




# पाकिस्तानचे जन्मरहस्य

Genesis of Pakistan


by : Vasant Nagarkar




अनुवाद

श्री. माधव लिमये





अखंड भारताची फ़ाळणी ही सर्वच भारतियांच्या मनात ठसठसणारी वेदना आहे. जगात अनेक देशांच्या फ़ाळण्या झाल्या आणि नंतर ते जोडलेही गेले. गेल्या शंभर वर्षांतील जगाचा भुगोल पाहिला तर जगाचा नकाशा जवळपास दरवर्षी बदलत असतो. कालचे मित्र आजचे कट्टर शत्रू होतात आणि पुन्हा मित्र होतात. राजकारणात कायमचे शत्रू किंवा मित्र कधी नसतात. याला अपवाद भारत आणि पाकिस्तानचा. खुद्द भारताचा नकाशा गेल्या चारशे वर्षांत वारंवार बदलत राहिला. या सर्व इतिहासाचा आणि सांस्कृतिक उलथापालथींचा वेध अत्यंत संयमाने आणि अभ्यासपूर्वक घेणारं हे पुस्तक आहे. कारण भारताची फ़ाळणी हे एकट्या दुकट्या व्यक्तीच्या मनाने आणि दोन चार बैठकींत झाली हे शक्य नाही. त्यामागे बरीच मोठी व गुंतागुंतीची पार्श्वभूमी आहे. आणि ही सर्व गुंतागुंत या पाचशे पानी ग्रंथामध्ये उलगडून दाखवण्यात आली आहे.

महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाने हे पुस्तक इंटरनेटवर विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. हे पुस्तक आपण जास्तीत जास्त लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवण्यासाठी आपण मदत कराल अशी अपेक्षा आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

# पाकिस्तानचे जन्मरहस्य

"GENESIS OF PAKISTAN" या पुस्तकाचा अनुवाद

३२७

लेखक: श्री. वसंत नगरकर
अनुवाद: श्री. माधव लिमये

महाराष्ट्र राज [illegible] संस्कृती मंडळ, मुंबई

# पाकिस्तानचे जन्मरहस्य

# पाकिस्तानचे जन्मरहस्य


लेखक

व्ही. व्ही. नगरकर

अनुवादक

माधव लिमये



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ,
मुंबई

प्रथमावृत्ती : १९८८

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ,
मुंबई-४०० ०३२.

© महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ.

मुद्रक :
व्यवस्थापक,
येरवडा कारागृह मुद्रणालय,
पुणे-४११ ००६.

किंमत : रुपये ३१.००

# प्रस्तावना

'आस्पेक्ट्स ऑफ मॉडर्न इंडियन हिस्टरी' (आधुनिक भारताच्या इतिहासाची अंगोपांगे) या संकल्पित ग्रंथमालेपैकी हा पहिला खंड वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. भारतीय समाजाचे संपूर्ण परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया ब्रिटिश अंमलात सुरू झाली आणि ती अद्यापही चालूच आहे. त्याचबरोबर ब्रिटिश सत्तेने परस्पर विरोधी शक्तींना मुक्तद्वार करून दिले व त्या कार्यप्रवण केल्या. या शक्ती एकमेकींवर आघात-प्रत्याघात करीत आल्या आहेत. त्यांतील बऱ्याचशा घटना आपल्या डोळ्यांदेखत घडलेल्या असल्यामुळे त्यांच्या एकूण परिणामांची संपूर्ण अटकळ अद्याप आपल्याला येऊ शकलेली नाही. तथापि, आधुनिक इतिहासाचे सम्यग् आकलन करून घेण्यासाठी आपल्याला त्यांचे विविध पैलू तपासून पाहिले पाहिजेत.

पाकिस्तानची निर्मिती कशी झाली. यासंबंधी अनेक पुस्तके यापूर्वीही प्रसिद्ध झाली आहेत. असे असताना त्याच विषयावर पुन्हा आणखी एक पुस्तक प्रकाशित करण्याची गरज का भासावी याचा खुलासा प्रस्तुत लेखकाकडून अपेक्षित आहे. १९४२ साली कॉलेजला रामराम ठोकून मी 'भारत छोडो' आंदोलनात उडी घेतली, तेव्हापासून मी या विषयात रस घेत आलो आहे. पुढे १९४५ साली तुरुंगातून सुटल्यानंतर मी पुन्हा कॉलेजात जाऊ लागलो तरी त्याबरोबरच मी त्यावेळच्या युवक आणि कामगार चळवळींतही सक्रिय सहभाग घेऊ लागलो होतो. इतर अनेक हजारो विद्यार्थ्यांप्रमाणे पुन्हा एकदा सामुदायिक चळवळ सुरू होईल अशी मी मोठ्या आतुरतेने वाट पाहत होतो. परंतु अशी चळवळ सुरू झाली नाही. त्यामुळे माझी घोर निराशा झाली. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. परंतु भारताच्या फाळणीच्या पाठोपाठ झालेल्या अमानुष कत्तली आणि लक्षावधी कुटुंबांची झालेली वाताहत यामुळे स्वातंत्र्य मिळाल्याच्या माझ्या आनंदाला गालबोट लागले. त्यावेळेपासून भारताची फाळणी का व कशी घडून आली यासंबंधी अनेक मित्रांच्याबरोबर तर्कचिकित्सेच्या स्वरूपातील चर्चेत मी ओढला गेलो. मौलाना आझाद यांचे 'इंडिया विन्स फ्रीडम' आणि डॉ. राम मनोहर लोहिया यांचे 'गिल्टी मेन ऑफ इंडियाज पार्टिशन' या दोन पुस्तकांच्या वाचनामुळे या विषयासंबंधीची माझी आस्था अधिक जागृत झाली. तथापि, या दोन्ही पुस्तकांत करण्यात आलेले विवेचन व काढण्यात आलेले निष्कर्ष यामुळे माझे समाधान होऊ शकले

नाही म्हणून इस्लाम व भारताचा आधुनिक इतिहास या दोन्ही विषयांवरील संशोधन स्वतःच हाती घेण्याचा मी निर्णय घेतला. अर्थात सरकारी नोकरीत असल्यामुळे त्या नोकरीतून सवड सापडेल तेवढाच वेळ मी माझ्या या नव्या छंदासाठी देऊ शकत असे.

दरम्यान दिल्ली विद्यापीठातील प्रपाठक आणि माझे एक जवळचे नातेवाईक डॉ. एम. ए. करंदीकर यांनी 'इस्लाम इन इंडियाज ट्रॅन्झिशन टू मॉडर्निटी' या आपल्या पुस्तकासाठी साहित्य जमा करण्यास सुरुवात केली होती. त्या-वेळेपर्यंत कुराण, मुसलमानी धर्मशास्त्र आणि मुसलमान धर्माचा सुरुवातीचा इतिहास यांच्या अभ्यासाच्या बाबतीत मी बरीच प्रगती केली होती. आम्ही दोघांनी मिळून या विषयावरील विपुल संदर्भ–साहित्याची छाननी केली. तो अनुभव फार मोलाचा ठरला.

१९४७ मधील फाळणीमुळे झालेला आघात, त्यावेळी सोसाव्या लागलेल्या प्रचंड मानवी यातना आणि पाकिस्तानच्या निर्मितीनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात उद्‌भवलेले संघर्ष यामुळे इतिहासतज्ञ आणि विद्वान यांच्यासकट जनतेच्या मनावर असा काही विपरीत परिणाम घडून आला की, विभाजनाला जबाबदार असलेल्या व्यक्ती शोधून काढून त्यांच्यावर दोषाचे खापर फोडण्याचा सैद्धांतिक प्रयत्नच सुरू झाला. पाकिस्तान निर्मितीपूर्वी घडून आलेल्या गुंता-गुंतीच्या घटनांबाबत इतिहासकारांना त्यांनी स्वीकारलेल्या संशोधन-निष्कर्षाच्या अपुरेपणामुळे समाधानकारक विवेचन करता आलेले नाही. १९४७ च्या आधीच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा कालखंडात भारतापुढे दोनच पर्याय उभे होते असा चुकीचा ग्रह त्यांनी करून घेतला होता. हे दोन पर्याय म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने अखंड अधिराज्य म्हणून राहाणे किंवा त्याची दोन स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रात विभागणी करणे. या गृहीतावर विसंबून त्यांनी चुकीचे प्रश्न उपस्थित केले आणि त्यातून साहजिकच असमाधानकारक उत्तरे निघाली. त्यांनी केलेले परिस्थितीचे मूल्यमापन सरधोपट आणि ढोबळ स्वरूपाचे होते किंवा फार तर असे म्हणता येईल की, ते अत्यंत अपुरे होते. काही लेखकांनी तर त्या काळात घडलेल्या घटनाक्रमाची अशी काही ओढाताण केली आहे की, त्यामुळे त्यांनी काढलेले निष्कर्ष अत्यंत विवेकशून्य ठरले आहेत. ऐतिहासिक अपघातांचा हास्यास्पद सिद्धांत भारतात फार लोकप्रिय असल्याचे आढळून येते. एकादी विशिष्ट चूक टाळता आली असती तर इतिहासाच्या प्रवाहाला अगदी निराळे वळण लागू शकले असते असे अनेकांना वाटते. एकादी घटना घडून गेल्यानंतर शहाणपणा सुचणे आणि अस्पष्ट आणि विकृत

दृष्टिकोनातून त्या घटनेबद्दल काही काल्पनिक अनुमाने बांधणे सोपे आहे. कार्यकारणभावासंबंधी या लेखकांच्या मनात फार मोठा गोंधळ उडालेला आहे. काही लेखकांनी गुंतागुंतीच्या घटनांबद्दल वस्तुनिष्ठ वृत्तांत दिला असल्याचा दावा केला आहे परंतु त्यांच्या प्रतिपादनाची काळजीपूर्वक छाननी केली असता असे दिसून येते की, वस्तुनिष्ठता म्हणून ते जिचा एवढा गाजावाजा करतात ती अगदीच नकली आहे. काही राजकारणी व्यक्तींनी फाळणीला कारणीभूत झालेल्या घटनांची संगती आपल्या मतानुसार लावून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. 'आत्मचरित्र' किंवा 'आठवणी' लिहिताना असा धोका नेहमीच संभवतो. 'क्षुद्र हेतूने प्रेरित झालेल्या क्षुल्लक व्यक्ती स्वतः फार मोठी भूमिका बजावीत असल्याचा आव आणतात' या डॉ. लोहियांच्या विधानातील सत्याची प्रचीती मला अशा लेखकांची आत्मचरित्रे वाचताना आलेली आहे.

या पुस्तकातील प्रतिपादनासाठी मी सरकारी अहवाल, त्या काळातील काही वृत्तपत्रांतील मजकूर, डॉ. एस. गोपाल, डॉ. एम. एन. दास यांच्यासारख्या विद्वानांनी त्यातील लहान लहान कालखंडाचा केलेला तपशीलवार अभ्यास प्रमुख व्यक्तींची भाषणे आणि लेख, सत्ता संक्रमण (दि ट्रॅन्स्फर ऑफ पॉवर) या राणी सरकारच्या अहवालातील गुप्त दस्तऐवजांचे पहिले चार खंड इत्यादींचा आधार घेतलेला आहे. तथापि, (१) श्री. नृपेंद्रनाथ मित्रा यांनी संपादित केलेले दि इंडियन अॅन्युअल रजिस्टर, (२) सैयद शरिफुद्दिन पीरजादा यांनी 'फौंडेशन ऑफ पाकिस्तान : ऑल इंडिया मुस्लिम लीग डॉक्युमेन्टस्—१९०६ ते १९४७' या नावाच्या संपादित आणि प्रकाशित केलेल्या पुस्तकातील ऑल इंडिया मुस्लीम लीगच्या वार्षिक सभांचे वृत्तांत, (३) (मध्यवर्ती) कायदेमंडळ आणि प्रांतिक कायदेमंडळे यातील चर्चा, (४) सायमन कमिशनसारख्या इंडियन स्टॅट्यूटरी कमिशनचा अहवाल व त्यासोबत प्रसिद्ध झालेले निरनिराळे खंड, (५) गोलमेज परिषदेच्या तीन अधिवेशनांचे अधिकृत वृत्तांत, (६) लॉर्ड वॅव्हेल यांचे दि व्हाइसरॉयज जर्नल अशा ग्रंथातील मजकुरांचा उपयोग करताना या त्या ग्रंथातील पृष्ठ क्रमांकाचा मात्र मी उल्लेख केलेला नाही. पुस्तकात दिलेल्या तारखा आणि संदर्भ यावरून मुळात ते कोठून घेतले ते चौकस वाचकांच्या सहज लक्षात येऊ शकेल. पानोपानी तळटीपा किंवा संदर्भसूची द्याव्या लागू नयेत म्हणूनच केवळ हे टाळले आहे. दैनंदिन घटनांची तारीखवार नोंद, प्रमुख राजकीय घडामोडी, महत्त्वाच्या राजकीय पक्षांची अधिवेशने आणि यांच्या इतर बैठकींचे वृत्तांत, निरनिराळ्या कायदे मंडळात झालेल्या चर्चा, ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारतासंबंधी झालेल्या चर्चा इ. विविध विषयांवरील संदर्भ

साहित्य यांचा एकत्रित संग्रह करून आधुनिक इतिहासाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरेल असे महाप्रचंड कार्य नृपेंद्रनाथ मित्रा यांनी करून ठेवले आहे. त्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि त्यांची विद्वता पाहून आपण आश्चर्य-चकित होऊन जातो. फौंडेशन्स ऑफ पाकिस्तानचे संपादन करणाऱ्या पीरजादा यांना देखील आपल्या पुस्तकात मुस्लीम लीगच्या अनेक अधिवेशनांचे वृत्तांत देताना ते इंडियन अॅन्युअल रजिस्टरमधून जसेच्या तसे उद्धृत करावे लागले आहेत.

पुस्तकातील निरनिराळ्या प्रकरणांना जे मथळे दिले आहेत त्यामुळे वाचकांची अडचण होण्याचा संभव आहे. काही प्रकरणातील मजकूर त्यांना दिलेल्या मथळ्यापुरताच संबंधित नसल्याने ही अडचण निर्माण झाली आहे. महत्त्वाच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीचे नीट आकलन व्हावे म्हणून घटना जसजशा घडत गेल्या त्यांच्या क्रमवारीत बदल होऊ द्यावयाचा नाही यावर माझा कटाक्ष होता. त्यामुळे त्या कालखंडात घडलेल्या इतरही अनेक घटनांची माहिती मला द्यावी लागली आहे. साहजिकच प्रकरणाला अन्वर्थक असा मथळा देणे ही अनेकदा मोठीच डोकेदुखी होऊन बसे. प्रत्येक प्रकरणातील कालखंडात जी महत्त्वपूर्ण घटना घडली असेल ती निवडून तिच्या अनुरोधाने त्या प्रकरणाला मथळा देणे असा तोडगा मी त्यावर काढला आहे.

अनेक वाचकांना आणि टीकाकारांना प्रमुख व्यक्तींच्या भाषणातील व लेखातील जे लांबलचक उतारे उद्धृत केले आहेत ते कंटाळवाणे वाटण्याचा संभव आहे. परंतु अशा प्रदीर्घ उताऱ्यांमुळे निरनिराळ्या व्यक्तींच्या विचार प्रक्रियेवर चांगला प्रकाश पडू शकतो असे मला आढळून आले आहे. विस्तार भयास्तव प्रदीर्घ उतारा देण्याऐवजी दुसऱ्या पुस्तकातील एकादेच वाक्य किंवा त्यातील काही भागच तेवढा उद्धत करण्याचा मोह काही लेखकांना टाळता येत नाही, परंतु त्यामुळे ते जे निष्कर्ष काढतात ते अगदी चुकीचे ठरतात.

गेल्या काही वर्षात अनेक मित्रांनी व विद्वानांनी या पुस्तकातील विषया-संबंधी माझ्याशी चर्चा करण्याचे सौजन्य दाखविले आहे. त्यापैकी वेळात वेळ काढून माझी टंकलिखिते तपासून ज्यांनी मला मोलाच्या सूचना केल्या आहेत. त्यांच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यास माझ्याजवळ शब्द नाहीत, मात्र या पुस्तकात व्यक्त केलेली मते ही माझी स्वतःचीच आहेत. मी भारत सरकारच्या नोकरीत असलो तरी आधुनिक भारताच्या माझ्या या अभ्यासात त्या गोष्टीला योगायोगापेक्षा दुसरे कसलेही महत्त्व नाही. गेली कित्येक वर्षे रात्ररात्र

जागून मी जे परिश्रम घेतले त्याचे फलित म्हणजेच हे पुस्तक होय. त्यात व्यक्त झालेल्या मतांचा सरकारच्या अधिकृत विचारसरणीशी अर्थाअर्थी कसलाही संबंध नाही.

या पुस्तकाची टंकलिखिते, त्याचप्रमाणे मुद्रिते तपासण्याच्या कामी ज्या मित्रांनी मला साहाय्य केले त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. पुस्तकात चुका राहू नयेत म्हणून मी शक्य तितकी दक्षता घेतली असली तरी का ी चुका अनवधानाने राहून गेल्या असण्याचा संभव आहे. त्या कोणी माझ्या नजरेस आणून दिल्या तर त्या मी आनंदाने सुधारीन.

**व्ही. व्ही. नगरकर**

मुंबई, मे १९७५.

---

# मनोगत

माझे मित्र श्री. वसंत नगरकर यांनी लिहिलेले पाकिस्तानचे जन्मरहस्य (Genesis of Pakistan) हे मूळ इंग्रजी पुस्तक प्रथम १९७५ साली प्रसिद्ध झाले. श्री. नगरकर हे १९४२ च्या आंदोलनात माझ्या बरोबर भूमिगत होते, त्याचप्रमाणे ते माझ्या बरोबरच मुंबईस पूज्य साने गुरुजी, नानासाहेब गोरे, शिरूभाऊ लिमये इत्यादी अनेकांसमवेत पकडले गेले. प्रथम स्थानबद्ध म्हणून आणि नंतर महाराष्ट्र कटाच्या खटल्यातील आरोपी म्हणून आम्ही येरवडा कारागृहात एकाच बराकीत होतो. श्री. नगरकर हे एक बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते आणि चळवळ ओसरल्यानंतर त्यांनी मध्येच सोडलेले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले व इंडियन पोलीस सर्व्हिसमध्ये ते भरती झाले. चळवळीत असतानापासून भारतातील हिंदू-मुसलमानांचा प्रश्न व मुसलमान धर्माची मूलतत्त्वे हा त्यांच्या खास अभ्यासाचा विषय होता. आणि सरकारी नोकरीत शिरल्यानंतरही त्यांनी तो चालूच ठेवला. आधुनिक भारताच्या इतिहासाच्या विविध अंगावर प्रकाश टाकणारी एक ग्रंथमाला ते लिहीत असून प्रस्तुत ग्रंथ हे त्यातील पहिले पुष्प आहे. या पार्श्वभूमीवर श्री. नगरकरांचे हे पुस्तक मराठी भाषिकांपर्यंत पोहचावे व त्याचा मराठी अनुवाद करण्याची संधी शक्यतो आपल्याला मिळावी असे मला फार उत्कटतेने वाटले. श्री. नगरकर यांच्याकडून अनुवादाच्या परवानगीबाबत अडचण येण्याचा काही संभव नव्हता. परंतु इतके मोठे पुस्तक प्रकाशित करणारा मराठी प्रकाशक मिळणे दुरापास्त होते. तथापि, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने ती जबाबदारी स्वीकारली आणि पुस्तक अनुवादासाठी माझ्याकडे दिले.

मी केलेला अनुवाद स्वत: श्री. नगरकर यांच्याकडून तपासून घेऊन तो मी साहित्य आणि संस्कृति मंडळाला सादर केल्यालाही आता ५–७ वर्षे उलटून गेली. परंतु मंडळाच्या अनेक अडचणींमुळे तो छापून प्रसिद्ध होण्यास इतका विलंब लागला. उशीरा का होईना, एक अत्यंत उपयुक्त व अभ्यासपूर्ण पुस्तक मराठी वाचकांच्या हाती पडत आहे ही आनंदाची बाब आहे.

भारताची फाळणी हा राजकीय निरीक्षकांप्रमाणेच सर्वसामान्य जनतेच्याही अत्यंत जिव्हाळ्याचा विषय बनला होता. प्रत्यक्ष फाळणी झाल्यानंतर माणुस-कीला काळीमा फासणाऱ्या ज्या अनेकानेक घटना घडल्या, हजारो निष्पाप

जीवांच्या कत्तली झाल्या, लक्षावधी कुटुंबे देशोधडीला लागली व जातीय दंगलींचा अगडोंब उसळला, त्यामुळे देशातील वातावरण अत्यंत प्रक्षुब्ध झाले होते. या फाळणीला जबाबदार कोण ? भारत अखंड ठेवणे शक्य झाले असते किंवा नाही ? ही फाळणी टाळता आली नसती का ? हे प्रश्न सर्वांना सतावीत होते आणि प्रत्येकजण आपआपल्यापरीने त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्नही करीत होता. त्यामुळे साहजिकच या विषयावर लहान मोठी अशी अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. परंतु त्यातून या प्रश्नांचा नीट उलगडा होत नाही हे श्री. नगरकर यांनी आपल्या पुस्तकात साधार दाखवून दिले आहे. अनेक लेखकांची व इतिहासकारांची याबाबतची भूमिकाच कशी सदोष होती व त्यामुळे त्यांनी काढलेले निष्कर्षही कसे चुकीचे होते, त्यावरही, श्री. नगरकर यांनी चांगला प्रकाश टाकला आहे. पाकिस्तान निर्मितीबद्दल जनतेच्या मनात जो गोंधळ होता तो नाहीसा करून प्रत्यक्ष वस्तुस्थितीची यथार्थ जाणीव होण्यास श्री. नगरकर यांचे हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे.

पाकिस्ताननिर्मितीनंतरही पहिले काही दिवस अनेकजण अखंड भारताची स्वप्ने पाहात होते आणि एक ना एक दिवस भारत पुन्हा अखंड बनेल अशी आशा ते बाळगून होते. परंतु पाकिस्तानची निर्मिती ही वस्तुस्थिती आहे ही गोष्ट आता बहुतेकांना मान्य झाली असून एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून जनता पाकिस्तानकडे पाहू लागली आहे. भारतीय नेत्यांनी सुरुवातीपासूनच पाकिस्तानकडे एक शेजारी मित्रराष्ट्र म्हणून त्याच्याशी संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला व त्या राष्ट्राला सतत शेजारधर्माची वागणूक दिली असा जनतेला अनुभव येत गेला. परंतु पाकिस्तानने मात्र या भावनेला जराही प्रतिसाद दिला नाही व शत्रुराष्ट्र म्हणूनच भारताशी वर्तन केले याचा भारतीय जनतेच्या मनात मोठा राग आहे. बांगला देशाच्या निर्मितीच्यावेळी तर भारताने तेथील जनतेच्या इच्छेला मान देऊन फार मोठी मदत केली पण त्या देशाचेही भारताबरोबरचे संबंध सलोख्याचे नाहीत. पाकिस्ताननिर्मितीच्यावेळी मुस्लिम लीग जे आडमुठेपणाचे धोरण अवलंबीत असे तसेच आज स्वतंत्र पाकिस्तानच्या निर्मितीनंतरही तेथील राज्यकर्ते अवलंबीत आहेत अशी भारतातील सर्वसामान्य नागरिकांच्या मनातील भावना आहे. हे असे का होत आहे ? भारतीय नेते मुत्सद्देगिरीत कमी पडत आहेत की स्वप्नरंजनातून ते अद्याप बाहेर आलेले नाहीत ? का बड्या राष्ट्रांच्या सत्तास्पर्धेत भारत-पाकिस्तानची प्यादी सरकवली जात आहेत व आपले नेते त्या कारवायांना बळी पडत आहेत ? भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांच्या प्रगतीसाठी त्या दोन देशात मैत्रीचे

संबंध असणे व दोन्ही देशातील जनतेत सामंजस्य असणे आवश्यक आहे. परंतु खलिस्तानवादी दहशतवादापासून प्रत्येक बाबतीत पाकिस्तानी राज्यकर्ते भारताच्या अडचणींचा जास्तीत जास्त फायदा उठविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

या पुस्तकाने पाकिस्तानचे जन्मरहस्य ज्याप्रमाणे भारतीय जनतेला उलगडून दाखवून एक महान कामगिरी बजावली आहे त्याप्रमाणेच भारत-पाकिस्तान-मधील आजच्या राजकारणाचे धागेदोरे उलगडून त्यातील समस्यांच्या निरुपणा-साठी देखील श्री. नगरकरांनी एकादा नवा ग्रंथ प्रसिद्ध करावा अशी अपेक्षा वाचकांनी बाळगली तर ती अस्थानी म्हणता येणार नाही.

या पुस्तकाचा अनुवाद करताना माझे ज्येष्ठ मित्र श्री. बाळासाहेब देशपांडे यांनी अनेक मोलाच्या सूचना केल्या व माझे हस्तलिखित अत्यंत काळजीपूर्वक तपासून दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**माधव लिमये.**

नाशिक, १ ऑगस्ट १९८८.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | भारतीय इतिहासातील विरोधाभास .. .. | १ |
| २ | ब्रिटिश राज्यकर्ते आणि अश्रफ यांचे गूळपीठ .. | २४ |
| ३ | प्रतिस्पर्धी शक्तिकेंद्र : अश्रफ .. .. | ३९ |
| ४ | मतभेदांना जातीय स्वरूप आले .. .. | ५५ |
| ५ | मुस्लीम लीगची स्थापना .. .. | ७१ |
| ६ | जातीयवादाची वाढ .. .. | ८५ |
| ७ | लखनौ करार आणि खिलाफत चळवळ .. .. | १०० |
| ८ | मुस्लीम जातीयवादाशी तडजोड हानीकारक ठरली .. | ११६ |
| ९ | माँटफर्ड सुधारणांचा प्रस्ताव .. .. | १३४ |
| १० | समझोत्याचे प्रयत्न-१ .. .. | १५१ |
| ११ | समझोत्याचे प्रयत्न-२ .. .. | १६४ |
| १२ | फुटीरवादी राजकारणाचे विश्लेषण .. .. | १८१ |
| १३ | प्रदीर्घ सामुदायिक लढ्यातील राष्ट्रवादी मुसलमानांचे स्थान. | १९६ |
| १४ | सरकार व जातीयवादी राजनिष्ठांकडून अलाहाबाद कराराला मूठमाती. | २१५ |
| १५ | मुस्लीम जातीयवाद्यांच्या नेतृत्वपदी जीना .. | २३० |
| १६ | जीनांचे काँग्रेस विरूद्ध युद्ध .. .. | २४६ |
| १७ | काँग्रेसवर दुहेरी भडीमार .. .. | २६५ |
| १८ | लाहोरचा ठराव .. .. | २८३ |
| १९ | जीनांचे भारताच्या विच्छेदनाचे स्वप्न .. .. | ३०४ |
| २० | भारताच्या भूमीत अनेक अल्स्टर्स घुसवण्याची कारवाई. | ३२३ |
| २१ | जीनांचा छिन्नविच्छिन्न पाकिस्तानला नकार .. | ३४४ |
| २२ | सार्वत्रिक निवडणुकीत लीगचा अभूतपूर्व विजय .. | ३६७ |
| २३ | भारताच्या ऐक्यासाठी मंत्रिमंडळाचा मसुदा .. | ३८७ |
| २४ | भंगलेले स्वप्न .. .. .. | ४१३ |
| २५ | छिन्नभिन्न पाकिस्तानचा जीनांकडून स्वीकार .. | ४४० |
| २६ | उपसंहार .. .. .. | ४६२ |

## प्रकरण पहिले

# भारतीय इतिहासातील विरोधाभास

मध्यवर्ती सत्तेचा अधूनमधून होणारा उदय, तसेच तिचे स्थैर्य आणि ऱ्हास, त्याचप्रमाणे प्रादेशिक सुभेदारांचा अभ्युदय यांनी हिंदुस्थानचा इतिहास भरलेला आहे. तेराव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात इल्तमशने संघटित केलेल्या साम्राज्याचा तैमूरने पाडाव केला त्याच्या काही वर्षेच आधी दख्खन आणि गुजराथच्या सुलतानांची सत्ता प्रस्थापित झाली होती. लोदी राजघराण्याने पुन्हा साम्राज्याची घडी बसविली परंतु दक्षिणेतील सुलतानांचा बीमोड ते करू शकले नाहीत. मोगल सम्राटांना आपल्या साम्राज्याची उभारणी करण्यास जवळजवळ शंभर वर्षे लागली. संबंध द्वीपकल्प आपल्या साम्राज्याला जोडून घेण्यासाठी सुरू केलेल्या जवळपास पाव शतकाच्या प्रदीर्घ मोहिमेच्या अखेरीस १७०७ साली औरंगजेब मरण पावला. त्याची ही मोहीम विफल ठरली. कारण त्याच्या मृत्यूनंतर मराठा, जाट आणि ईस्ट इंडिया कंपनी यासारख्या सत्ता जोरावर आल्या. निझाम आणि इतर अनेक प्रांताच्या सुभेदारांनी आपण स्वतंत्र असल्याचे जाहीर करून टाकले. १७६५ साली प्लासीची लढाई जिंकल्यापासून पुढे ८४ वर्षे सबंध हिंदुस्थान आपल्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीला प्रदीर्घ लढा द्यावा लागला. परंतु ईस्ट इंडिया कंपनीने पंजाब प्रांत जिंकून घेतल्यानंतर सात वर्षाच्या आतच ब्रिटिश पार्लमेंटने कंपनीचा कारभार आपल्या ताब्यात घेतला आणि कंपनीने हिंदुस्थानात प्रस्थापित केलेल्या साम्राज्याचे जतन करण्याची जबाबदारी स्वतःकडे घेतली. ब्रिटिशांची ही सत्ता फक्त ९० वर्षे टिकून राहिली आणि त्यानंतर देशाची त्रिविध स्वरूपाची विभागणी झाली.

आधुनिक भारताचा इतिहास अनेक विरोधाभासाने भरलेला आहे. कंपनीची सत्ता होती तोवर जवळजवळ सतत जुनी सरंजामशाही कंपनीबरोबर लढाया देत राहिली होती. त्यातील अनेक लढाया मुसलमानांच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या होत्या. या लढायांमुळे जेरीस आलेल्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अनेकदा असे उद्गार काढलेले आहेत की, हे मुसलमान ब्रिटिश सत्तेशी कधीही एकनिष्ठ राहू शकणार नाहीत. याउलट मुख्यतः हिंदू व्यापाऱ्यांतून नव्याने उदयास आलेला मध्यमवर्ग खंबीरपणे कंपनीच्या पाठीशी राहिला. कलकत्त्यातील शेलक्या हिंदूंनी तर कंपनीला विजय मिळावा म्हणून प्रार्थना केल्या आणि पुढे १८१८ त मराठ्यांचा पाडाव केल्यानंतर विजयोत्सव साजरे केले. १८५७ साली शिपायांनी केलेल्या उठावांच्या

वेळी शेवटचा मोगल सम्राट हा त्यांना आपला शूर शिरोमणी वाटत होता. हिंदुस्तानची सत्ता ब्रिटिश पार्लमेंटकडे गेल्यानंतर त्यांना असे आढळून आले की, कंपनीच्या कारकीर्दीत मुख्यत: हिंदूंमधील जो उच्चभ्रू वर्ग उदयास आला होता त्याची सरकार विषयीची निष्ठा हळूहळू कमी होऊ लागली होती आणि कंपनीने स्वत:च जी उदारमतवादी विचारसरणी हिंदुस्थानात प्रसृत केली होती त्यापासून स्फूर्ती घेऊन येथे एतद्देशीय मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित करण्याचा ते प्रयत्न करू लागले होते. तर उलटपक्षी सरंजामदार वर्गातील बंडखोरांचे जे अवशेष उरले होते तेच आता वासाहतिक सत्तेचे प्रमुख पाठीराखे बनले होते. स्वत:ला अरब, पर्शियन किंवा तुर्क या जेत्यांचे वंशज समजणाऱ्या मुसलमानांचा किंवा एकनिष्ठ अश्रफांचा अशा पाठिराख्यांत समावेश होता. एकसंघ भारतीय राष्ट्रवाद उदयास येऊ पहात असताना त्याल शह देण्यासाठी एकोणिसावे शतक संपण्यापूर्वीपासूनच एकनिष्ठ अश्रफांनी द्विराष्ट्र-सिद्धांताचा पुकारा करण्यास सुरवात केली होती. ब्रिटिश पार्लमेंटची प्रत्यक्ष सत्ता हिंदुस्तानात सुरू झाल्यानंतर सुशिक्षित मुसलमानांचा नवा वर्ग निर्माण झाला होता १९३० ते १९४० च्या दरम्यान त्यांनी अश्रफांचे नेतृत्व कायमचे झुगारून दिले, परंतु त्याचबरोबर त्यांनी द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचे अगदी शेवटचे टोक गाठले.

हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की, ज्या जीनांनी पाकिस्तान निर्मितीच्या लढ्याचे नेतृत्व केले त्यांनी या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धान्ताला अगदी शेवटी मान्यता दिली होती. याउलट ज्या राजनिष्ठ अश्रफांनी मुळात हा सिद्धांत प्रसृत केला होता त्यांनी मात्र १९४० मध्ये तो त्याज्य ठरवला. अनेक व्हॉईसरॉयांकडे, इतकेच नव्हे तर १९४६ साली इंग्लंडहून आलेल्या कॅबिनेट मिशनपुढेही गयावया करून त्यांनी अशी विनवणी केली की, ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी हा देश सोडून जाऊन आम्हाला लांडग्यांच्या तोंडी देऊ नये. बंगालमधील फजलूल हक यांनी १९४० सालच्या लाहोर अधिवेशनात मांडलेल्या मुख्य ठरावात देशाची तिहेरी फाळणी करून उत्तर आणि वायव्य प्रांताचे एक आणि पूर्वेकडील प्रांताचे एक अशी दोन सार्वभौम मुसलमान राष्ट्रे निर्माण करावीत असे सुचविले होते. त्यानंतर सहा वर्षांनी म्हणजे १९४६ साली मुस्लीम लीगच्या नवनिर्वाचित खासदार आमदाराच्या ऐतिहासिक अधिवेशनात बंगालमधील फजलूल हक यांचे प्रतिस्पर्धी सुऱ्हावर्दी यांनी असा मुख्य ठराव मांडला की, देशाची फाळणी तीन ऐवजी दोन भागातच करावी. या ठरावावर केलेल्या सुरवातीच्या भाषणात सुऱ्हावर्दी यांनी ही गोष्ट स्पष्ट केली की, पाकिस्तान ही काही मुसलमानांची अखेरची मागणी नव्हे. ती सर्वात अलीकडची मागणी आहे इतकेच. पुढे एक वर्षाच्या आत त्यांनी सार्वभौम बंगालच्या मागणीला पाठिंबा मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. बंगालच्या संकल्पित फाळणीविरुद्ध १९०५–१९०६ साली काँग्रेसने तीव्र स्वरूपाचा लढा दिला होता आणि अखेर १९११ साली फाळणी रद्द करून घेण्यात ती यशस्वी झाली होती. १९४६ साली त्याच काँग्रेस पक्षाने

संयुक्त बंगालची सूचना धुडकावून लावली आणि मुळात लॉर्ड कर्झन याने ज्या प्रकारे बंगालची फाळणी करावयाचे योजले होते त्याच धर्तीवर बंगालची फाळणी झाली पाहिजे असा आता आग्रह धरला. पुढे सुऱ्हावर्दीनंतर आलेले शेख मुजिबुर रहमान यांनी १९४६ सालची सुऱ्हावर्दींची दोन भागातील फाळणी ठोकरून लावून फजलूल हकयांनी १९४० साली सुचविलेली तीन भागातील फाळणी घडवून आणली. या विसंगतीमागील सूत्र शोधून काढण्याचा प्रयत्न पुढील पानांत करण्यात आला आहे.

पश्चिम आशियातून भारतावर स्वाऱ्या करून येणाऱ्यांची एक प्रदीर्घ परंपरा होती. परंतु अशा स्वाऱ्या करणारांशी ईस्ट इंडिया कंपनीचे कसलेच साम्य नव्हते. देशाच्या प्रशासनात आणि सामाजिक-आर्थिक जडणघडणीत कंपनीने हळूहळू क्रांतीकारी परिवर्तन घडवून आणले. या प्रक्रियेत अनेक मध्ययुगीन संस्था नामशेष होऊन गेल्या. भारताच्या इतिहासात प्रथमच नागरी प्रशासन अशी काही चीज अस्तित्वात आली. बंगालमधील मोगलांची जमाबंदीची व्यवस्था जाऊन त्या जागी कॉर्नवॉलिसने घालून दिलेली कायमधाऱ्याची पद्धत रूढ झाली. त्यामुळे पूर्वी सरकार आणि प्रत्यक्ष जमीन कसणारे शेतकरी यांच्या दरम्यान जो एक दलालांचा वर्ग असे त्यांच्या मधूनच जमीनदारांचा नवा वर्ग उदयास आला. वरिष्ठ अधिकाराच्या जागांबाबत युरोपीय लोकांची मक्तेदारी होऊन बसली. जुने धर्माधिष्ठित फौजदारी गुन्ह्यासंबंधीचे कायदे जाऊन त्यांची जागा निधर्मी कायद्यांनी घेतली. हे घडून येत असताना उमराव वर्गातील अश्रफ किंवा मराठे आणि त्यांच्या पदरी असलेले उच्च अधिकारी यांना आपले अधिकार आणि नोकऱ्या गमवाव्या लागल्या. ठगी पद्धतीचे निर्मूलन झाल्यामुळे व्यापार-उदीमाच्या वाढीसाठी आवश्यक असलेली शांतता देशात नांदू लागली. व्यापारी, सावकार इत्यादींची चलती सुरू झाली, त्यापैकी काही सावकारांना तर इंग्लिश बँका आणि व्यापारी कंपन्या यांचे भागधारकही करून घेण्यात आले. निधर्मी कायद्यांची संहिता पूर्ण होईपर्यंत काही जुने धर्माधिष्ठित कायदे चालू ठेवण्यात आले होते. त्यासाठी मुसलमानांच्या मदरसा किंवा हिंदूच्या पाठशाला यासारख्या धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळा कंपनी सरकारने जिकडे तिकडे सुरू केल्या होत्या. अशा शाळांमधून धर्मपंडिताचा पुरवठा होत राहावा व न्यायदानाच्या कामी त्यांचे साहाय्य मिळत रहावे असा त्यामागील हेतू होता.

इंग्रजीचे शिक्षण किंवा पाश्चात्य विज्ञान यांचा प्रसार करण्यासाठी कंपनी सरकारने खास असे प्रयत्न केले नाहीत. परंतु ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शाळांतून हे विषय शिकविले जात आणि नव्याने उदयास आलेला सधन मध्यमवर्ग आणि जमीनदार हे आपल्या मुलांना मोठ्या हौसेने अशा शाळात पाठवीत असत. १९ व्या शतकाच्या पहिल्या दशकात इंग्रजी आणि पाश्चात्य विज्ञान हे विषय शिकविणाऱ्या अनेक खाजगी शाळा बंगालमध्ये स्थापन झाल्या. १८१७ साली खाजगी संस्था म्हणून कलकत्त्याचे सुप्रसिद्ध हिंदू कॉलेज सुरू करण्यात आले. पाश्चात्य शिक्षणाचा हिंदू

समाजातील मध्यमवर्गीयांवर इतका जबरदस्त प्रभाव पडला होता की, नव्या सरकारी पाठशाळा सुरू करण्यास त्यांच्याकडून विरोध होऊ लागला. त्यासंबंधी विरोध दर्शविणाऱ्या आपल्या निवेदनात राजा राममोहन रॉय यांनी असे म्हटले होते की, ' संस्कृत पाठशाळांची पद्धती देशाला अंधारात ठेवण्याच्याच काय ती उपयोगाची आहे'. १९२८ पासून सरकारने धार्मिक शाळांतून इंग्रजी शिकविण्याची खास तरतूद केली आणि त्यानंतर दोन वर्षांनी सरकारी आणि अनुदानप्राप्त शाळांतून एतद्देशीय भाषांच्या अभ्यासाची सुरुवात झाली. १८३५ साली सरकारने अधिकृत भाषा म्हणून पर्शियन भाषेला असलेली मान्यता काढून घेतली. आणि इंग्रजी व एतद्देशीय भाषांना अधिकृत भाषांचा दर्जा दिला. १८३० पर्यंत निरनिराळ्या धर्माधिष्ठित कायद्यांच्या जागी सर्वांना सारखेच लागू पडतील असा निधर्मी कायद्यांच्या संहिता अंमलात आल्या होत्या. त्यामुळे न्यायदानाच्या कामी मदत करू शकतील अशा धर्मपंडितांचीही तितकीशी गरज उरलेली नव्हती.

हिंदू समाजातील दुष्टरूढींविरुद्ध ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सतत जो प्रखर प्रचार चालविला होता त्यामुळे पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या विचारी हिंदूंना आपल्या सामाजिक पद्धतीसंबंधी सखोल चिंतन करणे आवश्यक वाटू लागले. तेव्हापासून सामाजिक सुधारणा हा सुशिक्षितांनी अंगिकारलेल्या कार्यक्रमाचा एक नित्याचा भागच बनून गेला. बेकन, पेन, बेंथॅम आणि रुसो यांच्या ग्रंथांच्या वाचनाने स्वातंत्र्य आणि समता यासारखे विचार या सुशिक्षितांना अवगत झाले होते. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या अर्ध्या भागात वेडगळ समजुती, मूर्तीपूजा आणि इतर सामाजिक दुष्ट रूढीं-विरुद्ध अनेक चळवळी झाल्या. दक्षिणारंजन मुखोपाध्याय किंवा गोपाळ हरी देशमुख यांसारख्या ब्राह्मणांनी हिंदू धर्मातील पुरोहितशाही, जातिव्यवस्था, बहुपत्निकत्वाची चाल, बालविवाह, पुनर्विवाहास असलेली बंदी, परदेशगमन निषिद्ध मानण्याची रूढी यांसारख्या सामाजिक चालीरीतींविरुद्ध जोराची झोड उठविली. नव्याने उदयास आलेल्या वर्गाने सामाजिक सुधारणांची जी मोहीम सुरू केली होती तिची परिणती ब्राह्मो समाज आणि प्रार्थना समाज यांची स्थापना होण्यात झाली. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आधुनिकीकरणाचे जे युग सुरू केले होते त्यामुळेच राजा राममोहन रॉय, रामलिंगम, ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्यासारखे थोर समाज सुधारक निर्माण झाले.

ख्रिस्तो दास पॉल यांनी १८५६ मध्ये असे लिहून ठेवले आहे की, "या देशात अशी एक नवीच जात उदयाला आली आहे की, जिचे अगदी थोड्या दिवसांपूर्वी नाव-गावही कोणाला माहीत नव्हते....पाश्चात्य विद्याविभूषित अशा या पिढीने जुनाट रूढींच्या शृंखला तोडून टाकल्या असून ती आता बौद्धिक स्वातंत्र्याचा आग्रह धरू लागली आहे. खोट्या धर्माचा राक्षस गाडून टाकून धर्मशास्त्रावर आधारलेली भिक्षुकवर्गाची अरेरावी तिने झुगारून दिली आहे." पाश्चात्य शिक्षणामुळे फार मोठी राजकीय जागृतीही घडून आली. स्वातंत्र्य आणि समता यासारख्या संकल्पनांमुळे

इंग्रजी शिक्षण घेतलेल्या तरुणांत एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला. राजा राममोहन रॉय यांच्या विचारामधूनच त्यांच्यातील राजकीय जागृती विकसित होत गेली. त्यांनीच प्रथम न्यायदानात ज्यूरीची पद्धत, कायदेमंडळ, न्याय आणि अंमलबजावणी यांचे विभक्तीकरण, न्यायाधिशांच्या जागेवर हिंदी लोकांच्या नेमणुका, दिवाणी आणि फौजदारी खटले चालविण्यासाठी धर्मनिरपेक्ष न्यायालये आणि सार्वजनिक व्यवहारांची रीतसर नोंद यांसारख्या मागण्यांचा आग्रह धरला. सामाजिक विषमता आणि जाती वर्चस्वाविरूद्ध मोहीम चालवीत असतानाच शिकलेल्या तरुणांनी सरकारी नोकऱ्यांचे भारतीयीकरण, सरकारी खर्चाने सार्वत्रिक शिक्षण, आणि मुख्य म्हणजे जमीनदारांकडून होणाऱ्या छळवादापासून शेतकऱ्यांचे संरक्षण यासारख्या मागण्या पुढे रेटण्यास सुरवात केली. याच काळात सुशिक्षित भारतीयांनी अनेक वृत्तपत्रे सुरू केली. राजा राममोहन रॉय यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठीदेखील चळवळ सुरू केली. वृत्तपत्र स्वातंत्र्याचे समर्थन करताना त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, भारतातील विचारवंत नागरिकांना निरनिराळ्या प्रश्नांवरील आपले विचार व्यक्त करण्याची संधी फक्त वृत्तपत्रांच्या द्वारेच मिळू शकेल. एत्तद्देशीय भाषांतील वृत्तपत्रे तर एखाद्या प्रशासकाविरुद्ध नावनिशीवार टीका करण्यासही कचरत नसत. १८४३ साली द्वारकानाथ टागोर यांनी हिंदुस्थानातील प्रत्येक इलाख्याला ब्रिटिश पार्लमेंटवर आपले दोन प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असला पाहिजे अशी मागणी उठविली. त्यांचा मुलगा देवेंद्रनाथ टागोर यांनी देशासाठी मध्यवर्ती कायदेमंडळ असावे अशी मागणी केली होती. देवेंद्रनाथ यांची पुढे १८५१ च्या ऑक्टोबर महिन्यात नव्यानेच स्थापन झालेल्या ब्रिटिश इंडिया असोसिएशनचे चिटणीस म्हणून नेमणूक झाली होती. नेटिव्ह असोसिएशन ऑफ मद्रास आणि बॉंबे असोसिएशन यांनी देखील आपापल्या प्रांताकरता कायदेमंडळाची मागणी केली होती. ब्रिटिश इंडिया असोशिएशनने पार्लमेंटला सादर केलेल्या निवेदनात मध्यवर्ती कायदेमंडळाची स्थापना करण्यात यावी अशी मागणी केली होती. त्याचबरोबर त्या निवेदनात असेही नमूद करण्यात आले होते की ‘ज्यांच्या हाती राजकीय आणि अंमलबजावणीचे अधिकार केंद्रित झालेले आहेत अशा लोकांपासून ती अलग असली पाहिजे. इतकेच नव्हे तर, तिचे स्वरूप लोकाभिमुख असले पाहिजे, म्हणजेच जनतेच्या भावना तिच्यात प्रतिबिंबित झालेल्या असल्या पाहिजेत.’ पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीपुढे १८५२ साली ही मागणी विचारार्थ आली असता त्या समितीपुढे साक्ष दिलेल्या काही जणांनी असे दाखवून दिले होते की, गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवरील काही जागा भरून काढू शकतील अशा लायक हिंदी माणसांची या देशात मुळीच उणीव नाही. एफ्. जे. हॉलिडे यांनी देखील ही कल्पना उचलून धरली. परंतु त्यांनी अशी मेख मात्र मारून ठेवली की, हिंदू व मुसलमान यांच्यात फाटाफूट असल्याने कायदेमंडळातील प्रतिनिधित्वाची पद्धत अंमलात आणणे कठीण जाणार आहे. लॉर्ड एलनबरो यांनी

हिंदू व मुसलमान यांच्यासाठी कायदेमंडळाची दोन स्वतंत्र सभागृहे असावीत असे सुचविले. या कायदेमंडळांचे अधिकार त्या त्या समाजातील कायदे, रुढी आणि धर्म एवढ्या पुरतेच मर्यादित असावेत असे त्यांचे मत होते. त्यातही पुन्हा आपापल्या समाजापुरते देखील स्वतंत्रपणे कायदे करण्याचा अधिकार त्यांना असता कामा नये तर शासनाचे जे संकल्पित कायदे असतील त्यावर मुक्तपणे आपले विचार व्यक्त करण्यापुरतीच अशा कायदेमंडळाची व्याप्ती असावी असे त्यांचे मत होते. संयुक्त समितीपुढे नोंदल्या गेलेल्या साक्षीपुराव्याच्या आधारावर ब्रिटिश इंडिय असोसिएशनने एक लेखी निवेदन तयार केले, त्यात हिंदू आणि मुसलमान यांच्यासाठी स्वतंत्र कायदेमंडळाची स्थापना करण्याची कल्पना झिडकारून टाकण्यात आली आणि भारताच्या अंतर्गत प्रशासनाशी निगडित असलेल्या सर्व प्रश्नांवर चर्चा करण्याचा कायय मंडळाला अधिकार असला पाहिजे असा आग्रह धरण्यात आला होता. या बाबतीत हिंदू आणि मुसलमान यांच्या विचारात भिन्नता असण्याचा प्रश्नच नव्हता. पुरोगामी विचाराचे बंगाली अशा तऱ्हेने राष्ट्रवादाचा सिद्धांत पुढे मांडू लागले होते. सर्व मानव समान आहेत सर्वांना समान नागरिकत्व मिळाले पाहिजे या मागण्यांप्रमाणेच उदारमतवाद आणि धर्मनिरपेक्षता यावर त्यांचा भर होता. एका बाजूला जाती व्यवस्था व स्त्रियांची गुलामगिरी याविरूद्ध ते जी झोड उठवीत असत आणि दुसऱ्या बाजूच्या कोणत्य ना कोणत्या स्वरूपातील प्रातिनिधिक सरकार आणि त्याबरोबरच युरोपियनांबरोबरची समानता याची ते मागणी करीत असत तिचा मूलाधार देखील समानतेची संकल्पन हाच होता. १८५३ साली ईस्ट इंडिया कंपनीला देण्यात आलेल्या सनदेची मुदत वाढवून देताना कायदेमंडळाची मागणी पार्लमेंटने फेटाळून लावली तरी इंग्लंडमध्ये घेतल्या जाणाऱ्या हिंदुस्थानातील सनदी नोकरांच्या परीक्षांची दारे मात्र भारतीयांसाठी खुली केली.

ईस्ट इंडिया कंपनीबाबतची अश्रफांची प्रतिक्रिया मात्र यापेक्षा सर्वस्वी भिन्न होती त्यांच्याकडून कंपनीला प्रतिसाद असा तर मिळाला नाहीच, उलट नव्या राजवटीबद्दल ते अत्यंत प्रतिकूल आणि त्याचबरोबर उदासीन असत. त्याचे कारण असे होते की, कंपनी सरकारमुळे हिंदुस्थानातील मध्यवर्ती सत्तेचा जो ऱ्हास घडून आला होता त्याचप्रमाणे बिगर मुसलमानांच्या हाती सत्ता गेल्यामुळे मोगल साम्राज्याला जो धोका निर्माण झाला होता त्याबद्दल त्यांच्या मनात राग होता. त्यामुळे जुन्या विचारसरणीला चिकटून राहणेच त्यांनी पसंत केले.

दिल्लीच्या दरबारातील मनसबदारात राजकीय, वांशिक आणि गटबाजीच्या कारणावरून माजलेला बेबनाव, त्याचप्रमाणे निझाम, तसेच अर्कोट, बंगाल व औंधचे नबाब आणि रोहिले यांच्या सारख्या प्रांतिक सुभेदारांनी बळकावलेली सत्ता यामुळे दिल्लीच्या गादीवर नामधारी बाहुली बसविण्याची, दिल्ली दरबारातील सूत्रधारांना आयतीच संधी मिळाली. मंहमद शहा हा दिल्लीच्या गादीवर आल्यानंतर, स्वतःकडे स्वतंत्र सार्वभौमत्वाचे अधिकार घेण्यासाठी

दरबारातील या गटबाज सूत्रधारांचा बीमोड करण्याच्या बेतात असतानाच १७३९ साली इराणच्या नादीरशहाची स्वारी झाली व महमद शहावर मोठीच आपत्ती कोसळली. त्यानंतर गादीवर आलेले सम्राट हे केवळ नामधारी होते आणि बाहेरच्या मातबर व्यक्तींच्या लहरीवरच त्यांची सत्ता टिकणे न टिकणे अवलंबून असे. या काळात शहा अबदुर रहीमसारख्या अश्रफ धार्मिक नेत्याने नेतृत्वातील ही रुंदावत चाललेली पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करून पाहिला. आपल्या पुढारपणाखाली हिंदुस्थानात मध्यवर्ती सत्ता स्थापन करण्याच्या प्रयत्नात असलेल्या मराठ्यांविरुद्ध जेहाद पुकारण्यासाठी निझामाचे मन वळविण्याची त्याने खटपट केली. त्याचा मुलगा वलिउल्ला (मृत्यू १७६५) याने मुस्लीम सत्तेचा ऱ्हास थांबविण्यासाठी अत्यंत निर्धारपूर्व आटोकाटा प्रयत्न केले. मराठे आणि जाट यांच्याविरुद्ध धर्मयुद्ध सुरू करण्यास प्रांतिक सत्ताधाऱ्यांना उद्युक्त करण्याचे आपल्या वडलांचे धोरण त्याने नेटाने पुढे चालू ठेवले. त्याचप्रमाणे त्याने अनेक मुस्लीम राज्यकर्त्यांना पत्रे पाठवून मुसलमान साम्राज्याचा ऱ्हास का झाला त्याचे विवेचन करून आणि तो थांबविण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे त्यासंबंधीही उहापोह केला होता. त्याखेरीज त्याने लष्करी अधिकाऱ्यांना सैन्याची शिस्त व शिक्षण यांचा दर्जा सुधारण्याचाही सल्ला दिला होता. त्याने शासकीय अधिकाऱ्यांना आणि सुभेदारांना इस्लामी कायद्याचे कठोरपणे पालन करण्याचे आवाहन केले होते आणि धर्म विरोधी वर्तन करणारांशी दोन हात करण्याचा आणि सर्व बंडाळ्या मोडून काढण्याचा आदेश दिला होता. याशिवाय त्याने कुराणाचे पर्शियन भाषेत भाषांतर केले होते आणि निरनिराळ्या धर्मपंथात आणि विचारात सामंजस्य घडून येण्यास सहाय्यभूत होईल अशा तऱ्हेचे इस्लामचे विवरण करणारा नवीन ग्रंथही लिहिला होता. त्याच्या निरूपणानुसार इस्लाम ही भारतातील सर्व मुसलमानांची समान धार्मिक तत्त्वप्रणाली बनली होती. साम्राज्याच्या ऱ्हासाची धार्मिक दृष्टीकोनातून मीमांसा करताना त्याने हिंदूधर्मातून बाटून मुसलमान झालेल्यांना दोषी ठरविले होते. कारण मुसलमान ध स्वीकारल्यानंतरही ते आपल्या पूर्वीच्या रूढींना चिकटून राहतात आणि स्वत. तर त्यांचे पालन करतातच परंतु मुस्लीम समाजातही त्याचा प्रचार करतात असे तो प्रतिपादन करीत असे. अरब लोकांशी निकटचे संबंध राखून दैनंदिन जीवनात त्यांच्या इस्लामला प्रमाणभूत असलेल्या वर्तणुकीचे अनुकरण करण्याऐवजी भारतीय मुसलमान हिंदूंच्या संगतीने चालीरीती, रूढी, परंपरा इ. बाबतीत इस्लामने घालून दिलेल्या आदेशांकडे जवळजवळ डोळेझाक करतात. त्यांचा नैतिक दर्जा खालावला असून त्यांच्यातील कडवेपणाही कमी झाला आहे असे त्याचे मत होते. आणि यावर हिंदूची संगत सोडून देणे आणि त्यांचे सारे रीतिरिवाज, आणि रुढी, परंपरा यांचा त्याग करणे हाच त्याच्या मते उपाय होता. वलिउल्लाने आपल्या या कल्पनांचा अत्यंत जोमाने प्रचार चालविला होता. परंतु मुसलमान समाजाचे परिवर्तन घडून येण्यास प्रदीर्घ कालावधी लागणार

याची त्याला कल्पना येऊन चुकली होती त्याचप्रमाणे बादशहापासून तो सुभेदार, लष्करी अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांना पाठवलेल्या पत्रांना त्यांच्याकडून कसलाही प्रतिसाद मिळत नाही असे पाहिल्यावर मराठे आणि जाट यांच्याकडून साम्राज्याला जो धोका निर्माण झाला आहे, त्याचा बंदोबस्त करण्याची विनंती करणारी अनेक पत्रे, त्याने अफगाणिस्तानचा राजा अहमदशहा अबदाली याच्याकडे रवाना केली. मुस्लीम समाजातील वरिष्ठ वर्गाचे प्राबल्य म्हणजे खुद्द इस्लाममधे धर्माचे स्थैर्य अशी समजूत करून घेतल्यामुळे तो असे प्रतिपादन करू लागला की, या वर्गाच्या हातातील राजकीय सत्ता जाणे म्हणजे साक्षात इस्लामचाच अस्त होण्यासारखे आहे. अबदालीने मराठ्यांचा पराभव केला. परंतु मोगल साम्राज्याची नव्याने प्रस्थापना न करता तो नुसतीच लूट घेऊन परत फिरला याचे वलिउल्लाला जितके आश्चर्य वाटले तितकाच तो वैफल्यग्रस्तही झाला. त्यानंतर थोड्याच दिवसात अत्यंत निराशावस्थेत तो मरण पावला.

वलिउल्ला आणि त्याचे अनुयायी यांनी आपल्या समाजाला केलेल्या धार्मिक आवाहनाची ठिणगी पडल्यामुळे हिंदुस्थानातील जनसामान्यांच्या पातळीवरील समान संस्कृतीचा विध्वंस होण्याची प्रक्रिया सुरू झाली. उच्चभ्रूंच्या पातळीवर हिंदू आणि मुसलमान, आपापल्या स्वतंत्र जीवनपद्धती अनुसरीत असत. वरिष्ठ हिंदू वर्गापासून अलग पडू नये म्हणून मुस्लीम राज्यकर्त्यांचा वर्ग हिंदूंचे निरनिराळे सण सार्वजनिकरित्या साजरे करू देत असे. मुसलमानांतील अमीर उमराव दोन ईदी आणि मोहरम यांच्याप्रमाणेच हिंदूंच्या काही सणातही सहभागी होत असत. मुसलमानांतील सूफी आणि हिंदूंतील संत यांच्या शिकवणुकीमुळे सर्वसामान्य जनतेत दोन्ही धर्माच्या अनुयायांतील संबंध टिकून राहिले होते. मुस्लीम सूफी साधू आणि हिंदू संत यांच्या आध्यात्मिक विचारसरणीत तसा फारसा फरक नव्हता. अनेक मुसलमान हिंदू संतांना गुरु मानीत, तर अनेक हिंदू मुसलमान साधुंची भक्ती करीत. अमीर उमरावांप्रमाणेच सर्वसामान्य जनताही दोन्ही समाजातील नानाविध सणवार साजरे करण्यात उत्साहाने सहभागी होत असे. धर्मांतर केलेलेही आपल्या पूर्वीच्या जातीपाती, पूर्वग्रह आणि अंधश्रद्धा यांना चिकटून बसत त्यामुळे हिंदू आणि मुसलमान अशी तफावत जवळजवळ नसेच. हिंदुस्तानातील बऱ्याच भागात तेथील मुसलमान शरीयत ऐवजी हिंदू कायदाच पाळीत असत. मोपला समाजात वारसाच्या बाबतीत मातृप्रधान पद्धती रूढ होती तर दक्षिण कॅनरा आणि कोइमतूरमधील मुसलमान एकत्र कुटुंबपद्धतीच्या बाबतीत हिंदू कायद्याचेच पालन करीत. खोजा, कच्छी आणि हलाई मेमन त्याचप्रमाणे गुजराथेतील सुन्नी बोहरा हे देखील हिंदू कायदाच मानीत असत. पंजाबातील मुस्लीम शेतकरी आणि संयुक्त प्रांतातील तालुकदार हे देखील हिंदू वारसा कायदाच प्रमाण मानीत. शरियतचा कायदा उत्तर हिंदुस्थान आणि दिल्लीच्या आसपासचे अश्रफ यांच्यातच काय तो रूढ होता.

औरंगजेबाचा धर्मांधपणा आणि त्याने केलेला छळ याविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटल्या गेल्या होत्या. हिंदू व मुसलमान यात ऐक्य घडवून आणण्याची चळवळ म्हणून मुळात शिख पंथ निघाला. परंतु मोगलांकडून गुरू अर्जुनसिंग यांचा खून झाल्यानंतर त्याला स्वतंत्र धर्माचे स्वरूप प्राप्त झाले. पुढे गुरू गोविंदसिंग यांचा जो छळ करण्यात आला त्यामुळे तो लढाऊ बनला. औरंगजेबाची मराठ्यांविरुद्धची दक्षिणेतील मोहीम आणि संभाजी राजांचा त्याने हालहाल करून केलेला वध यामुळे मराठे उलट अधिक कडवे व लढाऊ बनले.

पानिपतच्या लढाईमुळे मराठ्यांची सत्ता दुर्बल झाली तरी त्यामुळे मोगल साम्राज्याची शक्ती मात्र वाढली नाही. उलट थोड्याच कालानंतर मराठ्यांच्यात पुन्हा आत्मविश्वास निर्माण झाला तर मोगल साम्राज्य मात्र अधिकाधिक दुर्बल होत गेले व त्यामुळे इंग्रज आणि फ्रेंच यांना आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षा पुढे रेटण्याची संधी मिळाली. बंगालच्या नबाबाविरुद्धच्या लढायांत सुरुवातीला मिळत गेलेल्या विजयानंतर ईस्ट इंडिया कंपनीने बक्सरची प्रतिष्ठेची लढाई जिंकली आणि खुद्द सम्राट शहा आलमलाच कैद केले. बंगाल, बिहार आणि ओरिसा प्रांताच्या दिवाणी कारभाराची सनद मिळाल्यानंतरच कंपनीने त्याची सुटका केली.

एकदा सत्ता हाती आल्याबरोबर ईस्ट इंडिया कंपनीला पैसा कमावण्याची हाव निर्माण झाली. त्यामुळे संपूर्ण राज्यकारभार आपल्या नियंत्रणाखाली आणणे, नबाबांना आणि बादशहाला द्यावयाचे वार्षिक तनखे बंद करून टाकणे आणि जमाबंदीची पद्धत काटेकोर बनवणे यासारख्या गोष्टी करण्यास कंपनी उद्युक्त झाली. जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्याची मोहीम हाती घेण्यात आली. महसुलाची बाकी चुकती करण्यासाठी अनेक थकबाकीदारांना आपल्या जमिनी विकून टाकणे भाग पडले. भारतात पहिल्या प्रथमच जमीन ही खरेदी-विक्री करता येण्यासारखी क्रयवस्तू बनली. नाईलाजाने जमिनी विक्रीस निघाल्यामुळे व्यापाऱ्यांना (त्यापैकी बहुतेक हिंदू असत) किमती पाडून अशा जमिनी गिळंकृत करण्याची संधी मिळाली. त्यातून व्यापारी जमीनदारांचा एक नवा वर्गच उदयाला आला. १७९३ साली जेव्हा कंपनीने कलकत्त्यात नव्या पोलीस दलाची प्रस्थापना केली तेव्हा बंगाल, बिहार आणि ओरिसा प्रांताच्या राज्यकारभारावर कंपनी सरकारची प्रत्यक्ष सत्ता प्रस्थापित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असे म्हणता येईल. त्या वर्षापासून सर्व वरिष्ठ पदे केवळ युरोपियनांसाठी राखून ठेवण्यात आली. त्याच वर्षी बंगालमध्ये कायमधारापद्धती लागू करण्यात आली. त्यामुळे जमीन महसुलाची नवी पद्धत रूढ झाली. पूर्वीचे मुसलमान, जमाबंदी अधिकारी, सरकार आणि प्रत्यक्ष कर वसूल करणारे यांच्यामधील दलाल म्हणून काम करीत असत. नव्या पद्धतीमुळे आता यांची जागा युरोपियन अधिकाऱ्यांनी घेतली. वर नमूद केल्याप्रमाणे, कर वसूल करणारांवर (त्यांच्यापैकी बहुसंख्य हिंदू होते) जमिनीचा धारा वसूल करून तो

सरकारात भरण्याची जबाबदारी सोपविण्यात आली व त्याबद्दल त्या जमिनीची वंशपरंपरा मालकी त्यांना बहाल करण्यात आली. प्रत्येक जमीनदाराने नेमका किती वसूला भरावयाचा तो त्याच्याकडे असलेल्या जमिनीचा दर्जा व क्षेत्रफळ यावरून ठरवून देण्यात आला. मुसलमान सरदार कुटुंबातील तरुणांना ब्रिटिश फौजेची दारे या पूर्वीच बंद करण्यात आली होती. १७९३ साली कंपनी सरकारने अंमलात आणलेल्या अशा तऱ्हेच्या उपाययोजनांमुळे बंगालमधील अश्रफ वर्गाच्या सत्तेचा पायाच खिळखिळा होऊन गेला.

वलिउल्लाची मुले आणि त्याचे अनुयायी बंगालमधील या घटना अगतिकपणे अवलोकन करीत होते. शेवटी १८०३ साली ईस्ट इंडिया कंपनीने मराठ्यांकडून दिल्ली जिंकून घेतली तो अंतिम फटका ठरला. शहा अब दुल अझीझ आणि बंगालच हाजी शरिअतुल्ला यांनी असे फर्मान काढले की, हिंदुस्तान हा आता दारुल इस्लाम (मुसलमानांची सत्ता असलेला आणि इस्लामिक शरीयत कायद्याचे प्रभुत्व असलेला देश) राहिलेला नसून तो दारुल हरब (मुस्लिम राजवटीची पुनर्स्थापना करण्यासाठी जेथील मुसलमानांनी युद्ध पुकारले आहे असे शत्रू राष्ट्र) बनला आहे. पुढे अनेक उलेमांनीही (धर्म पंडित) अशाच तऱ्हेचे फतवे काढून पाखंडी सत्ताधाऱ्यांविरुद्ध धर्मयुद्ध पुकारण्याचे मुसलमानांना आवाहन केले. शहा अबदुल अझीझ याने तर मुसलमानांना इंग्रजी न शिकण्याचा तसेच ब्रिटिशांच्या हाताखाली कारकून म्हणून नोकरीला न राहण्याचा सल्ला दिला. उलेमांनी पुढील पंधरा वर्षे हिंदुस्थानात पुनरपी मुस्लिमांचे नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी युद्धाची जोरदार तयारी करण्यावर आपले सारे लक्ष केंद्रित केले. हिंदूंचे रीतिरिवाज सोडून देण्याच्या प्रचारावर जोर देण्यात आला. शरिअतउल्लाची मजल तर इतक्या आचरटपणापर्यंत गेली की नवजात बालकाची नाळ सुइणीकडून कापून घेण्यासही तो विरोध करू लागला आणि ते पाप आहे असे सांगू लागला. आणि त्याचे कारण काय तर अरेबियांत नाळ कापण्याचे काम मुलाच्या बापाकडून केले जाते म्हणून ! दिल्लीच्या उलेमांनी पेशावर येथे खिलाफत स्थापन करण्याचे ठरविले. पेशावर त्यावेळी रणजितसिंगाच्या साम्राज्यात मोडत असे. एकाकाळचा पेंढाऱ्यांचा पुढारी पण पुढे जो मुस्लिम पंडित म्हणून प्रसिद्धीस आला अशा सैय्यद अहमद बरेलवी यांची त्यांनी इस्लामचा भावी खलिफा म्हणून निवड केली. त्याच्या विषयी त्यांनी अनेक दंतकथा प्रसृत करून त्या आधारावर साऱ्या देशात प्रचाराची धमाल उडवून दिली. १८२२ साली कलकत्ता-मार्गे सैय्यद अहमद बरेलवी मक्केच्या यात्रेला निघाला त्यावेळी दिल्लीपासून कलकत्त्या-पर्यंतच्या मार्गावर हजारो मुसलमानांनी या भावी खलीफाशी एकनिष्ठ राहण्याच्या शपथा घेतल्या.

मक्केला असताना वहाबी विचारसरणीची त्याच्यावर छाप पडली. वहाबी विचारसरणीचे लोक सूफी पंथाचा तिरस्कार करीत आणि स्वतः प्रेषित आणि

त्याच्या नंतरचे पहिले चार खलिफा यांच्या कारकिर्दीत अरबस्तानात ज्या कर्मठ परंपरा अस्तित्वात होत्या त्यांचे आजही पालन झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. वहाबी पंथ हा इस्लामी पुनरुज्जीवन झाले पाहिजे अशा मताचा होता. सातव्या शतकात अरबस्तानात प्रचलित असलेल्या विशुद्ध इस्लामी धर्माची पुनःस्थापना करण्यासाठी अरबस्तानातील आणि इतरत्रच्या मुसलमानांना उद्दीपित करण्याचा प्रयत्न वहाबी धर्मपंथाच्या लोकांनी चालविला. मक्केहून परत येताना सैय्यद अहमद ऑक्टोबर १८२३ मध्ये मुंबईला उतरला. एक वर्षापूर्वी दिल्लीहून कलकत्त्याला जाताना तो जसा गाजावाजा करीत गेला होता तसाच आता तो मुंबईहून दिल्लीला परतला. प्रत्येक ठिकाणी तो आपल्या अनुयायांना असे सांगत असे की, त्यांनी जी एकनिष्ठेची शपथ घेतली आहे तिला ते जागणार असतील तर त्यांनी हिंदूंच्या चालीरीती आणि रूढी यांचा त्याग केला पाहिजे इतकेच नव्हे तर (सूफी संतांच्या) पीरांना भजण्याचेही त्यांनी सोडून दिले पाहिजे. तसेच मोहरमचे ताबूत बनविण्याचे आणि झेंडे नाचविण्याचेही सोडून दिले पाहिजे. त्याच्या अनुयायांची संख्या खूप वाढली. पुढच्या वर्षी आपले ८,००० सशस्त्र अनुयायी घेऊन तो वायव्य सरहद्द प्रांतातील डोंगराळ भागात हजर झाला व त्याने तेथील निरनिराळ्या पठाण टोळ्यांना शिखांविरुद्धच्या धर्मयुद्धात आपल्याला येऊन मिळण्याचे आवाहन केले. सारे पाखंडी जग शुद्ध करण्याचे दैवी कार्य सैय्यद अहमदवर सोपविण्यात आले असल्याच्या प्रचाराचा एका मागोमाग एक असा अनेक टोळ्यांवर प्रभाव पडून त्या त्याच्या कच्छपी लागल्या. १८२६ च्या अखेरीस त्याने रणजितसिंगाविरुद्ध खरोखरीच धर्मयुद्ध पुकारले. १८३० साली त्याच्या सैन्याने पेशावर जिंकून घेतले आणि खलिफा म्हणून त्याची प्रतिष्ठापना केली. ज्याच्या लखलखीत जंबियामुळे पाखंड्यांचे निर्दालन होते असा 'न्यायी, धर्मरक्षक अहमद' अशी अक्षरे खोदलेली त्याच्या नावाची नाणी पाडून ती प्रसृत करण्यात आली. निरनिराळ्या पठाण टोळ्यांवर कर बसविण्यात आले परंतु त्याची खिलाफत फार दिवस टिकली नाही. रणजितसिंगाने धूर्तपणाने सैय्यद अहमदच्या हाताखालील सैन्यातील हिंदी मुसलमान आणि पठाण यांच्यात वितुष्ट घडवून आणले आणि पेशावरचा ताबा आपला मांडलिक असलेल्या मूळच्या सुभेदाराच्या हाती सुपूर्द करण्यास त्यास भाग पाडले. शीख सैन्याबरोबर युद्धाला तोंड लागलेले असतानाच सैय्यद अहमदच्या फौजेत सामील झालेली बरकझाइ नावाची पठाणांची एक सामर्थ्यवान टोळी त्याला सोडून गेली. त्या टोळीचा त्याने जो बदला घेतला त्यामुळे त्याच्या सैन्यात आणखीच दुही माजली. पठाणांच्या लग्न पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचा त्याने जो प्रयत्न केला त्याला पठाणांकडून चांगलाच विरोध झाला. त्यांची अशी समजूत झाली की सर्व अविवाहित पठाण मुलींची हिंदुस्थानी मुसलमान सैनिकांबरोबर लग्ने लावून देण्याचा सैय्यद अहमदचा इरादा आहे. त्यामुळे पठाणांनी त्याच्या हिंदुस्थानी अनुयायांची फार मोठ्या प्रमाणावर कत्तल केली. स्वतः

सैय्यद अहमदला आपला जीव वाचविण्यासाठी पळून जावे लागले. १८३१ साली बालाकोट येथे शीख सैन्याने त्याला आणि शहा महंमद इस्माइल याला आकस्मिकपणे गाठले आणि तेथे झालेल्या चकमकीत ते दोघेही कामास आले. परंतु तेवढ्याने धर्मयुद्धाचा शेवट झाला नाही तर त्यानंतर जवळजवळ चाळीस वर्षे ते धुमसतच राहिले.

शरिअतउल्ला याने देखील फराइझी चळवळ या नावाचे तशाच प्रकारचे आंदोलन सुरू केले होते. १८३० मध्ये शरिअतउल्लाचा चेला टिटू मीर यानेही फराइझी चळवळ सैय्यद अहमदच्या मुजाहिद आंदोलनात विलीन करून टाकली. सैय्यद अहमद-प्रमाणे त्याने देखील तटबंदी उभारली होती. १८३१ साली ब्रिटिश सैन्याच्या एका मोठ्या तुकडीने ती जमीनदोस्त करून टाकली. सैय्यद अहमदच्या मृत्यूनंतर उत्तर हिंदुस्तानातील निरनिराळ्या उलेमांनी त्याच्याविषयी नव्यानव्या दंतकथा प्रसृत केल्या. ते असा प्रचार करीत की, सैय्यद अहमद हा मेला नसून धुळीच्या लोटामधून अल्ला त्याला घेऊन गेला आहे आणि जगातील पाखंडयाविरूद्ध अखेरच्या धर्मयुद्धाचे नेतृत्व करण्यासाठी तो पुन्हा येऊन दाखल होणार आहे. प्रांतोप्रांती हिंडून त्यांनी या शेवटच्या जेहादसाठी स्वयंसेवक आणि निधी जमा करण्यासाठी रंगरुटांचे एक जाळेच निर्माण केले. वायव्य सरहद्द प्रांताबाहेर सित्ताना येथे एक नवा बालेकिल्ला उभारण्यात आला. किमान तीस वर्षेपर्यंत तरी हिंदुस्थानच्या पूर्वेकडील अगदी दूरदूरच्या कानाकोपऱ्यातून मुजाहिद चळवळीत सहभागी होण्यासाठी मुसलमान युवक सित्तानाला येत असत. बंगालमध्ये हाजी शरिअतुल्लाचा मुलगा दुदुमिया याने फराइझी चळवळीची सूत्रे आपल्या हाती घेतली. दुदुमिया याह्याअली आणि इतरांच्या मार्फत सित्तानबरोबर संपर्क राखून होता. त्याचप्रमाणे तो अधूनमधून जमीनदारांवर छापे घालून त्यांची लूटमार करीत असे. १८४६ पर्यंत तो अनेक उठाव देखील घडवून आणीत राहिला. १८४३ साली करण्यात आलेल्या खास अधिकृत चौकशीत असे आढळून आले की, मुजाहिदिन-फराइझी चळवळीकडे हजारो मुसलमान तरुण आकर्षित झाले होते आणि जेहादमध्ये सामील होण्याच्या त्यांनी शपथा घेतल्या होत्या. बंगालच्या पोलीस कमिशनरने आपल्या अहवालात असे नमूद करून ठेवले आहे की, या आंदोलनात तीस हजार अनुयायी सामील झाले होते.

१८४९ साली इंग्रजांनी पंजाब प्रांत जिंकून घेतल्यानंतर सित्तानाच्या नेत्यांनी खिश्चनांविरूद्ध उघड युद्ध सुरू केले. १८६० नंतर युद्धाच्या संघटकांवर आणि त्यांच्या साथीदारांवर कटाचे अनेक खटले भरण्यात आले आणि सित्तानाच्या मुख्य ठाण्याचा बीमोड करण्यासाठी अनेक मोहिमा हाती घेण्यात आल्या. १८७० च्या सुमारास सरहद्दीवर शांतता प्रस्थापित झाली. अशा प्रकारे हे धर्मयुद्ध जवळजवळ अर्धशतक चालू होते. या महान खटाटोपात हिंदुस्तानातील बहुतेक सर्व प्रांतातील मुसलमान सहभागी झाले होते. या प्रदीर्घ कालखंडात उलेमा नास्तिक लोकांविरूद्ध धर्मयुद्ध पुकारण्याच्या बाजूने प्रचार करीत राहिले, इतकेच नव्हे तर मुसलमान जनतेने

हिंदूंच्या रीतीभाती आणि रूढी-प्रथात सोडून द्यावेत येवढेच नव्हे तर त्यांच्याशी संगत सोबतही ठेवू नये असे ते सांगत राहिले. सर्वसाधारणपणे मुसलमानेतरांबद्दल ते द्वेषाची भावना पसरवीत आणि त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी धर्माचा आधार काढून देत. आंधळेपणाने धार्मिक पुढाऱ्यांमागे जाणाऱ्या मुजाहिदांच्या दृष्टीने हिंदू, शीख आणि ख्रिश्चन हे सगळे सारखेच काफीर होते आणि त्यात डावे-उजवे करण्याची त्यांची तयारी नव्हती.

डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांना व्हॉइसरॉयने भारतीय मुसलमानांवर एक ग्रंथ लिहिण्यास सांगितले होते. त्यांचा तो ग्रंथ १८७१ साली प्रसिद्ध झाला. त्या ग्रंथात त्याने असे नमूद केले आहे की, पोषाख, अभिवादन करण्याची पद्धत आणि इतर बाह्य गोष्टींच्य बाबतीत गेल्या चाळीस वर्षात मुसलमानांनी स्वतःला हिंदूपासून अलग करून घेतले आहे. त्यांच्या हाती सत्ता होती त्यावेळी त्यांना असल्या गोष्टींची कधीच जरूर भासली नव्हती. मुजाहिदांच्या चळवळीच्या प्रभावाने सांस्कृतिक क्षेत्रातही पृथक्‌पणा आला आणि सर्वसामान्य जनतेच्या पातळीवरील संमिश्र संस्कृतीची इतिश्री झाली. ही सांस्कृतिक अलगता १९ व्या शतकाच्या मध्याला प्रथम बंगालमध्ये घडून आली आणि तेथून हळूहळू ती इतर विभागात पसरत गेली.

एकोणिसाव्या शतकातील मुजाहिद चळवळ तशा तऱ्हेच्या इतर कोठल्याही चळवळी-पेक्षा दीर्घ काळ चालली होती. मुजाहिदांनी एक आदर्श खिलाफत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परंतु ती जेमतेम एक वर्ष टिकली. त्यांना शीखांचा बीमोड करता आला नाही किंवा ईस्ट इंडिया कंपनीचाही ते पराभव करू शकले नाहीत. जवळजवळ अर्धशतकापर्यंत चाललेला त्यांचा प्रदीर्घ संघर्ष निष्फळ ठरला. आपल्या शत्रूंचा पाडाव करण्याऐवजी त्या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या उलेमांनी हिंदू आणि मुसलमानांचे ऐक्य घडवून आणणाऱ्या समान संस्कृतीवर मात्र जोराचा आघात केला. भारताच्या दृष्टीने ती एक मोठीच आपत्ती ठरली व भावी काळावर त्याचा कायमचा परिणाम घडून आला. तथापि त्यांनी जो अभूतपूर्व लढा दिला त्यामुळे मन थक्क होऊन जाते आणि इस्लाम ही एक ज्वलंत शक्ती आणि प्रबळ तत्त्वप्रणाली असून सरहद्द प्रांतापासून तो बंगालपर्यंतच्या विस्तीर्ण भूभागात विखुरलेल्या व एकमेकां-पासून विभागलेल्या मुसलमानांत ऐक्य घडवून आणण्याचे सामर्थ्य तिच्या ठायी आहे याची पुन्हा प्रचिती आली. आपले ध्येय गाठण्यासाठी जरूर ते डावपेच आखण्याच्या आणि व्यूहरचना करण्याच्या बाबतीत जेहादचे नेते मोठे कुशल होते. सबंध उत्तर भारतातून स्वयंसेवक आणि पैसा जमा करण्याची जशी त्यांची कुवत होती त्याचप्रमाणे पूर्व बंगालपासून दोन हजार कि. मी. हून दूर असलेल्या सित्तानाला तो पोचता करण्याचे संघटना चातुर्यही त्यांनी दाखवून दिले. फराइझी चळवळीमागील आवाहनाचा शेतमजूर आणि पिळले गेलेले शेतकरी यांच्यावर प्रभाव पडून नास्तिक सत्ताधाऱ्यांविरुद्धच्या युद्धात स्वतःला झोकून देण्यास ते तयार होते.

१८५७ च्या प्रचंड बंडात मुजाहिद सामील का झाले नाहीत हे एक गूढच आहे. मात्र ते बंडात सामील झाले नाहीत ही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे. मुजाहिदांपैकी हजारो मुसलमान हे पिढ्यानपिढ्या त्यांच्या समाजातील गरीब वर्गापैकी होते आणि जुना प्रस्थापित वर्ग आता अगदी डबघाईला आल्यामुळे बंडखोर शिपायांच्या उठावात हिरीरीने सामील झाला असला तरी त्यामागे असलेल्या त्या वर्गाच्या उद्दिष्टाबद्दल या मुजाहिदांना कसलीही आस्था वाटत नव्हती हे तर त्यांच्या अलिप्ततेचे कारण नसेल? किंवा मुजाहिदांना आदर्श खिलाफत प्रस्थापित करावयाची असल्यामुळे त्या उत्साहाच्या भरात शेवटच्या मोगल बादशहाला पुन्हा गादीवर बसविण्यात त्यांना कदाचित रस वाटला नसेल.

मुजाहिदांकडून बंडाळ्या होत असल्या तरी देखील कंपनी सरकारने आपले विस्तारवादी धोरण जोमाने पुढे रेटण्याचे काम चालूच ठेवले होते. १८४२ साली सिंध प्रांत कंपनी सरकारच्या राज्यात समाविष्ट करून घेण्यात आला. त्या पाठोपाठ १८४८ साली सातारा, १८४९ साली पंजाब, १८५३ साली नागपूर आणि झाशी आणि शेवटी १८५६ साली अवध प्रांत कंपनीने आपल्या कबजात आणला. पेशव्यांच्या सारख्या जुन्या राजेरजवाड्यांचे तनखेही कंपनीने बंद करून टाकले. अशा तऱ्हेने पदच्युत केलेल्यांची संख्या वाढत चालली होती. जिंकून घेण्याला नवे प्रांतच आता शिल्लक न राहिल्यामुळे ब्रिटिशांच्या हिंदी फौजांना रजा देण्याचा प्रश्नही निर्माण झाला. अवध प्रांताने ब्रिटिश सैन्याला फार मोठ्या प्रमाणात रंगरूट पुरविले होते तो प्रांतच आता कंपनी सरकारने जिंकून घेतल्यामुळे सैन्य दलातील असंतोषात भर पडली. अशा परिस्थितीत सैनिकांना पुरविण्यात येणारी जी काडतुसे आधी दातांनी चावावी लागत असत त्यांना गायीची व डुकराची चरबी लावलेली असते अशी बातमी पसरली व त्यामुळे हिंदू आणि मुसलमान असे दोघेही खवळले. हिंदू-मुसलमान शिपाई बिथरून जावयास या तात्कालिक कारणाचे निमित्त झाले. या काडतुसाच्या प्रश्नावर १८५७ च्या जानेवारी महिन्यात बंगालात तुरळक उठाव घडून आले परंतु त्यावेळी अधिकाऱ्यांवर सार्वत्रिक असा हल्ला झाला नाही. संबंधित सैनिकांच्या तुकड्या विसर्जित करून टाकण्यात आल्या. १० मे १८५७ रोजी मीरत मधील ८५ सैनिकांनी ती संशयास्पद काडतुसे घेण्यास नकार दिला. त्यांना शासन करण्यासाठी कवायत मैदानावर त्यांना उभे करण्यात आले, त्यांचा लष्करी गणवेश काढून घेण्यात आला आणि कवायत मैदानावरच इतर सैनिकांच्या समक्ष त्यांना बेड्या ठोकण्यात आल्या. ज्यांनी हे अपमानास्पद दृश्य पाहिले ते इतर शिपाई आपापल्या बराकीकडे परत जाताना अन्यायाच्या भावनेने पेटले होते. रात्री शिपायांच्या तीन तुकड्यांनी बंड पुकारले. बंडाची ठिणगी पडली. जवळजवळ साऱ्या उत्तर आणि मध्य भारतात बंडाची ही वावटळ पसरली आणि ती शमण्यास जवळ जवळ दोन वर्षे लागली.

बंडाचा बीमोड झाला तरी इंग्रजी शिक्षण घेतलेल्या पुढाऱ्यांनी राजकीय सुधारणा-साठीचा आपला लढा चालूच ठेवला. १८६० साली कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्ये एक जाहीर सभा भरविण्यात आली होती. त्या सभेला हजर असलेले युरोपीय, हिंदू, मुसलमान, यहुदी आणि ख्रिस्ती या सर्वांनी एकमताने भारतात कायदेमंडळाची स्थापना करण्यात यावी असा ठराव पास केला. हिंदुस्तानात ही जी राष्ट्रीय जागृती होऊ लागली होती त्यामुळे वजनदार ब्रिटिश मुत्सद्यांचा तिळपापड झाला. १८६१ साली ब्रिटनच्या पार्लमेंटात इंडियन कौन्सिल संबंधीचा कायदा विचारासाठी आला त्यावेळी पार्लमेंटचे एक सभासद आयर्टन यांनी त्याला विरोध केला. त्यांचे म्हणणे असे होते की, परस्पर विरोधी असलेल्या हिंदू आणि मुसलमान समाजात एकच कायदेमंडळ निर्माण करण्यात आले तर, एक राष्ट्रीयत्वाची भावना बळावू लागेल आणि एकदा का एकराष्ट्रीयत्वाची भावना मूळ धरू लागली की ब्रिटिशांना हिंदुस्तानावरील आपला अंमल चालू ठेवणे अशक्य होऊन बसेल. परंतु सरकारच्या दृष्टीने हा प्रश्न तातडीचा नव्हता. सेक्रेटरी ऑफ स्टेट सर चार्लस वूड ६ जून १९६१ रोजी सभागृहाला उद्देशून असे म्हणाले की 'भाषा, धर्म, रीतीभाती, रूढी, परंपरा या सर्वच बाबतीत भिन्नता असलेल्या निरनिराळ्या वंशाच्या लोकांसाठी आपल्याला कायदा करावयाचा आहे. आपण भारताचे राज्यकर्ते असताना ब्रिटिशांनी आपली सत्ता बळकावली आहे अशी भावना असलेले कडवे मुसलमान जसे त्यात आहेत तसेच मुळात भितरट असलेले आणि प्रत्येक जेत्यांपुढे मान तुकविणारे हिंदूही तेथे आहेत. परंतु या हिंदूंचे एक वैशिष्ट्य आहे एरवी ते कितीही भित्रे आणि जी हुजूर प्रवृत्तीचे असले तरी पिढ्यान्‌पिढ्यापासून अविरतपणे चालत आलेल्या आपल्या जाती, धर्म, रूढी आणि परंपरा यांना ते तितक्याच कडवेपणाने चिकटून राहतात.' साम्राज्यवादी ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या मनात सतत जी चिंता डाचत होती तिचे या चर्चेच्या वेळी दर्शन घडून आले.

दि ब्रिटिश इंडिया असोसिएशनमध्ये मुख्य भरणा जमीनदारांचा होता. १८६१ साली भारतीय कायदेमंडळाचा कायदा पास झाल्यानंतर तिला सर्वस्वी राजनिष्ठ संस्थेचे स्वरूप प्राप्त झाले आणि सर्वसामान्य जनतेच्या मागण्यांना तिच्याकडून विरोध होऊ लागला आणि केवळ जमीनदारांच्या हितसंबंधाकडेच ती लक्ष पुरवू लागली. या कायद्यामुळे शांततेचे युग सुरू झाले असे म्हणता येणार नाही. देशात असंतोष खदखदतच होता. इंग्लंड ते भारत यांच्या दरम्यानच्या बोटीचा प्रवास कमी वेळात होऊ लागल्यामुळे भारतातील नेमणुकीकडे सनदी नोकर स्वतःची भरभराट करून घेण्याचे एक साधन म्हणूनच पाहू लागले. पूर्वीच्या सनदी नोकरांच्या मनात यापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात बांधिलकीची भावना वसत असे. जनतेबद्दलची कमालीची अनास्था त्याचप्रमाणे उबग आणणारी मग्रुरी यासारख्या तक्रारी नव्या सनदी नोकरांसंबंधी वाढत्या प्रमाणात येऊ लागल्या. ब्रिटिश मळेवाले आणि कारखानदार

आपली अरेरावी आणि उर्मटपणा यामुळे जनतेत अधिकाधिक अप्रिय होऊ लागले. शेतकरी आणि जवळजवळ गुलामासारखे राबावयाला मिळणारे मजूर यांच्या जोरावर ब्रिटिश मळेवाल्यांचा एक नवाच गबर वर्ग उदयास आला. हे मळेवाले निळीच्या लागवडीसाठी 'रयतेला' कर्जे देत. परंतु त्यांच्या अटी इतक्या जाचक असत की १८६० साली बंगालमधील तीन जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी निळीची लागवड करण्याच्या कराराचे पालन करण्याचे नाकारले. मळेवाल्यांनी याचा इतका धसका घेतला की आता देशात बंड झाल्यावाचून राहात नाही असे त्यांनी सरकारला कळविले. सरकारी अधिकाऱ्यांनी कायदेशीर कारवाई करावी लागेल असा धाक दाखवून शेतकऱ्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करून पाहिला आणि नंतर काही ठिकाणी दंगे उद्‌भवल्याची सबब पुढे करून कराराची सक्तीने अंमलबजावणी करून घेण्यासाठी त्या भागात सैन्य आणून ठेवले. निळीची लागवड करण्यास नकार देऊन एकाच जिल्ह्यातील चारशे शेतकऱ्यांनी कारावासाचा मार्ग पत्करला. देशातील शांततामय प्रतिकाराची ही पहिली चळवळ होय. तिच्यातून बिगर जमीनदार वर्गातील नवे नेतृत्व पुढे आले. निळीच्या आंदोलनातूनच बाबू विष्णूचरण विश्वास, दिगंबर विश्वास आणि शिशीरकुमार घोष हे शेतकऱ्यांचे प्रश्न धसास लावण्यास पुढे सरसावले. पुढे १८६८ साली शिशीरकुमार घोष यांनी अमृतबझार पत्रिका या नावाचे वर्तमानपत्र सुरू केले आणि त्यातून जमीनदारांप्रमाणेच ब्रिटिश सरकारवरही कडाडून हल्ले चढविण्यास सुरवात केली. शेतकऱ्यांबद्दलच्या आपल्या जबाबदारीकडे पाठ फिरविण्याच्या निंदास्पद कृत्यासाठी त्याने जमीनदारांना धारेवर धरले आणि आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतो हे त्यांचे म्हणणे उडवून लावले. बंडानंतरच्या दोन दशकात इंग्रजांनी स्थानिक नागरिकांचे काही खून केले होते. त्यामुळे, तसेच त्यांनी केलेल्या छळणुकीच्या अनेक प्रकरणांमुळे सबंध देशात खळबळ उडाली. व्हॉइसरॉय लॉर्ड लिटन याच्या कारकीर्दीत भारतीय नोकराचा खून केलेल्या एका इंग्रजाची किरकोळ दंडावर सुटका करण्यात आली. हायकोर्टाने देखील त्याची शिक्षा वाढविण्यास नकार दिला. या गोष्टीचा मनस्वी राग येऊन आरोपीच्या वर्तनाबद्दल त्याची जाहीर निर्भत्सना करणे, मॅजिस्ट्रेटला निलंबित करणे इतकेच नव्हे तर वायव्य (हल्लीच्या उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग) प्रांताचे सरकार आणि तेथील उच्च न्यायालय यावर टीका करणे लॉर्ड लिटनला भाग पडले

१८५७ च्या बंडानंतर सरकारने आपल्या सैन्यात दुपटीने वाढ करण्याचे ठरविले चिनी व अफगाणयुद्धामुळे भारत सरकारच्या तिजोरीवर फार मोठा ताण पडला होता. त्याखेरीज १८६८ नंतर सतत पडत गेलेल्या दुष्काळामुळे दुष्काळी कामे सुरू करणे भाग पडले होते. त्यामुळे आर्थिक परिस्थिती आणखीच बिकट झाली होती. अशा परिस्थितीत जनतेवर जादा करांचा बोजा लादणे सरकारला अपरिहार्य होऊन बसले. १८५९ साली प्रथम प्राप्तीवरील कर बसविण्यात आला. त्यानंतर आयात केलेले सुती कापड आणि इतर कारखानदारी वस्तूवरील जकातीत वाढ

करण्यात आली. सधन लोकांकडून प्राप्तीवरील कराला विरोध झाला तर मँन्चेस्टरच्या हितसंबंधियांनी सुती कापडावरील भारी जकातीबद्दल भारत सरकारला धारेवर धरले. १८७७ साली कॉमन्स सभागृहाने या जकाती उठविल्या. विद्यापीठातून पदवी घेतलेले तरुण मोठ्या संख्येने बाहेर पडू लागल्याने सुशिक्षित बेकारांचा प्रश्नही डोके वर काढू लागला. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांना सरकारला नोकऱ्या पुरविता येईनाशा झाल्या. भारतीय वृत्तपत्रांतून याबद्दलची सरकारविरुद्धची टीका अधिकाधिक कडक भाषेत व्यक्त होऊ लागली. आणखी एक बंड उद्भवणार अशी वदंता वारंवार पसरू लागली.

१८८० च्या फॅमिन कमिशनने आपल्या अहवालात असे नमूद केले की, जमीन धारण करणाऱ्यांपैकी जवळजवळ एक-तृतीयांश लोक कर्जात खोलवर बुडाले असून त्यांची यातून सुटका होण्याची शक्यता दिसत नाही; त्याशिवाय आणखीही जवळजवळ तितकेच लोक कर्जात आहेत परंतु त्यांची परिस्थिती अगदीच हाताबाहेर गेलेली नाही. पंजाबातील कॅनॉलच्या पाण्यावर शेती करणारे शेतकरी, बंगालमधील ज्यूट उत्पादक आणि मध्य भारतातील कापूस उत्पादक यांच्यातच थोडीफार सुबत्ता आढळते. सर्वसाधारणपणे मुंबई–दख्खन, मद्रास, वायव्य प्रांत, अवध, सिंध आणि गुजराथेतील बऱ्याच मोठ्या भागातील शेतकरी डबघाईला आलेला आहे.

जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जाची फेड करता न आल्यामुळे त्यांच्यावर दिवाणी दावे करून सावकारांनी हजारो एकर जमिनी घशाखाली घातल्या. १८७५ च्या आगेमागे मुंबईकडच्या दक्षिण पठारावर सावकारांवरील हल्ल्यांची अनेक प्रकरणे उद्भवली. शेती व्यवसाय तोटयाचा होऊन बसला होता आणि जमिनी मोठ्या प्रमाणावर ओस पडू लागल्या होत्या. नव्याने पाडलेल्या विहिरींवर सरकारने कर लादला होता त्यामुळे खाजगी विहिरींवरील बागायतीची मुस्कटदाबी होत होती. जंगलाची पुरेशी वाढ होत नसल्याने वारंवार दुष्काळ पडतात असे सरकारचे मत बनले होते, त्यामुळे वन कायद्याखाली मोठमोठ्या जमिनी सरकारने बंदिस्त करून टाकल्या. त्याचा परिणाम असा झाला की, त्या जमिनीवरील हजारो कुटुंबे निराधार बनली. सरकारविरोधी भावना आणखी तीव्र बनल्या.

भारतीय राजकारणात नव्याने पुढे येऊ लागलेले सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी १८७६ साली बंगालमध्ये इंडियन असोसिएशनची स्थापना केली. थोड्याच कालावधीत या नव्या संस्थेने ब्रिटिश इंडियन असोशिएशनला मागे टाकले. आनंद बझार पत्रिकेने बंगालवर त्या आधीच आपली छाप बसविली होती, मद्रासमध्ये नव्यानेच सुरू झालेल्या हिंदू या दैनिकाने अल्पावकाशातच उच्च वर्गीयांची मने आकर्षित करून घेतली. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी देशभर केलेल्या दौऱ्यांमुळे हिंदुस्तानातील निरनिराळ्या प्रांतातील राष्ट्रवाद्यांत घनिष्ट संबंध निर्माण झाले होते. सरकारी दडपशाहीमुळे सबंध देशात संतापाची एकच लाट उसळली आणि तिचा राष्ट्रव्यापी आविष्कार

झाला. अधिकारावर असलेल्या हुजूर पक्षापेक्षा इंग्लंडमधील प्रागतिक पक्षाचे लोक हिंदुस्थानात निर्माण होऊ पहात असलेल्या चिंताजनक परिस्थितीबाबत अधिक संवेदनाशील होते. प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या नियंत्रणाखालचे लोकशाही स्वरुपाचे सरकार स्थापन करण्याची कुवत निर्माण होण्यासाठी भारतीयांमध्ये शिक्षणाद्वारे इंग्रजी राजकीय विचारसरणी दृढ करणे ही ब्रिटिश राष्ट्राची नैतिक जबाबदारी आहे असे प्रतिपादन करणाऱ्या प्रागतिकांवर हुजूर पक्षीयांकडून टीकेची झोड उठविली जाई. १८८० साली हुजूर पक्षाचा पराभव होऊन ग्लॅडस्टन हा पंतप्रधान झाला. लॉर्ड लिटनच्या कारकिर्दीतली हानी भरून काढण्याचे त्याने ठरविले. यासाठी प्रागतिक विचारसरणीच्या लॉर्ड रिपनची त्याने व्हॉइसरॉय म्हणून नेमणूक केली. लॉर्ड रिपनने व्हरनॅक्युलर प्रेस ॲक्ट सारखे कायदे रद्द करून टाकले, स्थानिक स्वराज्य संस्था सुरू केल्या आणि युरोपीय व भारतीय गुन्हेगारांत कायद्याच्या संबंधातील भेदाभेद नष्ट करणारे इलबर्ट विधेयक मांडण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे लॉर्ड रिपन अल्पावधीतच लोकप्रिय बनला. या विधेयकान्वये युरोपीय गुन्हेगारांवरील फौजदारी खटले चालविण्याचे अधिकार भारतीय न्यायाधिशांना मिळणार होते परंतु या विधेयकाने भारतातील युरोपियन समाजात विरोधाचे एकच वादळ उठले. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना या विधेयकाविरुद्ध भडकावून दिले. युरोपियनांच्या दबावामुळे मूळचे विधेयक इतके पातळ करून टाकण्यात आले की त्यामुळे विधेयकाचा मूळ हेतूच नष्ट होवून गेला. युरोपीय समाजाकडून इलबर्ट बिलाला संघटितपणे जो विरोध झाला त्यामुळे भारतियांची राष्ट्रीय स्वरूपाची एकादी संघटना उभारण्याची हिंदी राष्ट्रवाद्यांना आवश्यकता भासू लागली. या विधेयकावर जोराचा वादविवाद सुरू असतानाच १८८३ साली कलकत्ता येथे पहिली राष्ट्रीय परिषद भरविण्यात आली. १८८५ साली स्थापन झालेल्या इंडियन नॅशनल कॉंग्रेसची ती नांदीच म्हणावी लागेल.

लॉर्ड रिपन यांच्या जागी आलेले नवे व्हॉइसरॉय डफरिन यांनी ह्यूम यांची इंडियन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना करण्याची सूचना उचलून धरली. इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे 'हर मॅजेस्टीज ऑपोझिशन' या नावाने ओळखला जाणारा अधिकृत विरोधी पक्ष असतो त्याप्रमाणे भारतात विरोधी पक्षाची कामगिरी बजावणारी एकादी संघटना अस्तित्वात नाही असे त्यांना आढळून आले व सरकारला वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या मतांवर सर्वस्वी विसंबून राहाता येणार नाही. त्यामुळे भारतातील राजकीय विचारवंतांनी दरवर्षी आपली अधिवेशने भरवून प्रशासनातील उणीवा सरकारच्या निदर्शनास आणून देणे आणि त्यावर उपाय सुचविणे ही कल्पना चांगली असल्याचे त्याने प्रतिपादन केले. १८८५ साली भरलेल्या कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात ज्या मागण्या मांडण्यात आल्या त्या जवळपास १८७६ मधील सुरेंद्रनाथ बानर्जींनी स्थापन केलेल्या इंडियन असोसिएशनने केलेल्या मागण्यांप्रमाणेच होत्या.

१८८३ साली भरलेल्या राष्ट्रीय परिषदेनेही त्याच मागण्या केल्या होत्या. काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात पुढील मागण्या मांडण्यात आल्या : (१) भारतातील राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी भारतीयांना पुरेसे प्रतिनिधित्व असलेले रॉयल कमिशन नेमण्यात यावे, (२) सर्व राजकीय सुधारणांची सुरुवात म्हणून अस्तित्वात असलेले सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांचे कौन्सिल बरखास्त करण्यात यावे, (३) मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदेमंडळाचा विस्तार करण्यात येऊन त्यावर लोकनियुक्त प्रतिनिधींना पुरेसे स्थान देण्यात यावे, (४) ज्या प्रांतात अशी कायदेमंडळे नसतील तेथे ती सुरू करण्यात यावीत, (५) कायदेमंडळाच्या सभासदांना राज्य कारभारातील कोणत्याही बाबीसंबंधी कायदेमंडळात प्रश्न विचारण्याचा अधिकार असावा, (६) सर्व अंदाजपत्रके कायदे मंडळासमोर मांडली जावीत, (७) कायदे मंडळांनी राज्य कारभाराबाबतच्या काही प्रश्नावर निषेध औपचारिकरित्या नोंदविला तर त्यासंबंधी विचार करण्यासाठी कॉमन्स सभागृहाच्या स्थायी समितीची नेमणूक करण्यात यावी, (८) स्पर्धात्मक परीक्षा इंग्लंडप्रमाणेच भारतातही घेण्यात याव्यात, (९) लष्करी खर्चात कपात करण्यात यावी. इ. १८८६ साली काँग्रेसने अशी मागणी केली की, जनतेचे दारिद्रय दूर करण्याच्या दृष्टीने प्रातिनिधिक संस्था स्थापन झाल्या पाहिजेत. न्यायदान आणि अंमलबजावणी ही खाती अलग करावीत आणि न्यायालयात ज्यूरीपद्धत सुरू करण्यात यावी अशीही मागणी करण्यात आली. वरिष्ठ लष्करी पदांवर भारतीयांची नेमणूक करण्यात यावी, लष्करी शिक्षण देण्यासाठी देशात महाविद्यालय सुरू करण्यात यावे, तांत्रिक शिक्षणाची सोय उपलब्ध करण्यात यावी, भारतीय कारखानदारीला प्रोत्साहन मिळावे आणि हत्यारांचा कायदा रद्द करण्यात यावा इ. मागण्या १८८७ च्या काँग्रेसतर्फे करण्यात आल्या.

डफरीनच्या अपेक्षेपेक्षा तिच्या संस्थापकांचे विचार अगदी निराळे होते हे काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनापासूनच स्पष्ट होऊ लागले. साहजिकच सरकारची काँग्रेसवर खप्पा मर्जी झाली आणि या नव्या संघटनेच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण करण्यात येऊ लागल्या. सर सैयद अहमद खान यांनी युनायटेड इंडियन पेट्रिऑटिक असोसिएशन या नावाची प्रतिस्पर्धी संघटना स्थापन केली. या संस्थेचे ध्येय आणि उद्दिष्ट होते :— (१) काँग्रेसला विरोध असणाऱ्या हिंदू आणि मुसलमान सरंजामदारांचा दृष्टीकोन इंग्लिश लोकांच्या कानावर घालणे, आणि (२) ब्रिटिश शासन मजबूत करणे. निरनिराळे किताब धारण करणारे जमीनदार आणि इतर राजनिष्ठ मंडळींना त्यांनी या नव्या व्यासपीठावर एकत्र आणले. असोसिएशनच्या निरनिराळ्या सभा-बैठकींमधून काँग्रेसने केलेल्या मागण्यांना विरोध दर्शविणारे ठराव करण्यात येऊ लागले. नंतर ते ठराव अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटमधून प्रसिद्ध केले जात. १८८७ साली जोनपूर येथे भरलेल्या अशाच एका सभेत काँग्रेसबद्दल आम्हाला कसलीही सहानुभूती वाटत नसून ब्रिटिश सरकारवर आमचा संपूर्ण विश्वास आहे असे जाहीर करण्यात

आले. या सभेला बडेबडे ८०० लोक आले होते. हिंदू आणि मुसलमान जमीनदार-तालुकदार यांनी काँग्रेसविरुद्ध आधीच मोहीम उघडली होती. १८८८ च्या मे महिन्यात इंग्लिशमनच्या संपादकांना लिहिलेल्या पत्रात जोगेंद्रनाथ दास यांनी अराजनिष्ठ लोकांविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली होती. १८८८ च्या जुलैत भरलेल्या अवध प्रांतातील तालुकदारांच्या सभेत भाषण करताना कनवर दुर्गाप्रसाद यांनी असे सांगितले की, काँग्रेस ही राजद्रोही संघटना आहे. तर कर्नल नरिंद्र बहाद्दूर या दुसऱ्या एका तालुकदाराने असे जाहीर केले की, प्रातिनिधिक सरकारची कल्पना मूर्खपणाची आहे. भिंगाचे राजे उदय प्रतापसिंग यांनी तर 'लोकशाही भारताला सोयीची नाही' (Democracy not suited for India) या नावाचे पुस्तकच प्रसिद्ध केले.

बंगाली राष्ट्रवाद्यांनी स्वातंत्र्य, समता आणि समान नागरिकत्व या कल्पनांच्या आधारे भारतीय राष्ट्रवादाचा सिद्धांत विकसित केला होता. ज्या आधुनिक विचारसरणीतून राष्ट्रवादाचा उगम झाला होता ती आधुनिक विचारसरणी बंगाली जमीनदार राष्ट्रवादाचा जो अन्वयार्थ लावत होते त्यामुळे निष्प्रभ ठरणार होती कारण हिंदुत्ववाद हाच भारतीय राष्ट्रवादाचा आधार असू शकतो अशी भूमिका ते मांडू लागले. उदाहरणार्थ नभगोपाळ असे प्रतिपादन करीत की, ऐक्य प्रस्थापित झाल्याशिवाय राष्ट्रवादाची वाढ होऊच शकणार नाही आणि हे ऐक्य फक्त हिंदुत्ववादाच्या आधारावरच साध्य होऊ शकेल. नभगोपाळ हे हिंदू मेळा त्याचप्रमाणे नॅशनल सोसायटी या संघटनांचे एक संस्थापक होते. अक्षयचंद्र सरकार यांचे मत असे होते की, भूभाग, धर्म, भाषा आणि पेहराव या राष्ट्रीय ऐक्यासाठी अत्यावश्यक असलेल्या चार मूलभूत बाबींपैकी भारतात फक्त भूभाग ही एकच बाब विद्यमान आहे. विविधतेतून ऐक्य साधण्याच्या बाबतीत हिंदू धर्म आणि त्यांतील निरनिराळे पंथ सहाय्यभूत ठरले असले तरी हिंदुस्तानात राष्ट्रीय ऐक्य घडवून आणण्याच्या बाबतीत इस्लाम धर्म हा मोठाच अडथळा ठरला आहे. बंगालमधील राजनिष्ठ हिंदू जमीनदार राष्ट्रवादासंबंधी जो विचार मांडीत तो १८८० साली सर सैयद यांच्या नेतृत्वाखालील मुस्लीम अमीर उमरावांच्या द्विराष्ट्र सिद्धांताला पूरक असाच होता. बंगालमधील जमीनदारांनी एके काळची सामाजिक सुधारक म्हणून असलेली आपली परंपरा हळूहळू सोडून दिली. वायव्य प्रांतातील हिंदू जमीनदार हे तर परंपरावादी सनातनी म्हणूनच प्रसिद्ध होते. १८८७ च्या डिसेंबरमध्ये मद्रास येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनानंतर थोड्याच दिवसात बनारसच्या महाराजांनी एका सभेत असा पुकारा केला की, जातीपद्धती हा हिंदू धर्माचा गाभा असून प्रातिनिधिक संस्थांचा पुरस्कार करणे हे हिंदू धर्मावरील निष्ठेचा अधिक्षेप करण्यासारखे आहे कारण खालच्या जातीतील व्यक्तीची उच्चाधिकारपदी नियुक्ती झाली तर त्याचे आदेश मानणे वरिष्ठ जातीतील हिंदू माणसाला कधीही पसंत पडणार नाही.

१८७५ साली झालेली आर्य समाजाची स्थापना हा आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा समजला जातो. पाश्चिमात्य शिक्षण घेतलेल्या भारतीयांच्या प्राचीन धर्मग्रंथाच्या अभ्यासामुळे एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला प्राच्यविद्या शास्त्रात पारंगत असलेल्या पाश्चात्यांनी चालविलेल्या संशोधनाबद्दल त्यांच्या मनात नवे कुतूहल निर्माण झाले होते. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धकातील समाज सुधारकांनी जुन्या हिंदू परंपरा सर्वस्वी त्याज्य ठरविल्या होत्या आणि त्यामुळे ज्यावर हिंदूधर्माची सारी उभारणी झालेली होती त्याचा पायाच त्यांनी जवळपास उखडून टाकल्यासारखे झाले. परंतु पाश्चात्य विद्वानांच्या संशोधनाने वेद आणि उपनिषदे यांना नवी प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. कलकत्ता, मुंबई आणि मद्रास शहरांच्या परिसरातील पाश्चात्य विद्या विभूषितांपैकी ज्यांना हिंदूंचा वारसा सर्वस्वी त्याज्य आहे असे वाटत नव्हते त्यांना पाश्चात्य विद्वानांनी प्राचीन धर्मग्रंथांचे जे पुनरुज्जीवन केले त्यामुळे नवा दिलासा मिळाला. त्यापैकी सर्वचजण सनातनी परंपरावादी होते असे नाही. स्वामी दयानंदांसारखे काहीजण तर हिंदू समाजात क्रांतिकारी सामाजिक सुधारणा घडवून आणणे ही अत्यंत निकडीची बाब आहे असे मानीत असत. दयानंदांनी पुन्हा वेदांची कास धरण्याचे आवाहन केले. पुनरुज्जीवनाचेच ते आवाहन होते. वहाबी पंथ पुनरपी कुराणाकडे वळण्याचे जे आवाहन करीत असे तशाच तऱ्हेची ही भूमिका होती. आदर्श वैदिक काळापासून आजच्या घडीपर्यंत हिंदू धर्मात आणि समाजात जो फाफटपसारा घुसला होता तो सर्व काढून टाकला पाहिजे असे स्वामी दयानंदांचे मत होते. वैदिक काळात जातिव्यवस्था अस्तित्वात नव्हती त्यामुळे आजच्या जातिव्यवस्थेला तावडतोब तिलांजली दिली पाहिजे असे ते कळकळीने सांगत. साहजिकच आर्य समाजाच्या झेंड्याखाली गोळा झालेल्या समाजसुधारकांच्या नव्या गटाचा सनातनी हिंदूंशी संघर्ष होवू लागला. एकोणिसाव्या शतकात जवळजवळ सबंध उत्तर हिंदुस्थानात इस्लामच्या पुनरुज्जीवनाची प्रचंड लाट उसळलेली प्रत्यक्ष दिसत असल्यामुळे हिंदू आणि मुसलमान पुनरुज्जीवनवाद्यांत झगडा निर्माण होणेही अपरिहार्य होते. आर्य समाजाचे नेते आणि उत्तर हिंदुस्तानातील पुनरुज्जीवनवादी उलेमा यांच्यात दीर्घकाळपर्यंत एकमेकांवर शाब्दिक हल्ले प्रतिहल्ले चढविण्यात त्याचे पर्यवसान झाले. वैदिक काळात गोरक्षण हे प्रत्येक हिंदूचे आद्य कर्तव्य समजले जात असल्यामुळे १८८० च्या दशकात आर्य समाजाच्या पुढाकाराने अनेक गोरक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे गाईच्या प्रश्नावरून त्या काळात अनेक हिंदू–मुसलमान दंगे घडून आले. थिऑसॉफिकल चळवळीचे प्रणेते मादाम ब्लॅव्हटस्की आणि कर्नल ऑलकॉट यांचे सहकार्य मिळत गेल्याने आर्य समाजाला एक नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली. आर्य समाजाची चळवळ प्रथम पंजाबात झपाट्याने फोफावत गेली आणि तेथून ती उत्तर हिंदुस्थानातील इतर भागातही पसरली.

या नंतरचा भारताचा इतिहास ब्रिटिश साम्राज्यशाही, काँग्रेस आणि हिंदू-मुसलमान जातीयवादी यांच्यात घडून आलेल्या झटापटींनी भरलेला आहे. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना भारत सोडून जावयाचे नव्हते आणि भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही ही गोष्ट त्यांनी अनेकवार स्पष्ट केली होती. भारतात स्वायत्त संस्थांचा हळूहळू विकास घडवून आणणे हे ब्रिटिशांच्या भारतविषयक धोरणाचे अंतिम उद्दिष्ट आहे अशी घोषणा १९१७ साली करण्यात आली होती. ब्रिटिश सरकारच्या धोरणात घडून आलेला पहिला महत्त्वाचा बदल म्हणून या घोषणेचा उल्लेख करावा लागेल. परंतु या बाबतीतही हा बदल हळूहळू घडवून आणला जाईल यावर सत्ताधाऱ्यांकडून भर दिला जाई. याचा अर्थ असा की, भारताचा स्वयंनिर्णयाचा अधिकार हे एक फार दूरचे स्वप्न होते आणि ते नेमके केव्हा साकार होणार याबद्दल कसलीच निश्चिती नव्हती. स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणारी काँग्रेस ही एकच संघटना नव्हती. दहशतवाद्यांचे काही तुरळक गटही हेच ध्येय बाळगून होते. स्वातंत्र्य लढ्याच्या सर्व कालखंडात सरंजामदारवर्ग हा बव्हंशी सरकारला खंबीरपणे एकनिष्ठ राहिला होता. त्यातही पुन्हा हिंदू जमीन-दारांपेक्षा मुसलमानातील अमीर उमराव हे सरकारला पाठिंबा देण्याच्या बाबतीत विशेष आग्रही होते. कारण त्यात मुसलमान जमीनदारांचे हितसंबंध अधिक गुंतलेले होते. ते आधुनिक काळात वावरत असले तरी पूर्वीच्या मोगल अमलाच्या आठवणी त्यांच्या मनातून जात नसत. वस्तुस्थिती तर अशी होती की अगोदरच्या शतकात नष्ट झालेल्या मोगल साम्राज्याचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नांवरच एकोणिसाच्या शतकाच्या पहिल्या अर्धकात त्यांचे सारे लक्ष केंद्रित झाले होते. पुन्हा सत्तेवर येण्याची स्वप्ने रंगवणारे मुस्लिम अमीर उमराव भारताच्या राज्यपद्धतीत लोक-प्रतिनिधींच्या तत्त्वाचा अंगिकार केला जावा या कल्पनेनेच धास्तावून गेले. आपली जमात देशात अत्यंत अल्पसंख्य आहे ही जाणीव प्रातिनिधिक संस्थांच्या विरोधाच्या मुळाशी होती. सरंजामशाही मनोवृत्तीची पार्श्वभूमी असलेल्या मुस्लिम आणि हिंदू अशा दोन्ही जातीयवाद्यांना प्रातिनिधिक संस्था जेवढ्या लांबणीवर टाकता येतील तेवढ्या हव्या होत्या आणि मतदानाच्या हक्कांचा विस्तार करण्यास तर त्यांनी शेवटपर्यंत विरोध केला. प्रातिनिधिक संस्था सुरू झाल्याशिवाय राहात नाहीत असे आढळून आल्यानंतर मुसलमान अमीर उमरावांनी धर्मावर आधारलेल्या राष्ट्रवादाचा सिद्धांत प्रसृत करून मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करण्यास सुरवात केली. आपण अल्पसंख्य आहोत या जाणिवेतूनच विशेषाधिकाराची ही मागणी पुढे आली होती आणि एकदा स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य झाल्यानंतर त्यांच्या भावी राजकारणाची दिशा स्पष्ट झाली.

दोन आघाडींवरच्या स्वातंत्र्य लढ्यामुळे स्वयंशासित संस्थांच्या विकासास गती देणे सरकारला भाग पडले. दुसरे महायुद्ध, आंतरराष्ट्रीय वातावरण, 'छोडो भारत'

आंदोलन, आझाद हिंद फौजेची स्थापना, नौदलातील आणि सशस्त्र दलातील एका गटाने केलेले बंड यामुळे भारतीय स्वातंत्र्य अपरिहार्य होवून बसले. १९३४ सालच्या सुमारास राजनिष्ठ अश्रफांना असे आढळून आले की, मुस्लिम समाजावर त्यांचे नेतृत्व राहिलेले नसून इंग्रजी शिक्षण घेतलेले बिगर अश्रफ आणि त्यांच्यातल्याच काहीजणांनी फुटीरवादी चळवळीचे नेतृत्व स्वतःच्या हाती घेतले आहे. ब्रिटिश सत्ताधारी भारत सोडून जाणार ही गोष्ट १९४६ सालात निश्चित होऊन चुकली होती. परंतु ते गेल्यानंतर भारत एकसंध राहणार की त्याच्या चिरफळ्या होणार येवढाच काय तो प्रश्न होता. १९३० पासून स्वातंत्र्य आंदोलनाला ब्रिटिश साम्राज्यशाही आणि मुस्लिम फुटीरवादी यांच्याप्रमाणेच स्वतःच्या संस्थानाचे सार्वभौम राज्यांत रुपांतर करून घेण्याची महत्वाकांक्षा बाळगून असलेल्या काही संस्थानिकांच्याही विरोधाला तोंड द्यावे लागत होते. त्या दशकाच्या अखेरीला मुस्लीम लीगवर जीनांनी आपले अप्रतिहत प्रभुत्व प्रस्थापित केले होते. त्यांनी ब्रिटिश हिंदुस्थानची फाळणी करण्याचा आग्रह धरला. फुटीरवादी आणि महत्त्वाकांक्षी संस्थानिकांना मद्रासमध्ये त्यांनी उघडउघड पाठिंबा दिला. अशा तऱ्हेने त्यांनी देशाच्या विघटनासाठी शर्थीचे प्रयत्न केले. १९४२ साली हिंदुस्थानात आलेले क्रिप्स मिशन हे भारतभूमीचे अनेक लहानलहान लचके पाडण्यासाठीच आले आहे असे गांधीनी त्याचे अगदी यथार्थ वर्णन केले होते. म्हणून भारताच्या फाळणीला कारणीभूत झालेल्या परिस्थितीबरोबरच हिंदुस्तानचे आणखी विभाजन करण्याचे प्रयत्न हाणून पाडून मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित करणे राष्ट्रीय आंदोलनामुळे कसे शक्य झाले त्याचाही आढावा आपल्याला घ्यावयाचा आहे. तसेच या देशात सहसा उपस्थित केला न जाणारा परंतु तितकाच महत्त्वाचा असलेला प्रश्न म्हणजे जीना रागारागाने केवळ फोलपट म्हणून ज्याची संभावना करीत त्या 'खंडित पाकिस्तानला' अखेर त्यांनी मान्यता कशी दिली त्यावरही प्रकाश पडेल.

## प्रकरण दुसरे

# ब्रिटिश राज्यकर्ते आणि अश्रफ यांचे गूळपीठ

ईस्ट इंडिया कंपनीने १८५७ सालचे प्रचंड बंड मोडून काढले परंतु मुजाहिदांची बंडाळी मात्र तिलाही पुरून उरली. १८५८ साली कंपनीने खूप मोठी फौज पाठवून सित्तान ताब्यात घेतले परंतु मुजाहिदांनी १८६३ मध्ये ते पुन्हा जिंकून घेतले. त्याच वर्षाच्या सप्टेंबर महिन्यात व्हॉइसरॉय लॉर्ड एलजिन याने सरहद्दीपलीकडील मुजाहिदांची ठाणी जिंकून घेण्यासाठी खूप मोठे सैन्य पाठवले. परंतु त्यात त्याला म्हणावे तसे यश आले नाही. त्यानंतर मुजाहिदांना मिळणारी कुमक व पैसा त्यांना मिळू न देण्याचा निर्णय सरकारने घेतला. हिंदुस्तानात राहून चळवळ चालविणाऱ्या मुजाहिदांच्या पुढाऱ्यांवर राजकीय कटांचे अनेक खटले भरण्यात आले. मुजाहिदांसाठी भारतात पैसा व स्वयंसेवक यांची जमवाजमव करणाऱ्या कित्येक उलेमांना जन्मठेपीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. सजा झालेल्या काही उलेमांची अपीले कलकत्ता हायकोर्टाच्या सरन्यायाधिशांनी फेटाळून लावली होती तर काही अपीले त्यांच्यापुढे सुनावणीस निघणार होती. सप्टेंबर १७८१ मध्ये अबदुल्ला नांवाच्या एका पंजाबी मुसलमानाने या न्यायाधीशांचाच खून केला. नंतर असे आढळून आले की तो वहाबी होता. दुसऱ्या एका मुसलमानाने १८७२ च्या फेब्रुवारीत व्हॉइसरॉय लॉर्ड मेयो याला ठार मारले. अर्ध शतकावर चाललेल्या मुसलमानांच्या या उठावामुळे हिंदुस्थानात नोकरी करण्यासाठी आलेले ब्रिटिश अधिकारी हैराण होऊन गेले. १८४३ मध्ये व्हॉइसरॉय लॉर्ड एलनबरो यांनी ड्यूक ऑफ वेलिंग्टन यांना असे लिहून कळविले होते की, 'मुसलमान समाज हा मूलतःच आपल्या विरोधात आहे अशी माझी खात्री झालेली आहे आणि या गोष्टीकडे मी दुर्लक्ष करू शकत नाही म्हणून आपले धोरण खरोखरी हिंदूंशी जमवून घेण्याचेच असले पाहिजे.' अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मते १८५७ च्या बंडाला मुसलमानच सर्वस्वी जबाबदार होते. बंगालमधील एक सनदी नोकर हेन्री थॉमस याने असे नमूद करून ठेवले आहे की, 'मुसलमानांच्या कटातूनच बंडाचा उद्‌भव झाला. केवळ स्वतःच्या साधन-सामुग्रीवर हिंदू बंड करण्यास कधीच उद्युक्त झाले नसते......अगदी पहिल्या खलिफापासून तो आजच्या एकाद्या फाटक्या मुसलमानापर्यंत सर्व मुसलमान सारखेच अभिमानी, असहिष्णू, क्रूर आणि खिश्चनांबद्दल तीव्र द्वेष बाळगणारे आहेत. मुसलमानांचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब

करण्यास ते कधीही मागेपुढे पाहाणार नाहीत. त्यांच्यापेक्षा निराळ्या धर्माच्या कोणत्याही सरकारचे ते चांगले प्रजाजन म्हणून राहूच शकणार नाहीत. कुराणाच्या शिकवणुकीत ते बसूच शकत नाही.' भारतीय मुसलमान हे राणीविरुद्ध बंड करण्यास त्यांच्या धर्मानेच बांधले गेले आहेत काय? या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी लॉर्ड मेयो यांनी ज्या सर विल्यम हंटर यांची नेमणूक केली होती ते देखील अखेर याच कटू निष्कर्षावर आले होते. 'मुसलमान प्रजाजनांकडून प्रामाणिक राजनिष्ठेची अपेक्षाच करता येणार नाही.'

ब्रिटिश राजवटीबद्दल मुसलमानांच्या मनात अप्रीती कशी वसत आहे त्यासंबंधी निरनिराळे ब्रिटिश अधिकारी वेळोवेळी अहवाल सादर करीत होते. जे. एच. रॅली नावाच्या बंगालमधील एका पोलीस अधिकाऱ्याने आपल्या अहवालात असे नमूद केले आहे की, वहाबी पंथाचे आकर्षण जमीन मालकांपेक्षा भूमिहीन वर्गातील मुसलमानांना अधिक आहे. जमीनदार हे वर्ग म्हणून वहाबी मुजाहिदांच्या चळवळीपासून अलिप्त होते या रॅलेच्या निष्कर्षाशी बहुतेक राज्य सरकारे सहमत होती. वायव्य प्रांताच्या दोन जिल्ह्यांतील जमीनदारांना काय ती त्या चळवळीबद्दल थोडी फार सहानुभूती होती. मीरत आणि साहराणपूर जिल्ह्याच्या कलेक्टरांच्या मते १८६० साली लागू करण्यात आलेला प्राप्तीकर हे त्याचे कारण होते. मीरतच्या कलेक्टरने असे दाखवून दिले की, सामान्यपणे सर्व मुसलमानांत राज्यकर्त्यांबद्दल अप्रीती आहे असे म्हणता येणार नाही पण तो पुढे असे म्हणतो की, 'मुसलमान आपल्याला उपटसुंभ समजतात आणि आपल्याला कोणी टोला लगावला तर त्यांना आनंद वाटतो हे साऱ्यांनाच माहीत आहे. त्यांची अशी श्रद्धा असते की एकनाएक दिवस त्यांचा धर्म आणि सत्ता पुनरपी प्रस्थापित होईल आणि सर्व पाखंडी लोकांचे निर्दलन केले जाईल. परंतु त्यांची ही श्रद्धा आपल्या ईश्वराच्या पुनरागमनावरील श्रद्धेपेक्षा निराळी नसल्यामुळे त्याची दखल घेण्याची किंवा भीती बाळगण्याचे कारण नाही.' 'आपण मुसलमानांच्या शिक्षणाबद्दल जी अनास्था दाखवली तीमुळे तो समाज वहाबी पंथाच्या आहारी गेला आहे' असे मत जेम्स ओ किनेली याने व्यक्त केले आहे. लॉर्ड मेयो यांची स्वतःची मात्र अशी खात्री होती की, सबंध मुसलमान समाज सरकारविरोधी नाही. २६ जून १७८१ मध्ये सादर केलेल्या एका टिपणीत लॉर्ड मेयो याने असे म्हटले आहे की, मुसलमान समाजाच्या संदर्भात ब्रिटिशांची शिक्षण पद्धती सर्वस्वी विफल ठरली असून त्या समाजातील बहुसंख्य आणि महत्त्वाच्या घटकांची सहानुभूती आणि विश्वास संपादन करण्याच्या कामी आपण अयशस्वी ठरलो आहोत इतकेच नव्हे तर आपण त्यांच्या अप्रीतीचे मात्र धनी होऊन बसलो आहोत की काय अशी शंका येण्यास जागा आहे. मुसलमानांच्या शिक्षणासंबंधी त्याच वर्षी सरकारने जो एक ठराव प्रसृत केला तो लॉर्ड मेयोच्या या टिपणीवरच आधारलेला होता.

एकंदरीत पाहाता सरकारी वर्तुळातील विचारसरणी अशी होती की, वहाबी चळवळीकडे केवळ गरीब मुसलमानच आकृष्ट झालेले आहेत; मुस्लीम उठावाचा फार मोठा धोका संभवत नाही आणि मुसलमानांत पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी विशेष प्रयत्न करणे हा या समस्येवरील तोडगा आहे.

१७८१ सालच्या एका खास ठरावाच्या द्वारे सरकारने मुसलमानांत शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी खास प्रयत्न केले जातील असे जाहीर केले. शैक्षणिक संस्था सुरू करण्यासाठी खाजगी संस्थांना मोठ्या प्रमाणावर अनुदान देणे, सरकारी शाळा-कॉलेजांतून शिक्षणाचे माध्यम म्हणून मुसलमानांच्या देशी भाषांना मान्यता देणे आणि प्रशिक्षित मुसलमान शिक्षकांच्या नेमणुका करणे असे त्या प्रयत्नांचे स्वरूप राहणार होते. सरकारच्या शिक्षण पद्धतीचा मुसलमान फायदा करून घेत नाहीत याचे कारण त्यांच्यातील मागासलेपणा हे आहे असे त्या ठरावात म्हटले आहे.

दरम्यान वायव्य प्रांत आणि बंगालमध्ये उदयास येऊ लागलेल्या नव्या अश्रफ नेतृत्वाकडून सरकारला जोरदार पाठिंबा मिळू लागला होता. बंडाच्या वेळी सय्यद अहमद खान यांची बिजनोर येथे सब-जज्ज म्हणून नेमणूक करण्यात आली होती. तेथे असताना त्यांनी अनेक ब्रिटिश कुटुंबाचे प्राण वाचविले होते. त्यांची ती कामगिरी लक्षात घेऊन त्यांना बढती देण्यात आली व जिल्ह्याचे प्रशासन त्यांच्याकडे सोपविण्यात आले. १८६१ मध्ये त्यांनी 'असबाब–ए–बगावत–ए–हिंद (हिंदी बंडाची कारणमीमांसा) या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली होती. त्यात त्यांनी असे प्रतिपादन केले होते की, '१८५७ चे बंड हा सर्व मुसलमानांचा मामला होता हा प्रचलित समज बरोबर नाही. त्याचप्रमाणे त्यामागे एखादा व्यापक प्रमाणावरील कट होता किंवा अवध प्रांत खालसा करण्यात आला म्हणून बंड झाले हेही खरे नाही. हिंदू आणि मुसलमान यांच्या स्वतंत्र पलटणी उभारण्यात आल्या असत्या तर त्यांच्यात असा भ्रातृभाव निर्माण झाला नसता आणि मुसलमान पलटणींनी काडतुसे घेण्यास नकार दिला नसता असे मला वाटते.' आपल्या सैन्यातील इराणी आणि अफगाण यांच्या पलटणी वेगवेगळ्या ठेवण्यात नादीरशहाने कंपनी सरकारपेक्षा अधिक शहाणपण दाखविले होते. जनतेच्या भावनांची दखल न घेण्याचे कंपनीचे धोरणही सूज्ञपणाचे नव्हते. सरकारने जे अनेक कायदे केले त्यामागील उद्दिष्टांबद्दल जनतेच्या मनात अज्ञानामुळे गैरसमज निर्माण झाले होते. कारण त्यांच्यातील प्रचलित रूढी किंवा रितीरिवाज यांच्याशी ते कायदे विसंगत होते. कायदेमंडळात भारतीयांना मज्जाव असल्यामुळे आणि अधिकाऱ्यांनी जनतेच्या भावनांकडे साफ दुर्लक्ष केल्यामुळेच हे गैरसमज निर्माण झाले. धर्माच्या बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे सरकारचे अधिकृत धोरण असले तरी प्रत्यक्षात मात्र व्यक्तिशः काहीं अधिकारी हिंदी लोकांना आपल्या धर्माच्या कळपात ओढण्याची संधी शोधीत असतात. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी विवाद्य ठरणाऱ्या पुस्तिकांच्या द्वारा धर्मांतराच्या प्रचाराची प्रचंड

मोहीम उघडली होती. ते आपल्या प्रचार सभातूनही इतर धर्मांवर टीकेची झोड उठवीत. या मिशनऱ्यांनी अनेक शाळा सुरू केल्या होत्या. त्यामुळे सरकारी शाळा म्हणजे मुलांना बाटविण्याचीच एक क्लुप्ती आहे अशी जनतेची समजूत होऊन बसली होती. बंगालमध्ये वसुलीसाठी अवलंबिण्यात आलेली पद्धती अत्यंत तिरस्करणीय होती. पूर्वी फार करून जमिनीची खरेदी-विक्री होत नसे आणि जी थोडी फार होत असे ती देखील संबंधितांच्या संमतीने होत असे. परंतु नवे सरकार अधिकारावर आल्यापासून कर्ज किंवा सारा वसुलीसाठी जमिनीची सक्तीने विक्री करण्याची प्रथा सुरू झाली. शेठ-सावकारांनी या संधीचा फायदा घेऊन जमीनदारांना मोठमोठी कर्जे दिली आणि नंतर त्यांच्या जमिनी बळकावण्यासाठी हव्या त्या भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब सुरू केला. सरकारच्या नव्या प्रशासन पद्धतीबद्दल भारतीयांपैकी कोणालाच आपलेपणा राहिला नाही. उलट आपला सत्यानाश करायचा आणि आपले धर्म स्वातंत्र्यही हिरावून घ्यावयाचे याच एकमेव उद्दिष्टाने सरकारचा कारभार चालविण्यात येत आहे अशी हळूहळू जनतेची समजूत होऊ लागली. मान्यवर भारतीयांना मानमरातब आणि किताब देण्यासाठी दरबार भरविण्याचेही शासनाने बंद करून टाकले. त्याचा परिणाम शेवटी असा झाला की, सुरुवातीच्या काळात कंपनीने जनतेची जी सदिच्छा मिळविली होती ती नाहीशी झाली. १८५७ मधील मे महिन्याच्या सुरुवातीला मीरत येथील लष्करातील काही अधिकाऱ्यांना शासन करण्यात येऊन त्यांची अत्यंत नामुष्की होईल अशा तऱ्हेने त्यांना अपमानित करण्यात आले होते. त्यामुळे शिपायांत संतापाची लाट उसळली आणि १८५७ च्या बंडाला कारणीभूत ठरणाऱ्या ता. १० मेच्या भयानक घटना घडून आल्या होत्या.

त्यानंतर थोड्याच दिवसात सर सैय्यद यांनी "भारतातील राजनिष्ठ मुसलमान" या नावाचे एक चोपडे प्रसिद्ध केले. त्यात बंडाच्या काळात प्रमुख मुसलमानांनी सरकारला केलेल्या मदतीसंबंधीची माहिती नमूद केली होती. मुसलमानांकडून त्यांच्या धर्मामुळे खिश्चनांना कायम विरोध होत असतो या समजुतीचे त्यांनी आपल्या पुस्तकात खंडन केले होते आणि वस्तुस्थिती याच्या नेमकी उलट असून 'खिस्ती धर्म हाच असा एक पंथ या भूतलावर आहे की, ज्याच्या बरोबर सख्य आणि स्नेहभाव राहू शकतो असे मुसलमान धर्म मानतो' असे त्यांनी प्रतिपादन केले होते. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यांनी कुराणाचा आधार दिला होता आणि पुढे असे दाखवून दिले होते की, ज्यावेळी मक्केत आपल्या अनुयायांचा छळ होऊ लागला त्यावेळी प्रेषिताने त्यांना इथियोपियाच्या खिस्ती राजाच्या आश्रयाला जाण्यास सांगितले होते, म्हणून सरकारविरुद्ध जेहाद पुकारण्याचा आदेश देणारे मौलवी हे अडाणी, माजलेले आणि बदमाश लोक होत. कोणाही विद्वान आणि समाजात वजन असलेल्या मौलवीने बंडात प्रत्यक्ष भाग घेतलेला नाही. ज्यावेळी सरकारकडून

संरक्षण मिळत नाही त्याच वेळी जेहाद पुकारावयाचा असतो परंतु येथे तर मुसलमान हे सरकारच्या संरक्षणाखाली नांदत असल्याने जेहादचा पुकारा धर्मबाह्य ठरतो असेही त्यांनी बजावून ठेवले होते. आपल्या या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ त्यांनी अनेक आधार दिलेले आहेत. 'भारतातील राजनिष्ठ मुसलमान' या पुस्तकात इस्लाम-वर नवे भाष्य करण्याचा त्यांनी प्रथमच प्रयत्न केलेला आढळतो.

१८६२ ते १८६५ पर्यंतच्या काळात सैयद अहमद खान यांनी बायबलविषयी अनुकूलता दाखविणारे लेख प्रसिद्ध केले. या लेखातून त्यांनी इस्लाम आणि ख्रिस्ती धर्म यात अनेक बाबतीत साम्य असल्याचे दाखवून दिले. कुराण पूर्वीच्या सर्व धर्म-ग्रंथाहून श्रेष्ठ आहे या सनातनी धर्मवेत्त्यांच्या भूमिकेचा नामोल्लेख मात्र त्यांनी कटाक्षांनी टाळला. १८६४ साली गाझीपूर येथे नोकरीवर असताना कर्नल ग्रॅहॅम यांच्या मदतीने इतिहास, निसर्गशास्त्र आणि राजकीय अर्थशास्त्र या विषयांवरील इंग्रजी ग्रंथांचे भाषांतर करुन घेण्यासाठी त्यांनी 'सायंटिफिक सोसायटी'ची स्थापना केली. अलीगढला बदली झाल्यानंतर या संस्थेची कचेरीही अलीगडला हालविण्यात आली. दोन वर्षानंतर इंग्रजांची शासन पद्धती भारतीयांच्यात लोकप्रिय करण्याच्या व भारतीयांचा दृष्टीकोन सरकारच्या कानावर घालण्याच्या हेतूने त्यांनी अलीगढ इन्स्टिटयूटचे प्रकाशन सुरू केले. नव्याने लागू करण्यात आलेल्या फौजदारी कायद्या-प्रमाणेच ब्रिटिशांच्या अनेक कायद्यांबद्दल भारतीयांच्या मनात असंतोषाची भावना होती. भारतीय दंड विधान, फौजदारी दंड विधान आणि पुराव्याचा कायदा हा तर सनातनी विचारसरणीवर मोठाच आघात होता. परंतु या कायद्यांच्या बाजूने त्यांनी प्रचंड मोहीम हाती घेतली. वर्ष-दोन वर्षातच सरकारनेही 'काझी'च्या नेमणुकीची पद्धत बंद करून टाकली. त्यापूर्वी त्या त्या धर्माच्या कायद्यांचा अर्थ समजाऊन घेऊन न्यायदान करण्याच्या कामात सरकार हिंदू आणि मुसलमान धर्म पंडितांची प्रत्यक्ष मदत घेत असे. १८६४ पर्यंत वकिलीची परीक्षा प्रादेशिक भाषांतून देता येत असे. त्यानंतर मात्र त्यासाठी इंग्रजी भाषा सक्तीची ठरविण्यात आली. या नव्या नियमामुळे परंपरागत धार्मिक नेते चांगलेच हादरून गेले. सायंटिफिक सोसायटीने १८६६ च्या मे महिन्यात आयोजित केलेल्या एक सभेत भाषण करताना सय्यद यांनी पूर्वीचे सर्व कायदे जुलूम जबरदस्तीवर आधारलेले आहेत अशी टीकेची झोड उठविली आणि असे प्रतिपादन केले की, यहूदी, हिंदु, ख्रिश्चन किंवा मुसलमान या सर्वांचा ईश्वर एकच असून त्यानेच ब्रिटिशांना भारतीयांवर राज्य करण्यास पाठवले आहे व त्यानेच ब्रिटिशांच्यामार्फत नवे बुद्धीनिष्ठ कायदे दिले आहेत. त्यामुळे आपल्यासाठी ईश्वराने जे धार्मिक कायदे दिले आहेत ते या नव्या कायद्यांच्या विरोधी असूच शकणार नाहीत. आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी जनतेला असे आवाहन केले की, "मनापासून राजनिष्ठ बना आणि सत्ताधाऱ्यांवर संपूर्ण भरवसा ठेवा. तुमच्या ज्या काय अडीअडचणी, आशा आकांक्षा असतील, तुमच्या मनात जी भीती

असेल ती मनमोकळेपणाने, प्रामाणिकपणे परंतु नम्रपणाने व्यक्त करा. आणि तुम्ही असे केलेत तर तुमचे जे न्याय्य अधिकार असतील ते तुम्हाला निश्चितपणे उपभोगावयास मिळतील याची खात्री बाळगा." सर सय्यद यांनी बजावलेल्या या कामगिरीबद्दल १८६७ साली व्हॉइसरॉय त्यांना सुवर्णपदक आणि मेकॉलेच्या ग्रंथांचा सबंध संच बहाल केला. या निमित्त त्यांचा सत्कार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेत उत्तरादाखल भाषण करताना त्यांनी "माझ्या या उदाहरणावरून स्फूर्ती घेऊन, असा बहुमान प्राप्त करून घेण्याची प्रेरणा इतरानांही होईल." अशी आशा प्रकट केली. आपल्या प्रयत्नांवर वरदहस्त ठेवणाऱ्या ईश्वराचे आणि आपल्या अल्पस्वल्प सेवेचे कौतुक करणाऱ्या भारत सरकारचे आभार मानून त्यांनी आपले हे भाषण संपविले.

१८६३ साली नवाब अबदुल लतीफ यांनी पाश्चात्य संस्कृती, युरोपियन ज्ञान आणि इंग्रजी शिक्षण लोकप्रिय करण्यासाठी बंगालमध्ये मोहामेडन लिटररी सोसायटी या नावाची संस्था स्थापन केली. त्याचबरोबर त्यांनी हिंदुस्थान हा दारुल हर्ब म्हणजे शत्रूराष्ट्र असून दारुल इस्लाम म्हणजे मुस्लिम राष्ट्रात त्याचे रूपांतर घडवून आणण्यासाठी धर्मयुद्ध पुकारावे असे फतवे प्रसिद्ध करणाऱ्या कडव्या उलेमांविरुद्ध जोरदार मोहीमही उघडली होती. नवाब अबदुल लतीफ यांच्या नेतृत्वाखालील बिहार आणि बंगालमधील मुस्लीम अमीर उमरावांनी अनेक उलेमांना आपल्या बाजूला वळवून घेऊन त्यांच्याकडून हिंदुस्थान हा आता दारुल हर्ब राहिलेला नसून जेहाद पुकारण्याची अजिबात गरज राहिलेली नाही असे जाहीर करवून घेतले. जेहादच्या घोषणेला सहाय्य करणाऱ्या पूर्व हिंदुस्थानातील अमीर उमरावांना यापुढे तसे करीत राहणे धोकादायक ठरणार असल्याची जाणीव होऊन चुकली होती. त्यामुळे उलेमांच्याकडून अशा तऱ्हेचे निवेदन प्रसिद्ध होणे अत्यंत आवश्यक होते. कारण सरकारी अधिकाऱ्यांनी जेहादचा प्रचार करणाऱ्यांविरुद्ध खटाचे खटले दाखल केले होते आणि त्यांना सहाय्य करणाऱ्या अनेकजणांना कैद केले होते.

सर सय्यद यांनी मुस्लिम समाजात पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार करण्याच्या कामी स्वतःला संपूर्णपणे वाहून घेतले होते तर नवाब अबदुल लतीफ हे परंपरागत शिक्षण पद्धतीचे पुरस्कर्ते होते. १८६८ साली बंगाल सायन्स असोशिएशन पुढे भाषण करताना त्यांनी असे प्रतिपादन केले होते की, ब्रिटिशांची शिक्षण पद्धती ही हिंदू समाजातील विशेष सन्माननीय आणि सधन लोकांनाच तेवढी सोयीस्कर होती. परंतु मुसलमान समाजातील सर्वच घटक मदरसाकडे (धार्मिक शाळा) आपल्या स्वतःच्या अशा शिक्षणाच्या खास 'राष्ट्रीय' संस्था म्हणून पाहातात आणि त्यापासून त्यांना जे हवे असते ते सर्व मिळू शकते असेही ते मानतात. त्यांच्या दृष्टीने मदरसांना केवळ वाङ्मय आणि विज्ञान शिकवणाऱ्या शाळा यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्व होते.

१८७० च्या डिसेंबर महिन्यात सर सैयद यांनी सरकारी शिक्षण पद्धतीबद्दल सर्वसामान्य मुसलमान अनास्था दाखवतात त्याची कारणे शोधून काढण्यासाठी आणि त्यांच्यात आधुनिक शिक्षणाचा प्रसार कसा करता येईल त्याचे उपाय सुचविण्यासाठी एक बिनसरकारी समिती नेमली.

त्या समितीने अशी शिफारस केली की, धार्मिक शिक्षण आणि आधुनिक इंग्लिश शिक्षण यांची सांगड घातली गेली पाहिजे. तिला अनुसरून सैयद अहमद खान यांनी १८७५ साली अलिगड येथे अशा तऱ्हेची शाळा सुरू केली. लवकरच त्यांनी महाविद्यालय सुरू करण्याचाही निर्णय घेतला व मोहामेडन अँग्लो ओरिएंटल कॉलेजची कोनशिला जानेवारी १८७७ मध्ये व्हॉइसरॉय लॉर्ड लिटन यांच्या हस्ते बसविण्यात आली. त्यावेळी व्हॉइसरॉयला दिलेल्या मानपत्रात मुसलमान विद्यार्थ्यांना शिक्षित करून पौर्वात्य विद्या आणि पाश्चात्य साहित्य आणि विज्ञान यात सुसंवाद घडवून आणणे, मुसलमानांना इंग्रज सम्राटांचे सन्माननीय आणि उपयुक्त नागरिक बनवणे आणि परकीय सत्तेविषयीच्या गुलामी लाचारीतून नव्हे तर चांगल्या सरकारमुळे होणाऱ्या फायद्याची जाणीव झाल्यामुळेच उत्स्फूर्त होणारी राजनिष्ठा त्यांच्या मनात रुजवणे या उद्देशाने हे महाविद्यालय स्थापन करण्यात येत असल्याचे सर सैयद यांनी स्पष्ट केले.

कॉलेजची रचना अर्थातच ऑक्सफर्ड व केंब्रिजच्या धर्तीवर करण्यात आली होती. तेथे शिकविल्या जाणाऱ्या प्राचीन इतिहासाची सुरवात ग्रीस व रोमच्या इतिहासापासून होई. परंतु हिंदुस्तानच्या बाबतीत मात्र एकदम मध्ययुगीन काळापासूनच इतिहासाच्या अभ्यासाला सुरुवात होई. तेथील विद्यार्थ्यांना परंपरागत शिया व सुनी पंथानुसार धार्मिक शिक्षण दिले जाई. तसेच त्यांना धार्मिक कायदाही शिकवला जाई. सर सैयद यांनी अनेक वर्षे इस्लाम धर्माच्या सनातनी शिकवणुकीविरुद्ध मोहीम चालविली होती परंतु त्यांचे सहकारी परंपरावादी होते व इंग्रजांचे आधुनिक विचार विद्यार्थ्यांत पसरविणे त्यांना पसंत नव्हते. त्यामुळे तेथे जुन्या शिया व सुनी पंथानुरूप धार्मिक शिक्षण दिले जाई. कुराण आणि सुन्ना यासंबंधीच्या सनातनी कल्पनांवरच अलिगड-मधील धार्मिक शिक्षणाची उभारणी करण्यात आली होती. अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटच्या स्तंभातून आणि अन्य प्रकारेही विद्यार्थ्यांना ब्रिटिश सत्तेच्या गुणगौरवाचे सतत डोस पाजले जात आणि हिंदुस्तानात जे उदारमतवादी राजकीय वातावरण निर्माण होऊ लागले होते त्यापासून त्यांना कटाक्षाने दूर ठेवले जाई. स्टेटस्मन, इंग्लिशमन, मॉर्निंग पोस्ट, टाइम्स ऑफ इंडिया यांसारखी अँग्लोइंडियन आणि युरोपीय यांनी संपादित केलेली राजनिष्ठ वृत्तपत्रेच तेवढी कॉलेजच्या ग्रंथालयात जात. सनातनीमतांबद्दल प्रसिद्ध असलेल्या इंग्रज व्यक्तींची काळजीपूर्वक निवड करून त्यांचीच प्राचार्य किंवा प्राध्यापक म्हणून नेमणूक केली जाई. शिया आणि सुनी अशा दोन्ही पंथांच्या विद्यार्थ्यांना नमाज पढणे सक्तीचे असे. प्रत्येक विद्यार्थ्याला

नमाजाच्या वेळी हजर राहावे लागे व त्याची नोंद ठेवली जात असे. काळा झगा आणि तांबडी फेझ कॅप हा गणवेष प्रत्येक विद्यार्थ्याला घालावाच लागे. तो घातल्या-शिवाय कोणाही विद्यार्थ्याला कॉलेजात, ग्रंथालयात किंवा वस्तुसंग्रहालयात प्रवेश करण्याची मनाई असे. त्याशिवाय विद्यार्थ्यांना इंग्लिश पद्धतीचे बूट-मोजे घालावे लागत. अनवाणी पायाने कोणालाही कॉलेजात येऊ दिले जात नसे. हिंदुस्थानच्या सर्व भागांतील अश्रफ आपापली मुले अलीगडच्या निवासी शाळा कॉलेजात धाडू लागली. तथापि, त्या शतकाच्या अखेरीपर्यंत तेथील कॉलेजातून अवघे २२० मुस्लिम विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडले आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्यांची संख्या तर अवघी चारच होती. कलकत्ता, अलाहाबाद आणि पंजाब या इतर तीन विद्यापीठांतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या मानाने ही संख्या अगदीच नगण्य होती. एक गोष्ट मात्र खरी की, सर सैय्यद यांनी अलीगडच्या धर्तीवर खाजगी संस्था स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू केली असे म्हणावे लागते.

१८७७ साली रशिया आणि तुर्कस्तान यांच्यातील युद्ध सुरू झाल्यापासून युरोपीय राजकारणाला नवी कलाटणी मिळाली. व्हॉइसरॉय लॉर्ड लिटन यांनी भारत मंत्र्यांना असे कळवले की, सध्या तरी येथील मुस्लिम प्रजाजन हे जरी पूर्वी कधी नव्हते इतके राजनिष्ठ आहेत असे दिसत असले तरी 'भारतातील मुसलमानांच्या भावना मतप्रवाह इ. वर लक्ष ठेवणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांचे असे मत आहे की, जर यदाकदाचित रशियाकडून होणाऱ्या तुर्कस्थानच्या लुटीकडे आपण कानाडोळा करीत आहोत असा त्यांना संशय आला आणि त्याहीपेक्षा आपण त्या लुटीत उघडउघड सहभागी होत आहोत असे त्यांना दिसून आले तर बहुधा इथे भारतात आपली इतकी पंचाइत होऊन जाईल की भारताच्या सरहद्दीबाहेरील आपल्या सर्व हालचाली कोलमडून पडतील, कारण आपल्या सरहद्दीभागात सर्वत्र खऱ्याखुऱ्या जेहादला तोंड द्यावे लागेल. इतकेच नव्हे तर येथील प्रत्येक अँग्लोइंडियनाच्या घरात दुष्मनाचा, देशद्रोह्यांचा आणि न जाणो मारेकऱ्यांचाही चंचुप्रवेश झाल्यासारखे होईल. ही आपत्ती महत्प्रयासाने आपण मोडून काढलेल्या ५७ सालच्या बंडापेक्षाही अधिक धोकादायक ठरण्याचा संभव आहे.

या युद्धात रशियाविरुद्ध तुर्कस्ताननेे अनेक नेत्रदीपक विजय मिळविले. भारतीय मुसलमानांनी सबंध देशभर त्याबद्दल विजयोत्सव साजरे केले. युद्धनिधी गोळा करून तो त्यांनी तुर्कस्तानकडे पाठवून दिला. स्वतः सर सैय्यद या विजयाने इतके प्रभावित झाले होते की, त्यांनी मुसलमानांनी तुर्की फेज टोपी घालण्यास सुरवात करावी अशी टूम काढली. आणि तुर्कस्तानचा सुलतान अबदुल अजीझ याचा गौरव करणारे अनेक लेख लिहून प्रसिद्ध केले. भारतातील काही मशिदीतून प्रथमच शुक्रवारच्या प्रार्थनेच्यावेळी या सुलतानाला भक्तिभावपूर्वक अभिवादन करण्याची प्रथा सुरू झाली. याचा अर्थ अबदुल अजीझला इस्लाम धर्माचा खलीफा म्हणून मान्यता मिळू लागली.

भारतातील मुसलमानांना दुखवू नये असा इशारा लॉर्ड लिटन यांनी देवून ठेवलेला असला तरीदेखील १८८० नंतर राणीच्या सरकारने तुर्कस्तानाविरुद्ध शत्रुत्वाचे धोरण स्वीकारण्याचा निर्णय घेतला. १८८१ साली बर्लिनच्या तहानुसार फ्रान्स आणि इंग्लंड यांनी तुर्की साम्राज्याचे लचके तोडून ते आपल्या राज्याला जोडून घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे इंग्लंडने १८८१ साली सायप्रस आणि १८८२ साली ईजिप्त घशात घातला. तर फ्रान्सने ट्यूनीशिया घेतला. इतके झाले तरीही सर सैय्यद आणि सैय्यद अमीर अली या अनुक्रमे वायव्य सरहद्द आणि बंगाल प्रांतातील अश्रफ अमीर उमरावांच्या नेत्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीवरील आपली निष्ठा लवमात्रही ढळू दिली नाही. भारतीय सैनिकांच्या मदतीने ब्रिटिशांनी केलेल्या सुदान आणि ईजिप्तच्या आक्रमणास त्यांनी संपूर्ण पाठिंबा दिला. इतकेच नव्हे तर ईजिप्तचा राष्ट्रीय नेता अरबी पाशा याचा धिक्कार केला. ईजिप्तमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे या ब्रिटिशांच्या प्रचाराचीही त्यांनी मोठ्या हिरीरीने री ओढली. अश्रफ समाजाला या राजनिष्ठेचे तावडतोब पारितोषिक मिळाले. भारतीय मुसलमानांच्या शिक्षणासंबंधी चौकशी करण्यासाठी नवा आयोग नेमण्यात आला. अश्रफांचा उघडउघड कैवार घेणारे सर विल्यम हंटर यांची या आयोगाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. १८७१ आणि १८७३ साली प्रसिद्ध करण्यात आलेल्या सरकारी धोरणामुळे मुसलमानांच्या शिक्षणात बरीच सुधारणा घडून आली होती. या काळात मुसलमान विद्यार्थ्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होऊन तो आकडा १ लाख चौदा हजारावरून २ लाख एकसष्ट हजारांवर गेला होता म्हणजे ही वाढ शंभर टक्क्यांहूनही जास्त होती. एकूण लोकसंख्येत मुसलमानांचे जे प्रमाण होते त्यापेक्षा प्राथमिक शाळातील मुसलमान विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक होते. अर्थात माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये यातील त्यांचे प्रमाण मात्र असे डोळ्यात भरण्यासारखे नव्हते.

१८८२ साली हंटर कमिशनपुढे साहजिकच सर सैय्यद यांची मुसलमानांच्या शिक्षणासंबंधी मुख्य साक्ष झाली. त्यांनी आपल्या साक्षीत असे सांगितले की, प्रचलित शिक्षण पद्धतीचा मुसलमान पुरेसा फायदा का करून घेत नाहीत त्याची कारणे शोधून काढण्यासाठी मी स्वतःच एक समिती नेमली होती. त्यावेळी असे आढळून आले की, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र आणि भूगोल या प्राचीन ग्रीक शास्त्रांशी आधुनिक शास्त्रांचा मेळ बसत नसल्याने मुसलमान समाजाला त्याबाबत आस्था वाटत नाही. त्यांच्या धर्मश्रद्धांच्या आड येणाऱ्या आधुनिक शास्त्रांचा ते धार्मिक कारणावरून अव्हेर करतात. अनेक मुसलमानांची तर अशी प्रामाणिक समजूत आहे की, पाश्चात्य शिक्षण हा त्यांना ख्रिस्ती धर्माच्या कळपात ओढण्याचा एक सापळा आहे. त्यांनी साक्षीत पुढे असे सांगितले की, अद्यापही काही मुसलमान अत्यंत तीव्र शब्दात इंग्रजीच्या अभ्यासाला विरोध करतात आणि जे त्याचा

प्रचार करतात त्यांच्यावर ते ख्रिस्ती म्हणून छाप मारतात. त्याचप्रमाणे आपल्या सामाजिक आणि राजकीय स्थानाबद्दल ते जो वृथाभिमान, आणि आढयता बाळगतात त्यामुळे ते शाळेत जाऊन इतर मुलांत बसणे कमीपणाचे मानतात. या अहंमन्य वृत्तीमुळेच ते इस्लामी साहित्य, अध्यात्म, तत्वज्ञान आणि तर्कशास्त्र यांना अवास्तव महत्त्व देतात आणि पाश्चात्य वाङमय आणि आधुनिक विज्ञान कवडी किंमतीचे आहे असे मानतात. हिंदुस्तानातील ब्रिटिशांच्या वर्चस्वाला सुरवातीला त्यांचा विरोध नव्हता. परंतु संक्रमणकाळात अनपेक्षितपणे त्यांच्यावर जे आघात झाले त्यामुळे इंग्रज लोक, त्यांची भाषा आणि आधुनिक शास्त्रे या सर्वांबद्दल त्यांच्या मनात तिरस्काराची भावना निर्माण झाली. घरंदाज कुटुंबातील लोक केवळ सरकारी नोकरीसाठी इंग्रजी शिकणे अपमानास्पद मानतात. अर्थात हे पूर्वग्रह सरकार दूर करू शकणार नाही हे त्यांना मान्य होते. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचे फायदे मुसलमान समाजाला पटवून देण्याच्या कामी खाजगी संस्थांनी प्रयत्न करणे हाच त्यावरील उपाय ठरतो. मुसलमानांनी आपला धर्मवेडेपणा टाकून द्यावा म्हणून त्यांचे मन वळविण्याचा त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी हिरीरीने प्रयत्न करून पाहिला. परंतु त्याबद्दल त्यांच्यावर शिव्यांची लाखोली वाहण्यात आली. इतकेच नव्हे तर एकदा तर पाखंडी आणि काफर म्हणूनही त्यांची संभावना करण्यात आली. परंतु या सर्व अडीअडचणींना ते पुरून उरले आणि आता कोठे त्यांच्या धर्मबांधवांना आपली चूक कळून आली असून याबाबतीत ते समजूतदारपणा दाखवू लागले आहेत. त्या काळात त्यांनी सुरू केलेल्या मोहॉमेडन अँग्लो ओरिएंटल कॉलेजमध्ये आज २२५ मुस्लीम विद्यार्थी शिक्षण घेत असल्याबद्दल समाधान व्यक्त करून आपल्या साक्षीच्या शेवटी त्यांनी असे नमूद केले की; सरकार आपल्याला मुसलमान म्हणून झुकते माप देईल अशी अपेक्षा त्या समाजाने करता कामा नये. सरकारी शिक्षणपद्धती ही समाजातील सर्व घटकांना सारखीच खुली असून समाजातील कोठल्याही एका वर्गाबद्दल किंवा गटाबद्दल पक्षपात दाखवता कामा नये. मुसलमानांना पुरेसा फायदा करून घेता आला नाही तो त्यांच्याच चुकीमुळे. त्यांचे परिणाम भोगण्याची तयारी त्यांनी ठेवली पाहिजे आणि आपल्या मागासलेपणाला आपण स्वतःच जबाबदार आहोत हे ओळखले पाहिजे.

त्यांच्या मते जास्तीत जास्त म्हणजे सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाचे नियम शिथील करणे आणि त्यायोगे मुस्लीम समाजातील वजनदार आणि सुस्थितीतील लोकांना शाळा कॉलेजे सुरू करण्यास उत्तेजन देणे इतकेच काय ते सरकारला करता येण्यासारखे आहे.

बंगालमध्ये बंगालीला प्रादेशिक भाषा म्हणून मान्यता मिळालेली असल्यामुळे मुसलमान विद्यार्थ्यांनाही बंगाली शिकविण्याची व्यवस्था प्रांतिक सरकारने केली होती. त्यामुळे मदरसा मधूनही बंगाली शिकविली जावू लागली होती. बंगालमधील अश्रफ अमीर उमरावांना हे मान्य नव्हते. आपण पर्शियन वंशाचे आहोत

याचा अभिमान बाळगणाऱ्या अमीर अलीने हंटर कमिशन पुढे असे सांगितले की, बंगालमधील हिंदूंच्या बाबतीत बंगाली भाषेचे जे स्थान आहे ते मुसलमानांच्या बाबतीत ऊर्दुला मिळाले पाहिजे. नबाब अबदुल लतीफ यांचे म्हणणे असे होते की, बंगाली मुसलमान हे मूळचे हिंदुंच्या कनिष्ठ वर्गातील असल्यामुळे त्यांना बंगाली खेरीज अन्य कोणत्याही भाषेतून प्राथमिक शिक्षण देता येणार नाही. तथापि विद्वान बंगाली हिंदू त्या भाषेत अनेक संस्कृत शद्ब वापरतात ते काढून त्यांचे जागी अरेबिक आणि पर्शियन शद्ब रूढ केले पाहिजेत. परंतु बंगाल जिंकून घेणाऱ्यांचे किंवा अरेबिया, पर्शिया आणि मध्य आशियातून बंगालच्या मुसलमान सत्ताधाऱ्यांच्या आश्रयाला आलेल्या धर्मनिष्ठ, विद्वान आणि शूर अशा मुसलमानांच्या वंशजासाठी मात्र मातृभाषा म्हणून ऊर्दूचाच अंगिकार केला जावा असे त्यांनी सुचविले.

धार्मिक शिक्षणाचा अभाव आणि इंग्रजी शिक्षणामुळे धर्मासंबंधी नास्तिकता निर्माण होण्याची संभाव्यता ही हंटर कमिशनच्या बहुसंख्य सभासदांच्या मते मुसलमानांच्या शैक्षणिक मागासलेपणाची कारणे होती. वरिष्ठ वर्गाची खालच्या वर्गाबरोबर मिसळण्याची अनिच्छा, पालकांचे दारिद्रय इ. कारणांचाही त्यांनी या संदर्भात उल्लेख केला होता. कमिशनच्या सभासदांनी अशी निरनिराळी कारणे नमूद केली असली तरी 'वंशाचा अभिमान', एकेकाळच्या श्रेष्ठत्वाच्या स्मृती, धार्मिक भयगंड आणि इस्लामच्या अभ्यासाबद्दल त्यांना साहजिकपणे वाटणारे ममत्व या बाबी त्यांच्या शैक्षणिक मागासलेपणाला जबाबदार होत्या असा त्यांचा एकमुखी निष्कर्ष होता. मकतब आणि मदरसांना प्रोत्साहन, अभ्यासक्रमात सर्वस्वी निधर्मी विषयांचा समावेश, उच्च शिक्षणासाठी खास सवलती, मुसलमान विद्यार्थ्यांसाठी प्राथमिकपासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत नादारी आणि खास शिष्यवृत्त्या, मुस्लिम शैक्षणिक निधीचा इंग्रजी शिक्षणासाठी उपयोग, मुसलमान शिक्षक आणि एज्युकेशनल इन्स्पेक्टर्स यांच्या संख्येत वाढ आणि सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांना वाढती संधी यासारख्या उपायांनी अधिकाधिक मुसलमान विद्यार्थ्यांना ब्रिटिशांच्या शिक्षण पद्धतीकडे आकर्षित करून घ्यावे असे कमिशनचे मत होते. विद्यापीठांनी अरेबिक आणि पर्शियन ह्या दोन्ही भाषा पदवी परीक्षेसाठी ठेवाव्यात यावर भर देण्यात आला. त्यावर १८८५ साली निघालेल्या फतव्याने (G. R.) शिक्कामोर्तब करण्यात आले. माध्यमिक शाळातील मुसलमान विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी खास सवलती देण्यात याव्यात, अन्य भाषांतील पुस्तकांचे उर्दूत उत्तम भाषांतर करणारांना खास बक्षिसे देण्यात यावीत आणि मुस्लिम शिक्षणाला अधिक अनुदान द्यावे असे सुचविण्यात आले. अशातऱ्हेने हिंदुस्थानातील मुसलमानांच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी शासनाने उचलली. मुसलमानांची निष्ठा संपादन करणे हाच यामागील हेतू असल्याचे अनेक सरकारी अधिकाऱ्यांनी उघडपणे बोलून दाखविले. १९४७ साली ब्रिटिशांच्या सत्तेचा शेवट होईपर्यंत हेच धोरण चालू होते. शिक्षणाच्या प्रसाराच्या बाबतीत

मुसलमान समाजाला सरकारचा जितका पाठिंबा मिळाला तितका तो हिंदुस्थानातील इतर कोठल्याच समाजाला मिळू शकला नाही.

इस्लाम धर्माचा व्यासंगी आणि पश्चिम आशियातील मुस्लीम राष्ट्रांतील घडामोडीं-संबंधीचा तज्ज्ञ विलफ्रिड स्कॅव्हन ब्लंट हा १८८३ मध्ये भारतात आला होता. त्याच्या अलीगड भेटीच्या वेळी एम. ए. ओ. कॉलेजमध्ये एक खास स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या प्रसंगी भाषण करताना सर सैय्यद म्हणाले की मुसलमानांचा ब्रिटिश सत्तेला विरोध आहे अशी समजूत करून घेणे बरोबर होणार नाही. त्यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस सांगितले की,

आमचा देश जिंकून ब्रिटिश येथे आले ते आमचे शत्रू म्हणून नव्हे तर मित्र म्हणून. आमची मनापासून अशी इच्छा आहे की, इंग्रजांची भारतातील सत्ता प्रदीर्घ काळ टिकावी इतकेच नव्हे तर ती यावत्‌चंद्र दिवाकरौ टिकावी आणि तीही इंग्लिश राष्ट्राचे भले व्हावे म्हणूनच नव्हे तर त्यात आमच्या देशाचेही भले आहे म्हणून. इंग्रजांची खुशामत करण्यासाठी मी असे म्हणत नाही तर त्यात आमच्या स्वतःच्या देशाची समृद्धी आणि कल्याण आहे अशी माझी खात्री आहे.

डिसेंबर महिन्यात ब्लंटने कलकत्त्याला भेट दिली. तेथे बंगालमधील प्रमुख मुसलमानांना त्याने जो सल्ला दिला तो उघड-उघड चिथावणी सारखाच होता. त्याने आपल्या दैनंदिनीत केलेल्या नोंदीवरून हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. २४ डिसेंबर १८८३ रोजीच्या त्याच्या दैनंदिनीत पुढील मजकूर आहे :—

"मुसलमानांना आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली तर सरकारकडून त्यांना आजच्यासारखी वाईट वर्तणूक मिळणार नाही किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षही केले जाणार नाही. हिंदुस्थानात मुसलमान बंड करून तर उठणार नाहीत ना अशी तिकडे इंग्लंडमध्ये आम्हाला कायम धास्ती वाटत असते. आणि वीस हिंदूंच्या शब्दापेक्षा एका मुसलमानाच्या शब्दाला आम्ही जास्त महत्त्व देतो. परंतु त्यांना ज्या सवलती नाकारण्यात येतात त्याबद्दल नशीबाला बोल लावून ते स्वस्थ बसतील तर इंग्रजांना उलट बरेच वाटेल. व आयती कटकट गेली असे ते म्हणतील. मुसलमानांनी कोणता कार्यक्रम हाती घ्यावा यासंबंधी विचार करण्यासाठी आज संध्याकाळी जी परिषद बोलाविण्यात आली आहे तिच्यापुढे माझे हे विचार मांडण्याचे मौलवी साहेबांनी मला कबूल केले आहे."

त्यानंतर दोन दिवसांनी बंगाली मुसलमानांना त्याने असे सांगितले की, भविष्य काळात केव्हा तरी उत्तर हिंदुस्थानात मुसलमानांच्या हाती व दक्षिणेत हिंदूंच्या हाती राजसत्ता सोपविण्यात येईल हे आपल्याला स्पष्ट दिसत आहे.

"सकाळ गडबडीतच गेली. सर्वात प्रथम मौलवी ए. एम्. भेटावयास आले होते. मुसलमानांच्या एकूण भवितव्याबद्दल त्यांच्याशी सांगोपांग चर्चा केली. भारताचे भवितव्य शेवटी काय राहणार अशी तुमची कल्पना आहे असे त्यांनी

विचारले तेव्हा त्यासंबंधीचे माझे विचार मी त्यांना सांगितले. हिंदुस्तानातील राज्यपद्धती ही ऑस्ट्रेलियाच्या धर्तीची राहील म्हणजे हिंदुस्तानच्या निरनिराळ्या प्रांतावर इंग्रजांची सत्ता राहील व तिला इंग्रजी फौजांचा आधार असेल परंतु संपूर्ण नागरी प्रशासन, कायदेकानू आणि अर्थव्यवस्था ही मात्र एतद्देशीय लोकांच्या हाती राहील. परिणामतः उत्तर हिंदुस्तानात मुसलमानांचे व दक्षिण हिंदुस्तानात हिंदूंचे सरकार असेल. माझा हा तोडगा ऐकून ते फार खूष झाले. इंग्रजांची सत्ता अजिबात नष्ट व्हावी असे कोणत्याच मुसलमानाला वाटत नाही. कारण आणखी शंभर वर्षे तरी हिंदू-मुसलमानांत मतैक्य घडून येण्याची शक्यता नसल्याने इंग्रज गेले तर येथे युद्ध उद्‌भवल्याशिवाय राहणार नाही. परंतु मुसलमानांना अर्थात इंग्रजी शासनही आवडत नाही. शासन हिंदूंना जरा जास्तच अनुकूल दिसते."

अर्थात बंगाली अश्रफांना अशा तऱ्हेची नवी चिथावणी मिळण्याची काहीच जरूर नव्हती. १८७१ च्या अखेरीस प्रसिद्ध झालेले हंटर साहेबांचे पुस्तक आणि त्याच वर्षी प्रसिद्ध झालेले सरकारचे शिक्षणविषयक धोरण यामुळे फुटीरपणाच्या राजकारणाचा अंगीकार करण्यास पुरेसे प्रोत्साहन मिळालेलेच होते. ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल सुरू झाल्यापासून बंगालमधील अश्रफांना जी विपन्नावस्था प्राप्त झाली होती त्यासंबंधी हंटरने अतिरंजित असे चित्र रंगवले होते, आणि त्या गटाला शक्य तेवढे झुकते माप देण्याचीही सरकारला कळकळीची शिफारस केली होती. त्याचप्रमाणे त्याने सरकारला असाही सल्ला दिला होता की आपल्या समाजाचा आदर संपादन करण्याच्या दृष्टीने मुसलमानांच्या तरुण पिढीला धार्मिक कायदा चांगला अवगत असेल आणि त्याचबरोबर त्यांना पाश्चात्यांच्या सामान्य ज्ञानाचाही परिचय असेल अशी काळजी घ्यावी. पुरोगामी आणि आधुनिक दृष्टीकोनाचा आग्रह धरणाऱ्या सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी १८७६ साली राष्ट्रवादी नॅशनल इंडियन असोसिएशन स्थापन केली तर बंगाली अश्रफांनी त्याच साली कलकत्त्यात नॅशनल सेंट्रल मोहॅमेडन असोसिएशनची स्थापना केली. काही वर्षातच मद्रास, पंजाब, आणि कराची यासारख्या दूरदूरच्या विभागात तिच्या शाखा पसरल्या. इंडियन असोसिएशनचा प्रयत्न, हिंदुस्तानातील एकूण जनतेचे हित साधण्याचा असे तर केवळ मुसलमान समाजाच्या हितासाठी झटणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे नॅशनल सेन्ट्रल मोहामेडन असोसिएशनने उघडपणे जाहीर करून टाकले होते. १८८२ च्या फेब्रुवारीत या असोसिएशनने व्हॉइसरॉय साहेबांना एक निवेदन सादर केले. बंगाली अश्रफांच्या विपन्नावस्थेला सर्वस्वी कंपनी सरकार जबाबदार आहे या हंटरच्या प्रतिपादनाचीच त्यात री ओढली होती. आपले म्हणणे फक्त बंगाली अश्रफांच्या बाबतीतच लागू पडणारे आहे असे हंटरने स्पष्ट केले होते परंतु या निवेदनात मात्र बंगालमध्ये जी परिस्थिती आहे तीच सर्वत्र आहे असे दाखवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. फक्त मुसलमान विद्यार्थ्यांनाच नादारी आणि शिष्यवृत्त्या

देण्याच्या शासनाच्या उपक्रमाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला होता, परंतु ही सवलत म्हणजे केवळ बिंदुमात्र आहे असेही त्या निवेदनात नमूद करण्यात आले होते. त्याशिवाय निवेदनात अशी मागणी करण्यात आली होती की, सरकारी नोकरीसाठी असलेली विद्यापीठाच्या पदवीची अट काढून टाकण्यात यावी आणि चारित्र्य आणि ताकद याबाबत मुसलमान भारी असल्याचे मान्य करण्यात यावे. अशातऱ्हेने एन्सीएमएने सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांना प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी केली. वायव्य प्रांतात सरकारी नोकरीतील मुसलमानांचे प्रमाण एकूण लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणापेक्षा जास्त असल्याबद्दल निवेदनात समाधान व्यक्त करण्यात आले असले तरी तेथेही सरकारी नोकरीतील हिंदूंची संख्या मुसलमानांपेक्षा जास्त असल्याबद्दल तक्रार करण्यात आलीच होती.

नॅशनल सेंट्रल मोहॉमेडन असोसिएशनने त्या निवेदनात असे स्पष्टपणे प्रतिपादन केले होते की, 'मुसलमानांचे एक स्वतंत्र राष्ट्र आहे असे आम्ही मानतो. ' वस्तुतः राष्ट्राचा कणा असलेला सुस्थितीतला मध्यमवर्ग मुसलमानांत मुळी अस्तित्वातच नाही.' त्यामुळे मुसलमानांना आश्रय देण्यात यावा अशी मागणी केली जाते. तथापि ती त्यांना राष्ट्रीय शील नाही म्हणून केली जाते असा गैरसमज करून घेतला जाऊ नये. कारण राष्ट्रीय संपन्नतेसाठी सरकारी नोकऱ्यांवर अवलंबून रहाणे हेही गैरच आहे. या प्रतिपादनातील तर्कसंगती बाजूस ठेवली तरी त्या निवेदनात मुसलमान समाज याअर्थी वारंवार आलेला 'राष्ट्र' हा शब्द खटकल्यावाचून राहात नाही.

१५ जुलै १८८५ रोजी भारत सरकारने या निवेदनासंबंधी एक स्वतंत्र प्रस्ताव प्रसिद्ध केला. मुसलमानांना सापत्नभावाची वागणूक दिली जाते असा जो आक्षेप घेण्यात आला होता तो नाकारण्यात येऊन एक बंगाल वगळता इतर सर्वत्र मुसलमानांना त्यांच्या प्रमाणापेक्षा कितीतरी जास्त सरकारी जागा मिळालेल्या आहेत असे आकडेवारीनिशी दाखवून देण्यात आले. वायव्य प्रांत, अवध, वऱ्हाड आणि मध्य प्रांत या विभागात मुसलमानांना अवास्तव प्रमाणात उदार आश्रय देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी खुल्या स्पर्धेतून नेमणुका करावयाच्या असतील तेथे मुसलमानांवर खास अनुग्रह करण्यात यावा ही मागणी फेटाळून लावण्यात आली, परंतु त्या त्या प्रांतातील प्रशासन, उच्च न्यायालये किंवा स्थानिक कचेऱ्यांत जेथे मोठ्या प्रमाणावर जागा भरावयाच्या असतील तेथे त्यांचा खास विचार केला जाईल असे आश्वासन देण्यात आले.

१८७८ साली व्हॉइसरॉय लॉर्ड लिटन यांनी सर सैयद यांची लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर नियुक्ती केली. १८८० त लॉर्ड रिपन यांनी त्यांची फेरनियुक्ती केली. या कौन्सिलात त्यांनी सुधारित इलबर्ट विधेयकाला पाठिंबा दिला. १८८२ साली मालमत्तेच्या हस्तांतरासंबंधीच्या विधेयकावर भाषण करताना भारतीय दंड विधान आणि फौजदारी कायदा या दोन अत्युत्कृष्ट कायद्यांमुळे जीवित व वित्त यांना सुरक्षितता लाभत असल्याबद्दल त्यांनी ब्रिटिश अंमलाची स्तुती केली. तथापि त्यांनी

अशी तक्रार केली की, दिवाणी कायद्याची अंमलबजावणी मात्र न्याय, समन्याय (equity) आणि सद्सद्विवेकबुद्धी यासंबंधीच्या मोघम तत्त्वानुसार केली जात असल्याने कज्जेदलाली निष्कारण वाढते म्हणून त्यांनी हिंदू व मुसलमान यांच्या व्यक्तिगत कायद्यांची संहिता बनविण्यात द्यावी अशी मागणी केली. १८८३ साली स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधीच्या विधेयकांवर बोलताना सर सैयद यांनी असे प्रतिपादन केले की, निवडणुकीद्वारा प्रतिनिधित्वाची पद्धत ही मुळातच या देशाला सोयिस्कर ठरणारी नाही. हिंदुस्थानसारख्या देशात जेथे अजून जातीपातीचे प्रस्थ आहे, निरनिराळ्या वंशांचे मीलन झालेले नाही, धर्मभेद जेथे हिंसक स्वरूप धारण करतात आणि आधुनिक दृष्टीने पाहता शिक्षणाच्या बाबतीत समाजातील सर्व थरात समान अथवा प्रमाणबद्ध प्रगती घडून आलेली नाही तेथे लोकल बोर्ड किंवा डिस्ट्रिक्ट कौन्सिलवर निरनिराळ्या हितसंबंधांना प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी नेहमीच्या सर्वसामान्य निवडणूक तत्त्वांचा अंगीकार करण्यात आला तर केवळ आर्थिकच नव्हे तर त्याहूनही अधिक भयंकर अशी हानीच जास्त घडून येण्याचा संभव आहे याबद्दल माझ्या मनांत संदेह नाही. जोपर्यंत जात, वंश, पंथ यांना हिंदुस्तानच्या सामाजिक-राजकीय जीवनात महत्वाचे स्थान आहे, सर्वसामान्यपणे देशाचे प्रशासन आणि कल्याण या बाबतीतही त्यांचाच अधिक प्रभाव असल्याचे दिसून येते तोवर निवडणुकीची नेहमीची पद्धत निर्वेधपणे स्वीकारता येणार नाही, तसे केल्यास बहुसंख्य समाज अल्पसंख्य समाजाचे हितसंबंध पार गिळंकृत करून टाकील.

ब्रिटिश सत्ताधारी–विशेषतः हुजूर पक्षाचे समर्थक आणि अश्रफ अमीर–उमराव यांच्यातील मैत्रीचे फार दूरगामी परिणाम घडून आले. अश्रफ अमीर–उमरावांपुढे अधिकाराचे जे तुकडे टाकण्यात आले त्याच्या मोबदल्यात त्यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादी आंदोलन आणि लोकशाही याविरुद्ध आघाडी उघडली. त्याचप्रमाणे मुस्लीम जनतेवर वजन असलेल्या ब्रिटिशविरोधी उलेमांविरुद्धही त्यांनी दंड थोपटले. या मैत्रीमुळे दोघांचेही सामर्थ्य वाढले. त्या दोघांनी मिळून मुसलमानांसाठी आधुनिक आणि मध्ययुगीन काळापासून चालत आलेल्या धार्मिक शिक्षणाची सांगड घालणारी नवी शिक्षणपद्धती सुरू केली. या शिक्षणपद्धतीमुळे इंग्रजी शिक्षण घेतलेल्या मुसलमानांत आधुनिक विचारसरणीचा प्रादुर्भाव होण्याचा मार्गच बंद झाला. ब्रिटिश साम्राज्याबद्दल मुसलमानांच्या मनात एकनिष्ठतेची भावना निर्माण करणे आणि प्रशासनातील निरनिराळ्या जागांवर काम करू शकतील अशा शिक्षित मुसलमानांचा वर्ग तयार करणे हे त्या शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट होते. अलिगडची शिक्षण पद्धती आणि तिचे अनुकरण करणाऱ्या इतर ठिकाणच्या संस्था यांनी शिक्षित बिगर मुसलमान आणि शिक्षित मुसलमान यांच्यात सामंजस्य निर्माण होणेच अशक्य करून टाकले. अशा तऱ्हेने विविधांगी निधर्मी राष्ट्रवाद आणि जातीयवादी अलगतेची भावना यामधील संघर्ष १८७० साली सुरू झाला आणि १९४७ साली देशाचे विभाजन होईपर्यंत तो चालूच राहिला.

---

प्रकरण तिसरे

# प्रतिस्पर्धी शक्तिकेंद्र : अश्रफ

काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनानंतर थोड्याच दिवसात इंग्लडमधील वृत्तपत्रांनी तिच्यावर टीकेची झोड उठविली. व्हॉइसरॉय लॉर्ड डफरीन यांच्या मनात बंगाली बाबूबद्दल तीव्र नाराजी निर्माण झाली आणि 'अत्यंत त्रासदायक डोकेउठाऊ' म्हणून ते त्यांचा उल्लेख करू लागले. आपण त्यांना घाबरतो असे त्यांना वाटता कामा नये असे ते म्हणत. सुशिक्षित बंगाल्यांबद्दल रिपन यांनी नसती अतिरंजित मते बनवून ठेवली होती असे त्यांना वाटे. जमीनदार वर्ग आणि समाजातील इतर सनातनी गट यांच्यावरच भरंवसा ठेवून त्यांच्याकडे अधिक लक्ष पुरवले पाहिजे असे त्यांनी ठरविले. संस्थानिकांना त्यांनी असे आश्वासन दिले की, त्यांच्या कारभारात निष्कारण हस्तक्षेप केला जाणार नाही आणि त्यांच्याकडे सहानुभूतीने बघितले जाईल. डफरीनच्या धोरणाचे डॉ. एस. गोपाळ यांनी सखोल विश्लेषण केले असून त्यात ते म्हणतात :

डफरीन यांनी केवळ वरिष्ठ वर्गाचेच सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला असे नाही तर सुरुवातीपासूनच हिंदुस्तानात आपण एक स्वतंत्र राजकीय घटक आहोत अशी भूमिका घेण्यास मुसलमानांना त्याने प्रोत्साहन दिले. मुंबईत पाऊल ठेवल्या-बरोबर त्याने असे सांगून टाकले की माझे बरेचसे आयुष्य मी मुसलमानांत घालविले असून भारतातील मुसलमानांच्या हितसंबंधाकडे लक्ष पुरविण्यास मला आनंद वाटेल. आपल्या या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी हाज यात्रेकरूंचे हाल थांबविण्यासाठी त्याने पावले उचलली. मुसलमानांशी बातचीत करता यावी म्हणून तो स्वत: पर्शियन भाषा शिकला. भारतात तो ज्या ज्या ठिकाणी गेला त्या त्या ठिकाणी मुसलमानांच्या शिक्षणाबद्दल आपल्याला विशेष आस्था आहे आणि त्यांना सरकारी नोकऱ्यांत जास्तीत जास्त जागा देण्याचा प्रयत्न राहील असे जनतेच्या निदर्शनास आणून देण्याचा त्याचा प्रयत्न असे. . . . . . भारतीय मुसलमानांच्या मनातील फुटीरपणाची भावना वाढीस लावण्याचे आणि सरकारला त्यांचा पाठिंबा मिळवून देण्याचे त्याने जे प्रयत्न केले त्यांना अपेक्षित असे फळ आले. डफरीनच्या या कृत्याचा एक परिणाम असा झाला की, जातीय दंग्यांना पुन्हा ऊत आला. स्वत: डफरीनने मोठ्या फुशारकीने तशी नोंद केली आहे. . . . लॉर्ड डफरीनच्या सत्तेमागील कर्ता करविता जो मॅकेंझी वॅलेस त्याने मार्च १८८६ त गॉडलेला असे लिहिले आहे की, 'भारतीय इतिहासातील एक नवा अध्याय किंबहुना एक नवे पर्व आम्ही सुरू करीत आहोत'.

पुढच्या वर्षी सर  बर्डवूड  यांच्यापाशी त्याने असे स्पष्टीकरण केले की, हिंदूंना जराही अन्याय न करता किंवा त्यांच्या विरोधी भूमिका न घेता मुसलमानांचे उपकारकर्ते आणि संरक्षक असल्याचा लॉर्ड डफरीन यांचा लौकिक झपाट्याने होऊ लागला आहे.

बंगालच्या नॅशनल सेंट्रल मोहॉमेडन असोसिएशनने काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाला संपूर्ण पाठिंबा दिला होता.  परंतु पुढल्या वर्षी कार्यकारिणीच्या एका ठरावाद्वारे तो पाठिंबा काढून घेण्यात आला.  त्या ठरावात प्रतिनिधी नियुक्त करण्याची पद्धती फारशी समाधानकारक नसल्याचे मान्य करण्यात आले असले तरी पुढे असे नमूद करण्यात आले आहे की :

या देशातील मुसलमानांचे स्थान लक्षात घेता आणि निरनिराळ्या पंथाचे आणि राष्ट्रीयत्वाचे लोक कसे मतदान करतील हे लक्षात घेता सर्वंकष स्वरुपात प्रतिनिधित्वाची पद्धत स्वीकारणे मुसलमानांना फायदेशीर ठरणार नाही अशी असोसिएशनची खात्री झालेली आहे. अल्पसंख्यांकांच्या हक्कांच्या संदर्भात प्रतिनिधित्वाच्या तत्वाचा काळजीपूर्वक विचार करावा लागेल.  त्याचप्रमाणे ज्यायोगे शासनाच्या प्रत्येक क्षेत्रात अल्पसंख्यांकांची गळचेपी होऊ शकेल अशा पद्धतीला असोसिएशन मान्यता देऊ शकणार नाही. दोन समाजातील असमान राजकीय विकास, शिवाय मुसलमानात त्यामानाने अगदी अलिकडेच झालेली इंग्रजी शिक्षणाची वाढ या बाबी लक्षात घेता राणी सरकारच्या मुसलमान प्रजाजनांच्या हितसंबंधांना घातक ठरणाऱ्या कोणत्याही चळवळीबाबत या समितीने अत्यंत जागरूक राहिले पाहिजे.

पहिली संपूर्ण दोन वर्षे सर सैयद आणि त्यांचे ' अलीगड इन्स्टिटयूट गॅझेट ' यांनी काँग्रेसवर कसलीही टीका टिपणी करण्याचे कटाक्षाने टाळले.  १८८६ च्या अखेरीस त्यांनी मोहॉमेडन एज्युकेशनल काँग्रेस या नावाची संस्था स्थापन केली.  पुढे १८९० साली तिचे मोहॉमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्स असे नामांतर करण्यात आले.  १८८७ च्या डिसेंबरमध्ये मद्रासला भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या सुमारासच लखनौ येथे भरलेल्या मोहॉमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्सचे दुसरे अधिवेशन भरले होते. त्यावेळी सर सैयद यांनी काँग्रेसवर अत्यंत जहरी हल्ला चढवला.  काँग्रेसच्या प्रचाराने वाहवून जाता कामा नये कारण त्यामुळे सरकारचा तीव्र रोष ओढवून घ्यावा लागेल असे त्यांनी मुसलमानांना बजावले.  मुसलमान समाजाने सरकार बरोबर जुळवून घेण्याची अत्यंत गरज होती, कारण त्यायोगेच अश्रफांना जुने वैभव प्राप्त करून देण्याचे स्वप्न साकार होवू शकेल.  सत्ताधाऱ्यांबद्दल मुसलमान समाजात विश्वास निर्माण झाला की, अब्राहमचे रक्त ज्यांच्या नसानसातून वाहाते आहे अशा पठाण, सैयदहाशिमी कुरेशी या माझ्या बांधवांच्या अंगावर झगमगता गणवेश चढून लष्करातील कर्नल, मेजर अशा मोठमोठ्या हुद्यांपर्यंत पोहोचण्यास त्यांना विलंब लागणार नाही. . . . आणि कालांतराने योग्य ती पात्रता आल्यावर पूर्वी आपले वाड-वडील

मानसन्मानाची जी पदे भूषवीत असत ती आपल्यालाही मिळू लागतील. एकास चार इतके हिंदूंचे मताधिक्य राहणार असल्याने सर सैयद यांनी निवडणूक पद्धतीस असलेला आपला विरोध पुन्हा एकदा जाहीर केला. त्यांनी असे प्रतिपादन केले की, हिंदुस्तान हे एक राष्ट्र नसून निरनिराळे राष्ट्रीयत्व असलेल्यांचा एक समूह आहे. 'निरनिराळ्या राष्ट्रांचे लोक हिंदुस्तानात आहेत. केवळ हिंदूंचाच विचार केला तरी काय दिसेल, आपल्या प्रांतातील हिंदू, पूर्वेकडील बंगाली आणि दक्षिणेतील मराठे म्हणजे काही एक राष्ट्र नव्हे.' स्पर्धात्मक परीक्षा घेण्याच्या काँग्रेसच्या मागणीवर हल्ला चढवताना ते म्हणाले :

सर्व जागा स्पर्धात्मक परीक्षा घेऊन भरावयाच्या असे ठरविले तर त्याचे काय परिणाम घडून येतील त्याचा क्षणभर विचार करा. मुसलमानांचे एक सोडा, पण उच्च पदस्थ राजेरजवाडे, आपल्या पूर्वजांच्या तलवारीचे पाणी अद्याप न विसरलेले राजपूत या सर्वांवर भाजी कापण्याची साधी सुरी दिसली तरी भीतीने गाळण उडून टेबलाखाली दडून बसणारे बंगाली बाबू सत्ता गाजवू लागतील (हंशा आणि प्रचंड टाळ्या). कोणत्याही अधिकाराच्या जागी बंगाल्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाचाही चेहरा दिसणार नाही. बंगाली लोक आपला विकास करून घेत आहेत यात मला आनंदच आहे. परंतु प्रश्न असा आहे की, देशाच्या प्रशासनावर त्याचा काय परिणाम घडून येईल? पोलिसांच्या तलवारी किंवा सोजिरांची बागनेटे यांना न भिणारे किंवा फाशीच्या तक्तावर चढण्यासही न डगमगणारे राजपूत किंवा लढाऊ पठाण हे बंगाल्यांच्या हाताखाली कधीतरी शांत बसतील असे तुम्हाला वाटते काय? (टाळ्या). काँग्रेसची मागणी मान्य झाली तर असे घडून आल्यावाचून राहणार नाही. तेव्हा तुमच्यापैकी ज्यांना असे वाटत असेल की देश बंगाल्यांच्या जोखडाखाली जखडला जावा आणि जनतेने बंगाल्यांचे बूट चाटीत राहावे तर तावडतोब गाडी पकडा आणि सरळ काँग्रेसच्या अधिवेशनासाठी मद्रासचा रस्ता धरा! (प्रचंड टाळ्या आणि हंशा).

सर सैयद यांच्या या हल्ल्यामुळे काही राष्ट्रवाद्यांत खळबळ उडाली. कलकत्ता काँग्रेसचे अध्यक्ष बदरुद्दीन तय्यबजी यांनी त्यांना एक पत्र पाठवून काँग्रेसच्या भूमिकेचे स्पष्टीकरण केले आणि सर सैयद यांची काही विधाने कशी चुकीची आहेत ते दाखवून दिले. परंतु सर सैयद यांच्यावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही उलट त्यांनी तय्यबजींना आणखीच विखारी पत्र लिहिले. त्याचप्रमाणे या प्रश्नावरील आपली भूमिका स्पष्ट करणारी पत्रे त्यांनी अनेक वृत्तपत्रांकडे पाठविली. अलिगड इन्स्टिट्यूट गॅझेटने तर काँग्रेसविरुद्ध सर्वंकष आघाडीच उघडली. २४ जानेवारी १८८८ रोजी तय्यबजींना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात :

राष्ट्रीय काँग्रेस या शब्दांचा अर्थच मी समजू शकत नाही. हिंदुस्तानात राहाणाऱ्या भिन्नभिन्न जातींचे आणि पंथाचे लोक हे एका राष्ट्राचे घटक आहेत

असे मानावयाचे कां? त्या सर्वांचे मिळून कधीतरी एक राष्ट्र बनू शकेल कां? किंवा त्यांच्या आशा-आकांक्षा, त्यांची उद्दिष्टे कधीतरी एक असू शकतील कां? चुकीचे नाव धारण करणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेसची कृती हिंदुस्तानला फायदेशीर ठरेल असे तुम्ही मानता परंतु माझे तर असे मत आहे की केवळ आपल्या समाजालाच नव्हे तर सर्व देशालाच ती घातक ठरणार आहे. भारत हे एक राष्ट्र आहे असे मानणाऱ्या कोणत्याही स्वरूपातील काँग्रेसला माझा विरोध आहे.

महिनाभरातच तय्यबजींनी त्यांना पुढीलप्रमाणे उत्तर पाठविले : 'संपूर्ण भारत हे एक राष्ट्र आहे असे कोणी मानीत असल्याचे मला तरी निदान माहीत नाही. आणि तुम्ही माझे उद्घाटनाचे भाषण वाचले तर त्यात हिंदुस्तानात अनेक जाती-जमाती किंवा राष्ट्रे आहेत आणि त्यापैकी प्रत्येकाचे स्वतंत्र प्रश्न असून ते त्यांना सोडवून घ्यावयाचे आहेत हे स्पष्ट केले असल्याचे तुम्हास आढळून येईल.' हिंदुस्तान हे एक राष्ट्र नाही अशी कबुली दिल्यानंतर त्यांनी सर सैयदना असे सुचविले की, मुसलमान जर काँग्रेसमध्ये सामील झाले तर त्यांना इष्ट वाटतील अशाच प्रश्नांपुरती काँग्रेसमधील चर्चा ते मर्यादित ठेवू शकतील. त्याचप्रमाणे त्यांनी असेही दाखवून दिले की, मुसलमान प्रतिनिधींचा आक्षेप असलेल्या कोणत्याही प्रश्नावर काँग्रेस चर्चा करणार नाही असे घोषित करणारा ठराव काँग्रेसने आपल्या दुसऱ्या अधिवेशनात पास केला आहे. परंतु यालाही सर सैयद यांनी चपराक लगावली. त्यांनी विचारले, 'मुसलमानांच्या दृष्टीने हानीकारक नसलेला असा एकतरी मूलभूत राजकीय प्रश्न काँग्रेससमोर उपस्थित करणे शक्य आहे कां? . . . . निवडणुकीची कोणतीही जरी पद्धत स्वीकारली तरी मुसलमानांच्यापेक्षा हिंदूंची संख्या चौपट राहाणार आणि त्यांच्याच मागण्या मान्य होणार. तसेच सर्व देशातील कायदेमंडळातील सत्ताही बंगाली किंवा तत्सम हिंदूंच्या हाती राहून मुसलमानांचा सतत मानभंग होत राहाणार.' काँग्रेसची एक एक मागणी घेऊन त्यावर त्यांनी हल्ला चढवला. अर्थसंकल्पावर नियंत्रण ठेवण्याची मागणी करण्याचा काँग्रेसला कसलाही अधिकार पोहोचत नाही. सत्ताधारी आणि त्यांचे प्रजाजन हे एकाच राष्ट्रातील असतील तेथेच अशी मागणी वाजवी ठरू शकते. आवश्यक वाटतील ते कर बसविणे हा सत्ताधाऱ्यांचा खास अधिकार असतो. भारतीय सैनिकांच्या मदतीने ब्रिटनने ब्रह्मदेश आपल्या साम्राज्यात सामील करून घेतला या गोष्टीचा काँग्रेसने निषेध केला होता. त्याबद्दलही सर सैयद यांनी काँग्रेसला बोल लावला. याबाबत त्यांनी मुसलमानांना असे स्मरण करून दिले की, मोगल सम्राट किंवा दिल्लीचे सुलतान हे हिंदुस्थानच्या एखाद्या प्रांतावर स्वारी करण्यापूर्वी आपल्या प्रजाजनांची परवानगी काढीत नसत. काँग्रेसचा हा दृष्टीकोन म्हणजे सत्तेचा त्यांना अनुभव नसल्याचेच द्योतक आहे. बंगाल्यांनी देशाच्या कोणत्याही भागावर कधीही राज्य केलेले नाही किंवा साम्राज्ये कशी

चालतात किंवा शासन कसे चालवावयाचे त्याचे त्यांना काडीचे ज्ञान नाही. लष्कराच्या आकारासंबंधी तक्रार करण्याचा किंवा लष्करातील वरच्या हुद्यावर भारतीयांच्या नेमणुका करण्यात याव्यात अशी मागणी करण्याच्या भानगडीतही काँग्रेसने पडता कामा नये असेही त्यांचे म्हणणे होते. लष्कर केवढे असावे ते ठरविण्याचा किंवा आपल्या विश्वासातील व्यक्ती जिल्ह्याजिल्ह्यांतून प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमण्याचा अधिकार सर्वस्वी साम्राज्य चालविणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा आहे. स्पर्धात्मक परीक्षा एकाच वेळी भारतात आणि इंग्लंडात घेण्याची काँग्रेसची मागणी म्हणजे निराळ्या शब्दात सांगावयाचे तर सगळा सनदी नोकरवर्ग बंगाल्यांनी भरुन टाकण्याचीच मागणी आहे.

आपल्या लखनौच्या भाषणावरील टीकेला उत्तर देणारी जी पत्रे सर सय्यद यांनी निरनिराळ्या वृत्तपत्रांकडे पाठविली होती त्यात आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करताना त्यांनी असा मुद्दा मांडला होता की, सत्ता मिळविण्यासाठी काँग्रेसची सारी धडपड चाललेली आहे. देशांतर्गत कारभार सरकारला येथील लोकांच्या हाती सोपवावयाचाच असेल तर त्याने मुसलमानांचे वाड-वडील जी हत्यारे वापरीत होते त्याच हत्यारांचा सत्ता संपादनासाठी हिंदूंशी स्पर्धा करताना आजही वापर करण्याची मुसलमानांना मुभा दिली पाहिजे. मग या 'स्पर्धात्मक परीक्षेत' जो विजयी होईल तो सत्ताधारी होईल. 'माझे बंगाली मित्र जर या परीक्षेत सर्वप्रथम आले तर, आम्ही त्यांचे जोडे उचलून ते आमच्या मस्तकी धारण करू. परंतु असे यादवी युद्ध घडून आल्याशिवाय आम्ही आमचे राष्ट्र त्यांच्या पायाखाली चिरडू देणार नाही.'

संमिश्र भारतीय राष्ट्रवादाचे ध्येय अशातऱ्हेने झिडकारल्यानंतर सर सैयद यांनी आपल्या समाजात मुस्लिम राष्ट्रवादाची भावना रुजविण्याचे कार्य तातडीने हाती घेतले. १४ मार्च १८८८ रोजी मीरत येथे मुसलमान समाजापुढे भाषण करतान त्यांनी असे जाहीर केले की, मुसलमान तरुणांना शिक्षित करण्यामागील उद्दिष्ट त्यांच्या मनात आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा आणि त्याबद्दचा स्वाभिमान जागृत करणे हे आहे.

दोन दिवसानंतर मीरत येथे केलेल्या दुसऱ्या एका भाषणात सर सय्यद यांनी काँग्रेसकडून आपल्या संघटनेत सामील होण्यासाठी मुसलमानांवर दडपण आणले जात आहे अशी तक्रार केली. जे मुसलमान काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनाला हजर राहिले होते त्यांचा भाडोत्री म्हणून त्यांनी धिक्कार केला. 'अधिवेशनासाठी माणसे कशी विकत घेण्यात आली होती ते सर्वांनाच माहीत आहे' असे सांगून त्यांनी काँग्रेस **'आमच्या राष्ट्रात'** सर्वस्वी अनावश्यक असा हस्तक्षेप करीत असल्याचा आरोप केला. काही काँग्रेसी हिंदू आपली स्वतःची ताकद वाढविण्याच्या विचारात आहेत कारण त्यामुळे 'त्यांच्या धार्मिक कृत्यांशी विरोधी असलेली मुसलमानांची धार्मिक कृत्ये बंद पाडता येतील आणि सर्व हिंदू एक झाले तर मुसलमानांना चिरडून

टाकता येईल' अशी त्यामागील त्यांची विचारसरणी आहे असेही त्यांनी प्रतिपादन केले आणि गोवधबंदीच्या चळवळीच्या वेळी उलट गाईंची कत्तल करण्याचे प्रकार फार मोठ्या प्रमाणात वाढले होते याचेही त्यांनी हिंदूंना स्मरण करून दिले. काँग्रेस हिंदू-मुसलमानात वितुष्ट निर्माण करीत आहे असा आरोप करून ते पुढे म्हणाले की, या देशात दोन स्वतंत्र राष्ट्रे नांदत असल्याने काँग्रेसची सूचना अत्यंत अव्यवहार्य ठरते. समजा काँग्रेसच्या म्हणण्याप्रमाणे सरकारने सत्ता सोडून दिली आणि ब्रिटिश फौजा हिंदुस्तानातून काढून घेतल्या तर त्या परिस्थितीत हिंदू आणि मुसलमान अशी दोन राष्ट्रे एकाच वेळी राजसिंहासनावर बसून समान सत्ता उपभोगू शकतील का? ते अशक्य आहे त्यांच्यापैकी एक जित आणि दुसरा जेता असेच राहणार. अशा तऱ्हेचे यादवी युद्ध घडून आले तर इंग्रजांपेक्षाही वाईट अशा दुसऱ्या एकाद्या राष्ट्राचे भारतावर आक्रमण होऊन तो त्याच्या घशात जाण्याचा धोका निर्माण होईल.

ऑगस्ट १८८८ मध्ये सर सैयद यांनी 'इंडियन पेट्रिऑटिक असोसिएशन' या नावाची एक संस्था स्थापन केली. पुढे या संस्थेचे नाव बदलून ते 'युनायटेड इंडियन पेट्रिऑटिक असोसिएशन' असे ठेवण्यात आले व स्वतः सर सैयद हे तिचे चिटणीस व एमएओ कॉलेजचे प्राचार्य बेक हे खजिनदार झाले. या संघटनेसंबंधी आपल्या एका मित्राला माहिती देताना सर सैयद यांनी असे सांगितले होते की, काँग्रेसला प्रतिस्पर्धी म्हणून ही संघटना सुरू करण्यात आली असून उच्च वर्गातील काँग्रेसविरोधी लोकांचा दृष्टीकोन इंग्रजांच्या कानावर घालून ब्रिटिशांची सत्ता दृढमूल करणे हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे.

१८८९ साली ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद चार्लस ब्रॅडलॉ यांनी पार्लमेंटमध्ये, 'इंडिया कौन्सिल' संबंधीचे विधेयक मांडले. त्यांच्या या विधेयकात इंपीरियल आणि प्रांतिक कौन्सिल वरील सभासदांची संख्या वाढवून त्यापैकी निम्मे सभासद लोक-नियुक्त असावेत अशी तरतूद होती. या विधेयकामुळे बेक चांगलेच खवळले. अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटच्या २० मार्च आणि १ एप्रिल १८९० च्या अंकात सर सैयद यांनी असे भविष्य वर्तविले की, सरकारने हिंदुस्तानात लोकनियुक्त सरकारे स्थापन केली तर या देशातील निरनिराळ्या धर्मांच्या अनुयायांत यादवी युद्ध झाल्यावाचून राहाणार नाही. यावेळी प्रथमच एम. ए. ओ. कॉलेजचे प्राचार्य बेक यांनी अलिगड-मधील विद्यार्थ्यांना राजकीय चळवळीसाठी संघटित केले. ब्रॅडलॉ यांच्या विधेयका-विरुद्ध सह्या गोळा करण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना कामाला लावले. बेकच्या आदेशानुसार विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या गावात फिरून सह्या गोळा करण्याची मोहीम उघडली. गाय मारण्याचा हक्क अबाधित राहावा म्हणून सरकारकडे अर्ज करावयाचा आहे असे सांगून या सह्या मिळविण्यात आल्या होत्या. अशा तऱ्हेने लबाडीने एकूण २०,७३५ सह्या दिल्लीत गोळा करण्यात आल्या.

सर सैयद यांच्या काँग्रेस विरोधाची तळी प्रमुख अश्रफांनीही उचलून धरली. हयूमला लिहिलेल्या पत्रात बद्रुद्दिन तय्यबजी यांनी अत्यंत विषादपूर्वक असे लिहिले आहे की, 'निझाम आणि त्याच्या संस्थानातील सालार जंग, मुनिर-उल-मुल्क, फत्ते नवाझ जंग आणि मुख्य म्हणजे सैयद हुसेन बिलग्रामी यांच्यासारखी सर्व प्रमुख माणसे सैयद अहमद, अमीर अली आणि अबदुल लतीफ यांनी उघडलेल्या विरोधी फळीत सामील झाली आहेत. सर सैयद यांनी दिलेल्या धक्क्यामुळे तैय्यबजी इतके हबकून गेले की अखेर त्यांनी नोव्हेंबर १८८८ मध्ये हयूमला असे कळवून टाकले की, निरनिराळ्या जाती-जमाती आणि प्रांत यांच्यात ऐक्य घडवून आणण्याचे आपले मुख्य उद्दिष्ट साध्य करण्यात काँग्रेसला दारूण अपयश आले असून पूर्वी कधी नव्हते इतके मुसलमान आज हिंदूंपासून अलग झाले आहेत आणि त्यांच्यातील दरी दिवसें-दिवस वाढतच चालली आहे. पाच वर्षेपर्यंत काँग्रेसने आपला कारभार स्थगित ठेवावा असे त्यांनी सुचविले. यापुढे आपले सारे आयुष्य मुसलमानांत ऐक्य घडवून आणण्यासाठीच वेचायचे असा निर्णय ते आधीच घेऊन चुकले होते. ८ सप्टेंबर रोजी एन. महंमद अली रोगे यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अडाणी, एककल्ली आणि कडव्या अशा समाजाशी आणि मुसलमानांचे ज्या मुद्यांवर एकमत आहे, त्याच्यावर भर देण्याऐवजी मतभेदाचे मुद्दे उगाळत बसणाऱ्या लोकांच्यात आपल्याला काम करावयाचे आहे हे विसरून चालणार नाही. आणि अशा सर्व फुटीर घटकांना 'इस्लाम' या एका परवलीच्या शद्वाखाली एकत्र आणून त्यांचा एकसंघ समाज उभा करणे हे माझे जीवितकार्य आहे. आपले हे ध्येय साध्य करण्यासाठी तय्यबजी आणि त्यांच्या कुटुंबियांनी गुजराथीचा त्याग करुन मातृभाषा म्हणून उर्दूचा स्विकार केला.

राष्ट्रवादाचा उदय होत असताना आत्मविश्वास आणि स्वतंत्र अस्मिता प्रयत्नपूर्वक जागृत करण्यासाठी गतेतिहासातील घटनांचे उदात्तीकरण करण्याचे मुद्दाम प्रयत्न केले जातात. साम्राज्यशाही सत्ताधाऱ्यांबरोबर संगनमत केलेल्या राजनिष्ठ अश्रफांनी संमिश्र भारतीय राष्ट्रवादाची कल्पना आधीच ठोकरून लावली होती. धर्मातीत राष्ट्रवादासाठी पायाभूत असलेली समान नागरिकत्वाची भावना वाढीस लावण्याच्या राष्ट्रवाद्यांच्या प्रयत्नास त्यांनी कसून विरोध आरंभला. सत्ताधाऱ्यांचा विश्वास संपादन करणे ही सर सैयद आणि तत्सम लोकांच्या दृष्टीने जीवनाची एकमेव इतिकर्तव्यता होती. तेवढ्यासाठी त्यांनी तुर्कस्तानचा सुलतान आणि त्याचे साम्राज्य याविषयीची आपली जुनी मते स्वतःच त्याज्य ठरविली होती. राष्ट्रवाद आणि आंतरजातीय प्रश्नांच्या बाबतही त्यांनी अशीच कोलांटी उडी घेतली होती. अश्रफांनी केवळ एक राजकीय पक्ष म्हणूनच काँग्रेसचा प्रतिकार केला असे नव्हे तर तिच्या तत्वप्रणालीवरही त्यांनी कडाडून हल्ला चढवला. त्यासाठी इस्लामचे गतवैभव आणि निरनिराळ्या देशावर मुसलमानांनी केलेल्या यशस्वी स्वाऱ्या यांच्या भव्यदिव्य

स्मृती जाग्या करून मुस्लिम राष्ट्रवादाची प्रतिस्पर्धी तत्त्वप्रणाली उभी करण्याचा जाणूनबुजून त्यांनी प्रयत्न केला. या सर्वांचा परिणाम असा घडून आला की, आपण येथे परके आहोत अशी भावना मुसलमानांत बळावत गेली.

एका बाजूला तुर्की साम्राज्याखाली असलेल्या यूरोप खंडातील ख्रिश्चन राष्ट्रांनी चालवलेला स्वातंत्र्य लढा आणि दुसऱ्या बाजूला पश्चिम आशिया आणि उत्तर आफ्रिका क्षेत्रांतील मुस्लिम देशांवर साम्राज्यशाही राष्ट्रांकडून झालेले आक्रमण अशा परिस्थितीत मुस्लिम जगतात फार मोठी खळबळ सुरू झाली होती. ईजिप्तमध्ये उदारमतवादी सुधारणा घडवून आणण्यासाठी जलालउद्दिन अफगाणी यांनी चळवळ सुरू केली होती. त्याचबरोबर नव्या खलिफाच्या नेतृत्वाखाली सर्व मुसलमानांचे ऐहिक आणि पारलौकिक ऐक्य घडवून आणण्यासाठी 'पॅन-इस्लामिझम'चा म्हणजे जगातील सर्व मुसलमानांना एका झेंड्याखाली आणण्याचा नवा सिद्धांत त्यांनी प्रसृत केला होता. सध्याच्या पाकिस्तानात मोडणाऱ्या विभागासकट पश्चिम आशियातील सर्व मुस्लिम देशांचे मिळून एक महान मुस्लिम प्रजासत्ताक बनविण्याची स्वप्ने ते रंगवीत होते. अफगाणी हे पाश्चात्य राष्ट्रांचे विरोधक होते त्याचप्रमाणे तुर्कस्तानच्या सुलतानावरही ते टीका करीत असत. आपल्या भारत भेटीच्या वेळी त्यांनी काही बंगाली अश्रफांचा पाठिंबा मिळवला परंतु सर सैयद मात्र त्यांच्या वाऱ्यालाही उभे राहिले नाहीत. ब्रिटिश सत्तेला निरपवाद निष्ठा वाहाण्याबद्दल ते सर सैयद यांच्यावर जोराची टीका करीत. सर सैयद यांनी अफगाणींचा पॅन इस्लामिझमचा सिद्धांत त्याज्य ठरवला त्याचप्रमाणे तुर्कस्तानचा सुलतान हा हिंदी मुसलमानांसकट सर्व मुसलमानांचा खलिफा असल्याचा दावाही त्यांनी फेटाळून लावला. अमीर अली मात्र अफगाणी इस्लामचे जे महात्म्य वर्णन करीत असत त्याने भारावून गेले आणि त्यांनी १८९१ मध्ये 'दि स्पिरीट ऑफ इस्लाम' या नावाचे आपले पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात प्रेषित महंमद हा सर्वगुणसंपन्न असून त्याने जगाला शेवटचा आणि सर्वोत्तम असा धर्म सांगितला असे प्रतिपादन केले आहे. इतर कोठल्याही धर्मापेक्षा इस्लाम धर्माची तत्त्वप्रणाली श्रेष्ठ आहे आणि बिगर मुसलमानांचे दोष मुद्दाम हुडकून काढून त्यामानाने सुरवातीच्या मुसलमानांची कामगिरी कशी नेत्रदीपक होती ते दाखविण्याचा त्यात प्रयत्न करण्यात आला आहे. इस्लामपूर्व अरबी समाजच केवळ नव्हे तर सर्व मानव जातच अधःपाताच्या गर्तेत रुतली होती. भ्रष्ट ख्रिस्ती धर्म, त्याचप्रमाणे उतरती कळा लागलेला हिंदू धर्म आणि अयशस्वी ठरलेला आणि हिंदूधर्माइतकाच अवनतावस्थेला पोहोचलेला बौद्धधर्म यांच्या प्रभावामुळे ही परिस्थिती निर्माण झाली होती. प्रेषित आणि त्याच्या नंतरचे चार खलिफा यांच्या सुवर्णयुगातच काय ते मानवाचे माहात्म्य दिसून येवू शकले. ख्रिस्ती धर्माच्या इतिहासातील नेमकी काळी कृत्येच तेवढी भडकपणे रंगविण्यात आली होती आणि इतर कोठल्याही धर्मापेक्षा ख्रिस्ती धर्मप्रवर्तकांनी निरपराध जीवांचे रक्त अधिक सांडले होते. विचार आणि

धर्म–स्वातंत्र्य चिरडून टाकण्यासाठी ख्रिस्तधर्मीय सदैव तलवार परजून उभे ठाकलेले असत. याउलट अत्यंत सहिष्णू अशा इस्लाम धर्मानेच काय ते शस्त्र धारण केले ते केवळ स्वसंरक्षणार्थ असा दावा त्या पुस्तकात करण्यात आला होता. अमीर अली यांनी १८९९ साली असाच एक शॉर्ट हिस्टरी ऑफ दि सारासीन्स या नावाचा अद्भूत ग्रंथ लिहिला होता. अलिगडच्या एम्. ए. ओ. कॉलेजातील अरेबिक आणि पर्शियन भाषेचे प्राध्यापक शिब्लि नुमानी हे १८९२ साली पश्चिम आशिया खंडातील देशात प्रवासाला गेले असता पॅन-इस्लामिक कल्पनांनी ते भारावून गेले. त्या भरातच त्यांनी उमर आणि अल् मामून या दोन खलिफांची, त्याचप्रमाणे अबू हनीफा गझाली, जलालउद्दिन यासारख्या प्राचीन विद्वानांची चरित्रे लिहून प्रसिद्ध केली. शिब्लि नुमानी आणि अमीर अली यांच्या पुस्तकांतून त्यांनी इस्लामी धर्माच्या वैभवाचे जे गोडवे गायले त्यामुळे सुशिक्षित मुसलमानांत एक स्वतंत्र अस्मिता निर्माण झाली.

बंगाली ऐवजी उर्दूचा उपयोग केला गेला पाहिजे असा बंगालमधील अश्रफांचा जो आग्रह होता तो देखील आपण या देशातील नसून परके आहोत ही भावना वाढीस लागण्यास कारणीभूत झाला. खालच्या वर्गातील बंगाली भाषिक मुसलमानांना आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठी त्यांनी धेडगुजराथी बंगालीत निरनिराळी पुस्तके प्रकाशित करण्यास सुरवात केली. अशा पुस्तकांतून पर्शियन आणि अरबी शद्बांची रेलचेल असे. या भाषेला ते मुसलमानी बंगाली असे म्हणत. त्या पुस्तकात प्रामुख्याने मध्यपूर्वेतील अद्भूत गोष्टींचा भरणा असे. परंतु मीर मुसरफ हुसेन यांनी या प्रवृत्तीला तीव्र विरोध दर्शविला. आणि 'बिसद सिंधू' या नावाचे पुस्तक बंगाली भाषेतून प्रकाशित केले. या पुस्तकाचा दर्जा फार उच्च प्रतीचा होता आणि बंगालमधील बुद्धीमंतावर त्याचा फार चांगला परिणाम घडून आला होता. या पुस्तकाचे परीक्षण करताना बंकीमचंद्रांनी असे म्हटले होते की, 'बंगालच्या विकासासाठी हिंदू मुसलमानांच्या ऐक्याची नितांत आवश्यकता आहे. उच्चवर्णीय मुसलमान जोपर्यंत आपली परकेपणाची भूमिका सोडीत नाहीत आणि बंगाली भाषा ही आपली नाही असे म्हणून उर्दू आणि पर्शियनमधूनच लिहिण्याचा आग्रह धरतात तोपर्यंत हे ऐक्य घडून येणार नाही. . . . ' परंतु मीर मुसरफ हुसेन हा एक अपवाद झाला. बिहार आणि उत्तर प्रदेशातील मुसलमानांच्या विकासाला उर्दूमुळे चालना मिळाली असली तरी सर्वसामान्य बंगाली मुसलमानांना मात्र उर्दू आत्मसात करण्यासाठी अतिशय कष्ट पडत आहेत ही गोष्ट नजरेआड करून अश्रफांनी आपले प्रयत्न चालू ठेवण्याचा अट्टाहास धरला. त्यामुळे उत्तर प्रदेश किंवा बिहारमधील मुसलमानांप्रमाणे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात बंगाली मुसलमान विशेष प्रगती करू शकले नाहीत हे त्यांच्या लक्षात आले नाही.

डफरिनचा काँग्रेसला विरोध असला तरी या ना त्या स्वरूपातील निवडणुकीच्या नावावर आधारलेल्या सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत असा त्यांनी आग्रह धरला

होता. त्याचे प्रतिपादन असे होते की सरकार अगदी खंबीर पायावर उभे असल्याने निवडणुकीचे तत्त्व अमलात आणले तरी त्याला कसलाही धोका उत्पन्न होणार नाही. प्रांतिक कायदेमंडळे स्थापन करण्याबाबत शिफारसी करण्याकरता ऑक्टोबर १८८८ मध्ये नेमण्यात आलेल्या डफरीन समितीच्या अहवालात असे सुचविण्यात आले होते की, अमीर, उमराव आणि जमीनदार, त्याचप्रमाणे व्यापारी, व्यावसायिक आणि शेतकरी, मळेवाले, युरोपीय समाज आणि सरकारी नोकर यांना प्रतिनिधित्व देण्यात यावे. नगरपालिका, लोकल बोर्डस् इ. चे 'निर्वाचक गट' (इलेक्टोरोल कॉलेज) निर्माण करण्यात यावेत अशीही शिफारस या समितीने केली होती. पुढच्या महिन्यात झालेल्या समितीच्या बैठकीच्या वृत्तांत त्यांनी असे नमूद केले आहे की, मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सभासदांच्या अंतर्गत बाबींवर प्रश्न विचारण्याची मुभा असावी. साम्राज्यविषयक बाबी मात्र त्यातून कटाक्षाने वगळण्यात याव्यात. डफरीनच्या या सूचना फेटाळण्यात आल्या परंतु त्याच्यानंतर आलेले लॅन्सडाऊन यांनी हे प्रयत्न चालूच ठेवले. शेवटी १८९२ साली इंडियन कौन्सिलस् ॲक्ट संमत करण्यात आला. या कायद्यान्वये, डफरीन यांनी केलेल्या शिफारसींच्या आधारावर बिनसरकारी सदस्यांची नियुक्ती करण्याची आणि त्यांना अंदाजपत्रकावर चर्चा करू देण्याची आणि प्रश्न विचारण्याची तरतूद करण्यात आली. पुढल्या वर्षी, नगरपालिका, चेंबर्स ऑफ कॉमर्स, व्यापारी मंडळे, मळेवाल्यांच्या संघटना, विद्यापीठे इ. चे निर्वाचन गट निर्माण करण्यात येऊन त्यांना कायदे मंडळावरील बिगर सरकारी सभासदांच्या नियुक्तीसाठी नावे सुचविण्याचा अधिकार देण्यात आला. यामुळे सर सैयद यांचा तिळपापड होणार हे अपेक्षितच होते आणि झालेही तसेच. राष्ट्रीयत्व, धर्म, जीवन पद्धती, रीतिरिवाज, नीतिमूल्ये, संस्कृती आणि ऐतिहासिक परंपरा अशा सर्वच बाबतीतील कमालीच्या तफावतीमुळे प्रातिनिधिक स्वरूपाची कोणतीही शासकीय पद्धत लागू करण्यात आली तर हिंदुस्तानावर फार मोठे संकट ओढवल्याशिवाय राहाणार नाही, असे विचार तारीख ५ ऑक्टोबर १८९३ च्या पायोनियरच्या अंकात एका जळजळीत लेखात त्यांनी व्यक्त केले. परंतु निवडणुकीचे तत्त्व एकदा स्वीकारण्यात येऊन प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होऊन चुकल्यामुळे सर्व जमातींचा अंतर्भाव असलेल्या संघटना आता निरर्थक बनणार आहेत असा निष्कर्ष सर सैयद आणि प्राचार्य बेक यांनी काढला व १८९३ च्या डिसेंबरात युनायटेड पेट्रिऑटिक असोसिएशन बरखास्त करून त्याऐवजी मोहॉमेडन ॲंग्लो-ओरिएंटल डिफेन्स असोसिएशन या नावाची केवळ मुसलमानांची संघटना स्थापन करण्यात आली व प्राचार्य बेक यांची तिचे चिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली. या संघटनेच्या उद्घाटन सभेत भाषण करताना प्राचार्य बेक यांनी या देशातील राजद्रोही चळवळ्यांनी अंदाधुंदीची परिस्थिती निर्माण केली तर तिला संयुक्तपणे तोंड देण्यासाठी इंग्रज आणि मुसलमान यांच्यात सख्य घडून आले पाहिजे

असे प्रतिपादन केले. भारतीय मुसलमानांचा दृष्टीकोन सरकारच्या कानावर घालणे, त्यांचे राजकीय हक्क अबाधित राखणे, त्यांच्या मनात राजनिष्ठेची भावना रुजविणे, मुसलमानांच्यात राजकीय आंदोलनाचा प्रादुर्भाव होऊ न देणे आणि ब्रिटिश सत्ता मजबूत करणे ही या संघटनेची उद्दिष्टे ठरविण्यात आली होती. पुढच्या महिन्यात अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटमध्ये लिहिलेल्या एका लेखात हिंदुस्थानातील राजनिष्ठेच्या अभावाची कारणमीमांसा करताना शिकलेल्या लोकात होणारा पाश्चात्य कल्पनांचा प्रसार, विद्यार्थी वर्गातील वाढती अधार्मिकता आणि सुशिक्षितामधील वाढती बेकारी त्याला जबाबदार असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले होते. राखीव जातीय मतदार संघ, स्थानिक स्वराज्य संस्थांत मुसलमानांना विशेषाधिकार आणि वायव्य प्रांतातील कायदेमंडळात समान प्रतिनिधित्व या मागण्यांवर विशेष भर देणारे मुसलमानांच्या मागण्यांचे एक निवेदन १८९६ मध्ये या संघटनेने तयार केले. इतिहास काळातील मुसलमानांचे खास स्थान आणि राजकीयदृष्टचा त्यांना असलेले महत्त्व या आधारावर हे विशेषाधिकार मागण्यात आले होते. (पुढे १९०६ साली सिमल्याला जे शिष्टमंडळ पाठविण्यात आले होते त्याच्या मुळाशी हे निवेदनच होते.) काँग्रेसने या मागण्या मान्य केल्या तर मुसलमान काँग्रेसमध्ये सामील होण्यास तयारच होतील असे सर सैयद यांनी अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटमध्ये लिहिलेल्या एका लेखातून जाहीर केले.

सर सैयद यांनी आपल्या एका दूताकरवी काँग्रेसाध्यक्ष रहिमतुल्ला सयानी यांना या मागण्या सादर केल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात यासंबंधी उहापोह करताना सयानी यांनी असे प्रतिपादन केले की, या सूचना चांगल्या असल्या तरी जोपर्यंत मुसलमान मनापासून आणि उत्साहाने काँग्रेसमध्ये सामील होत नाहीत तोपर्यंत त्या मान्य करता येणार नाहीत. मुसलमानांकडून काँग्रेसवर घेण्यात येणाऱ्या आक्षेपांचे खंडन करण्यात त्यांनी आपल्या भाषणाचा बराच भाग खर्ची घातला. काँग्रेसमध्ये सामील होणे आणि हिंदूंशी सहकार्य करणे इस्लाम धर्माच्या विरुद्ध आहे असे मानणे चूक आहे कारण मुसलमान आणि बिगर मुसलमान यांच्यातील सहकाराची परंपरा या देशातच नव्हे तर इतर देशातही फार काळापासून चालत आलेली आहे. सत्ताधाऱ्यांशी एकनिष्ठ राहाणे आणि त्यांच्या आज्ञा पाळणे हे इस्लामने प्रत्येकाचे कर्तव्यच ठरविले आहे. राज्यकर्त्यांनीही शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून खास पावले उचलली आहेत. हे खरे परंतु काँग्रेसही राजनिष्ठ राहू नका असे शिकवीत नाही. ती फक्त कायदेशीर आणि घटनात्मक मार्गाने जनतेच्या आकांक्षा सरकारच्या कानावर घालण्याचे काम करते. काँग्रेस हिंदुस्थानातील सर्व जमातींचे प्रतिनिधित्व करीत नाही अशी मुसलमानांतील कोणाची धारणा असेल तर जे काँग्रेसपासून अलिप्त राहतात तेच त्याला जबाबदार आहेत आणि त्यांनाच त्याबद्दल दोषी धरले पाहिजे असे म्हणणे भाग आहे. काँग्रेसला हिंदूंची सत्ता प्रस्थापित करावयाची

आहे असे म्हणणे हा तर निव्वळ कल्पनाविलास आहे. उद्योजक, व्यावसायिक आणि सधन जमीनदार वर्गातील पुढाऱ्यांचा काँग्रेसला पाठिंबा आहे त्यामुळे समाजातील महत्वाच्या घटकांचे काँग्रेस प्रतिनिधित्त्व करीत नाही असे कोणालाही म्हणता येणार नाही. नोकऱ्यांतील वरिष्ठ जागांवरील भरतीसाठी स्पर्धात्मक परीक्षा घेण्यास मुसलमानांकडून होणारा विरोधही चुकीचा आहे कारण काही शिकलेल्या मुसलमानांनी सर्वोत्तम शिक्षित हिंदूंपेक्षा आम्ही कोणत्याही तऱ्हेने कमी नाही हे दाखवून दिले असल्यामुळे याबाबतीत त्यांनी न्यूनगंड बाळगण्याची कसलीही जरुरी नाही. काँग्रेस-मध्ये मुसलमानांचा आवाज दडपून टाकला जाईल ही भीति देखील काँग्रेसच्या कामकाज पद्धती विषयीचे अज्ञान दर्शविते. कारण काँग्रेसची बैठक म्हणजे काही एकाद्या जॉईंट स्टॉक कंपनीच्या भागधारकांची सभा नव्हे. अशा सभांतून ज्यांच्या हातात बहुसंख्य भाग भांडवल असते ते म्हणतील तसेच निर्णय घेतले जातात. परंतु काँग्रेसने तर यापूर्वीच असा निर्णय घेऊन टाकला आहे की, मुसलमान प्रतिनिधींचा विरोध असलेला कोणताही विषय चर्चेला देखील घेतला जाता कामा नये. शिवाय काँग्रेस अधिवेशनात सर्व निर्णय एकमताने घेण्याची प्रथा आहे. तथापि यापैकी कोणताही युक्तिवाद अश्रफ, अमीर उमरावाचे जराही मतपरिवर्तन करू शकला नाही.

नव्या सुधारणांचे स्वागत करीत असतानाच न्याय आणि अंमलबजावणी खाती वेगळी करण्यात यावी यासारख्या मागण्या डावलण्यात आल्याबद्दल काँग्रेसने निराशा व्यक्त केली. ब्रिटनमधील जनमत वळवून घेण्यासाठी ह्यूमसाहेब काँग्रेसवाल्यांचे एक शिष्टमंडळ घेऊन इंग्लंडला गेले. त्यांच्या तेथील प्रयत्नाला चांगला प्रतिसाद मिळाला. १८९४ साली पार्लमेंटच्या १६० सभासदांच्या एका समितीने भारताबद्दल सहानुभूतीचे धोरण आखण्यात यावे अशी मागणी केली. या समितीने आपले स्वतःचे एक नियतकालिकही सुरू केले परंतु समितीच्या या हालचालींना लॅन्सडाऊन यांनी जोराचा विरोध दर्शविला. त्यांनी भारत मंत्र्यांना असे कळविले की, भारत सरकार पार्लमेंटचा १८९३ चा सनदी नोकरांसाठी असलेल्या स्पर्धात्मक परीक्षा एकाच वेळी हिंदुस्थानात आणि इंग्लंडात घेण्याचा प्रस्ताव अमलात आणू शकत नाही.

त्यांनी त्या पत्रात अशी तक्रार केली होती की, अशा परीक्षा घेतल्या गेल्या तर ज्यांना राज्य चालविण्याचा चांगला अनुभव आहे आणि वाङमयीन शिक्षणात मागे असले तरी जे अत्यंत चारित्र्यसंपन्न आहेत अशा हिंदुस्थानातील शीख, मुसलमान वगैरे जमातीतील लोकांचा सरकारला फायदा करून घेता येणार नाही.

लॅन्सडाऊन नंतरचे व्हॉइसरॉय एल्जिन यांनीही या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याचे नाकारले. पार्लमेंट किंवा ब्रिटिश मंत्रिमंडळ यांनीही हा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न केला नाही. या संबंधीचे लॅन्सडाऊन यांचे विचार थेट सर सैयद आणि अश्रफ अमीर उमराव यांच्या सारखेच होते. गमतीची गोष्ट म्हणजे अलिगड गट आणि सरकार यांच्यातही या विषयावर एकवाक्यता होती. सुशिक्षित

वर्गातील राजद्रोहाच्या भावनेला आळा घालण्यासाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यावर मर्यादा घालण्यात यावी असे वायव्य प्रांताच्या गव्हर्नरने १८९५ च्या जानेवारीत व्हॉइसरॉयला लिहून कळवले तर लॅन्सडाऊन यांनी पुन्हा एकदा जमीन-धारक आणि जमीनदार यांना पाठिंबा आणि प्रोत्साहन देण्याचे धोरण अंगिकारण्याचे ठरविले. त्यांनी भारत मंत्र्यांना असे कळविले की, सध्याच्या परिस्थितीत माझे असे मत बनले आहे की, मोठ्या जमीनमालकांमधून आपल्याला पाठिंबा देणारे समर्थक मिळविण्याचा प्रयत्न करावा.

सत्ताधारी आणि पाश्चात्यांना अनुकूल असलेले राजनिष्ठ अश्रफ यांच्यात झालेल्या गट्टीमुळे अश्रफात फूट पडली. अश्रफांपैकी सनातनी वृत्तीच्या उलेमांना सर सैयद यांची फाजील राजनिष्ठा अजिबात पसंत नव्हती आणि धार्मिक कारणावरून त्यांनी उघडपणे सर सैयद यांच्या दृष्टीकोनाला आव्हान दिले. १८७० पासून तो थेट १९४७ मध्ये भारताच्या फाळणीपर्यंत ब्रिटिशांना अनुकूल असलेले हुजूरपक्षीय मनोवृत्तीचे जमीनदार आणि उलेमा यांच्यापैकी मुसलमान समाजाचे नेतृत्व कोणाकडे जाणार या प्रश्नावर सतत संघर्ष चालल्याचे दिसून येते.

उलेमांनी अनेक उठाव करून पाहिले परंतु ते सर्व अयशस्वी ठरल्याने उलेमा जणू कोशात जाऊन गप्प बसले. त्यांच्यापैकी काही जणांनी दिल्लीपासून १२० कि. मि. अंतरावर असलेल्या देवबंद या गावी १८६७ साली एक धार्मिक संस्था सुरू केली. त्या संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या शाळेतील अभ्यासक्रम वहाबी तत्त्वप्रणालीऐवजी परंपरागत हनाफी (सुनी पंथाच्या धार्मिक कायद्यासंबंधीच्या चार विचारप्रणालीपैकी एक) धर्तीवर असेल अशी खास काळजी घेण्यात आली होती. प्रथम ईस्ट इंडिया कंपनीचे आणि नंतर ब्रिटिश सरकारचे अधिकारी सर्वसाधारणपणे सर्व मुसलमान बंडखोरांना वहाबी अशी संज्ञा देत. १८७६ साली पंजाबमधील वहाबींनी सरकारकडे अर्ज करून त्या संज्ञेला आक्षेप घेतला. १८८६ साली त्यांनी पुन्हा एक अर्ज करून आपल्याला अहल-इ-हादिस म्हणून संबोधण्यात यावे अशी विनंती केली. उलेमा निष्क्रीय झाले असले तरी ब्रिटिश सत्तेबद्दलचा त्यांचा तिरस्कार गेलेला नव्हता. सर सैयद, सैयद अमीर अली, नबाब अबदुल लतीफ हे जसजसे पुढे येत गेले तसतशी अश्रफांची विभागणी होऊन ते संघर्षाच्या पवित्र्यात समोरासमोर उभे ठाकले. त्यापैकी एक गट ब्रिटिशांचा व पाश्चात्य संस्कृतीचा पाठिराखा असलेला उच्च वर्गीयांचा होता तर दुसऱ्या गटात ब्रिटिशविरोधी पुनरुज्जीवनवादी उलेमांचा समावेश होता. मुस्लिम समाजात परदेशातील कुळात जन्म घेतलेल्या व्यक्ती फार सन्माननीय समजल्या जात असत. विणकर, गवंडी, खाटिक यासारख्या खालच्या जातीत जन्माला आलेल्या मुलाला जरी मदरसात जाऊन शिक्षण घेण्याची आणि अलिम म्हणजे धर्मवेत्ता बनण्याची मुभा होती, तरी वरिष्ठ जातींच्या गटात त्याला प्रवेश मिळण्याची आशा नसे. अलिमांची खानदानी कुटुंबे त्याला कुफ्व म्हणजे आपल्या

गटातील समजायला तयार नसत किंवा त्यांच्याशी बेटी व्यवहार करीत नसत.

१८७० साली इंग्लंडहून परत आल्यानंतर सर सैयद यांनी कडव्या उलेमविरुद्ध आणि सामाजिक सुधारणांच्या बाजूने प्रचाराची जोरदार आघाडी उघडली त्यामुळे त्यांच्याबद्दल मोठेच वादळ उठले. तहझीब-उल्-अखलाक (मुसलमानी सामाजिक सुधारणा) या नावाचे नवे वर्तमानपत्र त्यांनी सुरू केले होते. सनातनी प्रवृत्ती आणि पाश्चात्य संस्कृतीबद्दलचे धार्मिक पूर्वग्रह यांच्याविरुद्ध त्यांनी त्यातून झोड उठविली उलेमांनी त्याबद्दल तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आणि काफर म्हणून त्यांचा धिक्कार करणारे फतवे काढले. कानपूर, मुरादाबाद, आग्रा आणि इतर हिंदुस्तानातील अन्य काही शहरांतून त्यांचा मुकाबला करणारी प्रतिस्पर्धी नियतकालिके त्यांनी सुरू केली. मौलवी अली बक्षखान आणि मौलवी इमदाद-उल-अली यांनी सर सैयद यांचे लिखाण आणि त्यांच्या हालचालीबद्दल हिंदुस्तानातील आणि परदेशातील उलेमांना माहिती दिली आणि त्यांच्याकडून वर उल्लेखिलेले फतवे मिळवले. मक्केतील एका अलिमाने मौलवी अली बक्श खान यांना असे कळविले की, संकल्पित एम. ए. ओ. शाळेला किंवा कॉलिजला कोणत्याही तऱ्हेचे आर्थिक साहाय्य करता येणार नाही. त्या पत्रात पुढे असे म्हणले होते की, अल्ला या संकल्पित शाळा कॉलेजचे आणि त्याच्या संस्थापकाचे निर्दालन करो. अशा तऱ्हेची स्थापना करण्याच्या कामी मदत करण्याची कोणत्याही मुसलमानाला मनाई आहे. त्याचप्रमाणे यदाकदाचित अशी संस्था स्थापन झालीच तर तिचा बीमोड करणे आणि त्याबद्दलती सहानुभूती दाखवणाऱ्याला शासन करणे हे प्रत्येक धर्मनिष्ठ मुसलमानाचे कर्तव्य ठरते. मौलवी अलीबक्ष खान मक्केला गेले आणि त्यांनी तेथील सुनी पंथातील चारही विचारसरणीच्या प्रमुखांकडून सर सैयद सैतानाचे हे दूत असून मुसलमानांची दिशाभूल करीत आहेत आणि त्यांचे हे दुष्कृत्य ख्रिस्ती किंवा यहुदी यांच्यापेक्षाही वाईट आहे असे जाहीर करणारा फतवा मिळवला. आपल्या एम. ए. ओ. कॉलेजसाठी सर सैयद बिगर मुसलमानांकडून ज्या देणग्या जमा करीत होते त्यावरही उलेमांनी आक्षेप घेतला.

सर सैयद यांच्याकडून काँग्रेसला होत असलेल्या विरोधाची प्रतिक्रिया म्हणून ब्रिटिशविरोधी आणि धार्मिकदृष्टचा सनातनी मनोवृत्तीच्या अश्रफांनी काँग्रेसला संपूर्ण पाठिंबा द्यावयास सुरवात केली. देवबंद अकादमीच्या प्रमुखांनी तर मुसलमानांना काँग्रेस अधिवेशनांना हजर राहण्यास प्रत्यवाय नाही असे जाहीर करणारा फतवाच काढला.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात ग्रेट ब्रिटन आणि तुर्कस्तान यांचे संबंध आणखीच बिघडले. सुलतान स्वतःला मुस्लीम जगताचा खलीफा म्हणवून घेऊ लागला. त्याने नव्या बृहद् इस्लाम चळवळीला चालना दिली आणि त्यासाठी इतर देशातील उलेमांचा पाठिंबा मिळविण्यास सुरवात केली. अरबांना तुर्की साम्राज्याविरुद्ध चिथावण्याचा जो उद्योग पाश्चात्य सत्तांनी आरंभला होता

त्यामुळे तो अस्वस्थ झाला होता. अरब लोकांची आपल्याविषयीची निष्ठा विचलित होऊ नये म्हणून सुलतान अबदुल हमीद याने परंपरागत उलेमांचा पाठिंबा मिळविला आणि आपल्या प्रतिगामी बृहद्-इस्लाम चळवळीला अनुयायी मिळविण्यासाठी त्याने हिंदुस्तानसकट निरनिराळ्या देशात आपले दूत पाठवले. ईजिप्त आणि इतर अरब देशांप्रमाणेच हिंदुस्तानातही या स्वयंमन्य खलीफाला अनेक सनातनी उलेमांचा पाठिंबा मिळाला. ब्रिटिशविरोधी परंपरेचा अभिमान बाळगणारे देवबंदचे उलेमा याबाबतीत भलतेच उत्साही होते. त्यांनी सर सैयद यांना त्यांच्या राजनिष्ठेबद्दल पुन्हा एकदा धारेवर धरले. १८८० मध्येच सर सैयद यांनी स्वतःला खलिफा म्हणवून घेणाऱ्या अबदुल हमीदची टर उडविली होती आणि खलिफा हा त्याचा किताब पोकळ आणि निरर्थक असल्याची टीका केली होती. ग्रेट ब्रिटन आणि तुर्कस्तान यांचे संबंध जास्त बिघडल्यानंतर त्यांनी अबदुल हमीदवर पुन्हा हल्ला चढवला. अबदूल हमीद हे फार तर स्वतःच्या देशाचे खलिफा होऊ शकतील आणि तेथे इस्लामी कायद्यान्वये शासन करू शकतील परंतु आपल्या अधिकारक्षेत्राबाहेरील देशात त्यांना खलिफा म्हणून मान्यता मिळू शकणार नाही असे त्यांनी एका लेखात म्हटले होते. हिंदुस्तानातील मुसलमानांसाठी फतवे काढण्याचा तुर्कस्तानच्या धर्म प्रमुखाला शेख-उल-इस्लाम–अधिकार नाही अशीही त्यांनी भूमिका घेतली. देवबंद उलेमा आणि सर सैयद यांच्यातील हा वाद बराच काळ चालू होता. १८९८ साली सर सैयद निधन पावले. पुढे ग्रेट ब्रिटन आणि तुर्कस्तान यांच्यातील संबंधांना आणखी तडा गेल्यानंतर मुसलमान समाजातील बहुसंख्य लोक सुलतान अबदुल हमीदला खलिफा म्हणून मान्यता देऊ लागले.

एम्. ए. ओ. कॉलेजमधील एक प्राध्यापक शिब्लि नुमानी हे १८९२ मध्ये पश्चिम आशियातील देशांच्या दौऱ्यावर गेले असताना पॅन-इस्लामिक विचारांनी भारून गेले. सर सैयद यांच्या संपूर्ण राजनिष्ठेच्या भूमिकेला विरोध दर्शवून त्यांनी अलिगड सोडले आणि नदवत-उल-उलेमा या नावांची प्रतिस्पर्धी संस्था स्थापन केली. मौल-वींना देण्यात येणाऱ्या शिक्षणात सुधारणा घडवून आणणे हा त्या संस्थेचा उद्देश होता. त्याला अनुसरून धार्मिक विषयांच्या जोडीला इंग्रजी, आधुनिक इतिहास आणि राज्यशास्त्र हे विषयही त्या संस्थेत शिकविले जाऊ लागले. एक ना एक दिवस सबंध मुसलमान समाज आपल्या संस्थेच्या प्रभावाखाली येईल अशी स्वप्ने शिब्लि रंगवीत होते. त्या संस्थेपुढे केलेल्या पहिल्या भाषणात ते म्हणाले: मुसलमानी अमलाच्या काळात समाजाच्या धार्मिक आणि ऐहिक अशा दोन्ही बाबींवर उलेमांचे नियंत्रण असे. धर्माचे पालन, न्यायदान आणि त्याची अंमलबजावणी या तिन्ही गोष्टी तेच करीत. परंतु ब्रिटिशांचा अमंल सुरू झाल्यापासून ही परिस्थिती राहिलेली नाही. त्यांचे सर्वसामान्य जनतेबरोबरचे संबंध केवळ धार्मिक स्वरूपाचेच राहिलेले आहेत असे नाही. मुसलमान समाजाची नीतिमूल्ये, त्यांचे शिक्षण आणि

विद्वता, त्यांच्या रीतीभाती आणि परंपरा आणि त्यांचे बौद्धिक जीवन या सर्वांवर आजही उलेमांचा प्रभाव आहे असे सांगून त्यांनी भारतातील उलेमांना नदवाच्या नेतृत्वाखाली संघटित होण्याचे आवाहन केले. त्यांचे म्हणणे असे होते की, उलेमा एकदा असे संघटित झाले की, त्यांचे सामर्थ्य इतके वाढेल की सबंध मुसलमान समाज त्यांच्या फतव्याबरहुकूम वागू लागेल आणि जनतेला नदवाच्या धार्मिक निर्णयापुढे मान तुकवावी लागेल आणि त्या निर्णयांची पायमल्ली करण्याची त्यांची ताकद होणार नाही.

प्रकरण चौथे

## मतभेदांना जातीय स्वरूप आले

हिंदी उर्दू वादास १८७० पासून सुरुवात झाली. पंजाब, वायव्य प्रांत, अवध आणि बिहार या प्रांतात उर्दूला सरकारी भाषा म्हणून मान्यता मिळालेली होती हे आपण मागे पाहिलेच आहे. परंतु कित्येक वर्षेपर्यन्त असलेला उर्दू क्रमिक पुस्तकांचा अभाव, वरिष्ठ वर्गातील मुसलमान पर्शियन भाषेच्या अध्ययनाला देत असलेले महत्त्व आणि त्याच्या जोडीला उत्तर हिंदुस्तानातील शाळांतून हिंदीच्या शिक्षणाचा त्यामानाने झपाट्याने झालेला प्रसार यामुळे हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होऊन बसला.

ईस्ट इंडिया कंपनीने हिंदू आणि मुसलमान समाजातील मुलांना संस्कृत आणि पर्शियन भाषांचे ज्ञान व्हावे म्हणून धार्मिक शाळा सुरू केल्या होत्या. ही धार्मिक शाळा कॉलेजे पन्नास वर्षाहून अधिक काळपर्यन्त चालू होती. त्यानंतर निधर्मी शिक्षण पद्धती क्रमाक्रमाने सुरु करण्यात आली. शिक्षणात संस्कृत आणि पर्शियन भाषेवर भर देण्याच्या सुरवातीच्या परंपरेमुळे देवनागरी लिपीतील संस्कृतनिष्ठ हिंदी आणि पर्शियन लिपीतील अरबी आणि पर्शियन निष्ठ उर्दू सुशिक्षितांमधील वाङ्मयीन भाषा म्हणून पुढे आल्या. पंजाबपासून बिहारपर्यंतच्या उत्तर हिंदुस्थानातील मुसलमानांतील उच्च वर्णीय लोक पर्शियन भाषेला हमखास अधिक अनुकूलता दर्शवीत. अवध प्रांताच्या शिक्षणविषयक अहवालात अशी माहिती देण्यात आली आहे की, १८७० साली प्रांतातील एकूण ५०७ शाळांतील ४,००० मुलांपैकी २,००० मुले पर्शियन भाषेतून शिक्षण घेत होती तर २५० अरेबिक भाषेतून; उरलेली मुले हिंदी आणि संस्कृतमधून शिक्षण घेत असत. याउलट एत्तद्देशीय भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू झाल्या तेव्हांपासूनच वायव्य प्रांत, अवध आणि बिहार प्रांतातील हिंदू मुलांनी हिंदी शिकण्यास सुरवात केली. १८ नोव्हेंबर १८५४ च्या ठरावानुसार वायव्य प्रांताच्या सरकारने असा निर्णय घेतला होता की, महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना पर्शियन हस्तलिखित वाचता येत असेल, इंग्रजी उताऱ्याचे प्रचारातील उर्दूत भाषांतर आणि अंकगणित येत असेल त्यांनाच सरकारी नोकरीसाठी पात्र समजता येईल. त्यामुळे प्रशासनात मुसलमान विद्यार्थ्यांना प्रमाणापेक्षा जास्त नोकऱ्या मिळत. बंगालमध्ये प्रशासनात हिंदूंचे प्राबल्य होते तर बिहार, अवध आणि वायव्य प्रांतात त्यांचे प्रमाण फार कमी असल्याने ते नाराज होते. शासकीय भाषा म्हणून फक्त उर्दूलाच मान्यता असल्यामुळे सरकारी नोकऱ्यांच्या बाबतीत हिंदूंची फार

कुचंबणा होत असे, त्यामुळे वायव्य प्रांत आणि बिहारमधील लढाऊ प्रवृत्तीच्या हिंदूंनी उर्दूबरोबर देवनागरी लिपीतील हिंदीलाही सरकारी भाषा म्हणून मान्यता मिळावी या मागणीसाठी चळवळ सुरू केली. १८८० साली सरकारने ही मागणी अंशत: मान्य करून न्यायालयातील कामकाजासाठी देवनागरी लिपीतील हिंदीला पर्यायी भाषा म्हणून मान्यता दिली. बंगाली अश्रफांकडून याला तीव्र विरोध झाला. १८८२ च्या फेब्रुवारीत सेंट्रल नॅशनल मोहॅमिडन असोसिएशनने बिहारमध्ये हिंदीला देण्यात आलेल्या मान्यतेबद्दल आपला विरोध दर्शविणारे एक निवेदन व्हॉइसरॉयला सादर केले होते. त्यात असे म्हटले होते की :

> बिहार प्रांतातील बहुतेक सारे हिंदू हे रितीरिवाज, मनोरंजनाच्या पद्धती इ. सर्व दृष्टीने मुसलमानांतच जमा आहेत. त्यांचा अविर्भाव आणि संस्कृती ही देखील त्यांनी मुसलमानांकडूनच उचललेली आहे. शुद्ध उर्दू बोलण्यात त्यांना मोठा अभिमान वाटतो. बिहार प्रांतातील न्यायालयातून हिंदीचा अंतर्भाव करण्यात आल्यामुळे हिंदीच्या पुरस्कर्त्यांचे तर समाधान झालेले नाहीच उलट मुसलमानात मात्र संतापाची लाट पसरली आहे. देवनागरी लिपी भराभर लिहिता येत नाही त्याचप्रमाणे कायदेविषयक आशयही अचूकपणे व्यक्त करता येत नाही यामुळे सर्वच लोकांचा याला विरोध आहे.

उर्दूचे ज्ञान असल्याशिवाय कोणालाही सरकारी नोकरीत प्रवेश मिळू शकणार नाही असा आदेश १८७८ साली वायव्य प्रांताच्या सरकारने काढला होता. सुशिक्षित हिंदूंनी यावर जोरदार आक्षेप घेतला आणि हिंदीला आणखी एक प्रादेशिक भाषा म्हणून मान्यता मिळावी या मागणीसाठी प्रत्यक्ष चळवळच सुरू केली. त्यामुळे लगेच संघर्षाची ठिणगी पडली. १८७७–७८ सालच्या आपल्या अहवालात वायव्य प्रांताच्या शिक्षण संचालकाने असे नमूद करून ठेवले होते की, 'हिंदी हीच या प्रांताची खरी लोकभाषा असून ग्रामीण भागातील जनतेचे व्यवहार त्याच भाषेतून चालतात. हिंदीच्या बाजूने या निवेदनाचा विशेष उपयोग करून घेण्यात आला. याउलट त्या प्रांतातील बहुतेक सर्व शहरातील मुसलमानांनी त्यावर जोरदार आक्षेप घेऊन शेकडो वर्षांपासून पर्शियन लिपीच रूढ असल्याचा दावा केला. हा वाद बराच काळ चालू होता. शेवटी १९०० साली गव्हर्नर मॅकडोनाल्ड याने अशी शिफारस केली की, प्रशासकीय सोयीसाठी हिंदीतून आलेले अर्ज स्वीकारण्यात यावेत, त्याचप्रमाणे शासकीय आज्ञांचे त्या भाषेत भाषांतर केले जावे. कर्झनने ताबडतोब ही शिफारस मान्य करून तारीख १ जून १९०० रोजी गव्हर्नरला अशी सूचना केली की, याबाबत मुसलमानांकडून विरोध झाला तरी त्याकडे दुर्लक्ष करण्यात यावे. यासंबंधात कर्झनने असे लिहिले आहे की, मुसलमान याबाबत जो कांगावा करीत आहेत त्यामागे हातातून निसटलेली सत्ता भल्याबुऱ्या मार्गाने मिळविण्याचा प्रयत्न करणारे काही मूठभर असंतुष्ट लोकच काय ते आहेत.

लवकरच नबाब मोहसीन-उल्-मुल्क यांच्या अध्यक्षतेखाली उर्दू डिफेन्स असोसिएशन (उर्दू संरक्षण समिती) स्थापन करण्यात आली. हिंदीला दिलेली मान्यता काढून घेण्यात यावी असा ठराव समितीच्या बैठकीत एकमताने संमत करण्यात आला. नबाब साहेबांनी आपल्या भाषणात असे सांगितले की, 'ज्या मुसलमानांना लेखणी पेलवत नाही ते तलवार पेलायला समर्थ आहेत.' मुसलमान समाजाकडे सरकारने दुर्लक्ष करावे आणि त्याची उपेक्षा करावी याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. नबाब साहेबांनी सांगितले की, 'संपूर्ण मुस्लीम राष्ट्र या निर्णयाने व्यथित झाले आहे.' गव्हर्नरांनी या भाषणाबद्दलची आपली नाराजी त्यांना तात्काळ कळविली. त्याबरोबर नबाबसाहेब एम्. ए. ओ. कॉलेजच्या कोशात जाऊन बसले. नंतर थोड्याच दिवसांनी मेहदी हसन, विकार-उल्-मुल्क, मियां मोहमद शहा दिन, फजली हुसेन, मोहमद शफी आदि नेत्यांनी योग्य ती संघटना बांधल्याशिवाय आपले राजकीय हक्क सुरक्षित राहू शकणार नाहीत असा मुसलमान समाजात प्रचार करण्यास सुरवात केली. २०–२१ ऑक्टोबर १९०१ रोजी लखनौ येथे घेण्यात आलेल्या बैठकीत असे ठरविण्यात आले की, (१) हिंदुस्तानातील मुसलमानांनी स्वतःची संघटना उभारावी आणि तिने मुसलमानांच्या सामाजिक आणि राजकीय गरजा व हितसंबंध यांच्या बाबतीत कारवाई करावी. (२) काँग्रेसचे प्रातिनिधिक सरकारचे तत्त्व आणि स्पर्धात्मक परीक्षानुसार सरकारी नोकरीतील भरतीचे धोरण 'उघड उघड मुसलमानांच्या हितसंबंधांना विघातक' असल्याने मुसलमानांनी काँग्रेसपासून अलिप्त राहावे. अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटच्या फेब्रुवारी १९०३ च्या अंकात विखुरलेल्या मुस्लीम शक्तींचे एकत्रीकरण करून त्यांना संघटित करण्याच्या आवश्यकतेवर भर देऊन त्यांत पुढे असे म्हटले होते की, 'भारतीय मुसलमानांत जे धार्मिक ऐक्य आहे त्यामुळे ते राष्ट्र बनण्यास सर्वथैव योग्य ठरतात.' त्याचवर्षी उत्तर हिंदुस्थानात मुसलमानांच्या काही राजकीय संघटना स्थापन करण्यात आल्या.

१८८० नतर पुढे २० वर्षे देशात अनेक ठिकाणी जातीय दंगे उसळले. त्यांपैकी काही गोवध बंदीची चळवळ आणि वायव्य प्रांत, अवध आणि बिहार प्रांतातील मुसलमानांच्या काही गटांकडून त्याला होणारा विरोध यामुळे उद्‌भवले होते. त्यानंतर मुंबईतही फार मोठे जातीय दंगे झाले. ४ ऑगस्ट १८९३ रोजी वायव्य प्रांताचा गव्हर्नर सर ए. मॅकनोल्ड याने व्हॉइसरॉयला लिहिले की, हिंदू आणि मुसलमान हे दोघेही याबाबतीत दोषी आहेत. आपल्या प्रांतातील अधिकारी, मुसलमानांच्या बाजूने उघड-उघड पक्षपाती वर्तन करतात याबद्दल त्याने चिंताही व्यक्त केली होती. पाच दिवसानंतर व्हॉइसरॉयनी धाडलेल्या उत्तरात म्हटले होते की, 'हिंदूंना तक्रार करायला सबळ कारण असावे या भावनेने मी नेहमीच अस्वस्थ होत आलो आहे आणि तुमचे काही अधिकारी मुसलमानांच्या बाबतीत पक्षपाती वर्तन करतात.

असे जे तुम्ही लिहिले आहे त्यामुळे तर मी आणखीनच व्यथित झालो आहे.' परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की लॅन्सडाऊन याने कसलाही पुरावा नसताना १५ ऑगस्ट रोजी, भारतमंत्र्यांना असा अहवाल सादर केला की, काँग्रेसने गोवध बंदी चळवळ सुरू केली असून राजद्रोही लोक ती सबंध देशभर फैलावत आहेत. त्यावेळचे भारत मंत्री किंब्रलें यांना या अहवालामुळे साहजिकच आनंदाच्या उकळ्या फुटल्या. त्यांनी लॅन्सडाऊन यांना असे कळविले की, या घटनांमुळे 'हिंदू आणि मुसलमान यांचे ऐक्य घडवून आणणे अशक्य होणार असून आपल्याला सत्ता सोडावयास भाग पाडण्यासाठी भारतीय जनतेचे ऐक्य घडवून आणण्यासाठी चाललेल्या काँग्रेसच्या चळवळीचा पायाच उखडला जाणार आहे.' हिंदुस्तानातील राष्ट्रवादी यामुळे अतिशय प्रक्षुब्ध झाले. कलकत्ता, मुंबई आणि पुण्यातील वृत्तपत्रांनी सरकार काँग्रेसला बदनाम करण्यासाठी या दंग्यांना चिथावणी देत आहे असा उघड आरोप केला. लो. टिळकांनीही मुंबई आणि इतर शहरांतील दंग्याबद्दल रास्तपणे सरकारला दोषी धरले. टिळकांनी एका लेखात असे म्हटले की, "अगदी प्रथम लॉर्ड डफरीन यांनी 'फोडा आणि झोडा' नीतीचा अवलंब केला आणि देशातील सर्व नुकसानीच्या मुळाशी ही 'फोडा आणि झोडा' नीतीच आहे. जातीय दंग्यांना आवर घालण्याचा एकमेव उपाय सरकारी अधिकाऱ्यांनी हिंदू आणि मुसलमान यांच्या बाबतीत काटेकोर-पणे तटस्थता पाळणे हाच आहे!" तथाकथित निःपक्षपातीपणाबद्दल सरकारची भलामण करण्याबद्दल त्यांनी मवाळांवरही टीका केली. एक गोष्ट लक्षात घेण्या-सारखी आहे की, सर सैयद यांनी काँग्रेसविरुद्ध जेहादचा पुकारा केला असला तरी गोवध बंदीसाठी स्थापन झालेल्या निरनिराळ्या संस्थांची जबाबदारी काँग्रेसवर पडते, या सरकारी प्रचारात ते सामील झाले नाहीत. बेक यांच्याशी अनेक बाबतीत ते सहमत असले तरी याबाबतीत त्या दोघात मतभेद होते.

सरकारने काँग्रेसबद्दल जे शत्रुत्वाचे धोरण स्वीकारले होते त्याचा प्रत्यक्ष परिणाम असा झाला की, टिळकांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षात जहालवादाचा उदय झाला. हळूहळू टिळक अशा निर्णयाला येऊन पोहोचले की, कोठल्याही स्वरूपाच्या सुधारणांना नोकरशाहीकडून सतत जो विरोध होतो त्यामुळे घटनात्मक चळवळ निष्फळ ठरणार आहे. परकीय सत्ताधाऱ्यांविरुद्ध जनतेला संघटित करण्याचे एक साधन म्हणून त्यांनी सार्व-जनिक शिवाजी आणि गणेशोत्सव सुरू केले. त्याच सुमारास पंजाबातील शीख समाजात पुनरुज्जीवनवादी चळवळीचे मूळ धरू लागले होते. इतके दिवस गुरुद्वारांवर महंतांचे वंशपरंपरा नियंत्रण चालत असे, त्याऐवजी ते समाजाने निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडे सोपविण्यात आले पाहिजे या मागणीसाठी शिखांनी चळवळ सुरू केली. जनतेला संघटित करण्यासाठी काही शीख पुढाऱ्यांनी शेवटच्या दोन गुरूंच्या लढाऊ विचार प्रणालीचे पुनरुज्जीवन सुरू केले. गुरुद्वारांचे महंत सरकारचे कट्टर पाठिराखे असत. या घटनांचा फायदा घेऊन मुसलमानांना चिथावण्यास, बेकला आयती संधी सापडली

१८९५ साली लंडन येथे केलेल्या एका भाषणात त्यांनी असे घोषित केले की, शिवाजी आणि गुरु गोविंदसिंग यांचे अनुयायी मुसलमानांप्रमाणे औरंगजेबाला आपला नेता मानण्यास कधीच तयार होणार नाहीत. धार्मिक आणि ऐतिहासिक प्रतिकांच्या द्वारा जनतेला संघटित करण्याचे जे प्रयत्न सुरू झाले होते त्याची सत्ताधाऱ्यांनी चांगलीच धास्ती घेतली. सरकारने टिळकांच्या मराठी लेखाच्या विकृत भाषांतराच्या आधारे त्यांच्याविरुद्ध पुरावा जमा करण्यास सुरवात केली. इंग्लंडमधील हूजूर पक्षीय वृत्तपत्रांनी बेकची भूमिका उचलून धरली आणि शिवाजी आणि गणेश उत्सवांचा खरा रोख मुसल्मानांविरुद्धच आहे अशी हाकाटी करण्यास सुरवात केली. 'टाइम्स ऑफ इंडिया' सारख्या ॲंग्लो इंडियन पत्रांनी टिळक व शिवाजी या दोघांवरही हल्ला चढवला आणि शिवाजीने अफझलखानाला कपटाने कसे मारले ते तिखट-मीठ लावून सांगितले. त्यावरून त्या वृत्तपत्रातील वाचकांच्या पत्रव्यवहाराच्या रूपाने उलट सुलट चर्चा झाली. मुस्लिमच साधनांच्या आधारे एका अभ्यासकाने शिवाजीने अफझलखानाला कपटाने मारले हे ब्रिटिशांचे प्रतिपादन खोडून काढले. सरकारपक्षीय वृत्तपत्रांनी टिळकांची मुस्लीम द्वेष्टे, हिंदू पुनरुज्जीवनवादी म्हणून संभावना केली. आपण उत्तर हिंदुस्तानात असतो तर हिंदू आणि मुसलमान या दोघांचाही समान नेता म्हणून अकबराचे नाव घेतले असते असे त्यांनी या टीकेला उत्तर दिले. मुंबईसारख्या दक्षिणेकडील भागात शिवाजीसारखा अन्य नेता होऊन गेलेला नसल्याने परकीय सत्तेविरुद्ध सर्वसामान्य जनतेला जागृत करण्यासाठी शिवाजीच्या नावाचाच उपयोग होण्यासारखा होता असा खुलासाही त्यांनी केला. लंडन टाइम्सच्या साम्राज्य आणि परदेशविषयक विभागाचे संचालक चिरोल यांनी, टिळक उघडपणे हिंसेला चिथावणी देत आहेत आणि १८९३ सालच्या जातीय दंगलीच्या वेळी मुसलमान हे हिंदूधर्माचे कट्टर शत्रू आहेत असे टिळकांनी जाहीरपणे म्हटल्याचा त्यांच्यावर आरोप केला. गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीवर मुसलमान जमावाने केलेल्या हल्ल्यातून जातीय दंगे उद्‌भवले होते. तारीख २३ ऑगस्ट १८९३ च्या केसरीच्या अग्रलेखात टिळकांनी असे प्रतिपादन केले होते की, 'हिंदूंच्या इतकाच मुसलमानांनाही त्यांचे सणवार साजरे करण्याचा अधिकार आहे आणि जोपर्यंत त्यांच्यापैकी कोणीही मुद्दाम दुसऱ्याच्या आड येत नाही किंवा दुसऱ्याच्या भावना दुखावण्यासाठी कुरापत काढीत नाही तोपर्यंत सरकारने दोघांनाही सारखेच संरक्षण दिले पाहिजे. त्या अग्रलेखात त्यांनी पुढे असे म्हटले होते की, गोवध बंदी घडवून आणण्यासाठी सरकारकडे धाव घेण्यात काही अर्थ नाही. सरकारने याबाबत इतकेच करावे की, प्राधान्येकरून हिंदू वस्तीत गायी कापण्याचे खाटीकखाने काढण्यावर बंदी घालून हिंदूंच्या मनात निष्कारण प्रक्षोभ निर्माण होऊ देऊ नये. आठवड्याभराने दुसऱ्या एका अग्रलेखात त्यांनी असे म्हटले आहे की, एखादा मुसलमान हिंदूंच्या वस्तीत गाय कापू पाहील तर त्याला अटकाव करण्यात यावा त्याचबरोबर एखादा

हिंदू मुसलमानाच्या घरातून बळजबरीने गाय सोडवून आणू लागला तर तोही शिक्षेस पात्र ठरविण्यात यावा. लो. टिळकांनी इतकी स्पष्ट भूमिका घेतल्यामुळे सर्वसामान्य मुसलमान त्यांच्या विरूद्ध चाललेल्या विषारी प्रचाराला बळी पडला नाही आणि तो शिवाजी उत्सवातच केवळ नव्हे तर गणेशोत्सवातही मनापासून सहभागी झाला. जे हिंदू काही काळ मोहरमच्या सणापासून अलिप्त राहात आले होते तेही आता मुंबई-पुण्यात मोहरमच्या सणात मनमोकळेपणाने सामील होऊ लागले ज्यावेळी मुंबईच्या गव्हर्नरांनी ही हकीगत व्हाइसरॉय एल्जिन यांना कळवली त्यावेळी या दोन जमातीत घडून येत असलेल्या सलोख्याबद्दल त्यांनी उलट चिंताच व्यक्त केली. ११ जुलै १८९७ रोजी मॅकवर्थ यंग याला लिहिलेल्या पत्रात एल्जिनने त्याला असे कळविले की, 'हिंदू मुसलमानांतील सलोखा हा सरकारविरोधी संयुक्त कटच आहे असा भारत सरकारला संशय वाटतो'. १८९७ साली जनतेच्या भावना भडकावणारी आणखी एक घटना घडली. त्यावर्षी मुंबई आणि पुणे शहरात पसरलेल्या प्लेगच्या साथीला आळा घालण्यासाठी सरकारने जे उपाय योजले त्यामुळे जनतेच्या मनात व्यापक स्वरूपाचा असंतोष धुमसू लागला. प्लेगचे नियंत्रण करण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांना प्रत्येक घराची तपासणी करून प्लेग झालेल्या रुग्णांना क्वारंटाइनमध्ये हालविण्याच्या कामी मदत करण्यासाठी लष्कराला बोलावण्यात आले. सर सैयद यांच्यासारख्या राजनिष्ठ व्यक्तीलाही याबाबत सरकारला असा इशारा द्यावा लागला की, या प्लेगविषयक नियमांमुळे मुसलमान समाजात १८५७ पासून आजपर्यंत कधी नव्हती इतकी सरकारबद्दलची अप्रीती निर्माण होत आहे. प्लेग संबंधीची कार्यवाही चालू असताना त्यासाठी प्रमुख अधिकारी म्हणून नेमलेल्या एका ब्रिटिश सनदी नोकराचा आणि त्याच्या बरोबर जात असलेल्या दुसऱ्या एका इसमाचा चाफेकरांनी खून केला. आपल्या राजद्रोही लिखाणातून या खुनाला चिथावणी दिल्याच्या आरोपावरून सरकारने टिळकांवर खटला भरला. आणि दोन निरपराध इसमांवर खुनाच्या आरोपाखाली खटला सुरू केला. या गुन्ह्याशी टिळकांचा कोठल्याही प्रकारचा संबंध नसल्याचे चौकशी अधिकाऱ्याने आपल्या अहवालात नमूद केलेले असतानाही सरकारने हे पाऊल उचलले होते. शिवाजीवरील लेखाबद्दल दोषी धरून टिळकांना १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली. टिळकांचे लेख आणि भाषणे राजद्रोही असल्याचे सरकारला सिद्ध करता आले नाही. परंतु सरकारबद्दलच्या प्रीतीचा अभाव म्हणजे राजद्रोह अशी व्याख्या करून त्यांना कोर्टाने शिक्षा ठोठावली. पुढे ज्याने प्रत्यक्ष खून केला होता त्याने कबुलीजबाब दिला व त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. तरीही ज्या दोन निरपराध नागरिकांवर खटले भरण्यात आले होते त्यांना पुढे कित्येक वर्षे तुरुंगात खितपत पडावे लागले. टिळकांना शिक्षा झाल्यामुळे काँग्रेसवर सतत जोरदार हल्ला चढविणाऱ्या आणि स्वयंनिर्णयाच्या मागणीला उघडपणे विरोध करणाऱ्या सरकारधार्जिण्या वृत्तपत्रांना

आनंदाच्या उकळ्या फुटल्या आणि त्यांनी सरकारची तळी उचलून धरली. रास्त गफ्तार या वर्तमानपत्राने आपल्या अग्रलेखातून असे फुत्कार काढले की, 'शिक्षेची मुदत तशी फार नसली तरी बाहेर आल्यावर पुन्हा शिवाजीच्या उद्गारांच्या आडून राजद्रोहाची चिथावणी देणे कितपत लाभदायक ठरणार आहे याचा विचार करण्यास अवसर मिळण्याइतकी प्रदीर्घ ती खासच आहे.' अखबार-ए-इस्लाम या मुंबईच्या दैनिकानेही अशाच तऱ्हेची टीकाटिप्पणी केली होती. १० डिसेंबर १८९७ रोजी व्हॉइसरॉयला लिहिलेल्या पत्रात भारतमंत्र्यांनी हिंदू-मुसलमान ऐक्यात खो घालण्याच्या प्रयत्नावर लक्ष केंद्रित केले जाण्याची शक्यता सूचित केली. त्यांनी असे प्रतिपादन केले की, 'आपल्या सत्तेविरुद्ध एतद्देशीय जमाती, धर्म आणि जनमत वाढत्या प्रमाणात संघटित होत आहे ही गोष्ट आपल्या भवितव्याच्या दृष्टीने मला भीतिदायक वाटते. शिक्षण आणि वृत्तप्रसार यामुळे त्यांच्या मनातील या दुष्ट भावना वाढीस लागणार असल्याने ही धोकादायक प्रवृत्ती हाणून पाडण्याच्या कामी आपण कसलीही कसूर करता कामा नये. हॅमिल्टन यांच्या सूचनेनुसार व्हाइसरॉय एल्जिन यांनी अलिगडच्या एम्. ए. ओ. कॉलेजला वर्गणी व शिफारसपत्र पाठवून दिली त्याबद्दल त्या कॉलेजच्या प्राचार्यांनी आमच्या 'कॉलेजचे संरक्षणकर्ते' म्हणून एल्जिन साहेबांचा गौरव केला.

त्या शतकाच्या अखेरीस, हिंदू मुसलमानांतील तणाव इतके शिगेस का पोहोचले त्यासंबंधी विवेचन करणारा एक प्रदीर्घ लेख एम. ए. एन. हैदरी यांनी लिहून त्यावर उपायही सुचविले होते. त्यांच्या मते नोकरीसाठी ठेवण्यात आलेली शैक्षणिक पात्रतेची कसोटी, हिंदूंना मुसलमानांपेक्षा विशेष फायदेशीर ठरते. आणि नोकऱ्या मिळविण्याच्या शर्यतीत ठिकाणा लागत नसल्याने मुसलमानांना ब्रिटिश सत्तेबद्दल द्वेष वाटण्याऐवजी ते हिंदूंच्यावरच त्याचा राग काढू लागले आहेत आणि गत-काळांतील मुस्लिम राजवटीतील दुष्कृत्यांना इतिहासाच्या पुस्तकांतून महत्वाचे स्थान दिले जात असल्यामुळे मुसलमानांच्या रागात आणखी भर पडत आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, ज्या ज्या विभागात दीर्घ काळ मुसलमानांचा अंमल चालत आलेला होता अशा सर्व ठिकाणी या दोन समाजातील संबंध खालावत चालले आहेत. काही मुस्लिम संघटना, आक्रमक पवित्रा घेऊन नोकऱ्यात प्रतिनिधित्व मिळण्याच्या बाबतीत असंमजस आणि अवास्तव मागण्या करीत सुटल्या आहेत. मुसलमानांच्या या मागण्यांवर हिंदू नियतकालिकांतून प्रखर टीका होते. काही मुस्लीम संघटनांकडून केल्या जाणाऱ्या मागण्या कशा अवास्तव आहेत आणि त्यातून मग्रुरपणा कसा व्यक्त होतो हे त्यांना सौम्यपणे दाखवून देण्याइतकी सहिष्णुता आणि सहानुभूती एक पुढारलेला समाज या नात्याने हिंदूंनी दाखवावयाला हवी होती. काही वरिष्ठ जागा मुसलमान उमेदवारांसाठी राखून ठेवाव्यात अशा सारख्या त्यातल्यात्यात समंजसपणाच्या मागण्या उचलून धरून वृत्तपत्रांना हिंदू-मुसलमानातील

संबंध सुधारण्यास हातभार लावण्याची भूमिका बजावता येण्यासारखी आहे. बिगर-मुसलमान नेत्यांनी पुढे येऊन उत्तर हिंदुस्तानात हिंदी भाषेला सरकारी मान्यता देण्याचा निर्णय पुढे ढकलण्याची मागणी करावी असे आवाहन हैदरी यांनी केले. स्वार्थत्यागाची वृत्ती दाखविली तर हिंदू मुसलमानांची मैत्री संपादन करू शकतील असे त्यांचे मत होते. केवळ हिंदू विद्यार्थ्यांसाठी डॉ. ॲनी बेझंट यांनी बनारस येथे सुरू केलेल्या हिंदू कॉलिजला विरोध दर्शवून त्यांनी ते कॉलिज सर्व जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना खुले असावे अशी सूचना केली. मुसलमानी अमलासंबंधी सहानुभूतीपूर्ण दृष्टीकोन असणारी आणि भारतीय संस्कृतीत भर टाकणाऱ्या ज्या गोष्टी मुसलमानी अंमलात घडून आल्या, त्यावर भर देणारी हिंदुस्तानच्या इतिहासा-वरील पाठ्यपुस्तके मुद्दाम लिहून घ्यावीत असे त्यांचे मत होते. गोहत्या टाळण्याचा मुसलमान नेत्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावा असेही त्यांनी आवाहन केले.

हैदरींच्या या लेखावरून १९ व्या शतकाच्या अखेरीस दोन समाजातील संबंध कोणत्या मर्यादेपर्यंत बिघडत गेले होते त्याची कल्पना येऊ शकते. आक्रमक धार्मिक पुनरुज्जीवनाचा अट्टाहास, नोकऱ्यांसाठी चाललेले संघर्ष, मोठ्या प्रमाणावरील जातीय दंगली, भारतीय इतिहासाबद्दलचा पक्षपाती दृष्टीकोन, बृहद् इस्लामवादाचा पुकारा आणि राज्यकर्ते आणि उमरावशाही यांच्यात जमलेली गट्टी, यासारख्या अनेक बाबींमुळे देशात जातीयवादाची मुळे पक्की रुजली. हिंदुस्तानातील मुसलमानांचे स्वतंत्र राष्ट्र आहे अशी घोषणा अश्रफ नेते उघडपणे करू लागले.

नवलाईची गोष्ट अशी की, पंजाब प्रांतात मात्र शिक्षणक्षेत्रात मुसलमान, हिंदूंच्या पुढे होते. अनेक सरकारी अहवालात हे नमूद करण्यात आले आहे. शिक्षणाचे माध्यम म्हणून हिंदुंनी उर्दू भाषा स्विकारली होती. त्याचप्रमाणे हिंदी भाषेची मागणीही त्यांनी केलेली नव्हती. त्यामुळे त्या प्रांतात भाषाविषयक समस्याही नव्हती. तरी देखील १८७७ मध्ये पंजाबातील अंजुमान-ए-इस्लामिया या संघटनेने लोकसंख्येच्या आधारावर मुसलमानांसाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवण्यात याव्यात अशी प्रांतिक सरकारकडे मागणी केली. धर्म निरपेक्षतेने केवळ गुणानुसार नोकरभरती केली जात असल्याने ही मागणी मान्य करण्याचे सरकारने नाकारले. सर सैय्यद यांनी तारीख २ जून रोजी अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटमध्ये लेख लिहून सरकारच्या या भूमिकेचे समर्थन केले आणि जरूर ती पात्रता प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न न करता सरकारकडून सगळ्या गोष्टी आयत्या मिळवून घेण्याच्या प्रवृत्तीबद्दल त्यांनी त्या लेखात मुसलमानांना दूषण दिले.

पंजाबमधील जमीनदारांना विशेषतः त्यांच्यातील मुसलमानांना, आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठी सरकारने ऑक्टोबर १९०० मध्ये 'पंजाब ॲलीएनेशन ऑफ लँड ॲक्ट' (जमीन हस्तांतरविषयक कायदा) या नावाचा एक कायदा पास केला. वरवर पाहाता या कायद्याचा उद्देश जमीनमालकांना सावकारांच्या तावडीतून

सोडवणे हा असला तरी, त्या कायद्यासाठी नेमण्यात आलेल्या चिकित्सक समितीचे एक सभासद सर हरनामसिंग यांनी आपल्या भिन्न मतपत्रिकेत म्हटल्याप्रमाणे मत्स्यन्यायाला सहाय्यभूत ठरेल अशीच त्या कायद्याची रचना करण्यात आली होती. त्या कायद्यामुळे गरीब शेतकऱ्यांना कसलेही संरक्षण मिळाले नाही. उलट खुल्या बाजारभावापेक्षा अत्यंत कमी किंमतीत गरीबांच्या जमिनी बळकावणाऱ्या वंशपरंपरागत बड्या जमीनदारांच्या तुमड्या भरण्यास मात्र त्या कायद्याची मदत झाली. त्यामुळे सावकारी करणाऱ्या जमीन मालकांचा एक नवा वर्ग पंजाबात निर्माण झाला. जमीनमालक या शद्वाची व्याख्या करताना एखादी व्यक्ती प्रत्यक्ष शेती करीत आहे किंवा नाही या बाबीकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. निरनिराळ्या जाती आणि उपजाती या कोणताही निश्चित निकष न लावता मनाला येईल त्याप्रमाणे शेती व्यवसाय करणाऱ्या ठरविण्यात आल्या होत्या, आणि शेतमजूर किंवा असंरक्षित कूळ म्हणून प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या पददलित जातींना डावलून मुसलमानांना निष्कारण जादा सवलती देण्यात आल्या होत्या. आपल्या समाजाला मिळालेली ही जणू सनदच आहे असे मानून मुसलमानांनी हा कायदा उचलून धरला. या कायद्यामुळे पंजाबातील बडे मुस्लिम जमीनदार, सरकारचे कट्टर पाठीराखे बनले. १९२० साली पंजाबात ज्या अनेक कटकटी उद्भवल्या त्याचे मूळ या कायद्यातच सापडते.

१८९२ साली 'इंडियन कौन्सिल्स ॲक्ट' पास झाल्यापासून सरकारने आपली अशी समजूत करून घेतली होती की, काँग्रेस आता निष्प्रभ होवू लागली आहे तथापि लॅन्सडाऊन, एल्जिन आणि कर्झन त्याचप्रमाणे एकजात सगळे भारत मंत्री सर विल्यम वेडरबर्न यांच्या नेतृत्वाखाली 'इंडियन पार्लमेंटरी कमिटी' तर्फे काँग्रेसला अनुकूल अशा ज्या चळवळी चालत असत त्यामुळे हैराण होऊन गेले होते. १८ मे १८९९ रोजी भारत मंत्र्यांनी लॉर्ड कर्झन यांना लिहिलेल्या पत्रात काँग्रेसचे हे अरिष्ट परतवून लावण्यासाठी खालील सूचना केल्या होत्या : (१) संस्थानिक आणि वरिष्ठ वर्गातील कोणकोण काँग्रेसला मदत करतात त्याचा तपास घेऊन सरकार ते जाणून असल्याची त्यांना जाणीव देण्यात यावी, (२) मान-सन्मान किंवा किताब बहाल करताना जे काँग्रेसमध्ये नसतील अशांची निवड करण्यात यावी, (३) शिक्षण क्षेत्राचे नियोजन करताना आणि पाठ्यपुस्तके लावण्याच्या बाबतीत काटेकोर नियंत्रण ठेवावे. काँग्रेसच्या विनाशाबद्दल लॉर्ड कर्झन यांची इतकी खात्री होऊन चुकली होती की, १८ नोव्हेंबर १९०० रोजी भारत मंत्र्यांना त्यांनी असे कळविले की, 'काँग्रेस मृत्यूपंथाला लागली आहे अशी माझी खात्री होऊन चुकली असून माझ्या हिंदुस्तानातील कारकीर्दीत तिला शांततापूर्ण मरण येण्याच्या कामी आपण साहाय्यभूत व्हावे एवढीच माझी महत्वाकांक्षा आहे'. हॅमिल्टनसाहेब या पत्राने फार प्रभावित झाले. जानेवारी महिन्यात कर्झनला पाठवलेल्या उत्तरात त्यांनी असे कळविले की, 'वर्ष-दोन वर्षात काँग्रेस संपूर्णपणे नामशेष झाली तर त्याला कारणीभूत झाल्याचे

खरे श्रेय तुम्हालाच द्यावे लागेल.' १८९३ साली भारत सरकारच्या नोकऱ्यांतील वरिष्ठ पदावर भारतीयांच्या नेमणुका का केल्या जात नाहीत अशी पृच्छा करणारे पत्र वेडरबर्न यांनी लॉर्ड कर्झन यांना पाठविले होते. त्याला कर्झन यांनी पाठवलेले उत्तर मोठे मासलेवाईक आहे. आपल्या उत्तरात त्यांनी असे कळविले की, 'भारतीय, अशा जागांसाठी तितकेसे, कार्यक्षम ठरत नाहीत कारण एखादा आणीबाणीचा प्रसंग ओढवला तर त्यांचे डोके ताळ्यावर राहात नाही आणि अशा बहुतेक वेळी ते आपला अधिकार सोडून मोकळे होतात. या पत्रव्यवहारासंबंधीची माहिती भारत मंत्र्यांना कळवताना लॉर्ड कर्झन यांनी पुढे असे म्हटले आहे की, 'वस्तुतः जवळजवळ ९०० च्या वर वरिष्ठ पदावरच्या जागा, ज्या युरोपियनांसाठी राखून ठेवलेल्या आहेत, त्यापैकी अधिकाधिक जागा दरवर्षी एत्तद्देशीय लोक पटकावू लागले आहेत. ही पद्धत किती धोकादायक ठरणार आहे त्यासंबंधी केव्हातरी मी तुम्हाला लिहिणार आहे. माझ्या मते आपल्या प्रशासनाला त्यामुळे फार मोठा धोका निर्माण होणार आहे.' भारत मंत्री हॅमिल्टन यांनी कर्झन यांच्या या मताशी सहमती दर्शवून पुढे लिहिले की, 'सरकारी जागा भरण्याच्या बाबतीत भारतीय आणि ब्रिटिश नागरिकांत भेदाभेद केला जाणार नाही, असे जे १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यात घोषित करण्यात आले ती एक सर्वात मोठी चूक होती'.

हॅमिल्टन आणि कर्झन या दोघांनाही आपण काँग्रेसला नेस्तनाबूत करण्यास समर्थ आहोत असा विश्वास वाटत होता. या घमेंडीतूनच कर्झन यांनी बंगालच्या फाळणीचा बूट काढला. परंतु त्यामुळेच काँग्रेसला सामुदायिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले बंगाल, बिहार, ओरिसा आणि आसाम इतक्या विस्तीर्ण प्रदेशाचा कारभार पाहणे अतिशय कठीण जाते अशी तक्रार बंगालचे गव्हर्नर अगोदरच्या कित्येक वर्षांपासून करीत होते. एप्रिल १९०२ मध्ये कर्झनने आसामचा नवा प्रांत करावा व चितगाव विभाग त्याला जोडण्यात यावा असे भारत मंत्री हॅमिल्टन यांना सुचविले. या सूचनेला हॅमिल्टन यांची संमती मिळाल्यानंतर, कर्झनने आपल्या मूळच्या योजनेत बदल करून बंगालची फाळणी करताना चितगाव बरोबरच डाक्का, मैमनसिंग हे जिल्हे आणि टेपरा टेकड्यांचा विभागही नव्या आसामला जोडण्याचे ठरविले १९०३ च्या नोव्हेंबरात या प्रश्नावर लॉर्ड कर्झन यांची ले. गव्हर्नर फ्रेझर यांच्या बरोबर प्रदीर्घ चर्चा झाली. त्यात फ्रेझर यांनी या योजनेचे मनःपूर्वक स्वागत केले. कारण त्यांच्या मते, पूर्व बंगालला अवास्तव राजकीय महत्त्व प्राप्त झाल्यामुळे बंगाली लोक बिहारी लोकांवर सर्व बाबतीत वरचढपणा गाजवीत असत. कर्झन यांच्या योजनेमुळे बंगाली लोकांची ब्रिटिश विरोधी राजद्रोहाची चळवळ ऊर्वरित प्रांतापासून अलग पाडता येणार होती आणि त्यामुळे पूर्व बंगाल ह्यांच्या चळवळीचा प्रभाव कमी करण्याचे राजकीय आणि प्रशासकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असलेले उद्दिष्ट साध्य करता येणार होते. फ्रेझरच्या या भूमिकेमुळे कर्झन अतिशय खूष झाला

आणि फ्रेझरच्या म्हणण्याला त्याने अशी पुष्टी जोडली की, फाळणीच्या नव्या योजनेत काही त्रुटी असल्या तरी त्यामानाने वरील मुद्दे फार महत्त्वाचे ठरतात. बंगालची फाळणी जाहीर झाल्यानंतर थोड्याच दिवसात बंगाली लोकांच्या निरनिराळ्या थरातून त्याविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागली आणि साऱ्या देशभर त्याचे प्रतिध्वनी उमटले. परंतु आपली योजना तडीस नेण्याचा कर्झनचा निर्धार होता. १७ फेब्रुवारी १९०४ रोजी त्याने हॅमिल्टनला असे लिहून कळवले की,

> बंगाली लोक हे स्वतःला एक राष्ट्र समजतात आणि जेव्हा इंग्रज भारतातून निघून जातील त्यावेळी बंगाली बाबूच कलकत्त्यातील गव्हर्नमेंट हाऊसवर विराजमान होतील अशी स्वप्ने ते रंगवीत असतात. अर्थात हे स्वप्न भंग पावेल अशी कोणतीही गोष्ट ते खपवून घेणार नाहीत. त्यांच्या आरडाओरडीला बळी पडण्याचा कमकुवतपणा दाखविल्यास बंगालची फाळणी आपल्याला पुढे कधीच करता येणार नाही आणि भावी काळात वाढत्या कटकटी निर्माण करणारी एक प्रचंड शक्ती पूर्व आघाडीवर वाढू दिल्यासारखे होईल.

दुसऱ्या दिवशी डाक्क्यात केलेल्या एका भाषणात त्यांनी पूर्व बंगालातील मुसलमानांचा उघड उघड अनुनय करणारी भाषा वापरली ते म्हणाले :

> नियोजित फाळणीमुळे डाक्का ही नव्या स्वयंपूर्ण प्रांताचे मध्यवर्ती केंद्र इतकेच नव्हे तर राजधानीसुद्धा बनेल. नवा प्रांत निर्माण झाला म्हणजे या जिल्ह्यातील मुसलमानांची बहुसंख्या आणि उच्च संस्कृती यामुळे त्यांच्या शद्बाला महत्त्व प्राप्त होईल आणि पूर्व बंगालमधील मुसलमान राजे आणि सुभेदार यांची सत्ता नष्ट झाल्यापासून मुसलमानांना आजवर उपभोगता न आलेले ऐक्य पुनरपी प्रस्थापित होऊ शकेल आणि पूर्व बंगालच्या राज्यात पूर्वीच्या ऐतिहासिक परंपरा चालत आल्या होत्या त्या पुन्हा प्रस्थापित होण्यास चांगली चालना मिळेल.

फाळणी विरोधी असंतोषाला सामुदायिक आंदोलनाचे स्वरूप येऊ लागल्यामुळे भारत मंत्र्यांनी काही पर्याय सुचविले. त्यांपैकी स्वतंत्र बिहार प्रांत निर्माण करणे आणि ओरिसा मध्य प्रांताला जोडण्याची कल्पना त्याज्य ठरविण्यात आली. त्याबद्दलच्या कारणांचा भारत सरकारने तारीख ६ डिसेंबर १९०४ च्या आपल्या खलित्यात खुलासा केलेला आहे :

> त्यामुळे बंगाल्यांचा प्रभाव आणि तथाकथित राष्ट्रीय भावना आणखीनच वाढीस लागेल. सध्या राजकीय चळवळ करणारांची जी एकजूट घडून आली आहे ती मोडून काढली जाण्याऐवजी उलट कलकत्त्यातील राजकीय संघटनांचे प्रभुत्व मात्र त्यामुळे वाढीस लागेल. अविभक्त बंगाल ही फार मोठी ताकद ठरेल. परंतु बंगालची फाळणी झाली तर चहूबाजूंनी त्याची ओढाताण सुरू होईल. काँग्रेस पुढाऱ्यांना वाटणारी ही भीती अगदी बरोबर असून तीच तर या योजनेतील खरी मख्खी आहे ········ हा खलिता कधी ना कधी तरी प्रसिद्ध होणे अपरिहार्य

असल्यामुळे या प्रश्नासंबंधीची संपूर्ण बाजू या ठिकाणी मांडता येणार नाही. कारण तसे करावयाचे झाले तर मध्य प्रांत आणि वऱ्हाड यांच्या एकत्रीकरणाप्रमाणेच फाळणीच्या योजनेमागेदेखील आपल्या सत्तेच्या विरूद्ध असलेल्या संघटनेत फूट पाडून तिचे खच्चीकरण करणे हे जे एक प्रमुख उद्दिष्ट आहे त्याचा गौप्यस्फोट करावा लागेल.

४ जुलै १९०५ रोजी भारत मंत्र्यांनी बंगालची फाळणी करण्याची योजना स्वीकारण्यात आली असल्याची घोषणा पार्लमेंटच्या सभागृहात केली. भारत सरकारच्या १९ जुलै १९०५ च्या ठरावात असे नमूद करण्यात आले आहे की, ३१ दशलक्ष लोकसंख्येचा पूर्व बंगाल आणि आसाम मिळून बनविण्यात आलेला नवा प्रांत भौगोलिक, वांशिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि भाषिक दृष्टीने सुस्पष्ट असा एक घटक बनेल. त्यामुळे एकाच प्रांतात बंगालमधील खास मुसलमानी लोकसंख्या केंद्रीभूत होऊन सहाजिकच डाक्का ही त्यांची राजधानी बनू शकेल. शिवाय त्यामुळे तागाच्या लागवडीखालील विभाग आणि बहुतांश चहा उद्योग एका प्रशासनाखाली येईल.

१६ ऑक्टोबर १९०५ रोजी म्हणजे ज्या दिवशी बंगालची फाळणी झाली तो दिवस सबंध बंगालभर 'शोक दिन' म्हणून पाळण्यात आला. उभा बंगाल जणू सरकारविरुद्ध खवळून उठला होता. काँग्रेसने ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. 'वंदे मातरम्' हा परवलीचा शब्द होऊन बसला. हे आंदोलन झपाट्याने सर्व देशभर पसरले आणि जी संघटना अल्पावकाशात नेस्तनाबूद होईल अशा वल्गना केल्या जात होत्या ती एक फार मोठी शक्ती होऊन बसली. आसाम आणि पूर्व बंगालच्या नव्या प्रांतातील मुसलमानांचा फाळणीला संपूर्ण पाठिंबा आहे असे दाखवून देण्यासाठी नव्या प्रांताचे ले. ग. फुलर यांनी मुसलमानांचे मत संघटित करण्याच्या दृष्टीने अनेक पावले उचलली. त्याने मुसलमानांना पक्षपात करणारा हम करेसो कारभार सुरू केला. १९०६ सालच्या एप्रिल महिन्यात बारिसाल येथे बंगाल प्रांतिक परिषदेचे अधिवेशन भरविण्यात आले. परिषदेवर मनाई हुकूम बजावण्यात आला असतानाही अधिवेशनासाठी प्रचंड जनसमुदाय जमला होता. परिषदेचे अध्यक्ष बॅ. रसूल आणि सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली मनाई हुकूम मोडून सत्याग्रह करण्यात आला. तो भारतातील पहिला सामुदायिक सत्याग्रह म्हणावा लागेल. त्यावेळी पोलिसांनी जे अत्याचार केले त्यामुळे सबंध राष्ट्रात संतापाची लाट उसळली. १३ मे १९०६ रोजी कलकत्ता येथे भरलेल्या मुसलमानांच्या मेळाव्यात बारिसाल येथे सरकारी अधिकाऱ्यांनी जे घटनाबाह्य वर्तन केले. त्याचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. बंगाल प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनासाठी प्रतिनिधी म्हणून गेलेल्या प्रतिष्ठित नागरिकांवर हल्ला करणे आणि घटनात्मक आणि कायदेशीरपणे भरविण्यात आलेली परिषद बळाचा वापर करून उधळून लावणे,

जनतेचे अत्यंत आदरणीय आणि विश्वासू नेते बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांची जाहीरपणे मानखंडना करून त्यांना अटक करणे' या सर्व गोष्टी घटनाबाह्य असल्याचे या ठरावात नमूद करण्यात आले होते. बारिसाल परिषदेच्या अध्यक्षस्थानी सन्माननीय मुसलमान नागरिक होते ते कोण याची व्हॉइसरॉयने तावडतोब चौकशी करविली. त्यावर गृहमंत्री रिसले यांनी व्हॉइसरॉय लॉर्ड मिंटो यांना असे कळविले की, 'इंग्रज महिलेशी विवाह केलेले रसूल या नावाचे वकिली चालत नसलेले एक मुसलमान गृहस्थ' बारिसाल प्रकरणात अग्रभागी होते. कलकत्त्याला भरलेल्या निषेध सभेच्या अध्यक्षस्थानी असलेले महंमद हसन जान हे कोणाला फारसे माहीत नसलेले एक तरुण मुसलमान गृहस्थ असून 'स्वदेशी पार्टीकडून त्यांना तनखा मिळत असतो' असे त्यांचे वर्णन करण्यात आले होते.

फुलर यांच्या विरुद्धचा जनमानसातील असंतोष इतका वाढला की, व्हॉइसरॉय मिंटो यांनी भारत मंत्री मोर्ले यांच्याकडे अशी तक्रार केली की, फुलर डोके ताळ्यावर ठेवून वागत नाहीत आणि नव्या प्रांतात बराच गैरकारभार चालतो. त्या तक्रारीत त्यांनी पुढे असे नमूद केले होते की, 'अथपासून इतिपर्यंत सारा कारभार बिघडवून टाकण्यात आला आहे. आणि फुलरचे जे उद्योग चालू आहेत त्याबद्दल माहिती कळल्यावर मी व्यथित झालो.' त्यावर मोर्लेने अत्यंत वैतागाने असे उत्तर पाठवले की, अथपासून इतिपर्यंत सारा विचका करण्यात आला आहे हे तुमचे म्हणणे विचारान्ती मलाही पटले. या साऱ्याचा फार खेद होतो. प्रथम अनेक घोडचुका झाल्या त्यात फुलरच्या विचित्र स्वभावामुळे आणखीनच भर पडली आहे. मोर्ले यांच्या मते कायद्याचा विपरित अर्थ करून 'वंदे मातरम' वर बंदी घातली गेली. निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे काळ्या यादीत घालून 'सरकारी नोकरीपासून त्यांना कायमचे वंचित' करण्याची जी शिक्षा फुलरने त्या विद्यार्थ्यांना दिली त्याचाही मोर्लेला राग आला. आपल्या पत्राच्या शेवटी फुलरला काढून टाकण्यात यावे अशी सूचना करताना मोर्लेने म्हटले की, 'कनिष्ठ पदावर असलेला जो अधिकारी जबाबदार वरिष्ठ अधिकाऱ्याचे मन समजावून घेऊन वागत नाही तो तापदायकच ठरतो.' तरीहि फुलरने आपले अतिरेकी वर्तन चालूच ठेवले. काही शाळांची युनिव्हर्सिटीशी असलेली संलग्नता काढून घेण्याचे जे फर्मान त्याने काढले होते ते मागे घेण्यास भारत सरकारने त्याला ५ जुलै रोजी कळविले. त्यानंतर दहा दिवसांनी फुलरने राजीनामा सादर केला. व्हॉइसरॉयला त्यामुळे हायसे वाटले आणि तो म्हणाला 'त्याने राजीनामा दिला तो दिवस आपल्या दृष्टीने जगातील सर्वात भाग्याचा दिवस होता' इंग्लंडला परत गेल्यानंतर फुलरने २६ ऑगस्ट रोजी एका सतभे घोषित केले: 'यापुढे सरकारकडून न्याय मिळेल या भरवशावर मुसलमानांना गप्प बसता येणार नाही.'

फाळणीच्या विरुद्ध सुरू झालेल्या आंदोलनात मुसलमान समाज फार मोठ्या

संख्येने सामील होत असलेला पाहून सरकारी वर्तुळात सहाजिकच चिंता उत्पन्न झाली. बंगाली मुसलमानांत ब्रिटिशांविरुद्ध पुकारण्यात आलेल्या 'जेहाद' ची परंपरा जुनीच होती. वरिष्ठ श्रेणीतील अश्रफांनी जेहाद विरोधी फतवे प्राप्त करून घेऊन सरकारबरोबर समझोता केला असला तरी या जेहाद विरोधी फतव्यातील प्रतिपादन अजिबात पटण्यासारखे नव्हते असे १८७१ साली हंटरने जे नमूद करून ठेवले आहे ते अगदी बरोबर आहे. सर सैयद यांनी सरकारशी संपूर्णपणे एकनिष्ठ राहावे म्हणून पराकाष्ठेचे प्रयत्न केले असले तरी बंगाल मधील अश्रफांच्या एका फार मोठ्या गटावर त्याचा परिणाम घडून आलेला नव्हता. बंगाली मुसलमानांची सरकारविरुद्ध आणखीही एक गंभीर स्वरूपाची तक्रार होती. ती अशी की, बंगाल व्यतिरिक्त बहुतेक प्रांतांतील त्यांच्या धर्म बांधवांना सरकारी नोकरीतील निदान खालच्या जागा तरी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त मिळालेल्या होत्या. परंतु बंगालमध्ये मुसलमानांची बहुसंख्या असूनही त्यांना मात्र नोकऱ्यात अत्यल्प प्रतिनिधित्व मिळाले होते.

फुलरच्या जागी पूर्व बंगालचे गव्हर्नर म्हणून आलेले हेअर यांना जेव्हा असे आढळून आले की, डाक्क्याच्या नबाबासारख्या सरदार घराण्यातील अनेक प्रतिष्ठित मुसलमानही 'वंदे मातरम' च्या आणि ब्रिटिश मालावरील बहिष्काराच्या चळवळीत सामील झाले आहेत त्यावेळी ते चांगलेच वैतागून गेले. मुसलमान चळवळीत सहभागी होत आहेत असे जेव्हा हेअर यांनी वर कळवले त्यावेळी मिंटो यांनी त्याविरुद्ध उपाययोजना करण्याचे ठरविले. १५ ऑगस्ट १९०६ रोजी मोर्ले यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी बंगाली मुसलमानांना आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठी योजावयाच्या डावपेचाची कल्पना दिली. मुसलमान शेतकरी आणि हिंदू जमीनदार यांचे हितसंबंध परस्परविरुद्ध असून त्याचा फायदा आपण उठवला पाहिजे असे त्यांनी सुचविले. त्याशिवाय मुसलमानांच्या खास हितसंबंधांना संरक्षण देऊन त्यांना सरकारच्या बाजूला वळवून घ्यावयाची जबाबदारी पत्करण्याची तयारीही त्यांनी त्या पत्रात दर्शविली.

डाक्क्याच्या नबाबाला जे भरमसाट कर्ज झाले होते ते फेडता येऊन त्याला आपल्या कौटुंबिक कटकटी निस्तरता याव्यात इतकेच नव्हे तर राजकारणामध्ये निर्धास्तपणे भाग घेता येण्याइतके पैसे त्याच्या हाताशी असावेत म्हणून सरकारने त्याला भले मोठे कर्ज मंजूर केले. हिंदू लोकांकडून आपल्यावर जुलूम होत असून आपल्याला संरक्षण मिळावे असे सरकारकडे अर्ज करण्यास त्याला आणि त्याच्या सारख्या इतर अश्रफांना उद्युक्त करण्यात आले. मुसलमानांत जमीनदारांना वाळीत टाकण्यात येत असून मुसलमान शेतकऱ्यांवर चळवळीत सामील होण्यासाठी दडपण आणले जात आहे असे तक्रार अर्ज या मंडळीकडून सरकारकडे जाऊ लागले ते रीतसरपणे मोर्ले यांच्याकडे रवाना झाले. डाक्क्याच्या नबाबाने फुलरची बाजू उचलून धरली

आणि फुलरचा राजीनामा स्वीकारण्यात आल्याबद्दल जाहीरपणे विरोध दर्शविण्यास सुरवात केली. 'ब्रिटिश मालावर आणि तो वापरणाऱ्यांवरही बहिष्कार घाला अशी बंगालमधील आंदोलकांची घोषणा होती. त्यामुळे राष्ट्रवादी आंदोलक आणि राजनिष्ठ अश्रफ यांच्यात संघर्षाची ठिणगी पडली. मद्रास येथील भाषणात बिपिनचंद्र पाल यांनी राजनिष्ठ मुसलमानांवर सरळ सरळ हल्ला चढवला. त्याचप्रमाणे सरकारच्या फोडा आणि झोडा नीतीवरही त्यांनी सडकून टीका केली. प्लासीच्या लढाईत क्लाइव्हला मिळालेल्या विजयाला दीडशे वर्षे झाल्याच्या निमिताने जो समारंभ साजरा केला जाणार होता त्याचा उल्लेख करून त्यांनी सवाल केला की, 'प्लासीच्या लढाईत अखेर पराभव कोणाचा झाला? विश्वासघातकी मीर जाफर तर नामानिराळाच राहीला होता. या संदर्भात माझ्या मुसलमान बांधवांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, ज्यावेळी बंगालमधील शेवटच्या नबाबाचे राज्य खालसा करून टाकण्यात आले त्यावेळी मोहनलाल नावाचा एक हिंदूच स्वतःच्या प्राणाची बाजी लावून त्याच्या खांद्याला खांदा लावून शेवटपर्यंत लढत राहिला होता. अकबराच्या कारकीर्दीत बंगालमधील हिंदू आणि मुसलमान राजे मानसिंगाविरूद्ध एकोप्याने कसे लढले होते त्याचे स्मरण करून देऊन शेवटी त्यांनी मुसलमानांना सरकारविरूद्ध एकजुटीने चाललेल्या लढ्यात सामील होण्याचे आवाहन केले. हिंदूंच्याविरुद्ध मुसलमानांना चिथावणी देण्याच्या नोकरशाहीच्या धोरणामुळे जनतेच्या मनात संशय निर्माण होऊन वातावरण तंग बनले होते. बंगालमध्ये काही जातीय दंगे घडून आले. पश्चिम बंगालचे ले. गव्हर्नर फ्रेजर यांनी व्हॉइसरॉयला कळविले की, अनेक बुद्धिवादी, वतनदार आणि राजनिष्ठ लोकांनी माझ्याकडे तक्रारी केल्या आहेत की, 'पूर्व बंगालमध्ये सरकारी अधिकारी मुसलमानांना हिंदूंविरुद्ध भडकावून देत आहेत'. त्या अहवालात त्यांनी पुढे असे नमूद केले की, 'सुशिक्षित आणि राजनिष्ठ लोकही जेथे मनापासून असे मानतात तेथे सर्वसामान्य जनतेबद्दल काय बोलावे? हा सर्व प्रकार अत्यंत उद्वेगजनक आहे. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, अशुतोष चौधरी, नरेंद्रनाथ सेन, ए. रसूल, नवाब सैयद अमीर हुसेन आणि सैयद शम्स-उल-हुडा हे सर्वजण मिळून व्हॉइसरॉयकडे एक शिष्टमंडळ घेऊन गेले. आणि जातीय तणाव नष्ट करण्याच्या कामी आपल्याला सहाय्य करण्याची त्यांनी विनंती केली. परंतु व्हॉइसरॉय साहेबांनी त्याकडे कानाडोळा केला.

त्या सुमारास रॅम्से मॅकडोनाल्ड हिंदुस्तानला भेट देऊन गेले होते. त्यासंबंधी लिहिलेल्या पुस्तकात त्यांनी जातीय दंगलीबाबत सरकारलाच सर्वस्वी जबाबदार धरले आहे.

"फाळणी ही नुसती घोडचूकच नव्हती तर तो दंडनीय गुन्हाही होता. लॉर्ड कर्झनने आपले जुने वैर उजवून घेण्यासाठी हा बूट काढला याला सबळ पुरावा आहे. फाळणी ना प्रशासनाच्या दृष्टीने सोयिस्कर होती, ना ऐतिहासिक परंपरेला धरून होती. इतकेच

नव्हे तर तीत सामान्य शहाणपणाचाही अभाव होता. बंगालची फाळणी करताना लॉर्ड कर्झन यांनी बंगाली जनतेची अशी काही विभागणी करून टाकली की, फाळणी — लॉर्ड कर्झनने यांनी बंगाली जनतेची अशी काही विभागणी करून टाकली की, फाळणी-पूर्व बंगालमध्ये त्यांची संख्या सर्वात जास्त असताना त्यांना वस्तुतः जे महत्त्व असाव-यास हवे होते ते फाळणीनंतरच्या कोटल्याच नव्या प्रांतात राहिले नाही. शिवाय फाळणीच्या मागोमाग अनेक प्रशासकीय आणि न्यायविषयक पावले उचलण्यात आली व परिणामी हिंदू समाज सरकार विरोधी बनला आणि शासनाकडून आपल्याला न्याय मिळणार नाही अशी त्या समाजाची भावना होऊन बसली. बार्थोलोम्यूच्या कतलीत कॅथॉलिक चर्चचे हात जितके बरबटलेले होते किंवा अलिकडेच झालेल्या ज्यूंच्या शिरकाणात रशियन सरकारचा जितका सहभाग होता तितकाच बारिसालच्या दंगलीत तेथील सरकारी अधिकाऱ्यांचाही होता."

---

प्रकरण पाचवे

# मुस्लीम लीगची स्थापना

१९०६ मध्ये मिंटोने निरनिराळ्या प्रांतातील गव्हर्नर्स, ले. गव्हर्नर्स आणि कमिशनर्स यांच्याकडून आपापल्या प्रांतातील हिंदू मुसलमानांचे परस्पर संबंध कसे आहेत त्यासंबंधीची माहिती मागविली होती. त्या माहितीनुसार निरनिराळ्या प्रांतातील परिस्थिती निरनिराळी होती. यासंबंधात आलेल्या अहवालांनुसार त्या काळात तरी निदान कोठल्याही प्रांतात जातीय तणाव अस्तित्वात नव्हता. मात्र भावी काळात हे संबंध कसे राहातील याबाबत प्रांतनिहाय वेगवेगळे अंदाज व्यक्त करण्यात आले होते. पंजाब प्रांतात पुरोगामी विचारांच्या तरुणांचा गट आणि पुराणमतवाद्यांचा गट यापैकी मुसलमान समाजात कोण अधिक प्रभावी ठरतो त्यावर हिंदू-मुसलमान संबंधाचे भवितव्य अवलंबून राहणार होते. जर पुरोगामी गटाचे पारडे जड झाले तर हिंदू आणि मुसलमान यांच्यात राजकीय सलोखा निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु सनातनी गट अधिक प्रभावी ठरला आणि तेच अधिक संभवनीय आहे तर हिंदू–मुसलमान समाजात बेबनाव निर्माण होऊ शकेल असे पंजाब प्रांतातून आलेल्या अहवालात म्हटले होते. वायव्य प्रांतात आर्य समाजाच्या चळवळीमुळे हिंदू समाज मुसलमानांच्या मोहरमसारख्या सणात सहभागी होण्याच्या बाबतीत अधिकाधिक निरुत्साह दाखवू लागला होता. बलुचिस्तानात हिंदू–मुसलमानातील परस्पर संबंध फार चांगले असून ते बिघडण्याची कसलीही शक्यता नव्हती. राजपुतान्यात तर संबंध उलट सुधारले होते. बंगालमध्ये बहिष्कार आंदोलनाचे नेते मुसलमानांना आपल्या बाजूला वळवून घेण्याची दाट शक्यता होती. ब्रिटिश अंमलाखाली हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही सारखाच त्रास सहन करावा लागत आहे हे आंदोलकांच्या प्रचाराचे मुख्य सूत्र असून परकीय राज्यकर्त्यांनी चालविलेल्या शोषणामुळे बंगाल भिकेला लागला आहे हा प्रचार परिणामकारक ठरत होता. बंगालमधील हिंदू आणि मुसलमान विद्यार्थी देखील बहिष्कार आंदोलनाकडे अधिकाधिक आकृष्ट होऊ लागले होते. बंगालच्या ले. गव्हर्नरांच्या मते हिंदू जमीनदार हाच आपल्यावर खरा जुलूम करणारा आहे हे तेथील मुसलमान शेतकऱ्याला अद्याप उमगले नसल्यामुळेच हे सर्व घडून येत होते. संयुक्त प्रांतातील हिंदू मोगलांच्या कारकीर्दीतील दुःखद आठवणी अजूनही विसरू शकलेले नव्हते तर मुसलमान एकेकाळी आपण सत्ताधारी होतो याच कुर्यात अद्यापही वावरत होते. शासनाने भारतीयांना

प्रतिकूल किंवा युरोपियनांना अनुकूल असे धोरण जोराने पुढे रेटण्याचे ठरविले तरच हिंदू–मुसलमानांत एकजूट घडून येऊ शकेल. अर्थात अशी एकजूट घडून आली तरी ती फार काळ टिकू शकणार नाही. कारण हिंदू आणि मुसलमानांना परस्परांविषयी खरोखरीची सहानुभूती मुळी वाटतच नाही असे त्यांनी कळवले होते. अरेबियातून सतत येत असलेल्या व्यापाऱ्यांमुळे मलबार विभागात बृहद् इस्लामवाद डोके वर काढू लागला असून त्यांच्या प्रभावाखाली असलेले मोपले बिगर मुसलमानांचा–मग ते युरोपियन असोत वा भारतीय असोत–अधिकाधिक तिरस्कार करू लागले होते.

अशातऱ्हेच्या अहवालामुळे मिंटो अर्थातच नाराज झाले. त्यांनी मोर्ले यांना असे कळविले की, हिंदू आणि मुसलमानातील जातीय आणि धार्मिक मतभेद कमी होऊ लागले असून एकादवेळी ते अजिबात मिटण्याची देखील शक्यता आहे. पंजाब-मधील मुसलमान जमीनदारांना आणखी एक सवलत देण्यात आली. जंगल जमिनी वसविण्याच्या धोरणामुळे मुसलमान जमीनदारांत असंतोष पसरू लागला आहे हे लक्षात घेऊन मिंटोनी तो उपक्रम तावडतोब सोडून दिला. यासंबंधात २९ जून १९०७ रोजी महंमद शफी यांनी असे लिहून ठेवले की, 'वडया लाट साहेबांनी सरकारी जमिनी वसविण्यासंबंधाच्या (पंजाब) कायद्यावर सही करण्याचे नाकारले असल्याची बातमी अत्यंत समाधानकारक असून त्यामुळे होणारा आनंद शब्दाने व्यक्त करता येणार नाही.'

दरम्यान ब्रिटिश सरकारने जनतेचे लक्ष फाळणीविरोधी चळवळीपासून दुसरीकडे वळविण्याचे ठरविले. २० जुलै १९०६ रोजी मोर्ले यांनी कॉमन्स सभागृहात अशी घोषणा केली की, 'कायदेमंडळात लोक प्रतिनिधित्वाच्या तत्वाची व्याप्ती वाढ-विण्याच्या दृष्टीने शिफारसी करण्याकरता व्हॉइसरॉय लवकरच एक समिती नियुक्त करणार आहेत. ही घोषणा झाल्याबरोबर उच्चवर्गीय अश्रफ खडबडून उठले आणि कामास लागले. सैयद हुसेन बिलग्रामी यांनी हैदराबादच्या रेसिडेंटना पत्र पाठवून कळविले की, 'मोर्ले हे अत्यंत अविचारीपणाने वागत आहेत . . . . . .त्यांना व्हॉल्टेर आणि १८ व्या शतकातील वाङ्मयाचा इतिहास भले पाठ असेल पण त्यांना भारतातील चालू परिस्थितीचे ज्ञान नाही असे म्हणणे भाग आहे. भारतीय परि-स्थितीची यत्किंचितही कल्पना नसताना जे मंत्री आपल्या सिद्धांतांना कवटाळून बसतात आणि त्यासाठी वाटेल तो धोका पत्करण्यास तयार होतात त्यामुळे देशाचा विनाश ओढविल्यावाचून राहणार नाही.' याबाबत व्हॉइसरॉयसाहेबांना एकादे निवेदन सादर करणे योग्य होईल का याविषयी सल्ला विचारणारे पत्र मोहसीन उल-मुल्क यांनी एम. ए. ओ. कॉलेजचे प्राचार्य आर्चबोल्ड यांना लिहिले, त्या पत्रात ते म्हणतात :

'भारताच्या अंदाजपत्रकावरील जॉन मोर्ले यांचे भाषण तुमच्या वाचनात आले असेलच. त्यावर तुम्ही विचारही केला असणार. भारतातील मुसलमानात त्यासंबंधी

सध्या बरीच चर्चा चालू असून ते माध्यम म्हणजे 'नॅशनल कॉंग्रेसचा' फार मोठा विजय आहे अशीच सर्वसाधारण भावना झाली आहे. मुसलमानात आधीच नैराश्य पसरले आहे हे तुम्ही जाणताच. त्यातच तरुण शिक्षित मुसलमानांत कॉंग्रेसबद्दल सहानुभूतीची भावना पसरू लागली आहे आणि या भाषणामुळे तर कॉंग्रेसमध्ये सामील होण्याची त्यांच्यातील प्रवृत्ती आणखीनच वाढीस लागणार आहे. सुशिक्षित तरुण वगळता मुसलमानांपैकी इतर कोणी त्या संघटनेत सामील होतील असे मानावयाला फारसा आधार नसला तरी त्यांच्याकडून सर्वसाधारणपणे अशी तक्रार ऐकू येते की, आम्ही (अलिगडवाले लोक) राजकारणापासून अलिप्त राहतो आणि कॉलेजसाठी निधी गोळा करण्याव्यतिरिक्त त्यांच्या हक्कांची जपणूक करण्यासाठी जवळपास काहीच करीत नाही. कायदेमंडळात लोकप्रतिनिधी निवडून पाठविण्याची जी सूचना पुढे आली आहे त्याबाबत माझ्याकडे अनेक पत्रे आली आहेत. . . . . नव्या नियमानुसार व्यापक प्रमाणावर निवडणुकीचे तत्व लागू करण्यात आले तर मुसलमानांना एखादी जागा मिळणेदेखील मुष्कील होऊन बसेल आणि हिंदूंची बहुसंख्या असल्यामुळे त्यांना मात्र चांगलेच हात धुवून घेता येतील. मुसलमानांच्या हक्कांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी व्हॉइसरॉय साहेबांना एक निवेदन सादर करण्यात यावे अशी कल्पना आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा असून यावेळी जर आपण स्वस्थ बसलो तर लोक आपल्याला सोडून जातील आणि त्यांना पाहिजे तो मार्ग चोखाळू लागतील अशी मला धास्ती वाटते म्हणून मुसलमानांच्यावतीने व्हॉइसरॉय साहेबांना एखादे निवेदन सादर करणे योग्य ठरेल किंवा नाही याबद्दल तुमचा सल्ला काय पडतो, तसेच यासंबंधातील मुसलमानांचे विचार व्हॉइसरॉय साहेबांच्या कानावर घालण्यासाठी त्यांच्याकडे एखादे शिष्टमंडळ पाठवायचे झाले तर त्यासाठी त्यांची परवानगी मिळवाल का? तेही कृपा करून कळवावे.

तारीख १० ऑगस्ट रोजी ऑर्चिबोल्ड यांनी मुसलमानांच्या शिष्टमंडळाला भेटण्यास व्हॉइसरॉयची अनुमती मिळवली व त्याप्रमाणे तारीख १ ऑक्टोबर रोजी शिष्टमंडळाने व्हॉइसरॉय लॉर्ड मिंटो यांची भेट घेऊन सरदार, जहागिरदार, तालुकदार, वकील, जमीनदार व्यापारी वगैरेंच्या सह्यांचे खालील निवेदन व्हॉइसरॉयला सादर करण्यात आले:

'बहुसंख्य मुसलमान प्रजाजनांच्या वतीने हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागातील खाली सह्या करणारे आम्ही खाविंदांच्या चरणी अशी प्रार्थना करतो' अशी अजीजीने सुरवात करून निवेदनात मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदार संघाची आणि विशेषाधिकाराची मागणी करण्यात आली होती. त्याचप्रमाणे ब्रिटिश हिंदुस्थानातील एकूण लोकसंख्येत मुसलमानांचे प्रमाण २० ते २५ टक्केच असले तरी लहान लहान धर्मातील लोकांची त्याचप्रमाणे हिंदू म्हणून ज्यांचा चुकीने उल्लेख केला जातो त्यांची संख्या वगळली तर मुसलमानांचे प्रमाण कितीतरी जास्त पडते असे त्या मागणीच्या

समर्थनार्थ नमूद करण्यात आले होते. शिवाय (अ) मुसलमानांचे संख्याबळ, (ब) त्यांना असलेले राजकीय महत्त्व, आणि (क) साम्राज्य रक्षणाच्या कामी त्यांनी बजावलेली कामगिरी या बाबी विचारात घेऊन लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणापेक्षा त्यांना सरकारात अधिक प्रतिनिधित्व देण्यात यावे. शिवाय जेमतेम शंभर वर्षांपूर्वी हिंदुस्थानात मुसलमानांचे जे स्थान होते आणि ज्याची स्मृती अद्यापही त्यांच्या मनातून गेलेली नाही ते सरकारने नजरेआड करता कामा नये. तसेच मुसलमान हे स्वतंत्र राष्ट्र आहे असेही निःसंदिग्धपणे बजावण्यात आले होते. आमचे राष्ट्रीय हितसंबंध लक्षात घेता ज्या नव्या प्रातिनिधिक संस्था अस्तित्वात येणार आहेत त्यांपासून अलिप्त राहणे यापुढे योग्य होणार नाही असा स्पष्ट उल्लेख त्या निवेदनात आहे. आपले राष्ट्रीय हितसंबंध आपल्या विषयी सहानुभूती नसणाऱ्या बहुसंख्यांकांच्या मर्जीवर सोपवणे धोकादायक ठरणार आहे असे मुसलमान समाजातील विचारवंतांचे मत आहे. हिंदू आणि मुसलमान यांचे हितसंबंध बऱ्याच बाबतीत समान असले तरी मुसलमान समाज हा हिंदूंपासून अगदी निराळा असून त्यांचे स्वतःचे खास निराळे असे काही हितसंबंध आहेत. संयुक्त मतदार संघ अस्तित्वात आले तर बहुतेक सर्व महत्त्वाच्या बाबतीत बहुसंख्यांकांची मर्जी संभाळून राहिल्याशिवाय कोणताही मुसलमान निवडून येऊ शकणार नाही. यास्तव त्यांना नगण्य अल्पसंख्यांकांचे स्थान प्राप्त होणार नाही इतके प्रतिनिधित्व मुसलमानांना मिळाले पाहिजे. त्यासाठी मुसलमान जमीनदार, वकील, व्यापारी, पदवीधर इ. चे खास मतदार संघ बनविण्यात यावेत. मुसलमानांच्या नोकऱ्यांत प्रतिनिधित्व संबंधातील या निवेदनात म्हटले होते की, आता पात्रता असलेले मुसलमान मिळत नाहीत असे म्हणता येणार नाही कारण योग्य ते शिक्षण घेतलेले पुष्कळ मुसलमान उमेदवार मिळू शकतात. परंतु त्यांच्यापेक्षा अधिक जास्त शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांची निवड केली जाते म्हणजे 'एकपरीने अत्यंत वाईट स्वरूपातील स्पर्धात्मक निवडीचे तत्व लागू करण्यात आल्यासारखेच होते....... मुसलमानांतील शिक्षण प्रसारकांचा उद्देश प्रथमपासूनच मुलांच्या शीलसंवर्धनावर भर देण्याचा असतो आणि केवळ बौद्धिक कसरत करण्यापेक्षा शीलसंपन्न नागरिकच सरकारी नोकरीची जबाबदारी अधिक चांगल्या तऱ्हेने बजावू शकतील असे आमचे ठाम मत आहे. शिष्टमंडळाने मांडलेली तिसरी मागणी नगरपालिका आणि जिल्हा लोकल बोर्डातून मुसलमानांना अधिक प्रतिनिधित्व मिळण्यासंबंधीची होती. मुसलमानांची संख्या, सामाजिक दर्जा, स्थानिक पातळीवरील त्यांचे वजन आणि त्यांच्या समाजाच्या विशेष गरजा या बाबींचा यासंबंधात विचार करून प्रतिनिधित्व दिले पाहिजे. मुसलमानांच्या स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना ही शिष्टमंडळाची शेवटची मागणी होती.

आपल्या उत्तरात व्हॉइसरॉय साहेबांनी शिष्टमंडळाच्या प्रातिनिधिक स्वरूपाबद्दल समाधान व्यक्त केले. इस्लामच्या अनुयायांनी धर्माची न्याय्य उद्दिष्टये डोळ्यापुढे

ठेवून साम्राज्याच्या राजकीय इतिहासात सहभागी होण्याचा जो निर्धार व्यक्त केला त्याबद्दल आनंद व्यक्त केला. "तुम्ही स्वत: एका जेत्या आणि सत्ताधारी जमातीचे वंशज आहात. ब्रिटिश राजसत्तेने हिंदुस्थानला व्यक्तिगत नागरी स्वातंत्र्य, उपासना स्वातंत्र्य, सर्वसाधारण शांतता आणि उज्वल भवितव्याची जी हमी दिली आहे त्याबद्दल तुम्ही स्वत:च आता कृतज्ञता व्यक्त केली आहे." या प्रास्ताविकानंतर मिंटो यांनी भारतीय मुसलमानांना सहाय्य करण्यासाठीच्या विविध सरकारी उपक्रमांचा आढावा घेऊन सर सैयद यांच्या कार्याचा गौरव केला आणि अलिगडच्या विद्यार्थ्यांची राजनिष्ठा आणि देशभक्ती याबद्दल त्यांचे कौतुक केले. बंगालची फाळणी रद्द होणार नाही असे ठामपणे सांगून तेथील मुसलमान समाजाची राजनिष्ठा लक्षात घेऊन त्यांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याचे बाबतीत शासनाचे धोरण त्यांना पूर्ण न्याय देण्याचे राहील याबाबत निर्धास्त रहा असे आश्वासन दिले. नगरपालिका, जिल्हा बोर्ड किंवा कायदे मंडळात मुसलमान समाजाचे प्रतिनिधित्व, त्यांची संख्या, राजकीय महत्त्व आणि त्यांच्या समाजाने बजावलेली साम्राज्याची सेवा या बाबी लक्षात घेऊन ठरविण्यात यावे या शिष्टमंडळाच्या मागणीशी आपण संपूर्णपणे सहमत असल्याचे मिंटो यांनी सांगितले. भारत हे एक खंड असून त्यातील लोकांच्या विविध जाती जमातीगणिक वेगवेगळ्या श्रद्धा आणि परंपरा ध्यानात न घेता वैयक्तिक मताधिकार दिला तर हा सर्व उपक्रम कोसळून पडेल असे मत व्यक्त करून त्यांनी संयुक्त मतदार संघाविषयी शिष्टमंडळाने जी भूमिका मांडली होती तीही आपल्याला सर्वस्वी मान्य असल्याचे सांगितले. आपले भाषण संपवताना त्यांनी पुढे असे आश्वासन दिले की, मुसलमानांचे राजकीय हक्क आणि हितसंबंध समाज म्हणून सुरक्षित राखले जातील याची तुम्ही खात्री बाळगावी आणि ब्रिटिश साम्राज्यात मोडणाऱ्या भारतातील विविध जाती–जमातींच्या धार्मिक श्रद्धा आणि 'राष्ट्रीय परंपरा' यांचा ब्रिटिश सरकार सदैव सन्मान राखील असा भरवसा बाळगावा. व्हॉइसरॉयचे हे भाषण म्हणजे शिष्टमंडळातील सभासदांना आश्चर्याचा एक सुखद धक्काच होता. स्वत: मिंटो यांच्या दृष्टीनेही तो एक अत्यंत महत्त्वपूर्ण असा दिवस ठरला. लेडी मिंटो यांनी त्यासंबंधी आपल्या रोजनिशीत असे लिहून ठेवले आहे की, 'आज सकाळी मला एका अधिकाऱ्याकडून खालील पत्र मिळाले. "आज एक फार महत्त्वाची घटना घडली आहे हे मला आपल्याला कळविले पाहिजे. भारताच्या इतिहासावर पुढील अनेक वर्षे परिणाम घडवून आणील अशी मुत्सद्देगिरी आज लाटसाहेबांनी दाखविली. सहा कोटी लोकांना त्यांनी देशद्रोही विरोधी संघटनेत सामील होण्यापासून परावृत्त केले आहे."

सिमल्याला गेलेल्या शिष्टमंडळाच्या नेत्यांचे तेथे जे स्वागत झाले त्यामुळे ते भलतेच खूष होऊन गेले. त्यानंतर नऊ दिवसांनी आसाम आणि पूर्व बंगालच्या ले. गव्हर्नरला बंगालच्या फाळणीचा पहिला वर्धापन दिन साजरा करण्यासाठी

मुसलमानांच्या सभा भरत असल्याच्या एकूण २१ ठिकाणाहून तारा आल्या. यामुळे अत्यंत खुष होऊन मोर्ले यांनी व्हॉइसरॉयचे अभिनंदन करून आपल्या संदेशात पुढे असे कळविले की, 'मुसलमानांसंबंधी तुम्ही जी कामगिरी बजावली आहे त्यामुळे इतर अनेक फायद्यांबरोबर एक महत्वाचा फायदा असा घडून आला आहे की, ब्रिटिश पार्लमेंटमधील भारतानुकूल सभासदांचे सारे मनसुबे आणि डावपेच कोसळून पडले आहेत. भारताचा प्रश्न म्हणजे नोकरशाहीविरूद्ध जनता अशी समस्या आहे असे नेहमीचे ठोकळेबाज समीकरण अतःपर त्यांना मांडता येणार नाही'. तारीख १२ डिसेंबर रोजी इंग्लडंच्या बादशहांना पाठवलेल्या खलित्यात मिंटो यांनी असे लिहिले की, "आजमितीला बंगालमधील आणि नव्या प्रांतातील चळवळ ओसरू लागली आहे हे ऐकून आपणास आनंद होईल अशी माझी खात्री आहे. . . . केवळ बंगाली हितसंबंधापेक्षा इतरही अनेक बाबी विचारात घेणे आवश्यक असल्याचे मुसलमानांच्या चळवळीने दाखवून दिले आहे. राजनिष्ठ मुसलमानांवर त्यांच्या या भूमिकेबद्दल मेहेरनजर दाखविण्याच्या बाबतीत सरकारने कसलीही हयगय केली नाही. संकल्पित सुधारणासंबंधी प्राथमिक स्वरूपाचा आराखडा तयार करण्यासाठी ऑगस्ट महिन्यात अरुंडेल समितीची स्थापना करण्यात आली होती. या सुधारणा-संबंधीचा काँग्रेसचा दृष्टीकोन समितीसमोर मांडण्याची परवानगी काँग्रेसतर्फे आर. सी. दत्त यांनी मागितली होती. त्यांना ती नाकारण्यात आली. परंतु मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी मोहसीन-उल-मुल्क यांची साक्ष मात्र समितीने नोंदवून घेतली.

सिमल्याला गेलेल्या शिष्टमंडळाने उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती म्हणून मुसल-मानांची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी केली होती. ती मागणी मान्य करण्यावर मोर्ले यांचा फार कटाक्ष होता. त्यासंबंधी त्यांनी भारतातील अधिकाऱ्यांकडे परस्पर चौकशी करून तिचे निष्कर्ष ११ ऑक्टोबर १९०६ रोजी लॉर्ड मिंटो यांना कळविले.

मुसलमानांसंबंधी माझ्याकडे आलेले दोन-तीन अभिप्राय लक्षात घेण्यासारखे आहेत.

१. मी, कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मॅकलीन यांना खरोखरी-च्या पहिल्या दर्जाच्या न्यायमूर्तीचे नाव तुमच्या डोळ्यासमोर आहे का असे विचारले असता मला असे उत्तर मिळाले की, नाही, एकही नाही.

२. तोच प्रश्न मी त्याच कोर्टातील एक न्यायाधीश स्टीफन यांना विचारला तेव्हा त्यांनीही तसेच उत्तर दिले.

३. मुसलमानांशी घनिष्ट संबंध असणाऱ्या मॅकमोहन यांचे शासनातील एक घटक म्हणून मुसलमानांसंबंधी फारसे चांगले मत नाही. त्यांच्यात कसलीही गतिशीलता नसते. त्यांना सुधारणांबाबत आस्थाच वाटत नाही असे त्यांनी मला सांगितले.

ता. ४ नोव्हेंबर रोजी उत्तरादाखल मिंटो यांनी असे कळविले की, मूलतः वरील मते व्यावसायिक दृष्टीकोनातून व्यक्त केली गेली असून ती बरीचशी संकुचित आहेत.

म्हणजे व्यापक दृष्टीकोन न ठेवता केवळ व्यावसायिक गरजा विचारात घेऊन ती व्यक्त करण्यात आली आहेत. त्यांच्या दृष्टीने याच्याशी निगडित असलेला प्रश्न फार महत्वाचा आहे. कार्यक्षमता जरी कमी पडली तरी देखील मुसलमानांचे म्हणणे मान्य केले पाहिजे.

अश्रफांना सवलती देण्याच्या धोरणाचा जोराने पाठपुरावा करण्यात येऊ लागला. अश्रफ आणि हलक्या जातीतील धर्मान्तरीत लोक यांची नोंद ठेवणारी खास विभाग-वार नोंदणी पुस्तके तयार करण्यात आली. केवळ श्रमाचे काम करणाऱ्या मजुरा-व्यतिरिक्त इतर जागांसाठी खालच्या जातीतील लोकांना भरती न करण्याचे आदेश देण्यात आले. त्या उलट अश्रफांची मात्र थेट अधिकारी म्हणून एकदम नेमणूक करण्यात येऊ लागली. अस्सल मुसलनामांच्या (अश्रफ) बरोबरीचे स्थान खालच्या जातीतील मुसलमानांना देण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेश सरकारने दिले. वर्षभरात डनलॉप स्मिथ यांनी अश्रफ कायदेपंडित शोधून काढले व त्यांच्यापैकी काहींची उच्च न्यायालयांचे न्यायमूर्ती म्हणून किंवा इतर वरिष्ठ जागांसाठी शिफारस केली. (या नेमणुकांबद्दल १९०८ च्या डिसेंबरात अमृतसर येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात अध्यक्ष सैयदअली इमाम यांनी कृतज्ञता व्यक्त केली.)

बंगालची फाळणी झाल्यापासून महिनाभराच्या आत ब्रिटिशांबद्दल सदैव कृतज्ञ असणारा डाक्क्याचा नबाब सर सलीमुल्ला खान याने मुसलमानांचा नवा पक्ष स्थापन करण्याची एक तपशीलवार योजना तयार केली. डिसेंबरमध्ये ऑल इंडिया मोहॅमेडन एज्युकेशनल कॉन्फरसचे अधिवेशन नवाब साहेबांच्या अध्यक्षतेखाली डाक्यात भरले. परिषदेला हजर असलेल्या प्रतिनिधींसमोर त्यांनी आपली नव्या पक्षाची योजना मांडली आणि ती एकमताने पास झाली. त्यानंतर थोड्याच दिवसात ऑल इंडिया मुस्लीम लीगचे संस्थापना अधिवेशन भरविण्यात आले. शैक्षणिक परिषदेत नबाब विकार उल्-मुल्क यांनी आपल्या भाषणात काँग्रेस बरोबर मुसलमानांचे ज्या तीन बाबींवर मतभेद होते त्यांचा उहापोह केला. त्या बाबी अशा (१) काँग्रेसने केलेल्या काही मागण्यांमुळे भारतातील ब्रिटिश सत्तेचा पायाच उखडला जाण्याचा संभव आहे. (२) काँग्रेस अधिवेशनात अनेक वक्ते सरकारविरुद्ध आक्रमक आणि हिंसक भाषा वापरतात, आणि (३) काँग्रेसच्या काही मागण्यांमुळे मुसलमानांच्या हक्कां-वर गदा येईल. हिंदुस्तानातून ब्रिटिशांची सत्ता गेली तर बहुसंख्य असलेले हिंदू या देशावर राज्य करतील अशी भीती व्यक्त करून नबाबसाहेब पुढे म्हणाले की, 'अशा परि-स्थितीत आमचे जीवन, मालमत्ता, आमची प्रतिष्ठा, आमचा धर्म म्हणजे आमचे सर्वस्वच रसातळाला जाईल'. मुस्लीम लीगच्या संस्थापना अधिवेशनात नव्या संघटनेची ध्येय-धोरणे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली : हिंदुस्तानातील मुसलमानांच्या मनांत ब्रिटिश सत्तेबद्दल राजनिष्ठेची भावना वाढीस लावणे, मुसलमानांचे राजकीय

हक्क आणि हितसंबंध यांची जपणूक करणे, त्यांच्या गरजा आणि आशा–आकांक्षा शासनाच्या कानावर घालणे आणि वरीलपैकी कशालाही बाध येवू न देता इतर जाती–जमातींबद्दल भारतीय मुसलमानांच्या मनात अप्रीती किंवा वैरभावना निर्माण होवू न देणे. अधिवेशनात बंगालची फाळणी ही मुसलमानांच्या हिताची आहे असे नमूद करणारा आणि फाळणीविरोधी आंदोलनाचा निषेध करणारा ठरावही पास करण्यात आला. त्या अधिवेशनात सर्व प्रांतातील पुढाऱ्यांची एक तात्पुरती समिती नियुक्त करण्यात येऊन तिच्यावर लीगची घटना तयार करण्याची आणि तिचे पहिले अधिवेशन बोलावण्याची कामगिरी सोपविण्यात आली. निरनिराळ्या प्रांतांत झपाट्याने लीगच्या शाखा स्थापन करण्यात येऊ लागल्या. १९०७ च्या डिसेंबरात कराची येथे मुस्लीम लीगचे पहिले अधिवेशन भरले. अलिगडला सायन्स कॉलेजची स्थापना करण्यासाठी फार मोठी देणगी दिलेले सिंधमधील सर आदमजी पीरभॉय हे अध्यक्ष स्थानी होते. त्यांनी सिमल्याला गेलेल्या शिष्टमंडळाने बजावलेल्या कामगिरीबद्दल त्याची पाठ थोपटली. आदमजी हे स्वत: उद्योजक असल्याने त्यांनी आपल्या भाषणात मुसलमानांना नवे नवे उद्योग सुरू करण्याचे आवाहन केले. दिल्लीच्या आणि प्रांतिक कायदेमंडळात मुसलमानांसाठी काही जागा राखून ठेवल्याबद्दल सरकारचे आभार मानून त्यांनी मुसलमान समाजाच्या राजनिष्ठेची पुन्हा एकदा ग्वाही दिली आणि मुसलमानांवर विश्वास ठेवून राज्य कारभारात त्यांना सहभागी करून घेण्याची त्यांनी शासनाला विनंती केली.

१९०७ च्या ऑगस्टमध्ये भारत सरकारने केंद्रीय आणि प्रांतिक कायदेमंडळांची फेररचना करण्याची योजना तयार केली. या योजनेनुसार जमीनदार, व्यापारी, कारखानदार आणि मवाळांना प्रतिनिधित्व दिले जाणार होते. 'इंपीरियल ॲडव्हाय-सरी कौन्सिल'चा विस्तार करून त्यावर वंशपरंपरा हक्क भोगणाऱ्या सरदार जहा-गिरदारांना नियुक्त करावयाची योजना होती. प्रांताप्रांताच्या गव्हर्नरांकडे हा मसूदा पाठवताना भारत सरकारने अशी पुस्ती जोडली की, सरकारी गटाचे पुरेसे बहुमत राहिले पाहिजे अशी याबाबतीतील शासनाची धारणा आहे. त्यानंतरच्या मार्च महिन्यात अलिगड येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात या मसुद्याला संपूर्ण पाठिंबा दर्शविण्यात आला. सर्व कायदेमंडळातून मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. तशा अर्थाचे निवेदनही तयार करण्यात आले. आगा खान, अमीर अल्ली आणि बिलग्रामी यांच्या शिष्टमंडळाने भारत मंत्र्यांची भेट घेऊन मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदार संघ, प्रत्येक पातळीवर त्यांना विशेषाधिकार आणि व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर पन्नास टक्के प्रतिनिधित्व मिळावे अशी मागणी केली. पार्लमेंटमध्ये केलेल्या भाषणात मोर्ले यांनी या शिष्ट-मंडळाने केलेल्या वरील मागण्यांच्या संदर्भात असे घोषित केले की, स्वतंत्र मतदार संघ आणि विशेषाधिकार या संबंधीची मागणी पूर्णांशाने मान्य करता येण्यासारखी

असली तरी व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर मुसलमानांना समान प्रतिनिधित्व देण्याची मागणी मात्र मान्य करता येणार नाही. व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर फक्त एस. पी. सिन्हा यांची एकट्याची नेमणूक करण्यात आली. ते काँग्रेस पक्षाचे नव्हते. आणि पुढे काही वर्षांनी त्यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागेवर एका मुसलमानाची नेमणूक करण्यात आली.

१९०९ च्या इंडियन कौन्सिल ॲक्ट अन्वये सुधारणांचा आणखी एक हप्ता देण्यात आला. त्या कायद्यानुसार सरकारनियुक्त बिनसरकारी, सरकारनियुक्त अधिकारी आणि नगरपालिका, लोकल बोर्ड, विद्यापीठे, चेंबर ऑफ कॉमर्स, व्यापारी संघटना, चहाचे मळेवाले आणि जमीनदार यांनी निवडलेले असे त्रिस्तरीय प्रतिनिधी कायदेमंडळात राहणार होते. त्यामुळे तांत्रिकदृष्टचा प्रांतिक कायदेमंडळातून बिनसरकारी प्रतिनिधींचे बहुमत दिसले तरी प्रत्यक्षात ॲंग्लो-इंडियन्स आणि युरोपियन्स यांच्या सज्जड गटांवर मतासाठी सरकारला केव्हाही विसंबून राहाता येण्यासारखे होते. एकादी भारतीय व्यक्ती अयोग्य वाटल्यास तिची उमेदवारी रद्द ठरविण्याचा अधिकार शासनाला देण्यात आला होता. स्वतंत्र मतदार संघाची आणि संरक्षक सवलतींची मुसलमानांची मागणी संपूर्णपणे मान्य करण्यात आली होती. यासंबंधात रॅम्से मॅकडोनॉल्ड यांनी असे मत व्यक्त केले आहे की :

मुसलमानांना इतक्या भरमसाठ सवलती देण्यात आल्या आहेत की, त्यामुळे त्यामागे काही दुष्ट शक्तींचा हात असावा, ॲंग्लोइंडियन अधिकाऱ्यांची चिथावणी असावी आणि हे अधिकारी सिमला किंवा लंडनहून सूत्रे हलवीत असावेत असा रास्त संशय येतो. त्यांच्या या कारवायांमागे मुसलमानांच्या बाबतीत उघडउघड पक्षपात करून हिंदू-मुसलमानांत दुहीची बीजे पेरण्याचा पूर्वनियोजित कावा असावा असे वाटणे साहजिक आहे. नव्या सुधारणांची सुरुवात करताना जी नियमावली तयार करण्यात आली होती तीच किती अन्यायकारक होती ते पूर्व बंगालच्या उदाहरणावरून दाखवून देता येण्यासारखे आहे. जमीनदार मतदार संघातून मतदानाचा हक्क प्राप्त होण्यासाठी हिंदू रु. ५,००० चा महसूल भरत असला पाहिजे, तर मुसलमान मात्र फक्त रु. ७५०, उपकराच्या बाबतीत हिंदूला रु. १,२५० ची अट आहे तर मुसलमानाला रु. १८० ची. हिंदू व्यक्ती प्राप्तीवरील कर भरीत असेल, तिला सरकारी निवृत्तीवेतन मिळत असेल किंवा तो ऑनररी मॅजिस्ट्रेट असेल तरीही मतदानास पात्र ठरत नाही. परंतु मुसलमानांना मात्र या आधारावर मताधिकार प्राप्त होऊ शकतो. प्रांतिक कायदेमंडळावर निवडून येण्याच्या बाबतीत देखील हिंदूंच्यावर असाच अन्याय करण्यात आला आहे आणि तो देखील मुसलमान अल्पसंख्य आहेत अशा प्रांतात नव्हे तर जेथे त्यांचे प्रचंड बहुमत आहे अशाही प्रांतात हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

मुसलमानांच्यावर विविध सवलतींची ही जी खैरात करण्यात आली त्यासंबंधीचा विचार एका बाजूला विविध स्वरूपाचा स्वातंत्र्य लढा आणि दुसऱ्या बाजूला डिसेंबर १९०८ च्या अमृतसर अधिवेशनात मुस्लीम लीगने द्विराष्ट्र वादाच्या सिद्धांताच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल यांच्या पार्श्वभूमीवर केला पाहिजे. फाळणीविरोधी चळवळीला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले होते. काँग्रेसमध्येच मवाळ आणि जहाल असे दोन गट पडले होते आणि ते दोन्ही गट आपापल्या परीने स्वतंत्रपणे फाळणीविरोधी लढा चालवीत होते. त्याशिवाय दहशतवाद्यांचा एक तिसरा प्रवाह होता. मागील शतकात त्याची सुरुवात अगदी लहान प्रमाणावर झालेली असली तरी आता त्याने चांगले मूळ धरले होते. सरकारने दमनचक्र जोराने सुरू केले. मात्र भारतातील निरनिराळ्या जातीजमातींच्या बाबतीत सरकारचे धोरण निःपक्षपातीपणाचे असल्याचा पुकारा सतत केला जात होता. राजद्रोहासंबंधीच्या विधेयकावर भाषण करताना मिंटो असे गरजला की, 'राजकीय कारणास्तव भारत सरकारकडून एका जमातीविरुद्ध दुसऱ्या जमातीच्या हितसंबंधांच्या बाबतीत पक्षपात केला जातो असा जो आरोप करण्यात येतो त्याचा मी अगदी निक्षून इन्कार करतो. कोणताही पूर्वदूषितग्रह न बाळगता राष्ट्रीयत्व आणि धर्म याबाबतच्या निरनिराळ्या जातीजमातींच्या मागण्यात समतोल साधला जातो ही बाब ब्रिटिशांना मोठ्या अभिमानाची वाटते. त्या शतकात सर्वात जास्त खोटे बोलणाऱ्याला कोणी एकादे बक्षिस लावले असते तर मिंटोने ते खासच पटकावले असते. १९०८ च्या लीग अधिवेशनात सैयद अली इमाम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात त्याची भलामण करावी हे साहजिकच होते.

ते आपल्या भाषणात म्हणाले :

"खऱ्याखुऱ्या सामाजिक दृष्टीकोनातून पाहता (हिंदू आणि मुसलमान) हे दोन समाज हजार वर्षांपूर्वी परस्परांपासून जितके दूर होते तितकेच ते आजही दूरच आहेत. . . . त्यांची धार्मिक विचारसरणी सर्वस्वी भिन्न आहे . . . . सार्वभौमत्वाविषयीच्या त्यांच्या कल्पनाही वेगवेगळ्या आहेत. . . . यावरुन हे स्पष्ट होते की, वांशिक स्वरुपाची भिन्नता तर त्यांच्यात आहेच पण त्याशिवाय या दोन जमातीत परंपरा, धर्म, राजकीय आणि सामाजिक कल्पना यापैकी कशातच साम्य नाही."

"पूर्वीच्या काळी अकबर आणि औरंगजेब या दोघांनीही हिंदू-मुसलमानांत एकता घडवून आणण्याचे प्रयत्न केले. परंतु त्यांचे मार्ग परस्परविरोधी होते. धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात गोडीगुलाबी, देवाण-घेवाण आणि सवलती यावर अकबराचा भर होता तर औरंगजेबाने धार्मिक असहिष्णुता आणि सक्तीची बाटवाबाटवी यासारख्या एकांतिक आणि धोकादायक मार्गाचा अवलंब केला. परंतु दोघांचेही प्रयत्न निष्फळ ठरले. औरंगजेबाच्या काळात हिंदुंची नवी सत्ता उदयास आली आणि तिने मुसलमानी सत्तेविरुद्ध बंड पुकारले. त्यामुळे हिंदुस्तानातील उरला-सुरला इस्लाम

धर्मही मोडकळीस आला. पुढे ब्रिटिशांची राजवट सुरू झाल्यावर हिंदूंच्या इस्लाम-विरोधाला पायबंद बसला. 'ब्रिटिशांच्या सत्तेमुळे हिंदूकडून होणारी मुसलमानांची ससेहोलपट संपली हे नाकारण्यात अर्थ नाही. ब्रिटिश अमदानीमुळे भारतात शांततेचे एक नवे युग अवतरले आणि विकासाची नवी संधी उपलब्ध झाली. त्यामुळे नजीकच्या भविष्य काळात तर राहोच परंतु पुढेही कधी स्वातंत्र्याची मागणी करणे ही जनतेची फार मोठी घोडचूक ठरेल. भारतीयांच्या दृष्टीने सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांनी कायस्थ सभा, भूमिहार संघटना, राजपूत परिषद, मोहॉमेडन अंजुमान अशा तऱ्हेच्या आपापल्या जातीपुरत्या संघटना स्वतःचा विकास घडवून आणण्यासाठी काढाव्यात. बरोबरच अलि इमाम यांनी त्या भाषणात असेही वक्तव्य केले की,

" धर्म, समाज आणि राजकारण यांचे निरनिराळे कप्पे असू शकत नाहीत आणि त्या मुळे राजकारणाची धर्मापासून फारकत करता येणार नाही." त्याच अधिवेशनात महंमद अली यांनी असे प्रतिपादन केले की, समानधर्मी लोकसंख्येचा अभाव असलेल्या देशांना प्रादेशिक मतदार संघ सोयीस्कर ठरणार नाहीत."

मुस्लीम लीगच्या निर्मितीनंतर हिंदी-उर्दू वादही पुन्हा उकरून काढण्यात आला. डिसेंबर १९०८ मध्ये अमृतसरला भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात महंमद अलींनी हिंदी भाषेला मान्यता दिल्याबद्दल संयुक्त प्रांताच्या भूतपूर्व गव्हर्नराचा धिक्कार केला. आणि हिंदू लोक अरेबिक किंवा पर्शियन भाषेतून आलेले शब्द मुद्दाम टाळतात असा आक्षेप घेऊन त्याबद्दल त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. जानेवारी १९१० मध्ये दिल्लीत भरलेल्या अधिवेशनात अर्काटचे संस्थानिक सर गुलाम महंमद अली खानबहादूर यांनी असा दावा केला की, तामीळ, तेलगू, मल्याळम् आणि कन्नड मातृभाषा असणारे दक्षिण भारतातील मुसलमान हे त्या भाषांऐवजी मोठ्या प्रमाणावर उर्दूचा स्वीकार करू लागले असून उर्दू माध्यमाच्या शाळा स्थापन करू लागले आहेत. सर्व मुसलमानांची समान भाषा म्हणून उर्दूचा विकास घडवून आणण्यावर त्यांनी भर दिला. संबंध देशाची व्यवहाराची भाषा म्हणून उर्दूला मान्यता मिळावी. अशा आशयाचा ठराव शेख अबदुल कादीर यांनी त्या अधिवेशनात मांडला. काझी कबीरुद्दीन यांनी भारतीय मुसलमानांची भाषा म्हणून उर्दूच्या विकासावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी परिषदा भरविण्यात याव्यात आणि हे कार्य करू शकतील अशा संस्था स्थापन करण्यात याव्यात असे सुचविले. पुढल्यावर्षी नागपूर येथे भर-लेल्या अधिवेशनात खान बहादूर एच. एम. मलक यांनी उर्दू नियतकालिकांची राजनिष्ठा आणि आदबशीर भाषा यांचा खास उल्लेख करून आसाम आणि बंगाल-मधील मुसलमानांतही उर्दूचा प्रसार होऊ लागल्याचे सांगितले. शेख जहीर अहमद यांनी संयुक्त प्रांत आणि पंजाब या प्रांतात अनुक्रमे हिंदी आणि पंजाबी भाषांस राज्य भाषेचा दर्जा मिळवून देण्याच्या प्रयत्नांचा निषेध करणारा ठराव मांडला. मौलवी रफिउद्दिन यांची तक्रार अशी होती की, मुंबई इलाख्यात गुजराथी आणि

मराठी भाषांनी उर्दूचे स्थान बळकावले आहे. अशा तऱ्हेने अनेक वक्त्यांनी हिंदीवर टीकेची झोड उठवून उर्दूचे घोडे पुढे दामटण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला.

मुस्लिम लीगचे तिसरे अधिवेशन दिल्लीला भरले होते. हकीम अजमलखान यांनी दहशतवादी चळवळीचा निषेध केला. काँग्रेसचा उल्लेख त्यांनी 'तथाकथित इंडियन नॅशनल काँग्रेस' म्हणून केला. आणि सर सैयद यांच्या नेतृत्वाबद्दल गौरव-पर उद्‌गार काढले. १८८६ साली स्थापन झालेली मोहॅमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्स हे त्यांच्या दृष्टीने मुसलमानांनी उचललेले राष्ट्रीय स्वरूपाचे पहिले पाऊल होते. हिंदूंची त्याबाबतची प्रतिक्रिया अनपेक्षितपणे असमंजसपणाची होती असे त्यांनी सांगितले. स्वतंत्र जातीयवादी राजकीय संघटनांचे त्यांनी जोरदार समर्थन केले आणि अशा संघटनांचे स्वागत करण्याऐवजी त्यांच्या कार्यावर लोकांनी तुटून पडावे याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. मात्र फेरोजशहा मेहता किंवा सिन्हा यांच्यासारख्या काँग्रेसमधील मवाळ नेत्यांनी स्वतंत्र मतदार संघांना पाठिंबा दर्शविल्याबद्दल समाधान व्यक्त केले. शिक्षण घेतलेल्या मुसल-मानांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले. मुसल-मानांच्या मागण्या मान्य केल्याबद्दल त्यांनी व आगाखानांनी मिंटो आणि मोर्ले यांच्या-विषयी कृतज्ञता व्यक्त केली. मुसलमानांनी आता आपले राजकीय हक्क प्राप्त करून घेतले असल्यामुळे हिंदुंच्याबरोबर घनिष्ट संबंध प्रस्थापित करण्याची वेळ येऊन ठेपली आहे असे मत आगाखानांनी व्यक्त केले. मात्र असे करताना हिंदुस्तानातील ब्रिटिश सत्तेचा पाया मजबूत करणे आणि जनतेच्या मनात राजनिष्ठेची भावना रुजवून ब्रिटिश सत्ता कायम राहील म्हणून प्रयत्नशील राहणे हे आपले सर्वात पहिले कर्तव्य आहे याचा विसर पडू देता कामा नये असा इशाराही त्यांनी देऊन ठेवला. अलिगड कॉलेजचे विद्यापीठात रूपांतर करण्यात यावे अशी त्यांनी मागणी केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात अर्काटच्या संस्थानिकांनी मिंटो यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांनी वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, मध्य प्रांत आणि ब्रह्मदेश येथील मुसलमानांना इंपीरियल कौन्सिलवर प्रतिनिधित्व मिळावे अशी मागणी केली. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्तानच्या कल्याणासाठी हिंदू मुसलमानांनी हातात हात घालून कार्य करावे असे आवाहन करून परकियांच्या मदतीशिवाय केवळ हिंदू किंवा केवळ मुसलमान हिंदुस्तानावर राज्य करू शकतील ही कल्पना त्यांनी डोक्यातून काढून टाकावी असे अमीर अलींनी बजावले. इंग्रजी शिक्षणाचे बाबतीत मुसलमानांनी प्रचंड प्रगती केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. सुधारणांबद्दल सरकारचे आभार मानणारा आणि हिंदुस्तानच्या भूमीतून दहशतवादी चळवळीची पाळेमुळे उखडून टाकण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांशी सहकार्य करण्याचे जनतेला आवाहन करणारा, त्याचप्रमाणे मुसलमानांचे संख्याबळ आणि राजकीय महत्त्व लक्षात घेऊन सरकारी नोकऱ्यांतील त्यांचे प्रमाण ठरवून द्यावे, नगरपालिका आणि लोकल बोर्ड यात मुसलमानांना योग्य आणि परिणामकारक

प्रतिनिधित्त्व मिळावे व मुस्लीम युनिव्हेंसिटीची स्थापना करावी अशा मागण्या करणारे ठराव अधिवेशनात पास करण्यात आले. १९१० सालच्या काँग्रेस अधिवेशनात अध्यक्ष सर विल्यम वेडरबर्न यांनी आगाखानांनी केलेल्या मागण्यानुसार काँग्रेस आणि मुस्लीम लीग पुढाऱ्यांची संयुक्त बैठक बोलवावी असे सुचविले. त्याबरोबर अँग्लोइंडियन वृत्तपत्रातून त्यांच्याविरूद्ध टीकेचे मोहोळ उठले आणि सरकारविरुद्ध हिंदू-मुसलमानांचे ऐक्य घडवून आणण्यासाठीच ही संयुक्त बैठक बोलावण्यात येत आहे असा त्याच्यावर आक्षेप घेण्यात आला. शेवटच्या क्षणी अखेर ती संयुक्त बैठक बारगळली.

बंगालच्या फाळणीविरुद्ध चाललेल्या आंदोलनास चांगलीच धार चढली होती. दहशतवाद्यांच्या कारवायांमुळे सत्ताधारी आणि त्यांचे पाठीराखे हादरून गेले होते. सरकार धमक्यांना आणि चळवळीला भीक घालणार नाही असे लॉर्ड मिंटो पुन:पुन्हा जाहीरपणे सांगत असले तरी ते इंग्लंडला परत गेल्यानंतर थोड्याच दिवसात १९११ च्या डिसेंबर महिन्यात दिल्लीला भरलेल्या दरबारात बंगालची फाळणी रद्द करण्यात येत असल्याची घोषणा करण्यात आली. या प्रसंगीच्या आपल्या भाषणात पंचम जॉर्ज बादशहांनी पुढे अशी घोषणा केली की, बिहार, छोटा नागपूर आणि ओरिसा, पश्चिम बंगालपासून अलग केले जातील. पूर्व आणि पश्चिम बंगालचा मिळून एक प्रांत राहील आणि आसामचा स्वतंत्र प्रांत बनविला जाईल. राजनिष्ठ मुसलमानांचा अनुनय करण्यासाठी हसन इमाम यांची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करण्यात आली. शमसुल हुदा यांना बंगालच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर घेण्यात आले. अमीर अली यांची प्रीव्ही कौन्सिलचे सभासद म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि आगाखान यांना सर्वोच्च बहुमान प्रदान करण्यात आला. दिल्ली दरबारात डाक्क्याच्या नबाबांवर विशेष शाही मेहेरनजर दाखविण्यात आली. मार्च १९१२ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या पाचव्या अधिवेशनावर बंगालची फाळणी रद्द झाल्यामुळे विषादाची छाया पसरली होती. डाक्क्याच्या नबाबांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांत बंगालच्या फाळणीबाबत पडेल भूमिका स्वीकारली होती. पूर्व बंगालमधील मुसलमानांनी फाळणीला पाठिंबा दिला तो हिंदूंच्याबद्दल त्यांच्या मनात शत्रुत्वाची भावना होती म्हणून नव्हे तर स्वत:चा विकास घडवून आणण्याची संधी मिळावी हाच त्यामागे त्यांचा उद्देश होता असे आश्वासन त्यांनी हिंदू समाजाला दिले. हिंसक चळवळी आणि राजद्रोह यापुढे सरकारने शरणागती पतकरावी याबद्दल त्यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले. शिवाय ते असेही म्हणाले की, ब्रिटिशांच्या आश्वासनावर मुसलमानांचा इतके दिवस जो विश्वास असे त्याला तडा गेला आहे. फाळणी रद्द करण्यात आल्याबद्दल तीव्र दु:ख आणि निराशा व्यक्त करणारा महंमद अलींचा ठराव अधिवेशनात एकमताने मंजूर करण्यात आला.

मुस्लीम लीगची स्थापना झाल्यापासूनच्या पहिल्या सहा अधिवेशनातून मुस्लीम

लीगतर्फे खालील मागण्या करण्यात आल्या होत्या :

१. थेट इंपीरियल कौन्सिलपासून ते नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीपर्यंतच्या लोकनियुक्त संस्थांतून मुसलमानांना त्यांच्या विशिष्ट धर्मामुळे स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळावे.

२. हिंदुस्तानातील सर्व विद्यापीठांच्या सिंडिकेट आणि सेनेटवर मुसलमानांना वेगळे प्रतिनिधित्व देण्यात यावे. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तक समित्यांवर देखील मुसलमानांना प्रतिनिधित्व मिळावे.

३. उर्दू माध्यमाच्या शाळा सुरू करण्यात याव्यात, शिक्षण क्षेत्रात इन्स्पेक्टर्स आणि अन्य अधिकारपदांवर मुसलमानांची नेमणूक करण्यात यावी, मुसलमानांत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून खास अनुदान देण्यात यावे आणि अलिगड व डाक्का येथे स्वतंत्र मुस्लीम विद्यापीठांची स्थापना करण्यात यावी.

४. सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांना खास जागा राखून ठेवण्यात याव्यात. मात्र त्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात न ठेवता मुसलमानांची संख्या आणि त्यांचे राजकीय महत्त्व या निकषांवर आधारलेल्या असाव्यात. एखाद्या जागेसाठी जी किमान पात्रता ठरविण्यात आली असेल ती धारण करणाऱ्यांची त्या जागेसाठी नेमणूक करण्यात यावी त्यासाठी इतर समाजातील उमेदवारांशी त्यांना स्पर्धा करावी लागू नये अशीही मुस्लीम लीगची मागणी होती.

५. राज्य व्यवहाराची भाषा म्हणून उर्दूला मान्यता देण्यात यावी.

---

प्रकरण सहावे

## जातीयवादाची वाढ

गेल्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रीय चळवळीची पीछेहाट होत गेली त्याला अनेक कारणे होती. मुसलमानांचा ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी जो उघडउघड अनुनय चालवला होता त्यामुळे काँग्रेसच्या कार्यक्रमात सहभागी होणारांची संख्या रोडावत गेली. १९०१ नंतर काँग्रेसच्या अधिवेशनाला हजर राहणाऱ्या मुसलमान प्रतिनिधींची संख्याही एकदम घटली. एखाद्या धोरणविषयक प्रश्नाला मुसलमानांचा विरोध असेल तर तो प्रश्न काँग्रेस हाती घेणार नाही असे आश्वासन काँग्रेसने दोन वेळा आपल्या ठरावातून दिले तरी त्यालाही मुसलमानांकडून प्रतिसाद मिळाला नाही १८९६ मध्ये सयानी यांनी तर अशी सूचना पुढे मांडली होती की, मुसलमान जर मोठ्या संख्येने काँग्रेसमध्ये सामील होण्यास तयार असतील तर वायव्य सरहद्द प्रांताच्या कायदेमंडळात मुसलमानांना समान प्रतिनिधित्व मिळावे ही त्यांची मागणी मान्य केली जाईल. परंतु त्याचाही काही उपयोग झाला नाही. राष्ट्रीय कवी इकबाल हे फुटीरवाद्यांचे नेतृत्व करू लागलेले पाहून काँग्रेस नेते अधिकच गांगरून गेले. अमृतसर येथील मिनर्व्हा लॉज नावाच्या जातीयवादी नसलेल्या एका संघटनेने कवी इकबाल युरोपहून परत आल्यानंतर त्यांना आपल्या बैठकीस हजर राहण्याचे निमंत्रण पाठविले होते. परंतु त्यांनी ते निमंत्रण स्वीकारले नाही. निमंत्रणाच्या पत्राला ता. मार्च १९०९ रोजी पाठविलेल्या ह्या उत्तरात त्यांनी लिहिले होते :

"या देशात धार्मिक मतभेद नाहीसे व्हावेत असे माझे वैयक्तिक मत आहे आणि खाजगी जीवनात आजही मी त्याच तत्त्वानुसार वागत असतो. परंतु मला आता असे वाटू लागले आहे की, हिंदू आणि मुसलमान यांचे पृथक राष्ट्रीयत्व कायम टिकवणे हे त्या दोघांच्याही हिताचे ठरणार आहे. हिंदुस्तानात एकराष्ट्रीयत्वाची भूमिका रुजावी हे ध्येय म्हणून खूप उदात्त आहे आणि त्याबद्दल काव्यात्मक आकर्षणही वाटू शकेल. परंतु सध्याची परिस्थिती आणि दोन जमातींत अजाणतेपणे दिसून येणारी प्रवृत्ती लक्षात घेता ते ध्येय साध्य होणे संभवनीय आहे असे मला वाटत नाही."

कर्झनचा हुकुमशाही कारभार आणि बंगालची फाळणी यामुळे इतके दिवस सरकार-वर विसंबून असलेल्या मवाळांच्या त्या विश्वासासही तडा गेला. १८९७ पासून भारतमंत्री, भारतीयांमध्ये शिक्षणाचा अप्रतिहत प्रसार होत असल्याबद्दल वारंवार चिंता व्यक्त करीत होते. डिसेंबर १८९७ मध्ये मुंबई प्रांताच्या गव्हर्नरांना पाठविले-

खलित्यात त्यांनी असे नमूद केले होते की, (अ) देशीभाषेतील पाठ्य पुस्तके राजद्रोहाची शिकवण देण्यासाठी वापरली जाऊ शकतील (ब) राज्यकर्त्यांबद्दल अप्रीती निर्माण करण्यासाठी आणि राजकीय तर्कटे लढविण्यासाठी राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दुरुपयोग केला जात असून सुशिक्षितांच्या मनातील सत्ताधाऱ्यांबद्दलचा आदरभाव कमी होऊ लागल्याचे स्पष्टपणे दृष्टोत्पत्तीस येऊ लागले आहे. (क) राजकीय सभांत सहभागी होण्याच्या बाबतीत प्रांतिक सरकारे शिक्षकांवर आणि विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध घालीत नाहीत. त्यामुळे याला वेळीच आळा घातला नाही तर भारतीय विद्यार्थ्यांच्या अप्रगल्भ मनाला अध्यापक आणि प्राध्यापक अत्यंत अनिष्ट वळण लागण्याची साधार भीती निर्माण झाली आहे. १९०३ च्या 'कर्झन्स युनिव्हर्सिटी अॅक्टमध्ये वरील सूचनांच्या अनुरोधाने सर्व शैक्षणिक संस्थांवर सरकारचे कडक नियंत्रण राहील अशी तरतूद करण्यात आली होती. साहजिकच काँग्रेस पुढाऱ्यांनी त्याविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आणि ब्रिटिशांच्या शिक्षण पद्धतीचे उच्चाटन करून राष्ट्रीय शिक्षण पद्धतीचा अंगिकार करण्याचे धोरण अवलंबिण्यात यावे अशी मागणी केली. कलकत्त्याला भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात दादाभाई नौरोजी यांनी अशी कबुली दिली की, 'गेली पन्नास वर्षे मी जी आशा बाळगली होती ती आता राहिलेली नसून त्याबाबतीत माझा संपूर्ण भ्रमनिरास झाला आहे.'

१९०५ मध्ये राज्यकारभारात भारतीयांना अधिकाधिक सहभागी करून घेण्यासाठी प्रत्येक प्रांताला हाऊस ऑफ कॉमन्समध्ये प्रतिनिधित्व मिळावे, सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौन्सिलवर तीन भारतीयांची नियुक्ती करण्यात यावी आणि व्हॉइसरॉयच्या कौन्सिलवर भारतीयांना दोन जागा मिळाव्यात अशी मागणी काँग्रेसने केली. त्याचप्रमाणे भारतीय परिस्थितीची पहाणी करण्यासाठी पार्लमेंटने एक समिती नेमावी अशीही मागणी करण्यात आली. त्यावर्षी काँग्रेसने पास केलेला सर्वात महत्त्वाचा ठराव फाळणीला विरोध दर्शविणारा होता. १९०६ साली फाळणीच्या विरोधाबरोबरच बहिष्काराच्या चळवळीला मान्यता देणारा ठराव संमत करण्यात आला. प्रांतिक कायदेमंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास घडवून आणावा, प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यात यावे, माध्यमिक शिक्षणासाठी जादा रक्कम मंजूर करण्यात यावी आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी खास तरतूद करण्यात यावी, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात आणि विद्यापीठांची स्वायत्तता मान्य करण्यात यावी इत्यादी मागण्याही त्या अधिवेशनात केल्या गेल्या.

काँग्रेसमध्येही मवाळ-जहाल अशी दुफळी माजली. काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनाला हजर असलेल्या मवाळांनी मोर्ले यांची भारत मंत्री म्हणून नेमणूक झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. त्या संदर्भात मोर्ले यांच्या लिखाणातील काही उतारे उद्धृत करून ते भारतीयांच्या आशा-आकांक्षांना चांगला प्रतिसाद देतील अशी आशा मवाळ नेते

बाळगून होते. परंतु टिळकांची भावना याच्या नेमकी उलट होती. इंग्लंडमधील सरकार हुजूर पक्षाचे असो नाही तर उदार पक्षाचे असो ते सुखासुखी भारताला काहीही मिळू देणार नाही असा इशारा ह्यूम यांनी दहा वर्षांपूर्वीच देऊन ठेवला होता त्याचे टिळकांनी स्मरण करून दिले. 'अर्ज विनंत्या आणि निषेध खलित्यांचा जमाना आता राहिलेला नाही' असे त्यांनी घोषित केले. संकल्पित सुधारणांवर कडाडून हल्ला चढवताना त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, कायदेमंडळावर सहा-सात माणसांऐवजी अगदी बारा-पंधरा भारतीयांची नेमणूक झाली तरी त्यांच्या हाती कसलेही अधिकार असणार नाहीत. त्यानंतर काही दिवसांनी भरलेल्या कलकत्ता अधिवेशनात त्यांनी आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, 'आपण निःशस्त्र आहोत. पण आपल्याला शस्त्राची आवश्यकताही नाही. कारण आपल्याजवळ त्याहीपेक्षा प्रभावी असे राजकीय बहिष्काराचे शस्त्र आहे. महसूल गोळा करण्याचे आणि शांतता राखण्याचे कामी आपण त्यांना कसलीही मदत देऊ नये.' बिपिनचंद्र पालांनीही देशात अनेक ठिकाणी सभा घेऊन सरकारवर विश्वास टाकू नका, अर्ज विनंत्यांचे दिवस आता संपले आहेत असे घोषित केले.

१९०७ च्या जानेवारी महिन्यात टिळकांनी काँग्रेस अंतर्गत राष्ट्रीय पक्षाची स्थापना केली. त्यामुळे मवाळ पुढारी चांगलेच हबकून गेले. फेब्रुवारी महिन्यात केलेल्या एका भाषणात ना. गोखले यांनी असे सांगितले की, आपल्या देशाची आजची औद्योगिक परिस्थिती लक्षात घेता महत्वाच्या वस्तुंची परदेशातून आयात केल्यावाचून भागणार नाही. त्यामुळे बहिष्कार व्यवहार्य ठरणार नाही, म्हणून काँग्रेसने स्वदेशीचा प्रसार जरूर करावा परंतु परदेशी मालावरील बहिष्काराचा आग्रह धरू नये. एप्रिल महिन्यात अरविंद घोष यांनी निःशस्त्र प्रतिकाराचा त्रिसूत्री कार्यक्रम जाहीर केला. ती सूत्रे अशी होती—स्वावलंबन, अन्याय्य आणि जुलमी कायद्यांचा उघडपणे भंग करणे आणि सरकारशी सहकार्य करणाऱ्यांना वाळीत टाकणे. 'परदेशी मालावर बहिष्कार घाला आणि जे परदेशी माल वापरतील त्यांच्यावरही बहिष्कार घाला' या सुब्रह्मण्यम अय्यर यांच्या घोषणेचाही त्यांनी जोरदार पाठपुरावा केला. सुरेंद्रनाथ बानर्जीसारख्या मवाळ पुढाऱ्यानेही बारिसालच्या सभेवर अन्याय्याने बजावण्यात आलेला बंदी हुकूम मोडून सभा घेतली आणि त्यांच्यासकट सभेला जमलेल्या सर्व श्रोत्यांनी 'वंदे मातरम्' वर बंदी घालण्यात आलेली असताना त्याचा घोष केल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. ता. ११ ऑक्टोबर रोजी ना. गोखले यांनी वेडरबर्न यांना पत्र धाडले, 'मी आता निराश झालो आहे.' काँग्रेसमधील फूट आता अटळ आहे आणि एकदा काँग्रेस फुटली की, नोकरशाहीला दोन्ही गटांना दडपून टाकण्याची आयतीच संधी सापडणार आहे. आम्हा लोकांना जनतेचा पाठिंबा नाही या सबबीवर सरकार आम्हाला बाजूला सारणार आणि देशातील बहुसंख्य विचारवंतांचा पाठिंबा नाही म्हणून ते जहाल गटाला दडपून टाकतील.

शेवटी सुरतच्या अधिवेशनात काँग्रेस दुभंगली आणि गोखले यांनी व्यक्त केलेली भीती खरी ठरली. मिंटोला काँग्रेसमधील या दुफळीने जणू विजयोन्माद झाला. तारीख १५ जानेवारी १९०८ ला मोर्लेला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात की, 'काँग्रेस कशी कोसळून पडेल ते सांगणे कठीण आहे, परंतु आज तरी अशी चिन्हे दिसत आहेत की, जहाल गट नाहीसा होईल आणि मवाळांना काही प्रमाणात तरी आपल्या हेतूंबाबत शंका घेता येणार नाही. काही काळ तरी अशीच स्थिती राहील. हा आपला फार मोठा विजय ठरणार आहे' दडपशाहीचा कहर सुरू झाला. 'सिडीशस मिटींग्ज अ‍ॅक्ट' (राजद्रोही सभासंबंधीचा कायदा) आणि प्रेस अ‍ॅक्ट (वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा) यांसारखे कायदे करण्यात आले. जुलै १९०८ मध्ये टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला व साडेसहा वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावून त्यांची रवानगी मंडालेच्या तुरूंगात करण्यात आली. १८९६ प्रमाणेच याहीवेळी सरकारी हस्तक आणि राजनिष्ठ वृत्तपत्रांनी टिळकांच्या विरूद्ध अप-प्रचाराची मोहीम उघडली. व्हॅलंटाइन चिरोल यांनी १९१० साली प्रसिद्ध झालेल्या '**भारतीय असंतोष**' ( **Indian Unrest** ) या नावाच्या आपल्या पुस्तकात टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणून संबोधले आणि धादांत असत्य विधाने करून टिळकांना बदनाम करण्याचा खटाटोप केला. सरकारी कागदपत्रावर विसंबून आपण त्या पुस्तकातील विधाने केली होती अशी कबुली नंतर चिरोल यांनी दिली आहे. दरम्यान वणव्याप्रमाणे पसरत चाललेल्या दहशतवादी हिंसक चळवळीने सारा देश हादरून गेला होता. १९०८ साली मद्रास येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात मवाळांनी बहिष्कार, राजकीय कैद्यांची हद्दपारी आणि बंगालची फाळणी या विषयांवर चर्चाच होवू दिली नाही.

मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदार संघ आणि विशेषाधिकार यामुळे संतप्त झालेल्या देशी भाषेतील वृत्तपत्रांनी त्याविरुद्ध जोरदार मोहीम उघडली. मवाळ मंडळी मात्र त्या काळात जनतेने सरकारशी सहकार्य करावे आणि देऊ केलेल्या सुधारणांवर विश्वास ठेवावा म्हणून पराकोटीचे प्रयत्न करण्यात गुंतले होते. स्वतंत्र मतदार संघाबद्दलच्या जनतेच्या मनातील संतापाची धार कमी करून मुस्लीम लीग बरोबर वाटाघाटीने तडजोडीचा मार्ग शोधून काढण्याचा त्यांनी प्रयत्न चालविला होता. ना. गोखले यांनी मुसलमानांच्या विविध राजकीय मागण्यांना वृत्तपत्रांतून जो विरोध केला जात होता त्याबद्दल नापसंती व्यक्त करून मुस्लीम लीगचे मावळते अध्यक्ष सर अली इमाम यांच्याशी बोलणी केली. त्या दोघांच्या वाटाघाटीत असे ठरले की, मुसलमानांनी प्रथम सर्वसाधारण मतदार संघातून निवडणुका लढवाव्यात आणि जर त्यात ठरलेल्या संख्येइतके मुसलमान निवडून येऊ शकले नाहीत तर स्वतंत्र मतदार संघातून त्यांना तितक्या जागी आपले उमेदवार निवडून पाठवता यावेत. या कराराबाबत सर अली इस्लाम यांच्यावर राजकारणी मुसलमानांनी कडाडून

टीका केली. परंतु ते आपल्या शब्दाला चिकटून राहिले. त्यांनी असे प्रतिपादन केले की, आपल्या न्याय्य जागांपैकी एक-दोन जागा गमवाव्या लागल्या तरी चालतील. परंतु तेवढ्यासाठी प्रादेशिक निवडणुकांपासून आपली कायमची फारकत करून घेणे आणि हिंदूंचा राग ओढवून घेणे खचितच योग्य ठरणार नाही. परंतु त्यांचे हे म्हणणे कोणाला पटले नाही आणि मुसलमान समाजात ते अलग पडले. साहजिकच मग सरकारला तरी सुधारणा संबंधीच्या आपल्या योजनेत फेरफार करण्याची काय जरूर पडली होती ?

अशा तऱ्हेने मवाळांची चांगलीच पीछेहाट झाली. १९०९ सालच्या काँग्रेस अधिवेशनात—(१) एका विशिष्ट धर्माच्या अनुयायांना देण्यात आलेले प्रमाणाबाहेर गैरवाजवी प्रतिनिधित्व, (२) मतदार संघ, मताधिकार आणि उमेदवारी संबंधीच्या शर्ती याबाबत मुसलमान आणि बिगर मुसलमान प्रजाजनात करण्यात आलेला अन्याय्य आणि अपमानकारक भेदाभेद, (३) कायदे मंडळासाठी उभे राहणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत घालण्यात आलेल्या मनमानी आणि गैरवाजवी शर्ती, (४) निवडणूक नियमांतून व्यक्त होणारा सुशिक्षित वर्गाबद्दलचा सर्वसाधारण अविश्वास आणि (५) प्रांतिक कायदे मंडळात बिगर—सरकारी प्रतिनिधींचे वरवर संख्याधिक्य आहे असे दिसले तरी प्रत्यक्षात ते प्रभावी बनू शकणार नाही अशारीतीने त्यांची रचना याबद्दल संपूर्ण असमाधान व्यक्त करण्यात आले. दुसऱ्या एका ठरावान्वये पंजाबला लागू करण्यात आलेल्या सुधारणा संबंधीच्या नियमांसंबंधीही नापसंती व्यक्त करण्यात आली होती कारण इतर प्रांतातील अल्पसंख्य मुसलमानांच्या बाबतीत जे तत्व लागू करण्यात आले होते ते पंजाबमधील बिगर मुसलमान अल्पसंख्यांकाच्या बाबतीत मात्र डावलण्यात आले होते. आणि त्यामुळे पंजाबमधील बिगर मुसलमानांना इंपीरियल कौन्सिलवर जवळजवळ प्रवेशच मिळणार नव्हता. अशा तऱ्हेचे ठराव पास झाल्यानंतरसुद्धा मवाळ पुढाऱ्यांनी स्वतंत्र मतदार संघांना मान्यता देऊन संकल्पित सुधारणांच्या योजनेला पाठिंबा दर्शविला.

मुसलमानातील वाढती फुटीरवादी प्रवृत्ती, स्वतंत्र मतदार संघ आणि विशेषाधिकारांसारख्या त्यांच्या मागण्यांना मिळत गेलेली मान्यता आणि मुस्लिम लीगची स्थापना याची प्रतिक्रिया प्रतिस्पर्धी जातीयवादाने निरनिराळ्या स्वरूपात आपले डोके वर काढण्यात झाली. मुसलमानांच्या सिमल्याला गेलेल्या शिष्टमंडळाच्या मागण्या मान्य झाल्यामुळे इतर अल्पसंख्य गटांकडूनही तशाच तऱ्हेच्या मागण्या पुढे येऊ लागल्या. उदा. काही शीख पुढाऱ्यांनी गव्हर्नर जनरलला एक निवेदन सादर करून स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. काही पारशी आणि ख्रिश्चन पुढाऱ्यांनीही त्याच मागणीचा सूर लावला. 'दि सदर्न मराठा जैन ग्रॅज्युएटस असोसिएशन'ने सादर केलेल्या निवेदनात प्रमुख अल्पसंख्य गटांचा खास प्रतिनिधित्वाचा हक्क मान्य करण्याची तरतूद केली होती यास्तव सुधारणांच्या मसुद्याला संपूर्ण पाठिंबा व्यक्त

केला होता या संघटनेने शेतकऱ्यांना खास प्रतिनिधित्व देण्यात यावे अशी मागणी आपल्या निवेदनात केली होती.

संयुक्त प्रांतातील मुसलमानांनी चालवलेले अल्पसंख्यांकाचे यशस्वी राजकारण आणि त्या प्रांतातील पुढाऱ्यांचा एकूण मुस्लिम राजकारणावर असलेला प्रचंड प्रभाव यामुळे आर्थिक क्षेत्रात वर्चस्व गाजविणाऱ्या पंजाबातील वरिष्ठ वर्गीय हिंदूंच्या अल्पसंख्य गटानेही तशीच भूमिका घेतली. १९०७ साली त्यांनी पंजाब हिंदू सभा या नावाची संघटना स्थापन करून सबंध हिंदू समाजाच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी झटण्याचे कार्य आपल्या अंगावर घेतले. या संघटनेचे संस्थापक लाला लालचंद यांनी काँग्रेसमधील हिंदू पुढाऱ्यांची हिंदू समाजाने 'स्वतःहून ओढवून घेतलेले दुर्दैव' अशा शब्दात निर्भत्सना केली. मुस्लिम धार्जिणेपणा आणि हिंदूचे स्वतंत्र अस्तित्व टिकवून धरण्यासाठी जशास तसे या वृत्तीचा अवलंब करण्यास काँग्रेस पुढारी देत असलेला नकार याबद्दल त्यांनी या पुढाऱ्यांना धारेवर धरले. संपत्ती आणि बुद्धिमत्ता याबाबतीत श्रेष्ठ असलेला पंजाबमधील उच्चवर्गीय हिंदू आणि संयुक्त प्रांतातील उच्चवर्गीय मुसलमान यात फरक असा होता की, आपापल्या प्रांतात ते दोन्ही गट अल्पसंख्य असले तरी संयुक्त प्रांतातील उच्चवर्णीय मुसलमानांनी त्या प्रांतात स्वतःसाठी महत्वाचे स्थान आणि अधिकार प्राप्त करून घेतले होते. त्याचप्रमाणे प्रांतिक आणि मध्यवर्ती कायदेमंडळात त्यांनी मुसलमानांसाठी जादा प्रतिनिधित्व मिळवून घेतले होते.

पंजाब हिंदू सभेची स्थापना १९०७ साली झाली असली तरी १९१५ पर्यंत तिचे रीतसर अधिवेशन भरत नसे. परंतु संयुक्त प्रांत आणि बंगालमधून पंजाबमधील या हिंदू पुढाऱ्यांच्या विचारसरणीला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांना आढळून आले. १९०९ साली लखनौ येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनानंतर तेज बहादूर सप्रू यांनी एका लेखात असे म्हटले होते की:

> "मुस्लीम लीगच्या अधिवेशनामुळे राजकीय प्रतिनिधित्वाच्या बाबतीत हिंदू-मुसलमानात तडजोड घडवून आणण्यासाठी वाटाघाटी करणे किती निरर्थक आहे ते पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे......आता तरी हिंदू स्वतःच्या कर्तव्याबद्दल भान ठेवतील आणि त्यांचा गतकाळ तसेच त्यांचे भवितव्य याबद्दल जाणीव ठेवून जागे होतील काय?"

ट्रिब्यूनच्या १९ मार्च १९०९ च्या अंकात एक पत्र प्रसिद्ध झाले होते. त्यात असे सुचविण्यात आले होते की, हिंदूंनी मुसलमानांपासून धडा घ्यावा. कोठल्याही आंदोलनात सहभागी न होता आपल्या समाजासाठी जास्तीतजास्त फायदे पदरात कसे पाडून घेता येतील यावर आपले सर्व लक्ष केंद्रित करावे. पंजाब मधील हिंदू पुढाऱ्यांनी सिमल्याला गेलेल्या मुसलमानांच्या शिष्टमंडळाच्या धर्तीवर जुलै १९०९ मध्ये व्हॉइसरॉयला एक खलिता सादर केला. त्यात हिंदूच्या राजनिष्ठेचा निर्वाळा

देऊन मुसलमानांच्या विशेषाधिकाराच्या मागणीला विरोध दर्शविण्यात आला होता आणि राजकीय सवलती देण्याच्या बाबतीत सरकारने पक्षपाती धोरण स्वीकारू नये अशी मागणी करण्यात आली होती. एकाद्या वर्गाला विशेष सवलती देण्यामुळे, बादशहांच्या प्रजाजनांत कटुतेची भावना निर्माण होईल आणि त्यामुळे प्रशासकीय अडचणी निर्माण होतील असे त्या खलित्यात नमूद करण्यात आले होते.

१९०८ पर्यंत अरविंद घोष हे जनतेला राष्ट्रवादाचा तत्त्वप्रणाली म्हणून स्वीकार करण्याचे आवाहन करीत असत. पण त्यांना देखील आता असे वाटू लागले की, राष्ट्रवादाला हिंदुत्वाचे अधिष्ठान मिळवून देण्यावाचून तरणोपाय उरलेला नाही. धर्मरक्षक संघापुढे केलेल्या भाषणात त्यांनी असे घोषित केले की;

'राष्ट्रवाद हे केवळ राजकारण नसून, राष्ट्रवाद म्हणजेच धर्म, तीच तत्वप्रणाली आणि तेच श्रद्धास्थान असले पाहिजे असे मी म्हणत असे आणि माझे ते मत आजही कायम आहे परंतु मी ते आता निराळ्या शब्दात व्यक्त करतो. राष्ट्रवाद म्हणजे धर्म, तत्वप्रणाली किंवा श्रद्धास्थान असे न म्हणता मी आता असे म्हणतो की, **सनातन धर्म** हाच आपला राष्ट्रवाद असू शकतो. सनातन धर्मातून आपल्या राष्ट्राचा जन्म झाला आणि सनातन धर्माच्या विकासावरच आपल्या राष्ट्रवादाचाही विकास अवलंबून आहे. सनातन धर्माचा ऱ्हास झाला तर आपले राष्ट्रही रसातळाला जाईल.'

काँग्रेसमधील जहाल विचारसरणीचा उदय आणि बंगाल व इतर काही भागातील दहशतवादी यांना देखील राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी जनमत संघटित करण्याकरिता हिंदू प्रतीके उपयोगी पडली. घटनात्मक मार्गाचा आग्रह धरणाऱ्या मवाळांच्या पदरी अपयश आल्यामुळे साहजिकपणे अशी प्रतिक्रिया झाली होती. जनतेमध्ये हिंदूच बहुसंख्य असल्यामुळे त्यांना संघटीत करण्यासाठी हिंदूंच्या इतिहासाचे स्मरण करून देणे किंवा हिंदूच्या धार्मिक प्रतिकांचा उपयोग करून घेणे साहजिक होते. साम्राज्यशाही विरोधासाठी जनतेला उद्युक्त करताना ब्रिटिशांच्या अगोदर मुसलमानांची सत्ता चालत असल्यामुळे मुसलमानी सत्ताधाऱ्यांचाही उल्लेख केला जाई. त्या काळच्या ऐतिहासिक वाङमयात मुसलमान साम्राज्याविरुद्ध हिंदुंनी केलेल्या संघर्षाची वर्णने असत. राणा प्रताप आणि शिवाजी ही राष्ट्रवाद्यांची आराध्य दैवते बनली आणि हिंदूंच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतिक म्हणून त्यांचा उल्लेख केला जाऊ लागला. अर्थात हिंदू प्रतीकांचा उपयोग करून घेणारे सर्वजण हिंदू जातीयवादी होते असे मात्र नव्हे. परंतु ब्रिटिशांनी आणि त्यांच्या अश्रफ पाठीराख्यांनी याच मुसलमानांच्या मनात हिंदूच्याबद्दल आकस निर्माण करून घेण्यासाठी आणि त्यांना चिथावून देण्यासाठी या प्रतीकांचा भरपूर उपयोग करून घेतला.

सुमारे पाव शतकभर आर्य समाज ही केवळ सामाजिक सुधारणांसाठी चळवळ करणारी संघटना होती. अनिष्ट सामाजिक रूढींविरूद्ध आर्य समाजातर्फे जोरदार

आंदोलन चालविले गेले होते. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात काही विधायक कार्यही चालत असे. परंतु विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून या संघटनेने लढाऊ स्वरूप धारण केले. आर्य समाजाच्या काही पुढाऱ्यांनी जहाल चळवळीत भाग घेतला आणि पंजाबात दमनचक्र सुरू झाल्यावर लजपतराय, अजितसिंग, मूळचंद इ. नेत्यांवर खटले भरण्यात येऊन त्यांना हद्दपार करण्यात आले. १९०७ पासून आर्य समाजातील एका गटाने शुद्धीकरणाची चळवळ सुरू केली. त्यासाठी 'शुद्धी सभा' किंवा 'आर्य प्रतिनिधी सभा' या नावाची संघटना स्थापन करण्यात आली. बाटून मुसलमान धर्मात गेलेल्या एक हजारावर रजपुतांना शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेण्यात आले. त्याच-प्रमाणे उत्तर हिंदुस्थानातील दलित समाजातील काही गटांना आर्य समाजात सामील करून घेण्यात आले. तोपर्यंत आर्य समाजाच्या चळवळीची मुसलमानांकडून दखल घेतली जात नसे. परंतु शुद्धीकरणाची चळवळ सुरू झाल्यावर मात्र मुसलमानांत त्याचे प्रतिध्वनी उमटल्याशिवाय राहिले नाहीत. आर्य समाजाच्या शुद्धीकरणाच्या मोहिमेला आवर कसा घालावयाचा त्याचा विचार करण्यासाठी पतियाळा येथे १९०८ साली मुसलमानी रजपुतांची एक परिषद भरविण्यात आली. या साऱ्या प्रकरणात उत्तर हिंदुस्थानात तीव्र स्वरूपाचे जातीय तणाव निर्माण झाले. आर्य समाजाचे ब्रिटिश सरकार बरोबर वितुष्ट होते, तर हिंदू महासभेची स्थापना करणारे उच्च वर्णीय हिंदू पुढारी एकदम राजनिष्ठ होते.

एकूण मुस्लिम राजकारणालाच निराळी कलाटणी मिळाली नसती तर हिंदू जातीयवाद झपाट्याने फोफावला असता. परंतु बंगालची फाळणी रद्द करण्याचा सरकारचा निर्णय आणि युद्धपूर्व काळातील आंतरराष्ट्रीय परिस्थिती यामुळे मुस्लीम राजकारणाला निराळी दिशा मिळत गेली. शिवाय सुशिक्षित तरुण मुसलमान ब्रिटिश सरकारशी लांगूल चालन करण्याचे धोरण पुढे चालू ठेवण्यास आता तयार नव्हते. त्यांच्यातील जिना सारख्यांचे विचार लीगपेक्षा काँग्रेसशी अधिक मिळतेजुळते होते आणि त्यांनी स्वतंत्र मतदार संघाविरुद्ध उघडपणे मतप्रदर्शन केले.

मुस्लीम लीगवर वर्चस्व गाजवणाऱ्या अश्रफ पुढाऱ्यांच्याही आवाक्यात परिस्थिती राहिली नाही. तुर्कस्तान आणि युरोपातील अन्य देश यांच्या संबंधात आलेला बिघाड याचाही भारतीय मुसलमानांवर फार मोठा परिणाम घडून आला. खलिफाचे पाठिराखे धर्माच्या आणि राजकारणाच्या नावाने जे आवाहने करीत त्यामुळे शिक्षित तरुण प्रभावित होऊन जात. सिमला शिष्टमंडळातील राजाहूनही राजनिष्ठ पुढाऱ्यांना देखील याची दखल घेऊन तरुण पिढी आपल्या हाताबाहेर जाईल अशी धास्ती व्यक्त करावी लागली. १९०८ साली अलिगडच्या एम. ए. ओ. कॉलेजच्या विश्वस्तांनी व्हाइसरॉय मिंटो यांच्याकडे जादा आर्थिक मदतीची मागणी करून या पैशाचा विनि-योग सबंध देशातील मुसलमान तरुणांच्या मनात राजनिष्ठेची भावना रुजविण्यासाठी केला जाईल असे आश्वासन दिले. १९०९ च्या फेब्रुवारी महिन्यात एम. ए. ओ.

कॉलेजचे विश्वस्त आणि त्या कॉलेजचे इंग्रज प्राचार्य यांच्यात वाद उदभवल. हा वाद मिटविण्यासाठी प्रांताच्या गव्हर्नरांनी दोघांनाही लखनौला बोलावले. परंतु निकाल मात्र प्राचार्यांच्या बाजूने दिला. सर्व देशभर त्या निकालाबद्दल निषेध व्यक्त करण्यात आला. शेवटी मुसलमानांचे एक शिष्टमंडळ भेटून त्याने विनंती केल्यावरून गव्हर्नरचा हुकूम मागे घेण्यात आल्याचा देखावा करण्यात आला. परंतु यामुळे, अलिगडचे विद्यार्थी इतके प्रक्षुब्ध झाले की, अधिकाऱ्यांचे धाबे दणाणून गेले. आगाखान यांच्या गव्हर्नरांबरोबर अनेक बैठकी होऊन शेवटी मुस्लीम लीगची मुख्य कचेरी अलीगडहून लखनौला हलविण्याचे ठरले. त्यामुळे ती सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष नजरेखाली राहील अशी त्यामागील कल्पना होती. गव्हर्नर हेवेट यांनी ३ फेब्रुवारी १९१० रोजी मिंटो यांना लिहिलेल्या पत्रात बेजबाबदार तरुणांचा प्रबळ गट मुस्लीम लीगवर वर्चस्व गाजवू लागेल इतकेच नव्हे तर पुढारलेल्या हिंदू पुढाऱ्यांशी हात मिळवणी करील अशी धास्ती व्यक्त केली होती.

१९११ साली रशियाने पर्शियावर केलेले अतिक्रमण आणि इटालीचा त्रिपोलीवरील हल्ला यामुळे येथील शिक्षित मुसलमान आणखीच प्रक्षुब्ध झाले. १९१२ च्या मार्चमध्ये भरलेल्या लीगच्या अधिवेशनात अनेक वक्त्यांनी ब्रिटिश सरकारला असा इशारा दिला की, ब्रिटिश साम्राज्यातील बहुसंख्य मुसलमानांच्या भावनांचा आदर करणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. रशियाला पाठिंबा दिल्याबद्दल ब्रिटनचा एका ठरावाने निषेध करण्यात आला. भारतीय मुसलमान हे रक्तसंबंध, धर्म आणि समान संस्कृती यांच्या धाग्यांनी पर्शियाबरोबर बांधले गेले आहेत आणि पर्शियाचा पाडाव झाला तर त्याचे फार गंभीर परिणाम होतील असा दुसऱ्या एका ठरावाने ब्रिटिश सरकारला इशारा देण्यात आला. इटालीने त्रिपोलीवर केलेल्या हल्ल्याचा निषेध करणारा आणि तुर्कस्थानचे त्या भागातील सार्वभौमत्व मान्य करण्यात यावे अशी मागणी करणारा ठरावही अधिवेशनात संमत करण्यात आला. गोखले यांच्या प्राथमिक शिक्षणासंबंधीच्या बिलाला पाठिंबा देणारा ठराव अधिवेशनात मांडण्यात आला हे प्रतिनिधींच्या मनोवृत्तीत घडून आलेल्या बदलाचेच द्योतक होते. इस्लामला शिक्षण क्षेत्रात देखील सक्ती मान्य नाही या सबबीवर महंमद शफी वगैरेंनी ठरावाला विरोध केला. मझरुल हक आणि मौलाना आझाद यांनी विरोधकांचे म्हणणे खोडून काढले. मौलाना आझाद यांनी तर असा आरोप केला की, ब्रिटिश सत्ताधाऱ्यांवरील आपली निष्ठा व्यक्त करण्यासाठीच सरकारी पदव्या धारण करीत असलेले लोक गोखले यांच्या बिलाला विरोध करीत आहेत. शेवटी प्रचंड बहुमताने तो ठराव पास झाला. १९१२ च्या डिसेंबर महिन्यात लीगच्या कौन्सिलची बैठक भरली होती. त्या बैठकीत लीगच्या ध्येयधोरणात बदल सुचविणारा ठराव पास झाला. घटनेत ब्रिटिश राजसत्तेशी एकनिष्ठ राहण्याचा आणि मुसलमानांच्या राजकीय आणि अन्य हितसंबंधांचे संवर्धन करण्याचा जो भाग होता त्याच्या जोडीला इतर जातीजमातींशी

मैत्रीचे संबंध ठेवावेत आणि त्यांच्याशी ऐक्य घडवून आणून भारताला सोयिस्कर ठरेल अशा तऱ्हेचे स्वायत्त सरकार स्थापन करण्याचे कामी त्यांचे सहकार्य घ्यावे अशा आशयाची पुस्ती जोडण्यात आली. या ठरावामुळे मुस्लीम लीग इतके दिवस जी सर्वस्वी उच्च वर्णीय अश्रफांच्या हातात होती ती आता तशी राहिलेली नाही हे स्पष्ट झाले. लीगच्या ध्येय धोरणातील या बदलाला विकारुल मुल्क यांनी जोराचा विरोध केला. परंतु जीना आणि इतर प्रतिनिधींनी लीगच्या या संस्थापक सभासदाचे म्हणणे धुडकावून लावले. आगाखान हे मुस्लीम लीगचे कायमचे अध्यक्ष असत. त्यांनी आपल्या त्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर जवळजवळ दहा वर्षेपर्यंत मुस्लीम लीगचे धोरण काँग्रेस बरोबर सहकार्य करण्याचे आणि सरकारला विरोध करण्याचे राहिले. काँग्रेस जोपर्यंत स्वायत्त सरकारची भाषा सोडीत नाही तोपर्यंत मुस्लीम लीगला काँग्रेस बरोबर कसलाही संबंध ठेवता येणार नाही अशी अवघ्या चार वर्षापूर्वीची मुस्लीम लीगची भूमिका होती हे या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे.

पहिल्या प्रथमच मुस्लीम लीगच्या अधिवेशनासाठी अनेक काँग्रेस पुढाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले. सरोजनी नायडू यांना अधिवेशनात भाषण करण्याची विनंती करण्यात आली आणि त्यांच्या भाषणानंतर नबी उल्ला यांच्या आवाहनानुसार साऱ्या श्रोतृ-समुदायाने उभे राहून त्यांना उथ्थापन दिले. हिंदुस्थानात एक नवे वारे वाहू लागले होते.

जिना हे मुंबईतील एक यशस्वी बॅरिस्टर म्हणून ओळखले जात. आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरवात त्यांनी काँग्रेस मधून केली. त्यावेळी ते इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासदही होते. जिनांनी व्यक्तिगत भूमिकेवरून मुसलमानांच्या स्वतंत्र मतदार संघांना विरोध दर्शवणारा ठराव मांडावा याबद्दल लीगचे अध्यक्ष सैय्यद नबी उल्ला यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. स्वतंत्र मतदार संघातून निवडून गेल्या-नंतर कायदेमंडळात त्या मतदार संघाविरूद्ध ठराव मांडणे ही विसंगती आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. जीना आणि मझरूल हक हे १९१२ पासून मुस्लीम लीगच्या अधिवेशनांना हजर राहू लागले होते. जीना यांनी 'वक्फ व्हॅलिडेटींग ॲक्ट' कायदे-मंडळात मांडून तो पास करून घेतल्याबद्दल १९१३ साली भरलेल्या लीगच्या अधिवेशनात एका खास ठरावान्वये त्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्या विधेयकामुळे जीना हे सरंजामशाही अश्रफांचे तारणहार म्हणून ओळखले जाऊ लागले.

ब्रिटिश सरकारकडे बघण्याच्या मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांच्या दृष्टीकोनात ज्या कारणामुळे बदल घडून आला होता त्यामुळेच उलेमा पुन्हा प्रत्यक्ष राजकारणात भाग घेण्यास प्रवृत्त झाले. त्यांनीच प्रथम पर्शिया आणि तुर्कस्तानच्या प्रश्नाबाबत ओरड सुरू केली आणि खलिफा सुलतान अबदूल हमीद याची बाजू ते उघडपणे घेऊ लागले आणि बृहद् इस्लामवादी विचारसरणीचे ते प्रचारक बनले. लवकरच ती चळवळ सुशिक्षित मुसलमानात पसरली. तुर्कस्तानसाठी अलीगडच्या

'राजनिष्ठ' विद्यार्थ्यांनी निधी जमा केला. ख्रिश्चनसत्तांच्या विजयामुळे मुसलमानांच्या पवित्र स्थानांच्या भवितव्यासंबंधी चिंतेचे वातावरण पसरले. शुक्रवारच्या नमाजाच्या वेळी मशिदीतून खलीफासाठी प्रार्थना केल्या जाऊ लागल्या. भारताच्या या टोका-पासून त्या टोकापर्यंत सर्व ठिकाणच्या मुसलमानात प्रचंड खळबळ माजली.

१९१२–१३ साली घडलेल्या कानपूर मशीद प्रकरणाने मुसलमान समाजावर आपला किती प्रभाव आहे ते दाखवून देण्याची उलेमांना चांगली संधी मिळाली. कानपूरमधील एक रस्ता रुंद करताना तेथे असलेल्या मशिदीतील हातपाय धुण्याची जागा पाडून टाकण्याचे सरकारने ठरवले. स्थानिक उलेमांनी ताबडतोब त्यावर आक्षेप घेऊन मशिदीचा प्रत्येक भाग हा सारखाच पवित्र असल्याने आम्ही तो पाडू देणार नाही अशी भूमिका घेऊन त्याविरुद्ध चळवळ सुरू केली. त्या चळवळीचा जोर इतका वाढला की, कानपूरमधील ती मशीद म्हणजे एक तीर्थस्थानच बनले आणि हिंदुस्तानच्या कानाकोपऱ्यातून निरनिराळ्या विचारांचे मुस्लीम पुढारी तेथे येऊन मशिदीतील पाण्याच्या हौदाला हात लावू देणार नाही अशी भाषणे ठोकू लागले. १ जुलै रोजी सरकारने तो पाण्याचा हौद पाडून टाकला. त्यानंतर एक महिन्याने भरलेल्या निषेध सभेचे रूपांतर काळ्या निशाणांच्या मिरवणुकीत झाले. मशिदीकडे निघालेल्या त्या मिरवणुकीतील लोकांची पोलीसांशी झटापट होऊन पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १८ जण ठार व २७ जण जखमी झाले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारामुळे सबंध देशात संतापाची लाट उसळली व ते प्रकरण चिघळ-ण्याची चिन्हे दिसू लागली. अनेक शिष्टमंडळे व्हॉइसरॉयला भेटली. शेवटी त्यांनी पूर्वीचा हुकूम मागे घेतल्याचे जाहीर केले. १०५ कैद्यांची मुक्तता केली आणि पाडून टाकलेला हौद पुन्हा बांधून दिला.

मौलाना आझाद आणि महंमद अली यांनी तुर्कस्तानच्या बाजूने जोराची प्रचार मोहीम सुरू केली असली तरी ग्रेट ब्रिटनवर मात्र ते बेताबेतानेच टीका करीत असत. युद्ध सुरू झाल्यामुळे सारे राजकीय पुढारी स्तिमित होऊन गेले होते. महंमद अली आणि हकीम अजमल खान यांनी युद्ध प्रयत्नांना सर्वतोपरी पाठिंबा दर्शविला. परंतु उलेमांनी मात्र तुर्कस्तानची बाजू मोठ्या जोराने उचलून धरली आणि आपल्या प्रचार मोहिमेत ते अधिकाधिक तीव्रपणे ब्रिटिशविरोधी भूमिका घेऊ लागले. महंमद अल्ली यांचे 'कॉमरेड' आणि मौलाना आझादांचे 'अल हिलाल' या पत्रांनीही आपली पहिली भूमिका बदलली. ती आता ब्रिटिशविरोधी प्रचाराची मुखपत्रे बनली. अबदुल हमीद हा जगातील सर्व मुसलमानांचा खलिफा असून त्याचे साम्राज्य काय वाटेल ते करून टिकवले पाहिजे, सर्व जगात विखुरलेल्या मुसलमानांचे सांस्कृतिक ऐक्य टिकविण्यासाठी खिलाफतीची अत्यंत आवश्यकता आहे असे ते प्रतिपादन करू लागले. खलिफाच्या आज्ञा पाळणे हे मुसलमानांचे कर्तव्य आहे असे पटवून देण्यासाठी अनेक तऱ्हेचे धार्मिक युक्तिवाद करण्यात येवू लागले. ब्रिटिश सरकारने आझाद आणि

महंमद अली यांची मुस्कटदाबी केली इतकेच नव्हे तर काही मुल्लांना वश करून घेऊन तुर्कस्तान बरोबरच्या युद्धामुळे इस्लामच्या हितसंबंधांना कसलीही बाधा पोहोचत नाही अशा आशयाचे फतवे त्यांच्याकडून काढवून घेतले. आगाखान यांनी मुसलमानांनी कोठल्याही चळवळीपासून अलिप्त राहावे आणि सरकारवरील आपल्या निष्ठेला चिकटून राहावे असे आवाहन करणारी पत्रके प्रसिद्ध केली. अब्दुल हमीद हा हिंदी मुसलमानांचा खलिफाच नव्हे असे प्रतिपादन करणारे सर सय्यद यांचे जुने लेख मुद्दाम पुनर्मुद्रित करून प्रसृत करण्यात आले. स्वतः व्हॉइसरॉय साहेबांनी आजारी आणि जखमी झालेल्या तुर्की सैनिकांसाठी निधी जमविण्याच्या कामी पुढाकार घेतला. त्याचप्रमाणे मुसलमानांना त्यांनी आश्वासन दिले की, युद्ध समाप्तीनंतर तुर्कस्तानला निर्दयपणे शिक्षा दिली जाणार नाही. तुर्कस्तानच्या अमलाखाली असलेल्या अरबांच्या प्रश्नाला भरपूर प्रसिद्धी देण्यात आणि त्यांची स्वायत्ततेची मागणी उचलून धरण्यात आली. यासर्व उपायामुळे भारतीय मुसलमानांच्या मनातील या प्रश्नावरील असंतोष ओसरू लागला.

तथापि यावेळपर्यंत मुसलमानांत ब्रिटिश विरोधाची भावना खूप खोलवर रुजली होती. आणि काही जणांनी तर आपण आता सरकार धार्जिणेपणा सोडून काँग्रेसमध्ये सामील व्हावे अशी भूमिका मांडली. महंमद अली यांनी एक परखड लेख लिहून या भूमिकेला कडाडून विरोध केला :—

अनेक शतके हिंदुस्तानवर मुसलमानांची सत्ता चालत होती. त्यामुळे बदलत्या राजकीय परिस्थितीशी जमवून घेणे हा हिंदूंचा स्थायीभाव बनला आहे. साहजिकच ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्याबरोबर नव्याने उपलब्ध झालेले पाश्चात्य शिक्षण आणि भौतिक विकास यांचा फायदा उठविण्याची त्यांनी तत्परता दाखवली. हिंदू समाज मुसलमानांप्रमाणे वांशिक अभिमान किंवा सामर्थ्यशाली साम्राज्याच्या परंपरा यांच्या जोखडात अडकलेला नव्हता. पाश्चात्य वाङ्मयामुळे राजकीय स्वातंत्र्य आणि लोकशाही यांसारख्या कल्पना ते चटकन आत्मसात करू शकले आणि स्वायत्त सरकार आणि सुसंघटित राष्ट्रीय जीवन यांची स्वप्ने ते रंगवू लागले आणि ते स्तुत्यच होते. या नव्या विचारांना पोषक असे त्यांच्या गतेतिहासात काही नव्हते. परंतु त्यांच्या आशा-आकांक्षा उंचावल्या होत्या. इतिहासापासून स्फूर्ती घेण्यासारखे हिंदूंपाशी काही नव्हते याला निर्विवादपणे मुसलमानच कारणीभूत आहेत कारण त्यांनीच भारतावर आक्रमणे करून त्यांची राजकीय अस्मिता नष्ट करून टाकली होती. जे होऊन गेले ते स्वीकारण्याऐवजी ते आता इतिहासाशीच वाद करू पाहात आहेत. यामुळे सुशिक्षित हिंदू लोक, या देशात ७ कोटी मुसलमान राहात असून आणि हा देश हेच आपले निवासस्थान आहे असे ते मानीत असूनही येथील मुसलमानांच्या अस्तित्वाकडेच हिंदूंनी डोळेझाक चालविली आहे. धार्मिक प्रेरणा कोणतीही मिळो सुशिक्षित हिंदू लोक राजकीय एकतेसाठी मात्र हिंदुत्ववादाचा उपयोग करून घेत आहेत.

उदारमतवादामुळे सुरुवातीला सुशिक्षित हिंदूंना सामजिक सुधारणांची प्रेरणा मिळाली. त्या दिशेने वाटचालही सुरू झाली. परंतु स्वायत्त सरकारच्या नव्या आकांक्षेमुळे हा मार्गच त्यांनी सोडून दिला. प्राचीन इतिहासातून नवी राजकीय प्रमेये शोधून काढण्याच्या खटाटोपामधून राष्ट्रीयत्व आणि देशभक्ती यांची हिंदू धर्माशी सांगड घालण्यात आली. स्वराज्याच्या घोषणा करीत हा जातीयवादी हिंदू देशभक्त पुढे सरसावला...

या उलट मुसलमान जातीयवादी देशभक्ताचे मूळ अगदी निराळ्या परिस्थितीत सापडते. बौद्धिक आणि भौतिक विकासाची संधी उपलब्ध असताना देखील फार काळपर्यंत मुसलमान समाज त्यापासून विन्मुख राहिला आणि ज्यावेळी काळाची पावले ओळखून त्याला सामोरे जाण्यास मुसलमान समाजाने वाटचाल सुरू केली तेव्हा त्याची गाठ आपल्यापेक्षा संख्याबलाने, आर्थिक संपन्नतेने, शैक्षणिक प्रगतीचे बाबतीत तसेच राजकीय संघटनेत आणि सामर्थ्याने खूपच वरचढ असलेल्या हिंदू समाजाशी पडली. हिंदूंचा वर्धिष्णू हिंदुत्ववाद, स्वातंत्र्याची त्यांची स्वप्ने आणि लोकशाहीची आवरणे घातलेले पण जुन्याच देवदेवतात रंगून गेलेले भोवतालचे हिंदू पाहून भूतकाळाच्या मगरमिठीतून सुटका करून घेत असलेले सनातनी मुसलमान भांबावून गेले. लढाईचा सारा रागरंग बदलून गेला आहे, जुनी हत्यारे जाऊन नवी हत्यारे आली आहेत आणि ती वापरण्याचे तंत्रही बदलले आहे याची त्याला जाणीव झाली... मुसलमान समाज हा संख्येने लहान, अज्ञानी आणि दरिद्री आहे. हिंदू देशभक्तांच्या दृष्टीने तर तो नगण्य होता. धर्म आणि इतिहास यातून त्याचे जे व्यक्तिमत्व साकार झाले होते ते सोडून द्यावयाला तो तयार नव्हता. त्यामुळे आत्मकेंद्री बनून त्याने स्वतःला आपल्या कोशात गुरफटून घेतले आणि जातीयवादी देशभक्तीच्या कल्पना तो कुरवाळत बसू लागला........ इतिहासकालीन जुन्या जमान्यात मुसलमानांनी हिंदूवर जे राजकीय वर्चस्व गाजवले त्याबद्दल हिंदूंच्या मनात संतापाची भावना निर्माण झालेली आहे. मुसलमानदेखील एकाकाळचे आपल्या साम्राज्य, आपली सत्ता आणि प्रतिष्ठा याबद्दलच्या प्रबळ भावनांच्या विळख्यातून बाहेर पडू शकले नाहीत. या दोन्ही प्रकारच्या भावना व पूर्वग्रह मूर्खपणाचे असले तरी ते एक विदारक सत्य आहे. या पूर्वग्रहांचा दैनंदिन व्यवहार्य राजकारणावर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. एका बाजूने जातीयवादी देशभक्तांचा स्वभाव आक्रमक आणि भांडखोर बनत गेला तर दुसऱ्या बाजूने दुसऱ्यांविषयी ते संशयी आणि चिडखोर बनत गेले. हिंदू मुसलमानांची उपेक्षा करतात तर त्याच्या उलट 'राष्ट्रवादी' हिंदू एक-जात सगळे कपटी आहेत आणि ते व्यक्त करीत असलेल्या आशाआकांक्षा हा एक सापळा आहे असे मुसलमान धरून चालतात.....या प्रश्नाची सोडवणूक करून घ्यावयाची असेल तर सर्वप्रथम या समस्येचे अस्तित्व आणि तिचे गांभीर्य मान्य केले पाहिजे. हिंदू आणि मुसलमान हे विचाराच्या आणि भावनेच्या दृष्टीने

अगदी स्वतंत्र जगात वावरत आहेत हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदू 'देशभक्त' हा कधीकधी असहिष्णू आणि आक्रमक बनतो, नव्या हिंदुस्तानची उभारणी करताना हा देश हे हिंदू देवदेवतांचे आधुनिक मंदिर बनावे अशी आकांक्षा तो बाळगून असतो तर मुसलमान हा कूपमंडुक वृत्तीने आपल्या जमाती पुरताच विचार करतो, स्वायतता किंवा राष्ट्रीयत्व यांसारख्या महान धर्मनिरपेक्ष उद्दिष्टांबद्दल उत्साह बाळगणे याचा नेमका अर्थ काय याची त्याला फारशी जाणीव असत नाही आणि आपल्या गतवैभवाबद्दल खंत करीत एका भ्रामक जगात तो वावरत असतो. ही सर्व परिस्थिती ध्यानात घेतली तरच हिंदू मुसलमानातील समझोत्याच्या दृष्टीने काही प्रगती होऊ शकेल. आपला समाज अगदी निर्दोष आहे असे समजणारा मुसलमान हा एकतर भोळसट किंवा पक्का राजकारणी आणि आतल्या गाठीचा तरी असला पाहिजे. हिंदूंच्या बाबतीतही काहीसे असेच म्हणता येईल. या दोन जमातींची सध्याची धारणा विचारात घेता संयुक्त मतदार संघाचा आग्रह धरला तर त्यामुळे मुसलमान बिचकून जातील आणि हिंदूच्या हेतूविषयी त्यांच्या मनात संशय निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही........तातडीच्या आणि व्यावहारिक प्रश्नावर हिंदू-मुसलमानांत मतभेद असल्यामुळे देशाच्या राजकीय सुधारणांच्या टप्प्यात जातीय प्रतिनिधीत्वाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. गायीच्या प्रश्नावरून देशात अनेक जातीय दंगली घडल्या आहेत आणि वृत्तपत्रांतूनही प्रक्षोभक प्रचारमोहिमा उघडण्यात आल्या आहेत. मुसलमानांनी गोमांस खाण्याचे सोडून दिले तर केवळ तेवढ्याने हिंदू मुसलमानांत एका क्षणात सदिच्छेचे आणि आपलेपणाचे वातावरण निर्माण होईल असे अनेक सत्प्रवृत्त लोक समजतात.....परंतु बिगरहिंदु हा गायीकडे केवळ एक चतुष्पाद प्राणी म्हणून बघतो. तो गायीला त्याहून अधिक महत्त्व देत नाही हे अनेकदा लक्षातच घेतले जात नाही........हिंदुस्तानच्या राष्ट्रीयत्वाचा विकास घडवून आणण्यासाठी कटिबद्ध असलेल्या कोणाही खऱ्या देशभक्ताने प्रथम मुसलमानांचे विशिष्ट जातीय व्यक्तिमत्व निःसंकोचपणे मान्य केले पाहिजे. आणि त्याच आधारावर विधायक कार्य केले पाहिजे.'

चार वर्षानंतर लखनौ करारावर सह्या करणारे पुढारी सर्वसाधारणपणे वरील भूमिकेनुसारच वागत होते. मुसलमान पुढारी १९१३ पासून काँग्रेसच्या अधिवेशनांना हजर राहू लागले होते त्याचप्रमाणे काँग्रेस पुढारीही लीग अधिवेशनात आपली हजेरी लावू लागले. महंमद अली आणि एम ए. जीना यांनी स्वतंत्र मतदार संघांना विरोध दर्शविणारे ठराव अधिवेशनात मुद्दाम पास करून घेण्यापासून काँग्रेसला परावृत्त करण्यात यश मिळविले. तथापि स्वतंत्र मतदार संघाची व्याप्ती नगरपालिका आणि लोकल बोर्डापर्यंत वाढविण्याची मागणी करणारे ठराव करण्यापासून मात्र ते मुसलमान नेत्यांना परावृत्त करू शकले नाहीत.

मुस्लीम लीग आणि काँग्रेसचे नेते जरी एकमेकांच्या जवळ येत चालले होते तरी सर्वसामान्य जनतेच्या पातळीवर मात्र जातीय परिस्थिती हळूहळू बिघडत चालली होती. सनातनी हिंदूंनीही गोवध आणि सवाद्य मिरवणुकीसारखे प्रश्न उकरून काढले. १९१२ च्या नोव्हेंबरात संयुक्त प्रांतात फार मोठे जातीय दंगे घडून आले. परिस्थिती काबूत आणण्यासाठी लष्कर बोलवावे लागले. दंगली आणि गोळीबार मिळून एकूण पाच जण ठार आणि ४५ जण जखमी झाले. त्यानंतर काही महिन्यांनी नेलोर येथे एका मशीदीपुढील मिरवणुकीवर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन जण मरण पावले. त्याच्या मागोमाग उत्तर हिंदुस्तानात जातीय दंगलींची एक लाटच उसळली. त्यावेळी पोलीसांनी केलेल्या गोळीबारात तीन जण मरण पावले आणि ५३ जखमी झाले. दोन्ही जमातीतील पक्षांध लोक आपले म्हणणे देखील विचारात घेतले पाहिजे हे दाखवून देण्याच्या खटाटोपात होते. जसजसे दिवस जात होते तसतशी परिस्थिती पुढाऱ्यांच्या आवाक्याबाहेर जात चालली होती. १९१७ मध्ये गायीच्या कत्तलीच्या प्रश्नावरून बिहारात उसळलेल्या दंगली पंधरवडाभर चालू होत्या. या दंगलीत सशस्त्र लोकांचे अनेक जमाव खेड्यामागून खेडी जाळीत सुटले होते. या दंगलीचे प्रतिध्वनी मुस्लीम लीगच्या कलकत्ता अधिवेशनात उमटल्यावाचून राहिले नाहीत. बिहारमधील घटनांना जबाबदार असलेले हिंदू पुढारी मूग गिळून बसले याबद्दल अनेक वक्त्यांनी त्यांचा धिक्कार केला आणि अशा घटनांमुळे जातीय ऐक्य आणि घटनात्मक प्रगती साधण्याच्या कामात बाधा येईल असा इशारा दिला.

या घटनेनंतर दोन वर्षांनी मोपल्यांचे बंड उद्भवले. त्यांनी अनेक लोकांचे खून पाडले आणि बाजूला पडलेल्या एका खेड्यावर आपला कब्जा बसवला. दंगलखोरांना जरब बसेल अशा निर्घृणतेने लष्कराने ते बंड झपाट्याने मोडून काढले.

जातीय परिस्थिती अशा तऱ्हेने बिघडत चालली असली तरी राजकीय परिस्थिती-मुळे काँग्रेसच्या आणि मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांना एकमेकांच्या निकट येणे अपरिहार्य होवून बसले होते. काँग्रेसमधील मवाळ नेतृत्वाने स्वतंत्र मतदार संघाच्या प्रश्नावर फार भर न देण्याविषयी सर्वसामान्य काँग्रेसजनांचे मन वळविले आणि त्यामुळेच १९१६ साली लखनौ करार होऊ शकला.

प्रकरण सातवे

# लखनौ करार आणि खिलाफत चळवळ

१९१३ सालच्या मार्च महिन्यात भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनानंतर काँग्रेसबरोबरचे सहकार्य आणि सरकारधार्जिणे धोरण या प्रश्नावर लीगमध्ये तीव्र मतभेद माजले. राजनिष्ठ अश्रफांची तक्रार होती की, 'भडक डोक्याच्या' तरुणांनी लीगवर कबजा मिळविला असून त्यामुळे 'लीगच्या अनेक जबाबदार पुढाऱ्यांना लीगच्या कार्यातून मुकाट्याने अंग काढून घ्यावे लागले आहे.' लीगमधील या मतभेदाने इतके गंभीर स्वरूप धारण केले की, १९१३ सालच्या अधिवेशनानंतर दोन-अडीच वर्षे लीगचे अधिवेशनच होऊ शकले नाही. काँग्रेसचा दैनंदिन कारभार अद्यापही गोखले यांच्या नेतृत्वाखालील मवाळांच्याच हातात होता. वर दाखवून दिल्याप्रमाणे स्वतंत्र मतदार संघांना असलेला काँग्रेसचा विरोध मावळला होता आणि लीग बरोबर काँग्रेसचा समझोता घडवून आणण्याचे प्रयत्न चालू झाले होते. सहा वर्षांची शिक्षा भोगून टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर त्यांना काँग्रेसपासून दूर ठेवण्याच्या बाबतीत मवाळांना कसलीच अडचण पडली नाही. आपला राष्ट्रीय पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा त्यांनी पुढे केलेला हातही मवाळांनी झिडकारून टाकला. टिळकांच्या-वतीने अॅनी बेझंट यांनी मध्यस्ती करून पाहिली परंतु गोखले आपल्या भूमिकेवर ठाम होते. त्यांना अशी भीती वाटत होती की, टिळकांना काँग्रेसला पुन्हा बहिष्काराच्या मार्गावर न्यावयाचे आहे. पुढे १९१५ च्या अखेरीस टिळकांच्या राष्ट्रवादी गटाला काँग्रेस अधिवेशनात भाग घेण्याची मोकळीक मिळाली. त्याच साली गोखले निधन पावले आणि लीग बरोबर समेट घडवून आणण्याची जबाबदारी टिळकांवर येऊन पडली.

दरम्यान राजनिष्ठ अश्रफ आणि तथाकथित भडक डोक्याचे युवक यांच्यातील संघर्ष चालूच होता. १९१६ साली मुंबई येथे मुस्लीम लीगचे अधिवेशन भरविण्याच्या प्रश्नावरही फार मोठे वादंग माजले. त्याच वेळी काँग्रेसचे अधिवेशनही मुंबईत भरणार होते. तेव्हा काँग्रेसचे अधिवेशन भरत असताना तेथेच लीगचे अधिवेशन भरवायला नको या कारणास्तव मुंबईचेच सरदार सुलेमान हाजी कासीम मिठा, सी. आय. अे. यांनी अधिवेशन घेण्याला विरोध केला. त्यांनी आणि त्यांच्या पाठिराख्यांनी त्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आलेल्या मझरूल हक यांच्या नावाला त्यांनी मुसलमानांच्या स्वतंत्र मतदार संघांना विरोध केला होता या कारणास्तव आक्षेप

घेतला. मुसलमानांच्या राजनिष्ठेबद्दल निर्वाळा देणारा आणि सरकारवर संपूर्ण पाठिंबा व्यक्त करणारा ठराव स्वतः अधिवेशनात मांडण्याचे कबूल केल्यानंतर जरी त्यांच्या विरोधकांनी त्यांना अध्यक्षपद स्वीकारू दिले तरी त्यांनी अधिवेशनाचे कामकाज मात्र सुरळीतपणे पार पडू दिले नाही. त्यांच्या पाश्चात्य पोषाखाबद्दल काहींनी आरडाओरड केली तर ते दाढी वाढवीत नाहीत त्याअर्थी ते सच्चे मुसलमानच नाहीत आणि अशा काफीर मुसलमानावर विश्वास तरी कसा ठेवावा असा गिल्ला चालवला. मझरूल हक हे मुस्लीम लीगच्या ध्येय–धोरणालाच हरताळ फासीत आहेत, काँग्रेसशी संगनमत करून त्यांना मुस्लीम लीग काँग्रेसमध्ये विलीन करून टाकावयाची आहे असे आरोप कासीम मिठा यांनी त्यांच्यावर केले. अशिवेशनाचे कामकाज इंग्रजीतून चालल्याबद्दलही एका गटाने आरडाओरड सुरू केली आणि मग अधिवेशनात एकच गोंधळ उडाला. शेवटी त्या दिवसाचे कामकाज थांबवावे लागले. दुसऱ्या दिवशी अधिवेशन बंदिस्त जागी घेण्यात आले. काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांनी संयुक्तपणे सुधारणासंबंधीची योजना आखण्यासाठी त्याचवेळी भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात एक समिती नेमली होती त्या समितीबरोबर वाटाघाटी करण्यासाठी लीगने एक समिती नेमावी व त्या समितीत ७१ सभासद असावेत अशा आशयाचा ठराव जीनांनी अधिवेशनासमोर मांडला. तो ठराव रीतसरपणे पास झाला आणि पुढे लवकरच दोन पक्षातील प्रदीर्घ वाटाघाटींना सुरवात झाली. अर्थात या वाटाघाटीत बिब्बा घालण्यासाठी सरकारही तत्परतेने पुढे सरसावले.

१९१६ च्या ऑगस्ट महिन्यात बंगाल सरकारने शैक्षणिक क्षेत्रात मुसलमान समाजाला आणखी सवलती आणि विशेषाधिकार देण्यात येत असल्याची घोषणा केली. मुसलमान समाज हा शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणात मागे राहिला असल्यामुळे त्या प्रांताच्या राजकीय, व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रात त्यांची जी पीछेहाट झाली आहे ती भरून काढण्याची जबाबदारी सरकारने स्वतः घेतली आणि त्याप्रमाणे मुसलमानांना अनेक सवलती दिल्या. इतके सगळे करूनही बंगालमधील मुसलमान पुढाऱ्यांनी लखनौ करारान्वये प्रांतिक आणि मध्यवर्ती कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना जे प्रतिनिधित्व मिळाले असते त्यापेक्षा कमी स्वीकारण्याची तयारी दर्शविली. त्यावरून त्या काळी मुसलमानांची मनस्थिती कशी होती त्यावर चांगला प्रकाश पडतो.

तब्बल आठ महिन्यांच्या प्रदीर्घ वाटाघाटीनंतर दोन्ही संघटनांच्या शिष्टमंडळांनी सुधारणांसंबंधीचा संयुक्त आराखडा कायम केला. काँग्रेस आणि मुस्लीम लीगने डिसेंबर १९१६ त लखनौ येथे भरलेल्या आपापल्या अधिवेशनात स्वतंत्रपणे या लखनौ करारावर शिक्कामोर्तब करून घेतले. या योजनेचे दोन भाग पाडण्यात आले होते. काँग्रेसने मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत हे मान्य केले, त्याच-

प्रमाणे ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य असतील तेथे त्यांच्यासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कितीतरी अधिक जागा देऊ केल्या. पंजाब आणि बंगाल या थोडीशी मुस्लिम बहुसंख्या असलेल्या प्रांतात लोकनियुक्त प्रतिनिधींच्या अनुक्रमे ५० आणि ४० टक्के जागा त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात याव्यात असे ठरविण्यात आले. सर्वसाधारण जागांसाठी मुसलमान उमेदवारांनी उभे राहू नये परंतु जमीनदार, व्यापारी अशा खास हितसंबंधांच्या जागांसाठी मुसलमान उमेदवारांना उभे राहण्यास संमती देण्यात आली. इंपीरियल कौन्सिलवरील मुसलमानांचे प्रतिनिधित्व एकूण लोकनियुक्त सभासदांपैकी ३३ टक्के ठरवून देण्यात आले. प्रांतिक कायदेमंडळात मुसलमानांना ज्या प्रमाणात जागा असतील तितक्याच प्रमाणात मध्यवर्ती कायदेमंडळातही मिळाव्यात. म्हणजेच ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य असतील त्या प्रांतात प्रांतिक, आणि इंपीरियल कौन्सिलवरील जागांच्या बाबतही त्यांना विशेष सवलती दिल्या जाव्यात हे मान्य करण्यात आले आणि शेवटच्या कलमानुसार कौन्सिलमध्ये मांडण्यात आलेले एकादे विधेयक किंवा बिगर सरकारी सभासदाने मांडलेला ठराव, यांचे बाबतीत नकाराधिकार वापरण्याचा दोन्ही समाजांच्या सभासदांचा हक्क मान्य करण्यात आला.

राजकीय सुधारणांच्या बाबतीतही काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांचे एकमत झाले. करारातच त्यांचा तपशील समाविष्ट करण्यात आला. काँग्रेस आणि मुस्लिम लीगच्या संयुक्त मागणीला आधारभूत असाच तो आराखडा होता. मताधिकाराचा विस्तार प्रांतिक आणि इंपीरियल अशा प्रत्येक कायदेमंडळात एकूण जागांपैकी ८० टक्के जागा लोकप्रतिनिधींसाठी असाव्यात, प्रांतिक आणि मध्यवर्ती कार्यकारी मंडळावर बिगर सरकारी सभासदाची नेमणूक करताना ती त्या त्या कायदे मंडळावर निवडून आलेल्या सभासदांमधूनच करण्यात आली पाहिजे, इंपीरियल कौन्सिलवर सरकारी आणि बिनसरकारी सभासदांचे प्रमाण सारखे असले पाहिजे, मध्यवर्ती सरकारला कस्टम, टपाल आणि तार खाते, मीठ, अफू, रेल्वे, टांकसाळ, लष्कर इ. बाबीमधूनच फक्त महसूल गोळा करण्याचा अधिकार असावा या सर्वसाधारण स्वरूपाच्या मागण्या होत्या. त्याशिवाय न्याय आणि अंमलबजावणी खाती वेगवेगळी करण्यात यावीत, सैन्य दलातील कमिशन्ड आणि नॉन-कमिशन्ड जागांवर भारतीयांची नियुक्ती करण्याच्या बाबतीत कोणतेही निर्बन्ध असू नयेत, संपूर्ण प्रांतिक स्वायत्ता. केंद्रात द्विदल राज्यपद्धती असावी आणि भारत मंत्र्याचे लंडनमधील कौन्सिल बरखास्त करावे अशा मागण्याही या करारानुसार करण्यात आल्या होत्या.

या मागण्यांबाबत राज्यकर्त्यांवर दडपण आणण्यासाठी काँग्रेस आणि लीग यांचे एक संयुक्त शिष्टमंडळ इंग्लंडला रवाना झाले. या शिष्टमंडळात जीना, शास्त्री, सप्रू आणि वझीर हसन यांचा समावेश होता. शिष्टमंडळाने आपल्या मागण्या संबंधित अधिकाऱ्यांच्या पुढे मांडल्या. कदाचित त्यामुळेच भारत मंत्र्यांनी पुढच्याच

महिन्यात ब्रिटिशांच्या हिंदुस्थानविषयक धोरणासंबंधीचे एक महत्त्वपूर्ण निवेदन केले ते असे : 'राज्य कारभाराच्या प्रत्येक क्षेत्रात भारतीयांना अधिकाधिक प्रमाणात सहभागी करून घ्यावयाचे आणि ब्रिटिश साम्राज्याचा एक अविभाज्य घटक म्हणून हिंदुस्तानात क्रमाक्रमाने जबाबदार राज्यपद्धती स्थापन करण्याच्या उद्दिष्टाने स्वायत्त संस्थांचा हळूहळू विकास घडवून आणावयाचा हे बादशहांच्या सरकारचे धोरण असून भारत सरकार हे त्याला बांधलेले आहे आणि शक्य तेवढ्या लवकर या दिशेने भरीव पावले टाकण्याचेही ठरविण्यात आले आहे. कर्मधर्मसंयोगाने या घोषणेचा मसुदा कर्झननेच तयार केला होता. काळाने हा त्याच्यावर सूडच उगविला होता. ऑक्टोबर-मध्ये आणखी एका संयुक्त शिष्टमंडळाने व्हॉइसरॉयची भेट घेऊन काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांनी मिळून संयुक्तपणे जी योजना तयार केली आहे ती ताबडतोब अमलात आणली जावी अशी त्याच्याकडे मागणी केली.

सरकारी प्रवक्ते, सनातनी विचाराची राजकारणी मंडळी आणि अश्रफ हे वीस वर्षांहून अधिक काळपर्यंत टिळकांची निंदा-नालस्ती करीत आले होते. मुस्लीम द्वेष्टे, हिंदू पुनरुज्जीवनवादी आणि पुन्हा ब्राह्मणीसत्ता प्रस्थापित करू पहाणारे म्हणून ते टिळकांची संभावना करीत. जीना हे एकमेव मुसलमान नेते असे होते की, ज्यांनी टिळकांबद्दल सतत आदरभाव दाखवला आणि त्यांना स्तुतिसुमने वाहिली. १९१६ च्या नोव्हेंबर महिन्यात छिंदवाडा तुरुंगातून महमद अलींनी टिळकांना पत्र धाडले. त्यात लिहिले होते की, "तुमचे राजकीय आणि सामाजिक विचार जुनाट प्रवृत्तीचे आहेत आणि देशभक्ती संबंधीच्या तुमच्या कल्पनाही त्यातच घुटमळत राहतात या गैरसमजाने मला इतके दिवस ग्रासून टाकले होते हे मला कबूल केले पाहिजे. तुम्हाला हे मनमोकळेपणाने कळविण्याची मला आज निकड भासत आहे. माझा असा गैरसमज व्हावा याचा मला पूर्वीपासूनच पश्चाताप होत आला आहे आणि अगदी प्रत्यक्षपणे जरी नाही तरी मनाने मी आपली पूर्वीच क्षमा मागितली आहे." हे पत्र टिळकांपर्यंत पोचलेच नाही. कारण सरकारी सेन्सॉरने ते मध्येच अडकवून ठेवले. टिळकांची स्तुती-स्तवने गाणाऱ्या अनेक कविता हसरत मोहानी यांनी या काळात लिहिल्या. हिंदी राष्ट्रवादाबद्दल मुस्लीम लीगचा ग्रहही काहीसा सौम्य बनत चालला. १९१८ च्या ऑगस्टमध्ये भरलेल्या मुस्लीम लीगच्या खास अधिवेशनात स्वागताध्यक्ष फाजलभाई करीमभाई यांनी आपल्या भाषणातील बराचसा भाग हिंदी संस्कृती संमिश्र कशी आहे आणि तीत मुसलमानांनी कसा वाटा उचलला आहे ते दाखवून देण्यात खर्च केला होता. भारतातील फारच थोड्या मुसलमानांना आपण अस्सल मुसलमानांचे खरेखुरे वंशज असल्याचा दावा करता येईल, हिंदुस्थानातील बहुतेक सर्व मुसलमान हे या देशातील समान वंशांचेच नागरिक आहेत असेही त्यांनी आपल्या भाषणात प्रतिपादन केले.

लखनौ करारावर हिंदूच्या एका गटाकडून आणि बहुसंख्य उच्चवर्णीय अश्रफांकडून

लगेच टीका सुरू झाली. काँग्रेसच्या लखनौ अधिवेशनांत अशा टीकेचा समाचार घेताना टिळकांनी ठणकावून सांगितले की,

"आम्ही आमच्या मुसलमान बांधवांपुढे कमालीची शरणागती पत्करली आहे अशा आक्षेप काही लोकांकडून आमच्यावर घेतला जातो. परंतु स्वायत्त सरकारचे सर्व अधिकार फक्त मुसलमान समाजालाच बहाल करण्यात आले तरी आम्हाला त्याची क्षिती वाटणार नाही असे ज्यावेळी मी म्हणतो त्यावेळी सबंध हिंदुस्तानातील हिंदू समाजाच्या भावनाच मी व्यक्त करीत असतो याबद्दल मला तिळमात्र शंका नाही. आपले अधिकार बजावण्याच्या बाबतीत हिंदुस्थानातील सुशिक्षित वर्गापेक्षा अगदी कनिष्ठ वर्गच अधिक पात्र आहे असे सरकारला वाटत असेल आणि तेवढ्यासाठी त्यांनीं हिंदू समाजातील दलित वर्गाच्या हाती ते अधिकार सोपविले तरी त्याबद्दलही मी खंत बाळगणार नाही. फार काय भारतातील कोणत्याही गटाला सत्ता मिळाली तरी माझी ना नाही कारण त्यामुळे लढ्याचे स्वरूप आजच्यासारखे तिरंगी न राहता त्याची मर्यादा आपसातील भांडणापुरतीच असेल."

त्या काळात टिळकांच्या निकट असलेल्या रंगा अय्यरनी नंतर असे नमूद करून ठेवले आहे की, 'कराराविरूद्ध ते काहीही ऐकून घेण्यास तयार नसत. त्याचा अर्थ ते स्वतः त्या करारावर फार खूष होते असा नव्हे, परंतु त्यामुळे जर मुसलमानांचे समाधान होणार असेल, त्यांना काँग्रेसमध्ये आणता येणार असेल आणि बाह्य देशावरील निष्ठेऐवजी या देशाशी एकनिष्ठ राहून भारतीय राष्ट्रवादाचा जर ते अंगीकार करणार असतील तर असा करार करणे योग्यच होते असे त्यांना वाटत असे.'

राजनिष्ठ अश्रफांनी लखनौ कराराला विरोध करण्यासाठी अनेक कारणे पुढे केली. इतकेच नव्हे तर ज्या अधिवेशनात करारावर शिक्कामोर्तब करण्यात आले ते मुस्लीम लीगचे लखनौ अधिवेशन प्रातिनिधीक नव्हतेच असा पवित्रा त्यांनी घेतला. पुढच्या वर्षी भरलेल्या कलकत्ता अधिवेशनात लखनौ करारावर केल्या जाणाऱ्या टीकेचा समाचार घेताना अब्दुल लतीफ अहमद यांनी असे सांगितले की, मुस्लीम लीगने घातलेल्या अटी काँग्रेसने प्रथम मान्य केल्यानंतरच कराराचा तपशील ठरविण्यात आला. सर्व प्रांतांतील कायदेमंडळातून मुसलमान अल्पसंख्य राहणार आणि त्यांना हिंदूच्या कृपाकटाक्षावर विसंबून राहावे लागणार ही टीकाही कशी निराधार आणि अन्याय्य आहे ते त्यांनी दाखवून दिले. पंजाबमध्ये मुसलमानांचे निर्विवाद बहुमत राहील आणि बंगाल कौन्सिलमध्ये मुसलमान प्रतिनिधींची संख्या हिंदूंच्या एवढीच राहील. उरलेल्या जागा इतर जमाती किंवा निरनिराळे हितसंबंध यांच्याकडे जातील. त्यांच्या मते या करारामुळे मुसलमानांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यांच्या जमातीसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत आणि त्यांना लोकवस्तीच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधित्व मिळावे ही तत्त्वे मान्य झाली. त्यांनी आपल्या भाषणात असे दाखवून दिले की, ज्या प्रांतात मुसलमानांचे प्रतिनिधित्व अगदीच नगण्य राहिले असते त्या

प्रांतातही आता त्यांना महत्वाचे स्थान प्राप्त होणार असून त्यांना मिळणाऱ्या विविध सवलतींमुळे कोठल्याही महत्वाच्या प्रश्नावर, त्यांचे मत निर्णायक ठरणार आहे. त्याशिवाय हिंदुस्तानातील बिगर मुसलमानांपैकी मुख्य जमातींकडून भावी सरकारांत पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे हे तत्वही मान्य करून घेतले आहे. काँग्रेसने मुस्लीम लीग आपल्या ताब्यात घेण्याऐवजी उलट मुस्लीम लीगच्या सभासदांनीच काँग्रेसला खिशात टाकले आहे असा दावा करता येण्यासारखा आहे. लीग सारख्या एका नवीन संघटनेच्या दृष्टीने हा फार मोठा विजय असून मुस्लीम लीगने बजावलेल्या कामगिरीचे खरे मर्म मुसलमानांच्याच अद्याप लक्षात येत नाही ही मोठ्या दुःखाची बाब समजली पाहिजे. महमुदाबादच्या राजेसाहेबांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातही हेच मुद्दे मांडले.

परंतु आता ब्रिटिश सरकारच स्वतंत्र मतदार संघाबाबत आकांड तांडव करू लागले. १९१८ साली प्रसिद्ध झालेल्या माँटेग्यू चेल्म्सफर्ड रिपोर्टात स्पष्टपणे नमूद करण्यात आले की, समान नागरिकत्वाचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने जातीय मतदार संघ अत्यंत अडचणीचे ठरणार आहेत. त्याचप्रमाणे स्वायत्त राज्य-पद्धतीच्या मार्गातही त्यामुळे अडथळे निर्माण होणार आहेत, स्वतंत्र मतदार संघ इतिहासाच्या शिकवणुकीशी सर्वस्वी विसंगत आहेत......अल्पसंख्यांकांना खास प्रतिनिधित्व बहाल केले तर त्यामुळे ते आत्मतुष्ट बनतील आणि आधुनिक काळाला साजेसा स्पर्धात्मक दृष्टीकोन अंगिकारून इतरांच्या बरोबरीने पुढे येण्यासाठी प्रयत्नच करणार नाहीत. समाजाची धर्मपंथावर किंवा वर्गावर आधारित विभागणी करणे म्हणजे त्यांचे राजकीय गट बनवून त्यांना एकमेकांविरूद्ध संघटित करण्याप्सारखे होणार आहे. त्यांतून आपण सगळेजण या देशाचे नागरिक आहोत अशी भावना त्यांच्यात रुजू शकणार नाही.

माँटेग्यू चेल्म्सफर्ड रिपोर्ट म्हणजे ढोंगबाजीचा एक इरसाल नमुना होता. जाती-जमातीनुसार स्वतंत्र मतदार संघ स्थापन करण्यातील तोटे दाखवून देणाऱ्या त्या अहवालात पुढे केवळ मुसलमानांसाठीच नव्हे तर शिखांसाठीही असे स्वतंत्र मतदार संघ असावेत अशी शिफारस करण्यात आली होती. स्वतंत्र मतदार संघाप्रमाणेच त्या अहवालात जातीय नकाराधिकारावरही टीका करण्यात आली होती. असा नकाराधिकार देण्यात आला तर कोणते विधेयक एखाद्या जातीच्या हितसंबंधांना बाधक ठरणारे आहे हे ठरविता येणार नाही व त्यामुळे सर्वसाधारण स्वरूपाचे कोणतेही विधेयक पासच होऊ शकणार नाही अशी मल्लीनाथी करण्यात आली होती. अपेक्षेप्रमाणे काँग्रेस व मुस्लीम लीग यांनी संयुक्तपणे केलेली राजकीय मागणी धुडकावून लावण्यात आली. व स्थानिक स्वराज्य संस्थांचा संपूर्ण कारभार लोकप्रतिनिधींच्या हाती सोपविणे आणि प्रांतिक कारभारात द्विदल पद्धती सुरू करणे येवढ्या दोनच सवलती त्या अहवालानुसार दिल्या जाणार होत्या. बाकी भारत

सरकारच्या सर्वोच्च अधिकारांना यत्किंचित धक्का लावण्यात आला नव्हता. काँग्रेस-लीग संयुक्त निवेदनापैकी ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य असतील त्या प्रांतात त्यांना विशेष सवलती देण्यात याव्यात आणि पंजाब आणि बंगाल प्रांतात त्यांना अनुक्रमे पन्नास आणि चाळीस टक्के प्रतिनिधित्व मिळावे येवढी एकच शिफारस १९१९ च्या सुधारणा कायद्यात अंतर्भूत केली जाणार होती. मध्यवर्ती कायदेमंडळाला दिली गेलेली एकमेव सवलत म्हणजे लोकप्रतिनिधींना सरकारला प्रश्न विचारण्याचा आणि बिन सरकारी विधेयक सादर करण्याचा अधिकार. अर्थात असे एकादे बिन-सरकारी विधेयक आले तरी त्याला मान्यता द्यावयाची की नाही ते ठरविण्याचा अधिकार सरकारकडेच राखून ठेवण्यात आला होता. लखनौ करारामुळे भारतीय जनतेच्या मनात फार मोठ्या आशा निर्माण झाल्या होत्या. कारण हिंदू आणि मुसलमान यांनी संयुक्तपणे केलेली राजकीय मागणी ब्रिटिश सरकारला अवमानिता येणार नाही अशी सर्वसाधारण भावना होती. परंतु प्रत्यक्ष अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर जनतेच्या आशांचा चुराडा झाला. इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर असलेल्या जीना आणि इतर अठरा सभासदांनी एक विस्तृत पत्रक प्रसिद्ध करून माँटेग्यू चेल्म्सफर्ड सुधारणा अत्यंत निराशाजनक असल्याचे जाहीर केले.

काँग्रेसने आपल्या अमृतसरच्या अधिवेशनात अहवालातील शिफारशींबद्दल निराशा व्यक्त केली परंतु त्याचबरोबर त्या सुधारणा राबविण्याचा निर्णय घेतला. संपूर्ण जबाबदार सरकारची लवकर स्थापना करून घेण्यास त्यामुळे मदत होईल अशी त्यामागील भूमिका होती. संपूर्ण जबाबदारीचे सरकार स्थापन करण्याच्या मागणीला गती मिळावी या हेतूने टिळकांनी सुधारणा राबविण्यास अनुकूलता दर्शविली आणि काँग्रेस लोकशाही पक्ष या आपल्या संघटनेतर्फे निवडणूक लढविण्यासाठी एक जाहीर-नामा प्रसिद्ध केला. परंतु काँग्रेस किंवा टिळकांचा काँग्रेस लोकशाही पक्ष यापैकी कोणीच या सुधारणा राबवू शकले नाहीत. नियतीने निराळेच ताट वाढून ठेवले होते. सरकारने सुरू केलेली दडपशाही, पंजाबमधील अत्याचार, खिलाफत चळवळ आणि असहकार आंदोलन यांतच काँग्रेस आणि लीग हे दोनही पक्ष आकंठ बुडून गेले.

पहिल्या महायुद्धाच्या काळात अनेक भारतीय क्रांतीकारी देशाबाहेर गेले व तेथून त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. निरनिराळ्या देशात शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांनीही जर्मनांच्या मदतीने किंवा मदतीशिवायही स्वातंत्र्य मिळविण्यासाठी गुप्त संघटना उभारल्या. पंजाबमधील क्रांतीकारक कानडा-अमेरिकेत गेले व तेथे त्यांनी गदर पार्टीची स्थापना केली. देवबंद पंथाचे प्रमुख मौलाना महमूद हसन यांनी अफगाणिस्तान आणि इराण यांचे तुर्कस्तान बरोबर सूत जमवून द्यावयाचे आणि तुर्कस्तानचा लष्करी पाठिंबा मिळवून हिंदुस्थानवर इराण आणि अफगाणिस्तानातून स्वारी करावयाची अशी एक योजना आखली. १९ व्या शतकात झालेल्या धर्मयुद्धातील नेत्यांच्या वंशजांशीही संपर्क साधण्यात आला. त्यानंतर महमूद हसन यांनी भारतात आणि

भारताबाहेर अफगाणिस्तानसारख्या देशात गुप्त संघटना उभारण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपला एक विद्यार्थी उबेदुल्ला सिंधी याची देवबंदच्या माजी विद्यार्थ्यांच्या जमियत-अल-अन्सार या नावाच्या संघटनेचा प्रमुख म्हणून नेमणूक केली. त्याने अफगाणिस्तान, रशिया, तुर्कस्तान आणि अरेबिया या देशांना भेटी दिल्या. अफगाणिस्तानात त्याला काही अनुयायी मिळाले. तेथेच त्यांनी गदर पार्टीचे संस्थापक हरदयाळ यांच्या सहकार्याने भारताच्या तात्पुरत्या सरकारची स्थापना केली. काँग्रेसची शाखाही त्याने स्थापन केली. त्यानंतर १९१६ साली महमूद हसन मक्केला गेले आणि तेथे त्यांनी तुर्कस्तानच्या युद्ध मंत्र्यांची गाठ घेतली. त्या दोघांनी मिळून जगातील मुसलमानांसाठी म्हणून युद्ध मंत्र्यांच्या नावाने एक संदेश प्रसिद्ध केला. त्या संदेशात वर्षानुवर्षे मुसलमानांवर गुलामगिरी लादणाऱ्या खिश्चन राजसत्तांविरुद्ध उठाव करण्याचे आवाहन करण्यात आले होते. जगातील मुसलमानांनी जेहाद पुकारला असून तुर्कस्तानच्या फौजा इस्लामच्या शत्रूंना पाणी पाजीत आहेत, असा निर्वाळा देऊन त्या संदेशात पुढे असे जाहीर करण्यात आले होते की, तुर्कस्तानच्या सरकारने महमूद हसन यांची योजना स्वीकारली असून मुसलमानांनी महमूद हसन यांना सर्वतोपरी साहाय्य करावे. या संदेशाच्या प्रती उबेदुल्लाच्या मार्फत हिंदुस्थानात त्याच्या अनुयायांकडे पाठविण्यात आल्या होत्या. परंतु १९१६ च्या डिसेंबर महिन्यात तो संदेश आणि त्याबरोबरची पत्रे मधल्यामधेच पकडली गेली. अरबांनी तुर्कांविरुद्ध यशस्वीपणे उठाव केला आणि त्यांनी महमूद हसनला ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हवाली केले. त्याला माल्टा येथे स्थानबद्ध करून ठेवण्यात आले.

इकडे हिंदुस्तानातही जे मुसलमान तुर्कस्तानला पाठिंबा दर्शवीत होते त्यांना सरकारने चांगलेच धारेवर धरले. अली बंधू आणि मौलाना आझाद यांना तुरुंगात डांबण्यात आले. माँटेग्यू चेल्म्सफर्ड सुधारणांबद्दल बहुसंख्य जनतेत कमालीचे नैराश्य पसरले होते. भारतीय जनता आता आफ्रिकेत झालेल्या शांततामय प्रतिकाराच्या चळवळीमुळे गांधीजींकडे मोठ्या आशेने पाहू लागली होती. गांधीजींच्या नेतृत्वाखाली बिहारच्या चंपारण जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जो अभूतपूर्व विजय मिळाला होता त्यामुळे भारतीय जनतेच्या अंगात नवे वारे संचारले होते. तेथपासून हिंदी राजकारणात 'गांधी युग' सुरू झाले. सत्याग्रह हे स्वातंत्र्य लढ्याचे हत्यार बनले आणि शेतकरी व कामगार त्यात मोठ्या संख्येने सामील झाले.

भारत सुरक्षा कायदा, प्रेस ॲक्ट, सिडीशस मीटिंग्ज ॲक्ट, दि क्रिमिनल लॉ (अमेंडमेंट) ॲक्ट आणि शतकभराचे जुने रेग्युलेशन्स यासारखे झाडून सारे कायदे सरकारने भारतीय जनतेच्या वाढत्या आशा-आकांक्षा दडपून टाकण्यासाठी आपल्या भात्यातून काढण्याचा सपाटा सुरू केला. दहशतवादी कृत्यांना आवर घालण्यासाठी सरकारने परिस्थितीचा अभ्यास करून शिफारसी सुचविण्यासाठी रौलट कमेटी नेमली. जानेवारी १९१९ मध्ये रौलट कमेटीचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्या आधारे सरकारने मध्यवर्ती

कायदेमंडळात जे विधेयक मांडले त्यात सरकारला युद्धकाळातल्यासारखे अनेक जादा अधिकार देण्याची तरतूद होती. परंतु त्यामुळे सबंध देशात आणि विशेषत: पंजाबात संतापाची एकच लाट उसळली. स्वातंत्र्याचे तत्व पायदळी तुडविणाऱ्या आणि जनतेच्या मूलभूत हक्कांवर घाला घालणाऱ्या रौलट विधेयकाविरूद्ध सत्याग्रह सुरू करण्याची घोषणा गांधींनी १८ मार्च रोजी केली. या कायद्याबद्दलचा आपला संताप जनतेने देशात जिकडे तिकडे मोठमोठ्या सभा भरवून आणि मिरवणुका काढून व्यक्त केला. पंजाब प्रांतात काही ठिकाणी हिंसेचे तुरळक प्रकारही घडले. एप्रिल १९१९ मध्ये गांधींना अटक करण्यात आल्यानंतर तर पंजाबमधील जनता आणखीच भडकली. १३ एप्रिल रोजी अमृतसरमधील जालियनवाला बाग येथे प्रचंड सभा भरली असताना कुप्रसिद्ध जालीयनवाला बाग हत्यांकांड घडले. मार्शल लॉ पुकारण्यात आला. त्या हत्याकांडामुळे सारा देश हादरून गेला. गांधींनी आपले पहिले राष्ट्रव्यापी सत्याग्रह आंदोलन मागे घेतले. अ.भा.कॉं.क.ने पंजाबमधील परिस्थितीची चौकशी करण्यासाठी स्वत: एक समिती नेमली आणि सरकारकडेही अधिकृत चौकशी मंडळ नेमण्याची मागणी केली. त्याप्रमाणे सरकारने हंटर कमिशनची नियुक्ती केली.

युद्धकाळात पकडण्यात आलेल्या अनेक मुसलमान पुढाऱ्यांना युद्ध समाप्तीनंतर मुक्त करण्यात आले होते. परंतु सर्वसाधारणपणे तुर्कस्तान विरोधी प्रचार आणि तुर्कांना कॉंन्स्टेटिनोपलमधून हाकलून देण्याची व तुर्कस्तानचे राजकीय अवमूल्यन करण्याची जी मागणी पाश्चात्य वृत्तपत्रे एकसारखी करीत होती त्याची भारतीय मुसलमानांत तीव्र प्रतिक्रिया उमटली. पॅरिसच्या शांतता परिषदेत तहाच्या म्हणून ज्या अटी घालण्यात आल्या त्या अधिकच उद्वेगजनक होत्या. तुर्कस्तानचा प्रदेश किंवा खिलाफत यासंबंधी पूर्वी जी आश्वासने देण्यात आली होती ती वाऱ्यावर सोडून देण्यात आली होती हे स्पष्ट झाले आणि भारतीय मुसलमान कमालीचे दुखावले गेले. तुर्कस्तानची स्वायत्तता कायम राखावी, एशिया मायनरमधला तुर्की साम्राज्यातला मुलुख परत करावा, तुर्की साम्राज्याखाली अरबांना स्वायत्तता असावी, तेथील धार्मिक स्थानांवर तुर्कस्तानच्या खलीफाची अधिसत्ता असावी अशा तऱ्हेच्या मागण्या कायदेमंडळातील मुसलमान प्रतिनिधींनी मांडण्यास सुरवात केली. खिलाफत समिती स्थापन झाली. या समितीचेच पुढे खिलाफत परिषदेत रूपांतर करण्यात आले.

खिलाफत चळवळीतून जमीयत-उल-उलेमां-इ-हिंद या नावाची मुस्लिम धर्मगुरूंची एक नवी राजकीय संघटना उदयास आली. १८ सप्टेंबर १९१९ रोजी गांधीजींनी पहिल्या प्रथम खिलाफत चळवळीला आपला पाठिंबा असल्याचे मुंबईत भरलेल्या एका सभेत जाहीर केले. एक महिन्यानंतर हिंदुस्तानात सगळीकडे 'खिलाफत दिन' पाळण्यात आला. गांधीजींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या हिंदू मुसलमानांच्या संयुक्त बैठकीत जोपर्यंत खिलाफत प्रश्नांची समाधानकारक तड लागत नाही तोपर्यंत, भारतीय जनता युद्ध समाप्तीच्या समारंभात सहभागी होणार नाही अशा आशयाचा

ठराव पास करण्यात आला. १९ जानेवारी १९२० रोजी अ. भा. खिलाफत परिषदेच्या एका शिष्टमंडळाने व्हॉइसरॉयची भेट घेऊन खिलाफत परिषदेने केलेल्या मागण्या मंजूर करण्यात याव्यात असा आग्रह धरला. १७ मार्च रोजी शिष्टमंडळाने इंग्लंडला जाऊन तेथे पंतप्रधानांसमोर आपली बाजू मांडली. शिष्टमंडळाचे नेते महंमद अली यांनी मुसलमानांच्या धर्माच्या रक्षणासाठी खिलाफत टिकवली पाहिजे, खलीफाच्या अधिपत्याखाली पुरेसा मुलूख राहू दिला पाहिजे आणि मुसलमानांच्या धार्मिक स्थानांवर त्याचे संपूर्ण नियंत्रण असले पाहिजे अशी मागणी केली. या संदर्भात अरब राष्ट्रांचे अरबस्तानावर सार्वभौमत्व असणे आपणास अमान्य असल्याचे त्यांनी कबूल केले. अरबांचा नवा राजा फैझल स्वायत्त राजा म्हणून राज्य करू शकला, तरी मक्का, मदिनासारखी धर्मस्थाने तुर्की खलिफाचेच ताब्यात असली पाहिजेत असा महंमद अलींचा आग्रह होता. इंग्लंडच्या पंतप्रधानांनी शिष्टमंडळाला असे उत्तर दिले की, 'तुर्कस्तान या मुसलमान राष्ट्राप्रमाणे तीन खिरस्ती देशांशीही इंग्लंडचे युद्ध चालू असल्यामुळे तुर्कस्तान बरोबरची लढाई म्हणजे इस्लाम विरूद्ध पुकारलेले धर्मयुद्ध आहे अशी समजूत करून घेणे चुकीचे ठरेल. ख्रिस्त धर्मीय शत्रूंना आम्ही जे निकष लावतो तेच इस्लाम धर्मीय तुर्कस्तानलाही लावावे लागणार. ज्या देशांनी आपल्या अंकित असलेल्या प्रजाजनांवर जुलूम केला आणि साऱ्या जगाचा विनाश ओढविणारे युद्ध पेटवले त्या देशांच्या पीडित प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्याचा आमचा निर्धार आहे. पंतप्रधानांच्या या उत्तराने भारतात एकच खळबळ उडून गेली. तारीख १९ मार्च हा दिवस शोक दिन म्हणून पाळण्याचा आदेश देण्यात आला. त्या दिवशी सबंध देशभर हरताळ पाळण्यात आला. जाहीर सभांबरोबरच ठिकठिकाणी प्रार्थना म्हणण्यात आल्या. अनेकांनी त्या दिवशी उपोषण केले. खिलाफत नेत्यांनी भारतीय मुसलमानांनी एक तर दुसऱ्या एखाद्या इस्लामी देशात स्थलांतर करावे अन्यथा ब्रिटिश सरकारविरूद्ध जेहाद पुकारावा असा आदेश देणारा फतवा काढला. या आदेशानुसार १८ हजार मुसलमानांनी आपली चीज वस्तू फुंकून टाकून अफगाणिस्तानचा रस्ता धरला. परंतु त्यांना सरहद्दीवरच अडविण्यात आले. त्यामुळे, कफल्लकावस्थेत ते दुर्दैवी मुजाहिद माघारी फिरले. या महाप्रवासात त्यांचे अतोनात हाल झाले. कित्येक जण मृत्यूमुखी पडले, तर अनेक जन्माचे पंगू होवून बसले. तरीही खिलाफतीसंबंधीचा जनतेचा उत्साह कमी झाला नव्हता. १९२० च्या मे महिन्यात मौलाना महमूद हसन यांची मुक्तता करून त्यांना माल्टाहून मुंबईला पाठवण्यात आले. खिलाफत समितीतर्फे त्यांचा प्रचंड सत्कार करण्यात येवून त्यांना शेख-उल-हिंद असा किताब बहाल करण्यात आला.

२५ मार्च १९२० रोजी पंजाबमधील हत्याकांडासंबंधीचा काँग्रेसने नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला. खिलाफत प्रकरण आणि जालीयनवाला बागमधील हत्याकांड यामुळे जनतेची मते सरकारविरोधी भावनेने भारावून गेली

होती. १३ एप्रिलला जालीयनवाला बाग प्रकरण घडल्याला एक वर्ष पुरे होत होते. म्हणून तारीख ६ ते १३ एप्रिल पर्यंत राष्ट्रीय सप्ताह पाळण्यात आला. गांधीजींनी खिलाफत चळवळीला सर्वतोपरी पाठिंबा देण्याचे हिंदूंना आवाहन केले. इतकेच नव्हे तर गाईचे रक्षण करण्याचा सर्वोत्तम आणि एकमेव मार्ग म्हणजे खिलाफत वाचवणे हा होय असे जाहीर केले. युद्ध समाप्ती करार तुर्कस्तानला अधिक अनुकूल करून घेण्यासाठी आणि भारताचे स्वातंत्र्य संपादन करण्यासाठी असहकाराची चळवळ सुरू करण्याचा आपला निर्धार त्यांनी जाहीर केला. ॲनी बेझंट, सी. एफ. अँड्र्यूज इतकेच नव्हे तर रविंद्रनाथ टागोर यांच्या सारख्या नेत्यांनी खिलाफत आणि असहकार याबाबतीत गांधींशी आपले मतभेद असल्याचे जाहीर केले. त्यावर गांधींनी असा खुलासा केला की, आपण अरब देशांना स्वातंत्र्य देण्याच्या विरुद्ध नाही. आणि अरबांनी आपला स्वतःचा वेगळा खलीफा निवडला तरी त्याला आपली हरकत असणार नाही. असहकाराच्या बाबतीत सुरवातीला टिळकही काहीसे साशंक होते. परंतु गांधीजींशी चर्चा केल्यानंतर संकल्पित चळवळीला बिनशर्त आणि संपूर्ण पाठिंबा देण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

हंटर कमिशनने पंजाबमधील अत्याचारासंबंधीचा आपला अधिकृत अहवाल सरकारला सादर केला. परंतु त्याबाबत कमिशनवरील सर्व सभासदांत एकमत नव्हते. हिंदी सभासदांनी त्याला आपली वेगळी मतपत्रिका जोडली. त्यामुळे जनमत अधिकच खवळले. २ जून रोजी भरलेल्या सर्व पक्षीय परिषदेत गांधीजींच्या असहकाराच्या कार्यक्रमाला मंजुरी देण्यात आली. असहकाराचे आंदोलन एक ऑगस्ट पासून सुरू होणार होते परंतु त्याच दिवशी टिळकांचे निधन झाले. कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग यांनी आपापल्या खास अधिवेशनात स्वतंत्रपणे गांधीजींच्या असहकाराच्या कार्यक्रमावर शिक्कामोर्तब केले. सरकारी किताब आणि सन्माननीय पदे परत करणे, सरकारी कार्यक्रमांना क सभा-समारंभांना उपस्थित न राहणे, सरकारी किंवा सरकारी अनुदानावर चालणाऱ्या शाळा-कॉलेजातून आपापली मुले काढून घेणे, वकिलांनी आणि अशिलांनी न्यायालयावर बहिष्कार घालून लवाद मंडळामार्फत आपले तंटे सोडवून घेणे, मेसापोटेमियात पाठविण्यासाठी केल्या जाणाऱ्या लष्कर किंवा इतर खात्यातील नोकर भरतीत सामील न होणे आणि आगामी निवडणुका आणि परदेशी माल यावर बहिष्कार घालणे आदी बाबींचा त्या कार्यक्रमात समावेश होता. या असहकाराच्या चळवळीला विरोध असणाऱ्या मवाळांनी कॉंग्रेस बाहेर पडून नॅशनल लिबरेशन फेडरेशन या नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला.

लीग आणि कॉंग्रेसच्या अधिवेशनात जीनांनी स्वीकारलेली दुटप्पी भूमिका मोठी मजेदार होती. मुस्लीम लीगच्या अधिवेशनाचे तर ते स्वतःच अध्यक्ष होते. परंतु असहकाराबाबत स्वतःचे मत व्यक्त न करता त्याबाबतचा निर्णय तुमचा तुम्हीच घ्यावयाचा आहे. असहकाराचे तत्व तुम्हाला मान्य आहे की नाही आणि असले तर

त्याच्या तपशीलाशी तुम्ही कितपत सहमत आहात याचा तुम्ही आपल्या मनाशी विचार करा. या चळवळीचा बरा-वाईट परिणाम हा अखेर व्यक्तीशः तुमच्यावर होणार आहे. तो सहन करण्याची तुमची ताकद आहे की नाही ते अजमावून तुम्ही काय तो निर्णय घ्या असे त्यांनी आवाहन केले. परंतु जीनांच्या अशा तऱ्हेच्या भाषणानंतरही लीगच्या अधिवेशनात असहकाराच्या कार्यक्रमाला संपूर्ण पाठिंबा व्यक्त करण्यात आला. त्यानंतर भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात मात्र जीनांनी असहकार आंदोलनावर सडकून तोंडसुख घेतले आणि असहकाराचा ठराव अधिवेशनात बहुमताने पास झाला तरी मी तो मानणार नाही असे जाहीर करून रागारागात ते काँग्रेस अधिवेशनाच्या मंडपातून निघून गेले ते कायमचेच. त्यानंतर ते काँग्रेसकडे कधीच फिरकले नाहीत.

सामुदायिक चळवळ सुरू होणार असे आधीपासूनच सरकारने गृहित धरले होते म्हणून जमीन आणि इतर मालमत्ता धारण करणाऱ्या हितसंबंधियांना हाताशी धरून तिला तोंड देण्याची त्याने तयारी करून ठेवली होती. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर सहा महिन्यांनी पंजाब सरकारने एका खास ठरावान्वये सरकारी नोकऱ्यांतील ६० टक्के जागा १९०० सालच्या लँड ॲलीएनेशन या कायद्यान्वये शेती व्यवसाय करणाऱ्या म्हणून ज्या जातींची नोंद झालेली होती त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात येतील असे जाहीर केले. त्या कायद्यानुसार पंजाबमध्ये शिखांपैकी जवळजवळ ६७ टक्के, मुसलमानांपैकी ६० टक्के आणि २५ टक्के हिंदू शेती व्यवसाय करणाऱ्या जातीत मोडत होते. म्हणजे रौलट ॲक्ट विरुद्ध चळवळ करणाऱ्या मुख्यतः शहरी भागातील बहुसंख्य लोकांना या नव्या कायद्यामुळे सरकारी नोकरीची दारे बंद होणार होती. खिलाफत आणि असहकार आंदोलन सुरू झाल्यावर नोव्हेंबर १९२० मध्ये एक लांबलचक सरकारी निवेदन प्रसिद्ध करण्यात आले. त्यात ज्यांना देशाची खरीखुरी काळजी आहे (म्हणजे ज्यांचे हितसंबंध गुंतले आहेत) त्यांनी संघटितपणे आगामी आंदोलनाचा जाहीर धिक्कार करून कायदा व सुव्यवस्था राखण्यास पुढे यावे असे आवाहन केले होते. अलिगड आणि खालसा कॉलेजच्या विश्वस्तांनी आपल्या विद्यार्थ्यांत या चळवळीचा फैलाव होऊ नये म्हणून घेतलेल्या खबरदारीबद्दल या पत्रकात त्यांची तोंड भरून स्तुती करण्यात आली होती. चळवळीच्या नेत्यांच्या भाषण, लेखन आणि संचार स्वातंत्र्यावर कोणत्याही प्रकारचे निर्बंध लादण्यात येणार नाहीत परंतु ते जर हिंसेला चिथावणी देतील किंवा लष्करात आणि पोलीस दलात बेदिली माजविण्याचा प्रयत्न करतील तर ते मात्र सहन केले जाणार नाही असे या पत्रकात स्पष्ट करण्यात आले. आगामी आंदोलनाला सरकार नव्या राजकीय सुधारणांचा उपयोग करून घेऊनच तोंड देईल असे पत्रकात शेवटी नमूद करण्यात आले होते. थोड्याच दिवसात नव्याने अस्तित्वात येणाऱ्या प्रांतिक आणि मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या.

काँग्रेसमधून फुटून नॅशनल लिबरल फेडरेशन नावाचा नवा पक्ष स्थापन करणारे नेमस्त, मुस्लीम लीगमधून बाहेर पडलेले राजनिष्ठ अश्रफ आणि प्रतिगामी प्रवृत्तीची इतर मंडळी यांना या निवडणुका म्हणजे एक पर्वणीच होती. असहकार आणि खिलाफत चळवळीचा पुरस्कार करणाऱ्यांचा त्यांनी धिक्कार केला आणि प्रचंड प्रमाणावर मतदान करून गांधींना चोख उत्तर देण्याचे मतदारांना आवाहन केले. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. सहा मतदार संघात तर एकही उमेदवारी अर्ज भरला गेला नाही. माँटेग्यू चेल्मसफर्ड सुधारणान्वये अवघ्या तीन टक्के भारतीयांना मतदानाचा हक्क मिळाला होता. कौन्सिल ऑफ स्टेटसाठी मतदानाचा अधिकार असलेल्यांची संख्या तर त्याहूनही कमी होती. इतक्या अल्प संख्येतूनही जेमतेम ८ ते ४० टक्के मतदान झाले. सरकारनियुक्त सभासद, युरोपियन्स, अँग्लोइंडियन्स आणि अश्रफ आणि इतर जमातीतील राजनिष्ठ यांचा सरकारधार्जिणा गट कायदेमंडळात तयार झाला होता, या गटामुळे सरकारला प्रांतोप्रांती लोकनियुक्त स्थिर मंत्रीमंडळे राज्य कारभार करीत असल्याचा देखावा निर्माण करता आला. वस्तुत: ही लोकनियुक्त मंत्रिमंडळे एक टक्क्याहूनही कमी भारतीयांचे प्रतिनिधित्व करीत होती.

या मंत्रिमंडळातील मंत्री हे सरकारनियुक्त होते याची भारताबाहेरील फारच थोड्यांना जाणीव होती. या सरकारनियुक्त मंत्र्यांनी भारतातील राष्ट्रवादी शक्ती खच्ची करण्यास फार मोठा हातभार लावला. द्विदल राज्यपद्धतीमुळे अधिकारपदे मिळविण्यासाठी जातीजातीत भांडणे सुरू झाली. महत्वाची पदे भारतीय नागरिकच भूषवीत आहेत असा आणखी एक आभास निर्माण करण्यासाठी निवडक राजनिष्ठ होयबांची ठिकठिकाणी वर्णी लावण्यात आली. एका खास विधेयकान्वये अलिगडच्या एम. ए. ओ. कॉलेजचे रूपांतर अलिगड मुस्लीम युनिव्हर्सिटीत करण्यात आले. भारतीयांच्या भडकलेल्या भावनांवर फुंकर घालण्यासाठी पंजाबातील अत्याचारांबद्दल नक्राश्रु ढाळण्यात आले. काही अधिकाऱ्यांनी अयोग्य वर्तन केले आणि चुकीचे हुकूम दिल्याबद्दल गृहमंत्र्यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आणि 'पंजाब प्रकरणात' ज्यांना झळ सोसावी लागली असेल त्यांच्याबाबत सरकार सहानुभूतीचे आणि उदारतेचे धोरण स्वीकारील असे देखील जाहीर करण्यात आले.

सरकार धार्जिणे लोक सामुदायिक प्रतिकाराविरुद्ध प्रचाराची आग ओकू लागले. एम. ए. ओ. कॉलेजच्या विश्वस्तांनी चळवळीत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजातून काढून टाकल्याबद्दल डॉ. अन्सारी यांनी १९२० च्या डिसेंबरात नागपूर येथे भरलेल्या लीगच्या अधिवेशनात अध्यक्ष पदावरून भाषण करताना त्यांच्यावर कडाडून टीका केली. राष्ट्रवादी तसेच खिलाफत चळवळीचे पुरस्कर्ते यांचयाविरुद्ध अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटच्या स्तंभामधून जो जहरी प्रचार आणि चारित्र्यहनन चालविले जात होते त्याबद्दलही डॉ. अन्सारी यांनी त्या विश्वस्तांचा चांगला समाचार घेतला. लखनौचे नदवत-उल-उलेमा यांनी सरकारने देऊ केलेले अनुदान नाकारल्याबद्दल आणि चळवळीला

पाठिंबा दिल्याबद्दल अन्सारी यांनी त्यांचे जाहीर अभिनंदन केले. नागपूरच्या अधिवेशनात पुन्हा एकदा लीगच्या ध्येय-धोरणात बदल करून (१) शांततामय आणि कायदेशीर मार्गाने स्वराज्य प्राप्ती करून घेणे, (२) मुसलमानांच्या राजकीय, धार्मिक आणि अन्य हक्कांचे रक्षण करणे आणि (३) हिंदुस्तानबाहेरील मुसलमानांबरोबर घनिष्ट मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे यासाठी कार्य करीत राहण्याचे ठरविण्यात आले. दुसऱ्या एका ठरावान्वये ब्रिटिशांनी केलेली दोस्तीच्या कराराची सूचना फेटाळून लावण्याची अफगाण सरकारला विनंती करण्यात आली होती. अलिगड विद्यापीठ आणि एम. ए. ओ. कॉलेजच्या सरकार धार्जिण्या विश्वस्तांच्या धोरणाशी विरोध असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आंदोलनाच्या काही पुरस्कर्त्यांनी एकत्र येऊन जामिया मिलीया इस्लामिया (राष्ट्रीय मुस्लीम विद्यापीठ) या नावाची संस्था स्थापन केली.

अहमदाबादच्या कॉंग्रेस अधिवेशनात कॉंग्रेस सेवादलाची स्थापना करण्यात आली. 'मी जातीय सलोखा आणि एकात्मता निर्माण करण्यासाठी झटेन, खादीचेच कपडे वापरीन, कोणत्याही स्वरूपातील अस्पृश्यता पाळणार नाही, स्वदेशी व्रताचा अंगिकार करीन, दलित समाजाची सेवा करीन आणि पंजाबमधील अन्याय दूर करून घेण्यासाठी आणि स्वराज्याचे ध्येय साध्य करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहीन' अशी शपथ सेवादलात भरती होणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकास घ्यावी लागे. गांधीजी काही निवडक ठिकाणी वैयक्तिक आणि सामुदायिक सत्याग्रह सुरू करण्याची योजना आखीत होते. कॉंग्रेस आणि खिलाफत पुढाऱ्यांनी देशभर संयुक्त प्रचार दौरे काढून सारे वातावरण भारून टाकले. शेतकरी आणि कामगार या आंदोलनात मोठ्या संख्येने सामील होवू लागले. रायबरेलीतील शेतकरी आंदोलन आणि आसाम येथील रेल्वे कर्मचाऱ्यांचा संप ही असहकार आंदोलनातील नेत्रदीपक वैशिष्टे होती. देशाच्या कानाकोपऱ्यातून जाहीर सभा घेण्यात आल्या. मशिदीत मुसलमानांपुढे भाषण करण्यासाठी हिंदू पुढाऱ्यांना बोलावण्यात येवू लागले तर मंदिरात मुसलमान नेत्यांची भाषणे होवू लागली.

जनतेच्या उत्साहाला असे उधाण आले की, चळवळ सर्वस्वी अहिंसेच्या मर्यादेत राहणे अशक्य होऊन बसले. विशेषतः सरकारने खास वटहुकूम काढून कॉंग्रेस सेवादल बेकायदा ठरवून स्वयंसेवकांची मोठ्या प्रमाणावर धरपकड केल्यानंतर लोकांचा प्रक्षोभ पराकोटीला पोहोचला. संयुक्त प्रांत, बिहार, मुंबई आदि प्रांतात हिंसक प्रकार घडले. ब्रिटिश सरकारच्या लष्करात नोकरी करणे हे धार्मिकदृष्टचा बेकायदेशीर असून भारतीय लष्करातील मुसलमान सैनिकांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देणे हे त्याचे पवित्र कर्तव्य ठरते अशा आशयाचे भाषण केल्याबद्दल अली बंधूंवर खटला भरण्यात येऊन त्यांना दोन दोन वर्षांची सजा ठोठावण्यात आली.

ऑगस्टमध्ये घडून आलेल्या मोपल्यांच्या बंडाचा देशाच्या भावी जातीय आणि राजकीय परिस्थितीवर जबरदस्त परिणाम घडून आला. सरकारने त्या भागात सहा

महिनेपर्यंत लष्करी कायदा जारी केला होता. खिलाफत चळवळीमुळेच हा उठाव घडून आला असे सरकारने जाहीर केले. या प्रकरणाची स्वतंत्रपणे चौकशी करण्याची मागणी फेटाळून खिलाफत आणि असहकार आंदोलन बदनाम करण्यासाठी सरकारने त्याचा उपयोग करून घेतला. काँग्रेसच्या आणि लीगच्या त्यानंतर भरलेल्या अधिवेशनात या विषयावर चर्चा होणे अपरिहार्य होते. काँग्रेसच्या अधिवेशनात दंगलीचा निषेध करणारा ठराव आला असता मुसलमान प्रतिनिधींनी त्याला कडवा विरोध करून तो ठराव होऊ दिला नाही आणि पुढाऱ्यांना मलबारला भेट देण्यास प्रतिबंध केल्याबद्दल सरकारवर टीका करणारा एक मिळमिळीत ठराव करण्यावर त्या अधिवेशनाला समाधान मानावे लागले. लीगच्या अधिवेशनात मोपल्यांच्या दंगलीची चौकशी करण्यासाठी पाच जणांची एक समिती नेमण्यात आली. परंतु निरनिराळ्या विचारांच्या मुसलमान नेत्यांनी अगोदरपासूनच मोपल्यांचे समर्थन केलेले असल्यामुळे त्या समितीला काही अर्थ राहिला नव्हता आणि त्यामुळे समितीने आपले चौकशीचे काम पुरे का केले नाही असे विचारण्याची हिंमतही पुढे कोणी दाखविली नाही. परंतु हे सर्व घडत असतानाही खिलाफत आणि असहकार आंदोलन चालूच होते.

१९२१ च्या अखेरीला चळवळ जवळजवळ ओसरत आली होती. प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारत भेटीच्या निमित्ताने व्हॉइसरॉयने पं. मालवियांच्या मार्फत काँग्रेसकडे निरोप पाठवला की, काँग्रेस जर आपली चळवळ ताबडतोब मागे घेण्यास तयार असेल आणि अशा तऱ्हेने शाही आगमनासाठी अनुकूल असे वातावरण निर्माण होऊ देण्यास तयार असेल तर सरकार काँग्रेस सेवादल बेकायदा ठरविणारा वटहुकूम मागे घेईल आणि त्याखाली पकडलेल्या सर्व कैद्यांची मुक्तता करील. सरकारच्या या योजनेच्या संदर्भात पं. मालवीय यांनी प्रथम सी. आर. दास आणि मौलाना आझाद यांची तुरुंगात भेट घेतली. त्या दोघांनीही अनुकूलता दर्शवून मालवीय यांना गांधींची भेट घेण्यास सांगितले, परंतु सरकार अली बंधुंची जोपर्यंत सुटका करीत नाही तोपर्यंत आपल्याला या योजनेशी कसलेही कर्तव्य नाही अशी गांधीजींनी भूमिका घेतली. गांधींची ही अट व्हॉइसरॉय यांनी झिडकारली. दास आणि आझाद यांनी गांधीजींना तारा पाठवून योजना स्वीकारण्याबद्दल त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु आता व्हॉइसरॉयलाच त्याची जरूर राहिलेली नव्हती. प्रिन्स ऑफ वेल्सच्या आगमनप्रसंगी फार मोठ्या प्रमाणावर दंगली उसळून ५३ लोक मरण पावले आणि ४०० जखमी झाले. असहकाराचे आंदोलन शिस्तीच्या मर्यादेत ठेवण्याच्या बाबतीत आपण असमर्थ आहोत असे गांधीजींनी सांगितले. बार्डोली येथे सुरू होणारा सत्याग्रह स्थगित करण्यात आला. याच सुमारास २२ नोव्हेंबर रोजी ग्रेट ब्रिटन आणि अफगाणिस्तान यांच्यातील दोस्तीच्या करारावर सह्या झाल्याचे वृत्त आल्याने खिलाफत चळवळीच्या नेत्यांना मोठाच धक्का बसला. १ फेब्रुवारी १९२२ रोजी गांधीजींनी व्हॉइसरॉयला पत्र पाठवून आपली सामुदायिक शांततामय प्रतिकाराची चळवळ बार्डोली

आणि गुंतूर पुरतीच मर्यादित राहणार असल्याचे कळविले. दडपशाहीचे कायदे मागे घेण्यात यावेत आणि राजबंद्यांची मुक्तता करण्यात यावी या आपल्या मागण्यांचा पुनरुच्चार करून पत्राच्या शेवटी त्यांनी खिलाफत किंवा पंजाब प्रकरणात जो अन्याय झालेला आहे तो दूर करून घेण्यासाठी केल्या जाणाऱ्या कोणत्याही अहिंसक चळवळीत सरकारने हस्तक्षेप करू नये अशी इच्छा व्यक्त केली होती. असहकार पुकारणाऱ्यांना सरकार शांततामय प्रतिकाराची चळवळ सुरू करणे भाग पाडीत आहे या आरोपाचा इन्कार करून स्वयंसेवकांविरुद्ध योजलेल्या उपायांचे समर्थन करणारे एक निवेदन गांधींच्या पत्राला उत्तरादाखल म्हणून सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यात आले. सामुदायिक सत्याग्रहाविरुद्ध कडक उपाय योजले जातील असा इशाराही सरकारने दिला.

बार्डोली आंदोलनाच्या पूर्वतयारीत गांधीजी गुंतलेले असताना तारीख ४ फेब्रुवारी रोजी चौरीचुऱ्याचे प्रकरण उद्भवले. शेतकरी आणि काँग्रेस स्वयंसेवक यांच्या एका जमावाने एक फौजदार आणि एकवीस पोलीस यांना पोलिस ठाण्यात कोंडून ते पेटवून दिले. त्या आगीत ते सर्वजण जळून मेले. बार्डोली येथे काँग्रेस वर्किंग कमेटीची बैठक होऊन गांधीजींच्या सूचनेनुसार शांततामय प्रतिकाराची चळवळ तावडतोब मागे घेण्याचा निर्णय घेतला गेला. सरकारच्या प्रतिबंधात्मक आदेशांचा भंग किंवा ज्यामुळे अटक केली जाईल असे कोणतेही कृत्य न करता दारू दुकानावर पिकेटींग, खादी आणि राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार आणि दलितोद्धार येवढ्यांपुरतेच आपले कार्य सीमित करण्याचे आवाहन गांधींनी सर्व काँग्रेसजनांना केले. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात दिल्लीला भरलेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीच्या बैठकीत महाराष्ट्र आणि बंगालमधील प्रतिनिधींनी या निर्णयाला कडाडून विरोध केला. त्यांनी गांधींच्या विरुद्ध निंदाव्यंजक ठरावही आणला होता परंतु तो संमत होऊ शकला नाही. मात्र अ. भा. काँग्रेस कमिटीने काँग्रेसजनांना वैयक्तिक कायदेभंग करण्याची परवानगी देणारा ठराव पास केला. या घटनांमुळे सरकारला आक्रमक पवित्रा घेण्याची संधी मिळाली. सरकारने दोन महत्वाचे निर्णय घेतले. (१) मुसलमानांना आपल्या बाजूला वळवून घ्यावयाचे, आणि (२) गांधींना तुरुंगात डांबावयाचे. त्यानुसार २२ मार्चला सरकारने खिलाफत प्रश्नासंबंधी कडक शब्दात लिहिलेला खलिता ब्रिटिश सरकारला सादर केला. या प्रश्नावर भारतीय मुसलमानांच्या भावना अत्यंत तीव्र झाल्या असून ब्रिटिश सरकारने तुर्कस्तानवर लादलेल्या तहांच्या अटींचा फेरविचार करावा आणि कॉन्स्टेंटिनोपल, अँड्रिआनोपल आणि स्मरना ही शहरे तुर्कस्तानकडे राहू द्यावीत व इस्लाम धर्माच्या सर्व पवित्र स्थानांवर तुर्कस्तानच्या सुलतानांची अधिसत्ता राहू द्यावी अशा सूचना केल्या होत्या.

थोड्याच दिवसांत गांधींना पकडण्यात येवून त्यांना सहा वर्षाची सक्त मजुरीची सजा ठोठावण्यात आली.

---

प्रकरण आठवे

# मुस्लिम जातीयवादाशी तडजोड हानीकारक ठरली

अविभाज्य भारताच्या इतिहासात १९२० चे दशक अत्यंत निर्णायक ठरले. जातीयवादी मुस्लिम शक्तींबरोबर तडजोड घडवून आणण्याचे जे दोन प्रयत्न नुकतेच झाले होते त्यांचे वैयर्थ्य सुरवातीलाच स्पष्ट झाले. १९१९ च्या कायद्यामुळे निरनिराळ्या प्रांतिक कायदेमंडळातून जातवारी प्रतिनिधित्व मिळवून देण्याचा मार्ग आयताच मोकळा करून देण्यापलिकडे लखनौ करारातून दुसरे काहीही निष्पन्न झाले नाही. जातीय मतदार संघ आणि प्रमाणाबाहेर प्रतिनिधित्व ही सरकार धार्जिण्या अश्रफांची मागणी या करारान्वये काँग्रेसने मान्य केली. मुसलमानांची स्वतंत्र मतदार संघाची आणि ते अल्पसंख्य असतील त्या प्रांतात त्यांना जादा सवलती देण्याची मागणी टिळक आणि इतर नेत्यांना हिंदू समाजाच्या गळी उतरवता यावी हा हेतू साध्य करण्यासाठीच पंजाब आणि बंगालमधील मुसलमान पुढाऱ्यांनी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा थोडचा कमी जागा स्वीकारायला तयारी दर्शविली. परंतु थोड्याच दिवसांत त्यांनीही आपला शब्द फिरवला आणि अल्पसंख्य प्रांतातील सवलती तर राहिल्या पाहिजेतच आणि शिवाय पंजाब आणि बंगाल या दोन प्रांतातही जातीय बहुमताची कायदेशीर तरतूद करण्यात आली पाहिजे असा त्यांनी पवित्रा घतला. या धर्तीवर लखनौ करारात सुधारणा करा असा मुस्लिम जातीयवादी शक्तींनी त्या दशकात धोशा लावला होता. इतर लोकनियुक्त संस्था आणि नोकऱ्यांमध्येही हे जातीय प्रतिनिधित्वाचे आणि प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधित्व दिले पाहिजे ही मागणीही पाठोपाठ पुढे येवू लागली. पंजाबच्या कायदेमंडळात गुरुद्वारासंबंधीचे विधेयक घाईगर्दीने पास करून घेण्यात आले. त्यावेळी करारातील जातीय नकाराधिकाराची तरतूद शिखांच्या बाबतीत सोयिस्करपणे डावलण्यात आली. खिलाफतची मागणीच कशी अवास्तव आणि पोकळ होती हे खुद्द तुर्कस्तानने त्याबाबत स्वीकारलेल्या भूमिकेवरूनही पुढे आपल्याला दिसेल. ती मागणी उचलून धरल्यामुळे काँग्रेसला चार-दोन मुस्लीम पुढारी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात सामील करून घेता आले पण त्यासाठी फार जबर किमत मोजावी लागली. सनातनी प्रवृत्तीच्या उलेमांना राजकारणात स्थान मिळाल्याबरोबर त्याची प्रतिक्रिया म्हणून दुसऱ्या बाजूनेही तशाच प्रतिगामी आणि सुधारणांना विरोध करणाऱ्या कडव्या धर्मांध शक्ती उफाळून आल्या. भारताच्या इतिहासातील सर्वात भीषण दंगली याच

दशकात घडून आल्या. सबंध शासकीय यंत्रणा एकाद्या जमातीच्या हितसंबधासाठी कशी राबवून घेता येते ते फजली हुसेन यांनी दाखवून दिले. एकदा सत्तेची चटक लागल्यानंतर अधिकाधिक सत्तेचा हव्यास सुरू झाला व त्यातूनच फुटीरवादी शक्तींना खतपाणी मिळत गेले आणि अखेर १९४७ साली या शक्तींनी फाळणीच्या रूपाने परमोच्च बिंदू गाठला

गांधीजींना अटक करून शासनाने जणू खिलाफत आणि असहकार आंदोलन चिरडून टाकण्याचे टिपण साधले. वस्तुत: लष्कर आणि पोलीस दलाला चिथावणी देणाऱ्याविरुद्धच फक्त कारवाई करण्यात येईल असे सरकारने आश्वासन दिले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र सरसहा दमननीतीचाच शासनाने अवलंब केला. १९२१ च्या मार्चमध्ये भारत सरकारने प्रांतिक सरकारांना दडपशाहीचे उपाय मागे घेण्याचा आदेश द्यावा अशा आशयाचा एक ठराव डॉ. नंदलाल यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मांडला. सर्व उदारमतवाद्यांनी त्याला पाठिंबा दिला, परंतु खिलाफत आणि असहकार आंदोलनाला समाजातील सुशिक्षित किंवा प्रतिष्ठित वर्गाकडून प्रतिसाद मिळाला नाही. काही अपरिपक्व विद्यार्थी आणि अशिक्षित यांनीच काय तो त्या चळवळीला पाठिंबा दिला होता आणि त्यामुळे ती चळवळ शांततापूर्ण न राहता रायबरेली वगैरे ठिकाणी हिंसक प्रकार घडले असा होम मेंबरांनी प्रतिवाद केला. अनेक मुसलमान सभासदांनीही सरकारची बाजू उचलून धरली आणि शासनाने उलट अराजकापासून देशाला वाचवले अशी भलावण खान बहादुर झहिरुद्दिन अहमद आदींनी केली. 'आम्हाला स्वराज्य नको. कारण मुसलमान म्हणून मला असे वाटते की, स्वराज्य म्हणजे प्रत्यक्षात ते हिंदूचेच राज्य होणार' असे सांगालायही त्यांनी कमी केले नाही. खान बहादुर सरफराज हुसेन खान यांनी तर चळवळ दडपून टाकण्यासाठी शासनाने कडक उपाय योजावेत असे आवाहन केले. प्रांतांना तावडतोब संपूर्ण स्वायत्तता देण्यात यावी या जमनादास द्वारकादास यांनी सप्टेंबर २९ रोजी मांडलेला ठरावासही मौलवी अबदुल कासम आणि मौलवी अमजाद अली यांनी तीव्र विरोध दर्शविला. मुन्शी इश्वर शरण यांनी पुन्हा एकदा दडपशाहीविरोधी ठराव आणला असता मुसलमान सभासदांनी त्याचीही तशीच वासलात लावली. आता सरकारनेही मवाळांच्या बद्दलची आपली नाराजी व्यक्त करायला सुरवात केली. मवाळ पक्षाकडून आम्हाला अपेक्षेइतकेही सहकार्य मिळाले असते तर दडपशाही मार्गाचा अवलंब करण्याची जरूरही पडली नसती. तो पक्ष संघटीत आणि सामर्थशाली बनावा म्हणून सरकारने त्यांना जेवढी मदत केली तेवढी इतर कोणीही केली नसेल. त्यांनी जर अधिक जोमाने पावले उचलली असती तर सरकारवर दडपशाही करण्याची पाळीच आली नसती असे सर विल्यम व्हिन्सेंन्ट यांनी सांगून टाकले.

सरकारकडून झालेल्या या मुखभंगामुळे राय बहाद्दूर टी. रंगाचारीयर यांच्या सारख्या मवाळाग्रणींची परिस्थिती मोठी केविलवाणी होऊन गेली. आपण आपल्या प्रांतातील अस-

असहकार आंदोलनाला तीव्र विरोध केला होता आणि ती सबंध चळवळ संपूर्णपणे असफल ठरली आहे असा खुलासा त्यांनी केला. सभागृहापुढे आलेल्या ठरावावर सरकारनियुक्त सभासदांप्रमाणेच आठ मुस्लीम सभासदांनीही विरोधी मतदान केले. १९०८ चा क्रिमिनल लॉ (अमेंडमेंट) ॲक्ट रद्द करण्यात यावा, गांधी आणि अलीबंधूंची सुटका करण्यात यावी, किंवा डॉ. हरिसिंग गौर यांचा १९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टच्या चौकटीत राहून आणखी सुधारणा घडवून आणाव्यात इत्यादी ठरावावरही असेच मतदान झाले. म्हणजे सरकारला आपले दडपशाहीचे धोरण पुढे रेटण्याला एक परीने सदर परवानाच मिळाला.

इकडे तुर्कस्तानमधील घटनांमुळे तर जणू उल्कापातच घडून आला. ग्रीकांवर निर्विवाद विजय संपादन केलेल्या केमाल पाशाने विधिवत जरी नसले तरी प्रत्यक्षात तुर्कस्तानच्या सरकारवर आपले नियंत्रण प्रस्थापित केले होते. त्याआधी एक वर्ष गाझी सुलतान महंमद वहीउद्दीन हा खलिफा म्हणून तुर्कस्तानात गादीवर आला होता. मुस्लीम लीगने आपल्या अहमदाबादच्या अधिवेशनात इस्लामचा नवा खलिफा म्हणून त्याचे स्वागत करणारा एक खास ठराव पास केला होता. परंतु केमाल पाशाने सत्ता हाती घेतल्यावर या खलिफाला आपली गादी सोडून परागंदा व्हावे लागले. त्यानंतर केमाल पाशाने वहीउद्दीनचा चुलत भाऊ अबदुल मजीद याला नवीन खलिफा केले. जमीयत-उल-उलेमाने आपल्या वार्षिक अधिवेशनात विधिवत निवडला गेलेला खलिफा म्हणून त्याला मान्यता देऊन टाकली. त्याच ठरावात तुर्की सरकारला मुस्लिम जगताचा सल्ला घेऊन आणि शरीयतच्या कायद्याला अनुसरून खिलाफत हे पद कायम राखण्यात यावे अशी विनंती करण्यात आली होती. निराळ्या शद्वात सांगावयाचे तर तुर्कांनी कायदेशीरपणे त्याचप्रमाणे प्रत्यक्षातही अबदुल मजीदला तुर्की साम्राज्याचा सम्राट आणि सबंध मुस्लीम जगताचा आध्यात्मिक नेता म्हणून मान्यता द्यावी असाच त्या ठरावाचा अर्थ होता. तुर्कस्तानच्या नॅशनल असेंब्लीने खलीफाचे सर्व शासकीय अधिकार काढून घेतले. भारतातील खिलाफतवाद्यांना त्यामुळे जबरदस्त धक्का बसला. तुर्कस्तानच्या राष्ट्रीय विधानसभेला खलीफाच्या ऐहिक आणि पारमार्थिक अधिकारात असा भेदभाव करण्याचा किंवा त्याचे राजकीय अधिकार काढून घेण्याचा हक्क पोहोचत नाही अशी भूमिका त्यानंतर थोड्याच दिवसाने भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात शेख शहीद हसन यांनी मांडली. गंमत अशी की, ब्रिटिशविरोधी असलेल्या खिलाफत पुढाऱ्यांनी तुर्कस्तानच्या अधिकाऱ्यांसमोर आपली बाजू मांडून खलिफा म्हणून अबदुल मजीदचे सर्व हक्क अबाधित राखण्यात यावेत अशी मागणी करण्यासाठी कट्टर सरकारधार्जिणे म्हणून प्रसिद्ध असलेले आगाखान आणि अमीर अली या दोघांना आपले प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले. १९२३ च्या डिसेंबरात आगाखान आणि अमीर अली यांनी जनरल इस्मत पाशा यांना पत्र पाठवून तुर्कस्तानात पुन्हा राजेशाही प्रस्थापित करण्यात यावी अशी मागणी केली. त्यांनी आपल्या त्या पत्राच्या प्रती तुर्कस्तानातील अनेक वृत्तपत्रांकडेही पाठविल्या

होत्या. ज्या वृत्तपत्रांनी भारतीय मुसलमान नेत्यांचे हे पत्र प्रसिद्ध केले त्याच्या संपादकांना तुर्कस्तानच्या सरकारने तात्काळ गिरफदार केले. सुन्नींच्या वतीने बोलण्याचा या दोघांना अधिकारच कसा प्राप्त होतो असा सवाल जनरल इस्मत पाशा यांनी उपस्थित केला. आणि आगाखान हे खोजा पंथाचे, तर अमीर अली हे शिया पंथीय असून इस्लाम धर्माच्या दृष्टीने ते दोघेही पाखंडी ठरतात असे म्हणून केमाल पाशाने त्या दोघांचाही पाणउतारा केला. भारतातील ब्रिटिशांचे आधारस्तंभ असलेल्यांनी तुर्कस्तानच्या राष्ट्रवादासंबंधी मतप्रदर्शन करावे हे मोठे विचित्रच म्हटले पाहिजे अशा शब्दात केमाल पाशाने त्यांची संभावना केली. त्यानंतर काही महिन्यांच्या आतच अबदुल मजीदला पदच्युत करून आणि खलिफाचे पदच नष्ट करून तुर्कांनी या प्रश्नाची कायमची वासलात लावून टाकली. या दोन नेत्यांची जी संभावना झाली त्यामुळे खिलाफतवादी अत्यंत हताश झाले. परंतु तरीही त्यांनी आशा सोडली नाही. फेब्रुवारी १९२४ च्या अखेरीस खिलाफत हे पद नष्ट करून टाकण्यात आल्यानंतर खिलाफत आणि जमीयतच्या नेत्यांना आकाश कोसळल्यासारखे झाले आणि इस्लामी खिलाफत हा इस्लाम धर्माच्या संरक्षणाचा गाभा असून ती संस्था कायम टिकविण्यासाठी जगातील साऱ्या मुसलमानांनी अंतिम त्यागाची तयारी ठेवावी असे त्यांनी आवाहन केले. शेरीफ हुसेन यांची खलिफा म्हणून नेमणूक करण्यात यावी अशी जी एक पर्यायी सूचना पुढे आली होती तिला त्यांनी सक्त विरोध दर्शविला आणि तुर्कस्तानने खिलाफत रद्द करण्याच्या आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा अशी विनंती केली. खिलाफतवाद्यांना आणखीही काही धक्के बसावयाचे होते. खिलाफत परिषदेच्या खजिनदाराने परिषदेच्या पैशाची अफरातफर केल्याचा आळ आला. खिलाफत नेत्यांनी सौदी अरेबियाच्या राजाकडे धाव घेऊन इस्लामच्या पवित्र स्थानांची देखभाल करण्याच्या कामी आणि हाज यात्रेच्या व्यवस्थेसंबंधी त्याला सल्लामसलत देण्यासाठी निरनिराळ्या देशातील मुसलमानांची एक प्रातिनिधीक समिती नेमावी अशी त्याला विनंती केली. सौदी अरेबियाचा राजा इब्न सौद यांनी ही विनंती झिडकारली इतकेच नव्हे तर त्याच्या सार्वभौम अधिकारावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. त्यामुळे खिलाफत नेत्यांनी हळूहळू मुस्लीम जगताच्या ऐहिक आणि पारमार्थिक नेतृत्वाच्या मृगजळाचा नाद सोडला आणि देशाच्या अंतर्गत प्रश्नातच ते अधिक लक्ष घालू लागले.

खिलाफत चळवळ चालू असताना देखील आपल्या जमातीचे हितसंबंध पुढे रेटण्याकडे मुसलमान पुढाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले नव्हते. डिसेंबर १९२१ मध्ये अहमदाबाद मुस्लीम लीगच्या अधिवेशनात, काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांचे उद्दिष्ट समान असून खिलाफतच्या प्रश्नावर हिंदूंनी मुसलमानांना फार मोठे साहाय्य केलेले असल्यामुळे लीग विसर्जित करण्यात यावी अशा आशयाचा ठराव अब्बास तय्यबजी यांनी मांडला

होता. परंतु त्या अधिवेशनाचे अध्यक्ष मौलाना हसरत मोहानी यांनी त्या ठरावाला जोरदार विरोध करताना असे भाष्य केले की, स्वराज्याच्या ध्येयाच्या आपण जस-जसे जवळ जाऊ तसतशी उलट लीगची आवश्यकता वाढत जाणार आहे कारण स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर तर मुसलमानांच्या खास अधिकारांसंबंधीचा प्रश्न अधिकच महत्वाचा ठरणार आहे. मौलाना साहेबांच्या मुखाने त्यावेळी जणू ही भविष्यवाणीच प्रकटली !

मोपल्यांच्या भीषण दंगलींचा सरकारी यंत्रणेने पुरेपूर फायदा घेऊन असहकार आणि खिलाफत या आंदोलनाच्याविरोधी धूमधडाक्याने प्रचार केला. बिगर हिंदूंच्या मनातही त्या दंग्यामुळे दहशत निर्माण झाली होती. आजच्या जमान्यातही इस्लामी राजवट कशी राहणार ते मलबारने दाखवून दिले आहे 'त्यामुळे यापुढे हिंदुस्तानात पुन्हा खिलाफती राज्य येणे नको......, खून, चोरीमारी, बलात्कार करणे, जे आपला धर्म सोडावयाला तयार नसतील त्यांची राखरांगोळी करून टाकणे किंवा त्यांना देशाबाहेर घालवून देणे हीच आपल्या धर्माची शिकवण आहे असे जे मानतात त्यांना सुसंस्कृत जगात स्थान असता कामा नये' असे उद्गार ॲनी बेझंट यांनी काढले होते. हिंदूंच्या भावनाही तितक्याच तीव्र बनल्या होत्या आणि मोपल्यांनी धर्मासाठी जो कडवा लढा दिला त्याबद्दल खिलाफत नेते त्यांचे समर्थन करीत असलेले पाहून तर हिंदूंची प्रतिक्रिया अधिकच तीव्र बनली होती. मौलाना हसरत मोहानींसारखे जबाबदार समजले जाणारे मुसलमान पुढारीदेखील मोपल्यांचा कैवार घेण्यास पुढे सरसावले होते आणि त्यांचे वेडेवाकडे समर्थन करीत सुटले होते.

१९१७ साली बिहारमध्ये झालेल्या दंगलीत हिंदू जास्त आक्रमक होते आणि त्यांनी मुसलमानांत दहशत निर्माण केली होती. त्यावर्षी भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात अनेक वक्त्यांनी या दंगलीबाबत हिंदू पुढाऱ्यांनी मौन पाळल्याचा आरोप करून त्याबद्दल जोराचा आक्षेप घेतला. वस्तुत: "हिंदू" वर्तमानपत्रांनी आणि "हिंदू" पुढाऱ्यांनी या दंगलीचा तीव्र निषेध केलेला होता. १९२१ च्या काँग्रेस अधिवेशनात मोपल्यांच्या बंडाची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. परंतु त्या अधिवेशनातच काही मुस्लीम पुढाऱ्यांनी विरोधी भूमिका घेऊन इतका आरडाओरडा केला होता की, त्यामुळे हिंदूंच्या भावना भडकून गेल्या आणि दंगलीला बळी पडलेले हिंदू चौकशी समितीपुढे साक्षी नोंदविण्यास पुढे आलेच नाहीत. त्यामुळे समितीला काही कामच करता आले नाही. हिंदूंच्या या मनस्थितीचा आणखी एक परिणाम म्हणजे शुद्धीकरणाच्या चळवळीचे पुनरुत्थान घडवून आणण्याची पुनरुज्जीवनवाद्यांना संधी मिळाली. १९०५ साली प्रथम आर्य समाजाने ही चळवळ हाती घेतली होती. तिने आता पुन्हा डोके वर काढले. त्याच काळात हिंदू महासभेच्या कामालाही चांगली चालना मिळाली. अनेक शहरांतून हिंदू महासभेच्या शाखा निघाल्या. तसेच मुसलमान समाजाकडून होणाऱ्या हल्ल्यांचा प्रतिकार करता यावा

म्हणून महासभेच्या पुढाऱ्यांनी स्वयंसेवक संघटना सुरू करून त्यांत सामील होणाऱ्या स्वयंसेवकांना शारीरिक शिक्षण देण्यास सुरवात केली. हिंदू महासभेतून फुटून निघालेल्यांनी पुढे या संघटनेचे रूपांतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघात केले. अशा तऱ्हेने हिंदू जातीयवादी संघटित होऊ लागल्याबरोबर मुसलमान समाज मागे राहणे शक्यच नव्हते. सुप्रसिद्ध राष्ट्रवादी मुस्लीम पुढारी डॉ. सैफुद्दीन किचलू यांनी तबलिघ आणि तनझिम नावाच्या दोन संघटना सुरू केल्या. मुसलमानेतरांना मुसलमान करून घेणे, त्यांच्यात इस्लामी भाईचाऱ्याची भावना रुजविणे आणि शुद्धीकरणाची चळवळ थोपवून धरून मुसलमान जमातीच्या हितसंबंधांचे रक्षण करणे ही त्या संघटनांची उद्दिष्टे होती.

शुद्धीकरणाची चळवळ इतकी फोफावली की, १९२३ च्या पूर्वार्धात एकट्या संयुक्त प्रांताच्या काही भागात मुसलमान धर्मात गेलेल्या १८,००० रजपूत गुजर आणि वाणी यांना परत हिंदू करून घेण्यात आले. शुद्धी संघटनेचे कार्यकर्ते दलितोद्धाराचे, विशेषत: चांभार समाजाच्या उद्धाराचेही काम करीत. त्यांना सवर्ण हिंदूंच्या बरोबरीचे स्थान मिळावे म्हणून ते विहिरी स्पृश्यास्पृश्यांना खुल्या करून देत. मुस्लिम वस्तीतील विहिरींवरून तणाव निर्माण होत. हिंदू आणि मुसलमान अशा दोघांनीही आखाडे आणि व्यायामशाळा सुरू केल्या. लहान-सहान कारणांवरून प्रतिस्पर्धी आखाड्यात कुरबुरी सुरू होत. प्रकरण विकोपास जाई आणि त्यातून दंगे उद्भवत. पंजाबातील तबलिघच्या धर्तीवरच निरनिराळ्या प्रांतातून निरनिराळ्या संघटना सुरू झाल्या. जमीयत व खिलाफत पुढारी अशा चळवळीत मोठ्या उत्साहाने भाग घेत. दोन्ही जमातीतील कडवे लोक, भाषणे, पत्रके, पुस्तिका इ. च्या मार्फत एकमेकांविरुद्ध प्रक्षोभक प्रचार करीत. वृत्तपत्रातून अतिरंजित व खोडसाळ मजकूर छापून आणीत. दिल्लीच्या ख्वाजा हुसेन निझामी या नावाच्या एका धर्मप्रसारकाने एक अत्यंत प्रक्षोभक पत्रक काढले. त्यात मुस्लिम अधिकारी आणि तनझीमचे स्वयंसेवक यांना तपशीलवार सूचना देण्यात आल्या होत्या. उदाहरणार्थ अधिकाऱ्यांनी आपले वजन खर्च करून आणि हाताखालच्या लोकांवर दडपण आणन मुसलमानेतरांचे धर्म परिवर्तन घडवून आणावे, ख्रिस्ती मिशनरी आणि आर्य समाजी कार्यकर्त्यासंबंधीची गुप्त माहिती जमा करावी, मुस्लीम फेरीवाले, फकीर, भिकारणी आणि वेश्या यांनी हिंदूंच्या घरावर पाळत ठेवून त्यांच्याविरुद्ध कंडी पिकविण्याजोगी माहिती मिळाली तर पहावी. हे पत्रक खाजगी उपयोगासाठी होते. परंतु आर्य समाजाच्या एका कार्यकर्त्याला आफ्रिकेत त्याची एक प्रत मिळाली. त्याने लगेच ते पुनर्मुद्रित करून घेऊन त्या धर्मप्रसारकाचे बिंग फोडले, इतकेच नव्हे तर मुल्ला मौलवीविरुद्ध झोड उठविण्यासाठी आणि हिंदूंना मुसलमानांविरुद्ध चिथावण्यासाठी त्याचा भरपूर उपयोग करून घेण्यात आला. या प्रचार युद्धात सत्याचा बळी पडला आणि निरनिराळ्या अफवांचा मात्र सुळसुळाट झाला.

शुद्धी संघटना आणि तबलिघ व तनझिम यांसारख्या प्रतिस्पर्धी चळवळी, एकमेकां-

विरुद्ध निरर्गल प्रचार आणि पंजाबमधील जातीयवादी प्रचार यामुळे पंजाब, संयुक्त प्रांत, अजमेर आणि सिंध या ठिकाणी १९२३ मध्ये जातीय दंगलींचा भडका उडाला. वर्तमानपत्रातील प्रचारामुळे सबंध देशातील सुशिक्षित हिंदूंची समजूत झाली की, जातीय बेबनावामुळे सर्वात जास्त नुकसान, त्यांनाच सोसावे लागते. त्यामुळे स्वयंसेवक संघटना आणि व्यायामशाळांच्या चळवळीला पुन्हा जोराने चालता मिळाली. मुलतान आणि अमृतसर येथेही भीषण दंगली घडून आल्या. सी. आर. दास, मोतीलाल नेहरू, सी. राजगोपालाचारी, मौलाना आझाद, सरोजनी नायडू आदी काँग्रेस नेत्यांनी जातीय सलोखा प्रस्थापित करण्यासाठी पंजाब प्रांताचा प्रदीर्घ दौरा केला. ताबुतांच्या, मिरवणुकीचा मार्ग, गोमांस आणि झटका मटनाची दुकाने बंद करणे, हिंदूंकडून मुसलमान कामगारांवर टाकण्यात येणारा बहिष्कार, नुकसान झालेल्यांना मिळावयाची भरपाई, ज्यांच्यावर फौजदारी खटले भरण्यात आले असतील त्यांच्यावरील ते खटले मागे घेणे यासारख्या नाजूक प्रश्नांवर निरनिराळ्या शहरातील दोन्ही बाजूच्या जातीयवादी पुढाऱ्यांबरोबर सांगोपांग चर्चा घडवून आणण्यात आली परंतु त्यातून काही निष्पन्न झाले नाही. उलट कायदेमंडळापासून तो थेट विद्यापीठे आणि सरकारी नोकऱ्या येथपर्यंत सर्व ठिकाणी जातीय तत्वावर प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे असा मुसलमानांनी आग्रह धरल्यामुळे परिस्थिती आणखीनच चिघळली. याबाबत काँग्रेसकडून विविध योजना पुढे मांडण्यात आल्या परंतु जातीयवादी पुढाऱ्यांनी त्या सपशेल फेटाळून लावल्या. अखेर सी. आर. दास यांना एका जाहीर सभेत पंजाबी लोकांना सांगून टाकावे लागले की, पंजाबी लोक आपापसातील भांडणे मिटवून तडजोड करावयास तयार नसतील तर त्यांचा नाद सोडून देऊन ऊर्वरित भारताकरिता स्वराज्य संपादण्यावर सारे लक्ष केंद्रित करण्यावाचून गत्यंतर उरणार नाही. सी. आर. दास आणि अन्य पुढाऱ्यांनी पंजाबप्रमाणेच इत्तर हिंदुस्थानातील इतर ठिकाणांनाही भेटी दिल्या. परंतु जातीय दंगलींचा वणवा ते थोपवू शकले नाहीत.

फेब्रुवारी १९२४ मध्ये गांधीजींची मुक्तता झाली. त्यावेळी राजकीय प्रश्नाबरोबरच जातीय वैमनस्याची समस्याही त्यांच्यासमोर आ वासून उभी होती. काँग्रेस पक्षांतर्गत मतभेद ते सहजपणे सोडवू शकले. परंतु जातीय प्रश्नांच्या बाबतीत मात्र परिस्थिती त्यांच्याही आवाक्यात राहिलेली नव्हती. ते सुटून आल्यापासून अवघ्या तीन महिन्याच्या अवधीत जातीय परिस्थिती आणखीनच बिघडली आणि अनेक ठिकाणी जातीय दंगली उसळल्या. बंगालमधील परिस्थिती अतिशय तंग बनली. त्यावेळची परिस्थिती किती निराशाजनक होती त्याचे वर्णन गांधीजींनी २९ मे १९२४ च्या हरिजनच्या अंकात लिहिलेल्या एका लेखात केले आहे :

'मुसलमानांचे ऐक्य घडवून आणून त्यांना जागृत करण्याला आणि मुल्ला मौलवींना यापूर्वी कधीही नसलेली प्रतिष्ठा मिळवून देण्यास मीच कारणीभूत आहे. खिलाफत प्रश्न आता निकालात निघालेला असल्याने या जागृत मुसलमानांनी

हिंदूंच्या विरूद्ध एक प्रकारचा जेहाद पुकारला आहे अशा तक्रारी करणारी पत्रे हिंदूंच्याकडून मला आली आहेत, या उलट एका मुसलमान मित्राने मला लिहिले आहे की, अलिगडमधील बहुसंख्य मुस्लिम विद्यार्थी युनिव्हर्सिटीतून बाहेर पडले व त्यामुळे त्यांनी स्वतःचे अपरिमित नुकसान करून घेतले. परंतु त्यामानाने फार थोड्या हिंदू विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजांवर बहिष्कार टाकला. मुसलमानांना मी कौन्सिल प्रवेश न करण्याचा आदेश दिल्यामुळे मुसलमानांची फार मोठी हानी झाली आहे...... बंगालमध्ये हिंदू स्त्रियांवर झालेल्या अत्याचाराच्या ज्या कहाण्या मला ऐकायला मिळाल्या त्यात सत्याचा भाग पन्नास टक्के होता असे धरले तरी देखील त्या मन अस्वस्थ करून टाकणाऱ्या आहेत. स्थानिक मुसलमानांनी आणि एकूणच मुसलमान नेत्यांनी हे अत्याचार करणारांना शासन व्हावे यापेक्षा देखील अशा प्रकारांची पुनरावृत्ती होवू नये म्हणून त्यांना हुडकून काढले पाहिजे.... (जातीय दंगलीच्या काळात प्रसिद्ध झालेली निरनिराळी अशोभनीय पत्रके त्यांना दाखविण्यात आली असता त्यांनी अशा पत्रकांचा निषेध केला. दिल्लीच्या ख्वाजा हुसेन निझामी यांच्या चोपड्यामुळे तर ते विशेषच व्यथित झाले. त्याचा समाचार घेताना त्यांनी असे म्हटले आहे.)..... मुखपृष्ठापासून तो मलपृष्ठापर्यंत मी हे चोपडे वाचून पाहिले आहे. धर्मप्रसारकानी प्रचार कसा करावा त्यासंबंधी त्यात तपशीलवार सूचना देण्यात आल्या आहेत. इस्लाम, ईश्वराशी ऐक्य जोडण्याची शिकवण देतो हे उदात्त तत्व सुरवातीला नमूद करण्यात आले आहे. या महान सत्याचा प्रसार प्रत्येकाने करावयाचा आहे मग त्याचे चारित्र्य कसेही असो अशी लेखकाची धारणा आहे. एक गुप्तहेर खाते सुरू करावे आणि प्रत्येक बिगर मुसलमानाच्या घरावर नजर ठेवून त्यांच्या खाजगी गोष्टी माहीत करून घ्याव्यात व त्यासाठी वेश्या, धंदेवाईक भिकारी, फकीर, सरकारी नोकर, वकील, डॉक्टर, कलाकार या सर्वांचा उपयोग करून घ्यावा असे लेखकाने सुचविले आहे. असे झाले तर गुप्तपणे कागाळी करणारांच्या तावडीतून एकही हिंदु कुटूंब सुटू शकणार नाही...... (जातीय दंगलीसंबंधीच्या ज्या हकीगती त्यांच्या कानावर आल्या त्यांची शहानिशा करून घेतल्यावर त्यांना असे आढळून आले की, या दंगलीत मुसलमानांपेक्षा हिंदूंना कितीतरी अधिक झळ पोहोचलेली आहे. त्यावरून हिंदुंच्या डरपोकपणाबद्दल त्यांनी हिंदुंची खरडपट्टी काढली आहे.) मुसलमान हा नेहमीच रानदांडगेपणा करतो तर हिंदू डरपोक असतो असा माझा अनुभव आहे. हिंदूंने स्वतःच्या भित्रेपणाबद्दल मुसलमानाला का म्हणून जबाबदार धरावे? कोणी भित्रेपणा केला की, त्याच्यावर दुसरे कुरघोडी करणारच..... (सहराणपूरच्या) मुसलमानांना आपल्या लज्जास्पद वर्तनाचे कोठल्याही प्रकारे समर्थन करता येणार नाही. परंतु मुसलमानांच्या अशा कृत्याबद्दल मला त्यांचा जितका राग येतो त्यापेक्षा एक हिंदू म्हणून

हिंदुंच्या भित्रेपणाबद्दल मला अधिक शरमल्यासारखे होते. ज्यांची घरे लुटली गेली त्यांनी आपल्या संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी प्राणार्पण का केले नाही? आया-बहिणींवर अत्याचार होत असताना त्यांचे नातेवाईक काय करीत होते? संकटापासून पळून जाणे किंवा आपले निकटवर्ती असुरक्षित असताना त्यांना सोडून निघून जाणे हे माझ्या अहिंसेत खासच बसत नाही.

सप्टेंबर महिन्यातील कोहटमधील जातीय दंगा म्हणजे एक वज्राघातच होता. तेथील सनातन धर्मसभेच्या चिटणिसांनी काही धार्मिक श्लोकांचा एक संग्रह रावळपिंडीत छापून घेऊन तो प्रकाशित केला. त्यातील एका श्लोकावर मुसलमानांनी आक्षेप घेतला व स्थानिक मुसलमानांनी त्या पुस्तिकेविरुद्ध निषेधाची एकच झोड उठविली. त्यामुळे त्या चिटणिसांनी त्याबद्दल लेखी माफी मागितली आणि पुस्तिकेच्या शेकडो प्रतींची जाहीरपणे होळी केली. परंतु तेवढ्याने मुसलमानांचे समाधान झाले नाही. त्यांनी शरीयतच्या कायद्यानुसार पुस्तककर्त्यावर खटला भरण्यात आला पाहिजे अशी मागणी केली. सनातन धर्मसभेच्या नेत्यांनी ही मागणी धुडकावून लावली. परंतु हे प्रकरण खिलाफत पुढाऱ्यांकडे सोपवावे व ते देतील ती सजा भोगण्यास आपण तयार आहोत असे जाहीर केले. तरीही संतप्त मुसलमानांनी आपला हेका सोडला नाही. आसपासच्या खेड्यांतून मुसलमानांच्या झुंडीच्या झुंडी कोहटमध्ये येऊन गर्दी करू लागल्या आणि वातावरण अतिशय तंग बनले. त्यांतच भयभीत झालेल्या हिंदूपैकी कोणी तरी बंदुकीची एक गोळी झाडली आणि लगेच जातीय दंगलीचा आगडोंब उसळला. अनेक हिंदू प्राणास मुकले. लाखो रुपयांची मालमत्ता लुटली गेली, किंवा नष्ट झाली आणि शेवटी कोहटमधील सर्व हिंदूंचे स्थलांतर करण्यास सरकारने मान्यता दिली. या दंगलीमुळे गांधीजी अवाक होऊन गेले आणि त्यांनी दिल्लीत २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांनी घाईघाईने ऐक्य परिषद बोलावली. काही काळपर्यंत शुद्धी संघटना, तबलिघ आणि तनझिम या संघटनांचे कामकाज बंद ठेवण्यात आले. बहुतेक सर्व पक्षांचे आणि प्रांतांचे पुढारी त्या परिषदेला उपस्थित राहिले होते. परिषदेत जातीय दंगलींना कारणीभूत ठरणाऱ्या विविध प्रश्नांसंबंधी एक आचारसंहिता एकमताने तयार करण्यात आली. तीन महिनेपर्यंत देशात कोठेही दंगल झाली नाही. परंतु हा सलोखा अल्पजीवी ठरला. आपल्या उपोषणाच्या काळात गांधीजी महंमद अलींच्या घरी राहिले होते. 'आजच्या युगातील जणू दुसरा ख्रिस्त' असे त्यांनी गांधींचे वर्णन केले होते. परंतु खिलाफत चळवळीतील उलेमांना महंमद अलींचे हे उद्गार रूचले नाहीत. गांधीजींची अशी स्तुती केल्याबद्दल त्यांनी महमंद अल्लींचा निषेध केला. उपोषण काळातच गांधींना महमंद अल्लींचे घर सोडून दुसरीकडे जावे लागले. त्यानंतर 'गांधी कितीही चारित्र्यसंपन्न असले तरी धार्मिकदृष्ट्या अगदी चारित्र्यहीन अशा मुसलमानांपेक्षा कमी दर्जाचे आहेत असेच मी मानले पाहिजे.....माझ्या धर्मानुसार

व्यभिचारी आणि भ्रष्ट मुसलमान हा देखील गांधीपेक्षा चांगला आहे असेच मी मानतो, असे महंमद अलींकडून त्यांच्या अनुयायांनीं जाहीरपणे वदवून घेतले. १९२४ च्या डिसेंबरात भरलेल्या मुस्लीम लीग, जमीयत-उल-उलेमा आणि खिलाफत परिषद यांच्या अधिवेशनात तानझिम आणि तबलिघ चळवळी पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. किचलूंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या खिलाफत परिषदेच्या अधिवेशनात असा निर्णय घेण्यात आला की, तनझिम चळवळ चालवणे हे प्रत्येक खिलाफत समितीचे महत्वाचे कार्य असल्यामुळे ज्या समित्या त्याकडे दुर्लक्ष करीत असतील त्या बरखास्त कराव्यात. मुस्लीम लीगच्या अधिवेशनात महंमद अलींनी जिनांनी केलेली विनंती फेटाळून कोहटच्या दंगलीबद्दल तेथील हिंदूचा निषेध करणाऱ्या ठरावाचा आग्रह धरला. शौकत अल्लींनी तर प्रथम गांधीजींच्या समवेत कोटहच्या दंगलीची संयुक्तपणे चौकशी करण्याची तयारी दर्शविली होती. तरीही त्यांनी देखील महमंद अल्लींचा ठराव उचलून धरला. शेवटी महंमद अल्लींचा ठराव् प्रचंड बहुमताने पास झाला. सरकारने गांधी व शौकत अल्ली यांना कोहटला जाण्याची परवानगीच नाकारल्यामुळे तेथील दंगलीच्या संयुक्त चौकशीचे कामकाज होवू शकले नाही. पुढे मार्च १९२५ मध्ये त्या दोघांनी रावळपिंडी येथे चौकशीचे कामकाज हाती घेतले. व साक्ष देण्यासाठी लोकांना मुद्दाम तेथे आमंत्रित करण्यात आले. परंतु त्यापूर्वी मुस्लीम लीगच्या अधिवेशनात हिंदूंचा निषेध करणाऱ्या ठरावास पाठिंबा देऊन शौकत अल्लींनी दंगलीबाबत आधीच आपले मतप्रदर्शन करून टाकले. त्यामुळे गांधी व शौकत अल्लीचा दंगलीसंबंधीचा संयुक्त अहवाल तयार झालाच नाही.

गांधींनी जातीय वैमनस्याच्या वातावरणाला आळा घालण्यासाठी जोरदार प्रयत्न करून पाहिले. त्यासाठी व्यक्तिगत आवाहन, मध्यस्ती आणि एकवीस दिवसांचे उपोषण यासारख्या अनेक मार्गांचा त्यांनी अवलंब करून पाहिला. एक वर्षानंतर या कामी आपल्याला अपयश आल्याचे त्यांनी कबूल केले. १ मे १९२५ रोजी कलकत्ता येथे भरलेल्या एका जाहीर सभेत भाषण करताना ते म्हणाले की, हिंदू-मुसलमानांमधील संघर्षाबाबत तोडगा शोधून काढण्यास मी असमर्थ ठरलो आहे. कारण हिंदू किंवा मुसलमान यापैकी कोणीच माझे ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत. जानेवारीपासून सबंध देशात जातीय दंगलींचा जो आगडोंब उसळला होता त्याचा उल्लेख करून ते पुढे म्हणाले की, "आपण दोघांनी एकत्र येण्यापूर्वी एकमेकांचे रक्त सांडले पाहिजे असेच जर आपल्या नशिबी असेल तर असा रक्तपात जितक्या लवकर होऊन जाईल तितका बरा, असे मी म्हणेन."

जालियनवाला बागेत झालेली कत्तल आणि पंजाब प्रांतातील उद्रेक यामुळे सारा पंजाब अशांत बनला. त्याची परिणती असहकार आंदोलनात झाली. मुसलमान, हिंदू आणि शीख या तिन्ही समाजाचे लोक जालियनवाला बाग प्रकरणानंतर झालेल्या आंदोलनात सहभागी झाले होते. परंतु ही एकजूट फार काळ टिकू शकली नाही.

द्विदल राज्यपद्धती सुरू झाल्याबरोबर मुसलमान आणि बिगर मुसलमान यांच्यात कमालीचे जातीय वैमनस्य निर्माण झाले. सर फजली हुसेन यांनी कायदेमंडळातील मुसलमान सभासदांचा 'मुस्लिम पार्टी' या नावाचा एक रीतसर पक्ष बनवला. आणि सरकारी गटाचा पाठिंबा मिळवून कायदेमंडळात निर्विवाद बहुमत संपादन केले. सरकार अशा पक्षाच्या कारवायांकडे कानाडोळा करावयास तयार होतेच. त्याचा फायदा घेऊन सर फजली हुसेन यांच्या पक्षाने प्रांतिक प्रशासन आपल्या नियंत्रणाखाली आणले. लखनौ करारान्वये कायदेमंडळात मुसलमानांना पन्नास टक्के जागा मिळणार होत्या. त्याचा आधार घेऊन सरकारी नोकऱ्यांतही मुसलमानांना त्याच प्रमाणात जागा मिळाव्यात अशी मागणी करण्यात आली. पंजाब सरकारने लगोलग ती मान्यही करून टाकली. त्याशिवाय वर 'द मुस्लिम आऊटलुक' या सर फजली हुसेन यांच्या वृत्तपत्राला अनुदानही मंजूर केले. वरिष्ठ जागांच्या बाबतीत पात्रतेसंबंधीच्या पूर्वीच्या अटी मुसलमानांच्या बाबतीत बाजूला सारण्यात आल्या. उदाहरणार्थ असिस्टंट सर्जन्सच्या पाच जागा भरताना एम. बी. बी. एस. परीक्षेत पहिल्या आलेल्या हिंदू उमेदवाराला डावलून त्याच्यापेक्षा कितीतरी कमी मार्क असलेल्या मुसलमान उमेदवारांच्या नेमणुका करण्यात आल्या. प्रांतिक सरकारच्या आरोग्य खात्यांतील नोकऱ्यांत मुसलमानांचे प्रमाण पुरेसे नसल्याचे कारण दाखवून सरकारने या नेमणुकांचे जाहीर समर्थन केले. पंजाब सरकारच्या १९१९ च्या ठरावान्वये ६० टक्के जागा शेती व्यवसाय करणाऱ्या म्हणून जाहीर करण्यात आलेल्या जातीतील लोकांकरता राखून ठेवण्यात आल्या होत्या. त्यात आता मुसलमानांचे नोकरीतील प्रमाण ५० टक्क्यापर्यंत आणण्याचा नवा निर्णय घेण्यात आल्यामुळे हिंदू उमेदवारांना सरकारी नोकरीचे दरवाजेच बंद झाल्यासारखे झाले. त्यामुळे पंजाबातील शहरी वर्ग, शुद्धी संघटनांसारख्या चळवळीकडे आकर्षिला गेला.

पंजाबमध्ये द्विदल राज्यपद्धती सुरू झाल्यामुळे शीख समाजही दुखावला गेला होता. शीख समाज ही पंजाबच्या राजकारणातील एक उपेक्षा करता येण्यासारखी शक्ती नसल्यामुळे गुंतागुंत अधिकच वाढली. मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्यानुसार पंजाबात स्वतंत्र मतदार संघ निर्माण करण्यात आले नव्हते. त्यामुळे सर्व प्रांतात विखुरलेल्या शिखांना कायदेमंडळाच्या निवडणुकीत मोठ्या मुष्किलीने अवघी एक जागा मिळाली आणि तीही फार थोड्या मताधिक्याने. लखनौ करारात शीख समाजाला संपूर्णपणे डावलण्यात आल्याबद्दल शीख अतिशय नाराज झाले होते. मुसलमानांनी काही काळ हिंदुस्तानवर राज्य केले होते आणि ब्रिटिश हिंदुस्तानच्या सैन्यात ते फार मोठ्या संख्येने सामील झाले होते या दोन मुद्यावर मुसलमानांचे राजकीय महत्व जर मान्य करण्यात येते तर त्याच कारणास्तव शिखांनाही ते का प्राप्त होऊ नये? कारण हजारो शीख सैन्यात भरती होऊन सरकारची सेवा बजावीत असतात, रणजितसिंगाचे साम्राज्य तर मोगल साम्राज्याच्याही नंतर अगदी अलीकडे इंग्रजांनी

जिंकून घेतले होते. शिवाय शिक्षणाच्या बाबतीत ते पुढारलेले असून मेहनती म्हणून प्रसिद्ध आहेत असा शिखांचा दावा होता. शीख समाजाच्या नेत्यांनी मॉंटेग्यू आणि चेल्म्सफर्ड यांची भेट घेऊन आपल्याला स्वतंत्र मतदार संघ आणि लोकसंख्येच्या प्रमाणाहून अधिक प्रतिधिनित्व मिळावे अशी मागणी केली. नंतर त्यांनी राष्ट्रीय नेत्यांशीही संपर्क साधला आणि पुढे कसलाही करार झाला तर त्यावेळी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाणार नाही असे आश्वासन मिळविले.

शीख समाजातील पुनरुज्जीवनवादी चळवळीची सुरुवात प्रथम निरंकारी आणि नामधारी पंथांच्या स्वरूपात सुरू झाली. या दोन्ही पंथांनी शीख सामाजात पुन्हा धार्मिक भावना प्रज्वलित केली. शीखांच्या परंपरागत गुरुद्वारावर मूळ महंतांच्या वंशजांचा अंमल चालत असे. कित्येक पिढ्यांपूर्वी गुरुद्वारांच्या संस्थांपकांनी या महंतांच्या नेमणुका केलेल्या होत्या. पुनरुज्जीवनवादी चळवळीची प्रेरणा शिखांचे शेवटचे महान गुरू गुरू गोविंदसिंग यांच्या लढाऊ शिकवणुकीपासून घेतलेली होती गुरुद्वारांवर ताबा असलेले महंत हे आधीच्या गुरूंचे अनुयायित्व सांगत परंतु गुरुद्वारांच्या ताब्यातील मालमत्तेचा ते दुरुपयोग करीत आणि ऐषारामी जीवन जगत. त्यामुळे सुधारणावादी शीख पुढाऱ्यांनी गुरुद्वारांचा ताबा मिळविण्याचा प्रयत्न आरंभिला त्यासाठी १९ व्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या सुरवातीला अनेक दिवाणी दावे दाखल करण्यात आले. पण ते निष्फळ ठरले तेव्हा पुनरुज्जीवनवाद्यांनी गुरुद्वारांच्या व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि त्यावर 'पंथाचे' नियंत्रण बसविण्यासाठी 'शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती' या नावाची संघटना उभी केली. १९२० च्या नोव्हेंबर महिन्यात अमृतसर येथे शिखांचा एक प्रचंड मेळावा भरविण्यात आला. या मेळाव्यात अमृतसरच्या सुवर्ण मंदिराचा ताबा मिळविण्यासाठी समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु सरकारने सुवर्ण मंदिराची व्यवस्था पाहाण्यासाठी एक स्वतंत्र समिती नेमली व सुवर्ण मंदिराच्या किल्ल्या मेळाव्यात नेमण्यात आलेल्या समितीकडून ताब्यात घेतल्या. त्यामुळे शीख जनता प्रक्षुब्ध झाली व पहिला अकाली सत्याग्रह घडून आला. दोन महिन्यात सरकारने अटक केलेल्या सत्याग्रहींची मुक्तता केली आणि किल्ल्या प्रबंधक समितीच्या हवाली केल्या. इतर ठिकाणच्या गुरुद्वारांचा ताबा मिळविण्यासाठीही असेच सत्याग्रह झाले. तारणतारणसारख्या काही ठिकाणच्या महंतांनी शरणागती पत्करून गुरुद्वारे समाजाच्या हवाली केली. परंतु नानकानासाहेब येथे मात्र रक्तपात झाला. महंतांच्या पाठिराख्यांनी स्वयंसेवकांवर हल्ला चढवला. त्यात दीडशे लोक प्राणास मुकले. तेथील महंताने माघार घेऊन गुरुद्वाराची मालमत्ता निदर्शकांच्या स्वाधीन केली. परंतु सरकारने मात्र ती त्याला परत केली आणि स्वयंसेवकांची सरसकट धरपकड सुरू केली. गुरू का बाग प्रकरणातही स्थानिक महंतांच्या पाठिराख्यांनी स्वयंसेवकावर हल्ला चढवून शेकडो जणांना जखमी केले. त्याठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर

सत्याग्रह करण्यात आला. सरकारने शीख पुढाऱ्यांवर अनेक जाचक निबंध लादले. आंदोलनात भाग घेतल्याबद्दल बऱ्याच निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांची पेन्शने बंद करण्यात आली. तर अनेकांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या. गुरु का बाग येथे सत्याग्रह केलेल्या सत्याग्रहींच्या मुक्ततेची शिफारस करणारा ठराव पंजाब कायदे मंडळाने पास केला असतानाही त्याकडे सरकारने दुर्लक्ष केले.

पंजाब सरकारने कायदेमंडळातील मुसलमान सभासदांच्या संपूर्ण पाठिंब्याच्या जोरावर आपली दमननीती चालूच ठेवली. लखनौ कराराच्या धर्तीवर मुसलमानांना सरकारी नोकऱ्यांतही निम्म्या जागा मिळाल्या पाहिजेत अशी सर फजली हुसेन यांची भूमिका होती. परंतु त्याच करारातले एकाद्या जातीच्या नकारधिकाराचे तत्व शीखांच्या बाबतीत मात्र ते मानावयाला तयार नव्हते. सबंध शीख समाजाचा संपूर्ण विरोध असतानाही बहुमताच्या जोरावर त्यांनी १९२२ साली गुरुद्वारा बिल पास करवून घेतले. शीखांचे एक शिष्टमंडळ या संबंधात गव्हर्नरांना भेटले असता पंजाब कायदेमंडळात फजली हुसेन यांच्या पक्षाचे बहुमत असल्याने या प्रकरणी हस्तक्षेप करण्यासही आपण असमर्थ असल्याचे त्यांनी सांगितले. फजली हुसेन यांनी जास्तीत जास्त स्थानिक स्वराज्य संस्थात मुसलमानांचे बहुमत राहील अशा तऱ्हेने मतदार संघांची फेररचना करून घेतली. त्यातच शीखांच्या सुधारणावादी आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या नाभा संस्थानच्या राजाला सरकारने सक्तीने राजत्याग करावयास भाग पाडल्याने शीख समाज आणखीनच दुखावला गेला. शीख समाजातील असंतोषाची कारणे शोधून काढून त्यावरील उपाय सुचविण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी अशा आशयाचा सरदार गुलाबसिंग यांचा ठराव तारीख २६ फेब्रुवारी १९२४ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळाने संमत केला. आपल्या भाषणात शीखांवरील अत्याचारांचे वर्णन करताना सरदार गुलाबसिंग यांनी औरंगजेबाच्या सुभेदारांचा दाखला दिल्यामुळे काही मुसलमान सभासदांशी त्यांच्या शाब्दिक चकमकी झडल्या. शिरोमणी गुरुद्वारा प्रतिबंधक समिती ही शीखांचे प्रतिनिधित्व करणारी एकमेव संस्था आहे असे सांगून सरदार कर्तारसिंग यांनी शीखांवर झालेल्या अनेकविध अत्याचारांना वाचा फोडली. परंतु होममेंबर सर मालकम हेले यांनी शीख सत्याग्रहींना वाईट तऱ्हेने वागविण्यात आल्याच्या आरोपाचा इन्कार केला. उलट शीख समाजातच एकमत नसल्याचे आणि राजकीय निदर्शनांपासून अलिप्त राहण्याचे शीख सत्याग्रहींनी नाकारले असे सांगून सरकारी कार्यवाहीचे समर्थन केले. समिती नेमण्यासंबंधीचा ठराव सभागृहाने एकमताने संमत केला पण सरकारने त्याची अंमलबजावणी करण्याचे नाकारले. त्याच वर्षीच्या अंदाजपत्रकी अधिवेशनात मास्टर तारासिंग यांनी सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध म्हणून पंजाब कायदेमंडळात कपात सूचना आणली होती.

तुरुंगातून सुटल्याबरोबर १९२२ च्या मे महिन्यापासून सी. आर. दास यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांपासून तो थेट मध्यवर्ती कायदेमंडळापर्यन्तच्या सर्व निवडणुका

काँग्रेसने लढवाव्यात म्हणून प्रचार मोहीम सुरू केली. राष्ट्रवाद्यांनी या लोकनियुक्त संस्थांवर बहिष्कार घातल्यामुळे सरकारधार्जिण्या लोकांनी त्या ताब्यात घेतल्या असून राष्ट्रवादी चळवळ दडपून टाकण्यासाठी ते सरकारला हातभार लावीत आहेत. म्हणून काँग्रेसने निवडणुकांवर बहिष्कार न टाकता कायदेमंडळात जाऊन अडवणुकीचा मार्ग अवलंबावयास पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. सी. आर. दास यांनी हा जो धोरणविषयक बदल सुचविला त्यामुळे काँग्रेसमध्ये फेरवादी आणि नाफेरवादी असे उघडउघड दोन तट पडले. देशाच्या निरनिराळ्या भागातील असहकार आंदोलनाचा आढावा घेण्यासाठी काँग्रेस वर्किंग कमेटीने जी समिती नेमली होती तिच्यातही असेच दोन गट असल्याचे दिसून आले. डॉ. एम. ए. अन्सारी, के. आर. अयंगार आणि सी. राजगोपालाचारी यांच्याकडे नाफेरवाद्यांचे नेतृत्व होते तर हकीम अजमलखान, मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल हे फेरवादी नेते होते. १९२२ च्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष सी. आर. दास यांनी काँग्रेसने धोरणात्मक बदल, स्वीकारावा म्हणून जोरदार आग्रह धरला. परंतु त्यांचा पराभव झाला. त्यामुळे दुसऱ्या दिवशी त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि मोतीलाल नेहरू यांनी स्वराज्य पार्टीच्या स्थापनेची घोषणा केली. पुढच्या वर्षी दिल्लीला मौलाना आझाद यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे खास अधिवेशन भरले होते. त्यांनी सी. आर. दास आणि मोतिलाल नेहरू यांची बाजू उचलून धरली. शेवटी अधिवेशनात तडजोडीचा ठराव पास करण्यात आला. त्या ठरावान्वये सरकारबरोबरचा विरोध कायदेमंडळातून चालू ठेवण्यासाठी आगामी निवडणुकात भाग घेण्याची काँग्रेसजनांना परवानगी देण्यात आली. १९२३ च्या डिसेंबर महिन्यात भरलेल्या जमीयत-उल-उलेमांच्या अधिवेशनात निवडणुकात सहभागी होणे म्हणजे इस्लामच्या शरीयत कायद्याविरुद्ध वर्तन करण्यासारखे आहे असे जाहीर करण्यात आले. त्यापूर्वी भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात तर या प्रश्नावर इतका गदारोळ उसळला होता की ते, अधिवेशनच तहकूब करावे लागले. अलाहाबादहून स्वराज्य पक्षाचा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. उत्तर हिंदुस्तानातील अनेक प्रांतात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात स्वराज्य पक्षाला मतदारांचा भरघोस पाठिंबा मिळाला. सार्वत्रिक निवडणुकीत स्वराज्य पक्ष हा मध्यवर्ती कायदेमंडळातील सर्वात मोठा गट म्हणून निवडून आला. मध्य प्रांताच्या कायदेमंडळात तर त्याला निर्विवाद बहुमत मिळाले आणि पंजाब व मद्रास प्रांत वगळता इतरत्रही त्यांचे सभासद मोठ्या संख्येने निवडून आले. मध्यप्रांत आणि बंगालमध्ये स्वराज्य पक्षाला मंत्रि-मंडळ बनविण्यासाठी आमंत्रित करण्यात आले परंतु ते पक्षाने नाकारले.

१९ डिसेंबर १९२३ रोजी बंगालमधील स्वराज्य पार्टीने कायदेमंडळातील मुस्लीम गटाबरोबर लखनौ करारात काही फेरबदल करून एक अधिक व्यापक करार केला. या करारान्वये बंगालमधील मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कायदेमंडळात

प्रतिनिधीत्व देण्यात आले. स्वतंत्र मतदार संघाची पद्धत मान्य करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत की नाही हा प्रश्न खुला ठेवण्यात आला. परंतु प्रत्येक जिल्ह्यात बहुसंख्य जमातीसाठी साठ टक्के जागा राखून ठेवण्यात याव्यात आणि उरलेल्या चाळीस टक्के जागा अल्पसंख्य जातींना देण्यात याव्यात असे ठरविण्यात आले. सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण मुसलमानांसाठी ५५ टक्के आणि बिगर मुसलमानांसाठी ४५ टक्के असे ठरविण्यात आले तसेच सुरवातीच्या काळात किमान पात्रता असलेल्या मुसलमान उमेदवारांतून नोकरीच्या प्रमाणातील फरक भरून काढावा. मशिदीपाशी दिवसाच्या चोवीस तासात केव्हाही वाद्ये वाजवू नयेत. आणि गायींच्या कत्तलीवर कोणतेही निर्बंध असू नयेत ह्या मुसलमानांच्या मागण्या पक्षाने मान्य केल्या. जातीय तणावाला कारणीभूत होणारे प्रश्न मिटविण्यासाठी प्रत्येक तालुका पातळीवर समित्या नेमण्यात याव्यात असेही ठरविण्यात आले. याच्या बदल्यात मुसलमान सभासदांनी स्वराज्य पक्षाच्या अडवणुकीच्या कार्यक्रमात सहभागी होण्याचे त्याचप्रमाणे राजकीय कैद्यांची मुक्तता करण्यात यावी आणि दडपशाहीचे सर्व कायदे मागे घेण्यात यावेत या मागण्यांना पाठिंबा देण्याचे कबूल केले. लोकनियुक्त संस्था आणि सरकारी नोकऱ्यांतील जागाबाबतच्या तरतुदींची अंमलबजावणी स्वराज्य प्राप्त करून घेण्यात आल्यानंतर करण्यात यावी असेही या नव्या करारानुसार ठरविण्यात आले होते. १९२३ पर्यंत हिंदूमहासभेचा उत्तर हिंदुस्थानात चांगला जम बसला होता व सभेच्या अनेक शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. या बंगाल कराराचा हिंदूमहासभेने तीव्र निषेध केला. बंगालमध्ये अनेक ठिकाणी निषेध सभा घेतल्या. फक्त प्रार्थनेच्या वेळात मशिदीसमोर वाद्ये वाजवू नयेत अशी प्रथा असताना सबंध दिवसात केव्हाही वाद्ये न वाजविण्याचे मान्य करून स्वराज्य पक्षाने मुसलमानांपुढे लोटांगणच घातले आहे अशी टीका या सभातून करण्यात आली. गोहत्येला परवानगी देण्यात आल्याबद्दलही स्वराज्य पक्षाचा निषेध करण्यात आला. बंगाल करारावरून जो वाद निर्माण झाला त्यामुळे जातीय परिस्थिती आणखीनच चिघळली.

स्वराज्य पक्ष आणि बंगाल करारावर सही करणारे मुसलमान सभासद यांच्या एकजुटीमुळे सरकारची फार पंचाईत झाली तेव्हा सरकारने सर अबदुल रहीम यांची गव्हर्नरांच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलवर फेरनेमणूक केली तसेच ए. के. गझनवी आणि फजलूल हक यांना मंत्री म्हणून घेण्यात आले. या तिघांनी बंगाल कराराला तीव्र विरोध करून सरकारशी संपूर्ण सहकार्य करण्याचा निर्णय घेतला होता.

मुस्लीम लीगचे कामकाज १९२०–२१ पासून जवळजवळ बंदच पडले होते. १९२४ च्या मे महिन्यात फजली हुसेन यांनी जिनांच्या सहकार्याने त्याला पुन्हा चालना दिली व त्याच महिन्यात लाहोर येथे लीगचे अधिवेशन भरविले. त्या अधिवेशनापुढे भाषण करताना त्यांनी लखनौ करारावर सह्या करून मुसलमानांनी आधीच

आपल्या हितसंबंधांच्या बाबतीत त्याग केलेला आहे. इतर कोणालाही असा त्याग करावा लागलेला नाही. तरीही पुन्हा त्यांनाच आणखी त्याग करावयास इतर समाजांकडून सांगितले जात आहे अशी कडवट टीका केली. अधिवेशनात अनेक वक्त्यांनी लखनौ करार सुधारून घेण्यासंबंधी निरनिराळचा सूचना मांडल्या. अधिवेशनाला एकूण १३० प्रतिनिधी हजर होते. त्यापैकी ९७ एकटचा पंजाब प्रांतातील होते. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मागावे अशी त्यांची सूचना होती. परंतु मुस्लीम लीगच्या घटनेनुसार प्रत्येक प्रांताला मतांचा कोटा (प्रमाण) ठरवून देण्यात आला. बंगालमध्ये मुसलमानांची संख्या सर्वात जास्त असल्यामुळे एकूण मतांपैकी ६० टक्के मते बंगालच्या वाटचाला आली होती. बंगालमधून अधिवेशनाला फक्त दोन प्रतिनिधी आले होते. आणि ते दोघेही सरकारधार्जिण्या अश्रफांपैकी होते. मुस्लीम लीगच्या या अधिवेशनात संयुक्त प्रांतातील डॉ. झियाउद्दिन अहमद यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात मुसलमानांना प्रतिनिधित्व मिळावे अशा आशयाच्या ठरावाला जोरदार विरोध करून अल्पसंख्यांकांना पुरेसे आणि प्रभावी ठरू शकेल असे प्रतिनिधित्व देण्याची तरतूद असावी अशी उपसूचना मांडली होती. अधिवेशनातील एकूण १३० पैकी ९७ प्रतिनिधी पंजाबमधील होते. तरीही लीगच्या घटनेतील वर नमूद केलेल्या विशिष्ट तरतुदीमुळे डॉ. झियाउद्दिन यांची उपसूचना १२६ विरूद्ध ८३ मतांनी पास झाली. अधिवेशनात मुसलमानांच्या नवीन मागण्यांचा खर्डा तयार करण्यासाठी एक व्यापक समिती नेमण्यात आली.

१९२४ च्या मे महिन्यात भरलेले मुस्लीम लीगचे अधिवेशन हे आदल्या वर्षी तहकूब झालेले अधिवेशन होते. त्यामुळे त्यावर्षीचे रीतसर अधिवेशन कौन्सिल ऑफ स्टेटचे सरकारनियुक्त सभासद सैयद रेझा अल्ली यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनापासून लीगचे नेतृत्व पुन्हा सरकारधार्जिण्या अश्रफांच्या हाती गेले. खिलाफतवाद्यांची ब्रिटिश विरोधाची जहाल भूमिका केव्हाच मावळली होती. महमद अली व त्यांचे सहकारी पुन्हा मुस्लीम लीगच्या अधिवेशनात सहभागी होवू लागले. सैयद रेझा अली यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात असहकार आणि कायदेमंडळातून अडवणुकीचे धोरण यावर टीकास्त्र सोडले. लखनौ कराराला आपला विरोध नाही असे म्हणत त्यांनी लखनौ कराराचा फेरविचार होऊन पंजाब आणि बंगाल मधील कायदेमंडळात मुसलमान सभासदांची संख्या जास्त राहील अशी कायदेशीर तरतूद करण्याची मागणी मात्र केली. त्याचप्रमाणे सिंध आणि बलुचिस्तान असे दोन नवे प्रांत करण्यात यावेत आणि वायव्य सरहद्द प्रांतासकट या नव्या प्रांतांना सुधारणा कायदा लागू करण्यात यावा या मागणीचाही त्यांनी पुनरुच्चार केला. पंजाबप्रमाणे या तीनही प्रांतात जातीय सरकारे प्रस्थापित करता यावीत हाच त्यांच्या मागणीमागील खरा उद्देश होता हे उघड आहे. जिल्हा लोकल बोर्डात मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधीत्व न दिल्याबद्दल त्यांनी संयुक्त प्रांतातील हिंदूंना धारेवर धरले. कायदेमंडळाप्रमाणे

बोर्डातही मुसलमानांसाठी ३० टक्के जागा राखून ठेवण्याऐवजी २५ टक्केच जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत असा त्यांचा आक्षेप होता. लखनौ करारातील जातीय नकाराधिकाराची त्यांनी जोरात तरफदारी केली. परंतु फजली हुसेन पंजाबमध्ये त्याची पायमल्ली करीत असताना त्याबद्दल मात्र त्यांनी चकार शब्दही उच्चारला नाही. खरे तर जीना वगैरेंनी देखील पुढे अनेकदा जातीय नकाराधिकाराचा आग्रह धरला परंतु त्यापैकी एकानेही फजली हुसेन यांच्या गुरुद्वारा बिलासंबंधी कधी चुकून एक अवाक्षरही काढले नाही. पूर्वी नेमलेल्या समितीची एकही बैठक भरलेली नसताना त्याबद्दल कसलाही ऊहापोह न करता मुस्लीम लीगच्या मुंबई अधिवेशनात जीनांनी मांडलेल्या ठरावानुसार कायदेमंडळे आणि इतर लोकनियुक्त संस्थांतून मुसलमानांना किती प्रतिनिधीत्व असावे, त्याचप्रमाणे सरकारी नोकऱ्यात त्यांचे प्रमाण काय असावे यासंबंधीचा मसुदा तयार करण्यासाठी पहिल्याहूनही मोठी समिती नेमण्यात आली. १९२४ च्या अखेरीस हिंदुस्थानातील सर्व राजकीय पक्षांची परिषद भरली होती व त्या परिषदेने स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी एक समिती नेमली होती. जीना हे त्या समितीचे एक सभासद होते. परंतु समितीच्या कामकाजात त्यांनी कधीच भाग घेतला नाही. समितीच्या अगदी शेवटच्या बैठकीस मुसलमानांच्या मागण्या काय राहतील ते सादर करण्यापुरतेच ते उपस्थित राहिले व मागण्या सादर करण्यापुरतेच ते उपस्थित राहिले व मागण्या सादर करून ते बैठकीतून निघून गेले त्या मागण्यानुसार लखनौ करारान्वये मुसलमानांना देण्यात आलेले पंजाब व बंगाल कायदेमंडळातील प्रतिनिधीत्व तेवढे वाढविण्यात यावे बाकी त्या करारातील तरतुदी जशाचा तशा कायम ठेवाव्यात असे त्या मागण्यांत म्हटले होते.

१९२५ च्या डिसेंबरात अलिगडला भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात आलेल्या अशाच आशयाच्या एका ठरावाला जीना यांनी पाठिंबा दिला होता. इतकेच नव्हे तर कायदा करून लखनौ करारातील नकाराधिकाराची राज्यघटनेत तरतूद करण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली होती. मुंबई इलाख्यापासून सिंध प्रांत वेगळा काढण्याची मागणी करणारा ठरावही त्या अधिवेशनात संमत करण्यात आला. अध्यक्ष सर अबदुर रहीम यांनी आपल्या भाषणात हिंदुस्तानात इंग्रजी सत्ता कायम टिकून राहणे आवश्यक आहे असे प्रतिपादून राष्ट्रवादाच्या संकल्पनेलाच विरोध दर्शविला. हिंदू आणि मुसलमान हे केवळ धर्माने अलग आहेत एवढेच नव्हे तर ते स्वतंत्र जनसमूह म्हणजेच दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत असे आग्रहपूर्वक मांडताना ते पुढे म्हणाले की, या दोघांचे धर्म वेगवेगळे आहेत त्याचप्रमाणे त्यांची जीवनपद्धती संस्कृती, सामाजिक रीतिरिवाज, त्यांचा इतिहास, त्यांच्या परंपरा हे सर्वच अगदी भिन्न आहे. त्यामुळे केवळ हजार बाराशे वर्षे ते एका देशात राहात आहेत एवढ्या-वरून त्यांचे एक राष्ट्र बनू शकणार नाही. या उलट संस्कृती, इतिहास, परंपरा, धर्म याविषयींचे साधर्म्य आणि वंश व भाषा या विषयींची आत्मीयता यामुळे केवळ

हिंदुस्थानातीलच नव्हे तर जगातील कोठल्याही देशातील मुसलमानांत परस्पराबद्दल बंधुभाव आणि सहानुभूती निर्माण होत असली तरी त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही असे सांगून ते पुढे म्हणाले की, आपल्या गावातील हिंदू मोहल्यापेक्षा अफगाणिस्तान, पर्शिया यासारख्या मुस्लिम देशात त्यांना घरच्यासारखे वाटते. बंगाल कायदेमंडळात मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव पास केल्याबद्दल त्यांनी स्वराज्य पक्ष आणि त्याला पाठिंबा देणारे मुस्लीम सदस्य यावर टीका केली आणि स्वराज्य पक्ष हे 'एक थोतांड' असून त्याला पाठिंबा देणारे मुसलमान सभासद हे 'बंगालमधील मुस्लीम मतदारांवर लादले गेलेले एक ढोंग आहे' असे त्यांनी सांगितले. एका मुस्लीम फकीराचे म्युनिसिपल मार्केटमध्ये दफन करण्याच्या प्रश्नावरून स्वराज्य पक्षातून बाहेर पडण्यास नकार देणाऱ्या मुस्लीम सभासदांनाही त्यांनी धारेवर धरले. देशात, त्याचप्रमाणे सर्व कायदेमंडळातून संघटित मुस्लीम पार्टी, उभारण्याची आवश्यकता प्रतिपादन करून त्यांनी असे दाखवून दिले की, मुस्लीम सभासदांनी जेव्हा जेव्हा युरोपीय सभासदांशी सहकार्य केले तेव्हा तेव्हा ते आपल्या सर्व मागण्या पदरात पाडून घेऊ शकले आहेत. मतदारांना जबाबदारीने मतदान करण्याची पात्रता नसल्याने स्वयंनिर्णयाच्या मागे न लागता मुसलमानांनी प्रत्येक प्रांतात किमान ३३ टक्के प्रतिनिधित्व मिळविण्यावर आपले लक्ष केंद्रित करावे व सरकारातील युरोपीय सभासदांचे सहकार्य व सदिच्छा संपादण्यावर भर द्यावा असे सांगून त्यांनी आपले भाषण संपविले. राष्ट्रवादाचा धिक्कार, द्विराष्ट्रवादी सिद्धांताचा पुनरुच्चार आणि ब्रिटिश सत्तेला उघड पाठिंबा यांवरील अध्यक्षांचा भर आणि हिंदूंवर त्यांनी सोडलेले टीकास्त्र यामुळे बहुसंख्य हिंदुत संतापाची लाट उसळली.

१९२५ च्या डिसेंबर महिन्यात भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाला अली बंधू आणि मौलाना आझाद वगळता एकही मुस्लीम प्रतिनिधी हजर नव्हता. नेहमी मोठ्या संख्येने काँग्रेस अधिवेशनाला येणारे मुसलमान या अधिवेशनाकडे फिरकलेलेही नाहीत ही गोष्ट मालवीयजींनी अधिवेशनाच्या नजरेस आणून दिली.

## प्रकरण नववे

# मॉटफर्ड सुधारणांचा प्रभाव

गांधीजींची मुक्तता झाली त्यावेळी काँग्रेस फेरवादी आणि नाफेरवादी गटात विभागली गेली होती. असहकार आणि शांततामय कायदेभंग या कार्यक्रमालाच चिकटून राहावे असे म्हणणाऱ्या नाफेरवाद्यांचा आत्मविश्वास बोरसदच्या करबंदीच्या चळवळीमुळे आणि नागपूरच्या झेंडा सत्याग्रहामुळे वाढला होता. गुजरात-मधील बोरसद तालुक्यात देवरबाबा नावाच्या हद्दपार केलेल्या एका गुंडाचा बंदोबस्त करण्याची कामगिरी सरकारने एका फरारी मुस्लीम खुनी दरोडेखोराकडे सोपविली व त्याच्या दिमतीला पाच हत्यारी पोलिसांची एक तुकडीही दिली. पोलिसांच्या मदतीने या दरोडेखोराने फार मोठ्या प्रमाणावर लुटालूट सुरू केली. साहजिकच गुन्हेगारी खूप वाढली. परंतु सरकारने त्यातून या गुन्हेगारीला शेतकऱ्यांची फूस आहे असा विचित्र निष्कर्ष काढून त्या तालुक्यातील शेतकऱ्यांवर सामुदायिक दंड बसविला. विठ्ठलभाई पटेल यांनी त्याविरुद्ध करबंदीची चळवळ उभारली शेवटी सरकारला माघार घ्यावी लागली. नागपूरलाही असेच घडले. तेथे भरलेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनाच्या वेळी राष्ट्रीय झेंडे, घेऊन मिरवणुकी काढण्यावर सरकारने बंदी घातली. साहजिकच त्यामुळे वातावरण प्रक्षुब्ध होऊन त्याचे पर्यवसान झेंडा सत्याग्रहात झाले. हा बंदीहुकूम मोडण्यासाठी सर्व देशातून नागपूरकडे सत्याग्रहींची रीघ लागली आणि येथेही सरकारला नमते घ्यावे लागले. तिकडे स्वराज्य पक्षालाही जनतेकडून चांगला पाठिंबा मिळू लागला होता. डिसेंबर १९२३ मध्ये कोकोनाडा येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास हजर राहून आगामी निवडणुका लढविण्यास काँग्रेसची अनुमती मिळाली. कोकोनाडा येथे स्वराज्य पक्षाने राजकीय कैद्यांची मुक्तता करण्यात यावी, दडपशाही कायदे मागे घेण्यात यावेत, आणि स्वायत्त सरकार स्थापन करण्यासाठी गोलमेज परिषद बोलावण्यात यावी या मागण्यांचा मसुदा तयार केला. त्याचप्रमाणे अधिकार ग्रहण करावयाचे नाही किंवा सरकारी समित्यात सहभागी व्हावयाचे नाही असेही निर्णय पक्षाच्या बैठकीत घेण्यात आले. १९२४ च्या फेब्रुवारीत कायदेमंडळातील स्वराज्य पक्ष, नेमस्त पक्ष आणि जिनांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र सभासद यांची एक संयुक्त बैठक होऊन मध्यवर्ती कायदेमंडळात राष्ट्रीय पक्ष म्हणून काम करण्याचा निर्णय घेण्यात आला. ७२ सभासद असलेल्या या राष्ट्रीय पक्षाने मध्यवर्ती कायदेमंडळात आपले बहुमत प्रस्थापित केले. नाफेरवाद्यांनी विधायक

कार्याला वाहून घ्यावे आणि फेरवाद्यांच्या मार्गात अडथळे निर्माण करू नयेत आणि स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमाला काँग्रेसने आपला राजकीय कार्यक्रम म्हणून मान्यता द्यावी असा तोडगा काढून गांधीजींनी दोन्ही गटात दिलजमाई घडवून आणली निरनिराळ्या कायदेमंडळातील स्वराज्य पक्षाच्या आणि मध्यवर्ती कायदेमंडळात राष्ट्रीय पक्षाच्या सभासदांनी अवलंबिलेले अडवणुकीचे धोरण ही साम्राज्यशाही शासनाची मोठीच डोकेदुखी होऊन बसली.

द्विदल राज्यपद्धती सुरू झाल्यानंतर प्रथम अधिकारावर आलेली मंत्रीमंडळे ही सरकारच्या ताटाखालची मांजरे होती. त्यावेळीही सुधारक पक्षाच्या सदस्यांनी आणखी काही सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला व त्यादृष्टीने मध्यवर्ती कायदेमंडळात अनेक ठराव मांडले. मद्रास आणि मुंबई प्रांतातील ब्राह्मणेतर, राजनिष्ठ अश्रफ, युरोपियन आणि जमीनदार नेहमी सरकारच्या बाजूने राहात. केवळ सुधारणा राबवण्यासाठीच नव्हे तर हिंदुस्थानातील पहिल्या सामुदायिक चळवळीला पायबंद घालण्याच्या कामीही ते सरकारला संपूर्ण सहकार्य देत. बंगालमध्ये सर अबदुर रहीम हे कायदेमंत्री असताना त्यांनी स्वतःच १८१८ च्या बंगाल रेग्युलेशन ॲक्टचे पुनरुज्जीवन करणारा जुलमी कायदा पास करवून घेतला. पंजाबमध्ये फझली हुसेन यांच्या मुस्लीम पार्टीने शीखांचे आंदोलन मोडून काढले. सरकारनियुक्त मुसलमानाना सभासद तर उघडपणे दडपशाही धोरणाचा जोरजोराने पुरस्कार करीत. झहिरुद्दिन अहमद यांनी ८ फेब्रुवारी १९२२ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळात घोषणा केली की 'ज्याला स्वतःची मातृभूमी म्हणता येईल असा देश आम्हा मुसलमानांना नाही. आम्ही स्वतःला साऱ्या जगाचे नागरिक समजतो—मोस्लेम हैं हम वतन है सारा जहाँ हमारा. कोणत्याही मुसलमानाला राष्ट्रवादी म्हणवून घेण्याचा तिटकारा वाटतो. सरकारचे हे कट्टर पाठिराखे आणि सुधारक पक्षातील सभासद यांच्यातील हा जमीन–अस्मानाचा फरक सरकारच्या नजरेतून सुटला नाही. १९२३ च्या अखेरी अखेरीला सरकार आणि सुधारक यांच्यात कसलेही सौहार्द राहिलेले नव्हते. असह-कारवाद्यांना सरकारने उदारपणाने वागवावे आणि सुधारणांचा आणखी हप्ता द्यावा अशा आशयाचे ठराव त्यांच्याकडून मांडण्यात आले इतकेच नव्हे तर मिठावरील करात आणखी वाढ करण्याची सरकारची योजनाही त्यांनी फेटाळून लावली. ब्रिटिश पंतप्रधानांनी केलेल्या एका उद्दाम भाषणाविरुद्धही त्यांनी जोराने आवाज उठविला. जनतेला काँग्रेसच्या प्रभावापासून अलग ठेवण्याकरता सरकारने नॅशनल लिबरल फेडरेशनची ताकद वाढविण्यासाठी योजलेले सर्व उपाय निष्फळ ठरले. सरकार-धार्जिण्या अश्रफांनी शासनाला हे दाखवून दिले होते की, सरतेशेवटी सरकारला कोणावर विसंबून राहाता येणार असेल तर ते अश्रफांच्या सहकार्यावर सुधारणावाद्यांच्या खासच नव्हे.

फझली हुसेन यांच्या धोरणामुळे पंजाब कायदेमंडळातील मुस्लीम पार्टी विरुद्ध

हिंदू आणि शीख सभासद असा तीव्र संघर्ष सुरु झाला. अन्य प्रांतांत देखील कायदेमंडळाचे मुसलमान सभासद आणि कौन्सिलर्स यानी आपल्या समाजाच्या हितासाठी सुधारणा कायद्याचा जास्तीतजास्त उपयोग करून घेतला. वायव्य सरहद्द विभाग वेगळा करण्यात येऊन त्यालाही द्विदल राज्यपद्धती लागू करण्यात यावी या मागणीला पंजाब कायदेमंडळातील बिगर मुसलमानांनी तीव्र विरोध केला आणि तो भाग पंजाबमध्ये समाविष्ट करण्यात यावा अशी भूमिका मांडली. असा स्वतंत्र प्रांताचा दर्जा देण्यास सरकारचा विरोध असतानाही मध्यवर्ती कायदेमंडळात सरकारनियुक्त मुस्लीम सभासदांनी स्वतंत्र वायव्य सरहद्द प्रांताची मागणी उचलून धरली. बंगाल कायदेमंडळातील मुसलमान सभासदांत पंजाब सारखी एकवाक्यता नव्हती तर त्यांचे आपापसात इतर अनेक मतभेद असले तरी कलकत्त्याच्या कार्पोरेशनमध्ये मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत आणि त्यांच्यासाठी प्रमाणाबाहेर प्रतिनिधित्व असावे याबाबत मात्र त्या सर्वांचे एकमत होते. कायदेमंडळातील एकजात सर्व बिगर मुसलमानांनी या मागणीला जोरदार विरोध केला. या चर्चेत जातीय भावना उफाळून आल्या आणि शेवटी सरकार आणि युरोपियन सभासद यांच्या मध्यस्तीमुळे मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत परंतु त्यांचे विशेषाधिकार काही प्रमाणात कमी करण्यात यावेत अशी तडजोड निघाली.

मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदेमंडळात स्वराज्य पक्षाने प्रवेश केल्यानंतर मात्र परिस्थिती पार बदलली. नव्या कायद्याचे कामकाज बंद पाडण्यासाठी स्वराज्य पक्षाच्या सभासदांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कायदेमंडळातून अडवणुकीचे धोरण अवलंबून सरकार विरुद्ध सनदशीर लढा पुकारला. १९२४ पासून अनेकदा त्यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात सरकारचा पराभव केला. १८ फेब्रुवारी रोजी रंगाचारियर यांनी संपूर्ण प्रांतिक स्वायत्तता आणि वसाहतिक स्वराज्य देण्याच्या दृष्टीने १९१९ च्या कायद्यात सुधारणा करण्यात यावी अशा आशयाचा ठराव मध्यवर्ती कायदेमंडळात मांडला. मोतीलाल नेहरू यांनी त्या ठरावाला एक उपसूचना मांडली. उपसूचनेत भारताची नवी राज्य घटना बनविण्यासाठी गोलमेज परिषद बोलावण्याच्या दृष्टीने तातडीने पावले उचलावीत अशी मागणी करण्यात आली. घटनेत प्रमुख अल्पसंख्य गटांना जरूर ते संरक्षण देण्याची तरतूद असेल असेही उपसूचनेत नमूद करण्यात आले होते. घटनेचा मसुदा तयार झाला म्हणजे विद्यमान कायदेमंडळ बरखास्त करून नव्या निवडणुका घ्यावयाच्या व नव्याने निवडून आलेल्या कायदेमंडळापुढे तो मसुदा स्वीकृतीसाठी ठेवावयाचा अशी कल्पना मोतीलाल नेहरूंनी मांडली होती. राजनिष्ठ मुसलमान सभासद, मूळ ठराव व नेहरूंनी सुचविलेली उपसूचना या दोहोंवरही तुटून पडले. बंगालमधून निवडून आलेले मुसलमान सभासद अलिमुझमान यांनी असे प्रतिपादन केले की, जातीजातीतील मतभेद मिटल्याशिवाय

स्वराज्य मागण्यात काही अर्थ नाही. मुस्लीम नेतृत्वाने प्रथम आंधळेपणाने सरकारची तळी उचलून धरणाऱ्या आणि नंतर बंगालची फाळणी रद्द झाल्यामुळे आणि तुर्कस्तानच्या प्रश्नावर भ्रमनिरास झाल्यामुळे पुन्हा तितक्याच आंधळेपणाने हिंदू नेतृत्वाच्या मागे जाणाऱ्या मुसलमानांना त्यांनी सारखेच दोषी धरले. वायव्य सरहद्द प्रांतातील सरकारनियुक्त सभासद सर साहिबजादा अबदुल कयूम म्हणाले की, दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना जे स्थान आहे ते स्वतंत्र भारतात मुसलमानांच्या वाट्याला येईल. अँग्लोइंडियनांचे सरकारनियुक्त प्रतिनिधी कर्नल गिडने यांनी सांगितले की, हिंदू-मुसलमानांचे ऐक्य कदापिही होऊ शकणार नाही आणि म्हणून संपूर्ण प्रांतिक स्वायत्तता आणि वसाहतिक स्वराज्य हिंदुस्थानला देता कामा नये. होम मेंबर सर माल्कम हेले यांनीही अशीच भूमिका मांडली. भारताला वसाहतीचे स्वराज्य देणे शक्य होणार नाही असे घोषित करताना त्यांनी असा मुद्दा मांडला की, हिंदी संस्थानिक, युरोपीय आणि वरिष्ठ नोकरदार यांचे या देशात हितसंबंध गुंतलेले असून स्वयंनिर्णयाच्या बाबतीत सरकार कोणती भूमिका स्वीकारणार याविषयी त्यांच्या मनात कसलाही संदेह निर्माण होऊ देणे चुकीचे होईल. राज्य कारभाराच्या बाबतीत मूलगामी स्वरूपाचे कोणतेही बदल घडवून आणण्याचे सरकारच्या मनात नाही असेही त्यांनी सांगून टाकले. तथापि १९१९ च्या कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधी ज्या निरनिराळ्या तक्रारी आल्या आहेत त्यासंबंधी एकादी चौकशी समिती नेमण्याची मात्र त्यांनी तयारी दर्शविली. मोतीलाल नेहरूंची उपसूचना ७६ विरुद्ध ४८ मतांनी पास झाली. होम मेंबरने चर्चेच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे सरकारने सर अलेक्झांडर मुडिमन यांच्या अध्यक्षतेखाली ९ सभासदांची एक समिती नेमली. परंतु समितीत सरकारला पाठिंबा देणारांचे बहुमत राहील याची काळजी घेण्यात आली होती. मोतीलाल नेहरूंची उपसूचना मंजूर झाल्यामुळे सर्वत्र मोठीच खळबळ उडून गेली. पार्लमेंटच्या वरिष्ठ सभागृहात बोलताना भारत मंत्री लॉर्ड ऑलिव्हर यांनी भारतीयांच्या मनात सरकार-विषयी अविश्वास निर्माण होण्यास सबळ कारणे आहेत अशी कबुली दिली. त्यांच्या या भाषणाचे भारतात चांगले स्वागत झाले आणि मोतीलाल नेहरूंनी त्याबद्दल कायदेमंडळात त्यांचे अभिनंदनही केले. परंतु तरीही सरकारच्या धोरणात कसलाही बदल होणार नसून स्वराज्याच्या दिशेने भारताचे पाऊल पुढे पडणार नाही हे स्पष्ट असल्यामुळे कायदेमंडळातील राष्ट्रीय पक्षाने अंदाजपत्रकातील पहिल्या चार बाबींवरील खर्चाची मागणी फेटाळून लावली. काही दिवसांनंतर कायदेमंडळात फिनान्स बिल मांडण्यासाठी जी परवानगी लागते ती सभागृहाने नाकारली. तथापि कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये मात्र सरकारला अंदाजपत्रक पास करून घेता आले. राजकीय कैद्यांची मुक्तता, शीखांच्या तक्रारींबाबत चौकशी करण्यासाठी समितीची नियुक्ती, १८१८ च्या रेग्युलेशन कायद्याला मूठमाती आणि दक्षिण आफ्रिकेतून आयात केल्या जाणाऱ्या कोळशावर जकात अशा तऱ्हेचे अनेक ठराव राष्ट्रीय पक्षाने कायदेमंडळात पास करवून घेतले.

बंगालमध्ये स्वराज्य पक्षाचे सभासद आणि त्यांच्या बरोबरच्या करारावर सह्या करणारे मुसलमान सभासद यांचे बहुमत होते. मध्यप्रांतात स्वराज्य पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले होते. या दोन्ही प्रांतात त्यांनी अडवणुकीच्या धोरणाचा अवलंब करून मॉंटफोर्ड सुधारणांची अमलबजावणी जवळजवळ अशक्य करून टाकली. त्यामुळे सरकार अगदी हैराण होऊन गेले. कॉंग्रेसच्या १९२३ च्या कोकोनाडा अधिवेशनात हिंदू आणि मुसलमान यांच्यातील बंगाल करार फेटाळून लावला गेला होता. परंतु १९२४ च्या मे महिन्यात भरलेल्या बंगाली कॉंग्रेसजनांच्या वार्षिक परिषदेत प्रचंड बहुमताने त्याला मान्यता देण्यात आली. त्याच परिषदेत खुनाच्या आरोपाखाली फाशीची शिक्षा लागलेल्या गोपीनाथ सहा नावाच्या दहशतवाद्याने दाखवलेले असामान्य धैर्य आणि त्यागाची भावना यांचा गौरव करणारा ठराव संमत करण्यात आला आणि सरकारला हवी असलेली संधी मिळाली. स्वराज्य पक्षाच्या नेत्यांना अटक करण्यासाठी सरकार टपूनच बसले होते. या ठरावाचे निमित्त करून ऑक्टोबरमध्ये सुभाषचंद्र बोसांसकट स्वराज्य पक्षाच्या अनेक नेत्यांची व कार्यकर्त्यांची सरसहा धरपकड करण्यात आली. पुढच्या महिन्यात मुंबई येथे भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेत या अटक सत्राबद्दल सरकारचा निषेध करणारा ठराव पास करण्यात आला आणि क्रिमिनल लॉ अमेन्डमेंट वटहुकूम आणि १८१८ चा तिसरा रेग्युलेशन कायदा मागे घेण्याची मागणी करण्यात आली. दुसऱ्या एका ठरावान्वये ३१ मार्च १९२५ पूर्वी भारताच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी एक सर्वपक्षीय समिती नेमण्यात आली. त्याच सुमारास सर्व पक्षांचे सहकार्य मिळवता यावे म्हणून असहकार आंदोलन औपचारिकरित्या स्थगित करण्यात येत असल्याचे गांधी, सी. आर. दास आणि मोतीलाल नेहरू यांच्या संयुक्त सह्यांनी जाहीर करण्यात आले.

कोणाही व्यक्तीला चौकशीविना अटक करण्याचा किंवा खटला न भरता तुरुंगात डांबण्याचा अधिकार देणाऱ्या बंगालमधील वटहुकूमाची मुदत १९२५ च्या एप्रिलमध्ये संपत होती. बंगाल कायदेमंडळात एक रीतसर विधेयक आणून ही मुदत वाढवून घेण्याचा सरकारने प्रयत्न केला. परंतु सी. आर. दास यांच्या प्रभावी भाषणानंतर ते सरकारी विधेयक फेटाळण्यात आले. अशा परिस्थितीत सरकारने दास यांच्या बरोबर तडतोड घडवून आणण्याचे ठरविले आणि त्या दृष्टीने त्यांच्याशी गुप्त बोलणी केली. सी. आर. दासही आपल्यापरीने काही मर्यादेपर्यंत सरकारशी सहकार्य करण्यास तयार होते. बंगालमधील कॉंग्रेस आणि स्वराज्य पक्षाच्या पाठीराख्यांच्या परिषदेत केलेल्या भाषणात सी. आर. दास यांनी अशी भूमिका मांडली की, वसाहतीचे स्वराज्य मिळविणे हेच भारतीय जनतेचे ध्येय आहे. यासंबंधात सरकारच्या मनातील संशयाचे निराकरण करण्यासाठी त्यांनी बंगालमधील दहशतवाद्यांच्या हाल-चालींचा जाहीरपणे निषेधही केला. फजलूल हक यांना मंत्रीपदाचा राजिनामा देण्यास भाग पाडले होते. त्यांनी बंगाल प्रांतिक मुस्लिम परिषद संघटित केली. प्रतिस्पर्धी

परिषदेला हजर राहणाऱ्या मुसलमानांना काफर ठरविणारे एका प्रसिद्ध मौलवीचे पत्रक परिषदेत वाटण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात फजलूल हक यांनी 'इस्लाम धोक्यात' असल्याची घोषणा केली. स्वराज्याच्या दृष्टीने जसजसी प्रगती होत आहे तसतशी हिंदूंच्या हाती अधिकाधिक सत्ता येऊ लागली आहे, असे सांगून त्यांनी मुसलमानांना प्रांतात सर्वत्र आखाडे स्थापन करण्याचे आणि मुसलमानांची एकजूट उभारण्याचे आवाहन केले. फजलूल हक हे एका काळचे कट्टर खिलाफतवादी आणि असहकार आंदोलनाचे कट्टर पुरस्कर्ते. १९१८ साली दिल्लीत भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात ब्रिटिशांबरोबर समझोता करणे मुसलमानांच्या हिताचे नसून हिंदू बांधवांबरोबर दोस्ती करून आपली ताकद वाढविण्यातच शहाणपण आहे असे आवाहन त्यांनी केले होते. बिगर मुसलमानांबरोबर असहिष्णू वृत्तीने वागण्यातच बहादुरी आहे असे मानणाऱ्या मुसलमानांवर टीका करून इस्लामवर निष्ठा ठेवणे म्हणजे परिणामांचा विचार न करता बिगर मुसलमानांविरुद्ध उठल्यासुटल्या संघर्षाच्या पावित्र्यात उभे राहणे नव्हे असे प्रतिपादन केले होते. परंतु पुढे त्यांनी एकदम टोपी फिरवली. असहकार आंदोलनात सहभागी होण्याऐवजी निवडणूक लढवली आणि सरकारची पाठराखण सुरू केली. बंगाल प्रांताच्या कायदेमंडळातील स्वराज्य पक्षाच्या बहुमतामुळे त्यांचे मंत्रीपद गेल्याने ते कमालीचे अस्वस्थ झाले. राष्ट्रवाद्यांच्या अडथळ्या-मुळे माँटेग्यू चेल्म्सफोर्ड सुधारणा राबविता येत नसल्याने निरनिराळ्या प्रांतिक कायदेमंडळातून आणि कौन्सिलातून मुसलमानांची संख्या वाढवून देण्याचीही त्यांनी मागणी केली.

'१९२५ च्या जुलै मध्ये पार्लमेंटच्या वरिष्ठ सभागृहात भारत मंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनी ब्रिटिश सरकार भारताला याहून जास्त सुधारणा देण्यास तयार नाही असे स्पष्टपणे सांगून टाकले. १७६५ साली बंगाल प्रांत साम्राज्याला जोडून घेतल्यापासून नऊ प्रमुख धर्म आणि १३० भाषा असलेल्या या विशाल देशाचा राज्य कारभार चालविण्याची बिकट कामगिरी ब्रिटिश सरकार पार पाडीत आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून १९१९ साली सुधारणा लागू करून सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. क्रमाक्रमाने स्वयंशासित संस्थांचा विकास घडवून आणणे ही आपली जबाबदारी आहे असे ब्रिटिश सरकार मानते. १९१९ साली सुरू केलेल्या या प्रयोगाच्या बाबतीत उतावळेपणा करून चालणार नाही म्हणून सरकार कोठल्याही प्रकारची दमदाटी किंवा हिंसाचार खपवून घेणार नाही. सरकारला या बाबतीत प्रामाणिक सहकार्य तर मिळालेच नाही. उलट असहकार आणि अडवणुकीचे धोरण यालाच त्याला तोंड द्यावे लागले. ब्रिटिश हिंदुस्तान सोडून गेले तर हिंदू आणि मुसलमान यांच्यात यादवी युद्ध माजल्यावाचून राहाणार नाही. द्विदल राज्य पद्धतीचा अंमल सुरू झाल्यापासून हिंदू-मुसलमानांतील तणाव वाढले आहेत. अशा परिस्थितीत मुडिमन समितीवरील अल्पसंख्य सभासदांनी जो अहवाल सादर केला आहे तो स्वीकारून कायदा आणि

सुव्यवस्था खात्यासकट प्रांताना स्वायत्तता बहाल करणे सरकारला शक्य नाही. तथापि त्या समितीच्या बहुमताच्या शिफारशी स्वीकारून सरकार त्या कायद्याच्या नियमावलीत काही फेरफार करू शकेल. लॉर्ड बर्कनहेड यांनी आपल्या भाषणात पुढे असेही सुनावले की, 'लष्करी परंपरा असलेल्या सात कोटी मुसलमानांमुळे आधीच बिकट असलेल्या भारतीय परिस्थितीत अधिकच गुंतागुंत निर्माण होते. त्याशिवाय ब्रिटिश सत्तेशी सतत एकनिष्ठ राहिलेल्या देशी संस्थानिकांच्या बाबतीतील आमचे कर्तव्य आम्हाला विसरता येणार नाही. सरकारी नोकरांनाही जरूर तो दिलासा देणे आम्हाला भाग आहे."

काही महिन्यानंतर मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सिमला अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना लॉर्ड रीडींग यांनी जाहीर केले की, जोपर्यंत सध्याची राज्य घटना राबविण्याच्या बाबतीत जबाबदार राजकीय पुढाऱ्यांकडून सरकारला सक्रीय सहकार्य मिळत नाही तोपर्यंत राजकीय सुधारणांत वाढ करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कोणी कितीही धमक्या दिल्या तरी घाईगर्दीने सरकार कोणत्याही सवलती देणार नाही. नवे होम मेंबर सर अलेक्झांडर मुडिमन यांनी त्यांच्याच नेतृत्वाखालील समितीने बहुमताने केलेल्या शिफारसी स्वीकृतीसाठी सभागृहासमोर ठेवल्या. त्यावर मोतीलाल नेहरूंनी विद्यमान राज्यघटनेत मूलगामी बदल करून सत्तांतर करण्याच्या दृष्टीने काही तातडीची पावले उचलण्यात यावीत अशी उपसूचना मांडली. तिच्यात पुढील तरतुदी सुचविण्यात आल्या होत्या. (१) सेक्रेटरी ऑफ स्टेट हे पद रद्द करून टाकण्यात यावे, (२) सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचे सर्व अधिकार गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांच्याकडे सुपूर्द करण्यात यावेत, (३) गव्हर्नर जनरल मध्यवर्ती कायदे मंडळाला जबाबदार धरण्यात यावा, (४) लष्कराचे जलदीने भारतीयीकरण करण्यात यावे, (५) मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदेमंडळातील सरकारनियुक्त सभासदांची पद्धत बंद करण्यात यावी, (६) मतदानाच्या अधिकारांची व्याप्ती वाढविण्यात यावी, आणि (७) प्रांतिक स्वायत्तता लागू करण्यात यावी मात्र आंतरप्रांतीय आणि अखिल भारतीय स्वरूपाच्या बाबींसंबंधीचे शेषाधिकार आणि सर्वसाधारण नियंत्रण मध्यवर्ती सत्तेच्या हातात रहावे. मोतीलाल नेहरूंची ही उपसूचना ४५ विरुद्ध १४ मतांनी पास झाली. उपसूचनेला पाठिंबा देणारात जीना प्रमुख होते.

दोन वर्षांपासून चाललेल्या घटनात्मक लढ्यामुळे सरकार पार हबकून गेले होते. १९२४ साली मध्यवर्ती कायदेमंडळात सरकारला अडचणीत टाकणारे अनेक ठराव पास करण्यात आले. त्यातील काहींचा उल्लेख वर येऊन गेला आहे. २१ जुलै १९२४ रोजी लॉर्ड ऑलिव्हर यांनी पार्लमेंटच्या वरिष्ठ सभागृहात असा आरोप केला होता की, बंगालमधील स्वराज्य पार्टी कायदेमंडळातील सभासदांची मते विकत घेत असल्यामुळे ती कायदेमंडळात घटनात्मक पेच निर्माण करू शकली.

त्यांच्या या वक्तव्यामुळे मध्यवर्ती कायदेमंडळात संतापाची एकच लाट उसळली. अनेक सभासदांनी मुडिमन यांच्या बोलण्यात वारंवार अडथळे आणले. ही माहिती सरकारने पुरविलेली नाही असा खुलासा त्यांना करावा लागला. त्याचप्रमाणे या प्रश्नांसंबंधीच्या सभासदांच्या तीव्र भावना सरकार लॉर्ड ऑलिव्हर यांना कळवील का या चमनलाल यांच्या प्रश्नाला उत्तर देताना या विषयावरील प्रश्नोत्तरे लॉर्ड ऑलिव्हर यांचेकडे पाठविण्यात येतील असे आश्वासन देऊन मुडिमन यांना स्वतःची कशीबशी सुटका करून घ्यावी लागली. मध्यवर्ती कायदेमंडळात अंदाजपत्रकावरही सरकारला पराभव पत्करावा लागला. सरकार कायदेमंडळाने पास केलेल्या ठरावांची दखल घेत नसे. त्याचप्रमाणे अंदाजपत्रकातील तरतुदी फेटाळण्यात आल्या तरी व्हॉइसरॉय आपल्या अधिकारात त्यांना मंजुरी देत असे.

सप्टेंबर १९२५ मध्ये पास करण्यात आलेल्या ठरावाची सरकारने अंमलबजावणी केली नाही तर निरनिराळ्या कायदेमंडळातील स्वराज्यपक्षीय सभासदांनी राजिनामे देऊन बाहेर पडावे अशा आशयाचा ठराव मार्च १९२६ मध्ये भरलेल्या अ. भा. कॉं. समितीच्या अधिवेशनात संमत करण्यात आला. त्या ठरावानुसार लगेच ८ तारखेला मोतीलाल नेहरूंनी आपल्या सभासदत्वाचा राजीनामा सादर केला. आपल्या भाषणात ते म्हणाले आमच्या मागण्या सरकारने ठोकरून लावल्या याचा योग्य तो जाब जनता सरकारला विचारल्याशिवाय राहणार नाही असा आम्हाला विश्वास वाटतो. पहिल्यापेक्षाही मोठ्या संख्येने आम्हाला निवडून देऊन ती सरकारला चोख उत्तर देईल यात काडीमात्र शंका नाही.

स्वराज्य पक्षाने कायदेमंडळातून घटनात्मक संघर्ष चालू ठेवला असला तरी मध्य-प्रांत आणि बंगाल वगळता इतरत्र द्विदल राज्यपद्धतीचा कारभार समाधानकारक चालला होता. सी. आर. दास यांच्या मृत्यूमुळे कायदेमंडळातील स्वराज्य पक्षावर मोठा आघात झाला. डॉ. अबदुल्ला सुरावर्दीसारखे प्रमुख पुढारी पक्ष सोडून गेले. मध्यप्रांतातील स्वराज्य पक्षाचे एक नेते तांबे यांनी गव्हर्नरांच्या विनंतीवरून कार्य-कारिणीचे सभासदत्व स्वीकारले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे केळकर आणि जयकर यांच्या सारख्यांनी तांब्यांना पाठिंबा दिला. त्या दोघांनी स्वराज्य पक्षाने आपल्या धोरणात बदल करुन प्रतियोगी सहकारितेची भूमिका स्वीकारावी आणि शक्य तेथे अधिकारपदे घ्यावीत म्हणून प्रचाराची जोरदार मोहीम सुरू केली. मोतीलाल नेहरूंनी सँढस्ट समितीवर काम करण्यास संमती दिली होती असा दाखला त्यांनी आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ दिला. वस्तुतः तो गैरलागू होता. कारण स्वराज्य पक्षाच्या दृष्टीने हिताचे ठरणार असेल व पक्षाने बहुमताने मान्यता दिली तरच अशी जबाबदारी स्वीकारावी असा स्वराज्य पक्षाचा ठरावच होता. विठ्ठलभाई पटेल यांची मध्यवर्ती कायदे-मंडळाचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली याचा अर्थच स्वराज्यपक्षाने आपले कायम अडवणुकीचे धोरण सोडून दिले आहे अशीही मल्लीनाथी हे फुटीर पुढारी करू लागले.

१९२५ च्या उत्तरार्धात स्वराज्य पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविल्या पण त्यात त्यांना फार मोठा पराभव पत्करावा लागला. ८ मार्च १९२६ ला स्वराज्य पक्षाने मध्यवर्ती कायदेमंडळातून सभात्याग केला होता त्याच्या निषेधार्थ लाला लजपतराय आणि बिपिनचंद्र पाल यांनी पक्षाचा राजीनामा दिला. निरनिराळ्या प्रांतातून प्रतियोगी सहकारितेचा पुरस्कार करणारे प्रांतिक स्तरावरील पक्ष स्थापन करण्यात आले. १९२६ च्या एप्रिल आणि मे महिन्यात मिळून सबंध महिनाभर कलकत्त्यात जे जातीय दंगे उसळले त्यामुळे स्वतंत्र मतदार संघ आणि विशेषतः बंगाल करार याविरुद्ध तीव्र असंतोष पसरला. त्याच सुमारास अहमदाबाद येथे भरलेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीच्या बैठकीत बंगालमधील काही प्रतिनिधींनी स्वतंत्र मतदार संघ चालू ठेवण्याला जोराचा विरोध दर्शविला. मे अखेरीस कृष्णनगर येथे भरलेल्या बंगाल प्रांतिक परिषदेत बहुसंख्य सभासदांनी बंगाल कराराला कडाडून विरोध केला. कराराला अनुकूल असलेल्या अध्यक्षांना अखेर अधिवेशन सोडून जावे लागले. त्यांच्या जागी नव्या अध्यक्षांची निवड करून अधिवेशनाने ठराव केला की, कराराने जातीय भांडणे मिटण्याऐवजी उलट ती बद्धमूल झाली आहेत आणि म्हणून तो रद्दबातल ठरविण्यात येत आहे. मृणाल कांती बोस यांनी अशी भूमिका मांडली की करार आणि समझोते करून हिंदू–मुसलमानात ऐक्य घडवून आणता येईल अशी आशा करणे व्यर्थ आहे. काँग्रेसच्या कोकोनाडा अधिवेशनात महंमद अली म्हणाले होते की, हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी 'करार मदार करण्याची किंवा समित्या नेमण्याची आणि खास अधिवेशने भरविण्याची काहीही आवश्यकता नाही. खरोखरच कशाची आवश्यकता असेल तर ती विधायक कार्यक्रमाची आहे. याच उद्‌गारांचा मृणालकांती बोस यांनी आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ आधार घेतला होता. बोस यांनी आणखी असे प्रतिपादन केले की, 'करार आणि समझोते करून आपण मुसलमानांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचा जो जो प्रयत्न करीत आहोत तो तो हिंदु-मुसलमानातील तणाव उलट वाढतच आहेत....... देशबंधू (सी. आर. दास) आज हयात असते तर त्यांनीदेखील बंगाल करार करण्यात आपली चूक झाली असे कबूल करून तो रद्द करून टाकला असता.' बंगाल प्रांतिक काँग्रेस कमेटीत बंगाल कराराला झालेल्या विरोधाचे पर्यवसान 'काँग्रेस कर्मी संघाची' स्थापना होण्यात झाले. या संघटनेने आपल्या जाहीरनाम्यात असे नमूद केले की, लखनौ आणि बंगाल करारामुळे हिंदु–मुसलमानात ऐक्य घडून येऊ शकलेले नसून जातीय मतदार संघ आणि जातीय प्रतिनिधित्व रद्द करण्यात आले पाहिजे.

२० जुलै १९२६ रोजी पार्लमेंटमध्ये केलेल्या भाषणात उप-भारतमंत्री अर्ल विंटरटन यांनी असे उद्‌गार काढले की, स्वराज्य पक्षात हळूहळू फाटाफूट सुरू झाली असून आगामी निवडणुकीत साऱ्या देशाच्या वतीने मतदारांना आवाहन केले जाण्याऐवजी निरनिराळे गट सरळसरळ जातीयवादी भूमिकेवरून प्रचार करू लागतील आणि सुधारणा राबविण्यास तयार असलेला मजबूत पक्ष कायदेमंडळात निवडून

येईल. तथापि निवडणुकींचा निकाल कसाही जरी लागला तरी प्रशासन खंबीरपणे चालविले जाईल असा निर्वाळाही त्यांनी आपल्या भाषणात दिला.

सप्टेंबर महिन्यात काँग्रेसने पक्ष म्हणून निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला त्यामुळे स्वराज्य पक्ष आपोआपच संपला. ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध झालेल्या काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात राष्ट्रीय आकांक्षांना मूर्तस्वरूप देण्याचे सविनय कायदेभंग हे एकमेव प्रभावी साधन आहे असा विश्वास व्यक्त करण्यात आला. परंतु तो मार्ग चोखाळण्याची आजच्या परिस्थितीत देशाची तयारी नसल्याचे नमूद करण्यात आले होते. स्वराज्य पक्षाच्या सततच्या अडवणुकीच्या धोरणाला मान्यता दर्शविण्यात आली होती. सुधारणा राबविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे संपूर्ण जबाबदारीचे सरकार स्थापन करण्यात यावे ही राष्ट्रीय मागणी डावलण्याच्या सरकारी धोरणाला मान्यता देण्यासारखे ठरणार आहे असे जाहीरनाम्यात स्पष्ट करण्यात आले होते. डिसेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसला फारसे यश मिळू शकले नाही. बंगालमध्ये काँग्रेस आपले पूर्वीचे स्थान टिकवू शकली. बिहार आणि ओरिसात निवडून आलेले काँग्रेस सभासद हे प्रतियोगी सहकारवादी होते. मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, पंजाब आणि मुंबई इलाख्यात काँग्रेसचा पार धुव्वा उडाला. संयुक्त प्रांतात तर मध्यवर्ती कायदेमंडळातील एक मोतीलाल नेहरूंचा अपवाद वगळता हिंदूंच्या इतर सर्व जागा गमवाव्या लागल्या, परंतु १०४ पैकी ४० जागा जिंकून काँग्रेस पक्ष हा मध्यवर्ती कायदेमंडळात सर्वात मोठा गट बनला. मद्रास, बिहार आणि ओरिसा वगळता इतरत्र काँग्रेसला एकही मुसलमान आपल्या तिकिटावर उभासुद्धा करता आला नाही. बंगाल कायदेमंडळात काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आलेला तर सोडाच पण काँग्रेसला पाठिंबा देणारा एकदेखील मुसलमान निवडून येवू न शकल्याने त्या कायदेमंडळाचे चित्र पार पालटले. स्वराज्य पक्षाने बंगाल आणि मध्यप्रांतातील कायदेमंडळात द्विदल राज्य पद्धतीचा कारभार अशक्य करून सोडला होता. आता त्या दोन्ही कायदेमंडळांतून बहुमताचा पाठिंबा असलेली मंत्रिमंडळे अधिकारावर येऊ शकली. मद्रासमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले तरी मंत्रिमंडळात वर्णी लागलेल्या काही स्वतंत्रांना बहुसंख्य काँग्रेस सभासदांनी काँग्रेसचे धोरण धाब्यावर बसवून पाठिंबा दिला.

१९२७ व १९२८ साली केंद्रीय असेंब्लीत सरकारचा तीनचार वेळाच पराभव झाला. सायमन कमिशनवर सर्व ब्रिटिश सदस्यांचीच नेमणूक केल्याचा असेंब्लीने निषेध केला आणि नंतर कमिशनसाठीच्या खर्चाची मागणी फेटाळली. १९२९ सालापासून सरकारची परिस्थिती सुधारली. यावर्षी फक्त एकदाच सरकारचा पराभव झाला आणि तोही असेंब्लीचे अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांनी आपले निर्णायक मत सार्वजनिक सुरक्षा विधेयकाविरुद्ध दिल्यामुळे. त्याआधी या विधेयकावर समसमान मते पडली होती. अशातऱ्हेने घटनात्मक संघर्ष संपुष्टात आला. १९२८ सालीच २५ टक्के सारावाढीविरुद्ध बार्डोलीत सविनय कायदेभंगाची चळवळ यशस्वी करून

वल्लभभाई पटेलांनी सामुदायिक संघर्षाचा श्रीगणेशा सुरू केला होता. सायमन कमिशनच्या सभासदांनी भारताच्या भूमीवर पाय ठेवल्यापासून ते जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांचे उग्र निदर्शनांनी स्वागत झाले. सायमन कमिशन विरुद्धची निदर्शने म्हणजे घटनात्मक संघर्ष पर्वाची अखेर होती.

अनेक वर्षे काँग्रेसचे धोरण जमीनदारांना चुचकारण्याचे होते. १९२३ च्या स्वराज्य पक्षाच्या आणि १९२६ च्या काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यातही शेतकरी आणि कामगार वर्गाची परिस्थिती सुधारताना प्रस्थापित हितसंबंधांना बाधा येईल असे काहीही केले जाणार नाही असे निःसंदिग्ध आश्वासन देण्यात आले होते. संयुक्त प्रांतातील कायदेमंडळात काँग्रेस पक्षाने जमीनदारांशी संगनमत करून कूळ कायद्यात जमीनदारांना अनुकूल अशा उपसूचना आणल्या होत्या. परंतु इतके करूनही जमीनदार वर्ग काँग्रेसपासून फटकूनच राहिला. कारण जमीनदार आणि सरकार यांच्यात समान हितसंबंध असल्याने जमीनदारांना काँग्रेसपासून काहीच लाभ होण्यासारखा नव्हता. जमीनदार वर्ग आणि मुसलमान यांनी काँग्रेसकडे पाठ फिरवली आहे ही गोष्ट १९२५ च्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी मालवीयांनी नजरेस आणून दिली ती वस्तु-स्थिती होती.

असहकार आंदोलन अयशस्वी ठरले असले तरी स्वातंत्र्याचा लढा पुढे रेटणे अपरिहार्य होते. असहकार आंदोलनाच्या काळात दहशतवादी चळवळीस खीळ बसली होती, पण ते आंदोलन संपुष्टात आल्याबरोबर दहशतवादी गटांनी पुन्हा डोके वर काढले. परिस्थिती सामुदायिक चळवळीला अनुकूल नसल्यामुळे लढ्याशिवाय काँग्रेस जवळ पर्याय नव्हता. त्यातून जसे काही चांगले निष्पन्न झाले तसे काही वेळा चळवळीचे पाऊल मागेही पडले. स्वराज्य पक्षाने कायदेमंडळात अनेक प्रसंगी सरकारचा पराभव केला. त्याचप्रमाणे सरकारने सुधारणांच्या पुढील टप्प्यांचा प्रश्न जो १९१९ पासून बासनात बांधून ठेवला होता तो सतत जागता ठेवला. काही बिगर काँग्रेस सभासदांच्या सहकार्याने स्वराज्य पक्षाने आपल्या घटनात्मक संघर्षाला बहुपक्षीय राष्ट्रीय लढ्याचे स्वरूप प्राप्त करून दिले. इतर पक्षांबरोबरच्या या सहकार्यामुळे सुधारणांचा प्रश्न सर्वपक्षीय पातळीवरून सोडविण्याचा प्रयत्न करण्याचीही शक्यता निर्माण झाली. लखनौ करार हा फक्त काँग्रेस आणि लीग या दोन पक्षांच्या दरम्यानचा होता. १९२४ च्या अखेरीस जातीय समस्या आणि इतर घटनात्मक प्रश्नांवर तोड काढण्यासाठी काँग्रेसला सर्वपक्षीय परिषद भरविणे शक्य झाले होते. स्वराज्य आणि काँग्रेस पक्षाच्या अनेक सभासदांना संसदीय पद्धतीचे शिक्षण मिळाले आणि त्यांतील काहीजण चांगले संसदपटू बनले. परंतु उलटपक्षी काँग्रेसचे सामर्थ्य दिवसेंदिवस क्षीण होत चालले होते. मुळात काँग्रेसजन असलेल्या प्रतियोगी सहकारवाद्यांनी घटनात्मक संघर्षातून अंग काढून घेतले. इतकेच नव्हे तर १९१९ चा सुधारणा कायदा राबविण्यासाठी सरकारशी संगनमत करावयालाही मागेपुढे पाहिले नाही. परिणामी जातीय दंगलीच्या किंवा नवी राज्यघटना तयार करण्याच्या बाबतीत

काँग्रेस आपली स्वतःची मते रेटण्याचा प्रयत्न करू शकली नाही. बंगालच्या फाळणीच्या संदर्भात आधीच्या दशकात काँग्रेसला बरीच प्रतिष्ठा प्राप्त झाली होती प्रत्येक प्रश्नाकडे एकांतिक जातीय भूमिकेतून पहाणारेही फाळणी रद्द झाल्यामुळे जरा नरम पडले होते. शिवाय खिलाफत चळवळीमुळे मुसलमान पुढाऱ्यांना सरकारपासून आपल्या बाजूला वळवून घेणेही काँग्रेसला शक्य झाले होते. परंतु १९२० सालची परिस्थिती आता बदलली होती. लखनौ कराराला विरोध करणाऱ्या सरकारधार्जिण्या अश्रफांनी पुन्हा उचल खाल्ली होती. अश्रफांचे प्रस्थ पुन्हा वाढले होते. १९२० सालच्या साम्राज्यशाही विरोधी लढ्याच्या वेळी ते सरकारच्या पाठीशी उभे राहिले. सुधारित कौन्सिलातून आणि केंद्रीय असेंब्लीत त्यांनीच सरकारचा पाठपुरावा केला. सायमन कमिशनला देशातील ज्या थोड्याफार राजकीय नेत्यांनी सहकार्य दिले यांतही अश्रफांचाच भरणा होता. १८८० सालापासून भारतात एकात्म राष्ट्रवादाची वाढ होऊ नये म्हणून सरकार बुद्धीपुरस्सर द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताला खतपाणी घालत आले होते. मुसलमान पुढारी एकात्म राष्ट्रवादावर हल्ला चढवून प्रत्येक ठिकाणी द्विराष्ट्रवादाचा पाठपुरावा करीत असल्याची कितीतरी उदाहरणे दाखवता येतील. १० मार्च १९२३ ला सरकारी नोकऱ्यात झपाट्याने हिंदी लोकांची भरती करण्यात यावी अशा आशयाचा एक ठराव जमनादास द्वारकादास यांनी मध्यवर्ती कायदे मंडळात मांडला. त्यावर भाषण करताना वायव्य सरहद्द प्रांतातील एक सरकार नियुक्त सभासद खान बहाद्दूर अबदूर रहीम खान म्हणाले होते की, 'दुर्दैवाने भारत हा वंश, धर्म, भाषा या सर्वच दृष्टीने एक देश नसून तो एखाद्या खंडासारखा आहे. मी तर असे म्हणेन की, हिंदुस्थानला एक देश म्हणणे म्हणजे इंग्लंडच्या पंतप्रधानांनी सबंध युरोपखंडाचे पंतप्रधान बनावे असे म्हणण्यासारखेच ते हास्यास्पद होईल.'

मुस्लीम लीगच्या संस्थापकांपैकी एक खान बहादूर मिया महमद शफी हे कित्येक वर्षे तिथे उपाध्यक्ष असत. लखनौ करार आणि असहकार आंदोलन या दोहोंसही त्यांचा ठाम विरोध होता. पुढे व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर त्यांची नियुक्ती झाली होती. मुडिमन समितीचेही ते सभासद होते. त्या समितीपुढे येणाऱ्या मुस्लिम साक्षीदारांना सूचक प्रश्न विचारून जातीयवादी मागण्यांना पोषक अशी उत्तरे ते त्यांच्याकडून वदवून घेत. आयर्लंडमध्ये ज्याप्रमाणे कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट यांची स्वतंत्र सरकारे स्थापन करण्यात आली होती तशीच भारतातील परिस्थिती असल्याचे ते साक्षीदाराच्या निदर्शनास आणून देत. सायमन कमिशनपुढे दिलेल्या आपल्या साक्षीत त्यांनी असे प्रतिपादन केले होते की, "भारत हा देश नसून ते एक खंड आहे.' भारतीय संघराज्य हे अमेरिकन संघराज्याच्या धर्तीवर असावे. प्रथम प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता देण्यात यावी आणि त्यानंतर मध्यवर्ती कायदेमंडळातील सुधारणांचा विचार व्हावा. संघ राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी आधी प्रत्येक प्रांत हे स्वतंत्र घटक राज्य आहे हे मान्य करण्यात आले पाहिजे."

सर अबदुर रहीम यांनी मुस्लीम लीगच्या अलीगड अधिवेशनातील (१९२५) आपल्या अध्यक्षीय भाषणात द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत विस्तारपूर्वक मांडला होता हे सातव्या प्रकरणात येऊन गेलेलेच आहे. त्यांचे हे भाषण प्रोफेसर रशब्रुक विल्यम्स यांनी १९२४–२५ साली भारतासंबंधी सरकारला सादर केलेल्या अहवालावर आधारलेले होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.

नॅशनल मोहॉमेडन असोसिएशनने सायमन कमिशनला सादर केलेल्या कैफीयतीची सुरवातच पुढील वाक्याने झाली होती 'हिंदुस्तान हा देश नसून एक खंड आहे'······ त्यात पुढे म्हटले होते की, 'भारतातील ७ कोटी मुसलमान ही समान ध्येय असलेली एकसंघ अशी जमात असून त्यांचा धर्म, वंश, त्यांच्या परंपरा, ऐतिहासिक वारसा आणि संस्कृती यामुळे इतर लोकांपेक्षा सर्वस्वी भिन्न असल्याने त्यांना मजबूत असे स्वतंत्र राष्ट्रीयत्व प्राप्त झालेले आहे. त्या एकाच निवेदनात तीन ठिकाणी या स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचा आग्रह धरून पुढे पूर्व बंगाल आणि आसाम मिळून स्वतंत्र प्रांत बनविण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती. ऑगस्ट १९२८ मध्ये आगा खान यांनी १९ व्या शतकातील जर्मनीसारखे भारताचे संघराज्य असावे अशी मागणी केली होती. परंतु पुढे १९२९ च्या जानेवारीत भरलेल्या मुसलमानांच्या सर्वपक्षीय परिषदेत त्यांनी मुस्लिम ही अल्पसंख्य जमात नसून ते एक स्वतंत्र राष्ट्र आहे अशी भूमिका घेतली. १८ सप्टेंबर १९२९ रोजी पंजाब कायदेमंडळात सायमन कमिशनच्या पंजाब विषयक अहवालावर झालेल्या चर्चेच्यावेळी दीन महंमद यांनीदेखील हिंदू आणि मुसलमान ही स्वतंत्र राष्ट्रे आहेत असेच प्रतिपादन केले.

मोर्लेमिंटो सुधारणामुळे हिंदुस्थानातील जाती-जातीतील वैमनस्य वाढले असून या सुधारणांत भर टाकली तर वैमनस्य आणखी विकोपास जाईल म्हणून भारताला सुधारणांचा पुढचा हप्ता देता कामा नये असे लॉर्ड बर्कनहेड यांनी प्रतिपादन केले होते. २९ ऑगस्ट १९२७ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळात केलेल्या भाषणात लॉर्ड आयर्विन यांनीही हाच सूर लावला होता. परंतु राष्ट्रवादी शक्तींचा बीमोड करण्यासाठी जातीयवादाला खतपाणी घालणारे अधिकारीच हे नक्राश्रू गाळीत होते हे विसरून चालणार नाही. पार्लमेंटला १९२६–२७ चा अहवाल सादर करताना खुद्द त्या अहवालाचे लेखक जे. कोटमन यांनी जातीयवादी पक्षच या देशाचे भले करू शकतील असे निःसंदिग्धपणे नमूद करून ठेवले आहे. 'भारतातील राजकारणाला कदाचित काही काळ जातीयवादी अवस्थेतूनच जावे लागणार असेल····परंतु ही अवस्थादेखील फारशी घातक किंवा धोकादायक ठरू नये. कारण निरनिराळ्या मतदार संघातून सुसंघटित आणि चांगले नेतृत्व लाभलेले जातीयवादी पक्ष उभे राहतील तर सर्वसामान्यपणे ते सार्वजनिक हिताचेच ठरेल. तसेच दोन्ही जमातींतील सामुदायिक चळवळींचे नियंत्रण आज जे गावगन्ना पसरलेल्या स्वयंमन्य पुढाऱ्यांच्या हाती एकवटले आहे त्याऐवजी ते कायदेमंडळातील त्या त्या जमातीच्या खऱ्याखुऱ्या

नेत्यांच्या हाती केंद्रित होऊ शकेल आणि त्यामुळे जातीय दंग्यांना पोषक ठरणाऱ्या वातावरणाला आळा बसू शकेल.' या धोरणानुसार सरकारी नोकरांना जातीयवादी पक्षाच्या कामकाजात सहभागी होण्यास मुक्तद्वार असे. मे १९२४ मध्ये मुस्लिम लीगचे पुनरुज्जीवन झाले त्यावेळी पंजाबमधील सरकारी अधिकाऱ्यांचा एक मोठा जथा त्या अधिवेशनात सक्रीय सहभागी झाला होता. निरनिराळ्या कायदेमंडळातूनदेखील अनेक सरकारी नोकरांना सरकारनियुक्त सभासद म्हणून नियुक्त केले जात असे. हे सरकारी नोकर सदस्यसुद्धा जातीयवादाला खतपाणी घालीत असत. काही सरकारी नोकर हिंदू महासभा आणि आर्य समाज यांच्या कार्यक्रमात भाग घेतात अशी तक्रार काही मुसलमान सभासदांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मांडली त्यावेळी सरकारतर्फे असे उत्तर देण्यात आले की, सरकार त्यांच्याकडे सामाजिक संघटना म्हणून बघते आणि त्यांच्या कामकाजात सरकारी नोकरांनी भाग घेण्यात काही चूक आहे असे वाटत नाही. आर. एस. एस. सारख्या जातीयवादी स्वयंसेवक संघटनेत भाग घेण्यालाही सरकारी नोकरांना बंदी नव्हती.

अत्यंत मर्यादित मताधिकार आणि राजाश्रय यामुळे १९२० साली सरकार धार्जिणे अश्रफ राजकारणात पुन्हा स्वतःचे बस्तान बसवू शकले. कारण मर्यादित मताधिकारामुळे सर्वसामान्य मुस्लीम जनता मतदारांच्या यादीतून वगळली गेली होती. १९१९ च्या कायद्यानुसार फक्त सधन आणि सुशिक्षितांनाच मताधिकार होता यामुळेच मुस्लीम राजकारणावर अश्रफांची मक्तेदारी होती. आणि त्यांना अश्रफांच्या वर्गात न मोडणाऱ्या सर्वसामान्य मुस्लीम जनतेचे कसलेही सोयरसुतक नव्हते. मतदानाच्या अधिकाराची व्याप्ती वाढविण्याचा प्रश्न मुडिमन समितीसमोर १९२४–२५ साली आला असता समितीच्या बहुसंख्य सभासदांनी आपल्या अहवालात मताधिकाराची व्याप्ती वाढविण्यास नकार दर्शविला होता. त्यावर शफी आणि बरद्वानचे महाराज यांच्याही सह्या होत्या. या उलट अल्पसंख्य सभासदांनी त्यांच्यात जीनांचाही समावेश होता.— मताधिकाराची व्याप्ती वाढविण्याचा आग्रह धरला होता. डिसेंबर १९२७ मध्ये कलकत्त्याला भरलेल्या जीना गटाच्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात मौलाना जाफर अली खान यानी प्रौढ मताधिकार ताबडतोब लागू करण्यात यावा अशी मागणी केली होती. अक्राम खान यांनी या मागणीला जोरदार विरोध केला. आपल्या समर्थनार्थ त्यांनी अशी बाजू मांडली की, प्रौढ मताधिकार दिला तर, जनगणनेच्या आकड्यानुसार बंगाल कायदेमंडळात मुसलमानांची बहुसंख्या राहणार नाही. शेवटी ती मागणी मागे घेण्यासाठी जाफर अली खान यांचे मन वळविण्यात आले. मंत्री म्हणून दोन वेळा नेमणूक झालेले बंगालमधील एक बडे जमीनदार ए. के. गझनवी यांनी तर सायमन कमिशनपुढे दिलेल्या साक्षीत मताधिकाराची व्याप्ती वाढविण्याऐवजी उलट ते अधिक संकुचित करण्यात यावेत असे म्हटले होते.

ब्रिटिश सरकारचा पाठिंबा मिळविणे राजनिष्ठ अश्रफांना फार महत्वाचे वाटत

असे. कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी सरकारी अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करण्याची त्यांची सवय होती. त्यामुळे वैतागून जाऊन जीनांनी एकदा असे उद्‌गार काढले की, मुस्लीम राजकारणी खाजगीत काहीही बोलले तरी प्रत्यक्ष कृती करताना ते डेप्युटी कमिशनरच्या सल्ल्याने वागत असल्यामुळे मुसलमान समाजाचे नेतृत्व करणे कोणालाही अशक्य होऊन बसले आहे.

नानाविध जाती आणि अनेक धर्म यांच्यात विभागलेल्या हिंदी जनतेत राष्ट्रवादाची उभारणी होत असता विभक्त मतदारसंघामुळे या राष्ट्रवादाच्या मुळावरच घाव घातल्याचे नवीन सुधारणा कायदा अमलात आल्यावर दिसून आले. विभक्त मतदार-संघाचे मुस्लिम पुढाऱ्यांवर अत्यंत विपरीत परिणाम घडून आले. त्यांनी "मुसलमान समाजास फक्त जातीयवादी दृष्टीकोनातून मतदान करण्यास, जातीयवादाच्या चष्म्या-तून प्रत्येक गोष्टीकडे पाहण्यास, फक्त जातीयवादी भाषणे ऐकण्यास, राजकीय किंवा घटनात्मक सुधारणांकडे फक्त त्यायोगे आपल्या जमातीचे बळ कसे वाढेल एवढ्यापुरतेच पाहण्यास आणि आपली गाऱ्हाणी जातीयवादी दृष्टीकोनातून मांडण्यास भाग पाडले. विभक्त मतदारसंघाचे तत्त्वच असे आहे की, एकदा ते प्रत्यक्षात रूढ झाल्यावर इच्छा असली तरी त्याचा त्याग करणे कोणास शक्य होत नाही. आपल्या प्रतिस्पर्ध्यांना मागे सारण्याच्या भरात मुसलमान पुढारी अनेकदा अशक्य कोटीतील मागण्या करायला देखील मागेपुढे पहात नसत. त्याची काही मासलेवाईक उदाहरणे देण्यासारखी आहेत. वऱ्हाड मध्यप्रांतातील मुसलमानांची लोकसंख्या अवघी चार टक्के असताना तेथील मुसलमान प्रतिनिधींनी कायदेमंडळातील नियुक्त सभासदांपैकी २५ टक्के आणि मध्यवर्ती आणि प्रांतिक मंत्रिमंडळात ५० टक्के आणि सरकारी नोकऱ्यांत हिंदूंच्या बरोबरीने जागा मिळाव्यात असा आग्रह धरला होता. काझी मलरमूझ हुसेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तर मुसलमानांना सैन्यात ६६ टक्के आणि इतर मुलकी नोकऱ्यात व मंत्रिमंडळात बिगर मुसलमानांच्या इतक्या जागा मिळाव्यात अशी सूचना १९२९ साली मांडली होती.

मध्यवर्ती आणि अनेक प्रांतिक कायदेमंडळांतून जातीय प्रश्नावर रस्सीखेच चाले. तेथे विचारण्यात येणारे बहुतेक प्रश्नसुद्धा नोकऱ्यांतील जातीय प्रतिनिधित्व, जातीय स्वरुपाच्या वैयक्तिक तक्रारी आणि दुसऱ्या जातीच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनाबद्दल घेतले जाणारे आक्षेप या संबंधीचेच असत. सरकारी नोकऱ्यांत मुसल-मानांना किती प्रतिनिधित्व असावे हा जातीय प्रश्न सोडविण्याच्या मार्गातील एक महत्वाचा घटनात्मक प्रश्न होऊन बसला. मुंबई प्रांतिक कायदेमंडळात नूर महंमद आणि रफीउद्दीन यांनी सरकार इस्लामी संस्कृती नष्ट करुन टाकीत आहे असा जाहीरपणे आरोप केला आणि युनिव्हर्सिटी आणि इतर स्थानिक संस्थांत मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात येत नसल्याबद्दल सरकारला दोष दिला. शिक्षण मंत्र्यांनी त्यांना दाखवून दिले की, आपण मंत्री झाल्यावरच युनिव्हर्सिटी सेनेटवर तिनापैकी

दोन जागांवर मुसलमानांना नियुक्त करण्यात आले आहे. मुंबईत अंधेरीला मुसलमान समाजासाठी जे कॉलेज काढावयाचे आहे त्यासंबंधी आपण सध्या व्यग्र आहोत असेही त्यांनी पुढे सांगितले. पंजाब पोलिसांत गुरख्यांची भरती केली जात असल्याबद्दल हबीबुल्ला यांनी अत्यंत कडवट टीका केली होती. परंतु त्यावेळच्या युरोपियन अर्थ-मंत्र्यांनी पोलिस दलात मुसलमानांना ७५ टक्क्यांहून जास्त प्रतिनिधित्व मिळालेले असल्याने त्यांना तक्रार करायला काहीही जागा नाही असे बजावले. १९२६ मधील कलकत्त्याच्या दंगलीनंतर कलकत्ता कार्पोरेशनचे डेप्युटी मेयर व बंगाल कायदे मंडळाचे एक सभासद एच. एस. सुऱ्हावर्दी यांनी कलकत्त्यातील हिंदू पोलीस अधि-काऱ्यांविरुद्ध काही बेछूट आरोप केले होते. त्यासंबंधी चौकशी केली असता त्यांनी केलेले सर्व आरोप निराधार असल्याचे शाबीत झाले. त्यानंतर काही दिवसांनी बंगाल कायदेमंडळाच्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना लॉर्ड लिटन यांनी निराधारपणे केल्या जाणाऱ्या सर्वसाधारण आरोपांच्या संदर्भात असे उद्गार काढले की, 'मुसलमान हिंदू पोलिसांवर विश्वास ठेवणार नसतील आणि मुसलमान पोलिसांबद्दल हिंदूंच्या मनात अविश्वासाची भावना असेल तर त्यातून मला एकच निष्कर्ष काढावा लागेल आणि तो म्हणजे, हिंदुस्तानात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी हिंदी पोलिसांची नेमणूक करून चालणार नाही. तारीख ८ जुलै रोजी कलकत्त्यातील पोलिसांच्या कारभाराची चौकशी करण्यात यावी आणि पोलिस अधिकारी म्हणून आणखी मुसलमानांची नेमणूक करण्यात यावी अशा आशयाचा ठराव सुऱ्हावर्दींनी मांडला. सुऱ्हावर्दींचे त्यासंबंधीचे भाषण म्हणजे हिंदू पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध विद्वेषाचे स्तोत्र होते असा आरोप पी. एन. गुहा यांनी आपल्या भाषणात केला. एकाच गुन्ह्यासाठी हिंदू गुन्हेगारांपेक्षा मुसलमान गुन्हेगारांना जास्त कडक शिक्षा फर्मावण्यात येते असा आरोप सुऱ्हावर्दींनी केला त्यावेळी कोर्टाने कोणाला किती शिक्षा द्यावयाच्या त्याच्याशी पोलिसांचा काहीही संबंध नसतो असे सांगून अध्यक्षांनी सुऱ्हावर्दींना गप्प बसविले. पोलिस कारभाराची चौकशी करण्यासंबंधीचा त्यांचा ठराव फेटाळण्यात आला आणि जादा मुसलमान पोलिस अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यासंबंधीचा आपला ठराव त्यांनी मागे घेतला. परंतु यानिमित्ताने झालेल्या चर्चेच्या वेळी एकमेकाविरुद्ध जे आरोप प्रत्यारोप करण्यात आले त्यामुळे कमालीची जातीय कटुता निर्माण झाली तत्पूर्वी १९२४ मधील कोहटच्या दंगलीमागे मुस्लिम पोलिस अधिकाऱ्यांचा हात असल्याचा जो आरोप हिंदूंनी केला होता त्याला आधार असल्याचे सरकारच्या दृष्टोत्पत्तीस येऊन चुकले होते. त्यामुळे सरकारने असा निर्णय घेतला की, कोहट येथील पोलिस दलात हिंदूंना आणि शीखांना ३३ टक्के जागा द्यावयाच्या. कोहटच्या तथाकथित मुस्लिम वर्किंग कमेटीने याला तीव्र विरोध केला. मुसलमानांच्या विरोधाला न जुमानता सरकारने तो निर्णय अमलात आणला. या सर्व घटनांमुळे समान नागरिकत्वाच्या मुळावरच घाव घातला गेला.

परंतु हे नष्टचर्य एवढ्यावरच थांबणार नव्हते. जातीयवादाचा प्रश्न सामंजस्याने सोडविण्याच्याबाबतीत आणखीही अनेक अडचणी होत्या. सारांश १९२० च्या दशकांतील हिंदुस्तानातील परिस्थिती जातीय समस्या सोडविण्याच्या दृष्टीने अत्यंत प्रतिकूल होवून बसली होती.

प्रकरण दहावे

## समझोत्याचे प्रयत्न–१

१९२४ ते १९२९ च्या दरम्यान जातीय वैमनस्याचा आगडोंब विझविण्याचे, अल्पसंख्य गटांच्या राजकीय मागण्यांबाबत समझोता घडवून आणण्याचे आणि स्वायत्त भारताच्या घटनेचा सर्वसंमत मसुदा तयार करण्याचे अनेक प्रयत्न झाले. कोहट दंगलीनंतर थोडयाच दिवसात पहिली ऐक्य परिषद भरविण्यात आली. परंतु परिषदेत जे निर्णय घेण्यात आले ते जेमतेम तीन महिने टिकले. १९२३ साली बंगालमधील स्वराज्य पक्षवाल्यांनी जो बंगाल करार घडवून आणला त्याची पुढे शोकान्तिका झाली. १९२३–२४ साली डॉ. अन्सारी व इतर काही जणांनी राष्ट्रीय करार घडवून आणण्याचा केलेला प्रयत्न अर्धवटच सोडून द्यावा लागला. मध्यवर्ती कायदेमंडळात मात्र मोतीलाल नेहरूंनी दोन ठराव मांडून त्यांचा यशस्वीपणे पाठपुरावा केला. त्या दोन्ही ठरावात मिळून भारताची भावी राज्यघटना कशी असावी त्यासंबंधीची काही ठळक वैशिष्टये ग्रथित करण्यात आली होती. परंतु मुसलमानांच्या बहुतेक सर्व पक्षांनी ते ठराव आपल्याला अमान्य असल्याचे घोषित केले. जातीय दंग्यांना खंड पडत नव्हता आणि ऐक्य परिषदांतून समझोता घडवून आणण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले होते. १९२४–२५ साली भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेत प्रथमच जातीय समस्येवर राजकीय तोडगा निघू शकला. परंतु परिषदेतल्या बहुसंख्य सभासदांनी त्याकडे दुर्लक्षच केले आणि ती कोणत्याही शिफारसीच करू शकली नाही. तीन वर्षानंतर भरलेल्या दुसऱ्या सर्वपक्षीय परिषदेत नेहरू रिपोर्ट संमत करण्यात आला त्यांत स्वतंत्र, लोकशाही आणि अखंड भारताच्या भावी राज्यघटनेचा तपशीलवार आराखडा देण्यात आला होता. काँग्रेसमध्ये नसलेल्या सर्व मुसलमान नेत्यांनी तो फेटाळून लावला. त्या दशकाच्या अखेरीस काँग्रेसने पुन्हा सामुदायिक सत्याग्रहाचा पवित्रा घेतला तर ब्रिटिश सरकारने गोलमेज परिषद बोलावली. मागच्या प्रकरणात दाखवून दिल्याप्रमाणे जातीय प्रश्नाबाबत आपापसात तडजोड घडून येण्यासारखी परिस्थिती राहिली नव्हती आणि जातीय समस्येतून निर्माण झालेल्या फुटीरवादी चळवळीने १९३० च्या दशकात चांगलाच जोर पकडला.

खिलाफत चळवळीच्या काळात अनेक लहान मोठ्या उलेमांना राजकीय क्षेत्रात अवास्तव महत्व प्राप्त झाले होते आणि त्यांनी आपल्या धार्मिक कडवेपणामुळे सामाजिक/राजकीय वातावरण बिघडवून टाकले होते. हाजच्या यात्रेला जाणाऱ्या

अनेक यात्रेकरूंजवळ परतीच्या तिकिटाला पुरेसे पैसे नसल्यामुळे त्यांना तेथेच अडकून पडावे लागते असे अनुभवास आल्यामुळे मध्यवर्ती हाज समितीने हाजला जाणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूला यात्रेला जातानाच परतीचे तिकिट काढण्याची कायद्याने सक्ती करण्यात यावी अशी शिफारस केली. सरकारने तशा आशयाचे एक विधेयकही तयार केले परंतु प्रत्यक्षात ते मध्यवर्ती कायदे मंडळासमोर मांडण्यात आले त्यावेळी हा आमच्या धर्मात हस्तक्षेप होतो असा उलेमांनी एकच गिल्ला केला आणि त्याविरूद्ध प्रचार मोहीम उघडली. जीनासकट मध्यवर्ती कायदेमंडळातील सर्व मुसलमान सभासदांनी सरकारशी संगनमत करून मुसलमान धर्मात हस्तक्षेप करण्याचे कारस्थान रचले आहे असा आरोप करण्यासही त्यांनी कमी केले नाही. त्या विधेयकावर चर्चा सुरू झाली त्यावेळी महमद अली प्रेक्षकांच्या कक्षात बसले होते. प्राथमिक चर्चा ऐकल्यानंतर या विधेयकात धर्मात हस्तक्षेप करण्यासारखे काही नाही अशी कबुली त्यांनी एका अधिकाऱ्याजवळ दिली आणि तरीही ते हमदर्द आणि कॉमरेड या आपल्या नियतकालिकातून त्या बिलावर हल्ला करीतच राहिले. त्या विधेयकाचे प्रवर्तक याकूब यांनी विधेयकावरील चर्चेच्या वेळी महंमद अलींच्या या दुटप्पीपणाचा खरपूस समाचार घेतला

मुसलमानांच्या निरनिराळ्या पक्षात ज्याप्रमाणे वैयक्तिक कटुता आणि द्वेषभावना होती त्याप्रमाणे ती प्रत्येक पक्षांतर्गतही होती. मुसलमानांतील निरनिराळ्या पक्षांत सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी सर्व मुसलमान पक्षांची एक बैठक बोलावण्यात यावी हा शौकत अलींचा ठराव १९२४ डिसेंबरच्या लीगच्या अधिवेशनात पास करण्यात आला. लीगच्या चिटणिसांनी या बैठकीसाठी निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांना निमंत्रणे पाठवावयाची होती. या ठरावाला जीना आणि साहेबजादा अफताब अहमदखान यांचा पाठिंबा होता. १९२५ च्या मध्याला ही बैठक झाली. सर्व पक्षांनी आपापसातील वैर विसरून एकमेकांशी सहकार्य करावे अशा आशयाचा ठराव बैठकीत एकमताने संमत करण्यात आला. तसेच प्रत्येक पक्षाचे कार्यक्षेत्र ठरवून देण्यात आले. परंतु हा ठराव कागदावरच राहिला. त्यानंतर दीड वर्षांनी भरलेल्या लीगच्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून भाषण करताना शेख अबदुल कादीर यांनी निरनिराळे पक्ष इतरांना ठरवून दिलेल्या कार्यक्षेत्रात ढवळाढवळ करीत असल्याबद्दल आणि त्यांचे पुढारी जमातीचे हित डावलून स्वतःच्या व्यक्तिगत महत्वाकांक्षेतच मशगुल होऊन गेले आहेत आणि ते 'समाज हितासाठी' आपल्या प्रतिस्पर्धी पुढाऱ्याला खतम केले पाहिजे असे सांगत सुटले आहेत याबद्दल खेद व्यक्त केला. त्यांनी तर पुढे असेही सांगितले की, एकमेकांविरूद्ध इतका गलिच्छ आणि हिडीस मजकूर उघडउघड छापून प्रसिद्ध केला जात आहे की, सर्वसामान्य माणसालासुद्धा ते शब्द उच्चारण्याची लाज वाटावी.

खिलाफत परिषदेच्या खजिनदारांनी त्या संस्थेच्या पैशाची अफरातफर केल्यामुळे तिची पिछेहाट झाली होती. मुस्लीम लीगदेखील एकसंघ राहिली. नव्हती. जमियत-

उल-उलेमामध्ये मात्र भारताबाहेर घडलेल्या घटनांमुळे मोठी फूट पडली. १९२६ मध्ये अरेबियाची सर्वोच्च सत्ता राजे इब्न सौद यांच्या हाती आली. त्यांचा विजय म्हणजे अरेबियातील वहाबी धर्मपंथाचा विजय होता. वहाबी पंथ हा अत्यंत कर्मठ पुनरुज्जीवनवादी म्हणून प्रसिद्ध आहे. खुद्द पैगंबराच्या कबरीवरही आलीशान बांधकामे केली जावीत हे त्यांना सहन होत नव्हते. इब्न सौदच्या सैनिकांनी इस्लामच्या सुरुवातीच्या काळातील काही पुढाऱ्यांच्या कबरीवरील इमारतींच्या घुमटांची नासधूस केली. हिंदुस्तानात त्याची फार तीव्र प्रतिक्रिया उमटली कारण येथे परंपरागत सूफीवाद आणि दर्ग्यांची उपासना चालू होती. साहजिकच या प्रश्नावरून येथील उलेमात दोन स्पष्ट गट पडले. बरेली पंथांच्या उलेमांनी इब्न सौदच्या या कृत्याचा निषेध म्हणून जमीयत-उल-उलेमातून बाहेर पडून सुन्नी जमीयत-उल-उलेमा नावाची प्रतिस्पर्धी संघटना काढली. स्वतःला अहल-इ-हादीस म्हणवून घेणारे वहाबी पंथानुकूल उलेमा जुन्याच संघटनेत राहिले. इब्न सौदला त्यांचा पाठिंबा होता. त्यांचे विरोधक स्वतःला हनाफी म्हणजे परंपरागत इस्लामवादी म्हणवून घेऊ लागले. मोठमोठ्या साधू-फकीरांच्या कबरीं किंवा दर्गा या ठिकाणी पूजाअर्चा करणे त्यांना मान्य होते. उलेमा आणि खिलाफतवाद्यांनी अरबस्तानातील पवित्र स्थानांचे नियंत्रण करण्याची जबाबदारी मुसलमानांच्या एकाद्या आंतरराष्ट्रीय समितीकडे सोपवावी म्हणून इब्न सौदचे मन वळविण्याची खटपट केली होती. परंतु त्यांनी ही मागणी साफ धुडकावून आपले जुनेच धोरण पुढे चालविले होते. स्वतःच्या देशातील आपल्या धर्मबांधवांसंबंधीचे आपले कर्तव्य त्यांनी आधी बजावावे असा सल्ला त्यांना देण्यात आला होता. बृहद् इस्लाम-वादाला काहीशी ओहोटी लागली होती आणि खिलाफत चळवळीच्या वेळी केलेला त्याग फुकट गेला अशी वैफल्याची भावना त्यांच्यात पसरली होती. बाह्य देशांतील घडामोडीकडे लक्ष न देता येथील उलेमा जसजसे स्थानिक प्रश्नावर भर देऊन लागले त्याप्रमाणात बिगर मुस्लिमाबाबतची त्यांची असहिष्णुता आणि कडवेपणा वाढू लागला. तबलिगचे काम करणारे हिंदूंच्या धार्मिक भावनांवर हल्ले करू लागले आणि त्यामुळे जातीय वातावरण आणखीच बिघडले.

राजनिष्ठ अश्रफांच्यात जी अंतर्गत धुसफूस होती तिला या उलेमांनी धार्मिक स्वरूप दिले. पंजाबमध्ये फजली हुसेन यांनी स्थापन केलेल्या मुस्लीम पार्टीतील शहरी आणि ग्रामीण भागातील अश्रफांचे हितसंबंध परस्परविरोधी होते. शहरी भागातील अश्रफांचे म्हणणे होते की, शरीयतमधील वारसा हक्कासंबंधीच्या तरतुदी ग्रामीण आणि शहरी भागातील मालमत्तेला सारख्याच लागू असल्या पाहिजेत. परंतु ग्रामीण भागातील सर्वच जमीनदार मग ते कोणत्याही धर्माचे असोत अशा मताचे होते की; जमीन-जुमल्याच्या बाबतीत मुलींना वारसाहक्क नसावा. पंजाबमधील जमीनदार याबाबत हिंदू वारसा कायदा पाळत असत. शहरी आणि ग्रामीण भागातील अश्रफांत या प्रश्नावर जो संघर्ष झाला त्यामुळे मुस्लीम पार्टी दुभंगली आणि शीख, हिंदू आणि

मुसलमान जमीनदारांनी एकत्र येऊन एक ग्रामीण गट बनवला. त्या गटाला कायदे-मंडळात बहुमतही मिळाले. उलेमांनी धर्माच्या नावाखाली शहरी उलेमांची बाजू उचलून धरली. अशा तऱ्हेने मुसलमान पक्षोपक्षांची संख्या वाढत गेली आणि त्यामुळे अशा सर्व पक्षांना एकत्र आणून कोणत्याही स्वरूपाचा समझोता घडवून आणणे केवळ अशक्य होऊन बसले.

कोहट व्यतिरिक्त १९२४ साली बकर-इ-ईदच्या वेळी दिल्ली, कलकत्ता, अलाहाबाद पानिपत आणि कर्नाल येथे जातीय दंगली उसळल्या. १९२५ साली जातीय दंगलीचे हे लोण गुजराथ, बिहार, संयुक्त प्रांत आणि सोलापूर येथे पसरले. परंतु या सर्वात १९२६ मधील कलकत्त्यातील दंगल अतिशय भीषण होती. कलकत्त्यामागोमाग बंगाल, दिल्ली, अलाहाबाद आणि रावळपिंडी येथेही जातीय दंगलींचा आगडोंब उसळला. १९२६ मधील कलकत्त्याच्या दंगलीची राजकारणी लोकांत अत्यंत तीव्र प्रतिक्रिया उमटली. या संदर्भात बंगाल कायदेमंडळात सुऱ्हावर्दींनी काय तारे तोडले होते ते वर आलेच आहे. सुऱ्हावर्दींनीच असा सूर लावल्यावर खिलाफतच्या इतर लहान-मोठ्या पुढाऱ्यांनी त्यांनाही मागे टाकणारी वक्तव्ये करावीत याबद्दल आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही. दिल्ली येथे मे १९२६ मध्ये भरलेल्या अ. भा. खिलाफत अधिवेशनाचे अध्यक्ष मौ. सैयद सुलेमान नदवी यांनी सांगितले की, हिंदूंनी आपली संघटना उभारली तर हरकत नाही. परंतु त्यांच्या शुद्धीकरण चळवळीबद्दल मुसलमानांना फार चिंता वाटते. अबदुर रहमान दोजानवे म्हणाले की, आपण सर्वजण हिंदू मुस्लिम ऐक्याला मूठमाती देण्यासाठी येथे जमलो आहोत. एवढ्यावरच न थांबता त्यांनी पुढे असे सांगितले की, कोणाही मुसलमानाने काफराबद्दल आदर किंवा दया दाखवता कामा नये. हिंदुबरोबर मैत्रीचा हात पुढे करणे म्हणजे दुबळेपणाचे लक्षण आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. मुसलमान आपल्या प्रभावी ताकदीनिशी मैदानात उतरले तर हे लाला बिला (लाला म्हणजे लाला लजपतराय आणि हिंदूंमधील बलीया जमात) चट सारे दोन दिवसात दाती तृण धरून आपल्याशी समझोता करायला तयार होतील. तानझिम आणि तबलिघ संबंधीचे दोन ठराव अधिवेशनात संमत करण्यात आले. रेवारीचे मौलाना शिराझउद्दिन यांनी मात्र त्या ठरावांना विरोध केला. ते म्हणाले, 'आपण जर इतके दिवस हिंदू महासभेचा निषेध करीत आलो आहोत तर महासभा जे करते तेच आपण कसे काय करू शकतो? यातून चांगले तर काहीच निष्पन्न होणार नाही. उलट जे हिंदू महासभेपासून अद्याप अलिप्त राहिले आहेत ते तिच्याकडे ओढले जातील आणि त्यामुळे संघटना अधिक बळकट मात्र होईल.' महंमद अलींनी तबलिघला पाठिंबा दिला एवढेच नव्हे तर प्रत्येक मुसलमानाने अन्य धर्मीयांना आपल्या धर्मात आणले पाहिजे असे आवाहन केले. ज्या दिवशी मी गांधींना मुसलमान धर्माची दीक्षा देईन तो मला सुदिन वाटेल असे ते पुढे म्हणाले. आपल्या भाषणात मुलिक यांनी हिंदूचा उल्लेख हिंदू बांधव असा केला

तेवढ्यावरून अधिवेशनात गोंधळ माजला आणि अनेक प्रतिनिधींनी तो आक्षेपार्ह शब्द मागे घेण्यात यावा अशी मागणी केली.

परिस्थिती अशा तऱ्हेने चिघळत चालली असताना काँग्रेसने जातीय तणाव कमी करण्याच्या दृष्टीने दोन प्रयत्न करून पाहिले. तारीख ४ जुलै १९२६ रोजी काँग्रेसने असे घोषित केले की, जातीय भावना प्रक्षुब्ध होऊ नयेत म्हणून निरनिराळ्या जातींशी संबंधित असलेले कोणतेही विधेयक अथवा ठराव संबंधित जातीच्या ७५ टक्के प्रतिनिधींची संमती असल्याशिवाय कायदेमंडळासमोर न आणण्याचा संकेत सर्व राजकीय पक्षांनी कटाक्षाने पाळावा. परंतु या सूचनेकडे काँग्रेस सभासदांव्यतिरिक्त इतर कोणीच लक्ष दिले नाही. त्याच महिन्यात मोतीलाल नेहरू आणि मौलाना आझाद यांनी इंडियन नॅशनल युनियन या नावाची नवी जातिनिरपेक्ष संघटना स्थापन करीत असल्याची घोषणा केली. भारताचे एकसंघ राष्ट्र स्थापन करण्यास चालना देणे, जातीजातीतील वैमनस्य आणि फुटीरवादी प्रवृत्तींना आळा घालणे आणि परस्परात सदिच्छा आणि सद्भाव यांच्या आधारे जातीय समस्या सोडविण्यास अनुकूल असे वातावरण निर्माण करणे ही या संघटनेची उद्दिष्टे असल्याचे जाहीर-नाम्यात म्हटले होते. त्यावेळी काँग्रेस ही वरपांगी अ-जातीय असली तरी तिचे अनेक ज्येष्ठ पुढारी खिलाफत परिषद मुस्लीम लीग किंवा हिंदूमहासभा यासारख्या जातीयवादी संघटनांतही भाग घेत असत आणि त्यांची वक्तव्ये व्यासपीठानुसार दुटप्पीपणाची असत. वरिष्ठ नेत्यांपैकी गांधी, डॉ. एम. ए. अन्सारी आणि मोतीलाल नेहरू यांचाच काय तो याला अपवाद होता. आझाद, महंमद अली, मालवीय आणि इतर अनेक पुढारी काँग्रेसमध्ये असले तरी त्यांना जातीय पक्षांतही मान्यता होती. १९२६ च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीत अनेक प्रांतात काँग्रेसला पराभव पत्करावा लागल्यानंतर मालवीयांनी पुन्हा काँग्रेसचे सभासदत्व स्वीकारून ते तिचे नेतृत्व करू लागले.

इंडियन नॅशनल युनियनच्या जाहीरनाम्याविषयी मिश्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. पंजाबमधील हिंदू वृत्तपत्रांनी मोतीलाल नेहरू आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या धोरणामुळे हिंदू समाजाचे अपरिमित नुकसान झाले आहे असे मत व्यक्त करून काँग्रेसबद्दल अविश्वास व्यक्त केला तर 'मुस्लीम आऊटलुक' या लाहोरच्या नियतकालिकाने इंडियन नॅशनल युनियन म्हणजे 'एक नवे कपटजाल' आहे अशी त्याची संभावना केली. स्वामी श्रद्धानंद यांनीही इंडियन नॅशनल युनियनवर टीका करणारे पत्रक प्रसिद्ध केले. याउलट नामदार व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, सर तेज बहादूर सप्रू हकीम अजमलखान, सरोजिनी नायडू, सर झुलफीकार अलिखान, सर पी. सी. रे डॉ. एम. ए. अन्सारी, सेन गुप्ता, टी. ए. के. शेरवानी, एस. श्रीनिवास अय्यंगार, चौधरी खलिक्कुझमान, लाला दुनीचंद, डॉ. एस. महमूद आणि महंमुदाबादचे महाराजा सर महंमदखान यांनी एक पत्रक प्रसिद्ध मकरून इंडियन नॅशनल युनियनच्या

जाहिरनाम्याशी आपण संपूर्णपणे सहमत असल्याचे जाहीर केले आणि त्या नव्या संघटनेत सामील होण्याचीही तयारी दर्शविली. परंतु काँग्रेस पक्ष आगामी निवडणुकीच्या कामात अडकल्यामुळे इंडियन नॅशनल युनियन दुर्दैवाने कागदावरच राहिली.

मशिदीवरून सवाद्य मिरवणूक आणि गोहत्या हे जातीय दंगलीबाबतचे दोन अत्यंत जटिल प्रश्न होऊन बसले होते. हिंदूमहासभा आणि हिंदूंच्या इतर जातीय संस्था यांचा असा आग्रह होता की, मुसलमानांनी गोहत्या थांबविली पाहिजे आणि सार्वजनिक रस्त्यावरून सवाद्य मिरवणूक नेण्याचा त्यांचा अनिर्बंध हक्क मान्य केला पाहिजे. उलेमांची भूमिका नेमकी याच्या उलट होती. गोहत्येवर त्यांना कोठल्याही प्रकारचे निर्बंध नको होते आणि हिंदूंनी मशिदीवरून केव्हाच सवाद्य मिरवणूक नेता कामा नये असा त्यांचा आग्रह होता. या परस्पर विरोधी भूमिकांतून मार्ग काढण्यासाठी काँग्रेस पुढाऱ्यांनी निरनिराळे पर्याय सुचविले. प्रार्थनेत जाणूनबूजून अडथळा आणण्याचा हेतू नसेल तर मशिदीच्या आसपास वाद्ये वाजविण्यास इस्लामने कधीही बंदी घातलेली नाही असे मौलवी महमद याकूब यांनी जाहीर केले. बंगाल इलाखा मुस्लीम लीगचे सेक्रेटरी कुतुबुद्दिन अहमद यांनी १९२६ मध्ये खालील पत्रक प्रसिद्ध केले होते :

अन्य धर्मीयांनी मशिदीसमोर वाद्ये वाजवावी का नाही हा धार्मिक प्रश्न होऊ शकत नाही असे माझे नम्र मत आहे. आपल्या आदरणीय पैगंबरांनी स्वत: देखील ईदच्या सणाच्या वेळी मशिदीत वाद्ये वाजविण्यास परवानगी दिली होती आणि त्याप्रसंगी हजरत आयेशा यांना जातीने हजर राहण्यास सांगितले होते. ... कॉन्स्टँटिनोपलचे खलिफत उल मुस्लीम हे शुक्रवारी सलाम आलेक समारंभास हजर राहण्याकरिता सेंट सोफिया मशिदीत जात त्यावेळी टर्किश बँड लावून जात. मक्केतील महमेल मिरवणुकीतही नेहमी ईजिप्शियन बँड असे. हिंदूस्थानात देखील मुसलमान राजवटीत दिल्लीच्या जामा मशिदीच्या परिसरात रामलीला होत असत आणि त्यात नायकाचे काम करणाराला पुष्पहार घातला जात असे. कलकत्त्यातील एका मुस्लिम कुटुंबात लग्नाची सवाद्य मिरवणूक निघाली ती मुळी त्या घराच्या आवारातच असलेल्या मशिदीपासून. कित्येक आखाडे आजही मशिदीपासून वाद्ये वाजवीत निघतात तर सर्वच आखाडे एका मशिदीजवळ असलेल्या मौलवी दर्ग्यावर जातात आणि तेथे तासन्-तास वाद्ये वाजविली जातात. परंतु त्याविरुद्ध कोणी कसलीही तक्रार केलेली नाही. त्यामुळे मी असे मानतो की, वाद्ये वाजविण्याचा शरीयतशी कसलाही संबंध नसून काही हितसंबंधी लोकांनी हिंदूंच्या गोहत्या बंदीच्या मागणीला उत्तर म्हणून अडाणी जातीबांधवांना भडकविण्यासाठी हे एक निमित्त शोधून काढले आहे. गेल्या शतकाच्या अखेरीस काँग्रेसची स्थापना झाली त्या सुमारासच गोहत्येच्या प्रश्नाला धार्मिक स्वरूप देण्यात आले आणि तेव्हापासून हिंदू पुढाऱ्यांची ती एक डोकेदुखी होऊन बसली

आहे. मुसलमान गोहत्त्या करतात तर त्यांना चिडविण्यासाठी आता सवाद्य मिरवणुकीचा प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला. पूर्वीपासून हिंदू आणि मुसलमान हे दोघेही एकमेकांच्या धार्मिक भावनांचा आदर करीत असत. आणि एकमेकांबद्दल सदिच्छा आणि भ्रातृभाव बाळगत असत. पूर्वी हिंदूंकडून स्वेच्छेने मिळणारी ही वर्तणूक आज खंडित झाली असेल तर सक्तीने ती त्यांच्यावर लादता येणार नाही. म्हणून हिंदूंना सवाद्य मिरवणूक नेण्यास बंदी घालण्याचा आपल्याला कसा अधिकार पोहोचतो आणि त्यांनी तो पाळला नाही तर त्यांना ती सक्तीने पाळावयास लावण्यासाठी हिंसेचा अवलंब करणे तरी कसे समर्थनीय ठरते?

डिसेंबर १९२५ मध्ये भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात जातीय तणावा-संबंधीच्या प्रश्नावर दोन ठराव झाले. पहिल्या ठरावात जातीजातीतील वैमनस्य आणि कटुता वाढविण्याचा जो प्रयत्न काही सार्वजनिक संस्थांकडून केला जातो त्याचा निषेध करण्यात आला होता आणि हिंदुस्तानचा भावी राजकीय विकास हिंदू-मुसलमान ऐक्यावरच अवलंबून आहे असा विश्वास व्यक्त करून जनतेला देवाण-घेवाणीची वृत्ती जोपासण्याचे आवाहन करण्यात आले होते. दुसऱ्या ठरावात ज्यामुळे जातीय मतभेद विकोपास जातील असे प्रश्न सामोपचाराने मिटविण्यासाठी निरनिराळ्या जिल्ह्यात सर्व जमातींचे प्रतिनिधी असलेल्या समित्या स्थापन करण्यात याव्यात आणि प्रत्येक प्रांताच्या राजधानीच्या ठिकाणी मध्यवर्ती समिती नेमण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली होती. १९२६ डिसेंबरच्या अधिवेशनात या ठरावांना दुजोरा देण्यात आला. जुलै १९२६ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या अनौपचारिक ऐक्य परिषदेत बरद्वानचे महाराज आणि मुर्शिदाबादचे नबाब यांनीही अशा समित्या नेमण्याची शिफारस केली. परंतु प्रत्यक्षात मात्र त्या कधीच अस्तित्वात येऊ शकल्या नाहीत.

त्या वर्षाच्या अखेरीअखेरीस एका माथेफिरू मुसलमानाने स्वामी श्रद्धानंद यांचा अमानुष खून केला. त्यानंतर काही दिवसांनी भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात शेख अबदुल कादिर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात या भीषण घटनेचा तीव्र निषेध केला. ते आपल्या भाषणात म्हणाले 'काही मुसलमानांचे श्रद्धानंदांशी किंवा त्यांनी चालविलेल्या धर्म प्रसाराशी मतभेद होते. परंतु आपल्याच एका धर्मबांधवाकडून त्यांचा अशा तऱ्हेने अंत व्हावा याचे इतर कोणाइतकेच त्यांनाही दुःख झाल्यावाचून राहणार नाही. अशी माझा खात्री आहे. त्याने आपल्या या घाणेरड्या कृत्याने इस्लामचे जे अपरिमित नुकसान केले आहे त्याला तोड नाही तसेच शुद्धी चळवळीला उलट त्याने नवी जोरदार प्रेरणा दिली आहे. त्यांनी स्वतःच अध्यक्षपदावरून मांडलेला दुखवटयाचा व या भयानक प्रकाराचा अत्यंत तीव्र शब्दात निषेध करणारा ठराव एकमताने संमत करण्यात आला परंतु उलेमांचा मात्र त्याला पाठिंबा नव्हता.

जमीयत-उल-उलेमाचे मुखपत्र असलेल्या 'अल-जमीयत' चे संपादक मौलाना मौदूदी यांच्यासारख्या अनेक उलेमांनी धर्माच्या नावाखाली स्वामी श्रद्धानंद यांच्या खुनाचे उघडपणे समर्थन केले. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकात या खुनाचे समर्थन इस्लाम धर्मात जेहादचे जे माहात्म्य सांगितले आहे त्यावर आधारित होते. स्वामीजींच्या खुनीला ज्या दिवशी फाशी देण्यात आले त्याच्या आदल्या रात्रीपासून मुसलमान फार मोठ्या संख्येने दिल्लीच्या तुरुंगाबाहेर जमले होते आणि दुसऱ्या दिवशी त्यांच्या शवाची त्यांनी प्रचंड मिरवणूक काढली. त्यावेळी मिरवणुकीतील अनेक मुसलमान अनावर होऊन त्यांनी हिंदूंवर हल्ले चढविण्यास सुरवात केली. देवबंद येथे मृतात्म्यास शांती मिळावी म्हणून सात दिवसपर्यंत प्रार्थना करण्यात आली.

त्या काळात प्रसिद्ध होणाऱ्या भडक लिखाणाचा उल्लेख वर आलाच आहे. पंजाबच्या होम मेंबरांनी तेथील कायदेमंडळात यासंबंधी असे निवेदन केले की: १९२२ पासून पंजाबमधील देशी भाषातील वृत्तपत्रांनी जातीय वैमनस्याची आग भडकाविण्याचे काम चालविले आहे. त्या काळात दुसऱ्याच्या धार्मिक भावना दुखविणारे अनेक लेख आणि पत्रके प्रसिद्ध झाली होती. त्यापैकी 'रंगीला रसूल' या पुस्तिकाच्या लेखकावर खटला भरण्यात आला होता. परंतु कोर्टाने त्याला निर्दोष ठरविले. त्यामुळे काही मुसलमानांनी देशव्यापी आंदोलन उभे करून त्या खटल्याचा निकाल देणाऱ्या पंजाब हायकोर्टाच्या शीख न्यायाधिशाला बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी केली. जुलै १९२७ च्या पहिल्या पंधरवड्यात पंजाब मुस्लीम लीगने त्या न्याया-धिशाचा निषेध करणारा ठराव पास केला आणि मुसलमानांच्या एका शिष्टमंडळाने या संदर्भात गव्हर्नरांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या शिष्टमंडळाच्या निवेदनात न्यायमूर्ती दलीपसिंग यांच्यावर अद्वातद्वा टीका करण्यात आलेली असल्यामुळे गव्हर्नरांनी शिष्टमंडळास भेट देण्याचे नाकारले. वायव्य सरहद्द प्रांतातील उलेमां तर तेथील हिंदूंचा विच्छेद करण्याची चिथावणी देऊ लागले होते.

कलकत्त्याच्या खिलाफत परिषदेत महंमद अलींनी असे विधान केले की, देशहिताला प्राधान्य देऊन मी एकवेळ हिंदूंचा सवाद्य मिरवणुकीचा अधिकार मान्य करीन कारण मुसलमान इतकी एकाग्रचित्ताने प्रार्थना करतात की, कितीही वाद्ये वाजली तरी त्यांच्या प्रार्थनेत त्यावेळी व्यत्यय येत नाही याची मला जाणीव आहे. परंतु प्रेषिताची कोणी बदनामी केली तर ती मात्र मी कदापिही सहन करू शकणार नाही. बलात्कार आणि खून ही गेल्या पाच वर्षापासून नित्याची बाब होऊन बसली आहे याकडे हिंदूंचे लक्ष वेधणारा ठराव परिषदेत पास करण्यात आला. मुसलमानांना नमते घेण्यास लावण्यासाठी संधी मिळेल तेथे त्यांच्यावर संघटितपणे हल्ले चढविण्याची यांच्यापैकी काही जणांनी तयारी चालविली आहे असा आरोप त्या ठरावात पुढे करण्यात आला व अशा कृत्यामुळे दोन समाजात सरळसरळ यादवी उद्‌भवल्याशिवाय राहाणार नाही असा इशाराही देण्यात आला.

मध्यवर्ती कायदेमंडळातील अनेक हिंदू सभासदांनी देखील 'उन्नीस्वी सदी का महाऋषी' सारख्या आक्षेपार्ह पुस्तिका लिहिणाऱ्यांवर खटले भरण्यात यावेत अशी मागणी केली होती. त्या संबंधात बोलताना तारीख ५ सप्टेंबर १९२७ रोजी अबदुल हाये यांनी सभागृहाला असे सांगितले की, अन्य धर्मीयांवर अशा तऱ्हेचे गलिच्छ हल्ले करणे कुराणाला मंजूर नाही. आणि या पुस्तिकेच्या लेखकाने इस्लामला न साजेसे वर्तन केले आहे. एच. के. आचार्य यांनी सभागृहाच्या असे निदर्शनाला आणून दिले की, काही कडवे मुसलमान असे सांगत असतात की, त्यांना स्वराज्य नको असून केवळ मुसलमानांचे राज्य हवे आहे. पंडित ठाकूरदास भार्गव यांनी अशी तक्रार केली की, 'रंगीला रसूल' संबंधीच्या चळवळीच्या वेळी काही धर्मांध मुसलमान पुढारी आपल्या अनुयायांना हिंदूंवर हल्ले चढविण्याची चिथावणी देत होते. तर दुसरे काही मुसलमान पुढारी हिंदूंवर हिंसक हल्ले चढविण्याची आणि त्यांच्यावर बहिष्कार घालण्याची जाहीरपणे धमकी देत होते. सरकारने आक्षेपार्ह प्रचार होत असल्याचे मान्य केले आणि वायव्य सरहद्द प्रांतातील हिंदूंना तेथून हुसकावून लावले जाऊ नये म्हणून जरूर ती कार्यवाही केली जात आहे असे आश्वासन दिले. काही तेलगू नाटकांतून इस्लामचा अपमान होईल किंवा मुसलमान सम्राट, मुसलमान स्त्रिया आणि मुसलमानांना पवित्र असलेल्यांची बदनामी होईल असा मजकूर आहे अशी तक्रार अब्दुल लतीफसाहेब फरूकी यांनी केली होती. रंगीला रसूल प्रकरणाने उद्भवलेल्या वादळात सारा देश त्यावर्षी ढवळून निघाला होता. शेवटी एप्रिल १९२९ मध्ये त्या पुस्तकाचा लेखक राजपाल याचा खून झाला.

जनतेवर पुढाऱ्यांचा प्रभाव राहिलेला नव्हता. परंतु अगतिकपणाने आणि भाबडे-पणाने ते निरनिराळे तोडगे सुचवीत होते. व धर्मांच्या प्रेषितांबद्दल जनतेच्या मनात आदरभाव निर्माण व्हावा म्हणून सुरू करण्यात आलेल्या मोहिमेचे तारीख २७ जुलै रोजी सरोजिनी नायडू यांनी उद्घाटन केले. २९ ऑगस्ट रोजी लॉर्ड आयर्विन यांनी मध्यवर्ती कायदे मंडळाच्या आणि कौन्सिल ऑफ स्टेटच्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना केलेल्या भाषणात सर्व पुढाऱ्यांना जातीय ऐक्यासाठी पुन्हा एकदा प्रयत्न करण्याचे आवाहन केले. त्याप्रमाणे सप्टेंबर महिन्यात सर्वपक्षीय ऐक्य परिषद सिमला येथे बोलावण्यात आली. या परिषदेपुढे भाषण करताना व्हॉईसरॉय साहेबांनी अशी माहिती दिली की, गेल्या १८ महिन्यात जातीय दंगलीमुळे ३०० लोक मारले गेले असून २,५०० जखमी झाले आहेत. हिंदू मुसलमानात घडून आलेले अर्धवट समझोते या प्रश्नाची कायमची तड लावण्याच्या दृष्टीने कुचकामी ठरले असून अशा परिषदांतून भाग घेणारांना जोपर्यंत चिरस्थायी स्वरुपाची खरीखुरी शांतता घडून यावी असे मनापासून वाटत नाही तोपर्यंत अशा परिषदा वांझोट्याच ठरणार. परस्परांतील दुर्दैवी मतभेदांची कारणे शोधून काढून त्यांना सामोरे जाण्याची ज्येष्ठ जमातीतील जबाबदार नेत्यांची तयारी असेल आणि त्यातून काही निष्पन्न होणार असेल तर आपण अशी परिषद

बोलावण्यास तयार आहोत असे त्यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस सांगितले. त्यांच्या या भाषणाने काहीशा अडचणीत आलेल्या पुढाऱ्यांनी मग आर्यविन यांच्या मध्यस्थीशिवायच अशी परिषद बोलावण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे तारीख १६ ते २२ सप्टेंबरपर्यंत सिमला येथे सर्वपक्षीय ऐक्य परिषद झाली. परंतु तिच्यातून काहीही निष्पन्न होऊ शकले नाही. केवळ हिंदूमहासभा किंवा केवळ मुस्लीम लीग यांचे प्रतिनिधी असलेल्या स्वतंत्र समित्या नेमण्यात आल्या आणि त्यांच्यावर गोहत्या आणि सवाद्य मिरवणूक इ. प्रश्नावर सर्वमान्य असा तोडगा काढण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांनी इतकी एकांतिक मते मांडली की, त्याबाबत एकवाक्यता होणे शक्यच नव्हते. सर महंमद शफी आणि महंमद अली यांचा असा आग्रह होता की, परिषदेने राजकीय, सामाजिक आणि धार्मिक असे सगळेच प्रश्न हाताळावेत आणि त्यांचा सोक्षमोक्ष लावावा परंतु हिंदू महासभेच्या पुढाऱ्यांना ते मान्य नव्हते. त्यांना परिषदेतील चर्चा फक्त धार्मिक आणि सामाजिक प्रश्नापुरतीच मर्यादित ठेवावी असे वाटत होते. ही परिषद अयशस्वी ठरल्यामुळे काँग्रेसला याबाबतीत पुढाकार घेण्याची संधी मिळाली आणि त्या संधीचा फायदा घेऊन काँग्रेसने ऑक्टोबरच्या अखेरीस कलकत्त्यास आपली एक ऐक्य परिषद भरविली. या परिषदेतील ठरावात सार्वजनिक सुरक्षिततेला आणि नैतिकतेला बाध येणार नाही अशा मर्यादेत प्रत्येकाला आपापला धर्म पाळता येईल अशी हमी देऊन धर्मांतर, गोहत्त्या आणि सवाद्य मिरवणूक यावर काही रास्त निर्बंध असावेत असे सुचविण्यात आले होते. दोन महिन्यानंतर मद्रास येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात कलकत्त्याला ऐक्य परिषदेने केलेल्या शिफारसींच्या धर्तीवर एक विस्तृत ठराव पास करण्यात आला. तारीख २५ डिसेंबर रोजी मद्रासला भरलेल्या खिलाफत परिषदेनेही या ऐक्य परिषदेच्या शिफारसीवर शिक्कामोर्तब केले. १९२७ मध्ये मुस्लीम लीगमध्ये फूट पडून जीना गट आणि शफी गट असे दोन गट त्या संघटनेत पडले होते. जीना गटाचे अधिवेशन त्या वर्षाच्या अखेरीस कलकत्त्यास भरले होते. कलकत्त्याच्या ऐक्य परिषदेचा कोठल्याही प्रकारे उल्लेख न करता परंतु जवळजवळ तिच्याच शब्दात अधिवेशनात एक प्रस्ताव पास करण्यात आला. या उलट हिंदू महासभेने मात्र डिसेंबरमध्ये मद्रासला भरलेल्या आपल्या अधिवेशनात कलकत्ता ऐक्य परिषदेने केलेल्या शिफारसी फेटाळून लावल्या आणि मुसलमानांनाच त्यांनी गोहत्त्या अजिबात थांबवावी असे आवाहन करण्यात आले. मुस्लीम लीगच्या शफी गटाचे जे अधिवेशन ३१ डिसेंबर रोजी लाहोर येथे भरले होते त्यात एकूण हिंदू समाजाने ऐक्य परिषदेच्या शिफारसी झिडकारल्या आहेत असे घोषित करणारा ठराव संमत केला. त्या ठरावात हिंदूमहासभा आणि ऑल इंडिया आर्यन काँग्रेस यांच्याबरोबर काँग्रेसलाही गोवले होते आणि काँग्रेसने आपल्या मद्रासच्या अधिवेशनात जो ठराव संमत केला आहे तो मुसलमान समाजाला मान्य

होण्यासारखा नाही असे नमूद करण्यात आले होते.

हसरत मोहानींनी मांडलेल्या त्या ठरावावर अधिवेशनात चर्चाच झाली नाही त्यामुळे काँग्रेसच्या ठरावात मुसलमान समाजाला मान्य न होण्यासारखे काय होते ते गुलदस्ताच राहिले. परंतु पुढे शफींनी सायमन कमिशनपुढे जी साक्ष दिली त्यावरून असे स्पष्ट झाले की, शफी गटाला मुळी ऐक्य परिषदेच्या शिफारसीच मान्य नव्हत्या. अशा तऱ्हेने सर्व पक्षांना मान्य होईल असा तोडगा निघणे अशक्य आहे हे प्रकर्षाने दिसून आले.

१९२७ च्या सप्टेंबर महिन्यात सारडा यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मांडलेल्या बाल विवाह प्रतिबंधक विधेयकाचाही उलेमांनी जातीय भावना उद्दीपित करण्यासाठी उपयोग करून घेतला. मौलवी महंमद याकूब यांनी हा कायदा मुसलमानांनाही लागू करावा अशी उपसूचना त्या विधेयकाला आणली होती. बाल विवाहाची अनिष्ट प्रथा हिंदूइतकीच मुसलमानांतही प्रचलित असल्याचे प्रारंभीच्या चर्चेच्यावेळी दृष्टोत्पत्तीस आले. त्यासंबंधी उद्धृत करण्यात आलेले आकडे मोठे उद्बोधक होते. १९२१ च्या जनगणणेनुसार एक वर्षाखालील मुसलमान विवाहित मुलांची संख्या १,५७५, १ ते २ वयोगटातील २,०००, तर ६,००० विवाहित मुले २ ते ३ वयोगटातील होती. एक वर्षाखालील १२७ मुसलमान मुली विधवा होत्या. परंतु हे विधेयक मुसलमानांना लागू करणे म्हणजे आमच्या धर्मात हस्तक्षेप करणे होय अशी ओरड उलेमांनी सुरू केल्याबरोबर मौलवी महंमद याकूब यांचे पाय लटपटू लागले आणि त्यांनी चिकित्सा समितीत बाजू बदलून हे विधेयक मुसलमानांना लागू करू नये, असे फार जोराने प्रतिपादन केले. काही दिवसानंतर २५ मुसलमान आणि चार सनातनी हिंदूंनी मिळून होम मेंबरना पत्र लिहून या विधेयकामुळे हिंदू आणि मुसलमान अशा दोघांच्याही वैयक्तिक कायद्याच्या (पर्सनल लॉ) मुळावरच घाव घातला जाणार असल्याने त्याला विरोध करून सरकारचे धोरण कोणाच्याही धर्मात हस्तक्षेप न करण्याचे आहे हे पुन्हा एकदा कृतीने दाखवून देण्याची विनंती केली.

सप्टेंबर १९२९ मध्ये चिकित्सा समितीकडून आलेले हे सुधारित विधेयक मध्यवर्ती कायदेमंडळासमोर आले त्यावेळी झालेल्या चर्चेत काही मुसलमानांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा मुसलमानांना लागू केला पाहिजे अशी भूमिका मांडली तर काहींनी त्या उलट बाजू मांडली. या चर्चेत कुराणाचा उल्लेख करण्यात आला आणि मुलगी वयात आल्याशिवाय तिचे लग्न करू नये असा स्पष्ट उल्लेख असल्याचे, त्याचप्रमाणे लग्नाच्यासंबंधात मुलीचा उल्लेख निसा म्हणजे अरबी भाषेत वयात आलेली स्त्री म्हणून करण्यात आला असल्याचे दाखवून देण्यात आले. हा मुद्दा खोडून काढण्याचे जमीयत-उल-उलेमाला पुनः पुन्हा आव्हान देऊनही त्यांना तो खोडून काढता आलेला नाही असेही चर्चेच्या ओघात सांगण्यात आले.

शेवटी मुसलमानांना हे विधेयक लागू करण्यात येऊ नये ही अबदुल हाये यांची उपसूचना फेटाळण्यात आली. उपसूचनेच्या बाजूने तेरा विरुद्ध सहा मुसलमान सभासदांनी मतदान केले होते. जीना आणि हैदर यांनी सुरुवातीला विधेयकाला पाठिंबा दिला होता. परंतु प्रत्यक्ष मतविभागणीची वेळ आली त्यावेळी ते गैरहजर राहिले. कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये फजली हुसेन यांनी विधेयकाला जोरदार पाठिंबा दिला व हे विधेयक म्हणजे इस्लामी कायद्यावर बिगर मुसलमानांकडून केला जाणारा हल्ला होय असे म्हणणारांची चांगलीच टर उडविली. उलट त्यांनी असे प्रतिपादन केले की, इस्लामी रीतिरिवाज, संस्कृती आणि परंपरा या बिलातील तरतुदींशी सुसंगत अशाच आहेत. विधेयक पास झाल्यानंतरही त्याला संमती देण्यात येऊ नये अशी मागणी करण्याकरता महंमद अली यांच्या नेतृत्वाखाली मुसलमानांचे एक शिष्टमंडळ व्हॉइसरॉयला भेटले. परंतु त्यांनी ती मागणी फेटाळून लावली.

सरकार जातीय दंगलींना चिथावणी देत असते असा आरोप काँग्रेस पुढारी वारंवार करीत असत आणि काही बाबतीत तरी सरकारच्या हस्तकांनी दंगे घडवून आणल्याचे निर्विवादपणे सिद्ध झाले होते. एका प्रसंगी तर सरकारच्या एका हस्तकाने मिशनरी कॉलेजच्या प्राचार्यांकडे जाऊन मुसलमान विद्यार्थ्यांना हिंदूविरुद्ध चिथावण्याची परवानगीच मागितली होती परंतु त्या प्राचार्यांनी त्याची डाळ शिजू दिली नाही. १९३० च्या चितगाव दंगलीची दोन्ही जमातीच्या पुढाऱ्यांचा समावेश असलेल्या बिगर सरकारी समितीने चौकशी केली. त्यावेळी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मुसलमान पोलिसांच्या मदतीने तो दंगा घडवून आणला आणि हिंदूंच्या मनात दहशत निर्माण करण्यासाठी पोलिसांच्या संरक्षणाखाली हिंदूंची लुटालूट करविली होती असे निष्पन्न झाले. हिंदुस्तानात सरकारी नोकरीत असलेल्या ले. कर्नल ऑसबोर्न नावाच्या लेखकाने असा जाहीर आरोप केला की, चिथावणी देणारे हस्तक हाताशी धरून आणि अन्य मार्गांचा अवलंब करून सरकार हिंदू मुसलमानांतील सहकार्यात मोडता घालीत असे. सरकारच्या गुप्तहेर खात्याकडील पैसे मुस्लीम जातीयवादी वृत्तपत्रांना साहाय्य करण्यासाठी वापरले जात असत व मुसलमान संपादक ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून काय लिहावयाचे यासंबंधी सल्ला किंवा आदेश घेत असत. मुस्लीम लीगच्या १९२७ च्या कलकत्ता अधिवेशनात महंमद अली यांनी तर 'अलीगड मेल' चे गेल्या चार महिन्यांचे राहिलेले अनुदान पाठविण्याबद्दल डॉ. झियाउद्दीन अहमद यांनी कोटमन यांना लिहिलेले पत्रच वाचून दाखविले होते. सायमन कमिशन पुढील साक्षीतही पंजाबच्या गव्हर्नरांनी मुस्लिम आऊट लुकसाठी आपण नियमितपणे अर्थ साहाय्य देत होतो आणि एका सरकारनियुक्त सभासदांकडून कायदेमंडळातील मुसलमान गटासाठी ठराव लिहून घेतले जात असल्याचे कबूल केल्याचे नमूद आहे.

जातीय दंगलींचा बीमोड करण्यासाठी धार्मिक आणि सामाजिक प्रश्नावर हिंदू मुसलमानांत समेट घडवून आणण्याचे अनेक प्रयत्न झाले पण ते सर्व निष्फळ ठरले हे

वर आलेच आहे. कारण अशा प्रत्येक वेळी मुसलमान पुढारी काही तरी राजकीय प्रश्न उकरून काढीत आणि धार्मिक व सामाजिक प्रश्नांबरोबरच राजकीय प्रश्नावरही समझोता झाला पाहिजे असा आग्रह धरीत. सायमन कमिशनपुढे साक्ष देताना नानकचंद यांनी असे निवेदन केले होते की, पंजाबमधील वृत्तपत्रे दररोज असे जाहीर करीत असतात की, जोपर्यंत मुसलमानांच्या राजकीय मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत जातीय दंगे होतच राहणार. तशाच तऱ्हेची धमकी पंजाब कायदे-मंडळात फैज महंमद यांनी दिली होती त्याकडेही त्यांनी सायमन कमिशनचे लक्ष वेधले होते.

बालविवाह प्रतिबंधक कायदा पास झाला आणि त्याला व्हाइसरॉयची अनुमतीही मिळाली तरी त्यामुळे निर्माण झालेले वादळ मात्र शमले नाही. उलट उलेमांनी राजकीय मागण्यांच्या मसुद्यात आपल्या धार्मिक मागण्या घुसडून दिल्या. हाज यात्रे करू संबंधीच्या विधेयकापासून उलेमांनी जिनांच्या चारित्र्यहननाची पद्धतशीर मोहीमच उघडली होती. त्यामुळे ते इतके वैतागून गेले की, आपली धर्मपरायणता सिद्ध करण्यासाठी मुस्लिम कायदा खोजा आणि इतर शिया पंथियांनाही लागू करावा अशा आशयाचे एक विधेयक त्यांनी १९२६ साली स्वतःच केंद्रीय कायदेमंडळात आणले. त्यांच्या सुप्रसिद्ध चौदा कलमी कार्यक्रमात शरीयत आणि मुस्लिम वैयक्तिक कायदा अपरिवर्तनीय आहे अशा आशयाचे एक मुख्य कलम होते. तेव्हापासून सामाजिकदृष्टचा पुरोगामी मुसलमान म्हणून असलेली त्यांची प्रतिमा अस्तंगत झाली. जीना, मौलवी महंमद याकूब आदींची ही कोलांटी उडी हा उलेमांचा फार मोठा विजय होता. असहकार आंदोलन आणि खिलाफत चळवळ यामागील उद्दिष्ट जसे परस्परपूरक होते तसेच ते परस्परविरोधीही होते. खिलाफत चळवळीचा फुगा फुटल्याबरोबर जातीयवादी मुसलमान नेतृत्व पुन्हा ब्रिटिशांच्या वळचणीखाली गेले आणि खिलाफतवादी मुसलमानांनाही त्याने आपल्याबरोबर खेचून नेले.

---

प्रकरण अकरावे

## समझोत्याचे प्रयत्न--२

१९२० पूर्वीच्या काळात कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग हे दोनच प्रमुख पक्ष देशात होते. त्यामुळे जातीय किंवा राजकीय प्रश्नांवर जी काही तडजोड व्हावयाची ती याच दोन पक्षात होणें आवश्यक होते. परंतु पुढे नेमस्त कॉंग्रेसमधून बाहेर पडले. शिखांची स्वतंत्र संघटना उदयास आली. हिंदू महासभेचे कार्यही अखिल भारतीय पातळीवर सुरू झाले त्याचप्रमाणे खिलाफत परिषद आणि जमीयत-उल-उलेमा या सारखे पक्षही निर्माण झाले. त्यामुळे आता समझोता घडवून आणावयाचा तर तो या सर्व पक्षांना मान्य होईल असा घडवून आणणे अपरिहार्य होऊन बसले. परंतु या बदललेल्या परिस्थितीमुळेच कोणत्याही प्रश्नावर सर्वांचे एकमत घडून येणे अशक्य होऊन बसले. अखिल भारतीय स्वरूपाचा समझोता बंगाल कराराच्या स्वरूपाचा असता कामा नये अशी भूमिका कॉंग्रेसने कोकोनाडा अधिवेशनात स्वीकारली. त्यानंतर डॉ. अन्सारी, मंगलसिंग वगैरेंनी संयुक्त मतदार संघावर आधारलेला "राष्ट्रीय करार" घडवून आणाण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा तपशील केव्हाच प्रसिद्ध होऊ शकला नाही. १९२४ च्या अखेरीस बंगाल मधील दडपशाहीचा निषेध करण्यासाठी बोलाविण्यात आलेली सर्वपक्षीय परिषद म्हणजे परस्पर विरोधीं अशा राजकीय मागण्यांच्या बाबतीत सामंजस्य निर्माण करण्याचा तो पहिला प्रयत्न होता असे म्हणता येईल.

पहिल्या सर्वपक्षीय परिषदेत निश्चित स्वरूपाच्या योजनेचा आराखडा तयार करण्यासाठी त्रेपन्न सभासदांची एक समिती नियुक्त केली गेली होती. परंतु त्यापैकी गांधी, मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, लजपत राय, अलि बंधू, डॉ. एस. के. दत्त, अहमद अली, अहमद अली खान, नबाब सर साहेब जादा, अबदूल कयूम, महमद याकूब, ना. म. जोशी, न. चिं. केळकर, आणि स्वामी श्रद्धानंद असे चौदा जणच फक्त २३ जानेवारी १९२५ पासून सुरू झालेल्या त्या समितीच्या बैठकींना हजर राहात असत. जीना एकदाच आणि तेही काही मिनिटेच बैठकीला हजर राहून आपले निवेदन सादर करून निघून गेले. त्यांचे ते निवेदन असे होते :

लखनौ करारातील एक सहभागी म्हणून मी असे म्हणू शकतो की, तो करार कायम स्वरूपाचा असावा असा कोणाचाच विचार नव्हता. कॉंग्रेसने लजपत राय, अन्सारी, आणि मंगलसिंग या तिघांची एक समिती त्या करारात फेरफार घडवून आणण्यासाठी नेमली होती. परंतु त्या समितीचे कामकाज सुरू असतानाच

दास यांनी बंगालमध्ये एक करार घडवून आणला. परंतु कोकानाडा अधिवेशनात तो फेटाळून लावण्यात आला. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजात काही राष्ट्रवादी स्वतंत्र मतदार संघ रद्द करून टाकावेत अशा मताचे असले तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे ती विचारात घ्यावीच लागेल. दोन्ही समाजातील बहुसंख्य लोकांचा एकमेकांवर विश्वास राहीलेला नाही. बंगाल आणि पंजाब मधील मुसलमानांचा आग्रह आहे की, ते बहुसंख्य असल्याने तेथील कायदेमंडळात त्यांचेच बहुमत राहिले पाहिजे. लखनौ करारात अल्पसंख्यांकांना दोन प्रकारे संरक्षण देण्याची तरतूद होती. एक म्हणजे त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधित्त्व मिळावे आणि दुसरी गोष्ट म्हणजे एकाद्या जमातीसंबंधीचा ठराव त्या जमातीतील तीन–चतुर्थांश सभासदांनी हरकत घेतल्यास मांडला जाता कामा नये, दुर्दैवाने ही तरतूद केवळ कागदावरच राहिली आहे. म्हणून मी असे सुचवीन की. पंजाब आणि बंगाल कायदेमंडळात मुसलमान सभासद बहुसंख्य असावेत आणि इतर प्रांतात लखनौ करारातील वरील संरक्षक बाबी अमलात आणल्या जाव्यात. सरकारी नोकऱ्यातील प्रमाणासंबंधीचा विचार स्वतंत्रपणे करता येईल.

हे निवेदन सादर करून जीना बैठकीतून निघून गेले तर लजपत राय यांनी नव्या कराराची आवश्यकता नाही अशा आशयाचे पत्रक आधीच प्रसिद्ध केले होते. त्यामुळे मग बैठकीला उपस्थित असलेल्या इतर सभासदांनीही निश्चित स्वरूपाच्या अशा सूचना बैठकीसमोर ठेवल्या नाहीत आणि अशा तऱ्हेने ऐक्याचा पहिला प्रयत्न वांझोटा ठरला.

फजली हुसेन यांचा पंजाबमधील जातीयवादी कारभार आणि शहरांतील हिंदूंना मिळणारी पक्षपाती वागणूक यामुळे लजपतराय इतके चिडले की, १९२४ च्या अखेरीस त्यांनी पंजाबची फाळणी करावी अशी सूचना मांडली. १९२५ च्या एप्रिल मध्ये हिंदू महासभेचे अखिल भारतीय स्वरूपाचे अधिवेशन भरले होते. त्याचवेळी हिंदू महासभेला प्रथमच अखिल भारतीय संघटनेचे स्वरूप देण्यात आले. लाला लजपतराय त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी राजकीय वादाच्या बाबी निर्माण होतील त्यावेळी हिंदूच्या हितसंबंधांना पुरेसे संरक्षण मिळाले पाहिजे. त्याचबरोबर मुसलमान आणि ख्रिश्चन यांच्याबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करण्यात आले पाहिजेत असे प्रतिपादन केले. जातीय दंगलीत नुकसान झालेल्या हिंदूच्या मदतीसाठी निधी, शारीरिक शिक्षण आणि व्यायाम शाळांचा प्रसार, हिंदूंचे सण योग्यतऱ्हेने साजरे करणे आणि अन्य धर्मात गेलेल्यांना शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेणे असा कार्यक्रम त्यांनी अधिवेशनापुढे ठेवला. अधिवेशनाने लजपतरायांनी मांडलेला हा कार्यक्रम स्वीकारला आणि परधर्मात जाणाऱ्या हिंदंचा लोंढा थोपवून धरण्यासाठी ठिकठिकाणी हिंदू संरक्षण संघ स्थापन करण्यात यावेत असे ठरविले. या अधिवेशनावर मुसलमानांच्या वृत्तपत्रातून टीकेची झोड उठविण्यात

आली. त्यानंतर स्वराज्य पक्षातही मोठी फूट पडली आणि केळकर, जयकर यांच्या सारखे प्रतियोगी सहकारितेचा पुरस्कार करणारे नेते हिंदू महासभेच्या सभा परिषदांना हजर राहू लागले व सुधारणा राबविण्याच्या कामी ते सरकारशी सहकार्य करू लागले. त्या वर्षाच्या अखेरीस सर अबदूर रहीम यांच्या अध्यक्षतेखाली भरलेले अधिवेशन त्यांनी केलेल्या अत्यंत प्रक्षोभक अशा भाषणांमुळे फार गाजले. त्या अधिवेशनातील त्यांचे भाषण आणि मंजूर झालेले ठराव यावरून 'मुसलमानांना भरमसाट संरक्षक सवलती मिळाल्यावाचून याहून जास्त घटनात्मक प्रगती होवू शकणार नाही' हे स्पष्ट झाले. या अधिवेशनाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे जीनांच्यात घडून आलेले परिवर्तन. त्यावेळेपर्यंत जवळजवळ दोन वर्षे ते स्वराज्य पक्षाच्या सतत अडवणुकीच्या धोरणात सक्रीय सहभागी होऊन १९१९ च्या सुधारणा कायद्याची अंमलबजावणी अशक्य करून सोडण्यास मदत करीत आले होते. त्याच जीनांनी स्वतःच अलिगडच्या अधिवेशनात सुधारणा राबविण्याच्या कामी सरकारला सर्वतोपरी सहकार्य द्यावे अशा आशयाचा ठराव मांडला.

अशा तऱ्हेने जीना हे प्रतियोगी सहकारवादी बनले. त्या संबंध अधिवेशनाचा सूर प्रतियोगी सहकारवाद्यांप्रमाणे जातीयवादी पक्षांना उत्तेजन देण्याचाच होता. दुसऱ्या एका ठरावान्वये सुधारणांचा पुढचा हप्ता देण्याच्या प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी रॉयल कमिशन नेमण्यात यावे अशी मागणी करण्यात आली तसेच घटनात्मक सुधारणांविषयीचा एक आराखडा तयार करण्यासाठी मुस्लीम लीगच्या २९ पुढाऱ्यांची एक समिती नेमली. या समितीने शक्य तोवर इतर पक्षांचे सहकार्य घ्यावयाचे होते. आणि तयार केलेला मसुदा मुस्लीम लीगच्या कौन्सिलपुढे मंजुरीसाठी ठेवावयाचा होता.

स्वतंत्र मतदार संघाचे घातक परिणाम एव्हांना जाणवू लागले होते. त्यामुळे १९२४ साली पुन्हा एकदा स्वतंत्र मतदार संघ रद्द करण्याची मागणी पुढे येवू लागली. मुडिमन समितीतही या प्रश्नावर चर्चा झाली. सबंध देशाच्या हिताचा विचार करण्यापेक्षा आपापल्या गटाचा विचार करण्याची प्रवृत्ती असल्यामुळे राजकीय प्रगतीच्या मार्गात जाती-जातीतील मतभेदांमुळे फार मोठी अडचण निर्माण होत आहे असे समितीतील बहुसंख्य सभासदांचे मत होते. परंतु तरीही शेवटी त्यांनी निष्कर्ष मात्र असा काढला की, "सतत प्रयत्न करीत राहून सर्व जमातींचे पुढारी आपापसातले मतभेद विसरून जोपर्यंत एकत्र येत नाहीत तोपर्यंत जातीय प्रतिनिधित्त्वाची प्रथा रद्द करून टाकणे अशक्य आहे." त्या समितीपुढे साक्ष देताना पंजाब मुस्लीम लीगचे एक सदस्य बरकत अली यांनी असे म्हटले होते की, या देशातील ९० टक्क्यांहून अधिक लोक ग्रामीण भागात राहतात आणि जातीय तणाव असूनही ते अत्यंत सौहार्दाच्या वातावरणात आणि खेळीमेळीने राहात असतात. जातीय तणाव जे आहेत ते निरनिराळ्या प्रांतातील काही थोड्या शहरातच काय ते आहेत. त्यांच्या या प्रतिपादनाचा आधार घेऊन मुडिमन समितीतील अल्पसंख्य सभासदांनी संयुक्त मतदार संघाचा आग्रह धरला होता.

तारीख ७ जुलै १९२६ च्या ( लंडन ) टाइम्सच्या अंकात भूतपूर्व सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड ऑलिव्हर यांनी एक पत्र लिहून जातीय मतदार संघावर कडाडून हल्ला चढविताना त्यामुळे "जातीयवादी तत्त्वप्रणालीमुळे घडून येणारा घातक परिणाम दृढमूल झाला" असे म्हटले होते. साउथ बरो कमिशनने सर्वप्रथम जातीय मतदार संघाची शिफारस केली होती. पण त्यांनादेखील ते काही काळापुरते मर्यादित राहावेत असेच अभिप्रेत होते. लॉर्ड ऑलिव्हर यांनी पुढे म्हटले होते की,

मतदार संघांच्या बाबतीत जातीय विचारसरणीला जोपर्यंत तिलांजली दिली जात नाही तोपर्यंत घटनात्मक प्रगती सुरळीतपणे घडून येणे केवळ अशक्य आहे. हिंदुस्तानातील घडामोडींबद्दल ज्याला थोडीफार तरी माहिती आहे तो हे नाकारूच शकणार नाही की सर्वसाधारणपणे हिंदुस्तानांतील ब्रिटिश नोकरशाहीकडून मुसलमानांना सतत झुकते माप दिले जाते. मुसलमानांबद्दल वाटणारी आपुलकी हे त्याचे एक कारण असले तरी हिंदूंच्या राष्ट्रवादाला शह देणे हेच त्यामागील मुख्य कारण असते.

१९२६ च्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात केलेल्या भाषणात शेख अबदूल कादीर यांनी स्वतंत्र मतदार संघामुळे जाती-जातीत तणाव निर्माण होतात हा आक्षेप फेटाळून लावला आणि असे प्रतिपादन केले की, सद्यपरिस्थितीत स्वतंत्र मतदार संघ चालू ठेवण्यामुळेच आपले हितसंबंध सुरक्षित राहू शकतील अशी मुसलमानांची ठाम खात्री होऊन चुकली आहे. ज्या दिवशी हिंदू बांधव त्यांना न्यायाने आणि समतेच्या भूमिकेवरून वागवू लागतील त्यादिवशी मुसलमान आपण होऊनच स्वतंत्र मतदार संघ किंवा त्यासारखे इतर संरक्षक उपाय यांची आता जरूर नाही असे म्हणू लागतील, परंतु तोपर्यंत मात्र ते राहणे अपरिहार्य आहे. परंतु लखनौ करारानुसार मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतात त्यांना ज्या विशेष सवलती देण्यात आल्या आहेत त्या चालू राहाव्यात असे म्हणण्याचा मुसलमानांना कसलाही अधिकार पोचत नाही असे सांगून अबदूल कादीर यांनी अधिवेशनाला जमलेल्यानां आश्चर्याचा धक्का दिला. मात्र त्याचबरोबर त्यांनी मुस्लीम बहुसंख्य असलेल्या प्रांतातील कायदेमंडळांत त्यांचे संख्याबळ जास्त असले पाहिजे अशीही मागणी केली.

मागील तीन अधिवेशनांत मुस्लीम लीगने जी भूमिका घेतली होती तिचाच पुनरुच्चार करणारा जीनांचा ठराव पास करून अधिवेशनाने अबदूल कादीर यांची मागणी फेटाळून लावली. जीनांच्या ठरावात खालील मागण्या करण्यात आल्या होत्या. मुस्लीम बहुसंख्य प्रांतातील कायदेमंडळात कायद्याने मुसलमानांचे बहुमत प्रस्थापित करणे, मुस्लीम अल्पसंख्य असतील त्या प्रांतात त्यांना काही खास सवलती देणे, जातीय प्रश्नावर नकाराधिकाराची योजना, स्वतंत्र मतदार संघ, उपासना, प्रचार, संघटना व शिक्षण याबाबतचे स्वातंत्र्य. जीनांनी आपल्या भाषणात असा आरोप केला की मुस्लीम लीगच्या त्या आधीच्या तीन अधिवेशनांतील ठराव काँग्रेसकडे धाडण्यात आले होते परंतु काँग्रेसकडून त्यापैकी एकालाही समाधानकारक उत्तर

आले नाही. देशात जातीयवाद आहे या वस्तुस्थितीकडे पाठ फिरवून चालणार नाही. केवळ भावनात्मक बडबडीने तो जाणार नाही, त्याचप्रमाणे केवळ संयुक्त मतदार संघ निर्माण केल्याने राष्ट्रवाद येणार नाही. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष खान बहाद्दूर पीरझादा महंमद हुसेन यांनी तिसराच एक पर्याय सुचविला. त्यांनी हिंदुस्तानची प्रादेशिक पुनर्रचना करून समान धर्म, भाषा आणि संस्कृती असणाऱ्या निरनिराळ्या गटांची बहुसंख्य असलेले सलग प्रांत बनवावेत अशी मागणी पुढे मांडली. अशा प्रत्येक प्रांताला आपल्या हितसंबंधानुरूप स्वतःचे भवितव्य घडविण्याची मुभा असावी अशी त्यांनी मागणी केली. या संदर्भात हिंदुस्तानचा उल्लेख त्यांनी खंड म्हणून केला.

१६ मार्च १९२७ रोजी सर शंकरन नायर यांनी जातीय मतदार संघ तावडतोब रद्द करण्यात यावेत अशी शिफारस करणारा आणि हा मूलभूत बदल घडवून आल्या-शिवाय पुढील राजकीय सुधारणा अमलात आणता कामा नयेत अशी मागणी करणारा ठराव कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये मांडला. मुस्लीम लीगने स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह धरल्यामुळे पुढील राजकीय प्रगतीत अडथळे निर्माण केले जात आहेत असे प्रतिपादन त्यांनी केले. सर अलेक्झांडर मुडिमन यांची भूमिका याच्याबरोबर उलट होती. पाश्चात्य लोकशाही देशांप्रमाणे हिंदुस्तानात आजचा बहुमतवाला पक्ष उद्या अल्पमतात जाण्याचा किंवा त्याच्या उलट होण्याचा संभव नसल्याने पाश्चात्य लोक-शाहीची संकल्पना हिंदी लोकांच्या अंगवळणी पडल्याशिवाय स्वतंत्र मतदारसंघ रद्द करता येणार नाहीत. क्रमाक्रमाने सत्तांतर केले जाताना निरनिराळ्या प्रांतातील विशिष्ट जमातीच्या हाती सत्ता एकवटली जाणे अपरिहार्य असून त्यामुळेच सध्याच्या जातीय तणावास खतपाणी मिळत आहे हा आरोप चुकीचा आहे कारण बहुसंख्य गटाने आपल्याला गिळंकृत करून टाकू नये असे साहजिकपणेच अल्पसंख्य गटाला वाटत राहाते. स्वतंत्र मतदार संघामुळे काही अडचणी निर्माण होणार याची सरकारला जाणीव आहे पण त्या बरोबरच त्याशिवाय अल्पसंख्य जमातींना लोकशाहीच्या प्रक्रियेत समाविष्ट करून घेता येणार नाही हे सरकार जाणून आहे प्रत्येक प्रांतात स्वतंत्र मतदार संघांच्या मार्फतच अल्पसंख्य गटांना योग्य ते प्रतिनिधित्व देण्याचे तत्त्व मान्य करावे अशी उपसूचना सुऱ्हावर्दी यांनी शंकरन नायर यांच्या मूळ ठरावाला मांडली ती उपसूचना फेटाळली गेली. परंतु नायर यांचेही मन आपला ठराव मागे घेण्यासाठी वळविण्यात आले.

त्याच सुमारास काँग्रेस अध्यक्षांनी संयुक्त मतदार संघास मुसलमान पुढाऱ्यांनी मान्यता द्यावी असे आवाहन केले. त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून जीनांनी २० मार्च १९२७ रोजी दिल्लीला सत्तावीस मुसलमान पुढाऱ्यांची एक बैठक बोलावली. त्या बैठकीत या पुढाऱ्यांनी काँग्रेस व नॅशनॉलिस्ट पार्टीने संयुक्त मतदार संघासंबंधी केलेल्या ठरावांची दखल घेऊन स्वतंत्र सिंध प्रांताची निर्मिती, वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तानला सुधारणा कायदा लागू करणे, पंजाब आणि बंगाल प्रांतात

मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्त्व, आणि कायद्यानुसार मुसलमानांना मध्यवर्ती कायदेमंडळात एक तृतीयांश प्रतिनिधित्त्व या अटी मान्य असतील तर मुसलमान संयुक्त मतदार संघांना मान्यता देतील असा ठराव संमत केला.

दिल्ली बैठकीचा मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसात त्या मसुद्यावर सह्या करणारांपैकी सर महंमद शफी आणि नबाब सर झुल्फिकार अलि खान या दोघांनी कोणत्याही परिस्थितीत आपण संयुक्त मतदार संघाला मान्यता देणार नाही असे जाहीर केले. त्या नंतर एक आठवड्याने मद्रास कायदेमंडळातील मुसलमान सभासदांनीही दिल्ली मसुदा आपल्याला मान्य नसल्याचे सांगून टाकले. या बंडखोरी-मुळे जीनांना चांगलाच धक्का बसला. त्यांनी ता. २९ मार्च रोजी वृत्तपत्रांतून एक पत्रक प्रसिद्ध केले. जीनांच्या धरसोड वृत्तीचे ते निदर्शक होते. आपल्या त्या पत्रकात सुरुवातीलाच त्यांनी अशी कबुली देऊन टाकली की बहुतेक सर्व मुसलमान स्वतंत्र मतदार संघाच्या बाजूचे आहेत. संयुक्त मतदार संघावर काही आक्षेप घेण्यासारखे असून स्वतंत्र मतदार संघामुळे प्रातिनिधिक सरकारच्या गतीत बाधा निर्माण होईल असेही म्हणता येणार नाही. स्वतंत्र किंवा संयुक्त मतदार संघ हे साध्य नसून केवळ साधन आहे. म्हणून खरा प्रश्न अल्पसंख्य गटात विश्वास आणि सुरक्षिततेची भावना कशी निर्माण करता येईल हा आहे. पत्रकाच्या अखेरीस हिंदू पुढाऱ्यांनी प्रथम दिल्ली मसुदा जसाच्या तसा स्वीकारावा असे त्यांनी आवाहन केले आणि तसे झाल्यानंतर मुसल-मानांचे सरकारी नोकऱ्यांतील प्रमाण, धर्माशी निगडित असलेल्या प्रश्नांसंबंधी कायदे-मंडळात येणारी विधेयके किंवा ठराव याबाबत मुसलमान सभासदांना द्यावयाचे संरक्षक अधिकार इत्यादी प्रश्नांचा विचार करून त्यावर काही तरी तोडगा नंतर काढता येईल असे त्यांनी सुचविले ते पुढे असे म्हणाले की, आपली ही सूचना हिंदू पुढाऱ्यांनी मान्य केली तर ......

"अखिल भारतीय मुस्लीम लीगच्या मध्यवर्ती समितीचे सभासद, खिलाफत परिषदेने नेमलेल्या समितीचे सभासद, जमीयत-उल-उलेमाच्या कार्यकारिणीचे सभासद आणि मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळातील सर्व मुसलमान सभासद यांची एक संयुक्त बैठक शक्य तितक्या लवकर बोलावली जाईल. त्या बैठकीत काँग्रेस, हिंदू महासभा आणि देशातील अन्य राजकीय पक्ष यांनी नेमलेल्या एक किंवा अनेक समित्याबरोबर उर्वरित प्रश्नांसंबंधी वाटाघाटी करण्यासाठी एक पोट-समिती नेमण्यात येईल. आणि या समित्यांत जर एकमत झाले तर एकमताचा तो मसुदा देशातील हिंदूंच्या आणि मुसलमानांच्या निरनिराळ्या संघटनांपुढे मंजुरीसाठी ठेवावा लागेल."

जीनांच्या पत्रकाची सर्व भाषा जर-तरच्या स्वरूपाची होती आणि त्यांनी जी कार्यपद्धती सुचविली होती त्यामुळे कोठल्याही स्वरूपाचा करार घडून येणे अशक्य-प्राय होऊन बसले होते. दिल्ली मसुद्याबाबत मुसलमान पुढाऱ्यांत एकमत घडवून

आणण्याआधीच हिंदू पुढाऱ्यांनी प्रथम त्याला मान्यता द्यावी असे जीनांचे म्हणणे होते. दरम्यान पंजाब मुस्लीम लीगने स्वतंत्र मतदार संघ बरखास्त करण्याची मागणी साफ धुडकावून लावली होती. त्यानंतर आठवड्याभरातच भरलेल्या बिहार व ओरिसातील मुस्लीम पुढाऱ्यांच्या बैठकीत दिल्ली मसुदा फेटाळण्यात आला. मलिक फेरोजखान नून यांच्या नेतृत्वाखालील पंजाब कायदेमंडळातील मुसलमान सभासदांनी अशाच अर्थाचे एक पत्रक प्रसिद्ध केले. देशातील इतर ठिकाणच्या मुसलमान पुढाऱ्यांनीही दिल्ली मसुद्याविरूद्ध अशीच झोड उठविली. हिंदू महासभेने कुरकुरत तर काँग्रेसने मात्र दिल्लीच्या मसुद्याला मनापासून पाठिंबा दिला.

ता. ८ नोव्हेंबर १९२७ रोजी सायमन कमिशनच्या नेमणुकीची घोषणा झाली त्यामुळे परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची बनली. बहुतेक सर्वच राजकीय पक्षांना सायमन कमिशनवर एकाही भारतीयाची नेमणूक केली जाऊ नये, ही गोष्ट मनांतून फार खटकली होती. काँग्रेस प्रतियोगी सहकारितावादी, सुधारक, लजपत राय यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी पक्षाचे पुढारी आणि जीनांसारखे स्वतंत्र या सर्वांची १६ नोव्हेंबर १९२७ रोजी एक बैठक होऊन तिच्यात सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याची शिफारस करणारा ठराव पास करण्यात आला. त्यामुळे मुसलमान नेत्यांत एका बाजूला दिल्ली मसुद्याला आणि सायमन कमिशनवरील बहिष्काराला अनुकूल असलेले आणि दुसऱ्या बाजूला स्वतंत्र मतदार संघांची मागणी करणारे आणि सायमन कमिशन बरोबर सहकार्य करण्याची भूमिका घेणारे असे दोन स्पष्ट तट पडले. संयुक्त प्रांतातील मुसलमान नेत्यांच्या बैठकीत मुसलमानांच्या सर्व मागण्या इतर पक्षांकडून मान्य झाल्याशिवाय त्यांनी बहिष्कारात सहभागी होऊ नये हा मोहोनींनी मांडलेला ठराव पास केला गेला. पंजाब, बंगाल वगैरे ठिकाणच्या मुसलमान नेत्यांनीही तशीच भूमिका घेतली. खुद्द मुस्लीम लीगमध्ये त्यावेळी एक जीनांचा व दुसरा शफी यांचा असे दोन गट पडले होते. त्यापैकी शफी गटाचा दिल्ली मसुद्याला आणि सायमन कमिशनवरील बहिष्काराला विरोध होता. या दोन्ही गटांची अनुक्रमे कलकत्ता आणि लाहोर येथे १९२७ च्या अखेरीस स्वतंत्र अधिवेशने झाली.

कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्ष मौलवी महंमद याकूब होते. त्या अधिवेशनापुढे भाषण करताना जीना म्हणाले की, देशातील बहुसंख्य मुसलमानांना संयुक्त मतदार संघ पसंत नाहीत, हे खरे असले तरी तेच मुसलमानांच्या आणि हिंदुस्तानच्या हिताचे असल्यामुळे आपण त्यांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ठरावाला पाठिंबा देताना मौलाना अबूल कलम आझाद म्हणाले की, लखनौ करार करून मुसलमानांनी आपल्या हितसंबंधांचा सौदा मांडला होता. परंतु दिल्ली मसुद्यामुळे भारतातील मुसलमानांचे खरे हक्क मान्य केले जाण्याची संधी प्रथमच त्यांना मिळणार आहे. त्या मसुद्यातील तरतुदींमुळे हिंदूंची बहुसंख्या असलेले नऊ

प्रांत राहतील तर पाच प्रांतात मुसलमान बहुसंख्य असतील. साहजिकच बहुसंख्य हिंदू प्रांतात मुसलमानांना ज्या तऱ्हेची वागणूक मिळेल त्याच तऱ्हेची वागणूक मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतात हिंदूंना दिली जाईल. हा फार मोठा फायदा नव्हे काय? आपले हक्क अबाधित राखण्यासाठी मुसलमानांना हे एक नवे हत्यार प्राप्त होणार आहे. मौलाना शौकत अली यांनीही ठरावाला पाठिंबा दिला आणि तो अधिवेशनाने एकमताने मंजूर केला.

लाहोरला भरलेल्या शफी गटाच्या अधिवेशनात सायमन कमिशनबरोबर सहकार्य करण्याचा ठराव प्रचंड बहुमताने पास झाला. पंजाबमधील ६३ खिलाफतवादी प्रतिनिधींनी मात्र ठरावाला विरोध दर्शविला. राजकीय उद्दिष्टांबद्दल मुसलमानांत एकवाक्यता घडवून आणण्यासाठी मुसलमान पुढाऱ्यांची गोलमेज परिषद बोलावण्याचे अधिकार अध्यक्ष शफींना देण्यात आले.

१९२८ च्या सुरवातीला काँग्रेसने निरनिराळ्या सतरा राजकीय पक्षांच्या नेत्यांची एक बैठक बोलावली. या बैठकीला संस्थांनी प्रजाजनांचे प्रतिनिधी त्याचप्रमाणे व्यापारी, कामगार आणि जमीन मालक यांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारांनाही आमंत्रित करण्यात आले होते. यापैकी बहुतेक सर्वजण बैठकीला उपस्थित राहिले होते. मुस्लीम लीगच्या दोन्ही गटांनी मात्र या बैठकीबद्दल कसलीही आस्था दाखविली नाही. सर्वपक्षीय परिषदेत मंजूर करण्यात आलेल्या मागण्यांच्या अनुरोधाने योजनेचा तपशीलवार मसुदा करण्याचे काम त्या समितीकडे सोपविण्यात आले होते. फेब्रुवारी १९२८ च्या सर्वपक्षीय परिषदेवर बहिष्कार टाकल्यानंतर जीना गटाच्या मुस्लीम लीगच्या कौन्सिलने असा ठराव केला की, तीन महिन्यांपूर्वी लीगने आपल्या कलकत्ता अधिवेशनात संमत केलेला प्रस्ताव जोपर्यंत बिगर मुसलमानांच्या सर्व संघटना मान्य करीत नाहीत तोपर्यंत स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याचे काम हाती घेता येणार नाही. मार्च महिन्यात सर्वपक्षीय परिषदेची पुन्हा बैठक भरली त्यावेळी असे दिसून आले की, जर एकाद्या प्रांतात हिंदू अगर मुसलमान बहुसंख्य असतील तर तेथे राखीव जागांचे तत्त्व लागू करण्यास हिंदू महासभा आणि शीख लीग यांचा सक्त विरोध आहे. या प्रश्नावर मुस्लीम लीग, हिंदू महासभा आणि शीख लीग यांच्यात एकमत होऊ शकले नाही. सर्वपक्षीय परिषदेत सहभागी न होण्यास किंवा तिच्याशी सहकार्य न करण्यास जीना लीगला त्यामुळे आयतीच संधी मिळाली. शेवटी मे महिन्यात पुन्हा एकदा सर्वपक्षीय परिषदेची बैठक भरून तीनही जातीय संघटनांचे अलीकडील ठराव विचारात घेऊन राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली.

बहुसंख्य जमातीसाठी जागा राखून ठेवाव्यात किंवा नाही हा प्रश्न समितीने प्रथम विचारात घेतला. पंजाब व बंगाल प्रांतातील मुसलमानांच्या लोकसंख्येचे जिल्हावार आकडे जवाहरलाल नेहरू यांनी सादर केल्यामुळे त्या प्रश्नाबाबत काही निष्कर्ष

काढणे फार सोपे गेले. प्रौढ मताधिकार दिल्यानंतर पंजाब आणि बंगाल प्रांतातील लोकसंख्येच्या आधारावर राखीव जागांमुळे कायदेमंडळात मुसलमानांना जितक्या जागा मिळाल्या असत्या त्यापेक्षा कितीतरी जास्त जागा राखीव जागा काढून टाकल्यामुळे मिळू शकतील इतकेच नव्हे तर काही जिल्हयात मुसलमान वस्ती विशिष्ट प्रकारे केंद्रित झाली असल्यामुळे मध्यवर्ती कायदेमंडळात त्यांना ज्या ३३ टक्के जागा हव्या आहेत त्यापेक्षा त्यांच्या जागांचे प्रमाण जास्त राहील असेही त्या माहीतीवरून दिसून आले.

पंजाबमध्ये शीखांच्या लढाऊ अल्पसंख्य गटामुळे ही समस्या अधिकच बिकट बनली. लखनौ करारामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे अशी त्यांची भावना होऊन बसली होती. घटनात्मक प्रगतीच्या संदर्भात यापुढे कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी त्यांच्या मागण्यांची योग्य ती दखल घेतली जाईल असे आश्वासन त्यांना काँग्रेससकट निरनिराळ्या अनेक पक्षांच्या पुढाऱ्यांनी दिले होते.

राष्ट्रीय भावना वाढीस लागण्याच्या दृष्टीने तर स्वतंत्र मतदार संघ देशाच्या हिताचे नाहीतच पण, त्यापेक्षाही बहुमतवाला गट अल्पसंख्यांकांचा कसलाच मुलाहिजा ठेवणार नाही. व त्यामुळे अल्पसंख्य व बहुसंख्य यांच्यात एक दरी निर्माण होईल असेही समितीने दाखवून दिले होते. वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तान या प्रांतात सुधारणा कायदा लागू करण्यात यावा आणि सिंध प्रांत वेगळा करण्यात यावा अशी शिफारस समितीने केली होती.

'नेहरू रिपोर्ट' म्हणून प्रसिद्ध असलेल्या या शिफारसी लखनौ येथे भरलेल्या सर्व पक्षीय परिषदेच्या अधिवेशनासमोर ठेवण्यात आल्या. हे अधिवेशन सुरू असतानाच पंजाबमधील प्रतिनिधींनी एकमताने एक करार घडवून आणला. या करारानुसार प्रौढ मताधिकार प्राप्त झाल्यास पंजाब कौन्सिलमध्ये राखीव जागा न ठेवता संयुक्त मतदार संघ असावेत असे ठरविण्यात आले आणि दहा वर्षेपर्यंत हा प्रयोग कसा चालतो ते पाहिल्यानंतर कोणत्याही जमातीला राखीव जागा किंवा विभक्त मतदार संघाचा प्रश्न पुन्हा उपस्थित करण्याची मुभा ठेवण्यात आली. अशाच तऱ्हेचा करार बंगालमधील हिंदू व मुसलमान प्रतिनिधींत घडून आला. सर्वपक्षीय परिषदेने आणखीही काही ठराव केले त्यात भाषेसंबंधीचा एक ठराव होता. त्या ठरावान्वये देवनागरी किंवा अरबी लिपीत लिहिली जाणारी हिंदुस्तानी ही देशाची संपर्क भाषा ठरविण्यात आली. तसेच आपल्या मुलांना मातृभाषेतून आणि त्यांच्या पसंतीच्या लिपीतून शिक्षण देण्याचा अल्पसंख्य गटांचा अधिकार मान्य करण्यात आला. समितीच्या शिफारसींबाबत अधिक चर्चा करण्यासाठी त्याचप्रमाणे समितीच्या अहवालावर घेण्यात आलेल्या आक्षेपांचा विचार करण्यासाठी परिषदेत आणखी एक समिती नेमण्यात आली. या समितीवर ॲनी बेझंट, एम. ए. अन्सारी, मालवीय, लजपत राय, मौलाना आझाद, जीना, विजय राघवाचारी आणि मौलाना अबदूल कादीर कसूरी यांना स्वीकृत करून घेण्यात आले होते.

जीनांचे नाव एकमताने पुढे आले होते. त्यावेळी जीना परदेशात होते. परंतु भारतात परत आल्यावर त्यांनी समितीवर काम करण्याचे नाकारले. सरकारधार्जिणी मंडळी लगेच पुढे सरसावली. मध्यवर्ती कायदेमंडळाच्या २८ मुस्लीम सभासदांनी पत्रक काढून नेहरू रिपोर्ट फेटाळून लावला. १९०६ पासून 'जी हुजूर' वाल्यांचे मुकुटमणी असणाऱ्या आगाखानांनी ब्रिटिश लोकांना सत्ता सोडून जायला काही वेड लागले नाही अशा शब्दात नेहरू रिपोर्टसंबंधीची आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी असे सुचविले की, प्रत्येक प्रांताला आपण स्वतंत्र असल्याचे जाहीर करण्याची मुभा असली पाहिजे.

हिंदुस्तानातील केंद्रीय सत्ता मजबूत असावी की कमकुवत असावी या प्रश्नावर देशात बरेच दिवस चर्चा चालू होती. १९२७ च्या डिसेंबरात मद्रासमध्ये भरलेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनात (१) हिंदुस्तानसाठी ग्रेट ब्रिटनप्रमाणे एकात्म स्वरूपाचे सरकार असावे आणि प्रांतिक सरकारांचे अधिकार केंद्र सरकारवर अवलंबून असावेत, (२) सार्वभौम सत्ता असलेली देशी संस्थाने व मध्यवर्ती सरकार यांचे मिळून संघराज्य असावे, (३) शिक्षण व मालमत्ता यावर आधारलेला मर्यादित मताधिकार असावा, आणि (४) संयुक्त मतदार संघ असावेत अशा आशयाचा ठराव झाला. सर्वपक्षीय परिषदेच्या वेळी प्रांतिक स्वायत्तता असलेली संघराज्यात्मक पद्धत असावी याला हिंदू महासभेची संमती मिळविण्यात आली होती. नेहरू रिपोर्टानुसार मध्यवर्ती सरकारचे अधिकार संरक्षण, दळणवळण, परराष्ट्रीय व्यवहार, आंतरप्रांतीय विषय आणि जकात, परदेशाबरोबरचा व्यापार, चलन, पत पुरवठा आणि जहाज वहातूक या सारख्या अखिल भारतीय प्रश्नांपुरतेच मर्यादित राहणार होते. प्रांतिक सरकारांच्या अखत्यारीत ६३ बाबींचा समावेश करण्यात आला होता. आगाखानांनी प्रत्येक प्रांताला आपले संपूर्ण स्वातंत्र्य घोषित करण्याचा अधिकार असला पाहिजे अशी मागणी केली होती. सायमन कमिशनशी सहकार्य करणाऱ्या मुस्लिम नेत्यांनी आगाखानांच्यापुढे एक पाऊल टाकून नेहरू अहवालातील समर्थ केंद्रसत्तेची सूचना म्हणजे मागच्या दाराने हिंदू राज्य आणण्याचीच योजना असल्याचा गिल्ला सुरू केला. त्यांनी या प्रचाराची सबंध देशात इतकी धूम उठविली की, त्या दबावामुळे नेहरू रिपोर्टाला अनुकूल व प्रतिकूल असे तट पडून खिलाफत परिषद दुभंगली.

पंजाब आणि बंगालमधील खिलाफत समित्या व मुस्लीम लीग (जीना गट) यांनी खुले अधिवेशन भरवून पंजाब व बंगालशी संबंधित सर्वपक्षीय ऐक्य परिषदेच्या वेळी झालेल्या कराराला संपूर्ण पाठिंबा दिला. लखनौला जी विस्तारित समिती नेमण्यात आली होती, तिने आपल्या अहवालात पंजाब प्रांतात भरलेल्या अनेक जाहीर सभांतून हजारो मुसलमानांनी या कराराला पाठिंबा दर्शविल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या उलट शफी लीगचे नेते सभा भरविण्याच्या भानगडीत न पडता निषेधाची पत्रके प्रसृत करीत राहिले. मुसलमान अल्पसंख्यांकांना जसे

विशेषाधिकार नाकारण्यात आले होते तसेच बलुचिस्तान, सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतातील अल्पसंख्य हिंदूंनाही नाकारले होते असे दाखवून देऊन समितीने अहवालातील त्या तरतुदीचे समर्थन केले. विस्तारीत समितीने पुढे म्हटले की, मुसलमानांसाठी केंद्रीय विधिमंडळात ३३ टक्के जागा राखून ठेवल्या पाहिजेत अशी मागणी अनेक मुसलमान नेते करीत आहेत. परंतु अहवालात या प्रश्नावर जे तपशीलवार विश्लेषण केले आहे ते चुकीचे आहे असे एकाही मुसलमान नेत्याने दाखवून दिलेले नाही. "या बाबतीत नेहरू रिपोर्टमधल्या सूचना मुसलमानांना अधिक हितप्रद आहेत हे आम्ही सर्वांच्या नजरेस आणू इच्छितो."

शफी लीगच्या नेत्यांनी १९२८ सालचे वार्षिक अधिवेशन रद्द केले व त्याऐवजी अखिल भारतीय मुस्लीम सर्व पक्षीय परिषद भरविण्याची तयारी करण्यासाठी निरनिराळ्या प्रांतातून अशा परिषदा संघटित करण्याचा निर्णय घेतला. ता. ४ नोव्हेंबर रोजी संयुक्त प्रांताची परिषद भरली असता नेहरू रिपोर्टाला पाठिंबा देण्यासाठी उभे राहिलेले मूर्तजा हुसेन अबदी, हाफीज महंमद उस्मान आदींना आरडाओरड करून खाली बसविण्यात आले. अध्यक्ष खान बहाद्दूर हाफीज हिदायत हुसेन यांनी आपल्या भाषणात नेहरू रिपोर्टचा धिक्कार केला आणि प्रांतांना शेषाधिकार देण्यात यावेत या मागणीबरोबरच स्वतंत्र मतदार संघ, कमी-जास्त प्रमाणात सर्वत्र राखीव जागा वगैरे नेहमीच्याच मागण्या मांडल्या. हिंदूमहासभेचा अनुनय करण्यासाठी आणि सुधारकांना पुन्हा एकदा काँग्रेस चळवळीत सामील करून घेण्यासाठी नेहरू रिपोर्ट लिहिण्यात आला आहे अशी टीका मौलाना शौकत अली यांनी केली. अध्यक्षांनी केलेल्या वरील मागण्यांना पाठिंबा देणारे ठराव परिषदेत संमत करण्यात आले. अशाच तऱ्हेची आणखी एक ऐक्य परिषद बंगालमध्ये भरली होती. सर अबदूर रहीम तिच्या अध्यक्षस्थानी होते. त्याच दिवशी भरलेल्या जमीयत-उल-उलेमाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीने नेहरू समितीवर मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात आलेले नसल्यामुळे ती समितीच प्रातिनिधिक नव्हती अशी सबब काढली आणि कलकत्ता येथे भरणाऱ्या आगामी ऐक्य परिषदेस आपले प्रतिनिधी पाठविण्याची गरज नाही असे जाहीर केले.

त्यानंतर दोन दिवसांनी भरलेल्या अखिल भारतीय खिलाफत परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महंमद अलींनी ऐक्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. अन्सारी हे मोतीलाल नेहरूंच्या हातचे बाहुले बनले आहे अशी त्यांची संभावना केली. सर्व मुसलमानांनी इस्लाम धर्माज्ञांचे काटेकोरपणे पालन करावे, काँग्रेस सारख्या संघटनांशी कसलाही संपर्क ठेवू नये, राष्ट्रवादाच्या कल्पनेचा त्याग करावा आणि मुस्लीम आंतरराष्ट्रीयवादाची कास धरावी असा आदेश देणारा ठराव आझाद सोभानी यांनी अधिवेशनासमोर मांडला. संपूर्ण प्रांतिक स्वायत्ततेची मागणी सोडून दिल्याबद्दल हसरत मोहानी यांनी काँग्रेसचा निषेध केला. तसेच त्यांनी एका ठरावान्वये प्रांतांना

संपूर्ण स्वायत्ततेचे अधिकार देण्यात यावेत, प्रत्येक प्रांतातील मतदारांकडून गव्हर्नरांची निवडणूक व्हावी, प्रांतिक कायदेमंडळाकडे संघराज्याच्या पार्लमेंटचे सभासद निवडण्याचा अधिकार असावा व त्यांच्या निवडणुका अशा प्रकारच्या अप्रत्यक्ष पद्धतीने व्हाव्यात आणि प्रत्येक प्रांत आपण होऊन ज्या बाबी केंद्र सत्तेकडे सोपवील तेवढ्यापुरतेच संघराज्याचे अधिकार मर्यादित असावेत इ. मागण्या मांडल्या. देशाची सत्ता बहुसंख्यांकांच्या हाती सोपविण्याचा नेहरू रिपोर्टाचा डाव असून बहुसंख्य असलेले हिंदू हेच 'खरे जातीयवादी' आहेत, कारण त्यांना साऱ्या देशावर सत्ता गाजवावयाची आहे असे महंमद अलींनी आपल्या समारोपाच्या भाषणात सांगितले.

जीना मुस्लीम लीगचे १९२८ सालचे अधिवेशन ता. २६ ते ३० डिसेंबरपर्यंत कलकत्ता येथे भरले होते. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष मौलवी अबदुल करीम यांनी राखीव जागा आणि खास मतदार संघ यांच्याकरवी मुसलमानांना पुरेसे व प्रभावी प्रतिनिधित्व दिले जात नसल्याबद्दल नेहरू रिपोर्टावर टीका केली. अर्थात नेहरू रिपोर्टात प्रौढ मताधिकाराचा आग्रह धरण्यात आला आहे आणि त्यामुळे संयुक्त मतदार संघ राहिले तरी मुसलमानांची फारशी गळचेपी होणार नाही हे त्यांनी मान्य केले. अधिवेशनाचे अध्यक्ष महमुदाबादचे राजेसाहेब यांनी असे प्रतिपादन केले की, (१) मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतातील मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा, (२) राज्यघटना संघराज्याच्या स्वरूपाची असावी की एकात्म स्वरूपाची असावी, आणि (३) मध्यवर्ती कायदेमंडळातील राखीव जागांचे प्रमाण काय असावे एवढ्या तीन बाबींपुरतेच अल्पसंख्य असलेले मुसलमान आणि बहुसंख्य असलेले हिंदू यांच्यातील मतभेद उरले आहेत. छगला यांनी या अधिवेशनात भाषण करताना आपणच एक वर्षापूर्वी केलेल्या ठरावाच्या संदर्भात नेहरू रिपोर्टाचा विचार करावा आणि नेहरू रिपोर्टात जे फेरबदल सुचविण्यात आले आहेत ते आपल्या दृष्टीने फायदेशीर ठरणार आहेत की नुकसानकारक ठरणार आहेत ते पहावे असे जमलेल्या प्रतिनिधींना आवाहन केले. छगलांच्या दृष्टीने प्रौढ मताधिकाराऐवजी पंजाब व बंगालमध्ये राखीव जागा मागणे फायदेशीर की राखीव जागांऐवजी प्रौढ मतदानाचा अधिकार असणे फायदेशीर हा खरा महत्त्वाचा प्रश्न होता. सर्वपक्षीय परिषदेच्या आगामी अधिवेशनासाठी प्रतिनिधी मंडळ पाठविण्यासंबंधीचा छगला यांचा ठराव अधिवेशनात पास झाला. त्याचप्रमाणे मुसलमानांच्या सर्वपक्षीय परिषदेला हजर राहण्यास नकार देणारा ठरावही अधिवेशनाने संमत केला.

नेहरू रिपोर्टावर अखेरचा हात फिरविण्यासाठी कलकत्ता येथे बोलावण्यात आलेल्या सर्वपक्षीय परिषदेस जीना हजर राहीले होते. प्रौढ मताधिकाराचा हक्क मिळत असेल तर पंजाब आणि बंगालमध्ये राखीव जागांची जरूर राहणार नाही हे त्या परिषदेत त्यांनी मान्य केले. परंतु तो मिळाला नाही तर मात्र राखीव जागा ठेवाव्या लागतील आणि त्या त्या प्रांतातील मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्या

कायम कराव्यात असे त्यांनी सांगितले. प्रौढ मताधिकारामुळे मध्यवर्ती कायदेमंडळात मुसलमानांना साधारणपणे ३३ टक्के जागा मिळू शकतील असेही त्यांनी अप्रत्यक्षपणे मान्य केले. परंतु त्यामुळे श्रीमंताना अधिक श्रीमंत आणि गरीबांना अधिक गरीब करण्या-सारखेच ते ठरणार आहे, म्हणजे पंजाब आणि बंगालमध्ये मुसलमानांना लोकसंख्येच्या मानाने जादा प्रतिनिधीत्त्व मिळेल तर ते अल्पसंख्य असलेल्या प्रांतातील मुसलमानांना मात्र मध्यवर्ती कायदेमंडळात फार थोडया जागा मिळतील अशी भीती व्यक्त करुन त्यावर तोडगा म्हणून मध्यवर्ती कायदेमंडळात मुसलमानांसाठी ३३ टक्के जागा कायद्याने राखून ठेवण्यात याव्यात, त्यापैकी बहुसंख्य मुस्लीम प्रांतातील मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा देण्यात याव्यात आणि आणखी ८ टक्के जागा अल्प-संख्य मुस्लीम प्रांतातील मुसलमानात वाटून द्याव्यात. त्याचप्रमाणे प्रांताकडे शेषाधिकार सोपविण्यात यावेत अशीही त्यांची मागणी होती. शीख व भारतीय ख्रिश्चन प्रति-निधींनी या मागणीस जोराचा विरोध केला. मुसलमानांची ही मागणी मान्य झाली तर शीख व दलित वर्गाकडूनही अशीच मागणी पुढे येईल असे मत त्यांनी व्यक्त केले. एका प्रांतात लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मागावयाच्या आणि अल्पसंख्य प्रांतातील मुसलमानांसाठी मात्र विशेषाधिकार हवेत असे म्हणावयाचे ही दुटप्पीपणाची मागणी कधीही मान्य करता येणार नाही असे त्यांनी बजावले. शेवटी डॉ. एम. ए. अन्सारी अध्यक्षस्थानी असलेल्या त्या परिषदेने जीना यांची मागणी बहुमताने फेटाळून लावली.

ठरल्याप्रमाणे सर्व मुस्लीम पक्षांची परिषद १ जानेवारी १९२९ रोजी दिल्ली येथे सुरू झाली. १९०६ साली सिमल्याला गेलेल्या शिष्टमंडळाचे नेतृत्त्व करणारे आणि प्रांतांना फुटून निघण्याचा हक्क असला पाहिजे अशी मागणी करणारे आगा खान यांची यावेळी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती, हे लक्षात घेण्यासारखे आहे. जीना लीगच्या कलकत्ता येथील अधिवेशनाला हजर असलेले मौलवी महंमद याकूब यांच्यासारखे अनेकजण या अधिवेशनाला उपस्थित होते. सरकारकडून अर्थ-सहाय्य मिळणाऱ्या 'अलिगड मेल' या नियतकालिकाने या परिषदेच्या निमित्ताने खास पुरवणी काढली होती व त्याच्या प्रती अधिवेशनात वाटण्यात आल्या होत्या. दोन शतकांपूर्वी जे आपल्या गुलामगिरीत होते त्यांच्या पाताळयंत्रीपणाने आता आपल्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे असा इशारा त्या पुरवणीमधून मुसलमानांना देण्यात आला होता. ज्या वक्त्यांची अधिवेशनात भाषणे झाली त्या सर्वांनी असा दावा केला की, दोन्ही प्रतिस्पर्धी मुस्लीम लीग, खिलाफत परिषद, जमीयत-उल-उलेमा या सारख्या संघटनांचे प्रतिनिधी, मौलवी शफी दाउदी यांच्यासारखे राष्ट्रीय मुसलमान आणि इतरही अनेकजण या अधिवेशनाला उपस्थित राहिले अस-ल्याने हा मेळावा मुसलमानांचा सर्वाधिक प्रातिनिधिक आहे हे मान्य करावे लागेल. जातीय प्रश्नांच्या बाबतीत मुसलमानांच्या कोणत्याही संघटनेने नेहरू रिपोर्टाला मान्यता दिलेली नाही असे फाजल रहिमतुल्ला यांनी दाखवून दिले तर बहुतेक

सर्व वक्त्यांनी जीना हे याबाबतीत संपूर्णपणे एकाकी पडले आहेत असे प्रतिपादन केले.

हकीम अजमलखान यांचे पुत्र हकीम मुहमद जमीलखान हे या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. मुसलमानांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याची पुरेशी तरतूद नाही या मुद्यावर त्यांनी नेहरू रिपोर्टावर कडाडून टीका केली. मुसलमानांच्या अशा सर्व-पक्षीय परिषदेची आवश्यकता प्रतिपादन करताना त्यांनी असे सांगितले की, भारतातील सर्व मुसलमानांच्यावतीने बोलू शकेल आणि मुसलमान समाजाला जिचे निर्णय मान्य होतील अशी त्यांची कोणतीच संघटना आज या देशात अस्तित्वात नाही. आणि म्हणून मुस्लीम लीगच्या अनुयायांत ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी आगा खान यांना केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात आगा खान यांनी आग्रहपूर्वक असे प्रतिपादन केले की, बहुतेक सर्व मुसलमानांना मुस्लीम जगताशी सांस्कृतिक ऐक्य प्रस्थापित करावे असे वाटते. त्यांनी पुढे असेही सांगितले की, भारतीय मुसलमान ही एक जमात नसून अनेक जमातींचे मिळून बनलेले एक राष्ट्र आहे. ते आपल्या भाषणात पुढे म्हणतात :—

> हिंदू आणि मुसलमान यांच्यात संशयाचे आणि कुरबुरीचे वातावरण राहणार असेल तर मुसलमानांना भारतात सुखाने आणि शांततेने राहता येणे अशक्य आहे. आणि मुसलमानांसारखा या देशातील एक मोठा गट जर सतत आपले सांस्कृतिक जीवन येथे सुरक्षित राहील की नाही अशा धास्तीत वावरणार असेल तर हिंदुस्तान हा एकंदरीने पाहता समृद्ध आणि स्वयंशासित असा देश कधीच बनू शकणार नाही. तसेच जोपर्यंत आपल्याला बाह्य आक्रमण आणि अंतर्गत सुरक्षितता यांच्याबाबतीत संरक्षणासाठी ग्रेट ब्रिटनवर अवलंबून राहावे लागत आहे आणि ब्रिटिश फौजा जोपर्यंत आपल्या देशात पाय रोवून उभ्या आहेत तोपर्यंत साहजिकच ग्रेट ब्रिटन हिंदुस्तानच्या राज्यकारभारात सिंहाचा वाटा मागितल्याशिवाय कसा राहील? आणि माझी खात्री आहे की, मुस्लीम जनतेला या वस्तुस्थितीची यथार्थ जाणीव आहे . . . . . . 'जातीय' या शब्दाबद्दल आज बरेच काही बोलले जाते. . . . . . जाता जाता मला हे पुन्हा नमूद केले पाहिजे की, भारतीय मुसलमान ही केवळ एक जमात आहे असे नव्हे तर सबंध जर्मनीपेक्षाही संख्येने अधिक असलेल्या अनेक जमातींचे मिळून बनलेले ते एक राष्ट्र आहे.

हिंदूंच्या गायीविषयीच्या भावनांची दखल घेण्याची आवश्यकता आगाखान यांनी आपल्या भाषणात दोन वेळा व्यक्त केली. परंतु त्यांच्या भाषणाला सतत दाद देणारे प्रतिनिधी या दोन्हीवेळी मात्र मख्खासारखे बसून राहात हे लक्षात घेण्यासारखे आहे.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सर महंमद शफी यांनी मुसलमानांच्या मागण्यांची जंत्री असलेला एक ठराव मांडला. सर महंमद शफी आणि अलि बंधू यांनी संयुक्तपणे

तो तयार केला होता. जमीयत-उल-उलेमाचे अध्यक्ष मौलवी किफायत अली यांनी ठरावाला अनुमोदन दिले. म्हणजे मुस्लीम लीग, खिलाफत परिषद आणि जमीयत या तीन संघटनांचा मिळून तो संयुक्त ठराव होता असे म्हणावयास हरकत नाही. ठरावात खालील मागण्यांचा समावेश होता. (१) विभक्त मतदार संघ, (२) शेषाधिकारासकट प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता, (३) घटक राज्ये सोपवतील तेवढेच अधिकार केंद्र सरकारच्या हाती राहातील, (४) जातीय नकाराधिकार, (५) मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या प्रांतात मुसलमानांना निम्म्याहून जास्त प्रतिनिधित्व आणि ते अल्पसंख्य असलेल्या प्रांतातून त्यांना लखनौ कराराच्या धर्तीवर विशेषाधिकार, (६) सरकारी नोकऱ्यांत आणि कायद्याने निर्माण झालेल्या स्वायत्त संस्थांत पुरेसे प्रतिनिधित्व, (७) स्वतंत्र सिंध प्रांताची निर्मिती आणि वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान यांचा आजचा दर्जा वाढवून त्यांना स्वतंत्र प्रांताचा दर्जा देणे, (८) राज्यघटनेत मुसलमानी संस्कृती त्याचप्रमाणे त्यांची भाषा, शिक्षण, धर्म, व्यक्तिगत कायदा आणि वक्फ यांच्या संरक्षणाची पुरेशी तरतूद, (९) सर्व सरकारी अनुदानात न्याय्य हिस्सा, आणि (१०) संघराज्यातील सर्व प्रांतांची संमती असल्याशिवाय घटनेत दुरुस्ती करता कामा नये.

सायमन कमिशन हिंदुस्तानात आल्याबरोबर बर्कनहेड यांनी व्हाइसरॉयला असे लिहून कळविले होते की :—

> मी सायमन यांना असा सल्ला देईन की जे कमिशनवर बहिष्कार घालणार नसतील अशा सर्वांना विशेषकरून मुसलमान आणि दलित वर्गीयांना प्रत्येक ठिकाणी भेटावे. मुसलमान प्रतिनिधींबरोबर होणाऱ्या त्यांच्या मुलाखतींना भरपूर प्रसिद्धी द्यायला हवी. आता पुढचे सर्व धोरण सूर्यप्रकाशासारखे स्पष्ट आहे. कमिशन मुसलमानांच्या पुरते कच्छपी लागले आहे आणि त्यामुळे हिंदूंना अत्यंत घातक ठरेल असा अहवाल आता कमिशन सादर करील अशी बहुसंख्य हिंदूंच्या मनात दहशत निर्माण करावयाची व त्यायोगे मुसलमानांचा पाठिंबा मिळवावयाचा आणि जीनांना हात चोळीत बसायला लावावयाचे.

या नाटकाच्या पहिल्या अंकाची सुरुवात प्रांतिक पातळीवर मुसलमानांच्या सर्व-पक्षीय परिषदा भरविण्यापासून झाली. त्याचबरोबर मुसलमानांच्या अखिल भारतीय आणि स्थानिक स्वरूपाच्या मागण्या सादर करण्यासाठी सरकारधार्जिणी शिष्टमंडळे कमिशनच्या भेटीस जाऊ लागली. सर्व इंग्रज सभासद असलेल्या सायमन कमि-शनवर बहिष्कार घालणारे विरोधक आणि त्याच्याशी सहकार्य करणारे सरकार-धार्जिणे असे देशात उघडउघड दोन तट पडले. जानेवारी १९२९ मध्येच व्हाइसरॉय मध्यवर्ती कायदेमंडळात असे जाहीर करून चुकले होते की, नेहरू रिपोर्ट हा गंभीरपणे विचार करण्याच्या लायकीचा असला तरी इतरांनी घेतलेल्या निर्णयावर केवळ शिक्कामोर्तब करणाऱ्या एखाद्या नोंदणी अधिकाऱ्याच्या इतक्या खालच्या पातळीवर ब्रिटिश पार्लमेन्ट कधीही उतरणार नाही.

दिल्लीच्या मुस्लीम परिषदेचा परिणाम विस्मयचकित करुन सोडणारा होता. जीनांचे पाठीराखे एका मागोमाग पगड्या फिरवू लागले. या पश्चातापदग्ध पुढाऱ्यांची भलावण करण्यात किंवा त्यांच्या पदरात लगोलग त्याचे फळ टाकण्याच्या बाबतीत सरकारनेही कसली हयगय केली नाही. मौलवी महंमद याकूब यांना नाइटहुडचा किताब बहाल करण्यात आला आणि लवकरच व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर त्यांची वर्णी लावण्यात आली. त्यामानाने जीनांनी फार सावधपणे कोलांटी उडी मारली होती. कारण त्यांना आपली प्रतिमा डागाळू द्यावयाची नव्हती त्याचबरोबर आपले पुढारीपणही सांभाळावयाचे होते.

मार्च २८ रोजी जीनांनी आपल्या गटाच्या मुस्लीम लीगची बैठक बोलावली, त्याचवेळी त्यांनी आपल्या प्रसिद्ध चौदा कलमी मागण्यांचे लांबलचक पत्रक प्रसृत केले. त्या चौदा कलमात दिल्लीच्या मुस्लीम परिषदेत करण्यात आलेल्या सर्वच्या सर्व मागण्यांचा तर समावेश होताच पण त्याशिवाय इतरांनी सायमन कमिशनपुढे सादर केलेल्या काही मागण्याही अंतर्भूत करण्यात आल्या होत्या. आपल्या मुस्लीम लीगने १९२७ साली कलकत्याला जो ठराव केला होता त्याच्या नेमक्या उलट मागण्या स्वत: करून वर आपला मद्रासचा ठराव फिरवल्याबद्दल जीनांनी काँग्रेसवरच ठपका ठेवला. मुस्लीम लीगला विश्वासात न घेता नेहरू समिती नियुक्त केल्याबद्दल आणि त्याचबरोबर मुस्लीम लीगच्या अनुपस्थितीत लखनौच्या अधिवेशनात नेहरू रिपोर्ट विचारात घेतल्याबद्दल सर्वपक्षीय परिषदेला जीनांनी बोल लावला. मुसलमान, शीख, ब्राह्मणेतर आणि दलित वर्ग या सर्वांनीच नेहरू रिपोर्ट फेटाळून लावला आहे असे प्रतिपादन करून हिंदूमहासभेवर त्या रिपोर्टाला सुचविण्यात आलेल्या दुरुस्त्यांपैकी एकही न स्वीकारण्याच्या तिच्या आडमुठेपणाबद्दल त्यांनी टीका केली. मुस्लीम लीगने केलेल्या सूचना कलकत्ता येथे भरलेल्या बैठकीत नाकारण्यात आल्या असल्याने आपल्याला योग्य वाटेल तो मार्ग अनुसरण्यास लीग आता मोकळी आहे असेही त्यांनी सांगितले. त्या अधिवेशनात जीना यांनी स्वत:च अशी कबुली दिली की, मुसलमानांत तीन स्पष्ट गट पडले आहेत. एक नेहरू रिपोर्टाला संपूर्ण पाठिंबा देणारा, दुसरा तो सर्वस्वी त्याज्य मानणारा आणि तिसरा आंतरजातीय प्रश्नांबाबत त्यात काही सुधारणा सुचवणारा. अधिवेशनाच्या शेवटी विषय नियामक समितीने (तिच्यात मौलाना आझाद यांचाही समावेश होतो) १९२७ च्या मार्चमध्ये दिल्ली येथे करण्यात आलेल्या सूचनांचा आणि त्याच वर्षातील कलकत्ता अधिवेशनात पास झालेल्या ठरावांचा पुनरुच्चार केला. त्याचप्रमाणे सर्वपक्षीय परिषदेने कलकत्ता येथे घेतलेल्या निर्णयांना पुढील दुरूस्त्यांसह राष्ट्रीय मागणी म्हणून मान्यता दिली.

(१) मध्यवर्ती कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहात मुसलमानांना एक तृतियांश प्रतिनिधीत्त्वाची घटनात्मक तरतूद.

(२) प्रौढ मताधिकार न मिळाल्यास पंजाब व बंगालमध्ये मुसलमानांना

लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्त्व.

(३) प्रांताच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास केन्द्र सरकारला मज्जाव आणि युद्ध सुरू झाले तरच प्रांतिक कायदेमंडळे बरखास्त करण्याचा त्याला अधिकार.

(४) प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता आणि

(५) मुसलमान सभासदांपैकी बहुसंख्यांची संमती असल्याशिवाय मध्यवर्ती किंवा ांतिक कायदेमंडळांना मोहामेडन कायद्यात दुरूस्ती वा हस्तक्षेप करण्यास मनाई.

जीनांनी एका पत्रकान्वये लगेच असे जाहीर करून टाकले की, त्यांच्या गटाच्या मुस्लीम लीगने १९२७ मध्ये कलकत्ता अधिवेशनात संमत केलेला ठराव आणि २ जानेवारी १९२९ रोजी मुसलमानांच्या सर्वपक्षीय परिषदेने पास केलेला ठराव यात कसलाही फरक नाही. त्या पत्रकात त्यांनी पुढे असेही म्हटले की, जीना लीगने ता. ३१ मार्च रोजी सुचविलेल्या दुरुस्त्यांचा अंतर्भाव करण्यात आल्यास शफी लीग नेहरू रिपोर्टला मान्यता देईल. जीनांच्या या दोन्ही विधानांवर आक्षेप घेणारे निवेदन मौलाना आझाद यांनी लगोलग प्रसिद्ध केले.

---

प्रकरण बारावे

## फुटीरवादी राजकारणाचे विश्लेषण

सर्वपक्षीय परिषदेत आणि नेहरू समितीच्या कामात महत्त्वाची कामगिरी बजावलेल्या जयकरांनी ४ मार्च १९२९ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळात बोलतांना अशी कबुली दिली की, "माझ्या स्वत:पुरते बोलावयाचे तर १९२४ आणि १९२५ साली या सभागृहात जे निर्णय घेण्यात आले (मोतीलाल नेहरूंनी उपसूचनांच्या स्वरूपात मांडलेल्या राष्ट्रीय मागण्यांना मध्यवर्ती कायदेमंडळाने दिलेली स्वीकृती) त्यापलीकडे वेगळी अशी घटना करायला नको होती. त्या मागण्या ही चांगल्या प्रकारची घटनाच होती आणि तेवढ्यावर काम भागू शकले असते. परंतु लॉर्ड बर्कनहेड यांनी दिलेले घटना तयार करण्याचे आव्हान स्वीकारून आपण त्यांच्या सापळ्यात सापडलो. त्यामुळे ध्येयमंदिर दृष्टीच्या टप्प्यात येण्यापूर्वीच आपण आपल्यातील मतभेदांचा बाऊ करीत बसलो". सर्वसंमत अशी घटना तयार करता आली तर ब्रिटन आपल्याला लगेच स्वातंत्र्य देऊन टाकील अशा भ्रमात आम्ही वावरत होतो असेही जयकरांनी सांगून टाकले. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले :

"एका निवांत जागी एकत्र बसून हिंदू, मुसलमान आणि इतर अल्पसंख्य गट जी घटना बनवतील ती हिंदुस्तानची घटना म्हणून मान्य केली जाईल, असे इंग्लंडने आश्वासन देण्याचा अवकाश की लगेच हिंदू मुसलमानांतील भांडणे एका दिवसात मिटतील असे मी समोरच्या बाकावर बसलेल्या सभासदांना आश्वासन देतो" जयकरांना वस्तुस्थितीचे आकलन काहीसे उशिरा झाले.

घटना तयार करण्यात आलेल्या अपयशामुळे घटनात्मक लढ्याचे पर्व संपले आणि काँग्रेसने पुन्हा एकदा सामुदायिक लढा सुरू करण्याचे ठरविले. स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात हा लढा सर्वात प्रदीर्घ आणि मोठा असा ठरला. १९२९ च्या सुरुवातीला काँग्रेसने परदेशी मालावरील बहिष्कार पुकारून लढ्याची सलामी दिली. वातावरण तापू लागेपर्यंत सायमन कमिशनचे साक्षी नोंदवून घेण्याचे काम जवळजवळ संपत आले होते. देशातील राजनिष्ठ मंडळींनी आपापल्या मागण्यांची आणि सूचनांची निवेदने कमिशनला सादर केली होती. तसेच अनेक शिष्टमंडळे कमिमशनला भेटून आली होती. नेहरू समिती आणि सायमन कमिशन यांच्या कामकाजात एक महत्त्वाचा फरक होता. नेहरू समिती काहीही करून स्वतंत्र हिंदुस्तानची घटना तयार करण्याच्या प्रयत्नात होती तर सायमन कमिशन आणि त्यापुढे येणारे साक्षीदार यांना ब्रिटिशांची

वासाहतिक सत्ता टिकवून कशी धरता येईल याची चिंता लागून राहीली होती.

सायमन कमिशनपुढे साक्ष देणाऱ्यांपैकी काही शिष्टमंडळांनी ब्रिटिश सत्ता टिकून राहीली पाहिजे अशी अगदी खुलेपणाने आपल्या निवेदनांतून मागणी केली होती. एन. सी. एम. ए. ने ( नॅशनल सेंट्रल मोहॉमेडन असोसिएशन ऑफ बेंगॉल ) आणि संयुक्त प्रांतातील मुसलमानांच्या शिष्टमंडळाने ब्रिटिश सरकारविरुद्धच्या उच्च-वर्गीय अश्रफांच्या तक्रारी नमूद केल्या होत्या. मुसलमानी सत्ता होती तेव्हाच्या वैभवाचे स्मरण करून देऊन या दोन शिष्टमंडळांनी, पूर्वी अश्रफांची राज्यकारभारात जी मक्तेदारी होती, आणि स्थावर संपत्तीत त्यांचा जो मोठा वाटा होता तो नष्ट करून टाकल्याबद्दल ब्रिटीशांना दूषण दिले. त्याचप्रमाणे त्यांनी अनुसरलेल्या धोरणांमुळे हिंदूची सर्व क्षेत्रात भरभराट होऊन ती मुसलमानांना बाधक ठरली अशी तक्रार केली.

हिंदू हे शिक्षण, अर्थकारण आणि राजकारण या सर्वच बाबतीत मुसलमानांपेक्षा फार पुढे गेलेले आणि संघटित असल्यामुळे, त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची म्हणजेच हिंदुत्व-वादाची भावना वाढीस लागली आहे. याउलट मुसलमान बिचारे अशिक्षित, आर्थिकदृष्टचा दुर्बल हिंदूकडून परकीय म्हणून मानले जाणारे आणि मुख्यत: ते फार मोठचा प्रदेशात विखुरलेले असल्याने असंघटित राहिले आहेत. . . हिंदूसारखे ते चळवळी करीत नाहीत आणि सरकारला शक्य तितका कमी त्रास होईल अशी ते काळजी घेतात असे संयुक्त प्रांतातील मुसलमानांच्या शिष्टमंडळाने आपल्या निवेदनात नमूद केले होते. एन. सी. एम्. ए. शिष्टमंडळाने १८८५ पासून सरकार-कडून मिळत गेलेल्या उदार सवलतींचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून आपल्या निवेदनात सरकारकडून आणखी साहाय्य मिळण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. या सगळचाचा निष्कर्ष एकच निघतो आणि तो म्हणजे ब्रिटिश सत्ता येथे टिकून राहावी. एन. सी. एम्. ए. शिष्टमंडळाने पुढे म्हटले होते :–

> भारतातील मुसलमान समाज हा अद्याप संक्रमणावस्थेत असल्यामुळे त्याची खंबीरपणे, सहानुभूतीपूर्ण आणि नि:पक्षपातीपणे काळजी घेतली जाणे आवश्यक आहे. कोणतेही घटनात्मक किंवा प्रशासकीय स्वरूपाचे दूरगामी बदल धसमुसळेपणाने घडवून आणले गेले अथवा मुसलमानांचे धार्मिक आणि राजकीय अधिकार, शैक्षणिक विकास याबाबतच्या शासकीय सवलती कमी झाल्या किंवा विद्यापीठे, स्थानिक स्वराज्य संस्था, केन्द्रीय आणि प्रांतिक कायदेमंडळात आणि कार्यकारी मंडळात त्यांना पुरेसे प्रतिनिधीत्व याबाबत संरक्षण मिळाले नाही, तर एक स्वतंत्र जमात म्हणून मुसलमान समाजाचे अस्तित्वच नष्ट होऊन जाईल. निरनिराळचा धर्मांच्या अनुयायांत युद्धाचा भडका उडू नये म्हणून ब्रिटिश येथे कायम राहिले पाहिजेत अशीही मागणी एन्. सी. एम्. ए. ने केली.

सायमन कमिशनला भेटलेल्या मद्रासमधील मुसलमानांच्या शिष्टमंडळाने त्यांच्या मागासलेपणावर भर देऊन जोपर्यंत अल्पसंख्यांक पुढारलेल्या जमातींच्या बरोबरीला

येत नाहीत तोपर्यंत त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी तिसरा एकादा पक्ष असणे आवश्यक आहे असे आपले मत नमूद केले होते. पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत आणि सिंधमधील हिंदू आणि शीख शिष्टमंडळांनी, गृहमंत्रिपदावर मुसलमान असेल तर तो निःपक्षपातीपणे वागणार नाही अशी धास्ती असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था आणि न्याय ही खाती लोकांनी निवडून दिलेल्या मंत्र्यांकडे सोपवू नयेत अशी कमिशनकडे मागणी केली तर सर्व अल्पसंख्य प्रांतातील मुसलमानांच्या शिष्टमंडळांनी होम मेंबर हा सरकारनियुक्त असावा अशी मागणी केली होती. सर शंकरन् नायर यांच्या अध्यक्षतेखालील इंडियन सेंट्रल कमिटीवरील झुलफिकार अलीखान, आणि डॉ. ए. सुऱ्हावर्दी यांनी कमेटीच्या अहवालाला आपली भिन्न मत-पत्रिका जोडली. 'जोपर्यंत हिंदू मुसलमानांतील मतभेद कायम आहेत तोपर्यंत त्यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी आणि समान न्याय दिला जात आहे हे पाहण्यासाठी हिंदुस्तानांत ब्रिटिश सरकार टिकून राहिले पाहिजे' असे त्यांनी स्पष्टपणे प्रतिपादन केले होते.

केंद्र सरकारात मुसलमान मंत्र्यांची संख्या फार थोडी राहाणार असल्याने केंद्रात लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हाती कोणतीही जबाबदारी अजिबात सोपविण्यात येऊ नये असे प्रतिपादन स्वतःला तथाकथित 'ऑल इंडिया मुस्लिम फेडरेशन'चे प्रवक्ते म्हणविणाऱ्या कबिरूद्दीन नबाब, सरदार अहमद अली खान आणि नबाब सैयद अली खान या तिघांनी दिनांक २२ ऑक्टोबर १९२८ रोजी पुण्यात सायमन कमिशनची भेट घेतली त्यावेळी केले होते. शफी लीग आणि इतर मुसलमानांनीही हाच ठेका धरून केन्द्रात कमीत कमी सत्तेचे हस्तांतर केले जावे अशा आशयाची निवेदने केली होती.

हिंदुस्तानातील ब्रिटिशांची राजवट अशीच चालू राहावी अशी मागणी करण्यासाठी कायदेमंडळातील सरकारनियुक्त सभासदांची प्रथा कायम टिकवावी आणि राज्य कारभारात सध्याप्रमाणेच युरोपियनांचे वर्चस्व राहू द्यावे असे सूचित करण्यात आले होते. बंगालमधील मुसलमान शिष्टमंडळाच्या मते प्रांतिक कायदेमंडळातील २५ टक्के जागा सरकारनियुक्त सभासदांसाठी राखून ठेवल्या जाव्यात आणि मंत्री किंवा कार्यकारी मंडळाचे सभासद यांच्या बाबतीत हे प्रमाण पन्नास टक्के असावे. शफी लीगने अशी इच्छा प्रदर्शित केली होती की, ६६ टक्के सनदी नोकर युरोपियन असावेत. आय्. सी. एस्. अधिकाऱ्यांपैकी हिंदी लोकांकरिता फक्त ३३ टक्के जागा थेट भरतीने भरण्यात याव्यात असे सिंध मुहॅमेडन असोसिएशनचे मत होते तर प्रशासनातील युरोपियनांचे सध्याचे प्रमाण तसेच राहू द्यावे असे संयुक्त प्रांतातील मुसलमानांच्या शिष्टमंडळाने सुचविले होते.

१९२० पासूनच्या दशकात ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी कॉंग्रेसला शह देण्यासाठी संस्थानिक आणि दलितवर्गाला पुढे करण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. सरकारची सतत

तळी उचलून धरणाऱ्या आश्रफांनीही मग ते सूत्र पकडून दलित वर्गाचा कैवार घेण्यास सुरूवात केली. सायमन कमिशनला भेटायला गेलेल्या मुसलमानांच्या बहुतेक सर्व शिष्टमंडळांनी दलित वर्गासाठी स्वतंत्र जातीय मतदार संघांची मागणी केली होती. लजपतराय यांनी सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा जो ठराव मध्यवर्ती कायदेमंडळात आणला होता त्यावरील चर्चेच्यावेळी पंजाबमधील जमीनधारकांचे प्रतिनिधी मियाँ महम्मद शाह नवाझ यांनी असा युक्तिवाद केला की, समजा ब्रिटिश येथून निघून गेले तर मुसलमान आणि अस्पृश्य यांच्या हितावर निखारे ठेवावे लागले तरी केवळ सवर्ण हिंदूंच्याच पोळीवर तूप ओढून घेण्याची तुमची वृत्ती जात नाही तोपर्यंत तुम्ही कारभार पाहू शकणार नाही आणि तुम्हाला ते कधीच जमणार नाही हे तुम्हीही पक्के जाणून आहात. त्यावर लजपतराय यांनी असे निदर्शनास आणून दिले की, स्वतःच्या मालमत्तेतील मोठा हिस्सा त्यांनी पंजाबातील अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी देऊन टाकला आहे. ३ नोव्हेंबर १९२८ रोजी सायमन कमिशनपुढे दिलेल्या साक्षीतही पंडित नानकचंद यांनी आर्य समाजाकडून अस्पृश्योद्धारासाठी केल्या जाणाऱ्या कार्याची तपशीलवार माहिती दिली असून उलट सार्वजनिक विहिरींवर अस्पृश्यांना पाणी भरता यावे म्हणून जरूर ते उपाय योजण्यात यावेत अशी शिफारस करणारा एम. एल. भटनागर यांचा ठराव मात्र सरकार आणि मुस्लीम पार्टी यांनी एकजूट करून पंजाब कायदेमंडळात फेटाळून लावला असे नमूद केले आहे. सरकारी जमिनीचे वाटप करताना त्यात दलित वर्गालाही हिस्सा मिळावा असा ठराव आणला असता ती मागणीही फेटाळून लावण्यात आली हेही नानकचंद यांनी आपल्या साक्षीत दाखवून दिले.

साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांच्या ऊबदार कुशीत राहून राजकारणात प्रभावी स्थान पटकावता आले तर ते जमीनदार वर्गाला हवे होते. त्यामुळे जमीनदारांच्या बहुतेक सर्व शिष्टमंडळांनी त्यांच्या वर्गासाठी कायदेमंडळात जागा राखून ठेवण्यात याव्यात अशी मागणी केली. बंगालमधील जमीनदारांना तर त्या प्रांताच्या कायदेमंडळात एक-तृतीयांश जागा हव्या होत्या. कायदा आणि सुव्यवस्था खाते लोकप्रतिनिधींच्या हाती सुपूर्द करण्यास किंवा मताधिकाराची व्याप्ती वाढविण्यासही त्यांचा सक्त विरोध होता हे सांगायलाच नको. मुसलमानांच्या एक दोन शिष्टमंडळांनी प्रौढ मताधिकाराची गोष्ट काढली होती परंतु त्याबाबत लगेच असा खुलासा केला होता की, प्रौढ मताधिकार हा फक्त पुरुषांनाच असला पाहिजे, स्त्रियांना तो लागू करता कामा नये. आणि प्रौढ मताधिकार दिला तरी निवडणुकीस उभे राहण्यासाठी उमेदवार मालमत्ताधारक असला पाहिजे.

सायमन कमिशनपुढे व्यक्तिशः साक्ष देणारे मुसलमान आणि त्यांची शिष्टमंडळे तसेच त्यांनी सादर केलेली निवेदने या सर्वांनी एकजात स्वतंत्र मतदार संघाची बाजू उचलून धरली होती. मुसलमान, शीख आणि हिंदू जमीनदारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पंजाब ॲग्रिकल्चरल पार्टीनेही राखीव जागांची मागणी केली होती.

मुसलमानांच्या जवळजवळ सर्वच शिष्टमंडळांनी केवळ मुसलमानांसाठीच नव्हे तर युरोपियन्स, अँग्लो-इंडियन्स, ख्रिश्चन्स आणि अनुसूचित जाती यांच्यासाठीही स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. सायमन कमिशनच्या मध्यवर्ती समितीच्या बहुमताच्या अहवालात या मागणीस विरोध दर्शविण्यात आला होता तर त्या समितीवरील अल्पसंख्य सभासद आणि मुंबई, पंजाब, बंगाल, मद्रास आणि आसाम प्रांतातील समित्यांनी स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीस अनुकूलता दर्शविली होती. सायमन कमिशनच्या संयुक्त प्रांताच्या समितीने असे सुचविले होते की, लोकांनी निवडलेल्या मुसलमान सभासदांपैकी ७५ टक्के सभासद संयुक्त मतदार संघाला मान्यता देईपर्यंत स्वतंत्र मतदार संघ राहू द्यावेत.

स्वतंत्र मतदार संघाच्या जोडीला विशेषाधिकाराची मागणीही मुसलमानांकडून पुढे दामटली जात होती. निरनिराळ्या शिष्टमंडळांनी मुसलमानांची अल्पसंख्या असलेल्या प्रांतांसाठी राखीव जागांचे निरनिराळे प्रमाण सुचविले असले तरी त्या सर्वांना अल्पसंख्य प्रांतातील मुसलमानांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त राखीव जागांच्या स्वरूपातील विशेषाधिकार हवे होते.

परंतु विशेषाधिकाराच्या मागणीतही एक मेख होती. ज्या प्रांतात मुसलमान बहुसंख्य असतील त्या प्रांतातील अल्पसंख्यांकांनाही तसेच विशेषाधिकार देण्याची तयारी शफी लीगच्या शिष्टमंडळाने दर्शविली. परंतु कमिशनने ज्यावेळी त्यांना असा प्रश्न विचारला की, पंजाब आणि संयुक्त प्रांतात अनुक्रमे शीख आणि मुसलमान यांची लोकसंख्या नेमकी १४ टक्केच आहे. तेव्हा संयुक्त प्रांतात तुम्ही मुसलमानां-साठी जे विशेषाधिकार मागताहात ते पंजाबात तुम्ही शीखांना देण्यास तयार आहात का ? तेव्हा मात्र त्यांनी त्याला नकार दर्शविला. आपल्या या भूमिकेचे समर्थन करतांना त्यांनी असे सांगितले की, मुसलमानांतील शिया आणि सुनी यांच्यातील फरक ज्याप्रमाणे कृत्रिम आहे त्याप्रमाणेच हिंदू आणि शीख यांच्यातील फरकही नगण्य आहे. त्यामुळे शीखांना पंजाबात राखीव जागा हव्या असतील तर त्या हिंदू आणि शीख मिळून उरलेल्या ४५ टक्के जागांतूनच द्याव्या लागतील. कारण मुसल-मानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ५५ टक्के जागा मिळाल्याच पाहिजेत. त्यांनी या संदर्भात पुढे असेही सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत विशेषाधिकारा-मुळे कोठल्याही प्रांतात बहुसंख्य जमात अल्पसंख्य बनता कामा नये किंवा त्या प्रांतातील निरनिराळ्या अल्पसंख्य गटांच्या एकत्रित संख्येइतकेही स्थान तिला प्राप्त होता कामा नये. मुसलमानांच्या इतर शिष्टमंडळांचे म्हणणेही शफी यांच्या-सारखेच होते.

निवडणुकीसाठी जातीय मतदार संघ आणि लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा खूपच अधिक प्रतिनिधित्व याखेरीज इतरही भरमसाठ मागण्यांचे पिल्लू घुसडण्याचा प्रयत्न झाला. कायदेमंडळाप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांपासून तो विद्यापीठांपर्यंत आणि सरकारी

नोकऱ्यांतही राखीव जागांची मागणी अनेक शिष्टमंडळांनी केली. सरकारी अनुदानालाही हे तत्व लागू करण्यात यावे आणि स्वतंत्र मतदार संघांप्रमाणे मुसलमान उमेदवारांसाठी परीक्षाही स्वतंत्र असाव्यात असे सुचविण्यापर्यंतही काहींची मजल गेली.

मुसलमानांची अल्पसंख्या असलेल्या प्रांतातील मंत्रिमंडळातून मुसलमानांसाठी ३३ टक्के प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यात यावी या मागणीमुळे पुढे मुसलमानांतील जातीयवादी पुढारी आणि राष्ट्रीय नेतृत्व यांच्यात तीव्र स्वरूपाचे तणाव निर्माण झाले. सायमन कमिशनपुढे ज्यावेळी ही मागणी मांडण्यात आली त्यावेळी या मागणीमुळे प्रांतिक स्वायत्ततेला आणि मंत्रिमंडळाच्या सामुदायिक जबाबदारीच्या तत्वाला बाधा येईल असे निदर्शनास आणून देण्यात आले. मुसलमानांना मंत्रिमंडळात सहभागी व्हावयाचे असेल तर त्यांना इतर पक्षांबरोबर आघाडी करावी लागेल. संयुक्त प्रांतातील मुसलमान शिष्टमंडळाची मंत्रिमंडळाच्या सामुदायिक जबाबदारीला हरकत नव्हती परंतु मुसलमानांचे हितसंबंध ज्यात गुंतले असतील अशा प्रश्नांबाबत मात्र मुसलमान मंत्र्यांना त्यातून सोडवणूक असली पाहिजे अशी त्या शिष्टमंडळाची भूमिका होती. भारतीय मध्यवर्ती सायमन समितीचे अध्यक्ष सर शंकरन् नायर, सरदार शिवदेव सिंग ओबेरॉय, सर हरिसिंग गौर, एम्. सी. राजा, किकाभाई प्रेमचंद आणि राजा नबाब अली खान यांनी आपल्या बहुमताच्या अहवालात मुसलमान मंत्री नेमण्याची कायदेशीर तरतूद करण्यात यावी ही मागणी फेटाळून लावली. या सभासदांनी असे दाखवून दिले की, ही मागणी मंत्रिमंडळाच्या संयुक्त जबाबदारीच्या तत्वाशी विसंगत असून एकदा मुसलमानांच्या बाबतीत ती मान्य करण्यात आली तर इतर जमातींकडूनही तशी मागणी होऊ लागेल, तथापि सर झुल्फीकार अली खान आणि डॉ. ए. सुऱ्हावर्दी यांनी अहवालाला भिन्न मतपत्रिका जोडून या मागणीचा पाठपुरावा केला.

एन्. सी. एम्. ए. च्या निवेदनात प्रत्येक विद्यापीठात उपकुलगुरूच्या पदावर एका वर्षी हिंदूंची तर पुढच्या वर्षी मुसलमानांची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती.

सायमन कमिशनपुढे मांडण्यात आलेल्या मुसलमानांच्या आणखी काही मागण्या पुढीलप्रमाणे होत्या: जातीय नकाराधिकार, संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य, उर्दू भाषेला सरकारी उत्तेजन व राज्य कारभारात आणि न्यायालयातून वाढत्या प्रमाणावर तिचा वापर इत्यादी. शफी लीगने सायमन कमिशनला सादर केलेल्या निवेदनात गोवध करण्यास संपूर्ण मोकळीक आणि मशिदींच्या आसपास वाद्ये वाजविण्यास कायद्याने संपूर्ण बंदी या मागण्याही अंतर्भूत करण्यात आल्या होत्या. श्रीमती अहमद शहा यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या संयुक्त प्रांतातील मुस्लिम महिलांनी कमिशनला असे सांगितले की, स्त्रीच्या पतीला अथवा पित्याला मतदानाचा अधिकार असेल तर तो त्या स्त्रीलाही असला पाहिजे. परंतु पुरुषांच्या बहुतेक सर्व शिष्टमंडळांनी मात्र स्त्रियांना मताधिकार देण्यास विरोध दर्शविला. मुसलमान स्त्रिया बुरख्यात असतात आणि म्हणून मतदान केंद्रावर

जाऊन मतदान करणे त्यांना आवडणार नाही असे प्रतिपादन खुर्रो करू लागताच डॉ. आंबेडकरांनी त्यांना याबाबत छेडले तेव्हा खुर्रो यांना असे कबूल करावे लागले की, खालच्या वर्गातील त्याचप्रमाणे खेडेगावातून राहाणाऱ्या मुस्लिम महिला बुरखा पाळीत नाहीत.

सायमन कमिशनच्या शिफारसी १९३० मध्ये प्रसिद्ध झाल्या. मुसलमानांनी घेतलेल्या भूमिकेला त्यात अपेक्षेप्रमाणे झुकते माप देण्यात आले होते आणि ब्रिटिशांची सत्ता टिकून कां राहावी याचे समर्थन करण्यात आले होते. कायदेमंडळाला जबाबदार असलेल्या एका पक्षाच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे असणारी ब्रिटनमधील संसदीय पद्धती हिंदुस्तानला उपयुक्त ठरणार नाही असे नमूद करून सायमन कमिशनने महासंघराज्याची पहिली पायरी म्हणून स्वायत्त प्रांत निर्मितीची शिफारस केली होती. ब्रिटिश हिंदुस्तानातील अशा स्वायत्त प्रांतांचे एक संघराज्य राहील व हिंदी संस्थानांचे दुसरे संघराज्य राहील आणि त्या दोघांचे मिळून महासंघराज्य बनावे अशी कमिशनची कल्पना होती. या महासंघराज्याच्या निवडणुका अप्रत्यक्ष पद्धतीने व्हाव्यात आणि दोन्ही संघराज्यांच्या वतीने महासंघराज्याने काही जबाबदाऱ्या पार पाडाव्यात असे कमिशनला अभिप्रेत होते.

कमिशनने आपल्या अहवालात असे निदर्शनास आणून दिले होते की, अनेक जातीय दंगलींच्या वेळी दोन्ही बाजूंकडून पोलीस यंत्रणेच्या प्रमुखपदी युरोपियनाची नेमणूक करावी अशी मागणी केली जात असे. मॅंटेग्यू चेल्म्सफर्ड अहवालात स्वतंत्र जातीय मतदार संघाविरुद्ध जो युक्तिवाद करण्यात आला होता तो मान्य करून अशा मतदार संघांमुळे समान नागरिकत्वाची भावना वाढीस लागण्याच्या मार्गात निश्चितपणे अडथळा निर्माण होईल असेही सायमन कमिशनने आपल्या अहवालात म्हटले होते आणि तरीही मुसलमान जातीयवाद्यांनी संयुक्त मतदार संघाच्या विरुद्ध जो युक्तिवाद केला होता त्याचेही कमिशनने समर्थन केले. संमिश्र मतदार संघातून निवडून आलेल्या मुसलमान उमेदवाराला बहुसंख्य असलेल्या बिगर मुसलमान मतदारांचा अनुनय करावा लागेल आणि त्यामुळे मुसलमानांच्या हितसंबंधांच्या बाबतीत तो त्यांचे समाधानकारक प्रतिनिधित्व करू शकणार नाही या मुसलमान जातीयवाद्यांच्या युक्तिवादात 'फार मोठे तथ्य' आहे असे कमिशनला वाटले. देशातील एकूण मतदार संघांपैकी जवळ जवळ ३३ टक्के मतदार संघांत मुसलमान मतदारांचे प्राबल्य आहे. आणि ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य आहेत तेथेही अनेक मतदार संघांत मुसलमानांचेच बहुमत आहे असे नेहरू रिपोर्टात दाखवून देण्यात आले होते. परंतु त्याकडे सायमन कमिशनने साफ कानाडोळा केला. मुसलमान आणि इतर अल्पसंख्यांक यांचा विश्वास संपादन करता न आल्याबद्दल कमिशनने हिंदूंनाच दोषी धरले. अल्पसंख्य जमातीच्या लोकांना आपले हितसंबंध आणि हक्क यांची उपेक्षा केली जाईल अशी जी भीती वाटते तिला सबळ कारणे आहेत असे मत व्यक्त करून समान भाषा

वंश, धर्म, आर्थिक हितसंबंध आणि भौगोलिक संलग्नता यांच्या आधारावर प्रांतांची पुनर्रचना करण्याची कमिशनने शिफारस केली. याचा अर्थ सायमन कमिशनला प्रांतांची धार्मिक दृष्टीने फेररचना अभिप्रेत होती असाच होतो. काहीतरी शुल्लक कारणे देऊन प्रौढ मताधिकाराची मागणी कमिशनने नाकारली व त्याऐवजी मताधिकाराची व्याप्ती थोडी वाढविण्याची शिफारस केली. परंतु त्यामुळे एकूण लोकसंख्येपैकी अवघ्या दहा टक्के लोकांना किंवा वयात आलेल्या माणसांपैकी फक्त वीस टक्के लोकांना मतदानाचा अधिकार मिळू शकला असता. ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य असतील तेथे त्यांचे विशेषाधिकार राहू देण्यास कमिशनची तयारी होती परंतु त्यांची बहुसंख्या असलेल्या पंजाब आणि बंगाल या प्रांतांच्या कायदेमंडळांत त्यांचे बहुमत राहील अशी कायदेशीर तरतूद करण्यास मात्र कमिशनचा विरोध होता.

सायमन कमिशनच्या या अहवालाचा अपेक्षेप्रमाणे बहुतेक सर्वच राजकीय गटांनी धिक्कार केला. या अहवालासंबंधी भारत सरकारने आपला खलिता १३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केला. कमिशनने केलेल्या बहुतेक शिफारसींबद्दल एकवाक्यता दर्शवून आणि जातीयवादी मुसलमानांनी घेतलेल्या काही आक्षेपांना पाठिंबा दर्शवून भारत सरकारने त्यांना आणखी चढवून ठेवले. उदाहरणार्थ महिलांना मताधिकार देण्यास भारत सरकारच्या खलित्यात विरोध दर्शविण्यात आला होता आणि त्यांचे कारण असे देण्यात आले होते की, महिलांना मताधिकार दिला तर हिंदू समाजातील खालच्या जातीतील स्त्रिया मतदान करू लागतील व त्यामुळे पुरुषाला एक व स्त्रीला एक याप्रमाणे एका हिंदू कुटुंबाला दोन मताचा अधिकार प्राप्त होईल. परंतु मुसलमान समाजात आणि हिंदूंच्या वरिष्ठ जातीत सामाजिक रुढीमुळे स्त्रिया मतदानाला जाऊ शकणार नाहीत म्हणजेच वरिष्ठ हिंदू जाती किंवा मुसलमान यांच्या मानाने कनिष्ठ हिंदू जातींची मते दुप्पट होतील. पंजाब आणि बंगाल प्रांतातील मुसलमानांनी कायदेशीर बहुमताचा आग्रह न धरता एक तर लखनौ करारातील यासंबंधीच्या तरतुदी स्वीकाराव्यात किंवा स्वतंत्र मतदार संघाचा आग्रह सोडून तेथील कायदेमंडळात स्वतःच्या बहुसंख्येच्या जोरावर आपले बहुमत प्रस्थापित करावे असे मत सायमन कमिशनने व्यक्त केले होते. परंतु भारत सरकारला हा दृष्टीकोन मान्य नव्हता. अल्पसंख्य प्रांतात मुसलमानांना प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधीत्व देण्यात आले म्हणून बहुसंख्य प्रांतात त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व नाकारणे अन्यायाचे होईल असे मत भारत सरकारने त्या खलित्यात व्यक्त केले होते. प्रांतांच्या मंत्रिमंडळात जातीय तत्वावर मुसलमानांना विधिवत प्रतिनिधित्व देणे शक्य होणार नाही याबाबत मात्र कमिशन आणि भारत सरकार यांचे एकमत होते. कायदेमंडळातील मुसलमान सभासदांनी दोन तृतियांश बहुमताने स्वतंत्र मतदार संघ नसावेत असे ठरविले तरच संयुक्त मतदार संघाची पद्धत सुरू करावी हा कमिशन आणि भारत सरकार यांच्यातील मतैक्याचा आणखी एक मुद्दा होता.

सायमन कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात त्या अहवालावरील चर्चेला प्रमुख स्थान मिळणे क्रमप्राप्तच होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात इकबाल यांनी भाषिक, वांशिक आणि धार्मिक तत्त्वावर प्रांताची फेररचना करण्याच्या कमिशनच्या सूचनेला आपला संपूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले. परंतु सिंध, बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत आणि पंजाब प्रांतातील बहुसंख्य मुस्लीम वस्तीचा भाग मिळून एक प्रांत बनवला तरच वायव्य भागातील मुसलमानांचे भवितव्य निश्चित बनेल असे मत व्यक्त करून त्यासाठी पंजाबची फाळणी करण्यात यावी असे सुचविले. मध्यवर्ती कायदेमंडळ रद्द करून त्याऐवजी संघराज्याच्या घटकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे मिळून नवे कायदेमंडळ प्रस्थापित करण्यात यावे या कमिशनच्या शिफारसींचे त्यांनी स्वागत केले. हिंदूंचे निर्विवाद बहुमत असणाऱ्या लोकनियुक्त कायदेमंडळाचे नियंत्रण असलेली सामर्थ्यशाली केंद्रीय सत्ता निर्माण करण्याची शिफारस केल्याबद्दल त्यांनी नेहरु रिपोर्टावर कडाडून हल्ला चढवला. हिंदी संस्थानिकांचा संघराज्यात समावेश करण्यासही इकबाल यांचा तीव्र विरोध होता. कारण बहुसंख्य संस्थानिक हिंदू असल्यामुळे हिंदूंच्या बहूमतात त्यामुळे भर पडेल असा त्यावर त्यांचा आक्षेप होता. त्याऐवजी हिंदू संस्थानिकांचे एक आणि मुसलमान संस्थानिकांचे एक असे दोन स्वतंत्र महासंघ स्थापन करावेत अशी त्यांची सूचना होती.

इकबाल यांच्या भाषणाला दुसऱ्या एका दृष्टीनेही फार महत्व होते. वायव्येकडील मुसलमानांसाठी सिंध, बलचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत आणि मुस्लीम पंजाब मिळून एक प्रांत करण्याची त्यांची जी सूचना होती. त्यामागे इस्लाम धर्माचे तात्विक अधिष्ठान असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. धर्म ही व्यक्तीच्या जीवनातील केवळ एक खाजगी बाब राहिली पाहिजे ही धर्मनिरपेक्षतावाद्यांची भूमिका त्यांना अजिबात मान्य नव्हती. इस्लाम धर्मात राज्य संस्था आणि धर्म यांची फारकत होऊच शकत नाही असे त्यांचे म्हणणे होते. इस्लाम ही केवळ नैतिक विचारसरणी नसून ते एक राज्यतंत्र आहे. कारण शरीयतसारख्या परिपूर्ण न्यायव्यवस्थेवर आधारलेली समाजव्यवस्था इस्लामला अभिप्रेत आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. ख्रिस्ती धर्माप्रमाणे इस्लाम धर्माची तत्त्वप्रणाली केवळ पारलौकिक नसल्यामुळे ख्रिस्ती धर्मात चर्चला जे स्थान प्राप्त झाले तसे इस्लाम धर्मात होऊ शकणार नाही आणि त्यामुळे ल्यूथरसारखा धर्म सुधारकही इस्लाम धर्मात निघणार नाही. चर्चमुळे जगातील सर्व ख्रिश्चनांचे ऐक्य साधले गेले होते. ल्यूथरने चर्चवर हल्ला चढविल्यामुळे ख्रिश्चनांचे ऐक्यच भंग पावले. त्यामुळे युरोपात ख्रिस्ती धर्म मानणारांची निरनिराळी छोटी छोटी राष्ट्रे उदयास आली आणि त्यांच्यात परस्परविरोधी असे राष्ट्रीय हितसंबंध निर्माण झाले. अशातऱ्हेने इकबालने मुस्लिम राष्ट्रवादाचा धार्मिक आधार स्पष्ट केला व त्याचबरोबर, अंती इस्लामी जगताचे ऐक्य घडवून आणण्याची स्वप्ने रंगविली.

मुसलमानांना सायमन कमिशनने नोकऱ्यांत पुरेशा प्रतिनिधित्वाची सोय केली नाही असा अनेक मुसलमान नेत्यांचा आक्षेप होता. मुसलमानांचे नोकऱ्यांतील प्रमाण वाढवून मिळावे अशी मागणी जीनांसकट सर्व जातीयवादी मुसलमान पुढाऱ्यांनी केलेली होती. नोकऱ्यांत मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही हा आरोप सरकारने आकडेवारीनिशी धुडकावून लावला होता. सरकारी नोकऱ्यात भरती करताना प्रसंगी कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम घडून येणार असला तरी त्याकडे दुर्लक्ष करूनही मुसलमानांना झुकते माप देण्याचे धोरण मिंटोने अंगिकारिले होते. एक बंगाल सोडून निरनिराळ्या प्रांतिक सरकारात नोकऱ्यांच्या बाबतीत त्यांना कितीतरी जास्त प्रतिनिधित्व १९२० च्याही आधीपासून मिळालेले होते. १९२१ साली संयुक्त प्रांतातील लोकसंख्येत मुसलमानांचे प्रमाण १४ टक्के होते. परंतु नोकऱ्यांतील त्यांचे प्रमाण मात्र ४७ टक्के होते. संयुक्त प्रांत सरकारने सायमन कमिशनला सादर केलेल्या एका टिपणात असे दाखवून देण्यात आले होते की, स्पर्धात्मक परीक्षांपैकी ३३ टक्के जागा सरकारने मुसलमानांसाठी राखून ठेवलेल्या होत्या. अनेक खात्यांतून तर हे प्रमाण ४० टक्के होते. पोलिस दलातील साठ टक्के कनिष्ठ जागांवर मुसलमान होते आणि तरीही रिकाम्या झालेल्या जागा भरताना त्यांच्यासाठी आणखी ५० टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या होत्या. बढतीच्या बाबतीतही हिंदू व मुसलमान यांचे प्रमाण ५ : ३ असे होते. सायमन कमिशनपुढे साक्षी देणाऱ्यांपैकी सरकारी नोकरांसकट अनेकांनी महसूल आणि पोलीस खात्यात मुसलमानांचे प्राबल्य असल्याचे नमूद केले होते.

जमनादास द्वारकादास यानी १० मार्च १९२३ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळात सरकारी नोकऱ्यांत सर्वत्र भारतीयांच्या नेमणुका कराव्यात अशा आशयाचा जो ठराव आणला होता त्याला अशा नेमणुका करताना जातवार प्रतिनिधित्व अमलात आणावे अशी उपसूचना वायव्य सरहद्द प्रांतातील सरकारनियुक्त सभासद खान बहाद्दूर अबदुल रहीमखान यानी मांडली. ठरावावरील चर्चेच्यावेळी जातवार प्रतिनिधित्वाचे तत्व मान्य होणार नसेल तर आपल्याला नोकऱ्यांचे भारतीयीकरण मागण्याची जरूरच राहात नाही अशी भूमिका मौलवी अबूल कासीम यांनी मांडली. ठरावाला उत्तर देताना होम मेंबर सर माल्कम हेले यानी नोकऱ्यांच्या बाबतीत जातवार प्रतिनिधित्वाचे तत्व प्रत्येक जातीला लागू करणे कसे अशक्यप्राय आहे ते दाखवून दिले. त्याचप्रमाणे काही विभागापुरत्या मर्यादित वसती असलेल्या जातींना जातीच्या आधारावर अखिल भारतीय स्वरूपाच्या नोकऱ्यांत सामावून घेता येणार नाही असेही त्यांनी दृष्टोत्पत्तीस आणून दिले. शेवटी जागा भरताना कोणत्याही एका जमातीचे वर्चस्व राहाणार नाही याची सरकारने काळजी घ्यावी ही सर्वाधिकारी यांची उपसूचना प्रचंड बहुमताने पास झाली.

व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य या नात्याने सर महंमद शफी यांनी

सरकारी नोकऱ्यांतील रिकाम्या जागा भरताना ३३ टक्के जागा 'अल्पसंख्यांकांसाठी' राखून ठेवण्यास सरकारला राजी केले. स्वत: लॉर्ड रीडींग यांनीच १९२५ च्या अखेरीस सरकारचे हे नवे धोरण जाहीर केले. त्यानंतर ३३ टक्के रिकाम्या जागा मुसलमानांसाठी राखून ठेवण्याचे सरकारने मान्य केले असले तरी प्रत्यक्षात मात्र त्यांच्या बाबतीत भेदाभेद केला जातो अशी तक्रार मुसलमान सभासदांकडून वारंवार केली जात असे. ३३ टक्के जागा या केवळ मुसलमानांसाठीच राखीव नसून सर्व अल्पसंख्य गटांना मिळून आहेत असा खुलासा करून या तक्रारीत अर्थ नसल्याचे सरकारने कितीही जरी सांगितले तरी ते सभासद. पुन्हा पुन्हा पक्षपाताचे तुणतुणे वाजवीत राहात. सरकार शासकीय यंत्रणेत मुसलमानांना प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबीत असूनसुद्धा नोकऱ्यात आपल्याला पुरेसे प्रतिनिधित्व दिले जात नाही आणि भेदाभेद केला जातो अशी ओरड मुसलमान राजकारणी लोकांकडून जाणूनबूजून केली जात होती. पक्षपाताचा आरोप निराधार असल्याचे दाखवून दिले तर हे सभासद विषयांतर करून बढतीचा मुद्दा उपस्थित करीत आणि प्रत्येक खात्यात बढतीच्या बाबतीत अल्पसंख्यांकाचे प्रमाण ठरवून द्यावे असा आग्रह धरीत. राखीव प्रतिनिधित्वाचे तत्त्व हे नोकर भरतीपुरते मर्यादित असून बढतीच्या बाबतीत ते लागू नाही. बढती ही उमेदवाराची पात्रता पाहून केली जाते असा खुलासा शासनाकडून करण्यात आला तर बढतीसाठी खात्यातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षेच्या वेळीच पक्षपात केला जातो अशी तक्रार पुढे येई.

मुसलमान उमेदवार वरिष्ठ पदासाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षात उत्तीर्ण होत नसत याचे कारण अलिगडची शिक्षण पद्धती आणि सर सैयद यांच्या अनुयायांनी इतरत्र केलेला तिचा फैलाव हे होते हे उघड आहे. अलिगडच्या विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांपासून नेहमी अलग ठेवले जाई. इतरांबरोबर मिसळण्याची त्यांना संधीच मिळू दिली जात नसे. त्यामुळे मुसलमान व बिगर मुसलमान विद्यार्थ्यात कधी स्पर्धाच होत नसे व मुसलमान विद्यार्थ्यांना त्यांच्यातील गुणदोषांची यथार्थ कल्पना येत नसे. इतर गोष्टीं-पेक्षा शरीरसंपदेला प्राधान्य देण्यात येत असल्यामुळे मुसलमान विद्यार्थी बुद्धिमत्तेत कमी पडत. केवळ मुसलमान म्हणून त्यांना नोकऱ्यांत प्राधान्य देण्याच्या सरकारी धोरणामुळे मुसलमान समाजाची अपरिमित हानी झाली.

या सर्व प्रकारात अत्यंत दुःखाचा भाग कोणता असेल तर तो म्हणजे हिंदू अधिकारी मुसलमानांविरुद्ध पक्षपात करतात असा सभागृहात आरोप करून त्या अधिकाऱ्यांचा नावनिशीवार उल्लेख जाई. अशा तऱ्हेचे आरोप करणे १९२१ पासूनच सुरू झाले होते. पुढे त्यात सारखी वाढ होत गेली. अशा तऱ्हेचे खोटे आरोप करणारे सभासद काही वेळा स्वत:चेच हसे करून घेत. मौलवी महंमद याकूब यांनी दिल्ली-च्या एका मुसलमानाची आकसाने बदली करण्यात आली असा आक्षेप घेणारा प्रश्न विचारला असता त्यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, संबंधित कारकुनाची

बदली त्याने स्वतःच तशी विनंती केल्यावरून त्याच्या गावी करण्यात आली होती. अन्वर-उल-अझीम यांनी डाक्क्याच्या हिंदू डेप्युटी पोस्ट मास्टर जनरलवर वशिले-बाजीचा आरोप केला होता परंतु सरकारने त्याला उत्तर देताना, सदर अधिकाऱ्याने त्यापूर्वीच्या तीन वर्षात एकही नेमणूक केली नसल्याचे दाखवून दिले.

१९२९ पासून हिंदू अधिकाऱ्यांविरुद्ध घेण्यात येणाऱ्या आक्षेपांचे प्रमाण आणखीच वाढले. मौलवी महंमद याकूब यांनी असा आरोप केला की, हिंदू अधिकाऱ्यांनी आणि चौकीदारांनी मिळून पुरातन वस्तू संरक्षण खात्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या मशिदीचे पावित्र्य नष्ट करून टाकले आहे. सरकारतर्फे या आरोपाला उत्तर देतांना असे सांगितले गेले की, यासंबंधात आलेल्या तक्रारींची कसून चौकशी करता असे निष्पन्न झाले आहे की, 'कायद्याने संरक्षित ठरविण्यात आलेल्या वास्तूचे संरक्षण करण्याचे आपले कर्तव्य बजावताना अतिक्रमण करणारांना अधिकाऱ्यांनी हरकत घेतली म्हणून हे सर्व कुभांड रचण्यात आले आहे. अशा प्रकारचे सर्व आरोप सर्वस्वी फोल असल्याचे सरकारच्या तपशीलवार उत्तरावरून दिसत असतानाही मुसलमान सभासदांनी ते करीत राहाण्याचे थांबविले नाही.

मुसलमानांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याच्या उत्साहात अनेकदा मुसलमान सभा-सदांनी ताळ सोडलेला दिसतो. १९२४ च्या फेब्रुवारीत कबीरुद्दीन अहमद यांनी कायदेमंडळात मांडलेल्या एका ठरावावर बोलताना खान साहेब गुलाम बारी यांनी असा दावा केला की, महायुद्धात लढलेल्या भारतीय सैन्य दलापैकी ६० टक्के सैनिक मुसल-मान समाजापैकी होते. तेव्हा मुसलमानांना सैन्यात ६० टक्के जागा मिळाल्या पाहिजेत. परंतु शीखांच्या बाबतीत मात्र त्यांनी असे सांगितले की, तेही लढाईवर गेले होते हे खरे असले तरी सैनिकापेक्षा ते शेतकरी म्हणून अधिक चांगले असल्यामुळे त्यांच्यावर देशाच्या संरक्षणाचा भार लादण्याचे कारण नाही. त्यांच्या मते भारतातील सात कोटी मुसलमान हेच काय ते लष्करी पेशाचे असल्यामुळे लष्करी हालचाली करण्याची वेळ येईल, त्यावेळी त्यांच्याकडून जरूर तेवढे सैन्य उभे करता येईल.

नोकऱ्यांतील जागा भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत त्यावेळी एक तर एकाही मुसलमानाचा अर्ज नसे किंवा असलाच तर अर्जदार जरूर ती अर्हताप्राप्त नसे असे सरकारला आढळून येई. त्यामुळे मुसलमानांच्या निरनिराळ्या संघटनांनी योग्य उमेदवारांचा शोध घेऊन त्यांच्याकडून अर्ज मागवावेत असे प्रयत्न करून पाहण्यात आले. तरीही काही वेळा पात्रता असलेले उमेदवार मिळत नसत. मौलवी महंमद याकूब यांनी एकदा असा प्रश्न विचारला की, डिव्हिजनल वायरलेस कचेरीत दोन जागा भरावयाच्या असताना एकही मुसलमान का घेण्यात आला नाही. त्यावर सरकारतर्फे असे सांगण्यात आले की, कोणीही मुसलमान उमेदवाराकडून अर्जच आला नव्हता. त्यावर याकूब संतापाने म्हणाले की, ७५ अर्जदारात एकही मुसलमान नव्हता यावर कोण विश्वास ठेवील? २१ मार्च १९२७ रोजी त्यांनी अशी तक्रार केली होती की,

पाटणा हायकोर्टात एकाही मुसलमान न्यायाधीशाची नेमणूक करण्यात आलेली नाही. त्याला सरकारतर्फे असे उत्तर देण्यात आले की, दोन मुसलमान बॅरिस्टरांची त्या पदांवर नेमणूक झाली होती परंतु आपल्या पदाचा राजीनामा देऊन त्यांनी पुन्हा वकिली सुरू केली. त्यावर याकूब साहेबांची प्रतिक्रिया अशी झाली की, सरकारने तिसऱ्या एकाद्या बॅरिस्टरची नेमणूक करावयास हवी होती.

जवळजवळ पन्नास वर्षे सरकार मुसलमानांच्या शिक्षणाबाबत जी आस्था दाखवीत आले होते त्याचा परिणाम म्हणून विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून शिक्षणासंबंधी त्यांच्यात बरीच सुधारणा दिसून येऊ लागली. १९२७ सालापर्यंत देशातील मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा शिक्षित मुसलमान विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त झालेले होते. परंतु या शिक्षण प्रसारामुळे काही नव्याच समस्या निर्माण झाल्या. सुशिक्षित बेकारांच्या संख्येत एव्हाना भयानक वाढ झालेली होती. १९२६ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळात देशातील सुशिक्षित बेकारांच्या प्रश्नावर विस्तृत चर्चा झाली रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकार जरूर ते उपाय योजील असे आश्वासन मिळाल्यामुळे या प्रश्नासंबंधीची चौकशी करण्यासाठी सरकारने समिती नेमावी अशा आशयाचा सभागृहापुढे आलेला बिनसरकारी ठराव मागे घेण्यात आला.

मुसलमान समाजात औद्योगिक परंपरा त्याचप्रमाणे त्यासाठी लागणारे कसब किंवा मनाचा तसा कलही नसल्यामुळे उच्च मध्यमवर्गीय मुसलमानांना वाढत्या औद्योगिकरणामुळे निर्माण होणाऱ्या नव्या संपत्तीचा लाभ करून घेता आला नाही. मुसलमान अद्यापही सरंजामी स्वरूपाच्या जीवन पद्धतीला चिकटून राहिलेले असल्यामुळे काप गेले पण भोके राहिली अशी काहीशी त्यांची स्थिती झाली होती. नवे नवे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी लागणाऱ्या भुंजीचा त्यांच्यापाशी अभाव होता कारण दैनंदिन जीवनात त्यांना शिल्लक टाकण्याची सवय नव्हती. आधुनिक उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेमुळे मिळणाऱ्या विविध संधींचा त्यांनी कधी फायदा करून घेतला नाही की आर्थिक आव्हानांना ते कधी सामोरेही गेले नाहीत. पश्चिम किनाऱ्यावरील काही शियांचा अपवाद सोडला तर मुसलमानांत क्वचितच एकादा उद्योजक किंवा एकादी व्यापारी पेढी दाखवता येईल. संयुक्त प्रांतातील बँकिंग कमेटीपुढे साक्ष देताना एका मुसलमानाने असे नमूद करून ठेवले आहे की, 'मुसलमानांतील दारिद्र्याचे मूळ शोधावयाचे असेल तर एकाकाळी राज्यकर्ते असलेल्या परंतु आता कर्जबाजारी बनलेल्या त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यात ते सापडू शकेल. आपल्या खानदानी परंपरा जतन करणे हे धार्मिक कर्तव्याइतके ते महत्त्वाचे समजतात त्यामुळे आदरातिथ्य करण्याइतका पैसा हाताशी नसला तर ते कर्ज काढतील परंतु आपल्या खर्चात काटकसर करणार नाहीत. त्यामुळे त्यांच्यापैकी कोणी उद्योगधंदे तर सुरू करू शकले नाहीतच उलट वडलोपार्जित जमीनजुमलाही कर्जबाजारीपणात ते घालवून बसले.' बंगाल बँकिंग एन्क्वायरी कमेटीने (१९२९–३०) आपल्या अहवालात असा निष्कर्ष काढला आहे की, सर्वसाधारणपणे

मुसलमानांना उद्योगधंद्यात किंवा व्यापारात पडण्याचा तिटकारा आहे. मुसलमान कारागीर आणि शेतकरी हे मुख्यत सावकार आणि दलाल यांच्यावर अवलंबून असत. हिंदू सरकारी नोकरीव्यतिरिक्त उपजीवीकेसाठी इतर क्षेत्रात पदार्पण करू शकतात. परंतु सुशिक्षित मुसलमान तरुणांना मात्र सरकारी नोकरी व्यतिरिक्त चरितार्थाचे अन्य साधनच उपलब्ध नसते.

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचा मुसलमान समाजावर अगदी अनपेक्षित असा परिणाम घडून आला. ब्रिटिशांची सत्ता टिकून राहण्यावर आणि जातीयवादी राजकारणाची चलती होण्यावरच आपले भवितव्य अवलंबून आहे अशी त्यांची धारणा होऊन बसली. हातात राजकीय सत्ता असली म्हणजे आपल्या जातीच्या हितासाठी तिचा कसा उपयोग करून घेता येतो ते फझली हुसेन यांनी प्रत्यक्षच दाखवून दिले होते. जमीनदार आणि नव्याने उदयाला येऊ लागलेला मुसलमानांतील इंग्लिश विद्याविभूषित उच्च-वर्णीय यांची एकजूट जमली होती. सर सैयद अहमद यांनी घालून दिलेल्या मुस्लीम शिक्षण पद्धतीमुळे मुसलमान तरुण बिगर मुसलमानांबरोबरच्या स्पर्धेत कमी पडत होते व त्यामुळे त्यांच्यात वैफल्याची भावना निर्माण झाली होती. त्यातून फुटीर-पणाची बीजे रूजली गेली आणि कट्टर राजनिष्ठ अश्रफांनी त्याला प्रयत्नपूर्वक खतपाणी घातले. इंग्रजी शिक्षण घेतलेले हिंदू हेच आपले शत्रू असून जातीयवादी राजकारणी आणि सरकार यांनी मदतीचा हात पुढे केला तरच आपला तरणोपाय आहे असा त्यांनी आपला ग्रह करून घेतला. जातीयवादी वृत्तपत्रातून दंगलींसंबंधी जे पूर्वग्रहदूषित वृत्तांत प्रसिद्ध होत त्यामुळे प्रत्येक जातीय दंगलीच्या वेळी हिंदूच आपली कुरापत काढतात आणि तेच आपले खरे शत्रू आहेत अशी सुशिक्षित मुसल-मानांची दृढ समजूत होऊन बसली. इंग्रजी शिक्षण घेतलेला मुसलमान युवक मग तो उच्चवर्णीय असो वा अगदी गरीब कुटुंबात जन्माला आलेला असो तो फुटीरवादी जातीय राजकारणाचा कट्टर पाठिराखा बनला.

साहजिकच हा वर्ग भारतीय राष्ट्रवादाला पर्याय म्हणून पुढे आलेल्या इस्लामच्या पुनरुज्जीवनवादी तत्त्वप्रणालीकडे आकृष्ट झाला तर त्यात नवल वाटावयास नको. १८७० मधील सर सैयद यांच्यापासून तो पुढे सैयद अमीर अली आणि १९२० नंतरच्या इकबाल यांच्यापर्यंत इस्लामचा अर्थ निरनिराळ्याप्रकारे कसा लावण्यात आला ते देखील पाहण्यासारखे आहे. सुरुवातीला ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मात फारच थोडे अंतर आहे असे दाखवून देऊन मुसलमानांना ख्रिस्ती सत्ताधाऱ्यांशी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत असे. परंतु त्यानंतर इस्लामवर जी भाष्ये करण्यात आली त्यामागे मुसलमानांत आत्मविश्वासाची भावना जागृत करण्याचा हेतू होता. इस्लामच्या या नव्या विवरणामुळे इस्लाम धर्माची तत्त्वप्रणाली ही केवळ ख्रिश्चन तत्त्वप्रणालीपेक्षाच नव्हे तर आधुनिक काळातील कोठल्याही तत्त्वप्रणालीपेक्षा श्रेष्ठ आहे असे प्रतिपादन करणे अमीर अली आणि इकबाल यांना शक्य झाले.

इस्लामवर अधिष्ठित अशा नव्या जगाची उभारणी करण्याचे आवाहन या दोघांनी मुस्लिम जनतेला केले. आणि हे नवे जग सध्याच्या जगापेक्षा तर श्रेष्ठ असेलच पण निरनिराळ्या तत्त्वप्रणालींना अभिप्रेत असलेल्या इतर कोणत्याही जगापेक्षा ते श्रेष्ठ असेल असा त्यांनी दावा केला. इखवान-ए-मुसलमीन ( मुस्लीम बंधुभाव ) या ईजिप्तमध्ये उदयास आलेल्या पुनरुज्जीवनवादी धार्मिक संघटनेमुळेही भारतीय मुसलमानांना अशीच प्रेरणा मिळाली. मौलाना मौदूदी आणि जमीयत-उल-उलेमातील त्यांचे काही सहकारी इखवानने इतके भारावून गेले की, भारततही तशाच तऱ्हेची धार्मिक जागृती घडवून आणण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले.

---

प्रकरण तेरावे

## प्रदीर्घ सामुदायिक लढ्यातील राष्ट्रवादी मुसलमानांचे स्थान

स्वतंत्र भारतासाठी सर्वसंमत अशी घटना बनविण्याचे सर्वपक्षीय परिषदेचे प्रयत्न निष्फळ ठरले. परंतु त्याच्याही आधीपासून काँग्रेसमधील जहाल तरूण वर्गाचा वाटा-घाटी आणि सनदशीर मार्गावरील विश्वास उडू लागला होता. १९२८ च्या सुरूवातीला वल्लभभाई पटेलांनी बार्डोलीच्या सत्याग्रहाचे नेतृत्व केले होते तेव्हापासूनच त्यांना सरदार हे नामाभिधान प्राप्त झाले. जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांनी विद्यार्थी, युवक कामगार आणि किसान यांच्या चळवळीत भाग घेण्यास सुरूवात केली होती. औद्योगिक क्षेत्रात १९२८ साली कम्युनिस्टांनी कामगारांचे अनेक संप घडवून आणून भांडवलदार आणि सरकार यांच्या मनात दहशत निर्माण केली होती. विद्यार्थी आणि युवक चळवळींना तर असे उधाण आले होते की, १९२९ च्या जानेवारी महिन्याच्या सुरूवातीलाच गृहखात्याने सर्व प्रांतिक सरकारांना पाठविलेल्या परिपत्रकात युवक चळवळी धोकादायक बनल्या असून त्यामधून एक प्रचंड शक्ती निर्माण होण्याची शक्यता आहे अशी कबुली दिली होती. त्याविरूद्ध तावडतोब उपाय योजण्याच्या बाबतीत चालढकल झाली तर त्यामुळे धोकादायक परिस्थिती निर्माण होईल असा इशाराही त्या परिपत्रकामधून देण्यात आला होता. मुंबई आणि बंगाल प्रांताच्या सरकारांना जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांच्यावर राजद्रोही भाषणे केल्याबद्दल खटले भरण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

१९२५ साली दहशतवादी क्रांतिकारकांनी हिंदुस्तान रिपब्लीकन असोसिएशन या नावाची एक नवीन संघटना अलाहाबाद येथे सुरू केली होती. थोडयाच वर्षात पंजाब आणि बंगाल सारख्या दूरदूरच्या प्रांतात या संघटनेच्या शाखा निघाल्या. लजपतराय यांच्या मृत्यूस कारणीभूत होता असा प्रवाह असलेल्या गोऱ्या पोलीस अधिकाऱ्याचा १९२८ च्या डिसेंबरात खून झाला. त्यामुळे भयग्रस्त झालेल्या भारत सरकारने कम्युनिस्टांची धरपकड करून त्यांना कटाच्या खटल्यात गोवण्याचे ठरविले व त्यासाठी भारत मंत्र्यांकडे परवानगी मागितली. त्यातच परदेशी मालावरील बहिष्काराची मोहीम संघटीत करण्यासाठी ता. १८ फेब्रुवारी १९२९ रोजी काँग्रेस वर्किंग कमेटीने चार सदस्यांची एक समिती नेमली. त्यामुळे तर सरकार आणखीनच अस्वस्थ झाले. कलकत्त्यात परदेशी कापडाची होळी पेटवण्यात आली असता तेथे हजर असलेल्या गांधीजींना अटक करण्यात आली. ३१ मार्च रोजी एक पत्रक काढून

सुभाषचंद्र बोस यांनी कामगार चळवळीला आपला संपूर्ण पाठिंबा असल्याचे जाहीर केले. आणि काँग्रेस व कामगार संघटना यात अधिक सुसूत्रता निर्माण करण्यात यावी असे आवाहन केले. मार्चनंतर भरलेल्या अनेक प्रांताच्या राजकीय परिषदांतून राष्ट्रव्यापी प्रमाणावर शांततामय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. पंजाब कायदेमंडळाचे मुसलमान सभासद डॉ. आलम यांनी पंजाब प्रांताच्या राजकीय परिषदेत अशाच आशयाचा ठराव मांडला. काँग्रेस पुढाऱ्यांनी स्थापन केलेल्या युवक आणि स्वंयसेवक संघटनांवर बारीक नजर ठेवण्याच्या आणि बहिष्काराच्या चळवळीविरुद्ध कडक उपाय योजण्याच्या सूचना गृहखात्याकडून स्थानिक सरकारांना दिल्या जात होत्या. पुढे मीरत कटाचा खटला म्हणून गाजलेल्या प्रकरणात गोवण्यात आलेल्या ३१ कम्युनिष्ट कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. एप्रिल महिन्यात मध्यवर्ती कायदेमंडळात बाँब टाकण्यात आला आणि पिस्तुलातून गोळ्या झाडण्यात आल्या. यातूनच पुढे भगतसिंग वगैरेंवर लाहोर कटाचा खटला भरण्यात आला. मीरत आणि लाहोर कटाच्या हकीगतींनी युवकांची मने भारल्यासारखे झाली आणि काँग्रेस सेवादलात युवक झपाट्याने मोठ्या संख्येने भरती होऊ लागले. १९२९ च्या जून महिन्यात गृहखात्याने काढलेल्या परिपत्रकात काँग्रेसच्या स्वयंसेवकांचे वर्णन 'स्टॉर्म ट्रुपर्स' म्हणून करण्यात आले होते आणि पुढील काही महिन्यात त्यांच्याकडून अनेक हिंसक कृत्य घडतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. राजद्रोही भडक भाषणे करणाऱ्यांविरूद्ध कडक कायदेशीर कार्यवाही करण्यात येवून ते गजाआड डांबले जातील अशी दक्षता घेण्याचे आदेश प्रांतिक सरकारांना देण्यात आले होते. त्याचबरोबर मुसलमान आणि शीख परत काँग्रेसच्या बाजूला वळणार नाहीत अशी काळजी स्थानिक संघर्षाचे प्रश्न सोडविताना घेण्यात यावी असा इशाराही त्यांना देऊन ठेवण्यात आला होता त्याप्रमाणे प्रांतिक सरकारांनी मोठ्या प्रमाणावर धरपकड करण्याचे सत्र सुरू केले त्याबरोबर जुलैपासून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीतर्फे खास पत्रिका काढून धरपकडीची आणि इतर दडपशाहींच्या कृत्यांची माहीती देण्यात येऊ लागली.

सरकार इतके घाबरून गेले होते की, २३ मे १९२९ रोजी व्हाईसरॉयने मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका बेमुदत पुढे ढकलण्यात आल्याचे जाहीर करून टाकले सायमन कमिशनचा अहवाल लवकरच प्रसिद्ध होणार असल्याने आताच सार्वत्रिक निवडणुका घेणे योग्य ठरणार नाही असे कारण पुढे करण्यात आले होते. निवडणुका घेतल्यानंतर राष्ट्रवाद्यांना शह देण्यासाठी म्हणून इतके दिवस लाडावून ठेवलेल्या सरकारधार्जिण्या मंडळींना तोंड दाखवायलाही जागा राहणार नाही या भीतीनेच सरकारने हा निर्णय घेतला होता, असे जे कोटमन यांनी इयर्स ऑफ डेस्टिनी-इंडिया ( १९२६ ते १९३२ ) नावाच्या आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. काँग्रेस वर्किंग कमेटीने निवडणुका पुढे ढकलण्याच्या सरकारी निर्णयावर जोरदार टीका केली. आणि या मुदतवाढीमागे सायमन कमिशनवर बहिष्कार घालणाऱ्यांबरोबर मतदारांची एकजूट

घडून येऊ येन म्हणून शासनाने योजलेले हे कुटील कारस्थान आहे असा आरोप केला.

सल्लामसलतीकरता इंग्लंडला जाऊन आल्यावर लॉर्ड आयर्विन यांनी ३१ ऑक्टोबरला असे जाहीर केले की, १९१७ च्या जाहीरनाम्यानुसार अंतिमत: भारताला वासाहतिक स्वराज्याचा दर्जा देण्यास इंग्लड वचनबद्ध आहे असे सरकारच्या वतीने जाहीर करण्याचे अधिकार मला देण्यात आलेले आहेत. त्यांनी पुढे असे सांगितले की, घटनात्मक प्रश्नावर सर्वांचे जास्तीत जास्त एकमत घडवून आणण्यासाठी ब्रिटीश इंडिया आणि देशी संस्थाने यांच्या प्रतिनिधींची लवकरात लवकर एक परिषद ( गोलमेज परिषद ) बोलाविण्याचा ब्रिटिश सरकार विचार करीत आहे त्यानंतर लवकरच काढलेल्या एका पत्रकात कॉंग्रेसने अशी मागणी केली की, सरकारने सर्वसाधारपणे तडजोडीचे धोरण अवलंबावे, राजकीय कैद्यांची मुक्तता करण्यात यावी आणि नियोजित परिषदेत कॉंग्रेसला सर्वात जास्त प्रतिनिधीत्व मिळावे. देशव्यापी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याची धमकी दिली जात आहे म्हणून मजूर पक्षाच्या, नेतृत्वाखालील संमिश्र सरकारने व्हाइसरॉयला अशा तऱ्हेची घोषणा करण्याची सूचना करावी याबद्दल लंडनमध्ये हुजूर पुढाऱ्यांनी या सरकारवर टीकेची झोड उठविली. सायमन कमिशनचा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वीच अशातऱ्हेची घोषणा करण्यात यावी आणि नजीकच्या काळात भारताला वासाहतिक स्वराज्याचा दर्जा मिळणार आहे असा समज लोकांच्या मनात पसरू दिल्याबद्दल लॉइड जॉर्ज यांनीही सरकारवर टीका केली. यासंबंधी झालेल्या चर्चेला उत्तर देताना भारत मंत्र्यांनी असा खुलासा केला की, भारताला तावडतोब वसाहतीचे स्वराज्य देण्याचा सरकारचा विचार नाही कारण तेथील जनता निरक्षर असून १९१९ पर्यंत लोकशाही स्वरूपाचा सरकारची त्यांना तोंडओळखही नव्हती त्यातच हिंदुस्तानातील नाना वंश, नाना भाषा वेगवेगळे राष्ट्रीयत्त्व हेही हिंदुस्तानला तावडतोबीने वसाहतीचे स्वराज्य देता येणार नाही. डिसेंबरच्या अखेरीला व्हाइसरॉयनी गांधी, मोतीलाल नेहरू, सप्रू, वल्लभभाई पटेल आणि जीना यांची भेट घेतली. वासाहतिक स्वराज्याची घटना तयार करण्याचे अधिकार असल्याचे स्पष्टपणे घोषित झाल्याशिवाय कॉंग्रेसला गोलमेज परिषदेला हजर राहता येणे कठीण आहे असे गांधीजींनी सांगून टाकले. त्यानंतर थोड्याच दिवसात लाहोर येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात नेहरू रिपोर्टला तिलांजली देण्यात आली आणि संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाची घोषणा करण्यात आली त्याचप्रमाणे सर्व देशभर तारीख २६ जानेवारी १९३० हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्यात येईल आणि त्यानंतर सविनय कायदेभंगाची चळवळ हाती घेण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. एका स्वतंत्र ठरावाद्वारे हिंदुस्तानच्या भावी राज्यघटनेत अल्पसंख्यांकांचे संपूर्ण समाधान करण्यात येईल आणि स्वतंत्र भारतात जातीय समस्येवर राष्ट्रीय पातळीवरून तोडगा निघू शकेल असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. त्यापूर्वी नोव्हेंबर ३० रोजी ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून

भाषण करताना नेहरूंनी वाटाघाटी करून सरकारबरोबर तडजोड घडवून आणण्याची शक्यता फेटाळून लावली होती. डिसेंबर महिन्यात युवकांच्या अनेक परिषदा संघटीत करण्यात आल्या होत्या या परिषदांतून हजारो विद्यार्थी आणि युवक आगामी सामुदायिक लढ्याला पाठिंबा जाहीर करीत.

त्या वर्षातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे एक संघटीत गट म्हणून राष्ट्रीय मुसलमानांनी सुरू केलेली हालचाल. १९२९ च्या जुलै महिन्यात बोलावलेल्या एका बैठकीत युसुफ मेहेर अली आणि एस. ए. ब्रेलवी यांनी मुंबईत कॉंग्रेस मुस्लिम पार्टीची स्थापना केली. उद्घाटन समारंभात भाषण करताना महंमद अली (सुप्रसिद्ध अली बंधूपैकी महंमद अली ते हे नव्हते) यांनी आगा खान आणि सर महमंद शफी यांचा आपणच सर्व मुसलमान समाजाचे प्रतिनिधीत्व करतो हा दावा फेटाळून लावला. ते आपल्या भाषणात म्हणाले :—

प्रत्येक नोकरशाही सरकारला आपले होयबा, मानमरातबासाठी लाचारी पत्करणारे आणि खुशामतखोर लागतच असतात. स्वार्थासाठी ते काय वाटेल ते करायला तयार असतात. अंतर्गत भांडणाचा बुजबुजाट असलेला आणि अडाणी आणि स्वार्थी मुल्लांच्या कचाट्यात सापडलेला आपला समाज आर्थिक दिवाळखोरीच्या काठावर उभा असून, राष्ट्रीय मुसलमानांनी कंबर कसून त्याला अनिवार्य अधःपातापासून वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले नाहीत तर त्यांचे भवितव्य मोठे अंधकारमय आहे.

त्याच महिन्यात अलाहाबाद येथे आझाद यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी मुसलमानांची पहिली अखिल भारतीय परिषद भरली होती. मुस्लिम पक्षांचे पुढारी देशाच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन स्वतःचा स्वार्थ साधू पाहात आहेत असा आरोप परिषदेपुढे भाषण करणाऱ्या वक्त्यांनी केला. मुसलमानता राष्ट्रवाद आणि जातीयता विरोधी भावना रुजविण्यासाठी आणि राष्ट्रीय लढ्यात सर्वतोपरी सहभागी होण्याची त्यांना प्रेरणा होईल असे प्रयत्न केले म्हणजे बहुसंख्यांकांनाही अल्पसंख्यांकाचे हक्क अबाधित राखणे हा देशभक्तीचाच एक भाग आहे असा विश्वास वाटू लागेल अशी अपेक्षा परिषदेत व्यक्त करण्यात आली. २ जानेवारी १९३० रोजी डॉ. अन्सारी आणि मौलाना आझाद यांनी एक पत्रक प्रसिद्ध करून कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य संग्रामात मुसलमानांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले. राष्ट्रवादी मुसलमानांच्या लाहोर येथे भरलेल्या अशाच एका परिषदेच्या अध्यक्षपदी अफझल हक हे होते. तेथेही अशाच तऱ्हेचा ठराव करण्यात आला. बंगाल प्रांतिक मुस्लिम राजकीय परिषद चितगाव येथे तारीख २१ एप्रिल १९३० रोजी भरली होती. त्या परिषदेतही निरनिराळ्या वक्त्यांनी आपल्या भाषणातून मोठ्या संख्येने कॉंग्रेसमध्ये सामील होण्याचे आणि स्वातंत्र्य संपादनासाठी इतर समाजांच्या बरोबरीने त्याग करण्याचे मुसलमानांना आवाहन केले. परिषदेने संमत केलेल्या ठरावात असे म्हटले

आहे की, स्वतंत्र मुस्लिम संघटनांनी आपले कार्य सामाजिक सुधारणा आणि शैक्षणिक व आर्थिक विकास येवढ्यापुरतेच मर्यादित ठेवावे आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी काँग्रेसशी सहकार्य करावे. सरकार आणि सरकारधार्जिणे जातीयवादी पुढारी काँग्रेसला मुसलमानांकडून मिळू लागलेल्या पाठिंब्याबद्दल उपेक्षा दाखवीत असले तरी वायव्य सरहद्द प्रांतात काँग्रेसला जो प्रचंड प्रतिसाद मिळाला तो पाहून मात्र ते अक्षरश: चकीत होऊन गेले.

पठाणांच्या या प्रांतात अनपेक्षितपणे काँग्रेसला भरघोस पाठिंबा मिळाला. वायव्य सरहद्द प्रांताला सुधारणा लागू करण्याच्या बाबतीत जातीयवादी मुसलमान पुढारी कधी नरम तर कधी गरम अशी दुहेरी खेळी खेळत होते. गेली कित्येक वर्षे सुधारणांना विरोध करण्याबद्दल ते हिंदू पुढाऱ्यांवर दोषारोप करणारी लंबीचवडी भाषणे कायदेमंडळातून करीत आले होते. परंतु सुधारणांचा प्रश्न काँग्रेसने हाती घेतल्यामुळे हे सरकारधार्जिणे पुढारी चांगलेच तोंडघशी पडले. त्या भागात काँग्रेस संघटना झपाट्याने वाढीस लागली आणि ८ मार्च १९३० रोजी वायव्य सरहद्द प्रांतिक काँग्रेस कमेटीने सविनय कायदेभंगाच्या चळवळीस संपूर्ण पाठिंबा व्यक्त करणारा ठराव पास केला. खान अबदूल गफार खान यांनी खुदाई खिदमतगार ( ईश्वराचे सेवक ) या नावाची स्वयंसेवक संघटना स्थापन केली होती. लाल डगला हा त्यांचा गणवेष होता. लवकरच खान अबदुल गफार खान हे त्या प्रांतातील अग्रगण्य काँग्रेस नेते म्हणून ओळखले जाऊ लागले. तारीख २३ एप्रिल रोजी त्यांना व त्यांच्या दहा सहकाऱ्यांना सरकारने गिरफतार केल्याबरोबरच पेशावरात प्रक्षोभाची लाट उसळली. सरकारी आकड्यानुसार ३० लोक ठार व ३३ लोक जखमी झाले असे प्रसिद्ध झाले असले तरी पेशावरच्या गोळीबारात १२५ जणांना आपल्या प्राणास मुकावे लागले असे काँग्रेसने उजेडात आणले. गढवाल रायफल्सच्या दोन तुकड्यांनी गोळीबाराचा हुकूम मानण्याचे नाकारून आपली हत्यारे खाली ठेवली. सरकारने पेशावर सोडून दिले. बंडानंतर इतकी गंभीर परिस्थिती प्रथमच निर्माण झाली होती. ११ दिवसांनंतर सैन्य आणि वायूदलाच्या मदतीने सरकारने पेशावर वर पुन्हा ताबा मिळवला. त्यानंतर काही महिने संबंध प्रांत बंड करून उठला होता. व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून नियुक्त करण्यात आलेले फजली हुसेन आणि पंजाबमधील मुसलमान जमीनदारांचे इतर पुढारी यांनी तडजोड घडवून आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न चालविले. जून आणि जुलै महिन्यात फजली हुसेन यांनी त्या प्रांतास भेट दिली. त्यावेळी काही किरकोळ सुधारणा जाहीर करण्यात आल्या. काँग्रेस ही हिंदूंची संघटना असून तिच्यात मुसलमानांना कसलेही स्थान नाही अशी तिची बदनामी करणारी प्रचाराची प्रचंड मोहीमच हाती घेण्यात आली. जीना शौकत अलि आदी केंद्रीय आणि प्रांतिक कायदेमंडळाच्या सभासदांच्या शिष्टमंडळांनी अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन प्रांतातील राजकीय कैद्यांच्या मुक्ततेची मागणी केली. जातीय प्रचाराचा

थोडाफार परिणाम घडून आला तरी पठाणांचा प्रतिकार वाढतच गेला आणि शेवटी ऑगस्ट महिन्यात सरकारला लष्करी कायदा पुकारावा लागला. तब्बल पाच महिने तो चालू होता.

दरम्यान गांधींच्या दांडी मोर्चाने सुरू झालेल्या सविनय प्रतिकाराच्या चळवळीला जोर चढला होता. जुलै महिन्याच्या अखेरीपर्यंत मिठाच्या सत्याग्रहाबद्दल पन्नास हजारांवर सत्याग्रहींना शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या आणि पोलीसांनी केलेल्या गोळीबारात आणि लाठीमारात शंभरावर लोक मारले गेले होते आणि जवळजवळ पाचशे जखमी झाले होते. कायदेमंडळाच्या सभासदत्त्वाचे राजीनामे सादर करण्याचे जे आवाहन काँग्रेसने केले होते त्याला अनुसरून कौन्सिल ऑफ स्टेटच्या ९, मध्यवर्ती कायदेमंडळाच्या २१ आणि प्रांतिक कायदेमंडळाचे १४२ सभासद राजीनामे देऊन चळवळीत सामील झाले होते. त्यात अनेक राष्ट्रवादी मुसलमान सदस्यांचाही समावेश होता. निरनिराळ्या वटहुकुमाखाली जूनपर्यंत ३८६३, जणांना स्थानबद्ध करण्यात आले होते किंवा त्यांच्यावर खटले भरण्यात आले होते. या चळवळीतील मुसलमानांचा सहभाग डोळ्यात भरण्यासारखा होता. सामुदायिक सत्याग्रहात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांत कराचीच्या मुसलमानांचा वाटा फार मोठा होता. गांधींना अटक झाल्यानंतर अब्बास तय्यबजी यांनी त्यांची जागा घेतली. मौलाना हबीबुर रहमान, मौलाना जाफर अली खान आणि डॉ. आलम हे पंजाब मधील लढ्याचे नेते म्हणून ओळखले जावू लागले होते. तारीख ३ जून रोजी काँग्रेसबरोबरची एकजूट दर्शविण्यासाठी निघालेल्या एक मैल लांबीच्या मुसलमानांच्या मिरवणुकीच्य अग्रभागी एस. ए. ब्रेलवी आणि मौलांना अहमद सैद होते. युसुफ मेहर अली आणि डॉ. सिचल यांनी अनेक युवक परिषदांतून भाषणे केली त्याचप्रमाणे सत्याग्रहांसाठी स्वयंसेवकांच्या तुकड्या पाठविल्या. शेकडो मुसलमान कार्यकर्ते आपापल्या भागातील युद्ध मंडळाच्या नेतृत्त्वपदी होते. सोलापूरला ज्या चौघांना फाशीची सजा फर्माविण्यात आली होती त्यात अबदुल कुर्बान रसूल हुसेन याचाही समावेश होता. मीरत कटातील एकूण ३१ आरोपींपैकी ४ मुस्लिम, ३ युरोपीय व १ पारशी होता. राष्ट्रवादी मुसलमानांनी चळवळीत सहभागी होताना आपल्याच सरकारनिष्ठ धर्मबांधवांच्या विरोधाला ज्या धैर्याने आणि निर्धाराने तोंड दिले त्याचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

मुसलमानांतील विविध मते धारण करणाऱ्या सर्वांना नेहरू रिपोर्ट स्वीकारार्ह वाटावा म्हणून त्यात कोणते फेरबदल करावेत यासंबंधी विचारविनिमय करण्यासाठी सरोजनी नायडू यांनी तारीख ११ ऑगस्ट १९२९ रोजी गांधी, जीना आणि अली बंधू यांची मुंबई येथे एक गुप्त बैठक घडवून आणली होती, परंतु ही बैठक निष्फळ ठरली. त्याच दिवशी संध्याकाळी महंमद अलींनी एका मुसलमानांच्या सभेत भाषण करताना नेहरू रिपोर्ट म्हणजे हिंदूंचे मुसलमानांवरील वर्चस्व कायम टिकवून धरण्याचे आणि

त्यांना गुलामगिरीत अडकवून ठेवण्याचे एक कारस्थान आहे असे उद्‌गार काढले. ते पुढे म्हणाले या देशाच्या उभ्या इतिहासात प्रथमच बहुमतवाल्यांचे राज्य स्थापन करण्याचा नेहरू रिपोर्टाचा इरादा आहे. राम-कृष्णांच्या काळापासून तो पृथ्वीराज, गझनीचा महंमद, महंमद घोरी, खिलजी, तुघलग, मोगल घराण्यापर्यंत आणि अलिकडे क्लाइव्ह, हेस्टींग, डलहौसी, कर्झन आणि आता लॉर्ड आर्यविन यांपैकी कोणाच्याच कारकीर्दीत बहुमतवाल्यांच्या हाती सत्ता नव्हती.

नेहरू रिपोर्टात संपूर्ण स्वातंत्र्याऐवजी वसाहतिक स्वराज्याची घोषणा असल्या-बद्दल महंमदअली त्यावर उठल्या सुटल्या तोंडसुख घेत असत. परंतु काँग्रेसने लाहो-रच्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केल्यानंतर मात्र ते त्याबाबत तोंडात मिठाची गुळणी धरून बसले. सरकारधार्जिण्या मुसलमान पुढाऱ्यांनी मात्र काँग्रेसच्या या भूमिकेविरूद्ध जोरदार मोहीम उघडली. १८ जानेवारी १९३० रोजी संयुक्त प्रांतातील कायदेमंडळाचे सर्व मुसलमान सभासद आणि प्रांतिक मुस्लीम लीगचे पुढारी यांनी काँग्रेसच्या लाहोर ठरावाचा धोकादायक म्हणून निषेध केला आणि काँग्रेसने सुरू केलेल्या कोणत्याही लढ्यात मुसलमान सहभागी होणार नाहीत असे जाहीर केले. त्यानंतर आठवड्याभरात अली बंधू, शफी दाउदी आणि नवाब इस्माइल खान यांनी एका पत्रकान्वये दुसऱ्या दिवशीच्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात सामील न होण्याचे मुसलमानांना आवाहन केले. तारीख २२ फेब्रुवारी रोजी मलीक फिरोजखान नूर यांनी पंजाब युरोपियन असोसिएशनच्या वार्षिक भोजन समारंभात भाषण करताना इंग्रजांना घालवून देऊन हिंदूंची निरंकुश सत्ता स्थापन करण्याच्या हेतूने इंग्रजांना हुसकून लावण्याचे प्रयत्न चालवल्याबद्दल काँग्रेसवर उघडपणे हल्ला चढवला आणि काँग्रेसच्या स्वातंत्र्य ठरावाने अगर राष्ट्रध्वज वंदनाच्या कार्यक्रमामुळे तुम्ही अस्वस्थ होऊ नका, इंग्लंडएवढाच हिंदुस्थान सुरक्षित आहे अशी ग्वाही दिली.

बहिष्काराच्या चळवळीला जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळत होता. इतका की, एका वर्षात इंग्लंडमधून भारतात होणारी आयात ४३ टक्क्यांनी घटली होती. परंतु बंगालमधील फाळणीविरोधी आंदोलनाप्रमाणे यावेळीही ब्रिटीश कापडाच्या दुकाना-समोरील निरोधनावरून जातीय दंगली उद्‌भवल्या. डाक्क्यात वंदे मातरम्‌च्या घोषणा-देत स्वातंत्र्यदिनाची मिरवणूक एका मशिदीवरून जात असताना मुसलमानाच्या एका मोठ्या जमावाने मिरवणुकीतल्या लोकांवर हल्ला चढवला आणि तेथून दंगलीला सुरूवात झाली. स्वतंत्रपणे केलेल्या चौकशीतून असे निष्पन्न झाले की, डाक्का, कोंताय किशोर गंज, चितगाव आणि कानपूर येथील दंगलींना पोलिसांची फूस होती. कोंता-यच्या दंगलीतील भीषण हकीकती के. सी. नियोगी यांनी कायदेमंडळाला कथन केल्या. कलकत्त्याच्या दि स्टेट्समन या अँग्लो-इंडियन वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या आधारे या दंगलीकडे पोलिसांनी कानाडोळा केला आणि ते किती बेपर्वाईने वागले त्याची अनेक उदाहरणे त्यांनी सभागृहाला सादर केली. पोलीसांच्या

डोळ्यादेखत करण्यात आलेल्या भयानक अत्याचारांच्या हकिकती सांगून त्या संबंधात डाक्क्यातील एक मुस्लीम पुढारी ए. एफ. नुरन्नबी यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या घटना-संबंधी केलेले निवेदन त्यांनी वाचून दाखवले. आपल्या त्या निवेदनात त्यांनी म्हटले होते, 'आगीत सापडलेल्या एका दुकानातून एक मोठा घोळका बाहेर येताना मला दिसला, ते त्या दुकानातील वस्तू लंपास करीत होते. ते सर्वजण मुसलमान होते. काही पोलीस आणि एक युरोपियन अधिकारी त्या घोळक्यातून बाहेर पडतानाही मला दिसले. नंतर ते रमत गमत पश्चिमेच्या बाजूला निघून गेले.'

कानपूर दंग्याच्या वेळीही असाच प्रकार घडला. अगदी प्रथमच सरकारी चौकशी-नंतरच्या एका ठरावात संयुक्त प्रांत सरकारने पोलीसांनी बघ्याची भूमिका घेतल्याचे मान्य केले.

सविनय कायदेभंगाच्या चळवळीमुळे जमीनदार आणि कुळे यांच्यातील संबंध बिघडण्याचा धोका निर्माण झाला आहे, अशी चिंता सं. प्रां. जमीनदार परिषदेच्या कार्यकारी मंडळाने १९३० च्या जानेवारी महिन्यात भरलेल्या आपल्या बैठकीत व्यक्त केली. त्याच संघटनेच्या फेब्रुवारी महिन्यात लखनौ येथे नवाब सर मोझ-मिलुल्ला खान यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनात 'क्रांती आणि साम्यवादी' वृत्तीचा निषेध करणारा, आणि काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचे उद्दिष्ट घोषित केल्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करणारा ठराव पास करण्यात आला. त्यानंतर एक महिन्याने जमीनदार असोसिएशनच्या वार्षिक सभेत आपापसातील मतभेद मिटवून संघटना अधिक बलवान बनविण्याचा आणि कुळांबरोबरचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. सविनय कायदेभंगाच्या चळवळीमुळे सुनियंत्रितपणे चाललेल्या समाजाला फार मोठा धोका निर्माण होणार आहे असा इशारा त्या सभेत काँग्रेस पुढाऱ्यांना देण्यात आला. कौन्सिल ऑफ स्टेटच्या एका मुस्लिम जमीनदार सभासदाने मताधिकाराचा संकोच करण्याची मागणी करणारा खाजगी ठराव मांडला तर काँग्रे-सने प्रौढ मताधिकाराचा जो आग्रह धरला होता आणि नाही रें ची बाजू उचलून धरण्याची जी घोषणा केली होती त्याबद्दल मवाळ पक्षाचे पुढारी अस्वस्थ झाले होते. मागील काही वर्षांपासून जमीनदार आणि कुळे यांचे संबंध तितकेसे चांगले राहिले नव्हते. कुळांचे हक्क सुरक्षित राखण्याच्या उद्देशाने सं. प्रांत सरकारने प्रांतिक कायदेमंडळात दोन विधेयके सादर केली होती. त्यातील तरतुदीबाबत मुसलमान जमीनदारांनी बरीच आरडाओरड केली. सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यापासून ती दडपण्यासाठी सरकारने जमीनदारांना चांगलेच हाताशी धरले होते. संयुक्त प्रांताचा गव्हर्नर हेले यांच्या प्रेरणेने लढ्यात सहभागी होण्यापासून जनतेला परावृत्त करण्यासाठी या जमीनदारांनी प्रांतात ठिकठिकाणी "आमन सभा" ( शांतता समिती ) स्थापन केल्या होत्या. प्रक्षुब्ध शेतकऱ्यांकडून अनेक ठिकाणी या शांतता समितीच्या सभात हुल्लड माजविण्यात आली. निरनिराळ्या खेड्यातील झेंडे

काढून टाकण्यात मुसलमान जमीनदारांचा पुढाकार असे. त्यामुळे संयुक्त प्रांतातील शेतकरी आंदोलनाला मुसलमान विरोधाचे स्वरूप प्राप्त झाले. १९२० मधील चळवळीच्यावेळी असे घडले नव्हते. किसान चळवळीतील प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांनी नजराणे, बिगार आणि व्याजाचा भरमसाठ दर यावर कडाडून हल्ले चढवण्यास सुरूवात केली. रायबरेलीच्या डेप्युटी कमिशनरांनी एका गुप्त पत्रकाअन्वये खंड थकल्याच्या आरोपावरून तालुकदारांनी कुळांवर खटले भरावेत. सरकार याकामी त्यांना सहाय्य करील असे आश्वासन दिले. संयुक्त प्रांतातील सरकारी अधिकारी आणि पोलीस दलातील शिपायी यात मुसलमानांचा भरणा फार मोठा होता. खंड वसुलीबाबत त्यांची जमीनदारांना नेहमीच मदत मिळे. शेकडो कुळांना सक्तीने जमिनीवरून बेदखल करण्यात आले त्यामुळे तर आगीत तेल पडल्यासारखे झाले. १९३१ मध्ये तर परिस्थिती आणखीनच बिघडली.

दरम्यान सरकारने गोलमेज परिषदेसाठी भारतीय प्रतिनिधींची निवड करताना फार दक्षता घेतली होती. १९३० च्या नोव्हेंबर महिन्यात भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेला साहजिकच काँग्रेस किंवा राष्ट्रवादी मुसलमानांपैकी कोणालाही बोलावण्यात आले नव्हते. परिषदेला उपस्थित असलेल्या मुसलमान प्रतिनिधींची वक्तव्ये मोठी मासलेवाईक होती. त्यापैकी महमंद अलींनी असे तारे तोडले होते की

> डॉ. मुंजे आणि येथे असलेल्या गोऱ्या लोकांप्रमाणे माझ्या नसातून आर्यांचे रक्त वाहात आहे असा माझा दावा नाही, आमचे लॉर्ड रीडींग यांच्या नसातून जे रक्त वाहत असेल तेच बहुतेक बहधा माझ्याही रक्तातून वाहात असावे. मी सेमेटीक आहे आणि लॉर्ड रीडींग हे ज्याप्रमाणे यहुदी धर्मातून ख्रिस्ती धर्मात आलेले नाहीत त्याप्रमाणेच मीही इस्लाममधून धर्मांतर केलेले नाही. . . आम्ही राष्ट्रवादी नसून परम राष्ट्रवादी आहोत. आणि एक मुसलमान म्हणून मी सांगतो की, देवाने माणूस बनवला आणि सैतानाने राष्ट्र बनवले. राष्ट्रवाद फाटाफूट घडवून आणतो तर आमचा धर्म सर्वांना एकत्र आणतो.

राजा शेर मंहमद खान यांनी असे प्रतिपादन केले की, पंजाबमध्ये सातशे वर्षे मुसलमानांचे राज्य होते आणि यामुळेही भारतातील मुसलमानांच्या कार्याचे केंद्र पंजाब हेच राहीले पाहिजे. पंजाबच्या लष्करी परंपरेचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांनी अशी सूचना मांडली की, भारताच्या भावी संघराज्यात सामील होणाऱ्या घटकांचे स्वतंत्र प्रांतिक सैन्यदल असावे आणि राष्ट्रीय सैन्यदलाकडे फक्त अशा स्वतंत्र सैन्यदलांवर देखरेख ठेवण्याचे आणि त्यांच्यात सुसूत्रता राखण्याचे काम सोपविण्यात यावे. या गोलमेज परिषदेत अनेक उपसमित्या नेमण्यात आल्या. त्यापैकी अल्पसंख्यांकासंबंधी विचार करण्याकरता नेमलेली उपसमिती आणि फेडरल स्ट्रक्चर उपसमिती, या दोन सर्वात महत्त्वाच्या होत्या.

परंतु परिषदेला हजर असलेले मुसलमान प्रतिनिधी जातीय प्रश्नावर सर्वसमंत

असा तोडगा शोधून काढण्याच्या मनस्थितीत नव्हते असेच फजली हुसेन यांनी एका प्रतिनिधीला पाठवलेल्या पत्रावरून म्हणावे लागते. त्या पत्रात ते लिहितात.

मजूर सरकारने असे मोठेसे काय देऊ केले आहे? त्यांचे म्हणणे असेच ना की जर तुम्ही जातीयवाद आपापसात मिटवलेत तर आम्ही तुम्हाला केंद्रात जबाबदारीचे अधिकार देऊ. आजच्या परिस्थितीत केंद्रात जबाबदारीचे अधिकार मिळाले तर त्यापासून अधिक फायदा कोणाचा होणार? हिंदूंचा की मुसलमानांचा? अर्थात हिंदूंचाच, मग हा फायदा उपटण्यासाठी जातीय मतभेद मिटविण्याची घाई कोणाला असणार? साहजिकच हिंदूंना, मग या देशातील मुसलमान हे राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्टचा मागासलेले असताना, ब्रिटीशांना घालवून दिले आणि जबाबदारीचे अधिकार मिळाले म्हणजे आपला फार मोठा फायदा होणार आहे अशी समजूत करून घेऊन त्यांनी आपल्या जातीय हितसंबंधांवर तुळशीपत्र ठेवायला काय म्हणून तयार व्हावे?

मुसलमान प्रतिनिधींपैकी फक्त महंमद अलींनी तो प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत आस्था दाखविली, परंतु त्यांनी अशी सूचना पुढे आणली की, कोणत्याही उमेदवाराला आपल्या स्वतःच्या जातीपैकी किमान ४० टक्के मतदारांची आणि इतर जातीतील १० ते १५ टक्के मतदारांची मते मिळाल्याशिवाय तो उमेदवार निवडून आला असे जाहीर करता येणार नाही अशी तरतूद निवडणूक पद्धतीत करण्यात यावी. अल्पसंख्यांक उपसमितीत या सूचनेचा विचार होऊन तीमुळे स्वतंत्र जातवार मतदार याद्या तयार कराव्या लागतील या कारणास्तव ती फेटाळण्यात आली. अल्पसंख्यांक उपसमिती किंवा फेडरल स्ट्रक्चर उपसमिती यापैकी कोणत्याच समितीत सर्वसंमत असा ठराव होवू शकला नाही. फेडरल स्ट्रक्चर उपसमितीतील चर्चेच्या वेळी सर महंमद शफी आणि जीना या दोघांनी असे जाहीर केले की, ते घेजण उपसमितीच्या कामकाजात भाग घेत असले तरी त्यावरून समिती जे निर्णय देईल ते त्या दोघांना मान्य असतीलच असे धरून चालण्यात येऊ नये. तपशीला-संबंधी चर्चा सुरू करण्यापूर्वी जातीय प्रश्नावर तडजोड निघाली पाहिजे अशी त्या दोघांची इच्छा होती. त्या उपसमितीच्या शेवटच्या बैठकीत फजलूल हक यांनी आगाखान यांचे निवेदन वाचून दाखविले त्या निवेदनात आगाखानांनी असे म्हटले होते की, जोपर्यंत जातीय प्रश्नाबाबत आपले समाधान होत नाही तोपर्यंत फेडरल स्ट्रक्चर किंवा प्रॉव्हिन्शियल कॉन्स्टिटयूशन उपसमिती यापैकी कोणत्याही समितीच्या शिफारसींना मुसलमान आपली संमती देऊ शकणार नाहीत. प्रांतिक मंत्रिमंडळावर मुसलमानांना प्रतिनिधीत्त्व देण्याची कायदेशीर तरतूद करण्यात यावी हा मुद्दाही महंमद अली आणि इतर मुसलमानांनी लावून धरला. परंतु त्यामुळ मंत्रिमंडळाच्या सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वाला बाधा येईल असेही इतर सभासदांनी निदर्शनास आणून दिले.

पहिल्या गोलमेज परिषदेत जीनांनी जी भूमिका घेतली त्यावरून ते आता आपल्या

गटात सामील झाले आहेत अशी सरकारधार्जिण्या जातीयवादी मुसलमानांची खात्री होऊन चुकली. धार्मिक क्षेत्रातील सनातनी वृत्तीशी दोन हात करताना जीनांनी मुस्लीम जातीयवादी पक्षांतील आपल्या राजकीय विरोधकांपुढे सपशेल शरणागती पत्करली. १९२४ साली ते आणि स्वतंत्र पक्षातील त्यांचे पाठीराखे मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून आले होते. त्यावेळी जीना हे कायदेमंडळातून सरकारी कामकाजात शक्य तितके अडथळे आणण्याच्या बाजूचे होते. मोतीलाल नेहरूंचा राष्ट्रीय मागणीचा पहिला प्रस्ताव पास झाल्यानंतर जीना यांची मुडीमन समितीचे सभासद म्हणून नियुक्ती झाली होती. जीनांनी या समितीतील अल्पसंख्य सभासदांची म्हणून जो अहवाल तयार केला होता त्यात संयुक्त मतदार संघाचा हिरीरीने पुरस्कार करण्यात आला होता. त्याचप्रमाणे प्रांतिक मंत्रिमंडळात सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व लागू करण्याची घटनात्मक तरतूद करण्यात यावी असा त्यांनी आग्रह धरला होता. १९२५ सालच्या स्पटेंबरामध्ये पुन्हा त्यांनी मोतीलाल नेहरूंच्या राष्ट्रीय मागणीच्या दुसऱ्या ठरावाला पाठिंबा दिला होता. परंतु त्या वर्षाच्या अखेरीस त्यांनी एकदम कोलांटी उडी मारली आणि ते पक्के सहकारवादी बनले. मुस्लीम लीग अधिवेशनात आपण अगदीच अलग पडत आहोत असे पाहिल्यावर त्यांनी स्वतंत्र मतदार संघ राहीले पाहिजेत या मागणीचा पाठपुरावा करण्यास सुरूवात केली. वस्तुत: ते लखनौ करार घडवून आणणाऱ्यांपैकी एक होते. परंतु असे असूनसुद्धा त्यानी लखनौ करारात एकतर्फी बदल घडवून आणला पाहिजे म्हणजे ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य असतील तेथे त्यांन-स्वतंत्र मतदार संघ आणि लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधीत्त्व मिळाले पाहिजे. परंतु मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतातील अन्य अल्पसंख्यांकाना मात्र अशा सवलती असता कामा नयेत अशी मागणी सुरू केली. १९२७ च्या सुरू-वातीला त्यांना असे आढळून आले की, २६ मुसलमान पुढाऱ्यांनी स्वतंत्र मतदार संघाची बाजू सोडून ते संयुक्त मतदार संघाच्या बाजूचे झाले आहेत. त्याबरोबर त्यांनी पुन्हा संयुक्त मतदार संघाचा पुरस्कार करायला सुरूवात केली. नेहरू रिपोर्ट-मुळे काँग्रेसच्या मद्रास ठरावाला बाधा येत नाही हे निष्णात कायदेपंडित म्हणून त्यांच्या लक्षात आले नसेल असे नाही. परंतु मुद्दामच त्यांनी याबाबत काँग्रेसचे काहीही ऐकून घेतले नाही आणि सर्वपक्षीय परिषदेने मुसलमानांवर अन्याय केला असल्याचा कांगावा सुरू केला. वस्तुत: १९२७ च्या मार्च महिन्यात त्यांनी स्वत:च केलेल्या सूचना आणि मुस्लीम सर्वपक्षीय परिषदेने जानेवारी १९२९ मध्ये केलेला ठराव यात जमीन-अस्मानचा फरक असताना देखील ते त्या दोहोत कसलाही फरक नाही असा दुराग्रह धरून बसले. त्यानंतर जीना पूर्णपणे सरकारधार्जिण्या अश्रफांच्या आहारी गेले आणि त्यांनी मुस्लीम सर्वपक्षीय परिषदेत जो ठराव केला होता. त्यालाच १४ कलमी जाहीरनामा असे नाव देऊन ते तो स्वत:च्या नावावर खपवू लागले. गोलमेज परिषदेच्या वेळी पुन्हा एकदा त्यांनी केंद्र सत्ता मजबूत असली

पाहिजे या मागणीऐवजी सरकारधार्जिण्या अश्रफांच्या सुरात सूर मिळवून केंद्र सरकारच्या हाती कसलीही सत्ता सोपवता कामा नये अशी मागणी करावयास सुरूवात केली इतकेच काय पण मुसलमानांची बहुसंख्य असलेल्या प्रांतातील मुसलमानांना यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मध्यवर्ती कायदेमंडळात प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे ही आपली एका काळची भूमिकाही त्यांनी बदलली. अशा तऱ्हेने काँग्रेस आणि तिची सविनय कायदेभंगाची चळवळ या दोहोंशी सामना देण्याच्या पवित्र्यात असलेल्या सरकार धार्जिण्या जातीयवादी मुस्लीम नेत्यांना जीना संपूर्णपणे स्वीकारार्ह वाटू लागले.

पहिल्या गोलमेज परिषदेनंतर ब्रिटनचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी हिंदुस्तानात ब्रिटीश हिंदुस्तान आणि देशी संस्थाने मिळून संघराज्य स्थापन करण्याचा सरकारचा मानस असल्याचे जाहीर केले व त्यासंबंधीचा थोडासा तपशीलही दिला. भारताला संपूर्ण स्वातंत्र्याच्या दिशेने मजल मारण्याच्या मार्गात अडथळा होऊन बसले अशा तऱ्हेचे राखीव अधिकार व्हाइसरॉयला दिले जाणार नाहीत ही गोष्टही त्यांनी मुद्दाम स्पष्ट केली आणि आपल्या भाषणाच्या शेवटी काँग्रेस आपली सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेऊन घटनात्मक सुधारणासंबंधीच्या चर्चेत सहभागी होईल अशी आशा व्यक्त केली. काँग्रेस वर्किंग कमेटीचे सभासद अटकेत होते. त्यामुळे त्यांच्या जागी काम करणाऱ्या सभासदांची मॅकडोनाल्ड यांच्या घोषणेसंबंधी विचार करण्यासाठी अलाहाबाद येथे दोन दिवसांची बैठक झाली. ब्रिटीश पंतप्रधानांनी केलेली घोषणा अत्यंत संदिग्ध असल्याने काँग्रेसच्या धोरणात बदल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असा अभिप्राय बैठकीत व्यक्त करण्यात आला. चार दिवसानंतर वर्किंग कमेटीच्या सर्व सभासदांना आपापसात चर्चा करण्याची संधी मिळावी म्हणून त्या सर्वांची बिनशर्त मुक्तता करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे व्हाइसरॉयने जाहीर केले. देशात शांततेचे वातावरण निर्माण झाले तर सरकार आपल्या उद्दिष्टापासून मागे हटणार नाही असे जे आश्वासन ब्रिटीश पंतप्रधानांनी दिले आहे त्याला अनुसरून हा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

एक महिन्याच्या आत गांधी आणि आर्यविन यांच्यात बोलणी सुरू झाली व तारीख ४ मार्च रोजी त्या दोघात एक करार घडून आला. त्या करारानुसार काँग्रेस प्रतिनिधींना गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रात सहभागी होता यावे म्हणून जरूर ती कारवाई करण्याचे व सर्व वटहुकूम मागे घेण्याचे आर्यविन यांनी आश्वासन दिले तर गांधीनीं काही काळ सविनय कायदेभंगाची चळवळ तहकूब ठेवण्याचे मान्य केले. चर्चेच्या वेळी डॉ. अन्सारी, मालवीय आणि सरोजनी नायडू यांना गोलमेज परिषदेत सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले जाईल असे तोंडी आश्वासन आर्यविन यांनी दिले परंतु मीरत कटातील आरोपींची मुक्तता करण्यात यावी आणि लाहोर कटातील भगतसिंग आदि क्रांतीकारकांची फाशीची शिक्षा रद्द करण्यात यावी या मागण्या मात्र गांधी व्हाइसरॉयकडून मान्य करवून घेऊ शकले नाहीत. मीरत कटातील

आरोपींची मुक्तता करून घेण्यात गांधी अयशस्वी ठरल्याबद्दल त्यांचा निषेध करण्यासाठी कम्युनिस्ट विचारसरणीच्या कामगार पुढाऱ्यांनी ठिकठिकाणी निदर्शने केली, भगतसिंग आदि क्रांतिकारकांची फाशी रद्द होऊ न शकल्याने देशभर दुःखाची छाया पसरली. सुभाष बोस यांनी गांधी आयर्विन कराराबद्दल जाहीरपणे असमाधान व्यक्त केले. देशात अनेक ठिकाणी गांधीविरोधी निदर्शने करण्यात आली.

उलटपक्षी सरकारधार्जिण्या जातीयवाद्यांनी आपली तीव्र नापसंती व्यक्त केली. मुस्लीम कॉन्फरन्सच्या वर्किंग कमेटीने फेडरल स्ट्रक्चर समितीच्या शिफारसी फेटाळून लावणारा ठराव आपल्या तारीख ७ फेब्रुवारी १९३१ च्या बैठकीत पास केला. तारीख १ मार्च रोजी भरलेल्या या कमेटीच्या बैठकीत हजरत मोहानी यांनी मांडलेल्या ठरावात हिंदूनां भारतात हिंदूंचे राज्य प्रस्थापित करावयाचे असून मुसलमानांच्या हिताला विघातक ठरणारे वसाहतिक स्वराज्याची स्थापना होऊ न देण्याचे आणि कायदेमंडळाकडे जबाबदारीचे अधिकार सोपवू देण्यास विरोध करण्याचे आवाहन करण्यात आले होते. दिल्लीला तेवढ्यासाठी मुस्लीम परिषदेचे एक खास अधिवेशन तारीख ५ एप्रिल रोजी भरविण्यात आले. इतरही अनेक मुसलमान पुढाऱ्यांनी गांधीवर हवी तशी टीका केली. फेरोजखान नून यांनी तर संरक्षण खाते लोकनियुक्त सभासदाकडे सोपविण्याच्या काँग्रेसच्या मागणीलाही विरोध केला.

गांधी आयर्विन करारानंतर राष्ट्रवादी मुसलमानांनी मुस्लीम लीग आणि मुस्लीम कॉन्फरन्स नेत्यांबरोबर समझोता घडवून आणण्याचे नव्याने प्रयत्न सुरू केले. भोपाळ येथे भरलेल्या संयुक्त बैठकीत दोन्ही बाजूकडून करारासंबंधीच्या आपपल्या शर्ती सादर केल्या गेल्या. वाटाघाटीची शेवटची बैठक जून महिन्यात दिल्लीला भरली होती. लीग आणि मुस्लीम कॉन्फरन्सच्या नेत्यांनी डॉ. अन्सारी आणि त्यांचे सहकारी यांनी सादर केलेला मसुदा फेटाळून लावला इतकेच नव्हे तर त्यांनी स्वतःची योजना सुचविली होती तीही मागे घेतली. अशा तऱ्हेने वाटाघाटींचे गुऱ्हाळ चार महिने चालून अखेर बोलणी फिसकटली. १९३१ च्या जुलैत मुंबई येथे भरलेल्या काँग्रेस वर्किंग कमेटीच्या बैठकीत राष्ट्रवादी मुसलमानांच्या सूचनेनुसार जातीय प्रश्नासंबंधी एक विस्तृत ठराव पास करण्यात आला. या ठरावात प्रत्येक जातीला आपली संस्कृती, भाषा, लिपी, शिक्षण, व्यवसाय, धर्म, धार्मिक अनुदाने आणि व्यक्तीगत कायदा याबाबतीत संपूर्ण संरक्षण देण्याची हमी देण्यात आली होती. देशाची भावी राज्यघटना संघराज्याच्या स्वरूपाची असावी आणि भारताच्या हिताला बाधा पोचणार नसेल तर शेषाधिकार घटक प्रांताच्या हाती असावेत असेही त्या ठरावात स्पष्ट करण्यात आले होते. प्रौढ मताधिकार, संयुक्त मतदार संघ आणि लोकसंख्येच्या प्रमाणात सिंध प्रांतात हिंदूंना आसामात मुसलमानांना आणि पंजाब व वायव्य सरहद्द प्रांतात शिखांना राखीव जागांची तरतूद करण्यात येईल. तसेच ज्या प्रांतात हिंदू आणि मुसलमानांची संख्या एकूण लोकसंख्येच्या २५ टक्क्यांहून कमी असेल अशा

प्रांतात दोघांनाही राखीव जागा व त्या व्यतिरिक्त इतर जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसही त्यांना उभे राहाण्याची सवलत या ठरावाने दिली होती. सिंध हा स्वतंत्र प्रांत बनविण्यात यावा आणि वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान यांना संपूर्ण सुधारणा कायदा लागू करण्यात यावा या मागण्याही ठरावात मान्य करण्यात आल्या होत्या. संघराज्याचे आणि प्रांतिक मंत्रिमंडळे बनवताना अल्पसंख्य जमातींचे हितसंबंध लक्षात घेऊन नवे संकेत निर्माण करण्यात येतील असे आश्वासनही ठरावाच्या अखेरीस देण्यात आले होते. काँग्रेसचा वरील ठराव हा त्यापूर्वी राष्ट्रवादी मुसलमानांच्या लखनौ परिषदेत पास करण्यात आलेल्या ठरावासारखाच आहे असे डॉ. अन्सारी यांनी वर्किंग कमेटीच्या बैठकीनंतर एका आठवड्याने मीरत येथे भरलेल्या संयुक्त प्रांत राष्ट्रवादी मुस्लीम परिषदेत भाषण करताना जाहीर केले. गरीब जनतेचे हितसंबंध प्रौढ मताधिकारामुळेच सुरक्षित राहू शकतील असे सांगून त्यांनी प्रौढ मताधिकाराचा जोरदार पुरस्कार केला. गोषा पाळणाऱ्या मुसलमान स्त्रिया इजिप्तमध्ये जर त्यांच्यासाठी असलेल्या मतदार केंद्रावर जाऊन व्यवस्थितपणे मतदान करतात तर हिंदुस्तानाच त्यांना अडचण का वाटावी असा सवाल त्यांनी टाकला. परिषदेचे अध्यक्ष डॉ. सैयद महमूद यांनी बहुसंख्यांक हिंदूंकडून होणाऱ्या अन्यायाचे आणि दडपशाहीचे कल्पनाचित्र मुसलमानांकडून रंगविले जाते त्याचा समाचार घेऊन मुसलमान समाज ज्या एका गंडाने पछाडला गेला आहे त्यावर नेमके बोट ठेवले.

जातीयवाद्यांचा सार्वजनिक संस्थात आणि सरकारी नोकऱ्यात धर्माच्या आधारावर राखीव प्रतिनिधीत्व मागणे एवढा एकच कार्यक्रम आजवर ठरून गेलेला आहे. मागच्या दाराने संधी मिळविण्याचा तो एक सोप्यातला सोपा मार्ग होऊन बसला आहे त्यामुळे तरूण मुसलमानांच्या महत्त्वाकांक्षा खुरटून गेल्या, त्यांची बुद्धी गंजून जाऊ लागली. मुसलमान समाजाचा कणाच अशा रीतीने मोडल्यासारखा होऊन बसला आणि इस्लाममधील पुरुषार्थालाच अवकळा आली. आज उभ्या हिंदुस्तानात विशेष बुद्धिमत्तेचा एकही मुसलमान आढळत नाही. त्याचे कारण देखील हेच आहे. राखीव प्रतिनिधीत्त्वाच्या कार्यक्रमामुळे जीवनात जोम निर्माण करणारी ईर्षाच मरगळून गेली आहे. मुसलमानांतील सामुदायिक भावनेचा विकास खुंटला गेला आणि मुसलमान दुर्बळ बनले, तर हिंदूंच्या मनात द्वेषभावना निर्माण झाली. गेल्या वीस वर्षात शिक्षण, आरोग्य, आर्थिक कल्याण याबाबतीत मुसलमानांचे पाऊल पुढे पडेल अशी एकही गोष्ट त्यांच्या प्रतिनिधींकडून झालेली नाही आणि त्यामुळे त्यांच्या आसपास फोफावत असलेल्या दुष्ट प्रवृत्तींची ते दुर्दैवाने शिकार बनले आहेत. आपल्याहून सबळ आणि शूर असलेल्यांबरोबर दोन हात करावे लागल्याशिवाय कोणत्याही जमातीचा विकास घडून येत नाही. परंतु असा संघर्ष येवू देण्याचेच आजवर आपल्या पुढाऱ्यांनी टाळले. त्यामुळे आपल्या समाजाचे जीवन कुंठीत होण्याची पाळी आली. या उलट संयुक्त मतदार संघ आले तर मुसलमान समाजातील जे

उदात्त आणि सर्वोत्तम असेल त्याचा परिपोष होईल.

जमीयत-उल्-उलेमाच्या वर्किंग कमेटीत जातीय प्रश्नांसंबंधीच्या काँग्रेस वर्किंग कमेटीच्या ठरावावर विचार झाला, त्यातील दृष्टीकोनाचे सर्वसाधारणपणे स्वागत करण्यात येऊन त्यात काही किरकोळ दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. काँग्रेसच्या ठरावात प्रौढ मताधिकार व संयुक्त मतदार संघ यावर तिने जो भर दिला होता. त्याला जमीयतने संपूर्ण पाठिंबा दर्शविला, मात्र मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतात त्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्त्व मिळाले पाहिजे अशी अट घालण्यात आली.

मुस्लीम लीग आणि मुस्लीम कॉन्फरन्स यांनी अर्थातच ताबडतोब काँग्रेसच्या त्या ठरावाविरूद्ध पवित्रा घेतला. बहुसंख्यांकावर ज्यांचा विश्वास नाही त्या अल्पसंख्यांकांच्या निवडणुकीची उठाठेव करण्याचे काँग्रेसला काही एक कारण नाही असे सांगून मुसलमान आणि दलित वर्ग स्वतंत्र मतदार संघाचा आपला आग्रह सोडणार नाही असे शौकत अलींनी बजावले. मुस्लीम परिषद आणि जीनांचा चौदा कलमी जाहीरनामा यातील मागण्या इतर सर्व पक्षांनी मान्य केल्याशिवाय जातीय प्रश्नाची तड लागू शकणार नाही हे ही त्यांनी स्पष्ट केले. खास निमंत्रणावरून जीना या परिषदेला हजर राहीले होते. त्यांनी मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार करून सर्व राष्ट्रवादी मुसलमानांनी मुस्लीम राजकारणाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावे असे आवाहन केले.

त्यानंतर गांधीनी जीनांच्या बरोबर बोलणी केली. राष्ट्रवादी मुसलमानांसकट सर्व मुस्लीम नेते एकमताने त्यांच्या मागण्यासंबंधी जो मसुदा तयार करतील तो मान्य करण्याचे गांधींनी आश्वासन दिले मात्र त्याबाबत त्यांच्या दोन अटी होत्या त्या अशा की, संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याच्या काँग्रेसच्या प्रयत्नात सर्व मुसलमान समाजाने सहभागी होण्याची तयारी दर्शवावी आणि हिंदू-मुसलमान समस्या सोडविण्यासाठी घेतलेला कोणताही निर्णय, इतर अल्पसंख्यांकाना जाचक ठरता कामा नये. १९२७ आणि १९२८ साली आपण जो डाव टाकला होता तोच गांधीजी आपल्यावर उलटवत आहेत हे हेरून जीनांनी गांधींचे म्हणणे झिडकारून लावले, इतकेच नव्हे तर मद्रास आणि मुंबई येथे केलेल्या भाषणातून काँग्रेसवर कडाडून हल्ला चढवला आणि मुसलमानांना गांधींच्याविरूद्ध प्रक्षोभक चिथावणी दिली. जीनांच्या या भाषणामुळे त्यांचे दीर्घ काळापासूनचे एक सहकारी छगला यांनाही धक्का बसला आणि त्यांनी जीनांची विधाने दुदैवी आणि खोडसाळ असल्याचे मत व्यक्त केले. जीनांनी अहिंसेचा केलेला धिक्कार आणि त्यांची गांधीविरूद्ध आग पाखड यांचा संबंध अनेक जणांनी मुंबईत भरलेल्या राष्ट्रवादी मुसलमानांच्या परिषदेवर जो भयानक सशस्त्र हल्ला झाला होता त्याच्याशी लावला होता.

त्या वर्षीच्या १८ एप्रिलला लॉर्ड आर्यविन यांच्या जागी व्हाइसरॉय म्हणून लॉर्ड विलिंग्डन यांची नेमणूक झाली. राष्ट्रवादी मुसलमानांचे प्रतिनिधी म्हणून दुसऱ्या गोलमेज परिषदेला डॉ. अन्सारी यांना बोलावण्यात येईल असे आश्वासन लॉर्ड आर्यविन

यांनी गांधीना दिले आहे हे माहित असूनसुद्धा लॉर्ड विलिंग्डन यांनी ते पाळले नाही आणि त्याऐवजी सर अली इमाम यांची निवड केली. परंतु ते इतके म्हातारे आणि आजारी होते की, त्यांच्याकडून राष्ट्रवादी मुसलमानांचे खरेखुरे प्रतिनिधीत्व होणेच शक्य नव्हते. या प्रकारामुळे राष्ट्रवादी मुसलमानात घोर निराशा पसरली. तर सरकारधार्जिण्या मुसलमानांना राष्ट्रवादी मुसलमानांची सर अलि इमाम यांच्यावर कोणाचीही प्रतिनिधी म्हणून निवड व्हावयास नको होती. अखिल भारतीय मुस्लीम परिषदेने अलि इमाम यांच्या निवडणुकीला तीव्र आक्षेप घेतला आणि राष्ट्रवादी मुस्लीम पार्टी ही काँग्रेसचाच एक भाग असल्याने ती मुसलमान समाजाचे प्रतिनिधीत्व करूच शकत नाही अशी भूमिका घेतली, आणि मुसलमानांची एकजूट तोडण्यासाठीच सर अली इमाम यांची निवड करण्यात आली आहे असा आरोप केला. गांधी, वल्लभभाई पटेल आणि जवाहरलाल नेहरू यांनी व्हाइसरॉयची भेट घेऊन त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु इतर मुसलमान प्रतिनिधींचा डॉ. अन्सारींच्या नावाला विरोध आहे असे सांगून व्हाइसरॉयनी त्यांना वाटेला लावले. एकजात सर्व मुस्लीम प्रतिनिधींचा संपूर्ण स्वातंत्र्याला विरोध आहे असे भासविण्याचाच तो एक प्रयत्न होता. डॉ. अन्सारींच्या नावाला संमती देण्याची गांधींनी जीनांना परोपरीने विनंती करून पाहिली पण तीही फोल ठरली.

सर अली इमाम राष्ट्रवादी मुसलमानांचे प्रतिनिधी म्हणून दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेले खरे, परंतु त्यांना सहज खिशात टाकण्यात आले कारण राष्ट्रवादी मुसलमानांचे प्रतिनिधित्व करण्याबाबत ते स्वतःच फारसे उत्सुक नव्हते. अल्पसंख्यांक समितीत त्यांनी जेमतेम दोन-तीन मिनिटे भाषण केले. त्यांनी सांगितले की आपण राष्ट्रवादी मुस्लीम पक्षाचे सभासद असलो तरी त्या पक्षाने आपल्याला अधिकृत प्रतिनिधी म्हणून या परिषदेला पाठविलेले नाही. तरीही 'सभापती महोदय, मी राष्ट्रवादी मुसलमानांचा दृष्टीकोन मांडावा अशी आपली इच्छा असेल तर तसे करण्याची माझी तयारी आहे. परंतु त्यासाठी मला आपली परवानगी लागेल कारण त्यासाठी मला बैठकीचा बराच वेळ घ्यावा लागेल आणि अशा बैठकीत वेळेला तर सर्वात जास्त महत्त्व असते.' अलि इमाम यांच्या या वक्तव्यानंतर बैठकीच्या अध्यक्षस्थानी असलेले रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी अर्थपूर्ण नजरेने आगा खान यांच्याकडे पाहिले आणि सर अलि इमाम यांना बोलावयाची परवानगी द्यावयाची का असे विचारले, आगा खान यांनी रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचा आशय लक्षात घेऊन तात्काळ असे सुचविले की, 'आज रात्रीच गांधींच्या बरोबरची बोलणी सुरू होणार असल्याने ही बैठक आता तहकूब करण्यात यावी. त्याप्रमाणे बैठक तहकूब झाली आणि सर अलि इमाम यांना भाषण करण्याची संधी त्यापुढेही मिळाली नाही.

तारीख १ ऑक्टोबर रोजी सर्व मुसलमान प्रतिनिधींनी पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहातील बऱ्याचशा सभासदांची एकत्रित भेट घेतली त्यावेळी अध्यक्षस्थानी असलेले

व्हायकाउट ब्रेंटफोर्ड यांनी असा मुद्दा मांडला की, गांधींच्या दृष्टीकोनाव्यतिरिक्त हिंदुस्तानातील राजनिष्ठ मुसलमानांचाही एक स्वतंत्र दृष्टीकोन आहे. शफी अलि आणि शौकत अलि यांचीही त्या बैठकीत भाषणे झाली. शफींनी स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीचा पुनरूच्चार केला तर शौकत अलींनी मुसलमान कोणत्याहीं परिस्थितीत ब्रिटीशांची साथ सोडणार नाहीत असे आश्वासन दिले. या बैठकीनंतर आठवड्याने अलाहाबाद येथे एका जाहीर सभेत भाषण करताना टी. ए. के. शेरवाणी यांनी इंग्लंडला जमलेल्या सगळ्या मुसलमान प्रतिनिधींची चांगली खरडपट्टी काढली आणि शौकत अलि सारख्या नेत्याने मुंबईच्या भूतपूर्व गव्हर्नरांकडून राजनिष्ठेचे शिफारसपत्र मिळविण्यासाठी इतक्या खालच्या पातळीला जावे याचे आपल्याला दु:ख होते असे सांगितले.

गांधी लंडनला येऊन दाखल झाल्याबरोबर अल्पसंख्यांक उपसमितीवर त्यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. आंबेडकर आणि अँग्लो इंडियन व युरोपियन प्रतिनिधींनी पहिल्याच बैठकीत असे जाहीर केले की, गांधी आणि मुसलमान प्रतिनिधी यांच्या दरम्यान झालेला कोणताही समझोता इतर अल्पसंख्य गटांच्या मागण्या डावलल्या जाणार असल्या तर आम्हाला मान्य होणार नाही. त्या बैठकीत असे ठरविण्यात आले की, सर्व प्रतिनिधींनी एकत्र बसून चर्चा करावी आणि एखादा सर्वमान्य मसुदा तयार करावा. परंतु आठ दिवस वाटाघाटी होऊनही त्या निष्फळ ठरल्या आणि सर्व संमत तोडगा शोधून काढण्यात अपयश आल्याचे गांधींना कबूल करावे लागले. ज्या तऱ्हेने भारतातील प्रतिनिधींची निवड करण्यात आली होती त्यातच या अपयशाची बीजे साठवलेली आहेत कारण लोकनियुक्त प्रतिनिधी ऐवजी येथे आलेले सारे प्रतिनिधी सरकारनियुक्त आहेत अशी त्यांनी या अपयशाची कारणमिमांसा केली. त्यांनी असेही सांगितले की, जातीय प्रश्नावर सर्वसंमत तोडगा शोधून काढण्याचे प्रयत्न जरूर जारी ठेवावेत परंतु तसे करताना घटना तयार करण्याच्या प्रयत्नांची मात्र हेळसांड होऊ देता कामा नये. अस्पृश्य आणि सर्व जातीजमातीतील गरिबांसकट देशातील जनसामान्यांचे प्रतिनिधीत्त्व कॉंग्रेस करते असे घोषित करून त्यांनी पुढे सांगितले की, मुसलमान आणि शीख यांचा अपवाद वगळता इतर कोणासाठीही स्वतंत्र मतदार संघ किंवा खास प्रतिनिधित्त्व देण्याला आपला विरोध आहे. जातीय प्रश्न हा आता केवळ हिंदू-मुसलमानांपुरता मर्यादित राहिलेला नाही. शीख, अँग्लो इंडियन्स, युरोपियन्स आणि भारतीय ख्रिस्ती यांच्या मागण्या डावलण्यात आल्या तर ते ऐकणार नाहीत त्यामुळे या प्रश्नातील गुंतागुंत अधिकच वाढली आहे शिवाय काही प्रतिनिधींचा मुळात सत्तांतराला विरोध आहे. आणि तोच खरा वादाचा मुद्दा होऊन बसला आहे.

गांधीजींनी अपशयाची अशी कबुली दिल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी आपल्या वक्तव्याने आश्चर्याचा आणखी एक धक्का दिला त्यांनी असे घोषित केले की,

ब्रिटीशांकडून सत्ता तावडतोब भारतीयांच्या हाती यावी अशी दलीत वर्गाला घाई झालेली नाही किंवा त्यांचे त्यांना फारसे आकर्षणही वाटत नाही. तुम्ही सत्तांतर करणारच असाल तर आमचे म्हणणे असे आहे की, ती सत्ता हिंदू वा मुसलमान अशा कोणत्याही एका गटाच्या हातात केंद्रीत होता कामा नये. तर प्रत्येक जातीची संख्या लक्षात घेऊन त्या प्रमाणात तिला स्वतंत्र सहभागी करून घेतले पाहिजे.

एक महिन्यानंतर जातीय प्रश्नावरील आदर्श तोडगा म्हणून जो अल्पसंख्यांकांचा करार झाला त्यावर सही करतानां डॉ. आंबेडकरांनी आपणच सुचविलेल्या वरील तोडग्यावर संपूर्ण दुर्लक्ष केले.

मुसलमान, दलित वर्गीय, अँग्लो इंडियन्स' युरोपियन्स आणि भारतीय ख्रिश्चनांतील एक गट यांचा म्हणून झालेला एक करार १३ नोव्हेंबर रोजी आगा खान यांनी सादर केला. भारतीय ख्रिश्चनांच्या दोन प्रतिनिधींपैकी डॉ. एल. के. दत्त यांनी त्या करारावर सही करण्याचे नाकारले होते. कराराच्या पहिल्या भागात अल्पसंख्यांकाना हव्या असलेल्या '११ कलमी' संरक्षक बाबींचा अंतर्भाव होता.

कराराला जे तक्ते जोडले होते ते बारकाईने तपासून पाहिले तर त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होती की, कोणत्याही प्रांतातील बहुसंख्य जमातीच्या कायदेमंडळातील प्रतिनिधींची संख्या इतर अल्पसंख्य जमातीच्या प्रतिनिधींपेक्षा कमी किंवा समान देखील होता कामा नये असे करारावर सही करणाराचे प्रतिपादन असले तरी प्रत्यक्षात ते तत्त्व डावलले जात होते. स्वतःस ४६ टक्के जनतेचे प्रतिनिधी म्हणविणाऱ्या या पाच जमातींच्या मनोनीत पुढाऱ्यांनी आपल्यामध्ये जागांची अशी वाटणी सुचविली होती की, ज्यायोगे त्यांना केंद्रीय विधीमंडळात, तसेच मुंबई आणि संयुक्त प्रांत वा प्रांतिक विधी-मंडळात निर्विवाद बहुमत मिळाले असते. अर्थात मुस्लीम बहुसंख्या असलेल्या प्रत्येक प्रांतात मुसलमानांना निःसंदिग्ध बहुमताची सोय करून ठेवली होती हे सांगावयास नकोच

सत्तांतराबाबत कोणताही समझोता होऊच नये अशा तऱ्हेनेच हा करार करण्यात आल्याचे स्पष्ट होते. सरदार उज्वल सिंग यांच्या प्रमाणेच महिला प्रतिनिधींनी आपला या कराराला पाठिंबा नसल्याचे जाहीर केले. जातीय समस्येबाबत ब्रिटीश पंतप्रधानांनी निवाडा द्यावा असे सर चिमणलाल सेटलवाड यांनी सुचविले आणि आपण देऊ तो निवाडा मान्य करण्याचे लेखी आश्वासन उपसमिती वरील सर्व प्रतिनिधी देण्यास तयार असतील तर ती जबाबदारी स्वीकारण्याची तयारी रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी दर्शविली.

अल्पसंख्यांकाचा प्रश्न प्रांतिक किंवा संघराज्याची घटना यापैकी कशावरच प्रति-नीधींचे एकमत होवू शकत नाही असे दिसून आल्यावर तारीख २८ नोव्हेंबरपासून गोलमेज परिषदेचे संपूर्ण अधिवेशन सुरू झाले तेथे पुन्हा स्वतंत्र मतदार संघ, अल्पसंख्यांकाना मंत्रिमंडळात जागा देण्याबाबत कायदेशीर तरतूद इ. मागण्यांचा आग्रह धरण्यात आला. मुसलमानांचे समाधान झाल्याशिवाय घटना तयार करण्याच्या

चर्चेत मुसलमान प्रतिनिधी भाग घेणार नाहीत असेही बजावण्यात आले. फजलूल हक यांनी राष्ट्रवादी मुसलमान या कल्पनेचीच टर उडविली आणि राष्ट्रवादी मुसलमान म्हणजे प्रॉटेस्टंट कॅथॉलिक सारखाच प्रकार झाला असे सांगितले.

मद्रासमधील मुसलमान स्वतःला हिंदुस्तानातील तमाम मुस्लीम समाजाचा अविभाज्य घटक समजतात असे सांगून सयद महंमद पातशाह साहेब बहादूर यांनी बंगाल आणि पंजाब प्रांतातील कायदेमंडळात मुसलमान सभासदांची बहुसंख्या राहील अशी कायदेशीर तरतूद करण्याची मागणी केली. गांधीनी आणि इतर अनेक प्रतिनिधींनी जातीयतेची समस्या राष्ट्रसंघ किंवा ज्येष्ठ न्यायमूर्तींचे मंडळ अशा एकाद्या लवादाकडे सोपवावी अशी मागणी केली. कॉंग्रेस ही देशातील ८५ टक्के जनतेचे प्रतिनिधीत्व करते या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करून गांधीजींनी असे निदर्शनास आणून दिले की, इतर पक्षांचे जे प्रतिनिधी येथे हजर आहेत ते कोणत्या तरी एका गटाचे प्रतिनिधीत्व करतात. परंतु कॉंग्रेस हा असा एकच पक्ष आहे की, जो संबंध देशाचे प्रतिनिधीत्व करतो. कॉंग्रेस ही जातीय संघट नानसून कोणत्याही स्वरूपातील जातीयवादाला तिचा सक्त विरोध आहे. वंश, वर्ण किंवा पंथ यांना थारा न देता सर्वांना सामावून घेणारी अशी ती एकमेव संघटना असून तिचे व्यासपीठ सर्वांना खुले आहे असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले.

आपल्या समारोपाच्या भाषणात पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जाहीर केले की (१) संबंध भारताचे एक संघराज्य बनविण्याचे सरकारचे प्रयत्न चालूच राहतील. (२) अल्पावधीत जातीय प्रश्नांबाबत सर्व संबंधितात एकवाक्यता घडून न आल्यास ब्रिटीश सरकार त्याबाबत अखेरचा निर्णय देईल. (३) भावी राज्य घटनेत अल्पसंख्यांकांच्या नैसर्गिक हक्कांच्या सुरक्षिततेची हमी दिलेली असेल. (४) वायव्य सरहद्द प्रांताला ताबडतोब प्रांताचा दर्जा देण्यात येईल. (५) सिंध प्रांताची निर्मिती करताना येणाऱ्या आर्थिक अडचणींचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जाईल आणि (६) संघराज्याची अर्थव्यवस्था, मताधिकार आणि मतदार संघ त्याचप्रमाणे संस्थानिकांबरोबर करावयाचे करार-मदार या प्रश्नांसंबंधी विचार करण्याकरता समित्या नियुक्त करण्यात येतील आणि त्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर गोलमेज परिषदेचे तिसरे अधिवेशन बोलावण्यात येईल.

---

प्रकरण चौदावे

## सरकार व जातीयवादी राजनिष्ठांकडून अलाहाबाद कराराला मूठमाती

गोलमेज परिषद निष्फळ ठरणार हे निरीक्षकांना आधीपासूनच अपेक्षित होते. लॉर्ड विलिंग्डन यांच्या हाती सूत्रे आल्यापासून सरकारी धोरण ताठ कडक बनू लागले. सरकार आणि राजनिष्ठ जातीयवादी यांची एकजूट अधिक बळकट झाली. तारीख १ ऑक्टोबर रोजी मुस्लीम प्रतिनिधींनी पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहातील काही सभासदांना सरकारशी एकनिष्ठ राहण्याचे वचन दिले होते. त्यांच्याकडून राष्ट्रवादी मुसलमानांवर अधिकाधिक जहरी हल्ले होऊ लागले उदाहरणार्थ जुलै १९३१ मध्ये डाक्याला भरलेल्या बंगाल मुस्लीम परिषदेत भाषण करताना डॉ. शफत अहमद खान यांनी आपल्या समाजाला लागलेला कलंक म्हणून राष्ट्रवादी मुसलमानांची संभावना केली. मध्यवर्ती कायदेमंडळातील प्रेस-बिलावरील चर्चेच्या वेळी ए. के. गझनवी यांनी काँग्रेसला अनुकूल असलेल्या वृत्तपत्रावर अत्यंत कडक टीका केली. काँग्रेसजन आणि त्यांना पाठिंबा देणारी वृत्तपत्रे यामुळे जीवन असह्य झाले असून त्यांच्या कारवायास वेळीच पायबंद घातला पाहिजे असे सांगून हे विधेयक आणल्याबद्दल त्यांनी सरकारला धन्यवाद दिले, परंतु सरकारने आणखी कडक भूमिका न स्वीकारल्याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले. संस्थानिक आणि दलित वर्गातील पुढारी सरकारला जाऊन मिळाल्यामुळे सरकारची बाजू अधिकच बळकट झाली. आगा खान आणि इतर काही जणांनी मिळून अल्पसंख्यांकाचा करार घडवून आणला, त्यापूर्वी सुमारे एक महिना गुरगाव येथे अखिल भारतीय दलितवर्गीय परिषद भरली होती. त्यावेळीच पुढील चाल कशी राहणार त्यासंबंधीची अटकळ आली होती. त्या परिषदेचे अध्यक्ष एम. सी. राजा यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचा ठराव केला असूनही त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही म्हणून काँग्रेसला दूषण दिले होते. दलित वर्गावर जुलूम करणारांचे हात बळकट करण्यासाठी म्हणून तर स्वराज्याची मागणी केली जात नाही ना अशी शंका व्यक्त करून त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीला जोरदार पाठिंबा दर्शविला होता. गांधी हे दलित समाजाच्या मागणीचा विचार मुसलमान किंवा शीख यांच्या समपातळीवरून करत नाहीत अशी त्यांनी टीका केली होती. आपल्या भाषणात त्यांनी असे प्रतिपादन केले होते की, हिंदू-मुसलमानांतील संघर्षाबाबत आपण तटस्थपणे केवळ बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही तर मुसलमान, अँग्लो इंडियन्स आणि भारतीय

ख्रिस्ती यांच्याशी संगनमत करून आपण सतत कृतिशील राहीले पाहिजे. प्रौढ मताधिकारावर आपला विश्वास असला तरी भारतातील आजच्या परिस्थितीत तो व्यवहार्य ठरणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले.

आपल्या पूर्वीच्या व्हाइसरॉयने दिलेला शद्ब मोडून लॉर्ड विलिंग्डन यांनी डॉ. अन्सारीच्या जागी गोलमेज परिषदेसाठी सर अलि इमाम यांची वर्णी लावली होती परंतु त्यांना राष्ट्रवादी मुसलमानांचा दृष्टीकोन परिषदेपुढे मांडण्याची संधी मिळाली नाही. त्यामुळे राष्ट्रवादी मुसलमानात वैफल्याची जी तीव्र भावना पसरली होती तिला पंजाब राष्ट्रवादी मुस्लीम परिषदेत मलिक बरकत अलि यांनी वाचा फोडली.

१९३१ साली शेती मालाचे भाव एकदम घसरले आणि खंडकऱ्यांना खंड भरणे अशक्य होऊन बसले. पंजाब कायदेमंडळाने एक ठराव करून जमीनधारा निम्म्यावर आणला. संयुक्त प्रांत कायदेमंडळानेही जमीनधारा आणि खंड सारख्या प्रमाणात कमी करण्यात यावेत अशी शिफारस केली. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त प्रांत काँग्रेस कमेटीने खंड कमी करून घेण्यासाठी जोरदार आंदोलन सुरू केले. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी सरकार, जमीनदार आणि काँग्रेस कमेटी यांच्यात बोलणी झाली. परंतु त्या त्रिपक्षीय वाटाघाटी निष्फळ ठरल्या आणि शेवटी अलाहाबाद जिल्हा काँग्रेस कमेटीने खंडबंदीचा लढा पुकारला. त्याला उत्तर म्हणून संयुक्त प्रांत सरकारने 'इमर्जन्सी पॉवर्स' वटहुकूम काढला आणि काँग्रेस पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर धरपकड केली.

वायव्य सरहद्द प्रांतात काँग्रेसने आपली दडपशाहीविरोधी मोहीम चालू ठेवली होती. वर्ष अखेरीस खान अबदुल गफार खान आणि डॉ. खान यांच्यासकट काँग्रेसचे बहुतेक सर्व पुढारी पकडले गेले. त्याचवेळी बंगालमधील परिस्थिती आणखीच चिघळली. निरनिराळ्या ठिकाणी झालेल्या जातीय दंगलींच्या वेळी पोलीसांनी जे पक्षपाती वर्तन केले त्यामुळे काँग्रेसचा प्रशासनावर विश्वासच राहीला नाही. मिदनापूर जिल्ह्यातील हिजली येथील स्थानबद्धांच्या छावणीवर पोलीसांनी जो बेछूट गोळीबार केला त्यात दोन स्थानबद्ध मरण पावले त्यामुळे संबंध देशात संतापाची एकच लाट उसळली. सरकारकडून गोळीबाराची जी चौकशी करण्यात आली त्यावरून गोळीबार सर्वस्वी असमर्थनीय होता असे निष्पन्न झाले. हिजली गोळीबाराचा निषेध करण्यासाठी देशात सर्वत्र निदर्शने झाली. त्याचबरोबर दहशतवादी चळवळीनेही डोके वर काढले. डाक्याचे जिल्हा मॅजिस्ट्रेट आणि युरोपियन असोसिएशनचे अध्यक्ष यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. सरकारने तावडतोब बंगाल क्रिमिनल लॉ वटहुकूम जारी केला. बंगाल प्रांत काँग्रेस कमेटीने बहिष्कार चळवळ पुन्हा हाती घेण्यात यावी अशी शिफारस करणारा ठराव केला. तारीख ८ नोव्हेंबर रोजी भरलेल्या काँग्रेस वर्किंग कमेटीच्या बैठकीत सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध करण्यात आला. बंगाल, संयुक्त प्रांत आणि वायव्य सरहद्द प्रांतातील परिस्थिती चिघळत चालली असून यापुढे

गोलमेज परिषदेत सहभागी होण्याने कसलाही फायदा होणार नाही असे गांधीच्या नजरेस आणून देण्यात आले व त्यांना तावडतोब भारतात परत येण्याची विनंती करण्यात आली. दुसऱ्या गोलमेज परिषदेचे सूप वाजवल्यानंतर तारीख २८ डिसेंबर रोजी गांधींनी मुंबई बंदरात पाऊल ठेवले. दडपशाहीच्या धोरणांचा आणि वटहुकुमांचा अवलंब केल्याबद्दल त्यांनी सरकारवर टीका केली आणि जोपर्यंत सरकार आपले दडपशाहीचे धोरण चालू ठेवील तोपर्यंत काँग्रेस गोलमेज परिषदेने नियुक्त केलेल्या कोठल्याही समितीच्या कामकाजात सहभागी होणार नाही असे घोषित केले. त्यांनी व्हाइसरॉयची भेट घेण्याची इच्छा प्रदर्शित केली परंतु ती भेट नाकारण्यात आली. काँग्रेसने पुन्हा सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली आणि गांधीना अटक झाली.

१९३१ च्या डिसेंबरात दिल्ली येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनाचे अध्यक्ष चौधरी झाफरूल्ला खान यांनी गोलमेज परिषदेत मुसलमान प्रतिनिधींनी जी भूमिका घेतली होती तिच्यावर शिक्कामोर्तब केले. केंद्र शासनाकडे कमीत कमी आणि घटक प्रांताकडे जास्तीत जास्त अधिकार असावेत. हे त्यांच्या भाषणाचे मुख्य सूत्र होते. ब्रिटीश हिंदूस्तानातील प्रतिनिधींच्या बरोबरीने संस्थांनी प्रतिनिधींची नियुक्ती करून त्यांना राज्य कारभारात अधिकार देणे त्यांना अजिबात मंजूर नव्हते. संरक्षण, परराष्ट्र संबंध आणि देशी संस्थानिकांबरोबरचे करार-मदार हे विषय ब्रिटीश राजाच्या अखत्यारीत असावेत आणि त्याबाबत व्हाइसरॉय हा थेट ब्रिटीश पार्लमेंटला जबाबदार असावा. तसेच सध्या केंद्र सरकारकडे असलेले बहुतेक विषय हे प्रांतिक सरकारांकडे वर्ग करावेत आणि अखिल भारतीय पातळीवरील सरकारी नोकऱ्या रद्द करून त्या प्रांतिक सरकारांकडे सोपविण्यात याव्यात अशा त्यांच्या मागण्या होत्या. भारतीय मुसलमानांचे स्वतःचे असे एक स्वतंत्र राष्ट्र असून राष्ट्र निर्मितीसाठी आवश्यक असलेली धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक एकता त्यांच्यापाशी आहे त्या-शिवाय समान संस्कृती, परंपरा आणि इतिहास यामुळे त्यांच्यात अविभाज्य बंधन निर्माण झाले आहे असे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन दिले. काँग्रेस आणि हिंदू महासभा जोपर्यंत मुसलमानांच्या मागण्या मान्य करीत नाहीत तोपर्यंत हिंदुस्तानला स्वातंत्र्य मिळू शकणार नाही असा जाहीर इशारा खानसाहेब शेख महंमद खान यांनी दिला. मुसलमान हे गरीब आणि दुर्बळ असले तरी त्यांनी हिंदूच्यां मार्गातील काटे बनून राहीले पाहिजे आणि आपल्या मागण्या पुऱ्या होईपर्यंत त्यांनी हिंदूंना सुखाने झोपू देता कामा नये. अशी डरकाळी फोडून त्यांनी पुढे असे घोषित केले की, मुसलमान दहशतवादी चळवळीला आणि संयुक्त प्रांतातील खंड बंदीच्या चळवळीला तोंड देतील. त्याचप्रमाणे देशात सविनय कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू झाली तर तिला विरोध करतील. मुस्लीम लीग आणि मुस्लीम कॉन्फरन्स यांचे विलिनीकरण घडवून आण-ण्यासाठी कॉन्फरन्सच्या नेत्यांशी वाटाघाटी करण्याचे अध्यक्ष व चिटणीस यांना अधिकार देणारा ठराव त्या अधिवेशनात पास झाला.

दहशतवादी चळवळ वाढत होती त्याचप्रमाणे सविनय कायदेभंगाच्या चळवळीला जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळत होता. एकट्या बंगालमध्ये १९३२ च्या जूनपर्यंत म्हणजे पहिल्या सहा महिन्यातच दहा हजारांवर स्वयंसेवकांना कारावासांच्या सजा फर्मावण्यात आल्या होत्या. सरकारचे धोरण अधिक ताठर बनून गांधी आयर्विन करारानुसार मागे घेण्यात आलेले अनेक वटहुकूम पुन्हा जारी करण्यात येऊ लागले. सरकारने अवलंबिलेल्या दडपशाहीच्या धोरणास सरकारधार्जिण्या अश्रफांनी संपूर्ण पाठिंबा दिला व मध्यवर्ती कायदेमंडळात त्यांचे हिरीरीने समर्थन केले व त्याबद्दल सरकारचे अभिनंदन करण्यासही कमी केले नाही. सर अबदुल्ला सुऱ्हावर्दी यांनी आपल्या भाषणातून जातीयवाद, दहशतवाद आणि सविनय कायदेभंग यामुळे हिंदुस्तानातील शांतता धोक्यात आली असून जोपर्यंत गांधी हयात आहेत तोपर्यंत सविनय कायदेभंगाचे शुक्लकाष्ट नाहिसे होणार नाही असे सभागृहाला बजावले.

संयुक्त मतदार संघासाठी बंगाल प्रांतिक मुस्लीम लीगने जे आंदोलन सुरू केले होते त्यामुळे तेथील अश्रफ वर्ग बिथरून गेला. संयुक्त मतदार संघाचे वारे थोपवून धरण्यासाठी ए. एच. गझनवी, सर अबदुल्ला सुऱ्हावर्दी, आणि बंगालमधील दोन मंत्री ख्वाजा नाझिमुद्दीन व नबाब बहादूर के. जी. एम. फरूकी यांनी तारीख ९ जुलै रोजी अ. बंगाल मुस्लिम परिषद आयोजित केली तत्पूर्वी एच. एस. सुऱ्हावर्दी आणि बंगालचे सेवानिवृत्त विभागीय आयुक्त खान बहादूर अबदूल मोमेन यांनी हिंदूंच्या विरूद्ध विद्वेष फैलावण्याची प्रचंड मोहीमच सुरू केली होती. ते दोघेही बंगाल कायदेमंडळाचे सभासद होते. परिषदेत नेहमीच्या मागण्यांचा पुनरूच्चार करण्यात आला. एका ठरावान्वये ब्रिटीश पार्लमेंटने परस्पर संपूर्ण स्वायत्त अशा प्रांताकडे सत्ता सुपूर्द करावी अशी मागणी करण्यात आली.

हिंदुस्तानच्या प्रश्नावर तज्ज्ञ समजले जाणारे ब्रिटीश, तज्ज्ञ १९२९ सालापासूनच मुसलमानांच्या मागण्यांचा नेमका अन्वयार्थ उलगडून दाखविण्याचा प्रयत्न करीत होते. उत्तर आणि वायव्य हिंदूस्तान संपूर्णपणे आपल्या नियंत्रणाखाली आणणे हा मुसलमानांचा उद्देश असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मोंटफर्ड सुधारणा लागू करण्यात आल्यापासून पंजाबमधील गुप्तचर विभागाचे प्रमुख जे. कोटमन, यांनी दुसऱ्या गोलमेज परिषदेनंतर थोड्याच दिवसात प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात असे म्हटले आहे की,

> संपूर्ण ब्रिटीश हिंदूस्तान, हिंदी, संस्थाने, आणि हिंदूस्तानला .राष्ट्राचा दर्जा प्राप्त होण्यासाठी अत्यावश्यक असलेला वायव्य सरहद्दीवरील विभाग या सर्वांचा समावेश असलेला एकात्म आणि सामर्थ्यशाली भारत निर्माण करणे उत्तरोत्तर अशक्यप्राय होवू लागले असून त्याऐवजी उत्तर आणि वायव्य भागात मुसलमानांचे प्रबळ राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आणि एकूण मुस्लीम जगताच्या दृष्टीने अगदी नाममात्र असलेल्या या विभागाचे लक्ष हिंदुस्तान ऐवजी मुस्लीम जगताकडे लागले आहे.

दुसऱ्या एका ठिकाणी या लेखकाने असे लिहून ठेवले आहे की, मुसलमानांची चाल आता ठरून गेली असून यापुढे एकातम भारत अस्तित्वात येणे जवळपास अशक्य होऊन बसले आहे, परंतु अद्यापही आशेला काही जागा असून ब्रिटीश सरकार ही प्रक्रिया थोपवून धरून तिला उलट दिशा लावू शकेल. गोलमेज परिषदेत नेमण्यात आलेल्या उपसमितीत जातीय प्रश्न ब्रिटीश पंतप्रधानांवर सोपविण्यात यावा अशी जी सूचना आली होती तिचा उल्लेख करून कोटमन विचारतात की, पंतप्रधान तरी याबाबत निवाडा कसा देऊ शकणार? कारण जी समस्या उभी आहे ती अत्यंत गहन आणि मूलभूत स्वरूपाची आहे. एकाद्या बाहेरच्या लवादाने वादातील दोन्ही बाजूकडील मागण्यांपैकी निम्म्या मागण्या मान्य करून त्यांचे समाधान करण्याचे तत्त्व अंगिकारावयाचे ठरविले तरी तेवढ्याने हा प्रश्न सुटणार नाही कारण असा निवाडा कोणतीच बाजू मान्य करणार नाही. म्हणून ब्रिटीश सरकारने लवादाची भूमिका स्वीकारण्याऐवजी हिंदुस्तानच्या ऐक्याच्या आड येणारी मूळ समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा.

याउलट गव्हर्नरांसकट काही ब्रिटीश अधिकारी हिंदुस्तानचा उल्लेख एक राष्ट्र म्हणून करण्याऐवजी उपखंड म्हणून करू लागले होते. सर जॉन कमिंग यांनी संपादित केलेल्या एका पुस्तकात १८९९ ते १९०५ पर्यंत अलिगडच्या एम. ए. ओ. कॉलेजचे प्राचार्य सर थिओडर मॉरिसन यांनी द्विराष्ट्रवादी सिद्धांताचा सविस्तर उहापोह केला होता, आणि लोकशाही संस्थांच्या अंमलाखाली टिकून राहण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या लढ्यात ते एकाकी पडणार नाहीत असा निर्वाळाही त्यांनी मुसलमानांना देऊन ठेवला होता.

> हिंदू आणि मुसलमान ही दोन अगदी स्वतंत्र राष्ट्रे असून युरोपातील इतर कोठल्याही दोन राष्ट्रांइतकीच ती भिन्न भिन्न आहेत. परकीय सरकारच्या विशेषत: लोकशाहीवादी आणि सर्व नागरिकांना समान दंडक लागू करू पाहणाऱ्या सरकारच्या अधिपत्याखाली मुस्लीम संस्कृती टिकून राहू शकणार नाही. आपली वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती टिकवून धरण्याची चिंता केवळ आपल्यालाच आहे असे मुसलमानांनी समजण्याचे काहीच कारण नाही.

अँग्लो-मुस्लीम जातीय वाद्याकडून मुस्लीम जनतेला स्वातंत्र्याच्या लढ्यापासून परावृत करून तिला फुटीरपणाच्या राजकारणात ओढण्याचे आटोकाट प्रयत्न केले जात होते. बहिष्काराच्या चळवळीबरोबर देशातील जातीय परिस्थिती चिघळत चाललेली पाहून या मंडळींनी तिचा पुरेपूर फायदा उठवला. मौलाना मौदुदी यांनी जमीयत-उल-उलेमामधून बाहेर पडून इस्लामच्या मूलतत्त्वाच्या नावावर धर्मांध प्रचार सुरू केला आणि काँग्रेसच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सामील झालेल्या उलेमांना तेथून फोडून आपल्या बाजूला वळवून घेतले. काश्मीरच्या राजाच्या अरेरावी कारभाराविरूद्ध तेथील जनतेने सुरू केलेल्या लढ्यालाही हिंदू विरूद्ध मुसलमान

अशा जातीयवादी लढ्याचे स्वरूप देण्यात आले.

मुसलमानांचे दुसरे एक धर्मगुरू ख्वाजा हसन निझामी, यांनी हिंदू-मुसलमान संबंधाविषयीचा एक जाहीरनामा १९२८ मध्ये प्रसिद्ध केला होता, त्यात असे म्हटले होते की, मुसलमान हे हिंदूंपेक्षा अगदी निराळे आहेत. त्यांचे हिंदूंच्या बरोबर ऐक्य घडून येणे कदापीही शक्य नाही. अनेक रक्तरंजित लढ्यानंतर मुसलमानांनी हिंदुस्तान जिंकून घेतला पुढे इंग्रजांनी तो मुसलमानांच्या हातून घेतला मुसलमान हे एक संघटित राष्ट्र असून हिंदुस्तानावर तेच हुकुमत चालवू शकतात ते आपले व्यक्तिमत्त्व कधीही सोडणार नाहीत. शेकडो वर्षे त्यांनी हिंदुस्तानावर राज्य केलेले असल्याने वहिवाटीचा हक्क म्हणून हिंदुस्तानावर राज्य करण्याचा अधिकार त्यांनाच पोहोचतो. जगात हिंदूंचा समाज हा अगदीच लहान आहे शिवाय त्यांची आपापसात नेहमी भांडणे चाललेली असतात.... दुसऱ्यावर राज्य करण्याची त्यांची कुवत आहे कोठे? मुसलमानांनी राज्य केलेले आहे आणि मुसलमान पुढेही राज्य करतील.

लाहोर कटाच्या खटल्यातील भगतसिंग आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांना फाशी देण्यात आल्यानंतर काही दुकानदारांनी आपली दुकाने बंद ठेवण्यास नकार दिल्याच्या कारणावरून कानपूर आणि इतर अनेक ठिकाणी जातीय दंगली उसळल्या. कानपूर दंग्याची परिणती मुस्लीम लीग आणि मुस्लीम कॉन्फरन्स यांच्या बरोबर एकजूट करावी अशी उघडपणे बाजू घेणारी प्रतिस्पर्धी जमीयत-उल-उलेमाची निर्मिती होण्यात झाली. १९३२ च्या मार्च महिन्यात शौकत अलींनी जाहीरपणे असा आरोप केला की, बहिष्काराची चळवळ ही नेमकी मुसलमान दुकानदारांपुरतीच आहे. अबदुल रहमान मीठा यांच्या वडीलांचे दुकान होते आणि त्यांना बहिष्काराच्या चळवळीची चांगलीच झळ बसली होती. अबदुल रहमान मीठा यांनी स्वतः एक पत्रक काढून वरील आरोपाचा इन्कार केला होता. तरी देखील शौकत अलींच्या चिथावणीखोर वक्तव्याने आणखीच कटुता निर्माण झाली. देशात जातीय दंगली ही तर काही ठिकाणी नित्याचीच बाब होऊन बसली. १९३२ साली देशातील एक अत्यंत भयानक असा जातीय दंगा मुंबईत उसळला तो कित्येक महिने धुमसत होता. त्यांत शेकडो माणसे प्राणास मुकली आणि जखमी झाली.

१९२० ते ३० च्या दरम्यान इस्लाम आणि प्रेषित महंमद यांचे अवमूल्यन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक हिंदूंना ठार करण्यात आले, श्रद्धानंद हे त्यापैकी नसले तरी त्यांच्या खुनाचे मौलाना मौदुदी यांनी धर्मयुद्धाच्या नावाखाली समर्थन करावयाला सुरूवात केली.

काश्मिर हा असाच एक अनेक वर्षे रेंगाळत पडलेला आणि जातीय तणाव निर्माण होण्यास कारणीभूत झालेला प्रश्न होता. तेथील राजा हिंदू आणि बहुसंख्य प्रजा मुसलमान असल्यामुळे जातीयवाद्यांनी त्याचा फायदा घेतला नसता तरच नवल. अलिगडमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि मुस्लीम लीगच्या अधिवेशनाला हजर

राहणाऱ्या काही मुसलमान विद्यार्थ्यांवर इकबाल यांच्या भाषणाचा फार पगडा बसला होता. इकबाल यानी मुस्लीम लीगच्या अलाहाबाद अधिवेशनातच प्रथम मुसलमानांना वायव्य भागात स्वत:ची जिव्हभू असली पाहिजे अशी घोषणा केली होती. काश्मीरच्या प्रशासनात मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळत नाही अशी तक्रार करणारी अनेक निवेदने काश्मीरच्या महाराजांना सादर करण्यात आली होती. १९३० च्या अखेरीस महाराजांनी संस्थानचा दिवाण म्हणून असलेल्या एका इंग्रजाऐवजी काश्मिरी पंडिताची नियुक्ती केली. जातीयवाद्यांना तेवढे निमित्त पुरेसे होते. महाराज गोलमेज परिषदेसाठी गेले असताना तरुण शेख अब्दुल्ला यानी मंत्रिमंडळाकडे एक शिष्टमंडळ नेऊन मुसलमानांसाठी नोकऱ्यात राखीव जागांची मागणी केली. शेख अबदुल्लांचे राजकारणात तेच पहिले पदार्पण. तिकडे इंग्लंडमध्ये महाराज काँग्रेसचा पाठपुरावा करणारी भाषणे करीत होते. त्यामुळे ब्रिटिश सरकार आणि मुस्लीम प्रतिनिधी हे दोघेही वैतागून गेले होते. गोलमेज परिषदेहून प्रतिनिधी हिंदुस्थानला परत आल्यापासून लाहोरच्या मुस्लीम वृत्तपत्रातून काश्मीरच्या हिंदू राजाविरुद्ध अत्यंत जहरी प्रचाराची मोहीम सुरू झाली. जळजळीत भाषेत द्वेषाचे वातावरण फैलावणारे लेख असलेले अंक हजारोंनी काश्मीरात पाठवले जाऊ लागले. धर्माच्या आणि प्रेषिताच्या नावाखाली लवकरच सुरू होणाऱ्या संघर्षात सहभागी होण्यास आणि सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी ठेवण्यास मुसलमानांना उद्युक्त करण्यात येऊ लागले. ठिकठिकाणी मुसलमानांना चिथावणी देणारी भाषणे होवू लागली. त्यातून जम्मू भागात काही प्रकरणे उद्भवली. परंतु एका युरोपियनाकडे बटलरचे काम करणाऱ्या काश्मीर बाहेरच्या एका बुटक्या, कुरुप मुसलमानाच्या भाषणाने तर आधीच स्फोटक बनलेल्या वातावरणात ठिणगी पडल्यासारखे झाले. अबदुल कादिर नावाच्या या माणसाने हिंदूंची सरसकट कत्तल करण्याचीच चिथावणी दिली. त्याला ताबडतोब अटक करण्यात आली. परंतु त्याचा खटला उभा राहण्यापूर्वी तुरुंगाबाहेर मुसलमानांचा प्रचंड जमाव जमला आणि परिस्थिती इतकी चिघळली की शेवटी पोलिस लाईनला आग लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या जमावावर पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्यात वीस जण मरण पावले त्यामुळे परिस्थिती आणखीनच बिघडली आणि एकंदर परिस्थिती पाहून महाराजांनी साऱ्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन समित्या नियुक्त केल्या.

काश्मीर प्रश्नामुळे मुसलमान खवळून उठले. गावोगाव जाहीर सभा घेण्यात आल्या. या सभातून राजकीय मागण्या मांडल्या जात. त्यांना एखाद्या तत्वप्रणालीचे स्वरुप प्राप्त झाले. त्या संबंधात कोटमन यांनी असे भाष्य केले की, काश्मीर प्रश्नामुळे हिंदू-मुसलमान संबंधाला कायमचा तडा गेला असून काही मुसलमानांकडून व्यक्त केली जाणारी फुटीरपणाची तत्वप्रणाली चांगलेच मूळ धरू लागली हे नाकारता येणार नाही.

पंजाबमध्ये राष्ट्रवादी मुसलमानांपैकी सनातनी वृत्तीच्या काही लोकांनी अहरार

या नावाच्या नव्या राजकीय पक्षाची स्थापना केली. या पक्षाने काश्मीरच्या लढ्याला पाठिंबा दर्शवून सत्याग्रह करण्यासाठी काश्मीरमध्ये स्वयंसेवकांचे अनेक जथे पाठविले. काश्मीरच्या सरहद्दीचे संरक्षण करण्यासाठी नेमलेले ब्रिटिश सोल्जर्स आणि पोलिस त्यांना तात्काळ अटक करीत. इतका लढा पेटल्यावर हिंदू महासभा तरी मग मागे कशी राहील ? जातीयवादी मुसलमानांच्या तोडीस तोड असा मुसलमानविरोधी जहरी प्रचार हिंदू महासभेनेही सुरू केला.

शेवटी ६ सप्टेंबर १९३३ रोजी सरकारने हिंदी संस्थानांच्या संरक्षणासाठी एक विधेयक आणले या विधेयकाद्वारे संस्थानांच्या कारभारावर टीका करणाऱ्या ब्रिटिश हिंदुस्थानातील वृत्तपत्रांना त्याचप्रमाणे संस्थानांविरुद्ध चळवळ करणारांना किंवा पाठविणाऱ्यांना शासन करण्याची तरतूद करण्यात आली होती. विधेयकावर काही महिनेपर्यंत चर्चा झाल्यानंतर दोन्ही सभागृहांनी ते मंजूर केले. परंतु या विधेयकाला एकाही मुसलमान सभासदाकडून विरोध झाला नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

फुटीरवृत्तीच्या जातीयवाद्यांकडून स्वतंत्र संग्रामात भाग घेणाऱ्या राष्ट्रवादी मुसलमानांच्या भावना भडकावून त्याना स्वातंत्र्याच्या लढ्यापासून फोडण्याचे खूप प्रयत्न झाले. परंतु ते फारसे यशस्वी ठरले नाहीत आणि मुसलमानही फार मोठ्या संख्येने लढ्यात सामील झाले. सत्तेसाठी चाललेल्या जातीय भांडणापेक्षा आर्थिक प्रश्न कितीतरी अधिक महत्वाचे आहेत याची दोन्ही समाजातील गरीब जनतेला जाणीव झाली होती. त्यामुळे सविनय कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू झाल्याबरोबर हजारो लोकांनी स्वतःला अटक करून घेतली. आर्थिक मंदीमुळे गरीब मध्यमवर्गातील सुशिक्षितांना वसाहतवाद्यांकडून आर्थिक शोषण कसे केले जाते आणि त्या कामी त्यांना स्थानिक हितसंबंधियांकडून कसे साहाय्य मिळते ते कळून चुकले होते. थोडक्यात म्हणजे राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्याला वाढत्या प्रमाणावर आर्थिक आशय प्राप्त होऊ लागला होता. सविनय कायदेभंगाच्या चळवळीप्रमाणेच शेतकऱ्यांच्या लढ्यालाही जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला होता. अश्रफ नेते मात्र जमीनदारांच्या बाजूने उभे ठाकले होते. संयुक्त प्रांताप्रमाणेच बंगालमधील शेतकऱ्यांवरही अनन्वित जुलूम होत होता. बंगालमधील मुसलमान कुळांच्या दडपणामुळेच बंगाल मुस्लीम लीगने वेगळीच भूमिका घेतली. जातीय मतदार संघ हे देशाला आणि मुसलमान समाजालाही घातक ठरले आहेत, असे जाहीर करून बंगाल प्रांतिक मुस्लीम लीगने जुन्या नेतृत्वाला मोठाच धक्का दिला. बंगालमधील ८६ टक्के जगाता जमीन कसणाऱ्यांपैकी होती. आणि त्यांना पुरेसे प्रतिनिधीत्व देणे क्रमप्राप्त होते. हिंदू आणि मुसलमान या दोघांनीही परिस्थिती सुधारावी म्हणून मुसलमान जनतेने हिंदू जनतेशी सहकार्य करावे असे आवाहन तिच्याकडून करण्यात आले. असे सहकार्य घडून यावयाचे असेल तर त्यासाठी स्वतंत्र मतदार संघाचा अडसर दूर झाला पाहिजे. परंतु काही स्वार्थी मंडळी स्वतःचा मतलब साधण्यासाठी बंगाली जनतेला वापरून घेत आहेत

असा उघड आरोप प्रांतिक मुस्लीम लीगने प्रसिद्ध केलेल्या त्या निवेदनात केला होता. अशाच तऱ्हेच्या आर्थिक प्रेरणेतून दलित वर्गाच्या चळवळीलाही चालना मिळाली. एकीकडे डॉ. आंबेडकर अश्रफांच्या हाताला हात लावून प्रौढ मताधिकारालाही विरोध करीत होते तर दलितांचे दुसरे एक पुढारी एम. सी. राजा हे हिंदू महासभेचे नेते डॉ. मुंजे यांच्याबरोबर वाटाघाटी करीत होते. या वाटाघाटीतून मुंजे-राजा कराराचा जो मसुदा २९ मार्च १९३२ रोजी प्रसिद्ध झाला त्यात प्रौढ मताधिकारासह संयुक्त मतदार संघ आणि दलित वर्गीयांसाठी राखीव जागांचा समावेश होता. राजा यांनी नंतर एक पत्रक प्रसिद्ध करून आंबेडकरांची भूमिका आपल्याला मान्य नसल्याचे जाहीर केले. आणि १० जुलै रोजी मुंबई येथे भरलेल्या अखिल भारतीय दलित-वर्गीय परिषदेत तर आंबेडकर आणि राजा यांच्या प्रतिस्पर्धी गटात उघडउघड चकमकीच घडल्या.

बंगालमधील खिलाफतवाद्यांनी संयुक्त मतदार संघांना आधीच अनुकूलता दर्शविली होती. नेहरु रिपोर्टला त्यानी दिलेल्या पाठिंब्यामुळे त्यावर्षी खिलाफत चळवळीत फार मोठी फूट पडली होती. बंगाल मुस्लीम लीगने देखील अखिल भारतीय नेतृत्वाविरुद्ध बंडाचे निशाण उभारले होते. आणि संयुक्त मतदार संघाचा हिरीरीने प्रचार चालविला होता. मौलवी अबदुस सयद यांनी स्वतंत्र मतदार संघ हे अराष्ट्रीय आणि जबाबदारीच्या सरकारशी विसंगत असल्याने त्याऐवजी संयुक्त मतदार संघ अंमलात आणावेत अशी शिफारस करणारा ठराव बंगाल कायदेमंडळात मांडला. त्यातील अराष्ट्रीय इ. शब्द गाळावेत आणि प्रौढ मताधिकार देण्यात येणार असेल तर संयुक्त मतदार संघ असावेत अशी उपसूचना तमिझुद्दिन खान यांनी मांडली. दोन दिवसांच्या चर्चेनंतर प्रौढ मताधिकाराचा आग्रह न धरता स्वतंत्र मतदार संघाऐवजी संयुक्त मतदार संघाची तरतूद करण्यात यावी असा ठराव सभागृहाने संमत केला. मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतावर स्वतंत्र मतदार संघ लादण्याचा जो निर्णय ब्रिटिश सरकारने घेतला होता तो मागे घेण्याची संधी या ठरावामुळे ब्रिटिश सरकारला आयतीच प्राप्त झाली होती. मॉंटफोर्ट आणि सायमन या दोघांनाही आपल्या अहवालात राष्ट्रीयत्वाचा विकास होण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या समान नागरिकत्वाच्या संकल्पनेला स्वतंत्र मतदार संघामुळे छेद बसतो असे स्पष्टपणे नमूद केले होते.

कोटमन यांनी देऊन ठेवलेला इशारा आणि स्वतंत्र मतदार संघाविरुद्ध बंगालमध्ये दिसून आलेली तीव्र प्रतिक्रिया यापैकी कशाचीही दखल न घेता ब्रिटिश पंतप्रधान रॅमसे मॅकडोनाल्ड यांनी दिनांक १६ ऑगस्ट रोजी आपला जातीय निवाडा जाहीर केला. या निवाड्यात मुसलमान, शीख, ख्रिश्चन, अँग्लो इंडियन्स आणि युरोपीय यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघाची तरतूद करण्यात आली होती. दलित वर्गीयांना खास स्वतंत्र मतदार संघाची हमी देण्यात आली होती. त्याशिवाय सर्वसाधारण

मतदार संघात मतदान करण्याचाही हक्क त्यांना देण्यात आला होता. स्त्रियांसाठीही स्वतंत्र मतदार संघ राहणार होते. मुस्लीम अल्पसंख्य असलेल्या प्रांतातील मुसलमानांचे प्रमाणाबाहेरचे प्रतिनिधित्व कायम ठेवण्यात आले होते. पंजाबात नवे कायदेमंडळ अस्तित्वात येईल त्यावेळी एकूण १७५ जागांपैकी ८६ मुसलमानांसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्याशिवाय जमीनधारकांच्या मतदार संघातील तीन जागा त्याना मिळू शकतील असे प्रलोभनही होतेच. त्या प्रांतातील हिंदूंना २७ तर शिखांना १८.८ टक्के जागा मिळणार होत्या. बंगालमध्ये मुसलमान, हिंदू आणि युरोपीय याना अनुक्रमे ४८.४, ३९.२ आणि १० टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या होत्या. मध्यवर्ती कायदेमंडळातील जातवार प्रतिनिधीत्वासंबंधीचा निर्णय पंतप्रधानांनी राखून ठेवला होता. निवाड्याला जोडलेल्या खुलाशात पंतप्रधानांनी असे म्हटले होते की, या प्रश्नावर आता अधिक वाटाघाटी करून काही निष्पन्न होण्याची शक्यता नाही. तथापि, सर्वसंमत अशी एखादी योजना कोठल्याही एका प्रांतासाठी किंवा संबंध ब्रिटिश हिंदुस्तानासाठी पुढे आली तर ती स्वीकारण्याची सरकारची तयारी आहे.

या निवाड्याबाबत संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त होणार हे अपेक्षित होते. पंजाब आणि बंगालच्या कायदेमंडळात मुसलमानांची बहुसंख्या राहील अशी कायदेशीर तरतूद करण्यात आलेली नाही, काही अल्पसंख्य मुस्लीम प्रांतातील मुसलमानांचे विशेषाधिकार कमी करण्यात आले आहेत आणि स्वतंत्र सिंध प्रांताच्या निर्मितीचा प्रश्न अनिर्णित ठेवण्यात आला आहे या कारणास्तव अखिल भारतीय मुस्लीम कॉन्फरन्सच्या कार्यकारी समितीने निवाड्याबद्दल नापसंती दर्शविली तर त्याच दिवशी बंगाल प्रांतिक मुस्लीम लीगने राखीव जागा विरहीत संयुक्त मतदार संघ ठेवण्यात आले नाहीत म्हणून जातीय निवाड्याचा धिक्कार करणारा ठराव केला. बंगाल राष्ट्रवादी मुस्लिम पार्टीनेही त्याच कारणास्तव ब्रिटिश पंतप्रधानांचा निवाडा फेटाळून लावला. अर्थात निवाडा फेटाळण्याची आणखीही काही कारणे नमूद करण्यात आली होती शिखांच्या निरनिराळ्या गटानीही त्यांना हा निवाडा मंजूर नसल्याचे जाहीर केले. २४ सप्टेंबर रोजी कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये निवाड्यावर चर्चा झाली. ह्यात खान नून, हुसेन इमाम आणि चौधरी झाफरुल्ला खान यांनी निवाड्याला पाठिंबा दर्शवला. संस्थानिकांनी संघराज्यात सामील व्हावे म्हणून त्यांचे मत वळविण्यासाठी मुसलमान समाज स्वतःच्या हितसंबंधावर पाणी सोडण्यास तयार होणार नाही असे सैयद मुहम्मद पादशहा यांनी सभागृहाला सांगितले. कुरकुरत का होईना परंतु मध्यवर्ती कायदेमंडळातील यच्चयावत सर्व मुसलमानांनी निवाड्याला मान्यता दिली. पंजाब कायदेमंडळात या विषयावर चर्चा सुरू झाली त्या दिवशी हिंदू व शीख सभासदांनी सभागृहावर बहिष्कार टाकला. आसाममधील मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळालेले नाही त्याचप्रमाणे पंजाब आणि बंगालमध्ये मुसलमानांसाठी बहुसंख्य जागा ठेवण्याची कायदेशीर तरतूद नाही या कारणास्तव मुस्लीम लीगनेही

निवाडयालाही विरोध असल्याचे दिनांक ४ सप्टेंबर रोजी जाहीर केले.

अशा परिस्थितीत राष्ट्रवादी मुसलमानांनी वाटाघाटीतून समझोता घडवून आणण्यांच्या कामी पुढाकार घेण्याचे ठरविले. या प्रयत्नात सहभागी होण्यासाठी मालवीय आणि शौकत अली यांचे मन वळविण्यात आले. गांधीजींची तुरुंगात भेट घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. परंतु, त्यांच्या भेटीची परवानगी नाकारण्यात आली. अशा तऱ्हेने इकडे गांधींना भेटून सर्वमान्य तोडगा काढण्याचे प्रयत्न चालू होते. तर त्याच वेळेला तिकडे ७ ऑक्टोबरला इकबाल आणि इतर बारा वीस जणांनी एक पत्रक काढून ती कल्पना मोडून काढली. स्वतंत्र विरुद्ध संयुक्त मतदार संघ असा प्रश्न पुन्हा उकरून काढणे अत्यंत अप्रस्तुत ठरेल असे त्या पत्रकात म्हटले होते. जातीय निवाडयामुळे स्वस्थता निर्माण झाली आहे. पण पुन्हा एकदा जुनी राजकीय खपली उकरून काढून राष्ट्रीय मुसलमान हे समाजात आणखी बेबनाव निर्माण करीत आहेत याबद्दल सर. एम. याकूब यांनी एक वेगळे पत्रक काढून खेद प्रदर्शित केला. यापूर्वी झालेले ऐक्याचे प्रयत्न हिंदूंनी सफल होऊ दिलेले नसताना मुसलमानांनी आता पुन्हा त्यांचे दार ठोठावयाला जाणे शहाणपणाचे ठरणार नाही असे मत व्यक्त करून त्यांनी पुढे हिंदूंना असा उपदेश केला की, प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यानंतर हिंदूंनी मुसलमानांशी चांगले वागून आपली विश्वासार्हता सिद्ध करावी. आणि मुसलमानांची जर अशी खात्री झाली की, हिंदूंच्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही तर त्यावेळी मग समझोत्यासाठी त्यांच्याशी वाटाघाटी करता येतील. गांधीच्या भेटीची परवानगी मागणारे जे पत्र शौकत अलींनी व्हाइसरॉयला लिहिले होते त्याला पाठवलेल्या उत्तरात व्हाइसरॉयनी अशी मेख मारून ठेवली की, तुमचे प्रयत्न स्तुत्य असले तरी तुम्ही जी पावले उचलणार आहात त्याबाबत मुसलमान समाजातील सर्वांचे एकमत आहे याबद्दल स्वतःची खात्री करून घ्या. ऐक्याच्या प्रयत्नाला विरोध करणारी दोन निवेदने प्रसिद्ध झालीच होती. त्यात नॅशनल सेंट्रल मुहामेडन असोसिएशनच्या ऐक्य प्रयत्नाला विरोध करणाऱ्या पत्रकाने आणखी भर पडली. त्याच दिवशी सर अबदुल्ला सुऱ्हावर्दी आणि ए. एच. गझनवी यांनी ऐक्याचे प्रयत्न पुढे चालू ठेवणे व्यर्थ आहे अशा आशयाचे पत्रक प्रसिद्ध केले. सरकारधार्जिण्या जातीयवाद्यांकडून असा विरोध होत असला तरीही १६ ऑक्टोबर रोजी लखनौ येथे सर्वपक्षीय मुस्लीम परिषद बोलावण्यात आली. परिषदेत महंमद अलींच्या मसुद्यानुसार संयुक्त मतदार संघांना मान्यता देण्याच्या सूचनेवर शिक्का मोर्तब केले गेले. त्यानंतर आठवडाभरानेच मुस्लीम लीगच्या कौन्सिलने जोपर्यंत मुसलमानांच्या सध्याच्या परिस्थितीत विशेष सुधारणा घडवून आणणारी दुसरी एकादी पर्यायी योजना पुढे येत नाही तोपर्यंत जातीय प्रश्न पुन्हा उपस्थित करण्यास आपला विरोध असल्याचे जाहीर करणारा ठराव पास केला.

ऐक्य परिषदेचे पहिले अधिवेशन दिनांक ३ नोव्हेंबर पासून पंधरवडाभर अलाहाबाद

येथे चालले होते. कॉंग्रेस, हिंदू महासभा, लिबरल फेडरेशन, नॅशनॅलिस्ट पार्टी, खिलाफत परिषद, मुस्लिम परिषद, राष्ट्रवादी मुसलमान, शिखांचे निरनिराळे पक्ष, जेयूयू, मुस्लिम लीग, अहरार, शिया परिषद, ख्रिश्चन असोसिएशन हे पक्ष त्याशिवाय व्यापारी, जमीनदार आणि सिंध व पंजाबमधील हिंदू यांचे प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित होते. परिषदेच्या २३ बैठकीत मिळून एकूण १३६ तास कामकाज झाले. पंजाब आणि बंगाल या मुस्लीम बहुसंख्य प्रांतातील कायदेमंडळात मुसलमान सभासद बहुसंख्य राहतील अशी कायदेशीर तरतूद, मध्यवर्ती कायदेमंडळात मुसलमानांना ३२ टक्के प्रतिनिधीत्व, स्वतंत्र सिंध प्रांताची निर्मिती इ. कलमांचा अंतर्भाव असलेला महंमद अली मसुदा आधारभूत मानून संयुक्त मतदार संघ असावेत यावर परिषदेत एकमत झाले तरीही ऐक्याला मोडता घालण्याचे प्रयत्न चालूच होते. मुस्लीम कॉन्फरन्सची वर्किंग कमेटी मुस्लीम लीग कौन्सिल, फुटीर जेयूयू, यांची संयुक्त बैठक दिल्ली येथे भरून तीत जोपर्यंत मुसलमानांनी केलेल्या मागण्या मान्य होत नाहीत तोवर अलाहाबादचा समझोता स्वीकारता येणार नाही असे जाहीर करण्यात आले.

दिनांक १२ डिसेंबर रोजी लखनौ येथे सर्वपक्षीय मुस्लीम परिषदेची पुन्हा बैठक भरली. अलाहाबाद परिषदेने संमत केलेल्या समझोत्याच्या मसुद्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली आणि ऐक्य परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनासाठी ५० प्रतिनिधी पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या बैठकीचे अध्यक्ष सर झुल्फिकार अलीखान यांनी असे निदर्शनास आणून दिले की, जातीय निवाड्यामुळे जीनांच्या मसुद्यांतील विशेषाधिकार आणि मतदार संघ फक्त दोनच कलमे मंजूर होतात. परंतु अलाहाबाद मसुद्यामुळे जीनांची १४ ही कलमे मान्य होतात. असे असून काही गट आणि व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी संबंध समाजाच्या हितावर निखारे ठेवण्यास तयार व्हावेत याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला.

मुस्लीम लीगमध्ये इतके मतभेद होते की, तिची बैठकच होऊ शकली नाही. २६ ते २८ डिसेंबरपर्यंत मुस्लीम कॉन्फरन्स आणि फुटीर जेयूयू यांची अधिवेशन होवून दोघांनीही अलाहाबादचा समझोता फेटाळून लावला. त्याआधी दोनच दिवस भारत मंत्र्यांनी संघराज्याच्या कायदेमंडळात आणि सरकारात मुसलमानांना ३३$\frac{1}{3}$ टक्के जागा कायद्याने दिल्या जातील अशी मूळच्या जातीय निवाड्याला पुस्ती जोडली. अशा तऱ्हेने ऐक्य परिषदेत सहभागी होणाराकडून जे कळकळीचे प्रयत्न केले जात होते ते ब्रिटिश सरकार आणि त्याची तळी उचलणारे राजनिष्ठ अश्रफ यांच्याकडून धुडकावून लावले जात होते. मध्यवर्ती खिलाफत समिती, जेयूयू, अफगाण जिरगा, अहरार, मुस्लीम यूथ लीग आणि नॅशनॅलिस्ट मुस्लीम पार्टी यांच्या संयुक्त बैठकीत असा ठराव पास करण्यात आला की, कलकत्ता येथे भरलेले मुस्लीम कॉन्फरन्सचे अधिवेशन हे कायदेशीर नव्हते कारण वरील संघटनांनी त्या अधिवेशनात भाग घेतला नव्हता. या अधिवेशनात भाषण करताना मौलाना आझाद यानी असे सांगितले की, जीनांची

१४ कलमे स्वीकारण्यास वस्तुतः त्यांचा विरोध होता. परंतु केवळ समझोता घडून यावा या भावनेने त्यांनी त्याला मान्यता दिली. परंतु लखनौच्या पहिल्या अधिवेशनात ही चौदा कलमे स्वीकारण्यात आल्याबरोबर मुस्लीम कॉन्फरन्सच्या कार्यकारी मंडळाने नवी सहा कलमे पुढे आणली. वाटाघाटीने सर्वसंमत तोडगा निघू द्यावयाचा नाही हाच त्यामागील हेतू होता हे उघड आहे.

एका बाजूने वाटाघाटीने समझोता घडवून आणण्याच्या प्रयत्नात खो घालीत असतानाच दुसऱ्या बाजूला फुटीरवादी राजनिष्ठ हे भारतात केन्द्र सरकार असे नसावेच आणि असलेच तर ते अगदी नाममात्र आणि अत्यंत दुर्बळ असे राहावे ही आपली मागणी पुढे रेटण्याचा प्रयत्न करीत होते. हिंदुस्थानात मध्यवर्ती सरकार अस्तित्वातच असू नये आणि प्रांतानाच वासाहतिक दर्जा देण्यात येवून ते थेट भारत मंत्र्यांच्या अखत्यारीत असावेत असा प्रचार इकबाल तिसऱ्या गोलमेज परिषदेला इंग्लंडला गेले असताना तेथे करीत होते. संस्थानांसकट ब्रिटिश हिंदुस्तानांतील सव प्रांतावर कर बसविण्याचा संघराज्याच्या सरकारला अधिकार असावा अशी सूचना हुसेन इमाम यांनी कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये केली असता व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळातील शिक्षण मंत्री (एज्युकेशन मेंबर) चौधरी झाफरुल्ला खान यानी तिला विरोध केला. बंगाल कायदेमंडळात खान बहादूर अबदुल मोमेन यानी दिनांक १३ मार्च १९३३ रोजी अखिल भारतीय पातळीवरच्या सरकारी नोकऱ्या रद्द करून टाकण्यात याव्यात अशी मागणी करणारा ठराव आणला होता. याबाबत त्यांनी केलेला युक्तिवाद असा होता की, अखिल भारतीय स्वरुपाच्या नोकऱ्यांची पद्धती प्रांतिक स्वायत्तेच्या कल्पनेशी विसंगत आहे. अशाच तऱ्हेची मागणी संयुक्त प्रांताच्या कायदे-मंडळातही करण्यात आली होती. उच्च न्यायालये ही सर्वस्वी प्रांतांच्या अखत्यारीत असावीत अशी मागणी मुस्लीम कॉन्फरन्सच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २६ मार्चच्या ठरावाने केली होती.

केंद्रीय सत्ता शक्य तेवढी दुर्बळ करून ठेवण्याची पुढाऱ्यांची खटपट चालू असतानाच इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असलेल्या काही पंजाबी मुसलमान विद्यार्थ्यांनी पाकिस्तान निर्मितीच्या चळवळीचा पाया घातला. चौधरी रहमत अली आणि इतर तीन मुस्लीम विद्यार्थ्यांनी मिळून "आता - नाही तर मग कधीच नाही." ( Now or never ) या नावाचे पुढे खूप गाजलेले चोपडे प्रकाशित केले. त्यात असे प्रतिपादन करण्यात आले होते की, भारत हा एक देश नाही. त्याचप्रमाणे तो कोठल्याही एका राष्ट्राची भूमि नाही. गोलमेज परिषदेत मुसलमान प्रतिनिधींनी संबंध हिंदुस्तानचे एक संघ राज्य बनविण्यास तत्वतः मान्यता देऊन मुस्लीम राष्ट्राचा विश्वासघात केला आहे असा आरोप त्या पुस्तिकेत मुसलमान प्रतिनिधींवर करून पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, काश्मिर, सिंध आणि बलुचिस्तान यांचे मिळून मुस्लीम संघराज्य बनविण्यात यावे अशी त्या पुस्तिकेत मागणी करण्यात आली होती. या भागात मुसलमानांची

संख्या ७५ टक्के असून धर्म, संस्कृती, इतिहास, परंपरा, सामाजिक रीतिरिवाज, अर्थव्यवस्था आणि नागरी कायदे या निकषावर तो भाग हे एक स्वतंत्र राष्ट्र ठरते. असा त्या पुस्तिकेत दावा केला होता. या विद्यार्थ्यांनी पाकिस्तान नावाचे एक साप्ताहिक सुरू केले. मुसलमानांना स्वतंत्र पितृभूमी मिळाली पाहिजे ही कल्पना नवी नव्हती हे आपण वर पाहिलेच आहे. देशाची फाळणी करून उत्तर भारत मुसलमानांच्या आणि दक्षिण भारत हिंदूच्या ताब्यात द्यावा लागेल अशी कल्पना ब्लंट यांनीही मांडलेली होती. तसेच १९२३ साली वायव्य सरहद्द प्रांत कमेटीपुढे साक्ष देताना प्रांतिक इस्लामिक अंजुमानचे अध्यक्ष सरदार गुलखान यांनी असे निवेदन केले होते की,

> हिंदू-मुसलमान ऐक्य कधीही घडून येवू शकणार नाही. आणि हिंदू आणि मुसलमान यांचे विभक्तीकरण होईलच होईल अशीच आमची धारणा आहे. २३ कोटी हिंदू हे दक्षिणेकडे राहतील. तर ८ कोटी मुसलमान उत्तर हिंदुस्तानात राहतील. थेट रासकुमारी (कन्याकुमारी) पासून तो आग्र्यापर्यंतचा सगळा मुलुख हिंदूंच्या हवाली करा आणि उरलेला आग्र्यापासून पेशावरचा भाग मुसलमानांकडे सोपवा.

"**दि इंडियन मुस्लीम**" या नावाचे एक पुस्तक "**एक भारतीय मुसलमान**' या टोपण नावाखाली १९२८ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यात सदर लेखक म्हणतो :

> भारताच्या सरहद्दीच्या आत एक हिंदू आणि एक मुसलमान अशी दोन राष्ट्रे नांदत आहेत. युरोपातील फ्रेंच आणि जर्मन यांच्या परस्परांशी ज्या भावना असतात तशाच त्या हिंदू आणि मुसलमानात यांच्या एकमेकाविषयी असतात आणि युरोपातील कोणतेही दोन राष्ट्रे एकमेकांपासून जितकी भिन्न असतील त्याहूनही हिंदू आणि मुसलमान एकमेकाहून जास्त निराळे आहेत. भारतीय समाजाची उभारणी या मूलभूत वस्तुस्थितीच्या आधारे झालेली असून तिची दखल न घेता बनवलेली घटना कोसळून पडल्याशिवाय राहणार नाही.

हिंदू आणि मुसलमान यांची संस्कृती स्वतंत्र आहे आणि त्यात संघर्ष निर्माण झाल्याविना राहाणार नाही. ती दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत आणि स्वयंनिर्णयाच्या तत्वावर त्यांचे विभाजन झाले पाहिजे अशा तऱ्हेची विचारसरणी अनेकांकडून वृत्त पत्रीय लेखांतून आणि पुस्तक रूपाने प्रस्तुत केली जात होती. १९१७ साली स्टॉक होमला भरलेल्या सोशलिस्ट इंटरनॅशनलच्या बैठकीतही खेदरी बंधूंनी या विचार सरणीला वाचा फोडली होती. एम. ए. क्यू. बिलग्रामी यांनी तर १९२० सालीच गांधींना लिहिलेल्या अनावृत पत्रात जिल्ह्या जिल्ह्यापासून भारताची फाळणी कशी करावयाची त्याची तपशीलवार योजनाच सादर केली होती. हे पत्र पुढे पुस्तिकेच्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यात आले आणि त्याच्या कित्येक आवृत्त्या निघाल्या. तोच धागा पकडून १९२१ साली नादीर अली नावाच्या वकिलांनी ही अशीच योजना मांडली होती.

१९३३ साली जवाहरलाल नेहरुंनी गोलमेज परिषदेत सहभागी झालेल्या मुसलमान पुढाऱ्यांनी जी प्रतिगामी आणि फुटीरपणाची भूमिका स्वीकारली होती त्याबद्दल त्यांच्यावर टीका केली होती. त्यांच्या या टीकेचा समाचार घेताना इकबाल यांनी नेहरुंना असे सुनावले होते की, हिंदुस्तानातील राजकीय पुढारी या देशातील जमातीत जणू काही वांशिक संयोग घडून येईल आणि अशा काहीशा समजुतीवर भारत हे एकात्म राष्ट्र आहे या कल्पनेच्या मायाजाळातून जितक्या लवकर बाहेर येतील तितके ते सर्वांच्याच दृष्टीने हितावह ठरेल. त्यांच्या मते हिंदुस्तानपुढे दोनच पर्याय होते, एक म्हणजे ब्रिटिशांचे कायमचे वर्चस्व पत्करणे किंवा धर्म, इतिहास आणि संस्कृती यांच्या आधारावर देशाची फेर वाटणी करणे.

प्रकरण पंधरावे

# मुस्लीम जातीयवाद्यांच्या नेतृत्वपदी जीना

ऑगस्ट १९३२ मध्ये ब्रिटिश पंतप्रधानांनी जो जातीय निवाडा जाहीर केला त्यात दलित वर्गीयांसाठीही स्वतंत्र मतदार संघाची तरतूद करण्यात आली होती. त्यावेळी गांधी येरवड्याच्या तुरुंगात होते. या प्रश्नावर त्यांनी आपले प्राण पणाला लावण्याचे ठरविले आणि एक महिन्यानंतर आपण आमरण उपोषणास सुरवात करू असे रॅम्से मॅकडोनाल्ड यांना कळविले. गांधीचे प्राण वाचविण्याच्या उद्देशाने मालवीय यांनी निरनिराळ्या पक्षांतील हिंदू पुढाऱ्यांची एम्. सी. राजा आणि डॉ. आंबेडकर यांच्याशी भेट घडवून आणली. गांधींच्या उपवासाच्या पाचव्या दिवशी सुप्रसिद्ध पुणे करार ओळखल्या जाणाऱ्या करारावर सह्या झाल्या. जातीय निवाड्यातील दलित वर्गीयांच्या स्वतंत्र मतदार संघाऐवजी दलित वर्गीयांच्या बाबतीत निवडणूक दोन टप्प्यात घेण्यात यावी. पहिल्या टप्प्यात दलित वर्गीयांच्या स्वतंत्र मतदार संघातून दलितांनी आपले चार उमेदवार निवडून द्यावे आणि दुसऱ्या टप्प्यात संयुक्त मतदार संघातून सर्व साधारण मतदारांनी या चार उमेदवारांपैकी एकाची निवड करावी या गोष्टीस दलितवर्गीय नेत्यांनी मान्यता दिली. त्या बदल्यात हिंदू पुढाऱ्यांनी जातीय निवाड्यात दलितांना जितक्या जागा देण्यात आल्या होत्या त्याच्या दुप्पट जागा देण्याची तयारी दर्शविली. सुदैवाने या पुणे करारावर सह्या झाल्या त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यातील शर्ती मान्य असल्याची सरकारी घोषणा एकाच वेळी दिल्ली आणि लंडनहून करण्यात आली. १९३३ च्या मध्यापर्यंत सविनय प्रतिकाराची चळवळ जवळ जवळ थंडावली होती. जातीय निवाड्यातील इतर तरतुदींविरुद्ध देशात अनेक परिषदा होऊनही सरकार आणि जातीयवादी मुसलमान त्याला चिकटून बसले होते. त्यामुळे जातीय निवाडा काही आता रद्द होत नाही, ती गोळी कितीही कडू असली तरी आपल्याला गिळावी लागणार अशा निष्कर्षाप्रत राष्ट्रवादी मुसलमानही येवून ठेपले होते. अशा तऱ्हेने मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदार संघाची निश्चिती झाली होती.

काँग्रेसमधील अणे-मालवीय गटाने जातीय निवाड्याविरुद्धचा आपला जोरदार प्रचार चालूच ठेवला होता. त्याचप्रमाणे हिंदू महासभा आणि शीख समाजातील सर्व गटांनीही जातीय निवाडा विरोधी अनेक परिषदा संघटित केल्या होत्या. परंतु जातीय निवाडा स्वीकारवा लागणार असे अत्यंत नाराजीने म्हणणारे राष्ट्रवादी मुसलमानही १९३४ पासून जातीय निवाडा विरोधी आंदोलनाचा निषेध करू लागले.

काँग्रेस मोठ्या शृंगापत्तीत सापडली होती. काँग्रेस वर्किंग कमेटीने असहाय्यपणे जातीय निवाड्याबाबत तटस्थतेची भूमिका स्वीकारली. काँग्रेसच्या या संदिग्ध भूमिकेमुळे मालवीय आणि अणे काँग्रेसबाहेर पडले. त्यानी काँग्रेस नॅशनॅलिस्ट पार्टीची स्थापना केली आणि काँग्रेसमध्ये आणखी एकदा फूट पडली.

दिनांक १ एप्रिल १९३४ रोजी डॉ. अन्सारी यांनी काँग्रेस पुढाऱ्यांची एक परिषद आयोजित केली होती. त्या परिषदेत स्वराज्य पार्टीच्या नावाने पुन्हा कौन्सिल प्रवेशाचा कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हणजे एका तऱ्हेने इतिहासाची पुनरावृत्ती घडून आली. त्यानंतर थोड्याच दिवसात पाटणा येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या अधिवेशनात कौन्सिल प्रवेशाच्या कार्यक्रमास मान्यता देण्यात आली व कायदेमंडळाच्या आगामी निवडणुका लढविण्यासाठी पार्लमेंटरी बोर्ड नियुक्त करण्यात आले. या अधिवेशनात काँग्रेसने स्वीकारलेला कार्यक्रम जुन्या स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमापेक्षा बराच मवाळ होता. कायदेमंडळातून सरकारची अडवणूक करण्याचा कार्यक्रम सोडून देण्यात आला. स्वराज्याच्या राष्ट्रीय मागणीसाठी आणि घटना समिती बोलाविण्यासाठी समविचारांच्या सर्व पक्षांची एकजूट उभारणे यावर भर देण्याचे अधिवेशनात ठरविण्यात आले. कार्यक्रमाला अधिक जहाल वळण देण्याच्या हेतूने सुचविण्यात आलेल्या सर्व उपसूचना अधिवेशनात फेटाळण्यात आल्या. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यात पुन्हा एकदा तट पडले. युवक चळवळीतील काही जहाल विचार-सरणीच्या पुढाऱ्यांनी काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीची स्थापना केली. अर्थात स्वतंत्र पक्ष म्हणून काम न करता काँग्रेसमध्ये राहूनच कार्य करीत राहण्याचे या पार्टीने ठरविले होते. वृत्तपत्रातून आणि सभातून मात्र जातीय निवाडा आणि कौन्सिल प्रवेश या दोन प्रश्नावर काँग्रेसच्या नेतृत्वावर कडक टीका होऊ लागली.

खुद्द मुस्लीम लीगच्या नेतृत्वाबाबत याच काळात एक महत्वाची घटना घडून आली. यापूर्वी मुस्लीम लीगवर ज्यांचे वर्चस्व होते असे बहुतेक सर्व नेते एक तर वार्धक्यामुळे निष्क्रीय झाले होते किंवा कालवश झाले होते. त्यामुळे ही पोकळी भरून काढू शकेल असा एकच नेता उरला होता आणि तो म्हणजे जीना. साहजिकच त्यांच्यावरच सर्वांचे डोळे खिळून राहिले होते. अलाहाबाद समझोता घडून येण्याच्या थोडेच दिवस अगोदर लंडनहून आपल्या मुंबईतील एका अनुयायाला तार पाठवून त्यानी असे कळविले होते की, मुसलमानांनी (जीनांच्या) १४ कलमांचा आग्रह सोडू नये. परंतु इतर बाबतीत समाधानकारक तडजोड होत असेल तर केवळ स्वतंत्र मतदार संघाच्या प्रश्नावर वाटाघाटी फिसकटू देऊ नयेत. तथापि या घटनेनंतर अवघ्या दीड महिन्यांनी म्हणजे १९३२ च्या नोव्हेंबरात समझोता जवळ जवळ पक्का होत आला असताना त्यांनी लंडनहून एक पत्रक प्रसिद्ध केले त्यात अलाहाबाद करारामुळे फारसे काही साध्य होऊ शकणार नाही असा निराशाजनक सूर होता. भारतात परत येऊन फाटाफुटीने ग्रासलेल्या मुस्लीम लीगचे नेतृत्व आपल्या हाती घ्यावे अशी अनेकांनी

त्यांना विनंती केली होती. त्याप्रमाणे १९३४ साली भारतात परत आल्यावर जीनांनी मुस्लीम लीगच्या कौन्सिलची बैठक बोलावली. या बैठकीला लीग मधील अनेक दुय्यम पुढाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. काही राष्ट्रवादी मुसलमानही त्या बैठकीला उपस्थित राहिले होते. जीनांच्या नेतृत्वाखाली मुस्लीम लीगची दारे सर्वांना खुली केली जातील अशी आशा असफ अली यांनी व्यक्त केली. एम्. सी. छगला आणि असफ अली यांनी अनुक्रमे मुंबई आणि दिल्ली येथे लीगच्या शाखा संघटित करण्याची जबाबदारी पत्करली. बैठकीच्या अखेरीस जीनांनी एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी जातीय निवाड्याला पाठिंबा देवून स्वायत्त सरकारच्या मागणीतही सहभागी होऊ असे जाहीर केले. डॉ. अन्सारी यांनी या घटनेचे मनःपूर्वक स्वागत करून जिना ऐक्य घडवून आणण्याचे प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असल्याबद्दल आपल्याला खात्री वाटत असल्याचे सांगितले. या बैठकीत मुस्लीम लीगचे संघटक म्हणून निर-निराळ्या प्रांतात ज्यांची नेमणूक करण्यात आली त्यात काही कट्टर राजनिष्ठ होते तर काही राष्ट्रवादीही होते. डॉ. अन्सारी यांनी राष्ट्रीय मागणीत दडप-शाही कायदे मागे घेणे आणि घटना समिती बोलावणे यांचा समावेश होतो हे स्पष्ट केले. आणि जो सर्वसंमत जातीय तोडगा निघेल तो या राष्ट्रीय मागणीचा अविभाज्य घटक असेल असा विश्वास व्यक्त केला होता. एकूण हा आशावाद जबरदस्त होता. सर्वसंमत जातीय तोडगा किंवा कॉंग्रेसशी सहकार्य यापैकी कशातच जीनांना रस नव्हता हे वर्षाच्या आत दिसून आले. त्यामुळे डॉ. अन्सारी यांचा भ्रमनिरास झाला आणि वैफल्यग्रस्त बनून त्यांनी १९३५ च्या सुरवातीलाच कॉंग्रेस वर्किंग कमेटीचा राजीनामा दिला आणि तेथून पुढे ते भारतीय राजकारणातूनच कायमचे अस्तंगत झाले. १९३४ जुलैत सरकारने जातीय निवाड्याचा तिसरा भाग जाहीर केला. तो सरकारी नोकऱ्यांतील राखीव जागासंबंधीचा होता. भारत सरकारच्या आणि रेल्वे-तील नोकऱ्यात २५ टक्के जागा मुसलमानांसाठी आणि ८.७५ टक्के जागा इतर अल्पसंख्यांकासाठी राखून ठेवण्यात आल्या. इतर अल्पसंख्यांकांमधून योग्य उमेदवार न मिळाल्यास त्या जागांवर मुसलमानांतील योग्य उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावयाची होती. दिनांक १३ ऑगस्ट रोजी भरलेल्या मुस्लीम लीग आणि मुस्लीम कॉन्फरन्सच्या वर्किंग कमेटीच्या बैठकीत लोकसंख्येच्या प्रमाणानुसार मुसलमानांना ३३.३३ टक्के जागा मिळावयास पाहिजे असताना फक्त २५ टक्के जागाच त्यांच्या-साठी राखून ठेवण्यात आल्याबद्दल नापसंती व्यक्त केली गेली. त्याचप्रमाणे प्रांतिक सरकारच्या नोकऱ्यातही मुसलमानांसाठी राखीव जागांचे प्रमाण ठरवून देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. दोन्ही वर्किंग कमेट्यांनी जातीय निवाड्याला पाठिंबा असल्याचे पुन्हा एकदा जाहीर केले आणि बलुचिस्तानला सुधारणा कायदा लागू करावा असा आग्रह धरला दोन्ही संघटनांनी एकसारखे ठराव पास केल्याने मुस्लीम लीग आणि मुस्लीम परिषद एकमेकींच्या जवळ आल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. कालांतराने

मुस्लीम परिषद नामशेष झाली आणि जीनांच्या नेतत्वाखालील मुस्लीम लीगच्या हाती सर्व सूत्रे आली. दरम्यान सरकारचे दडपणशाहीचे धोरण चालूच होते. रफी अहमद किडवाई यांना सहा महिन्यांची तर जवाहरलाल नेहरू आणि खान अबदूल गफारखान यांना दोन दोन वर्षांच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या.

ब्रिटिश पार्लमेंटने नेमलेल्या संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल दिनांक २२ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध झाला. समितीने एकूण २७ भारतीय स्वीकृत करून घेतले होते. त्यात ७ संस्थानिकांचे प्रतिनिधी आणि पाच राजनिष्ठ अश्रफ यांचाही समावेश होता. समितीच्या अहवालात पुढील शिफारशी करण्यात आल्या होत्या. गव्हर्नरांकडे काही खास अधिकार आणि जबाबदाऱ्या राखून ठेवून प्रांतिक स्वायत्तता, पन्नास टक्के संस्थानिकांनी संमती दर्शविल्यास संस्थांनी विभागासह संबंध हिंदुस्तानच्या संघराज्याची निर्मिती, संघराज्य अस्तित्वात येईपर्यंत माँटफोर्ड सुधारणा कायद्यान्वये अस्तित्वात आलेले मध्यवर्ती कायदेमंडळ तसेच चालू राहावे. स्वतंत्र सिंध आणि ओरिसा प्रांतांची निर्मिती, पुणे करारातील तरतुदींसह जातीय निवाड्याला मान्यता, अखिल भारतीय स्वरुपाच्या नोकऱ्यावर भारत मंत्र्यांचा प्रत्यक्ष अधिकार, इत्यादी मात्र घटनेत मूलभूत हक्कांचा अविभाज्य घटक म्हणून समावेश करण्यात यावा ही मागणी चिकित्सा समितीने फेटाळून लावली.

त्या वर्षाच्या अखेरीस मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. निवडून आलेल्या सभासदांची संख्या पुढीलप्रमाणे होती. काँग्रेस ४४, काँग्रेस नॅशनॅलिस्ट पार्टी ११, जीनांची स्वतंत्र पार्टी २२ आणि युरोपीय ११, त्याशिवाय २६ सरकारी आणि १३ बिनसरकारी सभासद नियुक्त करण्यात आले होते. युरोपियनांचा गट धरून किमान ५० सभासद सरकारच्या बाजूचे होते. अध्यक्षपदासाठी टी. ए. के. शेरवाणी यांना जीनांचा पाठिंबा मिळविण्याचा काँग्रेसने प्रयत्न करून पाहिला. परंतु शेरवाणी यांचा पराभव करून सरकारी गटाच्या पाठिंब्याचा जोरावर जीनांनी सर अबदुर रहीम हा आपला उमेदवार निवडून आणला. अशा तऱ्हेने जीनांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचा काँग्रेसचा पहिला प्रयत्न निष्फळ ठरला. जातीय निवाड्यासंबंधीच्या काँग्रेसच्या तटस्थतेच्या ठरावाला विरोध करून जीनांनी काँग्रेसला दुसरा धक्का दिला. जानेवारी २३ ते १ मार्च पर्यंत काँग्रेस अध्यक्ष राजेंद्र प्रसाद यांनी जातीय प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी जीनांशी अनेक वेळा बोलणी केली. एका तात्पुरत्या मसुद्यावर त्या दोघांचे एकमतही झाले होते. परंतु तो मसुदा पक्का होण्यापूर्वी काँग्रेसने त्याला हिंदू महासभेची संमती मिळवली पाहिजे अशी अट घालून जीनांनी काँग्रेसला तिसरा हादरा दिला. गेले दीड वर्ष जातीय निवाड्याविरुद्ध सतत प्रचार करीत आलेली हिंदू महासभा राजेंद्र प्रसादजींना कराराला पाठिंबा देईल हे शक्यच नव्हते. १९३४ पासून पुढे संस्थानी मुलखास कटच्या भारतीय संघराज्याच्या कल्पने-

वर जीना पुनः पुन्हा हल्ला चढवू लागले होते. जीना शेवटपर्यंत आपल्या या मताला चिकटून होते. १९१९ च्या कायद्यान्वये अस्तित्वात आलेले मध्यवर्ती कायदेमंडळ चालू ठेवण्याच्या आणि संघराज्याच्या निर्मितीस पन्नास टक्के संस्थानिकांची संमती आवश्यक ठरविण्याच्या सेरकारच्या निर्णयावरून सरकार केंद्रसत्ता अंशत: देखील सोपविण्यास उत्सुक नाही हेच प्रत्ययास येत होते. आज्ञाधारक मुलाप्रमाणे संस्थानिकांनी संघ-राज्यात सहभागी होण्याचे नाकारल्यामुळे व्यवहारत: पार्लमेंटने थेट प्रांताकडे मर्यादित सत्ता सुपूर्द केल्यासारखेच झाले. देशात जिकडे तिकडे जातीय दंगलींना ऊत आला होता, परंतु बेळगांग आणि कॅनानूर येथील दंगली विशेष भीषण स्वरुपाच्या होत्या. इस्लामची निर्भत्सना केल्याबद्दल अबदुल कायूम याने नथूराम नावाच्या इसमाचा भर कोर्टात खून केला होता. त्याला फाशीची शिक्षा झाली होती. फाशी दिसल्यानंतर त्याचा दफन विधी शहराबाहेर करावा असे सरकारचे म्हणणे होते. परंतु मुसलमानांना अंत्ययात्रेची प्रचंड मिरवणूक काढून शहरातच त्याचे दफन करावयाचे होते. सरकारने याला परवानगी नाकारल्यामुळे संतप्त झालेल्या जमावाने पोलिस आणि मॅजिस्ट्रेट यांच्यावर हल्ला चढवला आणि एका सैनिकाच्या हातातील बंदूक पळवून नेली. त्यावेळी लष्कराने गोळीबार केला त्यात अनेकजण मारले गेले.

१९३५ च्या पहिल्या सहा महिन्यातही हजारीबाग, फेरोजाबाद, आग्रा, दक्षिण हैद्राबाद, चंपारण आणि नोआखाली अशा अनेक ठिकाणी जातीय दंगे उद्भवले. परंतु लाहोर येथे जो पेचप्रसंग निर्माण झाला त्यामुळे जातीय परिस्थिती तर चिघळलीच पण त्यापेक्षाही फार दूरगामी असे राजकीय परिणाम घडून आले. तेथील शहीदगंज गुरुद्वाराच्या परिसरात एक प्राचीन मशीद होती. परंतु १७० वर्षाहून अधिक काळपर्यंत ती वापरात नव्हती. या मशिदीचा वाद अनेक वर्षे कोर्टात रेंगाळत पडला होता. अखेर १९३४ साली कोर्टाने ती मशीद शीखांच्या मालकीची असल्याचा अंतिम निर्णय दिला. १९३५ च्या जूनमध्ये शीखांनी ती मशीद पाडून टाकण्यास आरंभ केला ही बातमी वणव्यासारखी सगळीकडे पसरली आणि मुसलमानांच्या प्रचंड जमावाने शहीदगंज गुरुद्वारावर हल्ला चढविला. स्थानिक अधिकाऱ्यांना परि-स्थिती काबूत आणणे कठीण होऊन बसले. सरकारने सामोपचाराने त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करून पाहिला. नवी मशीद बांधण्यासाठी सरकारी जागा देण्याचीही तयारी दर्शविली. परंतु दोन्ही समाजातील अतिरेक्यांनी कोणतीही तडजोड होऊ दिली नाही. मुसलमानांचे जमाव पुन्हा पुन्हा गुरुद्वारावर चाल करून येत. त्याना पांग-विण्यासाठी लष्कराला दोन वेळा गोळीबार करावा लागला. मुसलमानांपैकी काही धार्मिक नेत्यांनी इतका प्रक्षोभक प्रचार सुरू केला की, सप्टेंबरमध्ये यापैकी १८ जणांना हद्दपार करण्यात आले आणि इतर अनेकांना गिरफदार करण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात लाहोरमध्ये एका शीखाचा खून झाला. त्यामुळे संतप्त झालेल्या हजारो शिखांनी रस्त्यावर येऊन निदर्शने केली. शिखांनी आपली चळवळ कायद्याच्या

चौकटीत राहून चालविली होती. त्यामुळे पंजाब सरकारची अधिकच पंचाईत झाली. या सर्व प्रकरणामुळे केवळ पंजाबमधीलच नव्हे तर साऱ्या देशभरच्या मुसलमानांच्या भावना भडकल्या. सर सिकंदर हयात खान यांनी मुस्लीम लीगमध्ये सामील होण्याचे ठरविले. त्यामागे हेही एक कारण होते. १९३८ साली जीनांनी नेहरूंना ज्या मागण्या सादर केल्या होत्या त्यात शहीदगंज वादात सन्माननीय तडजोड घडवून आणण्यासाठी काँग्रेसने मध्यस्थी करावी ही एक होती.

ब्रिटिशांचे कायमचे वर्चस्व किंवा धर्म, इतिहास आणि संस्कृति यांच्या आधारावर देशाची फेरविभागणी हे दोनच पर्याय देशापुढे आहेत. असा प्रचार इकबाल करीत असल्याचे वर आलेच आहे. खलीफा हा धर्माचा प्रमुख असला तरी त्याचे अधिकार वाटून दिले जाऊ शकतात असा श्लेष काढून इस्लामी राज्यातही कायदेमंडळाची पद्धती असू शकते असे सांगत. परंतु खलीफाची सत्ता बिगर मुसलमान कायदेमंडळाकडे सोपविता येणार नाही म्हणजेच ज्या कायदेमंडळात बिगर मुसलमान अर्थात हिंदू असतील असे कायदेमंडळ इस्लाम धर्माला धरून होणार नाही. याचा अर्थ असा की, हिंदू आणि मुसलमान ही स्वतंत्र राष्ट्रे समजली गेली पाहिजेत अर्थात त्यांची कायदेमंडळे कायदे हे सर्व स्वतंत्र असले पाहिजे. धर्मातीत राज्य पद्धतीसही त्यांचा सक्त विरोध होता. कारण धर्म ही खाजगी बाब आहे असे ती विचारसरणी मानते आणि धर्म आणि राज्य संस्था यांची फारकत केली जाते आणि ते इस्लामविरोधी आहे इस्लामची तत्वप्रणाली ही राष्ट्रवाद आणि समाजवाद यांच्या विरुद्ध आहे असे इकबाल सारखे लोक सांगत, तर त्याच काळात नेहरू आर्थिक प्रश्नावर भर देऊन समाजवादाचा पुरस्कार करीत. त्यामुळे खुद्द काँग्रेस पक्षातील प्रतिगामी विचार-सरणीचे नेते देखील नेहरूंवर बिथरून गेले होते. मग इकबाल, मौदूदी वगैरे सनातनी नेत्यांना नेहरूंचे वावडे वाटू लागले तर त्यात आश्चर्य कसले ?

भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्यात जातीय निवाड्याचा अंतर्भाव होता. त्या कायद्यानुसार संघराज्याच्या कायदेमंडळाची निवडणूक प्रांतिक कायदेमंडळाकडून अप्रत्यक्ष पद्धतीने व्हावयाची होती. मुंबई, संयुक्त प्रांत आणि बंगाल या सारख्या काही प्रांतात वरिष्ठ सभागृहे राहाणार होती. मतदार संघ पूर्वीच्या द्विदल राज्य पद्धतीपेक्षा काही प्रमाणात विस्तृत करण्यात आले असले तरी एकंदरीने पाहता मतदानाचा अधिकार पुष्कळच मर्यादित होता. फक्त तीन कोटी सत्तर लक्ष भारतीयांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला होता. म्हणजे ब्रिटिश हिंदुस्तानापुरते बोलावयाचे तर १७ टक्क्याहूनही कमी लोक मतदान करू शकणार होते. मतदानाचा अधिकार मालमत्तेच्या निकषावर आधारलेला असल्यामुळे जुन्या समाज व्यवस्थेतील हितसंबंधी लोकांचेच वर्चस्व कायम टिकून राहणार होते. त्याच्या जोडीला स्वतंत्र मतदार संघाचा अडसर निर्माण करून ठेवल्यामुळे जाती जातीतील दुरावाही कायम राहणार होता. अशा तऱ्हेने १९३५ च्या कायद्यामुळे जातीय प्रवृत्तींना आळा बसण्याऐवजी

उलट त्यांना खतपाणीच मिळाले. त्याचबरोबर या नव्या सुधारणामुळे भारताच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले. देशी संस्थाने पहिल्या प्रथमच राजकीय आखाडयात उतरली. संस्थानिकांनी संघ राज्यात सामील होण्यास पुनः पुन्हा नकार दिल्यामुळे ब्रिटिश सरकारला केंद्रीय सत्ता जनतेच्या हाती न सोपविण्यास आणखी एक संधी मिळाली. राजनिष्ठ अश्रफांच्या गटात सामील होण्यास सतत विरोध दर्शविणाऱ्या जीनांच्या नेतृत्वाखाली मुस्लीम लीगची जडण घडण बदलून गेली होती. परंतु त्या संबंधीही ब्रिटिश सरकारने फारशी आस्था दाखवली नाही. कारण सरंजामशाही हितसंबंधांकडे दुर्लक्ष करणे ब्रिटिश सरकारला परवडण्यासारखे नव्हते. छतारीच्या नबाबांच्या नेतृत्वाखाली संयुक्त प्रांतात स्थापन झालेल्या नॅशनल ॲग्रिकल्चरिस्ट पार्टीला त्या प्रांताचे गव्हर्नर हेले यांचे आशीर्वाद लाभले होते ही गोष्ट त्यावेळीही सर्वांना माहीत झाली होती. काँग्रेस आणि फजलूल हक यांची कृषक पार्टी यात डोके वर काढू लागलेल्या डाव्या शक्तींशी मुकाबला करून विद्यमान परिस्थिती टिकवून ठेवण्याच्या बाबतीत सरकारची खरी भिस्त पंजाबमधील युनियनिस्ट पार्टी, संयुक्त प्रांतातील नवी ॲग्रिकल्चरिस्ट पार्टी आणि काँग्रेसमधून फुटून बाहेर पडलेले उजव्या विचारसरणीचे लोक यावरच होती.

जीनांच्या निरपवाद नेतृत्वाखालील नव्या स्वरुपातील मुस्लीम लीगचे अधिवेशन १९३६ च्या एप्रिल महिन्यात मुंबईत भरले होते. सर सैयद वझीर हसन यांनी अध्यक्षपदावरून भाषण करताना देशातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला काही अटीवर संयुक्त मतदार संघांना मान्यता देण्याची जीनांनी तयारी दर्शविली असताना त्यांचे सहकार्य झिडकारल्याबद्दल त्यांनी काँग्रेसला दूषण दिले. जातीय निवाडयाबाबत तटस्थतेचे धोरण स्वीकारूनही कांग्रेसने अशीच घोडचूक केली असे सांगून त्यानी आपल्या भाषणात द्विराष्ट्रवादाचा आवडता सिद्धांत मांडला आणि मुसलमानांना मंत्रिमंडळात व नोकऱ्यात राखीव जागा, संघराज्याला विरोध इ. मागण्यांचा पुनरुच्चार केला. सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करून दडपशाही कायदे ओढवून घेतल्याबद्दल त्यानी काँग्रेसवर टीका केली. प्रौढ मताधिकारावर आधारलेले लोकशाहीवादी जबाबदारीचे सरकार, दडपशाही कायद्यांचे निरसन, भाषण, वृत्तपत्र, संघटना आदि मूलभूत स्वातंत्र्याची प्रस्थापना, शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य, सुशिक्षित आणि अशिक्षित बेकारांना रोजगार, आठ तासांचा दिवस आणि औद्योगिक कामगारांना किमान वेतन अशा तऱ्हेचा समान कार्यक्रम निरनिराळ्या जातींसाठी हाती घ्यावा असे आवाहन त्यांनी आपल्या भाषणात केले. जीना हे मुस्लीम लीगचे तह-हयात अध्यक्ष राहावेत असे त्यानी सुचविले. काँग्रेस अध्यक्षांनी भारताची घटना बनविण्यासाठी आणि कायदेमंडळातून आणि कायदेमंडळाबाहेरून हाती घ्यावयाचा वार्षिक कार्यक्रम आखण्यासाठी देशातील सर्व राजकीय संघटनांना एकत्र बोलवावे असे त्यांनी आवाहन केले.

त्या अधिवेशनात जीनांनी मांडलेल्या ठरावात जनतेच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर नवी घटना लादल्याबद्दल तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला होता. आणि हिंदुस्तान-साठी संघराज्यात्मक घटना बनविण्याची योजना प्रतिगामी, विघातक आणि ब्रिटिश हिंदुस्तानातील हितसंबंधाना घातक ठरणारी असून त्याबाबत ब्रिटिश पार्लमेंटने ताबडतोब फेर विचार करावा असे सुचविण्यात आले होते. मात्र सद्य: परिस्थितीत घटनेतील प्रांतासंबंधीची योजना राबविण्याची तयारी दर्शविली होती. जीनांनी आपल्या भाषणात असे निदर्शनास आणून दिले की, नव्या घटनेनुसार फक्त २ टक्के जबाबदारी जनतेकडे सोपविण्यात आली आहे तर गव्हर्नर जनरलच्या हाती ९८ टक्के विशेषाधिकार आणि खास जबाबदाऱ्या ठेवण्यात आल्या आहेत. या परिस्थितीला तोंड द्यावयाचे असेल तर सर्व जातींनी एकत्र येऊन संयुक्त कृतीचे पाऊल उचलावे लागेल असे सांगून काँग्रेस मुसलमानाकडे एक संघटित जमात म्हणून पहात नाही तोपर्यंत तिला आपले ध्येय कधीही साध्य करता येणार नाही असा त्यांनी इशारा दिला.

नव संघटित मुस्लीम लीगने आपल्या पहिल्या अधिवेशनात (१) सर्व मुसलमानांना एका पक्षाच्या झेंड्याखाली संघटित करणे, (२) मुसलमान समाजातील ऐक्य भावना वाढीस लावणे, आणि (३) मुसलमानांना प्रांतिक सरकारात योग्य आणि प्रभावी स्थान मिळवून देणे यासाठी मध्यवर्ती निवडणूक मंडळ नियुक्त करण्याचा अधिकार जीनांना देण्यात आला. त्याचप्रमाणे प्रांतिक निवडणूक समित्या स्थापन करून त्या मध्यवर्ती समितीला जोडून घेण्याचे अधिकारही त्यांच्याकडे सोपविण्यात आले. या ठरावाचे खरे मर्म त्यावेळी बहुधा कोणाच्या लक्षात आले नसावे. परंतु पुढील दोन वर्षात ज्या घटना घडून आल्या त्यावरून ते स्पष्ट झाले. मुख्य म्हणजे सर्व मुसल-मानांना जीनांच्या नेतृत्वाखाली संघटित करण्यात यावयाचे होते. ज्या प्रांतात मुस्लीम बहुसंख्य असतील तेथे मुस्लीम लीगची मंत्रिमंडळे अधिकारावर यावीत आणि जेथे ते अल्पसंख्य असतील तेथे लीगला प्रतिनिधीत्व मिळवून द्यावे हा त्या ठरावामागील खरा उद्देश होता. जीनांच्या १४ कलमांपैकी एक कलम असे होते की, मंत्रिमंडळातील ३३ टक्के जागा मुस्लीम लीग ज्यांची नियुक्ती करील अशांनाच मिळाव्यात.

९ जून रोजी लीगचा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध झाला. त्यात (१) मुसल-मानांच्या धार्मिक हक्कांना जमीयत उल्-उलेमाच्या सल्ल्यानुसार संरक्षण, (२) दडप-शाही कायद्यांचे उच्चाटन, मूलभूत स्वातंत्र्याचे संरक्षण, आर्थिक पिळवणुकीला प्रतिबंध, प्रशासन खर्च आणि जनतेवरील करांचा बोजा यात कपात, (३) सैन्य-दलाचे राष्ट्रीयीकरण आणि लष्करावरील खर्चात कपात, (४) औद्योगिक विकास, आर्थिक विकासासाठी चलन, विनियम आणि किंमती यावर नियंत्रण, ग्रामीण जनतेचा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक अभ्युदय आणि ग्रामीण कर्जबाजारीपणाला आळा घालणे, (५) मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, आणि (६) सर्वसामान्य

जनतेत राजकीय जागृती करणे आणि सुदृढ लोकमत तयार करणे या बाबींचा समावेश होता.

पूर्वीपेक्षा लीगचा यावेळचा कार्यक्रम कितीतरी अधिक पुरोगामी होता. तरीही काँग्रेसच्या निवडणूक जाहिरनाम्याच्या मानाने तो खूपच अपुरा होता. लीग घटना राबवायला तयार होती तर काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात भारत सरकारचा कायदा शक्य तितक्या लवकर मोडीत काढून राज्य घटना तयार करण्यासाठी घटना समिती बोलावण्यास सरकारला भाग पाडण्यासाठीच कायदेमंडळाचा उपयोग करून घेतला जाईल असे नमूद करण्यात आले होते. काँग्रेसच्या कार्यक्रमात खालील बाबींना अग्रक्रम देण्यात आला होता. दारुबंदी, जमीन सुधारणा, सारा आणि खंड यात कपात, दलाल वर्गाचे उच्चाटण, पत पुरवठा, कर्ज मुक्ती, औद्योगिक कामगारांच्या जीवनमानात सुधारणा, कामाचे तास, औद्योगिक तंटे नियंत्रण शिवाय वृद्धावस्था, आजारीपण आणि बेकारी याविरुद्ध सामाजिक सुरक्षिततेची तरतूद त्याचप्रमाणे संघटना स्थापन करण्याचा आणि संपावर जाण्याचा औद्योगिक कामगारांचा हक्कही काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात मान्य करण्यात आला होता. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने नागरिकत्वाचे अधिकार, समान वेतन, बाळंतपणाची रजा आणि इतर सवलती उपलब्ध करून देऊन स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याचे आश्वासनही काँग्रेसने दिले होते. प्रांतिक निवडणूक समित्या संघटित करण्याच्या बाबतीत जीनांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. बिहार, ओरिसा, वायव्य सरहद्द प्रांत आणि सिंधमध्ये तर त्यांना समित्या स्थापन करताच आल्या नाहीत. बहुतेक प्रांतातून स्थानिक पुढाऱ्यांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केले होते. फार काय जीनांच्या मध्यवर्ती निवडणूक समितीत असलेल्या काही पुढाऱ्यांचाही असे स्वतंत्र पक्ष संघटित करणारात समावेश होता. आपापले पक्ष मुस्लिम लीगमध्ये समाविष्ट करण्यास त्यानी साफ नकार दिला. काही ठिकाणी एकाच प्रांतात प्रतिस्पर्धी मुस्लीम पक्ष असल्यामुळे तर जीनांचे काम अधिकाच बिकट आणि गुंतागुंतीचे होऊन बसले होते. बंगालमधील तीन निरनिराळ्या मुस्लीम पक्षांनी जीनांना कलकत्त्यास येण्याचे आमंत्रण दिले होते. या तीन पक्षात समझोता घडवून मुस्लीम लीगची बंगाल प्रांतिक निवडणूक समिती स्थापन करण्यात ते कसेबसे यशस्वी झाले. परंतु फजलूल हक यांनी असा आग्रह धरला की, इतर पक्षाच्या पुढाऱ्यांनी त्यांच्या कृषक प्रजासमितीच्या प्रतिज्ञापत्रकावरही सही केली पाहिजे. त्यानी तसे करण्याचे नाकारताच फजलूल हक यानी जीनांनी घडवून आणलेला समझोता उधळून लावला आणि स्वतंत्रपणे निवडणुका लढवल्या. पंजाबात इकबाल यानी जीनाचे नेतृत्व स्वीकारून पंजाब मुस्लीम लीगची सूत्रे आपल्या हाती घेतली होती सर सिकंदर हयातखान यांची युनियनिस्ट पार्टी मुस्लीम लीग बरोबर सहकार्य करण्यास तयार नव्हती त्यामुळे इकबाल अस्वस्थ झाले होते. त्याविषयी तक्रार करणारे पत्र त्यांनी जीनांना पाठवले. त्यांत सिकंदर हयातखान परकियांची मदत

घेऊन आपल्या समाजाचे ऐक्य धोक्यात आणीत आहेत असे सूचित केले होते. आणखी पंधरवड्यात जीनांना लिहिलेल्या पत्रात इकबाल यांनी त्यांना कळविले की, वारंवार विनंती केल्यानंतर युनियनिस्ट नेत्यांनी अखेर इतकेच आश्वासन दिले आहे की, कायदेमंडळावर निवडून आलेले मुस्लीम लीगचे सभासद जर प्रांतिक पातळीवर युनियनिस्ट पार्टीला सहकार्य देण्याचे कबूल करतील तर युनियनिस्ट पार्टी अखिल भारतीय स्वरूपाच्या प्रश्नात मुस्लीम लीगच्या धोरणाचा पुरस्कार करील. आणि पंजाबच्या कायदेमंडळात युनियनिस्ट पार्टी दुसऱ्या कोणत्याही बिगर मुसलमान गटाशी कसलाही करार करणार नाही. .

संयुक्त प्रांताच्या मुस्लीम लीग निवडणूक समितीत अहरार जमीयत मोमीन, शिया पॉलिटीकल कॉन्फरन्स, खलिकुझ्झमान सारखे पूर्वीचे राष्ट्रवादी आणि काही उच्च वर्गीय अश्रफ यांची खिचडी झाली होती. त्या निवडणूक समितीत मतभेदांनी डोकेवर काढले आणि काही सभासद निवडणूक समिती सोडून गेले. शेवटी त्या निवडणूक समितीत काँग्रेसानुकूल, काँग्रेस विरोधक आणि छत्तारीच्या नबाबांच्या नॅशनल अॅग्रिकल्चरिस्ट पार्टीला अनुकूल असलेले असे तीनच गट उरले. त्याचवेळी रफी अहमद किडवाई यांनी काँग्रेसला अनुकूल असलेल्या गटाबरोबर गुप्त करार करून त्यांच्या उमेदवारांना निवडणुकीत अर्थसहाय्य मिळवून दिले. संयुक्त प्रांतातील हा एक गुप्त करार वगळता काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यात इतर कोठल्याही प्रांतात निवडणूक समझोता झालेला नव्हता. ज्या प्रांतात मुस्लीम लीगची निवडणूक समिती स्थापन झाली होती. तेथेही मुंबई आणि आसाम प्रांत वगळता लीगला मुसलमानांच्या सर्व राखीव जागांवर आपले उमेदवार उभे करता आले नाहीत. निवडणुकीत अर्थातच मुस्लीम लीगला फार मोठा पराभव पत्करावा लागला. पंजाबात लीगने फक्त सात उमेदवार उभे केले होते तर संयुक्त प्रांतात लीगने मुसलमानांच्या ६६ राखीव जागांपैकी फक्त ३५ लढवल्या. सर्व प्रांतात मिळून काँग्रेसने फक्त ५८ मुसलमान उमेदवार उभे केले होते. निवडणुक प्रचार मोहीम जोरात चालू असताना मुसलमानांच्या राखीव मतदार संघात आपले उमेदवार उभे केल्याबद्दल जीनांनी काँग्रेसवर सडकून टीका केली. आणि काँग्रेसने मुसलमानांच्या वाट्याला जाता कामा नये असा इशारा दिला. नेहरू आपल्या भाषणात असे सांगत की, या देशात सरकार व काँग्रेस असे दोनच पक्ष आहेत. त्याचा उल्लेख करून जीनांनी नेहरूंवरही टीका करून असे बजाविले की तिसराही एक पक्ष या देशात आहे आणि तो म्हणजे मुसलमानांचा. त्याच भाषणात जीनांनी समान भागीदारीच्या तत्त्वावर इतर जातींबरोबर समझोता करण्याची तयारी दर्शविली. जीनांच्या या विधानाचा समाचार घेताना नेहरूंनी असे घोषित केले की, राष्ट्रवादाचे प्रतिक असलेला काँग्रेस हा एकमेव पक्ष ब्रिटीश साम्राज्यशाहीशी लढा देत असल्याने कोठल्याही तिसऱ्या पक्षाला किंवा मध्यममार्गी आणि दोलायमान असलेल्या गटांना स्थान नाही. मुस्लीम लीग ही उच्च

मध्यम वर्गीयातील वरच्या श्रेणीतील लोकांचे प्रतिनिधीत्व करते आणि साम्राज्यशाही लढ्याच्या बाबतीत तिचे धोरण बोटचेपेपणाचे असल्यामुळे कॉंग्रेस लीग बरोबर कसलीही तडजोड करू शकणार नाही असेही नेहरूंनी स्पष्ट केले. जीनांनी २८ फेब्रुवारी रोजी पुन्हा एकदा अशी घोषणा केली की, जे पक्ष सर्वसंमत अशा मूलभूत तत्त्वासंबंधी लीगबरोबर वाटाघाटी करण्यास तयार असतील त्यांच्याशी लीग सहकार्य करील. अर्थात जीनांनी दाखवलेली सहकार्याची ही तयारी प्रामाणिकपणाची नव्हती हे पुढील घटनांवरून स्पष्ट झाले. जीना-राजेंद्र प्रसाद करार, हिंदू महासभेला तो मान्य नाही या पोकळ सबबीवर त्यांनी असाच मोडून टाकला होता. तारीख २ मार्च रोजी नेहरू आणि राजेंद्र प्रसाद यांनी कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यात कसलीही समान भूमिका नसून लीगला घटना राबवावयाची आहे तर ती मोडून टाकण्याचा कॉंग्रेसचा निर्धार आहे असे जाहीर केले.

निवडणूक निकालाने बहुतेक सर्वच पक्षांना आश्चर्याचा धक्का बसला. मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतात कॉंग्रेसने विरोधकांचा पार धुव्वाउ डविला. हिंदू महासभेच्या निशाणाखाली निवडणुकीस उभे राहिलेल्या हिंदू जातीयवाद्यांना तर कॉंग्रेसने अक्षरशः धुवून काढले. मुसलमान बहुसंख्य असलेल्या वायव्य सरहद्द प्रांतातही कॉंग्रेसला सर्वात जास्त जागा मिळाल्या. मुसलमानांच्या एकूण राखीव जागापैकी निम्म्याहून थोड्या कमी जागा मुस्लीम लीगने लढविल्या होत्या त्यातील जवळपास साठ टक्के जाग तिने मिळवल्या. बंगाल वगळता मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या प्रांतातून लीगल जवळजवळ एकही जागा मिळू शकली नाही. उदाहरणार्थ पंजाबमध्ये एकूण ८४ मुस्लीम जागांपैकी लीगला अवघी एक जागा मिळाली, तर सिंध प्रांतात ३३ पैकी ३ आणि वायव्य सरहद्द प्रांतात तर तिला एकही जागा मिळू शकली नाही. बंगालमध्येही एकूण ११७ मुस्लीम राखीव जागापैकी फक्त ३९ जागा लीगच्या पदरात पडल्या. मुंबईत मात्र लीगला चांगले यश लाभले (२९ पैकी २० जागा) त्याखालोखाल नंबर लागतो संयुक्त प्रांताचा (६४ पैकी २७) आणि नंतर मद्रास (२८ पैकी १०) आणि आसाम (३४ पैकी ९ जागा).

निवडणुका जिंकल्यानंतर अधिकार स्वीकार करावयाचा की नाही हा प्रश्न कॉंग्रेसपुढे लगेच उभा राहीला. नेहरूंनी अधिकार स्वीकाराच्या विरूद्ध हिरीरीने बाजू मांडली. परंतु १९ मार्च रोजी निरनिराळ्या प्रांतातील विधानसभांवर निवडून आलेल्या सभासदांची जी परिषद भरली होती. तिच्यात नेहरूंचे म्हणणे अमान्य झाले आणि १९३५ च्या कायद्यान्वये गव्हर्नरांना जे खास अधिकार देण्यात आले होते त्यांचा वापर केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ते मंत्र्यांचा सल्ला मानतील असे आश्वासन त्यांच्याकडून मिळाले तर अधिकार स्वीकार करावा अशी शिफारस करणारा ठराव पास करण्यात आला. परंतु गव्हर्नरांकडून असे आश्वासन मिळाले तर नाहीच उलट त्यांनी बिगर कॉंग्रेस मंत्रिमंडळे अधिकारारूढ केल्यामुळे कॉंग्रेसने अधिकार

स्वीकार करण्याची शक्यता दुरावली. त्यावर काँग्रेसने प्रत्यक्ष चळवळीचा कार्यक्रम हाती घेतला. त्या कार्यक्रमाची सांगता तारीख १ एप्रिल रोजी घटनाविरोधी दिन पाळून व्हावयाची होती. परंतु तारीख २६ मार्च रोजी जीनांनी एक जाहीर निवेदन प्रसिद्ध करून मुसलमान आमदारांना काँग्रेसच्या या कार्यक्रमात सहभागी न होण्याचा आदेश दिला.

पुढे २५ एप्रिलला एक राष्ट्रीय मुसलमान या नावाने प्रसिद्ध झालेल्या लेखात असा मुद्दा मांडला होता की, गरीब जनतेच्या हितासाठी कराव्या लागणाऱ्या लढ्याच्या आधारेच राष्ट्रीय ऐक्य साधता येईल म्हणून जातीयवादी नेतृत्वाबरोबर करार मदार करीत बसण्याच्या भानगडीत पडणे व्यर्थ आहे. कारण हे उच्चभ्रू पुढारी फक्त विधीमंडळात आणि नोकऱ्यात किती राखीव जागा देता यासाठीच भांडत बसतील. यात सामान्य गरीब जनतेला रस वाटत नाही. याच सुमारास रफी अहमद किडवाई यांनीही आर्थिक प्रश्नावर भर देणारे एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यांनी असे मत व्यक्त केले की, धर्माच्या ऐवजी आता वर्गीय निकषावर विभागणी होऊ लागली असून हिंदू शेतकऱ्यांइतकाच मुसलमान शेतकऱ्यांवरही काँग्रेसच्या शेतीविषयक कार्यक्रमाचा परिणाम घडून येणार असल्याने ते दोघेही त्याबद्दल सारखीच आस्था दाखवतात असे निवडणूक प्रचाराच्या वेळी दिसून आले आहे.

काँग्रेसने हाती घेतलेल्या मुस्लीम जनता संपर्काच्या कार्यक्रमास सुरुवातीला फार चांगला प्रतिसाद मिळाला. राजकीय गुलामगिरीविरूद्ध हिंदू आणि मुसलमान जनतेचा उठाव घडवून आणल्यानेच सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक समस्या सुटू शकतील. हा प्रचार फार प्रभावी ठरू लागला होता. जीनांनी याविरूद्ध अत्यंत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. जातीय प्रश्न सोडविल्याशिवाय जनतेच्या दारिद्र्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे हे घोड्यापुढे गाडी जोडण्याइतके हास्यास्पद असून या मार्गाने कोणालाही तो प्रश्न सोडविता येणार नाही असा त्यांनी इशारा दिला.

मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात काँग्रेसने सर्वपक्षीय आमदारांचा एक मेळावा घटना विरोधी भूमिकेला चालना देण्यासाठी आयोजित केला होता. अपेक्षेप्रमाणेच मुस्लीम लीगने या मेळाव्यावर बहिष्कार घातला. परंतु लीगचे काही प्रमुख आमदार लीगमधून बाहेर पडून काँग्रेसमध्ये सामील होऊ लागले. १९३६ च्या लीग अधिवेशनाचे अध्यक्ष सैयद वझीर हसन हे स्वतःच मे महिन्याच्या सुरुवातीला काँग्रेसमध्ये दाखल झाले. १६ मे रोजी अलाहाबाद येथे झालेल्या राष्ट्रवादी मुसलमानांच्या परिषदेत मुसलमान समाजाने मोठ्या संख्येने काँग्रेसमध्ये सामील होवून स्वातंत्र्य लढ्यात सहभागी व्हावे असे आवाहन करणारा ठराव संमत करण्यात आला होता. लीगच्या काँग्रेसविरोधी अलगतावादी आणि राष्ट्रविघातक धोरणाबद्दल लीगचा निषेध करणारा ठरावही अधिवेशनात करण्यात आला होता. इकडे या घटना घडत असताना मुस्लीम लीगच्या तिकीटावर संयुक्त प्रांताच्या विधानसभेत निवडून गेलेल्या खलिकुझमानांनी काही काँग्रेस नेत्यांबरोबर वाटाघाटींना सुरुवातही केली होती. एप्रिल महिन्यात

त्यांनी जीनांना न कळवता काँग्रेस वर्किंग कमेटीने तारीख २८ फेब्रुवारी रोजी जो कार्यक्रम निश्चित केला होता त्या आधारावर काँग्रेस बरोबर संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याचीही तयारी दर्शविली. या बोलण्यांना काँग्रेस आणि लीगच्या काही प्रांतिक पुढाऱ्यांकडून विरोध होत होता. सैयद महंमद हुसेन यांनी वर्तमानपत्रात एक पत्रक प्रसिद्ध करून मुसलमानांना काँग्रेस विरूद्ध संघटित करण्याचा जीनांचा बेत उधळून लावण्याचे कारस्थान खलिकुज्झमन रचत असल्याचा आरोप केला तर खुद्द जीनांनी आपल्याला अंधारात ठेवून काँग्रेस बरोबर वाटाघाटी सुरू करून मुसलमानात फाटा-फूट निर्माण केल्याबद्दल त्यांची निर्भत्सना केली. खुलिकुज्झमान यांनी त्यावर वृत्तपत्रातून असे जाहीर केले की, अर्धसत्य सांगून काही हितसंबंधी लोकांनी जीनांचे कान भरवून दिले.

तारीख ७ मे रोजी भरलेल्या मुस्लीम लीगच्या संयुक्त प्रांताच्या निवडणूक समितीच्या बैठकीस जीना हजर राहीले होते. काँग्रेस बरोबर वाटाघाटी चालू ठेवाव्यात ही आपली भूमिका सोडण्यास खलिकुज्झमान तयार नसल्याने जीनांनी काहीशी माघार घेऊन काँग्रेस बरोबर वाटाघाटी चालू ठेवण्याचा खलिकुज्झमान यांना अधिकार देणारा ठराव पास होऊ दिला. मात्र त्याबाबत (१) काँग्रेसच्या घटना मोडण्याच्या धोरणास मुस्लीम लीगने पाठिंबा देऊ नये. (२) मुस्लीम लीगच्या कार्यक्रमाशी सुसंगत असेल अशाच कार्यक्रमावर काँग्रेस व लीग यांचे सहकार्य होऊ शकेल आणि (३) अखिल भारतीय पातळीवर जातीय समस्या सुटेपर्यंत जातीय निवाडा आणि स्थानिक स्वराज्य संस्थातील राखीव प्रतिनिधित्व कायम राहू द्यावे अशा तीन शर्ती ठरावात नमूद करण्यात आल्या. परंतु संयुक्त प्रांतापुरताच हा अपवाद करण्यात आला होता. त्याचदिवशी काँग्रेस बरोबर सहकार्य होवू शकेल असे सूचित करणाऱ्या लीगच्या काही पुढाऱ्यांना त्यांनी चापले आणि मुसलमानांना संघटित करून आपली ताकद वाढेपर्यंत काँग्रेस किंवा सरकार यापैकी कोणाशीच तूर्त सहकार्य न करण्याचा त्यांनी सल्ला दिला.

संयुक्त प्रांतासंबंधी जरूर ते निर्णय घेण्याचे अधिकार काँग्रेस वर्किंग कमेटीने मौलाना आझाद यांच्याकडे सोपविले होते. लीगमधील प्रतिगामी जातीयवाद्यांबरोबर कोणतीही बोलणी न करण्याची गळ सज्जद झहीर यांनी मौलानांना घातली. संयुक्त प्रांता-मधील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनात नवाब इस्माइल खान यांच्याबद्दल विशेष तिटकारा होता. कारण ते स्वत: एक मोठे जमीनदार होते आणि खलिकुज्झमान यांच्याबरोबर काँग्रेस पुढाऱ्यांशी वाटाघाटी करण्यात त्यांचा पुढाकार होता. हाफीज महंमद इब्राहीम हे लीगला रामराम ठोकून काँग्रेसमध्ये सामील झाले होते आणि लीग ही राष्ट्र-विरोधी संघटना आहे असे म्हणून त्यांनी लीगचा निषेध केला होता. अलाहाबादला भरलेल्या राष्ट्रवादी मुसलमानांच्या परिषदेतही लीगवर त्यांनी असेच ताशेरे झाडले होते. या सर्व घटनांमुळे काँग्रेस आणि लीग यांच्यात कमालीचा दुरावा निर्माण झाला

होता. ज्यांशी मुस्लीम मतदार संघातून लीगविरूद्ध काँग्रेसने आपला उमेदवार उभा केल्यामुळे तर या दोन संघटनातील वैर कमालीचे विकोपास गेले होते. या निवडणुकीत मुस्लीम लीगकडून केवळ काँग्रेसचा पराभव करण्यासाठी केल्या जाणाऱ्या जहरी जातीय प्रचाराकडे नेहरूंनी खलिकुज्झमान यांना एक पत्र पाठवून त्यांचे लक्ष वेधले. केवळ काँग्रेसने मुस्लीम लीगविरूद्ध आपला उमेदवार उभा केला. म्हणून लगेच इस्लाम धोक्यात आल्याचा जो प्रचार लीगने चालविला होता त्याबद्दल नेहरूंनी एक पत्रक प्रसिद्ध करून लीगवर कडाडून हल्ला चढविला. जीनांच्या एका जाहीर सभेचा निर्देश करून नेहरूंनी त्या पत्रकात असे म्हटले होते की,

"निवडणुकीत ईश्वराच्या किंवा धर्माच्या नावाने प्रचार करणे हे अत्यंत विचित्र म्हटले पाहिजे. . . अगदी सामान्य प्रचारकानेही तसे करता कामा नये. असे असताना जीनांनी त्याचा अवलंब करावा हे तर केवळ अगम्यच म्हटले पाहिजे याबाबत त्यांनी फेरविचार करावा अशी मी त्यांना विनंती करीन . . . राजकीय क्षेत्रात धार्मिक आणि जातीय भावना भडकावणे असाच त्याचा अर्थ होतो. त्यामुळे भारत पुन्हा नमो युगात ढकलला जाणार आहे. अशा तऱ्हेच्या जातीयवादाचा परिणाम शेवटी काय होणार आहे हे जीना जाणत नाहीत असे थोडेच आहे?"

तारीख २२ जून रोजी गव्हर्नरांच्या विशेषाधिकाराबाबत काँग्रेसला अत्यंत जपून काही आश्वासने देणारे व्हाइसरॉयचे निवेदन प्रसिद्ध झाले. काँग्रेसच्या दृष्टीने ते संपूर्ण समाधानकारक नसले तरीही एका बाजूने निवडणूक जाहीरनाम्यातील कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी आणि दुसऱ्या बाजूला नव्या घटनेच्या विरूद्ध लढा देण्यासाठी तिने अधिकार स्वीकार करण्याचा निर्णय घेतला. सिंध व पंजाब प्रांतिक काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष अनुक्रमे चोईतराम गिडवाणी आणि डॉ. सत्यपाल हे काँग्रस आपल्या भूमिकेपासून ढळणार नाही. किंवा साम्राज्यशाहीच्या हस्तकांशी लांगूलचालन करणार नाही अशी ग्वाही देत होते तर त्याचवेळी वायव्य सरहद्द प्रांताचे गव्हर्नर, युनायटेड मुस्लीम पार्टी, हिंदू पार्टी आणि शीख पार्टी यांनी आपापसात करार करून मंत्रिमंडळ, सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्था यावर हिंदू, मुसलमान आणि शीख या तीन जमातींना प्रतिनिधीत्त्व मिळाले पाहिजे असे ठरवून टाकले होते. या तीन जमातींचा जातीय नकाराधिकाराचा हक्कही त्या करारान्वये मान्य करण्यात आला होता. वायव्य सरहद्द प्रांतातील हिंदू आणि शीख यांच्या मागण्या आणि अल्पसंख्य मुस्लीम प्रांतातील मुसलमानांच्या मागण्या यातील साम्य दाखवून देताना एम. एन. रॉय यांनी आपल्या एका अग्रलेखात असे प्रतिपादन केले होते की,

मुद्दा असा आहे की, जातीयवादी मग तो हिंदू असो की मुसलमान मूलत: त्यांच्यात कसलाही फरक नसतो. त्यांची मनोवृत्ती किंवा त्यांना हव्या असलेल्या सवलती एकाच प्रकारच्या असतात. अधिकारपदाच्या चार तुकड्यासाठी त्यांच्या साऱ्या कारवाया चाललेल्या असतात. जातीयवादाचे तर्कशास्त्रच असे आहे की

त्याचे पुरस्कर्ते आपापत: साम्राज्यवादी गटात फरफटले जातात मग भले ते स्वत:ला हिंदू महासभावादी किंवा मुस्लीम लीगवाले म्हणून संबोधून घेवोत.

त्यानंतर आठवडाभरात सात प्रांतात काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर आली झांशीतील पोट-निवडणुकीच्या वेळी कटुता निर्माण झाली असूनही खलिकुज्झमान यांनी प्रांतिक काँग्रेसचे पुढारी आणि मौलाना आझाद यांच्याबरोबरची बोलणी पुढे चालू केली. मंत्रिमंडळात ३३ टक्के प्रतिनिधित्व मिळाल्यास काँग्रेसचा सर्वसाधारण कार्यक्रम अंमलात आणण्याच्या बाबतीत तिच्याशी सहकार्य करण्याची तयारी मुस्लीम लीगने दाखवली. मुस्लीम लीगने संयुक्त जबाबदारीचे तत्त्व मान्य करावे, काँग्रेस-प्रमाणे लीगनेही आपली प्रांतिक निवडणूक समिती बरखास्त करून टाकावी आणि स्वतंत्र गट म्हणून काम करण्याचे थांबवावे. या शर्ती मान्य असल्याच्या करारावर खलिकुझ्झमान यांनी सही केली पाहिजे असा आझादांचा आग्रह होता, गांधी आणि नेहरू यांची या कराराला मान्यता होती. २३ जुलै रोजी मुस्लीम लीगचे तीन आणि संयुक्त प्रांतातील तीन स्वतंत्र आमदार काँग्रेस पक्षाला येऊन मिळाले. अशा तणावाच्या परिस्थितीतही खलिकुझ्झमान यांनी दोन अटींवर आझादांच्या मसुद्यावर सही करण्याची तयारी दर्शविली. जातीय प्रश्नांच्याबाबत मुस्लीम लीगला काँग्रेसच्या धोरणाच्या विरोधी ठरणार असली तरी कृती करण्याची आणि आपले मत व्यक्त करण्याची मुभा असली पाहिजे आणि सहा जणांच्या मंत्रिमंडळात स्वत: खलिकुझमान आणि नवाब इस्माइल खान अशा दोघां मुस्लीम लीगच्या सभासदांचा समावेश करण्यात आला पाहिजे अशा त्या दोन अटी होत्या. नवाब इस्माइल खान यांना तर संयुक्त प्रांतातील काँग्रेस कार्यकर्त्यांचा विरोध होताच शिवाय जातीय प्रश्नासकट सर्व बाबतीत संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वाबाबतही काँग्रेसचा आग्रह होता. त्यामुळे अखेर ती बोलणी फिसकटली. मुंबई प्रांतात काँग्रेसने आपण होऊन मंत्रिमंडळावर मुस्लीम लीगचे दोन सभासद नियुक्त करण्याचा देकार जीनांना दिला होता. परंतु जीनांनी त्यासाठी अशा काही अटी घातल्या की, त्यामुळे संबंध मंत्रिमंडळ त्यांच्या मुठीत राहीले असते. त्या अटी काँग्रेसला मान्य होणे शक्यच नव्हते.

अशा परिस्थितीत संयुक्त प्रांतात काँग्रेस-लीग संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन होणे शक्यच नव्हते आणि त्यावेळी त्याचा कोणाला खेदही झाला नाही. निवडणूक निकाला-नंतर काँग्रेसने न घाबरता आणखी मुसलमान उभे करावयाला हवे होते असे नेहरूंनी मत व्यक्त केले. मुस्लीम जनता उदासीन असली तरी ती जातीयवादाच्या जंजाळातून बाहेर पडून आर्थिक प्रश्नाबाबत आस्था दाखवू लागल्याची चिन्हे दिसू लागली आहेत, असे दाखवून देऊन तरुण मुसलमानांत घडून येत असलेल्या बदलाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. खान अबदुल गफार खान यांनी वायव्य सरहद्द प्रांतात अनेक सभा घेऊन गरीब जनतेच्या दृष्टीने हिंदू विरूद्ध मुसलमान असा प्रश्नच उपस्थित होत नसून शोषक विरूद्ध शोषित असेच खरोखरी सामान्य जनतेपुढील सर्व समस्यांचे स्वरूप

असावे असे प्रतिपादन केले.

या उलट जीना मात्र आर्थिक प्रश्नाऐवजी जातीय प्रश्नावरच भर देत राहीले. आपल्या हाती हुकमाचे पान राहणार नसलेली तडजोड घडून येण्यापेक्षा जातीयवादी शक्ती संघटीत करण्यातच त्यांना अधिक रस होता. १९३५ साली शेख अबदुल्ला आणि प्रेमनाथ बजाज यांनी काश्मीरमधील जनतेच्या लढयाला धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने हमदर्द नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. त्याच्या पुढच्या वर्षी जम्मू आणि काश्मीर संस्थानातील कित्येक बिगर मुसलमान नागरिकांनी अबदुल्लांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या लढयात उडी घेतली. परंतु पंजाबमध्ये मात्र पाकिस्तानची चळवळ सुशिक्षित तरूण मुसलमानांत चांगले मूळ धरू लागली होती. पुढील काही वर्षात रहीमत अलि आदिंनी पाकिस्तान निर्मितीसाठी सुरू केलेली चळवळ हळूहळू फोफावत चालली होती.

पंजाबात इकबाल यांचेकडे मुस्लीम लीगचे नेतृत्व होते. परंतु निवडणुकीत मुस्लीम लीगची उडालेली दाणादाण आणि यूनियनिस्ट पार्टीने (पुर्वीची पंजाब अॅग्रिकल्चरल पार्टी) लीग विरोधी प्रभावी शक्ती म्हणून प्राप्त करून घेतलेले स्थान पाहून इकबाल हवालदिल होऊन गेले आणि त्यांच्या मनाने असे घेतले की, अधिकृतपणे फाळणीच्या मागणीचा आवाज उठवला पाहिजे. २८ मे १९३७ रोजी जीनांना पाठवलेल्या पत्रात ते लिहतात :—

इस्लामी कायद्याचा दीर्घ काळपर्यंत काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर मी अशा निर्णयापर्यंत येऊन पोहोचलो आहे की, या कायद्याने घालून दिलेली पद्धत नीट समजाऊन घेतली आणि ती अंमलात आणली तर प्रत्येकाला निदान जिवंत राहण्याचा अधिकार तरी प्राप्त करून देता येईल. परंतु इस्लामी शरियत कायद्याची अंमलबजावणी किंवा विकास घडवून आणावयाचा असेल तर एक किंवा अनेक मुस्लीम राष्ट्रे या देशात निर्माण केल्याशिवाय तो अशक्य आहे. गेल्या कित्येक वर्षापासून याबद्दल माझी खात्री होऊन चुकली आहे आणि मुसलमानांचा भाकरीचा प्रश्न सोडवावयाचा असेल आणि हिंदुस्तानात शांतता प्रस्थापित करावयाची असेल याशिवाय दुसरा तरणोपाय नाही असे आजही माझे ठाम मत आहे आणि हिंदुस्तानात जर हे घडून येणार नसेल तर यादवी हाच पर्याय शिल्लक राहतो.

प्रकरण सोळावे

## जीनांचे काँग्रेस विरूद्ध युद्ध

सात प्रांतात काँग्रेस मंत्रिमंडळे अधिकारावर आल्याबरोबर १९३५ चा कायदा रद्द करण्याची शिफारस करून स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी घटना परिषद बोलावण्यात यावी अशी मागणी करणारे ठराव काँग्रेसने विधीमंडळासमोर आणले. बिहारमधील काँग्रेसच्या अशा तऱ्हेच्या ठरावाला रिझवी नावाच्या सभासदाने राखीव मतदारसंघाच्या द्वारा मुसलमानांना घटना समितीत प्रतिनिधीत्त्व देण्यात यावे आणि मुसलमानांचे अधिकार आणि हितसंबंध याबाबत आपापसात करार करून समझोता घडवून आणावा अशी उपसूचना मांडली. काँग्रेसने ती उपसूचना स्वीकारल्याने बिहार विधानसभेतील स्वतंत्र मुस्लीम गटाचे समाधान झाले आणि तो ठराव एकमताने पास झाला. या उलट संयुक्त प्रांत विधानसभेत मुस्लीम लीगने ज्या उपसूचना आणल्या त्या काँग्रेस पक्षाला मान्य होण्यासारख्या नव्हत्या. त्यामुळे मूळ ठरावावरील मतदानापूर्वी लीगच्या आमदारांनी सभात्याग केला, अर्थात काँग्रेस पक्षाचा ठराव संमत झाला. त्याच प्रांतातील बिजनोर मुस्लीम मतदार संघात झालेल्या निवडणुकीत काँग्रेस आणि लीग यांच्यात कमालीची चुरस लागली होती. शेवटी काँग्रेसचे हाफीज महंमद इब्राहीम हे मुस्लीम लीगच्या उमेदवाराचा पाच हजारावर मतांनी पराभव करून निवडून आले.

निवडणुकीनंतर थोड्याच दिवसात जीनांनी निरनिराळ्या प्रांतात दौरे करून विधानसभातील मुसलमानांचे स्थानिक गट आणि लहान लहान पक्ष यांना लीगच्या झेंड्याखाली आणण्याचे जोरदार प्रयत्न सुरू केले. जीनांच्या या परिश्रमामुळे मुस्लीम लीगच्या शाखात झपाट्याने वाढ होत गेली. पंजाब आणि बंगाल प्रांतात तर त्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. त्या दोन्ही प्रांतातील मुख्य मंत्री लीगमध्ये सामील झाले. तथापि बिहारमध्ये मात्र जीनांची फारशी डाळ शिजू शकली नाही. तेथे देखील काही लहान गट त्यांनी आपल्या बाजूला वळवून घेतले. परंतु बिहार मुस्लीम इंडिपेंडंट पार्टी या सर्वात मोठ्या गटाबरोबरची त्यांची बोलणी मात्र फिसकटली. बिहार विधानसभेतील सर्व मुसलमान सभासदांनी काँग्रेसच्या सुधारित ठरावाच्या बाजूने मतदान केल्याचे पाहून जीनांची फार मोठी निराशा झाली. वायव्य सरहद्द प्रांतातील युनायटेड मुस्लिम पार्टी आणि हिंदू-शीख नॅशनॅलिस्ट पार्टी यांच्या संयुक्त मंत्रिमंडळाचा पराभव होऊन काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यामुळे तर त्यांना

चांगलाच धक्का बसला. त्यातच मध्यप्रांत आणि मद्रास प्रांतातील मुस्लीम लीगचा एक एक आमदार लीग सोडून काँग्रेसमध्ये गेला व त्यांना मंत्री करण्यात आल्यामुळे तर जीनांच्या काँग्रेस विरोधाच्या आगीत तेल ओतले गेले. त्यातच सामान्य जनतेचे लक्ष जातीय संघर्षावर केंद्रीत होऊ नये म्हणून काँग्रेस आर्थिक प्रश्नावर अधिकाधिक भर देत होती. आणि हे असेच चालू राहून जनतेला जातीय प्रश्नापेक्षा आर्थिक प्रश्नाचे महत्त्वच अधिक वाटू लागले, तर लीगचा पायाच निखळून पडणार म्हणून या प्रक्रियेला उलट गती देता आली तरच मुस्लीम लीगला आशेला जागा होती.

मुस्लीम लीगचे पंचविसावे अधिवेशन १९३७ च्या ऑक्टोबरात लखनौ येथे भरले होते. त्या अधिवेशनात जीनांनी काँग्रेस विरूद्ध युद्ध पुकारले असे गांधी म्हणाले होते ते अगदी यथार्थ होते. त्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष महमुदाबादचे राजेसाहेब होते. त्यांनी आपल्या भाषणात हिंदुस्तानातील आणि पॅलेस्टाइनमधील मुसलमानांविषयी गंभीर चिंता व्यक्त केली. 'मुसलमानांचे एक जमात म्हणून अस्तित्त्व मानावयाला किंवा आमच्या पुढाऱ्यांबरोबर सहकार्य करायलाच मुळी हिंदू तयार नाहीत .... आम्हाला प्रतिगामी ठरविण्यात येते, बदनाम करण्यात येते आणि आमच्यावर व्यक्तिगत हल्ले चढविण्यात येतात ... आम्हाला देशाचे स्वातंत्र्य हवे आहे. परंतु त्याच बरोबर आम्हाला आमच्या जमातीसाठीही स्वातंत्र्य हवे आहे' असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले तर जीनांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात देशात लीगच्या शेकडो शाखा स्थापन झाल्या असून अलिकडेच झालेल्या निवडणुकीत लीगचे साठ ते सत्तर टक्के उमेदवार निवडून आले असल्याचा मोठ्या अभिमानाने उल्लेख केला.

नंतर जीनांनी काँग्रेसवर तोंडसुख घेण्यास सुरुवात केली. ते म्हणाले काँग्रेस संपूर्ण स्वातंत्र्याच्या आणि १९३५ चा कायदा मोडण्याच्या वल्गना करीत होती. गव्हर्नरांच्या विशेषाधिकाराबाबत काँग्रेसने मागितलेले आश्वासन तिला मिळालेले नसताना तिने अधिकार स्वीकार केला आहे. मोडणे म्हणजे राबवणे असा तर काँग्रेसच्या शद्बकोशातील अर्थ नव्हे ? काँग्रेस पुढारी प्रत्यक्ष कृतीचीही भाषा करीत होते. तिच्याकडून यापूर्वी प्रत्यक्ष कृतीचे दोनदा प्रयत्न करून झाले, पण त्यातून जनतेला अपरिमित हाल आणि नुकसान सोसावे लागल्यावाचून दुसरे काय निष्पन्न झाले ? दारिद्र्य आणि भूक यांचा जो घोशा काँग्रेसने लावला आहे त्यामागील तिचा खरा उद्देश समाजवादाचे आणि साम्यवादाचे ध्येय जनतेच्या गळी उतरविणे हेच आहे. पण आज भारताची त्याला अजिबात तयारी नाही. सामुदायिक लढ्याच्या आत्मघातकी आणि निष्फळ धोरणाचा अवलंब करण्याऐवजी अल्पसंख्यांकाशी न्यायाचे वर्तन करणे आणि योग्य असेल ते त्यांच्या पदरात टाकणे हाच शहाणपणाचा मार्ग आहे, याची काँग्रेसने जाणीव बाळगावी. हिंदूंना सर्वस्वी अनुकूल असलेल्या धोरणामुळेच गेल्या दहा वर्षात भारतातील मुसलमान काँग्रेसला पारखे होऊ लागले असून त्यांची जबाबदारी तिच्यावरच आहे जीना पुढे म्हणाले की :—

काँग्रेस सरकारांनी .. आपल्या वाणीने, कृतीने आणि कार्यक्रमाने अधिकाधिक प्रमाणावर असे दाखवून दिले आहे की, त्यांच्याकडून न्याय किंवा सद्‌भावाची वागणूक मिळेल अशी अपेक्षा मुसलमानांनी करूच नये. .. हिंदी ही हिंदुस्तानची राष्ट्रभाषा होणार असून वंदे मातरम् हे राष्ट्रगीत म्हणून सर्वांवर लादले जाणार आहे. काँग्रेसच्या झेंड्याला सर्वांना मान द्यावा लागणार आहे. आताशी कोठे थोडीशी सत्ता हाती आली आहे तोच बहुसंख्य जमात हिंदुस्तान हा हिंदुंच्यासाठी आहे असे आपल्या मनातील गरळ ओकू लागली आहे. ... काँग्रेस पक्षाच्या सध्याच्या धोरणाची परिणती, वर्गीय कटुता आणि जातीय संघर्ष यात होणार असून त्यामुळे साम्राज्यशाहीची पकड मात्र अधिक बळकट होणार आहे असे मी बजावून ठेवतो."

वायव्य सरहद्द प्रांतातील संयुक्त मंत्रिमंडळाचा पराभव करून काँग्रेसने बहुमत आपल्यापाठीशी सिद्ध करून दाखवल्यानंतर स्वतःचे मंत्रिमंडळ स्थापन केले होते. परंतु या वस्तुस्थितीकडे पाठ फिरवून जीनांनी काँग्रेसवर 'संयुक्त जबाबदारीचे तत्त्व वाऱ्यावर सोडून दिल्याचा' व 'इतर गटांशी हातमिळवणी केल्याचा' आरोप केला ते पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्ष ज्या प्रांतात बहुमतात आहे तेथे 'मुस्लीम लीगबरोबर सहकार्य करण्याचे नाकारून लीगने बिनशर्त शरणागती पत्करावी अशी काँग्रेसने मागणी केली..... जो मुसलमान अशी बिनशर्त शरणागती पत्करण्याला तयार असेल आणि काँग्रेसच्या प्रतिज्ञा पत्रकावर सही करील त्यालाच काँग्रेसने मंत्री करून घेतले आणि बहुसंख्य मुसलमान आमदारांचा पाठिंबा नसला तरी मुसलमान मंत्री म्हणून काँग्रेस त्याला मिरवू लागली आहे, अल्पसंख्यांकाच्या संरक्षणासाठी गव्हर्नरांवर सोपविण्यात आलेल्या खास जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याबद्दल जीनांनी गव्हर्नरांनाही धारेवर धरले. मुसलमान मंत्र्यांच्या नेमणूकीबाबत ज्या घटना आणि आदेश पत्रामागील हेतू सरळ सरळ गुंडाळून ठेवले जात असताना गव्हर्नर त्याला हातभार लावीत आहेत असाही त्यांनी आरोप केला. काँग्रेसपुढे बिनशर्त शरणागती पत्करण्याची शिकवण दिल्याबद्दल त्यांनी काँग्रेसमधील मुसलमानांवरही हल्ला चढवला. दुसऱ्याच्या दयेवर आणि सदिच्छेवर विसंबून राहण्याची वृत्ती म्हणजे कमालीचा पराभूतपणा होय असे प्रतिपादन करून जीना पुढे म्हणाले की, मुसलमान समाजाशी कमालीचा द्रोह आहे आणि एकदा का अशा धोरणाचा अवलंब सुरू झाला म्हणजे देशाच्या राष्ट्रीय जीवनातील आणि सरकारी कामकाजातील आपले न्याय्यस्थान आपण गमावून बसू आणि सारा समाज विनाशाच्या गर्तेत जाण्याला वेळ लागणार नाही.

काँग्रेसच्या मुस्लीम जनता संपर्काच्या मोहीमेचा उल्लेख करून जीनांनी असा इशारा दिला की, मुसलमानांत फूट पाडून त्यांना दुर्बळ करण्याचा आणि मुस्लीम जनतेला तिच्या अधिकृत पुढाऱ्यांपासून अलग पाडण्याचा तो एक डाव आहे. भारत मंत्र्यांकडे

घटना समिती बोलावण्याची मागणी करणाऱ्या ठरावाची थट्टा उडविताना ते म्हणाले की :—

घटना समिती ही सार्वभौम सत्ताच आपल्या अधिकारात बोलावू शकते. जी परकीय सत्ता या देशावर सार्वभौम अधिकार गाजवीत आहे तिलाच घटना समिती बोलावण्यास सांगणे आणि त्यातही जातीय समस्या सुटलेली नसताना आणि देशातील प्रमुख राजकीय पक्षांनी काँग्रेसचे नेतृत्व मान्य केलेले नसताना अशी मागणी करणे म्हणजे घोड्यापुढे गाडी जोडण्यासारखे हास्यास्पद आहे. शिवाय सरकार अखिल भारतीय संघराज्य बनविण्याची आपली अत्यंत प्रतिगामी योजना राबविण्याच्या दिशेने पावले उचलीत आहे, याकडे मात्र साफ दुर्लक्ष करून काँग्रेसने घटना समितीची भाषा सुरू केली आहे.

आपल्या भाषणाच्या अखेरीस जीनांनी मुसलमानांनी स्वतःच आपले भाग्य विधाते बनावे आणि इतर कशाचाही विचार न करता स्वतःची संघटना बांधून आपली ताकद जास्तीत जास्त वाढवण्यावर सर्व लक्ष केंद्रीत करावे असे आवाहन केले.

जीनांनी त्या भाषणात आणखी असे सांगितले की :—

सन्माननीय तडजोड ही फक्त तुल्यबळातच होवू शकते. आणि जोपर्यंत दोन्ही एकमेकांबद्दल आदर आणि दरारा वाटत नाही तोपर्यंत कोठल्याही तडजोडीला भक्कम आधार असू शकत नाही. दुर्बळ पक्षाने शांततेचा हात पुढे करणे याचा अर्थ आपल्या दौर्बल्याची कबुली देणे आणि आक्रमणाला आमंत्रण देणे असाच नेहमी केला जातो. देशभक्ती, न्याय आणि चांगुलपणा त्याचप्रमाणे सद्भाव यासाठी केलेली सारी आवाहने त्यावेळी निरर्थक ठरतात. संरक्षक बंधने आणि कराररमदार यामागे जर सामर्थ्य नसेल तर ते कस्पटासमान ठरतात हे लक्षात यावयाला काही मोठे राजकीय शहाणपण लागत नाही.

अधिवेशनात एकूण १५ ठराव पास करण्यात आले. त्यातील खाली दिलेले ठराव निषेधात्मक होते. (१) लाहोरमधील शहीदगंज मशीद पाडल्याबद्दल, (२) इस्लाम विरोधी आणि मूर्तीपूजक असलेल्या वंदेमातरम हे राष्ट्रगीत करण्याचे काँग्रेसचे धोरण, (३) उर्दूच्या जागी हिंदी आणण्याची प्रयत्न, (४) स्थानिक संस्थांच्या निवडणुकात संयुक्त मतदार संघांची पद्धत सुरू करणे, (५) मुसलमानांच्या हितसंबंधाना मारक ठरणारी अखिल भारतीय संघ राज्याची योजना, (६) मुसलमानांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी देण्यात आलेल्या विशेषाधिकारांचा वापर करण्याच्या बाबतीत गव्हर्नरांकडून झालेली कुचराई आणि १९३५ चा कायदा उघड उघड धाब्यावर बसवून त्यांनी काँग्रेसला मंत्रिमंडळे बनविण्याची दिलेली संधी. उर्दू संबंधीच्या ठरावात ती भाषा भारतांचे राष्ट्रीयत्त्व विकसित होण्याच्या दृष्टीने सर्वात सोयीची आहे असे नमूद केले होते.

या व्यतिरिक्त आणखी दोन ठराव मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहेत. एका

ठरावान्वये असे जाहीर करण्यात आले की, मुसलमान आणि इतर अल्पसंख्यांकाचे हितसंबंध आणि हक्क सुरक्षित राहावेत म्हणून घटनेत जरूर ती तरतूद असलेले स्वतंत्र आणि लोकशाही प्रांताचे संघराज्याच्या स्वरूपातील संपूर्ण स्वतंत्र भारत निर्माण करणे हे लीगचे उद्दिष्ट राहील. मात्र ठराव मांडताना हसरत मोहानी यांनी जे भाषण केले त्यात त्यांनी सांगितले की, ब्रिटीश सरकार बरोबरचे सर्व संबंध तोडून टाकावयाचे असे लीगला अभिप्रेत नाही. देशी संस्थानांना जोपर्यंत स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त होत नाही तोपर्यंत भारतीय संघ राज्यात त्याचा समावेश होऊ शकणार नाही असाही खुलासा त्यांनी आपल्या भाषणात केला. आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यक्रमासंबंधीच्या शेवटच्या ठरावात खालील बाबींचा समावेश करण्यात आला होता (१) औद्योगिक कामगारांचे किमान वेतन आणि कामाचे तास निश्चित करणे, आणि त्यांच्या आरोग्य आणि निवासाच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे (२) व्याज घेण्यावर बंदी, (३) सर्व प्रकारच्या कर्ज वसुलीची तहकुबी, (४) हुकुम-नामा बजावताना घराची जप्ती किंवा विक्री यात सूट देणारा कायदा करणे, (५) खंडकऱ्यांना वाजवी खंड ठरवून देणे आणि त्यांना बेदखलीपासून संरक्षण, (६) कुटीर आणि लघू उद्योगांना प्रोत्साहन, (७) स्वदेशीला प्रोत्साहन, (८) बेकार भत्ता, (९) सक्तीचे प्राथमिक शिक्षण आणि शास्त्र व तांत्रिक शिक्षणाची पुनर्रचना, (१०) दारू-बंदी, (११) रायफल क्लब आणि लष्करी महाविद्यालय सुरू करणे, (१२) समाज सेवेसाठी स्वयंसेवक दल उभारणे, (१३) मुसलमान समाजातील इस्लामशी विसंगत असलेल्या सर्व रूढी व चालीरिती बंद पाडणेस.

लखनौ अधिवेशनानंतर लगेच गांधींनी जीनांना पत्र लिहून असे कळविले की, 'तुमचे भाषण म्हणजे कॉंग्रेसविरूद्ध युद्धाची घोषणा आहे असे माझे मत बनले आहे, त्यानंतर नेहरू आणि कॉंग्रेस अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनीही जीनांना पत्रे पाठवून त्यांची भेट घेण्याची इच्छा दर्शविली. जीनांनी प्रथम गांधीना भेटण्याची तयारी दर्शविली परंतु या भेटीच्या वेळी मौलाना आझाद यांनी उपस्थित राहावे ही सूचना मात्र त्यांनी साफ फेटाळून लावली. तारीख ३ मार्च १९३८ रोजी गांधींना लिहिलेल्या पत्रात त्यांनी एक विलक्षणच मागणी केली.

> आपण अशा एका अवस्थेप्रत येऊन पोहोचलो आहोत की, शंकेला कोटलीही जागा राहू देता कामा नये. अखिल भारतीय मुस्लीम लीग ही हिंदुस्तानातील मुसलमानांची एकमेव अधिकृत आणि प्रातिनिधिक संघटना आहे तर तुम्ही देशातील यच्चयावत हिंदू आणि कॉंग्रेस यांचे प्रतिनिधित्व तुम्ही करता हे तुम्ही मान्य करावे. या आधारावरच आपल्याला चर्चा पुढे चालवता येईल.

पाच दिवसानंतर गांधींनी पाठवलेल्या उत्तरात असे म्हटले होते की, कॉंग्रेस आणि देशातील यच्चयावत सारे हिंदू यांच्या वतीने मी बोलू शकेन अशी आपली अपेक्षा दिसते परंतु आपली ती अट मी पुरी करू शकेन असे मला वाटत नाही. गांधींची

वर्ध्याला भेटीस येण्याची विनंती अव्हेरून जीनांनी त्यांना तारीख २८ एप्रिल रोजी मुंबईतील आपल्या निवासस्थानी भेटीस बोलावले. परंतु बोलणी निष्फळ ठरणार हे उघडच होते. २६ मे १९३८ रोजी सुभाषचंद्र बोस यांच्याबरोबर झालेल्या वाटाघाटींच्या वेळी जीनांनी असा आग्रह धरला की, मुस्लीम लीग ही भारतीय मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संघटना आहे हे काँग्रेसने मान्य करावे इतकेच नव्हे तर जो काही करार होणार असेल त्याच्या सरनाम्यात हिंदूच्या वतीने म्हणून काँग्रेस या करारात सहभागी होत आहे असा तिने स्पष्ट निर्देश करावा, जीनांनी वाटाघाटी आणि करार करण्यासाठी घातलेल्या या पूर्व अटी मान्य करता येत नाहीत असे तारीख २५ जुलै रोजी त्यांना काँग्रेसने कळविले.

लखनौच्या अधिवेशनात लीगने जे विविध आक्षेप घेतले होते त्याचे खंडन करण्याचा नेहरूंनी १८ जानेवारी पासूनच प्रयत्न चालू ठेवला होता. (१) हिंदी, हिंदुस्तानी आणि उर्दू, या बाबतची काँग्रेसची भूमिका नेहरूंनी लिहिलेल्या **भाषेचा प्रश्न** या पुस्तिकेत स्पष्ट करण्यात आली आहे. ती भूमिका गांधींना मान्य आहे इतकेच नव्हे तर अंजुमाने-ई-तरक्की-ई-उर्दू या हैद्राबाद येथील संस्थेचे चिटणीस मौलवी अबदुल हक यांनी देखील तिला मान्यता दिली आहे. उर्दूला विघातक ठरेल असे काँग्रेसने काहीही केलेले नाही. मद्रास प्रांतातील काँग्रेस मंत्रिमंडळ मुद्दाम जामीया मिलीया या संस्थेकडून तयार करवून घेतलेली पुस्तके शाळातून लावणार असून ती देवनागरी आणि उर्दु अशा दोन्ही लिपीतून छापली जाणार आहेत, आणि कोणत्या लिपीतील पुस्तक निवडावयाचे ते संबंधित विद्यार्थ्यांवर सोपविण्यात येणार आहे. (२) **जातीय निवाडा** : एक वस्तुस्थिती म्हणून काँग्रेसने तो स्वीकारला आहे. (३) **वंदे मातरम्** : गेल्या तीस वर्षापासून हे गीत भारतीय राष्ट्रवादाशी निगडित असून त्याच्या भोवती त्यागाच्या आणि भावनांच्या अनेक स्मृतींची गुंफण झाली आहे सरकारव्यतिरिक्त अन्य कोणीही त्या गीतावर आक्षेप घेतलेला नाही. तरी देखील काँग्रेस वर्किंग कमेटीने १९३७ च्या ऑक्टोबरात त्या गीतातील फक्त दोन कडव्यांची राष्ट्रगीत म्हणून निवड केली असून त्या कडव्यांबाबत कोणताही आक्षेप येण्यासारखा नाही. नेहरूंनी पुढे अशी पुस्ती जोडली होती की, हजारो लोक ज्या गीताला मानीत आहेत आणि त्याच्याशी ज्यांच्या भावना निगडित झाल्या आहेत त्यांना त्या गीताचा त्याग करावयास सांगणे म्हणजे त्यांच्या भावना दुखावण्यासारखे इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष राष्ट्रीय चळवळीलाच हानी पोहोचविण्यासारखे ठरणार आहे. (४) **स्वतंत्र मतदार संघ** : संयुक्त मतदार संघ काँग्रेसला अधिक पसंत होते हे खरे असले तरी ज्यांना ते नको असतील त्यांच्यावर काँग्रेस ते सक्तीने लादू इच्छित नाही. मुंबई सरकारने अलिकडेच एका विधेयकाने स्थानिक संस्थात स्वतंत्र मतदार संघाची तरतूद केली आहे मात्र त्यात ज्या अल्पसंख्य समाजाला स्वतंत्र मतदार संघ नको असतील याला संयुक्त मतदार संघात राहण्याची मुभा ठेवली आहे. जीनांच्या १४ कलमी

जाहीरनाम्यातील सातव्या कलमाला अनुसरूनच हे आहे. तरीही मुंबईच्या कायदे-मंडळातील मुस्लीम लीगच्या गटाने तिच्याच धोरणाचा अंतर्भाव असलेल्या त्या विधेयकास विरोध केला होता, शिवाय मुस्लीम लीगच्या १९२९ च्या ठरावात असे स्पष्ट करण्यात आले होते की, सिंध प्रांत खरोखरीच स्वतंत्र करण्यात आला आणि १९३५ चा सुधारणा कायदा वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान यांना लागू करण्यात आला तर लीग संयुक्त मतदार संघाला संमती देईल. त्यापैकी पहिल्या दोन अटी पुऱ्या झाल्या असून बलचिस्तानला सुधारणा कायदा लागू करण्यास काँग्रेस वचनबद्ध आहे. (५) **राष्ट्रध्वज :** मुस्लीम. शीख आणि इतर ख्यातनाम नेत्यांशी सांगोपांग चर्चा केल्यानंतरच काँग्रेसने १९२९ साली तिरंगी राष्ट्रध्वज कायम केला त्या संबंधात नेहरू पुढे लिहितात :—

सध्याच्या राष्ट्रीय ध्वजाचे रंग ठरविताना ते निरनिराळ्या जमातीचे प्रातिनिधिक असावेत अशी मूळची कल्पना होती, परंतु राष्ट्रध्वजातील रंगांच्या बाबत असा जातीविषयक दृष्टीकोन ठेवावा हे आम्हाला पसंत नव्हते. अनेक प्रसंगी मौलाना महंमद अली मौलाना शौकत अली, आणि आजच्या लीग नेत्यापैकी बऱ्याच जणांनी हा ध्वज आपला मानलेला आहे आणि भारतीय ऐक्याचे प्रतिक म्हणून त्याचे गुणगान केलेले आहे असे असताना आता कोणीही झाले तरी त्याला संयुक्तिकपणे विरोध कसा काय करू शकतात ते समजणे कठीण आहे. कोणत्याही जातीचा झेंडा त्याची जागा घेऊ शकणार नाही. हे उघड आहे कारण मग विविध जमातींची विविध निशाणे एकाच वेळी वापरावी लागतील आणि आपल्यातील फाटाफुटीचे आणि अलगतावादाचे मात्र त्यामुळे प्रदर्शन होईल. गेल्या काही महिन्यात अनेक प्रसंगी मुस्लीम लीगच्या काही सभासदांनी किंवा स्वयंसेवकांनी राष्ट्रध्वजाचा अवमान केला आहे हेही मी नजरेस आणून देऊ इच्छितो यामुळे आम्हाला अत्यंत दुःख झाले परंतु जातीय कटुतेत आणखी भर पडू नये म्हणून संघर्षात्मक अशी कोणतीही पावले उचलण्याचे आम्ही जाणूनबुजून टाळले.

आपल्या निश्चित स्वरूपाच्या मागण्या मांडण्याची जीना पुन्हाः पुन्हाः टाळाटाळ करीत होते. नेहरूंनी त्यावर नेमके बोट ठेवले. १७ मार्च १९३८ रोजी जीनांनी वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या सूचनांचा उल्लेख करून दोन निनावी लेखांची कात्रणे यासोबत जोडली. तारीख ६ एप्रिल रोजी त्यांना पाठवलेल्या उत्तरात नेहरूंनी असे नमूद केले की, त्यांच्या समजुतीप्रमाणे जीनांना पुढीलप्रमाणे अनेक प्रश्नावर करार घडून यावयाला हवा आहे. (१) जीनांची १४ कलमे, (२) जातीय निवाड्याला मंजुरी, (३) प्रांतिक सरकारच्या नोकऱ्यात मुसलमानांचे प्रमाण निश्चित करणे, (४) मुस्लीम व्यक्तिगत कायदा आणि संस्कृती याबाबत हमी देणारा कायदा, (५) शहीदगंज मशिदीचा प्रश्न काँग्रेसने हाती घेऊन मुसलमानांना त्या मशिदीचा ताबा मिळवून देण्यासाठी आपले नैतिक वजन खर्च करावे, (६) धार्मिक विधी इ.

बाबत मुसलमानांच्या अनिर्बंध हक्काला मान्यता, (७) गो-वधाला मुसलमानांना मुभा, (८) यापुढे होणाऱ्या कोणत्याही प्रादेशिक फेररचनेत विद्यमान प्रांतात जेथे मुसलमानांची बहुसंख्या असेल तेथे ती अबाधित राखणे, (९) उर्दूला राष्ट्रभाषेचा दर्जा, (१०) मुस्लीम लीगला मुसलमानांची एकमेव अधिकृत आणि प्रातिनिधिक संघटना म्हणून मान्यता, आणि (११) संयुक्त मंत्रिमंडळे.

नेहरूंनी पुढे असे दाखवून दिले की, १९३५ साली जीना आणि राजेंद्र प्रसाद यांनी जो मसूदा तयार करीत आणला होता तो मुसलमानांना आता समाधानकारक वाटेनासा झाला आहे असे दिसते आणि त्यामुळे त्या आधारावर होणारी कोणतीही तडजोड त्यांना मान्य होणार नाही. या मुद्यांबाबत नेहरूंचे म्हणणे असे होते की, जोपर्यंत घटना समिती अस्तित्त्वात येत नाही तोपर्यंत विविध तरतुदींचा समावेश घटनेत कसा करता येणार? परंतु अल्पसंख्यांकांच्या हक्कासकट मूलभूत अधिकारासंबंधीचा कराचीचा ठराव काँग्रेस भावी राज्यघटनेत समाविष्ट करण्यास तयार आहे. १४ कलमी जाहीरनाम्यातील अनेक मागण्या जातीय निवाड्यान्वये पदरात पडलेल्याच आहेत आणि उरलेल्यापैकी काही काँग्रेसला मान्य होण्यासारख्या आहेत. जोपर्यंत दुसरा पर्याय निघत नाही. तोपर्यंत जातीय निवाडा आहे तसाच राहू द्यावा याला काँग्रेसने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे. वस्तुतः स्वतः जीनाच १९३५ पासून ही भूमिका घेत आलेले आहेत. सरकारी नोकऱ्यातील मुसलमानांच्या प्रमाणाबद्दल बोलावयाचे तर प्रशासकीय चौकट जथाबंद आणि अगदी काटेकोर बनविण्याऐवजी निरनिराळ्या जमातींना प्रांतिक नोकऱ्यांत न्याय्य आणि योग्य वाटा मिळवून देण्याच्या बाबतीत चांगले संकेत निर्माण करणे अधिक युक्त ठरेल. काँग्रेस कायदा करून सक्तीने गोवध बंदी घडवून आणणार आहे अशी समजूत करून घेणे चूक ठरेल, प्रादेशिक फेररचनेचा प्रश्न अद्याप पुढे आलेला नाही, मुस्लीम लीग ही एक महत्त्वाची जातीय संघटना आहे हे काँग्रेसला मान्य असले तरी मुसलमानांची एकमेव अधिकृत आणि प्रातिनिधिक संघटना म्हणून तिला मान्यता देणे काँग्रेसला जमणार नाही. कारण मुसलमान बहुसंख्य असलेल्या वायव्य सरहद्द प्रांतात काँग्रेस मंत्रिमंडळ आजही अधिकारावर आहे आणि जमियत, अहरार यांसारख्या इतर अनेक मुस्लीम संघटना काँग्रेसशी सक्रीय सहकार्य करीत आहेत. निश्चित कार्यक्रमाच्या आधारे संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याची काँग्रेसची तयारी आहे. वरील खुलासा लक्षात घेऊन जीनांनी आपले आरोप सिद्ध करून दाखवावेत अशी विनंती करून, मुस्लीम लीगकडून काँग्रेसवर केल्या जाणाऱ्या आरोपांबाबत दोघांना मान्य असलेल्या निकषांच्या आधारे चौकशी करण्याचीही नेहरूंनी तयारी दर्शविली.

नेहरूना पाठवलेल्या उत्तरात आरोपाची बाब शुल्लक आहे असे म्हणून जीनांनी मूळ प्रश्नाला बगल दिली आणि नेहरूंनी चौकशीची तयारी दाखवली असताना तिलाही नकार देऊन जीनांनी तावातावाने उलट नेहरूंवरच असा आरोप केला की,

"आपल्याला माझ्या पत्रांचा नीट अर्थदेखील लावता येत नाही असे दिसते" मी आपणाला जे पत्र लिहिले त्याला तेढी कलाटणी देवून आपल्याच विनंतीवरून मी जी भूमिका आपल्यासमोर मांडली त्याचा आपण अजिबात चुकीचा अर्थ लावून घेतलात याचा मला खेद वाटतो. आपण आपल्या पत्रात उपस्थित केलेल्या काही मुद्यांचे जनकत्व माझ्यावर लादून जणू त्या माझ्याच सूचना आहेत असे तुम्ही भासवीत आहात."

या पत्रव्यवहारानंतर थोड्याच दिवसात कलकत्ता येथे जीनांच्या अध्यक्षतेखाली मुस्लीम लीगचे खास अधिवेशन भरले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी मुस्लीम लीगच्या संघटनेत नेत्रदीपक वाढ झाल्याचे सांगून पक्ष म्हणून सात प्रांताच्या कायदे-मंडळात आणि मध्यवर्ती कायदेमंडळातही तिचे कार्य सुरू असल्याचे प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिले. मुसलमान समाजावर मुल्ला मौलवीचा जो अनिष्ट प्रभाव होता तो दूर करण्यात लीग यशस्वी झाली असल्याचा त्यांनी दावा केला. मुस्लीम लीगच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळून तारीख १८ फेब्रुवारी रोजी हिंदुस्तानातील जवळ जवळ प्रत्येक शहरात आणि अनेक खेड्यातूनही शहीदगंज दिन पाळला गेला. याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. शहीदगंज प्रकरणी शिकदंर हयात खान यांनी घेतलेली भूमिका उचलून धरून त्यांनी संयम पाळण्याचा सल्ला दिला. काँग्रेस अधिकारावर असलेल्या प्रांतातून मुसलमानांना वाईट रीतीने वागविण्यात येत असल्याच्या व त्यांच्यावर अन्याय होत असल्याच्या नानाविध तक्रारींचा उल्लेख करून अशा तक्रारींची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली असल्याचे जीनांनी जाहीर केले. नेहरूंनी सर्व खुलासा केलेला असतानाही लखनौच्या अधिवेशनात केलेल्या त्याच त्या आरोपांचा त्यांनी पुनरूच्चार केला.

एकीकडे काँग्रेस पुढाऱ्यांबरोबरचा पत्रव्यवहार चालू असतानाच जीनांनी काँग्रेस पक्षाविरूद्धची आपली प्रचार मोहीम अधिक तीव्र बनविली. काँग्रेस मंत्र्यांना त्यांच्यावर केले जाणारे आरोप कसे गैरलागू आहेत ते पटवून देण्यासाठी बचावात्मक पवित्रा घ्यावा लागे. तारीख १२ मे रोजी बिहार कायदेमंडळात मुसलमानांच्या नागरी हक्कात कपात केल्याचा आरोप कसा निराधार आहे ते दाखवून देण्यासाठी संबंधित मंत्र्यांनी एक विस्तृत निवेदन केले. संयुक्त प्रांत कायदेमंडळात झेड. एच. लारी यांनी रेव्हेन्यू बोर्डाच्या एका सदस्याने आपला सुरूवातीचा निवाडा फाडून टाकून त्याजागी दुसरा निवाडा घुसविला असा जो आरोप केला होता त्याचा मुख्यमंत्री गोविंद वल्लभ पंत यांना जाहीर इन्कार करावा लागला. असे असूनही डॉ. गोबेल्सप्रमाणे वारेमाप आरोप करणे चालूच होते. या सर्वावर कढी म्हणजे काँग्रेसवर केल्या जाणाऱ्या आरोपांची न्यायालयीन किंवा त्रयस्थ व्यक्तीकडून चौकशी करून घेण्याची तिने वारंवार तयारी दाखवलेली असूनही तिला स्पष्ट नकार देऊन जीनांनी लीगमार्फत खास चौकशी समित्या नियुक्त केल्या. जीना हे स्वतः व्यवसायाने कायदेपंडित असूनही स्वतःकडे फिर्यादीची आणि न्यायाधिशाची भूमिका घेण्यात त्यांना काही गैर वाटले नाही.

याहूनही वाईट गोष्ट म्हणजे लीगचे कार्यकर्ते काँग्रेस अधिकारावर असलेल्या प्रांतातून दंग्याची चिथावणी देऊ लागले.

सरकारी इमारतींवर काँग्रेस आणि लीग या दोघांचेही झेंडे फडकले पाहिजेत असा जीनांचा आग्रह असे. संयुक्त प्रांतात आणि बिहारमध्ये अनेक ठिकाणी मुस्लीम लीगच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसच्या ध्वजाची विटंबना करून जातीय शांतता धोक्यात येईल अशी परिस्थिती निर्माण केली. हे प्रकार नेहरूंनी जीनांच्या नजरेस आणून दिल्यानंतरही त्याला जरा देखील आळा बसला नाही. अनेक गृहमंत्र्यांनी कायदे-मंडळातून लीगवर जातीय दंगलींना चिथावणी दिल्याचे जाहीर आरोप केले. १९३८ मध्ये अनेक प्रसंगी जीनांनी तावातावाने या आरोपांचा इन्कार केला. मुसलमान युवक डाव्या विचारसरणीकडे वळू नयेत म्हणून त्यांच्यात जातीयवाद भिनवण्यासाठी जीनांनी अनेक उपाय योजले. १९३७ च्या डिसेंबरात कलकत्ता येथे भरलेल्या ऑल इंडिया मुस्लीम स्टुडंस्टस फेडरेशनचे त्यांनी अध्यक्षपद स्वीकारले होते. तेव्हापासून त्यांनी मुस्लीम लीगच्या अधिवेशनाला जोडून मुस्लीम स्टुडंट्स फेडरेशनचेही अधि-वेशन भरविण्याचा परिपाठ सुरू केला. विद्यार्थ्यांप्रमाणेच, ऑल इंडिया वुइमेन्स फेडरेशनमधून मुस्लीम स्त्रियांना आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठी त्यांनी मुस्लीम वुइमेन्स कॉन्फरन्सही संघटीत केली.

बंगालचे मुख्यमंत्री फजलूल हक हेही आपल्या प्रांतात जातीय भावनांना चिथावणी देण्याच्या बाबतीत मागे नव्हते. काँग्रेसला बदनाम करण्याच्या त्यांच्या मोहीमेला उत्तर देण्यासाठी सुभाषचंद्र बोस यांनी जून १९३८ मध्ये बंगाल प्रांताचा दौरा सुरू केला होता. त्यांच्या सभांना मुसलमान फार मोठ्या संख्येने हजर राहात होते. इतकेच नव्हे तर रेल्वे आणि बस स्थानकावरही त्यांच्या स्वागतासाठी जमा होत होते. यादृष्टीने सुभाषबाबूचा दौरा यशस्वी होत होता. १५ जून रोजी ब्राह्मण बारीया येथे त्यांची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. दहा हजारांवर हिंदू-मुसलमान नागरिक त्या मिरवणुकीत सामील झाले होते. स्थानिक मुस्लीम लीगचे कार्यकर्ते त्यामुळे इतके चिडले की त्यांनी दगडफेकीस सुरूवात केली. त्यात सुभाषबाबूसकट सोळा जण जखमी झाले. काँग्रेस हिंदूचे राज्य प्रस्थापित करायला निघाली आहे, तिला नऊ कोटी मुसलमानांना गुलाम बनवावयाचे आहे आणि काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर असलेल्या प्रांतातील मुसलमानांचे जीवित, वित्त, धर्म आणि प्रतिष्ठा अत्यंत धोक्यात आहे अशा तऱ्हेचा धांदात खोटा प्रचार करणारी पत्रके मुस्लीम लीगने वाटली असतानाही ब्राह्मण बारियाचे हजारो मुसलमान आपल्या स्वागताला आणि सभांना कसे हजर राहत असत ते दाखवून देणारे पत्रक हा प्रकार घडल्यानंतर लगेच सुभाषबाबूंनी प्रसिद्ध केले होते. त्या प्रत्रकात त्यांनी असेही म्हटले होते की, काँग्रेसचा बंगाल टेनन्सी बिलाला विरोध होता असा जो आरोप केला जातो तो सिद्ध करून दाखवण्याचे जाहीर आव्हान आपण मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांना दिले होते.

त्याचप्रमाणे मौलाना आझाद यांनी फजलूल हक यांना ते करीत असलेले आरोप सिद्ध करण्याचे आव्हान दिले असताना त्यापैकी एखादाही आरोप ते सिद्ध करू शकले नव्हते याचेही सुभाषबाबूंनी आपल्या पत्रकात स्मरण करून दिले होते.

लीगमधील सनातनी प्रवृत्तीचे नेते काँग्रेसच्या आर्थिक धोरणांमुळे घाबरून गेले होते. जवाहरलाल नेहरू आणि इतर पुढारी समाजवादावर जो भर देऊ लागले होते त्याचीही त्यांनी दशहत घेतली होती. डिसेंबर १९३८ मध्ये पाटणा येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात जीनांनी अशी दर्पोक्ती काढली होती की, 'स्वातंत्र्य, आर्थिक प्रश्न, कामगार किसान यासारख्या जहाल घोषणामुळे काँग्रेसकडे आकर्षित झालेल्या मुसलमान युवकांना मुस्लीम लीगने गेल्या तीन वर्षात आपल्या बाजूने वळवून घेतले आहे. स्वागत समितीच्या वतीने भाषण करताना सैयद अबदुल अझीज यांनी राष्ट्रवाद आणि समाजवाद याविरूद्ध झोड उठविली आणि ती विचारसरणी इस्लाम-विरोधी आहे असे घोषित करून काँग्रेसचे आणि समाजवाद्यांचे त्यासंबंधीचे विचार मुसलमानांच्या दृष्टीने विघातक आहेत असे प्रतिपादन केले. मुस्लीम लीग जमीनदारी कधीही नष्ट करणार नाही, त्याचप्रमाणे भांडवलदारांना उद्योगधंद्यात भांडवल-गुंतवणे फायद्याचे ठरणार नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ देणार नाही, असे आश्वासन देऊन त्यांनी पुढे असे जाहीर केले की, ही मर्यादा सांभाळून शेतकरी आणि कामगार यांच्यासाठी जे काही करता येण्यासारखे असेल ते मुस्लीम लीग जरूर जरूर करील. सर सिकंदर हयात खान यांनीही अशीच भूमिका मांडली. जमीनदार वर्गाच्या उठावणीमुळे बिहारमधील काँग्रेस मंत्रिमंडळ इतके गडबडून गेले की, शेवटी ते जो कूळ कायदा करणार होते त्यात सरकार आणि जमीनदार यांच्या दरम्यान झालेल्या समझोत्यातील तरतुदींचा समावेश करण्यात आला.

उलटपक्षी काँग्रेसानुकुल किसान सभेचे दडपणही वाढत होते. बिहार सरकारने कुळ कायद्याच्याबाबत जी तडजोड पत्करली होती त्यावर जोरदार आक्षेप घेऊन किसान सभेने जमीनदारांबरोबर कोणत्याही प्रकारचा समझोता करण्यापासून इतर काँग्रेस मंत्रिमंडळांना परावृत्त केले. किसान सभेचे नेतृत्त्व निरनिराळ्या डाव्या विचार सरणीच्या डाव्या नेत्यांकडे होते. त्यापैकी काही तर काँग्रेसमधील उच्च पदांवर होते. किसान सभेने खुद्द काँग्रेस सरकारांविरूद्ध चळवळ करण्यास कमी केले नाही. त्याच-प्रमाणे काँग्रेसवर नियंत्रण असलेल्या उजव्या नेतृत्त्वाबरोबर दोन हात करण्यासही तिने मागे पुढे पाहिले नाही. किसान सभेच्या आंदोलनामुळेच बंगालच्या कूळ कायद्याला इतके दिवस थोपवून ठेवलेली मंजुरी गव्हर्नरला द्यावी लागली. सुभाषचंद्र बोस आणि प्रो. रंगा यांनी त्यासाठी एक महिनाभर प्रचार मोहीम चालविली होती. पंजाबच्या किसान सभेनेही सरकारने आणलेल्या पुरोगामी विधेयकांना पाठिंबा दिला होता.

लखनौच्या अधिवेशनानंतर सहा महिन्याच्या आतच कलकत्ता येथे १९३८ साली

मुस्लीम लीगचे खास अधिवेशन भरले होते. काँग्रेसविरोधी प्रचार मोहीमेसाठी तर त्याचा उपयोग करून घेण्यात आंलाच तथापि, या अधिवेशनाचा मुख्य उद्देश आसाम, बंगाल आणि पंजाबमधील मुस्लीम लीगला अनुकूल असलेल्या सरकारांना ज्या राजकीय अडचणींना तोंड द्यावे लागत होते. त्यातून मार्ग काढणे हा होता. त्या वेळेपर्यंत फजलूल हक यांच्या कृषक प्रजा पार्टीत फूट पडून तीस जणांचा एक गट त्यातून बाहेर पडला होता. फजलूल हक यांना पाठिंबा देण्यासाठी या गटावर जास्तीत जास्त दडपण आणण्याचा या अधिवेशनात निकराचा प्रयत्न झाला.

त्या अधिवेशनात काँग्रेसने निरनिराळ्या प्रांतातील मंत्रिमंडळांची फेररचना करावी आणि प्रत्येक प्रांतात काँग्रेस-लीग संयुक्त मंत्रिमंडळे स्थापन करण्यासाठी मुस्लीम लीग बरोबर समझोता घडवून आणावा. सरकारी नोकऱ्यांतील नेमणुका आणि मुसलमानांचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन यासंबंधी सन्माननीय तडजोड घडवून आणावी आणि शहीदगंज मशीद प्रकरणी मुसलमान आणि शीख यांच्यात मध्यस्ती करून तो प्रश्न सोडवावा अशीही हक यांनी मागणी केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात जीनांनी काँग्रेसने मुस्लीम लीगला संपूर्ण बरोबरीचा दर्जा द्यावा आणि इतर पक्षांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत हा दावा तिने सोडून द्यावा असे सांगितले. बंगालमधील हक आणि आसाममधील सादुल्ला यांचे मंत्रिमंडळ यांची मुख्यत: काँग्रेसच्या उपदव्यापांचा प्रतिकार केल्याबद्दल प्रशस्ती करणारा आणि या मंत्रिमंडळांना संपूर्ण पाठिंबा देण्याचे मुसलमानांना आवाहन करणारा ठराव अधिवेशनात संमत करण्यात आला. दुसरा ठराव सर सिकंदर यांना पंजाबमध्ये ज्या अडचणींना तोंड द्यावे लागत होते त्यासंबंधीचा होता. त्या प्रांतात काही मुसलमानांनी शहीदगंज प्रकरणात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याची धमकी दिली होती. या प्रकरणात शीखांच्या बरोबर समझोता घडवून आणण्यासाठी शांततामय वातावरण निर्माण करण्याचे आणि टिकवण्याचे मुसलमानांना आवाहन करण्यात आले होते. या ठरावावर भाषण करताना पंजाबमधील एका प्रतिनिधीने सविनय कायदेभंग करू पाहाणारे पुढारी हे काँग्रेसचे हस्तक असून त्यांना प्रांतातील मुसलमानांच्या एकतेत बिब्बा घालावयाचा आहे असा आरोप केला तर सर सिकंदर यांनी पंजाब आणि बंगालमधील मुसलमानांचे ऐक्य दुभंगले तर ते केवळ या दोन प्रांतांनाच नव्हे तर इतर प्रांतानाही विघातक ठरेल असे बजावले. तिसऱ्या ठरावान्वये भारतातील मुसलमानांना वायव्य सरहद्द प्रांतात काँग्रेसने ज्या मुस्लीम विरोधी कारवाया चालवल्या आहेत त्यांचा मुकाबला करण्यासाठी खास उपाय योजण्याचे आवाहन करण्यात आले आणि चौथ्या ठरावात जातीय दंग्यांच्यावेळी मुसलमानांचे जीवित आणि वित्त वाचविण्याच्या कामी अपेशी ठरवल्याबद्दल संयुक्त प्रांत, बिहार, मध्यप्रांत आणि मुंबईच्या सरकारांचा निषेध करण्यात आला होता.

या अधिवेशनाचा हेतू काही प्रमाणात साध्य झाला असे म्हणता येईल कारण त्यानंतर वर्षभर सर सिकंदर आणि फजलूल हक यांना सरकार चालविण्याच्या बाबतीत फारशा कटकटी अनुभवाला आल्या नाहीत. तथापि सादुल्लांचे डळमळीत संयुक्त मंत्रिमंडळ मात्र वाचू शकले नाही. सादुल्ला हे वस्तुत: अल्पसंख्य संयुक्त गटाचे नेते असताना गव्हर्नरांनी त्यांना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण केले होते. कारण काँग्रेस हा जरी कायदेमंडळातील सर्वात मोठा गट होता तरी तो कोणाबरोबर आघाडी करून संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्यास तयार नव्हता. ज्याच्या हातात चार दोन मते असतील अशा कोणालाही मंत्रिपद देऊ करून सादुल्लांनी अधिकारावर आल्यानंतर बहुमत मिळवण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु तो निष्फळ ठरला आणि शेवटी त्यांना राजीनामा द्यावा लागला. आणि तारीख १९ सप्टेंबर १९३८ रोजी काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आले. साहजिकच जीना त्यामुळे आणखीच संतापले. वायव्य सरहद्द प्रांतात तर त्यांची परिस्थिती भिंतींवर डोके आपटून घेण्यासारखी झाली होती. कारण त्या प्रांताचे मुख्यमंत्री डॉ. खानसाहेब यांना पाठिंबा देणाऱ्या मुसलमानांपैकी एकालाही ते आपल्या बाजूला वळवून घेऊ शकले नाहीत. परंतु सिंध मधील देखील आपले प्रयत्न निष्फळ ठरावेत याची त्यांना सर्वात जास्त खंत वाटत होती. त्यामुळे त्यांनी आपले सर्व लक्ष सिंधवरच केंद्रीत करण्याचे ठरविले. तारीख ८ ऑक्टोबर १९३८ रोजी कराचीस भरलेल्या सिंध मुस्लीम लीगच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद जीनांनी स्वीकारले होते. या अधिवेशनात त्यांनी प्रांतिक कायदे मंडळातील सर्व मुसलमान सभासदांना लीगच्या पंखाखाली आणण्याचा प्रयत्न केला. जीनांनी त्यांना असे पटवून दिले की, कायदेमंडळात लीग सभासदांचे बहुमत असल्याने सिंध सरकारचा कारभार आपल्या हातात घेऊन 'सिंध मधील जनतेचा आणि विशेषत: मुसलमानांचा यशस्वीरित्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय विकास घडवून आणणे हे तुमचे कर्तव्य आणि जबाबदारी ठरते.' फजलूल हक आणि सर सिकंदर हयात खान यांचीही या अधिवेशनात भाषणे झाली. त्या दोघांनीही आपापसातील मतभेद मिटवून प्रांतिक सरकार ताब्यात घेण्यासाठी संयुक्त मुस्लीम लीग पक्ष स्थापन करावा असे कायदेमंडळातील सर्व मुसलमान सभासदांना आवाहन केले. इस्लामसाठी जास्तीत जास्त त्याग करण्यास सांगून फजलूल हक म्हणाले, 'आठ वर्षाच्या महंमद बिन कासीम जर केवळ १८ सैनिकांना बरोबर घेऊन सिंध प्रांत काबीज करू शकतो तर ९ कोटी मुसलमान संबंध हिंदुस्तान आपल्या नियंत्रणाखाली का आणू शकणार नाहीत? (प्रचंड टाळ्या). आपल्या स्वागताध्यक्षीय भाषणात सर अबदुल्ला हरून यांनी काँग्रेसला असा इशारा दिला की, जर बहुसंख्य जमातीने आपला असंमजसपणा आणि हेकटपणा तसाच चालू ठेवला आणि मुसलमानांच्या आकांक्षा फलद्रूप होण्याच्या मार्गात ती अडथळा आणू लागली तर अलिकडेच झेकोस्लोव्हाकियात ज्या घटना घडल्या त्याची भारतात पुनरावृत्ती झाल्याशिवाय

राहणार नाही. कॉंग्रेस अधिकारावर असलेल्या प्रांतातून मुसलमानांवर होणाऱ्या अत्याचारांच्या आणि तेथील मुसलमानांची संस्कृती, धर्म आणि जीवित धोक्यात येत असल्याच्या जुन्याच आरोपांचा पाढा वाचून हिंदू हिंदुस्तान आणि मुस्लीम हिंदुस्तान अशी देशाची विभागणी करून दोघांची दोन स्वतंत्र संघराज्ये निर्माण होण्यांपासून भारताला आता कोणीही वाचवू शकणार नाही असे त्यांनी घोषित केले. शेख अबदुल मजीद यांनी वरील विधानांना पाठिंबा देऊन पुढे असे सांगितले की, मुसलमानांना पाकिस्तानच्या योजनेचा पाठपुरावा करण्यावाचून दुसरा पर्याय उरलेला नाही. अधिवेशनात नेमण्यात आलेल्या उप-समितीने हिंदुस्तानची फाळणी करण्याची मागणी करणाऱ्या ठरावाचा मसुदा तयार केला. तो ठराव असा होता :—

विस्तीर्ण अशा या भारत खंडात चिरस्थायी शांतता नांदावी आणि हिंदू आणि मुसलमान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोन राष्ट्रांचा अप्रतिहत सांस्कृतिक विकास घडून यावा, त्यांची आर्थिक आणि सामाजिक उन्नती व्हावी आणि त्यांना राजकीय स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त व्हावा यासाठी भारताची फेडरेशन ऑफ मुस्लीम स्टेट्स् आणि फेडरेशन ऑफ नॉन मुस्लीम स्टेट्स अशी दोन संघराज्यात विभागणी होणे अत्यावश्यक होऊन बसले आहे असे सिंध प्रांतिक मुस्लीम लीगच्या या परिषदेचे मत आहे.

तथापि, डावपेचाच्या आणि इतर कारणास्तव तो मसुदा बाजूस सारून पुढील ठराव अधिवेशनात समोर आला :—

विस्तीर्ण अशा या भारत खंडात चिरस्थायी शांतता नांदावी आणि हिंदू आणि मुसलमान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोन राष्ट्रांचा अप्रतिहत सांस्कृतिक विकास यावा, त्यांची आर्थिक आणि सामाजिक उन्नती व्हावी आणि त्यांना राजकीय स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त व्हावा यासाठी योग्य ती राज्यपद्धती प्राप्त करुन देण्यासाठी कोणती राज्यघटना सोयिस्कर ठरेल यासंबंधी अखिल भारतीय मुस्लीम लीगने आमूलाग्र फेरविचार करावा अशी शिफारस करणे अत्यावश्यक होऊन बसले आहे असे या परिषदेचे मत आहे.

"शासन अद्याप ब्रिटीशांच्या ताब्यात आहे हे आपण विसरता कामा नये. तुम्ही दूरवर नजर ठेवली पाहिजे. आणि जे ध्येय पंचवीस वर्षांनंतर प्रत्यक्षात उतरणार असेल यासाठी आतापासून प्रयत्नशील राहिले पाहिजे" असा जो इशारा जीनांनी अधिवेशनाला दिला होता त्यामुळेच मूळ ठरावात हा बदल करण्यात आला असावा. इकबाल यांनी जून १९३७ मध्ये असे सुचविले होते की, लीगने मुसलमानांची अल्पसंख्या असलेल्या प्रांताकडे लक्ष देऊ नये. परंतु जीनांना तसे वाटत नव्हते. कारण आणखी पाव शतक ब्रिटीशांची सत्ता चालू राहील असा त्यांचा अंदाज होता.

अखिल भारतीय संघराज्याची स्थापना झाली तर संघराज्याच्या कायदेमंडळात मुस्लीम लीगला अत्यंत कमी जागा मिळतील अशी धास्ती प्रांतिक कायदेमंडळाच्या

निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यापासून जीनांना वाटू लागली होती. संस्थानिकांनी संघराज्यात सामील व्हावे म्हणून त्यांची मने वळविण्यासाठी व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी आपले खास दूत निरनिराळ्या संस्थानिकांकडे रवाना केले होते. तारीख १० मार्च १९३८ रोजी संस्थानिकांबरोबर झालेल्या वाटाघाटींचा आढावा घेऊन संघराज्याची सुरवात कशी केली जाईल ते सरकारने जाहीर केले.

(१) नव्याने अस्तित्त्वात येणाऱ्या संघराज्याच्या सरकारकडे कोणतेही प्रभावी अधिकार राहणार नाहीत, आणि (२) संघराज्याच्या कायदेमंडळावर प्रजेने निवडलेले प्रतिनिधी घेण्याऐवजी संस्थानिकांना आपल्या पसंतीचे प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार देण्यात आल्यामुळे संस्थांनी मुलखात निरंकुश सत्तेला वाव मिळेल अशा दोन कारणास्तव काँग्रेसने संघराज्याला विरोध दर्शविला आणि संस्थानांतून लोकनियुक्त कायदेमंडळे अस्तित्त्वात यावीत म्हणून संस्थानी प्रजाजनांच्या स्थानिक आंदोलनांना प्रोत्साहन देण्याचा कार्यक्रम हाती घेतला. तसेच तिने निरनिराळ्या संस्थानांत संस्थानी काँग्रेस स्थापन करण्याला १९३८ पासून उत्तेजन देण्यास सुरवात केली. अशा काँग्रेस कमेटचा या काँग्रेसच्या शाखा म्हणून काम करीत नसत तर स्थानिक पातळीवरील स्वायत्त संघटना म्हणूनच त्यांचे कार्य चाले. संस्थानी प्रजाजनांची चळवळ यशस्वी झाली तर संस्थानी मुलखातून काँग्रेसला अनुकूल असलेले प्रतिनिधीच संघराज्याच्या कायदेमंडळावर निवडून जातील आणि जीनांना आपल्या मर्जीप्रमाणे तेथे वर्चस्व गाजवता येणार नाही. असा काँग्रेसचा हिशेब होता. २६ ऑगस्ट रोजी स्थानिक स्टेट काँग्रेसने त्रावणकोर संस्थानामध्ये सामुदायिक चळवळ सुरू केली. थोड्याच आठवड्यात या चळवळीचे लोण सौराष्ट्र आणि ओरिसा राज्यातही पसरले. तारीख १९ ऑक्टोबर रोजी दि ईस्टर्न स्टेटस एजन्सीच्या संस्थानिकांच्या कौन्सिलने ओरिसा मधील संस्थानात आंदोलनाला चिथावणी दिल्याबद्दल बाहेरील चळवळ्यांचा निषेध करणारा ठराव पास केला. परंतु जीना आणि त्यांचे सहकारी अत्यंत अस्वस्थ झालेने हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत त्या संस्थानात आंदोलन सुरू केले त्यावेळी पुढे काँग्रेसने आपली चळवळ मागे घेतली. तरी हिंदू महासभा आणि आर्य समाज यांनी तो लढा चालू ठेवला. डिसेंबर १९३८ मध्ये पाटण्याला भरलेल्या लीगच्या अधिवेशनात या घटनांचा तीव्र निषेध करण्यात आला. संस्थानात काँग्रेसने कसलीही लुडबुड करता कामा नये असा जीनांनी इशारा दिला. घटनेनुसार मुस्लीम लीगला वस्तुतः संस्थानाच्या कारभारात हस्तक्षेप करता येत नाही असे सांगून ते म्हणाले

हैद्राबाद सारख्या मुसलमानी संस्थानातील आपली चळवळ काँग्रेस चालूच ठेवणार असेल तर संबंध देशातल्या संस्थानाच्या कारभारात हस्तक्षेप करण्यासंबंधीच्या प्रश्नाचा मुस्लीम लीगलाही फेरविचार करावा लागेल.

......यामागे काँग्रेसचा एकच डाव आहे आणि तो म्हणजे भिकार आणि अत्यंत

आक्षेपार्ह घटनेचा फायदा करून घेऊन भरघोस बहुमत मिळवावयाचे, एकदा बहुमत मिळाले म्हणजे काँग्रेस जिभल्या चाटत संघराज्य स्वीकारील आणि मुसलमानांची संस्कृती आणि संघटना यांचा विध्वंस करून फासिस्ट धर्तीची एकमेव हुकूमशाही संघटना म्हणून काँग्रेसची बांधणी करण्याचे आपले दुष्ट कारस्थान तडीस नेण्याच्या उद्योगास ती लागेल. मग हिंदुस्तानात हिंदूंचे राज्य प्रस्थापित करण्याचे आपले उद्दिष्ट तिला साध्य करता येईल. . . . संघराज्यासंबंधीची काँग्रेसची चाल अगदी स्पष्ट आहे. एकदा का तिला संघराज्याच्या यंत्रणेवर ताबा मिळवता आला की, हातातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सत्तेचा वापर करून फजलूल हक यांचे बंगालमधील आणि सर सिकंदर हयात खान यांचे पंजाबमधील सरकार ती पार निष्प्रभ करून टाकील.

वस्तुत: काश्मीरमधील जनतेच्या लढ्याला काँग्रेसचा संपूर्ण पाठिंबा होता. तरी देखील काश्मीरचा राजा हिंदू आणि बहुसंख्य प्रजा मुस्लीम असल्यामुळे काँग्रेस मुद्दामच तेथील चळवळीकडे कानाडोळा करीत आहे असा जीनांनी आरोप केला. परंतु वस्तुस्थिती अशी होती की, काश्मीरमधील चळवळ जातीयवादी मुस्लीम नेतृत्वाच्या हाती न राहिल्यांमुळे जीना आणि पंजाबमधील जातीय पुढारी हतबद्ध होऊन गेले होते. २६ मार्च १९३८ रोजी मुस्लीम कॉन्फरन्सच्या वार्षिक अधिवेशनात शेख अबदुल्ला यांनी केलेले भाषण म्हणजे जातीयवादावर एक जबरदस्त प्रहारच होता. जमलेल्या लोकांना त्यांनी असे सांगितले की, 'राजकीय प्रश्नांचा विचार करताना मुसलमान किंवा बिगर मुसलमान म्हणून विचार करावयाचे सोडून द्या, आणि प्रौढ मताधिकार, आणि संयुक्त मतदार संघाच्या मागणीला पाठिंबा द्या. जून महिन्यात भरलेल्या काश्मीरच्या मुस्लीम परिषदेच्या वर्किंग कमेटीने संघटनेच्या नावातील जातीवाचक विरूद्ध काढून टाकण्याचा निर्णय घेतला, आणि जनरल कौन्सिलला अशी शिफारस केली की, परिषदेच्या आगामी अधिवेशनात संघटनेच्या नांवात आणि घटनेत अशा प्रकारे बदल करण्यात यावा की, ज्या कोणाला या राजकीय लढ्यात सहभागी व्हावयाचे असेल त्याला परिषदेचे सहज सभासद होता यावे मग तो कोणत्याही जातीचा, पंथाचा वा धर्माचा असो.'

काँग्रेसने आणि इतर हिंदू संघटनांनी अंतस्थ हेतुने प्रेरित होऊन सुरू केलेल्या संस्थानातील आपल्या विध्वंसक हालचाली ताबडतोब थांबवल्या नाहीत तर मुसलमानांच्या न्याय्य हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी लीगला जरूर ते उपाय योजावे लागतील असे बजावणारा जहाल भाषेतील ठराव पाटणा येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात पास करण्यात आला. या ठरावावर भाषण करताना मुस्ताक अहमद यांनी असे उद्‌गार काढले की, 'काँग्रेसने आपल्या गृहखात्याला म्हणजे हिंदु महासभेला हैद्राबाद संस्थान आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा आदेश दिला आहे परंतु काश्मीरकडे मात्र ती डोळेझाक करीत आहे. शक्य त्या सर्व मार्गांनी ब्रिटीश

हिंदुस्तान आणि देशी संस्थाने या दोन्ही ठिकाणच्या मुसलमानांना दडपून टाकण्याचा काँग्रेस प्रयत्न करीत आहे.' 'हिंदुस्तानच्या उत्तरेकडील प्रांतात मुसलमानांची संख्या मोठी असल्यामुळे त्या भागात आपण त्यांचे काहीही नुकसान करू शकत नाही हे कळून चुकल्यामुळे, गांधीच्या सर्व चळवळी दक्षिणेतून मुसलमानी संस्कृती उखडून टाकण्याच्या दिशेने चालल्या आहेत. त्यामागे दक्षिणेत हिंदूचे कायमचे वर्चस्व स्थापन करण्याचाच त्यांचा हेतू आहे. हैद्राबाद संस्थानात हिंदूंचे वर्चस्व प्रस्थापित करणे हा काँग्रेसच्या तेथील आंदोलनाचा एकमेव हेतू आहे. असे खानसाहेब अबदुल रहमान म्हणाले, तर हाजी अबदुल कादीर यांच्या मते काँग्रेसचे हैद्राबादमधील आंदोलन उर्दूची गळचेपी करणे आणि तेथे सध्याचे जातीय सलोख्याचे संबंध आहेत त्यात बिब्बा घालणे येवढ्यासाठी चालविले जात आहे.

अपेक्षेप्रमाणे जीनांनी आपल्या भाषणातून काँग्रेसवर घणाघाती हल्ला चढवला. ते म्हणाले :—

> एका बाबतीत आता संशयाला कसलीही जागा राहिलेली नाही आणि ती म्हणजे काँग्रेस श्रेष्ठी मुसलमानांना केवळ आपले होयबा बनवू पाहात आहेत. त्यांचा उपयोग करून घ्यावयाचा आणि आपला हेतू साध्य झाला की त्यांना पायदळी तुडवावयाचे ही काँग्रेसची नीती आहे. मुसलमानांनी हिंदू राज्याची कल्पना बिनशर्त मान्य करावी असे काँग्रेस नेत्यांना वाटते. थेट फासिस्ट पद्धतीने काँग्रेसने हिंदू-मुसलमान ऐक्याची सारी आशा नष्ट करून टाकली आहे हे तुमच्या लक्षात आलेच असेल. काँग्रेसला मुसलमानांबरोबर समझोता व्हावयाला नकोच आहे. तिला भारतीय मुसलमानांवर आपल्याच अटी लादावयाच्या आहेत. . . . काँग्रेस ही केवळ हिंदूंची संघटना आहे. . . .परंतु मी तर असे म्हणेन की ती सर्व हिंदूंचे देखील प्रतिनिधीत्त्व करीत नाही. कारण मग हिंदू महासभेचे काय? लिबरल फेडरेशन आहे ते कोणाचे आहे? या देशातील इतर सर्व जमाती आणि त्यांची संस्कृती चिरडून टाकून हिंदूंचे राज्य प्रस्थापित करावयाचे असा काँग्रेस श्रेष्ठींचा अगदी पक्का निर्धार झाला आहे हे आपल्या देशाचे मोठे दुर्भाग्यच नव्हे तर मी तर म्हणेन ती खरी शोकांतिका आहे. ते स्वराज्याची भाषा करतात त्यावेळी त्यांच्या मनात हिंदू राज्य असते. आणि राष्ट्रीय सरकार म्हणताना त्यांना खरे अभिप्रेत असते ते हिंदू सरकार. . . . वर्धा शिक्षण पद्धती घ्या. ती ज्यावेळी तयार करण्यात येत होती त्यावेळी मुसलमानांना विश्वासात घेतले होते? मुसलमानांना अंधारात ठेवूनच ती योजना हाती घ्यावयाचे ठरले आणि तिचा तपशील ठरविण्यात आला. त्या मागील खरी प्रेरणा कोणाची? मिस्टर गांधींची. मी बिनदिक्कतपणे असे सांगू इच्छितो की काँग्रेसच्या मूळच्या उद्दिष्टांवर जर कोणी बोळा फिरविला असेल तर तो गांधींनी. हिंदूत्वाच्या पुनरूज्जीवनासाठी काँग्रेसचा हत्यार म्हणून कोणी वापर सुरू केला

असेल तर तो त्यांनीच. हिंदू धर्माचे पुनरुजीवन करून देशात हिंदूंचे राज्य प्रस्थापित करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. आणि त्यासाठी ते काँग्रेसचा उपयोग करून घेत आहेत. . . . एका वाक्यात सांगायचे तर आज हिंदू मनोवृत्ती आणि हिंदू दृष्टीकोन यांची काळजीपूर्वक जोपासना केली जात आहे. आणि या नव्या परिस्थितीपुढे मान तुकविण्यास आणि काँग्रेस पुढाऱ्यांचे हुकूम शिरोधार्य मानण्यास मुसलमानांना भाग पाडले जात आहे. आणि आपल्या दैनंदिन जीवनात हिंदूंची विचारसरणी स्वीकारण्यास त्यांना भाग पाडले जात आहे.

अशा तऱ्हेने काँग्रेसची यथेच्छ निर्भत्सना केल्यानंतर जीनांनी जमलेल्या श्रोत्यांना मुस्लीमांची राष्ट्रीय अस्मिता जागृत करण्याचे आवाहन केले. आपल्या या भाषणात जीनांनी पाकिस्तानच्या चळवळीला आपण पाठिंबा असल्याचे प्रथमच सूचित केले ते म्हणाले :—

. . . .हिंदूंनी आज फार मोठ्या प्रमाणावर नैतिक, सांस्कृतिक आणि राजकीय अस्मिता प्राप्त करून घेतली आहे. या राजकीय अस्मितेलाच हिंदूंच्या राष्ट्रीय अस्मितेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तो एक फार महत्त्वाचा गुण समजला जातो आणि तीच त्यांच्यामागील खरी शक्ती आहे. मुसलमानांना ही शक्ती संपादन केली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. एकदा तुम्ही ती मिळविलीत की तुमचे ईप्सित निश्चित साध्य होणार याबद्दल माझ्या मनात शंका नाही. शिरगणती ठीक असेलही पण शेवटी राष्ट्राचे भवितव्य केवळ संख्या बळाने ठरत नसते. तुम्हाला अद्याप राष्ट्रीय व्यक्तीमत्त्व आणि राष्ट्रीय स्वत्त्व अंगी बाणवावयाचे आहे. ते फार बिकट काम आहे. आणि मी सांगितल्याप्रमाणे तुम्हाला तर अद्याप त्याला हात घालावयाचा आहे.

अधिवेशनात आणखीही काही ठराव पास झाले. १९३५ च्या कायद्यान्वये संघराज्याची जी योजना होती. त्यावरील ठराव म्हणजे १९४० च्या लाहोर ठरावाची नांदीच होती. मुसलमानांना संघराज्याची ती योजना पसंत नाही असे त्या ठरावात म्हटले होते परंतु त्याच ठरावात पुढे अशी पुष्टी जोडण्यात आली होती की 'तथापि आजवर घडलेल्या किंवा पुढील होणाऱ्या संभाव्य घटना विचारात घेऊन संघराज्याऐवजी मुसलमान आणि इतर अल्पसंख्याक यांच्या हितसंबंधास बाधा येणार नाही असा दुसरा पर्याय शोधून काढण्यासाठी आवश्यक असलेल्या मार्गाचा वेळोवेळी अवलंब करण्याचे अधिकार अखिल भारतीय मुस्लीम लीगच्या अध्यक्षांना या ठरावान्वये देण्यात येत आहेत.

अधिवेशनातील सर्वात महत्त्वाचा ठराव, बिहार संयुक्त प्रांत आणि मध्य प्रांतातील सरकारांना तेथील मुसलमानांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यात आणि त्यांची गाऱ्हाणी दूर करण्यात अपयश आल्याबद्दल, प्रत्यक्ष कृती करण्याची शिफारस करण्यासंबंधीचा होता. या ठरावातील चर्चेच्या वेळी अनेक वक्त्यांची भाषणे झाली जळजळीत

भाषणे झाली. फझलूला हक यांनी असे जाहीर केले की, एकदा प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ सुरू झाली की, भारतातील सगळे मुसलमान मंत्री चळवळीत सामील होण्यासाठी आपापल्या मंत्रिपदाचे राजीनामे देतील. शेख अब्दुल मझीद यांनी असे बजावले की, सविनय कायदेभंगाची चळवळ ही केवळ तीन प्रांतापुरती मर्यादित राहाणार नाही याची काँग्रेसने जाणीव ठेवावी. वायव्य सरहद्द प्रांतांतील काँग्रेस मंत्रिमंडळ पदच्युत केल्यावाचून तेथील मुसलमान स्वस्थ बसणार नाहीत असे औरंगजेब खान यांनी घोषित केले. ठराव एकमताने संमत झाला. हा ठराव पास करून लीगने आजवरच्या परंपरा सोडून नव्या क्रांतिकारी मार्गावर पदार्पण केले आहे. पूर्वी ती घटनात्मक पद्धतीने विकास घडवून आणण्याच्या खटपटीत गुंतलेली असे पाटणा ठरावामुळे तिने आता नवा लढाऊ पवित्रा घेतला आहे असे जीनांनी उद्‌गार काढले.

---

## प्रकरण १७ वे

### काँग्रेसवर दुहेरी भडीमार

पाटणा अधिवेशनापासून मुस्लीम लीगच्या काँग्रेस विरोधी प्रचारास आणखी चेव आला. काँग्रेसच्या राजवटीत मुसलमानांना जाणून बुजून वाईट वागणूक दिली जाते. इस्लाम धोक्यात आहे, काँग्रेस ज्या प्रांतात अधिकारावर आहे तेथे तिने हिंदू राज्य सुरू केले आहे यासारखे शेकडो आरोप सर्व देशभर पुन्हा पुन्हा करण्यात येऊ लागले. काँग्रेसच्या मंत्र्यांचे दौरे होत त्यावेळी मुस्लीम लीगचे लोक त्यांच्या विरूद्ध निदर्शने करीत आणि अपशब्द उच्चारून त्यांचा अपमान करीत. पुन्हा एकदा नेहरूंनी काँग्रेसवर होणाऱ्या आरोपाबाबत नि:पक्षपाती चौकशीची तयारी दर्शविली असता जीनांनी ती फेटाळून लावली त्यासंबंधी तारीख ५ जानेवारी १९३९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या पत्रकात चौकशीला नकार देण्याचे कारण त्यांनी असे दिले होते की, नेहरूंनी सुचविलेल्या चौकशीमागे अनुशास्ती (sanction) राहणार नाही देशातील अल्पसंख्यांच्या संरक्षणासाठी गांधीनी ज्यावेळी निरनिराळे उपाय सुचविले त्यावेळी मौलवी सर महंमद याकूब यांना त्यात फॅसिझमचा वास आला. मुंबईत केलेल्या एका भाषणात त्यांनी तसे बोलून दाखविले. या सर्व प्रकाराने वैतागून गेलेल्या काँग्रेस वर्किंग कमेटीने अशा परिस्थितीत वाटाघाटीने जातीय समझोता होण्याची शक्यता उरलेली नाही अशी कबुली देणारा ठराव केला. त्या ठरावात पुढे असे नमूद करण्यात आले होते की, यापूर्वी अनेकदा काँग्रेसने जातीय प्रश्नाविषयीचे आपले धोरण जाहीर केलेले आहे आणि अल्पसंख्यांकांना काही निश्चित स्वरूपाची आश्वासनेही दिलेली आहेत.

जानेवारी १९३९त संयुक्त प्रांताच्या कूळ कायद्यावरील चर्चेच्या वेळी तो संमत होणे लांबणीवर पडावे म्हणून लीगच्या सभासदांनी अनेक क्लुप्त्या योजल्या आणि जातीय भावना भडकावण्याच्या उद्देशाने धर्माचे नाव पुढे केले. मुसलमान कुळांच्या बाबतीत मुस्लीम व्यक्तिगत कायदा लागू करण्यात यावा अशी मागणी करणाऱ्या अनेक उपसूचना त्यांनी मांडल्या. सावत्र आया, आजोबा, अविवाहीत मुली, पुर्नविवाह न केलेल्या विधवा इ. यांना वारसा हक्क देण्यात यावा अशीही मागणी करण्यात आली. याबाबत सरकारने असे दाखवून दिले की, १९०१ पासून सरकारने वेळोवेळी जितक्या समित्या नेमल्या त्यावरील मुसलमान सभासदांनी जमीन धारणेच्या बाबतीत मुस्लीम

व्यक्तिगत कायदा लागू करण्यास तीव्र विरोध दर्शविलेला आहे. अशा प्रकारच्या प्रत्येक उपसूचनेवर मतदान होण्यापूर्वी खडाजंगी चर्चा होऊन नंतर ती फेटाळली जाई. इतर किरकोळ बाबींसाठी मांडण्यात आलेल्या उपसूचनांचाही शेवटपर्यंत आग्रह धरण्यात येई. बिहार कायदेमंडळातील मुस्लीम लीगच्या सभासदांनी हुंडा प्रतिबंधक कायदा मुसलमानांना लागू करण्यास कसून विरोध केला. त्याचप्रमाणे वंदे मातरम् काँग्रेसध्वज यासारख्या प्रश्नांवर अनेक तहकुबी सूचना आणल्या. १९३९ च्या जानेवारीत बहुसंख्यांकांकडून अल्पसंख्यांकांना निर्घृणपणाने चिरडून टाकले जात आहे या आशयाचे जे आरोप केले जात होते ते कसे निराधार आहेत ते दाखवून देण्यासाठी बिहारचे शिक्षणमंत्री डॉ. सय्यद महमूद यांनी प्रदीर्घ भाषण केले. सरकारी नोकरांच्या नेमणुका करताना काँग्रेसची सरकारे जातीयवाद, वशिलेबाजी आणि पक्षपात यांचा सर्रास वापर करीत आहे असे काँग्रेसवर आरोप करण्याची एक मोहीमच मुस्लीम लीगने फेब्रुवारीत हाती घेतली. ते आरोप खोडून काढणारे आणि एकूण एक विषशेत: तांत्रिक सेवांच्या बाबतीतील नेमणुका केवळ गुणावगुणांचा विचार करूनच कशा केल्या जातात. ते दाखवून देणारे एक लांबलचक निवेदन तारीख ६ फेब्रुवारी रोजी डॉ. सैयद महमूद यांनी प्रसिद्ध केले. पिरपूर अहवालात करण्यात आलेली विधाने ही निराधार असल्याचे खुलासे निरनिराळ्या काँग्रेस सरकारांनी प्रसिद्ध केले. परंतु मुस्लीम लीगचे लोक मात्र जातीय भावना भडकवण्याची एकही संधी सोडीत नव्हते. उदाहरणार्थ आसाम कायदेमंडळात अमजद अलि यांनी असा आक्षेप घेतला की, मशिदीवरून वाद्ये वाजवीत न जाण्याच्या ज्या वेळा ठरवून देण्यात आल्या आहेत त्या मुसलमानांना सोयीच्या नाहीत कारण त्यामुळे सबंध प्रांतातील मुसलमानांच्या प्रार्थनेच्या ठरलेल्या वेळात अडथळा येतो. दोन दिवसानंतर झहानुद्दिन यांनी शेतीवरील प्राप्ती कराला मुस्लीम व्यक्तिगत कायद्यावर त्यामुळे अतिक्रमण होते या सबबीवर विरोध केला.

१९३९ सालच्या सुरवातीला मुस्लीम लीगने प्रांतिक परिषदा भरविण्याचा कार्यक्रम हाती घेतला. आंध्र प्रांतिक परिषदेत मेहबूब अलि बेग यांनी मुसलमानांच्या एकतेचा भंग करावा या हेतूने काँग्रेसने त्यांना सभासद करून घेण्याची मोहीम सुरू केल्याबद्दल तिच्यावर तोंडसुख घेतले. वंदे मातरम् आणि वर्धा शिक्षण योजना यांचा निषेध करणारा आणि काँग्रेस सरकारांनी हिंदू आणि मुसलमान यांच्यासाठी वेगवेगळी शिक्षण पद्धती आखावी अशी मागणी करणारा ठराव त्या परिषदेत पास करण्यात आला. बिहार प्रांतिक परिषदेने असे जाहीर केले की, बिहारमध्ये वर्धा शिक्षण योजना लागू करण्यात आली तर मुस्लीम लीगच्या प्रांतिक कौन्सिलचे रुपांतर सविनय कायदेभंगाच्या युद्ध समितीत केले जाईल. त्या परिषदेतही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संयुक्त मतदार संघ असण्यास विरोध दर्शविला गेला. १८ मार्च रोजी संयुक्त प्रांताची परिषद भरली होती त्या ठिकाणी 'साम्राज्यशाहीची सर्वात मोठी हस्तक' म्हणून काँग्रेसची संभावना करण्यात आली. नबाब इस्माइल खान यांनी असे

सुचविले की, मुस्लीम लीगने संस्थानी मुसलमानांच्या हक्कांचे संरक्षण करण्याकडे विशेष लक्ष पुरवावे. मसलमानांच्या मनातील अविश्वास आणि संशयाची भावना दूर करण्यासाठी जोपर्यंत काँग्रेस जरूर ते उपाय योजित नाही तोपर्यंत देशातील जातीय दंगे थांबणार नाहीत असेही त्यांनी बजावले. त्यानंतर एका आठवड्याने भरलेल्या मीरत विभागीय परिषदेत (१) पारंपारिक इस्लामी पद्धतीनुसार राजकीय व सांस्कृतिक विकास घडवून आणण्यासाठी योजना, आणि (२) संस्थानी प्रदेशातील मुसलमानांच्या हितसंबंधाचे प्रभावीपणे संरक्षण करण्यासाठी योजावयाचे उपाय अशा दोन विषयावर प्रदीर्घ चर्चा झाली. १९३५ च्या घटनेने मुस्लीमांना दगा दिला. असल्यामुळे मुसभानांसाठी राजकीय आणि सांस्कृतिक स्वातंत्र्याचा आग्रह धरावा किंवा काय याचा मुसलमान पुढारी विचार करू लागले आहेत असे लियाकत अलीने आपल्या भाषणात सांगितले. या अधिवेशनात जीनांचेही भाषण झाले. आपण गरिबांच्या उद्धारासाठी झटत आहोत असे जे काँग्रेसकडून सांगितले जात असे त्याची टर उडवून काँग्रेस ही केवळ एक ढोंगबाजी आहे असे त्यांनी तिचे वर्णन केले आणि त्याच ओघात जमीनदार वाढत्या संख्येने लीगमध्ये सामील होत आहेत ही एक आनंदाची बाब आहे असेही त्यांनी सांगून टाकले. मुसलमानांच्या हितसंवर्धनासाठी आणि त्यांच्यात एकता निर्माण करण्यासाठी पडेल तो त्याग करून मुसलमान जनतेचे नेतृत्त्व करावे असे आवाहन त्यांनी बुद्धीजीवी वर्गाला केले. तारीख २५ मार्चच्या बैठकीत मुस्लीम लीग वर्किंग कमेटीने वर्धा शिक्षण योजनेतून मुसलमानांना वगळण्यात मध्य प्रांतातील काँग्रेस सरकारला भाग पाडल्याबद्दल प्रांतिक मुस्लीम लीगचे एका ठरावान्वये अभिनंदन केले. दडपशाही आणि विध्वंसक मार्गाने संस्थानी प्रदेशात हिंदूंचे वर्चस्व स्थापन करण्याचा काँग्रेसने आणि हिंदूंच्या इतर संघटनांनी विडा उचलला असल्यामुळे तेथील मुसलमानांबद्दल दुसऱ्या एका ठरावात गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली होती, संस्थानातील मुसलमानांनी स्वतःचे हक्क आणि हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी प्रभावीपणे संघटित व्हावे असे आवाहन करून त्या ठरावात त्यांना सर्वतोपरी पाठिंबा आणि साहाय्य देण्याचे आश्वासनही देण्यात आले होते.

तारीख ८ एप्रिल रोजी दिल्लीत भरलेल्या मुस्लीम लीग कौन्सिलच्या बैठकीत सर्व प्रांतातून मुस्लीम नॅशनल गार्डस ही संघटना उभारण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली. राजकोटमध्ये काँग्रेसने सुरू केलेल्या आंदोलनाचा निषेध करण्यात आला त्याचप्रमाणे हैद्राबादसंबंधीही एक विस्तृत ठराव पास करण्यात आला. त्यात उच्च वर्णीय हिंदूंच्या दास्यातून मुक्त करण्यासाठी अनुसूचित जातींना आवश्यक तेवढे प्रतिनिधीत्त्व देण्यात यावे अशी निझामाला विनंती करण्यात आली होती. त्या ठरावात पुढे असे म्हटले होते की, 'हिज एक्झालटेड हायनेस दि निझाम' सार्वभौम सत्तेचे एकनिष्ठ मित्र असतानाही त्यांच्याविरूद्ध ब्रिटीश हिंदुस्तानातून जी विध्वंसक चळवळ चालवली जात आहे तिला आळा न घालण्याचे सार्वभौम सत्तेचे धोरण सर्वस्वी

असमर्थनीय आहे त्यामुळेच जातीजातीत संघर्ष सुरू झाले असून ते तसेच चालू राहणार आहेत आणि त्यांची जबाबदारी त्या सार्वभौम सत्तेवरच येऊन पडते असे या कौन्सिलचे निश्चित मत बनले आहे. ठरावाच्या शेवटी गांधी हे हिंदी संस्थानांच्या कारभारात प्रत्यक्ष हस्तक्षेप करीत असून त्यामागे संस्थानिकांचे सार्वभौम हक्क नष्ट करून टाकण्याचा आणि त्या जागी हिंदूंचे आधिपत्य स्थापन करण्याचा त्यांचा अंतस्थ हेतू असण्याचा आरोप करण्यात आला होता. हिंदी संस्थानात काँग्रेसने ज्या खोडसाळ आणि धोकादायक हालचाली सुरू केल्या आहेत त्याला ब्रिटीश सरकारने पायबंद घातला पाहिजे असे आग्रहपूर्वक प्रतिपादनही त्या ठरावात करण्यात आले होते. त्याच दिवशी भरलेल्या दिल्ली प्रांतिक मुस्लीम परिषदेत मुसलमानांनी त्यांना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तु मुसलमान दुकानदारांकडूनच घ्याव्यात असे आवाहन करणारा, मुसलमान व अन्य अल्पसंख्यांकाविरूद्ध काँग्रेस मंत्रिमंडळांनी अवलंबिलेल्या दडपशाही धोरणाचा निषेध करणारा तसेच मुसलमानांचे हक्क सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने घटनेचा नवा मसुदा तयार करण्याची अखिल भारतीय मुस्लीम लीगला विनंती करणारा असे ठराव पास करण्यात आले.

त्याच दिवशी बंगाल प्रांतिक मुस्लीम परिषदही भरली होती. फजलूल हक यांनी त्या परिषदेत काँग्रेस मंत्रिमंडळे हिंदूंना मुसलमानावर हल्ले करण्यास उत्तेजन देतात असा आरोप केला. परिषदेत पास झालेल्या ठरावात काँग्रेस ही जातीय संघटना असून ती मुसलमानांच्या हितसंबंधाना विघातक असल्यामुळे बंगाल सरकारने उर्दू भाषेला आणि लिपिला संरक्षण आणि उत्तेजन द्यावे आणि बंगाली मुसलमानांसाठी नगरपालिकांच्या हद्दीत राहण्याच्या घरांची सोय करावी असे आवाहन करण्यात आले. तारीख ६ मे रोजी सोलापूर येथे भरलेल्या मुंबई प्रांताच्या परिषदेत संस्थानी कारभारात हस्तक्षेप करण्याबद्दल जीनांनी काँग्रेसवर चांगलेच तोंडसुख घेतले. आणि ती मुसलमानांना चिरडून टाकण्याचे धोरण अवलंबित असल्याचा आरोप केला. सर सिकंदर हयात खान यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात तर एक पाऊल पुढे जाऊन काँग्रेस हिटलर आणि मुसोलिनी यांच्या पावलावर पाऊल टाकत आहे असे विधान करण्यासही कमी केले नाही. एक स्वतंत्र समाज म्हणून काँग्रेस अनुसूचित जातींना त्यांचे राजकीय आणि इतर हक्क मिळू देत नाही म्हणून त्यांनी तिला धारेवर धरले आणि वर असाही आरोप केला की, दडपशाहीचे मार्ग वापरून संस्थानिक आणि अल्पसंख्यांक यांना नामोहरम करून टाकण्याचा काँग्रेसचा दुष्ट हेतू आहे. हैद्राबाद संस्थानातील चळवळीबद्दल तर सर सिकंदर यांना विशेषच राग होता कारण ते संस्थान म्हणजे दक्षिणेतील मुस्लीम संस्कृतीचे सर्वोत्तम असे केंद्र असून ते नष्ट करण्याचाच चळवळीपाठीमागील हेतू आहे असे त्यांचे मत होते. आपल्या मर्जीला येईल त्यावेळी सर्व प्रांतिक सरकारे मोडून टाकता यावीत म्हणून केंद्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा काँग्रेसने आटापीटा चालविला आहे असा इशारा त्यांनी मुस्लीम

बहुसंख्य प्रांतांना दिला.

तीन जुलै रोजी जीनां यांच्या निवासस्थानी भरलेल्या मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीने खालील ठराव केले (१) जयपूर, जोधपूर, भावनगर आणि पतियाळा संस्थानांतील मुसलमानांच्या तक्रारी दूर करून त्यांच्यात सुरक्षिततेची आणि विश्वासाची भावना निर्माण करण्याचे तेथील संस्थानिकांना आवाहन, (२) हिंदू महासभा आणि आर्यसमाज यांच्या हैद्राबादमधील चळवळीमुळे मुस्लीम जनतेत कटुतेची भावना पसरत असून काही तुरळक संघर्षाची सुद्धा परिणती संबंध देशात जातीजातीत दंगे भडकण्यात होण्याचा संभव आहे असा त्या दोन पक्षांना इशारा, (३) हैद्राबाद संस्थानातील चळवळ बंद पाडण्यासाठी ब्रिटीश सरकारने तातडीने पावले उचलावीत असे आवाहन, (४) वर्धा शिक्षण पद्धतीमागील हेतू मुस्लीम संस्कृती नष्ट करून तिच्या जागी हिंदू संस्कृतीची प्रस्थापना करणे हा असल्याचा आरोप करून त्या शिक्षण पद्धतीचा निषेध. वर्धा शिक्षण पद्धतीच्याद्वारा अहिंसेचे तत्त्वज्ञान आणि काँग्रेसची विचारसरणी प्रसृत केली जाते, तिच्यात धार्मिक शिक्षणासाठी सवलती ठेवलेल्या नाहीत, हिंदुस्तानीच्या नावाखाली संस्कृतनिष्ठ हिंदी लादण्याचा आणि देशाची राष्ट्रभाषा असलेल्या उर्दूची गळचेपी करण्याचा त्या योजनेचा हेतू आहे. आणि त्या योजनेखाली तयार करण्यात आलेली क्रमिक पुस्तके मुसलमानांच्या भावना दुखावणारी आहेत असेही आक्षेप घेण्यात आले. आणि (५) काँग्रेस शासित प्रांतातील मुसलमानांचे हक्क आणि हितसंबंध सुरक्षित राखण्याची जबाबदारी गव्हर्नर जनरलवर सोपविण्यात आली आहे ती त्यांनी पार पाडावी असे आवाहन शेवटच्या ठरावात करण्यात आले.

जमीयत-उल-उलेमा या संघटनेचे वस्तुतः काँग्रेसबरोबर सख्य होते. तरीही मार्चच्या पहिल्या आठवड्यात दिल्ली येथे भरलेल्या तिच्या वार्षिक अधिवेशनात मुस्लीम लीग काँग्रेस विरूद्ध जे आक्षेप घेत होती त्यांना पुष्टी देणारे ठराव संमत करण्यात आले. एका ठरावान्वये काहीं प्रांतातून मुसलमानांना दिल्या जाणाऱ्या वर्तणुकीमुळे त्यांच्या मनात जे असमाधान पसरले आहे हे लक्षात घेऊन त्यांच्या तक्रारींची चौकशी करून त्या दूर करण्यासाठी काँग्रेसने जमीयत-उल-उलेमाचा प्रतिनिधी असलेली एक बिनसरकारी चौकशी समिती नियुक्त करावी अशी मागणी करण्यात आली. काँग्रेस अध्यक्षांनी औद्योगिक नियोजन समितीवर एकाही मुसलमानाला घेतलेले नसल्यामुळे ती समिती मुसलमानांच्या हितसंबंधाना बाधक ठरण्याचा संभव व्यक्त करणारा आणखी एक ठरावही त्या अधिवेशनात संमत करण्यात आला.

दरम्यान अनेक ठिकाणी उद्भवलेल्या भीषण दंगलीमुळे देशातील जातीय परिस्थिती पुन्हा एकदा खालावली. कानपूरच्या फेब्रुवारीमधील दंगलीत २९ जण ठार झाले तर २२० जण जखमी झाले. जूनमध्ये कानपुरात पुन्हा दंगल झाली. मे महिन्यात गया येथे जातीय दंगा होऊन त्यात ११ जण मृत्युमुखी पडले तर ९० जणांना जखमा झाल्या त्याच महिन्यात सोलापूर येथील दंगलीने सहा जणांचा बळी घेतला. तारीख

२९ रोजी सिमला येथे भरलेल्या सर्व प्रांतातील गृहमंत्र्यांच्या परिषदेत जातीय प्रचाराला आळा घालण्यासाठी कोणते उपाय योजावयाचे ते ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे खालावत चाललेल्या जातीय परिस्थितीला तोंड देण्यासाठी अनेक योजना आखण्यात आल्या. गृहमंत्र्यांच्या या परिषदेनंतर महिनाभराने मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीची बैठक झाली. त्या बैठकीत पास झालेल्या एका विस्तृत ठरावात 'जातीय स्वरूपाचा' प्रचार आणि कोठल्याही स्वरूपातील हिंसेला चिथावणी याविरूद्ध मोहीम सुरू करण्याचा जो निर्णय गृहमंत्र्यांच्या बैठकीत घेण्यात आला होता त्याबद्दल जबरदस्त संशय व्यक्त करण्यात आला. या निर्णयाचा गैरफायदा घेऊन काँग्रेस मंत्रिमंडळे मुस्लीम लीग आणि मुस्लीम वर्तमानपत्रे यांची गळचेपी करतील आणि या ना त्या नावाखाली सर्वसाधारण मुसलमानांचा आवाज दडपून टाकतील अशी भीती वर्किंग कमेटीने व्यक्त केली. आणि गृहमंत्र्यांच्या परिषदेत घेण्यात आलेल्या निर्णयाचा काँग्रेस मंत्रिमंडळांना दुरूपयोग करू देऊ नये असे भारत सरकारला आवाहनही करण्यात आले.

मुस्लीम लीगने काँग्रेस विरूद्ध अशा प्रकारचे प्रचार युद्ध चालविले होते तर दुसऱ्या बाजूला हिंदू महासभेने बरोबर तशाच प्रकारची पिसाट जातीयवादी आणि काँग्रेस विरोधी मोहीम सुरू केली होती. १९३७ साली स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रूपाने तिला गतीशील नेतृत्त्व मिळाले होते. सावरकर हे महान क्रांतिकारक म्हणून प्रसिद्ध होते शिवाय ब्रिटीशांच्या पहाऱ्यातून भारतात आणले जात असताना बोटीतून उडी मारून निसटण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न आणि पन्नास वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा भोगण्यासाठी अंदमानला झालेली त्यांची रवानगी यांचे वलय त्यांच्या भोवती होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला भरलेल्या अधिवेशनात हिंदू महासभेच्या घटनेत महत्त्वाचे बदल करण्यात येऊन हिंदू राष्ट्राचे वैभव वृद्धिंगत करणे हे महासभेचे ध्येय ठरविण्यात आले. १९३३ पर्यंत हिंदू महासभेला मुख्यतः मुस्लीम बहुसंख्य प्रांतातूनच पाठिंबा होता. सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा आदेश दिलेला असतानाही महासभेच्या या प्रांतातील नेत्यांनी कमिशनपुढे साक्षी दिल्या आणि निवेदने सादर केली. मध्य प्रांतातील मुसलमानांच्या पावलावर पाऊल ठेवून हिंदू महासभेने वायव्य सरहद्द प्रांतातील हिंदूसाठी भरमसाठ विशेषाधिकारांची मागणी केली होती. पंजाब आणि बंगाल या मुस्लीम बहुसंख्य प्रांतातील कायदेमंडळात आणि सरकारी नोकऱ्यात मुसलमानांचे बहुमत राहील अशी कायदेशीर तरतूद करण्यात यावी या मागणीस तिचा विरोध होता. सविनय कायदेभंगाच्या वेळी जमीनदारांविरूद्ध जी आंदोलने झाली होती त्यांची निरनिराळ्या प्रांतातील हिंदू जमीनदारांनी धास्ती घेतली होती. आणि उद्योगपतींच्या एका गटासकट ते हिंदू महासभेत सामील झाले होते. त्यामुळे तिला प्रथमच अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. स्वराज्य संपादन करण्यासाठी आणि आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी सविनय कायदेभंगाऐवजी सनदशीर मार्गाचाच अवलंब केला पाहीजे अशी महासभेच्या पुढाऱ्यांची निःसंदिग्ध भूमिका होती

अनेकजण तर सरकारने आपल्या दृष्टीकोनाचा सहानुभूतिपूर्वक विचार करावा यासाठी सरकारबरोबर सहकार्य करावे अशा मताचे होते. १९३३ साली एका खास ठरावान्वये महासभेने मालमत्ता धारण करणाऱ्याविरूद्ध होणाऱ्या कोणत्याही स्वरूपातील चळवळीचा निषेध केला होता. निवडणुकीत संपूर्ण पराभव झाल्यापासून हिंदू राष्ट्रवाद आणि कडवा काँग्रेसविरोध हे हिंदू महासभेचे ब्रीद बनले.

१९३८ च्या डिसेंबर महिन्यात नागपूर येथे भरलेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनात सावरकरांनी जे अध्यक्षीय भाषण केले. त्यात सिंध प्रांतिक मुस्लीम परिषदेने स्वतंत्र मुस्लीम संघराज्याची जी मागणी केली होती त्यासंबंधी हिंदूंची प्रतिक्रिया व्यक्त झाली होती. एक धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक आणि राजकीय घटक म्हणून हिंदुस्तानला आकार देण्याचा गेली पाच हजार वर्षे हिंदू समाजाच्या नेत्यांकडून सतत प्रयत्न होत आला आहे असे सावरकरांनी भारताच्या प्राचीन इतिहासातील काही निवडक दाखले देऊन दाखवून दिले. आणि हिंदू राष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी सर्व हिंदूंनी पराकोटींचा त्याग करण्यास सिद्ध राहावे असे आवाहन केले. काँग्रेसने हिंदू महासभेला जातीय संघटना म्हणून बदनाम करावे याबद्दल अत्यंत तिखट प्रतिक्रिया व्यक्त करून हिंदू राष्ट्रवादाची कास धरण्यात लाज वाटण्यासारखे काहीही नाही असे त्यांनी बजावले. सावरकरांच्या मते निरनिराळ्या लोकनियुक्त संस्थावरील हिंदुंच्या वाटयाला आलेल्या सर्वच्या सर्व जागा जिंकून काँग्रेसला पदच्युत करणे हाच ते ध्येय गाठण्याचा एकमेव भरवशाचा मार्ग होता. त्यासाठी त्यांनी हिंदूंना काँग्रेसवर बहिष्कार, काँग्रेस उमेदवाराला मतदान करावयाचे नाही आणि जो कडवा हिंदू राष्ट्रवादी उमेदवार असेल त्यालाच मत द्यावयाचे असा तीन कलमी कार्यक्रम दिला. आपल्या या भाषणात सावरकरांनी असे घोषित केले की, काँग्रेस थेट तिच्या संस्थापनेपासून तो आजतागायत निव्वळ हिंदूंची संघटना असून हिंदूंची बुद्धिमत्ता, पैसा आणि त्याग यावरच ती पोसली गेली आहे असे जे जीना म्हणतात ते अगदी बरोबर आहे. त्यांचा मार्ग चुकलेला असला तरी अनेक थोर देशभक्त काँग्रेसमध्ये होऊन गेले हे अगदी खरे आहे. मुसलमानांचा अनुनय करण्यासाठी आणि आपल्या पक्षातील मुसलमानांच्या दडपणामुळे काँग्रेस हिंदू-विरोधी धोरणाचा अवलंब करीत आली आहे. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे काँग्रेस राष्ट्रवादासंबंधीच्या चुकीच्या सिद्धांताला खतपाणी घालीत आली आहे हिंदूंना पाश्चात्य शिक्षण दिले म्हणजे ते ख्रिस्ती धर्मात येतील अशी ब्रिटीश सत्ताधाऱ्यांची अटकळ होती. तसे घडले नसले तरी पाश्चात्य शिक्षणामुळे इंग्रजी विद्या शिकलेले हिंदू हे आपल्या जुन्या समाजापासून अलग पडले आहेत. हिंदूंचा इतिहास, संस्कृती आणि धर्म याविषयी त्यांना कसलेही ज्ञान राहीले नाही आणि आपण हिंदू आहोत याची शरम वाटावी म्हणून हिंदू धर्मातील ज्या वाईट गोष्टी जाणून बूजून त्यांच्या मनावर ठसविण्यात आल्या आहेत तेवढयाच काय त्या त्यांना माहीत असतात. या उलट पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावापासून मुसलमान दूर

राहिले ते योग्यच होते. हिंदू परंपराच अजिबात विसरल्या गेल्यामुळे पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या हिंदूंच्या पहिल्या काही पिढ्यांनी भारतीय राष्ट्रवादाबद्दल अशी समजूत प्रचलित केली की वंश, धर्म, संस्कृती, जात, पंथ यापैकी कशाचाही एकात्म आणि सामर्थ्यशाली असे भारतीय राष्ट्र उभारण्याच्या कामात अडथळा येऊ शकणार नाही. प्रादेशिक राष्ट्रवादापुढे धर्म, भाषा, संस्कृती, वंश, आणि ऐतिहासिक विकास याबाबतचे मतभेद निष्प्रभ ठरतील अशी शिक्षित हिंदूंची समजूत होती. यातून तर्कसंगत निष्कर्ष निघतो तो हा की प्रत्येकाने स्वतःकडे हिंदू, मुसलमान किंवा ख्रिस्ती म्हणून न पाहता केवळ एक भारतीय म्हणून पाहावे.

ब्रिटीश सरकारला हिंदू राष्ट्रवादाची धास्ती वाटत असल्याने त्याचे पुनरूज्जीवन होऊ नये म्हणूनच सुरूवातीला त्याने हिंदी राष्ट्रीय चळवळीला उत्तेजन दिले. त्याचेही कारण असे होते की, ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्तान जिंकून घेतला तो मुसलमानांकडून नव्हे तर हिंदूकडून. आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ सावरकरांनी कोणाचा हवाला दिला असेल तर तो निझामाच्या दरबारात असलेल्या पेशव्यांच्या वकिलांनी लिहिलेल्या एका पत्राचा.

[ईस्ट इंडिया कंपनीला एक प्लासीची लढाईच काय ती मुसलमानांविरूद्ध द्यावी लागली. परंतु तिने संबंध हिंदुस्तानचा ताबा घेतला तो पेशवे, जाट, शीख अशा सर्व हिंदू राजांकडून कारण तेच साऱ्या देशावर राज्य करीत होते. १८५७ च्या बंडाचे नेतृत्व देखील मुख्यत्वेकरून हिंदूंच्याकडेच होते आणि त्यामुळेच हिंदुंनी पुन्हा डोके वर काढू नये यासाठी उतारा म्हणून कंपनी सरकारने मुसलमानांना हाताशी धरले. ब्रिटीश सरकार एका बाजूने हिंदू राष्ट्राविषयी मुसलमानांच्या मनात घर करून असलेला धर्मांध तिरस्कार, शत्रुत्व आणि अविश्वास यांना गुप्तपणाने प्रोत्साहन आणि साहाय्य देत होते आणि त्यायोगे हिंदुस्तानचे राष्ट्रीय ऐक्य मृगजळाप्रमाणे अप्राप्य करून ठेवीत होते तर दुसऱ्या बाजूला भारतीय राष्ट्रवादाच्या त्या मृगजळा-मागे धावण्यास हिंदूंना, निदान सुरुवातीला तरी, उत्तेजन देत होते. तेणेकरून हिंदूंचे एकसंघ राष्ट्र उभारणे अव्यवहार्य ठरावे, राष्ट्राचे अविभाज्य ऐक्य घडवून आणण्याची प्रबळ इच्छा असली तरच त्या लोकांचे एकसंघ राष्ट्र बनू शकते ही महत्त्वाची बाब भारतीय राष्ट्रवादाच्या पुरस्कर्त्यांनी लक्षातच घेतली नाही. वस्तुतः हिंदुस्तानचे दोन भागात विभाजन करण्याची मुस्लीम लीगची जाहीर मागणी आणि परकीय मुस्लीम राष्ट्रांना मुसलमानांचे संघराज्य बनविण्यासाठी भारतात येण्याचे आणि हिंदुस्तानात मुसलमानांचे राज्य स्थापन करण्याचे लीगने केलेले आवाहन याची या पुरस्कर्त्यांनी मुद्दाम दखल घ्यावयास पाहिजे होती. सर्वसाधारणपणे मुसलमानी इतिहास, धर्म-शास्त्र आणि राजकीय पिंड याविषयी सर्वस्वी अनभिज्ञ असलेल्या काँग्रेस जनांना अभिप्रेत असलेल्या भौगोलिक राष्ट्रवादाबद्दल मुसलमानांना स्वभावतःच औदासिन्य वाटणे हे मानवी स्वभावाला धरूनच होते.

मुसलमानांच्या दृष्टीकोनातून पाहिले तर याबद्दल त्यांना दोष देता येणार नाही.

किंवा हिंदूत्ववादाचे मारेकरीही म्हणता येणार नाही. त्यांची ती धारणा अगदी प्रामाणिक होती. कारण आजचा हिंदुस्तान हा आपला देश आहे असे मुळी त्यांनी कधी मानलेच नाही. आपल्या लोकसंख्येत झपाट्याने होत जाणारी वाढ आणि हिंदूंना आपल्या धर्मात घेण्याच्या बाबतीत येथील अनुकुलता व त्यामुळे हिंदूंची संख्या रोडावत जाणार अशी त्यांना वाटणारी आशा यामुळे आपल्या उद्दिष्टांबद्दल मुसलमान विशेषच उत्साही आणि आशावादी बनले आहेत. शिवाय हिंदूंच्या तुलनेने आपले स्थान बळकट करण्याच्या बाबतीत ब्रिटीशांकडून त्यांना मदतीचे जे आश्वासन मिळते त्यामुळेही त्यांचा उत्साह वाढीस लागतो, असे विश्लेषण करून सावरकरांनी पुढे असे प्रतिपादन केले की :—

केवळ प्रादेशिक ऐक्याच्या अशक्यप्राय अशा बंधनाच्या आधारे हिंदू आणि मुसलमान यांच्यात एकजूट होऊ शकेल अशा भ्रमात असलेले हिंदू काँग्रेसवाले मुसलमानांनी जरा कांगावा केला की, विशेषाधिकार, खास आणि वाढीव प्रतिनिधित्व इ. त्यांच्या मागण्या मान्य करून मोकळे होतील अशीही मुसलमानांची बालंबाल खात्री असते. अल्पसंख्य असूनही सैन्य आणि हत्यारी पोलीस दलातील जवळ जवळ ६० टक्के जागा आजच त्यांच्या हाती असून त्या क्षेत्रात त्यांचे चांगलेच वर्चस्व आहे. अनुकूल असलेल्या या सर्व बाबींमुळे त्यांना असा विश्वास वाटतो की, जर एकाद्या मोठ्या जागतिक युद्धात ब्रिटीशांचा पाडाव झाला तर हिंदुस्तानच्या सरहद्दीवर असलेल्या बिगर हिंदी मुसलमानी सत्तेच्या मदतीने हिंदुस्तानातील ब्रिटीशांची सत्ता हिरावून घेऊन येथे पुन्हा मुस्लीम साम्राज्याची स्थापना करता येईल.

एका अर्थाने सावरकर आपल्या भाषणात अप्रत्यक्षपणे फाळणीचा पुरस्कारच करीत होते कारण त्यांचे प्रतिपादन असे होते की,

भौगोलिक दृष्टीकोनातून सुद्धा भारतीय ऐक्यासंबंधीची आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट करणे हे आपल्या पुढील तातडीचे कार्य आहे. हिंदू राष्ट्र स्वतःच्या हिताच्या दृष्टीने संयुक्त भारतीय राष्ट्राची कल्पना त्याज्य मानणार नाही. मात्र ती समानतेच्या तत्त्वावर आधारलेली असली पाहिजे.

हिंदुस्तानातील सर्व अल्पसंख्य जमातींना समान अधिकार देण्याला सावरकरांची तयारी होती. त्याचप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना कायदेमंडळात आणि मुलकी नोकऱ्यात जागा देण्यासही त्यांची ना नव्हती. शिवाय प्रचंड बहुसंख्य असूनही हिंदूंच्यासाठी काही खास सवलती असाव्यात असेही त्यांचे म्हणणे नव्हते. मात्र ते असे बजावतात की,

अल्पसंख्य जर विशेषाधिकार किंवा खास अनुग्रह यासारख्या आचरटपणाच्या मागण्या करू लागतील तर ते मात्र कदापीही सहन केले जाणार नाही. अल्पसंख्यांकांना संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य आणि इतरांच्या हक्कांना बाधा येणार नसेल तर

भाषा आणि संस्कृती यांचा विकास करण्याच्या बाबतीत सवलती याची हमी आम्ही जरूर देऊ. मुसलमान ही बंधने पाळावयास तयार असतील आणि केवळ भारतीय राष्ट्राशीच ते एकनिष्ठ राहणार असतील तर उत्तमच. पण ते तसे करणार नसतील तर आमचा दंडक ठरलेला आहे. तुम्ही आलात तर तुमच्या बरोबर, तुम्ही आला नाहीत तर तुमच्या शिवाय पण तुम्ही विरोध केलात तर तुमची फिकीर न करता आम्ही हिंदू भारतीय स्वातंत्र्याची लढाई लढू आणि नजीकच्या भविष्यकाळातच स्वतंत्र आणि सामर्थ्यवान अशा हिंदू राष्ट्राचा सूर्य उगवलेला पाहू.

हिंदू राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण हे निःसंदिग्ध आणि निर्भेळ अशा हिंदू दृष्टीकोनावर आधारलेले असेल ज्यांचे आम्हाला साहाय्य झाले होते त्यांना आमचा पाठिंबा राहील. जे आमच्या उलट गेले त्यांना आमचा विरोध राहील. मात्र यापुढे आत्मघातकी सहानुभूतीचा घोळ घालणाऱ्या खिलाफती आणि 'पॅलस्टाइन आफत' असल्या काही भानगडी राहणार नाहीत.

इतर अल्पसंख्यांकाच्याबाबत मात्र सावरकरांचा दृष्टीकोन अगदी निराळा होता. त्यांच्या दृष्टीने पारशी हे हिंदूंना सर्वात जवळचे होते. त्यानंतरचा नंबर त्रावणकोर वगळता इतर ख्रिश्चनांचा. त्रावणकोरच्या ख्रिश्चनांचा अपवाद अशा करता की, हिंदूंच्या विरूद्ध ते काही मनसुबे रचीत असल्याचे दिसत होते. भारतात राहणाऱ्या यहुद्यांना सर्व हक्क उपभोगता येणार होते. परंतु हिंदुस्तानात एकादी नवी यहूदी वसाहत उभी राहू देण्याची काँग्रेसची सूचना मान्य करण्याचा मात्र सावरकरांच्या दृष्टीने प्रश्नच उद्‌भवत नव्हता. मुसलमानांच्या बाबत मात्र सावरकरांचे धोरण अत्यंत कडव्या प्रतिकाराचे होते. एकाद्या हिंदू मुलीची अब्रू लुटण्याचा प्रयत्न झाला किंवा जातीय दंगलीची कुरापत काढली गेली तर त्याबद्दल अशी अद्दल घडविली जाईल की भारतात कोठेही असल्या प्रकारांची पुनरावृत्ती करण्याचे कोणाला धाडसच होणार नाही. मशिदीवरून इंग्लिश बँड आणि सरकारी मिरवणुका गेल्या तर मुसल-मानांची त्याला हरकत नसते त्याप्रमाणे सार्वजनिक रस्त्यांवर हिंदूंनी वाद्ये वाजवली तर ते सहन करायला मुसलमानांनी शिकले पाहिजे. मध्यवर्ती कायदेमंडळात हिंदू राष्ट्रवादी पुरेशा संख्येने निवडून गेले तर ते सरहद्दीवरील मुस्लीम टोळ्यांविरूद्ध कडक कारवायी करून, युरोपियनांच्या जिवीत आणि मालमत्तेला त्याठिकाणी जसा कसलाही धोका पोहोचत नाही त्याप्रमाणे तेथील आमचे हिंदू बांधव सुरक्षित राहतील अशी काळजी घेण्यास सरकारला ते भाग पाडतील. जमनादास मेहताचा लोकशाही पक्ष, डॉ. आंबेडकरांचे शेड्यूल कास्ट फेडरेशन आणि पंजाबातील शीखांच्या पक्षांना सावरकरांनी आपल्या भाषणाच्या शेवटी संपूर्ण पाठिंबा दर्शविला आणि त्यांनी हिंदू ध्वजाखाली हिंदूंची संयुक्त राष्ट्रीय आघाडी उघडण्यासाठी सज्ज राहण्याचे आणि मतपेटीद्वारा राजकीय सत्ता हस्तगत करण्याचे हिंदूंना आवाहन केले.

नागपूरच्या या अधिवेशनात थोडे थोडके नाहीत तर अठ्ठावीस ठराव संमत करण्यात आले त्यातील अनेक मुस्लीम लीगच्या ठरावांसारखेच होते. हिंदू महासभा हीच हिंदूंची एकमेव प्रतिनिधिक राष्ट्रीय संघटना असून काँग्रेसला त्यांच्यावतीने बोलण्याचा कसलाही अधिकार पोहोचत नाही. असा दावा एका ठरावात करण्यात आला होता. तर दुसऱ्या एका ठरावात हिंदू महासभेला मुस्लीम लीगच्या पंक्तीला बसवून जातीय संघटना म्हणून तिला बदनाम करण्याबद्दल काँग्रेसचा निषेध करण्यात आला होता. काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यातील कोणत्याही कराराला हिंदू महासभेची मान्यता मिळणार नाही असे त्या ठरावाद्वारे जाहीर करण्यात आले होते. १९३५ च्या कायद्यातील भारतीय संघराज्याच्या कल्पनेला मुस्लीम लीगने विरोध दर्शविला होता तर हिंदू महासभेच्या या अधिवेशनात संघराज्याची योजना अत्यंत अपुरी आणि असमाधानकारक आहे असे दाखवून देण्यात आले. परंतु त्याचबरोबर संघराज्याची लगेच स्थापना करण्यात यावी अशीही मागणी करण्यात आली होती. मुस्लीम लीगच्या स्वतंत्र मुस्लीम संघराज्याच्या मागणीचा निषेध करून मुसलमानांचा तो हेतू निष्फळ करून टाकण्यासाठी आपली सारी ताकद एकवटण्याचे हिंदूंना आवाहन करणारा एक ठरावही त्यात होता. आणखी एका ठरावाने मुसलमानांच्या विरोधाला घाबरून हैद्राबादमधील सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेतल्याबद्दल त्याचप्रमाणे त्रावणकोर, म्हैसूर, बडोदा, राजकोट, जुनागड यासारख्या केवळ हिंदू संस्थानिकांच्या विरूद्ध मात्र चळवळ सुरू करण्याबद्दल काँग्रेसला दूषण याखेरीज आसाम हा मुसलमानी प्रांत बनविण्याच्या हेतूने त्यांच्या संघटीत स्थलांतराबाबत हिंदूंना इशारा आणि हे स्थलांतर थांबविण्यासाठी खास उपाय योजण्याचे आश्वासन, बिहार, बंगाल, आसाम, मद्रास आणि वायव्य सरहद्द प्रांतात मुसलमान आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून चाललेले महिलांना पळवून नेण्याचे आणि सक्तीच्या धर्मांतराचे प्रकार यांना आळा घालण्यासाठी आणि त्यावर कडक नजर ठेवण्यासाठी दक्षता समित्यांची स्थापना, देवनागरी लिपितील संस्कृतनिष्ठ हिंदीची राष्ट्रभाषा म्हणून घोषणा आणि उर्दूला सक्त विरोध; आणि हिंदुस्तानातील लॅन्ड ॲलिएनेशन ॲक्टनुसार स्थावर मालमत्ता खरेदी करण्यास नागरी हिंदूंना प्रतिबंध, प्रांतातील साठ टक्के नोकऱ्या जमीनदारांसाठी राखीव ठेवणे, बिगर जमीनदार हिंदू विरूद्धची अपप्रचाराची मोहीम, हिंदू वृत्तपत्रांविरूद्ध कारवाया, वगैरे कारणासाठी पंजाब सरकारचा निषेध, वायव्य सरहद्द प्रांतास भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी सावरकरांच्या नेतृत्त्वाखाली एका समितीची स्थापना, लष्करी शिक्षण देणारी शाळा आणि आखाडे, रायफल क्लब्स, इ. सुरू केल्याबद्दल मुंजे यांचे अभिनंदन, हिंदू युवक संघटना स्थापन करण्याच्या स्फूर्तीदायी प्रयत्नाबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर संघचालकांचे अभिनंदन, इ. ठरावही पास करण्यात आले. अशातऱ्हेने एका बाजूला हिंदू महासभेचा हिंदू जातीयवाद आणि दुसऱ्या बाजूला मुस्लीम लीगचा मुसलमान जातीयवाद असा दुहेरी भडीमार

काँग्रेसवर होत होता. आणि साम्राज्यशाहीच्या जोखडातून देश मुक्त करण्यापेक्षा काँग्रेसला बदनाम करण्यातच त्या दोन्ही संघटना धन्यता मानीत होत्या.

१९३९ मध्ये हिंदू महासभेची काँग्रेस विरोधीं मोहीम ऐन भरात होती. वंदे मातरम् या गाण्याची फक्त पहिली दोन कडवी राष्ट्रगीत म्हणून काँग्रेसने जाहीर केली होती तर हिंदू महासभेच्या बंगाल प्रांतिकच्या अधिवेशनात मुद्दाम संपूर्ण वंदे मातरम् गीत म्हटले गेले. काँग्रेस मुसलमानांचा जो जो अनुनय करायला जाते तो तो मुस्लीम लीग काँग्रेसवर अधिकाधिक जहरी टीका करीत सुटते असे सावरकरांच्या प्रत्येक भाषणाचे सूत्र असे. काँग्रेस मंत्र्यांनी लीगच्या आरोपांना उत्तरे देण्यासाठी प्रसिद्ध केलेल्या निवेदनांवरून काँग्रेस मुसलमानांच्या जास्तीत जास्त अनुनय करते या हिंदूंकडून घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना बळकटीच येते, असे त्यांचे म्हणणे होते. सावरकरांनी बिहारमधील सरकारी नोकऱ्यांतील मुसलमानांची टक्केवारी किती गैर-वाजवी आहे ते निदर्शनास आणून दिले. त्याचप्रमाणे मुसलमानांना खूष करण्यासाठी हिंदूवर निरनिराळे निर्बंध कसे लादण्यात येत आहेत याची लांबलचक यादी देऊन 'इस्लाम इन डेंजर' च्या धर्तीवर काँग्रेस राजवटीत 'हिंदुत्व धोक्यात' असल्याची त्यांनी घोषणा केली. काँग्रेसची धोरणे राष्ट्रवादास पोषक नाहीत तर विकृत राष्ट्रवादाचा तो एक नमुना असून त्यापेक्षा जातीयवाद परवडला असे सावरकर सांगत आणि मुसलमानांचा इतका अनुनय करूनही २५ वर्षापूर्वी मुसलमान जितके समाधानी असत त्यापेक्षा आज त्यांचे अधिक समाधान करण्यात काँग्रेस जरा तरी यशस्वी झाली आहे का असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काँग्रेस मुसलमानांबरोबर मैत्री करू इच्छिते. परंतु त्यासाठी त्यांना हिंदूंच्या हिताचा बळी द्यावा लागत नाही का? आणि तरीही आज मुसलमान जर सर्वात जास्त तिरस्कार कोणाचा करीत असतील तर तो काँग्रेसचाच. ही वस्तुस्थिती नाकारता येईल का असे ते पुढे विचारीत. सावरकरांनी काँग्रेसवर हिंदूंचा विश्वासघात केल्याचा आरोप केला 'घटनाच जातीय-वादी असल्यामुळे उमेदवार तरी निवडणुकीसाठी जातीयवादी संघटनेवाचून अन्य कोणाचे तिकिट घेणार? आणि ते ज्यावेळी हिंदू मतदारांच्या मतावर निवडून येतात आणि तरीही हिंदूंचे हितसंबंध सुरक्षित राखीत नाहीत तेव्हा ते हिंदूंशी दगलबाजीच करीत असतात. त्यांना ढोंगीच म्हटले पाहिजे.' गोविंद वल्लभ पंत हे सर्वस्वी हिंदूंच्या मतावर कायदेमंडळावर निवडून गेले होते. परंतु ते मुख्यमंत्री असताना जातीय दंगली उसळल्या तेव्हा हिंदूंच्या घरावर अवकळा पसरली होती. त्यांना शंख फुंकण्याची देखील मनाई होती. देवळातील घंटाही ते वाजवू शकत नव्हते. वाद्ये वाजविण्याला मज्जाव होता. आणि हिंदूंचे नागरी आणि धार्मिक हक्क पार ठोकरून लावण्यात आले होते. असले उपाय योजून 'आपले धोरण हेच खऱ्या राष्ट्रवाद्याचे धोरण आहे' असे दाखवून देण्याचा पंतांनी प्रयत्न चालवला होता. उलटपक्षी 'आपण सत्ता हातात घेतली आहे ती मुसलमानांचे हितसंबंध पुढे रेटण्यासाठीच घेतली आहे' ही गोष्ट

मुसलमान नेत्यांनी लपवून ठेवलेली नव्हती. फजलूल हक भाषणे करीत ती बहुदा याच दृष्टीकोनातून केलेली असत आणि जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा आपण या प्रांतात मुसलमानांचे राज्य प्रस्थापित करीत आहोत असे ते उघडपणे सांगत....... पंजाबात दुसऱ्या एका मुसलमानाने अशी धमकी दिली की, संधी मिळाली तर पंजाबमधील मुसलमान सैनिकांना बरोबर घेऊन नादीर शहाची भूमिका आपण बजावू. मी जे हे सगळे सांगतो आहे तो माझ्या केवळ कल्पनेचा खेळ नाही, तर पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या गौरवार्थ लिहिलेल्या लेखाचा अनुवादच मी तुम्हाला विहीत करीत आहे, असे सावरकर पुढे सांगत असत.

जीना हे मुसलमानांचे खरेखुरे प्रतिनिधी आणि त्यांच्या हक्कांचे राखणदार आहेत असे त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सावरकर म्हणाले, हिंदू समाजाला जीनांसारखी माणसे हवी होती, त्यांनी पुढे सांगितले की, 'फजलूल हक आणि त्यांच्या धाडशीवृत्ती-बद्दल आपल्या मनात अतीव कौतुकाचीच केवळ भावना आहे. हक यांनी बंगालवर सक्तीने उर्दू लादली. त्यामुळे केवळ दहा वर्षापूर्वी—पण दहा तरी कशाला अवघ्या पाचच वर्षांपूर्वी बंगालमध्ये एकच भाषा प्रचलित होती. भाषेच्या दृष्टीने हिंदुस्तानातील इतर कोठल्याही प्रांतापेक्षा बंगालच जास्त एकसंध होता'. हक मंत्रिमंडळ भारताची एकमेव राष्ट्रभाषा म्हणून उर्दूला स्थान देत आहे. इतिहासाची आणि इतर पाठ्यपुस्तके, बंगाली आणि उर्दू अशा दोन्ही लिप्यात लिहवून घेण्यात आली आहेत. भाषिक, धार्मिक, राजकीय आणि प्रादेशिक अशा सर्वच दृष्टीने मुसलमानांचे हिंदूंपेक्षा निराळे असे एक स्वतंत्र राष्ट्र आहे अशी मुसलमानांची धारणा बनवावी हे मुस्लीम लीगचे उघड धोरण आहे.... भारताची हिंदू आणि मुसलमान संघराज्यात विभागणी व्हावी असे मत मुस्लीम लीग कसलाही आडपडदा न ठेवता व्यक्त करीत असताना त्यांच्या बरोबर तडजोडीची भाषा करणे निष्फळ आहे. काँग्रेसच्या याबाबतच्या प्रयोगाने जर काही आढळून आले असेल तर, ते हेच की सवलती आणि विशेषाधिकार यामुळे ऐक्य कधीही साधता येत नाही.

बंगाल प्रांतिक हिंदू महासभेच्या अधिवेशनात बंगालमधील हक मंत्रिमंडळाचा त्यांच्या हिंदूविरोधी धोरणाबद्दल निषेध करण्यात आला.

मार्चच्या शेवटच्या आठवड्यात भरलेल्या बिहार प्रांतिक हिंदू महासभेच्या अधिवेशनात जमीनदारांना अनुकूल अशा धोरणांचा उघडउघड पुरस्कार करण्यात आला. तसेच बंगाल, बिहार आणि महाकोशलच्या परिषदांमधून हैद्राबाद संस्थानातील आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा व्यक्त करण्यात आला, उलट साम्राज्यशाही सत्तेविरूद्ध एक अवाक्षरही न काढता प्रत्येक प्रश्नावर काँग्रेसविरूद्ध मात्र झोड उठविण्यात आली. त्यामुळे काँग्रेसची परिस्थिती अत्यंत विचित्र होऊन गेली. सुभाषचंद्र बोसांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी फेरनिवडणूक झाली होती. परंतु काँग्रेस वर्किंग कमेटीच्या बहुसंख्य सभासदांनी त्यांच्याशी, सहकार्य करण्याचे नाकारले होते. त्यावरून खुद्द काँग्रेस पक्षातही

दुफळी माजली होती. मध्य प्रांतातील मंत्रीमंडळातही पेचप्रसंग निर्माण झाला होता आणि तेथील मुख्य मंत्री डॉ. खरे यांच्या बडतर्फीमुळे जे वादळ माजले होते ते अद्याप शमलेले नव्हते. मुस्लीम लीग आणि हिंदू महासभा यांनी काँग्रेसविरुद्धच केवळ शरसंधान सुरू केले होते असे नव्हे तर, त्यांनी अशी परिस्थिती निर्माण केली होती की, कोठलाही वादग्रस्त प्रश्न अंतिम निर्णयासाठी अखेर ब्रिटीश सरकावर सोपविणे भाग पडावे, शिवाय अनेक परिषदांमधून सावरकर असा प्रचार करीत की, हिंदू लोक स्वातंत्र्य लढ्यासाठी सर्वतोपरी त्याग करीत असताना त्याचे श्रेय मात्र काँग्रेस मुसलमान समाजाला देत आहे. याच काळात काँग्रेसमधील निरनिराळे गट तिला आपापल्या दिशेने खेचण्याचा प्रयत्न करीत होते. तशात युरोपात युद्धाचे ढग जमू लागलेले असतानाच एम. एन. रॉय यांचा गट वगळता इतर डाव्या पक्षांनी साम्राज्यशाहीविरोधी लढा ताबडतोब सुरू करण्यात यावा म्हणून काँग्रेसवर दडपण आणण्यास सुरवात केली होती.

निरनिराळ्या राज्यांनी पास केलेल्या कूळ कायद्यांमुळे सरकारनिष्ठ अश्रफांचा एक मोठा गट धास्तावून गेला होता आणि त्यांच्यापुढे पेच निर्माण झाला होता. फजलूल हक मंत्रिमंडळाने केलेल्या कूळ, कायद्याच्या प्रश्नावर मध्यवर्ती कायदेमंडळावरील मुस्लीम लीगचे सभासद सर ए. एच. गझनवी यांनी पक्षाचा राजीनामा दिला होता. अखिल भारतीय जमीनधारक परिषदेपुढे भाषण करताना बंगालचे भूतपूर्व मंत्री नवाब सर के. जी. एम. फरूकी यांनी हिंदू आणि मुसलमान या दोघांच्याही कट्टर जातीयवादी भूमिकेबद्दल त्यांच्यावर सडकून टीका केली आणि ते निरक्षर आणि भावनावश जनतेत धर्मांधता पसरवित असल्याचा आरोप केला. जमीनधारक हे दुराग्रह, जातीयवाद आणि संकुचित गटबाजी यापासून सर्वस्वी अलिप्त असतात असे सांगून त्यांनी आपली स्वत:ची आणि आपल्या कुळांची सुरक्षितता आणि समृद्धी यासाठी अखिल भारतीय स्वरूपाची संघटना स्थापन करावी असे कळकळीचे आवाहन नवाब सर फरूकींनी केले. नवाब सर महंमद यूसूफ यांनी लँड होल्डर्स फेडरेशनची तपशीलवार योजना सादर केली. तर बिहारमधील शहा मसूद अहमद यांनी त्यांच्या प्रांतातील काँग्रेस आणि जमीनदार यांच्यात घडून आलेला तथाकथित समझोता म्हणजे निव्वळ धूळफेक आहे असे सांगितले. काँग्रेसने पुढाऱ्यांची दिशाभूल केली असून कूळ कायद्यांमुळे जमीनदारांची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली असल्याने जमीनदारांनी काँग्रेस बरोबरच्या वाटाघाटींच्या सापळ्यात सापडू नये असा त्यांनी सल्ला दिला. त्याच्या मते या सर्वांवर एकच उपाय होता आणि तो म्हणजे , ब्रिटीश सरकारकडून निरनिराळ्या कायदेमंडळात जमीनदारांसाठी शक्य तितक्या जास्त जागा मिळवून घ्यावयाच्या. सर महंमद अहमद सैयद खान, नवाब ऑफ छत्तारी यांच्या मते देशात पसरलेल्या असंतोषाचे मूळ ग्रामीण भागात सतत चालू असलेला जमीनदारविरोधी प्रचार हेच होते. कारण अशा प्रचारामुळे शेतकऱ्यांना कायद्याबद्दल कसला तो आदरच राहिलेला नाही. संयुक्त प्रांतातील कूळ

कायद्यावर त्यांनी सडकून टीका केली. शेवटी त्या अधिवेशनात दरभंग्याच्या महाराजाधिराजांच्या नेतृत्वाखाली जमीनदारांचा महासंघ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा तऱ्हेने वर्गीय हितसंबंधांना प्राधान्य मिळाले. मुसलमानांची अल्पसंख्या असलेल्या प्रांतातील अश्रफांना हे कळून चुकले की, हिंदू आणि मुसलमान जमीनदारांची स्थिती सारखीच आहे. त्यामुळे फुटीरवादी राजकारणातून ते अंग काढून घेऊ लागले. त्याचप्रमाणे द्विराष्ट्र सिद्धांतापासूनही दूर राहू लागले. पंजाबमधील मुस्लीम, शीख आणि हिंदू जमीनदार तर दहा वर्षापूर्वीच या निष्कर्षाप्रत आले होते. त्यांचे नेते सर सिकंदर हयात खान हे दोन्ही डगरीवर हात ठेवू पाहत होते. त्यांना अशा अखिल भारतीय संघराज्याला पर्यायी योजना सुचविली. मुस्लीम लीगमधील आपल्या नव्या सहकाऱ्यांच्या तीं गळी उतरविता येईल अशी त्यांना आशा वाटत होती.

सर सिकंदर यांनी १९३९च्या मे महिन्यात सोलापूर येथे भरलेल्या मुंबई प्रांतिक मुस्लीम लीगच्या परिषदेत आपली योजना तपशीलवार मांडली. आणखी वीस वर्षे म्हणजे १९५९ पर्यंत ब्रिटीशांची सत्ता चालू राहील असे त्यांच्या योजनेत गृहीत धरलेले होते. लॉर्ड लोथियन यांचा अंदाजही जवळपास तसाच होता. या योजनेनुसार भारताचे सात विभाग पाडून त्यांचे संघराज्य बनविण्यात यावयाचे होते व प्रत्येक विभागाचे वेगळे कायदेमंडळ राहणार होते. सर सिकंदर यांच्या योजनेतील सात विभाग पुढीलप्रमाणे होते, (२) आसाम, बंगाल आणि बंगालमधील संस्थाने, (२) बिहार, ओरिसा आणि बंगालमधील पहिल्या विभागात समाविष्ट न झालेले दोन जिल्हे, (३) संयुक्त प्रांत आणि त्या विभागातील संस्थाने, (४) मद्रास प्रांत, त्या विभागातील संस्थाने आणि त्याच्या जोडीला त्रावणकोर व कुर्ग, (५) मुंबई प्रांत, हैद्राबाद, म्हैसूर, काठेवाड, ही आणि मुंबई आणि मध्य प्रांताच्या विभागात मोडणारी संस्थाने, (६) मध्य प्रांत आणि वऱ्हाड राजपुतान्यातील संस्थाने, ग्वाल्हेर, मध्य भारतातील संस्थाने, आणि बिहार व ओरिसा विभागांतील बिकानेर आणि जयसालमेर वगळून बाकीची संस्थाने, आणि (७) पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान आणि काश्मीर, बिकानेर, जयसालमेर आणि पंजाब विभागातील इतर संस्थाने या सात विभागातील कायदेमंडळांच्या सर्व सभासदांचे मिळून संघराज्याचे मध्यवर्ती कायदेमंडळ बनेल. मात्र त्यात मुसलमानांना ३३ टक्के कायदेशीर प्रतिनिधित्व असेल. गव्हर्नर जनरल संघराज्याचे मंत्रिमंडळ नियुक्त करील. त्यात प्रत्येक विभागातील किमान एक तरी सभासद असेल. मंत्रिमंडळात मुसलमानांना आणि संस्थानांना अनुक्रमे ३३ आणि २५ टक्के प्रतिनिधीत्त्व दिले जाईल. त्याशिवाय संरक्षण आणि परराष्ट्र संबंध या दोन खात्यांसाठी गव्हर्नर जनरल दोन वेगळे मंत्री नेमतील. अल्पसंख्यांकाची सुरक्षितता, ब्रिटीशांपासून निर्माण झालेल्या प्रजेच्या बाबतीत वांशिक भेदाभेद होऊ नये म्हणून व्यवस्था, संस्थानिकांना वेळोवेळी दिलेली आश्वासने आणि केलेले करार मदार कायम राहावेत, संस्थाने त्याचबरोबर ब्रिटीश प्रांताची एकात्मता

स्वायत्तता याबाबत संघराज्याकडून होणारा हस्तक्षेप आणि विविध स्वरूपाची विध्वंसक कृत्ये इ. बाबत गव्हर्नर जनरलच्या हाती खास संरक्षक अधिकार असावेत अशीही त्या योजनेत तरतूद होती.

मुस्लीम लीगने हिंदूंचे व मुसलमानांचे स्वतंत्र संघराज्य असावे म्हणून प्रचार चालविलेला असतानाही सिंधमधील अलाबक्ष मंत्रिमंडळ टिकून राहिले होते. त्यामुळे पूर्वी काँग्रेस मंत्रिमंडळांच्या बाबतीत जो पवित्रा घेण्यात आला होता तोच जीनांच्या अनुयायांनी अलाबक्ष मंत्रिमंडळाच्या बाबतीतही घेतला. मंत्रिमंडळाला घाबरून सोड-ण्यासाठी जातीजातीत वैमनस्य निर्माण होईल असे प्रयत्न सुरू झाले. लाहोरच्या शहीदगंज मशीद प्रकरणाची पुनरावृत्ती करण्यात आली. सक्कर येथे मंजिलगाह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोन प्राचीन इमारती सरकारच्या ताब्यात होत्या. त्यापैकी एक मशीद होती म्हणून ती मुसलमानांच्या ताब्यात देण्यात यावी असा प्रचार प्रांतभर सुरू झाला आणि या प्रश्नावर मुसलमानांच्या भावना भडकावून देण्यात आल्या. मुसलमान जनतेकडून इतके दडपण आले की, शेवटी अलाबक्ष मंत्रिमंडळातील मुसलमान सभासदही विचलित झाले आणि जातीय प्रश्नावर मंत्रिमंडळात फुट पडली. एक कृती समिती नेमून मुस्लीम लीगने या प्रश्नावर कायदेभंगाची चळवळ सुरू केली. लीगच्या स्वयंसेवकांनी स्वतःला अटक करून घेतली इतकेच नव्हे तर त्यांनी मुसलमान मंत्र्यांच्या घरांना घेराव घातला आणि मंजिलगाहचा जबरदस्ती करून प्रत्यक्ष ताबा घेतला. परिस्थिती इतकी विकोपाला गेल्यावर मात्र गव्हर्नरांनी शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी हस्तक्षेप करण्याचे ठरविले. संशयावरून कोणालाही अटक करण्याचे अधिकार देणारा वटहुकूम जारी करण्यात आला. त्यामुळे वातावरण आणखीच बिघडले. केवळ नाइलाज म्हणून गांधींनी सक्करमधील हिंदूंना सक्कर सोडून जाण्यास सांगितले तर महासभेच्या नेत्यांनी त्यांना या जुलमांविरूद्ध लढा देण्यास सिद्ध राहण्याचे आवाहन केले. तारीख १ नोव्हेंबर रोजी सिंधमधील एका प्रसिद्ध हिंदू कवीचा खून झाला. त्याचा निषेध करण्यासाठी हिंदू महासभेच्या नेत्यांनी ठिकठिकाणी सभा भरविल्या त्यामुळे परिस्थिती आणखीच चिघळली. शेवटी सरकारने परिस्थिती काबूत आणण्यासाठी कडक उपाय योजण्याचे ठरविले आणि मंजिलगाहात जाऊन बसलेल्या लीगच्या स्वयंसेवकांना बाहेर काढून पुन्हा त्या इमारतींचा ताबा मिळविला. परंतु त्यामुळे परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी संबंध सिंध प्रांतात भयानक स्वरूपाच्या जातीय दंगली उसळल्या त्यात ११५ हिंदू आणि १७ मुसलमान प्राणास मुकले. त्यानंतर काही आठवड्यातच अल्लाबक्ष मंत्रिमंडळ गडगडले.

१९३८ च्या लखनौ येथील शिया-सुनी दंगलीनंतर खाकसार चळवळीने डोके वर काढले. इनायतुल्ला खान उर्फ अल्लामा मश्रिकी याने ही संघटना १९३० साली पंजाबमध्ये सुरू केली. 'आदर्श वागणुकीने सर्व जगावर आपले प्रभुत्त्व आणि सामा-जिक आणि राजकीय सार्वभौमत्त्व प्रस्थापित करणे' हे या खाकसार चळवळीचे

उद्दिष्ट होते. जगाचा भावी सत्ताधारी म्हणून प्रत्येक समाजाला त्याचे नागरी हक्क मिळवून देणे आणि त्यांचे अंतर्गत आणि बाह्य हितसंबंध अबाधित राखणे हे प्रत्येक खाकसार सैनिकाचे कर्तव्य आहे असे मानले जाई. खाकसार या शब्दाचा अर्थच लीनता असा होतो. या संघटनेचे स्वंयसेवक विशिष्ट गणवेश धारण करून आणि फावडे हे आपल्या संघटनेचे प्रतीक, खांद्यावर टाकून रस्त्यांतून संचलन करीत. सुरूवातीला त्यांच्याकडे फारसे कोणी लक्ष देत नसे. परंतु शिया-सुनी वादाचा बीमोड करण्यासाठी शेकडो खाकसार पंजाबातून लखनौला येऊन थडकले तेव्हा मात्र सरकारने त्यांच्याविरूद्ध कडक कारवाई केली. तिचाही जातीयवादी मुसलमान नियतकालिकांनी काँग्रेसविरोधी प्रचारासाठी उपयोग करून घेतला.

एकात्म राष्ट्रवाद, हिंदू राष्ट्रवाद आणि मुस्लिम राष्ट्रवाद अशा भिन्न भिन्न मतांच्या गलबल्याचे ते दिवस होते. १९३८ मध्ये काही बंगाली बुद्धिवादी मुसलमानांनी बंगाली राष्ट्रवादाचा पुरस्कार करायला सुरवात केल्यापासून त्यात आणखी एका वादाची भर पडली. बंगाली राष्ट्रवादाची कल्पना सर्वप्रथम बंगाली मुस्लीम लिटररी कॉन्फरन्सचे एक प्रवक्ते बॅ. वाझेत अलि यांनी निवडक श्रोत्यांच्या पुढे मांडली. ते म्हणाले :—

> आपले उद्दिष्ट अखिल भारतीय राष्ट्रवाद हे नसून बंगाली राष्ट्रवाद हे आहे. त्याचा दर्जा भारतीय संघराज्यातील इतर घटक राज्यांच्या बरोबरीचा असेल· · · आपल्या ( बंगाली मुसलमानांच्या ) दृष्टीने, आपल्या अंतिम हिताचा केवळ तोच एक मार्ग असू शकतो. हे ध्येय डोळ्यासमोर ठेवले तर आपल्या समाजाच्या धर्माच्या किंवा संस्कृतीच्या हितसंबंधाशी कसलाही संघर्ष उद्‌भवण्याचे कारण उरणार नाही. जवळ जवळ बंगाली मुसलमानांइतकीच संख्या असलेल्या बंगाली हिंदूबद्दलही असेच म्हणता येईल. संख्येच्या दृष्टीने पाहता मुसलमान हे थोडेसे वरचढ असले तरी प्रतिष्ठा आणि प्रभाव याबाबतीत हिंदूंचा वरचष्मा आहे. त्यामुळे दोन्ही समाजाच्या लोकांना या ध्येयाचा अंगिकार करून आपल्या मातृ-भूमिच्या चरणी आपली शक्ती वाहण्यास कसलीही अडचण पडू नये.

याच काळात जमीयत-उल-उलेमा या संघटनेने प्रथमच 'एकात्म' राष्ट्रवादाची कल्पना उचलून धरली आणि तात्त्विकदृष्टया तिचे समर्थन केले. सर्वसाधारण मुस्लीम जनतेवर किंवा बुद्धिवाद्यांवर त्यावेळी तिचा परिणाम घडून आला नसला तरी इस्लामी तत्त्व प्रणालीच्या संदर्भात तो विचार काहीसा निराळाच होता. पुढे १९३७ साली जमीयत-उल-उलेमाचे नेते मौलाना हुसेन अहमद मदनी यांनी असे जाहीर केले की, इकबाल सारखे लोक प्रचार करीत असलेल्या इस्लामिक राष्ट्रवादाऐवजी भारतीय मुसलमानांनी प्रादेशिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेची कास धरावी. मौलाना मदनींच्या या वक्तव्याबद्दल त्यांची खरडपट्टी काढणारी 'हुसेन अहमद' नावाची एक कविता इकबाल यांनी लगेच प्रसिद्ध केली. त्यांवरून प्रादेशिक राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते आणि

इस्लामी राष्ट्रवादाचे प्रचारक यांच्यात रणधुमाळी माजली. थोड्याच दिवसात मदनी यांनी मुत्तहिदा कौमीयत और इस्लाम (संयुक्त भारतीय राष्ट्रवाद आणि इस्लाम) या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली त्या पुस्तिकेत मुख्यत: हिंदुस्तानातील परिस्थिती आणि पैगंबर हयात असतानाची परिस्थिती यातील साम्य दाखवून देण्यात आले होते. स्वत: पैगंबराने अरबस्तानातील यहुदी आणि ख्रिश्चन यांचे हक्क आणि अधिकार निश्चित करून देणारे करारमदार केले होते. अरबस्तानातील निरनिराळ्या धर्म पंथांच्या जीवनपद्धतीत भिन्नता असली तरी पैगंबराने ज्याप्रमाणे त्यांच्याबरोबर सहजीवन होऊ शकते असे गृहीत धरले होते, त्याप्रमाणे विविध धर्म, संस्कृती, भाषा इ. च्या संरक्षणाबद्दल काँग्रेसने जी हमी दिली आहे तिच्या आधारावर भारतातील हिंदू आणि मुसलमान एकत्र राहू शकतात असे मौलाना मदनी यांनी त्या पुस्तिकेत प्रतिपादन केले होते. आपल्याला अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद हा पाश्चात्यांच्या कल्पनेतील राष्ट्रवादापेक्षा निराळा आहे असा खुलासा करून त्यांनी असे स्पष्ट केले होते की, पाश्चात्य राष्ट्रवादात धर्म, भाषा आणि वंश हे एकजिनसी असले पाहिजेत असे गृहीत धरलेले असते तर एकात्म भारतीय राष्ट्रवाद प्रत्येक जमातीचे हक्क अबाधित राखले जातील या आधारावर सहजीवनाची हमी देतो. एकात्म भारतीय राष्ट्रवाद हा इस्लामी तत्त्व प्रणालीच्या विरोधी नसून या देशात राहणाऱ्या लोकांचे धर्म भिन्न असले तरी त्यांची सुखदु:खे त्याचप्रमाणे त्यांना भेडसावणारे प्रश्न समान असल्यामुळे हिंदुस्तानात अशा प्रकारच्या राष्ट्रवादी विचाराची नितांत आवश्यकता आहे असे त्यांनी मोठ्या आग्रहाने प्रतिपादन केले.

---

## प्रकरण १८

### लाहोरचा ठराव

१० जुलै १९३८ रोजी नेहरूंची लॉर्ड लोथियन यांच्या बरोबर इंग्लंडमध्ये बोलणी झाली. त्यावेळी नेहरूंनी तीन अटींवर संघराज्याची योजना राबविण्याची तयारी दर्शविली. त्या तीन अटी अशा होत्या (१) जी संस्थानें संघराज्यात सामील होण्यास तयार असतील त्यांना प्रथम आपल्या राज्यात काही लोकशाही सुधारणा घडवून आणण्यास ब्रिटीश सरकारने भाग पाडावे, (२) राखीव खात्यांच्या बाबतीत व्हाइसरॉयने लोकनियुक्त मंत्र्यांच्या सल्ल्यानुसार निर्णय घ्यावेत, (३) संरक्षण खात्यावरील खर्चापैकी काही बोजा ब्रिटीश सरकारने उचलावा. परंतु साम्राज्यशाही सत्ताधारी लगेच सत्तांतर करण्यास किंवा संस्थानात लोकशाही जमाना सुरू करण्यास अजिबात उत्सुक नव्हते. त्यामुळे अर्थातच नेहरूंच्या अटी मान्य करण्यात आल्या नाहीत. काँग्रेसने प्रांतातून अधिकार स्वीकार केला असल्यामुळे संघराज्याला असलेला तिचा विरोधही कालांतराने मावळेल आणि संघराज्याची योजना राबवायला ती यथावकाश तयार होईल अशी ब्रिटीश सरकारची अटकळ होती. या उलट भारत मंत्री लॉर्ड झेटलंड यांनी मात्र मुस्लीम लीगकडून संघराज्याच्या योजनेला अत्यंत कडवा विरोध होईल असे मत १९३७ सालीच व्यक्त करून ठेवले होते. १९३८ साली त्यावेळचे हंगामी गव्हर्नर जनरल लॉर्ड ब्रेबोर्न यांच्या सिकंदर हयात खान आणि जीना यांच्याबरोबर ज्या स्वतंत्र बैठकी झाल्या त्यावरून वरील मताला पुष्टीच मिळाली. त्या दोघांनीही लॉर्ड ब्रेबोर्न यांच्याबरोबर झालेल्या बोलण्याच्यावेळी असा आग्रह धरला की, ब्रिटीश सरकारने १९१९ च्या कायद्यानुसार मध्यवर्ती सरकारचा कारभार पूर्ववत पाहावा आणि काँग्रेस अधिकारावर असलेल्या प्रांतातील अल्पसंख्य मुसलमानांना साहाय्य करावे. त्याबदल्यात केंद्रात सरकारला कोणत्याही परिस्थितीत संपूर्ण पाठिंबा देण्याची तयारी या दोघांनी दर्शविली. पुढे चार महिन्यानंतर भरलेल्या मुस्लीम लीगच्या पाटणा अधिवेशनात जीनांनी सरकार बरोबर झालेल्या या समझोत्याची अप्रत्यक्ष कबुलीही दिली.

संघराज्यांची योजना अंमलात आणण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न करण्यास आपण घटनेने बांधलेले आहोत अशी लॉर्ड लिनलिथगो यांची धारणा होती तर ती योजना राबविण्याच्या भरात मुसलमानांना नाराज करून ठेवण्यात अर्थ नाही असे लॉर्ड झेटलंड यांना वाटत होते. डिसेंबर १९३८ ते मे १९३९ च्या दरम्यान लॉर्ड

लिन लिथगो यांना लिहिलेल्या पत्रांत लॉर्ड झेटलंड यांनी पुढील मुद्दे मांडले होते. (१) हिंदुस्तानचे यापुढील सरकार कसे असावे हे ठरविण्याच्या बाबतीत मुस्लीम लीग हा निर्णायक घटक ठरणार आहे, (२) संस्थानी प्रदेशातील काँग्रेसच्या चळवळीमुळे मुस्लीम लीग अत्यंत अस्वस्थ झाली असून भावी संघराज्याच्या कायदेमंडळात काँग्रेसचे प्रभुत्व राहील अशी तिला भीती वाटते, (३) कोठल्याही स्वरूपातील भावी केंद्रीय सरकारात हिंदूंचे वर्चस्व सहन करावयाचे नाही या निर्धाराने मुसलमान एकत्र येत आहेत, (४) संघराज्याच्या वादात काँग्रेस आणि ब्रिटीश सरकार असे दोनच पक्ष आहेत अशी समजूत करून घेणे चुकीचे ठरेल कारण मुसलमानांचाही महत्त्वाचा असा एक तिसरा पक्ष आहे आणि काँग्रेस प्रमाणेच त्यांच्याही विचारांची आणि भावनांची दखल घ्यावीच लागेल, (५) मुसलमानांच्या मनात हिंदूंच्या वर्चस्वाबद्दल नाराजीची आणि भीतीची जी भावना घर करून बसली आहे तिच्याकडे ब्रिटीश सरकारला सहजासहजी दुर्लक्ष करून चालता येणार नाही, आणि (६) संघराज्याच्या योजनेला अत्यंत कडवा विरोध असलेल्या पंजाब आणि बंगाल या दोन प्रांतांना संघराज्यात सामील होण्यास राजी कसे करता येईल हा एक कूट प्रश्नच आहे. उलट पक्षी व्हाइसरॉयनी पाठवलेल्या उत्तरात पुढील युक्तीवाद केला होता. (१) गोलमेज परिषदेनंतर मुस्लीम लीगने कोणतीही नवी शंका उपस्थित केलेली नाही, (२) १९३५ च्या कायद्यान्वये इतर जातींना कायदेशीररीत्या मिळणाऱ्या तरतुदींच्या मानाने मुसलमानांना जास्तीत जास्त सरंक्षक सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, (३) केंद्रात कोणत्याही स्वरूपातील जबाबदारीचे सरकार आणावयाचे म्हटले तरी मुसलमान आपल्या मनातील भीती कधी सोडणार नाहीत, (४) हिंदुस्तानच्या भावी राजकारणाचा प्रवाह कधी न मिटणाऱ्या जातीय संघर्षाने भरलेलाच असणार असे मानणारे जे मुसलमान आहेत ते प्रातिनिधिक सरकारच्या तत्त्वावर आधारलेली संघराज्याची कोणतीच योजना कधीही स्वीकारणार नाहीत, (५) संघराज्याच्या स्थापनेच्या मार्गात अडथळे आणणे मुस्लीम लीगच्या आवाक्या बाहेरचे आहे, आणि (६) संघराज्य अमलातच येऊ द्यावयाचे नाही किंवा अस्तित्वात आलेच तर त्याचे कामकाज चालू द्यावयाचे नाही असे मुस्लीम लीगने ठरविले तर ते केवळ जास्तीत जास्त संस्थानिक संघराज्याच्या बाहेर राहिले तरच शक्य होईल लिनलिथगो यांना असा विश्वास होता की एकदा संघराज्याची योजना अमलात आली की लीग आणि काँग्रेस ही दोघेही तिच्यात सहभागी होतील. ३० जुलै १९३९ रोजी प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकात जीनांनी संघराज्याला पुन्हा विरोध एकदा घोषित केला आणि हिंदुस्तानची इच्छा नसताना तीव्र विरोध पत्करून ब्रिटीश सरकारने संघराज्याची योजना लादण्याचा आग्रह धरू नये असे आव्हान लॉर्ड लिनलिथगो आणि ब्रिटीश सरकार या दोघांनाही केले. ऑगस्ट महिन्यात बादशहाचे प्रतिनिधी आणि चेंबर ऑफ प्रिन्सेसच्या स्थायी समितीचे सभासद यांच्यात सिमला येथे बोलणी

झाली. संस्थानिकांच्या वतीने उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांसंबंधी बादशहाच्या तिनिधीने खुलासा केला. बोलण्याच्या अखेरीस प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात असे म्हटले होते की, मतभेद दूर झाले असून संघराज्याच्या मूळ योजनेचा गाभा कायम ठेवून सुचविण्यात आलेल्या काही पर्यायांबाबत एकमत झाले आहे. तारीख २३ ऑगस्ट रोजी ही बोलणी संपली त्यावेळी संघराज्यात्मक घटना अमलात येणार अशी चिन्हे दिसू लागली होती. परंतु सप्टेंबर महिन्यात दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि सारी परिस्थितीच पार बदलून गेली व संघराज्याच्या योजनेला कायमची मूठमाती मिळाली.

दुसरे महायुद्ध सुरू झाले त्यावेळी पाकिस्तानच्या चळवळीने चांगले मूळ धरले होते. १९३७ च्या ऑक्टोबरात सैयद अलि जावत यांनी पायोनियरमध्ये लिहिलेल्या एका लेखात असे सुचविले होते की, जर वाटाघाटींनी जातीय प्रश्नाची तड लागत नसेल तर हिंदू हिंदुस्तान आणि मुस्लीम हिंदुस्तान अशी देशाची फाळणी करण्यावाचून अन्य पर्याय राहात नाही. जी. एल. शांझलिन यांनी दि मुस्लीम वर्ल्ड नावाच्या नियतकालिकात एप्रिल १९३८ मध्ये एक लेख लिहिला होता. त्यात त्यांनी देशाच्या फाळणीची तपशीलवार योजना दिली होती. त्याच महिन्यात कलकत्ता येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात मांडण्यासाठी बंगाल कायदेमंडळाचे एक सभासद अबदुल जाबर पाहलोन यांनी विषय नियामक समितीकडे एक ठराव पाठवला होता त्या ठरावात हिंदुस्तानची फाळणी करून उत्तर हिंदुस्तान मुसलमानांकडे तर दक्षिण हिंदुस्तान हिंदूंकडे देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती. आपल्या मृत्युपूर्वी इकबाल यांनी आपण पाकिस्तानच्या आंदोलनात सामील होण्यास तयार असल्याचे चौधरी रहमत अलि यांना कळविले होते आणि लगेच त्यांना त्या आंदोलनाचे अध्यक्षपद देऊ करण्यात आले होते. १९३८ च्या डिसेंबरात रहमत अलि यांनी चौधरी खलिकुझयान यांच्याबरोबर प्रदीर्घ काळ चर्चा करून सार्वभौम पाकिस्तान निर्माण करणे कसे निकडीचे आहे ते त्यांना पटवून दिले. खलिकुझ्झन यांना देशाची फाळणी अपरिहार्य आहे हे पटले होते परंतु मुसलमानांची वायव्यकडे एक आणि ईशान्य भागातील एक अशी दोन स्वतंत्र संघराज्ये निर्माण होणे त्यांना अधिक पसंत होते.

कराची येथे ऑक्टोबर १९३९ मध्ये भरलेल्या सिंध प्रांतिक मुस्लीम लीगच्या अधिवेशनात एक पुस्तिका वाटण्यात आली होती. त्या पुस्तिकेचे लेखक उस्मानिया युनिव्हर्सिटीतील इंग्रजीचे प्राध्यापक डॉ. सैयद अब्दुल लतीफ हे होते. १९३९ च्या सुरुवातीला 'हिंदुस्तानातील मुसलमानांची समस्या या नावाने त्या पुस्तिकेची दुसरी आवृत्ती मुंबईला छापून घेण्यात आली. त्या पुस्तिकेत हिंदुस्तानचे चार प्रमुख आणि अनेक लहान लहान मुस्लीम विभाग पाडण्यात यावेत असे सुचविण्यात आले होते, (१) सिंध, बलुचिस्तान, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत आणि खैरपूर आणि बहावलपूर या संस्थानांचा समावेश असलेला वायव्य विभाग, (२) पूर्व बंगाल आणि

आसाम यांचा पूर्व विभाग, (३) दिल्ली लखनौ विभाग, (४) संपूर्ण हैद्राबाद संस्थान आणि त्यांच्या जोडीला कुर्नल, कडाप्पा, चित्तूर, उत्तर अर्काट, चिंगलपेठ हे जिल्हे आणि मद्रास शहर मिळून दक्षिण विभाग, (५) भोपाळ, (६) टोंक, (७) जुनागड, (८) जावरा, आणि (९) बाकीची उरलेली मुस्लीम संस्थाने असे मुसलमान विभाग सुचविण्यात आले होते, उर्वरित देशाचे पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, पश्चिम बिहार आणि दिल्ली लखनौ विभाग वगळून बाकीचा संयुक्त प्रांत, राजपुतान्यातील संस्थाने, काठेवाड, गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, तामिळ भाषिक विभाग, मल्याळी भाषिक विभाग, आणि पूर्व पंजाबमधील बिगर मुस्लीम संस्थाने असे मुख्यत: भाषिक तत्त्वावर आधारलेले हिंदू विभाग पाडण्यात यावेत असेही त्या योजनेत नमूद करण्यात आले होते. डॉ. लतीफ यांच्या या योजनेनुसार पंचवीस वर्षांच्य कालावधीत हिंदू व मुसलमान लोकसंख्येची संपूर्ण अदलाबदल करण्यात यावयाची होती. डॉ. लतीफ यांच्या योजनेतील दक्षिण विभाग खूप मोठा होणार होता. परंतु डॉ. लतीफ यांनी त्यांचे समर्थन असे केले होते की, एक तर त्या विभागाला एकादे तरी चांगले बंदर असले पाहिजे शिवाय हैद्राबाद संस्थानातील बराचसा भाग खडकाळ व नापीक आहे तसेच ओरिसा, मध्यप्रांत, मुंबई, मद्रास, म्हैसूर, कोचीन आणि त्रावण-कोर भागातील मुसलमानांना या विभागात सामावून घ्यावे लागणार असल्याने तो मोठा ठेवणे अपरिहार्य आहे हरिजन ख्रिश्चन आणि आदिवासी यांना विशेषाधिकार असलेल्या जाती समजून त्यांना दक्षिण विभागात राहण्याची मुभा डॉ. लतीफ यांनी दिली होती.

लोकसंख्येची अदलाबदल होईपर्यंतच्या कालावधीत मुसलमान विभागात मुसलमानांची व हिंदू विभागात हिंदूंची मंत्रिमंडळे अधिकारावर असतील अशी या योजनेत तरतूद होती डॉ लतीफ यांच्या या योजनेनुसार काही विभाग हे केवळ मुसलमानांकरिता राखून ठेवले जाणार असल्याने देशात अनेक पाकिस्ताने निर्माण होणार होती. शिवाय तिच्यात पुढे लोकसंख्येची संपूर्ण अदलाबदल अभिप्रेत होता. त्यायोगे विखुर लेली सर्व मुसलमान जनता या विभागात स्थायिक झाली असती. अल्पसंख्य प्रांतातील उच्च वर्गीय लोकांच्या आकांक्षा या योजनेत प्रतिबिंबित झालेल्या होत्या. अर्थात त्यामागील मुख्य हेतू 'निझामाची सत्ता कायम टिकवून ठेवावयाचो हाच होता. डॉ. लतीफ यांच्या या पुस्तिकेला सर अबदुल्ला हसन यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत अशा तऱ्हेचे विखुरलेले विभाग निर्माण करण्याच्या लेखकाच्या कल्पनेला विरोध दर्शविला होता आणि त्याऐवजी ब्रिटीश हिंदुस्तानची विभागणी करून एक हिंदूंचे व एक मुसलमानांचे अशी दोन संघ राज्ये निर्माण करावीत असे सुचविले होते.

१९३९ च्या मार्च महिन्यात चौधरी खलिकुझमान आणि रेहमान सिद्दिकी यांनी उपभारत मंत्री, कर्नल मूरहेड आणि भारतमंत्री, लॉर्ड झेटलंड यांची भेट घेऊन सरकारच्या संघराज्याच्या योजनेस मुसलमानांचा तीव्र विरोध असल्याचे त्यांच्या

कानावर घातले. यासंबंधी झेटलंड यांनी लिनलिथगो यांना पाठविलेल्या पत्रात असे लिहिले की, सरकारच्या योजनेला विरोध असेल तर त्यावर तुमच्यापाशी काही पर्याय आहे का असे ज्यावेळी विचारले त्यावेळी त्या दोघांनी सांगितले की होय आमच्यापाशी पर्याय आहे आणि तो म्हणजे तीन किंवा चार संघराज्ये स्थापन करावयाची आणि कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील लहानशा मध्यवर्ती समितीच्या आधारे त्यात सुसूत्रता ठेवावयाची अर्थात त्यांच्या योजनेचा मुख्य उद्देश केंद्रात मुसलमानांना हिंदूंच्या इतकीच सत्ता कशी प्राप्त होईल हा होता.

तारीख ८ एप्रिल १९३९ रोजी भरलेल्या पहिल्या दिल्ली प्रांतिक मुस्लीम लीग परिषदेच्या अध्यक्षपदी असलेल्या राजा ऑफ महमुदाबाद यांनी आपल्या भाषणातील बराचसा भाग अखिल भारतीय संघ राज्याला जे अनेक पर्याय सुचविण्यात आले होते त्यांचा उहापोह करण्यातच खर्ची घातला होता. इकबाल आणि सिंध प्रांतिक मुस्लीम लीग यांनी हिंदूंचे व मुसलमानांचे स्वतंत्र संघराज्य करण्यात यावे अशी जी सूचना केली होती तिचा उल्लेख करून राजा साहेबांनी असे दाखवून दिले की, त्यामुळे अल्पसंख्य प्रांतात विखुरलेल्या मुसलमानांच्या भवितव्याचा विचार होत नाही; शिवाय हैद्राबाद, भोपाळ आणि इतर मुसलमानी संस्थाने याकडे इकबाल आणि सिंध प्रांतिक लीग यांचे दुर्लक्ष झाले आहे अशी टिका करून त्यांनी हैद्राबादचे डॉ. लतीफ यांनी तयार केलेल्या योजनेची जोरदार शिफारस केली. त्याच दिवशी मुस्लीम लीगच्या कौन्सिलची बैठकही दिल्लीत भरली होती. त्या सभेत बोलताना जीनांनी जमलेल्या सभासदांना असे सांगितले की, अखिल भारतीय संघराज्याला पर्यायी अशा ज्या योजना पुढे आल्या आहेत त्याबाबत विचार करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली आहे.

मे १९३९ मध्ये पंजाबचे नबाब सर मुहंमद शहा नवाझ खान यांनी हिंदुस्तानचे महासंघ राज्य या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली. लोकसंख्येची अदलाबदल करण्यास भरमसाठ खर्च येईल या कारणास्तव डॉ. लतीफ यांच्या योजनेवर त्या पुस्तिकेत टीका करण्यात आली होती. त्याऐवजी हिंदुस्तानात (१) सिंधू नदीचे खोरे, (२) राजस्थान आणि मध्य भारतातील संस्थाने, (३) हैद्राबाद आणि म्हैसूर सकट दक्षिणी संस्थाने, (४) पूर्व बंगाल आणि आसामचा काही भाग, आणि (५) उर्वरित भारत अशी पाच देशांची पाच संघराज्ये करावीत असे त्या पुस्तिकेत सुचविण्यात आले होते. या पाच संघराज्याचे मिळून एक महासंघ राज्य बनवावे व त्याकडे फक्त संरक्षण खाते सोपवावे आणि त्यासाठी पाचही संघराज्यांनी समान अर्थसहाय्य करावे असेही त्या योजनेत होते. शहा नवाझ खान यांची विचारसरणी अशी होती की, मुसलमानांचे स्वतंत्र राष्ट्र असले तरी हिंदूंनी त्यांच्यावर फाळणी लादली तरच त्यांनी त्याला तयारी दर्शवावी. मुसलमानांत बाहेरच्या लोकांचा अंश फारच थोडा आहे आणि हिंदू हे या देशाचे जितके भूमिपुत्र आहेत तितकेच आपण मुसलमानही आहोत आणि

शेवटी आपले भवितव्य भारताशीच निगडीत असून ते बाहेरच्या कोठल्याही देशावर अवलंबून नाही.

१९३९ च्या मध्याला अलिगड युनिव्हर्सिटीच्या सईद झाफरूल हसन आणि डॉ. महंमद अफझल हुसेन काद्री या दोन प्राध्यापकांनी तयार केलेली एक योजना 'भारतीय मुसलमानांची समस्या आणि तीवरील उपाय' या नावाने प्रसिद्ध झाली. योजनेच्या प्रास्ताविकात भारतीय मुसलमानांचे एक स्वतंत्र राष्ट्र असून सुडेटन जर्मन हे झेक लोकांहून जितके निराळे आहेत त्याहूनही मुसलमान हे हिंदूपेक्षा जास्त निराळे आहेत; आणि हिंदू आणि ब्रिटीश या दोघांच्याही जोखडातून मुक्त होऊन आपले स्वतःचे भवितव्य घडविण्याची त्यांची दुर्दम्य इच्छा आहे असे नमूद करण्यात आले होते हिंदुस्थानातील मुस्लीम राष्ट्रांच्या वतीने या दोन प्राध्यापक महाशयांनी (१) वायव्य भागात पाकिस्तान, (२) आसाममधील सिल्हेट विभाग, आणि हौरा, मिदनापूर आणि दार्जिलींग हे जिल्हे वगळून बंगाल आणि बिहारचा पूर्णिया जिल्हा, (३) वऱ्हाड आणि कर्नाटक यांच्या सकट हैद्राबाद ( ईस्ट इंडिया कंपनीने जिंकून घेतलेला मूळचा कर्नाटकच्या नबाबाच्या ताब्यातील प्रदेश ), आणि (४) उर्वरित ब्रिटीश हिंदूस्तान, अशी चार सार्वभौम राज्ये निर्माण करण्यात यावीत अशी मागणी केली होती. इतर संस्थानांपैकी जम्मू आणि काश्मीर करात, बहावलपूर, खैरपूर, पतियाळा, जिंद, नाथा, कपूरथाळा, मलेर कोटला, फरीदकोट आणि सिमल्याच्या टेकडी भागातील संस्थाने यांचा समावेश त्या दोघांना पाकिस्तानात व्हावयास हवा होता. या योजनेचा मुख्य गाभा मुसलमानांना स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता देण्यात यावी आणि हिंदुस्तानातदेखील त्यांच्यासाठी जास्तीत जास्त स्वायत्त टापू मिळवावेत हाच होता पुस्तिकेच्या लेखक द्वयांचे म्हणणे असे होते की, हिंदुस्तानांतील मुसलमानांना एक अल्पसंख्य राष्ट्र तसेच पाकिस्तान आणि बंगाल या दोन्हींचा समावेश असलेल्या एका मोठ्या राष्ट्राचा भाग म्हणून मान्यता मिळाली पाहिजे. त्यासाठी दिल्ली ( दिल्ली मीरत आणि रोहीलखंड विभाग आणि अलिगड जिल्हा ) आणि मलबार ( मलबार आणि मलबारच्या किनाऱ्यालगतचा टापू ) असे दोन स्वायत्त प्रांत हिंदुस्तानमध्येच निर्माण व्हावयास हवेत. हिंदुस्तानातील बरेचसे मुसलमान हे शहरातून राहात असल्यामुळे पन्नास हजारांच्यावर लोकसंख्या असलेली शहरे ही खुली शहरे म्हणून जाहीर करण्यात यावीत आणि त्यांना स्वतःचे पोलीस, न्यायखाते आणि स्वतंत्र कायदेमंडळ असावे अशीही त्यांची मागणी होती. त्याशिवाय हिंदुस्तानातील अल्पसंख्य मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सर्व पातळीवर स्वतंत्र मतदार संघ आणि प्रतिनिधित्व त्याचप्रमाणे मुस्लीम राजकीय नेते त्यावेळी ज्या संरक्षक तरतुदींची मागणी करीत होते त्याही त्यांना मिळाव्यात असे त्यांचे मत होते. शिवाय वऱ्हाड आणि कर्नाटक हे दोन प्रांत ब्रिटीशांनी केवळ प्रशासकीय व्यवस्थेसाठी निझामाकडून घेतले होते. त्यामुळे ते परत त्यांच्या स्वाधीन करण्यात आले तर हैद्राबादला

त्याचा समुद्र किनारा परत मिळेल व नवे सार्वभौम राज्य म्हणून ते अस्तित्वात येईल आणि मुस्लीम हिंदुस्तानचा दक्षिणेतील तो एक घटक बनू शकेल असे लेखकांनी या पुस्तिकेत म्हणून ठेवले होते.

आणखीही काही योजना पुढे आल्या होत्या. त्यापैकी वायव्य सरहद्द प्रांतातील जमीयत-उल-उलेमाचे मौलाना अबदुल वदूत यांची योजना अशी होती की, अफगाणिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत आणि या दोन्हीमधील टोळीवाल्यांचा मुलुख हे एकत्र करून त्यांचे एक राज्य बनवावयाचे. पंजाबमधील विद्यार्थ्यांची योजना तर मुसलमानांची बहुसंख्या असलेला सिंध, बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत आणि पंजाब, संयुक्त प्रांताचा काही भाग, मध्यप्रांत आणि वऱ्हाड, हैद्राबाद संस्थान आणि या भागाला बंगाल व आसामशी जोडणारा मधला विस्तीर्ण टापू हे सर्व मिळून पाकिस्तानची खिलाफत स्थापन करावयाची. या योजनाकारांच्या मते उत्तर हिंदुस्तानातील मुसलमानांचा त्यांच्या 'मातृभूमीवर' राज्य करण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे किंवा निराळ्या शद्वात सांगायचे तर ज्या विभागात त्यांचे वर्चस्व असेल त्या विभागावर राज्य करण्याचा हक्क फक्त त्यांचाच असला पाहिजे या नियोजित पाकिस्तान खिलाफतीचा प्रमुख हा धार्मिक सर्वाधिकारी असावा आणि कुराणाच्या आज्ञेनुसार त्याने राज्य चालवावे असेही त्या योजनाकारांना अभिप्रेत होते. अखिल भारतीय संघराज्याला पर्याय म्हणून या सर्व योजना पुढे आल्या होत्या.

१९३९ मधील ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात रशिया आणि जर्मनी यांच्यातील करारावर सह्या झाल्यानंतर आता युद्ध टळत नाही याविषयी कोणाच्या मनात शंका राहिली नाही. भारतातील सर्व थरांतून युद्ध प्रयत्नांना पाठिंबा मिळविण्याची सरकारने खटपट सुरू केली. त्यापूर्वी पंधरा दिवस आधी भरलेल्या काँग्रेस वर्कींग कमेटीच्या बैठकीत फॅसिस्ट आक्रमणाचा निषेध केला गेला होता. परंतु त्याचबरोबर मध्यवर्ती कायदेमंडळाने आपल्यापूर्व संमतीशिवाय भारतीय फौजा भारताबाहेर पाठवू नयेत असा ठराव केलेला असतानाही सरकारने त्या सिंगापूर आणि ईजिप्तला पाठविल्याबद्दल कमेटीने विरोध प्रदर्शित केला होता. तारीख २७ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या कौन्सिलच्या बैठकीत सर इब्राहीम करीमभाई यांनी असा ठराव मांडला होता की, ग्रेट ब्रिटन आणि काँग्रेस मुसलमानांच्या भावना दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे युद्ध सुरू झाल्यास मुसलमानांनी सरकारबरोबर सहकार्य करू नये. परंतु चर्चेनंतर करीमभाई यांच्या ठरावाऐवजी सर अबदुल्ला हसन यांनी मांडलेला पर्यायी ठराव एकमताने पास करण्यात आला. त्यात (१) मुसलमानावर संघराज्याची योजना लादून त्यायोगे त्यांच्याशी सतत वैर बाळगणाऱ्या बहुसंख्य जमातीला त्यांचे धार्मिक, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक हक्क पायदळी तुडविण्याचा सदर परवाना देण्याचे ब्रिटीश सरकारने चालविलेले प्रयत्न, (२) काँग्रेस शासित प्रांतातील अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी देण्यात आलेले खास अधिकार वापरण्याबाबत गव्हर्नरांनी

दाखविलेली अनास्था, आणि (३) पॅलेस्टाइनमधील अरबांच्या प्रश्नाकडे बघण्याचा ब्रिटिशांचा दृष्टीकोन याबद्दल नापसंती व्यक्त करण्यात आली होती. त्या ठरावात पुढे असे नमूद करण्यात आले होते की, मुस्लीम लीगच्या कौन्सिलने आपल्या परराष्ट्र विषयक समितीला मुस्लीम राष्ट्रांशी संपर्क साधून युद्ध उद्‌भवल्यास त्याबद्दल त्या राष्ट्रांची भूमिका काय राहील ते समजून घेण्याचे आदेश दिले असून, ती समजून येईपर्यंत युद्धासंबंधी भारतीय मुसलमानांनी कोणता दृष्टीकोन स्वीकारावा ते ठरविणे अकाली ठरेल. दुसऱ्या एका ठरावान्वये, मुस्लीम लीगच्या कौन्सिलची बैठक दोन दिवसानंतरच भरणार असल्याचे जाहीर झाले असताना सर सिकंदर हयात खान यांनी २५ ऑगस्ट रोजी ब्रिटीश सरकारला पाठिंबा जाहीर करून टाकावा याबद्दल कौन्सिलने खेद व्यक्त केला व सर सिकंदर यांचे ते मत व्यक्तिगत असून भारतीय मुसलमानांच्या दृष्टीकोन तसा नाही असे स्पष्ट केले.

युद्धाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्यानंतर, जनतेची संमती नसताना भारताला त्यात गोवल्याबद्दल काँग्रेसने सरकारचा निषेध केला. परंतु युद्धासंबंधी नेमकी कोणती भूमिक स्वीकारावयाची त्याबाबतचा निर्णय घेण्यास काँग्रेसला थोडासा विलंब लागला. युद्धाची घोषणा झाल्यानंतर दोन दिवसांनी जीनांनी लॉर्ड लिनलिथगो यांची भेट घेतली आणि मुसलमान समाजावर हिंदू आपले वर्चस्व गाजवतील अशी चिंता व्यक्त करून एकात्म लोकशाही हिंदुस्तानला पर्याय म्हणून देशाची फाळणी करावी अशी मागणी केली. यावरून हे स्पष्ट होते की, हिंदुस्तानातील ब्रिटीशांची सत्ता लवकरच संपुष्टात येणार हे त्यांनी हेरले होते. तारीख १४ सप्टेंबर रोजी काँग्रेस वर्किंग कमेटीने जर्मनीने पोलंडवर केलेल्या आक्रमणाचा निषेध करून पोलंडला पाठिंबा जाहीर केला. परंतु त्याच ठरावात ब्रिटीश सरकारने आपले युद्ध हेतू स्पष्ट करावेत आणि हिंदुस्तानच्या बाबतीत लोकशाही तत्त्वे ते कशी लागू करणार आहे ते निःसंदिग्धपणे जाहीर करावे अशी मागणी केली. त्या आधी तीन दिवस व्हाइसरॉयने संघराज्याची योजना तहकूब करण्यात आल्याची घोषणा मध्यवर्ती कायदेमंडळात केली होती. त्यामुळे लीगला हर्षोन्माद झाला होता. तारीख १८ सप्टेंबर रोजी भरलेल्या बैठकीत मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीने सरकारच्या या घोषणेची तारीफ केली. परंतु, संघराज्याची योजना सरकारने कायमची सोडून द्यावी आणि भारताच्या भावी राज्य-घटनेसंबंधी नव्याने आमूलाग्र विचार करावा असा तिने आग्रह धरला. लोकशाही पद्धतीमुळे आपल्याला राष्ट्रीय प्रवाहात सरकारात आणि प्रशासनात बहुसंख्य जमातींच्या बरोबरीने मानाचे स्थान मिळेल या मुसलमानांच्या आशांचा चक्काचूर झाला आहे, तसेच हिंदू समाज कायमचा बहुसंख्य बनून मुसलमानांवरील वर्चस्वात त्या पद्धतीची परिणती झाली आहे आणि मुसलमानांचे जीवित, प्रतिष्ठा आणि संपत्ती यांना धोका निर्माण झाला असून काँग्रेसच्या राजवटीत मुसलमानांचे धार्मिक हक्क आणि संस्कृती पायदळी तुडविली जात आहे या आपल्या जुन्याच तक्रारींचा कमेटीने

पुन्हा एकदा पाढा वाचला. (१) काँग्रेस शासित प्रांतातील मुसलमानांना न्यायाची आणि सद्भावनेची वागणूक मिळावी म्हणून गव्हर्नर आपले खास अधिकार बजावणार असतील आणि (२) भारतीय मुसलमानांच्या वतीने बोलण्याचा अधिकार असलेली एकमेव संस्था म्हणून मुस्लीम लीगची मान्यता आणि अनुमती घेतल्याशिवाय घटनात्मक सुधारणांच्या पुढल्या टप्प्यासंबंधी कोणतीही घोषणा केली जाणार नाही असे आश्वासन मिळणार असेल तर सरकारला युद्ध प्रयत्नांच्या बाबतीत लीगकडून संपूर्ण सहकार्य मिळेल असे वर्किंग कमेटीच्या या ठरावात म्हटले होते.

दरम्यान व्हाइसरॉयनी देशातील निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या ५२ पुढाऱ्यांच्या त्याचप्रमाणे संस्थानिकांच्या प्रतिनिधींच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी विचार विनिमय केला. तारीख १७ ऑक्टोबर रोजी त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यांत देशात राजकीय प्रश्नावर कशी मतभिन्नता आहे ते निदर्शनास आणून देण्यावर भर देण्यात आला होता. परिस्थिती इतकी अनिश्चित होऊन बसली आहे की, युद्ध चालविण्यामागील हेतूंचे अगदी तपशिलासह वर्णन करणे अशक्य आहे असा खुलासा करून व्हाइसरॉयनी त्या निवेदनात पुढे असे म्हटले की, हिंदुस्तानला वसाहतीचे स्वराज्य मिळावे म्हणून मदत करण्याचा ब्रिटीश सरकारचा निश्चय आहे. युद्ध समाप्तीनंतर हिंदुस्तानातील निरनिराळ्या जाती-जमाती, राजकीय पक्ष आणि संस्थानिकांसकट इतर हितसंबंधित यांच्या प्रतिनिधींचे राज्य घटनेत जरूर त्या सुधारणा घडवून आणण्यासाठी सहकार्य आणि साहाय्य मिळविण्याच्या दृष्टीने त्यांच्याबरोबर चर्चा करण्याची ब्रिटीश सरकारची तयारी आहे असे घोषित करण्याचे अधिकार मला देण्यात आले आहेत. युद्धप्रयत्नात भारतीय जनतेचे सहकार्य मिळविण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांनी सादर केलेल्या नावांच्या यादीतून व्हाइसरॉय एक सल्लागार मंडळ नियुक्त करील. दुसऱ्या दिवशी हाऊस ऑफ लॉर्डसमध्ये लॉर्ड झेटलंड यांनी अशाच तऱ्हेचे वक्तव्य केले. त्यांच्या निवेदनात एक महत्त्वाचे वाक्य होते आणि ते म्हणजे "हिंदुस्तानच्या राजकीय ऐक्याला घातक ठरणारे जाती-जातीतील वैमनस्य आम्हाला दूर करावयाचे आहे म्हणजेच निराळ्या शब्दात त्यांना असेच सांगावयाचे होते की, भारतीयांना जातीय प्रश्न सोडविता आला नाही तर देशाची फाळणी करावी लागेल.

व्हाइसरॉय आणि भारतमंत्री यांच्या निवेदनावर तारीख १७ आणि १८ ऑक्टोबर १९३९ रोजी अनुक्रमे काँग्रेस आणि लीग यांच्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. त्यावरून या दोन पक्षांच्या विचारसरणीत केवढी प्रचंड दरी पसरली होती ते स्पष्ट झाले. देशातील निरनिराळ्या राजकीय पक्षांची भूमिका आणि धोरणे यात कितीही जरी तफावत असली तरी ब्रिटीश सरकारचे हिंदुस्तानबाबतचे जे धोरण राहणार आहे त्याची सत्यता पडताळून पाहता यावी म्हणून ब्रिटीश सरकारने युद्धहेतू संबंधीची घोषणा करावी अशी काँग्रेसने मागणी केली होती. निरनिराळ्या बावन्न राजकीय पुढाऱ्यांबरोबर अलगअलग चर्चा करावी, त्यांच्या विचारसरणीतील तफावतीचा बागुलबुवा

करावा आणि नंतर मतभेदांची सबब पुढे करुन व्हाइसरॉयांनी युद्धहेतू संबंधीच्या घोषणेला बगल द्यावी याबद्दल काँग्रेसने तीव्र नापसंती व्यक्त केली होती. तारीख २२ ऑक्टोबरच्या वर्किंग कमेटीच्या ठरावात तारीख १७ ऑक्टोबरच्या निवेदनात व्हाइसरॉयनी अंतर्गत मतभेदाचा जो उल्लेख केला होता तो म्हणजे ग्रेट ब्रिटनच्या मनातील खरा हेतू लपविण्यासाठी पांघरलेला बुरखा होता असा स्पष्ट आरोप करण्यात आला होता.

तारीख ६ डिसेंबरला भारत मंत्र्यांना लिहिलेल्या एका गोपनीय पत्रात लॉर्ड लिनलिथगो यांनी स्वतःच अशी भूमिका मांडली होती की, इतर कशापेक्षाही 'हिंदुस्तानातील आपले आसन शाबूत ठेवणे' आपल्याला अधिक अगत्याचे वाटते. ब्रिटीशांचे हिंदुस्तानावरील वर्चस्व पुढेही असेच चालू रहावे हाच त्यांच्या मते १९३५ च्या कायद्याचा हेतू होता आणि त्यांच्या समजूतीप्रमाणे भारतीयांच्या हितासाठी घटनात्मक बदलाच्या प्रक्रियेला गती देणे हे मुळी ब्रिटीशांचे धोरणच नाही. तसेच उपकारबुद्धीने सत्तेची सूत्रे भारतीयांच्या हाती सोपविण्याचीही त्यांना घाई सुटलेली नाही.

काँग्रेसने ब्रिटीशांची ही खेळी बरोबर ओळखली होती आणि ग्रेट ब्रिटनच्या साम्राज्यशाही धोरणाला भारतातील राजकीय लोकमताचा पाठिंबा नाही हे दाखवून देण्यासाठी निरनिराळ्या प्रांतातील आपल्या मंत्रिमंडळांनी राजीनामे सादर करावेत असा आदेश वर्किंग कमेटीने दिला. त्याचप्रमाणे भारताची भावी राजकीय जडण घडण कशी असावी ते ठरविण्यासाठी प्रौढ मताधिकारावर आधारलेली घटना परिषद बोलाविण्यात यावी या मागणीचा तिने पुनरुच्चार केला. या उलट त्याचदिवशी मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीने व्हाइसरॉयच्या निवेदनातील काही भाग समाधानकारक असल्याचे जाहीर केले. आपण भारताचे प्रतिनिधित्व करतो हा काँग्रेसचा दावा व्हाइसरॉयच्या निवेदनामुळे फेटाळला जातो असा लीगने त्यांचा अर्थ लावला आणि मुस्लीम लीगला भारतीय मुसलमानांचे प्रतिनिधित्त्व करणारी एकमेव संघटना म्हणून ब्रिटीश सरकारने मान्यता दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला. भारताच्या भावी राज्य घटनेचा नव्याने आमूलाग्र विचार करावा या आपल्या मागणीचा पुनरूच्चार करून तिच्या संबंधीची कोणतीही योजना लीगची पसंती न घेता पुढे आली तर ती कधीही मान्य केली जाणार नाही असेही तिने बजावले. ब्रिटीश पार्लमेंटमधील मजूर पक्षाचे काही सभासद सरकारच्या भारत विषयक धोरणाबद्दल नाराज होते. त्यांनी भारताला ताबडतोब वसाहतीचे स्वराज्य देण्यात यावे अशी मागणी केली. तिच्यावर बोलताना सर सॅम्युअल होअर यांनी पुन्हा या महान उपखंडातील निरनिराळ्या जाती-जमाती आणि वर्ग यांच्यातील मतभेदांचे तुणतुणे वाजविले आणि जोपर्यंत भारतीय जनता हे मतभेद आपापसात मिटवीत नाही तो पर्यंत भारताला सुधारणांचा पुढचा हप्ता देता येणे अशक्य आहे ही ब्रिटीशांची ठाम भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तारीख १ नोव्हेंबर रोजी व्हाइसरॉयनी गांधी, राजेंद्र प्रसाद आणि जीना यांना

आपल्या भेटीसाठी बोलावून घेतले आणि कॉंग्रेसने जीनांच्या बरोबर समझोता घडवून आणला तर आपल्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलची वाढ करण्याची तयारी दर्शविली. लीगने देशाची फाळणी करण्याची मागणी करण्याचा निर्णय घेतला असल्याचे तारीख ५ सप्टेंबर रोजीच व्हाइसरॉयला कळविण्यात आले होते. तारीख १७ सप्टेंबर रोजी भरणाऱ्या कॉंग्रेस वर्किंग कमेटीच्या बैठकीस उपस्थित राहण्याचे निमंत्रण कॉंग्रेस अध्यक्षांनी जीनांना पाठविले होते. परंतु ते त्यांनी साफ धुडकावून लावले. कॉंग्रेसच्या घटना समितीच्या मागणीस आपला विरोध असल्याचे त्यांनी अनेकवार स्पष्ट केले होते. अशा परिस्थितीत जीनांबरोबर वाटाघाटी करणे ही निरर्थक उठाठेव ठरणार होती. व्हाइसरॉय यांच्या बरोबर झालेल्या मुलाखतीनंतर सरकार या वादात जातीय प्रश्न निष्कारण घुसडीत आहे अशी तक्रार करणारे राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना पत्र पाठवले होते. जीना-राजेंद्रप्रसाद बोलणी निष्फळ होणार हे ठरून गेल्यासारखेच होते.

कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिल्यानंतर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यासाठी गांधींच्यावर वाढते दडपण येऊ लागले. परंतु एक पत्रक काढून संयम पाळण्याचे त्यांनी जनतेला आवाहन केले आणि जोपर्यंत (१) व्हाइसरॉय समझोता घडवून आणण्याची शक्यता अजमावून पाहत आहेत, (२) मुस्लीम लीगकडून अडवणूक केली जात आहे, आणि (३) कॉंग्रेसमधील शिस्तभंगाला आळा बसत नाही तोपर्यंत सत्याग्रहाची चळवळ सुरू करता येणे शक्य नाही असे जाहीर केले. नेहरूंनी जीनां-बरोबर बोलणी करण्याचा आणखी एक प्रयत्न करून पाहिला. पण जीनांनी काही कालावधी मागून घेऊन तो उडवून लावला. दरम्यान गांधींनी तारीख १९ नोव्हेंबर रोजी आणखी एक पत्रक प्रसिद्ध करून असा खुलासा केला की, मुसलमानांचा आग्रह असेल तर संकल्पित घटना समितीवरील त्यांचे प्रतिनिधी राखीव मतदार संघातून निवडण्यास आपली हरकत असणार नाही. त्यानंतर चार दिवसांनी ब्रिटीश सरकार जोपर्यंत भारतीय जनतेचा स्वातंत्र्याचा आणि घटना समितीद्वारा राज्यघटना तयार करण्याचा हक्क मान्य करीत नाही, तोपर्यंत त्यांच्या बरोबर कोणताही करार होणे शक्य नाही या आपल्या भूमिकेचा कॉंग्रेस वर्किंग कमेटीने पुनरुच्चार केला. घटना समितीमार्फत आणि तेही ब्रिटीश साम्राज्यशाहीकडून हस्तक्षेप झाला नाही तरच जातीय प्रश्नावर तोडगा निघू शकेल हे गांधीजींनी पुन्हा एकदा स्पष्ट केले. तथापि नेहरूंच्या बरोबर बोलणी सुरू होण्यापूर्वीच २२ डिसेंबर हा दिवस कॉंग्रेस सरकारांच्या जोखडातून मुक्तता झाल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानण्याकरता सर्व मुसलमानांनी देशभर मुक्तिदिन म्हणून पाळावा असे आवाहन करून जीनांनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

मुस्लीम लीगने कॉंग्रेसवर केलेले आरोप सर्वस्वी निराधार आहेत असा दावा करून जीनांची तयारी असेल तर हे सर्व प्रकरण स्वतंत्रपणे न्यायालयीन चौकशी करण्यासाठी फेडरल कोर्टाचे सर-न्यायाधीश सर मॉरिस ग्वायर यांच्याकडे सोपविण्याची

तयारी राजेंद्रप्रसाद यांनी दर्शविली. काँग्रेसवर केल्या जाणाऱ्या आरोपांची चौकशी एकाद्या नि:पक्षपाती लवादाकडून करून घेण्याची सूचना जीना पुन:पुन्हा फेटाळून लावीत असल्यामुळे काँग्रेसच्या मुख्य मंत्र्यांनी आपापल्या प्रांताच्या गव्हर्नरांना या आरोपांची दखल घेण्यास सांगावे असा आदेश काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचा अध्यक्ष या नात्याने आपण दिला होता असे वल्लभभाई पटेल यांनी जाहीर केले आणि त्याच-प्रमाणे काँग्रेस मंत्रिमंडळावर करण्यात आलेले आरोप निराधार असल्याचे सर्व गव्हर्नरांनी स्पष्ट केले होते असे सांगून पटेलांनी आपल्या निवेदनात शेवटी असे म्हटले की, जातीय शांतता धोक्यात आणण्याच्या उद्देशानेच काँग्रेसवर असले बेछूट आरोप पुन्हा पुन्हा केले जात आहेत. मुक्ति दिन पाळण्याचा आदेश मागे घेण्याचे कळकळीचे आवाहन गांधींनी वर्तमानपत्रातून जीनांना केले. त्या पत्रकात त्यांनी असे म्हटले होते की, स्वत:च फिर्यादी आणि न्यायाधीश बनण्याची अजब जबाबदारी जीनांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे! एकीकडे सरकारला आरोपांची शहानिशा करण्यास जीना सांगत होते, तर दुसऱ्या बाजूला ते मुसलमान जनसमुदायाला असे आवाहन करीत होते की, जणू काही सर्व आरोप सिद्ध झाले आहेत असे मानून त्यातून आपली सोडवणूक केल्याबद्दल त्यांनी अल्लाचे आभार मानावे. या सर्वांवर जीनांचे प्रत्युत्तर असे होते की, काँग्रेसवरील आरोपांची चौकशी करण्याकरता रॉयल कमिशन नेम-ण्याची मागणी लीगने ब्रिटीश सरकारकडे केली असल्याने हे सारे प्रकरण आता व्हाइसरॉय आणि राजेसाहेबांचे सरकार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे. जीनांच्या या निवेदनाने काँग्रेस पुरतीच दिङ्मूढ होऊन गेली. काँग्रेस मंत्रिमंडळांनी आपले राजीनामे सादर केल्यानंतर जातीय तणाव कमी होईल आणि समझोत्याला अनुकूल असे वातावरण देशात निर्माण होईल अशी काँग्रेसची अपेक्षा होती. मुक्तिदिन पाळ-ण्याचा हेका जीना सोडीत नाहीत असे पाहिल्यावर जातीय प्रश्नावर बोलणी करण्या-साठी आपल्यात समान भूमिका तरी कोणती आहे असे नेहरूंनी त्यांना विचारले. त्यावर जीनांनी तात्काळ असे उत्तर दिले की मुस्लीम लीग ही मुसलमानांची एकमेव अधिकृत आणि प्रातिनिधिक संस्था आहे हे काँग्रेस मान्य करीत नाही, त्याचप्रमाणे लीगला काँग्रेसची घटना समितीची आणि युद्ध हेतू जाहीर करण्याची मागणी मान्य नाही, त्यामुळे काँग्रेसबरोबर बोलणी करायला तरी कसलाही पाया उरत नाही. जातीय प्रश्न डावलण्यासाठीच काँग्रेसने घटना समितीची मागणी पुढे केली आहे.

डॉ. शफात अहमद खान आणि सर सिकंदर हयात खान यांनी असा आरोप आपल्या पत्रकातून केला.

१९३९ च्या संबंध वर्षभर हिंदू महासभेच्या प्रचाराला जोर चढला होता. १९ जुलै रोजी निझामाने आपली नवी राज्य घटना घोषित केली. या घटनेनुसार त्याच्या हाती या संस्थानातील सर्व सत्ता राहणार होती. आणि जनतेच्या सार्वभौम सत्तेचे प्रतिकही

निझामच राहणार होता. या घटनेनुसार ३३ टक्के सरकार नियुक्त प्रतिनिधी असलेल्या कायदेमंडळाची तरतूद करण्यात आली होती. मात्र उरलेल्या सभासदांच्या निवडणुकीसाठी नेहमीच्या भौगोलिक मतदार संघाऐवजी आर्थिक निकषानुसार आधारलेले मतदार संघ बनविण्यात येणार होते. हिंदू आणि मुसलमान यांना समान प्रतिनिधित्व देण्यात आले होते. निझामाच्या या घोषणेनंतर थोड्याच दिवसांनी हिंदू महासभेच्या वर्किंग कमेटीने सत्याग्रह स्थगित करण्यात येत असल्याचे जाहीर केले आणि पकडलेल्या आपल्या सर्व स्वयंसेवकांच्या सुटकेची मागणी केली. त्याचप्रमाणे भोपाळ आणि रामपूरचा मुसलमानी संस्थानातील हिंदूंच्या तक्रारीची दखल घेण्यासाठी एक समिती तिने नियुक्त केली. केंद्रात जबाबदार सरकारची स्थापना, जातीय निवाड्यासंबंधी फेरविचार, जातीजातीत लष्करी आणि बिनलष्करी असा भेदभाव करण्यास विरोध आणि युद्ध प्रयत्नांत भारतीय जनतेकडून प्रभावी सहकार्य मिळावे म्हणून लष्कराचे संपूर्ण भारतीयीकरण इ. मागण्याही तिच्याकडून करण्यात आल्या. कोणत्याही आक्रमणापासून देशाचे रक्षण करणे ही ब्रिटीश सरकार इतकीच भारतीय जनतेच्या ही जिव्हाळ्याची बाब आहे, असे तिच्या ठरावात म्हटले होते. त्या वर्षाच्या अखेरीस कलकत्ता येथे भरलेल्या हिंदू महासभेच्या वार्षिक अधिवेशनात भारतीय संघराज्याला पर्याय म्हणून ज्या विविध योजना मांडल्या गेल्या होत्या त्या सर्वांचा अत्यंत कडक शब्दात निषेध करण्यात आला. या अधिवेशनात सावरकरांनी जुन्या मुद्यांची उजळणी करून काही नवे मुद्देही मांडले. उदाहरणार्थ त्यांनी आपल्या भाषणात हिंदुस्तान ही आपली पितृभूमि आणि धर्म भूमि आहे असे जो मानतो तो हिंदू अशी व्याख्या केली, त्यामुळे मुसलमान, ख्रिश्चन, ज्यू इतकेच नव्हे तर पारशीही या व्याख्येतून वगळले गेले. त्याचा असा अर्थ झाला की हिंदूच्यां बरोबरीने नागरिकत्वाचे हक्क मिळण्यास ते पात्र ठरत नाहीत. हिंदूंचे लष्करी दल स्थापन करण्याची शिफारस करणारा ठरावही या अधिवेशनात संमत करण्यात आला, तसेच युवकांना लष्करात भरती होण्याचे आवाहन करण्यात आले आणि सर्व शैक्षणिक संस्थांतून लष्करी शिक्षण सक्तीचे करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

त्यानंतर तारीख १० जानेवारी १९४० रोजी मुंबई येथे भरलेल्या महासभेच्या बैठकीत व्हाइसरॉयच्या निवेदनात भारताला वसाहतीचे स्वराज्य त्वरीत देण्याचा ब्रिटीश सरकारचा निर्णय सूचित होत असल्याचे मत व्यक्त करून त्या निवेदनाचे स्वागत करण्यात आले, त्यानंतर हिंदू महासभेला सरकारशी संघर्ष करण्याचे काही कारणच उरले नाही.

नॅशनल लिबरल फेडरेशन आणि अखिल भारतीय ख्रिश्चन कॉन्फरन्स यांची वार्षिक अधिवेशनेही १९३९ डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात भरली होती. दोन्ही अधिवेशनाच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणातून जातीय प्रश्नाचा अर्थातच उल्लेख

केला होता. फेडरेशनच्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. परांजपे यांनी काँग्रेस आणि लीग या दोन्ही संघटनात एकाधिकारशाही वृत्ती झपाट्याने वाढत चालली आहे असे सांगून त्याबद्दल त्यांना दोषी धरले. कायदेमंडळांना जबाबदार राहाण्याऐवजी काँग्रेस मंत्री आपल्या पक्ष श्रेष्ठींची बांधिलकी पत्करतात. त्याचप्रमाणे लीगकडून जीनांचा शद्ब हा कायद्याप्रमाणे प्रमाण मानला जात असून जीना देखील आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेतल्यावाचून स्वतःच सर्व निर्णय घेऊ लागले आहेत. असे त्यांनी दाखवून दिले. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, यांसारख्या क्षुल्लक प्रश्नावर रणे माजवीत बसल्याबद्दल त्यांनी काँग्रेस आणि लीग या दोघांवरही हल्ला चढवला. भारतातील यच्चयावत सर्व जनतेचे आपण प्रतिनिधीत्त्व करतो हा काँग्रेसचा दावा, त्याचप्रमाणे सर्व मुसलमानांची लीग ही एकमेव अधिकृत आणि प्रातिनिधीक संघटना आहे हा लीगचा दावा सारखाच आचरटपणाचा आहे असे सांगून डॉ. परांजपे यांनी त्याची टर उडविली. जातीय दंगलींना कारणीभूत होणारे, मशीदीसमोर वाद्ये वाजविण्या-सारखे प्रश्न न सोडविल्याबद्दल डॉ. परांजपे यांनी पुढाऱ्यांना दूषण दिले. त्यांच्या मते हिंदू-मुसलमानांत तेढ निर्माण होण्याचे मुख्य कारण प्रांताप्रांतातील संयुक्त मंत्रि-मंडळे हेच होते. दोन्ही संघटनांनी एकांतिक भूमिका घेतल्याबद्दल त्यांनी दोघांनाही दोष दिला. काँग्रेस आणि लीग या दोन्ही संघटनांनी व्यापक असा राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम आखून संयुक्त मंत्रिमंडळे बनवावीत व अशा संयुक्त मंत्रिमंडळांच्या बाबतीत सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वाला थोडी मुरड घालावी, तसेच पक्षाची 'व्हीप' जारी करण्याची पद्धत रद्द करण्यात येऊन कायदेमंडळांतील प्रत्येक सभासदाला विवाद्य प्रश्नावर आपल्या मर्जीनुसार मतदान करण्याची मोकळीक देण्यात यावी असे त्यांनी सुचविले.

अखिल भारतीय ख्रिश्चन कॉन्फरन्सच्या अधिवेशनात प्रो. एच. सी. मुकर्जी यांनी अनेक प्रश्नांवर मुसलमान पुढारी अयोग्य आणि असमंजसपणाची भूमिका कशी घेत आले आहेत आणि इतर जमातींना जाचक ठरणार असली तरीही मुसलमानांच्या बाबतीत पक्षपाती भूमिका स्वीकारून ब्रिटीश सरकार त्यांना कसे उत्तेजन देत आहे याचा आपल्या भाषणात आढावा घेतला. ते पुढे म्हणाले :—

जातीय प्रश्नाचा निष्कारण बागुलबुवा केला जात आहे, त्याचप्रमाणे जोपर्यंत इंडियन नॅशनल काँग्रेस आणि ब्रिटीश सरकार हे मुस्लीम लीगकडे जाऊन सहकार्या-साठी तिची मनधरणी करीत राहतील तोपर्यंत हा प्रश्न कधीही सुटणार नाही. जोपर्यंत बहुसंख्य जमात, ब्रिटीश सरकार आणि हिंदुस्तानची राज्य घटना संघराज्या-त्मक असावी अशा मताचे इतर लोक हे एकत्र येऊन मुस्लीम बांधवांसकट सर्व सामाजिक आणि धार्मिक गटांना त्यांच्या न्याय हक्कांची हमी असलेली राज्य घटना तयार करण्याच्या कामास जारीने सुरुवात करणार नाहीत तोपर्यंत या प्रश्नाची तड लागणार नाही असे माझे मत आहे.

या तीनही पक्षांनी घेतलेल्या भूमिकेचा वस्तुस्थितीशी कसलाच मेळ बसत नव्हता आणि त्याचे कारण एकच की घटना अत्यंत वेगाने घडत होत्या आणि त्यांच्याशी जुळवून घेणे त्यापैकी कोणत्याच पक्षाला जमण्यासारखे नव्हते. तारीख ४ आणि ७ नोव्हेंबर १९३९ रोजी जीनांच्या व्हाइसरॉयबरोबर स्वतंत्रपणे भेटी झाल्या. त्याचप्रमाणे त्यांच्यात अनेक पत्रांची देवाण-घेवाणही झाली. जीनांनी पुढील दोन मागण्यांचा आग्रह धरला होता. (१) हिंदू आणि मुसलमान प्रतिनिधींची पसंती आणि मान्यता असल्याशिवाय ब्रिटीश सरकारने कोणतेही निवेदन प्रसिद्ध करू नये, आणि (२) मुस्लीम लीगची पसंती आणि अनुमती असल्याशिवाय ब्रिटीश सरकारने कोणतीही घटना तयार करू नये किंवा घटनेच्या पुढील टप्प्यासंबंधी कोणतेही निवेदन करू नये. जीनांना पाठवलेल्या उत्तरात व्हाइसरॉय यांनी असे म्हटले होते की, या मागण्यांमुळे इतर जमातींवर परिणाम घडवून आणणारे प्रश्न उद्भवतील तथापि त्यांनी एवढे आश्वासन दिले की भारताच्या भावी घटनात्मक विकासाचा विचार करताना सरकार मुसलमान समाजाच्या दृष्टीकोनाची जरूर दखल घेईल. त्या वर्षाच्या अखेरीला हरिजनाच्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातील अंकात जो लेख प्रसिद्ध होणार होता त्याची प्रत गांधींनी जीनांच्याकडे अवलोकनार्थ पाठवली. गांधींना तारीख १ जानेवारी १९४० रोजी पाठवलेल्या उत्तरात जीनांनी असे कळविले की,

"तुमचा सगळा युक्तिवाद चुकीच्या गृहीत कृत्यांवर आधारलेला आहे कारण भारत हे एक राष्ट्र आहे असा सिद्धांत तुम्ही धरून चालला आहात परंतु मुळात तेच खरे नाही. त्यामुळे साहजिकच त्यावरून तुम्ही पुढे जे निष्कर्ष काढले आहेत तेही चुकीचे आहेत.... तुम्ही आपल्या लेखात जे लिहिले आहे ते तुम्ही शेगावात एकाकीपणाने राहता आणि आपले सर्व निर्णय आपल्या आवाजानुसार घेता याचाही परिणाम असेल."

३ फेब्रुवारी १९४० पासून मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीची बैठक सतत चार दिवस चालू होती. जीनांनी व्हाइसरॉयबरोबर झालेल्या चर्चेचा वृत्तांत सादर केल्यानंतर वर्किंग कमेटीने लीगच्या तारीख १८ सप्टेंबर आणि तारीख २२ ऑक्टोबर १९३९ च्या ठरावाद्वारे सरकारकडून जी आश्वासने मागितली होती त्यासंबंधी व्हाइसरॉयने पुन्हा एकदा विचार करावा असे त्यास कळविले. त्याचप्रमाणे पंजाब आणि बंगाल प्रांताचे पंतप्रधान, नझीमुद्दिन (बंगालचे गृहमंत्री) आणि चौधरी खलिकुझमान यांचा समावेश असलेले एक शिष्टमंडळ, भारतीय मुसलमानांची बाजू तिकडील जनता, पार्लमेंट आणि ब्रिटीश सरकार यांना पटवून देण्यासाठी इंग्लंडला धाडण्याचा निर्णयही त्या बैठकीत घेण्यात आला. खलिकुझमान यांनी आपल्या पुस्तकात असे नमूद करून ठेवले आहे की, बैठक चालू असतानाच, पंजाब आणि बंगालच्या पंतप्रधानांनीं व्हाइसरॉयची भेट घेतली असता लिनलिथगो यांनी त्यांना असे सांगितले की मी तर लीगकरिता माझ्याकडून होईल तेवढे सर्व करीतच आहे. तरी देखील

लीगची बाजू मांडण्यासाठी एकादे शिष्टमंडळ ब्रिटीश पंतप्रधान आणि भारतमंत्री यांच्या भेटीला पाठवावे हे चांगले, चार दिवसांच्या आपल्या प्रदीर्घ बैठकीत लीगच्या वर्किंग कमेटीने अखिल भारतीय संघराज्याला पर्यायी अशा अनेक योजनांवर विचार केला. खलिकुझमान यांनी असे नमूद केले आहे की, बैठकीच्या दुसऱ्याच दिवशी वायव्य भागातील मुस्लीम विभाग आणि पूर्वेकडील बंगाल आणि आसाम देशाच्या इतर भागापासून अलग करून हिंदुस्तानची फाळणी करण्याची आपली सूचना जीनांनी मान्य केली होती. पंजाबचे मुख्यमंत्री सर सिकंदर हयात खान यांनी सुचविलेल्या विस्कळीत संघराज्यापेक्षा त्यांना ही योजना अधिक पसंत पडली होती. खलिकुझमान पुढे असेही सांगतात की, तारीख ६ फेब्रुवारी रोजी जीनांनी व्हाइसरॉयला असे सांगितले होते की, लाहोरला होणाऱ्या मुस्लीम लीगच्या आगामी अधिवेशनात देशाची फाळणी करण्याची मागणी करण्यात येणार आहे. त्यावेळची युद्ध परिस्थिती ग्रेट ब्रिटनच्या आणि दोस्तांच्या दृष्टीने फारशी अनुकूल नसल्याने भारत मंत्र्यांनी काँग्रेस बरोबर तडजोड घडवून आणण्याचा लकडा व्हाइसरॉयकडे लावला होता. पुढच्याच महिन्यात लाहोर येथे होणाऱ्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात फाळणीच्या मागणीचा बाँब गोळा टाकण्यात येणार आहे असे समजल्यामुळे तारीख २२ फेब्रुवारी रोजी भारत मंत्र्यांना लिनलिथगो यांनी असे कळविले की, काँग्रेसच्या मागण्या मंजूर करण्याची जरूर नाही. परदेशात त्यामुळे आपल्याविषयी कदाचित गैरसमज पसरतील किंवा पार्लमेंटला तोंड देणे अवघड जाईल. पण तो धोका पत्करूनही काँग्रेसच्या मागण्यांना नकार द्यावा असे मत व्यक्त करून त्यांनी पुढे असे सुचविले की परिस्थिती कसे वळण घेते त्याची जरा वाट पहावी.

१३ फेब्रुवारी १९४० च्या 'टाइम अँड टाइड' या नियतकालिकाच्या अंकात जीनांचा एक प्रदीर्घ लेख प्रसिद्ध झाला होता. लेखाचा मथळा 'पाश्चात्य लोकशाही हिंदुस्तानला गैरसोयीची' असा होता. भारतातील विद्यमान राज्यपद्धती आणि संपूर्ण वासाहतिक दर्जा यामधील कालावधी कमी करण्याचा ब्रिटीश सरकारचा जास्तीत जास्त प्रयत्न राहील असे जे व्हाइसरॉयने आपल्या निवेदनात म्हटले होते त्याबद्दल सुरुवातीलाच जीनांनी त्यांना धारेवर धरले होते. व्हाइसरॉयचे निवेदन सदोष आहे असे प्रतिपादन करताना जीनांनी असे लिहिले होते की, भारतीय परिस्थिती संबंधीच्या संपूर्ण अज्ञानावर ते निवेदन आधारलेले आहे. भारतातील परिस्थिती आणि आपल्या स्वतःच्या देशातील परिस्थिती यामधील तफावत ब्रिटीश मुत्सद्दी लक्षात का घेत नाहीत याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. जीनांनी त्यांना असा सल्ला दिला की, भारता-संबंधी आजपावेतो त्यांनी जी समजूत करून घेतली आहे ती पार विसरून जावी आणि घटनात्मक सुधारणासंबंधी संयुक्त चिकित्सा समितीने आपल्या १९३३-३४ सालच्या अहवालाच्या पहिल्याच परिच्छेदात जे लिहून ठेवले आहे त्या अनुरोधाने भारतीय परिस्थितीचे त्यांनी नव्याने आकलन करून घ्यावे. जीनांनी आपल्या लेखात

उदधृत केलेला तो परिच्छेद खालीलप्रमाणे होता :—

हिंदुस्तानातील रहिवासी भिन्न भिन्न वंशाचे असून त्यांचे मूळ, त्यांची परंपरा आणि जीवन पद्धती यांबाबतीत ते युरोपातील राष्ट्रांइतकेच परस्परापासून भिन्न आहेत. तेथील दोन-तृतीयांश लोक आपण हिंदू धर्मातील या ना त्या पंथाचे असल्याचे सांगतात. ७७ दशलक्षाहून अधिक लोक इस्लाम धर्मीय आहेत. आणि या दोघांतील फरक केवळ धर्माचाच आहे असे नाही तर त्यांचे कायदेकानू आणि संस्कृती ही देखील अगदी वेगवेगळी आहे. असेही म्हणता येईल की, दोन अगदी भिन्नभिन्न अशा संस्कृतीचे ते घटक आहेत. जाती संस्था हे हिंदुत्वाचे वैशिष्टच असून तिच्यावर हिंदूंचा धर्म आणि समाजपद्धती आधारलेली आहे. आणि काही मर्यादित क्षेत्र वगळता पाश्चात्य तवज्ञानाच्या संपर्कानेही सर्वसाधारणपणे त्यात फरक पडलेला नाही. या उलट मानवातील समानतेच्या संकल्पनेवर इस्लाम धर्माची उभारणी झालेली आहे.

चिकित्सा समितीने भारतातील दोन स्वतंत्र राष्ट्रांचे अस्तित्व मान्य केले असताना ब्रिटीश सरकारने हिंदुस्तानावर पाश्चात्य पद्धतीची लोकशाही लादण्याचा प्रयत्न करावा हे विचित्र म्हटले पाहिजे असे सांगून जीनांनी पुढे म्हटले होते की, ग्रेट ब्रिटन सारख्या एकात्म देशात संसदीय पद्धतीचा अवलंब करता येण्यासारखा असला तरी भारतासारख्या विविध जाती असलेल्या देशाला ती लागू पडणारी नाही. त्या लेखाचा उत्तर भाग कॉंग्रेस मंत्रिमंडळावरील आपल्या नेहमीच्या आरोपांचा पाढा वाचण्यात जीनांनी खर्च केला होता. त्याचप्रमाणे लीगने वेळोवेळी केलेल्या मागण्यांचाही त्यात पुनरुच्चार होता. त्यानंतर पाच दिवसांनी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत हिंदुस्तान हे एक राष्ट्र नसून दोन राष्ट्रे आहेत ही वस्तुस्थिती मान्य करूनच घटनेसंबंधीचा करार होऊ शकतो अशी घोषणा करून जीनांनी पुढे बजावले की, भारतीय मुसलमान हिंदूंना किंवा ब्रिटीशांना आपणासंबंधी कोणताही निर्णय घेऊ देणार नाहीत तर आपले भवितव्य ते स्वतःच ठरवतील.

फेब्रुवारी २५ रोजी भरलेल्या लीग कौन्सिलच्या बैठकीत राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन जीनांनी अशी घोषणा केली की, लीग ब्रिटीशांना किंवा गांधींना मुसलमानांवर कधीही सत्ता गाजवू देणार नाही. लीगचा तसा निर्धार आहे. लीगने कॉंग्रेसबरोबर समझोता घडवून आणावा अशी मुसलमानांतील सुशिक्षित तरुणांची भावना आहे असे सर राझा अली यांनी बैठकीस उद्‌गार काढले. त्यावेळी जीना आणि राजा ऑफ पिरपूर त्यांच्यावर तुटून पडले. मुस्लीम युवकाच्या मनात कसे काही नसून सर राजा अलीच्या मनाचेच हे सारे खेळ आहेत असे त्या दोघांनी त्यांना ऐकविले. या बैठकीच्या वेळी प्रथमच जीनांनी आपण कॉंग्रेसबरोबर समझोता घडवून आणण्याच्या विरूद्ध असल्याची स्पष्ट कबुली दिली. भारताला लवकरच वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल असे आश्वासन देणारे जे भाषण व्हाइसरॉयनी

मुंबईत केले होते त्याबद्दल बैठकीत नापसंती व्यक्त करण्यात आली आणि मुस्लीम लीगने काँग्रेस मंत्रिमंडळाविरूद्ध केलेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी रॉयल कमिशनची नेमणूक करण्यास ब्रिटीश सरकारने नकार दिल्याबद्दल तीव्र असंतोष प्रकट करण्यात आला.

१९४० च्या सुरूवातीला चौधरी रहमत अली यांनी बंगाल आणि आसाम यांचा समावेश असलेला सार्वभौम बंग-इ-इस्लाम स्थापन करण्याची आपली योजना प्रसिद्ध केली. त्यामुळे त्या भागातील बिगर मुसलमानात कमालीचा असंतोष पसरला. त्यातच आसाम इस्लाम मिशन सोसायटीचे चिटणीस यांनी ३० मार्च रोजी भरलेल्या त्यांच्या सोसायटीच्या विशेष सर्वसाधारण सभेत असे जाहीर केले की, 'मला राजकारणात चबढब करावयाची नाही परंतु माझा असा विश्वास आहे की आपल्या इतर मुस्लीम संघटना जे करू शकत नाहीत ते इस्लाम मिशन उघडपणे आणि शांततेच्या व सनदशीर मार्गाने करून दाखवू शकते. इस्लाम मिशन काही थोड्या वर्षांच्या कालावधीत अल्पसंख्यांकांचे रूपांतर प्रचंड बहुसंख्यांकांत करू शकेल. त्यामुळे आसाममधील आजचा गोंधळात टाकणारा प्रश्न चुटकीसरसा सोडविता येईल. या वक्तव्यामुळे तर असंतोषात आणखीनच भर पडली. बंगालमधून ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यात जाणाऱ्या मुसलमानांचा लोंढा काही एका मर्यादेच्या पुढे जाऊ न देण्याची आसाम सरकारची जी पद्धत त्यावेळी अस्तित्वात होती तिचाही त्यांनी निषेध केला. आसाम सरहद्दीच्या बाहेरून येणाऱ्या स्थलांतरितांच्या लोंढ्यामुळे आपण अल्पसंख्य बनू अशा भीतीने ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यातील मूळच्या रहिवाशांनी आंदोलन सुरू केल्यामुळे आसाम सरकारने स्थलांतरावरही बंदी घातली होती.

१९ मार्च १९४० ला काँग्रेसचे रामगड अधिवेशन सुरू होणार होते. परंतु त्यावेळेपर्यंत काँग्रेस पुढाऱ्यांना २३ मार्चला मुस्लीम लीगच्या लाहोर अधिवेशनात काय घडणार त्याची दु:खद चाहूल लागलेली होती. रामपूर अधिवेशनाचे अध्यक्ष मौलाना आझाद यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जातीय प्रश्नांसंबंधी विस्ताराने ऊहापोह केला होता. फोडा आणि झोडा या धोरणाचा अवलंब केल्याबद्दल आणि आपले आसन मजबूत करण्यासाठी अंतर्गत मतभेदांचे अवडंबर माजविल्याबद्दल त्यांनी ब्रिटीशांना दोष दिला. "काँग्रेसच्या संबंध इतिहासात जातीय प्रश्नाची तिने कधी उपेक्षा केलेली नाही. काँग्रेसचे धोरण दोन तत्त्वावर आधारलेले असते. भारताच्या भावी राज्यघटनेत अल्पसंख्यांकांना त्यांचे हक्क आणि हितसंबंध याबद्दल संपूर्ण हमी आणि आपल्याला कशा स्वरूपाचे संरक्षक अधिकार हवेत ते त्यांचे त्यांनाच ठरवू देणे. लोकशाही हिंदुस्तानात आपले हक्क आणि हितसंबंध सुरक्षित राहणार नाहीत अशी अल्पसंख्यांकांनी भीती बाळगावी हे विचित्रच म्हटले पाहिजे. भारतीय मुसलमान हे एकूण लोकसंख्येच्या फक्त २५ टक्केच असले तरी राजकीय दृष्ट्या ते अल्पसंख्य आहेत असे मानणे चूक आहे. त्यांची संख्या जवळपास ८० ते ९० दशलक्ष

आहे आणि इतर जमातींच्या मानाने ते अधिक एकसंघ आणि सामर्थ्यवान आहेत. इतक्या मोठ्या मानव समूहाला स्वतंत्र आणि लोकशाही हिंदुस्तानात आपले स्वतःचे हक्क आणि हितसंबंध यांचे रक्षण करता येणार नाही अशी भीती बाळगण्याचे काय कारण? अखिल भारतीय संघराज्याची राज्यघटना कोणतीही जरी असली तरी त्यात प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता बहाल करण्यात आलेली असेल आणि परराष्ट्र संबंध, संरक्षण, जकाती, यासारख्या अखिल भारतीय स्वरूपाच्या बाबीच तेवढ्या केंद्राच्या अखत्यारित ठेवण्यात येतील, अशा प्रकारची राज्य घटना असली म्हणजे बहुसंख्य अल्पसंख्य असल्या प्रश्नांना कसले स्थानच उरणार नाही. प्राचीन काळापासूनच भारत हे नाना वंशाच्या लोकांचे आणि संस्कृतीचे निधान बनून गेले आहे. निरनिराळे प्रवाह त्याठिकाणी काही काळ वेगवेगळ्या मार्गाने जात राहिले आणि नंतर निसर्ग नियमानुसार ते एका महान प्रवाहात मिसळून याच्याशी एकजीव होऊन गेले. शतकानुशतकांच्या समान इतिहासामुळे इस्लामी जीवनपद्धतीचा येथील भाषा, काव्य, वाङ्मय, संस्कृती, कला, वेषभूषा, चालीरीती आणि दैनंदिन जीवन यावर ठसा उमटला आहे. यातून समान भाषा, समान रीति रिवाज आणि समान रूढी यांचा मिलाफ घडून आला. मी भारतीय आहे याचा मला अभिमान वाटतो. भारताच्या अविभाज्य ऐक्याचा म्हणजेच भारतीय राष्ट्रीयत्त्वाचा मी एक घटक आहे. या महान मंदिरातील माझे स्थान अत्यावश्यक असून माझ्यावाचून त्याची बांधणी पूर्ण होऊ शकणार नाही. ज्यायोगे भारताची उभारणी झाली त्यात माझे स्थान अढळ आहे. माझा हा दावा मी कधीही सोडणार नाही". परंतु भावनांनी ओथंबलेल्या आझादांच्या या भाषणाचा पाकिस्तानच्या उत्साही पुरस्कर्त्यांवर काडीमात्रही परिणाम घडून आला नाही.

तारीख २२ मार्च १९४० पासून तीन दिवसपर्यंत लाहोर येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनास एक लाखांवर मुसलमान उपस्थित होते. अधिवेशनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष मभदोतचे नबाब सर महंमद शहा नवाझ खान यांनी एक वर्षापूर्वी हिंदुस्तानचे महासंघराज्य निर्माण करावे अशी योजना मांडली होती आणि हिंदू जोपर्यंत देशाची फाळणी मुसलमानांवर लादीत नाहीत तोपर्यंत त्यांनी फाळणीचा विचारही करू नये असे आवाहन केले होते. परंतु आपल्या स्वागताध्यक्षीय लेखी भाषणात त्यांनी असे दाखवून दिले की, आपण आता संपूर्ण बदललो आहोत, त्यांनी असे घोषित केले की, मुसलमान धर्म, संस्कृती, इत्यादी या सर्वच बाबतीत भिन्न असलेल्या जमातीच्या दास्यात राहावयास कधीच तयार होणार नाहीत. कॉंग्रेसने राखीव मतदार संघाना मान्यता देण्याचे नाकारल्यामुळे जातीय समझोता घडवून आणण्याचे निदान पंचवीस तरी प्रयत्न आजवर निष्फळ ठरलेले आहेत. अखेर कॉंग्रेसने ज्यावेळी त्यांना मान्यता दिली त्यावेळी त्यांना असे स्वरूप देण्यात आले होते की त्यामुळे मुसलमानांना स्वतःचे निराळे अस्तित्त्व आणि स्वातंत्र्य राखता येण्याची शक्यता उरलेली नव्हती. ब्रिटीश हिंदुस्तान सोडून गेल्यानंतर मुसलमानांवर कॉंग्रेसचे वर्चस्व लादले जाणार हे

स्पष्ट दिसत असतानाही काँग्रेसची बाजू घेऊन तिने चालविलेल्या लढ्यात सहभागी होणाऱ्या राष्ट्रीय मुसलमानांवर सर महंमद शहा यांनी. कडाडून हल्ला चढविला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात जीनांनी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला :—

हिंदुस्तानातील समस्या ही जातीय स्वरूपाची आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. ती वस्तुतः आंतर-राष्ट्रीय स्वरूपाची आहे आणि त्या दृष्टीकोनातूनच ती सोडविली पाहिजे ही मूलभूत वस्तुस्थिती लक्षात न घेता बनविण्यात आलेली कोणतीही घटना विनाशाला कारणीभूत झाल्याशिवाय राहणार नाही, हिंदू आणि मुसलमान यांची समाजपद्धती सर्वस्वी भिन्न असून ते समान राष्ट्रीयत्त्व कधीही विकसित करू शकणार नाहीत. त्यांची धार्मिक विचारसरणी, सामाजिक रितीरिवाज आणि त्यांचे वाङ्मय हे सारेच अगदी निराळे आहे. त्यांची संस्कृती वेगळी आहे. त्याचप्रमाणे इतिहासातील त्यांची स्फूर्तिस्थानेही निरनिराळी आहेत. त्यांची महाकाव्ये वेगवेगळी आहेत. इतकेच नव्हे तर अनेकदा एकाला जो महापुरुष वाटतो तो दुसऱ्याला आपला शत्रू वाटतो. बाल्कन द्वीपसंघातील लहान लहान देशाची देखील तेथील रहिवाशांच्या राष्ट्रीयत्त्वानुसार झेकोस्लोव्हाकियासारख्या अनेक राष्ट्रात विभागणी करण्यात आली आहे, ब्रिटीशांच्या आक्रमणामुळे हिंदु-मुसलमानांचे कृत्रिम ऐक्य घडून आले आणि ब्रिटीशांच्या वागनेटामुळे ते टिकून राहिले. सरकार बहुसंख्य हिंदूचे बनणार असेल तर अशी राज्य घटना मुस्लीम हिंदुस्तान कधीच मान्य करणार नाही. मुसलमान हे अल्पसंख्य नाहीत तर ते एक राष्ट्र आहेत आणि त्यांना स्वतःचा देश, स्वतःचा मुलुख आणि स्वतःचे राज्य असले पाहिजे. या उपखंडात शांतता आणि सौख्य नांदावे असे ब्रिटीश सरकारला खरोखरीच वाटत असेल तर त्याला एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे हिंदुस्तानची दोन स्वायत्त राष्ट्रात विभागणी करून त्यांना स्वतंत्र भूभाग वाटून देणे.

फाळणी संबंधीचा ठराव मांडताना फजलूल हक यांनी काँग्रेसच्या रामगड अधिवेशनात इस्लाम धर्माला न शोभणारे भाषण केल्याबद्दल मौलाना अबुल कलाम आझाद यांचा निषेध केला. भारतातील मुसलमानांची संख्या ८० दक्षलक्षाहून अधिक असली तरी ती इतकी विखुरलेली आहे की, त्यांची परिस्थिती अत्यंत कुमकुवत असून त्यांना इतरांच्या दयेवर अवलंबून रहावे लागते. या कारणास्तव त्यांनी फाळणीचे समर्थन केले.

बहुतेक सर्व प्रांतातील प्रतिनिधींनी ठरावाला पाठिंबा देणारी भाषणे केली. ठरावाला अनुमोदन देताना खलिकुझमा यांनी मुस्लीम लीगला फाळणीची मागणी करण्यास भाग पाडल्याबद्दल ब्रिटीश सरकार, काँग्रेस, बहुसंख्य जमात आणि काँग्रेस-धार्जिणे मुसलमान या सर्वांवर आग पाखड केली. त्यांनी ब्रिटीशांवर असा आरोप केला की हिंदुस्तान हे एक राष्ट्र आहे असे घोषित करून त्यांनी निष्कारणच मुळात नसलेल्या प्रश्नाचे भूत उभे केले आहे. ज्या प्रांतात काँग्रेस अधिकारावर होती तेथील

अल्पसंख्यांकांना अशा तऱ्हेने वागविण्यात आले की आपले अस्तित्वच धोक्यात आहे असे मुसलमानांना वाटू लागले. काँग्रेसधार्जिण्या मुसलमानांनी सध्याच्याच केवळ नव्हे तर मुसलमानांच्या भावी पिढ्यांचाही विश्वासघात केला आहे. मौलाना जाफर अली खान यांनी असे सांगितले की, अनेक दिवस काँग्रेसबरोबर राहिल्यानंतर आपली अशी खात्री होऊन चुकली आहे की, काँग्रेसला स्वातंत्र्यापेक्षाही अल्पसंख्यांकांना दडपून टाकण्यातच अधिक स्वारस्य वाटते. मुसलमानांच्या पाठिंब्यावरच काँग्रेस ऐवढी प्रबळ झाली, परंतु एकदा प्रबळ बनल्यानंतर मात्र तिला मुसलमानांची पर्वा वाटेनाशी झाली.

अल्पसंख्य प्रांतात राहणाऱ्या मुसलमानांनी फाळणीच्या मागणीला पाठिंबा दिल्या-बद्दल सरदार औरंगझेब खान यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि सरहद्द प्रांतातील मुसलमानांच्या वतीने त्यांना असे आश्वासन दिले की आम्ही आपल्या धर्म बांधवां-साठी प्राणांचे बलिदान करण्यास सदैव सिद्ध आहोत. ते आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, केवळ डोकी मोजणारी ब्रिटीशांची लोकशाही आम्हाला नको. सर अबदुल्ला हारून यांनी आपल्या भाषणात सिंधच्या मुस्लीम लीगने वायव्य आणि पूर्व विभागात अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करण्याची मागणी करणारा जो ठराव केला होता त्याचा उल्लेख करून हिंदूना असे बजावले की, त्यांच्या प्रांतातील मुसलमानांना जर न्याय्य वर्तणूक मिळाली नाही तर हिटलरने सुडेटसना जशा तऱ्हेने वागविले तशाच तऱ्हेने बहुसंख्य मुस्लीम प्रांतातील हिंदूंना वागविले जाईल. बिहारचे खान बहादूर नवाब महंमद इस्माइल खान, मद्रासचे अबदुल हमीद खान, मुंबई तर्फे आय. आय. चुंद्रीगर आणि मध्यप्रांताचे सैयद अबदुल रौफ शहा यांनीही फाळणीच्या मागणीला पाठिंबा देणारी भाषणे केली. बिहारच्या पुढाऱ्याने अशी घोषणा केली की, मौलाना आझादांचे मत म्हणजे काही मुसलमानांची मते नव्हेत, जीना हेच काय ते भारतीय मुसलमानांचे मत बोलून दाखवितात हे काँग्रेसने लक्षात ठेवावे. मुस्लीम बहुसंख्य प्रांतातील मुसल-मानांनी अल्पसंख्य प्रांतातील आपल्या धर्म बांधवांना मदतीचा हात पुढे केला याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. परंतु त्याचबरोबर बिहारमधील मुसलमान कोणत्याही परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करावयास समर्थ आहेत असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला. सैयद अबदुल रौफ शहा यांनी बहुसंख्य प्रांतातील मुसलमानांना असे सांगितले की, हिंदू प्रांतातील आपल्या धर्म बांधवासंबंधी त्यांनी कसलीही चिंता बाळगू नये, कारण हिंदू प्रांतातील मुसलमानांना असा भरंवसा आहे की, बहुसंख्य मुसलमान प्रांतातील धर्म बांधवांप्रमाणे आपणही कधीना कधी स्वतंत्र बनू.

---

## प्रकरण १९

### जीनांचे भारताच्या विच्छेदनाचे स्वप्न

लाहोर ठरावाने सारा देश स्तंभित होऊन गेला. २५ मार्च रोजी सावरकर यांनी असे घोषित केले की, देशाची फाळणी करण्याचा प्रयत्न झाला तर आपला पक्ष त्याला अत्यंत कडवा विरोध करील. हिंदू-मुसलमानांचे ऐक्य घडून आल्याशिवाय स्वराज्य अशक्य आहे असा पाढा पुन्हा पुन्हा वाचत राहील्याबद्दल त्यांनी काँग्रेसची हेटाळणी केली आणि असे सांगितले की आजच्या घटकेला जर कशाची गरज असेल तर हिंदू योध्यांची आणि हिंदू पुढाऱ्यांची. नेहरूंनी असे मत व्यक्त केले की, या प्रश्नाला एक नवेच स्वरूप प्राप्त झाले आहे. आणि वाटाघाटींनी यातून काही मार्ग निघण्याची शक्यताच आता उरलेली नाही. हरिजनमध्ये एप्रिल महिन्यात या विषयावर लिहिलेल्या लेखमालेत गांधींनी असे प्रतिपादन केले की, मुसलमानांनी फाळणीचा आग्रहच धरला तर उर्वरित भारताला त्यांच्यापुढे मान तुकवावीच लागेल. अहिंसक मार्गाने आठ कोटी मुसलमानांना उर्वरित भारताच्या इच्छेला मान देण्यास भाग पाडण्याचा उपाय माझ्यापाशी नाही. भारतातील इतर लोकांइतकाच मुसलमानांनाही स्वंयनिर्णयाचा हक्क असला पाहिजे. हिंदुस्तान हे एक संयुक्त अविभक्त कुटुंब आहे असे मानले तर त्या कुटुंबाचा कोणताही घटक वाटणी मागू शकतो. परंतु हिंदुस्तानची फाळणी करणे हे सत्याच्या निकषावर टिकणारे नाही आणि मी तरी निदान भारताचे तुकडे पाडण्यास आपण होऊन कधीच तयार होणार नाही. गांधींनी पुढे लिहिले होते.

'हिंदू आणि इस्लाम धर्माची विचारसरणी संस्कृती किंवा धर्मतत्त्वे परस्परविरोधी आहेत ही कल्पनाच मी सहन करू शकत नाही. माझा सारा आत्मा अशा कल्पनेविरूद्ध बंड करून उठतो. . . . पण ती माझी व्यक्तीगत श्रद्धा झाली. परंतु स्वतःला स्वतंत्र राष्ट्र समजणाऱ्या मुसलमानांच्या गळी मी ती उतरवू शकत नाही.

काही जणांनी १९३७ साली मुस्लीम लीग बरोबर संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्यास नकार दिल्याबद्दल काँग्रेसला दूषण दिले. परंतु याकूब हसन यांनी एका लेखातून या आरोपाला तावडतोब असे उत्तर दिले की संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याचा अदूरदर्शीपणा काँग्रेसने दाखविला असता तर द्विराष्ट्र वादाचा मागाहुन आलेला सिद्धांत हा जीनांचा आवडता सिद्धांत आहे असे मुळी मानलेच गेले नसते. कारण ती मुळी एक

वस्तुस्थिती बनली असती आणि हिंदुस्तानच्या नव्या राज्य घटनेत द्विराष्ट्रवादाचे तत्त्व समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी सरळच पुढे आली असती. सिंध प्रांतातील अल्ला बक्ष, वायव्य सरहद्द प्रांताचे खान अबदुल कयूम खान, बंगालचे सैयद हबिबुर रहेमान यांनी लाहोर ठरावाचा निषेध केला. मास्टर तारासिंगांची प्रतिक्रिया सावरकरांपेक्षाही कडवी होती. संयुक्त प्रांताच्या लखनौ येथे भरलेल्या शीख परिषदेत त्यांनी मुसलमानांना असा इशारा दिला की, 'मुसलमानांना जर पाकिस्तानची निर्मिती करावयाची असेल तर त्यासाठी त्यांना शीखांच्या रक्ताचा महासागर ओलांडावा लागेल.'

जीनांनी दिलेल्या आदेशानुसार १९ एप्रिल रोजी पाकिस्तान दिन पाळण्यात आला. लीगच्या सर चिटणीसांनी नंतर जाहीर केल्याप्रमाणे त्या दिवशी संबंध देशात हजारो जाहीर सभा झाल्या. तारीख २७ एप्रिल १९४० पासून लीग व्यतिरिक्त इतर मुस्लीम पक्षांच्या पुढाऱ्यांची चार दिवसांची बैठक झाली. अखिल भारतीय आझाद मुस्लीम कॉन्फरन्स म्हणून तिला संबोधण्यात आले होते. मौलाना हफीझुर रेहमान यांनी मांडलेला ठराव बैठकीत संमत करण्यात आला. त्या ठरावात पुढील मागण्या करण्यात आल्या होत्या. (अ) प्रौढ मताधिकारानुसार निवडण्यात आलेली घटनासमिती तावडतोब बोलावण्यात यावी. आणि (ब) अशा घटनासमितीवर निवडून आलेल्या मुसलमान सभासदांना आपल्या समाजाच्या हितसंबंधांचे आणि हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जरूर ती संरक्षकबंधने घटनेत अंतर्भूत करण्याचा निरपवाद अधिकार असेल. असफ अलिच्या ठरावानुसार पुढील पाच प्रश्नांचा सखोल अभ्यास व चौकशी करून स्पष्ट शिफारशी करण्यासाठी २७ नेत्यांची एक समिती नेमण्यात आली :—(१) मुस्लीम संस्कृति, व्यक्तिगत कायदा आणि धार्मिक अधिकार; (२) मुसलमानांचे राजकीय हक्क आणि त्यांचे संरक्षण; (३) केंन्द्रात एकात्म सरकारऐवजी अत्यंत मर्यादित अधिकार असलेले महासंघ सरकार निश्चित करणारी राज्यघटना; (४) मुसलमानांचे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क व त्यांचे संरक्षण. तसेच (५) सरकारी नोकऱ्यातील मुलमानाने प्रमाण मौलाना हफीझर रहेमान यांच्या ठरावात मतदार संघाबाबत कसलाच उल्लेख नव्हता. परंतु असफ अलिच्या ठरावात मात्र मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी करण्यात आली होती.

१८ एप्रिल रोजी भारत मंत्री लॉर्ड झेटलंड यांनी हाऊस ऑफ लॉर्डसमध्ये असे निवेदन केले की, भारतीय नेत्यांबरोबर समझोता घडवून आणण्याचा मार्ग ब्रिटनने बंद करून टाकलेला नाही. परंतु त्यांनी आपल्या भाषणात काँग्रेसवर कडक टीका केली आणि जोपर्यंत जातीय सलोखा घडून येत नाही तोपर्यंत भारतात राजकीय ऐक्य प्रस्थापित होणे अशक्य आहे या आपल्या जुन्याच विधानाचा त्यांनी पुनरूच्चार केला. आपल्या भाषणात ते म्हणाले ". . . . हिंदू आणि मुसलमान या दोन महत्त्वाच्या जमातीत सलोखा घडवून आणण्याचा माझ्याकडून मी शक्य तेवढा प्रयत्न करीन.

परंतु याबाबतची वस्तुस्थिती अशी आहे की काँग्रेसने मुसलमानांच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण करून ठेवले असून त्याचे निराकरण काँग्रेसलाच करावे लागणार आहे. काँग्रेस ऐक्याचे मार्ग बंद करून टाकण्याचे थांबविणार आहे काय? या प्रश्नाच्या उत्तरावरच त्या देशाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे." लॉर्ड झेटलंड यांचे हे निवेदन इतके बोलके आहे की, त्यावर निराळे भाष्य करण्याची आवश्यकताच नाही.

दरम्यान युद्ध परिस्थिती अत्यंत गंभीर बनली होती. हिटलरच्या फौजांनी फ्रान्स पादाक्रांत करून टाकला होता. इटली जर्मनीला जाऊन मिळाला होता. आणि ब्रिटनचे अस्तित्त्वच धोक्यात आले होते. चर्चिल यांच्या नव्या मंत्रिमंडळात एल. एस. अमेरी हे लॉर्ड झेटलंड यांच्या जागी भारतमंत्री झाले होते या नव्या भारत मंत्र्यांनी २३ मे रोजी कॉमन्स सभागृहात अशी घोषणा केली की, आपल्या आधीच्या भारत मंत्र्यांशी आपण संपूर्ण सहमत आहोत. ब्रिटीश कॉमनवेल्थमध्ये हिंदुस्तानला संपूर्ण आणि समान भागीदारी मिळवून देणे हे ब्रिटीशांचे धोरण असल्याचा पुनरूच्चार करून अमेरींनी पुढे असे सांगितले की, भारताची राज्यघटना कशी असावी ते हिंदी लोकांनीच ठरवावयाचे आहे. त्यांनी असेही जाहीर केले की, १९३५ चा कायदा आणि त्यावर आधारलेले धोरण आणि योजना यासंबंधी युद्ध समाप्तीनंतर फेरविचार करता येईल. निरनिराळ्या जमातींच्या न्याय्य मागण्या आणि त्यांचे हितसंबंध लक्षात घेऊन भारतीय पुढारी आपापसात तडजोड घडवून आणतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. व्हाइसरॉय यांनी पुन्हा एकदा विविध पक्षांच्या नेत्यांना भेटीस बोलावले आणि युद्ध सल्लागार समिती नियुक्त करण्याची त्याचप्रमाणे गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचा विस्तार करण्याची तयारी दर्शविली.

१ जुलै रोजी जीनांनीं व्हाइसरॉयला पाठवलेल्या खलित्यात अनेक मागण्या केल्या त्यातील काही अशा होत्या, (१) मुस्लीम लीगने लाहोरच्या अधिवेशनात फाळणीसंबंधीचा जो ठराव केला आहे त्याला कोणत्याही तऱ्हेने बाधा येईल अशी घोषणा ब्रिटीश सरकारने करता कामा नये, (२) मुस्लीम लीगच्या पूर्वसंमती शिवाय तात्पुरती किंवा कायमची अशी कोणतीही राज्य घटना अंमलात आणता कामा नये.(३) केंद्रात आणि प्रांतात मुसलमानांना बिगर मुसलमानांच्या बरोबरीने समान प्रतिनिधित्त्व दिले गेले पाहिजे म्हणजे त्यायोगे केंद्रीय आणि प्रांतिक सरकारांत मुसलमानांच्या हाती समान अधिकार आणि नियंत्रण राहू शकेल. (४) व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचा विस्तार करावयाचा झाला तर मुसलमान सभासदांची संख्या हिंदू सभासदांइतकी असली पाहिजे. परंतु जर काँग्रेसने सहभागी होण्याचे नाकारले तर कौन्सिलमध्ये मुसलमान सभासदांची बहुसंख्या असली पाहिजे, (५) गव्हर्नरांच्या प्रत्यक्ष अमलाखाली असलेल्या प्रांतातील बिनसरकारी सल्लागारात मुसलमानांचे बहुमत असले पाहिजे, (६) संकल्पित युद्ध सल्लागार समितीत संस्थानिकांना पुरेसे प्रतिनिधित्त्व मिळाले पाहिजे आणि ब्रिटीश हिंदुस्तानातील प्रतिनिधीत्त्वाबद्दल

बोलावयाचे तर. काँग्रेस त्या समितीत सहभागी होणार असेल तर मुस्लीम हिंदुस्तानचे प्रतिनिधित्त्व हिंदूंच्या बरोबरीने असले पाहिजे. अन्यथा त्यांचे तेथे बहुमत असले पाहिजे. अशा तऱ्हेने जीनांनीं आपला द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत तर्क शास्त्राच्या थेट कडेला नेऊन पोहचविला म्हणजे असे की हिंदू आणि मुसलमान ही स्वतंत्र राष्ट्रे आहेत असे एकदा मानले की प्रत्येक बाबतीत ते समान असले पाहिजेत आणि प्रशासनातही त्यांना समान प्रतिनिधीत्त्व मिळाले पाहिजे हे ओघानेच आले.

तारीख ७ जुलैच्या काँग्रेस वर्किंग कमेटीने ग्रेट ब्रिटनने हिंदुस्तानला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याची ताबडतोब घोषणा करावी आणि त्याची पहिली पायरी म्हणून मध्यवर्ती कायदेमंडळाला जबाबदार असलेले तातपुरते राष्ट्रीय सरकार स्थापन करावे अशी मागणी केली. परंतु जीनांनीं तात्काळ तीवर आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली त्यांनी असे जाहीर केले :—

तातपुरते राष्ट्रीय सरकार म्हणजे काँग्रेसचे राज्य 'राष्ट्रीय' या शद्बाचा हवा तसा दुरूपयोग केला जात आहे. युरोप किंवा अमेरिका ही जशी एक राष्ट्रे असत नाहीत त्याचप्रमाणे हिंदुस्तानातही एक राष्ट्र असू शकणार नाही. हिंदूंची मागणी मान्य करणे म्हणजे हिंदुंचे बहुमत असलेले सरकार आणि तेही अगदी कायमचे असा त्याचा अर्थ होईल. आणि मुसलमानांना ते कधीही मान्य होणार नाही.

तारीख ८ आणि १४ ऑक्टोबर रोजी अनुक्रमे व्हाइसरॉय आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनी ब्रिटीशांच्या हिंदुस्तानविषयक धोरणासंबंधी दोन महत्त्वाची निवेदने केली. लिन्‌लिथगो यांनी फाळणीची मागणी तत्त्वतः मान्य केली, तर अमेरींनी त्याहीपुढे जाऊन द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतावर संपूर्ण शिक्का मोर्तब करून टाकले. ही दोन निवेदने प्रसिद्ध होताच जीनांनी लगेच त्याचा फायदा घेऊन ब्रिटीश सरकारने मुस्लीम लीगला दिलेले ते गंभीर आश्वासन आहे असा पुकारा सुरू केला. एका बाजूला हिंदुस्तानच्या फाळणीच्या मागणीमागील तत्त्व लॉर्ड लिन्‌लिथगो आणि अमेरी मान्य करीत होते आणि द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचा पुनरूच्चार करीत होते तर त्याचबरोबर ते भाता तील शतकानुशतकाच्या सांस्कृतिक ऐक्याचे तोंड भरून गोडवे ही गात होते. हिंदुस्तानचे राजकीय आणि प्रशासकीय ऐक्य प्रस्थापित करण्याच्या कामी ब्रिटीशांचे मोलाचे सहाय्य झाले असून ब्रिटीशांच्या मदतीने ते ऐक्य अद्यापही टिकून राहू शकेल अशी सदिच्छाही त्या दोघांनी व्यक्त केली होती. तारीख २ सप्टेंबर रोजी भरलेल्या लीगच्या वर्किंग कमेटीने लिन्‌लिथगो आणि अमेरी यांच्या निवेदनात हिंदुस्तानच्या ऐक्याचा जो उल्लेख करण्यात आला होता त्यावर आक्षेप घेतला आश्चर्याची गोष्ट अशी की, १९४० डिसेंबर महिन्यात भरलेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनात सावरकरांनी याच उल्लेखाच्या आधारावर ब्रिटीश सरकारने हिंदुस्तानच्या फाळणीची मागणी औपचारिकरित्या फेटाळून लावली आहे असा निष्कर्ष काढला.

तारीख २२ ऑगस्ट रोजी भरलेल्या काँग्रेस वर्किंग कमेटीने ही दोन्ही निवेदने

औपचारिकरित्या फेटाळून लावावी हे अपेक्षितच होते. नंतर तिने गांधींच्या वैयक्तिक सत्याग्रहाची कल्पना उचलून धरली व त्याप्रमाणे तो सुरू झाला. परंतु वैयक्तिक सत्याग्रह सुरू होण्याच्या आधीपासून सरकारने दमननीतीचा अवलंब सुरू केला होता, सुभाषचंद्र बोस यांना तारीख २ जुलै रोजी अटक करण्यात आली. त्यानंतर चार महिन्यांनी जवाहरलाल नेहरूंना त्यांनी संयुक्त प्रांतात केलेल्या भाषणांबद्दल चार वर्षांच्या तुरुंगवासाची सजा ठोठावण्यात आली. दरम्यान व्हॉइसरॉयनी एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचा विस्तार करण्याच्या दृष्टीने हालचालीस सुरूवात केली होती. तारीख १४ ऑगस्ट रोजी त्यांनी मुस्लीम लीगला एक अधिकृत खलिता पाठवून असे कळविले की, अकरा सभासदांच्या विस्तारित कौन्सिलवर विद्यमान सभासद सर झाफरूल्ला खान धरून लीगचे तीन प्रतिनिधी राहतील त्या खलित्यात लीगला असे ही कळविण्यात आले होते की, तिने आपल्या पसंतीच्या चार सभासदांची यादी सादर करावी त्यातून सरकार कोणत्याही दोन सभासदांची कौन्सिलवर नियुक्ती करील. तारीख २ सप्टेंबर रोजी भरलेल्या लीगच्या वर्किंग कमेटीने व्हॉइसरॉय यांची ही सूचना फेटाळून लावली. त्याशिवाय बैठकीत खालील ठराव बाबतीत ठराव पास करण्यात आले– (१) मुस्लीम लीगच्या मागणीप्रमाणे तिची पूर्व संमती आणि मान्यता घेतल्याशिवाय कोणतीही घटना अमलात आणली जाणार नाही असे निःसंदिग्ध आश्वासन ब्रिटीश सरकारने दिल्याबद्दल समाधान, (२) मुसलमानांना व्यक्तिशः युद्ध समित्यात सहभागी होण्याची मुभा, (३) मुस्लीम नेतृत्त्वाला संपूर्णपणे विश्वासात घेण्याची आणि केंद्रीय व प्रांतिक सरकारात समान भागीदार म्हणून त्याला सहभागी करून घेण्याचा पुन्हा एकदा आग्रह आणि (४) प्रांतिक शाखांना मुस्लीम नॅशनल गार्डस ही संघटना मजबूत करण्याचे आदेश.

तारीख २४ सप्टेंबर रोजी जीनांनी व्हाइसरॉयची भेट घेऊन खालील मागण्यांबद्दल त्यांच्यापाशी आग्रह धरला– (अ) केंद्र सरकारात त्याचप्रमाणे गव्हर्नरांच्या अंमला-खालील प्रांताच्या सरकारात मुसलमानांना हिंदूंच्याइतके प्रतिनिधित्त्व देऊन त्यांना सत्तेत भरीव वाटा मिळवून देणे. पूर्वीच्या काँग्रेस अधिकारावर असलेल्या प्रांतात आणि युद्ध समित्यांतही हे तत्त्व लागू करण्यात यावे. जर काँग्रेसने सहभागी होण्याचे नाकारले तर मुसलमानांना बहुसंख्य जागा मिळाव्यात, (ब) पुढे मागे काँग्रेसने एक्झि-क्युटिव्ह कौन्सिलमध्ये सहभागी होण्याचे मान्य केले तरी, जोपर्यंत लीग बरोबर तिचा समझोता घडून येत नाही तोपर्यंत तिला तसे करू दिले जाणार नाही असे लीगला आश्वासन मिळाले पाहिजे. व्हाइसरॉय लीगला जास्तीत जास्त म्हणजे वीस सभासदाच्या युद्ध समितीवर पाच आणि विस्तारित एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर आणखी दोन जागा देण्यास तयार होते. पुढे मुस्लीम लीगच्या कौन्सिलच्या बैठकीत ब्रिटीश सरकारला आपल्या हातातील सत्ता सोडण्याची अजिबात इच्छा नाही अशी तक्रार करून जीनांनी पुढे असे सांगितले की, केंद्र आणि प्रांतिक सरकारात लीगला अधिकाराचे

स्थान मिळाल्याखेरीज युद्ध प्रयत्नात मुसलमानांचे सहकार्य मिळू शकणार नाही. मात्र भारताची नवी राज्य घटना तयार करताना पाकिस्तानची योजना विचारात घेण्याचे सरकारने आश्वासन दिल्याबद्दल जीनांनी आनंद व्यक्त केला

राजगोपालचारी यांनी ऑक्टोबर महिन्यात घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत असे सुचविले की, ब्रिटीश सरकारने मुस्लीम लीगला आपला पंतप्रधान नियुक्त करून केंद्रीय मंत्रिमंडळ बनविण्यास सांगावे. नोव्हेंबरमध्ये काँग्रेसचे सभासद मध्यवर्ती कायदे-मंडळाच्या अधिवेशनातील फिनान्स बिलावरील चर्चेच्या वेळी हजर राहिले आणि त्यांनी ते फेटाळून लावले. त्यावेळी झालेल्या चर्चेत भाग घेताना जीनांनी केंद्रात राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यात यावे या काँग्रेसच्या मागणीवर हल्ला चढविला, ही मागणी मान्य झाली तर विद्यमान राज्य घटनेवर मूलभूत आणि दूरगामी परिणाम घडून येतील अशी भिती व्यक्त करून त्यांनी मध्यवर्ती कायदे मंडळात हिंदूंचे दोन तृतियांश इतके बहुमत असल्यामुळे हिंदूंचाच वरचष्मा राहील असे प्रतिपादन केले. आपल्याला पंतप्रधान करण्यात यावे या राजगोपालाचारीच्या सूचनेची टर उडवून अधिकारपदाची लालसा नसल्याने असली प्रलोभने दाखवून काँग्रेसच्या निर्णयापुढे मान वाकविण्यास आपल्याला कोणासही भाग पाडता येणार नाही. काँग्रेस सभासदांकडे वळून जीनांनी असा सवाल केला की, 'तुम्ही आणि आम्ही मिळून एकत्र विचार करून अमेरी, ब्रिटीश पार्लमेंट किंवा ब्रिटीश राष्ट्र यांच्याकडे संयुक्त मागणी का सादर करू नये? त्यानंतर तीन आठवड्यांनी मुंबईच्या एका जाहीर सभेत भाषण करताना त्यांनी असे उद्‌गार काढले की, काँग्रेसला स्वातंत्र्य संपादन करावयाचे असेल तर त्याला एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे दोन्ही जमातींनी स्वतंत्र घटक म्हणून राहण्याचे मान्य करणे. भारतीय स्वातंत्र्याला पाकिस्तान शिवाय अन्य मार्ग नाही.

खुद्द ग्रेट ब्रिटनमध्येही हिंदुस्तानसंबंधीच्या कट्टर हुजूर पक्षीय धोरणावर खूप टीका झाली. २५ सप्टेंबर, २५ नोव्हेंबर आणि १२ डिसेंबर रोजी, केलेल्या भाषणा-तून असुरींनी टीकाकारांचा समाचार घेतला. भारताचा घटनात्मक विकास घडवून आणावयास नको म्हणून ब्रिटीश सरकार जाणून बुजून जातीय मतभेदांना खतपाणी घालीत आहे किंवा त्यांचा निष्कारण बागुलबुवा करीत आहे असा आरोप करणे बरोबर होणार नाही. १९३५ च्या कायद्यातील संघराज्यासंबंधीची तरतूद लागू करता आली नाही ती संस्थानिकांनी त्यांत सामील होण्याचे नाकारले आणि मुसल-मानांसारख्या एका मोठ्या जमातीने हिंदूंच्या कायमच्या बहुमताच्या हाती आपले भवितव्य सोपविण्यास नकार दिला म्हणून संबंधित राजकीय पक्षात एकमत घडून आले तरच हिंदुस्तानात राष्ट्रीय सरकार स्थापन होऊ शकेल. काँग्रेस, लीग, संस्थानिक आणि वर्गीकृत जमाती यांच्यात तडजोड घडून आली आणि त्यांनी राज्य घटनेचा सर्वसंमत असा आराखडा तयार केला तर, ब्रिटीश सरकार मोठ्या आनंदाने त्याला

मान्यता देईल आणि जे संस्थानिक नव्या राज्य घटनेत सामील होऊ इच्छित नसतील त्यांच्यापुरतेच ब्रिटीशांचे सत्ता वर्चस्व मर्यादित राहील; .... हिंदुस्तानातून ब्रिटीशांआपली सत्ता काढून घेतली तर त्याचे राजकीय ऐक्य संपुष्टात येईल. हिंदुस्तानची छकले होऊन निरनिराळी स्वतंत्र राज्ये पुन्हा अस्तित्वात येतील आणि मोगल साम्राज्याच्या अखेरीस भारतात जी अवस्था होती ती पुन्हा प्राप्त होईल म्हणून ब्रिटिशांचा अंमल टिकून राहिला पाहिजे असे अमेरींनी आपल्या बारा डिसेंबरच्या भाषणात सांगितले. जीना आणि संस्थानिक यांना अमेरींची ही विधाने अत्यंत आश्वासक वाटली.

युद्ध सुरू झाल्यापासून एच्. एन्. रॉय हे दोस्तांच्या युद्ध प्रयत्नांचे फार मोठे समर्थक बनले होते. पाकिस्तानची मागणी विद्यमान परस्थितीच्या संदर्भात सर्वस्वी गरलागू ठरते असे ते आपल्या ठिकठिकाणच्या भाषणातून प्रतिपादन करीत. १९४० च्या नोव्हेंबरात भरलेल्या संयुक्त प्रांतातील मुस्लीम विद्यार्थ्यांच्या परिषदेत भाषण करताना कॉंग्रेसने निरनिराळ्या प्रांतातील आपल्या मंत्रिमंडळांना राजिनामा देण्यास सांगून राजकीय आत्महत्या केल्याबद्दल त्यांनी तिला दोष दिला. युद्ध सुरू झाल्यापासूनच कॉंग्रेसचे धोरण चुकत चालले आहे असे सांगून त्यांनी असे मत व्यक्त केले की, देशात एक निराळे वातावरण निर्माण करण्यासाठी कॉंग्रेसने सर्व प्रांतातून संयुक्त मंत्रिमंडळे बनवावयास हवी. प्रागतिक किंवा हिंदू महासभा यांच्या प्रमाणेच एच्. एन्. रॉय यांचे हे विचारदेखील कालविसंगत होते. पाकिस्तानच्या मागणीच्या गुणावगुणावर सर्व देशात चर्चा होत होती आणि त्याच्या समर्थकात आणि विरोधकात वादविवादाची रणे माजली होती. १९४० च्या अखेरीस डॉ. आंबेडकर यांचे 'थॉटस ऑन पाकिस्तान' हे विचार प्रवर्तक पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यात त्यांनी मांडलेला युक्तीवाद थोडक्यात असा होता :—

(१) हिंदू आणि मुसलमान यांच्यातील सामाजिक चालीरीती आणि रीतीरिवाज यामध्ये जी समानता आढळून येते तो धर्मांतराची प्रक्रिया पूर्ण न झाल्याचा परिणाम आहे. त्या दोघांच्या समान संस्कृतीची ती द्योतक नव्हे. राजकीय आणि धार्मिक बाबतीत या दोन जमातीत जी प्रचंड दरी पसरलेली आहे ती भरून काढण्याच्या दृष्टीनेही समान वैशिष्टये अगदीच अपुरी आहेत. परकियांनी केलेल्या स्वाऱ्या आणि घडवून आणलेली धर्मांतरे यामुळे या दोन समाजात एकमेकांविषयी निर्माण झालेली कटुता इतकी दृढमूल होऊन बसली आहे की, ब्रिटिशांच्या शे-सवाशे वर्षांच्या अंमलामुळे ती कमी झालेली नाही किंवा लोक ती विसरूही शकलेले नाहीत. मुसलमानी आक्रमकांना तोंड देणाऱ्या योदच्यांचे हिंदू पोवाडे गातात तर मुसलमानांना ते आक्रमक आपले वीर पुरूष वाटतात.

(२) कॅनडातील फ्रेंच वंशीय रहिवाशांनी त्या देशात त्यांना प्राप्त झालेले स्थान जसे स्वीकारले तसे भारतीय मुसलमान स्वीकारण्यास तयार नसल्यामुळेच ते स्वतःला एक जमात म्हणवून घेण्याऐवजी स्वतंत्र राष्ट्र म्हणवून घेऊ लागले.

(३) मुस्लीम लीगला मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संघटना म्हणून मान्यता द्यावयाची की नाही यावर तसेच संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याच्या प्रश्नावर काँग्रेस आणि लीग या दोघांनींही एकांतिक भूमिका स्वीकारल्यामुळे त्यांच्यातील तेढ वाढत गेली आहे.

(४) अल्पसंख्यांकांपैकी जे प्रभावी ठरू शकतील अशा प्रतिनिधींना सत्तेत सहभागी करून घेण्याची काँग्रेसची इच्छा नसल्यामुळे तिने मुसलमानांना राजकीय सत्तेपासून दूर ठेवले.

(५) लीगचे काँग्रेसबद्दलचे आक्षेप अतिरंजित आहेत यात शंकाच नाही, परंतु तसे करण्यात काही तरी कुभांड रचून सत्ता मिळविण्याचीच लीगची योजना दिसते.

(६) हिंदुस्तानचे ऐक्य भंगल्याबद्दल हिंदूंच्या कडून जो युक्तिवाद केला जातो तो ऐतिहासिकदृष्टचा बरोबर नाही. कारण गेल्या आठशे वर्षांत त्याचे ऐक्य अनेकदा भंग पावलेले आहे. ब्रम्हदेश हा देखील हिंदुस्तानचाच एक भाग होता. परंतु तो अलग झाला तेव्हा त्याबद्दल कोणी आकांडतांडव केले नाही.

(७) पाकिस्तानच्या निर्मितीमुळे हिंदुस्तानच्या संरक्षण क्षमतेत उणेपणा येईल हा युक्तिवादही चुकीचाच आहे. कारण गेल्या शंभराहूनही अधिक वर्षे भारतीय सैन्य दलात मुसलमानांचेच प्रभुत्त्व आहे आणि ते देखील पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतातील मुसलमानांचे अफगाणिस्तानने स्वारी केली. तर पंजाब आणि वायव्य सरहद्द या प्रांतातील फौजा कशा वागतील हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून तो अप्रिय वाटला तरी त्याला सामोरे जावेच लागेल. यामुळे हिंदूंच्या पुढे एक बिकट विकल्प उभा आहे. आपली सरहद्द सुरक्षित ठेवावयाची की विश्वासार्ह सैन्य ठेवायचे शिवाय मुख्यत: मुसलमानांचा भरणा असलेल्या या पाकिस्तानी प्रांतातील सैन्य दलाला हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रांताकडूनच प्रचंड प्रमाणावर रसद पोहोचविली जाते. तेव्हा या मुद्यावर पाकिस्तानला विरोध करणे म्हणजे आत्मनाशासाठी स्वत:चे अमोघ शस्त्र खरेदी करण्यासारखे होणार आहे. सरहद्द सुरक्षित असण्यापेक्षा सैन्य भरवशांचे असणे हे नेहमी अधिक हिताचे असते.

(८) फाळणीमुळे जातीय समस्या सुटणार नाही हे खरे, परंतु हिंदुस्तानपुरते तरी तिचे स्वरूप इतके उग्र राहणार नाही.

(९) सबंध पंजाब आणि बंगाल प्रांत पाकिस्तानात समाविष्ट करण्याची मुसलमानांची मागणी सर्वथैव असमर्थनीय आहे. गेल्या वीस वर्षाहून अधिक काळपर्यंत हिंदुस्तानात जे रानटी स्वरूपाचे जातीय दंगे उसळत आहेत ते लक्षात घेता भावी काळात जातीय शांतता नांदावी या हेतूने केलेली पाकिस्तानची मागणी वाजवी ठरते आणि त्याकरता पंजाब आणि बंगाल प्रांताच्या सरहद्दीची नव्याने आखणी करणे हे अत्यावश्यक होऊन बसते.

(१०) सामाजिक ऐक्य घडवून आणल्याशिवाय केलेले राजकीय ऐक्य हे उन्हाळचात

लावलेल्या रोपट्याप्रमाणे अल्पजिवी ठरण्याचा संभव असतो. राजकीय ऐक्यामुळे हिंदुस्तान हे एक राज्य बनू शकेल परंतु तेवढ्याने ते राष्ट्र बनू शकणार नाही आणि त्यामुळे ते फार काळ टिकून राहण्याची शक्यताही कमी.

(११) १९४० च्या एप्रिलमध्ये भरलेल्या अखिल भारतीय आझाद मुस्लीम कॉन्फरन्सकडून फार अपेक्षा बाळगणे चूक आहे. पाकिस्तानला पर्याय म्हणून मुसलमानांच्या मागण्यांचा जाहीरनामा तयार करण्यासाठी अधिवेशनात जी समिती नेमण्यात आली तिचा अहवालच प्रसिद्ध होऊ शकला नाही. परंतु त्या जाहीरनाम्यात कोणत्या मागण्यांचा अंतर्भाव करण्यात आला असता त्याची सहज कल्पना करता येण्यासारखी आहे. सर्व कायदेमंडळात, मंत्रिमंडळात, सनदी नोकऱ्यांत, सैन्य दलात, सार्वजनिक संस्थात आणि हिंदुस्तान सहभागी होणार असेल अशा सर्व आंतरराष्ट्रीय संस्थामधून मुसलमानांना पन्नास टक्के प्रतिनिधित्व मिळावे. पंतप्रधान, उपपंतप्रधान, सरसेनापती उप सरसेनापती ही पदे त्यांना आलटून पालटून मिळावीत, एखाद्या मुस्लीम देशाविरूद्ध कोणतीही कृती करावयाची असेल किंवा त्यांच्याशी तहनामा करावयाचा असेल, प्रांताच्या सरहद्दींची फेरआखणी करावयाची असेल, धर्म किंवा संस्कृती यांच्याशी संबंधित असा एकादा कायदा करावयाचा असेल किंवा घटनेत कोणताही बदल घडवून आणावयाचा असेल तर त्याबाबत मुसलमानांना नकाराधिकाराचा हक्क बजावता आला पाहिजे आणि त्यांची शेवटची मागणी उर्दू ही हिंदुस्तानची राष्ट्रभाषा करण्यात यावी ही असणार, जाहीरनाम्यातील मागण्याबाबतचा माझा हा अंदाज बरोबर ठरला तर हिंदूंच्या कडून त्याला कसा प्रतिसाद मिळेल हे समजून घेणे उद्‌बोधक ठरेल. पाकिस्तान टाळण्यासाठी या अटी ते मान्य करतील का? की त्यापेक्षा पाकिस्तान परवडला असे ते म्हणतील? डॉ. आंबेडकर यांनी शेवटी यावरून असा निष्कर्ष काढला की, पाकिस्तान टाळण्याचा हा पर्याय अत्यंत भयानक आणि घातकी असून हिंदू जर त्याकडे दुर्लक्ष करतील तर त्यामुळे ते स्वतःचाच नाश ओढवून घेतील.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या पुस्तकात मलिक बरकत अली यांच्या १९३१ च्या पंजाब राष्ट्रीय मुसलमान परिषदेतील भाषणातील बराच भाग उद्‌धृत केला आहे हे इकबाल यांनी पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान आणि सिंध प्रांताचे मिळून एक स्वतंत्र मुस्लीम राज्य स्थापन करण्यात यावे अशी जी मागणी केली होती त्याबद्दल त्यावेळी बरकत अलीनीं जाहीरपणे त्यांचा निषेधही केला होता. परंतु हेच बरकत अली १९४१ पासून जीनांचे एकनिष्ठ अनुयायी आणि पाकिस्तानचे कट्टर पुरस्कर्ते बनले आणि आपल्या या कोलांट उडीचे तात्त्विक समर्थनही करु लागले.

परंतु मलिक बरकत अली हे पुढे जीनांना जाऊन मिळालेले एकटेच राष्ट्रीय मुसलमान होते असे नव्हे. एकाकाळी संयुक्त मतदार संघाचा हिरिरीने पुरस्कार करणारे अनेक राष्ट्रीय मुसलमान पुढे पाकिस्तानी आंदोलनात अग्रभागी असलेले

दिसतात. त्यांपैकी प्रमुख म्हणजे नबाबजादा लियाकत अली खान, चौधरी खलिफुझमान आणि १९३२ च्या अलाहाबाद करारावर सह्या केलेल्यांपैकी बहुसंख्य नेते द्विराष्ट्र-वादाच्या सिद्धांताचे मूळचे पुरस्कर्ते जे राजनिष्ठ अश्रफ मुस्लीम राजकारणावर १८८० ते १९३० पर्यंत आपला प्रभाव ठेवून होते ते एकेक करता त्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकले गेले किंवा त्यांना कसलेही महत्त्वाचे स्थान उरले नाही. पूर्वीचे अनेक खिलाफत वादीही पाकिस्तानी आंदोलनाचे नेते बनले. जे थोडे अश्रफ जमीनदार पहिल्यापासून लीग बरोबर राहिले होते त्यांनीही काळाची पावले ओळखून नमते घेतले. १९४० च्या अखेरीपर्यंत बहुतेक सर्व सुशिक्षित मुसलमान जीनांना आपले पुढारी मानू लागले होते. १९४० आणि १९४१ साली भरलेल्या मुसलमान विद्यार्थ्यांच्या प्रांत निहाय परिषदांतून पाकिस्तानच्या उद्दिष्टावर निष्ठा व्यक्त करण्यात आली.

१९४१ पासून पाकिस्तानच्या मागणीचे चित्र अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले. मुस्लीम एज्युकेशनल सर्व्हिस लीगच्या मुंबई येथे भरलेल्या वार्षिक सभेत बोलताना जीनांनी असे प्रतिपादन केले की, हिंदुस्तानातील सर्व पक्षांनी पाकिस्तानची योजना मान्य करून हिंदू आणि मुसलमान यांचे आपापल्या प्रदेशात पुनर्वसन करण्याच्या कार्यास लागावे. तसे झाले तरच या देशाला 'मनरो डॉक्ट्रिन' लागू करता येणे शक्य होईल. जीनांनी व्यापक प्रमाणावरील लोकसंख्येच्या अदलाबदलीची केलेली ही सूचना होती असाही त्याचा अर्थ लावता येईल. फेब्रुवारीच्या सुरूवातीला त्यांनी तारीख २३ मार्च हा पाकिस्तान दिन म्हणून पाळावा असा आदेश दिला आणि ब्रिटीश सरकार संस्थानिक आणि हिंदू यांनी पाकिस्तानची योजना मान्य करावी असे पुन्हा एकदा आवाहन केले. त्यांनी असा दावा केला की, या देशात पाकिस्तानचे अस्तित्व शतकानुशतकापासून चालूच आहे आणि ते जगाच्या अंतापर्यंत कायम राहणार आहे. पहिल्या पाकिस्तान दिनाच्या सभेत भाषण करताना त्यांनी असे जाहीर केले की, हिंदू आणि मुसलमान या देशावर संयुक्तपणे कधीच राज्य करू शकणार नाहीत. म्हणजे अप्रत्यक्षपणे त्यांनी केंद्र सरकारात काँग्रेस-लीग संयुक्त मंत्रिमंडळ अधिकारावर येण्याची शक्यता फेटाळून लावली. त्याआधी १८ फेब्रुवारी रोजी अखिल भारतीय मुस्लीम लीगच्या परराष्ट्रविषयक समितीने फाळणीची तपशीलवार योजना प्रसिद्ध केली होती. त्या योजनेत वायव्य सरहद्द प्रांतापासून दिल्लीपर्यन्त पसरलेले एक बंगाल आणि आसामचा समावेश असलेले दुसरे आणि वऱ्हाड प्रांतासकट हैद्राबाद संस्थानचे तिसरे अशी तीन सार्वभौम मुस्लीम राष्ट्रे गृहित धरली होती. त्यानंतर पाच दिवसांनी नव्यानेच स्थापन झालेल्या अखिल भारतीय संस्थांनी मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीची बैठक होऊन १९४० च्या ऑगस्टमध्ये लिनलिथगो आणि अमेरी यांनी केलेल्या निवे-दनात भावी काळात हैद्राबाद संस्थानचे स्वतंत्र सार्वभौम अस्तित्व कायम राहिले असे जे आश्वासन दिले होते त्याचे स्वागत करणारा ठराव संमत करण्यात आला.

ब्रिटिशांनी दिलेल्या या आश्वासनाच्या आधारावरच घटनेबाबतचा समझोता होऊ शकतो असेही त्या ठरावात पुढे घोषित करण्यात आले होते. तारीख १७ मे रोजी बंगलोर येथे म्हैसूर स्टेट मुस्लीम लीगच्या बैठकीत भाषण करताना जीनांनी असा खुलासा केला की, पाकिस्तानची योजना ही फक्त ब्रिटिश हिंदुस्तानपुरती मर्यादित असून संस्थानी प्रदेशाशी तिचा कसलाही संबंध पोहोचत नाही. यावरून कोणाही चाणाक्ष निरीक्षकाने असाच निष्कर्ष काढला असता की, १९४१ मध्ये जीनांच्या डोक्यात तीन किंवा तिनाहूनही जास्त सार्वभौम मुस्लीम राज्यांच्या निर्मितीची कल्पना घोळत असली पाहिजे. अशा तऱ्हेच्या स्वतंत्र सार्वभौम राज्यांच्या मागणीचे समर्थन करण्यासाठी देखील ऑगस्ट १९४० मधील ब्रिटिशांच्या आश्वासनांचाच आधार घेण्यात आला होता. १९४१ च्या एप्रिल महिन्यात हैद्राबाद येथे मजलिस इत्तेहाद-उल-मुसलीमीन नावाचा नवा पक्ष स्थापन करण्यात आला, हे देखील लक्षात ठेवण्यासारखे आहे. त्या पक्षाच्या संस्थापना परिषदेत असे जाहीर करण्यात आले की, हैद्राबाद संस्थानचे सार्वभौमत्त्व हे त्या भागांतील मुसलमान जनतेत सामावलेले असून निझामाच्या रूपाने ते साकार झाले आहे.

एप्रिल १९४१ मध्ये मद्रास येथे भरलेल्या लीगच्या अधिवेशनात दक्षिणेत आणखी एक स्वतंत्र सार्वभौम राज्य निर्माण करण्याच्या कल्पनेला जीनांनी पाठिंबा दिला. जस्टीस पार्टीचे नेते ई. व्ही. रामस्वामी नायकर, कोचीन संस्थांनचे दिवाण, सर आर, के. षण्मुखम् चेट्टी, सर के. व्ही. रेड्डी, सर ए. पी. पेट्रो, कुमारराजा एम. ए, मुथैया चेट्टीयर, स्वदेश मित्रनचे संपादक सी. आर. श्रीनिवासन, एम. सी. राजा. एन. शिवराज आणि इतर ब्राह्मणेत्तर पुढारी खास निमंत्रित म्हणून त्या अधिवेशनाला उपस्थित होते. अध्यक्षपदावरुन केलेल्या भाषणात जीना म्हणाले :—

या उपखंडात दोन स्वतंत्र समाज नांदत आहेत एक मुसलमान समाज आणि दुसरा हिंदू समाज. त्यातही पुन्हा या विशिष्ट भूभागात आणखी एक राष्ट्र आहे आणि ते म्हणजे द्रविडी लोकांचे. हा भूभाग म्हणजे खरोखरी द्रविडीस्तानच आहे. कल्पना करा या भागात ब्राह्मणांची लोकसंख्या केवळ तीन टक्के असून कुटील डावपेच आणि निवडणूक नीती यांच्या जोरावरच हे उच्चवर्णीय कायदे मंडळात बहुमत मिळवून बसतात याला लोकशाही म्हणावयाचे की लोकशाहीचे विडंबन? म्हणून ब्राह्मणेतराबद्दल मला सहानुभूती वाटते आणि माझा त्यांना संपूर्ण पाठिंबा आहे. त्यांना माझे असे सांगणे आहे की, 'तुम्हाला तुमचे स्वत्त्व शाबूद राखावयाचे असेल तर तुमची संस्कृती, तुमची भाषा सुदैवाने हिंदीचा येथपर्यंत शिरकाव झालेला नाही' तसेच तुमचा इतिहास यावर आधारलेले जीवन तुम्ही जगले पाहिजे. म्हणजेच तुमची अस्मिता तुम्ही टिकविली पाहिजे. त्यासाठी निर्धाराने पाऊल उचलले पाहिजे. माझी तुम्हाला सहानुभूती आहे आणि माझ्याकडून तुम्हाला शक्य ते सर्व सहाय्य मिळत राहील. तुम्ही द्रविडीस्तान खास मिळवू शकाल आणि

त्यात सात टक्के लोकसंख्या असलेले मुसलमान आपला दोस्तीचा हात तुमच्या पुढे करतील आणि सुरक्षितता व न्याय या तत्त्वांच्या आधारावर तुमच्या बरोबर गुण्यागोविंदाने राहतील.'

त्यानंतर एक वर्षानी तारीख ३० मार्च १९४२ रोजी जस्टीस पार्टीचे एक शिष्ट-मंडळ पेरियर ई. व्ही. रामस्वामी नायकर यांच्या नेतृत्त्वाखाली क्रिप्स यांना भेटले. त्यावेळी नायकरांनीं असे निवेदन केले की, शिक्षण, संपत्ती आणि संधी या तिहींच्या अभावामुळे आमच्या पक्षाला निवडणूक जिंकता येत नाही. त्यामुळे आमच्यापेक्षा सधन आणि सामर्थ्यशाली असलेल्या ब्राम्हणसमाजासमोर आमचा टिकाव लागू शकत नाही. म्हणून मद्रास प्रांत भारतीय संघराज्यापासून वेगळा काढण्यात यावा. तसे झाले तरच आमच्या हाती सत्ता येण्याची काही शक्यता आहे. क्रिप्स योजनेत कायदे मंडळात ठराव करून किंवा सार्वमत घेऊन प्रांताना केंद्रापासून फुटून निघण्याची मुभा ठेवण्यात आली होती. परंतु शिष्टमंडळाने असे दाखवून देण्याचा प्रयत्न केला की, यापैकी कोणत्याही मार्गाने मद्रास प्रांत फुटून निघणे शक्य होणार नाही आणि म्हणून शिष्टमंडळाने असे सुचविले की स्वतंत्र मतदार संघाची व्याप्ती अशी वाढवावी की, त्यायोगे आम्हाला प्रांतात आपोआपच बहुमत मिळेल. परंतु शिष्टमंडळाची ही सूचना सर्वथैव अव्यवहार्य असल्याचे क्रिप्सने सांगून टाकले आणि जोपर्यंत ते मद्रासच्या मतदारांना आपल्याला निवडून देण्यास उद्युक्त करू शकत नाहीत तोपर्यन्त लोकशाही मार्गाने त्यांना हवे असलेले बहुमत मिळविण्याचा कोणताही मार्ग उपलब्ध नाही. हेही त्यांनी स्पष्ट केले.

१९४१ च्या सुरुवातीला भरलेल्या अपक्ष पुढाऱ्यांच्या परिषदेत सप्रूनी काँग्रेस आणि लीग यांच्यासह त्रिपक्ष परिषद बोलवावी असे सरकारला आवाहन केले. जीनांनी लगेच अशा परिषदेची कल्पना फेटाळून लावली आणि कांग्रेस व हिंदू महासभा यांच्या हस्तकांनी काढलेली एक क्लुप्ती म्हणून तिची संभावना केली. मात्र आपण गांधी आणि अन्य हिंदू नेत्यांबरोबर वाटाघाटी करण्यास तयार आहोत असे जाहीर केले. यासंबंधात जीना आणि सप्रू यांच्या दरम्यान झालेला पत्रव्यवहार सप्रूनी प्रसिद्ध केला. त्यावरून हे स्पष्ट झाले की, जीना गांधींना काँग्रेसचे नेते म्हणून भेटण्यात तयार नव्हते, तर हिंदूंचे प्रतिनिधी म्हणून त्यांची भेट घेऊ इच्छित होते आणि गांधींना ते मान्य होणे अजिबात शक्य नव्हते.

१२ एप्रिल १९४१ ला मद्रासला मुस्लीम लीगच्या अधिवेशनाच्या सुरूवातीस स्वागताध्यक्ष अब्दुलहमीद खान यांनी इतिहासाचा विपर्यास करणारे भाषण केले. ते म्हणाले, हिंदू आणि मुसलमान यांच्यातील सध्याच्या धार्मिक आणि सांस्कृतिक फरकाचा सखोल अभ्यास केल्यावर असे दिसून आले की, या तफावतीची बीजे शतकानुशतकांच्या इतिहासात आणि तत्त्वप्रणालीमध्ये खोलवर रुजलेली आहेत. या आधारावरच १९०६ साली विभक्त मतदारसंघाची मागणी करण्यात आली.

तरी देखील काँग्रेसबरोबर मिळते घेण्याच्या उदार बुद्धीने सहकार्याचा हात पुढे करून लीगने लखनौ करार घडवून आणला. परंतु काँग्रेस आणि लीग यांच्यातील हा दोस्ताना टिकू शकला नाही. कारण काँग्रेसने अचानक राखीव मतदार संघाऐवजी संयुक्त मतदार संघ असले पाहिजेत अशी मागणी करायला सुरूवात केली. मुसलमानांनी असहकाराच्या चळवळीत भाग घेतल्यामुळे काँग्रेस पुढाऱ्यांचा पूर्वीचा अडेलतट्टूपणा वाढतच गेला आणि काँग्रेस अध्यक्षांनी सुचविलेल्या आणि काँग्रेसने आपल्या मद्रास अधिवेशनात मंजुरी दिलेल्या हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या मसुद्याला तिने केराची टोपली दाखवली मग त्याची कारणे काय असतील ती एक काँग्रेसचे हिंदू पुढारीच जाणोत. अशा तऱ्हेने हिंदू-मुस्लीम ऐक्याची योजना ही एकाद्या मृतबालकाच्या जन्मासारखी ठरली. नेहरू रिपोर्टमुळे मुसलमानांच्या भावना आणखीनच दुखावल्या. अखेर मुसलमान नेत्यांना परिस्थितीची कोंडी कशी झाली आहे ते समजून चुकले आणि त्यातूनच १९२८ साली सुप्रसिद्ध चौदा कलमी जाहीरनामा पुढे आला. हिंदूंच्या बरोबर सलोखा घडवून आणण्याचा पाया म्हणूनच मुसलमान त्याकडे पाहात. गोलमेज परिषदेच्या दोन्ही अधिवेशनाच्या वेळी कांग्रेसने जे डावपेच लढवले त्यावरून काँग्रेसची कपटनिती स्पष्ट झाली. हिंदूत्ववादाला भारतीय राष्ट्रवादाचा मुखवटा चढविण्याच्या हेतूनेच, काँग्रेस पुढाऱ्यांची पावले पडत आहेत याचेही त्यावेळी प्रत्यंतर आले. काँग्रेसच्या उद्दिष्टासंबंधी मुसलमानांच्या मनात असलेली उरलीसुरली शंका ही गांधीजींच्या ऐतिहासिक उपोषणाने दूर झाली. बाह्यत: गांधीचे हे उपोषण हिंदू समाजात घर करून बसलेल्या सामाजिक विषमतेविरूद्ध असल्याचे भासविण्यात आले तरी त्यामागील अंतस्थ हेतू दलितांना सर्वणांच्या जाती वर्चस्वाच्या मगर मिठीतून मुक्त होता येवू नये हाच होता. संघराज्याच्या तत्त्वावर आधारलेली हिंदुस्तानच्या भावी राज्य घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या या गोलमेज परिषदेत जीनांनी मुसलमान बांधवासाठी अत्यंत मोलाची अशी कामगिरी बजावली. कायदे अझम यांनी संघराज्यांच्या तत्त्वाला कडाडून विरोध केला. कारण त्यांनी आपल्या दूरदृष्टीने भारताच्या शांततेला आणि स्वातंत्र्याला त्यामुळे जो धोका निर्माण होणार होता तो ओळखला होता निवडणुकानंतर फाजील आत्मविश्वासामुळे काँग्रेसने मुस्लीम लीगचे सहकार्य झिडकारले आणि एकजिनसी ब्रिटीश पार्लमेंटच्या धर्तीवर या देशावर ती एकात्म पद्धतीचे सरकार लादण्याचे मनसुबे रचू लागली.... यामागे जातीयवादी मनोवृत्तीने पछाडलेल्या बहुमतवाल्या पक्षाचे जोखड कायमचे मुसलमानांच्या गळयात अडकवण्याचे काँग्रेस पुढाऱ्यांची महत्त्वाकांक्षाच दडलेली होती. काँग्रेसच्या गैरकारभाराची कारणमीमांसा करताना अबदुल हमीद यांनी असे सांगितले की, 'राजकीय सत्ता कशी राबवावयाची त्याचा काँग्रेसला अनुभव नाही आणि मुत्सद्देगिरीचा आणि दूरदृष्टीचाही तिच्या जवळ अभाव आहे' पाकिस्तानबद्दल बिगर मुसलमानांना, यत्किंचितही भीती बाळगण्याचे कारण नाही, त्यांना पाकिस्तानात नागरिकत्वाचे

सारे हक्क पुरेपूर उपभोगता येतील असे आश्वासन आपल्या भाषणाच्या शेवटी अबदुल हमीद यांनी दिले.

मोगल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर मुस्लीम भारत आजच्या इतका सुसंघटीत त्याच-प्रमाणे राजकीयदृष्टया जागृत यापूर्वी कधीच नव्हता असे सांगून जीनांनी आपल्या अध्यक्षीय भांषणात पाकिस्तानच्या मागणीचे जोरदार समर्थन केले. त्यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, एकात्म आणि सुसंवादी असे राष्ट्र असते त्या ठिकाणीच लोकशाही आणि प्रातिनिधिक सरकार सोईस्कर ठरते परंतु हिंदुस्तानासारख्या दोनपेक्षा अधिक राष्ट्रे असलेल्या देशात यशस्वी होवू शकणार नाही. युद्ध सुरू झाल्यापासून ब्रिटीश सरकारकडून लीगला मिळालेल्या आश्वासनांचा आढावा घेऊन ते म्हणाले की, ब्रिटीश सरकार मुस्लीम लीगला केंद्रीय आणि प्रांतिक सरकारात बरोबरीचे स्थान आणि सत्ता देण्यास मात्र अद्यापही तयार होत नाही. मुस्लीम लीगने युद्ध प्रयत्नात सर्वतोपरी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली असतानाही तिच्या तातडीच्या मागण्या मान्य न करण्यात सरकारचा कृतघ्नपणाच दिसून येतो असा आरोप करून जीनांनी जमलेल्या प्रतिनिधींना असा इशारा दिला की, हिंदू महासभा, ऑल इंडिया हिंदू लीग आणि लिबरल फेडेरेशन ही सर्व काँग्रेसचीच उपांगे आहेत आणि त्यामुळे हिंदू भारताचे खरेखुरे प्रतिनिधित्त्व जर कोणी करीत असेल तर ती काँग्रेसच. काँग्रेसला सर्व सत्ता आपल्याच हाती केंद्रीत करावयाची आहे या आपल्या पालुपदाकडे वळून त्यांनी सरकारला अशी विनंती केली की, ज्यांना तुमचे युद्धप्रयत्न हाणून पाडा-वयाचे आहेत आणि आजच्या अत्यंत आणीबाणीच्या परिस्थितीत युद्ध कार्यात आणि देशाच्या संरक्षणात जे अडथळे निर्माण करू पहात आहेत त्यांचा अनुनय करण्याचे धोरण कृपा करून सोडून द्या.

त्या अधिवेशनात एका ठरावान्वये मुस्लीम लीगच्या घटनेत दुरुस्ती करून लाहोर ठरावाचा तिच्या ध्येय धोरणात समावेश करण्यात आला. हा ठराव मांडताना लियाकत अलिखान यांनी असे सांगितले की, यापुढे ज्यांना मुस्लीम लीगचे सभासद व्हावयाचे असेल त्यांना पाकिस्तान-निष्ठेची शपथ घ्यावी लागेल. आणि मुस्लीम लीगला खरोखरी पाकिस्तान नको असून केवळ सौदेबाजीसाठी लाहोर ठरावाचा देखावा करण्यात आला आहे असे जे मानतात त्यांचाही या घटना दुरूस्तीमुळे भ्रम-निरास होईल.

मुस्लीम लीगच्या संमतीशिवाय घटनेत कोणताही तात्पुरता किंवा कायम स्वरूपाचा बदल करण्यात आला तर तो आश्वासन भंग मानला जाईल आणि आपल्या सर्व सामर्थ्यानिशी त्याचा प्रतिकार करण्यासाठी लीगला कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यावाचून पर्याय राहणार नाही असा सरकारला इशारा देणारा ठरावही अधि-वेशनात पास करण्यात आला.

लीगच्या या ठरावाकडे दुर्लक्ष करून व्हाइसरॉयनी २१ जुलै रोजी आपल्या

एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलची वाढ केली आणि २२ सभासदाच्या नॅशनल डिफेन्स कौन्सिलची स्थापना करण्यात येत असल्याचे घोषित केले. त्याच्या आदल्या दिवशी त्यांनी जीनांना असे लिहून कळविले की, पंजाब, बंगाल आणि आसामच्या पंतप्रधानांना मुसलमानांचे प्रतिनिधी म्हणून या राष्ट्रीय सुरक्षा समितीवर घेण्यात आले आहे. या पत्रामुळे जीनांचा तीळपापड उडाला आणि रागारागाने त्यांनी व्हाइसरॉयना असे कळविले की, 'लीग ही मुसलमानांची एकमेव प्रतिनिधी असल्याने आपल्याला डावलून परस्पर मुसलमान प्रतिनिधी म्हणून कोणाची तरी नेमणूक करण्याची उठाठेव व्हाइसरॉयनी करता कामा नये. अशा मार्गांचा अवलंब करून व्हाइसरॉय मुसलमानांच्या एकजुटीत बिब्बा घालण्याचा प्रयत्न करीत आहेत'. नंतर सर सिकंदर, फजलूल हक आणि सादुल्ला यांना राष्ट्रीय सुरक्षा समितीचे राजीनामे देण्याचे त्यांनी आदेश दिले. त्याप्रमाणे सर सिकंदर आणि सादुल्ला यांनी तात्काळ आपले राजीनामे पाठवले. फजलूल हक यांनी मात्र प्रथम थोडी खळखळ केली. परंतु नंतर त्यांनीही राजीनामा पाठविला. सर सुलतान अहमद आणि बेगमशहा नवाझ यांचीही अनुक्रमे व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर आणि राष्ट्रीय सुरक्षा समितीवर नेमणूक झाली होती. त्यांनी राजीनामा देण्याचा आदेश मानण्याचे नाकारले म्हणून लीगमधून त्यांची पाच वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आली या राजीनामा प्रकरणापासून फझलूल हक आणि जीना यांच्यातील बेबनावास सुरूवात झाली. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीला जीनांनी व्हाइसरॉय बरोबरच्या लढतीत आपल्या भात्यांतील दुसरा बाण सोडला. मध्यवर्ती कायदे मंडळ आणि कौन्सिल ऑफ स्टेटमधील मुस्लीम लीग पक्षाने त्या दोन्ही सदनावर बहिष्कार घालण्याचा निर्णय जाहीर केला आणि २८ ऑक्टोबर रोजी सभागृहापुढे एक निवेदन सादर करून जीनांनी सभात्याग केला.

तारीख ८ सप्टेंबर रोजी हक यांनी मुस्लीम लीगच्या कार्यकारिणीचा आणि कौन्सिलचा राजीनामा दिला. पक्षाला लिहिलेल्या पत्रात त्यांनी, अध्यक्ष आपल्या अधिकाराचा मन मानेल तसा वापर करतात आणि अल्पसंख्य प्रांतातील लीगचे पुढारी बंगाल आणि पंजाब प्रांतातील मुसलमानांचे हितसंबंध धोक्यात येतील अशा तऱ्हेचे वर्तन करतात असे आरोप केले. बंगालमधील जनता एका व्यक्तीच्या या एकाधिकारशाही विरूद्ध बंड करून उठल्याशिवाय राहणार नाही अशा आशयाचे एक पत्रकही त्यांनी प्रसिद्ध केले. परंतु त्यांचे हे अवसान फाळ काळ टिकले नाही. दोन महिन्यानंतर त्यांनी दिलगिरी व्यक्त करणारे पत्र पाठवून कोणाच्याही भावना दुखावण्याचा किंवा कोणा एका किंवा अनेक व्यक्तींवर दोषारोप करण्याचा आपला मानस नव्हता असा खुलासा केला. ते पत्र म्हणजे फजलूल हक यांनी केलेली क्षमा याचना आहे असे मानून त्यांच्याविरूद्ध कोणतीही कारवाई न करण्याचा निर्णय लीगच्या वर्किंग कमेटीने घेतला. परंतु जीनांनी मात्र आपल्या मनाशी काय करायचे ते ठरविले होते. पंधरवड्या-भरात बंगाल मंत्रिमंडळातील लीगच्या इतर मंत्र्यांनी आपले राजीनामे दिले. त्यावेळी

फजलूल हक यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि डाक्याचे नबाब यांना घेऊन आपले नवे मंत्रिमंडळ बनवले. त्याच दिवशी लीग मधून त्यांची हकालपट्टी करण्यात आली.

लाहोरला पाकिस्तानचा ठराव मांडणारे फजलूल हक हे जीनांच्या नेतृत्वा विरूद्ध बंड करून उठणारे एकमेव मुस्लीम लीगर निघाले. डिसेंबरमध्ये लीगमधून फुटून निघून त्यांनी बंगाल प्रांतात नवे संयुक्त मंत्रिमंडळ बनविले. परंतु ते जेथे जेथे जात तेथे तेथे त्यांना मुसलमानांच्या संतप्त जमावाला तोंड द्यावे लागे. वृत्तपत्रातून ते राणा भीमदेवी पत्रके प्रसिद्ध करीत असले तरी मनातून मात्र ते पार हादरून गेले होते आणि २९ मार्च १९४२ रोजी क्रिप्स यांना तर त्यांनी असे सांगून टाकले की, आता किंवा यापुढे केव्हाही जीनांच्या विरोधात उभे राहण्याची आपली इच्छा नाही आणि संघर्षाचा प्रसंग आला तर जीनांचे म्हणणे पटत नसले तरीही आपण जीनांचेच नेतृत्त्व पत्करू सिकंदर ह्यात खान हेही अधूनमधून विसंवादी सूर काढीत आणि हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या नुसत्याच वल्गना करीत. परंतु त्यांनाही जीनांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या आणि भारताच्या भावी राज्य घटनेसंबंधीची आपली मते लाहोर ठरावातील भूमिकेशी मिळतीजुळती अशीच आहेत अशी त्यांना ग्वाही द्यावी लागली.

१९४१ साली देशात ज्या अनेक जातीय दंगली उसळल्या त्यात अहमदाबाद, मुंबई, बिहार शरीफ आणि डाक्का येथील दंगली विशेष गंभीर स्वरूपाच्या होत्या. डाक्क्यातील जातीय दंगल तर जवळ जवळ सहा महिने चालू होती. त्या दंगलीत अनेकांना प्राणास मुकावे लागले. हजारो कुटुंबांनी स्थलांतर करून त्रिपुराच्या महाराजाचा आश्रय घेतला. जे बंगाली मुसलमान अद्यापपर्यंत मुस्लीम लीगपासून अलिप्त राहीले होते त्यांनीही मुस्लीम लीगच्या झेंड्याखाली आणण्यासाठी लीगच्या पुढाऱ्यांनी हिंदूंच्याविरूद्ध द्वेषाची आणि दहशतीची जहरी मोहीम उघडली. उदाहरणार्थ, १९४१ च्या मार्च महिन्यात मैमनसिंग जिल्ह्यात भरलेल्या मुस्लीम लीगच्या एका परिषदेला दोन लीग मंत्री हजर असताना त्यांच्या देखत स्वागताध्यक्षांनी एक कविता वाचून दाखविली. ती कविता तारीख १० मार्चच्या आझादच्या अंकात प्रसिद्ध झाली होती त्या कवितेचा आशय असा होता :—

ज्यांच्यावर जुलूम होत आहे ते मूर्तिपूजक हिंदूंची ढोंगबाजी पाहून अवाक होऊन गेले आहेत. विजयी सैनिकांनो लीगच्या झेंड्याखाली काबाला निघालेल्या या दिंडीत सामील व्हा.

* * *

आम्ही हवे तेवढे रक्त सांडायला तयार आहोत आम्ही पाकिस्तान मिळवणार, योग्य अशी फाळणी झालीच पाहिजे जर ती वाटाघाटींनी होणार नसेल तर मुसलमान तलवारी आणि भाले यांचा वापर करण्यास भिणार नाहीत.

* * *

मुस्लीम युवक गेले कोठे ? त्यांनी हृदयाशी कवटाळून धरलेली स्वप्ने आम्ही जंगली वाघाला जेरबंद करून साकार करूच करू.

* * *

त्वरा करा सोमनाथाचा चक्काचूर करा. तुम्हाला स्वातंत्र्य हवे आहे ना ? मग जाळपोळ करीत सुटा ! हे लाक्षागृह भस्मसात करून साऱ्या कटकटींचा शेवट करा.

* * *

पाकिस्तानच्या चळवळीला विरोध करणारे मुसलमान सर्व हिंदुस्तानभर पसरलेले असले तरी त्यांची ताकद फार कमी होती. मार्च महिन्यात खान अबदुल गफार खान यांच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे जातीयताविरोधी परिषद भरली होती. पाकिस्तानची योजना ही राष्ट्रद्रोही आणि देशाच्या हिताला विघातक आहे, या कारणास्तव परिषदेत तिचा धिक्कार करण्यात आला. कायदेमंडळे आणि नोकऱ्यांत जातीय तत्त्वावर प्रतिनिधित्व देण्यासही परिषदेने विरोध दर्शविला. त्यानंतर तीन महिन्यांनी कुंभकोणम येथे फाळणीविरोधी परिषद संघटीत करण्यात आली होती. महंमद युसुफ शरीफ अध्यक्षस्थानी होते. दक्षिणेतील मुसलमान मोठ्या संख्येने त्या परिषदेला उपस्थित होते. एका ठरावान्वये त्यांनी असे जाहीर केले की, द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताला आपला संपूर्ण विरोध असून हिंदुस्तानच्या भौगोलिक आणि राजकीय एकात्मतेवर आपली श्रद्धा आहे. दुसऱ्या एका ठरावाने मुस्लीम लीगलाच फक्त मुसलमानांचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार आहे हा दावा परिषदेने फेटाळून लावला. काँग्रेस मंत्रिमंडळाविरुद्ध करण्यात येणाऱ्या आरोपांची चौकशी करण्यासाठी काँग्रेसने स्वतःच एक स्वतंत्र चौकशी समिती नेमावी, वर्धा शिक्षण योजना रद्द करण्यात यावी आणि भाषेच्या प्रश्नाबाबत ऊर्दू, हिंदी आणि प्रादेशिक भाषा असे त्रिभाषिक सूत्र स्वीकारण्यात यावे असे आणखीही काही ठराव परिषदेत पास करण्यात आले.

हिंदू आणि मुसलमानांच्या संस्कृती या एकमेकांपासून अजिबात भिन्न आहेत या प्रतिपादनाचे सर एस. सुलतान अहमद यांनी अलिगड मुस्लीम युनिव्हर्सिटीच्या डिसेंबर महिन्यात झालेल्या पदवीदान समारंभात बोलताना खंडन केले. ऊर्दूच्या फाजील दुराभिमानावरही त्यांनी टीका केली. फारशी आणि अरेबिक शब्दांचे जंजाळ माजवून या दुराभिमान्यांनी ऊर्दू भाषा बोजड आणि सौंदर्यहीन करून टाकली आहे. तसेच ऊर्दू वृत्तपत्रांतून सध्या जी भाषा वापरली जाते ती खुद्द लेखकाला आणि सर तेज बहादूर सप्रूंसारख्या ऊर्दू मातृभाषा असणारांनाही समजत नाही.

मुस्लीम लीगचा मध्यवर्ती कायदेमंडळावरील बहिष्कार अल्पजिवी ठरला. मध्यवर्ती कायदेमंडळातील मुस्लीम लीग पक्षाचे चिटणीस डॉ. सर झियाउद्दिन अहमद यांची फेब्रुवारी १९४२ मध्ये अलिगड मुस्लीम युनिव्हर्सिटीचे कुलगुरू म्हणून नेमणूक करण्यात आली.

२८ फेब्रुवारी १९४२ रोजी आझाद मुस्लीम कॉन्फरन्सच्या बोर्डाची बैठक झाली.

त्या बैठकीत हिंदुस्तानला ताबडतोब स्वातंत्र्य देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली त्याचप्रमाणे आझाद मुस्लीम कॉन्फरन्स ही मुसलमानांच्या नऊ संघटनांचे प्रतिनिधित्व करते या भूमिकेचा पुनरूच्चार करण्यात येऊन सरकार मुस्लीम लीगला मुसलमान समाजाची एकमेव प्रतिनिधी म्हणून वागणूक देत असल्याबद्दल सरकारचा निषेध करण्यात आला. जीना संपूर्ण मुसलमान समाजाचे नेतृत्त्व करतात हे आपणास मान्य नसल्याची तार साडेचार कोटी मुसलमानांच्यावतीने दोन मोमीन नेत्यांनी अमेरींना पाठवली. यावर अमेरीना धाडलेल्या खलित्यात लिनलिथगोने असे भाष्य केले की 'आझाद मुस्लीम कॉन्फरन्स, म्हणजे अश्रफ अलींनी उभा केलेला एक देखावा' होता. तारेत उल्लेख करण्यात आलेल्या नऊ बिगर लीग संघटनापैकी काही अस्तित्त्वातच नाहीत, मोमीन कॉन्फरन्सचा त्या समाजावर कसलाही प्रभाव नाही आणि अनेक मोमीन हे मुस्लीम लीगचे सभासद आहेत हा प्रश्न ज्यावेळी कॉमन्स सभागृहात उपस्थित झाला त्यावेळी अमेरींनी जवळजवळ लिनलिथगोंचीच री ओढली आणि तारीख २० मार्च रोजी जमीयत-उल-उलेमाचे अधिवेशन लाहोर येथे भरले होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष मदनी यांनी पाकिस्तानच्या निर्मितीमुळे साम्राज्यशाहीचे हात बळकट होतील असे विधान करताच श्रोत्यांतील एका गटाने पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा देऊन सारे सभागृह डोक्यावर घेतले आणि अधिवेशनात एकच गोंधळ माजवला. त्यापूर्वी पाच दिवस भरलेल्या अहरार संघटनेच्या वर्किंग कमेटीने आझाद मुस्लीम परिषदेतून अंग काढून घेण्याचा निर्णय घेतला होता.

या सर्व घटनांमुळे अप्रत्यक्षरित्या लीगचे हात अधिकच बळकट झाले. क्रिप्स हिंदुस्तानात येऊन दाखल झाले तोपर्यंत खुद्द गांधीही जीनांचा उल्लेख कायदे आझम (महान नेता) म्हणून करू लागले होते.

गांधींनी विधायक कार्याला आणि हिंदु-मुस्लीम ऐक्याला वाहून घेण्याचा आपला मनोदय व्यक्त केला होता. तथापि, मुस्लीम लीगचे मुखपत्र असलेल्या डॉन मधून हिंदूविरोधी विखारी प्रचाराची जी मोहीम सुरू करण्यात आली होती तीमुळे ते अस्वस्थ झाले. 'कायदे आझम यांना आवाहन' अशा मथळ्याच्या एका लेखात त्यांनी असा सवाल केला की, हिंदू समाजाशी आपले कसलेही भांडण नाही असे सांगणाऱ्या जीनांच्या भाषणांशी हा प्रचार सुसंगत कसा ठरतो? अर्थात जीनांनी त्याची कसलीही दखल घेतली नाही. हिंदू आणि काँग्रेसविरोधी धडधडीत असत्य प्रचार त्यांना चांगलाच लाभदायी ठरला होता. हिंदुस्तानांतील राजकीय परिस्थितीचा प्रत्यक्ष जागेवर जाऊन अभ्यास करण्याकरिता प्रोफेसर आर. कूपलंड १९४१ साली भारतात आले होते. लीगने काँग्रेस मंत्रिमंडळाविरूद्ध केलेले आरोप सर्वथैव निराधार आहेत असे त्यांनी आपल्या अहवालात नमूद केले. काँग्रेस सरकारवर लीगकडून घेण्यात येणारे आक्षेप असत्य असल्याबद्दल सरकारचीही खात्री पटली होती. परंतु त्यासंबंधी चौकशी करण्यास नकार देऊन सरकारने अप्रत्यक्षपणे लीगच्या आरोपांना बळकटीच

आणली. लिनलिथगो देखील खाजगीरित्या हे आरोप केवळ मानसिक स्वरूपाचे आहेत असे कबूल करीत, परंतु जाहीरपणे मात्र ते तसे सांगायला तयार नव्हते.

१९४१ साल उलटले त्यावेळी जीनांचा आत्मविश्वास खूपच वाढला होता. १३ जानेवारी १९४२ रोजी मुंबईचे त्यावेळेचे गव्हर्नर रॉजर लम्ले यांच्याशी झालेल्या चर्चेच्या वेळी अल्पसंख्य प्रांतातील मुसलमान हे काँग्रेसपासून पूर्णपणे अलग पडले असून ते पाकिस्तानच्या मागणीच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहेत असे जीनांनी त्यांना सांगितले. परंतु त्यांची खरी अडचण होती ती मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांताच्या बाबतीत, कारण तेथे काँग्रेसला हिंदूंचे राज्य प्रस्थापित करावयाचे आहे हा प्रचार तितकासा प्रभावी ठरत नव्हता. पंजाब व्यतिरिक्त बहुसंख्य मुस्लीम प्रांतात लीगचे मंत्रिमंडळ कोठेच अधिकारावर नव्हते आणि पंजाबमधील सर सिकंदरांची भूमिकाही बोटचेपीच होती. जीनांनी लम्ले यांना असे सुचविले की, मुख्यतः हिंदूंची लोकसंख्या असलेला अंबाल्या सभोवतालचा विभाग पंजाबपासून अलग करण्यात यावा वायव्य सरहद्द प्रांत आणि सिंधमधील प्रत्येक पोट-निवडणूक लीगने जिंकली होती आणि अल्ला बक्षांना जनतेला तोंड दाखवायलाही जागा राहिलेली नाही. जीनांबरोबर झालेल्या या बोलण्यावरून लम्ले यांचा असा ग्रह झाला की, जीनांना पंजाब आणि बंगालची फाळणी अभिप्रेत आहे. संपूर्ण पंजाब आणि बंगाल प्रांताचा संकल्पित पाकिस्तानात समावेश करण्यास जीना का कू करीत असलेले पाहून अल्पसंख्य प्रांतातील मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांच्या मनात भीती निर्माण झाली. म्हणून तारीख ७ ऑक्टोबर १९४२ रोजी खलिकुझमान यांनी जीनांना असे लिहून कळविले की, पाकिस्तान निर्मिती मागील एक मूलभूत तत्त्व असे आहे की, हिंदूंची बहुसंख्या असलेल्या प्रांतातील मुसलमानांच्या बदल्यात मुस्लीम बहुसंख्य प्रांतात हिंदूंना ओलिस म्हणून ठेवून घ्यावयाचे. आपल्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रांतातून लक्षावधी हिंदूंना जर बाहेर जाऊ दिले तर अल्पसंख्य प्रांतातील मुसलमानांच्या सुरक्षिततेवर त्याचा अत्यंत प्रतिकूल परिणाम घडून येईल.

---

## प्रकरण २०

## भारताच्या भूमीत अनेक अल्स्टर्स घुसवण्याची कारवाई

युद्धाच्या सुरूवातीसच दोस्त राष्ट्रांची फार मोठी पीछेहाट झाली आणि १९४१ च्या जूनमध्ये जर्मनीने रशियाविरूद्ध सर्वंकष आक्रमणाचा पवित्रा घेतला. परंतु सुमारे आठ महिन्यानंतर त्या आघाडीवर कोंडी निर्माण झाली. त्यावर्षाच्या अखेरीस जपानने पर्ल हार्बर बेटावर अनपेक्षित हल्ला चढविला. त्यामुळे अमेरिका दोस्तांच्या बाजूने युद्धात खेचली गेली. त्यानंतर जपानीयुद्ध यंत्रणेने आपला मोर्चा आग्नेय आशियातील डच आणि ब्रिटीश यांच्या अंमलाखालील प्रदेशाकडे वळवला. सिंगापूर आणि रंगूनचा पाडाव झाला आणि युद्ध भारताच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले. युद्धात प्रत्यक्ष सामील झाल्यानंतर थोडयाच दिवसात अमेरिका आणि चीनच्या सरकारांनी युद्ध प्रयत्नात भारतीय जनतेचे संपूर्ण सहकार्य मिळविण्याच्या कामात विशेष लक्ष घालण्यास सुरवात केली. १९४१ च्या सुरूवातीला सुभाषचंद्र बोस हिंदुस्तानातून निसटले आणि त्यांनी आझाद हिंद फौजेची उभारणी केली. बर्लिनच्या आकाशवाणीवरून भारतीयांना उद्देशून ते जी भाषणे करींत त्यांची हिंदी जनतेच्या मनावर फार परिणाम होऊ लागला. तरीही ब्रिटीशांनी आपले नियंत्रण सैल होऊ दिले नाही. कारण त्यांना हिंदुस्तानावरील आपले साम्राज्य चिरकाल टिकावे असे वाटत होते. रूझवेल्ट बरोबर अटलांटिक सनदेवर सही केली असूनसुद्धा ती सनद फक्त युरोपपुरती मर्यादित असून भारताला ती लागू करण्यात येणार नाही असे चर्चिलने घोषित केले. त्यामुळे भारताप्रमाणेच ब्रिटनमध्येही निषेधाचे वादळ उठले. भारतीय फौजांच्या पराक्रमांची दोस्त राष्ट्रांमध्ये कृतज्ञतापूर्वक प्रशंसा केली जात होती. परंतु हिंदुस्तानातील पेचप्रसंग सुटत नसल्या-मुळे मात्र तेथील जनता गोंधळून गेली होती. ब्रिटिश पार्लमेंटचे काही सभासद त्याच-प्रमाणे तेथील वृत्तपत्रे सरकारच्या हिंदुस्तानविषयक धोरणाबद्दल अधिकाधिक टीका करू लागली होती आणि त्याबाबत सरकारकडून ज्या सबबी पुढे केल्या जात होत्या त्याबद्दलही संशय घेऊ लागली होती शेवटी जनमताच्या दबावामुळे सरकारने जवाहरलाल आणि इतर अनेक नेत्यांची कारावासांतून मुक्तता केली.

प्रतिकात्मक वैयक्तिक सत्याग्रह काँग्रेसने मागे घेतल्यातच जमा होता. हिंदुस्तान जर प्रत्यक्ष युद्धात गोवला गेला तर अहिंसा कितपत परिणामकारक ठरेल याबद्दल गांधीजी आणि काँग्रेस वर्किंग कमेटी यांच्यात तीव्र मतभेद उद्‌भवले होते. गांधींनी सक्रिय राजकारणातून अंग काढून घेतले आणि नेहरूंना आपले उत्तराधिकारी नेमले.

काँग्रेसमध्ये नसलेल्यांनी याचा अर्थ "असा" लावला की, देशातील पेचप्रसंग सोडविण्यासाठी युद्ध प्रयत्नात सहभागी होण्याची काँग्रेसची तयारी असल्याचेच हे द्योतक आहे. सप्रुंनीं आणखी एक अपक्ष परिषद आयोजित केली. भारतातील पेचप्रसंग मिटवून राजकीय तोडगा काढण्याच्या दृष्टीने परिषदेत काही बाबतीत एकमत झाले. सप्रुंनी चर्चिल यांना तार पाठवून ते त्यांच्या कानावर घातले. २६ फेब्रुवारी १९४२ रोजी कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये संरक्षण खाते भारतीयांकडे सोपविण्याची मागणी करणारा कुंझरूंनी मांडलेला ठराव पास झाला. कुंझरूंनी हिंदुस्तानात तावडतोब राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यात यावे अशीही मागणी केली. व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटीव्ह कौन्सिलमध्ये काँग्रेसजनांचा समावेश करण्यात यावा असा लकडा ॲटलीसारखे मजूर पक्षाचे पुढारी सरकारच्या मागे लावीत होते. अमेरिकेतील सर्वसाधारण जनमतही याला अनुकूल असल्याचे ॲटलींनी चर्चिलच्या निदर्शनास आणून दिले. परंतु ७ जानेवारी रोजी ॲटलींना पाठवलेल्या खलित्यात भारतातील परिस्थितीबाबतच्या अमेरिकेतील जनमानसाचा आपल्याला कसलाही अडथळा होणार नाही असे सांगून काँग्रेसवाल्यांना व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात घेण्याची ॲटलींची सूचना चर्चिलनीं फेटाळून लावली. चर्चिलनी ॲटलींना असेही कळविले की, काँग्रेसने प्रांतातील मंत्रिपदे पुन्हा स्वीकारावी आणि जबाबदारीने राज्य कारभार चालवून आपला सद्‌भाव प्रथम सिद्ध करावा. भारतात असताना प्रो. कूपलँड यांनी मध्यवर्ती कायदेमंडळाला व्हाइसरॉयचे एक्झिक्यूटीव्ह कौन्सिल जबाबदार ठेवावे असे लिनलिथगो यांना सुचविले होते. प्रो. कूपलँड यांची ही सूचना अमान्य करताना लिनलिथगो यांनी असा युक्तिवाद केला की, तसे केले तर माझ्या हाती असलेले सर्व अधिकारच काढून घेतल्यासारखे होईल आणि साम्राज्याचा प्रतिनिधी म्हणून संस्थानिकांचे हक्क आणि हितसंबंध अबाधित राखण्याचे माझे कर्तव्य मला पार पाडता येणार नाही.

केंद्र आणि प्रांतिक सरकारात मुसलमानांचे सारखेच प्रतिनिधी असले पाहिजेत असा जो आग्रह जीनांनी धरला तो सरकारच्या पथ्यावरच पडला. इतर पक्षांना जीनांची ही मागणी मान्य होण्यासारखी नसल्याने सरकारला हिंदुस्तानचा कारभार आयताच निरंकुशपणाने चालवता येणार होता. लोकनियुक्त मंत्रिमंडळे अधिकारावर असलेल्या प्रांतात देखील गव्हर्नर त्यांना गुंडाळून ठेवीत असत. प्रशासनाच्या प्रत्येक बाबतीतच गव्हर्नर हस्तक्षेप करीत असल्याबद्दल सिंधचे पंतप्रधान अलाबक्ष यांनी तारीख १९ डिसेंबर १९४१ रोजी प्रांतिक कायदेमंडळात जाहीरपणे खेद व्यक्त केला होता. ज्या बाबतीत गव्हर्नरांवर खास जबाबदारी सोपविण्यात आलेली नाही किंवा ज्यात त्यांनी स्वतःचे मत चालवावे अशी अपेक्षा नाही अशा बाबतही ते हस्तक्षेप करीत असल्याने मंत्रिमंडळाकडे काही अधिकारच उरलेले नाहीत. हेही अल्लाबक्षांनी स्पष्टपणे सांगून टाकले.

तीन महिन्यानंतर तारीख २७ फेब्रुवारी १९४२ रोजी फजलूल हक यांनी बंगाल

कायदेमंडळासमोर अशीच तक्रार मांडली. गव्हर्नरांना एक लांबलचक पत्र पाठवून कारभाराच्या बारीक सारीक बाबतीतही ते हस्तक्षेप करतात, आपल्याला दुष्काळ-ग्रस्त भागांना भेटी देण्यासही हरकत घेतात, मंत्रिमंडळाला अंधारात ठेवून अधिकाऱ्यांना आदेश देतात, ज्या अधिकाऱ्याकडून प्रमाद घडला असेल, त्याची चौकशी करण्यास किंवा त्यांच्याकडून पंतप्रधान म्हणून खुलासा मागण्यास आपल्याला व्यत्यय आणतात. खेडुतांवर अत्याचार करण्यासारखे अपराध त्यांच्याकडून झालेले असताना देखील त्यांना पाठीशी घालतात अशा प्रकारच्या तक्रारी त्यांनी त्यात नमूद केल्या होत्या.

युद्ध समाप्तीनंतरही त्रिपक्षीय समझोता होता येईल तितका लांबवता यावा अशा धोरणाने आपली पाकिस्तानची मागणी मुद्दामच संदिग्ध ठेवली होती. मध्यस्तीच्या कोणत्याही प्रयत्नांशी ते करीत आलेला असहकार आणि जो कोणी राजकीय प्रगती घडवून आणण्याची सूचना करील त्याची निर्भत्सना करणारी त्यांची निवेदने सप्रू परिषदेने किंवा चीनच्या आणि अमेरिकेच्या नेत्यांनी केलेल्या गैरसोयींच्या मागण्यांना काटशह देण्याला चांगलीच उपयोगी पडण्यासारखी होती. १९४२ च्या सुरुवातीला मार्शल चँग कै शेक यांनी भारताला भेट दिली. भारतातील जनमत जपानविरूद्ध संघटित करणे हा त्यांच्या या भेटीमागचा उद्देश होता. आपल्या दौऱ्याच्या अखेरीस भारताला खरीखुरी राजकीय सत्ता आणि स्वातंत्र्य बहाल करण्यात यावे अशा आशयाचे आवाहन त्यांनी सरकारला केले. परंतु लगेच तारीख २२ फेब्रुवारी रोजी मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीची बैठक होऊन ब्रिटिश सरकारने सप्रू परिषदेच्या मागण्या मंजूर केल्या तर मुस्लीम हिंदुस्तान त्याविरूद्ध बंड करून उठेल असा धाक दाखवणारा ठराव पास केला. याच दिवशी एक पत्रक प्रसिद्ध करून चँग कै शेक यांनी केलेल्या सूचनाबद्दल जीनांनी त्याच्यावर टीका केली.

जेव्हा रूझवेल्ट हे देखील भारताला राजकीय सुधारणा देण्याचा चर्चिलपाशी आग्रह धरू लागले, त्यावेळी ४ मार्च रोजी चर्चिल यांनी त्यांना एक पत्र पाठवून असे कळविले की, 'दहा कोटी लोकसंख्या असलेल्या आणि तातडीच्या युद्ध कार्यात विसंबून राहावे लागणार आहे अशा भारतीय फौजेतील एक महत्त्वाचा घटक असलेल्या मुसलमानांशी फटकून वागणे ब्रिटिश सरकारला परवडण्यासारखे नाही. त्याचप्रमाणे आम्हाला ३ ते ४ कोटी दलीत समाजाबद्दलचे आमचे कर्तव्य विसरून चालणार नाही तसेच संस्थानिकांशी आमचे जे करारमदार झाले आहेत त्यांकडेही पाठ फिरविता येणार नाही. साहजिकच शत्रूच्या फौजा उंबरठ्यापर्यंत आल्या असताना आम्हाला हिंदुस्तानात गोंधळाची परिस्थिती निर्माण व्हावयाला नको आहे, या पत्रासोबत चर्चिल यांनी त्यांना आलेल्या जीना आणि सर फिरोज खान नून यांच्या पत्राच्या नकलाही जोडल्या होत्या. जीनांनी आपल्या पत्रांत सप्रू परिषदेतील पुढाऱ्यांची काँग्रेसचे हस्तक म्हणून संभावना केली होती आणि संप्रूंनी केलेल्या सूचना राष्ट्रद्रोही

आहेत असे म्हटले होते. आणि सरकार जर त्या सापळ्यात सापडले तर मुस्लीम हिंदुस्तानवर विशेषत: युद्धप्रयत्नांच्या दृष्टीने त्याचे अत्यंत विघातक परिणाम घडून येतील असे बजावले होते. नून यांनी तारीख २८ फेब्रुवारीच्या आपल्या पत्रात असे मत व्यक्त केले होते की सप्रू परिषद ही मुळात अपक्ष परिषद नसून ती हिंदूंच्या पक्षांचीच परिषद आहे. युद्ध चालू असताना भारताला वसाहतीचा दर्जा मिळू शकला नाही तर सध्याच्या घटनेप्रमाणे भारत सरकारचा कारभार तरी निदान आपल्या हाती यावा आणि अशा रीतीने हिंदू राज्य ताबडतोब प्रस्थापित व्हावे हा या परिषदेच्या प्रवर्तकांचा डाव आहे. ब्रिटिश सरकार हळूहळू या वाचाळ पक्षाच्या आंदोलनापुढे नमते घेत असून मुसलमान, संस्थानिक आणि इतर अल्पसंख्यांक यांना त्यांनी आजवर जी आश्वासने दिली आहेत ती वाऱ्यावर सोडून देणार आहे अशी आजच्या परिस्थितीत मुसलमान समाजाला कमालीची धास्ती वाटत आहे. संबंध मंत्रिमंडळाचे ताबडतोब भारतीयीकरण करण्यात आले तर बहुसंख्य हिंदूंनी कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला तर अल्पसंख्यांकांनी ज्याच्यावर सहाय्यासाठी विसंबून राहावे त्या युरोपियांनाना मंत्रिमंडळात अजिबात स्थानच राहणार नाही. मुसलमानांना मंत्रिमंडळात ५० टक्के जागा मिळाल्या पाहिजेत अशी मागणी करून नून यांनी आपल्या पत्रात पुढे असे बजावले होते की, यदा कदाचित हिदुस्तानला वसाहतीचा दर्जा देण्याची घोषणा करण्याचा सरकार विचार करीत असेल तर त्या बरोबरच मुसलमानांची पाकिस्तानची मागणी मान्य करण्यात येत असल्याचेही जाहीर करण्यात आले पाहिजे.

ब्रिटिश सरकारची एक नवी योजना घेऊन क्रिप्स यांना भारतात पाठविले जात आहे असे ज्यावेळी लिनलिथगो यांना समजले त्यावेळी आजवरच्या ब्रिटिश धोरणात मूलभूत फरक झाला आहे असा ग्रह करून त्यांनी आपल्या पदाचा राजिनामा देण्याची तयारी दाखविली. परंतु मूलभूत धोरणात बदल करण्याचा प्रश्न नसून सरकारवर चहूकडून जे दडपण येत आहे त्यामुळे हा पवित्रा घ्यावा लागत आहे अशीअमेरींनी त्यांची समजूत काढली, आणि राजीनामा देण्यापासून त्यांना परावृत्त केले. अमेरींनी लिनलिथगोंना अशी खात्री दिली की, जी नवी योजना घेऊन क्रिप्स भारतास जात होते ती काँग्रेस मान्य करणे शक्य नाही. क्रिप्स योजनेनुसार सप्रूंना अभिप्रेत असलेले सरकार तर अस्तित्वात येणार नाहीच, उलट तिच्यात पाकिस्तानची बीजे आहेत असे ज्यावेळी काँग्रेसच्या नेत्यांना समजून येईल त्यावेळी तर काँग्रेसवाल्यांची प्रतिक्रिया अधिकच कडवी बनेल. काँग्रेस तर ही योजना स्वीकारणार नाही परंतु आपल्याला मात्र हिंदुस्तानचा प्रश्न सोडविण्याची मनापासून सदिच्छा असली तरी तो किती बिकट आहे हे जगाला दाखवून देता येईल आणि मग आपल्या सदभावाविषयी कोणी शंका घेणार नाही. क्रिप्स हे स्वत: समाजवादी आणि काँग्रेसबद्दल अनुकूल ग्रह असलेले असताना देखील त्यांच्याकरवी आपली धोरणे भारतीय पुढाऱ्यांच्या गळी उतरविण्यास क्रिप्सना तयार करण्याची अवघड गोष्ट शक्य केल्याचे

श्रेय चर्चिल आणि अमेरींना द्यावे लागते. अमेरींनी व्हाइसरॉयपाशी असा खुलासा केला की स्वतः ही जबाबदारी पत्करण्याएवजी आम्ही मुद्दामच क्रिप्सना पुढे केले आहे. कारण माझ्यामुळे भारतीयांच्या मनात जो संशय निर्माण झाला असता तो अत्यंत जहाल म्हणून ओळखले जाणारे आणि काँग्रेस आणि नेहरू यांच्या अगदी निकट असलेले क्रिप्स मूलतः हुजूर पक्षाच्या धोरणाचा मसुदा घेऊन तिकडे आले तर राहणार नाही. स्वतः जीनांची भेट घेऊन क्रिप्स यांच्यासंबंधीची कसलीही भीती बाळगण्याचे कारण नाही हे त्यांना पटवून द्यावे, असाही सल्ला अमेरींनी लिनलिथगोना दिला. क्रिप्स यांची जीनांच्या बरोबर पहिली भेट झाली त्यावेळी दोन वर्षापूर्वी पाकिस्तानची मागणी म्हणजे निव्वळ स्वप्नाळूपणा आहे असे जें त्यांनी भाष्य केले होते त्याबाबत प्रथम सारवसारव करून मगच त्यांना मुख्य मुद्याला हात घालावा लागला. क्रिप्स यांचे भारतात आगमन झाले त्याच्या दुसऱ्याच दिवशी मुस्लीम लीगतर्फे सर्व देशभर 'पाकिस्तान दिन' पाळण्यात आला होता. त्यानिमित्त केलेल्या भाषणात जीनांनीं आपल्या श्रोत्यांना असे सांगितले की, क्रिप्स हे जरी काँग्रेसचे मित्र असले तरी त्यामुळे आपल्याला भीती बाळगण्याचे काहीच कारण नाही. कारण भारतला त्यांची भेट वैयक्तिक स्वरूपाची नसून ब्रिटिश मंत्रिमंडळाचे आदेश घेऊनच ते येथे आले आहेत.

ब्रिटिश युद्ध मंत्रिमंडळाची म्हणून जी योजना घेऊन क्रिप्स हिंदुस्तानात आले तिचे दोन भाग पाडता येतात. पहिला युद्ध चालू असे पर्यंतचा आणि दुसरा युद्ध समाप्तीनंतरचा. युद्ध संपेपर्यंत दोस्त राष्ट्रांच्या युद्ध प्रयत्नाचा एक भाग म्हणून हिंदुस्तानच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी ग्रेट ब्रिटनवर राहणार असल्यामुळे संरक्षणाची दिशा आणि नियंत्रण ग्रेट ब्रिटनच्या हातात राहील. तथापि देशातल्या, ब्रिटिश कॉमनवेल्थच्या आणि दोस्त राष्ट्रांच्या समित्यांत सहभागी होऊन भारतातील सर्व साधनसामग्री आणि जनमत युद्ध प्रयत्नाशी संघटित करण्यास मदत करावी असे आवाहन ब्रिटिश सरकारने सर्व पुढाऱ्यांना आणि पक्षांना केले. क्रिप्स यांनी हे स्पष्ट केले की सध्याच्या घटनेत बसू शकेल इतक्या मर्यादेपर्यंत व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाची द्वारे भारतातील राजकीय पक्षांच्या नेत्यांना खुली राहतील आणि साधनसामग्री संघटित करण्याच्या कामी ते प्रत्यक्ष भाग घेऊ शकतील. संरक्षण खाते सध्याप्रमाणेच सर-सेनापतींच्या हाती राहील. विद्यमान घटनेतील तरतुदीनुसार व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद हे व्हाइसरॉयलाच जबाबदार राहतील. युद्ध संपल्याबरोबर प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका घेतल्या जातील आणि अशा सर्व सभासदांचा मिळून होणारा मतदार संघ प्रमाणशील प्रतिनिधित्त्वाच्या पद्धतीनुसार घटना समितीच्या सभासदांची निवड करील. साधारणपणे प्रांतिक कायदेमंडळाच्या दर दहा सभासदांमागे घटना समितीवर एक सभासद निवडून पाठवला जाईल संस्थानिकांना आपल्या वतीने घटना समितीवर सभासद नियुक्त करण्याचा अधिकार

राहील. आणि साधारणपणे ब्रिटिश हिंदुस्तानातील लोकसंख्येचे जे प्रमाण घटना समितीवरील प्रतिनिधीत्वासाठी ठरवून दिले असेल तेच प्रमाण संस्थानिकांच्या बाबतीतही राहील. अशा संस्थानी प्रतिनिधींना घटना समितीत ब्रिटिश हिंदुस्तानातील प्रतिनिधींइतकेच हक्क व अधिकार राहतील. या तऱ्हेने निवडण्यात आलेल्या घटना समितीला भारताची नवी घटना बनविण्याचा अधिकार असेल आणि पुढील दोन अटींवर ब्रिटिश सरकार ती घटना अमलात आणण्याची हमी घेईल.

(१) भारताच्या नव्या संघराज्यात सामील न होण्याचा कोठल्याही प्रांताला किंवा संस्थानाला अधिकार राहील. सामील न होणाऱ्या घटकांना ब्रिटिश सरकार स्वतःची स्वतंत्र घटना बनवण्यासाठी सारख्या सवलती उपलब्ध करून देईल आणि हिंदी संघराज्याचाच दर्जा त्यांनाही दिला जाईल.

(२) अशा तऱ्हेने अस्तित्वात येणाऱ्या एक किंवा अनेक घटना समित्यांबरोबर ब्रिटिश सरकार जो करार करील, त्यात वांशिक आणि धार्मिक अल्पसंख्यांकांच्या संरक्षणासाठी ब्रिटिश सरकारने पूर्वी जी हमी दिली आहे तिची तरतूद असेल.

मुख्य घटना समितीने तयार केलेल्या घटनेला प्रत्येक प्रांताची मंजुरी व संघराज्यात सामील होण्याबद्दलची संमती मिळवावी लागेल. संघराज्यात सामील होण्याच्या अथवा न होण्याच्या निर्णयास प्रांतिक कायदेमंडळातील सभासदांच्या ६० टक्क्यांपेक्षा कमी मते पडली असतील तर ज्यांनी अशा निर्णयास विरोध दर्शविला असेल त्यांना त्या प्रश्नावर सार्वमताचा आग्रह धरता येईल. आणि सार्वमताच्या वेळी मात्र साध्या बहुमताने घेण्यात आलेला निर्णय बंधनकारक राहील. संस्थानिकांना संघराज्यात सामील होण्याची अथवा बाहेर राहाण्याची मुभा राहील. जे संस्थानिक सामील होणार नाहीत त्यांच्या बाबतीत ब्रिटिश सरकार अधिसत्ता म्हणून पूर्वीप्रमाणेच त्यांच्याबरोबर केलेल्या करारमदारांचे पालन करण्याची हमी घेईल.

तारीख २४ मार्च रोजी लिनलिथगोना पाठविलेल्या खलित्यात या योजनेमुळे काय काय परिणाम घडून येऊ शकतील त्यांचा उहापोह करताना अमेरींनी असा अंदाज व्यक्त केला की, ब्रिटिश हिंदुस्तानातील हिंदु विभाग एकत्र राहिला तरी वायव्येला आणि इशान्येला मुसलमान प्रदेश, सर्व देशी संस्थाने, ब्रिटिश सरकारच्या सरळ अधिपत्याखालचे काही डोंगरी विभाग अशा अनेक स्वतंत्र राज्यात हिंदुस्तानचे विभाजन होईल आणि त्यापैकी बहुतेक अत्यंत लहान व दुर्बल राहणार असल्याने त्यांना स्वतःचे सैन्य, आरमार आणि विमानदळ ठेवणे मध्यवर्ती राखीव फंडातून परवडणार नाही, त्यामुळें काही विमानतळ, बंदरे आणि कॅन्टोन्मेंटस आपल्या ताब्यात ठेवून संरक्षण यंत्रणा कोणाला तरी आपल्या हाती ठेवावी लागेल. आणि त्यासंबंधीची तजवीज स्वतंत्रपण कोणत्याही एका कायदेमंडळाबरोबर करून चालणार नाही तर प्रत्येक स्वतंत्र कायदेमंडळांनी निवडलेल्या शिष्टमंडळाबरोबर करावी लागेल. शिवाय दीर्घकाळपर्यंत व्हाइसरॉय हा केवळ घटनात्मक गव्हर्नर जनरलच नव्हे तर साम्राज्य

सरकारच्या व्यापक हितसंबंधाचा प्रतिनिधी म्हणूनही त्याला काम पहावे लागेल. मात्र घटना बनविण्याचा अशा प्रकारचा प्रयोग करताना दिल्ली आणि तिच्या आस-पासचा बराच मोठा विभाग कोणत्याही एका राज्याच्या ताब्यात जाणार नाही अशी दक्षता घेण्याची खास सूचना अमेरींनी लिनलिथगोंना केली होती.

त्याच दिवशी म्हणजे तारीख २४ मार्चला क्रिप्सनी योजनेचा तपशील व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलवरील सभासदांना समजाऊन सांगितला. हैद्राबाद संस्था-नला मुस्लीमबहुसंख्य प्रांतांनी बनविलेल्या स्वतंत्र राज्यात सामील होता येईल का, असा प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी त्याचे स्पष्टपणे हो असे उत्तर दिले. मुसलमान संस्थानिकांना स्वतंत्र राहण्याचा इतकेच नव्हे तर वाटल्यास स्वतःचे महासंघ राज्य बन-विण्याचा अधिकार देण्याची तरतूद योजनेत आधीच करून ठेवण्यात आली होती. ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या योजनेत वायव्य सरहद्द प्रांत, सिंध आणि पंजाब यांचे एक महासंघ-राज्य अस्तित्वात येण्याची शक्यता गृहीत धरलेली होती. १९४१ च्या शिरगणतीनुसार या महासंघराज्यात १८.४ दश लक्ष मुसलमान आणि ७.४ दश लक्ष बिगरमुसलमान अशी संमिश्र लोकसंख्या राहणार होती. आणि मुसलमान संस्थानिकांनी स्वतंत्र महा-संघ राज्य बनविण्याचे ठरविले तर, त्यांत ३.३ दशलक्षमुसलमान आणि १४.२ दशलक्ष बिगर मुसलमान लोकसंख्येच्या समावेश झाला असता. त्याशिवाय स्वतंत्र बंगाल राज्याची लोकसंख्या २७.५ दशलक्ष मुसलमान आणि २१.५ दशलक्ष बिगर मुसलमान इतकी असतील.

या योजनेनुसार मुसलमानांच्या जे पदरात पडणार होते ते जीनांच्या अपेक्षेपेक्षाही जास्त होते आणि म्हणून क्रिप्स बरोबरच्या पहिल्या भेटीत त्यांनी ही योजना आप-ल्याला संपूर्ण समाधानकारक वाटते सांगून टाकले. क्रिप्सचे आगमन झाल्यानंतर काही दिवसांनी योजनेचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला तोपर्यंत तो प्रसिद्ध झालेला नव्हता. जीनांच्या सूचनेवरून त्यांत काही फेरबदल करण्यात आला.

अशा तऱ्हेने घटना समिती स्थापन होण्यापूर्वीच प्रांतांना तिच्या बाहेर रहाण्याची मुभा देण्यात आली. दोन दिवसानंतर जीनांनी क्रिप्सची पुन्हा भेट घेतली. त्यांच्या भेटीनंतर क्रिप्स यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात असे म्हटले होते की, "जीनांनी जी भूमिका मांडली त्यावरून त्यांच्या कमेटीने (मुस्लिम लीग वर्किंग कमेटीने) योजनेला आधीच मान्यता दिलेली आहे हे स्पष्ट झाले." त्याच दिवशी सिकंदर हयात खान यांनी क्रिप्सची भेट घेऊन लीगने त्यांची योजना सर्वसाधारणपणे स्वीकारण्याचा निर्णय घेतला असून व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात सहभागी होण्याची तिची तयारी आहे अशी माहिती खाजगीरीत्या त्यांना दिली. कारण लीगने घेतलेला हा निर्णय गुलदस्तात ठेवण्यात आला होता.

लीग व्यतिरिक्त बहुतेक सर्व पक्ष प्रांतांना भारतीय संघराज्यात सामील न होण्याची मुभा देण्यात आल्यामुळे असमाधानी होते. काँग्रेस पुढाऱ्यांनीही याविषयीचे आपले

असमाधान व्यक्त केले. परंतु त्यांनी हा मुद्दा ताणून धरला नाही. काँग्रेस वर्किंग कमेटीचा २ एप्रिलचा ठराव या संदर्भात म्हणतोः—

प्रांतांनी सामील न होण्याच्या तत्वाला आधीच मान्यता देण्यात आल्यामुळे भारतीय ऐक्याच्या संकल्पनेवर फार मोठा आघात होणार असून त्यामुळे प्रांतात वाढत्या कटकटी निर्माण होऊन जी संस्थाने भारतीय संघराज्यात सामील होऊ इच्छितात त्यांच्या मार्गातही अडथळे येण्याचा संभव आहे. भारताचे स्वातंत्र्य आणि ऐक्य यांना काँग्रेस बांधलेली असून या ऐक्याला बाधा आणणाऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार करणेदेखील घातक आणि दुःखद ठरणार आहे. तथापि काँग्रेस वर्किंग कमेटी कोणत्याही प्रदेशातील जनतेला तिच्या मर्जीविरुद्ध सक्तीने भारतीय संघराज्यात डांबून ठेवण्याचे मनातही आणू शकत नाही. परंतु तिची अशी धारणा आहे की, निरनिराळ्या घटक राज्यात समान आणि परस्पर सहकार्यावर आधारलेले राष्ट्रीय जीवन विकसित होत जाईल अशा तऱ्हेचे वातावरण निर्माण करण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

यावरून हे स्पष्ट झाले होते की, या गोष्टीला काँग्रेसने आक्षेप घेतला असला तरी तिने ती बाब समझोता घडवून येण्याच्या आड येण्याइतकी प्रतिष्ठेची केली नव्हती. तथापि संस्थानिकांना घटना समितीवर आपल्या पसंतीचे सभासद नियुक्त करण्याचा जो अधिकार बहाल करण्यात आला होता त्याला मात्र तिचा ठाम विरोध होता. नजिकच्या भविष्य काळात खरी जबाबदारी केंद्राकडे सोपविली जाणार नव्हती एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल अजूनही व्हाइसरॉयलाच जबाबदार रहाणार होते आणि संरक्षण खातेही सर्वस्वी ब्रिटिशांच्याच हाती रहाणार होते. या सर्व गोष्टी काँग्रेसला पसंत नव्हत्या.

भारतीय नेत्यांबरोबर क्रिप्स यांची जी बोलणी चालू होती त्याकडे अमेरिकन सरकारचे बारीक लक्ष होते. दोस्त राष्ट्रांचे हेतू तडीस नेण्याच्या दृष्टीने शस्त्रास्त्र निर्मितीबाबत या देशाची औद्योगिक क्षमता किती आहे ते अजमावून पाहण्यासाठी १९४२ च्या सुरुवातीला जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेचे एक शिष्टमंडळ भारतात आले होते. प्रेसिडेंट रुझवेल्ट यांचे दिल्लीतील खास दूत म्हणूनही जॉन्सन यांचीच नियुक्ती झालेली होती. वाटाघाटींच्या अखेरच्या अवस्थेत क्रिप्स यांना सहाय्य करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. त्यांची काँग्रेस पुढाऱ्याबरोबरही बोलणी झाली आणि एक प्रामाणिक मध्यस्थ असा त्यांच्या विषयीचा अभिप्राय काँग्रेसजनांनी व्यक्त केला होता. परंतु क्रिप्स शिष्टाई फसल्यानंतर त्यांना तावडतोब माघारी पाठवण्यात आले. क्रिप्स शिष्टाईच्या काळात त्यांचे आणि भारतातील वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांचे संबंध इतके बिघडले की, क्रिप्स शिष्टाईसंबंधी आपले स्वतंत्र भाष्य प्रसिद्ध करण्याची धमकी देण्यासही जॉन्सन यांनी कमी केले नाही.

क्रिप्स यांचे काँग्रेस पुढाऱ्यांबरोबर समझोता घडवून आणण्याचे प्रयत्न चालू असतानाच मुस्लीम लीगचे रीतसर अधिवेशन अलाहाबाद येथे ३ एप्रिलपासून सुरू झाले होते. द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत आणि पाकिस्तानची मागणी या नेहमीच्या मुद्यांचा उहापोह केल्यानंतर जीनांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाचा बराचसा भाग क्रिप्स योजना काय आहे ते समजाऊन सांगण्यात खर्ची घातला. योजनेत पाकिस्तानची शक्यता अभिप्रेत असली तरी मुस्लीम राष्ट्राचे अस्तित्व आणि एकात्मता तिच्यात मान्य करण्यात आलेली नाही. नियोजित घटना समिती राखीव मतदार संघाऐवजी अकरा प्रांतिक कायदेमंडळातील सभासदांच्या संयुक्त मतदार संघातून प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार निवडण्यात येणार असल्याचे सांगून जीनांनी असे म्हटले की, त्यामुळे घटना समितीत मुसलमानांना २५ टक्क्याहून अधिक प्रतिनिधित्व मिळू शकणार नाही. म्हणजे प्रचंड बहुमत असलेले हिंदूच भारतीय संघराज्याची घटना बनवणार. अर्थात घटना समितीत सामील न होण्याची तरतूद योजनेत आहे. परंतु एखाद्या कायदेमंडळात घटना समितीत सामील न होण्याच्या ठरावाला ६० टक्के मते पडली नाहीत तर सार्वमत घेण्याची जी तरतूद योजनेने करून ठेवली आहे तिच्यावर जीनांनी तीव्र आक्षेप घेतला. त्यामुळे पंजाब व बंगाल मधल्या मुसलमानांना हिंदूंवर अवलंबून राहावे लागेल आणि ते कदाचित त्यांना हिंदी संघराज्यात फरफटत नेतील अशी भीति जीनांनी व्यक्त केली.

भाषणाच्या शेवटी पाकिस्तान आणि मुसलमानांचा स्वयंनिर्णयाचा हक्क ही दोन तत्वे खऱ्या अर्थाने अमलात यावीत म्हणून योजनेत जरूर तो फेरबदल करण्याचे जीनांनी ब्रिटिश सरकार आणि सर स्टॅन्फोर्ड क्रिप्स यांना आवाहन केले.

४ एप्रिल रोजी क्रिप्स यांनी चर्चिलना तार पाठवून असे कळविले की, मुस्लिम-लीग ही सर्वसाधारणपणे योजना स्वीकारावयाला अनुकूल असली तरी काँग्रेसमध्ये मात्र या प्रश्नावर तीन तट पडले आहेत. गांधींचा गट योजना संपूर्णपणे फेटाळावी असे म्हणणारा आहे. दुसऱ्या गटाचा विरोध संरक्षण, घटना समितीत सामील न होण्याचा अधिकार आणि संस्थानिकांना आपल्या पसंतीच्या व्यक्तींची घटना समितीवर नियुक्ती करण्याचा हक्क एवढ्यापुरताच मर्यादित आहे आणि तिसरा गट संरक्षण खात्याबाबत समाधानकारक तडजोड निघाली तर योजना राबवायला तयार आहे. काही करून काँग्रेसबरोबर तडजोड घडवून आणावयास क्रिप्स इतके उतावीळ झाले होते की, त्यांना ज्या सूचना देण्यात आल्या होत्या त्याच्याही पुढे जाऊन त्यांनी गृह आणि अर्थ ही दोन खाती भारतीय पक्षांच्या प्रतिनिधीकडे सोपविण्याची तयारी दर्शविली आणि व्हाइसरॉय आणि त्यांचे कार्यकारी मंडळ यांच्या दरम्यानचे संबंध कसे असावेत याविषयी काही संकेत रूढ करता येतील असेही सुचविले. परंतु लिनलिथगोंनी त्याला जोराचा आक्षेप घेतला. आजपर्यंत ब्रिटिश सनदी नोकरांकडे असलेली गृह आणि अर्थ ही दोन महत्त्वाची खाती आपल्याला

अंधारात ठेवून काढून घेतली जात आहेत याचा त्यांना राग आला. याबाबत त्यांनी तक्रार नोंदविली. त्यावेळी चर्चिल आणि त्यांचे मंत्रिमंडळ हे देखील गडबडून गेले. व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे संपूर्ण भारतीयीकरण करावे किंवा ही महत्त्वाची खाती भारतातील राजकीय नेत्यांच्या हाती सोपवावीत असे ब्रिटिश सरकारला मनापासून कधी वाटतच नव्हते. आपल्या कार्यकारिणीतील सभासदांबरोबरच्या संबंधा-बाबत काही संकेत रुढ करण्याच्या कल्पनेमुळेही लिन्लिथगो अस्वस्थ झाले होते. त्यांची तक्रार अशी होती की, गव्हर्नर जनरल म्हणून त्यांचे जे स्थान आहे त्यावर यामुळे मर्यादा पडतात आणि कार्यकारी मंडळाच्या सभासदांशी मतभेद झाल्यास आपला शब्द निर्णायक ठरण्याचा अधिकार डावलला जातो. या दोन्ही मुद्यांवर ब्रिटिश मंत्रिमंडळाने लिनलिथगो यांचीच बाजू उचलून धरली.

संरक्षण खात्याबाबत काही तडजोडीसाठी कॉंग्रेसला राजी करण्याचे क्रिप्स यांचे प्रयत्न असफल ठरले. क्रिप्स योजनेबाबत कॉंग्रेस कोणती भूमिका घेते इकडे लक्ष लावून बसलेल्या मुस्लीमलीगच्या वर्किंग कमेटीने कॉंग्रेसने ती योजना फेटाळून लावल्या-बरोबर आपल्या बैठकीत एक ठराव पास केला. हिंदुस्तानची भावी राज्य घटना कशी असावी यासंबंधीची मूलभूत तत्वे ग्रंथित करणाऱ्या योजनेत कसलाही फेरफार करण्यास अजिबात वाव नसावा याबाबत खेद व्यक्त करून पाकिस्तानच्या तत्वाला अप्रत्यक्षत: मान्यता देण्यात आली आहे ही अत्यंत समाधानाची गोष्ट असली तरी लीगला ती योजना स्वीकारता येत नाही असे त्या ठरावात म्हटले होते. सर्व प्रांतिक कायदेमंडळातील सभासदांचा मिळून एकच निर्वाचक गट बनविण्यात आल्याबद्दल ठरावात आक्षेप घेतला गेला होता. कारण त्यामुळे राखीव मतदार संघांच्याद्वारा आपले प्रतिनिधी निवडण्याचा मुसलमानांचा मूलभूत हक्क डावलला जातो असा युक्तिवाद त्यासंबंधात करण्यात आला होता. भारतीय संघराज्यात सामील न होण्याची जी तरतूद क्रिप्स योजनेत होती त्याबाबत ठरावात असे म्हटले होते की, मुस्लिम बहुसंख्य प्रांताच्या कायदेमंडळाच्या स्वरुपामुळे त्या कायदेमंडळातून निर्विवादपणे पाकिस्तानला अनुकूल असा कौल मिळणे अत्यंत कठीण होऊन बसणार आहे. बंगाल आणि पंजाब कायदेमंडळात मुसलमान अल्पसंख्य आहेत तर सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतातील कायदेमंडळांची सभासद संख्याच फार कमी आहे. संघराज्यात सामील होण्याच्या बाबतीत विशिष्ट प्रमाणात मते न पडल्यास सार्वमताची जी तरतूद योजनेत करून ठेवण्यात आली होती त्या संबंधात ठराव म्हणतो की, हे सार्वमत फक्त मुसलमान नागरिकांचे न घेता सर्व प्रौढ नागरिकांचे घ्यावयाचे असल्यामुळे मुसलमानांचा स्वयंनिर्णयाचा स्वाभाविक हक्कच नाकारला जातो.

इतर पक्ष आणि हितसंबंधीय यांच्यापैकी हिंदूमहासभेने प्रांतांना संघराज्यात सामील न होण्याचा अधिकार देण्यात आल्यामुळे ती योजना लगेच फेटाळून लावली. सप्रू आणि जयकर यांना सामील न होण्याच्या ठरावाला प्रांतिक कायदेमंडळातील

युरोपीय सभासदांसकट एकूण ६५ टक्के मते पडली पाहिजेत अशी दुरुस्ती हवी होती.

नरेन्द्र मंडळाच्या (चेंबर ऑफ प्रिन्सेस) शिष्टमंडळाने मार्च महिन्यात क्रिप्स यांची भेट घेऊन त्यांच्याकडून काही बाबतीत स्पष्टीकरण मागितले. त्यावर क्रिप्स यांनी असा खुलासा केला की, संस्थानिकांबरोबर झालेले करारनामे दोन प्रकारचे आहेत. पहिल्या प्रकारात अधिसत्तेबाबतचे करार मोडतात तर दुसरे व्यापार आणि इतर आर्थिक बाबींसंबंधीचे आहेत. हे दुसऱ्या प्रकारचे करार नव्या संघराज्याच्या सरकारबरोबर नव्याने करून घ्यावे लागतील. तथापि, अधिसत्तेसंबंधीचे जे तहनामे असतील ते मात्र चालू राहतील आणि साम्राज्य सरकार ब्रिटिश भारतातून निघून गेल्यावरही त्यातील शर्तींनुसार संस्थानिकांचे रक्षण करण्यास ते बांधलेले राहील. गव्हर्नर जनरल आणि व्हाइसरॉय ही पदे दोन स्वतंत्र व्यक्तींच्या हाती राहतील आणि व्हाइसरॉयच्या कचेरीसाठी संस्थानिकांना वेगळी जागा उपलब्ध करून द्यावी लागेल. त्याचप्रमाणे जरूरीनुसार संस्थानी प्रदेशात ब्रिटिश सैन्याची ने-आण करणे इ. बाबत नव्या संघराज्याबरोबर होणाऱ्या तहनाम्यात व्यवस्था करून ठेवावी लागेल. जोपर्यंत सिलोन ब्रिटिशांच्या ताब्यात आहे आणि काही संस्थानांतील विमानतळावर त्यांचे नियंत्रण आहे तोपर्यंत आरमार आणि वायुदळ यांच्याबाबत त्यांना कसलीही अडचण उपस्थित होणार नाही. अमेरी यांच्याप्रमाणेच क्रिप्स हेही असे धरून चालले होते की, "संस्थानिकांसंबंधीची कर्तव्ये" पार पाडण्यासाठी ब्रिटिशांना हिंदुस्तानात बराच काळपर्यंत प्रत्यक्ष वास्तव्य करावे लागेल. निझामाचे दिवाण छतारीचे नबाब यांनी दिनांक ३ एप्रिल रोजी क्रिप्स यांना पत्र पाठवून असे कळवले की, ब्रिटिशांनी मांडलेली योजना न्याय्य आहे परंतु १७६६ मध्ये ब्रिटिश हिंदुस्तानला जोडलेले काही जिल्हे, १८०० साली समाविष्ट केलेला उत्तर सरकार विभाग आणि १८५३ साली घेतलेला वऱ्हाड या प्रदेशांच्या भवितव्याचा प्रश्न उपस्थित करण्याचा निजामसाहेबांना हक्क असला पाहिजे. हैद्राबाद राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने हे प्रदेश अत्यंत महत्त्वाचे आहेत असा छतारींच्या नवाबांनी दावा केला.

सरदार बलदेवसिंग, मास्टर तारासिंग, सरदार जोगेन्दसिंग, सरदार उज्जल सिंग आणि सरदार मोहन सिंग यांचा समावेश असलेल्या शीख पक्षांच्या समितीने क्रिप्स यांना असे सांगितले की, भारतीय संघराज्यापासून पंजाब अलग करण्याला शीख समाज सर्व शक्तीनिशी विरोध करील. तथापि, पंजाबची फाळणी करून अंबाला आणि जालंदर हे विभाग आणि अमृतसर, गुरुदासपूर आणि लाहोर या जिल्ह्यांचा स्वतंत्र प्रांत बनविण्यात आला आणि शीखांच्या इतर मागण्या मान्य करण्यात आल्या तर शीख समाज ही योजना स्वीकारावयास तयार होईल. व्हाइसरॉयच्या विस्तारित एक्झिक्यूटिव्ह कॉन्सिलवर शीखांचा एकही प्रतिनिधी घेण्यात आला नाही याबद्दलही समितीने आपला निषेध नोंदविला.

डॉ. आंबेडकर आणि एम. सी. राजा यांनी दिनांक ३० मार्च आणि १ एप्रिल रोजी क्रिप्स यांची भेट घेऊन त्यांच्यापुढे अशी तक्रार नोंदविली की, या योजनेमुळे दलितवर्गाची कमालीची हानी होणार असून ते हिंदू राज्याच्या जोखडाखाली जखडले जाणार आहेत. दलित वर्गाचा वांशिक आणि धार्मिक अल्पसंख्यांकात समावेश केला जाईल आणि त्यांच्या संरक्षणाबाबत ब्रिटिश सरकार आणि घटना समिती यांच्या दरम्यान खास करार घडवून आणला जाईल असे आश्वासन त्यांना क्रिप्स यांच्याकडून हवे होते. यावर क्रिप्स यांनी असा खुलासा केला की, ब्रिटिश सरकारचा हिंदुस्तान-बरोबर जो करार होईल त्यात राष्ट्रसंघाच्या अल्पसंख्यांकाविषयीच्या तहनाम्याच्या धर्तीवर काही तरतुदी केल्या जातील. आणि घटनेत याविषयी खास तरतुदी असतील त्या कायम ठेवल्या जातील. शिवाय याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो एखाद्या त्रयस्थाकडे सोपविण्यात यावा आणि तो जो निवाडा देईल तो हिंदुस्तानने बंधनकारक मानावा असे निर्बंध घालण्यात येतील आणि जर भारताने या शर्तीचा भंग केला तर ब्रिटिश सरकार योग्य ते पाऊल उचलील. आपली सत्ता गेल्यानंतरही ब्रिटिश सरकार अल्पसंख्यांकांबाबतचे कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी कायमची आपल्या हाती ठेवू पाहात होते असाच याचा अर्थ होतो. डॉ. आंबेडकर आणि राजा यांचे क्रिप्स यांच्या या खुलाशाने समाधान झाले नाही आणि दलित वर्गाने स्वखुषीने मान्यता दिलेली नसताना एखादी राज्य घटना जर जबरदस्तीने त्यांच्यावर लादण्यात आली तर दलित वर्गाचा केलेला तो विश्वासघात आहे असे समजण्यात येईल असे ब्रिटिश सरकारला कळविण्यास त्या दोघांनी क्रिप्सला सांगितले.

भारतीय पुढाऱ्यांबरोबर झालेली क्रिप्सची बोलणी फिसकटल्याचे ऐकून अमेरींना हायसे वाटले. दिनांक ११ एप्रिल रोजी लिनलिथगोंना लिहिलेल्या पत्रात काँग्रेसला डावलून, मुस्लीम लीग, अनुसूचित जमाती आदींचा समावेश करून एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचा विस्तार करता येईल का ते अजमावून पहाण्याचा आदेश त्यांनी लिन-लिथगोंना दिला. लिनलिथगोंनी सर फिरोजखान नून यांच्यामार्फत जीनांकडे खडा टाकून पाहिला. आणि दुसऱ्या दिवशी त्यानी अमेरींना अशी तार पाठविली की, फिरोजखानांमार्फत मी जीनांची जी चाचपणी केली तिचा अधिक वृत्तांत आता माझ्या हाती आला आहे. नून यांच्याकडून मला असे समजले की काँग्रेस आली नाही तरीदेखील जीना आनंदाने एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये यावयाला तयार होतील. पण त्यांच्या दोन अटी आहेत. त्यांची पहिली अट अशी की, १५ सभासदांच्या कौन्सिलवर व्हाइसरॉयनी "८ मुस्लिम लीगच्या आणि बहुधा २ हिंदू महासभेच्या सभासदांची नियुक्ती करावी, त्याशिवाय दलित वर्ग आणि शीख प्रतिनिधी कौन्सिलवर घ्यावेत परंतु ते जीनांच्या पसंतीचे असले पाहिजे." काँग्रेसतर्फेचे सभासद नसलेल्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये लीगचे बहुमत असले पाहिजे ही जीनांची मागणी जुनीच होती. परंतु अल्पसंख्यांकांमधून कौन्सिलवर जे सभासद घ्यावयाचे त्यांनादेखील

मुस्लीम लीगची मान्यता असली पाहिजे ही त्यांची अट मात्र नवी होती. त्यानंतर दोन दिवसांनी यासंबंधीचा आपला अभिप्राय लिनलिथगोंनी अमेरींना कळविला. जीना ज्या भरमसाठ मागण्या करीत आहेत त्याबाबत दोन गोष्टी संभवतात. एक तर दोस्त राष्ट्रांची युद्धातली परिस्थिती किती बिकट आहे हे त्यांना अजमावून पहावयाचे असावे किंवा त्यांचा असा डाव असावा की, इतक्या भरमसाठ मागण्या करावयाच्या की, त्या सरकारला मान्य करताच येणार नाहीत आणि मग जगाला असे सांगत सुटावयाचे की, पहा, सरकार सत्ता सोडायला खरोखरी तयार असते तर जीना सहकार्य करणार होते पण त्यासाठी किंमत मोजायला मात्र ते तयार नव्हते. असे सांगून मुस्लीमलीगच्या असहकाराला सरकारच सर्वस्वी जबाबदार ठरते असा डंका पिटायचा. तेव्हा एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवरील रिकाम्या जागा एक बिगर लीगी मुसलमान, एक शीख, एक युरोपियन आणि डॉ. आंबेडकर यांना घेऊन भराव्यात असे लिनलिथगोंनी सुचविले. कारण त्यामुळे त्यांच्यामताने काँग्रेस आणि लीगचे प्रतिनिधी आले नाहीत तरी एक्झिक्युटिव्ह कौन्सिल जास्तीत जास्त व्यापक स्वरूपाचे होणार होते.

सरकारला मान्य करता येऊ नयेत इतक्या कडेच्या मागण्या जीनांनी करून ठेवल्या होत्या. हे त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांनादेखील बहुधा माहीत नसावे असे दिसते. कारण २५ एप्रिल १९४२ रोजी खलिकुज्जमान यांनी संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरची भेट घेतली. त्यावेळी काँग्रेसशिवाय केंद्रात राष्ट्रीय सरकार स्थापन करावे अशी जोरदार मागणी करून त्यांनी मुस्लीमलीग त्यात सहभागी होईल असे आश्वासनही दिले होते. ग्रेट ब्रिटन आणि पाकिस्तानसकट इतर मुस्लिम राष्ट्रे यांच्यात भावी काळात दोस्ती रहावी म्हणून ब्रिटिशांबरोबरचे संबंध तसेच चालू ठेवणे हे मुसलमानांच्याच हिताचे आहे असेही त्यांनी या भेटीच्या वेळी गव्हर्नरांच्या निदर्शनास आणून दिले आणि पाकिस्तानी मुलखाचे झपाट्याने औद्योगिकरण घडवून आणण्यासाठी ब्रिटिश उद्योजक खरेखुरे साहाय्य करतील अशी अपेक्षाही बोलून दाखवली. त्याच दिवशी या भेटीच्या अगोदर ते गव्हर्नरांकडे मुस्लीमलीगचे एक शिष्टमंडळ घेऊन गेले होते. मुस्लिम सिव्हिल गार्डस ही संघटना ए. आर. पी. सारख्या अधिकृत नागरी सुरक्षा संघटनांशी कोठल्याही प्रकारे विसंगत नाही हे सर्व प्रांतांच्या गव्हर्नरांना पटवून देण्यासाठी हे शिष्टमंडळ भारताच्या दौऱ्यावर निघाले होते. खलिकुज्झमान यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शिष्टमंडळाने गव्हर्नरांना असेही सांगितले की मुसलमानांना आपल्या सुरक्षिततेबाबत जपान्यांपेक्षाही हिंदूंची जास्त भीति वाटते. म्हणून मुस्लिम सिव्हिल गार्डस एकाकी पडलेल्या विभागातून मुसलमानांना अधिक सुरक्षित जागी हलवीत आहेत. शिवाय हिंदूमहासभेच्या कार्यकर्त्यांनी नेपाळ सरकारशी जे संधान बांधले आहे त्याचीही मुसलमानांना चिंता वाटते. ब्रह्मदेशातील घटनांवरून हे स्पष्ट झाले आहे की, जपानच्या आक्रमक फौजा पूर्व बंगालमधील हिंदूंना मुक्तहस्ताने

शस्त्रे वाटत सुटणार आणि त्यामुळे तेथील बहुसंख्याक मुसलमानांचे जीवीत आणि वित्त धोक्यात येणार, संयुक्त प्रांताचे गव्हर्नर हॅलेट शिष्टमंडळाच्या या निवेदनाने प्रभावित झाले आणि ब्रिटिश सरकारने क्रिप्स योजनेला चिकटून रहावे आणि तिच्यात पाकिस्तानचे तत्व गृहीत धरले आहे असे उघडपणे सांगून टाकावे अशी लिनलिथगो यांच्याकडे त्यांनी जोरदार शिफारस केली. युद्ध प्रयत्नांत सहकार्य करण्याच्या नावाखाली नागरी संरक्षणाचा एक भाग म्हणून सुरू करण्यात आलेल्या मुस्लिम सिव्हिल गार्डचा बुरखा पांघरून मुस्लीमलीग आपली मुस्लिम नॅशनल गार्डसची संघटना मजबूत बनविण्याची संधी साधत आहे हे शिष्टमंडळातील इतर सभासदांच्या हालचालीवरून स्पष्ट झाले होते.

जीनांच्या अतिरेकी मागण्यांबाबत जेथे मुस्लिमलीगचे ज्येष्ठ नेतेदेखील अंधारात होते तेथे राजगोपालाचारीसारख्यांना त्यांची कल्पना आली नाही तर त्यात आश्चर्य कसले ? राजगोपालाचारींची अशी समजूत होती की, जीनांच्या मागण्या रास्त असून काँग्रेसला त्या सहज मान्य करता येण्यासारख्या आहेत. केंद्रात मंत्रिमंडळाच्या स्वरूपाचे सरकार असले पाहिजे ही काँग्रेसची मागणी मान्य झाली तर त्या मंत्रिमंडळाला 'फॅसिस्ट ग्रँड कौन्सिल'चे स्वरूप प्राप्त होईल आणि मुसलमान आणि इतर अल्पसंख्यांकांना केवळ कांग्रेस राज्याच्या दयेवर विसंबून रहावे लागेल असे जाहीर पत्रक जीनांनी दिनांक १५ एप्रिल रोजी काढले असताना राजाजी ते विचारात घ्यावयालाच तयार नव्हते. काँग्रेस आणि लीग यचांया दरम्यानची बोलणी फिसकटली ती ब्रिटिश सरकारने केंद्रात जबाबदार राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याचा आपला दिलेला शब्द फिरवला म्हणून नव्हे किंवा संरक्षण खाते भारतीयाकडे सोपविण्यास नकार दिला म्हणूनही नव्हे तर संघराज्यात सामील न होण्याचा प्रांतांना जो अधिकार देण्यात आला होता त्याला काँग्रेसने आडमुठेपणाने विरोध केला म्हणून अशी प्रचार मोहीमच त्यांनी क्रिप्स परतल्यापासून लगेच सुरू केली. दिनांक २२ एप्रिल रोजी त्यांनी केंद्रास कायदेमंडळातील काँग्रेस पक्षाच्या सभासदाची एक बैठक बोलावली. बैठकीला ९१ पैकी फक्त ५२ सभासद हजर होते. विशिष्ट विभागातील जनतेचे मत अजमावून पाहिल्यानंतर त्या विभागाला संयुक्त भारतातून फुटून निघण्याचा अधिकार असला पाहिजे ही मुस्लिमलीगची मागणी मान्य करून जपानच्या आक्रमणामुळे जी गंभीर आणि आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे तिला समर्थपणे तोंड देण्यासाठी राष्ट्रीय सरकार प्रस्थापित करण्याच्या कामी लीगचे सहकार्य मिळविण्याचा मार्ग काँग्रेसने खुला करून द्यावा अशी मागणी करणारा ठराव त्या बैठकीत संमत करण्यात आला. त्याला हजर असलेल्या ५२ सभासदांपैकी ३६ सभासदांनीच पाठिंबा दिला होता. भारताचे ऐक्य टिकविण्याच्या मृगजळामागे लागून राष्ट्रीय सरकार बनविण्याची संधी काँग्रेसने दवडू नये असे आवाहनही त्या ठरावात करण्यात आले होते. एकदा मुस्लिम लीगची फुटून निघण्याची मागणी काँग्रेसने मान्य केली की, मुसलमानांच्या

मनातील सर्व शंका आणि त्यांना वाटणारी भीती नष्ट होऊन राष्ट्रीय सरकार ताबडतोब अस्तित्वात येईल. असा युक्तिवाद करून ठरावाच्या अखेरीस मद्रासमध्ये मुस्लीमलीगबरोबर संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्यासाठी काँग्रेस श्रेष्ठींकडे परवानगी मागण्यात आली.

या ठरावामुळे अमेरी खूपच प्रभावित झाले होते. परंतु राजगोपालाचारी यांना अखिल भारतीय पातळीवरच नव्हे तर खुद्द त्यांच्या प्रांतातही काँग्रेसमध्ये पूर्वीसारखा पाठिंबा राहिलेला नाही अशी माहिती लिनलिथगो यांनी अमेरींना पुरविली. ते कसेही असो, परंतु पंजाब प्रांतिक काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष मिया इफ्तिकारुद्दिन यांच्यासारखे काही काँग्रेसजनच राजाजींच्या भूमिकेला संपूर्ण पाठिंबा देऊ लागल्यामुळे काँग्रेसजनांच्या मनाचा गोंधळ उडून गेला इतके मात्र खरे. अलाबक्ष यांच्या मंत्रिमंडळाचे एक सभासद पीर इलाबक्ष असे म्हणू लागले की, पाकिस्तानची योजना सर्वथैव अव्यवहार्य असली तरी देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रथम काँग्रेस आणि लीग यांच्यात समझोता घडून येणे अत्यावश्यक आहे.

क्रिप्स वाटाघाटी फिसकटल्यामुळे अन्य काँग्रेस विरोधी पक्षांना आणि राजकीय नेत्यांनाही मनातून बरे वाटले. वरिष्ठ पदावर आता आपली वर्णी लागू शकेल असे मनातले मांडे खाणाऱ्या काही व्यक्तींचाही त्यांच्यात समावेश होता. हिंदू महासभेचे सर जे. पी. श्रीवास्तव यांनी संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरांकडे अशी तक्रार केली की, क्रिप्सनी काँग्रेस आणि लीग या व्यतिरिक्त अन्य पक्षांची दखलच घेतली नाही. डॉ. खरे यांनीही आपल्या प्रांताच्या गव्हर्नरजवळ अशीच तक्रार केली. त्यांनी तर असेही उद्‌गार काढले की, काँग्रेस युद्ध प्रयत्नात सहभागी होण्यापेक्षा ती जपानबरोबर संगनमत करण्याच्या पाठीमागे आहे. रॉय यांनी आपल्या इंडिपेंडंट इंडियात लेख लिहून अदूरदर्शी राष्ट्रवादाच्या आहारी जाऊन काँग्रेस जपानबरोबर करार घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे अशी टीका केली. क्रिप्स यानी ऑगस्ट १९४० च्या घोषणेकडे पाठ फिरवली. इतकेच नव्हे तर काँग्रेस आणि लीग या व्यतिरिक्त कोणाचा मुलाहिजा ठेवण्याचेही कारण नाही अशा भावनेने ते वागले. यामुळे आपला कमालीचा भ्रमनिरास झाला असून अपमानित झाल्यासारखे वाटते अशी प्रतिक्रिया डॉ. आंबेडकर यांनी मुंबईच्या गव्हर्नरजवळ व्यक्त केली.

काँग्रेस आणि लीग यांच्यावर लिनलिथगो हेही रागावलेच होते आणि म्हणून त्यांचा शीख आणि अन्य अल्पसंख्यांकांचा पाठिंबा मिळविण्यावर कटाक्ष होता. पंजाबच्या गव्हर्नरांनी सादर केलेल्या अहवालात असे म्हटले होते की, क्रिप्स योजना प्रसिद्ध झाली तेव्हापासूनच भारतीय सैन्यात मोठ्या संख्येने भरती होणारा शीख समाज अत्यंत अस्वस्थ बनला आहे. कारण सबंध पंजाब प्रांत पाकिस्तानात समाविष्ट झाला तर 'सहानुभूतीशून्य आणि जुलमी अशा मुस्लीम सत्तेच्या जोखडाखाली आपल्याला कायमचे नांदावे लागेल अशी त्याना धास्ती वाटते.' म्हणून लिनलिथगो

यांनी ब्रिटिश सरकारला अशी शिफारस केली की, क्रिप्स योजना मागे घेऊन शीख आणि अन्य अल्पसंख्यांकांना दिलासा देणे आवश्यक आहे. कॉमन्स सभागृहात झालेल्या चर्चेच्या वेळी क्रिप्स यांनी आपली योजना मागे घेण्यात आल्याचे जाहीर केले. त्यावर अमेरी यांनी असा खुलासा केला की, योजना मागे घेण्यात आली याचा अर्थ भारताला स्वातंत्र्य देण्याचे जे आश्वासन ब्रिटिश सरकारने दिले आहे त्यापासून ते मागे हटणार आहे असा नाही. फक्त घटनात्मक प्रश्न सोडविण्यासाठी क्रिप्स योजनेनुसार जी पद्धत अवलंबिली जाणार होती तेवढ्यापुरतीच ही माघार आहे.

क्रिप्स यांची मध्यस्ती फसल्यामुळे अमेरिकेत चिंतेचे वातावरण पसरले. अमेरिकेच्या मनात उद्‌भवलेल्या संशयाचे निराकरण करण्यासाठी क्रिप्स यांचे खाजगी सचिव ग्रॅहॅम स्प्राय यांना वॉशिंग्टनला पाठवण्यात आले. ता. १५ मे १९४२ रोजी त्यानी प्रेसिडेंट रुझवेल्ट यांची भेट घेतली, त्यावेळी रुझवेल्ट यांनी त्यांना असे विचारले की, शेवटच्या क्षणी ब्रिटनच्या युद्ध मंत्रिमंडळाने मोडता घातल्यामुळे क्रिप्स यांच्या वाटा-घाटी फिसकटल्या का ? वाटाघाटी चालू असताना शेवटपर्यंत आपल्याला त्या मंत्रि-मंडळाचा आणि लिनलिथगो यांचा पाठिंबा मिळत राहिला होता हे रुझवेल्ट यांच्या कानावर घाला अशी क्रिप्स यांच्याकडून आलेली तार ग्रॅहॅम स्प्राय यांनी रुझवेल्ट याना दाखवली. परंतु त्यामुळे अध्यक्षांचे समाधान झालेले नाही हे ग्रॅहॅम यांच्या लगेच लक्षात आले. केंद्रात राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याचे आश्वासन क्रिप्स यांनी आयत्या वेळी चर्चिलच्या हकूमावरून मागे घेतले याची शहानिशा करण्यासाठी नवी दिल्ली आणि लंडन यामध्ये त्यावेळी ज्या गुप्त तारा धाडण्यात आल्या त्या स्वतः पाहण्याची रुझवेल्टना काय किंवा नेहरुंना काय, आवश्यकता नव्हती. अपेक्षेप्रमाणे आपण अत्यंत औदार्यपूर्ण भूमिका घेतली होती. परंतु काँग्रेसला दोस्त राष्ट्रांच्या अंगीकृत कार्याबद्दल सहानुभूती नव्हती आणि ती आपला दूराग्रह सोडावयाला तयार नव्हती म्हणुनच बोलणी फिसकटली अशी प्रचार मोहीमच ब्रिटिश सरकारने उघडली.

क्रिप्स शिष्टाईमुळे काँग्रेसजनांत कटुता निर्माण झाली होती. नव्या सरकारचा कारभार तांत्रिकदृष्टया १९१९ च्या कायद्यानुसार चालणार असला तरी प्रत्यक्षात तो ब्रिटिश मंत्रिमंडळासारखा चालेल आणि व्हाइसरॉयचे स्थान हे ब्रिटिश सम्राटा-सारखे राहील. ही स्वतः क्रिप्स यांचीच सूचना होती असे जाहीर करून नेहरु आणि आझाद यांनी ब्रिटिश मंत्रिमंडळाचे पितळ उघडे पाडले. स्वतः दिलेल्या शब्दातून कशी तरी सोडवणूक करून घेण्यासाठी अल्पसंख्यांकांचा बळी देऊन काँग्रेसला आपली स्वतःची हुकूमत देशावर लादावयाची होती. असले खोटे आरोप नंतर क्रिप्स काँग्रेसवर करू लागले. त्यामुळे परिस्थिती आणखीच चिघळली. लंडनला परत जाताना क्रिप्स यांनी अशी घोषणा केली की, यापुढे ब्रिटिश सरकार आपण होऊन कोणतेही पाऊल उचलणार नाही. त्यावर आझाद यानी लगेच असा टोला लगावला की, काँग्रेसलाही याबाबतीत पुढाकार घेण्याची इच्छा नाही. इंग्लंडमध्ये गेल्यावर क्रिप्स यांनी सांगून

टाकले की, युद्ध संपेपर्यंत ब्रिटिश सरकार आपली सत्ता सोडायला तयार नाही. त्यावर युद्ध संपेपर्यंतच काय, युद्ध संपल्यानंतरही ब्रिटिश राज्यकर्ते हिंदुस्तानातून आपण होऊन निघून जाणार नाहीत असे कॉंग्रेस पुढाऱ्यांनी भाष्य केले.

कॉंग्रेसजनांच्या मनात क्रिप्सबरोबर झालेल्या वाटाघाटी विषयी किती कटुता आणि अविश्वास निर्माण झाला होता ते दिनांक १ मे रोजी अलाहाबाद येथे भरलेल्या ए. आय. सी. सी. च्या बैठकीत पंडित पंत यांनी जो ठराव मांडला होता त्यावरून दिसून आले. राजगोपालाचारी यानी मांडलेला ठराव तर ऑ. इं. कॉं. कमिटीने फेटाळून लावलाच पण त्या उलट हिंदुस्तानची छकले करण्याची कोणतीही सूचना देशाच्या आणि त्याबरोबर जनतेच्या हिताला अत्यंत बाधक ठरणार आहे असा ठराव तिने केला. मद्रासमध्ये लीगबरोबर संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याची परवानगी मागणाऱ्या राजगोपालाचारींच्या दुसऱ्या ठरावाचीही अशीच वासलात लावण्यात आली. कॉंग्रेस आणि लीगने मिळून केलेली एक तरी मागणी सरकारने कधी मान्य केली असल्याचे दाखवून देण्याचे आव्हान कॉंग्रेसचे सरचिटणीस आचार्य कृपलानी यांनी एका लेखातून राजगोपालाचारी याना दिले. हरिजन या पत्रातल्या विविध लेखातून गांधीजींनी ग्रेट ब्रिटनबद्दल अशीच भावना व्यक्त केली. जातीजातीत वैमनस्य निर्माण केल्याबद्दल त्यांनी एका लेखातून सरकारला दोष दिला; देशाची छकले पाडणे हे पाप आहे असे म्हटले; पाकिस्तान म्हणजे जीनांना नेमके काय अभिप्रेत आहे ते त्यांनी केव्हाच स्पष्ट केलेले नाही. याचा पुनरुच्चार करून कॉंग्रेसबरोबर वाटाघाटी करण्यासाठी ते केसभरही पुढे आलेले नाहीत असे त्यांनी दाखवून दिले. त्यावेळी गांधींच्या भाषणांचा आणि लेखांचा सर्व भर ब्रिटिशांनी आत्ताच्या आता भारत सोडून जावे. ब्रिटिश सत्ता असे तोपर्यंत जातीय तडजोड होऊच शकणार नाही. हिंदुस्तानचे विच्छेदीकरण करण्याची क्रिप्स यांची योजना तर वाईट होतीच. परंतु त्यांना ब्रिटिशांच्या मदतीने संस्थानिकांची राजेशाही कायम टिकवावयाची होती. हा त्याहीपेक्षा वाईट भाग आहे असे दाखवून देण्यावर होता. त्यांनी क्रिप्स यांना असे सांगितले होते की, हिंदुस्तानांतील संस्थाने स्वतंत्र घटक म्हणून राहिली तरी आपली हरकत नाही. परंतु ब्रिटिश बागनेटाच्या जोरावर त्या प्रदेशावर अनिर्बंध राजेशाही कायमची लादण्यास आपण कधीही संमती देणार नाही.

मे महिन्यात नेहरुंनी संस्थानिकांविरुद्ध जोरदार आघाडी उघडली. दिनांक १ जून रोजी नरेन्द्र मंडळाचे अध्यक्ष नवानगरचे जामसाहेब यांनी लिनलिथगो यांच्याकडे अशी तक्रार केली की, संस्थानिकांनी ब्रिटनबरोबर जे करार केले आहेत ते सर्व रद्दबातल करून टाकण्यात यावेत असा नेहरुंनी धूमधडाक्याने प्रचार सुरू केला आहे. इतकेच नव्हे तर "हिंदी संस्थानिकांबरोबर झालेल्या कराराच्या गोष्टी जे करतात ते एक तर लबाड तरी असले पाहिजेत नाही तर मूर्ख तरी असले पाहिजेत" असे ते सांगत सुटले आहेत. जामसाहेबांची आणखी अशीही तक्रार होती की, वाटा-

घाटीच्यावेळी संस्थानी प्रजेच्या वतीने चर्चेत भाग घेण्याची क्रिप्स यांनी काँग्रेसने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीला परवानगी दिली होती. अमेरी यांनी लिनलिथगो यांना लिहिलेल्या पत्रात संस्थानिकांनी स्वतंत्र सार्वभौम राज्याचे प्रमुख म्हणून भारतीय संघराज्याच्या बाहेर राहण्याचा निर्णय घेतल्याबद्दल आपली खुषी व्यक्त केली होती. या मुद्यावर हुजूर पक्ष आणि मुस्लीम लीग यांचा दृष्टीकोन अगदी समान होता. दिनांक १० जून रोजी अमेरींनी लिनलिथगो यांना अशा सूचना पाठवल्या की, संस्थानिकांबरोबर ब्रिटिश सरकारचे जे कारारमदार झाले आहेत त्यातून तर ब्रिटन आपले अंग काढून घेणार नाहीच. उलट त्यानी भारतीय संघराज्याच्या बाहेर रहा-वयाचे ठरविले तर त्यांचे संरक्षण करण्यासाठी योग्य ते मार्ग शोधून काढील असे जाहीर आश्वासन त्यांनी संस्थानिकांना द्यावे.

अपेक्षेप्रमाणे जीनांनी गांधींवर टीकेची झोड उठविली. हिंदू-मुस्लिम समझोता झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणे शक्य नाही हे आपले पूर्वीचे मत बदलल्याबद्दल आणि पूर्वीपासूनच समझोत्याच्या प्रत्येक प्रयत्नात बिब्बा घालत आल्याबद्दल त्यांनी गांधींना दोष दिला. सरकारने काँग्रेसपुढे कोणत्याही स्वरूपात शरणागती पत्करली तर ते मुस्लिम भारताच्या हितसंबंधाना अत्यंत घातक ठरेल असे बजावून त्यांनी पाकिस्तान मिळविण्याच्या आपल्या निर्धाराचा पुनरुच्चार केला. त्याचप्रमाणे त्यांनी अगदी निःसंदिग्धपणे असेही सांगून टाकले की, जातीय समझोता व्हावयाचा असेल तर तो आपल्या शर्तींवरच होऊ शकेल. ब्रिटिशांनी हिंदुस्तानातून ताबडतोब चालते व्हावे या काँग्रेसच्या मागणीचा जाहीर सभातून आणि लेखांतून पुनरुच्चार होऊ लागला. त्यावेळी त्याला उत्तर म्हणून मुस्लिमलीगच्या वृत्तपत्रांनी गांधींच्याविरुद्ध प्रचाराची पद्धतशीर मोहीम उघडली. जातीय विभाग निर्माण करण्याच्या एकाकाळी लोकप्रिय झालेल्या योजनेचे प्रवर्तक डॉ. सैयद अब्दुल लतीफ यानी जीनांच्या हटवादीपणा-बद्दल त्यांच्यावर टीका केली. दिनांक ५ ऑगस्ट १९४२ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यानी जीनांच्या वर हल्ला चढवून क्रिप्स योजनेला नवी चालना देण्यासाठी लीगने काँग्रेस आणि अन्य पक्षांबरोबर सहकार्य करावे आणि त्यायोगे भारत छोडो आंदोलन थोपविण्यास मदत करावी असे मुस्लिमलीगला आवाहन केले.

८ ऑगस्ट रोजी ए. आय. सी. सी. ने मुंबईत सुप्रसिद्ध "छोडो भारत" ठराव पास केला. भारत छोडो आंदोलन हे अत्यंत उग्र स्वरुपाचे होते. परंतु ते फार थोडे महिने चालले. हा लढा १९२० आणि १९३० सालच्या लढ्यापेक्षा अगदी निराळ्या स्वरूपाचा होता. यावेळी सत्याग्रहाचा दैनंदिन कार्यक्रम नव्हता त्याचप्रमाणे मध्यवर्ती दिशा दिग्दर्शनही नव्हते. यापूर्वीच्या दोन्ही लढ्यांच्या मानाने आता जे प्रदेश पाकि-स्तानात समाविष्ट झाले आहेत तेथे सरकारविरोधी चळवळी खूपच कमी प्रमाणात झाल्या. परंतु इतर प्रांतात मात्र त्यांनी आक्रमक आणि हिंसक स्वरुप धारण केले. अधिकृत वृत्तांतानुसार ऑगस्ट आणि सप्टेंबर या केवळ २ महिन्यात या आंदोलनात ४७४

जण पोलिसांच्या आणि ३१२ लष्कराच्या गोळीबाराला बळी पडले, तर जखमींची संख्या १३७५ हून जास्त होती. ३४ पोलिस आणि ११ फौजी जवान याना आपले प्राण गमवावे लागले. ५३६ पोलिस आणि काही सैनिक जखमी झाले. ७३ पोलिस स्टेशन्स नष्ट करण्यात आली तर ८०९ टपाल कचेऱ्या एक तर अजिबात नष्ट करून टाकण्यात आल्या किंवा फार मोठ्या प्रमाणावर त्यांची नासधूस करण्यात आली. सरकारी नोकरीतील इतर काहीनाही या आंदोलनात आपले प्राण गमवावे लागले. सरकारी मालमत्तेचे अतोनात नुकसान करण्यात आले. चळवळीचे लोण पसरलेल्या प्रत्येक प्रांतात हजारो लोकांची धरपकड करण्यात आली. ऑक्टोबर १९४२ च्या अखेरीपासून चळवळीचा जोर ओसरू लागला आणि मार्च १९४३ पर्यंत तर ती जवळजवळ थंडावलीच.

२० ऑगस्ट १९४२ रोजी मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीने कठोर शब्दात एक लांबलचक ठराव पास केला. ए. आय. सी. सी. चा दिनांक ८ ऑगस्टचा ठराव आणि पुढाऱ्यांच्या धरपकडीनंतर सुरू झालेला सामुदायिक लढा यावर मुस्लीमलीग वर्किंग कमेटीच्या या ठरावात जोरदार हल्ला चढविण्यात आला होता. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली हिंदू वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेला हा उघड उठाव आहे अशी भारत छोडो आंदोलनाची त्या ठरावात निर्भत्सना करण्यात आली होती. मूठभर हिंदूच्या हाती सत्ता सोपविण्यास सरकारला भाग पाडावयाचे आणि नंतर त्याच्यावर मुसलमान आणि समाजातील इतर घटकांविषयीची जी नैतिक बंधने आहेत ती पार पाडण्याचा मार्गच बंद करून टाकायचा. इतकेच नव्हे तर मुसलमानांना काँग्रेसपुढे शरणागती पत्करण्यास भाग पाडावयाचे असा या चळवळी-मागचा काँग्रेसचा डाव आहे असे ठरावात नमूद करण्यात आले होते. लीगने युद्ध प्रयत्नांच्या बाबतीत सहकार्याचा हात पुढे केला असताना सरकारने तो झिडकारला असून काँग्रेस अनुनयाचे आपले धोरण चालूच ठेवले असल्याबद्दल ठरावात खेद व्यक्त केला गेला. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी अधिक विलंब न लावता मुसलमानांना त्यांच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काची ग्वाही देणारी निःसंदिग्ध घोषणा करावी, तसेच मुसलमानांचे सार्वमत घेऊन ते जो निर्णय देतील तो बंधनकारक मानून पाकिस्तानची योजना अंमलात आणण्याच्या कामी त्वरेने पावले उचलावीत असे या ठरावाद्वारे आवाहन करण्यात आले होते. ज्या प्रदेशात मुसलमान बहुसंख्य आहेत आणि जे ती भूमि आपली आहे असे मानतात त्या विभागात सार्वभौम राज्ये स्थापन करण्यात यावीत ही भारतातील दहा कोटी मुसलमानांची मागणी आहे असे सरकारला बजावण्यात आले. ठरावाच्या शेवटी मुसलमानांना चळवळीपासून अलिप्त राहाण्याचा आदेश देऊन याबाबत मुसलमानांवर कोणत्याही प्रकारची जोर जबरदस्ती करण्यात आली आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात व्यत्यय आणण्यात आला तर त्याना त्याचा प्रतिकार करण्या-साठी जरूर त्या सर्व मार्गांचा अवलंब करण्यावाचून गत्यंतर उरणार नाही असा

इशारा देण्यात आला होता.

त्यानंतर दोन दिवसांनी डॉ. सैयद अबदुल लतीफ यांनी एक पत्रक प्रसिद्ध करून त्यात असे प्रतिपादन केले की, काँग्रेस आणि मुस्लीमलीग यांच्यात तसेच सरकार आणि हे दोन पक्ष यांच्यात सन्माननीय तडजोडी घडवून आणण्यास पोषक असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी मुस्लीमलीगने अत्यंत भयानक आणि विनाशकारी भूमिका स्वीकारली आहे. मद्रास मुस्लीमलीगचे चिटणीस आणि लीगच्या कौन्सिलचे एक सभासद अबदुल फरूकी यानी देखील पेचप्रसंग सोडविण्याच्या कामी पुढाकार घेण्याचे जीनांना आवाहन करणारे पत्रक दिनांक १ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केले. दिनांक २७ सप्टेंबर रोजी मुंबईच्या तसेच तेलीचरीच्या मुस्लिमलीगच्या नेत्यांनी हिंदुस्तानात तात्पुरते राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेस लीग ऐक्य घडवून आणण्याचे जीनांना जाहीरपणे आवाहन केले. लाहोरहून प्रसिद्ध होणाऱ्या झणझणसारख्या लीगला अनुकूल असलेल्या, काही वृत्तपत्रांनीदेखील जीनांच्याकडे तोच आग्रह धरला होता.

अर्थात लीगच्या ठरावामुळे मुंबईचे गव्हर्नर रॉजर लम्ले यांच्यासारख्या अधिकाऱ्यांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. डेली टेलिग्राफ या वृत्तपत्राच्या मुंबईतील बातमीदाराशी जीनांचे खाजगीरीत्या जे बोलणे झाले होते त्याचा वृत्तांत रॉजर लम्ले यांनी आधीच व्हाइसरॉय लिनलिथगो यांच्याकडे धाडून दिला होता. जीनांनी त्या वार्ताहराला असे सांगितले होते की, हिंदूचे राज्य स्थापन झाल्याचे पहाण्याऐवजी भारतीय मुसलमान ब्रिटिशांची सत्ता हिंदुस्तानात चालू रहाणे पसंत करतील. त्याचप्रमाणे त्यांनी हेही स्पष्ट केले होते की, ब्रिटिश सरकार मुसलमानांची पाकिस्तानची मागणी मान्य करण्यास तयार असेल आणि व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलवरील ५० टक्के जागा मुस्लीमलीगला देण्यास तयार असेल तर केंद्र सरकारात सहभागी होण्याचीदेखील मुस्लीमलीगची तयारी आहे म्हणजे याचा अर्थ असा की एप्रिलपेक्षा जीना थोडे खाली आले होते. लीगच्या ठरावाची सरकारने यत्किंचितही दखल घेतली नाही अशी मुसलमानांची भावना होऊन बसू नये म्हणून ब्रिटिश सरकारने मुसलमानांच्या बाजूने काही तरी हालचाल करावी अशी जोराची शिफारस रॉजर लम्ले यांनी केली होती. तथापि, पंजाबच्या गव्हर्नरांनी दिल्लीला असा खलिता पाठवला होता की, लीगने घेतलेल्या पवित्र्यामुळे हिंदू आणि शीख अतिशय संतप्त झाले आहेत. आणि सरकारने पाकिस्तानची मागणी मान्य केल्याची घोषणा केली तर सबंध प्रांतात अव्यवस्था माजून राहील. असे उलटसुलट अहवाल येत असताना एकच गोष्ट करता येण्यासारखी होती आणि ती म्हणजे काहीच न करणे आणि तोच मार्ग अनुसरण्यात आला.

मुस्लीमलीगच्या ठरावाबाबत ब्रिटिश मिठाची गुळणी धरून बसलेले पाहून जीनांच्या अंगाचा तीळपापड झाला. सप्टेंबर १३ रोजी एका पत्रकार परिषदेत जीनांनी

असे सांगितले की, ब्रिटिश सरकार आणि काँग्रेस यांच्या दरम्यान अश्लाघ्य समझोता होण्याची मला नेहमीच काळजी वाटत आली आहे...... ब्रिटिश सरकारला मुसलमानांच्या सहकार्याची मातबरी किंवा पर्वा वाटत नाही. त्या मुलाखतीत त्यांनी अगदी उघडपणे असा इशारा देऊन ठेवला की, मुसलमान हे हिंदूंच्यापेक्षा शतपट अडचणी निर्माण करू शकतात. सरकारने हे विसरू नये की, भारतीय सैन्यदलात मुसलमानांची संख्या फार मोठी आहे आणि जर का जीनांनी काँग्रेससारखे आंदोलन करावयाचे ठरविले तर साऱ्या सरहद्दीवर भडका उडाल्यावाचून राहणार नाही. या वार्ताहर परिषदे-संबंधीची आपली प्रतिक्रिया अमेरी यांना कळविताना लिनलिथगोंनी असे लिहिले की, त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्याशिवाय मुसलमान सरकारशी व्यवहार करणार नाहीत. परंतु त्यांच्या मागण्या इतक्या अतिरेकी आहेत की, त्या आधारावर बहुसंख्य हिंदू कसलाही करार मान्य करतील हे कल्पनेत देखील संभवत नाही. केंद्रातील सत्ता लीगच्या हाती सोपवून स्वतःला दूषण लावून घ्यावयास सरकार तयार नसले तरी काही अतिउत्साही गव्हर्नर मात्र लीगला उपकृत करून ठेवायला तयार होते. ऑगस्ट महिन्यात आसाममध्ये मुस्लिमलीगचे सरकार स्थानापन्न करण्यात आले. सिंधचे पंतप्रधान काँग्रेसला अनुकूल अशी भूमिका घेत. त्यांनी आपले सरकारी किताब परत केले. तेवढे निमित्त करून त्याना पदच्युत करण्यात आले. त्यांच्या जागी आलेले हिदायतुल्ला हे लगेच लीगला जाऊन मिळाले आणि त्यांच्या मागोमाग कायदे-मंडळातील ३४ मुसलमान सभासदांपैकी २९ जणांनी तोच मार्ग अनसरला. बंगालच्या गव्हर्नरांनी फजलूल हक यांना आपले मंत्रिमंडळ वाढवू दिले नाही आणि रिकाम्या झालेल्या काही जागा मुस्लीमलीगसाठी राखून ठेवण्याचा त्यांच्यामागे लकडा लावला. गव्हर्नरांच्या दडपणामुळे फजलूल हक यांनी दिल्लीत जीनांची भेट घेतली आणि त्यांच्या-बरोबर मिळते घेण्याची तयारी दाखविली. त्यांनी आपल्या मंत्रिमंडळातील मुस्लीम-लीगमध्ये नसलेल्या मंत्र्यांना अर्धचंद्र द्यावा असा जीनांनी त्याना तात्काळ सल्ला दिला. हक याला तयार झाले नाहीत. परंतु त्यानंतर एका वर्षाच्या आत बंगालच्या गव्हर्नरांनी त्यांची उचलबांगडी केली आणि त्यांच्या जागी लीगचे मंत्रिमंडळ आणले. याच सुमारास वायव्य सरहद्द प्रांतातदेखील अल्पसंख्य लीग मंत्रिमंडळ गादीवर बसविण्यात आले. छोडो भारत आंदोलनामुळे काँग्रेस पुढारी प्रांतातील राजकीय घडामोडीत भाग घेऊ शकत नव्हते. त्याचा गैरफायदा घेऊन सरकारने तेथील मुस्लीम लीगला आपली शक्ती वाढविण्याच्या कामी प्रत्यक्ष साहाय्य केले. जणू काही भावी काळात सामुदायिक चळवळीच्या फंदात न पडण्याचा काँग्रेसला देण्यात आलेला तो इशाराच होता.

---

## प्रकरण २१

### जीनांचा छिन्नविच्छिन्न पाकिस्तानला नकार

राजकीय कोंडी फोडण्यासाठी अनेक कागदी योजना पुढे आल्या. २५ सप्टेंबर १९४२ रोजी चॅथॅम हाउस ऑफ दि रॉयल इन्स्टिटयूट ऑफ इंटर नॅशनल अफेअर्स, लंडन या संस्थेतर्फे भारतीय समस्येवर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी अशी सूचना पुढे आली की, जीनांनी आपली पाकिस्तानची मागणी युद्ध संपेपर्यंत पुढे ढकलावी. दरम्यान लिनलिथगो यांनी राजाजी किंवा जीना यांना राष्ट्रीय सरकार बनविण्यास पाचारण करावे आणि त्यांनी लीग, हिंदू महासभा आणि या सरकारात सहभागी होण्यास तयार असलेले काँग्रेसजन यांच्यातून सरकार बनवावे. संरक्षण, जातीय प्रश्न आणि परराष्ट्र व्यवहार या बाबतीत व्हाइसरॉयनी स्वतःकडे नकाराधिकार राखून ठेवून बाकीच्या बाबतीत आपल्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलला मंत्रिमंडळाप्रमाणे वागवावे. परंतु या सूचनेची कोणी दखलही घेतली नाही. ग्रेट ब्रिटनच्या कम्युनिस्ट पार्टीने ब्रिटिश सरकारने काँग्रेस पुढाऱ्यांबरोबर पुन्हा बोलणी सुरू करावीत अशा आशयाचा ठराव केला होता. परंतु त्याचीही तशीच वासलात लागली. अलीगड युनिव्हर्सिटी स्टुडंटस युनियन पुढे भाषण करताना सर फिरोज खान नून यांनी असे सुचविले की, भारताचे पाच विभाग पाडण्यात यावेत आणि त्यांच्या प्रतिनिधींचे मिळून मध्यवर्ती सरकार बनविण्यात यावे. त्या सरकारकडे संरक्षण, जकात, परराष्ट्र व्यवहार आणि चलन ही खाती सोपविण्यात यावीत. प्रत्येक विभागाला फुटून निघण्याचा किंवा मागाहून मध्यवर्ती सरकारात सामील होण्याचा अधिकार असावा. नून यानी यापूर्वी लिनलिथगो आणि जीना यांच्यातील मध्यस्थाची भूमिका बजावलेली असल्यामुळे त्यांच्या या योजनेला बरेच महत्व प्राप्त झाले होते. परंतु जीनांनी तिच्याकडे साफ दुर्लक्ष केले. त्याचप्रमणे विस्कळीत स्वरुपाच्या संघराज्याची सूचनाही त्यानी फेटाळून लावली.

२१ ऑक्टोबर १९४२ रोजी राजगोपालाचारी यानी एका नव्या योजनेच्या आधारे आपण लंडन येथे जाऊन तेथे ब्रिटिश सरकारबरोबर बोलणी करणार आहोत असे एका पत्रकार परिषदेत जाहीर केले. राजाजींची ही नवी योजना अशी होती की व्हाइसरॉयनी तात्पुरते मध्यवर्ती सरकार बनवावयाचे, विवाद्य संरक्षण खात्यापैकी ज्या बाबी लोकप्रतिनिधीकडे राहू देण्यास क्रिप्स यानी यापूर्वीच अनुमती दर्शविली आहे तेवढ्या बाबी त्यांच्याकडेच राहू देऊन उरलेल्या बाबींची जबाबदारी सरसेनापतींच्या

हाती सोपवावयाची. कोठेही आणि केव्हाही निवडणुका झाल्या तर जे काँग्रेस पुढारी पहिल्या नंबराने निवडून येण्याची सहज खात्री देता येईल अशा पाचांची व्हाइसरॉयने राष्ट्रीय सरकारातील सभासद म्हणून निवड करावयाची. यानंतर जीनांना मुस्लीमलीगच्या पसंतीचे तितकेच सभासद राष्ट्रीय सरकार बनविण्यासाठी निवडावयास सांगावयाचे. काँग्रेस आणि लीग यांच्या प्रतिनिधींनी मिळून इतर प्रमुख अल्पसंख्य गटातून आणखी तिघांची निवड करावयाची अशा तऱ्हेने राष्ट्रीय सरकार बनविण्यात आले म्हणजे सर्व प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुका घ्यावयाच्या. प्रांतिक कायदे मंडळावर नव्याने निवडून आलेल्या सर्व सभासदांनी मध्यवर्ती कायदेमंडळाची निवड करावयाची आणि नंतर हे राष्ट्रीय सरकार या मध्यवर्ती कायदेमंडळाला जबाबदार राहील. गांधी आपल्या या योजनेला पाठिंबा देतील असा विश्वास व्यक्त करून राजगोपालाचारींनी त्याचे कारण असे दिले की, अटक होण्यापूर्वी ब्रिटिश सरकारने जीनांना केंद्रात राष्ट्रीय सरकार बनविण्यास सांगावे इतक्या मर्यादेपर्यंत गांधी गेले होते आणि काँग्रेसला स्वतःसाठी सत्ता नको आहे हेही त्यांनी स्पष्ट केले होते. ब्रिटिश सरकार आपली ही योजना मान्य करील अशी राजगोपालाचारी यांना आशा वाटत होती. परंतु जर त्याने ती मान्य केली नाही तर हा प्रश्न दोस्त राष्ट्रांपुढे उपस्थित करण्याची त्यांची तयारी होती. कारण त्यांच्या दृष्टीने भारत हा आता ब्रिटिश सरकारचा घरगुती मामला राहिला नव्हता. दहा दिवसानंतर म्हणजे दिनांक १ नोव्हेंबर रोजी जीनांनी राजाजींची ही योजना साफ धुडकावून लावली. वृत्तपत्रात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यानी अगदी निःसंदिग्धपणे असे जाहीर केले की, ब्रिटिश सरकारसकट सर्व पक्षांनी मुसलमानांचा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य केल्याशिवाय, त्याचप्रमाणे वायव्य आणि पूर्व विभागातील मुसलमानांच्या सार्वमताचा निर्णय बंधनकारक मानण्याचे आश्वासन दिल्यावाचून कोणतीही तडजोड घडून येऊ शकणार नाही. काँग्रेसशी कोणत्याही प्रकारचा अनुनय करण्याचा प्रयत्न केल्यास ते मुस्लीम हिंदुस्तानचा बळी देण्यासारखे होईल आणि त्याचे परिणाम अत्यंत घातक ठरतील असा इशारा त्यांनी इंग्लंडला आणि अमेरिकेलाही देऊन ठेवण्यास कमी केले नाही. लिनलिथगो आणि अमेरी या दोघांनीही राजाजींच्या लंडन भेटीला विरोध केला, युद्ध चालू असेतोपर्यंत निवडणुका घेण्याची सूचना फेटाळून लावली आणि वर असा युक्तिवाद केला की, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल कायदे मंडळाला जबाबदार असावे ही सूचना जीनांना कधीही मान्य होणार नाही. दिनांक १२ नोव्हेंबर रोजी राजाजींनी जीना आणि व्हाइसरॉय या दोघांचीही भेट घेतली. परंतु गांधींची तुरुंगात भेट घेण्याची परवानगी मात्र त्यांना नाकारण्यात आली.

सरकारने काँग्रेसबाबत कडक धोरण स्वीकारले होते आणि गांधी हात बांधून शरण येईपर्यंत काँग्रेसशी कसलीही बोलणी करावयाची नाहीत असे ठरवून टाकले होते. दिनांक १३ नोव्हेंबर रोजी लिनलिथगोंना पाठवलेल्या एका खलित्यात अमेरींनी

असे सुचविले होते की, ताबडतोब तात्पुरते राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याच्या प्रश्नावरून भारतीय जनतेचे लक्ष उडेल आणि युद्धानंतर भारताची घटना कशी बनविता येईल या प्रश्नात भारतीय पुढाऱ्यांचे सारे लक्ष अडकून राहील असे प्रयत्न करण्यात यावेत. दरम्यान युद्धाला दोस्तांच्या बाजूने कलाटणी मिळू लागली होती जपानविरुद्ध नोव्हेंबर १९४२ मध्ये गुडाळ कालव्याच्या नाविक युद्धात अमेरिकेला विजय मिळाल्यामुळे जपान भारतावर आक्रमण करील अशी भीति उरली नव्हती. "जपानकडून आपला सर्वत्र पराभव होत असताना आपण क्रिप्सना शिष्टाईसाठी पाठविण्यात फार मोठी चूक केली असे आता मागे वळून पहाता वाटू लागते. क्रिप्स स्वत: गेल्यामुळे तर आपण अगतिक झालो आहोत असा सर्वत्र समज झाला. हे मत अमेरींनी लगेच दिनांक १७ नोव्हेंबर १९४२ रोजी लिनलिथगोना पाठविलेल्या खलित्यात व्यक्त केले होते.

त्यावेळी अनेकांची अशी प्रामाणिक समजूत होती की, जीनांची पाकिस्तानची मागणी हे केवळ दबावाचे राजकारण असून वस्तुत: पाकिस्तानबद्दल त्यांचा तसा मुळीच आग्रह नाही. कशी कुणास ठाऊक, परंतु अगदी १९४७ पर्यंत ही समजूत प्रचलित होती आणि आजही काही लोक ती सोडावयाला तयार नाहीत. सरकारने याबाबत काही मध्यस्थांच्यामार्फत जीनांच्या मनात नक्की काय आहे त्याचा कानोसा घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यापैकी एकाने दिनांक १६ नोव्हेंबर रोजी लिनलिथगो यांना असे कळविले की, जीनांना खरोखरीच पाकिस्तान हवे असून सबंध मुसलमान समाज त्यांच्या पाठीशी आहे.

पाकिस्तानच्या मागणीला आपण शेवटपर्यंत चिकटून राहाणार याबद्दल कोणाला शंका घेण्याला जीनांनी आपल्या भाषणात किंवा लेखात यत्किंचितही जागा ठेवलेली नव्हती. राजाजींसारखे जे लोक काँग्रेस लीग समझोता घडवून आणण्याचा आग्रह धरीत होते त्यांनाही संस्थानिकांच्या प्रश्नांबाबत जीनांची मते ग्रेटब्रिटनमधील हुजूर पक्षाशी तंतोतंत जुळणारी होती या गोष्टीचे भान राहिले नाही. १९४२ आणि १९४३ सालात निझाम आपला गेलेला मुलुख ब्रिटिशांनी आपल्याला परत करावा म्हणून सरकारवर एकसारखे दडपण आणीत होता. त्याने हैद्राबाद संस्थानच्या घटनेचा एक मसूदाही तयार करवून घेतला होता. त्यात हैद्राबाद हे स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य असल्याची घोषणा करण्यात आली होती. या मसुद्याला जीनांची संमती मिळ-विण्यासाठी त्याने मुद्दाम नवाब अली यावर जंग यांना दिल्लीला पाठवले होते, जीनांनी त्या मसुद्याला संमतीही दिली. याचा अर्थ त्यांना वायव्य आणि ईशान्य भागातच केवळ मुस्लिम राज्ये निर्माण करावयाची होती असे नव्हे, तर दक्षिणेतही मुसलमानांचे एक राज्य उभे रहावे आणि निझामांच्या रूपाने तेथे मुस्लीम सार्व-भौमत्व साकार व्हावे असे त्यांना वाटत होते असा होतो.

केवळ मुसलमानांचेच सार्वमत घेण्यात यावे या नव्या मागणीमुळे पंजाबात फार

मोठी खळबळ उडाली. केवळ मुसलमानांचे सार्वमत घेतले तर सबंध पंजाब पाकिस्तानात जाईल या आशंकेने आणि सिकंदर हयातखान यांची लीगबरोबर गट्टी जमलेली असल्याने आधीच घाबरून गेलेल्या बिगर-मुसलमानांत अत्यंत तीव्र प्रतिक्रिया उसळली. १९४२ च्या जूनमध्ये सर सिकंदर यांनी मुस्लिम-शीख करार किंवा सिकंदर-बलदेवसिंग करार घडवून आणला होता. या करारामुळे शिखांना काही सवलती मिळणार होत्या आणि बलदेवसिंग गटाने सत्ताधारी संयुक्त आघाडीत सामील व्हावयाचे होते. आपले आसन आणखी बळकट करून ठेवण्यासाठी त्यांनी शहरी हिंदू मध्यम वर्गाला, विशेषतः व्यापाऱ्यांना काही विशिष्ट सवलती देऊ केल्या होत्या. मुसलमानांपुरते सार्वमत मर्यादित ठेवण्याच्या जीनांच्या नव्या पवित्र्यामुळे सर सिकंदर यांना पाठिंबा देणारे हिंदू आणि शीख दोघेही कमालीचे अस्वस्थ होऊन गेले. त्यांना एक प्रकारचा दिलासा देण्याकरता सर सिकंदर यांनी पंजाबच्या फाळणीची संभाव्यता असलेली एक नवी योजना पुढे मांडली. त्यांची ही योजना अशी होती की, सुरवातीला घेण्यात यावयाच्या फक्त मुसलमानांच्या सार्वमतात जर त्यांनी पाकिस्तानच्या बाजूने कौल दिला तर पूर्व पंजाबमधील हिंदू आणि शीख यांचेही सार्वमत घेतले जाऊन त्यांना पाकिस्तानमध्ये जाणाऱ्या पंजाबमधून फुटून निघण्याचा हक्क राहील आणि त्यांनी तसा निर्णय घेतला तर ज्या भागात मुसलमानांची बहुसंख्या नसेल तो भाग त्यांना पूर्व पंजाबात समाविष्ट करून घेता येईल. सर सिकंदर यांनी आपल्या या नव्या योजनेची वाच्यता प्रथम त्या प्रांताच्या गव्हर्नरांजवळ केली आणि त्यांना आपल्या योजनेला पाठिंबा देण्याची विनंती केली. त्यावेळी ग्लॅन्सी हे पंजाबचे गव्हर्नर होते. सर सिकंदर यांची योजना जीनांकडून आलेली नाही हे एक आणि दुसरे म्हणजे त्यामुळे पाकिस्तानच्या योजनेतील वैगुण्य आपोआपच उजेडात येते. या कारणाने या योजनेचा आग्रह धरला तर सर सिकंदर जीनांचा राग ओढवून घेतील असे गव्हर्नरांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत लिनलिथगो यांचा सल्ला घेण्यात आला असता त्यांनी असे मत व्यक्त केले की, पंजाबची फाळणी करण्याच्या योजनेमुळे जातीय तणाव कमी होण्याऐवजी उलट तो उग्र स्वरूप धारण करील. सर ग्लॅन्सी यांनी आधीच अंदाज केला होता त्याप्रमाणे खरोखरीच सर सिकंदर यांना जीनांच्या रागाला तोंड द्यावे लागले आणि त्याबरोबर त्यांनी तावडतोब माघार घेतली. दिनांक ३ ऑक्टोबर रोजी फिरोजपूर येथे झालेल्या जाहीर सभेत बोलताना ते असे म्हणाले की, मुसलमानांच्या स्वयंनिर्णयाच्या मागणीला विरोध करणे कोणत्याही पक्षाच्या दृष्टीने शहाणपणाचे ठरणार नाही. मुस्लिमलीग वर्किंग कमेटीच्या बैठकीत त्यांनी स्वतःच आपल्या योजनेविरुद्ध भूमिका घेतली. सिकंदर-बलदेवसिंग करारामुळे बरे दिवस येतील अशी आशा करणाऱ्या शीखनेत्यांचा सर सिकंदर यांच्या या नव्या पवित्र्यामुळे थरकाप उडाला.

जीनांचा रोष ओढवल्यामुळे सर सिकंदर इतके धास्तावून गेले होते की, नोव्हेंबर

महिन्यात जीनांनी पंजाबचा दौरा केला त्यावेळी त्यांच्या प्रत्येक सभेत आपण जीनांशी एकनिष्ठ असून मार्च ४० च्या लाहोर ठरावाला आपला संपूर्ण पाठिंबा आहे असे ते पुनः पुन्हा सांगत. जीनांना बहुसंख्य मुस्लिम प्रांतांचा पाठिंबा नाही हा काँग्रेसचा आरोप खोडून काढून जीनांचे हात बळकट करण्यासाठी १९३७ च्या ऑक्टोबर महिन्यात भरलेल्या लीगच्या अधिवेशनाला हजर रहाण्याकरता पंजाब कायदेमंडळातील मुसलमान सभासदांच्या समवेत आपण अक्षरशः छत्रधारी सैनिकांप्रमाणे लखनौला अवतीर्ण झालो होतो, असाही त्यांनी अनेकवार खुलासा केला. सर सिकंदर यांचे प्रत्यक्ष नाव न घेता मुस्लीम बहुसंख्य प्रांतातील इतर अल्पसंख्य गटांचा स्वयंनिर्णयाचा अधिकार मान्य करणाऱ्या योजनेच्या प्रवर्तकांवर जीनांनी कडक टीका केली. असा अधिकार दिला तर त्यामुळे शेकडो पाकिस्ताने निर्माण होतील असा युक्तिवाद करून ते श्रोत्यांना सवाल करीत की, ही नवी योजना कोणाच्या डोक्यातून निघाली ? आणि ते पुढे सांगत की, हिंदुस्तानातील प्रत्येक जमातीला स्वयंनिर्णयाचा हक्क द्या असे म्हणणारा एक तर कमालीचा मूर्ख असला पाहिजे किंवा खोडसाळपणाने तरी तो असे म्हणत असावा. मुसलमान स्वयंनिर्णयाचा हक्क अशासाठी मागतात की, एका विशिष्ट भूभागात ते एक राष्ट्र म्हणून राहतात व त्या भूमीला आपली गृहभूमि (होमलँड) असे मानतात. एकाद्या राष्ट्रात विखुरलेल्या इतर उपगटांना स्वतंत्र राज्ये तोडून दिल्याचे एक तरी उदाहरण तुम्ही दाखवू शकाल का ? जीनांच्या या शेवटच्या वाक्यात खलिस्तानची मागणी करणाऱ्यांना टोला होता. आपल्या अनेक भाषणांतून शीखांनी मुस्लीमलीगबरोबर तडजोड करण्यास पुढे यावे असे जीना आवाहन करीत. त्यावर शीख नेत्यांकडून त्यांना सुनावले जाई की, ते भिक्षेची झोळी घेऊन कोणापुढेही तोंड वेंगाडायला तयार नाहीत. शीख पुढाऱ्यांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचा जीनांनी खाजगी बैठकीतूनही खूप प्रयत्न करून पाहिला परंतु त्यातून काही निष्पन्न होऊ शकले नाही.

दिनांक १९ नोव्हेंबर रोजी ल्यालपूर येथे केलेल्या जाहीर भाषणात जीनांनी सर सिकंदर यांना सरळच ताकीद दिली. त्यांनी असे जाहीर केले की, मुसलमान मंत्र्यांनी हे ध्यानात बाळगावे की, आमच्या अनुमतीवाचून ते अधिकार पदावर राहू शकणार नाहीत. त्याच भाषणात पंजाब सरकारने बंदी घातलेल्या खाकसार संघटनेबद्दल जीनांनी सहानुभूती व्यक्त केली. त्यांच्यानंतर बोलायला उठलेल्या सर सिकंदर यानी खाकसार संघटनेवरील बंदी लवकरच उठविण्यात येईल असे सांगून टाकले. त्यानंतर थोड्याच दिवसात सर सिकंदर यांचे अकाली निधन झाले. त्यामुळेच जीनांकडून आणखी होणाऱ्या अवहेलनेतून ते सुटले.

पंजाबमधील अल्पसंख्यांकांचा प्रश्न जीनांना एकसारखा सतावीत होता. शीखांनी त्यांना पाठिंबा देण्याचे नाकारले. सरदार जोगेंद्रसिंग यांनी २५ नोव्हेंबर १९४२ रोजी पंजाबची फाळणी करण्याच्या शीख मागणीचा पुन्हा आग्रह धरला. आपल्या पंजाबच्या

दौऱ्यात जीनांनी ख्रिश्चन, अनुसूचित जाती आणि इतर अल्पसंख्यांकांना असे आश्वासन दिले की, पाकिस्तानात त्यांचे हितसंबंध सुरक्षित राखले जातील. परंतु पाकिस्तानात इस्लामी राज्यघटना अमलात आणली जावी असा आग्रह धरणाऱ्या उत्साही कडव्या मुसलमानांच्या विचारसरणीशी . जीनांच्या या आश्वासनांचा मेळ बसत नव्हता. म्हणून एप्रिल १९४३ मध्ये फक्त सभासदांसाठी खुल्या असलेल्या लीग कौन्सिलच्या अधिवेशनात पाकिस्तानातील नागरिकत्वाचे हक्क किंवा पाकिस्तानची घटना या सारख्या विवाद्य आणि मुस्लीम ऐक्याला बाधक ठरणाऱ्या प्रश्नावर चर्चा टाळण्याचा सल्ला जीनांनी आपल्या अनुयायांना दिला, खुल्या अधिवेशनात जीनांनी अशी भूमिका घेतली की, मिल्लत म्हणजे पाकिस्तानातील मुसलमान स्वतःची राज्यघटना बनविण्यास समर्थ आहेत. इस्लामी घटनेचा जो पुकारा केला जात आहे तो खोडसाळपणाचा आणि पाकिस्तानी जनतेवर अविश्वास व्यक्त करणारा आहे. जे लोक पाकिस्तानात इस्लामी सरकार राहील असा प्रचार करीत आहेत ते लीगचे शत्रू असून मुस्लीम जनतेत ते फाटाफूट निर्माण करीत आहेत असा आरोप करून जीनांनी असे घोषित केले की, पाकिस्तानची घटना किंवा सरकार कसे असावे ते तेथील जनता ठरवील. पाकिस्तानची राज्यघटना ही हुकूमत-इ-इला-हिया (ईश्वरी साम्राज्य) या संकल्पनेवर आधारलेली असावी अशा आशयाचा एक ठराव कौन्सिलच्या बैठकीसमोर येणार होता. परंतु जीनांच्या वरील वक्तव्यानंतर तो बारगळला. कारण अशा ठरावामुळे शीख आणि इतर अल्पसंख्यांक आणखीच बिथरले असते आणि जीनांना त्यावेळी असा कोणताही नवा उपद्रव ओढवून घ्यावयाचा नव्हता.

होम मेंबर मॅक्सवेल हे लवकरच निवृत्त होणार होते. तेव्हा त्यांच्या जागी कोणाची नेमणूक करावयाची असा प्रश्न साहजिकच उपस्थित झाला. त्यावेळी लिनलिथगो यांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवरील बहुतेक सर्व बिगर मुसलमान सभासदांचे असे मत पडले की, एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे संपूर्ण भारतीयीकरण करण्याची संधी आयतीच चालून येत आहे. तेव्हा मॅक्सवेल यांच्या जागी कोणातरी भारतीयाची नेमणूक करावी. परंतु कौन्सिलवरील एक सभासद महंमद उस्मान यांनी मात्र असे सुचविले की जो काय बदल करावयाचा असेल तो जीनांच्या सल्ल्याने करावा. कारण आजच्या परिस्थितीत एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे संपूर्ण भारतीयीकरण केले तर त्यामुळे जीनांचा रोष ओढवून घ्यावा लागेल. परंतु याबाबत त्यांनी अनधिकृतपणे जीनांची भेट घेऊन आपण त्यांचे मत समजून घेणे कितपत संयुक्तिक ठरेल याबद्दल मात्र ते स्वतः साशंक होते. त्यांनी लिनलिथगोंना असे सांगितले की, जर मी जीनांना भेटलो तर ते लगेच कौन्सिलवर मुस्लीमलीगला मताधिक्य मिळाले पाहिजे ही आपली मागणी पुन्हा उपस्थित करून मोकळे होतील. शेवटी होम मेंबरच्या नेमणुकीबाबत जीनांची पूर्वसंमती मिळविण्यासाठी लिनलिथगो यांनी त्यांना आपल्याकडे भोजनास येण्याचे निमंत्रण पाठवले. परंतु पूर्वनियोजित कार्यक्रमाचे निमित्त करून जीनांनी ते नाकारले.

काँग्रेस पुढाऱ्यांची सुटका घडवून आणून त्यांच्याशी वाटाघाटी करण्याच्या बाबतीत आपण पुढाकार घेण्यास का तयार नाहीत याचा खुलासा जीनांनी दिनांक २४ जानेवारी १९४३ च्या मुंबईच्या जाहीर भाषणात केला होता. आपली इतकी ताकद आहे की आपण सरकारला शरण यावयास लावू आणि मुसलमानांच्या हिताचा बळी देऊन आपली मागणी सरकारला मान्य करावयास लावू अशा गुर्मीत गांधी आणि त्यांची काँग्रेस आहे. परंतु लीगबरोबर समझोता केल्यावाचून स्वातंत्र्य मिळू शकणार नाही. त्यामुळे काँग्रेस अविभक्त भारताची भाषा करते तेव्हा त्याचा अर्थ सर्वांची गुलामगिरी कायम रहाणार असाच होतो. असे जीनांना या भाषणात सुचवावयाचे होते. ऐतिहासिक आणि भौगोलिक दृष्ट्या भारत हा एक देश आहे अशा आशयाचे वक्तव्य केल्याबद्दल त्यांनी आपल्या त्या भाषणात व्हाइसरॉय आणि अमेरी यांच्यावर देखील टीकेची झोड उठविली. अनेक मुसलमानांनी जीनांच्या त्या भाषणावर टीका केली. त्यासंबंधीची आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. सैयद अबदुल लतीफ यानी एका पत्रकार परिषदेत जीनांना चांगलेच धारेवर धरले. त्यांच्या मते :—

"पाकिस्तान संबंधीची आपली कल्पना जीनांनी कधीही स्पष्टपणे पुढे मांडलेली नाही; लीगला सामावून घेण्याचे काँग्रेसने केलेले सर्व प्रयत्न ठोकरून लावले आणि याबाबतीत आपण होऊन पाऊल उचलण्याची जेव्हा जेव्हा संधी आली तेव्हा तेव्हा त्यांनी ती डावलली. जीनांच या सर्व गोष्टींना जबाबदार आहेत. घटक राज्यांना काँग्रेसने जास्तीत जास्त स्वायत्तता देऊ केली होती आणि प्रांतांना शेष अधिकार इतकेच नव्हे तर फुटून निघण्याचा अधिकार देण्यासदेखील काँग्रेस तयार होती. परंतु जीनांचा दुराग्रह कायमच होता. काँग्रेसने केलेल्या सहकार्याच्या प्रत्येक आवाहनाबरोबर जीनांचा हेकटपणा वाढतच गेला. हिंदू महासभेने देखील जीनांच्याबरोबर बोलणी करण्याचा प्रयत्न करून बघितला. परंतु तिने लवकरच ओळखले की, जीनांच्या हेकटपणाला तितक्याच हेकटपणाचीच भाषा समजू शकते. अन्य मुस्लिम राष्ट्रांचाही पाकिस्तानच्या मागणीला पाठिंबा आहे अशी वल्गना जीना करीत होते. परंतु तुर्कस्तानचे शिष्टमंडळ येथे आले असता त्याने स्पष्टपणे असे सांगून टाकले की भारताच्या घरगुती भांडणात आम्हाला रस नाही. राजाजींना शेवटी लीगचे माप तिच्याच पदरात घालावे लागले. "लाहोरच्या पश्चिमेचा एक आणि डाक्का व मैमनसिंग भोवतालचा एक असे दारिद्र्याने ग्रासलेल्या प्रदेशाचे दोन लहान लचके तोडून ते खुशाल घेऊन बसा. तुमच्या पाकिस्तान-संबंधीच्या ठरावातून यापेक्षा जास्त काय निष्पन्न होणार आहे? खुशाल घ्या. त्यामुळे आमची तरी एकदाची सुटका होईल. कारण मग उर्वरित हिंदुस्तानासाठी आम्हा हिंदूंना समर्थ अशी मध्यवर्ती संसदीय सत्ता निर्माण करता येईल आणि मग जे एकपक्षीय सरकार अधिकारावर येईल त्याच्या हुकमतीत तुमच्या मुसलमान अल्पसंख्यांकांना नांदावे लागेल. जीनांना हे सर्व कसे काय वाटते? निरर्थक अहं-

भावनेच्या आहारी जाऊन काळ्याकुट्ट अनिश्चिततेच्या भोवती आपण भरकटत आहोत. क्षणभर तरी जीना विचारात घ्यावयाला तयार आहेत काय?

दिनांक १० फेब्रुवारी रोजी गांधींनी उपोषण सुरू केल्यानंतर जीनांनी त्यांच्यावर पुन्हा गालिप्रदान केले आणि राजाजी, सप्रू वगैरेंनी दिल्ली येथे बोलावलेल्या निर-निराळ्या पुढाऱ्यांच्या बैठकीस हजर रहाण्याचेही नाकारले. २० फेब्रुवारी रोजी भरलेल्या या बैठकीस हजर असलेले सप्रू, जयकर, एस. पी. मुकर्जी, महाराजसिंग, सर सुलेमान कासम, हाजी मीठा, मास्टर तारासिंग, रेव्हरंड मॅकँझी, अलाबक्ष, ए. एच. गझनवी, मौलाना अहमद सैयद साहेब, अबदुल कायूम, झहिरुद्दिन, हुमायून कबीर, कुंझरू, मुनशी, सरदार संत सिंग, बी. टी. रणदिवे इत्यादींनी मिळून संयुक्तपणे मांडलेला गांधीजींची तातडीने मुक्तता करण्यात यावी अशी मागणी करणारा ठराव पास करण्यात आला. त्यानंतरच्या दोन महिन्यात भरलेल्या अहरार आणि मोमीन यांच्या वार्षिक अधिवेशनात मुसलमान समाजाची एकमेव प्रतिनिधी असल्याचा लीगचा दावा खोटा असल्याचे जाहीर करण्यात आले. मोमीन परिषदेत पाकिस्तान योजना ही उर्वरित भारतात रहाणाऱ्या अल्पसंख्य मुसलमानांच्या हिताला बाधक ठरणार आहे या कारणास्तव तिचा धिक्कार करण्यात आला.

गांधींच्या उपोषणाबद्दलही सरकारने अत्यंत कठोर धोरण स्वीकारले होते. ऑक्टोबर १९४२ मध्ये डॉ. आंबेडकर यांनी व्हाइसरॉयना एक जाडजूड निवेदन सादर केले होते. त्यात अनुसूचित जातींच्या वतीने अनेक तक्रारी आणि मागण्या नमूद करण्यात आल्या होत्या. १९४३ च्या जानेवारीत त्याला पुस्ती जोडणारे आणखी एक निवेदन सादर करण्यात आले. त्यांत हिंदुस्तानसाठी घटना समिती बोलाविण्याच्या मागणीला डॉ. आंबेडकरांनी तीव्र विरोध दर्शविला होता. अमेरी अर्थातच डॉ. आंबेडकरांच्या या भूमिकेमुळे खूष होऊन गेले आणि त्यानी लिनलिथगोंना असे कळविले की, अनु-सूचित जातींना हाताशी धरून त्यांना हळूहळू मुसलमानांसारखा दर्जा प्राप्त करून देणे फायद्याचे करणार आहे. ज्यांची दखल घ्यावी लागेल असे अल्पसंख्यांकांचे दोन प्रबळ गट निर्माण करून ठेवणे हे राजकीय दृष्टया केव्हाही आपल्या हिताचेच ठरणार आहे. लिनलिथगो यांनी आपल्या उत्तरात आपण या विचारांशी संपूर्ण सहमत आहोत असे कळविले. परंतु त्यात पुढे त्यानी अमेरींच्या असे निदर्शनास आणून दिले की, आंबेडकर, राजा आणि शिवराज यांचा अपवाद वगळता अनुसूचित जमातीत तोलामोलाच्या व्यक्तीचा अभावच आहे. दिनांक ८ फेब्रुवारी १९४३ रोजी अनुसूचित जातींना प्रोत्साहन देण्याबाबतचे आपले आणखी काहीं विचार अमेरींनी व्यक्त केले होते.

मुसलमानांची फार मोठी संख्या असलेल्या प्रांतांना फुटून निघण्याचा अधिकार देऊन त्यांना जसे संरक्षण मिळेल तसे ते भौगोलिक निकषावर अनुसूचित जातीच्या बाबतीत मात्र ते मिळणे अशक्य आहे. घटनेच्या द्वाराच प्रत्येक अनुसूचित जातीला

एक्झिक्युटिव्हवर जागा देऊन आणि एक्झिक्युटिव्ह कौन्सिल योग्य त्या प्रमाणात कायदेमंडळापासून अलिप्त राखूनच त्यांना संरक्षण प्राप्त होईल. त्याचप्रमाणे गांधींच्या निधनानंतर अनुसूचित जातींच्या बाबतीतील सध्याच्या विचित्र निवडणूक पद्धतीत बदल करून त्याना जातीय तत्वावर आपले प्रतिनिधी प्रत्यक्षपणे निवडण्याचा अधिकार देण्याचाही विचार करता येईल.

भारत छोडो आंदोलन आणि त्याबरोबर फार मोठ्या प्रमाणावर देशभर उसळलेले हिंसाचार यामुळे अमेरिकेला फार चिंता वाटू लागली. हिंदुस्तानच्या प्रश्नाबाबत अमेरिकेकडून ब्रिटनवर वाढत्या प्रमाणात दडपण येऊ लागले होते. १९४२ च्या ऑगस्टमध्ये अशी एक घटना घडली की, जिला ब्रिटनकडून हिंदुस्तानच्या व्यवहारात अमेरिकेचा हस्तक्षेप अशी संज्ञा दिली गेली. त्या घटनेमुळे ब्रिटिश सरकार बरेच अस्वस्थ नाराज झाले. त्या महिन्यात अमेरिकेचे भारतातील कौन्सिल जनरल मेरेल यानी आपल्या सरकारला पाठविलेल्या अहवालात अशी माहिती पुरविली की, मुस्लीम-लीगला मुख्यतः हिंदू आणि मुसलमान संस्थानिक, बडे मुसलमान जमीनदार आणि विशेषतः कलकत्यातील इंग्रज व्यापारी यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य होते. हिंदुस्तानच्या खऱ्या प्रतिनिधींना येथील सत्ता ताब्यात घेता येऊ नये हाच सरकारप्रमाणे संस्थानिकांचा आणि इंग्रज व्यापाऱ्यांचा मुस्लीम लीगला पाठिंबा देण्या-मागील उद्देश आहे असा निष्कर्ष त्यांनी काढला होता. १९४२ च्या डिसेंबरमध्ये अमेरिका, ब्रिटिश सरकार आणि इतर वासाहातिक सरकारे यांचा सर्वसाधारण वासाहतिक प्रश्नासंबंधी एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्याचा विचार चालला होता. या जाहीरनाम्यात हिंदुस्तानसकट प्रत्येक राष्ट्राला आपल्या देशाचा कारभार स्वतः पाहाण्याचा निर्विवादपणे अधिकार राहील अशी हमी देण्यात येणार होती. परंतु अमेरीचा त्याला विरोध होता. निदान त्यातून हिंदुस्तानचा उल्लेख मुद्दाम वगळण्यात यावा असा त्यांनी आग्रह धरला. त्याच महिन्यात निम-सरकारी स्वरुपाची पॅसिफिक रिलेशन्स इंटरनॅशनल कॉन्फरन्स भरली होती. त्या परिषदेत अमेरिकेच्या आणि कॅनडा या प्रतिनिधींनी काँग्रेस पुढाऱ्यांची मुक्तता करून त्याना आंदोलन मागे घेण्यास उद्युक्त करवे व तडजोडीचे नव्याने प्रयत्न सुरू करावेत असा ब्रिटिश प्रतिनिधीपाशी आग्रह धरला. परंतु सर रामस्वामी मुदलियार यांच्या नेतृत्वाखाली त्या परिषदेला गेलेल्या शिष्टमंडळाने या कल्पनेला विरोध करताना असा युक्तिवाद मांडला की, ब्रिटिश सरकार काँग्रेसचा अनुनय करते, अशी मुसलमान पुढारी आधीच तक्रार करीत असल्यामुळे असे काही केले तर मुसलमानांचे शत्रुत्व ओढवून घ्यावे लागेल. त्यानंतर रुझवेल्ट यांनी फिलिप्स यांच्यासारख्या मुरब्बी मुत्सद्याची भारतात नेमणूक करण्याचे ठरविले. परंतु त्यांना राजदूत म्हणून भारतात पाठविण्याची अमेरिकेची विनंती ब्रिटिश सरकारने धुडकावून लावली. शेवटी अध्यक्ष रुझवेल्ट यांचे भारतातील खास प्रतिनिधी म्हणून ते १९४३ च्या जानेवारीत भारतात येऊन दाखल झाले.

थोड्याच दिवसात त्यानी भारताचा दौरा करून निरनिराळ्या राजकीय पक्षांचा व नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या. त्याचप्रमाणे ब्रिटिश अधिकाऱ्यांबरोबरही त्यांनी बोलणी केली. दरम्यान गांधीजींचे उपोषण सुरू झाले होते. दिनांक १८ फेब्रुवारी रोजी अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट कॉर्डेल हल यांची फिलिप्स यांना तार आली. तिच्या फिलिप्स यांनी व्हाइसरॉय यांची भेट घेऊन अमेरिकेला भारतातील राजकीय परिस्थितीबद्दल गंभीर चिंता वाटत असल्याचे त्याना कळविण्याची सूचना देण्यात आली होती. त्याचप्रमाणे यदाकदाचित गांधींचे प्राणोत्क्रमण झाले तर परिस्थिती अत्यंत चिघळण्याचा संभव असल्यामुळे ते टाळण्यासाठी काही तरी मार्ग काढला जाईल अशी अमेरिकेला आशा वाटते असेही व्हाइसरॉयच्या कानावर घालण्यास फिलिप्स याना सांगण्यात आले होते. गांधीच्या मृत्युचा धोका लक्षात घेऊनही अजिबात पडते न घेण्याचा चर्चिल, अमेरी आणि लिनलिथगो या तिघांना निर्धार होता. त्यामुळे अमेरिकेची ही लुडबुड त्यांना खपली नाही. लिनलिथगो यांनी फिलिप्स यांना असे स्पष्टच सांगून टाकले की, गांधीची बिनशर्त मुक्तता करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. त्यामुळे युद्ध प्रयत्नावर आपले सारे लक्ष केंद्रित करीत असलेल्या सरकारला कमीपणा पत्करावयास लावून गांधींना पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्यासारखे होईल. शिवाय गांधींच्या सुटकेची मागणी करण्यासाठी पुढाऱ्यांची जी बैठक झाली होती तिला उपस्थित रहाण्यास जीनांनी नकार दिला होता हेही त्यांनी फिलिप्स यांच्या निदर्शनास आणून दिले. शेवटी लिनलिथगो यांनी फिलिप्स यांना असेही सांगितले की, गांधी मरण पावल्यामुळे देशात अशांतता निर्माण झाली तरी ती सहा महिन्यांहून जास्त काळ टिकणार नाही आणि त्यानंतर मात्र हिंदुस्तानचा युद्धाच्या हालचालींसाठी अगदी भरवशाचा तळ म्हणून उपयोग करून घेता येईल. लिनलिथगोंनी फिलिप्स यांच्याबरोबरच्या आपल्या भेटीचा वृत्तांत अमेरींना कळविल्यानंतर त्यांनी अर्थातच लिनलिथगोंना जोरदार पाठिंबा दिला आणि अमेरिकेने भारताच्या प्रकरणात हस्तक्षेप करावा याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. एवढेच नव्हे तर हल आणि फिलिप्स यांनी ब्रिटिश सरकारची परवानगी न घेता परस्पर व्हाइसरॉयना भेटणे बरोबर नाही असेही मत व्यक्त केले. फिलिप्स हे आपला बराचसा वेळ सरकारच्या विरोधकांसमवेत घालवतात अशी तक्रार करून लिनलिथगो यांनी फिलिप्स यांना राजकीय पक्षांच्या शिष्टमंडळाला भेटी देण्यावरही जोराचा आक्षेप घेतला. त्याचप्रमाणे गांधींना भेटण्याची परवानगी मिळावी अशी फिलिप्स यांनी केलेली विनंती त्यांनी दोनदा फेटाळून लावली. याबाबत त्यांनी अमेरींना असे कळविले की, रुझवेल्ट यांचे खास प्रतिनिधी गांधींना भेटले तर त्यामुळे गांधींची प्रतिष्ठा वाढेल आणि गांधींना नेमके तेच हवे आहे. आणि त्यांचा तर तो एक मोठा विजय ठरेलचा पण त्यामुळे त्यांच्या येथील राजकीय विरोधकांना मात्र ती एक डोकेदुखी होऊन बसेल.

सर सिकंदर यांच्या मृत्यूमुळे जीनांना पंजाबवर आपले संपूर्ण प्रभुत्व प्रस्थापित करण्याची संधी मिळाली. तथापि मलिक खिजर हयात खान तिवाना यांना मंत्रि-मंडळ बनविण्यास सांगण्यापूर्वी गव्हर्नरांनी जीनांचा सल्ला घेतला नव्हता म्हणून ते नाराज होते. वस्तुत: खिजर हयात खान यांच्या नेतृत्वाला प्रांतिक मुस्लीम लीग आणि पंजाब कायदेमंडळातील मुसलमान सभासद यांनी जानेवारीच्या पहिल्या आणि तिसऱ्या आठवड्यात एकमताने मान्यता दिली होती. १९४३ साली मार्चच्या पहिल्या आठवड्यात मुस्लीम लीग कौन्सिलची बैठक भरली असताना बदाऊनी यांनी पंजाब कायदेमंडळातील मुसलमान सभासदांनी स्वत:ला युनियानिस्ट म्हणून न घेता स्वतंत्र मुस्लीमलीग पार्टीची स्थापना करावी असा ठराव मांडला अर्थात त्यामागे जीनांच हात होता हे उघड आहे. खिजर हयात खान यांनी सिकंदर-जीना कराराच्या आधारे युनियानिस्ट पार्टीची आवश्यकता कशी आहे त्याचा सविस्तर खुलासा करून आपली भूमिका स्पष्ट केली आणि यापुढे पंजाब मुस्लीमलीगमध्ये चैतन्य निर्माण करण्याची तयारी दर्शविली. मुख्यमंत्री म्हणून आपली नियुक्ती करण्यापूर्वी गव्हर्नरांनी मुस्लीम लीगला विचारले नाही या तक्रारी बाबत त्यांनी असा खुलासा केला की, इन्स्ट्रूमेंट ऑफ इन्स्ट्रक्शन्स अन्वये गव्हर्नरांवर तसे बंधन नाही. या खुलाशाने जीनांचा पारा जरा खाली आला आणि त्यांनी बदाऊनी यांना आपला ठराव मागे घेण्यास सांगितले. तथापि सिकंदर-जीना करारासंबंधी त्यांनी असे भाष्य केले की, युनियानिस्ट पार्टीतील मुसलमान सभासदांना स्वतंत्र मुस्लीमलीग पार्टी म्हणून काम करावे असे त्या करारात अभिप्रेत होते. त्याप्रमाणे ८६ सभासदांनी मुस्लीमलीगच्या प्रतिज्ञापत्रावर सह्याही केल्या होत्या. परंतु पक्षाचे तेथील काम बरोबर चालले नव्हते. त्यांनी पुढे असे सांगितले की, ज्याअर्थी खिजर हयात खान यांनी मुस्लीमलीग पक्षाला मुसलमानांची अधिकृत अशी एकमेव प्रातिनिधिक संघटना म्हणून प्रतिष्ठा आणि सन्मान मिळून देण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले आहे. त्याअर्थी आता अशा ठरावाचा आग्रह धरण्याचे कारण नाही. पुढच्या महिन्यात भरलेल्या लीगच्या खुल्या अधिवेशनात ब्रिटिश सरकारने संघराज्यात्मक घटना लादण्याचा प्रयत्न केला तर मुस्लिम हिंदुस्तानाकडून सर्वशक्तिनिशी त्याचा प्रतिकार केला जाईल आणि अपरिहार्य-पणे त्याची परिणीती संघर्ष, रक्तपात आणि दुरवस्था यात झाली तर त्याची जबाबदारी सर्स्वी ब्रिटिश सरकारवर राहील असा इशारा देणाऱ्या खलिकुझमान यांनी मांडलेल्या ठरावास खिजर यांनी जोरदार पाठिंबा दिला. त्यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी असेही आश्वासन दिले की, मुसलमानांचा स्वयंनिर्णयाचा हक्क मिळवून घेण्यासाठी जो त्याग करावा लागेल त्यात पंजाबमधील मुसलमान इतरांच्या मागे पडणार नाहीत.

१९४३ च्या मार्चपर्यंत सिंध मधील मुस्लीम लीग मंत्रिमंडळाने आपले स्थान बळकट करून घेतले होते. मुसलमान हे एक स्वतंत्र राष्ट्र असून हिंदुस्तानच्या उपखंडातील ज्या विभागात ते बहुसंख्य असतील तेथे त्यांची स्वतंत्र राज्ये असली पाहिजेत

मुसलमानांना दुसऱ्या राष्ट्राच्या (हिंदूच्या) वर्चस्वाखालील केंद्रीय सरकारात जावे लागणारी कोणतीही राज्य घटना ते कधीही मान्य करणार नाहीत आणि तसा प्रयत्न झाला तर त्याचे अत्यंत घातक आणि दुःखद परिणाम होतील असे बजावणारा जी. एम. सईद यांचा ठराव सिंध कायदेमंडळात ३ मार्च रोजी पास झाला. या ठरावाच्या बाजूने २४ मते पडली तर ३ हिंदू मंत्र्यांनी त्याविरुद्ध मतदान केले. इतर सात हिंदू सभासदांनी मतदानापूर्वीच सभात्याग केला होता. त्याच महिन्यात बंगाल-मधील फजलूल हक्क मंत्रिमंडळावर धान्य परिस्थिती नीट न हाताळल्याबद्दल जोराची टीका होऊ लागल होती. परंतु अविश्वासाच्या ठरावातून ते मंत्रिमंडळ कसेबसे बचावले. त्यानंतर गव्हर्नरांनी हक यांना बोलावून घेऊन बंगालमध्ये सर्वपक्षीय मंत्रि-मंडळ बनविण्याची सूचना केली. असे सर्वपक्षीय मंत्रिमंडळ बनवणे सोपे जाते म्हणून हक यांनी भोळसटपणाने आपल्या मंत्रिमंडळाचा राजिनामा गव्हर्नरांना सादर केला. परंतु त्यांनी अशी अट घातली की, दुसऱ्या दिवशी अंदाजपत्रकावर मतदान होणार आहे ते होऊन जाईपर्यंत हक यांनी राजीनामा दिला असल्याचा गौप्यस्फोट करू नये. तथापि गव्हर्नरांनी हे आश्वासन पाळले नाही आणि त्यामुळे हक यांची अतिशय पंचाईत होऊन गेली. लिनलिथगो हे देखील या सर्व प्रकारामुळे अस्वस्थ झाले.

मुस्लिम लीगचे नझिमुद्दीन यांना बहुमत नसतानाही गव्हर्नरांनी पंतप्रधान म्हणून त्यांची नियुक्ती केली. मात्र पुढे दोन महिन्यांनी म्हणजे १६ जून १९४३ रोजी नझिमुद्दिन सरकारचा पाडाव झाला तर पुन्हा हक यांना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण करण्याऐवजी गव्हर्नरांची राजवट सुरू करणे योग्य होईल कां असे हताशपणे त्यांनीच लिनलिथगो यांना विचारले.

१९४३ च्या एप्रिल महिन्यात झालेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनाच्या अगोदर फक्त सभासदांनाच प्रवेश असलेल्या लीग कौन्सिलच्या बैठकीत जीनांनी आपल्या अनुयायांना संघटना बळकट करून ब्रिटिशांविरुद्ध लढा देण्याच्या तयारीस लागण्याचे आवाहन केले. युद्ध संपल्यानंतर सर्वजण थकलेले असतील आणि कोठल्याही नव्या दिव्याला तोंड देण्याची त्यांची तयारी नसेल म्हणून लढ्याची नक्की तारीख युद्ध समाप्तीनंतर मुक्रर करण्यात येणार होती. सभासदांपुढे बोलताना जीनांनी असे सांगितले की, आपण कॉंग्रेसचे तर निर्दालन केलेच आहे. आता ब्रिटिशांची पाळी आहे. म्हणून आपले ध्येय साध्य करून घेण्यासाठी आपल्याला इतकेच करावयाचे आहे की, सबंध देशात फार मोठ्या प्रमाणावर कटकटी निर्माण करावयाच्या म्हणजे त्यांना आपल्याला शरण येणे भागच पडेल. खुल्या अधिवेशनात जीनांनी सरकार-विरुद्ध प्रक्षोभक भाषण केले. ब्रिटिश सरकार आणि मुस्लीम लीग यांच्यातील लढाई लुटुपुटीचीच होती. मुस्लीम लीग बद्दलच्या आपल्या पक्षपातावर पांघरूण घालण्यासाठी अमेरी आणि लिनलिथगो हे दोघेही आपल्या भाषणातून ढोंगीपणाने भारताच्या

भौगोलिक एकतेवर भर देत. त्याचप्रमाणे ऐतिहासिक काळापासून राजकीय ऐक्य कसे नांदत आले आहे त्याचा आढावा घेऊन सर्व जमातींचा समावेश असलेल्या सरकारबद्दल अकबर बादशहाचा गौरवपूर्ण उल्लेख करीत आणि आपापसातले सर्व मतभेद मिटवून देशाचे राजकीय ऐक्य अभंग राखण्याचे तोंडदेखले आवाहनही ते करीत असत. एप्रिल १९४३ मध्ये भरलेल्या या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात अनेक सदस्यांची राणा भीमदेवी भाषणे झाली. जीनांनी आक्रमक पवित्रा घेऊन असा सवाल केला की, ते ( गांधी ) सरळ मलाच का पत्र पाठवीत नाहीत. तसे करण्यापासून त्यांना कोण अडवू शकणार आहे? व्हाइसरॉयचे उंबरठे झिजविण्यापासून आणि त्यांच्याकडे शिष्टमंडळे पाठवण्यापासून काय साध्य होणार आहे? गांधींनीं मला असे पत्र पाठवले तर ते अडवण्याची या देशातील आजच्या सरकारची मग ते कितीही शक्तिशाली असो. छाती होईल यावर मी क्षणमात्रही विश्वास ठवणार नाही. जीनांच्या भाषणांचा वृत्तांत वाचून गांधीनीं तुरूंगातून जीनांच्या नावे पत्र पाठवून त्यांची भेट घेण्याची इच्छा दर्शविली. तुरूंगाधिकाऱ्यांनी ते पत्र सरकारकडे पाठविले. गांधीचे पत्र जीनांकडे जाऊ द्यावे की नाही यावद्दल ब्रिटिश मंत्रिमंडळाचा सल्ला घेण्यात आला असता चर्चिल यांनी असे मत व्यक्त केले की, हिंदू-मुसलमान "ऐक्य घडवून आणून ब्रिटिशांना घालवून देण्यासाठी भटीची इच्छा व्यक्त करणारे हितसंबंधी व्यक्तीचे पत्र युद्धकालीन परिस्थितीत (जीनांकडे) जाऊ देता कामा नये. 'एकदा का असे पत्र तुम्ही जाऊ दिलेत की त्यामागोमाग तुम्ही कधी न संपणाऱ्या भेटीगाठींच्या कचाट्यात ओढले जाल". सरकारने गांधींचे पत्र अडवून धरल्याचे प्रसिद्ध होताच लीगच्या दुय्यम दर्जाच्या पुढाऱ्यांनी त्याचा उत्स्फूर्तपण निषेध केला. नझिमुद्दिन यांनी तर आपल्या दिल्ली भेटीत वार्ताहर परिषदेत असे सांगितले की, गांधींचे पत्र अडवून सरकारने घोडचूक केली असून जीनांचा जो अपमान केला आहे त्याचा निषेध म्हणून लीग मंत्रिमंडळांना आपल्या अधिकारपदांचे राजिनामे द्यावे लागतील. डॉन दैनिकानेही आपल्या अग्रलेखातून संताप व्यक्त केला. परंतु या प्रश्नाबाबत स्वतः जीनांनी जी भूमिका स्वीकारली तिच्यामुळे त्यांचे अनुयायीही स्थीर होऊन गेले. दिनांक २८ मे १९४३ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी असे सांगितले की, "गांधींच्या पत्राकडे मुस्लिम लीग आणि ब्रिटिश सरकार यांच्यात वितुष्ट निर्माण करून स्वतःची मुक्तता करून घेण्यासाठी टाकलेला एक डाव म्हणूनच पाहिले पाहिजे." त्या पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारच्या कृत्याबद्दल साधी नापसंती देखील व्यक्त केली नाही. उलट गांधीवर मात्र नेहमीसारखे तोंडसुख घेतले. त्यानंतर पाच दिवसांनी खलिकुझमान यांनी संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरांना असे सांगितले की, लीग वर्किंग कमेटीच्या या अगोदरच्या बैठकीत सरकार बरोबर कसलाही वाद उपस्थित न करण्याचा आणि ब्रिटिश सरकार एक पक्ष म्हणून सहभागी असल्याशिवाय कॉंग्रेसबरोबर कोणताही करार न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर आठवडाभराने

लिनलिथगो यांनी अमेरींना असे लिहून कळविले की, "जीना सरकार विरोधी भूमिका कधीही घेणार नाहीत. ब्रिटिश सरकार आणि आपले राजकीय विरोधक यांच्याशी जास्तीत जास्त उद्दामपणाचे वागणे एवढेच त्यांचे भांडवल असून त्या जोरावर जास्तीत जास्त मागण्या पदरात पाडून घ्यावयाच्या एवढेच ते जाणतात. पण असे करतांना ते सरकार बरोबर प्रत्यक्षात कधीही संघर्ष करणार नाहीत. त्या आधी तीन दिवस त्यांनी असे कळविले होते की, गांधींना संपूर्ण शरणागती पत्करावयास लावण्याच्या बाबतीत जीना हे आता ठामपणे सरकारच्या पाठीशी आहेत. ऑक्टोबर १९४३ मध्ये आपले अधिकारपद व्हॅण्हेल यांच्या हाती सुपूर्त करताना लिनलिथगो यांनी राजकीय पक्षातील सततचे मतभेद आणि लीगचे सरकार बरोबरचे सख्य यांच्या आधारावरच आत्मविश्वासपूर्वक असे उदगार काढले होते की, भारतातील ब्रिटिशांच्या सत्तेला निदान आणखी तीस वर्षे तरी मरण नाही.

एप्रिल १९४३ मध्ये दिल्लीत भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष हुसेन मलिक यांनी मोठ्या अभिमानाने असे सांगितले की, एकूण पाच बहुसंख्य मुस्लिम प्रांतापैकी चार प्रांतात मुस्लिम लीगची मंत्रिमंडळे असून उरलेल्या पाचव्या प्रांतातही ते केव्हा येते त्याची आम्ही वाट पहात आहोत. आपल्या अध्यक्षीय भाषणात जीना म्हणाले की, वायव्य सरहद्द प्रांतातील मुसलमान समाज गेल्या १६-१८ महिन्या-पासून संपूर्णपणे मुस्लिमलीगच्या पाठीशी आहे अशी माझी माहिती असून ती अत्यंत विश्वसनीय सूत्राकडून मला मिळालेली आहे त्या प्रांतातील परिस्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन केलेल्या परदेशी पत्रकारांनी पाठवलेली माहिती ही माझ्यावरील विधानाला दुजोरा देणारीच आहे. त्यानंतर महिनाभराच्या आतच तेथे लीग मंत्रिमंडळाची प्रतिष्ठापना करण्यात आली. दिनांक २४ मे १९४३ रोजी वायव्य सरहद्द प्रांताच्या गव्हर्नरांनी लिनलिथगो यांना पाठविलेल्या गुप्त खलित्यावरून हे स्पष्ट होते की, गव्हर्नरांनी सक्रीय पाठिंबा दिल्यामुळेच मुस्लिम लीगचे औरंगजेब खान हे लीग अल्प-मतात असतानाही मंत्रिमंडळ बनवू शकले. कॉंग्रेस पक्षाचे दहा सभासद अटकेत होते याचा गैरफायदा घेऊन गव्हर्नरांनी दिनांक २५ मे १९४३ रोजी औरंगजेब खान यांची वायव्य सरहद्द प्रांताचे पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली. कायदेमंडळाचे त्यानंतरचे पहिले अधिवेशन ऑगस्ट महिन्यात फक्त एक आठवडा भरले होते नंतर ते जे बेमुदत तहकूब करण्यात आले ते एकदम १७ मार्च १९४४ रोजी अंदाजपत्रक सादर करण्यासाठी फक्त एक दिवस बोलावण्यात आले होते.

जेथे जेथे मुस्लिम लीगच्या हातात सत्ता होती त्याठिकाणी तिने मंत्रिमंडळाचा उपयोग आपला पक्ष बळकट करण्याचे एक साधन म्हणून करून घेतला. आसाम मधील सादुल्ला मंत्रिमंडळाने असा हुकूम जारी केला होता की, सरकारी नोकऱ्यांतील फक्त २० टक्के जागा गुणवत्तेनुसार भरण्यात याव्यात. ४ डिसेंबर १९४१ रोजी सिद्धीनाथ सर्मा नावाच्या एका कॉंग्रेस सदस्याने आसामच्या जनगणना अधीक्षकाने

लिहिलेले एक पत्र सभागृहाला सादर करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. जनगणनेत मुसलमानांची लोकसंख्या जास्त आहे असे दाखविण्यासाठी आकडेवारीत फरवाफिरवी करण्याच्या आसाम सरकारच्या सूचनांचा त्या पत्रात अंतर्भाव होता. १३ एप्रिल १९४४ रोजी खलिकुझमान यांची बिहारच्या गव्हर्नरांबरोबर दिलखुलास चर्चा झाली. या चर्चेच्या वेळी त्यांनी आसामचे मुलीस्म लीगचे पंतप्रधान सादुल्ला यांची तोंड भरून स्तुती केली. वस्तुत: त्यांच्या समर्थ नेतृत्वाखालीच आसाममध्ये मुसलमानांचे वसाहतीकरण भर वेगात चालू होते. आणि म्हणूनच खलिकुझमान यांनी आत्मविश्वासाने असे विधान केले की, 'थोड्याच वर्षात आसाम हा बहुसंख्य मुसलमान प्रांत बनून जाईल. बंगाल प्रांतात नझिमुद्दिन आणि सुऱ्हावर्दी यांनी मुलीस्म लीगचे एक ज्येष्ठ नेते इस्पहानी यांची अन्नधान्याची खरेदी करण्यासाठी सोल एजंट म्हणून नेमणूक केली. या इस्पहानी प्रकरणावर १९४३ आणि १९४४ साली बंगाल कायदेमंडळात झालेली खडाजंगी चर्चा फार गाजली. मुस्लीम लीग मंत्रिमंडळाने दुष्काळी परिस्थिती अत्यंत अयोग्य रीतीने हाताळली होती. शिधा पद्धती ताबडतोब सुरू करण्याची आवश्यकता होती व त्यासाठी शासनाने नवीन खाते सुरू केले होते. परंतु पुरेसे मुसलमान मिळत नसल्याने त्या खात्यातील जागा भरल्या जात नव्हत्या. बंगालवर नझिमुद्दिन आणि सुऱ्हावर्दी यांच्यामुळे केवढे मोठे संकट येऊन ठेपले आहे. त्याविषयी गव्हर्नर आणि व्हाइसरॉय यांनी ब्रिटिश मंत्रिमंडळाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. परंतु मंत्रिमंडळ अधिकारावर राहू देण्यात आले होते. ब्रिटिश मंत्रिमंडळ आणि मुस्लीम लीगचे मंत्रिमंडळ यांच्यातील अपवित्र युतीमुळे बंगालमध्ये लक्षावधी भूकबळी पडले. नझिमुद्दीन मंत्रिमंडळ पदच्युत करण्याचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी जीनांनी दिनांक १५ नोव्हेंबर १९४२ रोजी लीगच्या पाचही पंतप्रधानांची या विषयासंबंधीचे धोरण ठरविण्यासाठी एक बैठक बोलावली होती. बैठकीनंतर त्या सर्वांची लिनलिथगो यांच्या बरोबर भेट घडवून आणण्यात आली. संपूर्ण मुस्लीम लीग नझिमुद्दिन यांच्या पाठिशी आहे हे लिनलिथगो यांच्या निदर्शनास आणून देणे हाच या भेटी मागील हेतू होता. लिनलिथगो यांच्या जागी आलेले नवे व्हाइसरॉय लॉर्ड वॅव्हेल यांनी अगदी निराळी भूमिका घेतली. लिनलिथगो यांच्या प्रमाणे निष्क्रीय न रहाता त्यांनी १९४३ च्या डिसेंबरात स्वत: बंगालला भेट दिली आणि दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी सरकारी पातळीवरील उपाययोजनेच्या कार्याला चालना दिली. नझिमुद्दिन याना त्यांनी स्पष्टपणे सांगून टाकले की, बंगालमधील परिस्थितीबाबत आपले अजिबात समाधान झालेले नाही. परंतु नझिमुद्दिन मंत्रिमंडळ बरखास्त करण्याची लॉर्ड वॅव्हेल यांनी केलेली सूचना ब्रिटिश युद्ध मंत्रिमंडळाने दिनांक १३ जानेवारी १९४४ रोजी फेटाळून लावली. पुढील वर्षाच्या जून महिन्यात बंगालचे नवे गव्हर्नर कॅसे यानी बंगालच्या राजकारणात माजलेला भ्रष्टाचार आणि प्रशासनातील अकार्यक्षमता या विषयी वॅव्हेल यांच्याकडे तक्रार केली परंतु वॅव्हेल त्याबाबत

काही करू शकत नव्हते. सहा महिन्यापूर्वी उपासमार आणि रोगराई यांनी बंगाल प्रांतात थैमान घातले होते त्यावेळी प्रांताचा कारभार आपण आपल्या ताब्यात घेतला असता तर संपूर्ण जनमत आपल्या बाजूने राहिले असते. परंतु आता मात्र सगळीकडूनच आपल्या वर टीका होईल. या शब्दांत त्यांनी आपली अगतिकता व्यक्त केली. जोपर्यंत चर्चिल आणि अमेरी नझिमुद्दिन मंत्रिमंडळ बरखास्त करण्यास परवानगी देत नाहीत तोपर्यंत ते असेच अधिकारावर राहणार हे वॅव्हेल आणि कॅसे या दोघांना-ही समजून चुकले होते.

बंगालनंतर १९४३ च्या डिसेंबरात वॅव्हेल यांनी आसामलाही भेट दिली. जास्तीत जास्त मुसलमानांचे लोंढे बंगालमधून आसाम प्रांतात यावेत म्हणून सादुल्ला मंत्रि-मंडळाकडून कसे प्रयत्न होत होते ते त्या भेटीत त्यांना प्रत्यक्षच दिसून आले. त्या-संबंधी आपल्या दैनंदिनीत त्यानी असे नमूद करून ठेवले आहे की, (आसामची) मुख्य समस्या ही आहे की, येथील मुसलमान मंत्र्यांना अधिक धान्य पिकवा या मोहि-मेच्या नावाखाली सरकारी पडित जमिनींवर जास्तीत जास्त स्थलांतरित आणून बसवावयाचे आहेत. परंतु त्यामागील त्यांचा खरा उद्देश मुसलमानांची संख्या वाढवा हाच आहे. मुस्लीम लीगचे पुढील अधिवेशन १९४३ च्या डिसेंबर महिन्यात कराचीला भरले होते. त्यानंतर काही आठवड्यांनी वॅव्हेल यांच्या दैनं-दिनीत १६ मार्च १९४४ रोजीची पुढील नोंद आहे. "मंत्रिमंडळ अधिकारावर असले तरी (सिंधचे) गव्हर्नर हे स्वतःचीच सत्ता गाजवतात. त्यांना सिंधची चांगली माहिती आहे आणि त्यांच्या मंत्र्यांनी चालवलेला भ्रष्टाचार आणि चलाखी ते चांगली ओळखून आहेत. अर्थात शंभर वर्षापूर्वी इंग्लिश राजकारणी जे काही करीत होते त्याचाच बहुधा या मंत्र्यांकडून आज कित्ता गिरवला जात आहे."

सिंधच्या कायदेमंडळात पाकिस्तानचा ठराव मांडणारे जी. एम. सईद हे कराचीला भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते ते अधिवेशन योगायोगाने जीनांच्या वाढदिवशी म्हणजे दिनांक २५ डिसेंबर रोजी भरत होते. मुस्लीम लीगने "मुसलमानांनी सर्व वस्तू मुसलमानांकडूनच खरेदी कराव्यात" म्हणून जी मोहीम सुरू केली होती त्याविरुद्ध गहजब करणाऱ्या बिगर मुसलमानांवर सईद यांनी आपल्या भाषणात टीकेची झोड उठवली. गरीब आणि विशेष उद्योगी नसलेल्या वर्गातील लोकांना इतर वर्गांच्या पातळीवर आणण्यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आली असून त्या-विरुद्ध ओरड करणाऱ्यांपाशी राष्ट्रवादाच्या खऱ्याखुऱ्या भावनेचा अभाव आहे हे स्पष्ट होते असे सांगून पाकिस्तानात औद्योगिक आणि आर्थिक क्रांती घडवून आणण्याची गरज आहे हे पटवून देण्यावर त्यानी भर दिला. गरिबांना श्रीमंताविरुद्ध चिथावणी देऊन मुस्लीम राष्ट्रात फूट पाडण्याचा आणि ते दुर्बळ करण्याचा विरोधकांनी जो प्रयत्न चालविला आहे त्यापासून सावध राहण्याचा त्यांनी आपल्या श्रोत्यांना इशारा दिला. राष्ट्रातील गरिबांच्या बद्दल वाटणाऱ्या कळवळ्याच्या नावाखाली ते त्यांना

यादवी युद्ध आणि विनाशाच्या मार्गावर नेत आहेत असे प्रतिपादन करून सईद यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस सबंध हिंदुस्तानातील कारखानदार आणि व्यापारी यांना सिंधमध्ये येऊन कारखाने काढण्याचे आवाहन केले. जीनांनीही आपल्या अध्यक्षीय भाषणात पाकिस्तानी विभागात राष्ट्रीय स्वरुपाचे उद्योग सुरू करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. युद्ध प्रयत्नात सहकार्य करण्याचे वॅव्हेल यानी जे पाचारण केले होते त्यावर हल्ला चढवताना जीना म्हणाले की, सत्तेत सहभागी करून न घेता आम्हाला बाजारबुणग्याप्रमाणे हलकीसलकी कामे करण्यास सांगण्यात येत आहे. जॉन ब्राइट यानी दिलेल्या सल्ल्यानुसार ब्रिटिशांनी या देशाची फाळणी करून येथून चालते व्हावे असे जीनांनी सांगितले. व्हिक्टोरिया राणी हिंदुस्तानची सम्राज्ञी झाल्याचे घोषित करण्यात आल्याच्या निमित्ताने जॉन ब्राइट यांनी १८५८ साली पार्लमेंटमध्ये जे भाषण केले होते त्यातील काही भाग त्यांनी वाचूनही दाखवला.

काँग्रेस आपला "भारत छोडो"चा ठराव मागे घेत नाही तोपर्यंत तिच्याबरोबर कोठल्याही स्वरुपात वाटाघाटी होण्याची शक्यता जीनांनी आपल्या भाषणात फेटाळून लावली. लीगच्या मंत्र्यांना त्यानी आपल्या हाती असलेल्या राजकीय सत्तेचा तिला बलवान करण्यासाठी जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचा सल्ला दिला. अखिल भारतीय संघराज्य मुसलमानांवर लादण्यात आले किंवा भारत अखंड राहील अशा तऱ्हेची दुसरी एखादी घटना बनविण्यात आली तर त्यातून निर्माण होणाऱ्या कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी आणि पाकिस्तान प्राप्त करून घेण्याकरिता कराव्या लागणाऱ्या भावी लढ्यासाठी मुसलमानांना तयार करण्याच्या उद्देशाने अधिवेशनात एक कृती समिती नेमण्यात आली.

कम्युनिस्ट विचारसरणीच्या स्टुडंटस फेडरेशनच्या पुढाऱ्यांनी १९४२ च्या एप्रिल महिन्यात क्रिप्स यांची भेट घेऊन त्याना असे निवेदन सादर केले होते की, कम्युनिस्ट स्थानबद्ध हे मूलतः फॅसिस्ट विरोधी असून त्यांनी सध्याचे युद्ध हे लोक युद्ध आहे अशी भूमिका घेतली आहे. काही कम्युनिस्ट नेत्यांनीदेखील लोक युद्धाचा आपला सिद्धांत एन. एम. जोशी यांच्यामार्फत क्रिप्स यांच्याकडे पोहोचविला होता. ऑगस्ट १९४२ पर्यंत कम्युनिस्ट पुढाऱ्यांची फार मोठ्या प्रमाणावर तुरुंगातून मुक्तता झाली होती. आणि १९४३ च्या मे महिन्यात झालेल्या कम्युनिष्ट पक्षाच्या पहिल्या अधिवेशनात हिंदुस्तानातील निरनिराळ्या राष्ट्रसमुहाच्या संदर्भात एक महत्वाचा ठराव पास केला गेला. तो ठराव असा होता.

एका संलग्न भूभागाला आपली पितृभूमी समजून तेथे वास्तव्य करणारे, समान ऐतिहासिक परंपरा, भाषा, संस्कृती, आणि मनोवृत्ती असणारे आणि समान आर्थिक जीवन व्यतीत करणारे भारतीय जनतेमध्ये जे निरनिराळे गट आहेत त्यापैकी प्रत्येकाचे स्वतंत्र राष्ट्रीयत्त्व मान्य करून त्याला स्वतंत्र मभारतातील एक स्वायत्त राष्ट्र म्हणून राहण्याचा आणि त्यांची इच्छा असेल तर फुटून निघण्याचा त्याचा

हक्क मान्य करण्यात यावा. उद्याचा स्वतंत्र भारत हे पठाण, पश्चिमेकडील पंजाबी, शीख, सिंधी, हिंदुस्तानी, राजस्थानी, गुजराथी, बंगाली अशा निरनिराळ्या स्वायत्त राष्ट्रघटकांचे संघराज्य असले पाहिजे. या विखुरलेल्या अल्पसंख्यांकांच्या हक्कांची कायद्याने राष्ट्रसमूहात हमी देण्यात आली पाहिजे. जात, वंश यांच्यावर आधारलेल्या सवलती विशेषाधिकार आणि भेदाभेद यांना कायद्याने बंदी घालण्यात यावी. मुस्लीम धर्मियांसकट अशा प्रत्येक राष्ट्र घटकांना स्वायत्त म्हणून राहण्याचा व संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार मान्य करण्यात आला तरच काँग्रेस आणि लीग यांचे ऐक्य घडवून आणण्याला आधार मिळू शकेल. ज्या ज्या संलग्न भूभागातील लोकसंख्येत मुसलमानांचे प्राबल्य असेल. तेथे त्यांना आपले स्वतंत्र घटकराज्य स्थापन करण्याचा आणि त्यांची इच्छा असेल तर विभक्त होण्याचा अधिकार असला पाहिजे.

या ठरावाच्या आधारे कम्युनिस्टांनी 'काँग्रेस आणि लीगने एकत्र येऊन ब्रिटीश साम्राज्यासाठी विरूद्ध संयुक्त आघाडी उघडावी' असा पुकारा सुरू केला. पाकिस्तानच्या चळवळी मागे मुसलमानांची स्वातंत्र्याकांक्षा असून ती मान्य करणे हे काँग्रेसचे कर्तव्य ठरते असे कम्युनिस्ट सांगत. सुप्रसिद्ध इतिहासकार डॉ. राधा कुमुद मुखर्जी, यांनी एका लेखात कम्युनिस्टांच्या वरील विचारसरणीचे खंडन केले. त्यांनी असे दाखवून दिले होते की, सोव्हियट युनियन मध्ये निरनिराळ्या १८० राष्ट्रीयत्वाचे लोक रहात असले १५७ भाषा बोलल्या जात असल्या तेथे ११ गणराज्ये आणि २२ स्वायत्त प्रजासत्ताक राज्ये असली तरी सोव्हियेट यूनियन मधून फुटून निघण्याचा हक्क फक्त ११ गणराज्यांनाच काय तो देण्यात आला आहे. बाकीची जी २२ स्वायत्त प्रजासत्ताक राज्ये किंवा निरनिराळ्या राष्ट्रीयत्वाचे लोक आहेत त्यांना तत्त्वतः देखील हा हक्क ठेवलेला नाही. डॉ. मुखर्जी यांनी या संदर्भात सोव्हियट युनियनच्या नव्या राज्य घटनेसंबंधी तारीख १४ नोव्हेंबर १९३६ रोजी स्टॅलिन यांनी केलेले भाषण उद्धृत केले होते त्या भाषणात स्टॅलिनने हे स्पष्ट केले होते की, या ११ गणराज्यांपैकी एकाही फुटून निघण्याचा प्रश्न कधी उपस्थित केला नव्हता. त्या भाषणात त्यांनी पुढे असे म्हटले होते की, ही गणराज्ये चहूबाजूंनी सोव्हियट प्रजासत्ताकांनी आणि प्रदेशांनी वेढली गेलेली असून सोव्हियट युनियनमधून बाहेर पडण्यास त्यांना वावच राहीलेला नाही. शिवाय जी गणराज्ये अत्यंत लहान लहान आहेत त्यांना तर हा हक्क बजावता येण्यासारखाच नाही कारण अत्यंत थोडी लोकसंख्या आणि तुटपुंजे सैन्यदल असलेले असे एकादे सोव्हियट गणराज्य आपले स्वतंत्र अस्तित्त्व टिकवू शकेल अशी कल्पना करता येत नाही. मुखर्जी यांनी स्टॅलिनच्या 'स्ट्रगल' या पुस्ताकाचा उल्लेख केला. या पुस्तकात स्टॅनिनने असे म्हटले आहे की, वहातुकीची साधने विभक्त किंवा वेगवेगळ्या प्रजासत्ताकांच्या अखत्यारित ठेवून चालणार नाही हे उघड आहे. कारण वहातुकीची साधने हा आर्थिक जीवनाचा

मुख्य कणा आहे. म्हणून अशी साधने घटक राज्यांच्या अखत्यारीत ठेवली तर संघराज्याच्या दृष्टीने त्यात विस्कळीतपणा येईल. यामुळेदेखील प्रजासत्ताक राज्ये एकाच राष्ट्राचे घटक म्हणून रहाणे पसंत करतात. शिवाय तुटपुंजी आर्थिक साधन-सामुग्री हाही महत्त्वाचा भाग रहातोच.

अशा तऱ्हेने सोव्हियेट युनियनमधील फुटून निघण्याचा हक्क हा केवळ कागदोपत्रीच रहातो. अर्थात या लेखामुळे कम्युनिस्टांच्या भूमिकेत रेसभरही बदल झाला नाही. आणि त्यांनी आपला प्रचार चालूच ठेवला. या भूमिकेनुसार कम्युनिस्ट आपल्या कार्यक्रमांच्या वेळी लाल बावटाबरोबर काँग्रेस आणि मुस्लिम लीगचाही झेंडा लावीत. त्याची लीगच्या कराची अधिवेशनात जीनांनी खूप टर उडविली होती.

१९४३ च्या अखेरीअखेरीस काँग्रेसने आणि इतर राजकीय पक्षांनी क्रिप्स योजना स्वीकारावी म्हणून राजाजींनी निकराचे प्रयत्न करून पाहिले. १७ फेब्रुवारी १९४४ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळापुढे बोलताना वॅव्हेल यांनी क्रिप्स योजनेचा पुनरुच्चार करून कांग्रेस करीत असलेल्या असहकाराबद्दल खेद व्यक्त केला. १३ एप्रिल रोजी खलिकुझमान यानी बिहारच्या गव्हर्नरांना असे सांगितले की, जीनांशी आपले अलीकडेच जे बोलणे झाले त्यावरून त्यांचा क्रिप्स योजनेला सक्त विरोध असून हिंदूंनी आणि सरकारने पाकिस्तानची मागणी मान्य करावी असे त्यांचे मत असल्याचे आपल्याला आढळून आले आहे. जीनांचा सार्वमतालादेखील विरोध होता. कारण त्यामुळे निष्कारण कालहरण होईल आणि पंजाब आणि बंगालमध्ये दंगली उसळण्याव्यतिरिक्त त्यातून अन्य काहीही निष्पन्न होणार नाही असे त्यांचे मत होते. खलिकुझमान यांनी गव्हर्नरांच्या असे निदर्शनास आणून दिले की, मुसलमानांची मागणी सरकारने मान्य केली म्हणजे मग हिंदू ती मान्य करतात असा आजवरचा अनुभव आहे. स्वतंत्र मतदार संघाची मागणी १९०९ साली ब्रिटिश सरकारने मान्य केल्यानंतर १९१६ साली हिंदूंनी ती स्वीकारली. मध्यवर्ती कायदे-मंडळात मुसलमानांना एकूण सभासद संख्येच्या एक तृतियांश प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे या मागणीलाही काँग्रेसचा प्रथम विरोध होता. परंतु जातीय निवाड्यात तिला मंजुरी देण्यात आल्यानंतर काँग्रेसने ती मागणीही मान्य केली म्हणून खलि-कुझमान यांचे सांगणे असे होते की, प्रथम ब्रिटिश सरकारने पाकिस्तानची मागणी मान्य करावी म्हणजे हिंदू ती मुकाट्याने मान्य करतील. एप्रिल १९४४ मधील हिंदुस्तानच्या राजकीय परिस्थितीसंबंधीच्या आपल्या अहवालात वॅव्हेल यांनी असे नमूद केले होते की, काँग्रेसच्या गैरहजेरीचा (आंदोलनामुळे सर्व पुढारी तुरुंगात असल्याने) बरोबर फायदा उठवून लीगचे स्थान बळकट करण्यात त्याचप्रमाणे सर्व मुसलमानांना तिच्या झेंड्याखाली एकत्र आणून तिला लढाऊ स्वरुप देण्यात जीना यशस्वी झाले आहेत. त्यांचा (जीनांचा) पक्ष अधिकाधिक प्रबळ होत चालला असून त्याच्या हातातील सत्ता जो जो वाढत आहे तो तो काँग्रेसबरोबर समझोता करण्याची

त्यांना जरूर वाटेनाशी झाली आहे आणि सरकारनेही तसे करू नये म्हणून ते दक्षता घेत आहेत......क्रिप्स योजनेपेक्षा अधिक निःसंदिग्ध स्वरुपात पाकिस्तानला मान्यता दिल्याशिवाय जीनांच्याबरोबर वाटाघाटी करणे सोपे राहिलेले नाही... स्वतःची खाजगी सेना वाढवून ते सरकारला आव्हानही देऊन शकतील.

दिनांक ८ एप्रिल रोजी राजाजींनी जीना याना पत्र पाठवून एक योजना त्यांच्यापुढे मांडली. गांधीची या योजनेला संपूर्ण अनुमती आहे किंबहुना हा प्रश्न कायमचा मिटू शकेल. या आशेनेच गांधीजींच्या वतीने ती मांडली जात असल्याचा खुलासा राजाजींनी या पत्रातच केला होता. योजना थोडक्यात पुढीलप्रमाणे होती.--

वायव्य आणि ईशान्य भारतातील मुस्लिम बहुसंख्या असलेले सलग जिल्हे निश्चित ठरवून त्यामध्ये युद्धसमाप्तीनंतर फाळणीचे प्रश्नावर सार्वमत घेण्यासाठी एका आयोगाची स्थापना करण्यात येईल. सार्वमत घेण्यापूर्वी सर्व संबंधित पक्षांना जनतेपुढे आपापले म्हणणे मांडण्याची संधी मिळेल सार्वमताचा निकाल सार्वभौम राज्य स्थापन करण्याच्या बाजूने लागला तर तो अमलात आणला जाईल आणि संरक्षण, व्यापार, दळणवळण आणि इतर महत्वाच्या बाबींबद्दल परस्पर समजुतीने करारमदार करण्यात येतील. लोकसंख्येची अदलाबदल ही सर्वस्वी ऐच्छिक राहील.

या योजनेच्या आधारे जीनांनी काँग्रेसच्या स्वातंत्र्यांच्या मागणीला मंजुरी द्यावी आणि केंद्रात तात्पुरते सरकार स्थापन करण्याच्या कामी सहकार्य करावे असे आवाहन त्यांना करण्यात आले होते.

दिनांक ९ मे रोजी गांधी अत्यवस्थ झाल्यामुळे त्यांची तुरुंगातून मुक्तता करण्यात आली. जीनांकडून कसलेच उत्तर आलेले नसल्याने राजाजींनी पुन्हा एकदा सदर योजनेला गांधींचा संपूर्ण पाठिंबा असल्याचे त्यांना कळवले त्यानंतर जीनांना योजना मान्य नसल्यास तसे कळविण्याबद्दल दिनांक ३० जून रोजी त्यांना तार पाठवण्यात आली. दिनांक २ जुलै रोजी जीनांनी योजना आपल्याला पसंत नसल्याचा निष्कर्ष काढल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करून स्वतः गांधींनी ती थेट आपल्याकडे पाठविली तर आपण मुस्लीमलीगच्या वर्किंग कमेटीपुढे ती विचारार्थ ठेवण्यास तयार असल्याचे कळविले. राजाजींनी पुन्हा एकदा गांधीचा योजनेला पाठिंबा असल्याचे कळविले आणि स्वतः जीनांनाच जर तो मसुदा मंजूर नसेल तर तो त्यांच्या पक्षापुढे नेण्यात काहीच अर्थ नसल्याचेही त्यांच्या निदर्शनास आणून दिले. राजाजींच्या या पत्राला ज्यावेळी जीनांनी आपल्याला अधिक काहीच सांगावयाचे नाही असे उत्तर पाठविले. तेव्हा राजाजींनी वाटाघाटी आता संपुष्टात आल्या असून हा सर्व पत्रव्यवहार आपण प्रसिद्ध करीत आहोत अशी त्यांना तार पाठवली. त्याचप्रमाणे पत्रव्यवहार प्रसिद्ध झाल्याबरोबर सबंध देशात एकच खळबळ उडून गेली आणि हिंदू महासभा, शीख आणि व्ही. एस. श्रीनिवास शास्त्रींच्या सकट प्रागतिक नेत्यांनी त्याबद्दल अत्यंत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. अमेरींनी युद्ध मंत्रिमंडळाला सादर करण्यासाठी एक

टिपण तयार केले. त्यात त्यांनी असे म्हटले होते की, राजाजी-गांधी मसुदा ही पाकिस्तानच्या प्रश्नावर केलेली सशर्त आणि मर्यादित स्वरुपाची तडजोड आहे. ग्रेट ब्रिटन सत्तांतर करणार आहे असे त्या योजनेत गृहीत धरले आहे म्हणून ती सशर्त म्हणावी लागेल तर त्या योजनेत अभिप्रेत असलेल्या पाकिस्तानात संपूर्ण पंजाब, बंगाल आणि आसाम यांचा समावेश नसल्याने ती मर्यादित स्वरुपाची ठरते. या राजाजी-गांधी मसुद्यात संक्रमण कालीन सरकारातील जातीय प्रतिनिधीत्वाचा तपशील देण्यात आलेला नाही असेही अमेरींनी आपल्या टिपणात नमूद केले होते.

२९ जुलै रोजी लाहोर येथे भरलेल्या मुस्लिमलीग वर्किंग कमेटीच्या बैठकीने राजाजी-गांधी मसुदा हा व्यक्तिशः जीनांचा विजय आहे असा अभिप्राय व्यक्त केला. दुसऱ्या दिवशी भरलेल्या लीग कौन्सिलच्या बैठकीत जीनांनी एक प्रदीर्घ भाषण केले. त्यात त्यांनी असा श्लेष काढला की, गांधी किंवा राजाजी यापैकी कोणालाच काँग्रेसने असा अधिकार दिलेला नाही. राजाजींचा मसुदा म्हणजे मुस्लिमलीगच्या मार्च १९४० च्या ठरावाचे विडंबन किंवा त्याचा इन्कार असून त्याला हरताळ फासण्याचाच त्यामागे हेतू आहे. लाहोरच्या ठरावात सार्वमताचा चुकूनही कोठे उल्लेख नसल्याचे सांगून जीनांनी जिल्हावार सार्वमत घेण्याची कल्पना हास्यास्पद ठरवली. सार्वमतापूर्वी सर्व पक्षांना त्यात सहभागी होणार असलेल्या लोकांपुढे आपापला दृष्टिकोन मांडण्याची मुभा असावी ही सूचना सदोष असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. मसुद्याचे कलमवार वाचन करून त्यांनी आपल्या अनुयायांना असे सांगितले की, दहा कोटी मुसलमानांचे राष्ट्र आणि त्यांचे भवितव्य यांच्याशी निगडीत असलेल्या समस्येची तड लागावी किंवा त्यातून काही चांगले निष्पन्न व्हावे असे मुळी या योजनेच्या प्रवर्तकांना वाटतच नाही. उलट गांधींनी आपल्याला हवे असलेले पाकिस्तान देऊ केलेले नसून त्याऐवजी कसरीने कुरतडलेल्या खंडित आणि लुळ्या पांगळ्या पाकिस्तानचे फोळकट आपल्या गळ्यात बांधण्याचा प्रयत्न चालविला आहे.

गांधींनी तुरुंगातून सुटल्यानंतर स्थानबद्ध असलेल्या काँग्रेस वर्किंग कमेटीच्या सभासदांची भेट घेण्याची वॅव्हेल यांच्याकडे परवानगी मागितली. परंतु भारत छोडो ठराव काँग्रेसने मागे घेतलेला नाही या सबबीवर भेटीची परवानगी नाकारण्यात आली. त्या ठरावास अनुसरून असलेली सामुदायिक चळवळ सुरू करता आलेली नाही आणि सरकार जर राष्ट्रीय सरकार स्थापन करून देशाचा सर्व नागरी कारभार त्यांच्याकडे सोपवावयाला सरकार तयार असेल आणि प्रांतिक मंत्रिमंडळात सुधारणा घडवून आणणार असेल तर काँग्रेसने युद्ध प्रयत्नात संपूर्ण सहकार्य द्यावे असा सल्ला मी काँग्रेस वर्किंग कमेटीला देण्यास तयार आहे असे गांधींनी जुलै महिन्यात वॅव्हेलना कळवले. त्यात गांधींनी असेही कळविले होते की, गव्हर्नर जनरलचे अधिकार हे मंत्र्यांच्या सल्ल्यानुसार वागणाऱ्या घटनात्मक प्रमुखासारखे मर्यादित असावेत. शिवाय लष्कराच्या हालचालींचे संपूर्ण नियंत्रण सर सेनापती आणि गव्हर्नर जनरल यांच्या

हाती असावे परंतु हिंदुस्तानात ठेवण्यात आलेल्या दोस्तांच्या फौजांचा खर्च मात्र भारतीय तिजोरीवर पडता कामा नये. उत्तरादाखल वॅव्हेलनी गांधींना कळविले की या अटी अजिबात मान्य करता येणार नाहीत. तथापि, १९१९ च्या घटनेच्या चौकटीत राहून काम करणाऱ्या संक्रमणकालीन सरकाराशी सहकार्य करण्याची हिंदू, मुसलमान आणि इतर प्रमुख अल्पसंख्यांक तयारी दर्शवतील तर काही प्रगती होऊ शकेल मात्र नवी घटना कशी तयार करावयाची याबाबत निरनिराळ्या जमाती आणि इतर घटक यांच्यात असे संक्रमणकालीन सरकार बनविण्यापूर्वी एकमत झालेले असले पाहिजे. वर नमूद केल्याप्रमाणे गांधींनी पाठिंबा दिलेल्या राजाजींच्या योजनेला काही गटांकडून तीव्र विरोध दर्शविण्यात आला होता. तथापि, एक गोष्ट मात्र खरी की, आता पुन्हा एकदा गांधी राजकारणाचा केंद्रबिंदू बनले होते. चर्चिल यांनी वॅव्हेल यांना तार पाठवून असे कळविले की, गांधींबरोबर कसल्याही वाटाघाटी होता कामा नयेत. गांधी हे मरायलाच पाहिजेत—निदान राजकीय दृष्टया तरी.

गांधींनी सुचविल्याप्रमाणे जीनांच्या बरोबरची त्यांची बोलणी ९ सप्टेंबरला सुरू झाली. तीन आठवडेपर्यंत ती चालू होती. प्रत्यक्ष वाटाघाटी बरोबरच या दोघात पत्रांची देवाण-घेवाणही झाली. त्यातून पुढील काही महत्वाचे मुद्दे मात्र निश्चितच स्पष्ट झाले. (१) जीनांनी ही गोष्ट मान्य केली की, लाहोरच्या ठरावात दोन स्वतंत्र मुस्लिम राष्ट्रांची कल्पना अनुस्यूत असली तरी दोन विभाग असलेले एकच पाकिस्तान निर्माण करण्याचे त्यांनी ठरविले आहे. (२) एक राष्ट्र म्हणून मुसलमान स्वयंनिर्णयाची मागणी करीत असून सर्व मुसलमानांचे व मुसलमान राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारी मुस्लिम लीग ही एकमेव अधिकृत संघटना असल्यामुळे सार्वमतात आपल्याला काहीच रस नसल्याचे जीनांनी स्पष्ट केले. गांधींनीही सांगितले हिंदुस्तान हे एक विशाल कुटुंब असून त्या कुटुंबापैकी वायव्य आणि ईशान्य अशा बहुसंख्य मुस्लिम विभागात रहाणाऱ्या घटकांनी वेगळे होण्याची मागणी केली तर ती मान्य करावयाला आपण तयार आहोत. त्याला जीनांनी असे उत्तर दिले की,

> स्वयंनिर्णयाचा अधिकार हा केवळ भौगोलिक घटका पुरता मर्यादित आहे अशी जी कल्पना तुम्ही करून घेतली आहे तीच मुळात चूक आहे. त्यात ही या भौगोलिक घटकाची अद्याप व्याख्या करण्यात आलेली नाही. किंवा त्यांची आखणीही झालेली नाही....... आम्हाला हवी आहे ती हिंदू आणि मुसलमान अशा दोन राष्ट्रात समझोता घडवून आणण्यासाठी फाळणी करून त्या दोन स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रांची निर्मिती आज अस्तित्वात असलेल्या—ज्याला मुळात वास्तव्याचा आधार नाही—अशा एका घटकातून वेगळे होण्याची किंवा फुटून निघण्याची कल्पना आमच्या मागणीच्या मुळाशी नाही. आम्हाला जो स्वयंनिर्णयाचा हक्क हवा आहे त्यामागे आम्ही एक राष्ट्र आहोत. ही गोष्ट अभिप्रेत आहे. आणि म्हणून स्वयंनिर्णयाचा हा हक्क फक्त मुसलमानांचाच रहाणार आणि

त्यांनाच तो बजावता येणार आहे.

वायव्य आणि पूर्व भागातील ज्या जिल्ह्यात मुसलमानांची बहुसंख्या आहे तेथील मुसलमानांपुरतीच जीनांची पाकिस्तानची मागणी मर्यादित नव्हती तर भारतातील सर्वच्या सर्व दहा कोटी मुसलमानांसाठी त्यांना पाकिस्तान हवे होते. मुस्लिम लीगने भौगोलिक दृष्टचा वेगळे होण्याची कल्पना त्याज्य ठरवून भारतीय उपखंडात रहाणाऱ्या सर्व मुसलमानांचे एक स्वतंत्र राष्ट्र आहे आणि पाकिस्तान हीच त्यांची पितृभूमि असू शकते असा जो आग्रह धरला त्याचे देशाची फाळणी होऊन स्वातंत्र्य मिळाल्या-नंतर फार दूरगामी परिणाम घडून आले.

पंजाबच्या गव्हर्नरांनी वॅव्हेल यांना पाठवलेल्या एका पत्रात खेदपूर्वक असे म्हटले होते की, युनियनिस्ट पार्टीच्या दृष्टीने गांधी-जीना वाटाघाटी या अत्यंत अनुचित काळी घडून आल्या. गांधींच्यामुळे जीनांचे महत्व आता पुन्हा वाढले आहे...... नागरी भागात मुस्लीमलीगची लोकप्रियता वाढत असल्याचे दृष्टोत्पतीस येत असले तरी त्या बाहेर मात्र अद्यापही तिचा फारसा जम बसलेला नाही.

## प्रकरण २२

### सार्वत्रिक निवडणुकीत लीगचा अभूतपूर्व विजय

राजाजींच्या योजनेला सर्वात कडक विरोध झाला तो शिखांकडून. सर्वपक्षीय शीख परिषदेच्या वर्किंग कमिटीने दिनांक २ ऑगस्ट १९४४ रोजी राजाजींच्या मसुद्याचा धिक्कार करणारा प्रस्ताव पास केला. त्यानंतर शिखाच्या अनेक संस्थानी तीच भूमिका स्वीकारली. शिखांच्या ज्या काही सूचना असतील त्या त्यांनी आपल्याकडे पाठवाव्यात असे पुन्हा एकदा शिखांना आवाहन करून शक्य त्या सर्व मार्गांनी त्यांचा स्वीकार केला जाईल असे आश्वासनही जीनांनी त्यांना दिले. परंतु तारासिंगांनी त्यांना असा सवाल केला की, शिखांना आपले विनंती अर्ज घेऊन जीनांच्या दाराशी जाण्याची गरजच काय? आमचे भवितव्य ठरविण्याची अंतिमसत्ता त्यांच्या आणि गांधींच्या हाती आहे असे आम्ही का म्हणून मानावे? जथेदार प्रीतमसिंग यांनी असा खुलासा केला की, शिखांचा पाकिस्तानला विरोध आहे तो अशा करता की, त्यामुळे शिखांची विभागणी होईल. त्यांनी जीनांना असा प्रश्न केला की, संरक्षक अधिकार देण्याचे आश्वासन देऊन जीना आम्हाला पाकिस्तानात सामील होण्याचे आवाहन करीत आहेत. पण मग मी असे विचारतो की, केवळ संरक्षक अधिकारच पुरेसे असतील तर ते अधिकार प्राप्त करून घेऊन जीना स्वतःच हिंदुस्तानात राहण्याचे का मान्य करीत नाहीत? सरदार मंगलसिंग यांनीही असे बजावले की, कोणत्याही परिस्थितीत शीख समाज पाकिस्तानात सामील होण्यास तयार होणार नाही किंवा कोणत्याही जमातीच्या वर्चस्वापुढे आपली मान वाकविणार नाही. राजा महेश्वर दयाळ सेठ यांनी पायोनियरमध्ये लेख लिहून असा गौप्यस्फोट केला की, हिंदू महासभेचा सरचिटणीस या नात्याने ऑगस्ट १९४२ मध्ये आपण जीनांशी बोलणी केली होती. त्यावेळी जवळपास राजाजी योजनेसारखाच एक मसुदा स्वतः जीनांनीच सुचविला होता. तो मसुदा असा होता :

(१) मुसलमान बहुसंख्य असलेल्या हिंदुस्तानच्या वायव्य आणि ईशान्य विभागातील संलग्न टापूची आखणी करण्याकरिता एक आयोग नेमण्यात यावा.

(ता. क. स्पेशल कमेटीचे डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांना जीना १९४२ च्या सप्टेंबरमध्ये भेटले असता त्यांनी स्वतः मुखर्जी यांना असे सांगितले होते की, बहुमत म्हणजे काटेकोरपणे ५१ टक्के असे नव्हे ते त्याहून जास्त म्हणजे असे समजा की, ५५ टक्के असले पाहिजे)

(२) या दोन विभागात सर्व रहिवाशांचे सार्वमत घेतले जाईल आणि तेथील बहुसंख्य जनता जर स्वतंत्र सार्वभौम राज्याच्या बाजूने कौल देईल तर तसे राज्य निर्माण करण्यात येईल.

(३) फाळणी झाली तर हिंदुस्तानातील अल्पसंख्य मुसलमानांसाठी कोठल्याही संरक्षक अधिकाराची मागणी केली जाणार नाही. आपापल्या राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांकांच्या संरक्षक अधिकारासंबंधी परस्पर समजुतीने करारमदार करण्याची दोन्ही हिंदुस्तानांना मुभा राहील.

(४) हिंदुस्तानच्या वायव्य आणि ईशान्य विभागातील मुस्लिम टापूंनां जोडणारा पट्टा असणार नाही. परंतु ते दोन टापू मिळून एकच सार्वभौम राज्य असेल.

(५) हिंदी संस्थाने विचारात घेतली जाणार नाहीत.

(६) सर्वस्वी स्वेच्छेने होणाऱ्या लोकसंख्येच्या अदलाबदलीला सरकारी यंत्रणे-कडून जरूर त्या सवलती उपलब्ध करून दिल्या जातील.

राजा महेश्वर दयाळ यांनी त्या लेखात पुढे असाही खुलासा केला होता की, त्यांच्या पक्षाने जीनांच्या या सूचनांना साफ नकार दिला होता. तथापि या मसुद्याच्या प्रती त्यांनी डिसेंबर १९४२ मध्ये सप्रू आणि राजाजी यांना दिल्या होत्या आणि गांधींचे उपोषण सुरू असताना राजाजींनी त्यांना देखील ती प्रत दाखविली होती आणि त्यांची अनुमती मिळविली होती. दयाळ आपल्या लेखात शेवटी म्हणतात की, '२६ मार्च १९४३ रोजी राजाजींनी मला दिल्लीला बोलावून घेतले आणि लीग-'मध्ये जीनांच्या इतकेच महत्व असणाऱ्या आमच्या दोघांच्या एका स्नेह्यामार्फत जीनांशी आपण पुन्हा संपर्क साधला. परंतु आश्चर्याची कमाल म्हणजे जो मसुदा सप्टेंबर १९४२ मध्ये जीनांनी आपण होऊन सुचविला होता तो मान्य करण्यास ते आता तयार नव्हते. हा लेख प्रसिद्ध झाल्यावर जीनांनी कानावर हात ठेवले आणि आपण अशी काही योजना सुचविली होती याचाच मुळी साफ इन्कार केला.

गांधींबरोबरच्या वाटाघाटी का फिसकटल्या याबद्दल भाष्य करताना जीनांनी पत्रकारांना असे सांगितले की, "लीगने जर गांधींच्या अटी मान्य केल्या असत्या तर हिंदूंचे प्रचंड बहुमत असलेले राष्ट्रीय सरकार आले असते. म्हणजे आमच्यावर जवळ-जवळ हिंदू राज्य लादले गेले असते. सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी पत्र-कारांना सांगितले की, एखादा प्रादेशिक घटक म्हणून जीनांना पाकिस्तान नको होते तर मुसलमान, मग ते कोठेही असले तरी त्या सर्वांचे मिळून एक स्वतंत्र राष्ट्र आहे या भूमिकेवर त्यांचा भर होता आणि या आधारावर विविध भौगोलिक विभागात विखुरलेल्या आणि एकमेकांपासून अत्यंत दूर असणाऱ्या भिन्न भाषा बोलणाऱ्या आणि आर्थिक दृष्टिकोन समान नसणाऱ्यांची मिळून बनणारी दोन सार्वभौम राज्ये जीनांना अभिप्रेत होती. त्यामुळे त्यांच्याबरोबरच्या वाटाघाटीतून काही निष्पन्न होईल अशी आशा करण्यातच अर्थ नव्हता. लीगेतर पुढाऱ्यांपैकी एकटचा एम. एन. रॉय

यांचा मात्र जीनांना पाठिंबा होता. जीनांना त्यांचे असे सांगणे होते की, हिंदू हिंदुस्तानबरोबर समझोता करण्याची कल्पना त्यांनी सोडून द्यावी. कारण मुसलमानांची स्वयंनिर्णयाची मागणी हिंदुंच्याकडून कधीच मान्य केली जाणार नाही. रॉय यांचे मत होते की, गांधींच्या बरोबर झालेल्या प्रदीर्घ वाटाघाटीत जीनांनी जे प्रश्न उपस्थित केले आणि गांधींनी त्याला टोलवाटोलवीची उत्तरे दिली ते सर्व प्रश्न रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी, शेडयुल्ड कास्ट फेडरेशन, दक्षिण भारतातील ब्राह्मणेतर संघटना कॉंग्रेस आणि हिंदू महासभा या दोन संघटनांच्या बाहेर असलेले इतर घटक यांची लोकशाही आघाडी उभारली तर समाधानकारकपणे सुटू शकतील. या लोकशाही आघाडीत मुसलमान आणि बिगर मुसलमान अशा बहुसंख्य कष्टकरी जनतेचे प्रतिबिंब पडलेले असेल. शेवटी या सर्व संघटनांची एक परिषद बोलावण्याच्या कामी पुढाकार घेण्याचे त्यांनी जीनांना आवाहन केले. रॉय यांचा असा विश्वास होता की, जर अशी परिषद बोलावली गेली तर भावी घटनेबाबत त्या सर्वांचे एकमत होईल आणि लोकशाही संयुक्त आघाडीच्या तत्त्वावर आधारलेल्या अशा तात्पुरत्या सरकारकडे सर्व सत्ता सुपूर्त करण्याची त्यांना एकमुखी मागणी करता येईल.

इतरांना एखादी विशिष्ट योजना मांडावयाला लावावयाची आणि तशी ती कोणी मांडली की, आपण ती नाकारून आणखी काही सवलतींचा आग्रह धरावयाचा हे जीनांचे तंत्र त्यांच्या दृष्टीने फार फलदायी ठरत आले होते. १९४४ च्या उत्तरार्धात लियाकत अली खान आणि मध्यवर्ती कायदेमंडळातील कॉंग्रेस पक्षाचे नेते भुलाबाई देसाई यांच्यात कॉंग्रेस लीग ऐक्य घडवून आणण्याचा एखादा नवा मार्ग शोधून काढण्यासाठी १९४५ च्या जानेवारीत खाजगी बोलणी झाली. त्या दोघांच्या चर्चेतून उभय संमत असा एक नवा मसुदा तयार करण्यात आला. तो मसुदा दोघांनी अनुक्रमे जीना आणि गांधी यांना दाखवावयाचा असे ठरले. त्या मसुद्यात खालील गोष्टींचा अंतर्भाव होता. कॉंग्रेस आणि लीग यांच्या समान प्रतिनिधीत्वाच्या आधारावर त्या दोन पक्षांनी केंद्रात तात्पुरते सरकार बनविण्यास मान्यता द्यावी. त्याशिवाय शीख, शेडयुल्ड कास्टस यासारख्या अल्पसंख्यांक गटांनाही त्या सरकारात प्रतिनिधीत्व राहील. संरक्षण खात्याचे प्रमुख म्हणून आजच्याप्रमाणेच सरकार सरसेनापतींची नेमणूक करू शकेल. तात्पुरत्या सरकारचे कामकाज १९१९ च्या कायद्याच्या चौकटीत राहून चालेल. परंतु मध्यवर्ती कायदेमंडळाने मंजुरी दिलेल्या बाबींचा अमलात आणून त्यायोगे व्हाइसरॉयचा हस्तक्षेप टाळून स्वतंत्रपणे काम करण्याचा ते प्रयत्न करील. दोन्ही पक्ष वर्किंग कमेटीच्या सभासदांची त्वरित मुक्तता करण्यात यावी अशी मागणी करतील. वॅव्हेल यांनी जीना आणि देसाई यांना एकत्रितपणे किंवा वेगवेगळे भेटीस बोलावले तरी मुस्लिम लीग आणि कॉंग्रेस या दोन पक्षात झालेला करार म्हणून हा मसुदा त्यांना सादर केला जावा. केंद्रात एकदा तात्पुरते सरकार स्थापन झाले म्हणजे ज्या प्रांतात गव्हर्नरांची राजवट सुरू असेल तेथे संयुक्त मंत्रिमंडळे

बनविण्यात यावीत. मात्र सध्या अधिकारावर असलेल्या लीग मंत्रिमंडळात फेरबदल करण्यात येणार नाहीत.

तथापिही योजना गुप्त न रहाता तिच्या संबंधीची बातमी फुटली व ती वृत्त-पत्रातून प्रसिद्ध झाली. लियाकत अली खान यांनी ताबडतोब तिचा इन्कार केला. याबाबत पत्रकारांनी देसाई यांना छेडले असता त्यांनी काहीही सांगावयाचे नाकारले. ३१ ऑगस्ट रोजी लियाकत अलींनी वर्तमानपत्रातून एक पत्रक प्रसिद्ध करून देसाई-बरोबर झालेल्या आपल्या भेटीचा वृत्तांत जाहीर केला. पत्रकात त्यांनी पुढे असे म्हटले होते की, आपण फक्त आपले व्यक्तिगत मत देसाईंशी व्यक्त केले होते. परंतु कोणत्याही मसुद्याची जीनांबरोबर कधीही चर्चा झालेली नाही. मसुद्यातील सूचना या अगदी खाजगी अणि गोपनीय ठेवावयाच्या असे ठरले होते आणि त्या कोणालाही दाखवण्यात आलेल्या नव्हत्या. त्यावर देसाई यांनी एक पत्रक प्रसिद्ध करून असे जाहीर केले की, गांधींना तो मसुदा दाखवून आपण त्यांची अनुमती मिळवली होती. कॉंग्रस बरोबर कसलीही तडजोड घडवून न आणता तिच्याकडून आणखी सवलती उपटण्याचे जीनांचे जे अभिजात तंत्र होते त्याचा हा उत्कृष्ट नमुना म्हणावा लागेल.

सप्रू आणि त्यांचे सहकारी यांच्या सारखे तडजोड घडवून आणण्यासाठी अविश्रांत-पणे प्रयत्न करणाऱ्यांकडून जीना जरी पुनः पुन्हा त्यांचा अपमान करीत होते तरीही, आणखी एक सूचना पुढे आली. गांधी-जीना वाटाघाटी फिसकटल्यानंतर त्या दोघांना समझोता घडवून आणण्याच्या कामी सहाय्य करण्यासाठी एक समिती त्यांनी स्थापन केली होती. परंतु जीनांनी त्यांची भेट घेण्याचेही नाकारले. तेव्हा एप्रिल १९४५ मध्ये त्यांनी घटनेसंबंधीची आपली एक नवी तपशीलवार योजना प्रसिद्ध केली. जातीय समस्येसंबंधी त्यांच्या त्या योजनेत पुढील तरतुदी होत्या :

(१) मुसलमानांनी संयुक्त मतदार संघास मान्यता दिली तर शेड्यूल्ड कास्टस वगळून इतर हिंदू व मुसलमान यांना मध्यवर्ती कायदेमंडळात समान प्रति-निधीत्व.

(२) मुसलमानांनी संयुक्त मतदार संघास मान्यता दिली असेल तरच केंद्रीय कार्यकारिणीवर अनुसूचित जाती वगळून बाकीचे सर्व हिंदू आणि मुसलमान यांना समान प्रतिनिधीत्व.

(३) संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, हिंदी संस्थानांबरोबरचे संबंध, दळणवळण, व्यापार, सीमाशुल्क, चलन, आंतरप्रांतीय तंटे, निरनिराळ्या घटकांतील सुसूत्रता इ. बाबीच फक्त कमकुवत अशा केंद्राकडे सोपवावयाच्या.

(४) मध्यवर्ती कायदेमंडळ आणि एक्झिक्युटिव्ह कौन्सिल या दोहोंवरील शीख व शेड्युल्ड कास्ट यांच्या प्रतिनिधीत्वात वाढ.

(५) केंद्रीय मंत्रिमंडळ मध्यवर्ती कायदेमंडळाच्या संयुक्त सभागृहाकडून सिंगल ट्रॅन्सफरेबल मतदान पद्धती निवडण्यात यावे. म्हणजे मंत्रिमंडळात सर्व जमातींना

प्रमाणशीर प्रतिनिधीत्व मिळू शकेल. आणि

(६) अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना.

देसाई-लियाकत अली यांच्यातील विवाद्य करार आणि सप्रू समितीने सुचविलेली योजना यातून थोडा थोडा भाग घेऊन लॉर्ड वॅव्हेल यांनीही स्वत:ची म्हणून एक गंगाजमनी योजना याच सुमारास सुचविली होती.

१९४५ च्या मे महिन्यात आंबेडकरांनी घटनात्मक सुधारणेची आणखी एक योजना प्रसिद्ध केली. ती खालील तत्त्वावर आधारलेली होती :

(१) बहुमताचे राज्य सैद्धांतिकदृष्ट्या लागू न पडणारे आणि व्यवहारत: असमर्थनीय ठरते. (२) हिंदूंना आपल्या संख्येच्या आधारावर प्रतिनिधीत्वात निर्विवाद बहुमताचा हक्क सांगता येणार नाही. फार तर त्यांना सापेक्ष बहुमत मिळू शकेल. (३) हिंदूंचे हे सापेक्ष बहुमतही इतके असता कामा नये की; लहान लहान अल्पसंख्य गटांच्या मदतीने त्यांना आपली सत्ता प्रस्थापित करता येईल. (४) त्याचबरोबर प्रमुख अल्पसंख्य गटानाही असे प्रतिनिधीत्व दिले पाहिजे की, त्यांना संयुक्तपणे निर्विवाद बहुमत प्रस्थापित करता येणार नांही. (५) बहुसंख्यांकांकडून काढून घेण्यात आलेले जादा अधिकार अल्पसंख्यांकांना त्यांच्या सामाजिक दर्जाच्या व्यस्त प्रमाणात विभागून दिले पाहिजे आणि (६) सर्व अल्पसंख्य गटांना मिळून कायदेमंडळात निर्विवाद बहुमत मिळाले पाहिजे.

या तत्त्वांच्या आधारे मध्यवर्ती कायदेमंडळासाठी आंबेडकरांनी खालील प्रतिनिधीत्व सुचविले होते :—हिंदू ४० टक्के, मुसलमान ३२ टक्के, अनुसूचित जाती २० टक्के, ख्रिश्चन ३ टक्के, शीख ४ टक्के आणि अँग्लो इंडियन १ टक्का. निराळ्या शब्दात सांगावयाचे तर गोलमेज परिषदेच्यावेळी आगाखान यांच्या नेतृत्वाखाली मुसलमान अँग्लोइंडियन्स, युरोपियन्स, अनुसूचित जाती आणि भारतीय ख्रिश्चनांपैकी एक गट य. सर्वांनी मिळून अल्पसंख्यांकासंबंधी १९३० च्या सुमारास आपापसात जो करार घडवून आणला होता त्याचेच आंबेडकरांना पुनरुज्जीवन करावयाचे होते.

आपल्या योजनेबाबत आंबेडकरांनी असे स्पष्टीकरण दिले की, "माझी ही योजना अखंड भारतासाठी आहे आणि पाकिस्तान ऐवजी मुसलमान ती अधिक पसंत करतील या समजुतीने मी ती पुढे मांडली आहे. कारण त्यामुळे त्यांना पाकिस्तानापेक्षा अधिक चांगली सुरक्षितता लाभणार आहे. मी पाकिस्तानच्या विरुद्ध नाही स्वयं-निर्णयाच्या तत्त्वावर ते आधारलेले असून त्या तत्त्वाला आक्षेप घेण्याची वेळ आता निघून गेली आहे. या तत्त्वाचा मी मुसलमानांना फायदा देण्यास तयार आहे. पण मग त्या विभागातील बिगर मुसलमानांच्या बाबतीतही त्यांनी तो नाकारता कामा नये माझी योजना पाकिस्तानच्या पर्यायापेक्षा अधिक चांगली आहे कारण हिंदूंचे बहुमत कायमचे आपल्या मानगुटीस बसेल अशी मुसलमानांना जी भीती वाटते ती माझ्या योजनेच्या बाबतीत निराधार ठरते." शिवाय मुसलमानांना सध्या जे विशेषाधिकार

आहेत ते तसेच रहातात असेही आंबेडकरांनी सांगितले. परंतु आंबेडकरांच्या योजनेकडे सर्वांनीच दुर्लक्ष केले आणि ते अपेक्षितच होते.

१९४२ साली कॉंग्रेसचे पुढारी पकडले गेल्यानंतर सरकार आणि इतरही काही जणांच्या पद्धतीने मुस्लिम लीग एकसंघ आणि बलवान बनविण्याची जीनांना आयतीच संधी मिळाली. पाच प्रांतात लीगची मंत्रिमंडळे अधिकारावर आली होती. त्याचप्रमाणे मुसलमान समाजात व्यक्तिशः जीनांची प्रतिष्ठा किती तरी वाढली होती. ब्रिटिश सरकारविरुद्ध पुन्हा पुन्हा फुत्कार काढून त्यांनी त्याच्याबरोबरची आपली लुटुपुटीची लढाई चालूच ठेवली होती. गांधी, राजाजी आणि चॅथॅमगर यांनी तर जीनांना भारताचे पंतप्रधान करण्यात यावे असे जाहीरपणे सुचविले होते. कॉंग्रेसला उघड-उघड अनुकूल असलेल्या अमेरिकन सरकारने देखील जीनांसंबंधीची आपली भूमिका बदलली होती. रुझवेल्ट यांचे खास प्रतिनिधी फिलिप्स हे थोड्या दिवसांसाठी अमेरिकेला परत गेले होते. तेथे त्यांनी ब्रिटनचे वॉशिंग्टनमधील राजदूत लॉर्ड हॅलिफॅक्स यांची भेट घेतली. युध्द कार्यात भारतीयांचे सक्रीय साहाय्य मिळावे आणि भावी काळात इंग्लंड-अमेरिकेचे संबंध सुरळीत रहावेत अशा दोन्ही कारणांसाठी हिंदुस्तानातील पेचप्रसंग मिटविणे जरूरीचे आहे असे त्या भेटीत त्यांनी हॅलिफॅक्स यांना सांगितले आणि त्या दृष्टिने जीनांना तात्पुरत्या सरकारचे नेतृत्व देऊ करून त्यांच्या अहंकाराला वाट करुन देण्याचा प्रयत्न करुन पहावा असेही त्यांनी सुचविले. तसेच तात्पुरत्या सरकारात हिंदू आणि मुसलमान यांना समान प्रतिनिधीत्व असावे. संरक्षणाच्या बाबतीतील ब्रिटिश सरकारचा अंतिम अधिकार वगळता त्या सरकारच्या हाती व्यापक अधिकार सुपूर्त करण्यात यावेत. मात्र पाकिस्तानच्या मागणीला किंवा कायम स्वरूपाच्या घटनेबाबत एकमत होईतोपर्यंत जी कोणती घटना अमलात यावयाची असेल तिला अशा तऱ्हेच्या तात्पुरत्या सरकारमुळे बाधा येणार नाही. हे स्पष्ट करण्यात यावे. याही फिलिप्स यांच्या आणखी सूचना होत्या. अशा तऱ्हेने निरनिराळ्या ठिकाणाहून जीना एकामागोमाग एक सवलती मिळवीत चालले होते. आणि तरीही तडजोडीचा प्रत्येक प्रयत्न ठोकरुन लावून आपले सहकार्य मिळविल्याशिवाय या देशाचा राजकीय विकास घडून येऊच शकणार नाही असेच जणू ते दाखवून देत होते.

१९४५ च्या मार्च मध्ये वायव्य सरहद्द प्रांत आणि बंगालमधील लीग मंत्रिमंडळाचा त्या त्या कायदेमंडळात पाडाव झाला. बंगालमध्ये पर्यायी मंत्रिमंडळ बनविता न आल्याने १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टच्या ९३ व्या कलमाखाली तेथे गव्हर्नरांची राजवट लागू करण्यात आली. वायव्य सरहद्द प्रांतातील कायदेमंडळ ऑगस्ट १९४३ पासून स्थगित ठेवण्यात आले होते. अखेर १९४५ च्या मार्चमध्ये अधिवेशन बोलावण्यात आल्या-बरोबर डॉ. खानसाहेब यांनी मांडलेला अविश्वासाचा ठराव पास होऊन औरंगजेब खान यांना अधिकारपद सोडावे लागले. आपल्या ठरावावर भाषण करताना डॉ. खान

साहेब म्हणाले की, ५० सभासदांच्या सभागृहात अवघ्या २२ सभासदांचा पाठिंबा असलेल्या औरंगजेब खानांना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण करण्यात आले होते. कोणत्याही लोकशाही राष्ट्रात अशा प्रकारच्या अल्पसंख्य सरकारचा दाखला सापडणार नाही. डॉ. खानसाहेब यांनी असे निदर्शनास आणून दिले की, काँग्रेस सभासदांनी मागणी केलेली असूनही कायदेमंडळाचे पावसाळी अधिवेशन बोलावण्यात आले नाही आणि नामधारी मंत्रिमंडळ खुशाल अधिकारावर राहू देण्यात आले.

मंत्र्यांचा वाढता भ्रष्टाचार आणि राज्यकारभाराच्या लहानसहान बाबीतही त्यांच्याकडून होणारा हस्तक्षेप यामुळे सिंधमधील हिदायतुल्ला मंत्रिमंडळ अधिकाधिक अप्रिय होऊ लागले होते. दिनांक २१ मार्च १९४५ रोजी सिंध प्रांताचे गव्हर्नर डो यांनी वॅव्हेल यांना असे कळविले की, मंत्रिमंडळाने भ्रष्टाचार निर्मूलन अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. परंतु भ्रष्टाचार हुडकून काढण्याऐवजी प्रामाणिक अशा विशिष्ट अधिकाऱ्याकडून कसलाही त्रास पोहोचू नये म्हणून दक्षता घेणे हेच त्याचे मुख्य काम होऊन बसले आहे. शिवाय मुस्लिम लीग पक्षात जमीनदार आणि खंडकरी शेतकरी असे गट पडले होते. जमिनदारांना पाठिशी घालणाऱ्या हिदायतुल्लांना जीनांचा पाठिंबा होता तर खंडकरी शेतकऱ्यांचा कैवार घेणाऱ्या जी. एम. सईद यांच्यावर त्यांची खूप गैरमर्जी होती. स्वतःचे अधिकारपद टिकविण्यासाठी हिदायतुल्लांनी अनेक खटपटी लटपटी केल्या. तरी देखील त्यांचे आसन इतके डळमळीत झाले होते की, सिंधचे गव्हर्नर म्हणून नव्याने नेमणूक झालेले सर फ्रॉन्सिस मुडी यांनी त्यांना पाठिशी घातले नसते तर ते केव्हाच पदच्युत झाले असते. मंत्रिमंडळाच्या पराभवाची वेळ येऊ नये म्हणून मुडी यांनी १९४५ साली कायदेमंडळाचे पावसाळी अधिवेशनच बोलावले नाही आणि कायदेमंडळ बरखास्त करून सिंध प्रांतात फेर निवडणुका घेण्यात याव्यात अशी शिफारस केली. वॅव्हेल यांनी त्यांचा हा सल्ला मानला नाही. परंतु भारत मंत्री अमेरी यांनी वॅव्हेल यांचे मत बाजूला सारून कायदेमंडळ बरखास्त करण्यास परवानगी दिली. 'मुस्लिम लीगच्या अत्यंत बिकट काळात त्यांनी (सर फ्रॉन्सिस मुडी) पाकिस्तानसाठी सिंधला जीवदान दिले." असे भाष्य यावर चौधरी खलिकुझमान यांनी केले आहे. मुडी यांनी पुढेही लीगच्या फायद्यासाठी असेच डावपेच योजले होते.

१९४४ सालात काश्मिरमध्ये जीनांना अतिशय अडचणीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले. काश्मिरच्या दिवाणांनी वेळोवेळी अवलंबिलेल्या धोरणामुळे मुसलमानांच्या एका गटात तीव्र असंतोष पसरला होता. आणि नॅशनल कॉन्फरन्स आणि मुस्लिम कॉन्फरन्स या दोन्ही संघटनांनी आपल्यातील वाद मिटविण्यासाठी जीनांना निमंत्रण पाठवले. त्यावेळी ते काश्मीर प्रश्नात ओढले गेले. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते शेख अबदुल्ला आणि त्यांचे इतर काही सहकारी यांची जीनांची मर्जी संपादन करण्याच्या बाबतीत मुस्लिम कॉन्फरन्सबरोबर काही महिन्यापासून चढाओढ लागली होती.

जीनांनी व्हाइसरॉय यांना कडक शब्दात पत्रे पाठवून या संस्थानांतील दिवाणांच्या धोरणांचा खरपूस समाचार घेतला. लीग कॉन्सिलच्या बैठकीतही या प्रश्नावर चर्चा झाली. परंतु आपण काश्मीरच्या प्रश्नात विशेष लक्ष घालू लागलो तर हैद्राबादमधील हिंदूंना निजामाविरुद्ध आंदोलन करण्यास उत्तेजन दिल्यासारखे होईल असा एका लीग सभासदाने सावधगिरीचा इशारा दिल्यामुळे त्या बैठकीत काश्मीरसंबंधी एक सौम्यसा ठराव पास करण्यात आला. जीनांनी ज्यावेळी श्रीनगरला भेट दिली, त्यावेळी नॅशनल कॉन्फरन्स आणि मुस्लिम कॉन्फरन्स या दोन्ही संघटनांतर्फे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. तसाच त्यांचा जाहीर सत्कारही करण्यात आला. शेवटी जीनांनी मुस्लिम कॉन्फरन्सच्या बाजूने कौल दिला. त्यावर २५ जून १९४४ रोजी शेख अबदुल्ला यानी अशी घोषणा केली की असे लाखो जीना काश्मिरमध्ये आले तरी त्यांना स्थानिक राजकारणात आम्ही चबढब करू देणार नाही. जीना सन्माननीय पाहुणे म्हणून येथे आले परंतु ते त्या स्थानाचा दुरुपयोग करून घेत आहेत आणि मुस्लीम कॉन्फरन्सचेच राजकारण ते खेळू लागले आहेत असा आरोपही त्यांनी जीनांवर केला. ते म्हणाले :

> १९३२ साली मुस्लीम कॉन्फरन्स ही एक संकुचित संघटना होती. परंतु १९३९ साली आम्ही राजकीय प्रगतीचा वरचा टप्पा गाठला आणि लोकशाही पद्धतीने घेतलेल्या प्रचंड बहुमताच्या निर्णयानुसार आम्ही काश्मीरमधील जनतेच्या राष्ट्रीय संघटनेत आमची पहिली संघटना रुपांतरीत करून घेतली. . . . . मला असे सांगावयाचे आहे की, काश्मीरमधील जनतेला केवळ जातीय संघटनांच्या प्रवाहात लोटून तिच्या एकजुटीच्या शक्तीत नॅशनल कॉन्फरन्सला फूट पाडावयाची नाही.

तारीख २४ ऑक्टोबर १९४४ रोजी वॅव्हेल यांनी चर्चिल यांना एक प्रदीर्घ खलिता पाठवून भारताला सुधारणांचा पुढील हप्ता देण्यासाठी त्यांची मनधरणी केली होती. त्या खलित्यात त्यांनी खालील मुद्दे उपस्थित केले होते :

> (१) वीस किंवा तीस वर्षापूर्वी भारताला राजकीय सुधारणा देण्याची ज्यावेळी आपण सुरवात केली. त्यावेळी आपण जी एक दिशा धरली होती ती आता सोडून देता येणार नाही. त्यापासून माघार घेण्याची वेळ आता निघून गेली आहे. असे मला वाटते आणि अगदी अलीकडे क्रिप्स योजनेमध्येही भारताला अल्पावकाशात स्वयंशासन देण्याचेच धोरण होते. (२) मला असेही वाटत नाही की, कोणत्याही परिस्थितीत शस्त्रबळाच्या जोरावर आपण भारताला फार काळ दडपून ठेवू शकू. . . . . . मला तर स्वच्छपणे असे दिसते आहे की, ब्रिटिश जनता दडपशाहीच्या धोरणाला संमती देणार नाही. तसेच याबाबतीतील जागतिक प्रतिक्रियाही आपल्याला अनुकूल रहाणार नाही. त्याचप्रमाणे युद्धसमाप्तीनंतर या देशावर वर्चस्व गाजविण्यासाठी मोठ्या संख्येने येथे रहाण्यास ब्रिटिश सैनिकही तयार होणार नाहीत. (३) हिंदुस्तानातील सध्याचे सरकार कायमचे तर राहोच

पण फार काळ देखील टिकू शकणार नाही. (४) हिंदुस्तानने स्वखुशीने ब्रिटिश कॉमनवेल्थचा एक घटक म्हणून रहावे असे जर आपल्याला वाटत असेल तर आपण एखादे कल्पक आणि विधायक असे पाऊल ताबडतोब उचलले पाहिजे. गांधी आणि जीना त्याचबरोबर त्यांचे अनुयायी यांच्या विषयी आपल्याला वाटणारी अप्रीती आणि अविश्वास संयुक्तिक असेलही तथापि कॉंग्रेस आणि मुस्लीमलीग हे हिंदू आणि मुस्लीम हिंदुस्तानातील प्रबळ पक्ष आहेत आणि ते तसे रहाणारच आहेत. (५) आपण करणारी हालचाल भारतीयांना आकर्षक वाटली तरच ती प्रभावी होईल. जर केवळ दंडुकेशाहीने राज्य करावयाचे नसेल तर त्यासाठी बुद्धीपेक्षाही भावनेची कास धरली पाहिजे. आपली प्रत्येक हालचाल ही कळकळीची आणि मैत्रीची द्योतक असली पाहिजे आणि हिंदुस्तानविषयीच्या आपल्या दृष्टिकोनात तदनुसार बदल घडून आला पाहिजे. आणि (६) माझ्या मनात आहे ते क्रिप्स योजनेच्या धर्तीवरील सध्याच्या घटनेच्या चौकटीत बसणारे तात्पुरते राजकीय सरकार.

मार्च १९४५ मध्ये वॅव्हेल यांनी लंडनला युद्ध मंत्रिमंडळाशी याबाबत वाटाघाटी केल्या. "भारत सोडून जाण्याची, घटनेत बदल करण्याची आणि भारतावरचा हक्क लगोलग सोडून देण्याची" सूचना केल्याबद्दल चर्चिल तर प्रत्यक्ष त्यांच्यावर चांगलेच संतापले. त्यांनी असेही सांगितले की, पाकिस्तान, हिंदुस्तान संस्थानिस्तान अशी निरनिराळी राज्ये निर्माण करण्यासाठी भारताचे अनेक तुकडे पाडण्याची आपली तयारी आहे. दिनांक ८ मे रोजी युरोपातील युद्धाचा शेवट झाला. आणि इंग्लंडमध्ये नव्या निवडणुका घेण्याचे ठरले. काळजीवाहू सरकारच्या प्रमुखपदी असलेल्या चर्चिलनी अखेर वॅव्हेल योजनेला मान्यता दिली. आणि जून महिन्यात वॅव्हेल हिंदुस्तानात परत आले.

दिनांक १४ जून रोजी वॅव्हेल यांनी राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवरून एक भाषण केले. त्यात त्यांनी असे सांगितले की, प्रातिनिधिक स्वरुपाचे एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल बनविण्याच्या दृष्टीने राजकीय पुढाऱ्यांबरोबर वाटाघाटी करण्याचा आपला मानस आहे. त्यांच्या संकल्पित योजनेत पुढील तरतुदी होत्या. एक एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर मुसलमान आणि सवर्ण हिंदू याना सारखेच प्रतिनिधीत्व राहील. संरक्षण खाते वगळता आतापर्यंत युरोपियनांच्या हाती असलेली गृह, अर्थ, आणि परराष्ट्र व्यवहार इत्यादी सर्व खाती भारतीयांकडे सोपविली जातील. एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे काम-काज सध्याच्या घटनेच्या चौकटीत राहून चालेल. नव्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिल पुढील मुख्य कार्य जपान बरोबरचे युद्ध जिंकण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आणि देशाच्या नव्या राज्यघटनेबाबत एकमत घडवून आणणे हे राहील. भारत मंत्री अमेरी यांनीही अशाच आशयाची घोषणा केली. त्यानंतर वॅव्हेल यांनी प्रांतिक सरकारचे पंतप्रधान, ज्या प्रांतात गव्हर्नरांची राजवट होती तेथील त्यापूर्वीचे प्रधान-मंत्री, मध्यवर्ती कायदेमंडळ आणि कौन्सिल ऑफ स्टेटमधील कॉंग्रेस व मुस्लीमलीग

पक्षाचे नेते, मध्यवर्ती कायदेमंडळातील नॅशनॅलिस्ट पार्टी आणि युरोपीय सभासदांचा गट यांचे नेते अनुसूचित जातींचे आणि शिखांचे प्रतिनिधी म्हणून अनुक्रमे एन. शिवराज आणि तारासिंग आणि दोन प्रमुख पक्षांचे सर्वमान्य नेते म्हणून गांधी आणि जीना इतक्या जणांना वाटाघाटीसाठी बोलावले. वॅव्हेल यांच्या घोषणेनंतर २४ तासात वर्किंग कमेटीच्या सभासदांची जरी कारावासातून मुक्तता झालेली होती तरी काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना आझाद यांना मात्र या वाटाघाटीतून वगळण्यात आले होते. त्यावर काँग्रेसने जोरदार आक्षेप घेतल्यानंतर वरील यादीत त्यांचा समावेश करण्यात आला.

गांधींनी जातीय नावावरील समान प्रतिनिधीत्वाला विरोध दर्शविला. भुलाभाई देसाईंच्या योजनेला त्यांनी पाठिंबा दिला होता त्यामुळे त्या योजनेप्रमाणे राजकीय पातळीवरुन काँग्रेस आणि लीग यांना समान प्रतिनिधीत्व देण्याला त्यांची हरकत नव्हती. दिनांक २४ जून रोजी व्हाइसरॉय बरोबर झालेल्या भेटीच्या वेळी त्यांनी सवर्ण हिंदू या संज्ञेलाही हरकत घेतली आणि त्या ऐवजी अनुसूचितेतर हिंदू म्हणणे आपल्याला अधिक आवडेल असे सांगितले. ज्या प्रांतात काँग्रेस अधिकारावर असेल तेथील संयुक्त मंत्रिमंडळाबाबत त्यांनी अशी भूमिका मांडली की, अल्पसंख्यांकांपैकी जे काँग्रेसचे सभासद असतील त्यांच्यामधूनच मंत्रिमंडळावरील अल्पसंख्यांक नियुक्त केले जावेत. त्याच दिवशी वॅव्हेल यांची जीनांशीही बोलणी झाली. जीनांनी पुढील तीन मागण्या केल्या : (१) व्हाइसरॉय यांच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलवर मुसलमान आणि मुसलमानेतर यांना समान प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे. कारण इतर अल्प-संख्यांक सभासद काँग्रेस बरोबरच रहातील अशी जीनांना धास्ती वाटत होती. (२) कौन्सिलवर नेमावयाच्या सर्व मुस्लिम सभासदांची नियुक्ती करण्याची मुस्लिम लीगला परवानगी असावी आणि (३) कोठल्याही प्रश्नावर मुसलमानांना नकाराधिकार बजावता आला पाहिजे. यापैकी कोणतीही मागणी मान्य करण्याचे वॅव्हेल यांनी नाकारले.

वरील निमंत्रितांची सिमला परिषद दिनांक २५ जून रोजी सुरू झाली. जीना यांनी काँग्रेस ही फक्त हिंदूंचे प्रतिनिधीत्व करते असे उद्गार काढल्यामुळे पहिल्याच दिवशी काँग्रेस आणि लीग पुढाऱ्यात खटका उडाला. डॉ. खानसाहेब यांनी जीनांच्या या विधानाला जोरदार आक्षेप घेतला. परंतु वॅव्हेल यांनी मध्ये पडून जे काँग्रेसचे सभासद आहेत त्या सर्वांची ती प्रतिनिधी आहे असे सांगितल्याने पुढील वितंडवाद टळला. पाकिस्तान व्यतिरिक्त इतर कशालाही लीगची मान्यता मिळणार नसल्याने घटने-बाबत एकमत घडवून आणण्यात नवीन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलला कितपत यश येईल याबाबत जीनांनी आपल्या भाषणात शंका व्यक्त केली. कोठल्याही स्वरूपातील मध्यवर्ती सरकारला आपला मूलतःच विरोध असून सध्याची योजना ही केवळ एक तात्पुरती व्यवस्था म्हणून मान्य करण्यास आपण तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीतील चर्चेच्या ओघात (गांधी चर्चेत भाग घेत नव्हते. परंतु काही मदत लागली तर ती देता यावी म्हणून ते सिमल्यातच राहिले होते) सर्व निमंत्रितांचे सर्वसाधारण योजनेबाबत एकमत झाले. परंतु प्रत्येक पक्षाने आपल्या वतीने एक्झिक्युटिव्ह कौन्सिल-वर पाठवावयाच्या सभासदांच्या नावांची यादी सादर करावी म्हणजे त्यातून आपण निवड करू असे व्हाइसरॉय यांनी सांगितल्याबरोबर वादावादीला सुरवात झाली आणि काँग्रेस व लीग यांच्यातील वाटाघाटींसाठी परिषद तात्पुरती तहकूब करण्यात आली. परंतु काँग्रेसतर्फे एकाही मुसलमान सभासदाचे नाव सुचविले जाता कामा नये असा जीनांनी हट्ट धरल्यामुळे या वाटाघाटी फिसकटल्या.

त्यानंतर वॅव्हेल यांनी नेत्यांबरोबर खाजगीरित्या चर्चा केली. त्यावेळी जीनांनी असा मुद्दा उपस्थित केला की, एकूण १२ भारतीय सभासदांच्या (पाच हिंदू, पाच मुसलमान, एक शीख आणि एक अनुसूचित जातीपैकी) कौन्सिलमध्ये इतर सभासदांपुढे मुसलमानांचा टिकाव लागणार नाही. त्यावर वॅव्हेल यांनी असे प्रतिपादन केले की, मागील चार वर्षात कोठल्याही प्रश्नावर कौन्सिलने जातीय दृष्ठिकोन स्वीकारल्याचे एकही उदाहरण दाखवता येणार नाही, आणि कोणत्या प्रश्नावर मुसलमानांना नामोहरम केले जाईल असे वाटते. त्यासंबंधी खुलासा करण्याचे जीनांना त्यांनी आवाहन केले. युद्धोत्तर औद्योगिक विकास ही एकच बाब जीना या संदर्भात दाखवू शकले. सर्वच्या सर्व पाच मुसलमान सभासदांची नियुक्ती करण्याचा मुस्लिम लीगला अधिकार असला पाहिजे असा जीनांनी पुन्हा एकदा आग्रह धरला. या प्रश्नावर आता वाटाघाटी फिसकटणार हे जवळजवळ स्पष्ट झाल्याने बाकीचे सर्व पक्ष व्यथित होऊन गेले. आंबेडकर देखील जीनांवर चिडले आणि अशा परिस्थितीत देशाची फाळणी करून टाकलेली चांगली असे त्यांनी सुचविले. युनियॉनिस्ट किंवा लीग यापैकी कोणत्याच पक्षात नसलेल्या पंजाबमधील एखाद्या मुसलमान व्यक्तीला कौन्सिलवर घेण्याकडे स्वतः वॅव्हेल यांचा कल होता. जीनांचे मन वळविण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.[1] आणि मुस्लिम लीग कोणतीच यादी सादर करणार नसल्याचा अंतिम निर्णय जीनांनी दिनांक ९ जुलै रोजी व्हाइसरॉय यांना कळविला.

तारीख १४ जुलै हा सिमला परिषदेचा शेवटचा दिवस होता. त्या दिवशी परिषद असफल ठरल्याचे जाहीर करून वॅव्हेल यांनी सर्वस्वी त्याचा सर्व दोष आपलेवर घेतला. त्याचदिवशी पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत जीनांनी असे सांगितले की, वॅव्हेल योजनेच्या अंतिम विश्लेषणातून असे निष्पन्न होते की, ती एक सापळा होता. एका बाजूला अखंड भारताच्या नावाखाली हिंदूंसाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या खटपटीत असलेली गांधींची हिंदू काँग्रेस आणि दुसऱ्या बाजूला पंजाब मधील मुसलमानांचे

---

**तळटीप**:—१बरोबर एक वर्षानंतर मध्यावधी सरकारच्या स्थापनेबाबत चर्चा चालू असताना जीनांनी संरक्षण आणि परराष्ट्र व्यवहार यांच्याबरोबरच नियोजन खातेही लीगला मिळाले पाहिजे असा आग्रह धरला होता.

विघटन घडवून आणण्याचा चंग बांधलेले ग्लॅन्सी-खिजर आणि भौगोलिक ऐक्याचा अगदी अलिकडे पुरस्कार करणारे लॉर्ड वॅव्हेल यांच्या कचाटयात सापडण्याचा धोका या योजनेमुळे निर्माण झाला असता. त्या मुलाखतीत जीनांनी ही गोष्टही स्पष्ट केली की मुसलमानांच्या स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य करून युद्ध समाप्तीनंतर लाहोर ठरावाच्या आधारे पाकिस्तानची स्थापना करण्यात येईल अशी निःसंदिग्ध घोषणा जोपर्यंत ब्रिटिश सरकार करीत नाही तोपर्यंत कोठल्याही तात्पुरत्या सरकारात मुस्लीम लीग सहभागी होणार नाही याची जाणीव लीगने सरकारला अनेकवार स्पष्टपणे करून दिलेली आहे. दुसरे असे की, काँग्रेससकट इतर सर्वांना मिळून जेवढे प्रतिनिधीत्त्व मिळेल तेवढे या सरकारात स्वतंत्र राष्ट्र असलेल्या मुसलमानांना मिळाले पाहिजे कारण काँग्रेस प्रमाणेच अनुसूचित जाती, शीख, आणि ख्रिश्चन या सर्वांचे ध्येय देखील अखंड भारत हेच आहे. वांशिक आणि सांस्कृतिकदृष्टया हिंदू समाजाशीच ते मिळते जुळते असल्याकारणाने ते काँग्रेस बरोबरच रहाणार आणि मुसलमान मात्र एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये अल्पमतात जाणार.

दुसऱ्याच दिवशी खिजर हयातखान तिवाना यांनी एका प्रसिद्धी पत्रात जीनांच्या विधानातील विसंगती जनतेच्या नजरेस आणून दिली. वॅव्हेल योजना म्हणजे एक सापळा आहे, मुसलमानांनी प्रथमपासून ज्या गोष्टींचा आग्रह धरला आहे त्या पूर्ण होत नाहीत म्हणून लीगला ती स्वीकारार्ह वाटत नाही. इथपासून सुरुवात करून एकदम कोलांटी उडी घेऊन जीना शेवटी सांगतात काय तर एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर पंजाबला एक जागा मिळणार होती एवढयासाठी लीगने संबंध योजना फेटाळली.

मुस्लीम लीग व्यतिरिक्त इतर पक्षांच्या सहकार्याने वॅव्हेल यांनी आपली योजना अंमलात आणावी असा सल्ला अनेकांनी त्यांना दिला असताना तो त्यांनी मानला नाही. त्यामुळे कोठल्याही सुधारणांच्याबाबत नकाराधिकाराचा हुकमाचा पत्ता अद्यापही लीगच्याच हातात आहे हे पुन्हा एकदा दिसून आले.

राजाजी योजनेच्या बाबतीत किंवा गांधीबरोबरच्या वाटाघाटीच्या वेळी जीनांनी दाखवलेला हटवादीपणा सप्रूंच्या तडजोडवादी गटाचा त्यांनी केलेला अधिक्षेप भुलाभाई -लियाकत कराराबाबत त्यांनी स्वीकारलेली नकारात्मक भूमिका आणि शेवटी वॅव्हेल योजना राबवण्याच्या बाबतीत त्यांनी गाजवलेला नकाराधिकार यासर्वांमुळे काँग्रेस वर्किंग कमेटीच्या सभासदांत तीव्र प्रतिक्रिया उमटली. आता राजकारणाची सूत्रे त्यांनी आपल्या हाती घेतली आणि गांधी जवळजवळ अलग पडले. गांधींनी ज्या भुलाभाईच्या योजनेला आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले. त्या भुलाभाईचे नाव व्हाइसरॉयला सादर करावयाच्या यादीतून वर्किंग कमेटीने नेमके वगळले. जुलै १९४४ मध्ये आणि भारत छोडो आंदोलनातील भूमिगत हालचाली हिंसक कृत्यांबद्दल गांधींनी नापसंती दर्शविली होती. परंतु काँग्रेसच्या इतर पुढाऱ्यांनी मात्र तुरुंगातून सुटल्यावर ते तुरुंगात असताना आंदोलन चालू ठेवल्याबद्दल भूमिगत नेत्यांना

जाहीरपणे शाबासकी दिली, १९४५ मधील सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे जे अधिवेशन भरले होते, त्यात भारत छोडो आंदोलनाच्या काळात ज्यांनी अतुल धैर्य आणि चिवटपणा दाखविला त्यांना धन्यवाद देऊन त्यांना अभिवादन करणारा ठराव स्वतः नेहरूंनीं मांडला.

दुसऱ्या एका ठरावान्वये सुभाष बाबूंच्या आझाद हिंद फौजेतील अधिकाऱ्यांवर जे खटले भरले गेले होते त्याबद्दल सरकारचा निषेध करण्यात आला. स्वातंत्र्याची दुर्दम्य आकांक्षा बाळगली एवढाच काय तो गुन्हा त्यांच्या हातून घडला अशा तरुण अधिकाऱ्यांना सूडबुद्धीने शिक्षा ठोठावल्याबद्दल नेहरूंनी ब्रिटिश सरकारवर टीकेची झोड उठविली. या ठरावावर बोलणाऱ्या इतरांनीही आझाद हिंद फौजेतील लोकांचा वीर पुरुष म्हणून गौरव केला. आणि त्यांच्या विरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल केल्याबद्दल सरकारचा निषेध केला. तिसऱ्या ठरावात नव्या ब्रिटीश योजनेबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करण्यात आली होती आणि भारताचे स्वातंत्र्य थोपवून धरण्यासाठी चालविलेली काळकाढू कारवाई असे तिचे वर्णन केले होते. मात्र ग्रेट ब्रिटनमध्ये अधिकारावर आलेल्या मजूर सरकारने नव्या निवडणुका घेण्याची जी घोषणा केली होती तिला प्रतिसाद देऊन त्या लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अधिवेशनात डॉ. अश्रफ या कम्युनिस्ट सदस्याने मुसलमानांच्या स्वयंनिर्णयाचा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्याविरूद्ध एकच गिल्ला करण्यात आला. पंजाब काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष मिया इफ्तिखारूद्दिन यांनी असे सांगितले की ज्या विभागात मुस्लीम बहुसंख्य असतील तेथून घटना समितीवर निवडून आलेल्या प्रतिनिधींना आपले भवितव्य ठरविण्याचा आणि भारतीय संघराज्यात सामील व्हावयाचे की नाही ते ठरविण्याची संपूर्ण मुभा रहावी. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की काँग्रेसने अद्यापि देशातील सर्वसामान्य मुस्लीम जनतेत जागृती निर्माण केलेली नाही. वरवर पहाता मुसलमानांवर लीगचा पगडा असल्याचे किंवा ते लीगच्या बाजूचे आहेत असे दिसते त्याचे कारण काँग्रेसने आपले धोरण निःसंदिग्ध आणि स्पष्टपणे त्यांच्या मनावर ठसवलेले नाही, यावर उत्तर देताना नेहरू आपल्या भाषणात म्हणाले :—

'मी लवकरच संयुक्त प्रांतातील मुस्लीम जिल्ह्यांचा दौरा करणार आहे. डॉ. अश्रफ आणि मिया इफ्तिखारूद्दिन यांनी त्यावेळी माझ्या बरोबर येऊन मुसलमानांकडून काँग्रेसला किती प्रतिसाद मिळतो ते समक्ष पहाण्याचे मी त्यांना निमंत्रण देतो.

परंतु या प्रश्नाकडे ही मंडळी दुर्बिणीच्या चुकीच्या बाजूने पहात आहेत. यापूर्वी लीगशी जमवून घेण्याचा आम्ही कसोसीने प्रयत्न करून पाहिला. आमची आता खात्री होऊन चुकली आहे की, यापुढे मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांपासून चार हात दूर रहाणे हेच देशाच्या हिताचे ठरणार आहे. ( प्रचंड टाळ्या ) आपल्या अध्यक्षांची ( आझाद ) लीग नेत्यांनी किती अवहेलना केली ते डॉ. अश्रफ आणि

मिया इफ्तिखारूद्दिन विसरून गेले की काय? जोपर्यंत लीग आपली चूक सुधारत नाही तोपर्यंत आम्ही तिच्या बरोबर कसलीही चर्चा किंवा वाटाघाटी करण्यास तयार नाही. आम्ही सर्वसामान्य मुसलमानांना विश्वासात घेऊन त्यांच्या मागण्या मान्य करण्याकरिता आणि त्यांना कॉंग्रेसच्या बाजूला वळवून घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू परंतु मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांकडे यापुढे आम्ही कधीही जाणार नाही. माझी वर अशी खात्री होऊन चुकली आहे की, यापुढे मुस्लीम लीग नेत्यांच्या वाऱ्यालाही उभे रहाणे नको. पुन्हा पुन्हा आम्ही शरणागती पत्करून त्यांच्याकडे गेलो परंतु लताप्रहारावाचून त्यांच्याकडून आम्हाला दुसरे काहीही मिळाले नाही. कॉंग्रेस-लीग ऐक्याची जपमाळ ओढणाऱ्यांना जीनांनी आपल्या आदरणीय अध्यक्षांबद्दल कोणते उदगार काढले होते त्याचे एवढ्यातच विस्मरण झाले आहे काय? ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्याच्या मार्गात अडथळे आणले आणि ज्यांनी आम्हाला अनेकवार कडू गोळ्या गिळावयास लावल्या त्यांच्याबरोबर आता आम्ही कसलाही संबंध ठेवू इच्छित नाही.

लीगची भलामण करून तिच्या बरोबर समझोता घडवून आणण्याची मागणी करणाऱ्या वक्त्यांवर वल्लभभाई पटेल यांनीही त्या अधिवेशनात असाच कडाडून हल्ला चढवला होता :—

जातीय मतदार संघांना आपण मान्यता दिली हीच आपली चूक झाली, त्यामुळेच जातीय समस्या निर्माण होऊन बसली, कॉंग्रेसला यापुढे लीग बरोबर कसलाही संबंध ठेवता येणार नाही, असे नेहरू म्हणतात त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. काही मतभेद असतील तर ते अगदी आंतरराष्ट्रीय लवादाकडे सोपविण्यासही आम्ही तयार आहोत पण इतके करूनही कोणाचे समाधान होणार नसेल तर त्यांना लीगचा रस्ता मोकळा आहे. अशा लोकांना कॉंग्रेसमध्ये स्थान नाही. यापुढे कोणताही नवा मसुदा घेऊन आम्ही लीगकडे जाणार नसलो तरी अखेरचे म्हणून मी सांगतो की, एकाद्या त्रयस्थ निःपक्षपाती लवादापुढे आपण कॉंग्रेस आणि लीग यांच्यातील मतभेद मांडू आणि लवाद जो निर्णय देईल तो मान्य करू.

अखिल भारतीय कॉंगेस कमेटीचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सरदेसाई, भागवत, चितळे, के. एम. अश्रफ, सज्जद जाहीर, सोहनसिंग जोश, के. शर्मा आणि भारद्वाज या अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीवरील कम्युनिस्ट सभासदांविरूद्ध असलेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि गोविंद वल्लभ पंत या तिघांच्या वर्किंग कमेटीने एक समिती नेमली होती. कॉंग्रेसच्या मूलभूत धोरणावरच ज्यांचा विश्वास नाही. त्यांना कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळावर राहू द्यावयाचे किंवा नाही तसेच त्यांना असल्या पक्षाच्या निवडणुकीला उभे राहण्याची परवानगी द्यावयाची किंवा नाही ते कॉंग्रेस वर्किंग कमेटीने ठरवावे असे या समितीने आपल्या अहवालात म्हटले होते. कम्युनिस्टांच्या निरनिराळ्या ठिकाणच्या लिखाणाचा हवाला

देऊन १९३९, १९४० आणि १९४१ सालातील त्यांनी मांडलेली आणि १९४२ पासून स्वीकारलेली या दोन भूमिका कशा परस्पर विसंगत आहेत ते त्या अहवालात विस्तारपूर्वक दाखवून देण्यात आले होते. सुरुवातीला इंग्लंड आणि फ्रान्सला सहानुभूती दाखवल्याबद्दल आणि ज्यांनी साम्राज्यशाही युद्ध सुरू केले त्या सरकारशी, त्यांच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे बिनशर्त सहकार्य करण्याची तयारी दर्शविल्याबद्दल त्यांनी काँग्रेसवर टीका केली होती. त्याचप्रमाणे गांधींनी या युद्धाला हिटलर जबाबदार आहे असे म्हटल्याबद्दल त्यांच्यावरही कम्युनिस्टांनी आगपाखड केली होती. राष्ट्रीय लढयाचा विचका करून राष्ट्रीय आंदोलन धुळीला मिळविल्याबद्दल त्यांनी काँग्रेसवरही झोड उठविली होती. आणि काँग्रेस संघटना सुरक्षित राहावी म्हणून तिला साम्राज्यावाद्यांच्या हवाली केल्याचा काँग्रेस पुढाऱ्यांवर आरोप केला होता. परंतु नंतरच्या काळात कम्युनिस्टांनी याच्या बरोबर उलट सांगण्यास सुरुवात केली. आता ते जनतेला असे सांगू लागले की, भारत छोडो चळवळीमुळे देशात अराजक माजून त्याचा विनाश ओढवेल. १९४२ च्या मे जून महिन्यात भरलेल्या कम्युनिस्ट पार्टीच्या अधिवेशनात काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टी आणि फॉरवर्ड ब्लॉक यांना पंचमस्तंभीयाचे हस्तक ठरविण्यात आले. त्या अहवालात असेही निदर्शनास आणून देण्यात आले होते की, भारत छोडो आंदोलनापूर्वी काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्यातील वाद दोघांनाही मान्य असेल अशा लवादाकडे सोपविण्याचे गांधी आणि कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस पी. सी. जोशी, यांच्या दरम्यान ठरले होते. परंतु ज्यावेळी लवादाचा निर्णय कम्युनिस्टांच्या विरुद्ध गेला त्यावेळी त्यांनी हा निकाल एकतर्फी देण्यात आला असल्याची हाकाटी सुरू केली. समितीचा हा अहवाल हाती पडल्यानंतर अखिल भारतीय काँग्रेस कमेटीने वरील कम्युनिस्ट सभासदांवर शिस्तभंगाबद्दल कारवाई का करू नये अशी नोटीस बजावली.

त्यानंतर कम्युनिस्टांनी काँग्रेसच्या सभासदत्त्वाचे राजिनामे दिले. त्यांसंबंधात प्रसिद्ध केलेल्या पत्रकात पी. सी. जोशी यांनी स्वातंत्र्य संपादनाची योजना आखण्याऐवजी काँग्रेस स्वातंत्र्याच्या शक्तींचे विघटन करीत आहे असा तिच्यावर ठपका ठेवला. मुस्लीम लीगला काँग्रेस जो विरोध करीत आहे त्यातून भावी संघराज्य साध्य होण्याऐवजी यादवी युद्धाला मात्र निमंत्रण दिल्यासारखे होईल असे प्रतिपादन करून पी. सी. जोशींनी पुढे असे म्हटले होते की, काँग्रेसच्या सामर्थ्याची बढाई मारून लीगची उपेक्षा करणे म्हणजे डोळ्यावर पट्टी ओढून घेण्यासारखे आहे. स्वतः ब्रिटिशांकडे स्वयंनिर्णयाची मागणी करावयाची परंतु आपल्याच देशबांधवांच्या एका गटास मात्र ती नाकारावयाची हा उघडउघड अन्याय आहे. पी. सी. जोशी यांनी कम्युनिस्ट पक्षाची निवडणूक नीती काय राहील ते स्पष्ट करताना असे सांगितले होते की ज्या मतदार संघात कम्युनिस्ट पक्षाचा उमेदवार नसेल तेथे मुस्लीम जागेसाठी पक्ष लीगच्या उमेदवाराला पाठिंबा देईल आणि बिगर मुसलमान

जागेकरिता मात्र तो काँग्रेस उमेदवाराचा प्रचार करील.

१० ऑगस्ट १९४५ रोजी जपानने शरणागती पत्करल्यावर युद्ध संपुष्टात आले. संबंध देशात निवडणुकीचे वारे वाहू लागले. अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या सप्टेंबरमधील अधिवेशनानंतर काँग्रेस सोडून लीगकडे धाव घेणारांची रीघ लागली. सप्टेंबर २९ रोजी मिया इफ्तिकारूद्दिन लीगमध्ये सामील झाले. काँग्रेसला पाठिंबा देत आलेल्या जमीयत-उल-उलेमा या मुसलमानांच्या संघटनेत २६ ऑक्टोबर रोजी मोठी फूट पडली आणि मुस्लीम लीगला अनुकूल असलेल्या अशी प्रतिस्पर्धी जमीयत-उल-उलेमा मुख्यत: ज्या प्रांताचा समावेश पाकिस्तानात करून घेता येईल असे जीनांना वाटत होते अशा प्रांतात स्थापन करण्यात आली. इतर प्रांतातही पाकिस्तानानुकूल असलेल्या या नव्या संघटनेच्या थोड्याफार शाखा निघाल्या. गेली काही वर्षे काँग्रेसमध्ये असलेल्या कम्युनिस्ट पक्षातील मुसलमानांनी आता लीगचे सभासदत्व स्वीकारले. १९४२ साली अखिल भारतीय काँग्रेस कमेटीने फाळणीची मागणी फेटाळून लावली होती हे आपण यापूर्वी पाहिलेच आहे. ८ ऑगस्ट १९४२ च्या अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या ऐतिहासिक ठरावात संपूर्ण प्रांतिक स्वायत्तता आणि प्रांतांना शेषाधिकार यांची हमी देण्यात आली होती. ८ ऑगस्टच्या ऐतिहासिक ठरावाच्या आधारावरच काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा तयार करण्यात आला होता आणि त्या ठरावात करण्यात आलेल्या मागण्या आणि स्वीकारण्यात आलेली आव्हाने यांना धरूनच काँग्रेस निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे असे जाहीरनाम्यात घोषित करण्यात आले होते. ११ सप्टेंबर १९४५ रोजी झेड. एच. लारी, यांनी जाहीरपणे अशी मागणी केली की, काँग्रेसने एप्रिल १९४२ मधील जगत नारायण यांचा फाळणीची मागणी फेटाळून लावणारा आपला ठराव मागे घ्यावा. काँग्रेस आणि लीग या दोघांनीही जनतेचा कौल आपल्या बाजूने लावून घ्यावयाचाच अशा निर्धाराने निवडणूक लढविली.

मुख्यत: इंग्रजी शिक्षण घेतलेले सरकारी नोकरीतील मुसलमान आणि विद्यार्थी यांचा जीनांना पाठिंबा होता, त्यांचे एक पट्टशिष्य आता अलिगड मुस्लीम युनिव्हर्सिटीचे कुलगुरू बनले होते. आतापर्यंतचे त्या युनिव्हर्सिटीचे कुलगुरू पदवीदान समारंभाच्या भाषणात राजकारण येऊ देत नसत. पण तो संकेत मोडून यावेळेच्या कुलगुरूंनी आपल्या दीक्षांत भाषणात राजकारणाचा उहापोह केला इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांना पाकिस्तानी आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होण्याची चिथावणी दिली. प्रांतिक मुस्लीम युवक परिषदांची आमंत्रणे जीना सहसा नाकारीत नसत. नोव्हेंबर १९४२ मधील त्यांच्या पंजाब दौऱ्याच्या वेळी अखिल भारतीय मुस्लीम स्टुडंटस् कॉन्फरन्सचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. तेव्हापासून संबंध पंजाबभर पाकिस्तानची जोरदार लाट उसळली. मुस्लीम विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याकडून निवडणूक मोहिमेच्या वेळी जीनांना प्रचंड प्रमाणावर पाठिंबा मिळत गेला. १९३३ ते

१९४८ च्या दरम्यान डाक्का युनिव्हर्सिटीत इतिहासाचे प्राध्यापक असलेले मेहमूद हुसेन यांनी असे नमूद करून ठेवले आहे की, काँग्रेसप्रमाणे लीगपाशी सर्व वेळ कार्यकर्ते जवळजवळ नसतानादेखील मुसलमान विद्यार्थ्यांनी त्यांतही विशेष करून डाक्का युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी निवडणूक प्रचारात जे जिवापाड परिश्रम केले त्यामुळेच मुस्लीम लीगला इतके यश मिळू शकले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. निवडणूक जिंकण्याच्या कामी बंगालमधील शिक्षक आणि साहित्यिक यांनीदेखील फार महत्त्वाचा वाटा उचलला असेही त्यांनी नमूद करून ठेवले आहे.

१९२७ साली आलेल्या बालविवाह विधेयकाच्या वेळेपासून धार्मिक बाबतीत जीनांनी कधीच पुरोगामी भूमिका स्वीकारली नव्हती. मुस्लीम जनतेला संघटित करण्यासाठी आणि निवडणुका जिंकण्याकरितां मुल्ला मौलवींचा ते सर्रास उपयोग करून घेत. १९४६ च्या निवडणुकीत कित्येक मुस्लिम लीग नेत्यांना धर्मनेत्यांच्या बिरूदावली बहाल करून त्यांची आणि खरेखुरे मान्यवर धर्मपंडित यांची एक संयुक्त समिती प्रचारासाठी लीगने उभी केली होती. या कमिटीला 'मशाइख समिती' असे नाव देण्यात आले होते. धर्माच्या नावाने जनतेवर प्रभाव पाडण्यासाठीच ही मखलाशी होती.

मुसलमान जनतेला चिथावण्यासाठी जीना कशा तऱ्हेचा प्रचार करीत त्याची कल्पना निवडणूक मोहिमेतील त्यांच्या भाषणाचे जे उतारे पुढे दिले आहेत त्यावरून येऊ शकेल.

गांधी हे स्वतःला सत्याचे उपासक म्हणवतात परंतु प्रत्यक्षात मात्र ते असत्याचीच तरफदारी करीत असतात. आपल्याला पाकिस्तान म्हणजे काय ते समज शकत नाही असे पंडित नेहरू सांगत असतात. परंतु त्या दोघांनाही मुसलमानांना हिंदूंच्या राज्यात डांबून ठेवावयाचे आहे म्हणजेच जर्मनीत ज्यूंची जी गत झाली तीच त्यांना येथे मुसलमानांची करून टाकावयाची आहे. (१८-१०-४५).

पाकिस्तान हा आपल्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. आपण जगू तर ते पाकिस्तान मिळवून घेण्यासाठी आणि मरू तेही पाकिस्तानसाठीच. पाकिस्तानचा चाँद आकाशात चमकू लागला आहे आणि आपण त्यांच्यापर्यंत पोहचणारच (२८-१०-४५).

मुसलमान मतदारांच्या निर्णयावरच आपल्या जमातीचे भवितव्य ठरणार आहे. आपण जिवंत रहावयाचे की आपला विनाश ओढवून घ्यावयाचा याचां निर्णय मुसलमानांच्या मतदानावरच आता अवलंबून आहे. (१-११-१९४५).

आपण हिंदू आणि मुसलमान सर्वच बाबतीत एकमेकापासून अगदी निराळे आहोत. आपला धर्म भिन्न, आपली संस्कृती, भाषा, आपली शिल्पकला, संगीत कायदेकानू, न्यायदानपद्धत, आपले आहारविहार आणि पोषाख यांपैकी कशातही आपल्यात साम्य नाही. अशा परिस्थितीत केवळ मतदान पेटीच्या द्वारा आपण कधीही एकत्र येऊ शकणार नाही. हिंदूंना या देशात एकात्म स्वरूपाची राज्यपद्धती

हवी आहे कारण त्यायोगे तिनास एक इतके मताधिक्य मिळून मुसलमान हे कायम अल्पसंख्य राहिल्याने त्यांना मुसलमान राष्ट्रावर कायमचे अधिराज्य गाजविता येईल (२-११-४५).

मुसलमानांच्या दृष्टीने बकरी-ईदला विशेष महत्त्व आहे. कारण प्रेषित इब्राहिम याने ईश्वरासाठी आपल्या एकुलत्या एका मुलाचा बळी देऊन जो उत्कट त्याग केला त्यापासून मुसलमानांना धडा घेता येतो. आजच्या परिस्थितीतही हिंदुस्तानातील मुसलमानांना त्यातून पुष्कळ शिकण्यासारखे आहे. मुसलमान जर आपले कर्तव्य बजावित रहातील, आपले ऐक्य टिकवून धरतील आणि इस्लाम आणि मिल्लत यासाठी त्याग करण्याची तयारी ठेवतील तर आपला विजय ठरलेला आहे आणि तो विजयही नेत्रदीपक असेल याबद्दल माझ्या मनात बिलकूल शंका नाही. आपल्या सर्वांचे आवडते ध्येय जे पाकिस्तान त्याच्या पाठीमागे आपण एकजुटीने उभे राहिले पाहिजे अशी मुस्लिम भारताची आपल्याकडून अपेक्षा आहे. कशाचीही तमा न बाळगता आपले कर्तव्य बजावीत रहाण्याची आणि त्यायोगे स्वतंत्र पाकिस्तान या आपल्या ध्येयाच्या रोखाने आगेकूच करण्याची अल्ला आपल्याला शक्ती देवो (१५-११-४५).

मुस्लिम लीगच्या बाजूने पडलेले प्रत्येक मत म्हणजे पाकिस्तानच्या बाजूने पडलेले मत होय. तसेच मुस्लिम लीगच्याविरुद्ध गेलेले प्रत्येक मत हे हिंदू राज्याच्या बाजूने पडलेले मत आहे. आपल्या समोर हे दोनच पर्याय आहेत, हिंदू आणि मुसलमान यांची ही जी दोन प्रमुख राष्ट्रे ती फक्त धर्माच्याच बाबतीत निराळी आहेत असे नव्हे तर त्यांची संस्कृतीही सर्वस्वी भिन्न आहे. आपला धर्म ही आपल्या दिनक्रमात अंमलात आणावयाची एक जीवनपद्धती आहे आणि आपल्याला तिच्या आदर्शानुरूप वर्तन करावयाचे आहे; तर हिंदू पुढाऱ्यांना रामराज्य प्रस्थापित करुन मुसलमानांना अल्पसंख्यांक म्हणून वागवावयाचे आहे. परंतु दहा कोटी जनतेला अल्पसंख्य म्हणून वागविण्यात आल्याचे कधी कोणी ऐकले आहे काय? (२८-११-४५).

राष्ट्रवादी मुसलमान हे राष्ट्रवादी नाहीत आणि खरे मुसलमानही नाहीत ते जर सच्चे मुसलमान असते आणि लीगचे वर्तन मुसलमानांच्या हिताला बाधक आहे असे त्यांना वाटले असते तर त्यांनी लीगमध्ये सामील होऊन तिचे मार्गदर्शन केले असते. (२७-१२-४५).

आपला जो लढा चालू आहे त्यामागे किती मोठे प्रश्न गुंतलेले आहेत ते आपण समजून घेतले पाहिजेत. मुसलमानांच्या दृष्टीने हा जीवन-मरणाचा प्रश्न आहे. पाकिस्तान मिळविण्यात आपल्याला अपयश आले तर त्यामुळे आपले राष्ट्रीय अस्तित्वच संपुष्टात येणार आहे. या कसोटीच्या क्षणी प्रत्येक मुसलमानाने मग त्याचे स्थान काहीही असो मुस्लिम लीग आणि पाकिस्तान यांच्या बाजूने स्वतःला झोकून

देणे आणि अंतिम विजय मिळेतोपर्यंत उसंत न घेणे हे त्याचे कर्तव्य ठरते. ( १२-१-४६ ).

राष्ट्रवादी मुसलमान असा कोणताही पक्ष किंवा संघटना अस्तित्वात नाही. त्यांना ना कसली तत्त्वप्रणाली, ना कार्यक्रम. मुसलमान मतदारांनी या सापळ्यात सापडू नये असे माझे त्यांना बजावून सांगणे आहे. त्याचप्रमाणे अहरार, खाकसार आणि निरनिराळी नावे घेऊन कुत्र्यांच्या छत्र्यांप्रमाणे पुढे येणाऱ्या टोळ्या म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपल्या शत्रूंनी उभी केलेली भुतावळ आहे. मुसलमानांना पाकिस्तानच्या प्रश्नावर आपले निर्णायक मत नोंदवावयाचे आहे. उमेदवार व्यक्तिशः कसा आहे ते पाहून त्यांनी मतदान करता कामा नये. ( १९-१-१९४६ ).

काँग्रेस आणि लीग हेच या देशातील दोन खरे पक्ष आहेत हे सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालाने स्पष्ट झाले. मध्यवर्ती कायदेमंडळातील एकूण १०२ लोकनियुक्त जागांपैकी काँग्रेसला ५७ तर मुस्लिम लीगला ३० जागा मिळाल्या. प्रांतिक कायदेमंडळातील १,५८५ जागांपैकी ९२३ जागांवर काँग्रेस उमेदवार निवडून आले तर ४२५ जागा लीगने पटकावल्या. या दोन पक्षांच्या खालोखाल स्वतंत्र म्हणून उभ्या राहिलेल्या राष्ट्रवादी मुसलमानांना अवघ्या १६ जागा मिळाल्या यावरून इतर सर्व पक्षांचा या निवडणुकीत कसा साफ धुव्वा उडाला ते दिसून येते. प्रांतिक कायदेमंडळासाठी काँग्रेसच्या तिकिटावर उभ्या राहिलेल्या मुसलमानांपैकी बिहारमध्ये ४, वायव्य सरहद्द प्रांतात १९, आणि संयुक्त प्रांतात १ असे उमेदवार निवडून आले. प्रांतिक कायदेमंडळावरील एकूण १५८५ जागांपैकी ८ जागा मिळवून कम्युनिस्ट पक्षाचा चौथा नंबर लागला. हिंदूमहासभा आणि शेड्युल्ड कास्ट फेडरेशन यांना प्रत्येकी दोन जागा मिळाल्या तर रॉय यांच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीला मुंबई प्रांतात मिळालेल्या एकुलत्या एका जागेवर समाधान मानावे लागले. मुसलमानांच्या ६० लाख मतापैकी लीगला ४५ लाख म्हणजे ७५ टक्के मते पडली, परंतु लीगव्यतिरिक्त इतर मुस्लीम पक्षांना मिळालेली १५ लाख मते ही सर्व पाकिस्तानविरोधी होती असे म्हणता येणार नाही. कारण पंजाबमधील युनियनिस्ट पक्षांतील आणि सिंधमधील जी. एम. सईद गटातील मुसलमानांनी पाकिस्तानलाच आपला पाठिंबा जाहीर केला होता. बंगाल आणि आसाममधील ८२ टक्के मुसलमानांनी मुस्लिम लीगच्या बाजूने निःसंदिग्ध कौल दिला. त्या खालोखाल मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतातून लीगला ७९ टक्के मते मिळाली. पंजाब, सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतात मात्र लीगच्या बाजूने मुसलमानांचे अवघे ५९ टक्के मतदान झाले. पण युनियनिस्ट पार्टी आणि जी. एम. सईद यांच्या गटाला मिळालेली मते ही, पाकिस्तानच्याच बाजूची होती असे धरले तर ही मतदान संख्या ६५ टक्क्यांपर्यंत जाते. सिंध प्रांतात मुस्लिम लीगला १९९, ६५१ मुस्लिम मते पडली तर तिच्या

प्रतिस्पर्ध्यांना १५३, २३५ मते मिळाली. सिंध प्रांतातील मुस्लिम लीगला मिळालेले जेमतेम बहुमत आणि पक्षांतर्गत भांडणे यामुळे तेथील तिच्या मंत्रिमंडळाची परिस्थिती इतकी केविलवाणी झाली होती की, सिंधचे पंतप्रधान हिदायतुल्ला यांनी ८ मार्च १९४६ रोजी पत्रकारांना असे सांगितले की, 'सिंधमध्ये सुस्थिर सरकार अधिकारावर यावे म्हणून येथे नव्याने निवडणुका घेण्यात याव्यात. त्या प्रांतात काँग्रेस जी. एम सईद यांचा गट आणि मौला बक्ष यांचा गट अशा तिघांची मिळून संयुक्त विरोधी आघाडी बनविण्यात आली होती. बंगाल प्रांतात युरोपियन गटांच्या मदतीने मुस्लिम लीग मंत्रीमंडळ बनवू शकली होती.

वायव्य सरहद्द प्रांतात प्रांतिक निवडणुकीत लीगला पराभव पत्करावा लागला असला तरी बहुसंख्य मुसलमान आपल्या मागे आहेत हे तिने दाखवून दिले होते. मध्यवर्ती कायदेमंडळासाठी काँग्रेसला आपल्या तिकिटावर एकही मुसलमान उमेदवार उभा करता आला नव्हता .तारीख २८ ऑक्टोबर १९४५ रोजी कराचीत एका जाहीर सभेत भाषण करताना या घटनेचा उल्लेख करून जीना म्हणाले की, "मध्यवर्ती कायदे-मंडळासाठी काँग्रेसने उभ्या केलेल्या अधिकृत उमेदवारांची यादी मी पाहिली आहे. त्यावरून हे स्पष्ट होते की, हिंदुस्तानातील सर्व जनतेचे प्रतिनिधीत्व आपण करतो असा जो डांगोरा काँग्रेस जगभर पिटीत होती त्यापासून तिने आता पळ काढला आहे." निवडणूक निकालानंतर अल्पावधीतच काँग्रेसने मुस्लिम लीगबरोबर सर्व प्रांतात संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याचा प्रस्ताव मांडला. लीगने अर्थातच तो फेटाळून लावला. २० फेब्रुवारी १९४६ रोजी कलकत्त्यात एका जाहीर सभेत जीनांनी अशी गर्जना केली की, मंत्रिमंडळावर स्थानापन्न होण्यासाठी मुस्लिम लीगने निवडणुका लढविलेल्या नसून १९३५ चा कायदा सन्मानपूर्वक गाडून टाकण्याकरिता आणि पाकिस्तान मिळवून घेण्यासाठी आम्ही निवडणुकीच्या रिंगणात उतरलो होतो

## प्रकरण २३

### भारताच्या ऐक्यासाठी मंत्रिमंडळाचा मसुदा

१९४५ साली आणि १९४६ च्या सुरुवातीला ज्या अनेक घटना घडत गेल्या त्यामुळे भारताच्या राजकीय परिस्थितीत जमीन-अस्मानाचे स्थित्यंतर घडून आले. ग्रेट ब्रिटनमध्ये मजूर पक्षाला मिळालेला विजय ही अशीच एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना होती. हिंदुस्तानवरील आमचे साम्राज्य मोडीत काढण्यासाठी आम्ही युद्धात उतरलेलो नाही अशी दर्पोक्ती करणारे चर्चिल यांचे सरकार आता इंग्लंडमध्ये राहिलेले नव्हते. निवडणूक प्रचारात हिंदुस्तानात यापुढे आम्ही ब्रिटिशांची सत्ता चालू देणार नाही असे काँग्रेस हिरीरीने सांगत होती इतकेच नव्हे तर ब्रिटिशांनी तावडतोब आपले चंबूगबाळे उचलले नाही तर पुन्हा एकदा सामुदायिक उठाव करावा लागेल असेही सरकारला बजावीत होती. त्यामुळे सरकारी वर्तुळात चिंतेचे वातावरण पसरले होते. ब्रिटिश मंत्रिमंडळाला सादर केलेल्या अनेक अहवालातून वॅव्हेल यांनी भारतातील परिस्थिती कोणते वळण घेणार याविषयी तीव्र चिंता व्यक्त केली होती. युद्ध समाप्तीनंतर आझाद हिंद फौजेतील अधिकाऱ्यांवर सरकारने दाखल केलेल्या खटल्यांचे प्रकरण फार गाजले. या खटल्यांमुळे संबंध देशांत देशभक्तीचे एक नवे वारे संचरले आणि मुसलमानही त्यापासून अलिप्त राहू शकले नाहीत. मुस्लिम लीगनेदेखील या खटल्यांबद्दल सरकारचा सर्वसाधारणपणे निषेधच केला.

२७ डिसेंबर १९४५ रोजी वॅव्हेल यांनी ब्रिटिश मंत्रिमंडळाला एक विस्तृत अहवाल सादर केला. त्यात १९४६ साली हिंदुस्तानातील राजकीय परिस्थिती कशी असेल-, घटना कसकशा घडत जातील, आणि ब्रिटिश सरकारने त्याबाबत कोणते धोरण स्वीकारावे यासंबंधी उहापोह करण्यात आला होता. त्यांनी असे सुचविले होते की, (१) मध्यंतरीच्या काळात देशातील प्रमुख पक्षांना घेऊन कार्यक्षमतेने राज्य कारभार चालवू शकेल असे एक्झिक्युटिव्ह कौन्सिल स्थापन करावे. त्यावर अशा पक्षांना प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देण्यात यावे, (२) व्यवहार्य आणि सर्वांना मान्य होईल अशा तऱ्हेची घटना तयार करणारी एखादी घटना समिती स्थापन करण्यात यावी, (३) शक्यतोवर संयुक्त मंत्रिमंडळाच्या तत्त्वावर प्रांतिक सरकारे अधिकारावर आणावीत. त्या अहवालात वॅव्हेल यांनी असे नमूद केले होते की, काँग्रेस हा अत्यंत सुसंघटित असा राजकीय पक्ष असून सत्ता हस्तगत करण्याचे आपले उद्दिष्ट तडीस नेण्यासाठी तो कोणत्याही मर्यादेपर्यंत जाईल आणि प्रसंगी हिंसात्मक मार्गाचा अवलंब

करण्यासही मागेपुढे पहाणार नाही. शिवाय अनुसुचित जातीपैकी एका मोठा गट तिच्या पाठीशी आहे. आणि जमीनदार कम्युनिस्ट पार्टी अगर एच. एन. रॉय यांच्या मूठभर अनुयायांचा गट असो तिला कोणापासूनही हानी पोहोचू शकणार नाही. तिला मुस्लीम लीगच्या विरोधालाच काय ते खरे तोंड द्यावे लागेल. परंतु सरकार आणि कॉंग्रेस यांच्यात संघर्ष उद्भवला तर लीग तटस्थ राहील. जोपर्यंत लीगची सारी सूत्रे जीनांच्या हातात आहेत तोवर ती पाकिस्तानच्या मागणीला चिकटून राहील. सरकारला आधार आहे तो येऊन जाऊन संस्थानिक, सरकारी अधिकारी, आणि लष्कर यांचाच. कॉंग्रेसबरोबर संघर्ष करण्याची वेळ आलीच तर अजूनही आपण तिचा विरोध दडपून टाकू शकू. परंतु त्यासाठी आपल्याला फार मोठा रक्तपात करावा लागेल. पण हे केले तरी त्याजागी आपण कोणता नवीन पर्याय निर्माण करणार? केवळ सरकारी अधिकाऱ्यांच्या जोरावर राज्य कारभार चालू ठेवायचा म्हटले तरी त्यासाठी कार्यक्षम असे पुरेसे अधिकारीही आपल्यापाशी नाहीत. याकरिता वेळीच काही तोडगा शोधून काढला नाही तर आपल्याला अत्यंत बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागेल ..... म्हणून हिंदू आणि मुसलमान यांच्यात दुवा साधण्याचा काहीतरी मार्ग आपल्याला शोधून काढला पाहिजे. निवडणुका संपल्याबरोबर, आणि त्या कॉंग्रेस निश्चितच जिंकणार, कॉंग्रेसकडून एक्झिक्युटिव्ह कौन्सिल आणि घटना समिती यांची तावडतोब स्थापना करण्यात यावी अशी मागणी पुढे येणार, यातही पुन्हा या दोन्हीवर आपल्याला आपल्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे असा ती आग्रह धरणार. यासंबंधात वॅव्हेल यांनी पुढील काही मुद्दे उपस्थित केले होते; (१) नवे एक्झिक्युटिव्ह कौन्सिल कसे बनवावयाचे, (२) कॉंग्रेसचे सहकार्य मिळवावयाचे असेल तर जीना आणि मुस्लीम लीग यांना किती हद्दीपर्यंत डावलण्यास तयार आहोत? (३) गव्हर्नर जनरलच्या नकाराधिकाराच्या हक्कावर काही मर्यादा घालण्यास आपण संमती देणार का? (४) घटना समिती कशी नेमावयाची? याबाबत व्यक्तिशः त्यांनी असे सुचविले की, निवडणुकीनंतर कॉंग्रेस आणि लीग यांना एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवरील सभासदांसाठी आपापल्या पक्षातर्फे यादी सादर करण्यास सांगण्यात यावे. आणि त्या याद्यातील नावांमधून एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवरील सभासदांची नियुक्ती करण्यात यावी. त्याचबरोबर, याबाबत एखाद्या पक्षाने सहकार्य देण्याचे नाकारले तर त्या पक्षाला वगळून एक्झिक्युटिव्ह कौन्सिल बनविण्यात येईल याची आधीच स्पष्ट जाणीव त्या दोघांना देण्यात यावी. पंजाब प्रांतातील निवडणुका मुस्लीम लीगने जिंकल्या तर मुसलमानांना सवर्ण हिंदूंच्या बरोबरीने प्रतिनिधीत्त्व देण्यात यावे. एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवरील मुसलमान सभासदांच्या बाबतीत लीगचे म्हणणे प्रमाण मानण्यात यावे आणि युद्ध, परराष्ट्रीय व्यवहार, गृह आणि अर्थ या चार मोक्याच्या खात्यांपैकी दोन लीगकडे सोपविण्यात यावीत. कौन्सिलवर एकूण १४ सभासद असावेत, त्यापैकी ५ हिंदू, ५ मुसलमान,

२ अनुसूचित जाती, १ शीख आणि १ भारतीय ख्रिश्चन अशी त्याची विभागणी असावी.

पाकिस्तानबाबत वॅव्हेल यांनी असे मत व्यक्त केले होते की, जीना पाकिस्तानच्या मागणीवर अडून बसले तर पूर्वी त्यांनी ज्यांचे वर्णन फोलपट म्हणून केले होते तेवढ्या भागावरच त्यांना हक्क सांगता येईल म्हणजेच पंजाबचा दोन पंचमांश भाग आणि कलकत्ता शहरासकट सबंध पश्चिम बंगाल त्यांच्या पाकिस्तानात समाविष्ट होणार नाही.

१९४६ च्या सुरुवातीला नवे भारतमंत्री लॉर्ड पॅथिक लॉरेन्स यांनी आकाशवाणीवरील भाषणातून असे जाहीर केले की, "१९४६ हे वर्ष भारताच्या इतिहासात अत्यंत निर्णायक असे ठरणार आहे. हिंदुस्तानला लवकरात लवकर स्वतंत्र देशाचा दर्जा मिळून तो ब्रिटिश कॉमनवेल्थमधील आपला एक बरोबरीचा भागीदार बनावा असे मला स्वतःला आणि ब्रिटिश सरकारला वाटते. आम ब्रिटिश जनतेचेही हेची मत आहे याची मला खात्री आहे. हा दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी हिंदुस्तानला आम्ही जास्तीत जास्त सहाय्य करू. त्यासाठी आता कोणाला निषेधाची निदर्शने किंवा आंदोलन करून दडपण आणण्याची आवश्यकता नाही. हिंदुस्तानातील परिस्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी मुद्दाम येथे आलेल्या ब्रिटिश पार्लमेंटच्या शिष्टमंडळाच्या नेत्याने तारीख ६ जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत असे घोषित केले की, हिंदुस्तानबाबतच्या निर्णयात चालढकल करण्यासाठी आम्हाला इकडे पाठवण्यात आलेले नाही हिंदुस्तानचे हित साध्य होण्यासाठी काही तरी ठोस पाऊल उचलले जावे आणि तेही केव्हातरी शे-दोनशे वर्षांनी नव्हे तर येत्या काही महिन्यातच उचलले जावे अशी आम्हा सर्वांचीच तीव्र इच्छा आहे. शिष्टमंडळ इंग्लंडला परतण्यापूर्वी त्याचे एक सदस्य सॉरेन्स यांनी तारीख ७ फेब्रुवारी रोजी दिल्लीत असे सांगितले की, 'ब्रिटिश सरकारकडून भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा होणे किती निकडीचे आहे ते नव्याने सांगण्याची जरूरी नाही.' त्याच दिवशी भारतमंत्र्यांनीही एक जाहीर निवेदन केले की, जागतिक स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ज्याचा निर्देश केला जाईल असे स्थान हिंदुस्तानला प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने येत्या काही महिन्यातच आम्ही फार मोठी मजल मारू असा मला विश्वास वाटतो. हिंदुस्तानविषयीचा मजूर पक्षाचा दृष्टीकोन आणि त्याचे धोरण चर्चिलच्या अगदी उलट होते. व्हाइसरॉय आणि ब्रिटिश नोकरशाही यांनाही हिंदुस्तानवर आपल्याला सत्ता गाजवता येणार नाही हें कळून चुकले होते. आझाद हिंद फौजेच्या अधिकाऱ्यांवरील खटल्यांमुळे देशात एक नवे चैतन्य संचारले होते. त्यांना झालेल्या शिक्षा कमी करून थोड्याच दिवसात त्यांची मुक्तता झाली. त्यातच फेब्रुवारीच्या सुरुवातीला आरमारी दलातील तीन हजार खलाशांनी मुंबईत बंडाचे निशाण फडकावले. आरमारी दलाच्या निरनिराळ्या प्रकारच्या वीस बोटी त्यांनी ताब्यात घेतल्या, खलाशांच्या बंडामागोमाग मुंबईत अनेक दंगली उसळल्या आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी सरकारला

लष्कराला पाचारण करावे लागले. नाविकांना सहानुभूती दाखविण्यासाठी म्हणून रेल्वे कामगारांनीही संप पुकारला. अनेक शहरांतून युरोपियनांवर हल्ले चढविण्यात आले. तारीख २२ फेब्रुवारी रोजी बंगालमधील अँग्लोइंडियन्स आणि भारतात स्थायिक झालेले युरोपियन्स यांच्या निरनिराळया संघटनांच्या प्रतिनिधींनी एक संयुक्त पत्रक काढून सगळ्या राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांनी आपल्याबद्दल सदिच्छेचे वातावरण निर्माण करावे असे आवाहन केले. त्याच पत्रकात त्यांनी पुढे असे म्हटले की, शहरात दंगल उसळली त्यावेळी हिंदू आणि मुसलमान या दोघांनीही आमच्यावर हिंसक हल्ले चढवले. बायकांना रस्त्यात विवस्त्र केले. आमच्या घरादारांची नासधूस केली आणि उपासना मंदिरांचीही विटंबना केली. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या आपण विरूद्ध नाही असा निर्वाळा देऊन त्यांनी पुढे असे म्हटले की, राज्यकर्त्यांच्याविरूद्ध आमच्याही काही तक्रारी आहेत. पण त्यासाठी रस्त्यावर येऊन आम्हाला मिरवणुका काढता येत नाहीत. पत्रकाच्या शेवटी आपल्या स्वतःच्या समाजातील लोकांनीही भारतीय बांधवांबद्दल सदिच्छा आणि मैत्रीची भावना बाळगावी आणि हा देश हेच आपले घर मानून त्याबद्दल देशभक्तीची भावना बाळगावी असे आवाहन करण्यात आले होते. सरसेनापतींनी खलाशांच्या उठावाचा निषेध केल्याबद्दल जबलपूर येथील इंडियन सिग्नल कोअरमधील २०० जवानांनी अचानक संप पुकारला. शेवटी वल्लभभाई पटेलांच्या आवाहनामुळेच हा नाविक उद्रेक शमला. सरकारने विजय दिन साजरा करण्याचे ठरविले त्यावेळी देखील ७ आणि ८ मार्च रोजी दिल्लीत उग्र स्वरूपाच्या दंगली उसळल्या. सारांश ब्रिटिश साम्राज्याची खरोखरीच शंभरी भरत आली होती.

निवडणुकीचे निकाल जाहीर होण्यापूर्वीच लॉर्ड पॅथिक लॉरेन्स यांनी पार्लमेंटमध्ये दिनांक १९ फेब्रुवारी रोजी अशी घोषणा केली की, कॅबिनेटचे एक खास शिष्टमंडळ लवकरच भारताला भेट देणार आहे. या शिष्टमंडळात ते स्वतः क्रिप्स आणि अलेक्झांडर असे एकूण तिघे जण असतील. भारतातील निरनिराळ्या पक्षाच्या पुढाऱ्यांबरोबर वाटाघाटी करून घटना तयार करण्याची पद्धती, घटनासमितीची नेमणूक आणि केंद्र सरकारात प्रमुख राजकीय पक्षांचा पाठिंबा असलेल्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलची स्थापना याबाबत त्यांच्यात जास्तीत जास्त एकवाक्यता घडवून आणण्याचा हे शिष्ट-मंडळ प्रयत्न करील. या घोषणेनंतर सुमारे एक महिन्याने म्हणजे दिनांक १५ मार्च रोजी पार्लमेंटमध्ये ॲटली यांनी असे जाहीर केले की, भारतात जाणाऱ्या या शिष्ट मंडळाला जास्तीत जास्त निर्णय स्वातंत्र्य देण्यात येईल. त्यांनी असे सांगितले की, राष्ट्रवादाची लाट आताही लोकांच्या सर्व थरात पसरली असून लष्करही त्यापासून अलिप्त राहिलेले नाही. भारताला लवकरात लवकर स्वातंत्र्य संपादन करण्याच्या कामी हे शिष्टमंडळ प्रयत्नांची पराकाष्ठा करील. ब्रिटिशांना हिंदुस्तानात जास्तीत जास्त राजकीय पाठिंबा असलेले मध्यावधी सरकार स्थापन करावयाचे आहे की, राष्ट्र-

वादाची ही ऊर्मी केवळ ब्रिटिश मुलखापुरतीच मर्यादित राहिलेली नसून देशी संस्थानातही तिचे लोण पसरले आहे. संस्थानिक किंवा अल्पसंख्यांक यांना यापुढे भारतीय स्वातंत्र्याच्या आड येऊ दिले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. अल्पसंख्यांकासंबंधीचा ब्रिटिश सरकारचा हा नवा दृष्टिकोन हे ॲटलींच्या भाषणाचे खास वैशिष्ट्य मानावे लागेल. कोणत्याही अल्पसंख्य गटाला बहुसंख्यांकावर नकाराधिकार गाजवता येणार नाही असे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले की, एकीकडे स्वतःचे सरकार चालविण्याची जबाबदारी भारतीयांवर सोपवावयाची पण त्याचबरोबर त्यांच्यावतीने ते अधिकार येथे (ग्रेट ब्रिटन) स्वतःकडे राखून ठेवावयाचे असे करून चालणार नाही. नेहरूंनी ॲटलींच्या या निवेदनाचे स्वागत केले. जीनांनी साहजिकच त्यावर टीका केली आणि ॲटली हे तारेवरची कसरत करण्याचा प्रयत्न करीत आहेत असा त्यांच्यावर आरोप केला.

भारतातून निघून जाण्याची इंग्रजांची घोषणा प्रामाणिकपणाची नाही असे कॉंग्रेस समाजवादी नेत्यांनी अनेकवार घोषित केले. उलटपक्षी गांधी आणि कॉंग्रेसचे इतर ज्येष्ठ नेते मजूर सरकारच्या शब्दावर विश्वास ठेवायला तयार होते. १९४६ च्या फेब्रुवारीत या प्रश्नावर गांधी आणि अरुणा असफ अली यांच्यात सरळ सरळ खटका उडाला. अरुणा असफ अली आणि इतर समाजवादी पुढाऱ्यांनी ब्रिटिशांना भारतातून घालवून देण्यासाठी कॉंग्रेसने पुन्हा सामुदायिक लढा सुरू करावा असा आग्रह धरला. त्यावर दिनांक २४ फेब्रुवारी रोजी गांधींनी असे जाहीर केले की, कायम खंदकात राहून चालत नाही. संघर्षानंतर घटनात्मक मार्गाचाही अवलंब करावा लागतो. आणि घटनात्मक मार्ग आपण त्याज्य मानलेला नाही. ब्रिटिश शिष्टमंडळावर अविश्वास दाखविण्यात समाजवाद्यांची अदूरदृष्टीच दिसून येत आहे. वल्लभभाई पटेल यांनीही ३ मार्च रोजी अशी घोषणा केली की, भारताला स्वातंत्र्य हे मिळालेच पाहिजे आणि ते या वर्षातच मिळणार हे नक्की. क्रिप्स यांची ३ एप्रिल रोजी भेट घेतल्यानंतर गांधींनी असेच सांगितले की, शिष्टमंडळावर अविश्वास दाखवणे योग्य होणार नाही.

दिनांक २० फेब्रुवारी रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जीनांनी असे जाहीर केले की, एकच घटना समिती नेमण्यास आमचा सक्त विरोध आहे. याचप्रमाणे मध्यावधी सरकार म्हणून ज्यांचे वर्णन केले जात आहे अशा प्रातिनिधिक एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या नेमणुकीसही आपला विरोध आहे. दिनांक ४ एप्रिल रोजी त्यांनी शिष्टमंडळाची भेट घेतली. यावेळी त्यांनी अशी मागणी केली की, एक पाकिस्तानचे आणि दुसरे हिंदुस्तानचे अशी दोन केंद्रीय सरकारे स्थापन करून त्या दोहोंच्याकडे सत्ता सुपूर्त करण्यात यावी.

कायदेमंडळातील मुस्लिमलीगच्या सर्व सभासदांचा एक मेळावा ७ ते ९ एप्रिल पर्यंत दिल्ली येथे भरला होता. एका दृष्टीने हा मेळावा ऐतिहासिक ठरला असे

म्हणावे लागेल. कारण १९४० च्या सुप्रसिद्ध लाहोर ठरावाला मुरड घालून त्यात अभिप्रेत असलेल्या दोन पाकिस्तानांऐवजी एकच पाकिस्तान स्थापन करण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. ठरावावर प्रत्येक वक्त्याने राणाभीमदेवी भाषणे केली आणि पाकिस्तानचे ध्येय साध्य करून घेण्यासाठी होणाऱ्या चळवळीच्या संबंधात अखिल भारतीय मुस्लीम लीगकडून जे जे आदेश येतील ते स्वेच्छेने आणि निर्धाराने आपल्याकडून पाळले जातील व कसल्याही त्यागाची तयारी ठेवली जाईल अशी प्रतिज्ञा करूनच ते मेळाव्याहून परतले. त्या अधिवेशनात जीनांनी पुन्हा एकदा असे घोषित केले की, मुसलमानांपुरते बोलावयाचे तर अखंड भारताची कल्पना ते कधीही मान्य करणार नाहीत. त्याचप्रमाणे परिपूर्ण सार्वभौम पाकिस्तान निर्मितीच्या प्रश्नाबाबत कसलीही तडजोड होऊ शकणार नाही.

अधिवेशनातील महत्त्वाचा ठराव सुऱ्हावर्दीनी मांडला. (त्यानंतर तीन आठवड्यांनी बंगालचे पंतप्रधान म्हणून त्यांनी अधिकार ग्रहण केला) इस्लाम आणि हिंदुत्ववाद हे परस्परापासून सर्वस्वी भिन्न आहेत, हिंदू धर्मातील जातीपद्धती ही राष्ट्रवादाशी संपूर्णपणे विरोधी आहे. आता हिंदू आणि मुसलमान यांच्या आशाआकांक्षांमात कसलेही साम्य नसून ती दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत. अखंड हिंदुस्तानात हिंदू कायम बहुमतात रहाणार असल्याने लोकशाही पद्धतीच्या कोणत्याही राजवटीची परिणती हिंदू राष्ट्राची मुसलमान राष्ट्रावर कायमची सत्ता प्रस्थापित होण्यात झाल्याशिवाय रहाणार नाही. या जुन्याच सिद्धांताचा ठरावाच्या पहिल्या भागात पुनरुच्चार करण्यात आला होता. ठरावाच्या पुढील भागात मुसलमानांना हिंदूंच्या वर्चस्वातून सोडविण्यासाठी वायव्य सरहद्द प्रांत, सिंध, बलुचिस्तान, पंजाब, बंगाल आणि आसाम यांचा समावेश असलेल्या स्वतंत्र सार्वभौम पाकिस्तान निर्माण करण्याची मागणी करण्यात आली होती. पाकिस्तानी प्रांतासाठी स्वतंत्र घटना समिती नेमण्यात यावी अशीही मागणी करण्यात आली होती. प्रथम पाकिस्तानची मागणी मान्य करण्यात आल्याशिवाय आणि तिची त्वरेने अंमलबजावणी करण्याचे निःसंदिग्ध आश्वासन मिळाल्याखेरीज कोणत्याही मध्यावधी सरकारला मुस्लीम लीग मान्यता देणार नाही असे जाहीर करून ठरावाच्या शेवटी अखंड भारतासाठी मध्यावधी सरकार स्थापन करण्याचा आणि घटना बनविण्याचा प्रयत्न झाला तर लीग शक्य त्या सर्व मार्गांनी त्याचा प्रतिकार केल्याशिवाय रहाणार नाही अशी धमकी देण्यात आली होती.

ठराव मांडताना "पाकिस्तान ही आमची अखेरची मागणी आहे काय?" असा प्रश्न उपस्थित करून सुऱ्हावर्दी म्हणाले की, मी त्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या भानगडीत पडत नाही. परंतु मी इतकेच सांगतो की, ती आम्ही केलेली सर्वात ताजी मागणी आहे.......पूर्वी आम्ही यापेक्षा कितीतरी कमी मागत होतो. लोकशाही घटनेनुसार हिंदूंचा संख्येच्या बाबतीतला वरचष्मा खपवून घ्यावयालाही

(त्यानंतर वर्षाच्या आत सुऱ्हावर्दीनी स्वतंत्र सार्वभौम बंगालची मागणी करण्यास सुरवात केली).

आमची तयारी होती. परंतु आमच्या अगदी साध्यासाध्या मागण्याही त्यांनी फेटाळून लावल्या. आता फाळणीची मागणी करण्यावाचून आम्हाला गत्यंतर उरलेले नाही. . . . . . .तुम्ही आमच्याविरुद्ध युद्ध पुकारलेत तर त्याचा शेवट कशात होईल ते मी सांगू इच्छित नाही. आपल्या भाषणाच्या शेवटी सर्व मुसलमानांना एक राष्ट्र म्हणून एकत्र आणण्याच्याकामी फार मोठी कामगिरी बजावल्याबद्दल सुऱ्हावर्दींनी अल्पसंख्य मुस्लीम प्रांतातील आपल्या धर्म बांधवांचा गौरव केला. ठरावाला दुजोरा देताना खलिकुझमान यांनी पाकिस्तानच्या मागणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली :

१८५७ पासून स्वतःचे वेगळे अस्तित्व टिकविण्यासाठी मुसलमान झगडत आले आहेत. अलग होण्याची त्यांची मागणी पहिल्यापासूनचीच आहे. फार मोठा लढा दिल्यानंतर स्वतंत्र मतदार संघाची मागणी त्यांच्या पदरात पडली. त्यानंतर सिंध प्रांत अलग करण्यात आला. सत्तेचा समतोल राखण्यासाठीच ती मागणी करण्यात आली होती. त्यामुळे पाकिस्तानची मागणी ओघानेच आली. मुसलमान आता स्वतःचे भवितव्य स्वतःच ठरवतील. सर्व मुसलमानांना पाकिस्तान व्हावे असे अत्यंत तीव्रतेने वाटते आणि जी. एम. सईद, मलिक खिजर हयात इतकेच नव्हे तर खुद्द डॉ. खान साहेब हे देखील आपण पाकिस्तानविरोधी आहोत असे म्हणत नाहीत. मी असे ऐकले आहे की, एका कॅबिनेट मंत्र्याने ज्यावेळी त्यांना असा प्रश्न केला की, आपण अखंड भारताच्या बाजूचे आहात का? त्यावेळी त्यांनी असे उत्तर दिले की, मला सारे जगच अखंड हवे आहे. देशात दंगली सुरू झाल्या तर त्या वेळीतही मुसलमान मागे पडणार नाही. गांधी असे म्हणत असत की, 'मुसलमान हे गुंड आहेत तर हिंदू भित्रे आहेत.' भित्र्या माणसापेक्षा गुंड केव्हाही अधिक उपद्रव करू शकतो हे सर्वांनाच माहीत आहे.

आसामचे भूतपूर्व पंतप्रधान सादुल्ला यांनी अशी ग्वाही दिली की, तेथील आदिवासीसकट एकूण ९० लाख जनता आसामचा समावेश पाकिस्तानात करण्यात यावा अशा मताची आहे. सर फेरोजखान नून म्हणाले की, आम्हाला मध्यवर्ती सरकारच्या म्हणजेच हिंदू राज्याच्या दावणीला बांधण्यात आल्यामुळे ग्रेट ब्रिटन विरुद्ध लढण्याचा प्रसंग आला तर चेंगीज खान आणि हलाकू यांनाही लाजेने मान खाली घालावी लागेल असा हाहाःकार आम्ही उडवून देऊ. एकच घटना समिती नेमण्यात आली तर त्याविरुद्ध बंड करण्यासाठी मुसलमानांना आपल्या तलवारी म्यानाबाहेर काढाव्या लागतील अशी धमकी वायव्य सरहद्द प्रांतातील लीगचे पुढारी खान अब्दुल कयूम खान यानी आपल्या भाषणात दिली. मामदोतच्या खानांनी राष्ट्रवादी मुसलमानांची घरभेदे म्हणून संभावना केली. अल्पसंख्य प्रांतातील मुसलमानांच्यावतीने मध्यप्रांताचे सय्यद रौफ शहा मुंबईचे आय. आय. चुंद्रीगर आणि मद्रासचे महंमद इस्माइल यांनी पाकिस्तानच्या मागणीला पाठिंबा देणारी भाषणे केली आणि पाकिस्तानच्या निर्मिती-साठी धर्मयुद्ध करावे लागले तर त्यात अल्पसंख्य प्रांतातील मुसलमान सहभागी

होतील अशी ग्वाही दिली. महंमद इस्माईल यांनी तर असे सांगितले की, मुसलमानांचे धर्मयुद्ध केव्हाच चालू झालेले आहे. ते पुढे म्हणाले, 'आमची संस्कृती टिकवायची असेल आणि आम्हाला शांततेचे आणि सन्मानाचे जीवन जगायचे असेल तर ते फक्त पाकिस्तान निर्मितीनेच शक्य होईल.'

आपल्या समारोपाच्या भाषणात जीनांनी असे सांगितले की, ब्रिटिश शिष्टमंडळाबरोबर झालेल्या आपल्या मनमोकळ्या चर्चेच्या वेळी पाकिस्तान आणि त्याचे सार्वभौमत्व यासंबंधीच्या मूलभूत प्रश्नावर कोणतीही तडजोड होऊ शकणार नाही, असे आपण शिष्टमंडळाला परखडपणे सांगितले. कारण सामाजिक जीवनात मुसलमानांचा कणा मोडला आहे. आर्थिक क्षेत्रात तर त्यांचा सर्वनाश झाला आहे. अशा परिस्थितीत राजकीय सत्तेवाचून ते आपल्या धर्माचे रक्षण कसे करू शकतील ? संरक्षक अधिकारांच्या कल्पनेची त्यांनी टर उडविली. या संदर्भात त्यांनी असा सवाल उपस्थित केला की, आज काही संरक्षक अधिकार देण्यात आले तरी पाच दहा वर्षांनंतर बहुसंख्यांकांकडून त्यांची पायमल्ली होणार नाही कशावरून ? बहुसंख्यांक सतत प्रबळ होत राहतील आणि अल्पसंख्यांक अधिक दुबळे होत जातील. अशा परिस्थितीत एक एक करीत संरक्षक निर्बंधांचा लोपच होत जाईल. जीनांनी आपल्या भाषणात पुढे असे बजावले की, हिंदुस्तानातील मुस्लीम अल्पसंख्यांकांना वाईट तऱ्हेने वागविण्याची हिंदूंनी हिंमत केली तर पाकिस्तान सरकारही काही स्वस्थ बसणार नाही 'अहो ग्लॅडस्टनच्या काळी अर्मेनियनांच्या रक्षणासाठी ग्रेट ब्रिटन धावून जाऊ शकले तर अल्पसंख्यांकांची हिंदुस्तानात ससेहोलपट होऊ लागली तर पाकिस्तान काय हात जोडून स्वस्थ बसेल ?' १९३५ च्या कायद्यामुळे पंजाब आणि बंगाल प्रांतात लीगला इतर पक्षांच्या मदतीशिवाय सरकार बनवणे अशक्य होऊन बसले होते म्हणून आपल्या भाषणात जीनांनी त्या कायद्यावरही टीका केली. 'हे लोक आपल्याला थोपवू शकतील, आपल्या मार्गात ते अडथळेही आणतील परंतु आपले ध्येय गाठण्याच्या बाबतीत आता कोणीही आपल्याला अडवू शकणार नाहीत. जास्तीत जास्त म्हणजे काही काळ ते आपली ध्येय सिद्धी लांबवू शकतील परंतु श्रद्धा आणि धैर्य यांच्या जोरावर अंती आपण विजयी झाल्याशिवाय रहाणार नाही या शद्वात जीनांनी पाकिस्तान व्यतिरिक्त अन्य कशालाही आपण कबूल होणार नाही असा इशाराच शिष्टमंडळाला देऊन ठेवला. तथापि त्यांना त्याची घाईही झालेली नव्हती.

कॅबिनेट मिशनबरोबर झालेल्या प्राथमिक चर्चेत वॅव्हेल यांनी असे सांगितले की, वाटाघाटी निष्फळ ठरणार आणि काँग्रेस आणखी एक सामुदायिक आंदोलन सुरू करणार असा आपला अंदाज आहे आणि तसे झाले तर आपली अशी सूचना आहे की जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा थांबविण्यापासून तो ब्रिटिश मालमत्तेचा नाश केल्याबद्दल, नुकसान भरपाई वसूल करण्यापर्यंत आर्थिक दंड योजना करण्यासही ब्रिटिश सरकारने मागेपुढे पाहतां कामा नये. परंतु कॅबिनेट मिशनने वॅव्हेल यांची ही कडक उपाय

योजण्याचीही सूचना फेटाळून लावली.

वाटाघाटीच्या पहिल्या फेरीत शिष्टमंडळाने प्रांताचे पंतप्रधान आणि विरोधी पक्ष नेते यांच्या मुलाखती घेतल्या. आसामचे पंतप्रधान गोपीनाथ बारडोलाय यांनी सिल्हेट जिल्हा आसामपासून अलग करण्याची तयारी दर्शविली. आसाममध्ये मुसलमान खरोखरीच बहुसंख्य आहेत हा दावा मांडण्यासाठी आकडेवारी सादुल्ला यांनी सादर केली आणि त्या आधारावर संबंध आसाम्य प्रांत पाकिस्तानात समाविष्ट करण्यात आला पाहिजे अशी मागणी केली. (त्यापूर्वी ३ मार्च रोजी जीना यांनी देखील एका जाहीर पत्रकाद्वारे अशीच मागणी केली होती). बलुचिस्तानमधील एका नेत्याने काँग्रेस आणि लीग या दोहोंच्याहीबद्दल सारखीच तिरस्काराची भावना दाखविली आणि बलुचिस्तानचा वेगळा विचार करावा असे बजावले. खिजर हयात खान यांनी पाकिस्तानबद्दल अजिबात आस्था दाखविली नाही आणि काँग्रेसपेक्षा दुसऱ्या एखाद्या अधिक चांगल्या यंत्रणेकडे सत्ता सोपविण्याची शक्यता निर्माण होईपर्यंत ब्रिटिशांनी भारत सोडून जाऊ नये अशी इच्छा व्यक्त केली. मुंबई मध्यप्रांत संयुक्त प्रांत आणि मद्रास या प्रांताच्या विधानसभांतील मुस्लीम लीगच्या नेत्यांनी तारीख ८ एप्रिल रोजी शिष्टमंडळास असे सांगितले की, पाकिस्तान झाले तर हिंदू प्रांतातील मुसलमानांना त्याचा उपयोग होईल. वॅव्हेल यांनी आपल्या दैनंदिनीत यासंबंधी असे नमूद करून ठेवले की, त्यांना सबळ असा कोणताच युक्तिवाद करता आला नाही. फक्त सत्तेचा समतोल, प्रतिष्ठा, मानसिक परिणाम यांसारखे मोघम शब्दप्रयोग वापरून त्यांनी फक्त आपला हिंदूद्वेष भरपूर व्यक्त केला.

तारीख ३ एप्रिल रोजी मौलाना आझाद यांनी शिष्टमंडळापुढे भारतीय महासंघराज्याची एक अभिनव कल्पना मांडली. त्यांची योजना अशी होती की, महासंघराज्याच्या अखत्यारित येणाऱ्या विषयांच्या दोन याद्या बनविण्यात याव्यात.—एक सक्तीची आणि दुसरी ऐच्छिक विषयाची. केंद्राच्या अधिकारांतील विषयांव्यतिरिक्त काही ऐच्छिक विषय आपण होऊन केंद्राकडे सोपविण्यासही काही प्रांत तयार होतील. परंतु शिष्टमंडळाला ही योजना आकर्षक वाटली नाही. प्रांतांना संघराज्यात सामील न होण्याचा हक्क असला पाहीजे हे तात्विकदृष्टया आझादांना मान्य होते तरीदेखील पाकिस्तानला त्यांचा विरोध होता कारण पाकिस्तानातील हिंदू आणि हिंदुस्तानातील मुसलमान हे आपापल्या देशातच परकी नागरिक होतील असे त्यांना वाटत होते. त्यावर क्रिप्स यांनी युक्तिवाद केला की, कायद्याच्या दृष्टीने ही गोष्ट अशक्य आहे परंतु आझाद यांनी आपल्या विधानाच्या समर्थनार्थ जीनांच्या वचनांचाच आधार असल्याचे दाखवून दिले. आझाद यांनी आणखी असे सुचविले होते की, मध्यवर्ती सरकारमधील सभासद सध्याच्या प्रांतिक कायदेमंडळांनीच नियुक्त करून पाठवावेत. त्याच दिवशी गांधींनी शिष्टमंडळाला असे सुचविले की मध्यवर्ती सरकारला जबाबदार राहील असे मंत्रिमंडळ बनविण्यास जीनांनाच सांगण्यात यावे. शिखांच्या शिष्ट-

मंडळाने पंजाबच्या फाळणीची मागणी आग्रहाने पुढे मांडली.

सुरुवातीच्या बोलण्याची फेरी पूर्ण झाल्यानंतर क्रिप्स यांनी तारीख ८ एप्रिल रोजी दोन पर्यायी योजना पुढे मांडल्या. पहिल्या योजनेनुसार हिंदू प्रांत, मुसलमानी प्रांत, आणि संस्थाने अशा तीन गटांचे मिळून एक महासंघराज्य अस्तित्वात यावयाचे होते. त्यांची दुसरी योजना खंडित पाकिस्तानची होती. जी फोलपट म्हणून जीनांनी ती पूर्वीच त्याज्य ठरविली होती. तारीख १६ एप्रिल रोजी शिष्टमंडळातर्फे जीनांना असे समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला की, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, बंगाल आणि पंजाबमधील मुसलमानांची जास्त वसती असलेले जिल्हे आणि आसाम-मधील सिल्हेट जिल्हा एवढ्यांचा समावेश असलेल्या पाकिस्तानची मागणी त्यांनी केली तर ती वाजवी ठरेल. कलकत्ता हे खुले बंदर म्हणून जाहीर करण्यात यावे ही जीनांची मागणीही शिष्टमंडळाने फेटाळून लावली. हिंदू आणि मुसलमान यांची दोन स्वतंत्र महासंघराज्ये निर्माण करून संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि दळणवळण एवढ्याच फक्त बाबींवर नियंत्रण असलेली संयुक्त केंद्र सत्ता राहू देणे हा त्या दोन्ही-पेक्षा अधिक चांगला पर्याय ठरेल असेही शिष्टमंडळाने जीनांना सांगून पाहिले. परंतु हे दोनही पर्याय झिडकारून कोठल्याही स्वरूपातील भारतीय अखंडत्वाला असलेल्या आपल्या विरोधाला जीना चिकटून बसले आणि सहा प्रांताच्या पाकिस्तानची मागणी चालूच ठेवली. पाकिस्तानच्या निर्मितीला काँग्रेसने तत्वतः मान्यता दिल्यानंतरच त्याच्या सरहद्दी निश्चित करण्याचा प्रश्न उपस्थित होईल असेही त्यांनी सांगितले. क्रिप्स यांच्याबरोबर प्रदीर्घ चर्चा केल्यानंतर ता. २६ एप्रिल रोजी वाटाघाटीसाठी आधारभूत पाया म्हणून त्रिस्तरीय घटनेला जीनांनी तात्पुरती मान्यता दिली. दुसऱ्या दिवशी भारत मंत्र्यांनी आझाद आणि जीना यांना एकाच मजकुराची पत्रे पाठवून सर्वसंमत योजनेची शक्यता अजमावून पहाण्यासाठी सिमल्याला होणाऱ्या परिषदेस उपस्थित रहाण्याकरिता चार प्रतिनिधी पाठवावेत असे कळविले. पुढे दिलेल्या मूलभूत तत्त्वांच्या आधारे या योजनेविषयी विचारविनिमय होईल असे त्या पत्रात म्हटले होते.

ब्रिटिश हिंदुस्तानाच्या भावी घटनेची रचना खालीलप्रमाणे राहील:—

परराष्ट्र व्यवहार, संरक्षण आणि दळणवळण ही खाती अखत्यारित असलेले केंद्र सरकार प्रांताचे दोन गट रहातील. मुख्यतः हिंदूंचे प्राबल्य असलेल्या प्रांताचा एक गट आणि मुसलमानांचे प्राबल्य असलेल्या प्रांताचा दुसरा गट. ज्या बाबी दोन्ही गटांनी मिळून संयुक्तपणे हाताळाव्यात अशी प्रांतांची इच्छा असेल त्या बाबी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात येतील. इतर सर्व बाबी आणि सर्व शेष सार्वभौम अधिकार प्रांतिक सरकारच्या अखत्यारीत रहातील.

या भावी व्यवस्थेत आपले स्थान कसे असावे यासंबंधी देशी संस्थानिकांशी वाटाघाटी कराव्या लागतील.

परिषदेच्या निमंत्रणाच्या स्वीकृतीबरोबरच आझाद आणि जीना या दोघांनीही

योजनेबद्दलचा आपला दृष्टीकोन विषद केला होता. २८ एप्रिलच्या आपल्या पत्रात आझाद यांनी केंद्र सरकार हे अधिक समर्थ असावे आणि चलन, सीमाशुल्क, जकात आणि यांच्याशी संबंधित अशा इतर बाबींही त्यांच्या अखत्यारीत असाव्यात असे सुचविले. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, हिंदूंचे किंवा मुसलमानांचे प्राबल्य असलेल्या प्रांताबाबत बरीच संदिग्धता आहे. वायव्य सरहद्द प्रांत, सिंध आणि बलुचिस्तान या तीनच प्रांतात मुसलमानांचे प्राबल्य आहे असे म्हणता येईल. पंजाब आणि बंगाल या दोन प्रांतात मुसलमानांचे जेमतेम बहुमत आहे. धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर प्रांताचे गट पाडणे चूक आहे. आणि प्रत्येक प्रांताला विशिष्ट गटात सामील व्हावयाचे की त्याबाहेर राहावयाचे हे ठरविण्याची मुभा असली पाहिजे शिवाय केंद्र सरकारकडे सोपविलेल्या विषयाखेरीज त्याला आणखी काही विषय हाताळू देण्याची मुभा प्रत्येक प्रांताला असली पाहिजे. कॅबिनेट मिशनने पाठवलेल्या पत्रातील अनेक तात्विक आणि तपशीलाच्या बाबींसंबंधी स्पष्टीकरण आणि खुलासा मिळणे जरूर आहे. यावर जीनांनी आपल्या पत्रात भर दिला होता. त्याचप्रमाणे त्यांनी १९४० मध्ये लाहोरचा ठराव आणि मुस्लीम लीगच्या कायदेमंडळातील सभासदांच्या बैठकीत तीन आठवडयापूर्वी पास केलेला ठराव याकडेही शिष्टमंडळाचे लक्ष वेधले होते. या त्रिपक्षीय परिषदेला उपस्थित रहाण्याचे निमंत्रण स्वीकारणे म्हणजे संकल्पित योजना मान्य करणे असे होत नाही असा खुलासा पॅथिक लॉरेन्स यांनी जीना आणि आझाद या दोघांच्याहीकडे केल्यानंतर सिमला येथे ५ ते १२ मे पर्यंत ही परिषद झाली. शिष्टमंडळातर्फे परिषदेला उपस्थित राहणाऱ्या पक्षांकडे पुढील विषय पत्रिका पाठविण्यात आली होती.

(१) प्रांताचे गट
- (अ) रचना
- (ब) गटाकडील विषय ठरविण्याची पद्धत.
- (ग) गटाच्या संरचनेचे स्वरूप.

(२) संघराज्य
- (अ) केंद्राकडील विषय.
- (ब) केंद्रीय घटनेचे स्वरूप.
- (ड) अर्थव्यवस्था.

(३) घटना बनविण्याची यंत्रणा
- (अ) संरचना.
- (ब) कार्य.
  - (१) केंद्रीय सत्तेच्या संदर्भात.
  - (२) गटांच्या संदर्भात.
  - (३) प्रांतांच्या संदर्भात.

ही विषयपत्रिका महत्त्वपूर्ण होती कारण तिच्यातून दोन्ही पक्षांनी आपापली परस्परविरोधी भूमिका सोडून कामचलाऊ गोष्टीवर त्यांचे ऐक्य घडून यावे अशी शिष्टमंडळाला लागून राहिलेली चिंता व्यक्त होत होती. ब्रिटिशांनी हिंदुस्तानची विभागणी करून ते निघून गेले असा कोणी आपल्यावर ठपका ठेवू नये ही यामागची मजूर सरकारची भावना होती. काँग्रेस भारतीय संघराज्यावर भर देत होती इतकेच नव्हे तर केंद्र सरकार त्यातल्या त्यात समर्थ आणि प्रबळ असावे असाही तिचा आग्रह होता. याउलट जीनांना संघराज्य किंवा मध्यवर्ती सत्ताच नको होती. सहा प्रांतांचे रूपांतर स्वतंत्र आणि सार्वभौम अशा पाकिस्तानात व्हावे अशी त्यांची मागणी होती. क्रिप्स यांनी मांडलेल्या योजनेत हिंदुस्तान आणि पाकिस्तान असे प्रांतांचे सक्तीने गट पाडण्यात यावेत आणि संस्थानिकांच्या अंमलाखालील प्रदेशाचा तिसरा एक गट बनवावा अशी अभिनव कल्पना होती. घटनात्मक सुधारणा संबंधीच्या यापूर्वीच्या प्रत्येक बैठकीत प्रांतांना किती प्रमाणात स्वायत्तता द्यावयाची हा एक महत्त्वाचा मुद्दा असे. तिसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळी इकबाल यांच्या नेतृत्वाखालील मुसलमानांच्या एका गटाने प्रत्येक प्रांत हे स्वतंत्र सार्वभौम राज्य आहे असे जाहीर करावे अशी मागणी केली होती, तर मुसलमानांच्या अन्य शिष्टमंडळांनी केंद्रीय सत्ता शक्य तितकी दुर्बळ ठेवावी आणि स्वायत्त प्रांत अनुमती देतील तेवढ्याच बाबी केंद्राने हाताळाव्यात अशी भूमिका मांडली होती. १९४२ साली क्रिप्स भारतात आले होते त्यावेळी त्यांनी भारताच्या संकल्पित संघराज्यात सामील न होण्याचा प्रांतांचा अधिकार मान्य केला होता. परंतु कसेही करून भारताचे ऐक्य टिकवून धरण्याची चिंता लागून राहिल्यामुळे कॅबिनेट मिशनने यावेळी अगदी उलट भूमिका घेतली. संघराज्यात सामील न होण्याचा प्रांताचा अधिकार तर काढून घेतलाच परंतु प्रत्येक प्रांताने विशिष्ट गटात सामील झालेच पाहिजे आणि केंद्र सरकारच्या अखत्यारीतील अनिवार्य बाबींव्यतिरिक्त आणखी काही विषय गटांकडे सोपविण्यास तयार झालेच पाहिजे असाही पवित्रा घेतला.

मौलाना आझादांशी हस्तांदोलन सुद्धा करण्यास नकार देऊन जीनांनी सिमला परिषदेच्या आरंभीच कटुता निर्माण केली. केंद्र सरकारला कर गोळा करण्याचा कसलाही अधिकार असता कामा नये. तसेच केंद्रीय विधीमंडळही आवश्यक नाही अशी लीग प्रतिनिधींनी भूमिका घेतली. आणि कॅबिनेट शिष्टमंडळाने आमच्यावर मध्यवर्ती कायदेमंडळ लादलेच तर पाकिस्तान गटाला समान प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे अशी जीनांनी पुस्ती जोडली. सक्तीच्या गटांना काँग्रेसने विरोध दर्शविल्याबरोबर जीनांनी असे बजावले की काँग्रेसला अशा तऱ्हेने सक्तीने बनविण्यात येणारे गट मान्य असतील तरच आपण नियोजित केंद्रसत्तेला मान्यता दर्शविण्यास तयार आहोत. जीनांनी अशी मागणी केली होती की पाकिस्तानी गटाला पाच वर्षानंतर फुटून निघण्याचा अधिकार असला पाहिजे. वल्लभभाई पटेलांनी त्यावर फार जोराचा आक्षेप घेतला आणि असे

दाखवून दिले की भारतीय संघराज्याला लीग प्रामाणिकपणे मान्यता देत नसल्याचे यावरून उघड होत आहे. संघराज्याबाबत या परिषदेत एकमत घडून आले नाही तर खंडित पाकिस्तानची शिफारस करण्यावाचून शिष्टमंडळाला अन्य पर्याय उरणार नाही असा वॅव्हेल यांनी जीनांना इशारा दिला. मध्यवर्ती सरकार मध्यवर्ती कायदे मंडळाला जबाबदार असावे ही काँग्रेसची मागणीही शिष्टमंडळाने फेटाळून लावली.

ता. ८ मे रोजी शिष्टमंडळाने आपल्या तडजोडीच्या मसुद्याचा तपशील आणखी विस्ताराने सादर केला. त्यात पुढील गोष्टींचा समावेश होता:

(१) तथाकथित सहा मुस्लीम प्रांतांवर उरलेले हिंदू प्रांत आणि संस्थानी अमलाखालील प्रदेश असे तीन गट सक्तीने बनविण्यात येतील.

(२) नियोजित संघराज्याचे मध्यवर्ती कायदेमंडळ असेल व त्यावर वरील तीन गटांचे समसमान प्रतिनिधी असतील.

(३) भारतीय संघराज्याच्या अखत्यारीत संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, दळण-वळण आणि मूलभूत हक्क असे फक्त चारच विषय रहातील.

(४) घटना समितीवरील सभासदांची निवड प्रांतिक कायदेमंडळे करतील. प्रत्येक प्रांतिक कायदेमंडळ आपल्या संख्येच्या एक-दशांश इतके प्रतिनिधी त्या कायदे-मंडळातील निरनिराळ्या पक्षाच्या सभासद संख्येच्या प्रमाणात घटना समितीवर पाठवील.

(५) ब्रिटिश हिंदुस्तानातून ज्या प्रमाणात प्रतिनिधी घेतले जातील त्याच आधारावर संस्थानी मुलुखातील प्रतिनिधी लोकवस्तीच्या प्रमाणानुसार घेतले जातील.

(६) संघराज्याच्या घटनेत जातीय नकाराधिकाराची तरतूद असेल म्हणजे असे की जातीय प्रश्नाशी निगडित असलेली कोणतीही महत्त्वाची बाब दोनही जमाती-तील बहुसंख्य सभासदांनी मंजूर केल्याशिवाय ती घटनेत अंतर्भूत होऊ शकणार नाही.

(७) घटना अमलात आल्यापासून प्रथम दहावर्षांनंतर आणि त्यानंतर प्रत्येक दहा वर्षांनी कोणत्याही कायदेमंडळाने बहुमताने मागणी केल्यास तिच्यातील कलमांचा फेरविचार करण्याची तरतूद केलेली असेल.

(८) घटना समितीची प्राथमिक बैठक झाल्यानंतर हिंदू प्रांतातील, मुसलमान प्रांतातील आणि संस्थांनी प्रदेशातील प्रतिनिधी अशा तीन गटात तिची विभागणी होईल.

(९) हिंदू आणि मुसलमान प्रांताचे हें प्रतिनिधी स्वतंत्रपणे आपापल्या गटांतील प्रांतासाठी घटना बनवतील आणि त्यांची तशी इच्छा असल्यास आपल्या गटा-साठीही घटना बनवू शकतील. त्याचप्रमाणे त्या गटासाठी कायदेमंडळे आणि स्वतंत्र कार्यकारिणी यांचीही तरतूद करून ठेवतील.

त्याच दिवशी जीनांनी दोन स्वतंत्र घटना समित्यांच्या आपल्या मागणीचा पुनरुच्चार केला. त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या यादीत मूलभूत हक्कांच्या बाबींचा समावेश करण्यावरही आक्षेप घेतला तर दुसऱ्या दिवशी आझादांनी एका पत्राद्वारे सक्तीच्या गटपद्धतीस याचप्रमाणे गटागटांची घटना तयार करण्यास आणि गटासाठी कायदेमंडळे आणि कार्यकारिणी यांची तरतूद करण्यास काँग्रेसचा विरोध असल्याचे पुन्हा एकदा निदर्शनास आणून दिले. आसाम आणि वायव्य सरहद्द प्रांताचा पाकिस्तानी गटात समावेश करण्यासही त्यांनी विरोध दर्शविला. केंद्र सरकारकडे चलन, सीमाशुल्क, नियोजन आणि तत्संबंधीच्या बाबीही सोपविण्यात आल्या पाहिजेत. तसेच घटना कोलमडून पडल्यास किंवा आणीबाणीचा प्रसंग उद्‌भवल्यास जरूर ते उपाय योजण्याचे अधिकारही केंद्राकडे असावेत अशी त्यांनी मागणी केली. स्वतःच्या अखत्यारीत महसूल उभा करण्याचा अधिकार केंद्राला असला पाहिजे असेही आझाद यांचे मत होते आणि शेवटी केंद्रीय सरकारात किंवा कायदेमंडळात तीनही गटांना समानतेचे तत्त्व लागू करण्यास काँग्रेसचा सक्त विरोध असल्याचे त्या पत्रातून कळवले होते. काँग्रेस आणि लीग या दोन पक्षात मतभेद निर्माण झाल्यास ते प्रश्न स्वतंत्र लवादाकडे सोपविण्याची या दोन पक्षांनी तयारी दाखवावी. नेहरूंची सूचनाही जीनांनी नाकारली. अशा तऱ्हेने सिमला परिषदेतून काहीही निष्पन्न न होताच तिचे सूप वाजले. असे होईल असे गृहित धरून कॅबिनेट शिष्टमंडळ आणि व्हाइसरॉय यांनी आपला निवाडा जाहीर करण्याची तयारी अगोदरच सुरू केली होती. तथापि त्यांनी दोन्ही पक्षांना आपापल्या पर्यायी योजनांचे मसुदे सादर करण्यास सांगितले होते.

ता. १२ मार्च रोजी लीगचा म्हणून पुढील मसुदा जीनांनी शिष्टमंडळाकडे पाठवून दिला. हिंदुस्तान आणि पाकिस्तान यांच्या गटांसाठी दोन स्वतंत्र घटना समित्या असाव्यात. त्यांनी प्रथम आपापल्या गटाची आणि प्रांताची घटना तयार करावी आणि नंतर त्या दोन घटनासमित्यांची संयुक्त अधिवेशनात संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि संरक्षण खात्याशी संबंधित इतकेच दळणवळण या समान बाबींचा तपशील ठरवावा.

या दोन घटना समित्यांवर प्रत्येक प्रांतातील लोकसंख्येनुसार निरनिराळ्या जातींना प्रमाणशीर प्रतिनिधीत्व असावे. पाकिस्तान फेडरल गव्हर्नमेंट आणि त्यात समाविष्ट होणारे प्रांत यांची घटना तयार करण्यात आल्यानंतर त्यापैकी कोणत्याही प्रांताला तेथील जनतेची इच्छा अजमावून पाहिल्यावर पाकिस्तानी गटांतून बाहेर पडण्याची मुभा राहील. (या ठिकाणी जीनांनी जनतेचे जे सार्वमत घ्यावयाचे ते केवळ मुसलमानांपुरते मर्यादित ठेवलेले नाही हे वैशिष्ट्यपूर्ण आहे.) मध्यवर्ती कायदेमंडळाचा प्रश्न दोन घटना समित्यांच्या संयुक्त बैठकीवर सोपविण्यात यावा.

संकल्पित भारतीय संघराज्यातील केंद्र सरकारला कोणतेही कर बसविण्याचा अधिकार नसावा आणि त्याच्यासाठी लागणारा पैसा कसा उपलब्ध करावयाचा त्यासंबंधीचा निर्णय दोन घटना समित्यांच्या संयुक्त बैठकीस घेण्यात यावा.

संघराज्याच्या कार्यकारी यंत्रणेत आणि जर कायदेमंडळ झाले तर त्यात पाकिस्तान आणि हिंदुस्तान यांच्या गटांना समसमान प्रतिनिधीत्त्व असावे.

जातीय नकाराधिकार रहावा.

मध्यवर्ती कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ किंवा प्रशासन कोणत्याही वादग्रस्त प्रश्नावर तीन-चतुर्थांश मते मिळाल्याशिवाय निर्णय घेऊ शकणार नाही.

संघराज्यातून विभक्त होण्याचा पाकिस्तान गटाला हक्क असावा. मुस्लीम लीगच्या मसुद्यासंबंधी काँग्रेसने जे टीपण शिष्टमंडळाकडे पाठविले त्यात सक्तीच्या गटनिर्मितीवर तिने आक्षेप घेतला होता. मध्यवर्ती कायदेमंडळाला कर बसविण्याचा अधिकार असला पाहिजे या मागणीचा पुनरुच्चार केला आणि असे म्हटले की, विवाद्य प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी मुस्लीम लीगच्या मसुद्यातली तीन-चतुर्थांश बहुमताची सूचना इतकी अवास्तव आहे की ती अमलात आणली तर कोठलेही सरकार वा कायदेमंडळ मुळी कामच करू शकणार नाही.

ता. १२ मे रोजी काँग्रेसने सादर केलेल्या मसुद्यात यापूर्वी उल्लेखिलेल्या बाबी आणि अधिकार सोपविण्यात आलेल्या समर्थ केंद्रीय सत्तेवर भर देण्यात आला होता. गटांची आणि प्रांताची घटना आधी तयार करून नंतर संघराज्याची घटना तयार करण्याच्याऐवजी अगोदर संघराज्याची घटना तयार करून नंतर प्रांताची व गटाची राज्य घटना बनविली पाहिजे असे काँग्रेसचे मत होते. काँग्रेस एका अटीवर जातीय नकाराधिकार कबूल करावयास तयार होती. आणि ती अट म्हणजे मतभेद निर्माण झाल्यास लवादाची तरतूद असली पाहिजे आणि मतभेदांचा एकादा मुद्दा जातीय दृष्टीने खरोखरी महत्त्वाचा आहे की नाही ते ठरविण्याचा अधिकार एक तर सभापतीला असावा नाहीतर फेडरल कोर्टाने त्याबाबतचा निर्णय द्यावा. काँग्रेसचा शेवटचा मुद्दा असा होता की, ज्या ज्या बाबींवर मतैक्य होऊ शकणार नाही अशी प्रत्येक बाब लवादाकडे सोपविण्यात यावी.

ता. १६ मे रोजी कॅबिनेट मिशनने आपला स्वतःचा मसुदा प्रसिद्ध केला त्याचा सारांश पुढे दिला आहे :

सिमला परिषदेच्या वेळी काँग्रेस आणि लीग यांनी आपल्या भूमिकेस थोडीफार मुरड घातली तरी त्यांच्यात एकमत घडून येऊ शकले नाही. एक लीग वगळता इतर सर्वांना भारताची एकात्मता टिकून रहावी असेच वाटत आहे. परंतु मुसलमानांना मात्र खरोखरीच तीव्रतेने अशी भीती वाटते की त्यामुळे हिंदू बहुमताच्या जोखडाखाली कायमचे जखडले जाऊ. त्यांच्या मनातील ही भावना इतकी प्रबळ आणि खोलवर रूजलेली आहे की केवळ कागदावर त्यांना काही संरक्षक अधिकार

दिल्याने तिचे निराकरण होऊ शकणार नाही. हिंदुस्तानात अंतर्गत शांतता नांदावयाची असेल तर त्यांची संस्कृती, धर्म त्याचप्रमाणे आर्थिक आणि अन्य हितसंबंधांशी निगडित असलेल्या बाबींवर त्यांचे नियंत्रण राहील अशी त्यांची खात्री पटवून दिली पाहिजे.

लीगची संपूर्ण पाकिस्तानची मागणी समर्थनीय ठरत नाही कारण नियोजित पाकिस्तानच्या वायव्य आणि ईशान्य भागातील बिगर मुसलमानांची लोकसंख्या अनुक्रमे ३७ आणि ४८ टक्के इतकी आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या निर्मितीने जातीय अल्पसंख्यांकाची समस्या सुटत नाही. पाकिस्तानच्या समर्थनार्थ जो जो म्हणून युक्तिवाद केला जाईल तो सर्व बिगरमुसलमानी प्रदेश अशा प्रकारच्या पाकिस्तानमधून वगळण्यास पुष्टी देणाराच ठरतो.

खुद्द लीगचा देखील छोट्या पाकिस्तानला विरोधच होता. पंजाब आणि बंगाल प्रांतात बोलली जाणारी समान भाषा, त्यांचा प्रदीर्घ इतिहास आणि परंपरा यामुळे पंजाब किंवा बंगालची फाळणी करणे बरोबर होणार नाही. त्या दोन्ही प्रांतातील जनतेकडून अशा फाळणीला फार मोठ्या प्रमाणावर विरोध होईल. शिवाय पंजाबची फाळणी करावयाची म्हणजे शिखांमध्ये विभागणी करावी लागणार.

प्रशासकीय, आर्थिक आणि लष्करी दृष्टीनेही फाळणीचे समर्थन करता येणार नाही. दळणवळण आणि परिवहन यांचे विघटन हिंदुस्तान आणि पाकिस्तान या दोघांनाही सारखेच घातक ठरणार आहे. आणि सैन्य दलाच्या विभागणीमुळे भारतीय सैन्याच्या आजवरच्या उज्वल परंपरेला आणि उत्कृष्ट प्रतीच्या कार्यक्षमतेवर अत्यंत विपरीत परिणाम घडून येईल. शत्रूला खोलवर आत येऊ देऊ मग त्याला खडे चारण्याचा जो एक युद्ध प्रकार असतो त्यादृष्टीने पाकिस्तानचा भूभाग अपुरा पडेल. शिवाय ब्रिटिश हिंदुस्तानची विभागणी झाली तर स्वतःला त्याच्याशी निगडित करून घेणे हिंदी संस्थानांना फार कठीण होऊन बसेल आणि शेवटचा मुद्दा म्हणजे संकल्पित पाकिस्तानच्या दोन भागात जवळजवळ ७०० मैलांचे अंतर असणार ही भौगोलिक वस्तुस्थिती आहे. आणि त्यामुळे युद्ध असो की शांतता असो, त्या दोन भागातील दळणवळण हे सर्वस्वी हिंदुस्तानच्या सदिच्छेवरच अवलंबून रहाणार.

संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, दळणवळण आणि त्यांच्या जोडीला प्रांत आपण होऊन जे विषय केंद्राकडे सोपवितील त्या सर्वांची जबाबदारी केंद्रीय सत्तेकडे सोपवावी, या काँग्रेसच्या सूचनेचे जसे काही फायदे आहेत तसेच तिच्यात काही दोषही आहेत. सक्तीचे विषय ज्यांच्याकडे असतील ते मंत्री सबंध हिंदुस्तानला जबाबदार रहाणार तर ऐच्छिक विषयांची खाती असलेले मंत्री मात्र ज्या प्रांतांनीं ते विषय केंद्राकडे सुपूर्द केले असतील त्यांनाच तेवढे जबाबदार राहणार. अशी परिस्थिती जर निर्माण झाली तर मध्यवर्ती कायदेमंडळ आणि त्यांचे मंत्रिमंडळ

यांचे कामकाज चालणेच कठीण होऊन बसेल.

सार्वभौम सत्ता अतःपर ब्रिटिश साम्राज्याकडे ठेवता येणार नाही किंवा ती नव्या संघराज्याकडेही सुपूर्द करता येणार नाही. परराष्ट्र व्यवहार, संरक्षण आणि दळणवळण या बाबीं हाताळू शकणारे ब्रिटिश हिंदुस्तान आणि संस्थाने यांचा समावेश असलेले भारताचे एकात्म सरकार असले पाहिजे. त्याचप्रमाणे त्यासाठी लागणारा महसूल उभारण्याचे अधिकारही त्याला असले पाहिजेत.

या संघराज्याचे कायदेमंडळ तसेच त्याचे मंत्रीमंडळही असले पाहिजे व त्यावर ब्रिटिश हिंदुस्तान आणि संस्थाने या दोघांचेही प्रतिनिधी असावयाला हवेत.

कायदे मंडळात एखादा महत्त्वाचा जातीय प्रश्न उपस्थित झाला तर त्याचा निर्णय दोन्ही जमातीतील हजर सभासदांच्या बहुमताशिवाय घेतला जाता कामा नये.

इतर सर्व बाबी आणि शेष अधिकार प्रांतांकडे सुपूर्द करण्यात यावेत.

संघराज्याकडे सोपविण्यात आलेल्या बाबी व्यतिरिक्त इतर सर्व बाबी देशी संस्थानांना आपल्या अखत्यारीत ठेवण्याचा अधिकार राहील.

प्रांताना गट करण्याची त्याचप्रमाणे त्यांचे मंत्रीमंडळ व कायदेमंडळ राहू देण्याची मुभा राहील.

प्रांताकडे सोपविण्यात आलेल्या विषयांपैकी कोणते विषय समान ठेवावयाचे ते ठरविण्याचा अधिकार या गटांचा राहील.

सुरवातीला दहा वर्षांच्या मुदतीनंतर आणि त्यापुढे दर दहा वर्षांनी कोणा-त्याही प्रांतांना आपल्या कायदे मंडळात बहुमताने तसा ठराव पास झाल्यास, घटनेतील कलमांचा फेरविचार करण्याचा अधिकार देणारी तरतूद संघराज्यांच्या आणि गटाच्या घटनेत करण्यात यावी.

मुसलमान, शीख आणि सर्वसाधारण (मुसलमान किंवा शीख याखेरीज इतर सर्व व्यक्ती) अशा तीनच प्रमुख जमाती मान्यताप्राप्त असतील.

प्रत्येक प्रांतिक कायदे मंडळ दहालाख लोकसंख्येला एक या प्रमाणात प्रतिनिधी निवडून देईल. त्याचप्रमाणे प्रत्येक जमातीला आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळण्याची तरतूद राहील. प्रत्येक जमातीला त्या त्या प्रांतासाठी ठरवून दिलेल्या प्रतिनिधींची निवड प्रांतिक कायदे मंडळातील त्या जमातीच्या सभा-सदांकडून केली जाईल.

प्रांतांचे तीन गट पाडण्यात येतील, (अ) मद्रास, मुंबई, संयुक्त प्रांत, बिहार, मध्यप्रांत आणि ओरिसा, (ब) पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत आणि सिंध, आणि (क) बंगाल आणि आसाम, दिल्ली, अजमीर, मारवाड आणि कुर्ग हे चीफ कमिशनरांच्या अखत्यारीतील प्रांत 'अ' गटाला जोडले जातील. बलुचिस्तान 'ब' गटाला जोडला जाईल, 'अ' गटात १६७ सर्वसाधारण आणि २० मुसलमान

तर 'ब' गटातील पंजाब प्रांतात ८ सर्वसाधारण, १६ मुसलमान आणि ४ शीख प्रतिनिधी असतील. वायव्य सरहद्द प्रांतात मात्र फक्त तीन मुसलमान प्रतिनिधी असतील. सिंध प्रांतातील प्रतिनिधींचे प्रमाण ३ मुसलमान आणि एक सर्वसाधारण असे असेल, 'क' गटाच्या बंगाल प्रांतातील प्रतिनिधींची विभागणी २७ सर्व-साधारण आणि ३३ मुसलमान अशी असेल. संस्थानी प्रदेशातील प्रतिनिधी निवड-ण्याची पद्धत अधिक विचारविनिमयानंतर ठरविण्यात येईल, परंतु सर्व संस्थानी प्रदेशाचे मिळून एकूण ९३ सभासद असतील म्हणजे घटना समितीवरील सभा-सदांची एकूण संख्या ३८५ असेल.

अशा तऱ्हेने प्रतिनिधींची निवड करण्यात आल्यानंतर घटना समितीची प्राथमिक बैठक भरेल. ती चर्चा विषयांचा सर्वसाधारण क्रम ठरवील त्याचप्रमाणे नागरिक अल्पसंख्यांक आणि आदिवासी यांचे हक्क आणि वर्जित (Excluded) प्रदेश यासाठी सल्लागार समिती नियुक्त करील.

कोणत्या प्रस्तावामुळे महत्त्वाचा जातीय प्रश्न उपस्थित होतो ते ठरविण्याचा अधिकार घटना समितीच्या अध्यक्षाचा राहील. कोठल्याही एका प्रमुख जमातीच्या बहुसंख्य सभासदांनी मागणी केल्यास, त्यासंबंधीचा निर्णय जाहीर करण्यापूर्वी अध्यक्षाने फेडरल कोर्टाचा सल्ला घेतला पाहिजे.

त्यानंतर अ, ब, आणि क गटातील प्रतिनिधी आपल्या स्वतंत्र बैठका भरवतील व प्रांतिक घटनेसंबंधीचे निर्णय घेतील. त्यांची तशी इच्छा असल्यास ते आपा-पल्या गटाची देखील घटना तयार करू शकतील.

घटनेसंबंधीची सर्वसाधारण यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर कोठल्याही प्रांताला गटातून बाहेर पडण्याचा अधिकार राहील. मात्र हा निर्णय नव्या राज्य घटने-नुसार घेण्यात आलेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर अस्तित्वात येणाऱ्या नव्या कायदे मंडळासच घेता येईल.

व्हाइसरॉय प्रांतिक कायदे मंडळांना आपापल्या प्रतिनिधींची निवडणूक करण्या-बद्दल ताबडतोब आदेश देतील.

दरम्यानच्या काळात व्हाइसरॉय प्रमुख पक्षांचा पाठिंबा असलेले मध्यावधी सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करतील. युद्ध खात्यासकट या सरकारच्या अखत्यारीतील सर्व खाती हिंदी नेत्यांकडे सोपविण्यात येतील.

विविध प्रांतांना अ, ब आणि क अशा तीन गटात सक्रीय समाविष्ट करण्याच्या सूचनेमुळे काँग्रेस आणि मुस्लीम लीग व्यतिरिक्त इतर सर्व पक्ष अत्यंत अस्वस्थ होऊन गेले. आसाम प्रांतात मुसलमान बहुसंख्य नसताना त्यांची मनमानीपणाने तिसऱ्या गटाशी मोट बांधण्यात आली होती. बृहत् पाकिस्तानात आसामचा समावेश कर-ण्यात आला पाहिजे असा जीनांचा आग्रह होता आणि त्यांना खूष करण्यासाठी म्हणूनच केवळ ही तरतूद करण्यात आली होती. सादुल्ला यांनी कॅबिनेट मिशनची

अशी समजूत करून दिली होती की, आसाम हा बहुसंख्य मुस्लीम प्रांत आहे. आतापर्यन्त स्वतंत्र मतदार संघ, मतदानाचा मर्यादित अधिकार आणि आपल्या समाजासाठी विशेषाधिकार हे मुस्लीम राजकारणाचे मुख्य सूत्र राहिलेले होते. गटांची आणि प्रांताची घटना साध्या बहुमताने ठरावयाची असल्याने 'क' गटातील लीगचे प्रतिनिधी आपल्या बहुमताच्या जोरावर मतदानाचा अधिकार, मतदार संघ आणि विशेषाधिकार याबाबत अशी व्यवस्था करून ठेवतील की, तीमुळे आसाममध्ये मुसलमानांचे कायद्यानुसार बहुमत प्रस्थापित व्हावे अशी भीती काँग्रेसकडून व्यक्त केली गेली. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी काँग्रेसने १६ मे च्या निवेदनातील विसंगतीवर बोट ठेवून त्याचा अर्थ लावण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला. त्या निवेदनातील कलम १५ (३) मध्ये असे नमूद करण्यात आले होते की, "संघराज्याकडील विषयांखेरीज (परराष्ट्र व्यवहार, संरक्षण आणि दळणवळण) इतर सर्व बाबी आणि सर्व शेषाधिकार प्रांताच्या अखत्यारीत राहतील, कलम १५ (५) मध्ये असे म्हटले होते की, प्रांतांना आपापले गट करण्याची मुभा राहील. याच्या उलट कलम १९ अन्वये कोठल्याही प्रांताला कोणत्याही गटापासून अलिप्त राहण्याचा आणि स्वतःची घटना बनविण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता. कोणत्याही गटाला बहुमताच्या जोरावर त्या गटाची घटना बनविण्याचा जो अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे कलम १५ (३) आणि (५) अन्वये प्रांतांना बहाल करण्यात आलेली स्वायत्तता काढून घेतली गेली होती.

१६ मे रोजी आकाशवाणीवर केलेल्या भाषणात पेथिक लॉरेन्स यांनी असे सांगितले की, समान विषय हाताळण्यासाठी वेगवेगळे प्रांत गटात सामील होणे पसंत करतील अशी आम्हाला उमेद वाटते. या वाक्यावरून प्रांतांना 'एकत्र येणे पसंत न करण्याची' मुभा असल्याचे स्पष्टपणे ध्वनित होते. त्याच भाषणातील दुसऱ्या एका वाक्यात असे स्पष्टीकरण देण्यात आले होते की, तारीख १६ मे च्या निवेदनात प्रांतांचे सक्तीने गट करण्याची तरतूद असून प्रांतांना त्यात सामील न होण्याची मुभा ठेवण्यात आली आहे. तिचा नव्या प्रांतिक घटनेनुसार पहिल्या निवडणुका होवून गेल्यानंतरच त्यांना लाभ घेता येईल. आणि या प्रांतिक घटना गटांनी तयार करावयाच्या अशीही त्यात तरतूद होती. क्रिप्स यांनी एका पत्रकार परिषदेत सक्तीच्या गटांची योजना करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना असे सांगितले की, तो प्रश्न हाताळण्याचे दोन मार्ग आमच्यापुढे होते. एक म्हणजे सध्याच्याच प्रांतिक सरकारांना एखाद्या गटात सामील होण्याची मुभा ठेवावयाची किंवा दुसरा मार्ग म्हणजे घटना तयार करण्याचे काम पूर्ण झाल्यावर आस्तित्वात येणाऱ्या नव्या सरकारांना घटना नीट पारखून घेतल्यानंतर त्यांना वाटल्यास गटातून बाहेर पडण्याचा अधिकार ठेवावयाचा. यापैकी आम्ही दुसरा पर्याय पसंत केला. त्याची दोन कारणे आहेत, त्यापैकी पहिले कारण असे की, काँग्रेसने प्रांतासंबंधी

एकच संघराज्य असावे अशी सूचना केली होती तिची पूर्तता केल्यासारखे होते. प्रांतासंबंधीची काँग्रेसची सूचना अशी होती की, प्रथम सर्व प्रांतांचा एका संघराज्यात समावेश करण्यात यावा परंतु नंतर नवीन घटना पसंत पडली नाही तर, त्यांना फुटून निघण्याचा अधिकार असावा. आम्हाला असे वाटते की, गटांनाही हे तत्त्व लागू करण्यात यावे.

परंतु क्रिप्स यांचा हा युक्तिवाद सर्वस्वी चुकीचा होता, कारण काँग्रसने विद्यमान कायदे मंडळांना संघराज्याची घटना स्वीकारण्याचा किंवा त्याज्य ठरविण्याचा अधिकार असावा या गोष्टीला मान्यता दिली होती तर १६ मे च्या निवेदनाने हा हक्क अजिबातच काढून घेतला जात होता यावर क्रिप्सने केलेली मल्लिनाथी मोठी विचित्र होती. ते असे म्हणाले की, सध्याची कायदेमंडळे ही जातीय निवाड्यानुसार देण्यात आलेल्या खास अधिकारामुळे सबंध जनतेचे प्रतिनिधीत्व करीत नाहीत. . . त्यामुळे संघराज्यात राहावयाचे की नाही याबाबत त्यांचे मत निर्णायक मानण्यास आम्ही तयार नाही आणि म्हणून आम्ही असे म्हणतो की, नव्या घटनेनुसार पहिली निवडणूक झाल्यानंतर जी कायदेमंडळे अस्तित्वात येतील त्यांना त्या संबंधीचा निर्णय घेऊ द्यावा कारण त्या वेळी मताधिकाराची व्याप्ती निश्चितच वाढलेली असणार त्याचप्रमाणे संघराज्यात राहावयाचे किंवा नाही हा प्रश्नही त्यानिमित्ताने धसास लावून घेता येईल.

कॅबिनेट मिशनच्या मसुद्यात सर्वसाधारण मुसलमान आणि शीख या तीनच जमाती प्रमुख मानल्या गेल्या होत्या, मुसलमान किंवा शीख यांच्या व्यतिरिक्त इतर सर्वांचा समावेश "सर्वसाधारण" जमातीत करण्यात आला होता. कलम 'ब' मध्ये प्रांताच्या किंवा गटाच्या घटनेत जातीय नकाराधिकाराची तरतूद करण्यात आलेली नसल्याने शिखांच्या नंतर असे लक्षात आले की, त्यामुळे आपण संपूर्णपणे मुसलमानांच्या दावणीला बांधले जाऊ आणि म्हणून फक्त दोन प्रमुख जमातींना आणि तो देखील संघराज्याची घटना तयार करतानाच फक्त जातीय नकाराधिकार देणारी कॅबिनेट मिशनची सूचना त्यांनी फेटाळून लावली.

यावर पेथिक लॉरेन्स यांनी असे सांगितले की, खास समिती स्थापन करण्याचा आमचा इरादा असून तिच्या मार्फत अल्पसंख्यांक महत्त्वाची भूमिका बजावू शकतील. मुलभूत, तसेच अल्पसंख्यांक यांचे हक्क कोणते ते ठरविण्याचे आणि योग्य त्या त्या पातळीवर घटनेत त्यांचा अतंर्भाव करण्याची शिफारस करणे हे या समितीचे काम राहील. आपल्या पत्रकार परिषदेत क्रिप्स यांनी यावर पुढीलप्रमाणे वक्तव्य केले.

आणखी एका महत्त्वाच्या तरतुदीकडे मी मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो कारण घटनेच्या बाबतीत अशी तरतूद सहसा कोठे आढळत नाही. लहान लहान अल्पसंख्यांक गट, आदिवासी आणि वर्जित प्रदेश यांचा प्रश्न योग्य रीतीने कसा सोडवता येईल ही आमच्या पुढील अडचण होती. प्रमुख पक्षांतील समतोलाला

धक्का लागू न देता खास अधिकारांच्या द्वारा त्यांना परिणामकारक स्थान प्राप्त करून देण्याची तरतूद घटना तयार करताना करणे शक्य नव्हते त्यांना नाममात्र प्रतिनिधीत्व देता आले असते परंतु त्यांच्या दृष्टीने ते निरुपयोगी ठरले असते, म्हणून आम्ही असे ठरविले की, अल्पसंख्यांकांचा प्रश्न दुहेरी रीतीने सोडवायचा म्हणजे असे की, मुस्लीम प्रांतातील हिंदू किंवा हिंदू प्रांतातील मुसलमान त्याच-प्रमाणे पंजाबातील शीख आणि अनेक प्रांतातून ज्यांच्या प्रतिनिधींची संख्या बरीच मोठी आहे अशा दलित जमातींना घटना समितीची मुख्य रचना करताना प्रमाणशीर प्रतिनिधीत्व द्यावयाचे परंतु त्याच बरोबर या अल्पसंख्य गटांना आणि त्यातही विशेषतः हिंदी ख्रिश्चन, अँग्लो इंडियन्स त्याचप्रमाणे आदिवासी आणि वर्जित प्रदेशातील प्रतिनिधी या सर्वांना घटनेतील त्यांच्याविषयीच्या तरतुदीच्या बाबतीत आपले म्हणणे प्रभावीपणाने मांडता यावे म्हणून सल्लागार आयोग नेमावा अशीही तरतूद करून ठेवली आहे. मूलभूत हक्क, अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाची कलमे आणि आदिवासींच्या आणि वर्जित प्रदेशातील प्रशासन या-संबंधीच्या सूचना यांची एक यादी तयार करण्याच्या कामी आयोग पुढाकार घेईल. तसेच हा आयोग आपल्या शिफारशी घटना समितीला सादर करील आणि त्यांचा अंतर्भाव कोठे करावयाचा म्हणजे तो संघराज्याच्या गटाच्या किंवा प्रांताच्या घटनेत करावयाचा की, त्यापैकी दोन किंवा अधिक घटनातही तो केला जावा ते घटना समितीला सुचवील.

परंतु यातील चमत्कारिक भाग असा होता की, या कथित आयोगाने ज्या शिफारसी करावयाच्या त्या गटांच्या आणि प्रांताच्या घटनेला अंतिम स्वरूप देण्यात आल्यानंतर करावयाच्या होत्या. निवेदनात हे स्पष्ट करण्यात आले होते की, प्रथम तीनही गटातील प्रतिनिधींची फक्त प्राथमिक बैठक होईल. त्या बैठकीत कार्यक्रमाचा सर्व-साधारण क्रम ठरविणे, अध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांची निवड करणे आणि नागरिक, अल्पसंख्यांक आणि आदिवासी व निर्बंधित प्रदेश यांच्या संबंधीचे हक्क निश्चित करण्यासाठी समिती नियुक्त करणे एवढेच फक्त कामकाज होईल.* परंतु या समितीचे काम रीतसर सुरू होण्याच्याही आधी गटांच्या स्वतंत्र बैठका भरून त्यात गटांच्या आणि प्रांताच्या घटना तयार करण्याच्या कामास सुरवातही झालेली असणार, त्यामुळे सल्लागार समितीच्या शिफारशींचा गटाच्या घटनेत समावेश होईलच असे खात्रीपूर्वक सांगता येणार नव्हते. आणखी एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे केवळ लीगच्या आग्रहाखातर कॅबिनेट मिशनने मूलभूत हक्काची बाब संघराज्याच्या अखत्यारीतून काढून टाकली होती त्यामुळे ब आणि क या गटांना सल्लागार समितीच्या शिफारशींपैकी आपल्याला सोयीच्या वाटतील तेवढ्यांचा घटनेत

*क्रिप्स ज्या सल्लागार आयोगाचा उल्लेख करीत होते त्याला घोषणेत फक्त समिती असे नाव दिलेले होते ; आयोग हा शब्द वापरलेला नव्हता.

समावेश करण्याची आणि त्यांची अंमलबजावणी होते की नाही ते पहाण्याचे अधिकार-ही स्वतःकडेच ठेवण्याची आयतीच संधी मिळणार होती.

मर्यादित मताधिकारामुळे प्रांतिक कायदेमंडळे जनतेचे खरेखुरे प्रतिनिधीत्व करू शकत नाहीत या कारणास्तव गटात रहावयाचे की नाही हे ठरविण्याचा अधिकार प्रांतांना देण्यास कॅबिनेट मिशनवरील तीन समाजवादी सभासद तयार नव्हते. परंतु संस्थानिकांना मात्र घटना समितीवर आपले प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार बहाल करण्यात यावा अशी त्यांची शिफारस होती. क्रिप्स यांनी असा खुलासा केला की, नवी घटना अमलात आल्यानंतर संस्थानिकांचे सार्वभौमत्वाचे अधिकार चालू राहू शकणार नाहीत. त्याचप्रमाणे ते दुसऱ्या कोणाकडे सुपूर्दही करता येणार नाहीत. त्यामुळे संस्थानांना संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होईल, परंतु त्यांनी संघराज्यातच राहण्याच्या दृष्टीने वाटाघाटी करण्याची इच्छा प्रदर्शित केली असल्यामुळे ही बाब आम्ही ब्रिटिश हिंदुस्तानातील पक्ष आणि संस्थानिक यांच्यावरच सोपविली आहे. हैद्राबादला संपूर्ण स्वातंत्र्याचा दर्जा मिळावा आणि वऱ्हाड व ब्रिटिशांनी घेतलेले इतर जिल्हे आपल्याला परत मिळावेत अशी निझाम प्रथमपासून मागणी करीत आला होता, याची क्रिप्सला जाणीव नव्हती असे नाही. संस्थानिकांबरोबरच्या वाटाघाटीत मुस्लीम लीग निझामाची स्वातंत्र्याची मागणी निश्चितपणे उचलून धरणार हे उघडच होते. याबाबत जीनांनी संशयाला कसलीही जागा ठेवलेली नव्हती. त्यामुळे कॅबिनेट मिशनची सूचना काँग्रेसपेक्षा मुस्लीम लीगला सहाजिकच जास्त पसंत पडणारी होती. जीनांची 'संपूर्ण पाकिस्तान' स्थापन करण्याची कल्पना कॅबिनेट मिशनने मोडून काढली होती. परंतु कमिशनच्या या सूचनेमुळे जीनांना आता तशी संधी मिळणार होती आणि शिवाय दक्षिणेकडे आणखी एक स्वतंत्र मुस्लीम राज्य निर्माण करणे त्यांना शक्य होणार होते.

आकाशवाणीवरील आपल्या भाषणात पेथिक लॉरेन्स यांनी अशी ग्वाही दिली होती की, त्रिस्तरीय पद्धतीमुळे हिंदुस्तानच्या फाळणीबरोबर येणारे धोके पत्करावे न लागता मुसलमानांना पाकिस्तानचे फायदे मात्र मिळू शकतील. वॅव्हेल यांनी-देखील स्वतंत्रपणे केलेल्या भाषणात याच मुद्यावर भर दिला होता.

त्यांच्या भाषणानंतर चार दिवसांनी कॅबिनेट मिशनच्या या मसुद्यासंबंधींची काँग्रेसची पहिली प्रतिक्रिया एका निवेदनाद्वारे आझादांनी धाडली, त्यात प्रांतांना कोणते स्थान रहाणार यासंबंधी मिशनच्या मुसद्यांत विसंगती कशी आहे ते त्यांनी निदर्शनास आणून दिले, मिशनच्या मसुद्यातील "मूलभूत तरतूद" प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता बहाल करते परंतु पुढे त्यांच्यावर काही बाबतीत सक्ती करण्यात आल्याचे दिसून येते त्यामुळे त्यांच्या त्या स्वायत्ततेचा निश्चितच संकोच होतो.....जी गोष्ट प्रांतांना करावयाची नसेल ती करण्याची त्या प्रांतावर किंवा त्याच्या प्रति-निधीवर सक्ती कशी करता येईल ते स्पष्ट होत नाही. आझादांनी असे निदर्शनास

आणून दिले की, कलम 'ब' अन्वये पंजाब आणि कलम 'क' अन्वये बंगाल या दोन प्रांतांचे गटाची घटना बनवताना वर्चस्व रहाणार यात धोका असा आहे की, अशी घटना बनवताना निवडणुकीसंबंधी जे नियम तयार केले जातील त्यामुळे प्रांताच्या त्या गटातून बाहेर पडण्याच्या अधिकारावरच गदा येऊ शकेल. घटना समिती ही सार्वभौम असली पाहिजे असा काँग्रेसचा दृष्टीकोन असून तिचे जे अंतिम निर्णय असतील ते आपोआपच अमलात येतील असे ती मानते. या बाबतीत आम्ही एकच बंधन मानावयास तयार आहोत आणि ते म्हणजे काही महत्त्वाचे जातीय प्रश्न उद्‌भवले तर त्याबाबतचा निर्णय दोन प्रमुख जमातीपैकी प्रत्येक जमातीच्या प्रतिनिधींनी बहुमताने घेतलेला असला पाहिजे. आझाद यांना तारीख २२ मे रोजी पाठवलेल्या उत्तरात पेथिक लॉरेन्स यांनी असे कळवले की, कमिशनची सबंध योजना एकत्रितपणे विचारात घ्यावयाची असून तिच्यातील गट पद्धती हे तिचे एक खास वशिष्टच आहे त्यांत बदल करावयाचा असेल तर तो दोन पक्षांनी आपापसात तसा निर्णय घेतला तरच करता येईल. मसुद्यात नमूद केलेल्या तत्त्वांच्या आधारे जोपर्यंत घटना समितीचे काम चाललेले असेल तो-पर्यन्त तिच्या अधिकारात हस्तक्षेप करण्याचे किंवा तिने घेतलेल्या निर्णयाबद्दल आक्षेप घेण्याचे सरकारला कारणच पडणार नाही असे त्यांनी काँग्रेसला आश्वासन दिले. तारीख २४ मे रोजी भरलेल्या काँग्रेस वर्किंग कमेटीने एका ठरावान्वये भारताला जगाच्या व्यासपीठावर समर्थपणे आणि प्रतिष्ठेत प्रतिनिधीत्व करू शकेल अशी मजबूत मध्यवर्ती सत्ता असली पाहिजे या आपल्या पूर्वीच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. घटना समितीला एखादा महत्वाचा जातीय प्रश्न उपस्थित झाला तर तेवढा अपवाद वगळता कोणत्याही अवस्थेत घटनेत फेरबदल करण्याचे अधिकार असले पाहिजेत असे मत त्या ठरावात व्यक्त करण्यात आले होते. मसुद्यातील प्रांताचे गट बनविण्याच्या बाबतीतील विसंगतीवर ठरावात नेमके बोट ठेवण्यात आले होते. मध्यवर्ती सरकारचा दर्जा काय राहणार, त्याच्या हाती कोणकोणते अधिकार असणार आणि त्याची जडणघडण कशी असेल तेही अगदी स्पष्ट झाले पाहिजे असा वर्किंग कमिटीने आग्रह धरला. आणि पुढे अशी मागणी केली की, प्रांताप्रमाण संस्थानांचे प्रतिनिधी हेदेखील लोकनियुक्त असले पाहिजेत, तारीख २५ मे रोजी कॅबिनेट मिशनचे एक प्रदीर्घ निवेदन प्रसिद्ध झाले.

या निवेदनात सक्तीच्या गट विभागणीबाबतची तरतूद बदलावयाची असेल तर संबंधित पक्षात मतैक्य झाले पाहिजे हे स्पष्ट करून शिष्टमंडळाने घोषणेच्या १५ व्या परिच्छेदाचा काँग्रेस करीत असलेला अर्थ बरोबर नसल्याचे घोषित केले. एखाद्या गटात सामील व्हावे की नाही याची मुभा प्रांतांना लगेच मिळणार नाही. शिष्ट-मंडळाने सुचविलेली गटविभागणी हे योजनेचे खास वैशिष्टच असून गटाबाहेर पड-ण्याचा अधिकार नव्या घटनेनुसार मताधिकाराची व्याप्ती वाढणार असल्यामुळे

आम जनतेलाच मिळणार आहे. नव्या निवडणुकीत गटात राह्यचे की नाही हा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणून उभा राहील हे उघडच असल्याचे निवेदनात सांगण्यात आले. दैनंदिन कारभारात ब्रिटिश सरकार तात्पुरत्या हिंदी सरकारला जास्तीत जास्त मोकळीक देईल अशी ग्वाही देण्यात आली. ब्रिटिश सैन्य काढून घेण्याची कॉंग्रेसची मागणी मात्र नाकारण्यात आली.

सिमला परिषदेला मुस्लीम लीगचे प्रतिनिधी म्हणून जीनांच्या बरोबर हजर असलेले नबाब महंमद इस्माइल खान, नबाबजादा लियाकत अली खान आणि सरदार अबदुर रब निश्तार यांनी तारीख १६ मे रोजी कॅबिनेट मिशनची भेट घेतली आणि "क" गटांत समाविष्ट करण्यात आलेले बंगाल आणि आसाम हे प्रांत "ब" गटात आपला अंतर्भाव करून घेऊ शकतील की नाही त्याचप्रमाणे काही कालावधीनंतर फुटून निघण्याची लीगची मागणी कॅबिनेट मिशन मान्य करणार नाही यासंबंधी त्यांनी खुलासा विचारला.

तारीख २२ मे रोजी केलेल्या निवेदनात जीनांनी असे म्हटले आहे की, पाकिस्तानी गट म्हणून ('ब' व 'क' गटातले) सहा प्रांत एकत्र करण्यात आले, तर परराष्ट्रीय व्यवहार, संरक्षण आणि दळणवळण या तीन बाबींपुरतेच मर्यादित असलेले संघराज्य किंवा महासंघराज्य निर्माण करण्याच्या योजनेचा विचार करण्यास मुस्लीम लीग तयार होईल. परंतु सहा प्रांतांचा समावेश असलेल्या सार्वभौम पाकिस्तानची लीगची मागणी फेटाळून लावल्याबद्दल जीनांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. मात्र केवळ कागदोपत्री अशा संरक्षणाबाबत मुसलमानांच्या मनात अत्यंत तीव्र अशी विरोधी भावना आहे त्याचप्रमाणे सर्वस्वी एकात्म स्वरूपाच्या हिंदुस्तानात त्यांना घालण्यात आले तर आपली संस्कृती, तसेच आपले राजकीय आणि सामाजिक जीवन यांचा अंत होऊन जाईल अशी मुसलमानांस धास्ती वाटते याची कॅबिनेट मिशनच्या सभासदांना जाणीव झालेली आहे. याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तथापि (१) संघराज्याचे स्वतंत्र कायदे मंडळ नसावे. (२) संघराज्यात त्याचप्रमाणे कायदेमंडळ आणि मंत्रिमंडळ अशा प्रत्येक ठिकाणी हिंदु गट आणि मुस्लीम गट यांच्या प्रतिनिधीत्त्वाबाबत समानतेचे तत्व लागू करण्यात यावे. (३) कायदेमंडळ, मंत्रिमंडळ आणि प्रशासन यापैकी कोठल्याही पातळीवर एखाद्या विवाद्य प्रश्नावर निर्णय घ्यावयाचा असेल तर तो तीन-चतुर्थांश बहुमत असल्याशिवाय घेता कामा नये. (४) पाकिस्तानी गटाला सुरवातीच्या दहा वर्षांच्या कालावधीनंतर संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार असावा या मुस्लीम लीगच्या इतर काही मागण्या मिशनने फेटाळून लावल्याबद्दलही जीनांनी खेद प्रदर्शित केला. एखादा प्रश्न जातीय दृष्टीने महत्त्वाचा आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार फक्त घटना समितीच्या अध्यक्षाकडेच सुपूर्द करण्यात येणार असल्यामुळे जातीय प्रश्नावरील नकाराधिकार निरुपयोगीच ठरेल अशी तक्रार करून जीनांनी अल्पसंख्यांकांसाठी

नेमण्यात यावयाच्या सल्लागार समितीलाही विरोध दर्शविला कारण या संदर्भात या समितीच्या शिफारशींचा अंतर्भाव घटनेत करावयाचा किंवा नाही ते घटना समिती बहुमतानेच ठरविणार त्यामुळे आणखी काही बाबी संघराज्याच्या सरकारकडे सुपूर्द करण्याचा मार्ग मोकळा होईल आणि संघराज्य हे फक्त तीन विषयापुरतेच सीमित ठेवावे हे मूलभूत तत्त्वच पायदळी तुडविले जाईल.

तारीख २५ मे रोजी पेथिक लॉरेन्स यांना पाठवलेल्या पत्रात मास्टर तारासिंग यांनी अशी तक्रार केली की, शिखांचे भवितव्य सर्वस्वी मुसलमानांच्या मर्जीवर सोपवून देण्यात आले आहे. हिंदू बहुमताच्या सत्तेला आपण कायमचे जखडले जाऊ अशी मुसलमानांना अगदी मनापासून तीव्र चिंता वाटते हे त्याप्रमाणे कॅबिनेट मिशनला पटले आहे. त्याप्रमाणेच आपल्याला कायम मुसलमानांच्या जोखंडाखाली रहावे लागेल अशी शिखांनाही भीती वाटते हे देखील कॅबिनेट मिशनने मान्य करावयास हवे होते. मास्टर तारासिंग यांनी आपल्या त्या पत्रांत शिखांच्या संदर्भात तीन प्रश्न उपस्थित केले होते. (१) शीख समाजाला प्रमुख जमातीपैकी एक म्हणून मान्यता देण्यामागील हेतू काय? (२) समजा 'ब' गटाने बहुमताने कलम १९ (५) अन्वये घटना बनविली परंतु शिखांना ती मान्य नसली तर त्यामुळे पेचप्रसंग निर्माण झाला असे समजण्यात येईल की, शीख सभासदांचा विरोध म्हणजे ते त्या निर्णयाशी सहमत नाहीत एवढाच त्याचा अर्थ करण्यात येईल? आणि (३) कलम १५ (२) आणि कलम १९ (७) अन्वये मुसलमानांना आणि हिंदूंना जो अधिकार देण्यात येणार आहे तो शिखांनाही मिळेल अशी आशा करण्यास काही जागा आहे काय?

पेथिक लॉरेन्स यांनी मास्टर तारासिंग यांना तारीख १ जून रोजी उत्तर पाठवले त्यांत त्यांनी असे स्पष्ट केले की, शिखांना वाटणाऱ्या चिंतेकडे कॅबिनेट मिशनचे संपूर्ण लक्ष आहे. पेथिक लॉरेन्स यांनी त्या पत्रात लिहिले होते की, हिंदुस्तानची दोन सार्वभौम राष्ट्रात फाळणी करणे किंवा पंजाबची फाळणी करणे यापैकी कोणताही निर्णय शिखांना आज प्रत्यक्षात जी योजना कायम करण्यात येत आहे त्यापेक्षा अधिक अप्रिय वाटला असता हे तुम्ही देखील मान्य कराल अशी माझी खात्री आहे.. घटना समिती किंवा पंजाबमध्ये यापुढे अधिकारावर येणारे कोणतेही सरकार शिखांचे त्या प्रांतात जे खास स्थान आहे ते नजरेआड करू शकेल हे सर्वस्वी असंभवनीय आहे. तारीख ४ जून रोजी भरलेल्या ऑल इंडिया शीख लीगने प्रांताचे गट बनविल्यामुळे भारतीय संघराज्यातील एक स्वतंत्र घटक म्हणून पंजाबला काही स्थानच उरणार नाही या कारणास्तव व त्या योजनेचा धिक्कार केला आणि तिच्या अल्पसंख्यांकाचे विशेषत: शिखांचे स्थान जबरदस्त धोक्यात येईल अशी भीती व्यक्त केली. त्या ठरावात पुढे असे नमूद करण्यात आले होते की, केंद्रात आणि प्रांतात संयुक्त मतदार संघ अस्तित्वात आणून अल्पसंख्यांकांना राखीव जागांची तरतूद करून ठेवण्यात आली तरच जातीयवाद नष्ट होऊ शकेल. तारीख ९ जून रोजी

अमृतसर येथे भरलेल्या ऑल पार्टी व शीख कॉन्फरन्सनेही कॅबिनेट मिशनची योजना फेटाळून लावली. त्या योजनेविरूद्ध लढा सुरू करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली. तारीख २२ जून रोजी पुन्हा एकदा ऑल पार्टी शीख कॉन्फरन्सची बैठक भरली होती. त्या बैठकीत सरदार बलदेवसिंग यांना मध्यवर्ती सरकारात सहभागी न होण्याचा आदेश देण्यात आला.

वायव्य सरहद्द प्रांत आणि आसाम या दोन प्रांतांच्या सरकारांनी आपण अनुक्रमे 'ब' आणि 'क' गटात सामील होण्यास तयार नसल्याचे कॅबिनेट मिशनला कळविले. काँग्रेस आणि लीग यांनीही कॅबिनेट मिशनच्या योजनेबद्दल फारसा उत्साह दाखवला नव्हता. अशा अवस्थेत वाटाघाटी असफल ठरल्या तर त्यामुळे कोणती परिस्थिती निर्माण होईल त्याची कॅबिनेट मिशन आणि ब्रिटिश सरकार यांना जाणीव करून देण्यासाठी वॅव्हेल यांनी तारीख ३० मे रोजी एक टीपण तयार केले. त्यात त्यांनी असे सुचविले होते की, पुढाऱ्यांचे मन वळविण्याचा आणखी एक प्रयत्न करून पहावा. मुस्लीम लीगला याची जाणीव करून देण्यात यावी की, हिंदूंचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या कामी काँग्रेसला सहाय्य करण्याचा ब्रिटिश सरकारचा अजिबात हेतू नाही. परंतु त्याचबरोबर संपूर्ण पाकिस्तानची निर्मिती करून घेण्यासाठी मुस्लीम लीगला मदत करण्यातही त्याला रस नाही. मुस्लीम लीगने कितीही अडथळे आणले तरी भारताला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे हे स्पष्ट करण्यात यावे. त्याचप्रमाणे काँग्रेस पुढाऱ्यांच्याही हे नजरेस आणून द्यावे की, ज्या प्रांतांची हिंदुस्तानात राहण्याची इच्छा नसेल त्यांच्यावर तशी सक्ती केली जाणार नाही असे त्यांनीच पूर्वी जाहीर केलेले आहे काँग्रेसने मध्यवर्ती सरकारात सहभागी होण्याचे नाकारले आणि लीगने तशी तयारी दर्शविली तरी एकट्या मुस्लीम लीगला घेऊन ते बनवणे व्यवहार्य होणार नाही. त्या परिस्थितीत वायव्य सरहद्द प्रांत आणि आसाम या प्रांतातील प्रतिनिधींनी येण्याचे नाकारले तरीही 'ब' आणि 'क' गटाची घटना तयार करण्याच्या कामास लागण्याची मुसलमानांना मुभा देण्यात यावी. तसेच ऊर्वरित हिंदुस्तानातील प्रांतांना 'अ' गटाची त्याचप्रमाणे आपापल्या प्रांताची घटना बनविण्याचे काम सुरू करण्यास सांगण्यात यावे. तारीख ३ जून रोजी वॅव्हेल यांनी आपले हे टीपण ब्रिटिश मंत्रिमंडळाकडे पाठवून दिले आणि असे कळविले की, काँग्रेसने कॅबिनेट मिशनची योजना फेटाळून लावली तर 'अ' गटातील प्रांतांना स्वातंत्र्य देऊन टाकण्यात यावे आणि मुसलमानांना स्वत:ची घटना तयार करण्याच्या कामी मदत करण्यासाठी म्हणून 'सहा' मुस्लीम प्रांतापुरते ब्रिटिशांनी आपले नियंत्रण ठेवावे.

## प्रकरण २४

### भंगलेले स्वप्न

दिल्लीत मुक्काम करून असलेल्या कॅबिनेट मिशनला आणि लंडनमधील ब्रिटिश मंत्रिमंडळाला वॅव्हेलने मध्यवर्ती सरकारात सामील होण्याचे नाकारले तर काय करावे यासंबंधीच्या आपल्या सूचना कळविल्या होत्या हे वर येऊन गेलेच आहे. त्याप्रमाणे त्यांनी मध्यावधी सरकारची जुळवाजुळव करण्यास सुरवात केली.

तारीख १३ मे रोजी यासंबंधीची बोलणी सुरू झाली त्यावेळी वॅव्हेलनी जीनांना असे सांगितले की, लीगचे पाच, अनुसूचित जातीचा एक धरून कॉंग्रेसचे पाच, शिखांचा एक आणि इतर अल्पसंख्य जमातीचा एक प्रतिनिधी घेऊन मध्यावधी सरकार बनवावे असे आपल्या मनात आहे. ही रचना लीगच्या दृष्टीने इतकी फायदेशीर आहे की, त्यांच्याकडून (जीनांकडून) ती नाकारली जाण्याचे काहीच कारण दिसत नाही. परंतु जीनांनी अशी भीती व्यक्त केली की, सरकारवर कॉंग्रेस आपले नियंत्रण बसविण्याचा प्रयत्न करील आणि दीर्घ मुदतीच्या ज्या समस्या आहेत त्या तशाच लोंबकळत ठेवील, तर १४ मे रोजी नेहरूंनी वॅव्हेल यांच्या कॉंग्रेस आणि लीगला समान प्रतिनिधीत्व देण्याच्या कल्पनेवर आक्षेप घेतला तर तारीख २० मे रोजी वॅव्हेल यांना लिहिलेल्या पत्रात गांधींनी असे सुचविले की, निरनिराळ्या पक्षांना समान प्रतिनिधीत्व देण्याच्या प्रश्नावर घोळ घालीत बसून कालहरण करण्यापेक्षा त्यांनी देशातील सर्वोत्कृष्ट आणि अत्यंत सचोटीची माणसे निवडून त्यांच्यामधून मध्यावधी सरकार बनवावे. तारीख २४ मे रोजी भरलेल्या कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत एका ठरावान्वये अशी मागणी करण्यात आली की, व्हाइसरॉय जे मध्यावधी सरकार बनवणार आहेत त्याचे स्वरूप मंत्रिमंडळासारखे असावे आणि ते मध्यवर्ती कायदे मंडळाला जबाबदार असावे त्यानंतर दोन दिवसांनी वॅव्हेल यांनी नेहरूंना असे सांगितले की, कॉंग्रेसच्या मागणीचा अर्थ जवळजवळ असाच होतो की, सरकारने देशाचा संपूर्ण कारभार अशा एका पक्षाच्या हाती सोपवावा की, ज्याच्याबद्दल मुसलमानांच्या आणि संस्थानिकांच्या मनात कमालीचा अविश्वास वसत आला आहे. तारीख २६ मे रोजी नेहरूंबरोबर झालेल्या बोलण्याच्या वेळी वॅव्हेल यांनी असा आरोप केला की, कॉंग्रेसला प्रथम ब्रिटिशांचे वर्चस्व नष्ट करून कालांतराने मुसलमान आणि संस्थाने यांनाही चिरडून टाकावयाचे आहे. म्हणून एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये किंवा मध्यवर्ती कायदेमंडळात आपली अवस्था हिंदू बहुमताच्या दावणीला बांधल्यासारखी होणार नाही असा मुसलमानांना

विश्वास वाटावा यासाठी ब्रिटिश सरकारचा संयुक्त सरकार स्थापन करण्यावर कटाक्ष आहे असे वॅव्हेल यांनी समान प्रतिनिधीत्वाची तरफदारी करताना सांगितले. मध्यावधी सरकारला कारभाराच्या बाबतीत कितपत स्वातंत्र्य राहील या प्रश्नासंबंधी वॅव्हेल यांनी असे आश्वासन दिले की, आपण नवे मध्यावधी सरकार हे वसाहतीच्या सरकारच्या दर्जाचे आहे असे मानून त्याच्याशी तसेच वर्तन ठेवू. परंतु लीग आणि काँग्रेस यांना समान प्रतिनिधीत्व देण्यास विरोध करण्याची काँग्रेसची भूमिका ठाम होती.

लीगच्या वर्किंग कमेटीची बैठक सुरू होण्यापूर्वी तारीख ३ जून रोजी जीनांनी वॅव्हेल यांची भेट घेतली आणि त्यांना असा सवाल केला की, काँग्रेसने तारीख १६ मे चा मसुदा धुडकावून लावला परंतु लीगने त्याला मान्यता देऊन मध्यावधी सरकारात सामील होण्यास मान्यता दिली तर सरकारची भूमिका काय राहील? त्यावर वॅव्हेल यांनी असे उत्तर दिले की, जो पक्ष सहभागी होण्यास तयार असेल त्याला बरोबर घेऊन योजना राबवावयाचीच असा आमचा मानस आहे.

दुसऱ्या दिवशी वॅव्हेलनी जीनांना लेखी उत्तर पाठवून आदल्या दिवशीच्या आश्वासनाचा पुनरुच्चार केला मात्र त्या आश्वासनाची कोठे वाच्यता न करण्याची त्यांनी जीनांना विनंती केली आणि त्यातूनही वर्किंग कमिटीला त्याची कल्पना दिलीच पाहिजे असे त्यांना वाटत असेल तर त्या आश्वासनाबरोबर जी शर्त सांगितली होती तिचीही आपल्या सहकाऱ्यांना कल्पना द्या असे वॅव्हेल यांनी त्या पत्राद्वारे जीनांना सांगून ठेवले होते.

काँग्रेसचे पाच, लीगचे पाच, शिखांचा आणि ख्रिश्चनांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी या आधारावर मध्यवर्ती सरकार बनविण्याच्या दृष्टीने वॅव्हेल यांनी बोलणी सुरू केली. यात सिमला परिषदेतील योजनेला थोडीशी बगल देण्यात येत होती. कारण सिमला परिषदेत मुसलमान आणि उच्चवर्णीय हिंदू यांच्या प्रतिनिधीत समानता राखली जाईल असे अभिप्रेत होते तर वॅव्हेल यांच्या नव्या योजनेनुसार अनुसूचित जातीच्या प्रतिनिधीसकट काँग्रेसचे पाच प्रतिनिधी रहावयाचे असल्याने उच्चवर्णीय हिंदूंच्या प्रतिनिधीत्वाच्या प्रमाणात (आणि ते सर्व बहुधा काँग्रेसचेच असणार) कपात केली जात होती. समान प्रतिनिधीत्वाला काँग्रेस सतत विरोध करीत होती. त्यामुळे काँग्रेस मध्यवर्ती सरकारात सामील होणार नाही आणि १६ मे चा कॅबिनेट मिशनचा मसुदाही ती फेटाळून लावणार त्यामुळे वॅव्हेल यांच्या आश्वासनानुसार मध्यावधी सरकारात लीगचेच प्राधान्य राहणार असल्याने कॅबिनेट मिशनकडून ज्याला नकार मिळत होता ते विशाल पाकिस्तान आपल्याला मिळवून घेता येईल. आणि निझाम आणि इतर मुसलमान संस्थानिकांना आपले स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व घोषित करण्याच्या कामी सहाय्य करण्याची आयतीच संधी आपल्यांला मिळेल असे जीना धरून चालले होते. आपले विश्वासू सहकारी नाझिमुद्दिन यांचे नाव निझामच्या

पंतप्रधान पदासाठी सुचवावयाचे आणि मध्यवर्ती सरकारातील युद्धमंत्रिपद स्वतःकडे घ्यावयाचे असा मनसुबाही त्यांनी रचला होता.*

ता. ३ व ४ जून रोजी भरलेल्या लीग वर्किंग कमेटीच्या बैठकीत कॅबिनेट मिशनची योजना स्वीकारावयाची असा तात्पुरता निर्णय घेण्यात आला परंतु तो जाहीर मात्र करण्यात आला नाही. ता. ५ व ६ जून रोजी लीगच्या कौन्सिलची बैठक झाली तेथे केलेल्या भाषणात विशाल पाकिस्तानची मागणी फेटाळून लावल्याबद्दल जीनांनी कॅबिनेट मिशनवर कडाडून हल्ला चढवला.

कॅबिनेट मिशन करीत असलेली ती सर्वात मोठी घोडचूक आहे. . . मी तुम्हाला सांगू इच्छितो की, संपूर्ण, आणि सार्वभौम पाकिस्तान प्राप्त करून घेतल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही ( प्रचंड टाळ्या ). केवळ काँग्रेसला खूष करण्यासाठी आणि तिचा अनुनय करण्यासाठी कॅबिनेट मिशनने वस्तुस्थितीची ओढाताण चालविली आहे. वस्तुतः कॅबिनेट मिशनच्या निवेदनावरूनच पाकिस्तानला पाया आणि अधिष्टान कसे आहे ते दिसून येते. असे असताना कॅबिनेट मिशनने (आपली मागणी नाकारण्यासाठी ) युक्तिवाद पुढे केला आहे, जी कारणे दाखविली आहेत आणि सत्याचा विपर्यास चालवला आहे त्यामागील एकमेव कारण काँग्रेसचा अनुनय करून तिला राजी राखणे हेच काय ते आहे असे मी तुम्हाला पुन्हा खात्रीपूर्वक सांगून ठेवतो ( शेम शेमच्या आरोळ्या ) . . . सहा वर्षांपूर्वी मुसलमानांची परिस्थिती अशी होती की त्यांना पार नामशेष करून टाकता आले असते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मुसलमानांनी फार हालअपेष्टा भोगल्या आहेत. आणि आज-ही ते त्या भोगत आहेत. मला असे म्हणावयाचे आहे की या हालअपेष्टा आता थांबल्या पाहिजेत. पाकिस्तानखेरीज अन्य कोणतेही उद्दिष्ट आपल्या डोळ्यासमोर नाही ( टाळ्या ). आमच्या मार्गात अडथळे आणले जातील परंतु पाकिस्तान प्राप्त करून घेण्यासाठी आम्हाला शक्य असेल ते सर्व केल्याशिवाय आम्ही राहणार नाही. या व्यासपीठावरून मी पुन्हा एकदा बजावून ठेवतो की याबाबत विलंब लावणे हे ब्रिटिशांच्या किंवा हिंदूंच्या कोणत्याच हिताचे ठरणार नाही, त्यांना

---

*वॅव्हेल यांच्या रोजनिशीत ७ जूनला अशी नोंद आहे की, त्यांना (जीना) संरक्षण खाते हवे होते. आणि परराष्ट्र, व्यवहार आणि नियोजन खाती आपल्या दोन अनुयायांना मिळावीत असे त्यांना वाटत होते. त्याच रोजनिशीत १८ जून रोजी त्यांनी असे नमूद करून ठेवले आहे की, 'खातेवाटणीबाबत जीना फार जागरूक होते. आणि आपण स्वतः ( मध्यवर्ती सरकारात ) आलो नाही तरी संरक्षण खाते एकाद्या मुसलमानाकडे सोपविले जाईल असे आश्वासन त्यांना हवे होते. . . नाझिमुद्दिन यांना मी सरकारात घ्यावे याला त्यांचा विरोध होता कारण त्यांना दिवाण करावे अशी सूचना ते निझामाला करणार या प्रश्नावर आमची प्रदीर्घ चर्चा झाली. मी त्यांना सांगितले, नाझिमुद्दिन यांना मुकावे लागले तर मला फार खेद होईल.

स्वातंत्र्याचा कळवळा असेल. हिंदुस्तानची परदास्यातून मुक्तता व्हावी आणि आपण स्वतंत्र व्हावे असे त्यांना मनापासून वाटत असेल तर पाकिस्तान निर्मितीला संमती देणे हाच त्यावर एक खात्रीचा मार्ग आहे याची त्यांना जितक्या लवकर जाणीव होईल तितके त्यांच्या दृष्टीने चांगले. बऱ्या बोलाने तुम्ही पाकिस्तानला मान्यता देऊन टाका नाहीतर तुमच्या विरोधाला न जुमानता आम्ही ते मिळवूच मिळवू (हियर हियर) त्यासाठी कोणती पद्धत अवलंबावयाची, कोणती साधने वापरावयाची ते त्या त्या वेळेच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. ... मी तुम्हाला क्रिप्स योजना फेटाळून लावण्याचा सल्ला दिला होता. नुकत्याच झालेल्या सिमला परिषदेच्या मसुद्याबद्दलही मी तुम्हाला तसाच सल्ला दिला होता. परंतु ब्रिटिश कॅबिनेटच्या योजनेच्या बाबतीत मात्र मी तुम्हाला तसा सल्ला देऊ शकत नाही. ती योजना स्वीकारावी असे माझे तुम्हाला सांगणे आहे. ... मुसलमानांनी आपली मागणी मांडली ती लगेचच्या लगेच मान्य होईलच असा लाहोरच्या ठरावाचा अर्थ होत नाही. त्यासाठी आपल्याला दीर्घकाळपर्यंत फार मोठा लढा द्यावा लागणार आहे. लीगचे प्रातिनिधिक स्वरूप मान्य करून घेणे हा त्या लढ्याचा पहिला टप्पा होता. तो आपण सुरु केला आणि जिंकला. कॅबिनेट मिशनची योजना आपण स्वीकारली म्हणजे आपला पाकिस्तानचा लढा संपला असे होत नाही. पाकिस्तान मिळेपर्यंत तो चालूच राहील ... आपल्या इच्छेविरुद्ध काही निर्णय घेण्यात आले तर घटना समितीत आपण पेचप्रसंग निर्माण करू. आपल्या उद्दिष्टांसाठी आपण घटना समितीतूनही लढा चालू ठेवू..... संरक्षण, दळणवळण आणि परराष्ट्र व्यवहार याव्यतिरिक्त इतर सर्व बाबी गटांच्या अधिकारात असल्या पाहिजेत.

संरक्षण खाते स्वतःकडे घ्यावयाचे असे जीनांनी ठरवून टाकले होते. त्यामुळे कौन्सिलच्या सभासदांच्या मनातील भीती काढून टाकण्यासाठी जीनांनी त्यांना असे आश्वासन दिले की, जोपर्यंत नवी राज्यघटना अंमलात येत नाही तोपर्यंत संरक्षण खाते ब्रिटिशांच्याच हाती रहाणार आहे. त्यामुळे त्यासंबंधी आताच चिंता करीत बसण्याचे कारण नाही. ता. ६ जून रोजी लीग कौन्सिलने संपूर्ण आणि सार्वभौम पाकिस्तानची मागणी अमान्य केल्याबद्दल कॅबिनेट मिशनवर टीका करणाऱ्या ठरावात मुसलमानांच्या पाकिस्तानच्या ध्येयाचा पुढीलप्रमाणे पुनरुच्चार करण्यात आला.

संपूर्ण सार्वभौम पाकिस्तान हस्तगत करून घेणे हे आजही भारतातील मुसलमानांचे उद्दिष्ट असून त्यात कालत्रयीही बदल होणार नाही. आणि हे ध्येय साध्य करून घेण्यासाठी ते शक्य त्या सर्व साधनांचा वापर करण्यास आणि त्यासाठी वाटेल तो त्याग करण्यास किंवा हाल अपेष्टा भोगण्यास मागेपुढे पहाणार नाहीत. याविषयी कोणाच्याही मनात शंकेला कसलीही जागा राहू नये. म्हणून अखिल भारतीय मुस्लीम लीगच्या कौन्सिलची ही बैठक याचा पुनरुच्चार करीत आहे.

कॅबिनेट मिशनची योजना स्वीकारण्याचे समर्थन करण्यासाठी त्या ठरावात अनेक

कारणे पुढे करण्यात आली होती.

कॅबिनेट मिशनच्या निवेदनाच्या सरनाम्यात असमंजसपणाचे शब्द वापरून मुसलमानांच्या भावनांचा अधिक्षेप करण्यात आलेला असला तरीही देशापुढील समस्यांचे गंभीर स्वरूप लक्षात घेता आणि भारतातील घटनेसंबंधीचा प्रश्न शक्यतोवर शांततेच्या मार्गाने सुटावा अशा तीव्र इच्छेने त्याचप्रमाणे मुसलमानांच्या सहाही प्रांतांना सक्तीने 'ब' आणि 'क' गटात समाविष्ट करण्याच्या कॅबिनेट मिशनच्या योजनेतील तरतुदीमुळे पाकिस्तानच्या मागणीमागील पाया किंवा अधिष्ठान हे गृहीतच धरले आहे हेही डोळ्यापुढे ठेवून मिशनने आपल्या योजनेत दिग्दर्शित केलेल्या घटना बनविण्याच्या यंत्रणेशी सहकार्य करण्याची मुस्लीम लीग तयारी दर्शवीत आहे. मात्र त्याचबरोबर याची परिणती अंती संपूर्ण सार्वभौम पाकिस्तान अस्तित्वात येईल आणि त्यायोगे या विस्तीर्ण उपखंडातील दोन प्रमुख राष्ट्रे त्याचप्रमाणे इतर सर्व रहिवासी यांची स्वातंत्र्याकांक्षा फलद्रुप होईल, अशी आशा ती व्यक्त करीत आहे.

तथापि ही योजना केवळ तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात येत आहे असे बजावून त्या ठरावात पुढे असे म्हटले होते की,

घटना समितीच्या कामकाजातून काय निष्पन्न होते आणि तिन्ही गटांच्या संयुक्त आणि वेगवेगळ्या बैठकीतील चर्चेतून घटनेचा अंतिम मसुदा कोणता आकार घेतो त्यावरच मुस्लीम लीग याबाबत शेवटी कोणती भूमिका घेणार ते अवलंबून राहील. घटना तयार करण्यासाठी निर्माण केलेली कोणतीही यंत्रणा किंवा घटना समिती याठिकाणी चर्चा चालू असताना किंवा नंतर जरूर पडल्यास या ठरावात दिग्दर्शित करण्यात आलेले धोरण आणि भूमिका यांचा फेरविचार करण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा अधिकार मुस्लीम लीग राखून ठेवीत आहे.

ता. १६ मेच्या कॅबिनेट मिशनच्या निवेदनावर आधारलेला भारतीय संघ राज्याला मान्यता देणारा जो ठराव मुस्लीम लीगने केला त्याच्याइतका धडधडीत अप्रामाणिकपणाचा ठराव दुसरा कोणताही असू शकणार नाही. एप्रिल महिन्यात भरलेली कायदेमंडळातील सर्व मुसलमान सभासदांची आणि ता. ५ व ६ जूनची मुस्लीम लीगच्या कौन्सिलची बैठक यामध्ये झालेल्या चर्चेवरून हे स्पष्ट झाले होते की, लीगने आपली फाळणीची मागणी सोडून दिलेली नव्हती. इतकेच नव्हे तर विशाल पाकिस्तान प्राप्त करून घेण्यासाठी कॅबिनेट मिशनच्या निवेदनाचा एक साधन म्हणून उपयोग करून घ्यावा अशीच लीगची धारणा होती. मिशनच्या योजनेनुसार संस्थाने स्वतंत्र राहू शकणार होती आणि मध्यवर्ती सरकारवर जीनांना एकदा आपले संपूर्ण नियंत्रण बसवता आले असते म्हणजे हैद्राबाद आणि इतर मुस्लीम संस्थानांचेही सार्वभौमत्व त्यांना कायम राखता आले असते. विशाल पाकिस्तान प्रत्यक्षात उतरले असते म्हणजे जम्मू काश्मीरच्या प्रश्नाची जीनांना कसलीच चिंता करावी लागली

नसती, कारण तेथील सत्ता हिंदू राजाच्या हाती असली तरी ते तीन बाजूंनी जीनांच्या मुलखांनी वेढले जाणार असल्यामुळे हिंदू हिंदुस्तानपासून अलग पडले असते. वस्तुस्थिती ही सर्व अशी असताना देखील व्हाइसरॉय कॅबिनेट मिशन या दोघांनीही लीग कौन्सिलचे ता. १६ मेचे निवेदन स्वीकारणारा ठराव प्रामाणिकपणाचा आहे असे मानले. काँग्रेस पुढाऱ्यांनी मात्र लीगच्या कौन्सिलमध्ये झालेली चर्चा आणि त्यापूर्वी ता. २२ मे रोजी जीनांनी प्रसिद्ध केलेले पत्रक यावर अगोदरच टीकेची झोड उठविण्याची संधी का गमावली ते सांगता येणे कठीण आहे. घटना तयार करण्याच्या जवळजवळ प्रत्येक टप्प्यावर घटना समितीत पेचप्रसंग निर्माण करून आणि 'ब' आणि 'क' गटांना फुटून निघण्याचा अधिकार असला पाहिजे आणि तसेच संरक्षणासाठी आवश्यक असेल तेवढ्यापुरते दळणवळण खाते संघराज्याकडे रहावे असा आग्रह धरून आपली इच्छा घटना समितीवर लादल्याशिवाय आपण रहाणार नाही अशी धमकी त्या पत्रकातून जीनांनी देऊन ठेवली होती.

हा लबाडीचा ठराव पास झाल्याच्या दुसऱ्या दिवशी जीनांनी वॅव्हेल यांची भेट घेतली आणि त्यांना असे सांगितले की, आपण स्वतः युद्धमंत्री म्हणून मध्यवर्ती सरकारात येणार असून इतर खात्यांबरोबर मुस्लीम लीगला नियोजन आणि परराष्ट्र व्यवहार ही खातीही मिळाली पाहिजेत. त्याचदिवशी त्यांनी असेही जाहीर केले की, वॅव्हेल यांनी ५:५:२ हे सूत्र पाळण्याचे आश्वासन दिले आहे. वस्तुस्थिती मात्र अशी होती की, वॅव्हेल यांनी ता. ३ जून रोजी मुस्लीम लीगला फक्त इतकेच आश्वासन दिले होते की, काँग्रेसने ता. १६ मे चा मसुदा झिडकारून लावला तर इतर अल्पसंख्याकांसमवेत मुस्लीम लीगला मध्यवर्ती सरकार बनविण्याची संधी दिली जाईल आणि ता. ३ रोजी दिलेल्या या तोंडी आश्वासनांचाच वॅव्हेल यांनी ४ जूनला जीनांना पत्र पाठवून पुनरूच्चार केला होता. वॅव्हेल यांच्या रोजनिशीत ७ जून च्या तारखेवर पुढील नोंद आढळते ५:५:२ हे सूत्र मान्य असेल तरच लीग सामील होईल. असे जीनांनी सांगितले आणि मी तसे आश्वासन दिले आहे असे ते सांगू लागले. त्यावर मी त्यांना असे सांगितले की, ते सूत्र कार्यान्वित करण्याचा माझा प्रयत्न चालू असला तरी मी तसे आश्वासन दिलेले नाही. त्यामुळे संतापलेल्या जीनांनी दुसऱ्या दिवशी वॅव्हेलला पाठविलेल्या पत्रात लिहिले होते.

मध्यवर्ती सरकारबाबत प्रथम सिमल्यात आणि नंतर मी दिल्लीला परतल्यावर लीग वर्किंग कमेटीच्या बैठकीपूर्वी, ता. ३ जून रोजी आपली जी चर्चा झाली त्यावेळी मध्यावधी सरकारात फक्त बारा मंत्री राहतील आणि त्यातील पाच काँग्रेसचे, पाच लीगचे आणि शीख व ख्रिश्चन किंवा अँग्लोइंडियन यांच्यापैकी एक असे असतील असे आश्वासन आपण मला दिले होतेच. ... आपल्या पूर्वसंमतीने आपण दिलेल्या आश्वासनाची हकीकत मी आमच्या वर्किंग कमेटीच्या कानावर घातली. कॅबिनेट मिशनच्या जनेबरोबरच वर्किंग कमेटीने ज्या बाबींचा विचार केला

त्यात आपण दिलेले आश्वासन हेही महत्त्वाचे होते. कॅबिनेट मिशनची योजना आणि आपण दिलेले आश्वासन यांचा साकल्याने विचार करूनच ता. ६ जून रोजी मुस्लीम लीग कौन्सिलने ती योजना स्वीकारण्यास अनुमती दिली. आणि त्या बैठकीतही सुरवातीला योजना स्वीकारण्यास फार विरोध दर्शविण्यात आला होता. या बैठकीतसुद्धा मध्यावधी सरकारात आपले काय स्थान राहणार हा प्रश्नही उग्र व निकडीचा होता. आणि जेव्हा आपण दिलेले आश्वासन मी स्पष्ट करून सांगितले तेव्हाच योजनेला सुरुवातीला जो मोठा विरोध होता तो मावळला. आपल्याकडून हे आश्वासन मिळाले नसते तर योजना स्वीकारण्यास कौन्सिलची संमतीच मिळाली नसती. आपल्या विनंतीनुसार आश्वासनाची ही बाब जाहीर होऊ न देण्याचा माझ्याकडून शक्य तेवढा प्रयत्न मी केलेला आहे. वर निर्देश केलेल्या आपल्या सूत्राविरूद्ध काँग्रेसधार्जिण्या वृत्तपत्रांनी दुष्टपणाने झोड उठविली असल्यामुळे मी आपल्याला कळवू इच्छितो की, ५:५:२ या सूत्राबाबत आपण दिलेले आश्वासन हा आमच्या चर्चेतील निर्णायक मुद्दा होता आणि त्या आश्वासनामुळेच योजना स्वीकारण्यास आम्ही कौन्सिलची संमती मिळवू शकलो. प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे आता जर ते सूत्र डावलण्यात आले तर त्याचे गंभीर परिणाम घडून येतील आणि मुस्लीम लीगचे सहकार्य आपल्याला मिळू शकणार नाही. या सूत्रानुसार मिळालेल्या पाच जागात काँग्रेसने एकाद्या मुसलमानांचा अंतर्भाव करून आक्रमक पवित्रा घेतला तर मुस्लीम लीग ते कधीही मान्य करणार नाही आणि तो आपल्या मार्गातील आणखी एक अडथळा होऊन बसेल याचीही आपल्याला जाणीव असेल असे मी धरून चालतो.

मध्यावधी सरकारात लीगला काँग्रेसइतक्या जागा मिळाल्या नाहीत त्याचप्रमाणे काँग्रेसने एकाद्या मुसलमानाचा आपल्या यादीत समावेश केला तर ता. १६ मे च्या कॅबिनेट मिशनच्या निवेदनाला दिलेला आपला पाठिंबा लीग काढून घेईल अशी हे पत्र म्हणजे धमकीच होती. जीनांच्या या दुराग्रही धोरणाचे उद्दिष्ट केवळ हेच होते की, ता. १६ च्या निवेदनात सुचविण्यात आलेली योजना काँग्रेसने फेटाळून लावावी. मध्यावधी सरकारात सामील होण्याचे व्हाइसरॉयने दिलेले आमंत्रणही तिने झिडकारावे व त्यामुळे मध्यावधी सरकार संपूर्णपणे आपल्या ताब्यात ठेवण्याचा मार्ग लीगला मोकळा व्हावा. काँग्रेसवर भरमसाठ आरोप करीत सुटावयाचे हे जीनांच्या कांगावखोर राजकारणाचे सूत्र होते. काँग्रेसला सत्तेची मक्तेदारी प्रस्थापित करावयाची आहे अशी पुन्हा पुन्हा ओरड करताना वस्तुतः मध्यावधी सरकारवर लीगचे संपूर्ण आणि निरपवाद वर्चस्व लादण्याच्या आपल्या उद्देशावर जीना पांघरूण घालीत होते. दुसऱ्या दिवशी वॅव्हेल यांनी जीनांना एक अगदी त्रोटक उत्तर पाठवले.

५:५:२ या सूत्राबाबतच्या आश्वासनाचा मुद्दा आपण उपस्थित केला आहे मी असे आश्वासन दिलेले नव्हते. परंतु ते सूत्र माझ्या मनात घोळत आहे असे

काँग्रेसप्रमाणेच मी तुम्हालाही सांगितले होते असे काही आश्वासन दिले होते अशी तुमची समजूत होऊ देणे माझ्या दृष्टीने बरोबर होणार नाही तथापि त्या आधारावर आपल्या दोघात काही समझोता घडून येऊ शकेल अशी मात्र मी आशा करतो.

आश्वासनाबाबत वॅव्हेल यांच्या इतक्या निःसंदिग्ध खुलाशानंतरही जीना पुन्हा पुन्हा तेच पालुपद आळवीत. फरक इतकाच की, शब्दात जरा फिरवाफिरवी करून वॅव्हेल यांनी आश्वासन दिले होते, असे म्हणण्याऐवजी 'निवेदन केले होते' असा शब्दप्रयोग ते करू लागले.

ता. १० जून रोजी आझाद आणि नेहरू यांनी कॅबिनेट मिशन आणि व्हॉइसरॉय यांची भेट घेऊन युरोपियनांनी घटना समितीवरील प्रतिनिधींच्या निवडणुकीत सह-भागी होण्यास आणि मध्यावधी सरकारात लीगला समान प्रतिनिधीत्व देण्यास काँग्रेसचा विरोध असल्याचे सांगितले. काँग्रेसतर्फे घेण्यात आलेले आक्षेप जरी मान्य करण्यात आले नाहीत तरी या मुलाखतीमुळे समजोता घडून येण्याची शक्यता निर्माण झाली. कॅबिनेट मिशन जूनच्या अखेरीस इंग्लंडला परत जाणार होते. त्यांच्याबरोबर पाठवण्यासाठी म्हणून वॅव्हेल या वाटाघाटीसंबंधी एक टीपण तयार करण्याच्या कामास लागले. मध्यावधी सरकार प्रत्यक्षात स्थापन करता आले तरी देखील अनेक गंभीर समस्या आपल्यापुढे उभ्या राहिल्याशिवाय राहणार नाहीत या मुद्यावर वॅव्हेल यांनी आपल्या टीपणात विशेष भर दिला होता. मध्यावधी सरकार आणि घटना समिती यांना एकमेकांशी जुळवून घेणे कठीण जाणार आहे. कारण काँग्रेस आणि लीग आपापली परस्पर विरोधी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पूर्वीप्रमाणेच खटपट करीत राहणार. भारतीय संघराज्यात संस्थानिकांनी सामील व्हावे म्हणून त्यांच्यावर दडपण आणण्यासाठी काँग्रेस संस्थानात चळवळी सुरू करण्याचाही संभव आहे. या कारणाने भावी काळ कसोटीचा ठरणार आहे असा अंदाज व्यक्त करून ता. १६ मे ची योजना अमलात आणण्याचे प्रयत्न असफल झाले तर कोणते उपाय योजावयाचे त्यासंबंधीची निश्चित योजना ब्रिटिश मंत्रिमंडळाने तयार करून ठेवली पाहिजे असा इशाराही वॅव्हेल यांनी त्या टीपणात देऊन ठेवला होता.

आझाद यांना डावलून वॅव्हेल, जीना आणि नेहरू यांची त्रिपक्षीय बैठक बोलावण्याचा निर्णय ता. ११ जून रोजी घेण्यात आला. मध्यावधी सरकार त्याचप्रमाणे लोकनियुक्त अशा एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर कोणाकोणाची नेमणूक करावयाची यासंबंधी समझोता घडवून आणण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. ता. १२ रोजी वॅव्हेल यांनी या संबंधात जवळजवळ एकाच मजकुराची पत्रे जीना आणि नेहरू यांना पाठविली. त्यापैकी नेहरूंना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात.

मध्यावधी सरकारमधील निरनिराळ्या जागा जास्तीत जास्त चांगल्या रीतीने भरता याव्यात म्हणून जीनांच्या समवेत तुम्हा दोघांशी विचारविनिमय करण्याची

संधी मिळावी असे मला फार वाटते. या बैठकीत समान प्रतिनिधीत्वासारख्या कोणत्याही तात्त्विक प्रश्नांचा उहापोह करण्याचा माझा इरादा नसून देशातील दोन प्रमुख पक्ष आणि काही अल्पसंख्यांक यांचे प्रतिनिधी घेऊन शक्य तितके चांगले मध्यावधी सरकार कसे बनविता येईल, त्यात कोणकोणती खाती असावीत आणि ती कोणाकडे सोपवावीत एवढ्यापुरतीच आपली चर्चा मर्यादित राहील.

वॅव्हेल यांना पाठवलेल्या उत्तरात जीनांनी असे कळवून टाकले की, लीग आणि काँग्रेस यांना समान प्रतिनिधीत्व दिले जाईल असे सांगण्यात आल्यामुळेच लीगने मिशनची योजना स्वीकारली असून 'जो पर्यंत ते (काँग्रेस) याबाबतचा निर्णय घेत नाहीत तो पर्यंत (मध्यावधी सरकारातील) एकही किंवा त्या खात्यांसाठी योग्य व्यक्तींची निवड यासंबंधी चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही.' जीनांच्या या पत्रापूर्वी या बैठकीस त्यांनी हजर राहावे म्हणून त्यांचे मन वळविण्यासाठी क्रिप्स यांनी कित्येक तास त्यांच्याशी बोलणी करण्यात घालविले होते. परंतु त्यांचे ते सारे प्रयत्न निष्फळ ठरले होते. या उलट नेहरूंनी आपल्या उत्तरात असे कळविले होते की, आझाद हे आमचे अधिकृत प्रवक्ते असून त्यांना डावलण्यात येत असल्यामुळे आपली परिस्थिती काहीशी अडचणीची होऊन बसली आहे. तरी देखील 'आपण मला बैठकीचे निमंत्रण दिले असल्याने मी उपस्थित राहीन.

नेहरूंच्या बरोबरची बैठक होण्यापूर्वी वॅव्हेल यांची पटेल यांच्याशी चर्चा झाली होती. त्यावेळी त्यांनी वल्लभभाईंना असे सांगितले की, समान प्रतिनिधीत्वाच्या व त्याला असलेला काँग्रेसचा विरोध आपण समजू शकतो. परंतु यावेळेपुरताच तो अपवाद आहे असे समजावे; काँग्रेसने याखेपेला समान प्रतिनिधीत्व मान्य केले तरी तो शिरस्ता मानला जाणार नाही. त्यावर अगदी नगरपालिका आणि ग्रामपंचाय-तीच्या पातळीपर्यंत आजही हा शिरस्ताच होऊन बसला आहे. त्यांनी अशीही भीती व्यक्त केली की, केवळ जातीवादी आणि फाटाफुटीचे राजकारण खेळण्यासाठी जीना मध्यावधी सरकारचा गैरफायदा करून घेतल्याशिवाय राहणार नाहीत असे पटेलांनी उत्तर दिले. परंतु 'मध्यावधी सरकारचा हिंदुस्तानचा राज्य कारभार चालविण्याऐवजी जातीयवादी राजकारणाचा आखाडा बनविण्यासाठी जीनांनी किंवा दुसऱ्या कोठल्याही पक्षांनी प्रयत्न केला तर तो मी सफल होऊ देणार नाही' अशी वॅव्हेलनी खात्री दिली.. अर्थात वॅव्हेल यांचे हे आश्वासन अगदीच पोकळ होते ते पुढील घटनांवरून स्पष्ट झाले.

नंतर नेहरूंनी वॅव्हेल यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी जगजीवनराम आणि राज-कुमारी अमृतकुवर यांच्यासकट काँग्रेसचे सात, मुस्लीम लीगचे चार, एक लीग बाहेरचा मुसलमान, एक काँग्रेस बाहेरचा हिंदू, एक भारतीय ख्रिश्चन आणि एक शीख यांचा समावेश असलेली यादी वॅव्हेल यांना सादर केली. जीनांना ही यादी मान्य होणार नाही अशी वॅव्हेल यांना शंका होती परंतु या यादीतील नावांचा कोणाजवळही

गौप्यस्फोट करणार नाही असे. त्यांनी नेहरूंना आश्वासन दिले. नेहरूंच्या यादीत एकूण पंधरा नावांचा समावेश होता. त्यावरून बारा सभासदाच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या जागी मध्यावधी सरकार १५ सभासदांचे असावे अशी काँग्रेसची मागणी होती हे स्पष्ट होत होते.

तारीख १३ जून रोजी वॅव्हेल यांनी जीना आणि नेहरू यांची वेगवेगळी भेट घेतली. अनुसूचित जातीचा पुढारी धरून काँग्रेसचे सहा मुस्लीम लीगचे पाच, शीख आणि भारतीय ख्रिश्चन यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी मध्यावधी सरकारात असावा असे नवे सूत्र त्या दोघांच्याही पुढे त्यांनी मांडले. वॅव्हेल यांच्या म्हणण्याप्रमाणे हे नवे सूत्र आपल्या वर्किंग कमेटीसमोर विचारार्थ मांडण्याचे जीनांनी आश्वासन दिले परंतु तारीख २७ व २९ जून रोजी प्रसिद्ध केलेल्या आपल्या निवेदनातून जीनांनी असे जाहीर केले की, ५ : ५ : २ या सूत्रात फेरफार करण्यात आला तर त्याचे फार गंभीर परिणाम घडून येतील आणि आपल्याला कदाचित मुस्लीम लीग कौन्सिलची बैठक पुन्हा बोलवावी लागेल अशी समज तारीख १३ जून रोजी आपण वॅव्हेल यांना दिलेली होती. आपल्या निवेदनात त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले होते की आपण हे नवे सूत्र लीगच्या वर्किंग कमेटी समोर विचारार्थ ठेवू, आणि ते देखिल काँग्रेसने त्याला अंतिम मान्यता दिली असेल तर, इतकेच आपण वॅव्हेल यांना सांगितले होते, वर्किंग कमेटीकडे आपण नव्या सूत्राची शिफारस करू असा उल्लेख वॅव्हेल यांच्या बरोबरच्या बोलण्यात आपण केलेला नव्हता असाही त्यांनी खुलासा केला. त्याच दिवशी म्हणजे तारीख १३ जून रोजी गांधींनी वॅव्हेल यांना पत्र पाठवून असे कळविले होते की, "आपण कोणत्या तरी एका घोड्याची निवड केली पाहिजे. मला असे वाटते की, एकाच वेळी दोन घोड्यावर स्वार होणे आपल्याला केव्हाही जमणार नाही. एक तर काँग्रेसने सुचविलेली नावे आपण स्वीकारा नाही तर लीगची स्वीकारा; परंतु कृपा करून त्याची सरमिसळ करण्याचा प्रयत्न करून फार मोठा अनर्थ ओढवून घेऊ नका."

तारीख १४ जून रोजी वॅव्हेल, क्रिप्स, पेथीक लॉरेन्स आणि अलेक्झांडर या चौघांनी मिळून जगजीवनराम यांच्या सकट काँग्रेसचे सहा, लीगचे पांच, शीख, भारतीय ख्रिश्चन आणि पारशी (सर एन. पी. इंजिनियर) यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी मिळून मध्यावधी सरकार बनविण्यात येणार असल्याचे जाहीर करावयाचे असा निर्णय घेतला. त्याप्रमाणे आझाद आणि नेहरू यांना मध्यावधी सरकारात. समाविष्ट करून घेण्यात येणार असलेल्यांची नांवे कळविण्यात आली. त्या दिवशीं संध्याकाळी समान प्रतिनिधीत्वासंबंधी काही तरी गैरसमज होऊन आझादांनी मध्यावधी सरकार संबंधीचे सूत्र फेटाळून लावले. आणि घटना तयार करण्याच्या प्रक्रियेत युरोपियांनी सामील होण्यास आपला विरोध असल्याचे जाहीर केले. त्याच-प्रमाणे गटांच्या बाबतीत जी सक्ती करण्यात येणार होती तिलाही विरोध असल्याचे

पुन्हा एकदा स्पष्ट करतांना ते म्हणाले की, "...सरहद्द प्रांत आणि आसाम या प्रांतांनी बऱ्याच प्रभावीपणे सक्तींच्या गटांना विरोध दर्शविलेला आहे. या योजनेमुळे शीख दुखावले गेले असून आपण अलग पडणार या भावनेने फार अस्वस्थ झाले आहेत. पंजाबमध्ये ते अल्पसंख्य आहेत त्यामुळे त्यांचा समावेश सक्तीने 'ब' गटात केला जाणार असल्याने ते अधिकच अगतिक बनणार,.

दुसऱ्या दिवशी आझाद यांना पाठवलेल्या उत्तरात वॅव्हेल यांनी त्यांना असे कळविले की, युरोपियनांच्या संबंधीत निर्माण झालेली अडचण समाधानकारकपणे दूर होईल अशी आशा निर्माण झाली आहे. संकल्पित मध्यावधी सरकारात काँग्रेसचे सहा प्रतिनिधी राहणार आहेत तर लीगचे पाच याला समान प्रतिनिधीत्व म्हणता येईल काय असा सवाल करून त्यांनी पुढे असे म्हटले की, हिंदू आणि मुसलमान यांचे समसमान प्रतिनिधी राहणार आहेत असेही म्हणता येणार नाही कारण हिंदूच्या सहा प्रतिनिधींच्या बरोबर मुसलमानांचे पाचच प्रतिनिधी घेतले जाणार आहेत. प्रांतांचे गट बनविण्याबाबतच्या तरतुदीचा वॅव्हेलनी जो उहापोह केला होता तोही संदिग्ध स्वरूपाचा होता.

प्रांतांचे गट बनविण्याबाबतच्या आपल्या आक्षेपांची मला आणि शिष्टमंडळाला जाणीव आहे. तथापि मी असे निदर्शनास आणू इच्छितो की, तारीख १६ मे च्या पत्रकान्वये प्रांताचे गट करण्याची सक्ती केलेली नाही. त्याबाबतचा निर्णय प्रांतांच्या लोकनियुक्त प्रतिनिधींनी संबंधित गटांच्या बैठकीत घ्यावयाचा आहे. त्याबाबत करण्यात आलेली तरतूद एवढीच आहे की, विशिष्ट प्रांतांच्या प्रतिनिधीच्या गटवार बैठकी व्हाव्यात आणि त्या बैठकीत गट असावा किंवा नाही यासंबंधीचा निर्णय घेण्यात यावा. आणि त्यातूनही गट बनविण्याचा निर्णय झाला तरी त्या त्या प्रांताला आपल्या मर्जीनुसार त्या गटातून बाहेर पडण्याचा अधिकार राहणार आहेच.

त्याच दिवशी उशिरा युरोपियनांचे एक पत्रक प्रसिद्ध झाले. त्यात असे म्हटले होते की, घटना समितीच्या निवडणुकीसाठी ते आपला उमेदवार उभा करणार नाहीत किंवा युरोपियन उमेदवाराला मतदानही करणार नाहीत. मध्यावधी सरकारच्या स्थापनेबाबत दोन पक्षात एकमत घडवून आणण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले असल्यामुळे आता आपण कोणते पाऊल उचलणार आहोत त्या संबंधीचे पत्रक दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध करावयाचे आपण आणि मंत्रिमंडळाच्या शिष्टमंडळाने ठरविले आहे असे वॅव्हेल यांनी जीना आणि आझाद यांना कळवून टाकले.

तारीख १६ जून रोजी ते पत्रक प्रसिद्ध झाले. मध्यावधी सरकारबाबत दोन पक्षात आणखी वाटाघाटी करणे निष्फळ ठरणार असल्याचे स्पष्ट करून काँग्रेसचे (नेहरू, राजाजी, एच. के. महताब, पटेल, राजेंद्र प्रसाद आणि जगजीवनराम असे सहा (जीना) लियाकतअली खान, नबाब इस्माइल मुहंमद खान, नाझिमुद्दीन आणि

अबदूर रब निश्तार हे मुस्लीम लीगचे पाच आणि बलदेवसिंग व जॉन मथाई आणि इंजिनियर यांना व्हाईसरॉय नियोजित मध्यावधी सरकारात सामील होण्यासाठी पाचारण करतील असे त्या पत्रकात घोषित करण्यात आले. नियोजित मध्यावधी सरकारची ही रचना जातीय प्रश्न सोडविण्याबाबतीत दाखला म्हणून पुढे केली जाणार नाही असा खुलासा त्यात करण्यात आला होता. आणि संबंधित पक्ष या-कामी सहकार्य करतील अशी आशा व्यक्त करण्यात आली होती. त्या पत्रकात आणखी एक परिच्छेद होता आणि तो पुढे अत्यंत वादग्रस्त ठरला. तो परिच्छेद असा होता.

> "जर दोन प्रमुख पक्ष किंवा त्यापैकी कोठलाही एक वरील धर्तीवर बनविण्यात येणाऱ्या संयुक्त सरकारात सामील होण्याबद्दल अनिच्छा दाखविल तर १६ मे चे निवेदन मान्य करण्यास तयार असलेल्यांच्या सहकार्याने जास्तीतजास्त प्रातिनिधिक स्वरूपाचे मध्यावधी सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने जरूर ते पाऊल उचलण्याचा व्हाइसरॉयचा इरादा आहे.

मध्यावधी सरकारमधील अबदुर रब निश्तार यांच्या नावाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले. मुस्लीम लीगने त्यांचे नांव सुचविले आहे असे त्यावेळी वॅव्हेल यांनी आझादांना सांगितले त्यावेळी आझांदानी त्यांना ताबडतोब असे लिहून कळविले की, निश्तार यांचा अंतर्भाव करण्यास कॉंग्रेस कधीही मान्यता देणार नाही कारण वायव्य सरहद्द प्रांताच्या कायदेमंडळांच्या निवडणुकीत त्यांचा पराभव झालेला होता. त्यावर वॅव्हेल यांनी लगेच असे उत्तर पाठविले की 'मुस्लीम लीगने सुचविलेल्या नावांना आक्षेप घेण्याचा कॉंग्रेसला अधिकार आहे हे मला मान्य करता येणार नाही त्याच-प्रमाणे तिने कॉंग्रेसने सुचविलेल्या नावाला विरोध दर्शविला तर तोही मी मानणार नाही. त्या व्यक्तीची पात्रता हा याबाबतीतील खरा निकष असला पाहिजे. तरी देखील आपल्या यादीतील महत्त्वाचे नाव वगळून त्याऐवजी शरदचंद्र बोस यांचा समावेश करण्यात यावा असे तारीख १८ जून रोजी कॉंग्रेसने सुचविले त्यावेळी जीनांची या फेरबदलाला अनुमती घेणे वॅव्हेलना आवश्यक वाटले. आझाद आणि नेहरू यांनी कॉंग्रेसच्या यादीत डॉ. झाकीर हुसेन यांचा समावेश करण्यात यावा अशीही सूचना केली होती याबाबत वॅव्हेल यांच्या रोजनिशीत तारीख १८ जूनच्या पानावर पुढील नोंद आढळते "महताब यांच्या जागी बोस यांच्या नावाला जीनांनी संमती दिली परंतु आपण त्यांना घरभेदे समजतो त्या झाकीर हुसेन यांच्या नावाला कोणत्याही परिस्थितीत मान्यता देता येणार नाही असे ते म्हणाले. त्यानंतर लगेच जीनांनी एक पत्र पाठवून झाकीर हुसेन यांचा अंतर्भाव करण्यास मुस्लीम लीग कधीच मान्यता देणार नाही किंबहुना मुस्लीम लीगमध्ये नसलेल्या कोणत्याही मुसल-मानाचा मध्यावधी सरकारात समावेश करण्यास लीगचा विरोध राहील असे भेटीच्या वेळी आपण सांगितल्याचे वॅव्हेल यांच्या नजरेस आणून दिले.

दरम्यान तारीख १८ जून रोजीच जीनांनी मुस्लीम लीगच्या यादीतून नाझिमुद्दिन यांचे नाव वगळावे अशी इच्छा व्हाइसरॉय यांच्यापाशी प्रदर्शित केली. कारण ते निझामाकडे हैदराबाद संस्थानचे दिवाण म्हणून त्यांच्या नावाची शिफारस करणार होते. त्याचबरोबर लीगला संरक्षण खाते मिळेल असे आश्वासनही त्यांनी मागितले.

दुसऱ्या दिवशी जीनांनी वॅव्हेल यांना पुन्हा एक सविस्तर पत्र पाठवून ते ५ : ५ : २ या सूत्रापासून आपले पाऊल मागे घेत आहेत आणि त्याचे फार गंभीर परिणाम होतील, असे आपण पूर्वीच कळविले असल्याचे त्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिले. मुस्लीम लीगच्या वर्किंग कमेटीने पुढीलप्रमाणे आक्षेप आहेत असे जीनांनी त्या पत्रात लिहिलेले होते :—

(१) मुस्लीम लीगच्या पाच सभासदांना जी निमंत्रणे पाठविण्यात आली त्यांची जीनांच्याकडून यादी मागविण्यात आली नाही.

(२) कॉंग्रेस आणि लीग यांच्यातील समान प्रतिनिधीत्वाला खो देण्यात आला असून त्या ऐवजी उच्चवर्गीय हिंदू आणि मुस्लीम लीग यांच्यात ते तत्त्व अंमलात आणले जात आहे.

(३) जगजीवनराम यांचा समावेश अनुसूचित जातींना खरेखुरे प्रतिनिधीत्व देण्यासाठी करण्यात आलेला नसून कॉंग्रेसला एक जादा जागा देण्याचाच त्यामागे हेतू आहे.

(४) कॉंग्रेसला खूष करण्यासाठी वेळोवेळी मूळ योजनेत ' गंभीर स्वरूपाचे फेरफार' करण्यात आलेले आहेत.

(५) सर्वसाधारणपणे मध्यावधी सरकारतील मुसलमानांच्या प्रमाणावर आणि कॉंग्रेस विरोधातील एक म्हणून त्यांच्यावर नव्या सूत्रामुळे विघातक परिणाम घडवून येणार आहे.

त्यामुळे जोपर्यंत कॉंग्रेस १६ मे च्या निवेदनांबद्दलचा आपला निर्णय कळवीत नाही तोपर्यंत मुस्लिम लीगच्या वर्किंग कमेटीला कोणत्याही निश्चित निर्णयाप्रत येणे अशक्य आहे. त्याचप्रमाणे कॉंग्रेसकडून आणखी अडथळे येऊ नयेत म्हणून खातेवाटपासंबंधीचा अंतिम निर्णय घेण्यात यावा अशीही मागणी करण्यात आली. यानंतर तारीख १६ जूनच्या सूत्रासंबंधी कोणतेही एकमत होऊ न देणारा जीनांच्या पत्रातील सर्वात महत्त्वाचा भाग सुरू होतो.

(अ) मध्यावधी सरकारमधील सभासदांची संख्या १४ च राहिली पाहिजे.

(ब) कॉंग्रेसच्या सांगण्यावरून यापुढे कोणताही बदल करण्यात येता कामा नये.

(क) अनुसूचित जातीसकट कोणत्याही अल्पसंख्यांक गटाला मध्यावधी सरकारात सामील होता आले नाही तर त्यामुळे रिकाम्या होणाऱ्या जागा भरण्याबाबत

मुस्लीम लीगचा सल्ला घेण्यात आला पाहिजे.

(ड) मध्यावधी सरकारातील जातीनिहाय प्रमाणात बदल केला जाता कामा नये. आणि (इ) शेवटची बाब म्हणजे जे कोणत्याही महत्त्वाच्या जातीय प्रश्नावर बहुसंख्य मुसलमानांना सभासदाचा विरोध असेल तर एक्झिक्युटिव्ह कौन्सिलने निर्णय घेता कामा नये.

कॅबिनेट मिशनबरोबर विचारविनिमय केल्यानंतर दिनांक २० जून रोजी वॅव्हेल यांनी जीना यांना जे उत्तर पाठविले त्यात अल्पसंख्यांकांबाबतच्या महत्त्वाच्या आश्वासनासकट त्यांनी घातलेल्या सर्व अटी आपल्याला मान्य असल्याचे त्यांना कळविले. जीनांच्या दिनांक १९ जूनच्या पत्रातील संबंधित भाग आणि त्यांना पाठवलेले उत्तर त्यात जीनांच्या सर्व अटी मान्य करण्यात आल्याचे कळविण्यात आले होते. यांच्या प्रती वॅव्हेल यांनी आझादांकडेही रवाना केल्या. वॅव्हेल यांनी दिलेल्या आश्वासनांचा अर्थ असा होत होता की, काही कारणामुळे जगजीवनराम सरकारात सहभागी होऊ शकले नाहीत तर त्यामुळे जी जागा निर्माण होईल ती मुस्लीम लीगच्या सल्ल्याने भरली जाईल. काँग्रेसने याला फार जोराचा आक्षेप घेतला. याबाबतची काँग्रेसची भूमिका आझाद यांनी दिनांक २५ जून रोजी वॅव्हेल यांना जे पत्र पाठवले त्यावरून दिसून येते :—

दिनांक १९ जूनच्या जीनांच्या पत्राला पाठवलेल्या उत्तरात आपण असे म्हटले आहे की, "सध्या अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींना ज्या जागा देण्यात आल्या आहेत त्यातील एखादी रिकामी झाल्यास ती भरण्यापूर्वी मी साहजिकच दोन्ही प्रमुख पक्षांचा सल्ला घेईन. अशा तऱ्हेने जीना हे अनुसूचित जातींचा समावेश अल्पसंख्यांकात करू पहात आहेत आणि आपण त्यांच्या त्या मताशी सहमत आहात असे यावरून दिसते. आमच्यापुरते बोलावयाचे तर आम्हाला हा दृष्टीकोन अजिबात मान्य नाही. उलट आम्ही अनुसूचित जाती हा हिंदू समाजाचा अविभाज्य भाग आहे असे मानतो. दिनांक १५ जूनच्या पत्रात आपण देखील हीच भूमिका घेतली होती. त्यावेळी आपण असे निदर्शनास आणून दिले होते की, ज्याअर्थी, काँग्रेस पक्षातील ६ हिंदू तर मुस्लिम लीगचे पाचच मुसलमान सभासद मध्यावधी सरकारात राहणार आहेत आणि काँग्रेसच्या सहा प्रतिनिधींपैकी एक अनुसूचित जातीपैकी रहाणार आहे त्याअर्थी आपल्या योजनेत 'हिंदू' आणि मुसलमान यांच्यात त्याचप्रमाणे काँग्रेस आणि लीग यांच्यात ही समानता अभिप्रेत नाही. काही झाले तरी एका अल्पसंख्यांक जमातीचे प्रतिनिधीत्व सांगणाऱ्या नेत्याने अनुसूचित वा इतर अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींच्या निवडीत ढवळाढवळ करावी ही गोष्ट आम्हाला मान्य होणार नाही. शिवाय अनुसूचित जमातीच्या प्रतिनिधीचा काँग्रेसच्या यादीत आपणच समावेश केलेला आहे.

दरम्यान दिनांक २० जून रोजी काँग्रेस वर्किंग कमेटीच्या बैठकीने आपल्या यादीत

एखाद्या राष्ट्रवादी मुसलमानाचा अंतर्भाव करण्याचा आग्रह धरावा असा निर्णय घेतला. दिनांक २२ जून रोजी वॅव्हेल यांनी काँग्रेसने आपल्या यादीत मुसलमानांचा समावेश करण्याचा आग्रह धरू नये असे पत्राद्वारे आवाहन केले आणि आता जरी काँग्रेसने सुचविलेल्या मुसलमानाचा अंतर्भाव करता येणे शक्य होणार नसले तरी यापुढे तो शिरस्ताच आहे असे मानले जाणार नाही असे आश्वासन दिले. या पत्राचा मसुदा तयार करताना वॅव्हेल आणि कॅबिनेट मिशन यांची आपापसात जी चर्चा झाली तिच्यात ते अशा निष्कर्षाला येऊन पोहोचले की, हे पत्र पाठवल्यानंतर काँग्रेस मध्यावधी सरकारात सामील होण्यास अजिबात तयार होणार नाही. आणि तसे झाले म्हणजे काँग्रेसला वगळून लीगच्या मदतीने आपल्याला सरकार बनविता येईल असे मनसुबे वॅव्हेल पुन्हा आपल्या मनाशी रचू लागले. त्यांच्या रोजनिशीतील त्या दिवशीची नोंद अशी आहे. 'कोठल्याही परिस्थितीत आता काँग्रेसचा नकार अपरिहार्य आहे.....दरम्यान मला आता जीनांच्या सहकार्याने सरकार बनविण्याच्या प्रयत्नास लागले पाहिजे.'

परिस्थिती अशा निर्णायक अवस्थेला येऊन ठेपलेली असताना पटेलांनी सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. त्यांच्या सुचनेनुसार काँग्रेस वर्किंग कमेटीने दिनांक १६ मे च्या निवेदनाचा अर्थ लावण्याचा अधिकार राखून ठेवून ते स्वीकारण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसच्या यादीत राष्ट्रवादी मुसलमानाचा अंतर्भाव करण्याच्या प्रश्नावर काँग्रेस खंबीर राहिली. आणि दिनांक १६ मे च्या निवेदनाला मान्यता देत असतानाच मध्यावधी सरकारात मात्र सामील न होण्याचा निर्णय वर्किंग कमेटीने घेतला. हा गौप्यस्फोट प्रथम पटेलांनी दिनांक २३ जून रोजी वॅव्हेल यांच्यापाशी केला. दिनांक २४ जून रोजी क्रिप्स यांनी त्याला दुजोरा दिला. पेथिक लॉरेन्स यांनी गांधी आणि पटेल यांना असे सांगितले की, कॅबिनेट मिशन योजना स्वीकारून मध्यावधी सरकारच्या बाबतीत काँग्रेसला तुम्ही आता मुस्लीम लीगच्या बरोबरीने समान हक्क प्राप्त करून दिला आहे. मध्यावधी सरकार एकट्या लीगच्या हाती सोपवून काँग्रेसला त्यापासून अलग ठेवावयाचे कारस्थान अशा तऱ्हेने मुळातच उखडून टाकले गेले. वॅव्हेल यांच्यावर तर तो वज्राघातच होता. २४ तारखेच्या आपल्या रोजनिशीत वॅव्हेल यांनी लिहिले,

काँग्रेसच्या डावपेचामुळे जीना आणि मध्यावधी सरकारची रचना या दोहोंच्याही संदर्भात आम्ही अत्यंत अडचणीत सापडलो आहोत. मुस्लीम लीगला सहभागी करून घेऊन परंतु काँग्रेसला मात्र दूर ठेवून मध्यावधी सरकार बनविण्याचे प्रयत्न करण्याची शक्यताच आता उरलेली नाही. आणि आता काँग्रेस असा आग्रह धरणार की, सरकार बनविण्याचा कोणताही नवा प्रयत्न झाला तर यापूर्वी जीनांना जी आश्वासने देण्यात आली होती ती आणि ज्या आधारावर पूर्वी सरकार बनवले जाणार होते तो आधार हे दोन्हीही आता रद्दबातल ठरतात. खरे म्हणजे

काँग्रेसने आमचा डाव आमच्यावर उलटवला आहे.

काँग्रेसने केवळ वॅव्हेल यांचाच नव्हे तर जीनांचाही डाव त्यांच्यावर उलटवला होता. काँग्रेस जोपर्यंत दिनांक १६ जूनच्या योजनेबद्दल निर्णय घेत नाही तोपर्यंत मुस्लीम लीगला कोणताही निश्चित निर्णय घेणे अशक्य आहे असे जीनांनी आपल्या दिनांक १९ जूनच्या पत्राने वॅव्हेल यांस कळविले होते. जीनांच्या आजवरच्या डाव-पेचांना धरूनच हे होते. त्यामुळे दिनांक २५ जून रोजी कॅबिनेट मिशनने त्यांना बोला-वून घेऊन काँग्रेसने दिनांक १६ मेच्या निवेदनाला मान्यता दिली असल्याकारणाने आम्ही आता मध्यावधी सरकार बनविण्याचे प्रयत्न थांबविणार आहोत असे जीनांना सांगितले त्यावेळी ते स्तंभितच झाले. काँग्रेसचा हा निर्णय प्रामाणिकपणाचा नाही असे शिष्टमंडळाला जीना सांगू लागले त्यावेळी पेथिक लॉरेन्स यांनी असा टोमणा मारला की, काँग्रेसचा निर्णय तसा नसेल पण मग लीगचा तरी तो कुठे प्रामाणिक-पणाचा होता ? दिनांक १९ जूनचे आपले पत्र प्रसिद्धीला दिल्याबद्दल त्यांनी जीनांना चांगलाच बोल लावला कारण त्या पत्रामुळेच काँग्रेस संतप्त झाली आणि तिने मध्यावधी सरकार बनविण्याचे आपले प्रयत्न हाणून पाडले.

जीनांनी शिष्टमंडळ आणि वॅव्हेल यांच्यावर दिलेला शब्द फिरवल्याचा आणि काँग्रेसपुढे शरणागती पत्करल्याचा आरोप केला आणि असा आग्रह धरला की, एकट्या लीगलाच मध्यावधी सरकार बनविण्यासाठी पाचारण करण्यात आले पाहिजे. त्याचप्रमाणे व्हॉईसरॉय यांनी आपला तसा निर्णय लेखी कळवावा अशीही त्यांनी मागणी केली. दिनांक २५ जून रोजी वॅव्हेल यांनी आपल्या रोजनिशीत अशी नोंद करून ठेवली आहे की, जवळजवळ पाऊणतास चर्चा करून जीनांना पाठवावयाच्या पत्राचा मसुदा तयार केला आणि त्यावर माझी सही होऊन रात्री सुमारे दहाला ते पत्र त्यांच्याकडे रवाना झाले. त्या पत्रात असा मजकूर होता की, "दिनांक १६ मेच्या निवेदनास काँग्रेसने मान्यता दिली आहे. परंतु मध्यावधी सरकारात सहभागी होण्यास मात्र तिने नकार दिला आहे हे आपल्याला कळविलेच आहे. काँग्रेस आणि लीग या दोन्ही पक्षांचे मिळून संयुक्त सरकार बनविण्याचा आमचा प्रयत्न होता. परंतु त्याबाबत केलेल्या प्रदीर्घ वाटाघाटी निष्फळ ठरल्या असल्यामुळे आता त्या काही काळ स्थगित ठेवण्याचे आम्ही ठरविले आहे" परंतु जीनांनी सांगितल्याप्रमाणे व्हाइसरॉय यांचे हे पत्र त्यांना पोहोचण्यापूर्वीच मुस्लीम लीग वर्किंग कमेटीची बैठक होऊन तिच्यात जून १६ ची योजना स्वीकारण्याचा ठराव पास झाला आणि तो प्रसिद्धीलाही देण्यात आला. याचा अर्थ जीना आणि लीग वर्किंग कमेटी यांनी काँग्रेसने दिनांक १६ जूनच्या योजनेसंबंधी निश्चित निर्णय घेतल्याशिवाय लीगला त्यासंबंधी विचार करता येणार नाही ही आपली पहिली भूमिका सोडून दिली असाच होता. लीगच्या वर्किंग कमेटीने घाईघाईने पास केलेला हा ठराव म्हणजे वाटाघाटी काही काळ स्थगित ठेवण्याचा कॅबिनेट मिशनचा प्रयत्न हाणून पाडून त्याला फक्त मुस्लीम लीगला घेऊन

मध्यावधी सरकार बनविण्यास भाग पाडण्यासाठी घेण्यात आलेला आक्रमक पवित्रा होता. दिनांक २६ जूनच्या आपल्या पत्रात जीनांनी "वॅव्हेल" यांना असे कळविले की, त्यांचे पत्र आपल्या हातात पडण्यापूर्वीच दिनांक १६ जूनचा मसुदा स्वीकारण्याबद्दलचा लीगच्या वर्किंग कमेटीचा ठराव त्यांच्याकडे रवाना केला होता. आणि दिनांक १६ जूनच्या निवेदनातील आठव्या परिच्छेदानुसार आता विनाविलंब सरकार बनविणे त्यांच्यावर बंधनकारक आहे असा त्यांनी आग्रह धरला. त्याचप्रमाणे त्या सरकारात सहभागी करून घेण्यास कॉंग्रेस पात्र ठरते असा जो अर्थ वॅव्हेल लावीत होते त्यालाही जीनांनी आव्हान दिले. उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात वॅव्हेल यांनी असे कळविले की, मंगळवारी झालेल्या आपल्या भेटीच्यावेळी आम्ही समक्ष सांगितल्याप्रमाणे दिनांक १६ जूनच्या निवेदनातील आठव्या परिच्छेदाच्या संदर्भात दोन्ही पक्षांनी दिनांक १६ मेच्या निवेदनास स्वीकृती दिलेली असल्यामुळे त्या दोघांचे प्रतिनिधी असलेले सरकार बनविण्याचा प्रयत्न करण्यास मी बांधलेला आहे. त्यासाठी पुन्हा वाटाघाटी सुरू करण्यापूर्वी मध्यंतरी थोडासा काही वेळ जाऊ देणे आवश्यक आहे हे आपणही मान्य कराल असे मी धरून चालतो. आणि प्रत्यक्ष भेटीत आपल्याला सांगितल्याप्रमाणे दरम्यानच्या काळात सरकारी अधिकाऱ्यांचे तात्पुरते काळजीवाहू सरकार स्थापन करण्याचे आम्ही ठरवीत आहोत. घटना समितीच्या निवडणुका होऊन गेल्यानंतर वाटाघाटी पुन्हा सुरू करण्याचा माझा इरादा आहे.

तथापि केवळ मुस्लीम लीगला घेऊन तात्पुरते सरकार बनविण्याचा आपला आग्रह जीनांनी चालूच ठेवला. त्याचबरोबर घटना समितीच्या निवडणुका घेण्यालाही त्यांनी विरोध केला. दिनांक २८ जून रोजी वॅव्हेल यांना त्यांनी लिहिले,

> 'घटना समितीच्या निवडणुकाही पुढे ढकलण्यात आल्या पाहिजेत असे माझे कोणताही पूर्वग्रह न ठेवता आग्रहाचे सांगणे आहे. कारण दीर्घकालीन योजना आणि मध्यावधी सरकारची निर्मिती याकडे एकत्रितपणे पाहिले पाहिजे. एका संबंध योजनेचे ते दोन अविभाज्य भाग आहेत हे आपणही जाणता आणि म्हणून त्यातील फक्त एकच भाग म्हणजे घटनासमितीच्या निवडणुका अंमलात आणणे आणि दुसरा लांबणीवर टाकणे योग्य ठरणार नाही.'

जीनांच्या या पत्राला वॅव्हेल यांनी त्याच दिवशी उत्तर पाठवून असे कळविले की 'आम्ही आमचा शब्द फिरवला असे जे आपले म्हणणे आहे ते आम्हाला अजिबात मान्य नाही. दिनांक २५ जून रोजी आपल्या वर्किंग कमेटीची बैठक झाली त्यापूर्वीच आम्ही असे पाऊल उचलणार आहोत हे आपल्यापाशी स्पष्ट केले होते. घटना समितीच्या निवडणुका घेण्याची तयारी एव्हाना सुरूही झाली असून त्या आता आम्ही पुढे ढकलू शकत नाही.'

दिनांक २९ जून रोजी जीनांनी एक पत्रक प्रसिद्ध करून जून १६ च्या निवेदनातील तरतुदी अमलात न आणून व्हाइसरॉय आणि कॅबिनेट शिष्टमंडळ यांनी अंतिम

योजनेबाबत जो शब्द दिला होता तो मोडला आहे असा आरोप केला.

जून १९४६ मध्ये झालेल्या वाटाघाटी म्हणजे बौद्धिक डावपेचांचे एक युद्धच होते. आणि त्यात जीनांचा पराभव झाला होता. त्यांनी उराशी बाळगलेली स्वप्ने धुळीला मिळाली होती. १६ मेच्या निवेदनाला संमती दर्शविणारा दिनांक ६ जूनचा आपला ठराव मागे घेण्यासाठी मुस्लीम लीगच्या कौन्सिलची बैठक पुन्हा बोलवावी लागेल अशी धमकी जीनांनी आधीच देऊन ठेवली होती. त्यासाठी ते काही तरी सबब शोधतच होते. तथापि ज्या काही सवलती मिळवावयाच्या त्या मान्य करणे कॅबिनेट मिशन आणि व्हाइसरॉय यांच्याच हाती असल्यामुळे दोषाचे सर्व खापर त्यांच्यावर फोडून त्यांना चालणार नव्हते. जुलै महिन्यात भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या अधिवेशनामुळे जीनांना हवी असलेली संधी आयतीच मिळाली.

हे अधिवेशन दिनांक ६ जुलै रोजी मुंबईस भरले होते. नेहरूंनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. दिनांक १६ मेच्या कॅबिनेट मिशनच्या योजनेला मान्यता देण्या-संबंधीचा मुख्य ठराव मौलाना आझाद यांनी मांडला. वर्किंग कमेटीने तो अगोदर पास केलेलाच होता. त्या योजनेत अनेक त्रुटी आहेत. ज्या प्रकारच्या घटनेची तरतूद त्या योजनेनुसार करण्यात आलेली आहे तिच्यामुळे भारतीय जनतेला सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात झपाट्याने आपली प्रगती करून घेता येणार नाही. उलट तिला आपला विकास करून घेण्याचे स्वातंत्र्य आणि संधी यावर काही प्रमाणात मर्यादाच पडणार आहेत. नियोजित केंद्रीय सत्ता अत्यंत दुर्बल राहणार असल्याने ती जगातील राष्ट्रांच्या आदरास पात्र ठरू शकणार नाही. प्रांताचे गट पाडण्याच्या पद्धतीमुळे मध्यवर्ती सत्तेवर निष्कारण मर्यादा पडणार असून वायव्य सरहद्द आणि आसाम या सारखे प्रांत आणि शिखांसारखे अल्पसंख्यांक यांच्यावर त्यामुळे अन्याय होणार आहे." असे नमूद करून ठरावात पुढे म्हटले होते की, तरीही शांततामय मार्गाने हिंदुस्तानची समस्या सुटावी आणि त्याच्याबरोबरचा इंग्लंडचा संघर्ष कायमचा मिटावा अशी इच्छा असल्यामुळे अखिल भारतीय काँग्रेसने त्या योजनेचा साकल्याने विचार केला. तिचे असे मत बनले आहे की, संपूर्ण योजना विचारात घेतली तर मध्यवर्ती सत्ता व्यापक आणि समर्थ बनविण्यास तिच्यात पुरेसा वाव आहे त्याचप्रमाणे गटांच्या बाबतीत आपल्या इच्छेनुरूप निर्णय घेण्याचे प्रांताचे अधिकार अबाधित राहू शकतील आणि ज्या अल्पसंख्यांकांवर अन्याय होण्याचा संभव आहे त्यांना संरक्षणही देता येणे शक्य आहे. ठरावात पुढे असे म्हटले होते की, तात्पुरत्या किंवा इतर सरकारच्या बाबतीत काँग्रेसजन, काँग्रेसचे राष्ट्रीय स्वरूप कधीही विसरू शकणार नाहीत. त्याच-प्रमाणे समान प्रतिनिधीत्वाचे अन्याय आणि ओढूनताणून आणलेले तत्त्व तसेच एकट्या जातीयवादी गटाचा नकाराधिकार कधीही मान्य करणार नाहीत.

ठराव मांडताना केलेल्या भाषणात आझादांनी हे स्पष्ट केले की, सर्वस्वी एकात्म स्वरूपाचे शासन व्यवहार्य ठरणार नाही हे खरे असले तरी स्वतंत्र भारताची घटना

कशी असावी ते ठरविण्याचा संपूर्ण अधिकार घटना समितीला राहील. देशाची फाळणी अत्यंत विघातक असल्याने संपूर्ण एकात्म भारत आणि देशाची फाळणी यातील मधला मार्ग काँग्रेसने अनुसरावयाचे ठरविले आहे. कॅबिनेट शिष्टमंडळाच्या योजनेमुळे संघराज्यात सामील होणाऱ्या घटकराज्यांचे मिळून बनणार असलेले मजबूत असे मध्यवर्ती सरकार अस्तित्वात आणून भारताचे ऐक्य कायम राखले जाईल.

संकल्पित घटना समिती ही प्रौढमताधिकारानुसार बोलावण्यात येणार नसून मतदानाचा अधिकार फार मर्यादित राहणार आहे. त्याचप्रमाणे स्वतंत्र मतदार संघही राहणार आहेत. म्हणून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने ही योजना फेटाळून लावावी. असे अनसार हरवानी यांनी आपल्या भाषणात सांगितले. जयप्रकाश नारायण यांनीही ठरावाला विरोध केला. स्वातंत्र्य आता नजरेच्या टप्प्यात आले आहे हे नेहरू, आझाद आणि पटेल यांचे म्हणणे त्यांनी खोडून काढले. भारताला स्वातंत्र्याचे दान करण्यासाठी मिशन येथे आलेले नसून काँग्रेस आणि आपला मित्रपक्ष मुस्लीम लीग यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी ते येथे आलेले आहे. असा त्यांनी युक्तिवाद केला आणि मुस्लीम लीगचे पावलोपावली काँग्रेस आणि लीग यांच्यात मतभेद निर्माण होतील आणि त्या प्रत्येक वेळी निर्णयासाठी ब्रिटिशांच्या तोंडाकडे पहावे लागेल. म्हणून काँग्रेसने वाटाघाटी करण्याचे सोडून देऊन नव्या लढ्याची तयारी सुरू करावी. जयप्रकाश नारायण पुढे म्हणाले की, 'काँग्रेसची संघटना प्रथम मजबूत करायची आणि तिची ताकद पुरेशी वाढली आहे असा विश्वास निर्माण झाला की, ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा सुरू करून त्याला भारत सोडून देण्यास भाग पाडणे एवढा एकच मार्ग आपल्याला उपलब्ध आहे.' सहजानंद सरस्वती, मुनशी अहमेदुद्दीन आणि रावसाहेब पटवर्धन यांनीही ठरावाच्या विरोधी भाषणे केली. आर. के. सिन्हा, महावीर त्यागी आणि एन. जी. रंगा ठरावाच्या बाजूने बोलले. दुसऱ्या दिवशी गांधींनी आपल्या भाषणात योजना स्वीकारण्याचे कळकळीचे आवाहन केले. ते म्हणाले, 'घटना समितीच्या योजनेत अनेक दोष आहेत याची मला जाणीव आहे. परंतु तिच्यात सुधारणा घडवून आणणे किंवा ती गाडून टाकणे हे शेवटी तुमच्याच हाती आहे. त्या योजनेत ज्या उणीवा आहेत त्या तुम्हाला दूर करता येतील.' अच्युत पटवर्धन यांनी असे मत व्यक्त केले की, काँग्रेसने काही दिवसांपूर्वी जी क्रिप्स योजना झिडकारली होती. तिच्यापेक्षा या योजनेत फारशी प्रगती झालेली नाही. प्रांतांचे गट करण्याबद्दल काँग्रेसने योजनेतील तरतुदीचा जो अर्थ लावला आहे तो लीग किंवा मिशन यापैकी कोणीच मान्य केलेला नाही. संकल्पित संघराज्याच्या सरकारचे अर्थव्यवहार किंवा आर्थिक धोरण यावर कसलेही नियंत्रण राहू शकणार नाही. एकदा आपण घटना समितीत गेलो की, नुसत्या भांडणातच आपण गुंतून पडणार आणि दुसरे काहीही काम आपल्या हातून पार पडणार नाही, याची मला पक्की खात्री आहे. अरुणा असफअल्लींनीही ठरावाला तीव्र विरोध दर्शवताना

ब्रिटिशांना हिंदुस्तानातून घालवून लावण्यासाठी आपण पुन्हा सामुदायिक लढा सुरू केला पाहिजे असे सांगितले. गांधींकडे वळून त्या म्हणाल्या 'आजवर आम्ही तुमचे ऐकत आलो आणि तुमच्या आज्ञांचे पालनही करीत होतो. परंतु आता तुम्ही आमचे ऐकले पाहिजे.' आपल्या उत्तराच्या भाषणात आझाद यांनी असा युक्तिवाद केला की, आपल्या पुढील समस्या सोडविताना व्यवहारी दृष्टीकोन स्वीकारणे यातच खरी मुत्सद्देगिरी आहे. जी आणि जशी संधी मिळेल तिचा आपण आपले उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी उपयोग करून घेतला पाहिजे...... कॅबिनेट मिशन इकडे येण्याच्याही आधीपासून आपण ब्रिटिश सरकारला बजावले होते की, एक तर आम्हाला आमचे स्वातंत्र्य देऊन टाका नाही तर लढयाला तोंड द्यायला तयार रहा...... मध्यवर्ती सरकारच्या हाती जोपर्यंत अर्थव्यवहार सोपविले जात नाहीत तोपर्यंत ते समर्थ बनू शकणार नाही असे सांगण्यात आले परंतु हे प्रश्न घटना समिती सोडवू शकेल. घटना समिती हा एक सापळा आहे असे म्हणण्यात काहीही तथ्य नाही. स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी आपण घटना-समितीची मागणी करीत होतो. कॅबिनेट मिशनने ती आता मान्य केली आहे..... योजना स्वीकारून वर्षानुवर्षाची जुनी जातीय समस्या आपण कायमची मिटवून टाकू. भारताची फाळणी करावी आणि वेगवेगळया राज्यघटना असलेली हिंदुस्तान आणि पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करावीत, अशी मागणी मुस्लीम लीग गेली कित्येक वर्षे करीत आहे. कॅबिनेट मिशनच्या दिनांक १६ मे च्या योजनेस लीगने मंजुरी दिल्यामुळे या दोन्ही मागण्या तिने सोडून दिल्यासारखेच आहे.

अधिवेशनाचा समारोप करताना ठरावावर करण्यात आलेल्या टीकेचा नेहरूंनी समाचार घेतला, ते आपल्या भाषणात म्हणाले,

अच्युत पटवर्धन यांनी उपस्थित केलेली शंका बरोबर आहे. परराष्ट्रीय व्यापार ताब्यात नसेल तर परराष्ट्र व्यवहाराच्या खात्याला काय अर्थ उरतो? परंतु आझाद यांनी सांगितल्याप्रमाणे काही तरी तर्कटे रचून त्यावरून मळमळते निष्कर्ष काढले जात आहेत. परंतु माझ्यापुरते बोलावयाचे तर मी असे मानतो की, परराष्ट्र व्यवहारात परराष्ट्रीय व्यापार अंतर्भूतच असतो. संरक्षण आणि दळणवळण यातही संरक्षणाशी संबंधित अशा सर्व बाबींचा समावेश होणार हेही तितकेच उघड आहे. संरक्षण म्हटले की, त्याबरोबर नानाविध उद्योग आलेच. परराष्ट्र व्यवहार, संरक्षण आणि दळणवळण या व्यतिरिक्त संघराज्याच्या सरकारला निधी उभा करण्याचा अधिकार असला पाहिजे. याचा अर्थ महसूल देणाऱ्या काही बाबींवर केंद्राचे नियंत्रण असले पाहिजे. या बाबी नेमक्या कोणत्या ते निश्चित करावे लागेल. जकाती, आयकर इत्यादींचा त्यात समावेश असेल हे मी धरून चालतो.

एका बाजूला असे सांगण्यात आले की, घटना समिती अगदी आपल्याला हवी होती तशी मिळाली आहे तर दुसऱ्या बाजूने असाही युक्तिवाद करण्यात आला

की, हा सगळा दंगे दिलायंगेचा मामला असून आपण त्याला फारसे महत्त्व देऊ नये. याबाबत माझे मत विचाराल तर मी असे म्हणेन की, आपल्याला हवी होती तशी ही घटना समिती खासच नाही. तिच्यात अनेक उणीवा आणि अडचणी निर्माण करून ठेवल्या आहेत आणि तिचा एकंदर नूर आपल्या विरोधीच आहे..... परंतु त्याचबरोबर हेही तितकेच उघड आहे की, ती अगदीच टाकावू नाही.

या घटना समितीतून काय निष्पन्न होईल ? कदाचित तिचे कामकाज फार काळ चालूही शकणार नाही—ती बरखास्त होईल. कदाचित तिच्यातून काही चांगले निघेल आणि आपण प्रयत्न करीत राहिलो तर तिच्यामार्फत आपले काही प्रश्न सुटूही शकतील आणि आपल्याला पाहिजे तशी आणि अमलात आणता येण्यासारखी एकादी घटना आपण कदाचित तयारही करू शकू. यापैकी काहीही होऊ शकते. परंतु कॅबिनेट मिशनने दहा वर्षानंतर आम्ही हे करणार आहोत आणि ते करणार आहोत असे आम्हाला सांगत सुटावे हे मला फार विचित्र वाटते. दहा वर्षानंतर हिंदुस्तानात काय होणार यासंबंधी कोणी काही सांगू लागला तर ते विचित्रच नव्हे काय ? हिंदुस्तान एकदा स्वतंत्र झाला की, आपल्या इच्छेनुरूप तो हवे ते निर्णय घेईल. पुढे काही वर्षानंतर हिंदुस्तान काय करील ते आज कोणी सांगू लागेल तर त्याला मूर्खातच काढावे लागेल. ......भविष्यात केव्हा तरी आपल्याला आपली स्वतःची क्रांतिकारी घटना समिती बोलवावी लागणारच नाही असे मी सांगू शकणार नाही. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की, ह्या घटना समितीचा आपण उपयोग करून घेऊ नये किंवा आपल्या फायद्यासाठी ती राबवू नये. घटना समितीतून आपण आपल्याला पाहिजे ते मिळवून घेऊ शकलो नाही तर आपल्याला आपल्या डावपेचात योग्य तो बदल करता येईल....... कॅबिनेट मिशनची एक दीर्घ मुदतीची आणि एक अल्प मुदतीची योजना आहे असे येथे बरेच सांगितले गेले. पण आपल्या बाबतीत मुळी कोणतीही योजना—मग ती दीर्घ मुदतीची असो नाहीतर अल्प मुदतीची असो—स्वीकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. घटना समितीत जायचे की नाही एवढाच आपल्या पुढचा प्रश्न आहे. त्यापेक्षा अधिक काही नाही. हिंदुस्तानच्या दृष्टीने फायद्याचे आहे असे वाटेल तोवर आपण घटना समितीत राहू. ज्याक्षणी आपल्याला असे वाटेल की, यापुढे घटना समितीत राहणे देशाच्या दृष्टीने हानीकारक आहे. त्याक्षणी आपण घटना समितीतून बाहेर पडू आणि पुन्हा लढ्याला सुरवात करू. सध्या घटना समितीत जायचे नाही एवढेच काय ते एक बंधन आपण पत्करणार आहोत. त्याव्यतिरिक्त अन्य कोणतीही जबाबदारी आपल्यावर येत नाही. अर्थात जे आपल्या आड येतील त्यांच्याशी आपल्याला दोन हात करावे लागतील. परंतु आपण क्रांतिकारी आहोत हे आपल्याला विसरून चालणार नाही. आणि त्याच बरोबर आपण मुत्सद्देगिरीचाही अवलंब करायला हवा. केवळ घोषणाबाजी करून आपली

जबाबदारी टाळता येणार नाही तर आपल्या पुढील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी आपल्याला ठेवावी लागेल. एकदा कायदे मंडळात गेलो की, लहान सहान प्रश्नातच आपण गुंतून पडतो आणि महत्त्वाच्या प्रश्नांकडे आपले दुर्लक्ष होण्याचा संभव असतो. तसा धोका जरी असला तरी एका विशिष्ट अवस्थे-पर्यंत येऊन पोहोचल्यानंतर आपल्या पुढील समस्या सोडविण्याची जबाबदारी अंगाबाहेर टाकता येणे आपल्याला केवळ अशक्य आहे.

दिनांक ९ जुलै रोजी लियाकत अलीखान यांनी आपण दिनांक २८ व २९ जुलै रोजी लीग कौन्सिलची बैठक बोलावीत असल्याचे जाहीर केले. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीतील नेहरू आणि आझाद यांच्या भाषणातील उतारे विस्तृतपणे उद्धृत करून त्यांनी असे म्हटले की लीगने दिनांक १६ मे चे निवेदन अगदी बिनशर्त स्वीकारले होते. काँग्रेसप्रमाणे त्याबाबत काहीही हातचे राखून ठेवलेले नव्हते. मध्यावधी सरकार बनविण्याच्या बाबतीत मिशनने आपला शब्द फिरवल्याबद्दल त्यांनी तीव्र टीका केली आणि शेवटी अशी मागणी केली की, ब्रिटिशांचे उद्देश नव्याने प्रसिद्ध केले जात नाहीत तोपर्यंत मुस्लीम लीगने घटना समितीत सामील होणे किंवा मध्यावधी सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने व्हाइसरॉय पुन्हा वाटाघाटी सुरू करणार असतील तर त्यात सहभागी होणे अगदीच निरर्थक ठरणार आहे.

दिनांक १८ जुलै १९४६ रोजी ब्रिटिश पार्लमेंटात, कॅबिनेट मिशनने ज्या हालचाली केल्या त्यासंबंधी चर्चा झाली. दोन्ही सभागृहात पेथिक लॉरेन्स आणि क्रिप्स यानी जवळजवळ एकसारखी निवेदने सादर करून हिंदुस्तानात झालेल्या वाटाघाटींचा गोषवारा कथन केला. त्या दोघांनी आपापल्या सभागृहात असे सांगितले की, सिमला परिषद अयशस्वी ठरल्यानंतर काँग्रेस आणि लीग या दोन्ही पक्षांनी काही शर्तींवर आपली त्रिस्तरीय घटनेसंबंधीची सूचना मान्य केली होती.

आपल्या निवेदनात त्यांनी पुढे असे म्हटले की, दोन्ही पक्षांनी त्या घटना समितीचे कामकाज चालू रहावे या हेतूने तेथे जाण्याचे प्रथम मान्य केले होते. काँग्रेसच्या बाजूने मध्यावधी सरकारचा दर्जा काय राहील आणि व्हाइसरॉयकडून त्याला कशी वागणूक दिली जाईल असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. दोन पक्षांना समान प्रतिनिधीत्व देण्यावर तिच्याकडून तीव्र आक्षेप घेण्यात आला होता. म्हणून अनुसूचित जातीचा एक व सवर्ण हिंदूंचे पाच मिळून काँग्रेसचे एकूण सहा, मुस्लीम लीगचे पाच आणि दोन इतर अशा सूत्राच्या आधाराने मध्यावधी सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न करण्यात आले. जीनांनी कदाचित हे सूत्र मान्य केले असते परंतु काँग्रेसचे यामुळे समाधान होऊ शकले नाही.

त्यामुळे वाटाघाटी पुरत्या फिसकटल्या. त्यातून एकच मार्ग निघण्यासारखा होता आणि तो म्हणजे वरील सूत्रात एका शीख प्रतिनिधीचा समावेश करून प्रती व्हाइसरॉयने कॅबिनेट मिशनच्या सल्ल्याने मध्यावधी सरकार नियुक्त करावयाचे.

यावेळी जीनांनी असा पवित्रा घेतला की, काँग्रेस निश्चित निर्णय घेईपर्यंत मुस्लीम लीग आपला निर्णय जाहीर करणार नाही. मुस्लीम लीग आणि सवर्ण हिंदू यांच्यात नव्या सूत्रानुसार प्रस्थापित होणारे समान प्रतिनिधीत्व त्याचप्रमाणे अल्पसंख्यांकांचा प्रश्न या दोन गोष्टी काँग्रेसला खटकतच होत्या.

इतक्या सर्व अडचणी असूनही काँग्रेस या सूत्राला मान्यता देण्यास बहुधा तयार झाली असती. परंतु दुर्दैवाने त्याचवेळी जीनांची काही पत्रे प्रसिद्ध झाली. त्यापैकी सगळ्यात महत्त्वाच्या एका पत्रात व्हाइसरॉयने बिगर लीगी मुसलमानाची नेमणूक केली तर मुस्लीम लीग ते कधीही खपवून घेणार नाही असे एक वाक्य होते. आपल्या यादीत थोडा फरक करून एका मुसलमानाचा अंतर्भाव करण्याची इच्छा काँग्रेसने व्यक्त केली होती. परंतु व्हाइसरॉय यांनी काँग्रेसला तशी परवानगी दिली नाही. काँग्रेस आपला आग्रह मागे घेण्यास तयार झाली असती परंतु जीनांच्या पत्रामुळे काँग्रेसच्या राष्ट्रीय स्वरुपालाच आव्हान दिल्यासारखे होत होते. आणि आपल्या यादीत मुसलमानाचा समावेश करण्याचा आपला हक्कच नाकारला जात आहे आणि ते कदापि सहन केले जाणार नाही अशी काँग्रेसने भूमिका घेतली कारण आपली संघटना ही राष्ट्रीय स्वरूपाची आहे असा प्रथमपासूनच काँग्रेसने आग्रह धरला होता आणि प्रांतिक कायदे मंडळासाठी तिने जे उमेदवार उभे केले होते त्यावरूनही काँग्रेसचे स्वरूप जातीय नसून राष्ट्रीय असल्याचेच सिद्ध होत होते.

त्यामुळे मुसलमानांच्या नेमणुकीबाबत लीगची मक्तेदारी व्हाइसरॉय किंवा मिशन मान्य करणार नाहीत हे जीनांना स्पष्टपणे सांगण्यात आले.

दोन्ही प्रमुख पक्षांनी किंवा त्यातील कोठल्याही एकाने जर संयुक्त सरकारला मान्यता दिली नाही तर कोणत्या मार्गाचा अवलंब करावयाचा याचा खुलासा आम्ही दिनांक १६ जूनच्या निवेदनात केला होता. त्यामुळे आता व्हाइसरॉयच्या त्या योजनेत फारसा बदल करणे आम्हाला शक्य नव्हते. कोठल्याही एका पक्षाने विरोध करावयाचा ठरवले तर संयुक्त सरकारचा पायाच ढासळून पडणार होता. अशा परिस्थितीत व्हाइसरॉय दिनांक १६ मेचे निवेदन मान्य असणाऱ्या सर्वांचे जास्तीत जास्त प्रातिनिधिक सरकार बनविण्याचा प्रयत्न करील असे त्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले होते.

शेवटी काँग्रेसने दिनांक १६ मेचे निवेदन मान्य करावयाचे परंतु मध्यावधी सरकारात जावयाचे नाही असा निर्णय घेतला. त्याबरोबर व्हाइसरॉय बनविणार असलेल्या प्रातिनिधिक सरकारात प्रवेश मिळण्याचा मुस्लीम लीग इतकाच तिलाही अधिकार प्राप्त झाला. वरील निर्णय कळविणारे काँग्रेस अध्यक्षांचे पत्र मिळाल्याबरोबर आम्ही जीनांची भेट घेऊन त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली. १६ जूनच्या योजनेला आता कसलाही अर्थ उरलेला नाही हे त्यांच्या लक्षात आणून दिले.

तोपर्यंत १६ जूनच्या योजनेबद्दल लीगने कोणताही निर्णय घेतलेला नव्हता. परंतु

काँग्रेसचा निर्णय झाल्याबरोबर लीगनेही तो मान्य करण्याचे ठरविले. परंतु लीगच्या दृष्टीने आता फार उशीर झाला होता. जीनांची बहुधा अशी समजूत झाली असावी की काँग्रेसने दिनांक १६ मेचा निर्णय स्वीकारल्यामुळे आपण फार अडचणीत आलो आणि आम्ही फक्त मुलीस्म लीगच्या सहकार्याने मध्यावधी सरकार आधीच बनवावयाला हवे होते.

पेथिक लॉरेन्स आणि क्रिप्स यांच्या या निवेदनाने जीनांच्या उरल्यासुरल्या आशाही धुळीला मिळाल्या. त्या दोघांनीही मध्यावधी सरकार बनविण्यात व्हाइसरॉयना जे अपयश आले त्याबद्दल जीनांनाच जबाबदार धरले आणि त्यातील मुसलमानांच्या नेमणुका या लीगच काय त्या करणार हा जीनांचा दावा आम्ही स्वीकारू शकत नाही असेही जाहीर केले. परंतु एवढ्यानेही जीनांचे दुर्दैव संपले नव्हते. त्यांचा सल्ला धुडकावून हैद्राबादच्या निझामाने नाझिमुद्दीन यांच्याऐवजी आपले दिवाण म्हणून सर मिर्झा इस्माइल यांची नेमणूक केली. सिंधमधील मुस्लीम लीगचे अल्पमताचे सरकार कायदे मंडळाचे अधिवेशन बोलावण्याची टाळाटाळ करून तेथील गव्हर्नरांनी कित्येक महिने कसेबसे टिकवून धरले होते. परंतु बहुमतात असलेल्या संयुक्त आघाडीच्या दबावामुळे गव्हर्नरांना तेथील कायदे मंडळाचे अधिवेशन जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात बोलवावेच लागले. पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांत जीनांच्या पाठीमागे नव्हतेच. सिंधही त्यांच्या हातातून जाणार होता. अशा परिस्थितीत वॅव्हेल यांनी नेहरू आणि जीना या दोघांनाही पत्रे पाठवून मध्यावधी सरकार बाबतच्या त्यांच्या सूचना मागविल्या. आपल्या उत्तरात नेहरूंनी पुन्हा मध्यावधी सरकारच्या अधिकाराचा प्रश्न उपस्थित केला. तर जीनांनी ३१ जुलैपर्यंत उत्तरच पाठवले नाही.

जुलैच्या २७ तारखेला लीगच्या कौन्सिलची बैठक झाली. त्यावेळी केलेल्या भाषणात जीनांनी अशी तक्रार केली की,

वाटाघाटीच्या वेळी तीन पक्षांपैकी एक जबाबदार संघटना म्हणून जर कोणाचे वर्तन झाले असेल तर ते मुस्लीम लीगचे असे जर मी म्हणालो तर त्याबाबत कोणाचे दुमत होईल असे मला वाटत नाही. आम्ही एकामागून एक सवलती देत गेलो ते भीतीपोटी नव्हे......या वाटाघाटीतून प्रतिष्ठितपणे जर कोणी कामगिरी बजावली असेल तर ती लीगनेच...... (क्रिप्स आणि पेथिक लॉरेन्स यांनी) काँग्रेसला दूरगामी योजना स्वीकारण्यास राजी केले. त्यासाठी तिच्या शर्ती त्यांनी मान्य केल्या आणि आपण १६ जूनची मध्यावधी सरकारची योजना सोडून देऊ असे आश्वासनही काँग्रेसला दिले. बुडत्याने काडीचा आधार घेण्याचा प्रयत्न करावा तशातलाच हा प्रकार होता. आपले प्रयत्न संपूर्णतया असफल ठरलेले नाहीत असे दाखविण्याचा त्यांचा हा केविलवाणा प्रयत्न चालला होता. प्रांतांच्या गटासंबंधीची योजना असलेला भाग आम्ही मानणार नाही असे नेहरूंनी त्यांना सांगितले होते.

मुस्लीम लीगच्या दृष्टीने योजनेतील सर्वात महत्त्वाचा भाग 'ब' आणि 'क'

गटांची निर्मिती हाच होता. आणि नेमक्या त्याच भागाला काँग्रेसचा विरोध होता. काँग्रेसचे म्हणणे असे होते की, 'ब' आणि 'क' गटात मोडणाऱ्या प्रांतांना योजनेत नमूद केल्याप्रमाणे गटाची आणि प्रांताची घटना तयार होऊन नव्या प्रांतिक घटने-नुसार निवडणुका झाल्यानंतर नव्हे तर अगदी सुरवातीलाच त्यांना गटाच्या बाहेर राहण्याची मुभा आहे. मध्यावधी सरकारच्या बाबतीत कॅबिनेट मिशनने दिलेला शब्द मोडला आहे. अवघ्या दहा दिवसात त्यांनी आपला शब्द फिरवला. काँग्रेस देवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी मध्यावधी सरकार स्थापन करण्याचे लांबणीवर टाकले आणि असे जाहीर केले आहे की, काँग्रेसने दीर्घ मुदतीची योजना स्वीकारली आहे परंतु खऱ्या अर्थाने याला योजना स्वीकारली असे म्हणताच येणार नाही. शिस्त, ऐक्य आणि आपल्या स्वतःच्या राष्ट्राच्या ताकदीवर भरवसा हे आपले ब्रीद वाक्य असले पाहिजे. आपण हे ब्रीद वाक्य डोळ्यासमोर ठेवून वागलो तर पुन्हा असहकार आणि लढा पुकारू अशी जी धमकी काँग्रेस देत आहे तिची भीती बाळगण्याचे कारण नाही अशी कॅबिनेट मिशन आणि ब्रिटिश सरकार यांची खात्री होऊन चुकेल आणि त्यांचा भयगंड दूर होईल. काँग्रेस असे धरून चालली आहे की, मुस्लीम लीगला डावलून आपण मध्यावधी सरकारात स्थानापन्न होणार. भले ती जावो. आम्हाला त्याची धास्ती वाटत नाही. त्याला कसे तोंड द्यावयाचे ते आम्हाला चांगले ठाऊक आहे. या सर्व घटनांवरून सिद्ध होते ते असे की, भारतापुढील समस्येवर एकच उपाय आहे आणि तो म्हणजे भारताची फाळणी!

अपेक्षेप्रमाणे लीग कौन्सिलच्या या बैठकीच्या काँग्रेस आणि सरकार यांच्याविरुद्ध आग ओकणारी प्रतिनिधींची जहरी भाषणे झाली आणि शेवटी दिनांक २९ जुलै रोजी दिनांक १६ मे च्या योजनेला पूर्वी दिलेली मान्यता काढून घेण्याचा ठराव एकमताने पास करण्यात आला. दुसऱ्या एका ठरावाने पाकिस्तान मिळविण्यासाठी प्रत्यक्ष प्रतिकार करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिनांक ३० जुलै रोजी लीगच्या वर्किंग कमिटीने दिनांक १६ ऑगस्ट रोजी 'प्रत्यक्ष प्रतिकार दिन, म्हणून पाळण्यात यावा असा ठराव केला आणि त्यासाठी लीगची एक कृती समिति नेमण्यात आली. त्या समितीला प्रत्यक्ष कृतीचा तपशीलवार कार्यक्रम आखण्याचा आदेश देण्यात आला. दुसऱ्या दिवशी जीनांनी मुंबईत एक वार्ताहर परिषद घेतली. त्यात त्यांनी १९४२ पेक्षाही अधिक तीव्र लढा सुरू करण्याची काँग्रेसने तयारी चालविली असून त्या-दृष्टीने कार्यकर्त्यांना गुप्त आदेश पाठविले असल्याचा काँग्रेसवर आरोप केला. लढा परिणामकारक व्हावा म्हणून आझाद हिंद फौजेतील माजी सैनिकांची मदत घेण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. जीनांनी पुढे असे म्हटले की, काँग्रेस आणि सरकार हे दोघेही आपापल्या परीने शस्त्रसज्ज आहेत. सरकारजवळ तोफा-बंदुका यासारखी शस्त्रे आहेत तर सामुदायिक लढ्याची धमकी हे काँग्रेस वापरीत असलेले आयुध आहे. अशा वेळी पाकिस्तानची मागणी मान्य करण्यास भाग पाडण्यासाठी आपली

शक्ती पणास लावून लढचाला तयार होण्याची वेळ आली आहे असे लीगला वाटते.

नेहरूंच्या दिनांक १० जुलैच्या पत्रकार परिषदेचा उल्लेख करून जीना म्हणाले की, काँग्रेसने असे जाहीर केले आहे की, तिने स्वतःला कशालाही बांधून घेतलेले नाही आणि घटनासमितीने सार्वभौम संस्थेत रूपांतर करून घेण्यासाठीच ती तिच्यात प्रवेश करीत आहे. लीगचा कोणत्याही घटना समितीला विरोध नाही. परंतु एकच सार्वभौम घटना समिती अस्तित्वात असेल तर तिनास एक इतके बहुमत असलेली एका राष्ट्राची बहुसंख्य जनता दुसऱ्या राष्ट्राच्या बहुसंख्य जनतेवर आपले निर्णय लादल्याशिवाय राहणार नाही हे अगदी उघड असल्यामुळे दोन सार्वभौम घटना समित्या निर्माण करण्यात याव्यात अशी मुस्लीम लीगची मागणी आहे, असा जीनांनी खुलासा केला. ते पुढे म्हणाले "अलिकडील १९४२ सालची प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ धरून काँग्रेसने वेळोवेळी जी आंदोलने केली या सर्वांच्या पाठीमागे मुस्लीम लीगला डावलून आपल्या मागण्या मान्य करण्यास ब्रिटिशांना भाग पाडणे हाच उद्देश होता. आताही तिचे नेमके हेच उद्योग सुरू आहेत आणि मिशनने त्यामुळेच काँग्रेसपुढे नांगी टाकली आहे." एका बातमीदारांनी ज्यावेळी त्यांना असा प्रश्न विचारला की "लीगची चळवळ हिंसक असेल की अहिंसक? त्यावर जीनांनी असे उत्तर दिले की 'मला नीतीअनीतीच्या वादात शिरावयाचे नाही.'

दिनांक २ ऑगस्ट रोजी वल्लभभाई पटेल यांनी एका पत्रकात जाहीर केले की, जीना प्रत्यक्ष कृती सुरू करण्याची जी धमकी देत आहेत ती वस्तुतः ब्रिटिशांविरुद्ध नसून काँग्रेसविरुद्धच आहे. कारण आपण हा देश सोडून जाण्यास तयार आहोत असे ब्रिटिशांनी आधीच जाहीर केले आहे. पटेल आपल्या त्या पत्रकात पुढे म्हणतात :

दीर्घ मुदतीच्या योजनेला दिलेली मान्यता काढून घेण्यासारखी अशी कोणती नवी परिस्थिती निर्माण झाली आहे असे मुस्लीम लीगला वाटते ते मला समजू शकत नाही. काँग्रेसने घटना समितीत जाण्याचे मान्य केले आहे. परंतु तेथे गेल्यावर योग्य वाटतील ते निर्णय घेण्यास ती स्वतंत्र आहे. असे नेहरूंनी वार्ताहर परिषदेत सांगितले होते. त्यासंबंधी जीनांनी तक्रार केली आहे, परंतु जीना हे विसरलेले दिसतात की, लीगच्या कौन्सिलने आपल्या दिल्लीच्या बैठकीत कॅबिनेट मिशनची योजना स्वीकारण्याचा निर्णय घेतला त्यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी असेच किंवा याहूनही कडक उद्गार काढले होते. त्यावेळी ते म्हणाले होते की, मुस्लीम लीग दीर्घकालीन योजना स्वीकारीत आहे कारण तिच्यायोगे पाकिस्तानचा पाया घातला जाणार आहे आणि त्या पायावरच संपूर्ण अशा पाकिस्तानची इमारत उभी करण्याची मुस्लीम लीग आशा बाळगून आहे.

त्याच भाषणात जीना असे म्हणाले होते की, काँग्रेसने पाकिस्तानची शर्करा-गुंठित गोळी गिळली आहे. दीर्घकालीन योजना स्वीकारणाऱ्या लीगच्या ठरावातही अशाच आशयाची भाषा आहे. असे असताना जीना काँग्रेस अध्यक्षांविरुद्ध आग

पाखंड कशी करू शकतात ? मुस्लीम लीगला नामोहरम करण्यास मी जबाबदार आहे असे सांगून काँग्रेसच्या वतीने मी कॅबिनेट मिशन बरोबर काही गुप्त कारस्थान केले असल्याचा आरोपही त्यांनी माझ्यावर केला आहे. परंतु हा आरोप सिद्ध करणारा कोठलाही पुरावा ते आजवर सादर करू शकलेले नाहीत. उलट मी तर असे म्हणेन की, काँग्रेसला अंधारात ठेवून त्यांनीच गुप्त समझोता करून काही आश्वासने मिळविली होती. परंतु ज्यांची परिपूर्ती होऊ शकणार नाही अशीच ती आश्वासने होती. त्यामुळे आता ती पुरी करण्यात आली नाहीत अशी तक्रार करीत सुटले आहेत आणि या सर्व प्रकारामुळे साहजिकच ते संतापले आहेत. काँग्रेसला काहीही दडवून ठेवावयाचे नाही. आपले काय म्हणणे आहे ते ती नेहमीच स्पष्टपणे सांगत आलेली आहे. जीनांनी काँग्रेसवर डाव करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात ते फजित पावले आहेत.

## प्रकरण २५

### छिन्नभिन्न पाकिस्तानचा जीनांकडून स्वीकार

दिनांक २२ जुलै १९४६ रोजी वॅव्हेल यांनी मध्यावधी सरकार बनविण्याचे आपले प्रयत्न पुन्हा सुरू केले. १४ सभासदांच्या संकल्पित सरकारात त्यांनी मुस्लीम लीगला ५ जागा देऊ केल्या. काँग्रेस किंवा लीगकडून सुचविण्यात आलेल्या यादीतील व्हाइस-रॉयांची मान्यता असलेल्या नावांना त्यांच्यापैकी कोणालाही दुसऱ्याच्या यादीतील नावावर आक्षेप घेता येणार नाही असे वॅव्हेल यांनी जीनांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले होते. खाते वाटपाच्या बाबतीत दोन्ही पक्षांना महत्त्वाची खाती समान प्रमाणात देण्यात येतील असे आश्वासन देऊन महत्त्वाच्या जातीय प्रश्नांवर दोन्ही प्रमुख पक्षांची अनुमती असेल तरच निर्णय घेण्याचा संकेत रुढ करण्याचे काँग्रेसने मान्य केले तर आपण त्याचे स्वागत करू, परंतु तसे औपचारिक बंधन आपण स्वीकारणार नाही असेही त्यांनी जीनांना कळवले होते. दिनांक ३१ जुलै रोजी जीनांनी या निमंत्रणास नकार कळवणारे पत्र व्हाइसरॉय यांना पाठवले. काँग्रेस ही केवळ सवर्ण हिंदूंची प्रतिनिधी असून अनुसूचित जातीच्या प्रतिनिधीची नियुक्ती करण्याची तिला परवानगी असता कामा नये असा आग्रह धरून काँग्रेस आणि लीग या दोन पक्षांना किंवा सवर्ण हिंदू आणि मुसलमान यांना समान प्रतिनिधीत्व देण्याचे नाव सोडून देण्यास त्यांनी हरकत घेतली. त्याचप्रमाणे मुस्लीम लीगला न कळवता किंवा तिचा सल्ला न घेता मुसलमानेतर अल्पसंख्य सभासदांची नेमणूक करण्यासाठी जीनांनी विरोध दर्शविला. महत्त्वाच्या जातीय प्रश्नांवरील निर्णयाच्या संदर्भात संकेत रूढ करण्याची सूचना हा दिनांक २० जून रोजी दिलेल्या आश्वासनाचा भंग आहे असे जीनांनी कळविले.

मध्यावधी सरकार बनविण्याच्या बाबतीत त्या वॅव्हेलच्या पत्राला नेहरूंनी दिनांक २३ जुलै रोजी उत्तर पाठविले. व्हाइसरॉयांनी मध्यावधी सरकारचे केवळ घटना-प्रमुख म्हणून वागावे आणि मुसलमानांव्यतिरिक्त इतर अल्पसंख्यांकाचे प्रतिनिधीं स्वतः नेमण्याचा आग्रह धरू नये या काँग्रेसच्या पूर्वीच्याच मागण्यांचा नेहरूंनी त्यात पुनरुच्चार केला. त्यामुळे वॅव्हेल अतिशय संतापले आणि त्यांनी मध्यावधी सरकारच्या कार्यपद्धतीत कोणताही बदल करावयाचा असेल तर लीगला तो मान्य असेल तरच त्यास मान्यता दिली जावी, त्याचप्रमाणे दिनांक १६ मेचे निवेदन बिनशर्त आणि काहीही हातचे राखून न ठेवता काँग्रेस मान्य करणार नसेल तर त्या योजनेतील

घटना समिती कार्यान्वित करण्याच्या भागाबाबत फेरविचार करावा लागेल असे नेहरूंना भेटून त्यांना समक्ष सांगण्याची परवानगी भारत मंत्र्यांकडे मागितली. परंतु भारत मंत्र्यांनी त्यांना तशी परवानगी देण्याचे नाकारले. दिनांक ३१ जुलैच्या उत्तरात वॅव्हेल यांनी योजनेतील सक्तीच्या गटपद्धतीला एकदा संधी देऊन पाहण्याची नेहरूंना गळ घातली. त्याचबरोबर मध्यावधी सरकारच्या कार्यपद्धतीबाबत यापूर्वी दिलेल्या आश्वासनांच्या पलिकडे आपल्याला जाता येणार नाही असाही त्यांनी खुलासा केला. त्यानंतर वल्लभभाई पटेल यांनी मध्यावधी सरकारच्या दर्जाबाबत आग्रह न धरता व्हाइसरॉय यांनी आमंत्रित केले तर सरकारात जावे असे नेहरूंना आणि वर्किंग कमिटीला पटवून दिले.

या नव्या घडामोडीमुळे वॅव्हेल उल्हसित झाले आणि त्यांनी नेहरूंना मध्यावधी सरकार बनविण्यासाठी पाचारण करण्याची पेथिक लॉरेन्स यांच्याकडून परवानगी मिळविली. त्यांनी असेही सुचविले की, सरकारमध्ये सामील होण्याबाबत नेहरूंनी जीनांच्या बरोबर बोलणी करावीत. दिनांक ८ ऑगस्ट रोजी वॅव्हेल यांनी जीनांना असे कळविले की, '२९ जुलैचा लीगचा ठराव लक्षात घेता मी आता मध्यावधी सरकारबाबतच्या आपल्या योजना सादर करण्यासाठी काँग्रेसला पाचारण करण्याचे ठरविले आहे आणि त्यांच्याकडून संयुक्त सरकार बनविण्याच्या दृष्टीने योग्य सूचना आल्या तर तुमच्याकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळेल अशी माझी खात्री आहे. दिनांक १२ ऑगस्ट रोजी नेहरूंनी मध्यावधी सरकार बनविण्याची तयारी दर्शविली त्याचप्रमाणे जीनांबरोबर बोलणी करण्याचेही मान्य केले. काँग्रेसला आपल्यातर्फे मध्यावधी सरकारात मुसलमानाचा समावेश करण्याचा अधिकार असावा की नाही या मुद्यावर बोलणी फिसकटली. नेहरूंनी लीगच्या असहकाराबद्दल खेद व्यक्त केला आणि काँग्रेस अजूनही लीगबरोबर समझोता करण्यास तयार आहे असे एका पत्रकार परिषदेत सांगितले. लीगकडून जरूर ते सहकार्य मिळाले नाही असे सांगण्याऐवजी लीग शरणागती पत्करण्यास तयार नव्हती असे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सांगितले असते तर ते सत्याला अधिक धरून झाले असते असे जीनांनी नेहरूंच्या या मुलाखतीला उत्तर देतांना सांगितले. दिनांक २२ ऑगस्ट रोजी मध्यावधी सरकार बनविण्यासाठी नेहरूंनी जी नावे सुचविली होती त्यांना वॅव्हेल यांनी संमती दर्शविली. त्यांनी फक्त फजलूल हक यांच्या नावाला हरकत घेतली आणि त्याबाबत चर्चा केल्यानंतर नेहरूंनीही ते नाव मागे घेतले. त्यानंतर दोन दिवसांनी इंग्लंडच्या राजाच्या वतीने मध्यावधी सरकारची घोषणा करण्यात आली. जीनांच्या हटवादी धोरणामुळे काँग्रेसला आपले स्वतःचे नेते सरकारात पाठवता आले इतकेच नव्हे तर मुसलमानांसकट इतर अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींचाही त्यात समावेश करून घेता आला.

दिनांक २७ ऑगस्ट रोजी वॅव्हेल यांनी 'गांधी आणि नेहरू' यांची भेट घेऊन काँग्रेसने सक्तीच्या गटपद्धतीसकट कॅबिनेट मिशनची योजना पूर्णांशाने आणि जशीच्या तशी

स्वीकारली नाही तर आपण घटना समितीचे अधिवेशन बोलावणारच नाही अशी धमकी दिली. परंतु वर्किंग कमेटीने वॅव्हेल यांच्या पुढे मान तुकविण्याचे नाकारले आणि त्यांना असे कळविले की, काँग्रेसने कॅबिनेट मिशनची योजना आधीच स्वीकारलेली आहे. परंतु प्रांतिक स्वायत्तता हा योजनेचा गाभा असल्याने गटात सामील व्हावयाचे की नाही हे ठरविण्याचा प्रत्येक प्रांताला अधिकार असला पाहिजे हे ओघानेच येते. दिनांक १६ मेच्या निवेदनाचा अर्थ लावण्याच्या बाबतीत फेडरल कोर्टाचा निर्णय बंधनकारक मानण्याची वर्किंग कमेटीने तयारी दर्शविली. वॅव्हेल यांच्या रोज-निशीतील दिनांक ३१ ऑगस्टच्या नोंदीवरून असे दिसून येते की, पेथिक लॉरेन्स हे अत्यंत अस्वस्थ होऊन गेले होते आणि काँग्रेसशी वितुष्ट होईल असे कोणत्याही परिस्थितीत काहीही बोलू अथवा करू नका अशा सूचना त्यांनी वॅव्हेल यांना देऊन ठेवल्या होत्या. दिनांक २ सप्टेंबर रोजी नेहरूंच्या नेतृत्वाखाली मध्यावधी सरकार स्थापन झाले. ब्रिटिश मंत्रिमंडळ काँग्रेसबरोबर आपल्याला कसलाही झगडा करू देणार नाही हे वॅव्हेल समजून चुकले. आणि घटना समितीची पहिली बैठक दिनांक ९ डिसेंबर रोजी बोलावण्याचे वॅव्हेल यांनी दिनांक १६ सप्टेंबर रोजी मान्य केले- दरम्यान मुस्लीम लीगला सरकारात घेण्यास संमती देण्यासाठी काँग्रेसचे मन वळ-विण्याचे आपले प्रयत्न त्यांनी चालूच ठेवले होते.

मुस्लीम लीग १६ ऑगस्ट हा प्रत्यक्ष कृती दिन म्हणून पाळणार होती. बंगालचे लीगचे पंतप्रधान सुऱ्हावर्दी यांनी तो दिवस सार्वजनिक सुट्टीचा म्हणून जाहीर केला. त्या निमित्ताने कलकत्त्यात न भूतो न भविष्यती अशी दंगल उसळली आणि पुढे कित्येक दिवस ती चालूच राहिली. त्या दंगलीत ५,००० लोक मारले गेले. आणि १५,००० जखमी झाले. दिनांक २६ ऑगस्ट रोजी वॅव्हेल यांनी कलकत्त्याला भेट दिली. त्यावेळी बंगाल सरकारचे मुख्य सचिव आणि लष्कराचे स्थानिक अधिकारी यांनी त्यांच्यापाशी अशी तक्रार केली की, दंगली हाताळताना सुऱ्हावर्दींचे वर्तन जातीय पक्षपात करणारे होते. दिनांक २० सप्टेंबर रोजी बंगाल कायदेमंडळात कायदा व सुव्यवस्था या खात्याचे मंत्री असलेले सुऱ्हावर्दी त्याचप्रमाणे मंत्रिमंडळ यांच्या-विरुद्ध काँग्रेस पक्षाने आणलेले अविश्वासाचे ठराव चर्चेला आले. ठरावावरील चर्चेला उत्तर देताना सुऱ्हावर्दींनी असे सांगितले की, १६ ऑगस्टला प्रत्यक्ष कृतीची सुरवात व्हावयाची नव्हती, तर त्या दिवशी फक्त निदर्शने करावयाची होती. प्रत्यक्ष कृतीची मुसलमानांची त्या दिवशी तयारी नव्हती त्याचप्रमाणे तिचे स्वरूप काय राहणार याचीही त्यांना जाणीव नव्हती......ब्रिटिश सरकारने मुसलमानांचा जो विश्वास-घात केला, त्यांच्याशी जे धरसोडीचे वर्तन केले त्यामुळे संतापाने ते नुसते धुमसत होते. १६ ऑगस्टचा दिन यशस्वी ठरला तर पाकिस्तान अस्तित्वात येईल असा गैरसमज हिंदूंनी करून घेतल्यामुळे तो यशस्वी होऊ द्यावयाचा नाही असा बंगाल आणि कलकत्त्यातील हिंदूंनी निर्धार केला याबद्दल त्यांची कीव करावी तेवढी थोडीच

म्हटली पाहिजे. संघर्ष शक्य तो टाळावा म्हणून त्यादिवशी सुट्टी जाहीर करण्यात आली होती असे सांगून सुऱ्हावर्दी पुढे म्हणाले की, अशी सुट्टी जाहीर केली म्हणजे हिंदू देखील आपापली दुकाने आपण होऊन बंद करतील आणि मुसलमानांना त्यासाठी त्यांचे मन वळवावे लागणार नाही अशी मला आशा वाटत होती.

तारीख ३ सप्टेंबर रोजी पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत जीनांनी असे वक्तव्य केले की, व्हाइसरॉयच्या वर्तनाने शेफारलेल्या हिंदूंनी मुस्लीम लीग आणि तिचे मंत्रिमंडळ यांना बदनाम करण्यासाठी रचलेला या दंगली हा एक कट होता...... कलकत्त्यातील परिस्थितीबद्दलची आपली जबाबदारी व्हाइसरॉय, गांधी किंवा कॉंग्रेस यांना झटकून टाकता येणार नाही. कॉंग्रेस राजवटीत मुसलमानांवर असाच जुलुम करणार असतील, त्यांना दडपून टाकणार असतील आणि त्यांचा छळ करणार असतील तर दंगलींना आवर घालणे फार कठीण होऊन बसणार आहे. त्यानंतर आठवडाभराने दुसऱ्या एका पत्रकार परिषदेत जीनांनी असे सांगितले की, सरकारशी शांततामय असहकार हे आमच्या कृतीचे प्रत्यक्ष स्वरूप राहील. अद्याप त्याची सुरवात झालेली नाही. त्याचा तपशील त्यासाठी नेमण्यात आलेली एक खास समिती दिल्ली येथे तयार करीत आहे. सध्याची शांतताभंगाची परिस्थिती म्हणजे प्रत्यक्ष यादवी युद्ध नसले तरी ती त्यांपासून फार दूर नाही. मध्यावधी सरकार आमच्यावर लादण्यात आल्यामुळे त्याच्या विरूद्ध मुस्लीम लीगने केलेल्या निदर्शनाच्या दिवशीच नेमक्या दंगली घडून याव्यात याला आम्ही जबाबदार नाही. शांततामय निषेध करण्याचा हक्क आम्ही बजावत असून या दंगली आम्ही सुरू केल्या नाहीत तर आमच्या निषेधाची परिणामकारकता घालवून मुस्लीम लीगला निरुत्साही करण्यासाठी आधी ठरवून संघटितपणे उचलण्यात आलेले हे पाऊल आहे.

१० ऑक्टोबर रोजी पूर्व बंगालमधील नोआखाली आणि तिपेरा भागात यापेक्षाही भीषण दंगल उसळली. शेवटी शांतता स्थापित करून तेथील जनतेच्या मनात पुन्हा विश्वास निर्माण करण्यासाठी स्वतः गांधींना नोआखालीला जाऊन प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली. गुलाम सरवर यांच्या नेतृत्त्वाखालील सुमारे हजार लोकांच्या एका भल्या मोठ्या टोळीने ही दंगल सुरू केली होती. त्या टोळीतील लोक लहान लहान गटांनी खेड्या-खेड्यात जात, तेथील हिंदूंच्या मनात दहशत निर्माण करून त्यांची चीजवस्तु लुटीत व त्यांच्या घरादारांना आगी लावीत सुटत. त्यामुळे आपली घरेदारे सोडून सुरक्षिततेसाठी आलेल्या हजारो निर्वासितांची समस्या निर्माण झाली. पूर्व बंगालच्या एका खेड्यातील मदत केंद्रात काम करीत असलेल्या कु. मुरिएल लेस्टर यांनी तारीख ६ नोव्हेंबर १९४६ साली असे लिहून ठेवले आहे की,.. सगळ्यात दयनीय अवस्था स्त्रियांची झाली. आपले नवरे डोळ्यादेखत मारले जात असताना त्यांच्यापैकी अनेकींना पहावे लागले आणि नंतर सक्तीने धर्मांतर करून त्यांना मारणाऱ्यांपैकीच काही जणांशी निका लावावा लागला. त्यांचे चेहरे कमालीचे भकास

दिसत..... आपल्या प्राणांच्या मोबदल्यात हजारो लोकांना बळेबळे गोमांस खाऊन इस्लामवर आपली श्रद्धा असल्याचे कबूल करावे लागले..... या हत्याकांडा-बाबत कोणती एक गोष्ट निश्चितपणे सांगता येण्यासारखी असेल तर ती म्हणजे हे उठाव खेडूत जनतेने उस्फूर्तपणे घडवून आणलेले नव्हते.

सप्टेंबर महिन्यात मुंबईतही जातीय दंगा सुरू झाला. त्यात पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आणि भोसकाभोसकीत मिळून ३६० लोक दगावले आणि १,१०० वर जखमी झाले. तारीख १७ ऑक्टोबर रोजी वॅव्हेल यांनी मुंबईला भेट दिली त्यावेळी तेथील पोलिस कमिशनरांनी त्यांना असे सांगितले की, प्रतिस्पर्धी जातीय संघटनांनी आणि विशेषतः हिंदू महासभेने दंग्याला चिथावणी दिली. परंतु सरकारने अत्यंत कडक धोरण स्वीकारून सहा हजारावर लोकांना गिरफदार केले. त्यात निम्म्याहून अधिक हिंदू होते.

जातीय विद्वेषाचे असे वातावरण सर्वत्र पसरलेले असतानाच व्हाइसरॉय आणि काँग्रेस पुढारी यांच्याबरोबर अनेकवार बोलणी झाल्यानंतर मुस्लीम लीगने मध्यावधी सरकारात सहभागी होण्याचे मान्य केले. पुढे २६ ऑक्टोबर रोजी ज्या परिस्थितीत काँग्रेस-लीग संयुक्त सरकार स्थापन झाले ती लक्षात घेता त्या दोन पक्षात सलोखा निर्माण होण्याची किंवा भारत अखंड राहण्याची सूतराम शक्यता उरलेली नव्हती.

मुस्लीम लीग कौन्सिलने १६ मेचे निवेदन स्वीकारण्याचा आपला पहिला निर्णय बदलला याबद्दल पटेल यांनी अत्यंत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली होती. या संदर्भात तारीख २ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात त्यांनी असे म्हटले होते की,

> काँग्रेस आणि लीग यांची उद्दिष्टे परस्पर विरोधी असल्यामुळे त्यांचे संयुक्त सरकार बनण्याची यत्किंचितही शक्यता नाही हे मी स्पष्ट करू इच्छितो. असे सरकार बनविण्याचा प्रयत्न झाला तर तो अत्यंत विघातक ठरेल. युद्ध काळात इंग्लंडमध्ये मजूर आणि हुजूर या दोन पक्षांचे संयुक्त सरकार होते हे खरे परंतु तेथे त्या दोघां-चेही उद्दिष्ट जर्मनीचा आणि जपानचा पाडाव करणे हे एकच होते. परंतु इथे हिंदुस्तानात जीनांना हिंदुस्तान आणि पाकिस्तान अशी भारताची फाळणी करा-वयाची आहे तर संघराज्यात्मक अखंड भारत हे काँग्रेसचे उद्दिष्ट असून त्यासाठी ती प्रयत्नशील आहे असे असताना हे दोन पक्ष एकत्र कसे येऊ शकणार ? त्यांच्यात तर कोठलेही समान उद्दिष्ट नाही.

जीनांना अनुसूचित जातींबद्दल एकदम जो एवढा उमाळा आला होता त्याचा उल्लेख करून पटेल म्हणाले की, मध्यावधी सरकारात त्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात योग्य ते प्रतिनिधीत्त्व देण्यास आजवर जीनाच सतत विरोध करीत आले आहेत त्याचप्रमाणे पारशी वगैरेसारख्या इतर अल्पसंख्यांकांनासुद्धा कसलेही प्रतिनि-धीत्त्व देता कामा नये असा त्यांचा आग्रह होता.

तारीख १२ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात जीनांनी अशी तक्रार केली की,

लीगने १६ मे आणि १६ जूनची निवेदने स्वीकारली असूनही कॅबिनेट मिशनने मध्यावधी सरकार बनविण्याची योजना रद्द केली. त्याचप्रमाणे घटना समितीची निवडणूक पुढे ढकलण्याची लीगची मागणीही व्हाइसरॉयनी फेटाळून लावली. त्यामुळे अखेर लीगने निवडणुका लढविण्याचे ठरविले आणि मुसलमानांच्या जागांपैकी ९५ टक्के जागा जिकल्या. घटना समितीवर प्रतिनिधी पाठविण्यासाठी झालेल्या निवडणुकीच्या वेळी स्वतंत्र मतदार संघातून निवडून आलेल्या मुसलमानांसकट आपल्या सर्व सभासदांना सुरुवातीपासूनच 'क' गटाशी कोठल्याही प्रकारचा संबंध न ठेवण्याचा आदेश आसाम कायदेमंडळाने आपल्या प्रतिनिधींना दिला. १६ मेच्या निवेदनातील मूलभूत शर्तींचा हा उघडउघड भंग होता असे त्या पत्रकात जीनांनी पुढे म्हटले होते. एकीकडे मुस्लीम लीगला सहकार्याचे आवाहन केले जात असतानाच दुसरीकडे घटना समिती ही सार्वभौम आहे असे काँग्रेस वर्किंग कमेटी म्हणून चालली आहे तसेच काँग्रेसच्या या भूमिकेमुळे तिला १६ मेच्या निवेदनात घालून दिलेली कार्यपद्धती आणि मर्यादा यांचे उल्लंघन करता येणे शक्य आहे असेही त्यांचे म्हणणे होते. तारीख १८ रोजी आणखी एक पत्रक काढून जीनांनी असे जाहीर केले की, मध्यावधी सरकारातील १४ जागांपैकी नेहरूंनी देऊ केलेल्या ५ जागा मुस्लीम लीगला स्वीकारता येणे शक्य नव्हते कारण त्यामुळे आपल्या स्वतःच्या प्रतिनिधींव्यतिरिक्त काँग्रेसला तीन जादा मते मिळू शकली असती तर लीगच्या बाजूने मात्र एकच मत पडू शकले असते. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली मध्यावधी सरकारची स्थापना करण्यात येत असल्याची घोषणा झाल्यानंतर तारीख २४ ऑगस्ट रोजी आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात वॅव्हेल यांनी मुस्लीम लीगला उद्देशून असे आवाहन केले की,

घटना समितीचे काम शक्य तितक्या लवकर सुरू होणे हे देखील अत्यावश्यक आहे. १६ मे च्या निवेदनात प्रांत आणि गट यांच्या घटना तयार करण्याच्या बाबतीत जी कार्यपद्धती ठरवून दिली आहे तिचे प्रामाणिकपणे पालन केले जाईल, त्याच निवेदनातील १५ व्या परिच्छेदात घटना समितीसाठी जी मूलभूत तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत त्यात बदल केला जाणार नाही किंवा महत्त्वाच्या जातीय प्रश्नांबाबत दोन्ही प्रमुख जमातींचे बहुमत असल्याशिवाय कोणताही निर्णय घेतला जाणार नाही असे आश्वासन मुस्लीम लीगला देण्यात आलेले आहे याचे मी तुम्हाला स्मरण करून देऊ इच्छितो. त्याचप्रमाणे मी आपल्याला हेही सांगू इच्छितो की, निवेदनातील तरतुदींचा अर्थ लावण्याच्या बाबतीत वाद उपस्थित झाल्यास तो फेडरल कोर्टाकडे सोपविण्यास काँग्रेसने मान्यता दिलेली आहे. अशा परिस्थितीत आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याची आणि भारतातील मुसलमानांचे भवितव्य घडविण्याची फार मोठी संधी मिळणार आहे म्हणून योजनेत सहभागी न होण्याच्या आपल्या निर्णयाचा मुस्लीम लीग फेरविचार करील असा मला मनापासून विश्वास वाटतो.

वॅव्हेल यांच्या आकाशवाणीवरील भाषणाचा समाचार घेणारे पत्रक जीनांनी लगेच तारीख २६ ऑगस्टला प्रसिद्ध केले. वॅव्हेल यांचे हे भाषण मुस्लीम लीग आणि मुस्लीम हिंदुस्तानवर जबर प्रहार करणारे होते असे प्रतिपादन करून त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, अर्थाबद्दल वाद उपस्थित झाल्यास तो फेडरेल कोर्टापुढे सोपविण्याची कोणतीही तरतूद १६ मेच्या निवेदनात करण्यात आलेली नाही. प्रांतांची आणि गटाची घटना तयार करण्याबाबतचा प्रश्न हा अगदी मूलभूत स्वरूपाचा असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही या आपल्या मुद्याचाही जीनांनी त्या पत्रकात पुनरुच्चार केला. आणि शेवटी त्यांनी असे म्हटले की, व्हाइसरॉयनी केलेले आवाहन हे जर खरोखरीच प्रामाणिकपणाने आणि मनापासून केलेले असेल तर ते त्यांनी आपल्या वृत्तीने आणि वर्तनाने प्रथम प्रत्यक्षात आणून दाखवावे.

तारीख ७ सप्टेंबर रोजी नेहरूंचे आकाशवाणीवर भाषण झाले :—

"घटना समिती हा भांडणाचा आखाडा आहे असे आम्ही मानीत नाही. एखादा विचार सक्तीने दुसऱ्यावर लादण्याचेही ते स्थळ नव्हे. तसे झाले तर आपण अखंड आणि समाधानी अशा भारताची उभारणी करू शकणार नाही. कोठल्याही प्रश्नावर सर्वसंमत आणि एकसंघ तोडगा निघावा आणि त्यापाठीमागे सर्वांच्या जास्तीत जास्त सदिच्छा असाव्यात असे आम्हाला वाटते. कोणताही विवाद्य प्रश्न सोडविण्यासाठी समान आधार शोधून काढावयाचा अशा निर्धाराने आम्ही घटना समितीत पदार्पण करीत आहोत. आणि म्हणून आजपर्यंत काहीही जरी घडले असले तरी आणि कितीही कटू शब्द उच्चारले गेले असले तरी सहकार्याचा मार्ग आम्ही मोकळा ठेवला असून आमच्याशी ज्यांचे मतभेद आहेत अशांना देखील बरोबरीचे भागीदार म्हणून घटना समितीत सहभागी होण्याचे आम्ही आवाहन करीत आहोत. त्यासाठी आम्ही त्यांच्यावर कोणतीही बंधने लादू इच्छित नाही. कुणी सांगावे आपण एकत्र आलो आणि समान प्रश्नांना हात घालण्याचा प्रयत्न करू लागलो की आपल्या पुढील अडचणी कदाचित हळूहळू नाहीशाही होऊ लागतील.

या आवाहनाला प्रतिसाद देण्याऐवजी लंडन येथे त्रिपक्ष परिषद बोलावून हिंदुस्तानचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने नव्याने प्रयत्न करावेत अशी जीनांनी मागणी केली. कॅबिनेट मिशनचे सभासद हे अगदीच दुय्यम दर्जाचे होते असे त्यांचे जीनांनी वर्णन केले. त्यांनी मुसलमानांची अशी अवस्था करून टाकली की, त्यामुळे एक तर हिंदू व मुसलमान या दोघांचाही विनाश करणारे यादवी युद्ध किंवा येथील नेते आणि ब्रिटिश सर्वोच्च अधिकारी यांच्यात वाटाघाटी होऊन निघणारी शांततामय तडजोड, याखेरीज मुसलमानांपुढे अन्य पर्याय राहिला नाही असे जीनांनी सांगितले. तथापि 'कोणतीही योजना आमची पाकिस्तानची मागणी सिद्ध होण्यास कितपत उपयोगी पडेल याचाच मी विचार करीन' असा इशारा देऊन जीना म्हणाले की, पाकिस्तानला बगल देऊन संबंध उपखंडावर हिंदूंचे राज्य प्रस्थापित करणारे अखंड

हिंदुस्तान कसे निर्माण होईल हीच काँग्रेसची दृष्टी राहणार.'

वॅव्हेल यांच्या निमंत्रणावरून ता. १६ सप्टेंबर रोजी जीनांनी त्यांची भेट घेतली. वॅव्हेल यांच्या रोजनिशीतील नोंदीनुसार या मुलाखतीच्या वेळी जीना हे अपेक्षेपेक्षा बरेच सौम्य झालेले दिसले. त्यांची जीनांबरोबर २५ सप्टेंबरला दुसरी बैठक झाली. तत्पूर्वी त्यांनी नेहरूंजवळ असा खुलासा केला होता की, सत्तेचा समतोल राखण्यासाठी सरकारी गट म्हणून आपण लीगला केंद्र सरकारात आणण्याचा प्रयत्न चालविलेला नाही तर मंत्रिमंडळ एकदिलाचे असावे असाच आपला हेतू आहे. जीनांबरोबरच्या भेटीत वॅव्हेल यांना असे आढळून आले की स्वतःच्या प्रतिष्ठेला बाधा न येता तडजोडीचा एकादा मसुदा निघाला तर जीना तो स्वीकारण्याच्या मनस्थितीत आहेत म्हणून संकल्पित संयुक्त सरकारांतून राष्ट्रवादी मुसलमानांचे नाव वगळण्यासाठी त्यांनी नेहरूंचे मन वळविण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु नेहरूंनी त्यांची ही सूचना तात्काळ धुडकावून लावली. तारीख २८ सप्टेंबर रोजी वॅव्हेल यांनी पुन्हा एकदा जीनांची भेट घेऊन त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली. त्यावेळी वॅव्हेल यांनी आपल्या रोजनिशीत अशी नोंद करून ठेवली की, वाटाघाटी निष्फळ ठरू देण्यापेक्षा शेवटी ते राष्ट्रवादी मुसलमान राहू देण्यास तयार होतील अशी माझी समजूत झाली. तारीख २ ऑक्टोबर रोजी जीनांनी वॅव्हेल यांना असे कळविले की, ' काही सवलती देण्यात आल्या तरच माझी वर्किंग कमेटी मला मध्यावधी सरकारात सहभागी होण्यास परवानगी देईल. दुसऱ्या दिवशी त्यांनी वॅव्हेल यांना असे पत्र पाठविले की, (१) काँग्रेसच्या यादीत राष्ट्रवादी मुसलमानांचे नाव असता कामा नये (२) कोठल्याही महत्त्वाच्या जातीय प्रश्नावर एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवरील हिंदू किंवा मुसलमान सभासदांपैकी कोणाचेही बहुमत विरोधी असेल तर त्यावर निर्णय घेता येणार नाही, (३) यापुढे शीख, ख्रिश्चन आणि पारशी प्रतिनिधींपैकी कोणाची जागा रिकामी झाली तर काँग्रेस आणि लीग या दोघांच्याही विचाराने ती भरण्यात यावी. आणि अनुसूचित जातीचा प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार काँग्रेसकडे असता कामा नये तर त्याबाबतची अंतिम जबाबदारी व्हाइसरॉय यांच्यावर सोपविण्यात यावी. दुसऱ्या दिवशी जीनांना पाठवलेल्या उत्तरात वॅव्हेल यांनी काँग्रेसच्या यादीत राष्ट्रवादी मुसलमान असता कामा नये ही मागणी फेटाळून लावली मात्र त्यांची तिसरी मागणी मान्य असल्याचे त्यांना कळविले. महत्त्वाच्या जातीय प्रश्नांच्या संबंधात वॅव्हेल यांनी जीनांच्या असे नजरेस आणून दिले की, त्याबाबतीतले निर्णय मंत्रिमंडळातील मतदानाने घेणे अत्यंत घातक ठरेल. संयुक्त सरकार हे परस्परांतील सामंजस्याने चालले पाहिजे नाही तर ते मुळी कामच करू शकणार नाही. मुस्लीम लीगला मंत्रिमंडळात सहभागी व्हावयाचे असेल तर १६ मेचे निवेदन स्वीकारूनच व्हावे लागेल अशी वॅव्हेल यांनी जीनांना जाणीव करून दिली आणि ते निवेदन अव्हेरण्याच्या आपल्या पहिल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी ते शक्य तितक्या लवकर

लीग कौन्सिलची बैठक बोलावतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

१६ मेचे निवेदन स्वीकारण्याच्या लीग कौन्सिलच्या निर्णयाइतकेच जीनांचे तारीख १३ ऑक्टोबरचे मंत्रिमंडळात सहभागी होण्याचे निमंत्रण स्वीकारणारे पत्रही अप्रामाणिकपणाचे होते. मध्यावधी सरकार बनविण्याची योजना किंवा तिचा आधार वर्किंग कमेटीला मान्य नाही हे स्पष्ट करून जीनांनी त्या पत्रात पुढे अशी तक्रार केली होती की, त्याबाबत घेण्यात आलेला निर्णय ऑगस्ट १९४० च्या घोषणेशी विसंगत आहे तथापि मध्यवर्ती सरकारच्या प्रशासनाचे सर्व क्षेत्र काँग्रेसच्या हाती जाऊ देणे आत्मघातकीपणाचे ठरेल' म्हणूनच केवळ लीग मंत्रिमंडळात सामील होत आहे. त्याच दिवशी जीनांनी वॅव्हेल यांची पुन्हा भेट घेतली. लीगने आपल्या मुंबई ठरावाचा (जुलै २९) फेरविचार केला आणि १६ मेच्या निवेदनाला मान्यता दिली तरच तिला मध्यावधी सरकारात सहभाग होता येईल याची वॅव्हेल यांनी जीनांना पुन्हा एकदा जाणीव करून दिली. परंतु जीनांना संयुक्त सरकारचे कामकाज संघभावनेने चालावे असे वाटत नव्हते किंवा मुंबईचा निर्णय फिरविण्याचेही त्यांच्या मनात नव्हते.

काँग्रेस-लीग संयुक्त सरकारचा कारभार व्यवस्थितपणे चालावा म्हणून गांधी आणि जीना या दोघांनी मिळून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात एक संयुक्त मसुदा तयार केला होता. या मसुद्यानुसार काँग्रेसने मुस्लीम लीग ही भारतातील बहुसंख्य मुसलमानांची अधिकृत आणि प्रातिनिधिक संघटना असल्याचे मान्य करावे तर त्या बदल्यात मध्यावधी सरकारातील सर्व मंत्री सर्वथ हिंदुस्तानचे हित डोळ्या-पुढे ठेवून संघभावनेने काम करतील अशी लीगने हमी द्यावी आणि कोणत्याही प्रकरणात गव्हर्नर जनरलला हस्तक्षेप करण्याची पाळी येऊ देऊ नये असे ठरले होते. तथापि तारीख ६ ऑक्टोबर रोजी हा मसुदा नेहरूंकडे पाठविताना संघ भावनेने काम करण्याची लीगने हमी द्यावी हा त्यामधील भाग मात्र जीनांनी नेमका गाळला. त्यावर नेहरूंनी आक्षेप घेतला परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. दुसऱ्या दिवशी जीनांनी नेहरूंना एक पत्र पाठवून आपल्या विविध अटी कळविल्या त्यात अधिक अनुकूल वातावरण निर्माण होईपर्यंत दीर्घकालीन योजनेसंबंधीचा भाग तहकूब ठेवावा अशीही एक अट होती. या सर्व चर्चेतून एकच गोष्ट साध्य झाली आणि ती म्हणजे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या उपाध्यक्षपदाच्या प्रश्नावर आग्रह न धरता मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सभा-गृहाचे नेतेपद लीगच्या नेत्याकडे जावे ही नेहरूंची सूचना जीनांनी मान्य केली.

तारीख १४ ऑक्टोबर रोजी नेहरूंनी लीगने कोणत्या शर्तींवर मंत्रिमंडळात सहभागी होण्याचे मान्य केले आहे यासंबंधीचे स्पष्टीकरण वॅव्हेल यांच्यापाशी मागितले. त्यावर वॅव्हेल यांनी नेहरूंना असे कळविले की, २४ ऑगस्ट रोजी आकाशवाणीवरून आपण केलेले भाषण आणि ४ आणि १२ ऑक्टोबर रोजी त्यांना पाठवलेल्या पत्रात जे म्हटले होते त्याव्यतिरिक्त जीनांना अन्य कोणतीही आश्वासने देण्यात आलेली नाहीत किंवा खुलासेही करण्यात आलेले नाहीत.

मुस्लीम लीगच्या वतीने गझनफर अली खान यांना मध्यावधी सरकारात पाठवण्यात येणार होते. या गझनफर अली खानांनी लाहोर येथील इस्लामिया कॉलेजमधील विद्यार्थ्यांसमोर तारीख १९ ऑक्टोबर रोजी केलेल्या भाषणात असे उद्गार काढले की,

आम्ही उराशी बाळगलेल्या पाकिस्तानचे ध्येय साध्य करून घेण्यासाठी जो लढा द्यावा लागणार आहे त्यावेळी पाय रोवून उभे राहता यावे म्हणूनच आम्ही मध्यावधी सरकारात जात आहोत. मी तुम्हाला असे आश्वासन देतो की, आम्ही पाकिस्तान मिळविल्याशिवाय राहणार नाही....... केवळ काँग्रेस पक्षाचेच सरकार केंद्रात अधिकारावर आल्यानंतर देशात ठिकठिकाणी जे दंगे उसळले त्यावरून एकच गोष्ट सिद्ध होते की, दहा कोटी मुसलमान त्यांचे खरेखुरे प्रतिनिधी नसलेल्या कोणत्याही सरकारपुढे आपली मान वाकवावयास तयार नाहीत....मध्यावधी सरकारात काम करीत असताना मुस्लीम लीगच्या सहकार्याशिवाय या देशात कोणतेही सरकार सुरळितपणे चालू शकणार नाही आणि मुस्लीम लीग ही भारतीय मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संस्था आहे या दोन गोष्टी काँग्रेसला पटवून देण्याकडेच आमचे सतत लक्ष राहील आणि मध्यावधी सरकार ही प्रत्यक्ष कृतीच्या मोहिमेची एक आघाडी आमच्या नजरेसमोर ठेवू, आणि जीना आम्हाला ज्या आघाडीवर काम करावयास सांगतील तेथे आम्ही त्यांच्या हुकुमांची तंतोतंत तामिली करू.... पाकिस्तानच्या आधारे काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यात समझोता घडून आल्याशिवाय हिंदुस्तानात शांतता नांदू शकणार नाही किंवा त्याचा विकासही होऊ शकणार नाही.

चार दिवसानंतर नेहरूंनी या भाषणाबद्दल वॅव्हेल यांच्याकडे तक्रार केली. त्याच दिवशी नेहरूंना पाठविलेल्या उत्तरात वॅव्हेल यांनी असे कळविले की,

'मी आजच जीनांची भेट घेतली असून कॅबिनेट मिशनच्या तारीख १६ मेच्या निवेदनात जी योजना नमूद करण्यात आली आहे ती मान्य आहे या अटीवरच मुस्लीम लीगला मध्यावधी सरकारात घेण्यात येणार आहे याची त्यांना स्पष्ट जाणीव दिली आहे आणि याला संमती देण्यासाठी त्यांनी आपल्या कौन्सिलची बैठक शक्य तितक्या लवकर बोलावली पाहिजे असेही त्यांना सांगितले आहे.'

मुस्लीम लीग मध्यावधी सरकारात आणि घटना समितीत सहकार्याच्या भावनेने सहभागी होणार आहे असे जीनांनी मला आश्वासन दिले आहे हे मी तुम्हाला सांगितलेच आहे. नोआखालीतील दंगे, मुस्लीम लीग पुढाऱ्यांची भाषणे आणि १६ मेचे निवेदन स्वीकारण्यास असलेला त्यांचा विरोध यामुळे नेहरू आणि इतर पुढारी इतके संतापून गेले की, गृह आणि संरक्षण ही खाती आपल्याला मिळावीत ही जीनांची मागणी मान्य करण्याचा व्हाइसरॉय आग्रह धरणार असतील तर आम्हाला राजीनामा द्यावा लागेल असे त्यांनी बजावले. शेवटी तारीख २४ ऑक्टोबर रोजी जीनांनी अर्थखाते स्वीकारण्याचे मान्य केले.

त्याच दिवशी बिहारमध्ये जातीय दंगे सुरू झाले. दोन दिवसानंतर संयुक्त मंत्रिमंडळाची स्थापना झाली. कॉंग्रेसतर्फे असफ अली यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला. तर मुस्लीम लीगने लियाकत अली खान, आय. आय. चंद्रीगर, अबदुर रब निश्तार, गझनफर अलिखान आणि बंगालमधील सुऱ्हावर्दींच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री जोगेंद्र नाथ मंडल ( अनुसूचित जाती ) यांची आपल्यातर्फे नियुक्ती केली. कलकत्त्याहून आलेल्या बिहारी निर्वासितांपैकी जातीयवादी प्रवृत्तीच्या लोकांनी दिलेली चिथावणी बिहारमधील दंगलीला कारणीभूत ठरली. या दंगली सुरू होण्यापूर्वी नोआखाली दिन पाळण्यात आला. तेथून प्रथम छप्रात दंग्याला सुरवात झाली. आणि थोड्याच अवकाशात छप्रा, पाटणा आणि भागलपूर जिल्ह्यात त्यांचे लोण पसरले. लष्कराची मदत घेऊनही आठवडा उलटून गेला तरी ते काबूत आणता आले नाहीत. शेकडो घरे जमीनदोस्त करण्यात आली किंवा जाळून भस्मसात करण्यात आली. जवळपास तीन हजार लोक पोलिसांनी आणि लष्कराने केलेल्या गोळीबारात मारले गेले किंवा दंगलखोरांच्या हल्ल्याला बळी पडले. हजारो मुसलमान निर्वासितांनी मदत केंद्रात आश्रय घेतला. तारीख ८ नोव्हेंबर रोजी संयुक्त प्रांताच्या मीरत डिव्हिजनमधील गडमुक्तेसर येथे भरलेल्या जत्रेतही दंगा उदभवला. जत्रेहून आपापल्या गावी परतणाऱ्या यात्रेकरूंवर खुनी हल्ले चढविण्यात आले. शहाजहानपूरजवळ दंगलखोर जमावाने बैलगाड्या जाळून टाकल्या आणि २३ इसमांना कंठस्नान घातले, तसेच बाराहून जास्त बैल मारून टाकले. यात्रेकरूंना दिल्लीला परत घेऊन येणाऱ्या खास आगगाडीवर गाझियाबाद येथे हल्ला चढविण्यात आला. हल्ल्याला बळी पडलेल्यांचे मृतदेह पाच-सहा खेड्यात आढळून आले. बंगालपेक्षा बिहारमधील प्रशासन फारसे चांगले होते असे जरी म्हणता आले नाही तरी जातीय दंगलीबाबत कॉंग्रेस आणि लीग पुढाऱ्यांच्या दृष्टीकोनात असलेली कमालीची तफावत मात्र यानिमित्ताने ठळकपणे दृष्टोपत्तीस आली. नेहरू आणि राजेंद्र प्रसाद हे लियाकतअली खान आणि अबदुर रब निश्तार या लीगच्या दोन मंत्र्यांसमवेत तातडीने बिहारला धावून गेले. रागेझ येथील जाहीर सभेत भाषण करताना नेहरूंनी असे सांगितले की, 'एकाद्याही मुसलमानाला जर तुमच्यापैकी कोणी ठार करणार असेल तर त्याला प्रथम माझा जीव घेऊन माझे प्रेत ओलांडूनच पुढे जावे लागेल' अनेक सभांतून भाषणे करून श्रोत्यांकडून तात्काळ शांतता प्रस्थापित करण्याची जाहीर आश्वासने नेहरू मिळवीत आणि त्यांच्याकडून ' हिंदू-मुस्लीम एक हो' अशा घोषणा वदवून घेत. परंतु जातीय भावना इतक्या तीव्र बनल्या होत्या की पाटणा येथे विद्यार्थी निदर्शकांच्या एका फार मोठ्या जमावाने निदर्शन करून 'नेहरू चले जाव' अशा घोषणा देण्यासही कमी केले नाही. नेहरू आणि जयप्रकाश हे दोघेही धैर्याने त्या विरोधी जमावाला सामोरे गेले आणि त्यांनी विद्यार्थ्यांची निर्भर्त्सना केली. त्या जमावापुढे भाषण करताना जयप्रकाश नारायण यांनी म्हटले की त्यांनी केवळ आपलीच नव्हे तर सबंध बिहार

प्रांताचीच बेअब्रू केली केली आहे.

चोवीस तासात बिहारमधील दंगल थांबली नाही तर आपण प्राणांतिक उपोषण सुरू करू असा इशारा तारीख ५ नोव्हेंबर रोजी गांधींनी दिला. दंगल मोडून काढण्यासाठी त्याचप्रमाणे दंगलग्रस्तांना मदत देण्यासाठी आपल्या सरकारने योजलेल्या विविध उपाययोजनासंबंधीची माहिती संयुक्त प्रांताचे पंतप्रधान पंत आणि रफी अहमद किडवाई यांनी तारीख १२ नोव्हेंबर रोजी गांधींना सादर केली. तारीख २४ नोव्हेंबर रोजी मीरत येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीमध्ये जातीय दंग्याचा प्रश्न उपस्थित झाला असताना मौलाना आझाद यांनी कॉंग्रेसजनांनी जातीय दंगलीचा बीमोड करण्याची जबाबदारी स्वीकारणे कसे आवश्यक आहे ते सांगून बिहारमध्ये जेथे जेथे त्यांनी या कार्याला वाहून घेतले तेथे तेथे दंगली निवळल्या यावर भर दिला. बिहारमधील काही भागात कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी आपले वजन खर्च करून दंगली थांबविण्याचा प्रयत्न सुरू केल्याबरोबर त्या इतक्या त्वरेने थांबल्या की त्याबद्दल अनेक मुसलमानांनी अचंबा व्यक्त केला असेही त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. अधिवेशनात नेहरू अतिशय संतप्त झाले होते. फॅसिस्ट मार्गाचा अवलंब केल्याबद्दल लीगवर हल्ला चढवताना ते म्हणाले की, "लीगचे डावपेच हे हिटलरच्या तंत्राबरहुकूम असून अनेक बाबतीत लीगची कार्यपद्धती हिटलर सारखीच आहे. हिटलर प्रमाणेच लीगचे पुढारीही द्वेषाचे आणि हिंसेचे वातावरण निर्माण करीत असतात. देशासाठी किंवा मुसलमान समाजासाठी लीगजवळ कोणताही विधायक किंवा आर्थिक कार्यक्रम नाही. लीगने आपली भूमिका कधीही स्पष्ट केलेली नाही. कारण मुसलमान समाजाच्या सर्व थरांचे प्रतिनिधीत्व आपण करतो या भूमिकेस बाधा येईल अशा कोणत्याही प्रश्नावर चर्चा करण्याची त्यांनी नेहमीच टाळाटाळ केलेली आहे. लीग कौन्सिलच्या एका प्रमुख सभासदाने आपल्याला असे सांगितले आहे की, जीनांनी लीगचा विधायक कार्यक्रम मुस्लीम जनतेसमोर मांडावा असे आपण त्यांना म्हणालो होतो परंतु जीनांनी त्यावर असे उत्तर दिले की, असा एखादा कार्यक्रम तयार करावयाचा झाला तर त्यामुळे मतभेद उद्‌भवतील आणि मुसलमान जनतेत फूट पडेल. हिंदूंच्या विषयीची द्वेषभावना हाच त्यांच्यातील ऐक्य भावना शाबूत राखणारा दुवा असल्याने 'कॉंग्रेस आणि हिंदू यांच्याबद्दल द्वेषाची भावना प्रसृत करीत राहणे हाच लीगचा कार्यक्रम होऊ शकतो.'

भरमसाठ अतिशयोक्ति आणि जहरी भाषणे यांच्या साहाय्याने जातीय भावना भडकावून देण्यासाठी लीगच्या पुढाऱ्यांनी बिहारमधील दंगलीचा पुरेपूर उपयोग करून घेतला. तारीख २० नोव्हेंबर रोजी जीनांनी उघडपणे लोकसंख्येच्या अदलाबदलीचे सूतोवाच केले. त्यानंतर पाच दिवसांनी कराचीत पत्रकार परिषदेत या मागणीचा पुनरुच्चार करताना ते म्हणाले, "हिंदुस्तानच्या निरनिराळ्या भागात झालेल्या भीषण कत्तली लक्षात घेता माझे असे मत बनले आहे की, प्रचंड बहुसंख्या

असलेल्याकडून अल्पसंख्यांकाच्या कत्तली होण्याचे असले भयानक प्रकार पुन्हा घडू नयेत म्हणून केंद्रातील त्याचप्रमाणे प्रांतातील अधिकाऱ्यांनी लोकसंख्येच्या अदलाबदलीचा प्रश्न तातडीने हाती घ्यावा.'

तारीख १४ नोव्हेंबर रोजी नव्या दिल्लीत परदेशी पत्रकारांशी बोलताना जीनांनी असे घोषित केले की, मध्यावधी सरकारातील लीगचे मंत्री हे मुस्लीम हितसंबंधाचे रखवालदार आहेत आणि आमच्या पाकिस्तानच्या मागणीला बाधा आणण्याचा कोणी प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रयत्न करू पाहील तर आम्ही त्याचा प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाही. मध्यावधी सरकार यशस्वी होण्याची कितपत शक्यता आहे असा प्रश्न विचारण्यात आला असता ते सांगणे कठीण आहे असे सांगून जीना पुढे म्हणाले की, आपल्यावर लादण्यात आलेली सध्याची व्यवस्था आपल्याला फारशी पसंत नाही.

जीनांनी आपली पाकिस्तानची मागणी पुन्हा एकदा मांडली आणि जातीय तणावावर तो एकमात्र उपाय असल्याचे आग्रहाने प्रतिपादन केले. दोन्ही राष्ट्रांतील अल्पसंख्यांक आपापल्या राष्ट्रात अल्पसंख्य म्हणून राहू लागतील आणि मग बहुसंख्यांकांना कोठल्याही राष्ट्रीय स्वरूपाच्या भांडणाला तोंड द्यावे लागणार नाही. 'परिपूर्ण' पाकिस्तानची निर्मिती होईपर्यंत हिंदुस्तानातील अंतर्गत भांडणे चालूच राहतील. जीना पुढे असे म्हणाले की, हिंदुस्तान आणि पाकिस्तान अशी देशाची फाळणी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत सबंध देशात शांतता नांदू शकेल असे आपल्याला वाटत नाही. घटना बनविण्यासाठी दोन स्वतंत्र घटना समित्या असल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. त्याचप्रमाणे संपूर्ण बंगाल आणि आसाम प्रांताचा समावेश पूर्व पाकिस्तानात करण्यात आला पाहिजे असाही त्यांचा आग्रह होता. घटना समितीत संस्थानिकांनाही प्रवेश असावा ही सूचना त्यांना मान्य नव्हती. त्याबाबत त्यांचे म्हणणे असे होते की, त्यांनी वाटल्यास मागाहून हिंदुस्तानच्या किंवा पाकिस्तानच्या संघराज्यात सामील व्हावे. संस्थानी प्रदेशात कोठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करण्याची त्यांची तयारी नव्हती.

वॅव्हेल यांनी जीनांना १६ मेच्या निवेदनास मंजुरी देण्यासाठी लीगच्या कौन्सिलची बैठक बोलावण्यास सांगितले होते. परंतु तारीख १७ नोव्हेंबर रोजी त्यांना पाठवलेल्या उत्तरात जीनांनी वॅव्हेल यांची ही सूचना धुडकावून लावली आणि वर घटना समिती बेमुदत पुढे ढकलण्यात येत असल्याचे वॅव्हेल यांनी जाहीर करावे अशी त्यांच्याकडे मागणी केली. बिहारच्या दंगलीत तीस हजार मुसलमान मारले गेले असून दीड लाख बेघर झाले आहेत अशी माहिती देऊन ते पुढे म्हणाले की, अशा अत्यंत भारावलेल्या स्फोटक वातावरणात घटना समितीचा नुसता विचार करणे हे सुद्धा उचित ठरणार नाही त्याचप्रमाणे ते शक्यही होणार नाही. त्यानंतर दोन दिवसांनी वॅव्हेल यांच्याबरोबर झालेल्या भेटीत जीनांनी पुन्हा एकदा फाळणीची मागणी केली. या भेटीसंबंधी वॅव्हेल यांनी आपल्या रोजनिशीत अशी नोंद करून ठेवली आहे की,

त्यांच्या प्रतिपादनाचा मुख्य रोख हा होता की दोन जमातींमध्ये ऐक्य घडून

येणे अगदी अशक्य आहे. मुस्लीम लीग घटना समितीत आल्याने काहीही फायदा होणार नाही असे सांगून ते पुढे म्हणाले की, मुसलमानांना पायदळी तुडविले जात असून आपण त्यांना काहीही मदत करू शकत नाही. त्यांचे असे मत दिसले की, आपण या देशापैकी त्यांचा स्वतःचा भाग त्यांना द्यावा मग तो किती का लहान असेना पण तो त्यांचा स्वतःचा असला पाहिजे. जरूर तर त्यासाठी ते एकवेळ जेऊनही दिवस काढतील.

तारीख २६ नोव्हेंबर रोजी ब्रिटिश मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला की, घटना समितीच्या पहिल्या बैठकीबाबत काही समझोता घडवून आणण्याचा आणखी एक प्रयत्न करून पाहावा आणि त्यासाठी व्हाईसरॉय आणि मध्यावधी सरकारातील पाच मंत्र्यांना ( २ काँग्रेस, २ लीग आणि बलदेवसिंग ) वाटाघाटीसाठी इंग्लंडला बोलावून घ्यावे. यासंबंधी खुलासा करणारे जे पत्र ब्रिटिश पंतप्रधानांनी नेहरूंच्याकडे रवाना केले होते त्यात त्यांनी असे म्हटले होते की, घटना समितीची बैठक यशस्वी-रित्या कशी पार पडेल हे पाहण्याचाच या वाटाघाटीमागील उद्देश आहे. त्यात घटना समितीची कल्पना सोडून देण्याचा हेतू नाही. तथापि प्रांताचे गट बनविण्याच्या प्रश्नावर या वाटाघाटी फिसकटल्या आणि ६ डिसेंबर रोजी ब्रिटिश सरकारने यासंबंधी केलेल्या घोषणेत गटासंबंधीच्या अर्थाबाबत जो वाद निर्माण झाला होता त्याबाबतचा आपला निर्णय जाहीर केला. त्यानुसार वेगवेगळ्या प्रांतांना केवळ साध्या बहुमताने गट असावेत की नसावेत ते ठरविता येईल. त्याचप्रमाणे स्वतःची आणि गट असेल तर त्या गटाची घटनाही तशाच साध्या बहुमताने तयार करता येईल असा खुलासा करण्यात आला. काँग्रेसने ब्रिटिश सरकारने लावलेला हा अर्थ स्वीकारावा असा आग्रह धरण्यात आला कारण त्यामुळे लीगला याबाबतच्या आपल्या भूमिकेचा फेरविचार करण्याची संधी मिळणार होती. तथापि कॅबिनेट मिशनने आपले हे उद्दिष्ट पुन्हा एकदा स्पष्ट केल्यानंतरही हा मूलभूत प्रश्न निर्णयासाठी फेडरल कोर्टापुढे सोपविण्यात यावा असे घटना समितीला वाटले तर तिला तसे करता येईल. मात्र त्या परिस्थितीत मग तो प्रश्न शक्य तितक्या लवकर फेडरल कोर्टाकडे न्यावा. त्या परिस्थितीत मग कोर्टाचा निकाल येईपर्यंत घटना समितीतील गटांच्या बैठकी तहकूब ठेवणे संयुक्तिक ठरेल असे त्या घोषणा पत्रात नमूद करण्यात आले होते. त्यानंतरचा सर्वांत महत्त्वाचा परिच्छेद असा होता.

कार्यपद्धतीबाबत एकमत झाल्याशिवाय घटना समिती यशस्वी होण्याचा कसलाही संभव दिसत नाही. भारताच्या लोकसंख्येपैकी एका मोठ्या गटाचे प्रति-निधी उपस्थित नसताना घटना समितीने एकतर्फी घटना बनवावी का असा प्रश्न उपस्थित होतो आणि ज्यांची इच्छा नसेल अशा विभागावर घटना लादली जावी असे आपल्याला वाटत नाही असे काँग्रेसने वेळोवेळी जाहीर केले आहे. एक मोठा गट घटना समितीत सामील होण्यास तयार असताना त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर

घटना लादावी असे काँग्रेसप्रमाणेच ब्रिटिश सरकारलाही वाटत नाही.

हे निवेदन ॲटलींनी प्रथम त्या त्या पक्षांना दाखवले. जीनांनी ते निवेदन स्वीकारण्याची तयारी दर्शविली. मात्र विवाद्य कलमे फेडरल कोर्टापुढे सोपविण्यास मात्र आपण संमती देणार नाही असे बजावले. बलदेवसिंग यांचे मत असे पडले की, शिखांची परिस्थिती त्यामुळे अधिकच वाईट होणार असल्याने ते त्यांना मान्य होणार नाही. नेहरूंनी मुस्लीम लीगकडून खरोखरीचे सहकार्य मिळेल आणि 'भावी संघर्षाची तयारी करण्यासाठी केलेला शस्त्रसंधी ' असे त्या सहकार्याचे स्वरूप राहणार नाही अशी आशा व्यक्त केली. असे सहकार्य घटना समितीच्या बाबतीत मिळू शकले नाहीच. घटना समितीचे अधिवेशन तारीख ९ डिसेंबरला सुरू झाले. २८६ पैकी २०५ सभासद उपस्थित होते. मुस्लीम लीगचे सर्वच्या सर्व म्हणजे ७४ सभासद गैरहजर राहिले. जीना लंडनमध्येच थांबले होते. तेथे तारीख १४ डिसेंबर रोजी बोलावलेल्या पत्रकार-परिषदेत पाकिस्तान हे लीगचे उद्दिष्ट असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट करून त्यांनी असे निवेदित केले की, गटासंबंधीच्या कलमांबाबत ब्रिटिश सरकारने केलेले भाष्य काँग्रेस निःसंदिग्धपणे मान्य करावयास तयार असेल तरच लीग कौन्सिलची बैठक बोलावण्यात येईल. त्यांनी असा सवाल उपस्थित केला की, समजा, फेडरेल कोर्टाने लावलेला विवाद्य कलमासंबंधीचा अर्थ ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध गेला तर घटना समितीबाबत त्याचे धोरण काय राहील ? कोर्टाचा असा विरोधी अर्थ प्रमाणभूत मानून घटना समितीचे काम पुढे चालू ठेवावयाचे अशी जर ब्रिटिश सरकारची भूमिका असेल तर लीग ती केव्हाही मान्य करू शकणार नाही.

त्यानंतर लगेच जीनांनी हेही स्पष्ट केले की, काँग्रेसने ब्रिटिश सरकारने लावलेला अर्थ मान्य केला तरी ते तेवढ्यानेही वाद मिटत/संपत नाही. इंडियन ॲन्युअल रजिस्टरमध्ये ( खंड २ १९४६, पृष्ठ ३१६ ) जीनांच्या या मुलाखतीसंबंधीचे पुढील परिच्छेद ग्रथित करण्यात आले आहेत :—

एका पत्रकाराने दुहेरी प्रश्न केला: ब्रिटिश सरकारने आपल्या निवेदनात नमूद केलेली योजना काँग्रेसने स्वीकारली तर घटना समितीत सहभागी होण्यास मुस्लीम लीग तयार होईल काय ? आणि तिने तशी तयारी दर्शविली तर घटना समिती ही सार्वभौम आणि स्वायत्त असून तिच्या कामकाजात कोणाचा बाह्य हस्तक्षेप होता कामा नये ही काँग्रेसची भूमिकाही लीग मंजूर करणार काय ?

प्रश्नाच्या पहिल्या भागाला जीनांनी असे उत्तर दिले की,

काँग्रेसने ब्रिटिश सरकारचे तारीख ६ डिसेंबरचे निवेदन निःसंदिग्धपणे स्वीकारले तर मला कौन्सिलची बैठक नक्कीच बोलवावी लागेल, परंतु आपल्या या उत्तराने लीग कौन्सिल याबाबत काय निर्णय घेईल ते आपण सांगू शकत नाही असेच त्यांना सुचवावयाचे होते. प्रश्नातील दुसरा मुद्दा उपस्थित केल्याबद्दल त्या पत्रकाराचे जीनांनी आभार मानले. घटना समितीसंबंधी अशा तऱ्हेने अघळपघळ विधाने

करीत सुटणे ठीक आहे असे सांगून त्यांनी पुढील माहिती दिली. घटना समितीत काँग्रेस समर्थकांची संख्या २९२ असेल कदाचित थोडे कमी असतील तर मुसलमान सभासदांची संख्या ७९ असेल. म्हणजे समितीत काँग्रेसला 'पाशवी बहुमत' प्राप्त होणार आहे.

जीना पुढे म्हणाले "लोकशाही संबंधी जेव्हा लोक काही बोलतात तेव्हा त्यांची समज इतपतच असते. परंतु हिंदू आणि मुसलमान यांच्या संदर्भात लोकशाहीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. येथे एक राष्ट्र बहुमताच्या जोरावर दुसऱ्या राष्ट्राने एकमताने घेतलेला निर्णय ठोकरून लावीत आहे. कारण त्यांची संख्या अवघी ७९ आहे तर काँग्रेसचे समर्थक २९२ आहेत. मुसलमानांच्या दृष्टीने ही परिस्थिती अत्यंत धोकादायक ठरणार असून तिच्यातून बाहेर पडण्यासाठी बाहेरचा कोणीतरी थातूरमातूर करून आमची समजूत काढण्याचा प्रयत्न केलेला आम्हाला अर्थातच चालणार नाही. मात्र मूळ योजनेतच अशी काही तरतूद करून ठेवण्यात आली पाहिजे की तिच्यामुळे पाशवी बहुमताच्या जोरावर कोणाला आमचा लचका तोडून पळून जाता येणार नाही परंतु घटना समिती ही सार्वभौम आहे असे मानून बहुमताच्या जोरावर तिच्याकडून एकामागून एक काहीही निर्णय घेत सुटायचे आणि मागाहून मुस्लीम अल्पसंख्यांक, ब्रिटिश सरकार आणि साऱ्या जगासमोर होऊन गेलेल्या घटना म्हणून त्यांचा गाजावाजा करावयाचा हाच तर आमच्या दृष्टीने खरा धोका आहे.

याचा अर्थ मुस्लीम अल्पसंख्यांकांना विकासाला कायमची खीळ घालावयाची आहे, असा करावयाचा का ? असे एका पत्रकाराने विचारले. त्यावर जीना उत्तरले अनेकदा असे म्हटले जाते परंतु तो निव्वळ बाष्कळपणा आहे. राष्ट्रातील बहुमताला आपल्याला हवा तो निर्णय घेण्याची मुभा ठेवावयाची आणि तो निर्णय आम्हाला मान्य नाही असे म्हटल्याबरोबर तुम्ही नकाराधिकार वापरता, तुम्ही दुराग्रही आहात असे सांगत सुटायचे अशातलाच हा प्रकार झाला. म्हणजे बहुसंख्यांकांनी अल्पसंख्यांकांना पार भरडून काढावयाचे आणि अल्पसंख्यांकांनी मात्र अगतिक होऊन बसावयाचे. एखाद्या देशातील मोठ्या गटाने स्वेच्छेने संमती दिलेली असल्या-शिवाय त्या देशाची घटना यशस्वीपणे राबविली गेल्याचे एक तरी उदाहरण सबंध जगात दाखवता येईल का ? असा सवाल त्यांनी पत्रकारांना केला.

बहुसंख्यांकांचा प्रगतीचा मार्ग मुसलमान रोखून धरीत आहेत असे जे विधान केले जाते त्या संबंधात जीनांनी असा प्रश्न उपस्थित केला की, तुम्हाला कोणते बहुसंख्यांक अभिप्रेत आहेत ? आणि पुढे ते म्हणाले तुम्हाला जर हिंदू अभिप्रेत असतील तर भले ते अगदी जलद गतीने आपला विकास घडवून आणोत. आमची त्याला अजिबात ना नाही. खुशाल त्यांना हिंदुस्तानची प्रस्थापना करू द्या. हिंदूंच्या-साठी घटना तयार करू द्या. आमचे सांगणे एवढेच आहे की आमच्या मार्गात

येऊ नका आम्हालाही पाकिस्तानची घटना तयार करू द्या. पाकिस्तानकरता स्वतंत्र घटना समितीची आपली मागणी आहे का या प्रश्नाला जीनांनी असे उत्तर दिले की, आपण पहिल्यापासूनच ती मागणी करीत आलो आहोत.

त्यानंतर घटना फार झपाट्याने घडत गेल्या. घटना समितीचे अधिवेशन काही दिवस चालून नंतर लीग सहभागी होईल या आशेने स्थगित करण्यात आले. सिंध-मध्ये लीगचा पाडाव करता येईल ही काँग्रेसची आशा धुळीला मिळाली आणि निवडणुकीनंतर लीगची ताकद उलट अधिकच वाढली. त्या प्रांतातील हिदायतुल्ला मंत्रिमंडळ अल्पमतात होते आणि बहुमतात असलेल्या संयुक्त आघाडीने मंत्रिमंडळाला पदच्युत करण्यासाठी कायदेमंडळाचे अधिवेशन तावडतोब बोलावण्यात यावे असा आग्रह धरला होता हे आपण वर पाहिलेच आहे. त्यावेळेप्रमाणे आता पुन्हा दुसऱ्यांदा गव्हर्नर लीगच्या मदतीला धावून आले आणि त्यांनी कायदेमंडळ बरखास्त करून नव्याने निवडणुका घेण्याचे आदेश दिले. दरम्यान देशातील जातीय परिस्थिती इतकी चिघळली होती की, लीगचा पराभव करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही ते निष्फळ ठरले. आणि १९४७ च्या जानेवारीत हिदायतुल्ला सिंध प्रांतात मुस्लीम लीगचे भरभक्कम मंत्रिमंडळ बनवू शकले. लीगने आसाम, पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतात सविनय कायदेभंगाच्या चळवळी सुरू केल्या. आसाममध्ये लीगच्या चिथावणीने बंगालमधून येणाऱ्या निर्वासितांविरूद्ध सरकारने योजलेल्या उपायांच्या निषेधार्थ ही चळवळ सुरू करण्यात आली होती तर पंजाबमध्ये मुस्लीम नॅशनल गार्ड या संघटनेवर ती शस्त्रे जमा करीत असल्यामुळे घालण्यात आलेली बंदी हे चळवळीचे निमित्त मिळाले. अर्थात पंजाब सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही बंदी घातली होती. वायव्य सरहद्द प्रांतात नागरी हक्क रक्षणाच्या नावाखाली तेथील चळवळ सुरू करण्यात आली होती.

तारीख ६ जानेवारी १९४७ रोजी भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनात कॅबिनेट मिशनच्या निवेदनातील विवाद्य कलमांबाबत ब्रिटिशांनी लाव-लेला अर्थ एका ठरावाने मान्य करण्यात आला. परंतु त्या ठरावात पंजाबातील शिखांचे हक्क, त्याचप्रमाणे केवळ साध्या बहुमताने एखाद्या प्रांताला त्या गटात ढकलण्याच्या सक्तीमुळे निर्माण होणारी परिस्थिती याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती काँग्रेसने दिलेली अशी मान्यता ही निःसंदिग्ध स्वरूपाची आहे असे मानावयास लीग तयार नव्हती. तारीख ३१ डिसेंबरच्या ठरावाने तिने घटना समिती तात्काळ विसर्जित करण्यात यावी अशी मागणी केली. तारीख २० फेब्रुवारी रोजी ॲटलींनी कॉमन्स सभागृहात अशी घोषणा केली की, १६ मेच्या योजनेतील तरतुदीनुसार संपूर्णपणे प्रातिनिधिक असलेल्या घटना समितीने निर्माण केलेल्या यंत्रणेकडे सत्ता सुपूर्द कर-ण्याची ब्रिटिश सरकारची इच्छा आहे. परंतु सर्व पक्षांना संमत असलेली घटना निर्माण होणेच दुरापास्त आहे. ब्रिटिशांना तर भारतातील आपली सत्ता जून १९४८ पूर्वी

काढून घ्यावयाची असल्यामुळे केंद्र सरकारचे अधिकार कोणाकडे सोपवावे—ब्रिटिश हिंदुस्तानच्या सरकारकडे सरसकट सर्व सत्ता सोपवावी का काही भागात ती विद्यमान प्रांतिक सरकारकडे सुपूर्द करावी.—असा ब्रिटिश सरकारला पेच पडला होता. या घोषणेबरोबरच ॲटलींनी असेही जाहीर केले की, वॅव्हेल यांच्या जागी व्हाइसरॉय म्हणून लॉर्ड माउन्ट बॅटन यांची नेमणूक करण्यात येईल. त्यानंतर पाच दिवसांनी एका प्रश्नाला उत्तर देताना ॲटली यांनी असा खुलासा केला की, सरकारने संपूर्ण सत्तांतर करण्याचा निर्णय घेतला असल्याने जून १९४८ नंतर हिंदुस्तानवर बाह्य आक्रमण झाले तर त्याची जबाबदारी ब्रिटिश सरकार घेऊ शकणार नाही.

२६ फेब्रुवारी रोजी खिजर हयातखान यांच्याबरोबर समझोता होऊन लीगने आपली चळवळ मागे घेतली. त्यानंतर चार दिवसांनी पंजाबच्या पंतप्रधानांनी राजीनामा दिला. त्यांच्या जागी मंत्रिमंडळ बनविण्यासाठी कायदेमंडळातील मुस्लीम लीगच्या नेत्याला पाचारण करण्यात आले. पंजाबमधील हिंदू आणि शीख यांनी याबाबत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. त्याच सुमारास पाकिस्तानविरोधी निदर्शने करण्यात आली आणि सबंध प्रांतात अभूतपूर्व असा जातीय आगडोंब उसळला. मुंबई, रांची आणि कानपूर येथेही जातीय दंगली उद्भवल्या. तारीख ८ मार्च रोजी काँग्रेस वर्किंग कमेटीने जातीय दंग्यामुळे पंजाबात निर्माण झालेल्या भयानक परिस्थितीचे वर्णन करणारा ठराव पास केला. त्याचबरोबर पंजाबची दोन प्रांतात विभागणी करावी अशी शिफारस केली. त्यायोगे मुसलमानी लोकसंख्येचे प्राबल्य असलेला भाग बिगर मुसलमानांचे प्राबल्य असलेल्या भागापासून विभक्त होऊ शकेल असे नमूद करण्यात आले होते. अनेक शीख पुढाऱ्यांनी तारीख १८ एप्रिल रोजी व्हाइसरॉयची भेट घेऊन पंजाबच्या फाळणीची मागणी केली. बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीने तारीख ४ एप्रिल रोजी असा ठराव केला की, "विद्यमान बंगाल सरकारच्या हाती सत्ता सोपवून जाण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार असेल तर बंगालमधील जो भाग हिंदुस्तानच्या संघराज्यात राहू इच्छित असेल त्याला तशी परवानगी देण्यात यावी. आणि त्याचा संघराज्यांतर्गत असा स्वतंत्र प्रांत बनविण्यात यावा. कारण सध्या बंगालमध्ये जे सरकार आहे ते एका जातीय पक्षाचे सरकार असून बंगाल प्रांताचे स्वतंत्र सार्वभौम राज्य बनविण्याचा त्याचा निर्धार आहे." अशी मागणी बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीने तारीख ४ एप्रिल रोजी एका ठरावान्वये केली. त्याचदिवशी मध्यवर्ती कायदेमंडळाचे एक सभासद एल. के. मैत्रा यांनी बंगाल कायदेमंडळातील इतर हिंदू सभासदांच्यावतीने व्हाइसरॉय आणि काँग्रेस पुढारी यांना स्वतःच्या सहीनिशी एक निवेदन सादर करून त्यात बंगालच्या फाळणीची मागणी केली. त्यानंतर आठवडाभराने घटना समितीच्या बंगालमधील अकरा सभासदांनी अशाच आशयाचे एक निवेदन व्हाइसरॉय पदाची सूत्रे नुकतीच हाती घेतलेल्या माउन्ट बॅटन यांना सादर केले. तारीख ३० एप्रिल रोजी 'ब्रिटिश सरकारच्या मार्गात अडचणी निर्माण करणारे, आणि

मुसलमानांना खंडित, छिन्नभिन्न आणि कसरीने कुरतडलेले पाकिस्तान पत्करावे लागणार असा एकसारखा प्रचार करून त्यांचे नीतीधैर्य खच्ची करण्याचे एक कुटील कारस्थान म्हणून जीनांनी दोन्ही प्रांताच्या फाळणीच्या मागणीचा धिक्कार केला. त्या प्रांतातील जनतेच्या प्रशासकीय, आर्थिक आणि राजकीय जीवनाच्या मुळावरच आघात होणार असल्याने फाळणीची मागणी मान्य करण्यात येऊ नये असे त्यांनी ब्रिटिश सरकारला आवाहन केले. आपल्या पत्रकात जीनांनी पुढे असे म्हटले की, 'पाकिस्तानातील हिंदू अल्पसंख्यांकांना स्थलांतर करून आपल्या पितृभूमीकडे परत जावयाचे असेल तर त्यांना तशी मोकळीक राहील. त्याचप्रमाणे ज्या मुसलमानांना हिंदुस्तानातून पाकिस्तानात स्थलांतर करावयाचे असेल त्यांना तसे करता येईल. आज ना उद्या लोकसंख्येची अदलाबदल ही करावीच लागेल. हिंदुस्तानची आणि त्याचप्रमाणे पाकिस्तानची घटना समिती हा प्रश्न हाती घेऊ शकेल आणि नंतर या दोन देशांची सरकारे आवश्यक आणि शक्य असेल तेथे ती अदलाबदल व्यवस्थित-पणे घडवून आणू शकतील'. मे महिन्यात जीनांनी पुन्हा एकदा पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानला जोडणाऱ्या भूमी पट्ट्याची मागणी केली. परंतु नेहरूंनी ती ताबडतोब फेटाळून लावली.

बंगाल मुस्लीम लीग नेत्यांची याबाबतची प्रतिक्रिया मात्र अगदी निराळी होती. बंगालच्या फाळणीच्या संभाव्यतेमुळे ते धास्तावून गेले होते. ता. ८ एप्रिल १९४७ रोजी सुऱ्हावर्दी यांनी बातमीदारांना असे सांगितले की, बंगालची फाळणी होता कामा नये. आपण संयुक्त आणि विशाल बंगालच्या बाजूचे आहोत. मध्यावधी सर-कारातील लीगनियुक्त सभासद जे. एन. मंडळ यांनी ता. २१ एप्रिल रोजी असे पत्रक प्रसिद्ध केले की, बंगालची फाळणी हा जातीय संघर्षावरील उपाय होवू शकत नाही. त्या पत्रकात त्यांनी पुढे असेही म्हटले की, फाळणी हिंदूंच्या हिताची नसून अनुसुचित जातींचा तर तिला निश्चितच विरोध आहे. लीगचे दुसरे एक प्रतिनिधी नाझीमुद्दीन यांनी दुसऱ्या दिवशी कलकत्त्यात असे जाहीर केले की, स्वतंत्र सार्वभौम बंगाल हा मुसलमान आणि बिगर मुसलमान अशा सर्वच जनतेला फायदेशीर ठरणार असून बंगालची फाळणी एकूणच बंगाली जनतेला अतिशय घातक ठरेल असे माझे ठाम मत आहे. ता. २७ एप्रिल रोजी सुऱ्हावर्दीनी पत्रकार परिषद घेऊन पूर्ण संयुक्त सार्वभौम बंगालच्या बाजूने भावनापूर्ण आवाहन करून असे सांगितले की, तो एक महान देश बनेल आणि सबंध हिंदुस्तानात तो सर्वात श्रीमंत व समृद्ध ठरेल. सुऱ्हावर्दीनी स्वतंत्र बंगालची कल्पना शरद चंद्र बोस यांच्या गळी उतरविली आणि त्या दोघांनी मिळून गांधींना आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठी त्यांच्या अनेकवार भेटी घेतल्या. गांधींनी त्यांना अनुकुलता दर्शविली पण कॉंग्रेस वर्किंग कमेटीने ती कल्पना फेटाळून लावली.

पंजाबच्या फाळणीची मागणी करून कॉंग्रेसने पाकिस्तानची मागणी जवळजवळ

मान्यच करून टाकली आहे असे सैयद अली जहीर यांनी २५ एप्रिल रोजी लखनौहून एक पत्रक प्रसिद्ध करून जाहीर केले ते अगदी बरोबर होते. बंगालच्या फाळणीच्या मागणीला काँग्रेसने दिलेली मान्यता हे त्या दिशेने टाकले गेलेले आणखी एक पाऊल होते. घटना समितीचे अध्यक्ष राजेंद्र प्रसाद यांनी २८ एप्रिल रोजी घटना समितीच्या सभासदांना उघडपणे असे सांगितले की, केवळ भारताच्याच नव्हे तर भारतातील काही प्रांताच्या फाळणीसही सभागृहाने तयार राहिले पाहिजे. आणि घटना समितीला कदाचित अशी फाळणी गृहीत धरूनच घटना बनवावी लागेल. ३० मे रोजी पत्रकार परिषदेत त्यांनी असे सांगितले की, लीग जर प्रांताची फाळणी पत्करणार नसेल तर काँग्रेस देशाची फाळणीच अमान्य करील.

३ जून रोजी काँग्रेस, लीग आणि शीख पुढाऱ्यांच्या संयुक्त बैठकीत लॉर्ड माउंटबॅटन यांनी फाळणीची योजना सांगून टाकली त्याच दिवशी नेहरू आणि जीना यांनी आकाशवाणीवर वेगवेगळी भाषणे करून त्या योजनेला सर्वसाधारण संमती दर्शविली. ता. ९ जून रोजी मुस्लीम लीग कौन्सिलने फाळणीच्या योजनेला औपचारिक मान्यता देऊन खंडित पाकिस्तान स्वीकारले. त्यानंतर तीन दिवसांनी हैदाबादच्या निझामाने अधिकृतपणे असे जाहीर केले की, ब्रिटिशांची अधिसत्ता अस्तंगत झाल्यानंतर हैद्राबाद हे स्वतंत्र सार्वभौम राज्य बनेल आणि हिंदुस्तान आणि पाकिस्तान यापैकी कोणत्याच घटना समितीत ते सामील होणार नाही.

माउंट बॅटन योजना स्वीकारणारा मुख्य ठराव ता. १४ जून रोजी भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनामध्ये गोविंद वल्लभ पंत यांनी मांडला व मौलाना अबुल कलम आझाद यांनी त्याला अनुमोदन दिले. ज्या प्रांताची इच्छा नसेल त्यांच्यावर संघराज्यात सामील होण्याची सक्ती करावयाची नाही, हे काँग्रेसने प्रथम पासूनच जाहीर केलेले धोरण असल्याचे पंत यांनी ठरावावर भाषण करताना स्मरण करून दिले. ते पुढे म्हणाले की, क्रिप्स मिशनच्या वेळीच हे स्पष्ट करण्यात आले होते. काँग्रेसला पाकिस्तान पसंत नव्हते इतकेच नव्हे तर त्याला कायम विरोधच करीत आली होती. परंतु आपल्या ३ मार्चच्या ठरावात तिने असे म्हटले होते की देशातील परिस्थितीमुळे प्रशासनाच्या दृष्टीने पंजाबची फाळणी करणे अत्यावश्यक होऊन बसले आहे. ज्यांची इच्छा नसेल त्यांना संघराज्यात ठेवून घेण्यावर आपली शक्ती वाया न घालवता ३ जूनच्या निवेदनाला मान्यता देणे केव्हाही चांगले. पुढे केव्हा तरी समझोता होईल या आशेवर वाहवत जाण्याचे धोरण सोडून देण्याची वेळ आली आहे असे सांगून आझाद आपल्या भाषणात म्हणाले की, "देशात आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की आता विलंब करून चालणार नाही. सध्याचा निर्णय योग्य आहे असे आपल्याला वाटत नाही. परंतु त्यावाचून काँग्रेसपुढे अन्य पर्यायच उरलेला नाही. कोणती योजना स्वीकारावयाची आणि कोणती फेटाळावयाची हा आज काँग्रेस पुढील प्रश्न नसून ही अनिश्चितता किती दिवस राहू द्यावयाची हा

खरा प्रश्न आहे. दुर्दैवाने आज देशांतर्गत संघर्ष आणि अव्यवस्था पसरली असून तिला तोंड द्यावयाचे आहे. तशात लीग आपला हटवादीपणा सोडावयाला तयार नाही". गांधींनीही काँग्रेस वर्किंग कमेटीच्या अगोदरचा निर्णय मान्य करण्याचा सल्ला दिला. प्रतिनिधींना जर तो निर्णय मान्य करावयाचा नसेल तर त्यांना काँग्रेस पक्षाचे नेतृत्व करण्यासाठी नवे पुढारी शोधावे लागतील असे बजावून गांधीनी पुढे असे सांगितले की, त्यांनी हे मात्र विसरता कामा नये की, देशात शांतता नांदणे अत्यावश्यक आहे. राजाजींच्या मसुद्याच्या आधारावर गांधी–जीना बोलणी चालू असताना तुरुंगात आपण आणि आपले सहकारी यांनी या प्रश्नावर सांगोपांग चर्चा केली होती असा गौप्यस्फोट करून नेहरू आपल्या भाषणात म्हणाले की, गांधींचा या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन मान्य नसला तरी राजाजींच्या मसुद्याबाबत आमच्यात कसलेही मतभेद नव्हते. ज्यांना भारतात राहावयाचे नाही त्यांना अगदी तलवारीच्या धाकाने तसे करण्यास भाग पाडता येणार नाही. उलट त्यामुळे देशात कायम झगडे होत राहतील आणि हिंदुस्तानचा विकास खुंटून जाईल.

ता. १४/१५ ऑगस्ट १९४७ ला देशाची फाळणी झाली आणि त्याबरोबर अखिल भारतीय मुस्लीम लीगचीही फाळणी झाली. १४/१५ डिसेंबर १९४७ रोजी लीग कौन्सिलची बैठक कराचीत भरली होती. त्या बैठकीचे उद्‌घाटन करताना जीनांनी पाकिस्तानच्या निर्मितीचे श्रेय मुस्लीम अल्पसंख्यांक प्रांताकडे जाते असे सांगितले. लीगने भारतीय संघराज्यातील मुसलमानांना तोंडघशी पाडले आहे या आरोपाचा उल्लेख करून त्यांनी हिंदुस्तानातील मुसलमानांना असा सल्ला दिला की, आपल्या राजकीय हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी त्यांनी संघटित होऊन आपले सामर्थ्य वाढविले पाहिजे याबाबतीत पाकिस्तान सर्वतोपरी मदत करील असे आश्वासनही जीनांनी आपल्यातर्फे त्यांना दिले. त्यानंतर झालेल्या चर्चेत जीनांनी असे मत व्यक्त केले की, हिंदुस्तानात मुस्लीम लीगची एक संघटना असली पाहिजे. त्यापेक्षा काही निराळा विचार करीत असलात तर तुम्ही संपलाच म्हणून समजा. तुम्हाला लीग बरखास्त करून टाकावयाची असेल तर तुम्ही तसे करू शकता. परंतु ती फार मोठी चूक होईल असे मला वाटते तसे प्रयत्न होत आहेत हे मला माहीत आहे. हिंदुस्तानातील मुसलमानांचे निराळेपण मोडून काढण्याचे प्रयत्न मौलाना अबुल कलम आझाद आणि इतरांनी चालविले आहेत. तुम्ही ते चालू देता कामा नये. सरदार अबदुर रब निश्तार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, हिंदुस्तानातील अल्पसंख्यांकाचे संरक्षण हे पाकिस्तानच्या सामर्थ्यावर अवलंबून आहे. त्यांचे रक्षण करण्यासाठी आम्ही सर्व काही करू असे आश्वासनही त्यांनी दिले. कौन्सिलने पाकिस्तान मुस्लीम लीगचे निमंत्रक म्हणून लियाकत अली खान यांची आणि मद्रास प्रांतिक मुस्लीम लीगचे अध्यक्ष महंमद इस्माइल यांची भारतीय मुस्लीम लीगचे निमंत्रक म्हणून निवड केली. त्याचप्रमाणे दोन्ही लीगची दोन स्वतंत्र अधिवेशने

लवकरच कराची व मद्रास येथे घेण्यात यावीत असा कौन्सिलच्या या बैठकीत निर्णय घेण्यात आला. कौन्सिलच्या याच बैठकीत "पाकिस्तानात स्थायिक होणारे अखिल भारतीय मुस्लीम लीगचे प्राथमिक सभासद हे पाकिस्तान मुस्लीम लीगचे आणि भारतात स्थानिक होणारे मुस्लीम लीगचे प्राथमिक सभासद हे भारतीय मुस्लीम लीगचे प्राथमिक सभासद म्हणून मानण्यात यावेत" असेही ठरविण्यात आले.

---

## प्रकरण २६ वे

### उपसंहार

ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात भारतात प्रथमच धर्मनिरपेक्ष कायद्याचे राज्य सुरू झाले. तरीही कंपनीकडून एकाबाजूला ख्रिस्ती मिशनऱ्यांना उत्तेजन मिळत होते तर दुसऱ्या बाजूला आपले राजकीय प्रभुत्व नष्ट झाल्यामुळे ब्रिटिश सत्तेचे कडवे विरोधक पाठीशी घालण्याचे धोरण कंपनी सरकारकडून जाणीवपूर्वक अवलंबिले जात होते. त्यातूनच बंगालमध्ये जमीनदारांचा एक नवा वर्ग अस्तित्वात आला होता. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराची प्रतिक्रिया म्हणून भारतात जसा सामाजिक सुधारणेचा विचार बळावला, तसाच धार्मिक पुनरुज्जीवनाचा पुरस्कार करणाऱ्या शक्तींनीही जोर केला : नव्याने उदयास आलेला सधन मध्यमवर्ग आधुनिक विचाराने भारला गेला. एक राष्ट्र म्हणून सबंध भारताचा विचार प्रथमच त्यांच्या मनात घोळू लागला. त्यामुळे तो एकात्म राष्ट्रवादाचा पुरस्कर्ता बनला व प्रातिनिधिक संस्थांची मागणी करू लागला. याउलट, सरंजामदार वर्ग मात्र धर्माधिष्ठित राष्ट्र-वादाकडे आकृष्ट झाला.

राष्ट्रवादाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी सरंजामदार आणि मध्यम-वर्गीयांमधील वर्गसंघर्षाचा उपयोग करून घेतला, इतकेच नव्हे तर जातीय आणि धार्मिक भावनेलाही खतपाणी घातले.

मुसलमान समाजातील अश्रफ म्हणून ओळखला जाणारा तुर्कस्थान व पश्चिम आशियामधून आलेल्यांचा जो वर्ग होता, त्याची स्थिती "काप गेले आणि भोके राहिली" अशी झाली होती. आपल्या मूळ वंशाचा त्यांना मोठा अभिमान होता. एकेकाळी या देशात आपण सर्वसत्ताधारी होतो हे तो वर्ग विसरू शकत नव्हता, त्यामुळे भारतीय जनतेशी समरस होणे तो कमीपणाचे समजत होता. धर्मनिरपेक्ष एकात्म राष्ट्रवाद त्याला मानवण्यासारखा नव्हता. इंग्रजी शिक्षणापासून किंवा पाश्चात्य विचारापासून तो अलिप्त राहिला होता. सरकारने पर्शियन भाषेऐवजी इंग्रजी ही राज्यसरकारची भाषा ठरविल्यामुळे राज्य कारभारातील नोकऱ्यांची मक्तेदारीही त्यांच्या हातातून निसटली. व्यापारी वृत्तीचाही त्यांच्या ठिकाणी अभावच होता. आता पूर्वीचे स्थान आपल्याला परत मिळू शकणार नाही अशी खात्री होऊन चुकल्यामुळे अखेर त्यांनी सत्ताधाऱ्यांकडे पदर पसरायला सुरुवात केली. एकेकाळचे राज्यकर्ते म्हणून नोकऱ्यात, लष्करात, आपल्यासाठी राखीव जागा ठेवण्यात

याव्यात, शैक्षणिक सवलती मिळाव्यात अशा मागण्या ते करू लागले व त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांनी 'नॅशनल सेंट्रल मोहामेडन असोसिएशन' या नावाची संस्था स्थापन केली. योगायोग असा की, राष्ट्रवाद्यांची 'इंडियन असोसिएशन' या नावाची संस्थाही त्याच साली स्थापन झाली होती. या दोन संस्था म्हणजे, भारताच्या राजकीय जीवनातील परस्पर विरुद्ध प्रवाह होते. आणि त्यांनी पुढे सतत एकमेकांच्या विरोधी पवित्रे घेतले. राष्ट्रवादी संघटनेकडून केल्या जाणाऱ्या, सनदी नोकऱ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षा आणि प्रातिनिधिक लोकनियुक्त संस्था यासारख्या मागण्यांनी आपले स्थान गमावून बसलेल्या अश्रफवर्गाने धास्ती घेतली. सर सैय्यद अहमद यांचा कॉंग्रेसला इतका कडवा विरोध होता त्याचे रहस्य यावरून ध्यानात येऊ शकते.

सुरुवातीला त्यांनी सर्व जमीनदारांची एक संयुक्त आघाडी उभारून कॉंग्रेसला टक्कर देण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु आपले हे प्रयत्न यशस्वी होऊ शकणार नाहीत, अशी खात्री पटल्यामुळे वैतागून जाऊन त्यांनी 'मोहामेडन डिफेन्स असोसिएशन' ची उभारणी केली. या संस्थेचे ध्येय, धोरण व उद्दिष्ट आणि पुढे १९०६ साली स्थापन झालेल्या मुस्लीम लीगचे ध्येय, धोरण आणि उद्दिष्ट अगदी समान होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.

सत्ताधाऱ्यांना तर एकात्मिक राष्ट्रवादाचा सिद्धांत अमान्यच होता. अश्रफ वर्गानेही तो अव्हेरला आणि मुस्लीम राष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला. सर सैयद यांनी पुरस्कारलेल्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतामुळे ५० वर्षानंतर पुढे आलेल्या पाकिस्तानच्या मागणीत कोणतीही नवी सैद्धान्तिक भर टाकण्याची आवश्यकताच उरली नव्हती. समान नागरिकत्वाची कल्पना अव्हेरून स्वतंत्र मुस्लीम मतदार संघ आणि मुसलमानांसाठी विशेषाधिकार या दोन मागण्यांवरच १८९० पासूनचे अश्रफांचे राजकारण केंद्रीत झाले होते. मुसलमान समाजाला विशेष सवलती देण्याचे सरकारचे जे धोरण होते त्यामुळे बंगालच्या फाळणीच्या लॉर्ड कर्झन यांच्या निर्णयाने द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताला आणखीनच खतपाणी मिळाले. डाक्क्याच्या नवाबाला हाताशी धरून सरकारने फाळणीविरोधी लढायापासून मुसलमानांना अलग पाडले. बंगालमधील मुसलमान जमीनदारांच्या पावलावर पाऊल टाकून पंजाबमधील हिंदू जमीनदारांनी आपली संघटना उभी केली. बाह्यत: या दोन संघटना परस्पर विरोधी भूमिका घेत असल्याचे आढळले तरी त्या दोघींचाही आधार धर्माधिष्ठित राष्ट्रवाद हाच होता. मध्यमवर्गीयांकडून प्रसृत केला जाणारा एकात्मिक राष्ट्रवाद मोडून काढणे हे त्यांचे समान उद्दिष्ट होते. आणि कॉंग्रेस हे टीकालक्ष्य होते.

सुरुवातीची ३० वर्षे कॉंग्रेसचे नेतृत्व प्रागतिकांच्या हाती होते. अर्ज, विनंत्या आणि फार तर निषेध यावर त्यांचा फार भर असे. निरनिराळ्या जाती जमातीत एकजूट घडवून आणण्याचे त्यांचे धोरण होते. त्यामुळेच त्यांनी जातीय नकारा-

धिकाराच्या तत्त्वाला मान्यता दिली आणि स्वतंत्र मतदार संघांना असलेला विरोधही मागे घेतला. यासाठी त्यांना जबर किंमत मोजावी लागली तरी त्यांनी त्याची पर्वा केली नाही की सरकारबरोबर संघर्ष टाळण्याची आपली भूमिकाही बदलली नाही.

प्रागतिकांनी अवलंबिलेली ही नीती विफल ठरणार हे उघडच होते त्यामुळे १८९० पासून काँग्रेसमध्ये जहाल गटाचा उदय होऊ लागला. लोकमान्य टिळकांनी प्रागतिकांविरूद्ध सर्वात प्रथम दंड थोपटले. सरकारला आपल्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडण्यासाठी जनमत संघटित करण्यावर त्यांचा भर होता. त्या वेळच्या परिस्थितीत धर्म आणि ऐतिहासिक परंपरा यांच्याद्वारेच जनमत संघटित करता येण्यासारखे होते. म्हणून लोकमान्यांनी त्यांचाच आधार घेऊन सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंत्युत्सव सुरू केले. जहाल गटातील एकांतिक विचारसरणी धारण करणारे युवक दहशतवादाकडे वळले. अश्रफांना तर प्रागतिकांचेदेखील वावडे होते. साहजिकच काँग्रेसमधील जहाल गट हाच आपला शत्रू आहे अशी अश्रफांनी आपली समजूत करून घेतली आणि जहालांनी वापरलेली साधनेच त्यांनीही मुसलमानांना संघटित करण्यासाठी वापरली. मुसलमानांना काँग्रेसपासून दूर ठेवण्यासाठी हिंदूविरुद्ध त्यांनी कडव्या प्रचाराचे रान उठविले.

लखनौ करारानुसार स्वतंत्र मतदारसंघांना काँग्रेसने दिलेली मान्यता ही एक महान घोडचूक ठरली. त्यामुळे राजकीयदृष्टचा काही फायदा तर झाला नाहीच उलट सरकारला मुसलमानांबरोबर बिगर मुसलमान अल्पसंख्यांकातही ते पिल्लू घुसवता आले. त्याचा एक अत्यंत अनिष्ट असा परिणाम घडून आला आणि तो म्हणजे जातीय पक्षांना ऊत आला. हे सर्व पक्ष सारखेच राजनिष्ठ आणि काँग्रेस विरोधी होते हे त्यांचे वैशिष्टय लक्षात ठेवले पाहिजे. लखनौ कराराच्या अपयशानंतर प्रागतिकांनी काँग्रेसमधून आपले अंग काढून घेतले व काँग्रेसचे नेतृत्व गांधीजींच्याकडे गेले. स्वतंत्र मतदार संघामुळे झालेले राष्ट्राचे अपरिमित नुकसान भरून काढण्याचा त्यांनी पुढील १५ वर्षात आटोकाट प्रयत्न केला. १९३२ साली झालेला अहमदाबाद करार हा गांधीजींचा फार मोठा विजय होता. परंतु अश्रफांचा त्या करारालाही विरोध आहे या सबबीखाली सरकारने स्वतंत्र मतदार संघ चालूच ठेवले. या पार्श्वभूमीवर गांधीजींनी घडवून आणलेला पुणे करार ही फार मोठी कामगिरी म्हणावी लागेल.

ब्रिटिशांची परराष्ट्रनीती आणि विशेषत: तुर्कस्तान विरुद्धच्या युद्धातील इंग्लंडचा सहभाग या गोष्टींचा मुसलमान समाजावर फार मोठा परिणाम घडून आला. अश्रफांचे नेतृत्व त्यांनी झुगारून दिले. त्याची जागा उलेमा आणि इंग्रजी शिक्षण घेतलेल्या नव्या पिढीने घेतली. गांधीजींनी खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला आणि हिंदू-मुसलमान ऐक्याचे एक अभूतपूर्व दृष्य साऱ्या देशाला काहीकाळ पहावयास

मिळाले. खिलाफतीचा मुद्दा इतका पोकळ किंवा निरर्थक नसता तर हिंदू मुसलमान जनतेची ही एकजूट दीर्घकाळ टिकून राहू शकली असती व त्यातून निश्चितच काही तरी चांगले निष्पन्न झाले असते. परंतु आपण जो प्रश्न हाती घेतला आहे त्याचे वैय्यर्थ लक्षात आल्याबरोबर उलेमांचा कडवेपणा पुन्हा हिंदूच्या विरुद्ध उफाळून आला आणि देशात पुन्हा जातीय दंगलीचा आगडोंब उसळला. सरकारविरुद्ध लढा देण्याऐवजी हिंदू आणि मुसलमान समाजातील जातीयवादी नेतृत्व एकमेकांनाच पाण्यात पाहू लागले. वहाबी नेत्यांनी १० व्या शतकाच्या सुरुवातीला मुसलमान समाजाला दिलेल्या शिकवणीमुळे हिंदू मुसलमान जनतेतील समान संस्कृतीचे धागे पार तुटून गेले होते. एका बाजूला तबलीघ आणि दुसऱ्या बाजूला तानझीमची कडवी शिकवण यामुळे समान संस्कृतीचे उरलेसुरले दुवेही नष्ट होऊन गेले. आणि याचा परिणाम असा झाला की, पुढे जिनांनी कॉंग्रेसविरूद्ध जो धादांत खोटा आणि हीन प्रचार सुरू केला त्याला मुसलमान समाज आयताच बळी पडला.

बंगालच्या फाळणीप्रमाणेच पंजाब आणि बंगाल या मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या प्रांतात अधिकारावर आलेल्या जातीयवादी सरकारांमुळे द्विराष्ट्रवाद हा नुसताच सिद्धांत राहिला नाही, तर ती एक वास्तवता होऊन बसली. अश्रफ आणि मुसलमान जमीनदार यांनी नव्या मागण्या पुढे रेटावयास सुरुवात केली. मुसलमान समाजाच्या वतीने बोलण्याचा अधिकार आपल्यालाच काय तो आहे असा दावा करून मताधिकार व्यापक करण्यासाठी त्यांनी विरोध केला. आणि दर वेळी काही तरी खुसपट काढून त्यांनी हिंदू-मुसलमानात समझोता होऊ दिला नाही. अशा परिस्थितीत कॉंग्रेस बरोबरची त्यांची बोलणी सफल होणे शक्यच नव्हते. कारण स्वातंत्र्य संपादन हे कॉंग्रेसचे ध्येय होते तर अश्रफांना साम्राज्यशाही सत्ता टिकवून धरावयाची होती.

एकदा सत्तास्थाने उपभोगल्यानंतर मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या प्रांतातील जातीयवादी नेत्यांची हाव वाढत गेली, आणि सिंध, वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान या ठिकाणची सत्ता मिळविण्याची स्वप्ने ते पाहू लागले; एवढेच नव्हे तर ब्रिटिशांनी आपली सत्ता थेट प्रांताकडे सुपूर्द केली पाहिजे अशी मागणी ते १९२८ पासून करू लागले. हिंदुस्तानच्या वायव्य भागातील मुस्लीम प्रांताचे संघराज्य बनविण्यात यावे असा पुकारा इकबाल आणि अन्य नेते उघडपणे करू लागले. मुसलमानी प्रांताचे संघराज्य बनविण्यात यावे आणि ब्रिटिशांनी परस्पर प्रांताकडे सत्ता सुपूर्द करावी या दोन मागण्यांचा एकत्रितपणे विचार केला, तर त्यांना हिंदुस्तानची हिंदू आणि मुसलमान यांच्यात विभागणी करून हवी होती असाच त्यांचा अर्थ होतो. पाकिस्तान असे नाव त्यांनी त्यावेळी घेतले नव्हते चौधरी रहिमत अली यांनी प्रथम पाकिस्तान असे त्याचे नामकरण केले. केंद्रस्थानी कोठल्याही स्वरूपातील संघराज्य स्थापू देण्यास या जातीयवादी नेत्यांचा सक्त

विरोध होता आणि गोलमेज परिषदेच्या वेळी संघराज्याच्या कल्पनेला विरोध दर्शवून जिनांनी त्यांचीच री ओढली.

१९३० सालापर्यंत मुसलमान तरुण इंग्रजी शिक्षणाच्या बाबतीत इतर पुढारलेल्या जातींच्या बरोबरीला आले होते. परंतु मुसलमान समाजाला व्यापार किंवा कारखानदारी चालविण्याची परंपरा नव्हती. आणि मुसलमान जमीनदार हे तर आपल्या उधळपट्टीमुळे कर्जबाजारी बनले होते. ह्यामुळे या नवशिक्षित मुसलमान युवकांपुढे सरकारी नोकऱ्या मिळविणे एवढा एकच पर्याय शिल्लक होता. पण त्यांतही, बिगर मुसलमानांच्या बरोबर आपण टिकाव धरू शकू असा आत्मविश्वास त्यांना वाटत नव्हता. त्यामुळे आपल्या पुढाऱ्यांनी सरकारवर अधिकाधिक दडपण आणून निरनिराळ्या खात्यात आपल्याला विशेषाधिकार मिळवून द्यावेत अशी त्यांची अपेक्षा होती. जातीयवादी राजकारणीही सरकारी नोकरीतील मुसलमानांच्या नेमणुका आणि बदल्या यांत चबढब करीत. याचा असा परिणाम झाला की, मुसलमान तरुण व सरकारी नोकरीतील मुसलमान यांच्यात जातीयवादी राजकारणासंबंधी हितसंबंध निर्माण झाले आणि इंग्रजी शिक्षण घेतलेल्या मुसलमानांचा एक गट फुटीरवादी विचारसरणीकडे आकृष्ट झाला. लंडनमध्ये शिकत असलेल्या पंजाबी विद्यार्थ्यांनी सर्वात प्रथम पाकिस्तान निर्माण झालेच पाहिजे अशी जाहीरपणे मागणी केली आणि तेथपासून मुसलमान युवक आणि सरकारी नोकऱ्यातील मुसलमान यांच्यात ही मागणी अधिकाधिक जोर धरू लागली.

१९३० ते ३३ च्या सांप्रदायिक चळवळीत राष्ट्रीय मुसलमानांनी बजावलेली कामगिरी नेत्रदीपक होती. त्यांच्यापैकी अनेकांनी 'नेहरू रिपोर्ट' चा पाठपुरावा केला होता. त्याचप्रमाणे अलाहाबाद करार घडवून आणण्याच्या कामीही त्यांचे मोलाचे साहाय्य झाले होते. जातीयवादी विरोधकांशी त्यांनी मोठ्या धैर्याने टक्कर दिली होती. परंतु ब्रिटिश सरकारने अलाहाबाद कराराचा मुलाहिजा ठेवला नाही. इतकेच नव्हे तर बंगालच्या कायदेमंडळाने संयुक्त मतदारसंघांना पाठिंबा दर्शविणारा जो ठराव पास केला होता त्याचीही दखल न घेता 'जातीय निवाडा' भारतीय जनतेवर लादला. हिंदुस्तानच्या इतिहासावर या निवाड्याचा फार दूरगामी स्वरूपाचा परिणाम घडून आला. राष्ट्रीय मुसलमानांचे नीतीधैर्यच त्यामुळे गळून पडले जातीयवादी शक्तीबरोबर दोन हात करण्याची जिद्दच त्यांच्यात उरली नाही आणि १९३४ साली जीनांनी पुनरुज्जीवित केलेल्या मुस्लीम लीगकडे त्यांचा लोंढा सुरू झाला.

१९३० च्या दशकात उत्तर प्रदेशात किसानांच्या चळवळी झाल्या. पंडित जवाहरलाल नेहरू अशा चळवळीच्या अग्रभागी असत. धार्मिक प्रचाराने वाहवून न जाता आर्थिक प्रश्नांवर हिंदू-मुसलमानांनी संघटित झाले पाहिजे असा प्रचार ते करीत. त्यामुळे मुसलमान जमीनदार बिथरून गेले. औद्योगिक कामगारही

वर्गसंघर्षाच्या भूमिकेवरून संघटित होऊ लागले. किसान कामगार संघटना स्वातंत्र्य-लढ्याशी एकरूप होऊ लागल्या व स्वातंत्र्य लढ्याला अधिकाधिक जहाल स्वरूप येऊ लागले. त्यामुळे जातीयवादी मुसलमान पुढारी संतप्त झाले. काहीतरी निमित्त, करून त्यांनी जातीय दंगे पेटविण्यास सुरुवात केली. राष्ट्रीय मुसलमान या साऱ्या प्रकाराने धास्तावून गेले आणि त्यांनी मुसलमान जातीयवाद्यांबरोबर तडजोड घडवून आणण्यासाठी काँग्रेसवर दडपण आणण्यास सुरुवात केली.

१९३७ साली संयुक्त प्रांतात काँग्रेसने संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याची संधी गमावली, त्यामुळे कमालीचे जातीय वितुष्ट निर्माण झाले आणि पाकिस्तानची मागणी पुढे आली असा जो एक समज आहे तो बरोबर नाही. जीनांना यच्चयावत सर्व मुसलमानांना मुस्लीम लीगच्या झेंड्याखाली आणावयाचे होते. काँग्रेसबरोबर करावयाच्या वाटाघाटीतही लीगचे वर्चस्व राहिले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. वस्तुतः त्यावेळी बहुतेक प्रांतातील मुस्लीम लीगची ताकद उपेक्षणीय होती. मुस्लीम लीग बरोबरच्या वाटाघाटी यशस्वी होणे शक्यच नव्हते कारण संयुक्त मंत्रिमंडळाबरोबर येणारी संयुक्त जबाबदारी स्वीकारण्यास लीग तयार नव्हती. मुंबईत संयुक्त मंत्रिमंडळात सामील होण्यासाठी सबंध मंत्रिमंडळ आपल्या पसंतीचे असले पाहिजे अशी जीनांची अट होती. तथापि जीनांनी काँग्रेसविरुद्ध जे इतके रान उठविले होते त्याचे इंगित निराळेच होते. काँग्रेसने जमीन सुधारणाविषयक कायदे करण्याचे ठरविले होते. त्याचप्रमाणे संस्थानी प्रजेच्या राजकीय हक्कासाठी चाललेल्या लढ्याला काँग्रेसचा जो पाठिंबा होता तो जीना आणि मुस्लीम लीगमधील अश्रफ यांना अजिबात पसंत नव्हता.

संस्थानी मुलखासकट हिंदुस्तानचे संघराज्य निर्माण करावे अशी कल्पना पुढे आल्याबरोबर संस्थानांचे प्रतिनिधीत्व कोणी करावे यावर वाद सुरू झाला. काँग्रेस आणि पुरोगामी विचाराच्या इतर गटांचा संस्थानिकांना आपले प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार बहाल करण्यास सक्त विरोध होता. संस्थानी प्रजेच्या लढ्यांना काँग्रेसचा पाठिंबा होता. हैद्राबाद संस्थानात निजामाविरूद्ध आंदोलन सुरु झाल्या. बरोबर जातीयवादी मुसलमान पुढाऱ्यांनी 'इस्लाम धोक्यात' असल्याची ओरड सुरू केली, तर हिंदू जमीनदार आणि हिंदू संस्थानिक यांनी हिंदू महासभेचा आश्रय घेतला. म्हणजे काँग्रेसला एका बाजूला मुसलमान जातीयवादी आणि दुसऱ्या बाजूला हिंदू जातीयवादी असा दोघांशी मुकाबला करण्याचा प्रसंग आला, कारण त्या दोघांनाही आपापल्या जमातीतील प्रस्थापित हितसंबंधाची पाठराखण करावयाची होती.

काँग्रेस पुढाऱ्यांनी कितीही खुलासे केले, तरी त्याकडे जाणूनबुजून डोळेझाक करून काँग्रेसला 'हिंदूंचे राज्य' स्थापन करावयाचे आहे किंवा इस्लाम धोक्यात आहे अशा तऱ्हेचा धादांत खोटा प्रचार जीनांनी पद्धतशीरपणे सुरू ठेवला.

अश्रफ ज्यावेळी भरभराटीत होते त्यावेळी त्यांनी या देशात पूर्वीपासून वस्तुत: मुसलमानांचेच राज्य होते आणि हिंदूंना दुय्यम स्थान होते. पूर्वीचे गतवैभव प्राप्त करून घेण्यासाठी मुसलमानांनी साम्राज्यशाही सरकारची बांधिलकी पत्करली पाहिजे अशा तऱ्हेच्या शिकवणुकीने मुसलमानांची मने भारावून टाकली होती. संघराज्याच्या कल्पनेला सतत विरोध करून देशाच्या विभाजनाच्या विविध योजना सुचविण्यात आल्या अशा विभक्तीकरणातून मुसलमान समाजाचा जास्तीतजास्त फायदा कसा होईल त्यावर दृष्टी ठेवूनच सर्व योजना आखण्यात आलेल्या होत्या. मुस्लीम लीगच्या लाहोर अधिवेशनात पाकिस्तानची मागणी करणारा जो ठराव पास करण्यात आला त्याची भाषा मुद्दामच गोलमाल ठेवण्यात आली होती. परंतु जीनांच्या वक्तव्यावरून त्यांना भारत छिन्नविच्छिन्न करून टाकावयाचा आहे हे स्पष्ट होत होते. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यापासून त्यांनी व्हाइसरॉयपुढे ज्या मागण्या मांडल्या त्यावरून त्यांना केंद्र आणि प्रांतिक सरकारांवर संपूर्ण नियंत्रण हवे होते हे स्पष्ट होते. त्यासाठी त्यांनी द्विराष्ट्रवादाची कास धरून मुसलमानांना बिगर मुसलमानांइतके प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे अशी मागणी केली. इतकेच नव्हे तर अल्पसंख्य गटाचे प्रतिनिधी कोण असावेत ते ठरविण्याचा अधिकारही मुस्लीम लीगला असला पाहिजे असा आग्रह धरला. जीनांना तीन गोष्टी साध्य करून घ्यावयाच्या होत्या. (१) हिंदुस्तानात मुसलमानांची निरंकुश सत्ता पुन्हा स्थापन करणे, (२) देशाची छकले पाडणे आणि (३) पाकिस्तान निर्माण करून घेणे. लोकशाही किंवा प्रातिनिधिक संस्था याबद्दल त्यांना जरा सुद्धा आस्था नव्हती. ज्यावेळी महात्मा गांधी व चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी मंत्रिमंडळात मुस्लीम लीगने सामील व्हावे म्हणून जीनांची मनधरणी केली, त्यावेळी त्यांनी ती धुडकावून लावली. त्याचे कारण देताना त्यांनी असे सांगितले की, हिंदूंचे मताधिक्य असलेल्या कोणत्याही कायदे मंडळाला जबाबदार राहण्यास मुस्लीम लीगचे मंत्रीमंडळ कधीही तयार होणार नाही.

१९३५ च्या कायद्यान्वये मतदानाच्या अधिकारांची व्याप्ती वाढविण्यात आली त्यामुळे अश्रफ वर्गाचे महत्त्व आणखीनच कमी झाले. १९४० पर्यंत मुसलमानांच्या राजकारणात नव्याने उदयास आलेल्या मध्यमवर्गाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. उद्योजक म्हणून हारून किंवा इस्पहानी अशी घराणी पुढे येऊ लागली होती. प्रस्थापित बिगर मुसलमान भांडवलदारांबरोबरची स्पर्धा त्यांना टाळावयाची होती. आता जे प्रांत पाकिस्तानात मोडतात, त्या भागातील मुसलमान जमीनदारांचा काँग्रेसला, तिच्या शेतकऱ्यांना अनुकूल असलेल्या भूमिकेमुळे विरोध होता. इंग्रजी शिक्षण घेतलेले मुसलमान तरुण हे तर आधीच फुटीरवादाच्या आहारी गेलेले होते. आता नव्याने पुढे येऊ लागलेला मुसलमानातील भांडवलदार वर्ग आणि जमीनदार यांनाही असे वाटू लागेल की, देशाच्या विभाजनामुळेच आपला जास्तीतजास्त फायदा होऊ शकेल.

भारतीय स्वातंत्र्याचा शेवटचा सामुदायिक लढा १९४२ च्या अखेरीस फसल आणि त्याचबरोबर अखंड भारताची लढाईही आपण हरलो. ऑगस्ट क्रांती हे स्वातंत्र्य संग्रामातील एक सोनेरी पान असले, तरी पूर्वीच्या लढ्यांच्या मानाने त्यावेळी सर्वसामान्य जनता या लढ्यात सामील झाली नाही. पाकिस्तानात गेलेले प्रांत तर 'भारत छोडो' आंदोलनापासून जवळजवळ अलिप्तच राहिले. हिंदू आणि मुसलमान जमीनदार आणि उदारमतवादी म्हणवून घेणारा दलाली भांडवलदारवर्ग यांनी अपेक्षेप्रमाणे इंग्रजांचे बूटचाटेपण सोडले नाही. महात्मा गांधींचे उपोषण- किंवा बंगालमधील भयानक दुष्काळ यासारख्या घटनांमुळे देखील जनता बंड करून उठली नाही, हे कबूल करावे लागेल. पाकिस्तानला प्राणपणाने विरोध करू अशा वल्गना करणाऱ्यांनी आपले शद्ब म्हणजे बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी आहे असे आपल्या कृतिशून्यतेने दाखवून दिले. संघटन आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावाखाली हजारो युवकांना 'भारत छोडो' आंदोलनापासून अलिप्त राहावयास लावून त्यांना निष्क्रिय बनवून टाकले गेले. भारताची फाळणी जवळ येत चालली आहे याची साधी कल्पनासुद्धा त्यांच्या पुढाऱ्यांना आली नाही. आझाद हिंद सेनेला जबरदस्त पराभव पत्करावा लागला आणि त्याबरोबर भारतीय स्वातंत्र्य आणि एकता यासाठी भारताच्या बाहेरून चाललेल्या लढ्याचीही इतिश्री झाली. ऑगस्ट क्रांतीत सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणावर सामील करवून घेण्यात आलेले अपयश हेच भारताच्या विभाजनाचे मुख्य कारण ठरले असे म्हटले पाहिजे.

चर्चिल आणि हुजूर पक्ष यांनी हिंदुस्तान, पाकिस्तान आणि संस्थानिस्तान अश तीन भागात हिंदुस्तानची फाळणी करण्याचा घाट घातला होता तर कम्युनिस्टांनी बहुराष्ट्रवादाचा सिद्धांत पुढे करून भारत छिन्नविच्छिन्न करून टाकण्याचा पवित्रा घेतला होता.

माऊंटबॅटन निवाडा ही साम्राज्यवाद्यांच्या दुतोंडी धोरणाचीच परिणती असून जरी सत्तांतराच्या राष्ट्रीय मागणीबाबत काही सवलती मिळत असल्या तरी खरेखुरे स्वराज्य मिळू नये म्हणून प्रतिगामी आणि फूटपाड्या शक्तींना मुक्तद्वार मिळाले आहे, अशा अर्थाचा ठराव कम्युनिस्टांनी १९४७ च्या जूनमध्ये पसार केला.

१९४६ साली आलेल्या कॅबिनेट मिशनने प्रथम केलेल्या सूचनेनुसार पाकिस्तान खंडित होणार होते. जीनांनी ती सूचना फेटाळल्यानंतर मिशनने आपल्या मूळ सूचनेत पूर्व पंजाब, पश्चिम बंगाल आणि संपूर्ण आसाम यांचा समावेश केला. याचे दोन विभाग राहणार होते व त्या प्रत्येक विभागातील मुस्लीम लीगला त्या त्या विभागांतील प्रांताची स्वायत्तता पायदळी तुडवून आपल्याला हवी ती घटना गटांवर आणि प्रांतावर लादण्याचे अधिकार देण्यात आले होते. शीख समाजाला महत्त्वाचा अल्पसंख्य गट म्हणून मान्यता देण्यात आली असली तरी त्याचे भवितव्य मुस्लीम

लीगच्या हाती सोपवून देण्यात आले होते. उलट आधीच दुर्बल करून ठेवण्यात आलेल्या केंद्रीय सत्तेतही मुस्लीम लीगला जातीय नकाराधिकार बहाल करण्यात आला होता. व्हाइसरॉय आणि कॅबिनेट मिशन यांनी अशी अट घालून ठेवली की, काँग्रेस व मुस्लीम लीग यांना वरील योजना मान्य असेल तरच त्यांना, मध्यावधी केंद्रीय सरकारात सामील होता येईल. जीनांचा अनुनय करण्यासाठी काँग्रेस आणि लीग यांना समान प्रतिनिधीत्व देण्याची सूचनाही घुसडण्यात आली. सर्वात कळस म्हणजे मुस्लीम लीगने ५ आणि ६ जूनच्या बैठकीत संमत केलेल्या प्रदीर्घ ठरावाकडे सपशेल डोळेझाक करून लीगला ही योजना पसंत आहे असा कॅबिनेट मिशनने स्वतःचा ग्रह करून घेतला. वस्तुतः लीगने आपली पाकिस्तानची मागणी सोडून दिलेली नव्हती किंवा भारताच्या प्रादेशिक एकतेच्या तत्त्वालाही मान्यता दिलेली नव्हती. काँग्रेस साहजिकच समान प्रतिनिधीत्वाला विरोध दर्शविल्याशिवाय राहणार नाही असा जीनांचा आडाखा होता. त्यामुळे मध्यावधी सरकारवर संपूर्ण नियंत्रण ठेवता येईल या आशेने डावपेचाचा एक भाग म्हणून जीनांनी कॅबिनेट मिशनची योजना स्वीकारण्याची तयारी दर्शविली होती. जिनांनी ज्या घाईघाईने १६ जूनच्या निवेदनास मंजुरी दिली त्यावरूनही कसेही करून काँग्रेसला मध्यावधी सरकारपासून दूर ठेवण्याचा जीनांचा डाव होता हे स्पष्ट होते.

२३ सप्टेंबर १९४६ च्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीत काँग्रेसने असे जाहीर केले होते की, काँग्रेस घटना समितीत प्रवेश करणार आहे ती हातचे राखून न ठेवता आणि कोणत्याही पूर्व अटी न घालता. मौलाना आझाद यांनी याच भूमिकेचा पुनरुच्चार केला होता. पुढे लीगने कॅबिनेट मिशनची योजना नाकारली ती मुख्यतः वॅव्हेल आणि जिना यांनी शिजवत आणलेला कट फसल्यामुळेच. मध्यावधी मंत्रिमंडळात काँग्रेसला पाच, लीगला पाच, शिखांना व भारतीय ख्रिश्चनांना एक अशा जागा द्यावयाच्या त्यातही काँग्रेसला आपल्या पाच जागातही मुसलमान मंत्री नेमण्यास परवानगी द्यावयाची नाही व साहजिकच अशा अपमानास्पद अटींमुळे काँग्रेसने मध्यावधी मंत्रिमंडळात सामील होण्याचे नाकारले. म्हणजे मुस्लिम लीगला मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण करून देशाची सर्व सत्ता जीनांच्या हाती सुपूर्द करावयाची असा डाव वॅव्हेल आणि जिना यांनी शिजवत आणला होता परंतु काँग्रेसने मध्यावधी मंत्रिमंडळात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्यामुळे जीनांचे सारेच इमले कोलमडले.

काँग्रेसने कॅबिनेट मिशनच्या १६ मे च्या वक्तव्यास बिनशर्त मान्यता दिली असती तरीदेखील जीना अविभक्त भारताची घटना बनविण्याच्या कामात सहकार्य देण्यास तयार झालेच नसते. कारण फाळणीच्या प्रश्नावरच त्यांनी निवडणुका जिंकल्या होत्या आणि ती मागणी सोडून देण्यास ते तयार नव्हते. प्रसंगी स्वतःच्या मतास मुरड घालूनही जीना हे सर्वसामान्य मुसलमान नागरिकांच्या आकांक्षा शिरोधार्य

मानीत आले होते. वस्तुतः भारताच्या फाळणीचे आमिष दाखवून किंवा इस्लाम धोक्यात आहे असा बागुलबुवा निर्माण करून मुसलमानांच्या भावना त्यांनीच भडकावून ठेवल्या होत्या आणि आता त्यापासून माघार घेणे त्यांना शक्य नव्हते. लखनौ करारापासूनच्या जीनांच्या कोलांटउडचा पाहिल्या म्हणजे मुसलमानांच्या भावनांच्या लाटेवर आरूढ होऊनच जीनांना आपले राजकारण चालवावयाचे होते हे प्रत्ययास येते.

मुस्लीम लीग संयुक्त मंत्रिमंडळात सामील झाली त्याच्याही आधी काँग्रेसने त्याबाबत हरकत उपस्थित केली होती. लीगने कॅबिनेट मिशनच्या १६ मेच्या प्रकटनाला संमती दिलेली नसल्याने लीगला संयुक्त मंत्रिमंडळात सहभागी होण्याचा मुळी अधिकारच पोहोचत नाही असे काँग्रेसने दाखवून दिले होते. पुढे संयुक्त मंत्रिमंडळाच्या प्रत्यक्ष कारभाराबाबत लीगने जे धोरण स्वीकारले त्यावरून तिला काँग्रेसबरोबर संघ भावनेने काम करावयाचे नव्हते हे दिसून आले. काँग्रेसने लीगच्या या धोरणाबद्दल वेळोवेळी आपला विरोध नोंदवला. लीगच्या मंत्र्यांना मंत्रिपदाचे राजीनामे देण्यास सांगण्यात यावे अशी मागणीही काँग्रेसने केली. तरीही लीगला मंत्रिमंडळात राहू देण्यात आले. १९४६ च्या अखेरीपर्यंत भारताची फाळणी अटळ आहे हे ठरून गेल्यासारखेच होते.

पाकिस्तान निर्मिती तर आता होऊन चुकली आहे. परंतु अजूनही त्यासंबंधी काही प्रश्न उद्‌भवतात. अर्थात होऊन गेलेल्या घटनांबद्दल काथ्याकूट करण्याचाच तो प्रकार असला तरी असे प्रश्न मनात आल्यावाचून राहत नाहीत. १९४० सालापासून काँग्रेस असे जाहीर करीत आली होती की, ज्यांची इच्छा नसेल अशा प्रांतांवर त्यांच्या मर्जीविरुद्ध हिंदुस्तानात राहण्याची सक्ती केली जाणार नाही. या भूमिकेनुसार काँग्रेस असा आग्रह धरू शकली असती की, कॅबिनेट मिशनने त्या त्या प्रांतातील जनतेचा प्रथम कौल घेऊन नंतर खंडित पाकिस्तानचा आपला पहिला पर्याय अंमलात आणला पाहिजे. पंजाब आणि बंगालची फाळणी करण्याची मागणी करणारा ठराव काँग्रेस वर्किंग कमेटीने पास केल्यापासून मुस्लीम लीगचे नेतृत्व अत्यंत गोंधळून गेले होते. यावरून काँग्रेसने कॅबिनेट मिशनकडे जनतेची इच्छा समजून घेऊन खंडित पाकिस्तानचा आग्रह प्रथमच धरला असता, तर त्यामुळे काँग्रेस आपल्या उद्‌घोषित भूमिकेशी प्रामाणिक आहे असे सिद्ध झाले असते. त्यामुळे मुसलमान जनता आणि तिचे पुढारी यांच्यात या सबंध प्रश्नाच्या फेरविचाराची प्रक्रिया सुरू झाली असती.

मजूर सरकार खरोखरीच सत्ता सोडून निघून जाईल यावर शेवटपर्यंत विश्वास न बसल्याने काँग्रेसमधील जहाल गटाने आणखी एक सामुदायिक उठाव घडवून आणावा असा आग्रह धरला होता. १९४६ साली तशी सामुदायिक चळवळ झाली असती तर ती १९४२ च्या लढ्यापेक्षा अधिक व्यापक झाली असती खरी. पण

त्या परिस्थितीत मग वॅव्हेल व जीना जो डाव करू पाहत होते त्याला गती मिळाली असती आणि १९४६ सालचा लढा सरकार, मुस्लीम लीग आणि संस्थानिक या तिघांनी मिळून चिरडून टाकला असता. मुस्लीम लीगच्या हाती गृह आणि संरक्षण ही दोन्ही खाती गेल्यामुळे त्या लढ्याची परिणती यादवी युद्धात झाली असती इतकेच नव्हे, तर या तिघांचे मिळून संयुक्त बळ राष्ट्रवाद्यांना फार भारी पडले असते.

ज्या एका प्रांतात काँग्रेसला मुसलमान समाजाचा भरभक्कम पाठिंबा मिळत आला होता तो प्रांत तिला गमवावा लागला हे केवढे दुर्दैव! बिहार आणि बंगालमधील दंगलीमुळे जी पिसाट जातीयवादी भावना उसळली तिचा सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतातील मुस्लीम जनतेवर अत्यंत विघातक असा परिणाम घडून आला. या दंगली घडून आल्या नसत्या, तर डिसेंबर १९४६ मध्ये सिंध प्रांतात झालेल्या निवडणुका लीगला जिंकता आल्या नसत्या. आणि १९४७ च्या जुलैत वायव्य सरहद्द प्रांतात घेण्यात आलेला सार्वमताचा कौलही कदाचित काँग्रेसच्या विरुद्ध गेला नसता. परंतु काँग्रेसकडून एक मोठी घोडचूक झाली ती अशी की, मध्यावधी सरकारात आपल्यातर्फे राष्ट्रवादी मुसलमानाची नियुक्ती करण्याचा काँग्रेसने आग्रह धरला होता आणि तो योग्यच होता. परंतु नियुक्तीचे वेळी सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतातील राष्ट्रवादी मुसलमानांकडे मात्र काँग्रेसने कानाडोळा केला. १९४६ च्या ऑक्टोबरात पंडित नेहरूंनी वायव्य सरहद्द प्रांताला भेट दिली. त्यावेळी ठिकठिकाणी त्यांना प्रक्षुब्ध मुसलमानांच्या जमावाला तोंड द्यावे लागले. परंतु त्यांनी आपल्या बरोबर जर केंद्रीय मंत्रिमंडळात वायव्य सरहद्द प्रांतापैकी एखादा काँग्रेस पुढारी घेतला असता तर काँग्रेसला हिंदूंचे राज्य प्रस्थापित करावयाचे आहे या लीगच्या प्रचारातील वाराच काढून घेतल्यासारखा झाला असता. सिंध मंत्रिमंडळासंबंधीचा पेचप्रसंग ज्यावेळी शिगेला पोहोचला होता, त्यावेळी सिंध कोॲलिशन पार्टीच्या नेत्यांनी मध्यावधी सरकारातील आपला प्रतिनिधी म्हणून काँग्रेसने कोॲलिशन पार्टीतील एकाद्या मुसलमानाची नियुक्ती करावी म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांची परोपरीने विनवणी केली. परंतु त्याबाबतचे सर्व अधिकार मौ. आझाद यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहेत असे सांगून सरदार पटेलांनी आपले हात झटकले. आजवरची आपली सर्व नावे गुंडाळून ठेवून ज्यांची सारी हयात जातीयवादाचे जहर फैलावण्यात गेली होती अशा शफत अहमदखान आणि फजलूलहक यांना काँग्रेसने आपल्यातर्फे मध्यावधी सरकारात नियुक्त केले. पंजाबात कट्टर राजनिष्ठ असलेले खिजर हयातखान यांना काँग्रेसने दिलेला पाठिंबा हीही अशीच एक मोठी चूक होती. बंगालचे पंतप्रधानपद गेल्याबरोबर फझलूलहक यांनी कोलांटी उडी घेतली. लीगचा त्याग करून ते 'राष्ट्रवादी' मुसलमान नेते झाले. आणि मध्यावधी सरकारात आपली वर्णी लागत नाही असे दिसून आल्याबरोबर लगेच ते लीगवासी झाले.

हिंदुस्तानच्या अलिकडील इतिहासातील खरा कूट प्रश्न काँग्रेसने पाकिस्तानला

मान्यता कशी दिली यापेक्षादेखील जीनांनी 'कसरीने कुरतडलेला, छिन्नविच्छिन्न आणि खंडित' पाकिस्तान स्वीकारायला संमती कशी दिली हा आहे. वॅव्हेल-जीना कट फसल्यामुळे जीनांना फार मोठा धक्का बसला. काँग्रेसला डावलून सर्व सत्ता जीनांच्या हाती सोपविण्यास मजूर पक्ष तयार नव्हता. कारण काँग्रेसने सामुदायिक चळवळ सुरू केली असती, तर तिला तोंड देण्याची त्या पक्षाची तयारी नव्हती. अर्थात प्रत्यक्षात चळवळ सुरू झाली असती, तर ती दडपून टाकली जाण्याचीच शक्यता होती. परंतु मजूर पक्ष तो धोका पत्करण्यास तयार नव्हता आणि प्रत्यक्ष लढ्यापेक्षा लढ्याची घोषणाच काँग्रेसच्या दृष्टीने अधिक फायदेशीर ठरली. दैनंदिन कारभारात मुस्लीम लीगकडून वारंवार आगळीक केली जात असतानाही काँग्रेसच्या मंत्र्यांनी राजीनामा देऊन मध्यावधी सरकारमधून बाहेर पडावयाचे नाही असे ठरविले त्याचप्रमाणे कॅबिनेट मिशनने किंवा जीनांनी आयोगाच्या घोषणेचा जो अर्थ लावला होता त्याला बळी पडण्याचेही काँग्रेसने ठामपणे नाकारले. या सर्व घडामोडींमुळे संपूर्ण सत्ता बळकावण्याची जीनांची स्वप्ने धुळीला मिळाली. तसे पाहिले तर विशाल पाकिस्तानच्या निर्मितीची जीनांना घाई होण्याचे काहीच कारण नव्हते. अजूनही घटना परिषदेत सहभागी होऊन तिच्या कामकाजात पेचप्रसंग निर्माण करण्याचा आदेश ते मुस्लीम लीगला देऊ शकले असते, परंतु त्यांचा हा आदेश कितपत मानला गेला असता याची शंकाच आहे. उलट त्यामुळे जीनांचे सर्वसामान्य मुस्लीम जनतेवर आणि मुस्लीम लीगवर असलेले वजन कमी होण्याचाच धोका होता आणि शेवटचे, परंतु तितकेच महत्त्वाचे म्हणजे जीना हे व्याधीजर्जर झाले होते. घटना समितीत चालणारा प्रदीर्घ लढा तडीस नेईपर्यंत आपण जगू शकू असा भरवसा त्यांना राहिलेला नव्हता. पुढे १९४८ च्या सप्टेंबरात ते निवर्तलेही. अशा परिस्थितीत विशाल पाकिस्तानचे आपले ध्येय पुढे केव्हा तरी साध्य होईल या आशेवर विसंबून राहण्यापेक्षा मिळेल ते पाकिस्तान, मग ते खंडित का असेना, तावडतोब पदरात पाडून घेणेच त्यांनी पसंत केले.

हिंदुस्तानच्या दृष्टीने १९४७ साली ज्या स्वरूपात भारताचे विभाजन झाले, ती एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना मानली पाहिजे. पहिली गोष्ट अशी की, त्यामुळे भारतात प्रथमच जनतेला जबाबदार असलेली केंद्रीय सत्ता प्रस्थापित झाली. अर्थात त्यासाठी फार मोठी किंमत मोजावी लागली. फाळणीनंतर फार मोठ्या प्रमाणावर दोन्ही बाजूकडील लोकांच्या कत्तली झाल्या, लाखो कुटुंबांची धूळधाण झाली आणि माणुसकीला काळिमा लावणारी क्रूर कृत्ये घडली. हे सगळे मान्य करूनही सामर्थ्यवान केंद्रीय सत्तेची स्थापना होणे हा जनतेच्या दृष्टीने फार मोठा विजय होता हे नाकारता येणार नाही. जातीय, फुटीरवादी शक्ती, महत्त्वाकांक्षी संस्थानिक आणि हुजूर पक्षीय सत्ताधाऱ्यांच्या मनातील अंतस्थ हेतू या सर्वांवर मात करून मिळालेला हा विजय होता. दुर्दैवाची गोष्ट अशी की, ज्यांनी कधी ना कधी सरकारची री

ओढण्यात भूषण मानले होते, अशा अनेक भारतीय पक्षांनी यावेळीही फुटीरपणाला संपूर्ण साथ दिली. १९२० साली कांग्रेसने बहिष्काराचे आवाहन केलेले असताना याला प्रतिसाद न देता प्रतियोगी सहकारवाल्यांनी सरकारच्या जातीयवादी राजकारणाचा फैलाव करण्याच्या कामी मनापासून हातभार लावला. १९४० च्या सुमारास अनेक जणांनी कळत न कळत भारताच्या चिरफळ्या करण्याच्या कल्पनेला खतपाणी घातले. लोकयुद्धाचा पुकारा करून सरकारच्या युद्ध प्रयत्नात सहभागी झालेल्या कम्युनिस्टांनी आपल्या बहुराष्ट्र सिद्धांताने भारताच्या विभाजनाला तात्त्विक बैठक प्राप्त करून दिली. हिंदुमहासभेने हिंदू संस्थानांचे भारतात विलिनीकरण करण्यास विरोध दर्शवून एका परीने मुस्लीम लीगच्याच पावलावर पाऊल टाकले १९४७ च्या जानेवारीत हिंदू महासभेच्या अध्यक्षांनी एक जाहीर वक्तव्य प्रसिद्ध करून त्रावणकोरचे भारतात विलिनीकरण करण्याच्या आपण विरुद्ध असल्याचे सांगून टाकले होते.

१९४५ च्या निवडणुकी जिंकून जर पुन्हा चर्चिल आणि अमेरी सत्तेवर आले असते तर भारताचे आणखी विभाजन होऊन अनेक स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आल्याशिवाय राहिली नसती.

भारताचे विभाजन घडवून आणण्याचे जे धोरण जीनांनी अवलंबिले होते, त्याचा पूर्वीच्या हैद्राबाद व काश्मीर या संस्थानांचे भवितव्य घडविण्याच्या बाबतीत फार मोठा परिणाम घडून आलेला आहे. जीना स्वत: मुसलमानी संस्थानातील राजेशाही टिकवून धरण्याच्या बाजूचे असल्याने, संस्थानी प्रजेने चालविलेल्या लढ्यांवर त्यांचा फार मोठा राग असे. १९४६ साली काश्मीरमध्ये दडपशाहीचा कहर उसळला त्यावेळी कॅबिनेट मिशनबरोबरच्या वाटाघाटी ऐन भरास आलेल्या असतानाही वॅव्हेलचे न ऐकता नेहरूंनी श्रीनगरकडे धाव घेतली. तेथे संस्थानी अधिकाऱ्यांनी त्यांना अटक केली. ज्यावेळी संस्थानी प्रजेला बाहेरच्या मदतीची अत्यंत जरूर होती त्यावेळी तिला जीना व मुस्लीम लीगकडून ती मिळाली नाही, तर नेहरूच तिच्या मदतीला धाऊन गेले होते. या सर्वांचा परिणाम मात्र असा झाला की, काश्मीर आणि हैद्राबाद या दोहोंवरही जीनांना पाणी सोडावे लागले.

खाजगी जीवनात जीना हे प्रामाणिक आणि नि:स्वार्थी गृहस्थ होते. भ्रष्ट आणि अकार्यक्षम राजकारण्यांचा त्यांना मनस्वी तिटकारा असे, परंतु आपले राजकीय उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी मुस्लीम लीगच्या नावाने चाललेल्या या निरनिराळ्या प्रांतातील मंत्र्यांच्या भ्रष्ट कारभारावर मात्र ते पांघरूण घालीत. मुसलमान समाजातील सर्वसामान्य जनता पाकिस्तानच्या वेडाने इतकी भारावून गेली होती की, ते आपल्या भ्रष्ट पुढाऱ्यांच्या पापाकडे खुशाल डोळेझाक करीत. त्याचा परिणाम असा झाला की, पाकिस्तानातही त्यांना भ्रष्ट कारभाराचा वारसा मिळाला आहे. १९४७ साली जो गट पाकिस्तानात सत्तेवर आला त्याने देखील आपल्याला सत्तेवर राहू

देण्यासाठी ब्रिटिश गव्हर्नरांनी ज्या कारवाया केल्या होत्या त्यांचाच कित्ता गिरविण्यास सुरुवात केली.

ब्रिटिशांची केंद्रीय सत्ता नष्ट करून त्याजागी भारतीय जनतेची सत्ता प्रस्थापित करण्याच्या महान लढ्यातूनच पाकिस्तानचे प्रकरण उद्भवले हे नीट लक्षात ठेवले तरच भारतात ज्या घटना घडत गेल्या त्यांची बरोबर संगती लागू शकते. १९२० पासून जातीयवादी मुसलमानांच्या राजकारणाचा मुख्य भर जास्तीतजास्त प्रांतिक स्वायत्ततेवर होता. केंद्रीय सत्ता स्थापन होऊ देण्यास त्यांचा कडवा विरोध होता आणि भारताचे विभाजन घडवून आणण्याच्या त्यांच्या कारवाया उघडपणे चालू होत्या. मुस्लीम लीग हा अखिल भारतीय पक्ष असला तरी मूलतः तो महासंघाच्या स्वरुपाचा होता आणि मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या प्रांतातील पुढाऱ्यांना त्यात सामील होण्यावाचून गत्यंतर नव्हते. अल्पसंख्यांक असलेल्या प्रांतातील मुसलमानांचे पुढारी म्हणूनच जीना दीर्घकाळपर्यंत ओळखले जात असत. परंतु सर्व प्रांतातील मुसलमानांची एकजूट टिकवून धरण्याच्या दृष्टीने त्यांचा चांगला उपयोग होण्यासारखा होता. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य होते तेथील मुसलमानांबरोबर मुसलमानी राजकारणाचे जे लागेबांधे होते ते तोडले गेले. त्यामुळे पाकिस्तानातील राजकारण पुन्हा एकदा प्रांतीयवादाच्या गर्तेत लोटले गेले. केंद्रीय सत्तेविरुद्ध निरनिराळ्या प्रांताच्या ज्या तक्रारी होत्या किंवा केंद्राकडे ते ज्या परस्पर विरोधी मागण्या करीत होते त्यांची तड पाकिस्तानी नेते लावू शकले नाहीत. फार काय पाकिस्तानची राज्यघटना तयार करण्यास देखील त्यांना तब्बल दहा वर्षे लागली.

पाकिस्तानच्या निर्मितीनंतरही जीनांच्या धरसोडीला पायबंध बसला नाही. पाकिस्तान घटनापरिषदेचे उद्घाटन करताना त्यांनी पाकिस्तानात समान नागरिकत्व राहील असे विस्तारपूर्वक सांगितले होते आणि पाकिस्तान हे धर्मनिरपेक्ष राज्य राहील यावर भर दिला होता. परंतु चार महिन्यानंतर म्हणजे डिसेंबर १९४७ मध्ये, अखिल भारतीय मुस्लीम लीगच्या शेवटच्या बैठकीत त्यांनी असे घोषित केले की, पाकिस्तान हे इस्लामी तत्त्वप्रणालीवर आधारलेले मुस्लीम राष्ट्र होणार आहे हे स्पष्ट केले पाहिजे. इस्लाम धर्मात नागरिकत्वाच्या बाबतीत भेदाभेद केला जात नाही. सबंध जग, यात संयुक्त राष्ट्र संघटना देखील आली. पाकिस्तानचा उल्लेख मुस्लीम राष्ट्र म्हणूनच करते.

जमीनदार उद्योगपतींनी प्रस्थापित केलेले आपले भ्रष्ट नेतृत्व पाकिस्तानच्या निर्मितीपासून जुन्याच अल्पसंख्यांकांच्या राजकारणाला अद्यापही चिकटून होते. लोकशाही किंवा प्रातिनिधिक संस्था यांचे त्यांना कसलेही सोयरसुतक नव्हते. संयुक्त पाकिस्तानात बंगाल्यांचे निर्विवाद बहुमत असल्यामुळे या पुढाऱ्यांनी पाकिस्तानात निवडणुकाच होऊ दिल्या नाहीत.

१९५६ च्या राज्यघटनेनुसार पाकिस्तान नॅशनल कौन्सिलमध्ये ४५ टक्के असलेले पश्चिम पाकिस्तानी आणि ५५ टक्के असलेले पूर्व पाकिस्तानी म्हणजे बंगाली यांना समान प्रतिनिधीत्व देण्यात आले होते. पूर्वीच्या इतिहासाच्या संदर्भात बोलावयाचे तर ही तरतूद म्हणजे पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत असे कबूल करण्यासारखेच हे होते. अशा तऱ्हेने पाकिस्तानची निर्मिती झाल्या-बरोबर धर्माधिष्ठित राष्ट्रवादाचा सिद्धांत भुईसपाट झाला. १९५१ च्या जनगणने-नुसार ५६.४० टक्के पाकिस्तान्यांनी आपण बंगाली भाषिक आहोत असे नोंदविले होते, तर केवळ ३.३७ टक्के पाकिस्तान्यांनी आपली मातृभाषा उर्दू असल्याचे जाहीर केले होते. रौनक जहाँ यांनी आपल्या प्रबंधात दाखवून दिल्याप्रमाणे, पाकिस्तान दुभंगण्याचे मुख्य कारण, सत्ताधाऱ्यांनी बहुसंख्य बंगाली जनतेला राष्ट्रीय प्रवाहात प्रभावीपणे सहभागी होण्याची संधी नाकारली हे होते. बांगला देश फुटून निघाल्यानंतर प्रांतिक स्वायत्तता आणि केंद्रीय शासनाचे अधिकार यासंबंधी निर्माण झालेल्या गंभीर समस्यांना पाकिस्तानला तोंड द्यावे लागत आहे.

प्रतिगामी मुस्लीम नेत्यांनी संघराज्याच्या कल्पनेला सतत विरोध दर्शवून भारताच्या विभाजनाच्या विविध योजना पुढे मांडल्या. अशा विभक्तीकरणाने मुसलमान समाजाच्या पदरात जास्त सवलती पाडून घेता येतील अशी त्यांची समजूत होती. ज्या प्रांतात मुसलमान बहुसंख्य होते ते प्रांत संपूर्णपणे पाकिस्तानात समाविष्ट झाले पाहिजेत अशी तर त्यांची मागणी होतीच, पण त्याशिवाय काही विभाग तेथे मुसलमान संस्थानिक होते म्हणून, तर वऱ्हाड आणि कर्नाटक मुसलमान राज्यकर्त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीकडून जिंकून घेतले असल्यामुळे त्यांचा समावेशही पाकिस्तानात झाला पाहिजे अशी त्यांची मागणी होती. आसामात निर्वासितांचे लोंढेच्यालोंढे घुसविण्याच्या योजनाबद्ध धोरणामुळे आसाममध्ये मुसलमानांची लोकसंख्या झपाट्याने वाढत होती म्हणून आसामही त्यांना पाकिस्तानात हवा होता. म्हणजे 'माझे ते माझे आणि तुझे तेही माझे' अशा प्रकारच्याच विभाजनाच्या सर्व योजना होत्या. या सर्व योजनांचा रोख एकात्म राष्ट्रवादाविरुद्धच केवळ होता असे नव्हे तर लोकशाही आणि जनतेचे सार्वभौमत्व यांच्या मुळावरच घाव घालणारा होता.

बांगला देश विभक्त झाल्यानंतरही उर्वरित पाकिस्तानपुढे प्रांतिक स्वायत्तता आणि केन्द्र सरकारचे अधिकार याबाबत घटनात्मक प्रश्न उभे राहिले होते. १५ सप्टेंबर १९७२ च्या एका जाहीर भाषणात अध्यक्ष भुत्तो म्हणाले "स्वायत्तता आणि फुटीर-तेची मागणी यात फार सूक्ष्म फरक आहे. ज्यांना फाळणी हवी असते ते आपली मागणी आपल्याला फक्त स्वायत्तता हवी आहे असे म्हणतात. केंद्र सरकारकडे फक्त परराष्ट्र व्यवहार, संरक्षण आणि अर्थ एवढीच खाती ठेवली तर त्याची स्थिती एकाद्या निराधार विधवेसारखी होईल. जगात कोठेही केन्द्र सरकार एवढे दुबळे असलेले आढळणार नाही."

कॅबिनेट मिशनची योजना कॉंग्रेसने स्वीकारली असती, तर भारताचे ऐक्य टिकवून धरता आले असते असे आजही जे भाबडेपणाने मानीत असतात त्यांना मुसलमानी नेत्यांच्या वरील कारवाया आणि भुत्तोंची टीका हे चपखल उत्तरच नव्हे काय?

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ६.